
# प्रबोधनकार ठाकरे समग्र वाङ्मय

## खंड पाचवा



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# प्रबोधनकार ठाकरे
# समग्र वाङ्मय

## खंड पाचवा

संपादक

श्री. पंढरीनाथ सावंत

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

**प्रथमावृत्ती :** जानेवारी, २००७.

**प्रकाशक :**
सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई ४०० ०१४.

© **प्रकाशकाधीन**

**मुद्रक :**
व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
मुंबई ४०० ००४.

**मूल्य :**
रुपये १७०/-

# निवेदन

महाराष्ट्राने भारताला नेहमीच परिवर्तनाची दिशा दिली आहे. जिद्दीने आणि चिकाटीने अविरतपणे सहकार्य हाती घेऊन त्यासाठी जीवन वेचणारी नररत्ने याच भूमीत तेजाळून निघाली आहेत.

मराठी भाषेचा, साहित्याचा आणि वक्तृत्वाचा देदीप्यमान आविष्कार प्रबोधनकार ठाकरे यांच्या शैलीत दिसून येतो.

प्रबोधनकार ठाकरे मराठी अस्मितेचे वीर शिरोमणी आहेत. अत्यंत परखड भाषेत सडेतोड विचार मांडण्याची त्यांची खास शैली अद्वितीय आहे.

प्रबोधनकारांचे शतक सर्वत्र झुंजण्याचे, लढण्याचे शतक होते. प्रबोधनकारांच्या "एकलुहारकी" या बाण्याने त्यांनी अनेक घाव केले. आज सामाजिक परिवर्तनाची जी गोड फळे आपणांस दिसत आहेत, समाजमनाची जी वैचारिक पातळी दिसते आहे, त्यात प्रबोधनकार ठाकरे यांची भूमिका फार महत्त्वाची आहे. त्यांच्या लिखाणाला सामाजिक क्रांतीच्या इतिहासात महत्त्वपूर्ण स्थान आहे. मार्गदर्शक समाजक्रांतीकारांचा हा दस्तावेज आपल्या हाती देताना महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाला आनंद होत आहे.

आम्ही स्वत: प्रबोधनकार ठाकरे यांचे घणाघाती वक्तृत्व ऐकले आहे. त्यांच्या साहित्याचे मनन परिशिलन केले आहे.

पत्रकार पंढरीनाथ सावंत यांनी प्रबोधनकारांच्या अपूर्व निष्ठेतून त्यांच्या समग्र साहित्याच्या संपादनाचे कार्य घेतले. त्यांच्या अथक परिश्रमातून मराठी भाषेचे हे 'देशीकार लेणे' साकारले आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे प्रभारी सचिव, श्री. उ. बा. सूर्यवंशी; श्री. प्र. शं. मोरे, संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय तसेच श्री. ज. शं. साळवी व श्रीमती छा. दि. गोडांबे आणि मंडळाचे कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले, त्याबद्दल आभार.

**प्रा. रतनलाल सोनग्रा,**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

मुंबई,
दिनांक २९ डिसेंबर २००४.

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥
हें प्रचीतीचें बोलणे । विवेकें प्रचीत वाणें ।
प्रचीत पाहतील ते शहाणे । अन्यथा नव्हे ॥ श्री समर्थ

# ग्रामण्यांचा साद्यंत इतिहास

अर्थात

# नोकरशाहीचें बंड

मुख्य संपादक
**केशव सीताराम ठाकरे**
वक्तृत्वशास्त्र, कोदण्डाचा टणत्कार, कुमारिकांचे शाप,
Life & Mission of Ramdas इ. पुस्तकांचे कर्ते

मदतनीस संपादक
**विनायक सीताराम जयवंत**

सन १९१९ इ.

प्रकाशक
**यशवंत शिवराम राजे**
लेडी जमशेटजी रोड, सोराब मिल लेन,
मिरांडाची चाळ, दादर (मुंबई)

किंमत
कापडी बांधणीची प्रत रु. १–१३–०
कागदी बांधणीची प्रत रु. १–०–०

एन ४०२०–१

# ग्रामण्यांचा साद्यंत इतिहास

अर्थात

# नोकरशाहीचें बंड

## प्रकाशकाचे दोन शब्द

जाती मत्सराने महाराष्ट्राचे अपरिमित नुकसान केले आहे. हाच प्रकार या उप्पर तसाच चालू राहणे बरे नव्हे, म्हणून त्याचे खरेखुरे राक्षसी स्वरुप देशबांधवांसमोर मांडण्यास ते या निरर्थक वादापासून देशाचा बचाव करण्याचा काही तरी योग्य मार्ग शोधून काढतील, या आशेने हे ऐतिहासिक महत्त्वाचे पुस्तक प्रसिद्ध करण्यात येत आहे. जातिमत्सराचा नायनाट होऊन आमच्या सर्व देशबंधूंची मने एक देशीयत्वाच्या उज्ज्वल विचारांनी भरुन यावी ; निरनिराळ्या जातींची सामाजिक व धार्मिक बाबतींतील मनुष्यकृत कृत्रिम बंधने शिथिल व्हावी, निदान राष्ट्रीय कामगिरीत एका आईची सर्व लेंकरे या नात्याने प्रयत्न करण्याच्या कामात त्यांचा अडथळा उत्पन्न होऊं नये इतकी तरी त्याची व्याप्ती संकुचित व्हावी आणि ऐनकेन प्रकारेण परस्परांचा काया वाचा मने द्वेष करण्याची कबुली अतःपर कोणांतही उत्पन्न होऊं नये. हा या पुस्तक प्रकाशनाचा मुख्य उद्देश आहे. या पुस्तकात ऐतिहासिक सत्याचे निरूपण स्पष्ट केले आहे. रुचिभिन्नत्वाने ते कित्येकास आवडेल, कित्येकांस आवडणार नाही. त्याला आमचा इलाज नाही. आम्हाला पुणे भारत इतिहास-संशोधक मंडळासारख्या अहंपणाचा ताठा मिरविण्याचा अधिकार नाही किंवा इच्छाही नाही. पुस्तकात नजरचुकीने किंवा अन्य कारणाने इतिहासविषयक काही चुका किंवा विधाने कोणी विद्वजनांनी सप्रमाण नजरेस आणून दिल्यास त्यांचा आम्ही साभार स्वीकार करूं आणि दुसऱ्या आवृत्तींत ती सुधारणाही करूं. प्रस्तुत पुस्तकावर नियतकालिकांत टीका किंवा चर्चा करणारांनी कृपा करून त्या पत्राचा अगर मालिकाचा अंक आमचेकडे अवलोकनार्थ पाठविण्याची मेहेरबानी करावी. वास्तविक शिष्टसांप्रदायाप्रमाणे हे काम त्याच प्रकारचे असते. पण इतकी उदारमनस्कता आमच्या पत्रकारांत मुळीच आढळून येत नाही. फार काय अंक पाठविण्याबद्दल पत्राने विनंती केली असतानाही त्याचे उत्तर मिळत नाही.

उपोद्घाताकरिता लिहिलेला बराच मजकूर पुस्तकांची पृष्ठसंख्या अवसानाबाहेर वाढल्यामुळे आयत्यावेळी बाजूला ठेवावा लागला याबद्दल फार दिलगीर आहोत. मराठेशाहीतील व विशेषतः पेशवाईतील मोठमोठ्या पुस्तकांची स्वभावचित्रे त्यांची धोरणे ; त्यांची परस्परांविषयींची स्पर्धा आणि त्यांचा राष्ट्रावर झालेला परिणाम यांविषयी रा. ठाकरे यांनी केलेली साधार व सोपपत्तिक चर्चा वास्तविक याच पुस्तकात यायला हवी होती. परंतु नाईलाज आहे. मजकूर बराच मोठा असून त्याचे एक स्वतंत्र पुस्तक आम्ही लवकरच छापून प्रसिद्ध करणार आहोत. त्यातून सध्या ऐतिहासिक व्यक्त्यांच्या बाप्तिस्म्यांचा धुमाकुळ सुरू झाला आहे. सावित्रीबाई ठाणेदारणीला कोणी कायस्थ ज्ञातीतून चित्पावन ज्ञातीत ढकलीत आहेत. कोणी तिला कादंबरीतील नायिका म्हणत आहेत, कोणी नाना फडणीसांच्या अंतःकरणाच्या खाणीतून कोहीनुरांचे ढीगच्या ढीग बाहेर काढीत आहेत, कोणी त्यांच्या मनोमय भूमिकेवर नक्षीदार गालीचे पसरविण्याच्या गडबडीत आहेत, कोणी गोपीनाथ पंत बोकीलाला शिवाजीची चिटणीशी वतन बहाल देण्याच्या धामधूमीत आहेत, कोणी हेमाडपंतालाही ब्राह्मणी पोशाख चढविण्याच्या तजविजीत आहेत ; तर कोणी

मराठ्या आठवल्याला चित्पावनी बाप्रिस्या देण्याच्या खटपटीत आहेत. असा मोठा ऐतिहासिक क्रांतीचा काळ आलेला आहे. तेव्हा या भानगडीत काय काय उलाढाल्या होतील ते पाहिले पाहिजे. न जाणो अफजलखान हा शिवाजीचा मामा ठरण्याचा बराच संभव आहे. कारण कृष्णाने कंस मामाला ठार मारले म्हणून आणि मुरारबाजी हा चित्पावन असल्याचाही दस्तऐवजी पुरावा सापडणार नाही कशावरून ? ही सगळी धामधूम किंचित शांत झाली म्हणजे निवांतीने वरील पुस्तक आम्ही प्रसिद्ध करू.

सरतेशेवटी ज्या ज्या विद्वान मंडळींनी या पुस्तकाच्या बाबतीत मदत केली त्यांचे, ज्या विद्वान ग्रंथकारांच्या ग्रंथांच्या ठिकठिकाणी पुरावा घेण्यात आला आहे, त्यांचे व तत्वविवेचक छापखान्यातील मालक व सर्व कामगार लोक यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानतो.

बुधवार, आषाढी एकादशी<br>शके १८४१, तारीख ९ जुलै १९१९ इ.<br>दादर, मुंबई.

सर्वांचा नम्र लेखक<br>यशवंत शिवराम राजे<br>प्रकाशक.

## अनुक्रमणिका


| | | पृष्ठे |
|---|---|---|
| | उपोद्घात | ९ ते ४४ |
| १ | चांद्रसेनीय कायस्थ प्रभू | ४५ ते १४२ |
| २ | क्षत्रिय मराठे | १४३ ते १६५ |
| ३ | पंचाल (दैवज्ञ) ब्राह्मण | १६६ ते १७६ |
| ४ | शु. यजुर्वेदी वाजसेनेय ब्राह्मण | १७७ ते १८७ |
| | **परिशिष्ट** | |
| ५ | चित्पावनांचा इतिहास | १८८ ते २०० |

॥ श्री ॥

# ग्रामण्यांचा साद्यंत इतिहास
# अर्थात्
# नोकरशाहीचे बंड

## उपोद्घात

लेखक : केशव सीताराम ठाकरे

जगांतील कोणच्याही धर्मात पश्चातापाचें महत्त्व फार आहे. कृतकर्माचा उच्चार होऊन त्याबद्दल पश्चाताप झाला, म्हणजे मनुष्य पुनित होतो, तो ते कर्म पुनश्च सहसा करीत नाहीं, आणि तो पश्चाताप जर खरोखरी नाटकी नसेल तर कृतकर्माची व मनुष्याची पुन्हा यावज्जीव गांठ पडत नाहीं. परंतु पश्चाताप व्हायला तरी पदरीं कांही पुण्याई लागते म्हणतात त्यांतून कृतकर्माच्या पातकांची स्मृति होणें, हे देखिल मनाच्या शुद्धतेचें द्योतक समजलें जातें. कृतपापाची तंतोतंत मोजदाद ठेवून त्याची वारंवार आठवण देण्याचे पुण्य कृत्य गतकालाचा इतिहांस निस्पृहनाणें करीत असतो. उत्क्रांत्यवस्थेच्या प्रवासांत मानवी पायांना गतकालीन पातकांच्या धोंड्यांवर ठेचाळण्याचा वारंवार प्रसंग येऊं नयें म्हणून हाच इतिहास गतानुभवाची दिवटी घेऊन मानवी सृष्टीच्या पुढें पुढें हुजऱ्याप्रमाणें नांचवित असतो. पारमेश्वरी दिव्य इच्छेचें गूढ तत्त्व बरोबरसें नीट न उमगल्यामुळें मनुष्यांच्या हांतून जीं घोर अमानुष कृत्यें घडतात, तीं पुन्हा घडूं नयेत म्हणून हाच इतिहास वेळप्रसंग साधून मानवांच्या कृतपापाचा घडा त्यांच्या थोबाडांवर निर्भिडपणानें घडाघडा वांचून दाखवून, त्यांची कानउघाडणी करतो. भूतकाळामधे घडलेल्या क्षुल्लक चुकीचा भयंकर परिणाम वर्तमानकालीन मानवांना स्पष्टस्पष्ट पणें सांगून त्यांच्या विचारयंत्राला नियंत्रित करण्याची कामगिरी हाच इतिहास सांगत असतो. भूतकालांतील पापांचे पर्वत तुमच्या डोळ्यांपूढें. मूर्तिमंत आणून उभे करणारा आणि ' पहा, या उपर तुम्ही जर आपलें वर्तन नीट सुधारलें नाहींत, तर हेच पर्वत मी साऱ्या जगाच्या प्रदर्शनांत मांडून तुमच्या बदनामीचा डंका पिटीत राहीन ' म्हणून सडेतोड दम भरणारहि इतिहासच. कृतपापावर जाणून बुजून पांघरूण घालणाऱ्या आणि डोळ्यांवर कातडें ओढून पुण्याईचा तोरा मिरविणाऱ्या दांभिकाच्या मुस्कटांत भडकावून, ' चल चोरा ! पापाचे माप भरल्याशिवाय पुण्याईच्या गप्पा मारतोस ? ' अशी खरमरीत तंबी बिनमुर्वत देणारा इतिहासच. खऱ्याला खोट्याचा आणि खोट्याला खऱ्याचा मुखवटा घालून आडमार्गांत ऐतिहासिक विश्वामित्री सृष्टींचें ठाणें देऊन वेळोंवेळी डाकेखोरपणा करण्यास सवकलेल्या बिलंदाज टगांचे राजवाडे हुडकून काढणारा पटाईत डिटेक्टीव इतिहासच. पापांचे माप पदरांत बांधण्यात इतिहास जितका निर्दय आणि निस्पृह आहे, तितकाच पुण्यांची गांठोडी घेऊन अडीअडचणीच्या वेळी मदतीस धांवण्याइतिका तो मनाचा उदारहि आहे. बिकट परिस्थितीच्या उलट्या लाटा नांकातोंडात पाणी कोंबून राष्ट्राचा जीव गुदमरून टाकूं लागल्या कीं प्राचीन संस्कृतीच्या पुण्याईचा '' लाईफ् बोय् '' घेऊन

इतिहास पाठीमागें त्यास हात देण्यास दत्त म्हणून उभाच असतो. राजकीय किंवा धार्मिक जुलमांची तात राष्ट्राच्या मानेला लागतांच, प्राचीन संस्कृतीच्या व अनुभवाच्या तीव्र शस्त्रांनें ती तात ताडकन् तोडून राष्ट्राचा कांसावीस झालेला जीव वांचविणारा कोण ? इतिहासच. पोटांत एक आणि ओठांत एक अशा दांभिक गारुड्याच्या चल्चल् मदारीच्या हातचलाखीने खोट्यानाट्या कल्पनांची धूळ डोळ्यांत गेल्यामुळें राष्ट्र जेव्हां डोळें चोळूं लागतें आणि आत्मविनाशक शाबरी मंत्र्यांच्या 'पासेस' मुळें त्यांची आत्मविश्वासशक्ती लंजूर होऊन त्याची प्राणज्योत मिणमिण करूं लागते, तॆहां केसरीवत् गर्जना करून त्या डोंबाऱ्याच्या पांतड्यावर झडप घालून त्याची हाडके नरम करणारा आणि राष्ट्राच्या कानांत त्याच्या पूर्वसंचिताचा दिव्य मंत्र फुंकून त्याला निमिषार्धांत सचैतन्य करणारा इतिहासाशिवाय दुसरा अश्विनीकुमार कोंण ?

२. सत्कृत्यांचा योग्य तो अभिमान असणें आणि त्यांचा निरंतर उपचार करून स्तुति करणें हें जितकें स्वाभाविक आहे, तितकेंच दुष्कृत्यांकडे कानाडोळा करणें हेंहि अस्वाभाविक नाहीं. हा मनुष्याचा स्वभावच पडला. परंतु उत्क्रांतीतत्त्वाला पातकांचा उच्चार आणि तत्संबंधीं पश्चाताप हीं जितकीं पथ्यकारक होतात, तितका सत्कृत्यांचा जयघोष उपयोगी पडत नाहीं पुराणकालाबद्दल फाजील अभिमान बाळगून **जुनें तितकें सोनें** अशा प्रवृत्तीमुळें राष्ट्राच्या भूतकालीन् पातकांवर पांघरून घालणे म्हणजे नव्या मन्वंतराच्या नव्या आशिर्वादास आम्ही कुपात्र आहोत, अशी जबानी देणेंच होय. प्राचीन ग्रीक व रोमन राष्ट्रांच्या वैभवाबद्दल, बुद्धिमत्तेबद्दल आणि संस्कृतीबद्दल योग्य तो आदर राखून, त्यांच्या हातून जाणूनबुजून अथवा नकळत घडलेल्या पातकांची शक्य त्या निस्पृहतेनें छाननी केल्यामुळेंच आज पाश्चात्य राष्ट्रें लक्ष्मीसरस्वतीच्या प्रसादास पात्र झालीं आहे. खुद्द इंग्लंडकडे जरी पाहिलें तरी तेथील लोकांच्या राष्ट्राभिनाची मुळतत्वें त्यांनीं जरी अभंग ठेविलीं आहेत तरी सुद्दां त्यांच्या प्राचीन इतिहासांतील कृष्णकृत्यांचा खरमरीत निषेध करण्याला त्यांची मनोदेवता किंचित सुद्धा कचरत नाहीं. एलीझाबेथ राणीच्या कारकीर्दीत ब्रिटीशांच्या नव्या मन्वंतराचा उदय झाला, म्हणून तिच्या चरित्राकडे ब्रिटन लोक जितक्या अभिमानानें पहातात व त्याचे स्तुतिपाठ गातात, तितक्याच किंबहुना अधिक तीव्रतेनें त्याच राणीच्या अंमदानींत बोकाळलेल्या ढोबळढोबळ अनीतीमूलक गोष्टींचे बाभाडे काढायला त्यांची सत्यप्रियता मुळींच मागेंपुढें पाहत नाही. प्रजासत्तक राज्यपद्धतीचे उद्धारक म्हणून अग्रेसरत्वाचा धौशा चौखंडीं गाजविणारे अमेरिकन लोक, गुलामगिरीच्या व्यापाराचा प्रश्न डोळ्यांपुढें येतांच त्याचा तितक्याच जोरानें निषेध करायला ते अझूनही दिक्कत बाळगीत नाहींत ; उलटपक्षीं त्या काळ्याकुट्ट इतिहासांतील बारीकसारीक बाबतींचें संशोधन करण्यात ते अझुनहि अविश्रांत श्रम करीत असतात. दिव्याखाली अंधेर हा असावयाचाच. परंतु जेव्हां एखादे राष्ट्र दिव्याच्या उजेडाचाच इतिहास तेवढा पुढें आणतें आणि अंधाराबद्दल जाणूनबुजून अज्ञान दाखवितें, तेंव्हां तें राष्ट्र-त्याची प्राचीन संस्कृति कितीहि उज्वल असो–नवीन मन्वंताराच्या प्रसादाला पात्र होणें कधींहि शक्य नाहीं असे ठाम समजावें.

३. महाराष्ट्राच्या इतिहासांतील ग्रामण्याचा इतिहास हा एक काळाकुट्ट परंतु अत्यंत महत्वाचा भाग आहे. ग्रामण्यांचा इतिहास महाराष्ट्राच्या राष्ट्रीय, धार्मिक, सामाजिक

दिव्याखालचा अंधार आहे. हा इतिहास हें एक कटुतम सत्य आहे. या सत्यावर मुद्दाम घालून ठेवलेलें अनुपलब्धतेचें आणि क्षुल्लकपणाचें पांघरूण आमच्या राष्ट्रीय आकांक्षाचे पाय मधूनमधून खोलावर ओढीत नेत असतात. आमच्या आकांक्षारूपी गजेंद्राचा पाय या ग्रामण्यांच्या नक्रानें पकडला आहे ; परंतु आपला पाय कोण व कां ओढीत आहे याची जाणीव आम्ही नीट न ओळखल्यामुळे भगवंतालासुद्दां आमच्या हाका आरोळ्यांना उत्तर देण्याची पंचाईत पडली आहे. पाश्चात्य देशांतील गुलामांच्या व्यापाराचा इतिहास वाचणाऱ्या पुष्कळ महाराष्ट्रीय इतिहासवाचकांस कदाचित् कल्पनाहि नसेल की गुलामगिरीच्या अमदानींत सुधारकपणाची शेख मिरविणाऱ्या पाश्चात्यांच्या हांतून जीं अमानुष कृत्यें घडलीं, त्यापेक्षां अधिकपटीनें हलकट पशुवृत्तीचें वर्तन आमच्या महाराष्ट्रांतील राष्ट्रधुरीणांच्या आणि धर्मसंरक्षक (?) वर्गाच्या हांतून घडलेलें आहे. अर्थात या पातकाला चव्हाट्यावर बांधल्याशिवाय त्याच्या पुनरावृत्तीचा बंदोबस्त करणारा '' दवा '' कोण कसा सांगू शकेल ? म्हणून आम्हीं हा राष्ट्राच्या सडक्या भागाचा इतिहास–आमच्या महाराष्ट्रांचें हें राष्ट्रीय दुखणें आतां चव्हाट्यावर बांधण्याचा उपक्रम करीत आहोंत.

४. ग्रामण्य शब्दाची व्युत्पत्ति जर शोधली तर हा शब्द धेडगुजरी दिसतो ; म्हणून सर्वमान्य शब्दकोशांत अझून त्यास मिळावें. तें स्थान देण्यांत आलेलें नाहीं. याचें कारण असें आहे कीं ' ग्रामण्य ' या शब्दाचा इतिहास जसा अतिव्यापी तसा त्याचा अर्थसुद्धां अतिव्यापी आहे. ग्रामण्य म्हणजे बहिष्कार असा अर्थ एका मराठी कोशाकारानें दिलेला आहे. परंतु बहिष्कार म्हणजेच ग्रामण्य जर मानलें तर ' स्वदेशी चळवळीनें इंग्रजी व्यापारावर ग्रामण्य उभें केलें ' अशी वाक्यरचना करायला हरकत नसावी. पण त्याला कोणी ग्रामण्य म्हणत नाहीं. ग्रामण्य शब्द ऐकतांच मनांत ज्या ज्या कल्पना उद्भृत होतात, त्या त्या सर्व एक शब्दांत व्यक्त करून दाखविणारा शब्द ग्रामण्याशिवाय खुद्द मराठीत नाहीं, मग इतर भाषांची तर गोष्टच नको ! ग्रामण्य म्हणजे ग्रामण्य !!

व्युत्पत्तीच्या काथ्याकुटांतून मोकळे होऊन आपण जर ग्रामण्याच्या प्रत्यक्ष स्वरूपाकडे दृष्टी फेंकली तर त्यांत ' वेदोक्ताचें बंड ' हें एक मूळ खूळ आहे, असें आपल्याला दिसेल. फार काय पण ग्रामण्याच्या एकंदर व्याप्तीची जर कसोशीनें आणि चौकस बुद्धीनें आपण पाहणी केली नाहीं, तर ग्रामण्याच्या पितृव्याचा आरोप वेदोक्तावर करण्याचा कदाचित् आपणांस मोह पडेल. वेदोक्त आणि ग्रामण्य हे दोन शब्द दुर्दैवानें इतके जवळ जवळ आणून भिडविले आहेत कीं ते परस्पराचे अनुषंगीच आहेत असाहि आपल्याला भास झाल्याशिवाय रहात नाहीं. वेदोक्ताचें बंड धार्मिक क्षेत्रांतलें आहे. मग ग्रामण्याचें बंड शुद्ध धार्मिक बंड म्हणावें तरी पंचाईत आहेच ! कारण त्याच्या पायाचा शोध केला तर त्यांत कितीक तरी मोठमोठे चिरे सामाजिक आणि राजकीय खाणींतले दिसतात. बरें, तें सामाजिक म्हणावें तर धार्मिक क्षेत्रांतल्या सोंवळ्या धाबळ्या, जानव्यांचीं भेंडोळीं आणि गोमुत्राचे घडे यांचा सांवळा गोंधळ पाहून तसेंहि म्हणण्यास मनुष्य कचरतो. राजकीय बंड म्हणावें तर आजपर्यंत ग्रामण्याचा एकहि चळवळ्या छत्र मोर्चेले

उडवीत, सिंहासनाधिष्टित शककर्ता झाल्याचें इतिहासांत नमूद नाहीं उलट राजकीय चबुतऱ्यावरून ग्रामण्यांच्या धुडगुसाकडे पाहूं लागले तर ही सारी भानगड सामाजिक स्पर्धेची आहे असें दिसतें–क्षत्रिय आणि ब्राह्मण या दोन प्रमुख समाजांतला् हा तंटा आहे, यांत राजकीय भानगडीचा अंशहि नाहीं, असेंहि दिसून येतें. राजकीय भानगड किंवा सत्ताधाऱ्यांची लुडबूड मुळींच नव्हती असेंहि विधान करणें धोक्याचें आहे ; कारण ग्रामण्यांच्या सणंगातून राजकीय रेशमी धागे इतर सामाजिक आणि धार्मिक धाग्यांच्या बरोबरीनें सरसहा गुंफलेले स्पष्ट दिसतात. एकूण ही ग्रामण्याची भानगड अंजिरी रंगाच्या शालूसारखी आहे असें म्हणणें प्राप्त आहे. तिच्या हालचालीच्या प्रत्येक झुकण्याबरोबर निरनिराळे तऱ्हेतऱ्हेचे रंग प्रेक्षकाच्या नजरेस येतात ; अर्थात् ती अमूकच एका विवक्षित रंगाची आहे असें धाडसी विधान न करिता, ती सर्वरंगपरिपूण आहे, असें म्हणून आपण पुढें प्रयाण करावें हेंच बरें !

५. सांप्रत सर्व भरतखंडावर नव्या मन्वंतराचा उषःकालीन् प्रकाश पडला असून, राष्ट्र खडबडून जागें झालें आहे.

'' प्रचलित मनु-संदेश ऐकुनी थरारला देश। ''
'' अझुनी आम्हीं कां न त्यजावा उदासीन वेष॥ ''

अशा प्रकारचे जागृतीचे दिव्य संदेश देशाच्या कोनाकोंपऱ्यांतसुद्धा आपल्या गभीर ध्वनींचा पडसाद उमटवीत आहेत. या अवाढव्य हिंदी द्वीप-कल्पाच्या असंख्य प्रांतांतील नानाविध जातींचीं मनें एकाव्यापक राष्ट्रीय ध्येयाच्या बिंदूवर अगदीं खिळून राहिलीं आहेत. हिंदु आणि मुसलमान, ख्रिस्ती आणि पारशी, जैन आणि लिंगायत अशा प्रकारची भाषा आतां पाठीमागें पडून तिचें ठाणें हिंदी देशबांधव या शब्दप्रयोगानें पटकाविलें आहे.जातिभेदाचे अभेद्य तट फोडण्यास कंबर कसून सरसावलेले पाथरवट व सुरुंग्ये तटाची क्षुल्लक कपरीहि फोडूं न शकल्यामुळें जरी हताशवदन झाले, तरी त्यांनीहि आतां या नवीन मन्वंतरांत जातिभेदाच्या शनिवार वाड्याचा तट राहिला तर राहो, पण निदान तटाभोंवती जातिमत्सराच्या होळ्या पेटवून आपल्या असूयेचा शिमगा करून घेऊं नका, म्हणून जाहीरनामे काढिले आहेत. ज्या ज्या समाजांनीं गेल्या दोन दशकांत असूयेच्या चुडी हातांत घेऊन महाराष्ट्राच्या महत्वाकांक्षेच्या टोलेजंग प्रासादास चोहींकडून आग लावण्याचा उपक्रम केला, तेच समाज आजच्या राष्ट्रीय उत्क्रांतीच्या महापर्वणींत सर्व राष्ट्राला वंदन करून '' राष्ट्रायै स्वाहा इदंराष्ट्र इदन्न मम ''म्हणून आपल्या द्वैतभावाची आहुती राष्ट्रकार्याच्या कुंडांत देत आहेत. पाश्चिमात्य राष्ट्रांत राजकीय क्रांतीचा थयथयाट सुरूं असून, वातावरणाच्या लहरी त्या कालिकानृत्याचा दणदणाट हिंदुस्थानाच्या किनाऱ्यावर हरघडी आणून आदळीत असल्यामुळें, इकडील मंडळींच्या वृत्ति चैतन्यपूर्ण होऊं लागल्यास आश्चर्य तें काय ? स्वयंनिर्णयासारखी सत्ययुगांतील तत्त्वें चालूं कलियुगात सुद्धां अवतरलेली पाहून ' कली ' चें काळें करून त्याठिकाणीं ' सत्य ' शब्द कोणी घातल्यास या अदलाबदलीचा पुसट संशयसुद्धां कोणास येणार नाहीं. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे राष्ट्रीयत्वाचा खरा अर्थ हिंदुस्थानांतील यच्चावत् जनतेच्या खालच्या थरापर्यंत–कोणाला

समजो वा न समजो–आजकाल राष्ट्रीयत्वाचा चौघडा वाटेल त्या कोंपऱ्याला कान द्या तेथून ऐकूं येतच आहे. शुद्रातिशुद्रांच्याहि पंक्तिस बसायला आम्ही तयार आहोंत, असे शेकडो सह्यांचे जाहीरनामे उच्चवर्णांतील (?) ब्राह्मणलोक अज फडकावीत आहेत. अशा परिस्थितींत हें तुमचें ग्रामण्याचें बंड कशाला उपस्थित करतां ? त्याचें आतांच काय नडलें आहे ? ही खाजवून खरूज काढण्यांत काय हांशील आहे ? अशा प्रकारचे प्रश्न आम्हांला विचारण्यांत येत आहेत व येतीलहि.

प्रश्न दिसण्यांत गोंडस आणि विचारक्षम दिसतात खरे आणि ते विचारणारांच्या सद्धेतूबद्दल साशंकता धरणें हें महत्पाप आहे, हें आम्हाला कळत आहे. परंतु विचारणारांनीं एकंदर परिस्थितीचा करावा तितका विचार केलेला नसल्यामुळें, सद्विचारांचा झटक्यासरसे हे प्रश्न त्यांना सुचणें फारसे अस्वाभाविक नाहीं. एकतर ऐतिहासिक दृष्ट्या या ग्रामण्यांच्या इतिहासाचें महत्व या पृच्छकांना नाकबूल करून तर चालायचेंच नाहीं. दिव्याच्या उजेडाच्या एतिहासाबरोबरच त्याच्या अंधाराचाहि इतिहास पुढें आला पाहिजें, हें त्यांना मान्य केल्याविना सुटकाच नाहीं ; नाहींतर आमच्या इतिहासाचें एक अंग अर्धांगवायूनें लुलें पडलेलें आहे इतकें तरी उघडपणें संकोच न धरितां इतिहासाच्या शिरोभागीं नमूद करून ठेवलें पाहिजे ! मग असला लुलापांगळा एकांगी इतिहास असला काय आणि नसला काय सारखाचव !!

चांगल्या गोष्टींपेक्षा वाईट गोष्टींच मनावर उपदेशाचा विशेष परिणाम करितात. कॉमेडीपेक्षां ट्रॅजेडीच जास्त परिणामकारक होते. आपल्या राष्ट्रीय इतिहासांतील चांगला भाग अधिकाधिक उज्वल करणें जसें आपलें कर्तव्य आहे, त्याचप्रमाणें त्यांतले वाईट भाग आपल्या प्रत्यक्ष वर्तनानें सुधारून त्याऐवजीं चांगल्या शतकृत्यांची भर घालणें हेंहि आपलें अनिवार्य कर्तव्यच आहे. राष्ट्राचा किंवा समाजाचा इतिहास सर्वांगसुंदर करण्याचा हाच एक मार्ग आहे ; दोष लपवून सद्गुणांचाच नेहमीं पाढा वाचणें हा नव्हे ! गतकालांतील सामाजिक किंवा राजकीय पातकांना चव्हाट्यावर आणण्याचे नीतिधैर्य ज्या राष्ट्राला नाही, त्यानें आजन्म इतर सुधारक राष्ट्रांच्या कोंपरखळ्या खातच कोठेंतरी कानाकोंपऱ्यांत पडून राहिलें पाहिजे.

६. वाईट गोष्टींचें उच्चाटन करण्यास कचरणारी मंडळी संस्कृतीच्या महत्वाचा मुद्दा नीटसा लक्षांत घेत नाहींत. कोणत्याहि राष्ट्राचा, त्यांतील निरनिराळ्या समाजांच्या संस्कृतीचा इतिहास पहावयाचा असेल तर त्या राष्ट्राच्या गुणदोषांची समप्रमाणांत छाननी झालीच पाहिजे. काळाच्या प्रवाहामुळें राष्ट्र नवीन नवीन अनुभवानें कितीहि उन्नत झालें आणि दुसऱ्या अनेक राष्ट्रांच्या निकट परिचयामुळें त्याच्या सर्व कल्पनांत कितीही क्रांती झाली, तरी त्याच्या भवितव्यतेचा ताळा पडताळून पहाण्यास त्याच्या मूळ संस्कृतीचा सर्व इतिहास नीट अवगाहन करावा लागतो युरोप खंडांतील सुधारणेचा आणि शिक्षणाचा आशिया खंडांतील राष्ट्रांनीं कितीहि पूर्णपणें स्वीकार केला, तरी त्यांचा परिणाम दोनहि खंडांतील राष्ट्रांवर सारख्याच प्रमाणावर होणें शक्य नाहीं. औषध जरी एकच असलें, तरी प्रत्येक व्यक्तीच्या प्रकृतिमानाप्रमाणेंच त्याचा परिणाम घडून यायचा. व्यक्तीची प्रकृति आणि राष्ट्राची संस्कृति ही जवळजवळ

सारखीच. त्याचप्रमाणे बदललेल्या मनूप्रमाणें नव्या मन्वंतराचे संदेश जरी एकाच सांच्यांत आणि एकच स्वरांत सर्व समाजांच्या तोंडांतून एकसमयावच्छेदेंकरून उमटत असले, तरी त्या संदेशाची प्रत्यक्ष अंमलबजावणी व्हायच्या वेळीं प्रत्येक समाज आपापल्या बऱ्यावाईट पूर्व संस्कृतीच्या वळणावर गेल्याशिवाय खास रहात नाहीं. हा निसर्गाचा नियम असो वा नसो; इतिहासाचा अनुभव मात्र असा आहे खरा.

७. ग्रामण्याच्या इतिहासानें एक गोष्ट मात्र स्पष्ट रीतीनें सिद्ध केली जाईल, ती हीच कीं गतकाळच्या इतिहासांत ज्या ज्या समाजांनीं या देशाच्या राजकीय क्षेत्रांत काहीं नांव कमाविलें, त्यांची वैयक्तिक प्रवृत्ति आणि विशेषतः संस्कृति काय होती, याची वाचकांना चांगली खात्री पटेल. सध्यां एकदेशीयत्वाचें वारे आसेतूहिमाचल भरारा वाहत असतांना, वरवर पहाणाराला असा भास होणें शक्य आहे कीं हिंदु मुसल्मान वगैरे ठळक ठळक भेद तर आज समूळ नष्ट झाले आहेत, इतकेंच नव्हें तर खुद्द हिंदुहिंदुंमधील जातीभेदमूलक कल्पनांचाहि नव्या मन्वंतराच्या रामरगाड्यांपुढें चक्काचूर झाला आहे. परंतु ही भावना वरवर पाहणारांची झाली; आणि असे वरवरच पाहून हुरळून जाणारे लोक बहुशः बरेच असतात. वास्तविक स्थिति काय आहे, किंवा निदान कशी असावी, इतका पोंच ठेवून तारतम्यानें विचार करणारीं डोकीं फार थोडीं! रसभरीत व्याख्यानें देऊन किंवा वर्तमानपत्रांतून चुरचुरीत लेख लिहून देशभक्तीची स्वयंमान्यतेची पदवी पटकाविणारे लोक बोलतात किंवा लिहितात तसेच खरोखर वर्तन करतात काय, हा प्रश्न आमच्यांतील शेंकडा ८० लोकांस सुचत नाहीं; इतकी विचारशिथिलता अझून अस्तित्वांत आहे. दिसतें तसें नसतें ही साधी गोष्ट विचारांत घेण्याइतक्या विचारक्षमतेचा आमच्या गरीब श्रद्धाळु देशबांधवांत अझून उदय व्हावयाचा आहे.

श्रद्धाळुपणा हा गुण कांही वाईट नव्हे! परंतु त्याला देखीक कांही मर्यादा आहे. महाराष्ट्राच्या गतवैभवाचें आपण सिंहावलोकन केलें तर या श्रद्धाळुपणाच्या पायींच मऱ्हाठी साम्राज्याचा सत्यानाश आपला आपण कसा करून घेतला, हें चांगलें ध्यानी येईल. ज्या समाजांनीं श्रद्धाळुपणापेक्षां अधिक उच्च ध्येयावर नजर टाकून, क्रोधानें किंचित् अस्तन्या वर सारल्या असत्या तर राष्ट्रक्रांतीच्या वेळींसुद्धां विजयदेवतेनें धांवत येऊन त्याला माळ घातली असती, असे चांगले चांगले प्रबुद्ध समाज ऐनवेळीं श्रद्धेच्या फाजील स्तोमाच्या भरीं पडून आपले आपण वैरी कसे झाले, हें सिद्ध करणारीं स्थळें महाराष्ट्राच्या इतिहासांत अनेक दाखवितां येतील. चिकित्सक पाश्चिमात्यांचा आणि आमचा गेल्या शतकभर इतका निकट परिचय होऊनसुद्धां आमच्यांतील बरेच सुशिक्षित लोक अझून या श्रद्धाळुपणाच्या इन्फ्ल्युएंझापासून मुक्त होऊं नयेत आणि वाटेल त्या चलाख गारुड्यांच्या भजनीं हां हां म्हणतां लागण्याइतके हुरळून जावेत हें फार शोचनीय होय. थोडक्यांत सांगावयाचें तर कोणत्याहि गोष्टींवर एकदम विश्वास टाकण्यापूर्वी त्याच्या बाह्यांगाचें व अंतरंगाचें सूक्ष्म पृथःकरण करण्याची संवय अझून पुष्कळांना लागावयाची आहे.

८. बाजू अंगावर घसरूं लागली कीं सैतानसुद्धां बायबलाचा आधार घेतो, अशी एक इंग्रजींत म्हण आहे. सैतानानें बायबलांतील वेदांताचा पाठ धडाधडा म्हणून दाखविण्यास

सुरूवात केली म्हणून तो सैतानाचा साधू झाला असें मानणें बरेच धोक्याचें आहे. कदाचित् वेदपठनाच्या अनेक आवृत्त्यांमुळें त्याचें नैसर्गिक सैतानीपणाचें पाणी निवळण्याचा संभव असतो खरा, तथापि वेदाची पोथी गुंडाळून ठेवल्यावर श्रोत्यांच्याच बोकांडीं तो सैतान बसणार नाहीं कशावरून ? ज्याची मूळ संस्कृतीच सैतानी, ज्याच्या सैतकनी अत्याचाराचा इतिहास कित्येक शतकांच्या पृष्टांत खच्चून भरलेला आणि ज्याच्या सैतानी तांडवनृत्याच्या दणक्याखाली कित्येक साम्राज्यें चिरडून जमीनदोस्त झाली असला सैतान साधुत्वाचा मोठा आंव आणून वेदांताचीं प्रवचनें झोडू लागला म्हणून कां आम्ही त्याचीं स्तुतिस्त्रोत्रें गाण्यास एकदम प्रवुत्त व्हावे ? वेदांत आवडत नाहीं कोणाला ? सर्वांनाच तत्वज्ञान आवडतें. परंतु त्यावरून तत्वज्ञानांचीं पुराणें झोडणारे सर्वच पुराणिक साधु समजावयाचें कीं काय ? ज्याला बोलता येतें तो चांगलेंहि बोलतो आणि वाईटहि बोलतो. परंतु बोलणें आणि आचरण यांत बराच भेद असतो, हें मात्र विसरतां कामा नये. बोलणाराच्या आचरणाचा गत इतिहास काळाकुट्ट असल्याचें प्रत्यंतर आपणाला जर धडधडीत प्रत्ययाला येत आहे, तर त्याच्या तोंडांतून बाहेर कोसळणाऱ्या वेदांतप्रवचनाच्या पांढऱ्याफेक फेंसानें त्याच्या अंतस्थ कारस्थानी वृत्तीचा नैसर्गिक काळेपणा स्वच्छ धुवून काढलाच असेल, असें मानण्यास काय आधार ? ग्रामण्यांच्या इतिहासात महाराष्ट्रातील बऱ्याच प्रमुख समाजांची अंतर्बाह्य संस्कृति ठळक रीतीने चित्रित केलेली आढळते. राजकीय, सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील या समाजांचा दर्जा काय होता, याचेंही स्पष्ट चित्र या इतिहासफलकावर मुद्देसूद रेखाटलेलें आपणांस पहावयास मिळतें. अर्थात् सध्याच्या मन्वंतरांत जे जे तत्ववेत्ते पुराणीक राष्ट्रीय तत्वज्ञानांची पुराणें झोडण्यास पुढें सरसावलेले आहेत, त्यांची कुवत, त्यांची मूळ संस्कृति आणि त्यांच्या मनोवृत्तीची रचना काय आहे, या सर्व गोष्टींची पंचराशिकें सोडविण्याच्या कामीं आणि कोठें कोणतें प्रमाण व्यस्त येतें किंवा सम येतें हें बिनचूक दाखविण्याच्या कामी ग्रामण्यांचा इतिहास हाच एक गुरू होय, यांत मुळींच संशय नाहीं.

९. ग्रामण्यांचा इतिहास प्रसिद्ध झाल्यास जातिभेदाला विनाकारण चेतना येईल आणि राष्ट्रीय कामगिरीत सर्व समाजांचा मिळावा तसा एकोपा मिळणार नाही, असा दुसरा आक्षेप काढण्यांत येतो. हा आक्षेप सयुक्तिकतेच्या बाळशाने जरी गोंडस दिसत असला तरी वास्तविक तो तितका सशक्त नाहीं. जातिभेद असणारच आणि तो असावा हें मत नवीन नसून पुष्कळ विचारवंतांनी हिंदु समाजांचे सूक्ष्मरीत्या परीक्षण करून हा सिद्धांत काढला आहे. जातिभेद—म्हणजे चतुर्वर्णव्यवस्थेमुळें निर्माण झालेल्या विविध व्यवसायी समाज समाजांतील सामाजिक आणि धार्मिक बंधनांची जाणीव—ही नष्ट होणें जवळजवळ अशक्य कोटींतील आहे, असा आज तरी सर्वसाधारण ग्रह आहे. जातिमत्सर मात्र मुळींच नसावा आणि तो अलीकडे नष्ट होण्याच्या पंथाला लागलेला आहे, ही फार समाधानाची गोष्ट होय. जातिभेदाबरोबरच जातिमत्सरानेहि आपलें बिऱ्हाड बाजलें कायमचें ठेवावें, हें कोणीही मान्य करणार नाहीं. तथापि पुराणप्रियतेच्या फाजील अभिमानाच्या भरीं भरून जातिमत्सराच्या होळींत येन केन प्रकारेण तेल ओतणारे कित्येक राजवाडे धूमकेतूप्रमाणें मधूनमधून उपटतातच ! जातिमत्सराची मुळें जातिभेदाइतकीं खोलवर गेलेलीं नाहींत, हें तरी एक दुःखात सुख म्हटलें पाहिजें.

जातिमत्सराचा इतिहास अगदी अर्वाचीन आहे. प्राचीनकाळच्या चातुर्वण्य व्यवस्थेंत चुरस नव्हती अशांतला प्रश्न नाहीं. चुरस होती, स्पर्धा सारखी चालू होती आणि परस्पर समाजांत अनेक युद्धेहि झालीं. परंतु ह्या स्पर्धेचा पाया " दुष्मन् चाहि है लेकिन् वोभि दाना दुष्मन् चाहि है " या तत्वावरचा होता. म्हणून चारहि वर्णातील व्यक्तिनां आपापल्या वैयक्तिक संस्कृतीच्या जोरावर वाटेल त्या वर्णाच्या व्यक्तिबरोबर पराक्रमाची वरचढ करून त्याचा दर्जा पटकाविण्याची संधि मिळत असे ; आणि याबद्दल कोणीहि त्या बहाद्दराचा उपहास न करितां सर्व जगाकडून त्याच्या उज्वल संस्कृतीचा सकौतुक गौरवच केला जात असे. त्यावेळच्या वर्णाभिमानाची कसोटी वैयक्तिक किंवा सामुदायिक संस्कृतीच्या परिणतेनें सिद्ध होत होतीं. क्षत्रिय आणि ब्राह्मण यांच्यातील प्राचीन स्पर्धेचा इतिहास या दृष्टिनें प्राहिला म्हणजे सांप्रतचा जातिमत्सर हा अगदी अर्वाचीन आहे, हे सांगणे नको. कित्येक पंडित अर्वाचीन जातिमत्सर प्राचीन चतुर्वर्णस्पर्धेचे रूपांतर आहे असें म्हणतात ; परंतु ही त्यांची निव्वळ वकिली थाटाची विचारसरणी आहे असें म्हणावें लागतें.

१०. ज्यावेळी एखादा समाज वर्णनीय राष्ट्राची कामगिरी करून तद्देशीय इतिहासाला व भाटकवींना आपल्या विविधसग्दुणांचे स्तुतिपाठक बनवितो आणि जेव्हां परकीय इतिहासकारसुद्धां त्या स्तुतिगायनाच्या जलशांत स्वतःच्या रसिकतेला पुनित करण्याच्या अहमहमिकेनें येऊन सामील होतात, तेव्हां सहाजीकच त्या समाजाच्या प्राचीन संस्कृतीच्या परंपरेचा शोध लावण्याची तीव्र जिज्ञासा समंजस विद्वानांत उत्पन्न होते. जुनी ऐतिहासिक कागदपत्रें हुडकिणाऱ्या संशोधकांची संशोधन-दृष्टि दस्तऐवजी दिवटीच्या अभावीं भूतकालाच्या निबिड अंधःकाराला पाहून जरी बाचकून जाते ; डोळस इतिहासशास्त्र्यांच्या कालपटलभेदक दुर्बिणी अज्ञात काळच्या तटबंदी भिंतींचा छेद करून जरी पलिकडे जाऊं शकल्या नाहींत आणि भूतकाळाच्या अंधाराला अधिकच संशयग्रस्त करण्यासाठीं मत्सराच्या काजळीचे डोंगरच्या डोंगर जरी कोणी विश्वामित्राने मध्यंतरी आणून उभे केले, तरीसुद्धां जेव्हां त्याच अज्ञात आणि काळ्याकुट्ट कालपटलांतून एखादा समाज वर्तमानकालीन् इतर समाजांना दिपवून टाकण्याइतक्या स्वयंभू तेजानें फोंफावत बाहेर पडतो, तेव्हां त्याच्या पराक्राबरोबरच त्याच्या नैसर्गिक शीलाचा आणि प्राचीन संस्कृतीचा इतिहास स्पष्ट दृग्गोचर होऊं लागतो. हा इतिहास विशेषसा दुव्वेबाज नसल्यामुळें अर्वाचीन दृष्टीला जरी किंचित् गौण भासण्याचा संभव आहे आणि आधुनिक विचक्षण पद्धतीनें जरी त्याची छाननी यथातथ्य होणें शक्य नाही–आणि कोणत्याहि प्राचिन इतिहासावर हे आक्षेप आल्याशिवाय रहातच नाहींत ! –– तथापि त्याच्या उपलब्ध विस्कळीत दुव्यांवरूनहि विवक्षित व्यक्तिच्या, समाजाच्या किंवा सबंध राष्ट्राच्याही तत्कालीन् शीलाबद्दल किंवा संस्कृतिबद्दल निश्चयात्मक निर्णय काढतां येणें शक्य नाहीं असे मात्र मुळीच नाहीं. या कामी पाश्चिमात्य संस्कृतीचा आणि संशोधन-प्रवृत्तीचा पूर्ण संस्कार झालेली भारतीय शोधकबुद्धि अलिकडे बरीच कुशाग्र बनलेली आहे, यांत तिळमात्र संदेह नाही. इतिहास संशोधन आणि संगोपन या दिव्य मंत्राचा गुरूपदेश जरी पश्चिम दिशेनें पूर्वेच्या कानात फुंकला आहे, तरी गुरूसे चेला सवाई या सार्थ म्हणीचें प्रत्यंतर पौर्वात्य इतिहास–शास्त्र्यांनीं आपल्या वर्णनीय

कर्तबगारीने दाखविले आहे, असें म्हणण्यात अतिशयोक्ति होईलसें आम्हांस वाटत नाहीं. विशेषतः महाराष्ट्रीय कित्येक इतिहास–संशोधकांनी महाराष्ट्राच्या इतिहासाच्या बाबतींत अलीकडे जी सेवा केली आहे ती केव्हांहि प्रशंसनीयच म्हटली पाहिजे. वास्तविक पाहिलें तर महाराष्ट्राचा अर्वचीन म्हणजे १७ व्या शतकापासूनचा इतिहास जतन करण्याची कामगिरी चांद्रसेनीय कायस्थ प्रभू बखरकारांनींच बजावलेली आहे. शिवाजीच्या स्वराज्योपक्रमाच्या अंतस्थ स्फूर्तीच्या ठिणगीवर याच जातीनें आपल्या अलौकिक कर्तबगारीचे तेल ओतून ती प्रज्वलीत केली. शिवशाहीच्या भव्य प्रासादाचा पाया खणतांना याच जातीच्या अनेक नरनारींनी केवळ आत्मस्फुर्तीनें आपल्या प्राणांच्या आहुती त्यांत टांकून, त्यांतील प्रत्येक चिऱ्याचिऱ्यांत कायस्थप्रभू–रक्तांचें सिमेंट ठासून भरलें. ' हिंदवी स्वराज्याचा सूर्योधय होणार ! ' असा आत्मविश्वासपूर्ण कर्णा शिवाजीनें फुंकतांच खडबडून जागें झालेले महाराष्ट्र तरुण शिवाजीच्या निशाणाखाली येऊन दाखल होण्याच्या आधीं हाच समाज त्याच्या पाठीमागें येऊन उभा राहिला. रजपुतान्यांतील शौर्यसागर रजपुतांचे रक्त नसांनसांतून खेळत असणाऱ्या मराठे क्षत्रिय वीरांच्या दणकट तलवारींच्या तिखट पात्यांना चकित करून सोडणारी तलवारबहाद्दरी स्वराज्याच्या उषःकालापासून तों त्याच्या हतभागी अस्तापर्यंत याच समाजानें गाजविली आहे. मनगटांतल्या जोरावर क्षात्रवीर्याचा प्रमाप गाजवीत असतांनाच, कलमबहाद्दरीनें आणि मुत्सद्देगिरीनें बुद्धिकौशल्याची शिकस्त करणारा समाज हाच ; म्हणजे शिवाजीच्या स्वराज्य स्थापनेच्या कर्मयोगाला आपल्या निसर्गजात भक्तियोगाचें व ज्ञानयोगाचें पाठबळ देऊन, महाराष्ट्रांत मऱ्हाठी पातशाहीची प्राणप्रतिष्ठा करण्याचा आद्यमान चांद्रसेनीय कायस्थप्रभू समाजानेच मिळविला आहे, अर्थात् शिव-उदयापूर्वीचा काळ दुर्व्वेबाज इतिहासाच्या अनुलब्धतेमुळें जरी कितीहि अंधःकारमय असा भासत असला, किंवा ऐतिहासिक संशोधनाच्या क्षेत्रांत कडाक्याची थंडी पडल्यामुळें उत्पन्न झालेल्या संशयाच्या धुक्यांनी दाही दिशा जरी आज कोंदाटलेल्या दिसत असल्या, तरी एक गोष्ट निर्विवाद सिद्ध होत आहे कीं ज्या अर्थी " आपली सेवा करण्याकरितां या घटकेला कोण तयार आहेत ? " अशी राष्ट्रानें हांक मारतांच जो समाज एकदम आपल्या अज्ञात दशेचें कवच पार फेंकून देऊन, त्याच्या हांकेला हांक देऊन राष्ट्रीय निशाणाखाली धांवून आला ; इतकेंच नव्हे तर त्यानें आपल्या अवर्णनीय पराक्रमानें राष्ट्राची स्वराज्य स्थापनेची महत्वाकांक्षा रंगारुपासहि आणली, त्याअर्थी त्या समाजाची प्राचीन संस्कृति अर्थात् तितकीच बलवत्तर असली पाहिजे. अर्वाचीन डोळस इतिहासशास्त्र्यांच्या चष्म्यांना या प्राचीन संस्कृतीचें स्वरूप नीट अवगाहन करतां येत नसेल तर तो दोष त्यांचा नसून त्यांच्या चष्म्यांचा आहे, ही गोष्ट केव्हांहि सिद्ध करून दाखविण्यास अडचण पडणार नाही.

११. शिवाजीचा अवतार होण्यापूर्वीच चां. का. प्रभू समाजाचा इतिहास पाहिला तरीहि इतकें सिद्ध होत आहे कीं तत्कालीन मुसलमानी रियासतींत त्यांची स्मिति म्हणण्यासारखी खालावलेली नव्हती. त्यांची कलमबहाद्दरी, मुत्सद्देगिरी त्यांचें सुप्रसिद्ध इमान, त्यांची क्षात्रवृत्ति त्यांचा योग्य तो परामर्ष मुसलमानी संस्थानांतले शहा ठिकठिकाणीं घेतच होते. गडावरचे गडकरी आणि किल्ल्यांचे किल्लेदार होण्याचा मान व अधिकार विशेषतः कायस्थ प्रभूंकडेच असे.

मुसलमानी रियासतींत वरिष्ठ सरदाऱ्या भोगणारे शहाजीराजे, जाधवराव आदीकरून मराठे सरदारांचे सल्लामसलतगार, दळपती आणि सुभेदार कायस्थ प्रभुच असत आणि तत्कालीन् मोहिमांचे डांवपेंच ठरविण्याच्या कामांत याच गडकरी किल्लेदार वगैरे सरदारांच्या सल्ला मसलतींचा उपयोग मुसलमान सत्ताधारी करून घेत असत. याशिवाय जंजिरा वगैरे संस्थानांकडे पाहिलें तर तेथें चा. का. प्रभू केवळ सरदारक्या, गडकरीपणा किंवा किल्लेदारी याच हुद्यांचा उपयोग घेत होते असें नव्हें, तर दिवाणगिरीच्या जागांवरहि हे लोक वंशानुवंश अधिकार गाजवित होते. परंतु नुसत्या दिवाणगिऱ्या केल्या किंवा सरदाऱ्या गाजविल्या एवढ्याच मुद्यावर हा समाज मराठी स्वराज्य स्थापनेच्या प्रत्यक्ष कार्यभागांत पडण्याइतका स्वयं-स्फुर्तीनें अवचित उद्युक्त कसा झाला मराठी स्वराज्याची स्थापना प्रस्तुतच्या स्वराज्याच्या ' मागणी ' इतकीच सरळ आणि सोपी होती काय ? सांप्रतच्या ' सनदशीर मागणी ' ला जेवढे म्हणून आज अडथळे आहेत, जितके प्रतिरोध करणारे संघ आहेत आणि जनतेच्या मनाची ' सनदशीर तयारी आहे ' आहे, त्यापेक्षां सहस्त्रपट अधिक तीव्र विरोधाला तोंड देऊन, शिवाजीनें धुळीच्या कणांतून एवढे प्रचंड स्वराज्यमंदीर निर्माण केलें, ही गोष्ट प्रत्येक इतिहासज्ञाला कबूलच केली पाहिजे. शिवाजीच्या स्वराज्योपराक्रमाचें जहाज हांकारण्यास संध्यांच्या नामदारी–किंवा नामदार म्हणा वाटेल तर–देशभक्तांपेक्षा अधिक कसदार नावाड्यांची आवश्यकता होती, यांत संशय नाहीं. सध्यांहि सरदाऱ्या किंवा दिवाणगिऱ्या गाजविणारे कायस्थेतर कोणी नाहींत किंवा शिवकालई नव्हते असें नाहीं. परंतु शिवाजीच्या देशकालवर्तमानाचा सूक्ष्म दृष्टीनें विचार केला तर नुसत्या सरदार किंवा दिवाण–परंपरेच्या लोकांच्या हांतून तो स्वराज्यस्थापनेचा विश्वव्याप खात्रीनें तडीला जाणें शक्य नव्हतें. चां. कां. प्रभू समाजाची प्राचीन संस्कृति शिवकालापर्यंत नुसत्या सरदारी दिवाणगिरी किंवा किल्लेदारी येवढ्याच दर्जापर्यंत उन्नत झालेली होती, यापेक्षां अधिक उंचीपर्यंत तिची भरारी गेलेलीच नव्हती, असे जर गृहीत धरलें तर स्वराज्य स्थापनेच्या कार्यात त्यांनीं जी मुत्सद्देगिरी दाखविली, जीं धाडसाचीं अनेक पराक्रमी कामें केलीं आणि शिवाजीच्या प्रत्येक महत्वाकांक्षेच्या उत्साहाला प्रत्यक्ष दृश्य स्वरूप आणण्याच्या कामीं त्यांनीं जी कल्पनातील समयसूचक धोरणें लढविलीं, तीं सारीं ' अवचित घडून आलेला चमत्कार ' तरी मानला पाहिजे एक, किंवा तो सारा इतिहासच्या इतिहास कादंबरीवजा समजला पाहिजे एक ; याशिवाय या प्रश्नाचा उलगडा लागणें शक्य नाहीं. आजलाहि हिंदुस्थानाच्या चारी भागांवर दृष्टी टाकली आणि निरनिराळ्या प्रांतांतील निरनिराळ्यां समाजांची आधुनिक उन्नति व मनोधर्म यांचें नीट निरीक्षण केलें तर असें दिसून येईल कीं पाश्चात्य विद्येचा मुलामा जरी सर्व ठिकाणीं सारख्याच प्रमाणांत चढलेला दिसत आहे, तरीसुद्धां प्रत्यक्ष कार्याचा प्रसंग येतांच जो तो आपापल्या पूर्वसंस्कृत्यनुरूप अशाच क्षेत्रांत काय तो बहाद्दरी गाजवू शकतो. ज्या ज्या समाजांनी पूर्वी राज्यें केलीं किंवा प्राचीन राज्यकारभारांत ज्यांचे पूर्वज प्रत्यक्ष पडत होते, त्या त्या समाजांतील लोकच सांप्रतच्या राजकीय वातावरणांत टिकाव धरीत आहेत. पिढ्यान्‌पिढ्या ज्यांनीं नुसता व्यापार केला, अशा समाजांतील मंडळी जरी आजकाल राजकीय उलाढालींत पडत आहेत, तरी राजकीय तलवारीच्या मुठीचा आणि त्यांच्या हाताचा यावज्जन्म कधी संयोगच घडून न आल्यामुळें राजकीय क्षेत्रांतलें त्यांचें वर्तन विशेषसें दणकट किंवा अधिकारी होत नाही.

इतकेंच नव्हे तर त्यांना त्या बाबतींत आत्मसंतोषानें म्हणा अथवा लोकमताच्या विरोधानें म्हणा केव्हांतरी माघार घ्यावीच लागते, अशीं अनुभवांचीं उदाहरणें शेंकडों दाखविता येतील. थोडक्यांत सांगावयाचे म्हणजे पूर्वसंस्कृतीच्या अभावीं एखादी व्यक्ती अगर समाज राष्ट्रीय पुनर्घटनेसारखें जगड्व्याळ कार्य घडवून आणील हें शक्यच दिसत नाहीं. संस्कृतीचा संस्कार कितीहि मलीन झालेला असो, पण त्यालाहि अवसर मिळतांच तो आपला पराक्रम गाजविल्याशिवाय कधींहि राहणार नाहीं. उलटपक्षी संस्कृतीच्या प्रश्नाकडे कानाडोळा करून भलत्याच क्षेत्रांत बहाद्दरी मिळवूं पाहणाऱ्यांची स्थिती किती शोकजनक होते, याची उदाहरणें आज प्रत्यहीं आपल्या नजरेसमोर शेकडों घडत आहेत, शिवाजीला ही संस्कृति-परिक्षणाची कला, प्राचीन इतिहासाच्या अभ्यासानें असो अथवा निसर्गदत्त असो, फार चांगली अवगत झाली होती, यांत संशय नाहीं. हिच्या सहाय्यानेंच त्यानें महाराष्ट्रींय इतर समाजांकडे आपली नजर फेंकण्यापूर्वी चां. का. प्रभू समाजाला तयाने पोटाशी धरलें. शिवाजीच्या एकेदर चरित्रावरून ' मनुष्याची पारख ' करण्यांत त्याचा हात किती खंडा होता, हें चांगलेंच व्यक्त होत आहे. अर्थात् चां. का. प्रभूंना प्रथम जवळ करण्यांत त्याची रसिकता आणि दूरदृष्टी जरी व्यक्त होत असली तरी ती रसिकता निवळ काकतालीय न्यायाच्या भुसक्या पायावरची खास नसून, ती शिवाजीच्या संस्कार-परिक्षणाच्या अंतर्वेधदृष्टियरच उभारली गेली होती. पूर्वसंस्कृतीच्या बलवत्तर तेजाची साक्ष पटल्याशिवाय नसत्या भिडेसाठी किंवा कार्याची निकड म्हणून रिक्रूटांची खोगीरभरती करणारे शिवाजीमहाराज तरी खास नव्हते !

१२. चां. का. प्रभू समाजाची अशी पूर्वसंस्कृती तरी काय होती, कीं तिकडे शिवाजीचें लक्ष एकदम धांवून गेलें ? शिवाजीच्या मनांतील जन्मजात स्वराज्य स्थापनेकरिता मदतगार म्हणून त्याची दृष्टी याच विवक्षित समाजानें कां वेधून घेतली ? काय त्या वेळीं खुद्द शिवाजीचे नातलग आणि जातभाई मराठे शूर नव्हते ? स्वतःचे जरी स्वराज्य नव्हतें तरी परराज्याची यंत्रें तेच हालवित होते ना ? मग घरच्यांना वगळून दारच्यांकडेच शिवाजी का वळला ? ही प्रश्नमालिका निःपक्षपणानें सोडविणारालाच चां. का. प्रभूंच्या प्राचीन इतिहासाची ओळख पटणें शक्य होईल. इतर कोणी कितीहि जाडा व्युत्पन्न असला किंवा ऐतिहासिक जुनीं कागदपत्रें हुडकिणारा सूक्ष्म दृष्टीचा संशोधक उंदीर असला तरी त्याच्या दृष्टीला अंधाराशिवाय आणखी कांहीं दिसेल, असा आम्हांस भरंवसा वाटत नाहीं.

चां. का. प्रभू समाज संख्येच्या मानानें जितका लहान आहे, त्यापेक्षां त्याच्या पराक्रमाचा इतिहास अत्यंत विस्तृत आणि मोठा आहे. अल्पसंख्यांक समाजानें राष्ट्राच्या मोठमोठ्या उलाढालीच्या इतिहासांत प्रामुख्यानें झळकत राहिल्याचें उदाहरण निदान भरतखंडाच्या इतिहासांत तरी याच समाजाचें होय.

शिवावतारापूर्वीच्या चारदोन शतकांचा इतिहास पाहिला तरी त्याच्याहि उपलब्ध विस्कळीत आणि संकीर्ण पृष्टांत चा. कां. प्रभूंची राजकीय क्षेत्रांतील कर्तबगारी बिनचूक आढळून आल्याशिवाय राहत नाहीं. संख्येच्या प्रचंडत्वानें पूर्वी व आतांहि जगाची छाति दडपून टाकणारे असे अनेक समाज आजलाहि दाखवितां येतील कीं ज्यांच्या प्राचीन इतिहासाचें संशोधन करू

लागल्यास कित्येक शतकांची पानें जरी डोळे फाडफाडून चाळलीं तरी त्या संबंधी एक अक्षरसुद्धां कोठें धड सांपडण्याची मारमार पडते आणि या दृष्टिनें विचार केला तर चां. का. प्रभू समाज हा लोकसंख्येच्या दृष्टिनें अल्पतम असतांहि त्याचा पराक्रम प्रत्येक स्वकीय किंवा परकीय " शाही " च्या इतिहासांत प्रामुख्यानें दृग्गोच्चर व्हावा. ही एकच गोष्ट त्याच्या राष्ट्रीय महत्त्वाची साक्ष देण्यास पुरेशी आहे.

१३. चां का. प्रभूंचा प्राचीन इतिहास आजलाहि बराच उपलब्ध आहे ; परंतु तो सांप्रत संकीर्णावस्थेंत असल्यामुळें आणि आधुनिक इतिहासकारांनी तो अर्वाचीन पद्धतींत संकलित करण्याचा प्रामाणिक प्रयत्न न केल्यामुळें, खुद्द या ज्ञातींतील एखाद्या जाड्या इतिहासशास्त्रास जर प्रश्न केला कीं ' तुमचा इतिहास काय व कोठे आहे तो दाखवा पाहूं ? ' तर त्याला देखिल एका विवक्षित ' स्टँडर्ड ' ग्रंथाकडे बोट दाखविता येत नाहीं. काही मजकूर या पुस्तकांत, त्याच्या पुढचा दुसऱ्या पुस्तकांत, आणखी राहिला तो तिसऱ्या पुस्तकांत, अशा स्थितींत तो इतिहास पांगलेला आहे. बरें, ज्यांनीं स्वज्ञातीच्या इतिहासाचा ठाव पाहण्याचा कांहीं यत्न केला, त्यांना ' मायथॉलजी ' च्या भोळसट प्रेमानें इतके कांहीं ग्रस्त केलें कीं त्यांच्या विवेचनानें जी एकदां ब्रह्मदेवाच्या नाभिकमलाच्या मुळाशीं दडी मारली, तेथून त्यांची धडपणें अझूनहि सुटका झाल्याचें दिसत नाहीं. पौराणिक काथ्याकुटाच्या सांबाऱ्याचे भुरके मारण्यांत ही इतिहासकार मंडळी एकदां गुंग झाली कीं मग त्यांना ऐतिहासिक सृष्टींतील घडामोडीकडे दृष्टि फेंकायला फुरसदच रहातानाहीं ; आणि एकदां कां ही पुराणप्रिय मंडळी शब्दांच्या व्युत्पत्यांचा कीस काढूं लागली कीं " हैहय कुलोत्पन्न क्षत्रिय " म्हणजे ' घोड्यांचे वंशज ' येथपर्यंतच त्यांची मजल न जातां श्रीविष्णूला एखाद्या घोड्याचा अवतार घ्यावयास भाग पाडून मातोश्री लक्ष्मीलाहि घोडी बनविण्यास चुकत नाहींत. इतिहास-संशोधनाची धमक असूनसुद्धां आमच्यांतील पुष्कळ चांगले चांगले संशोधक या पुराणप्रियतेच्या फाजील आवडीमुळें इतिहास-सेवनाच्या बाबतींत कुचकामाचे ठरले आहेत, यापासून आमच्या आधुनिक विद्वनानीं पुष्कळ धडा घेण्यासारखा आहे.

१४. आजपर्यंत ऐतिहासिक संशोधनाकडे दुर्लक्ष करून पुराणांतल्या वंशावळी आणि भाकडकथांचा कीस काढण्याकडे आमच्यांतीक बऱ्याच विद्वनांची पुराणप्रियता फाजील प्रमाणांत गुंतल्यामुळें मध्यंतींच्या अनेक शतकांतील इतिहासाचे दुव्वे आज निष्काळजीपणाच्या अंधारांत हुडकणें फार बिकट होऊन राहिले आहें. पाश्चिमात्या शोधक आणि मेहनती युरोपियन इतिहासकारांनी आणि फिरस्त्यांनी जर या विस्कळीत दुव्यांची नीट जोपासना केली नसती, तर आजला चां. का, प्रभूंच्या प्राचिन इतिहासाचें तोंड उजळ करण्याची कोणत्याहि महत्त्वाकांक्षी अर्वाचीन इतिहासकाराला धडगतच नव्हती. आधुनिक चिकित्सक, संशयखोर आणि मनस्वी मार्मिक विचक्षण वृत्तीला निरुत्तर करण्याच्या कामीं पौराणिक विवेचनाची पुराणांतीलीं वांगीं कितपत उपयोगी पडतील, याचा आमच्या १९ व्या व २० व्या शतकांतील विद्वान् पुराणाभिमान्यांनीं किंचित् पोक्त विचार करावयास नको होता का ? या बाबतींत त्यांच्या हातून इतिहासाची जी हेळसांड झाली, ती भरुन यावयास त्यांची पौराणिक काथ्याकुटांची बाडें

काडीमात्र उपयोगीं पडत नाहींत. अर्थात् त्यांच्या साऱ्या ग्रंथलेखनाची किंमत आजच्या पिढीच्या दृष्टिनें मातीमोलच ठरत आहे, याबद्दल कोणाहि सहृदयांस खचित वाईट वाटल्याशिवाय राहणार नाहीं. स्वज्ञातीच्या इतिहासाकडे असें दुर्लक्ष झाल्यामुळें आणि प्राचीन इतिहासाचे सर्व दुव्वे इतस्ततः अनेक ग्रंथात विखरुन पडल्यामुळें, आज आमच्या हाडवैऱ्याना आणि हितशत्रूंना आमच्या प्राचीन आणि अर्वाचीन इतिहासावर वाटेल तसे घाणेरडे आरोप करण्यास बरेच फावलें आहे ! आणि याबद्दल जर खरोखर कोणी जबाबदार असतील तर आमचेच आधुनिक चां. का. प्रभू इतिहासकार होत, यांत मुळींच संशय नाहीं.

१५. शिवाजीमहाराजांच्या जगड्व्याळ कार्यव्यांपृत्वाच्या मानानें त्यांच्या कारकीर्दीतील उपलब्ध कागदपत्रांची संख्या अत्यंत क्षुल्लक आहे. असें कां व्हावें ? रा. राजवाड्यासारख्या एकनिष्ठ व एकमार्गी इतिहास-संशोधकाची मतिसुद्धां अगदीं गुंग होऊन गेली असून, त्यांनी या बाबतींत अगदीं दीर्घ निराशेचे उद्‌गार वेळोवेळीं काढले आहेत. शिवाजीमहाराजांच्या वेळच्या महत्त्वाच्या शें सवाशें पत्राखेरीज अधिक कांहींहि कागदपत्रें उपलब्ध होऊं नयेत, ही गोष्ट सर्व बाजूंनीं अत्यंत शोकजनक आहे, खुद्द शिवाजीमहाराजांच्या रिकार्डाचाच जेथें समूळ बेपत्ता, तेथें ज्या चां. का. प्रभूंचाहि इतिहास खुद्द महाराजांच्या इतिहासांतच निगडित झालेला, त्यांच्या तरी इतिहासाचा आणखी पत्ता लागणार कसा ? हीं सर्व कागदपत्रें एकाकीं नाहींशी झालीं कशीं ? काय मध्यंतरी मोठाथोरला धरणीकंप होऊन त्यांत तीं गडप झालीं, कीं अवचित तीं आपणच होऊन जळून फस्त झालीं ? अशा प्रकारच्या धरणीकंपाचा किंवा अग्निप्रळयाचा इतिहासांत तर कोठेहि नामनिर्देश आढळत नाही. या कोड्याचा उलगडा व्हावा म्हणून शोध करीत असतांना छत्रपतीच्या चिटणीसाच्या एका पत्राची नक्कल उपलब्ध झाली. त्यांत चिटणीसांनी स्पट लिहिलें आहे कीं आम्हांला तुरुंगात टाकल्यावर चिंतामणराव पटवर्धनाच्या चिथावणीवरून बाळाजीपंत नातूनें आमचें घरदार लुटविलें आणि अठरा उंट भरून घरांतील सर्व कागद पत्र नेऊन जाळून पोळून फस्त केले. यावरुन इतकें सिद्ध होत आहे कीं (१) छत्रपति प्रतापसिंहाच्या कारकीर्दीपर्यंत भोंसले राजघराण्याचे सर्व कागदपत्र चिटणीसांच्या संग्रहीं जिवंत शाबूद होते ; (२) सरकारी दप्तराचे अधिकारी चिटणीस व चिटणीसांच्या हस्ताक्षरा-खेरीज सरकारी फर्मानांची 'वॅलिडिटी' (सत्यता) अखिल भरतखंडांत कोणीहि मान्य करीत नसे. अर्थात् मराठेशाहीच्या अव्वल पासून अखेरपर्यंतचे महत्त्वाचे सर्व कागदपत्र चिटणीसांच्या संग्रही असत. (३) त्यांचीच बाळाजीपंत नातूसाहेबांनी होळी केल्यावर रा. राजवाड्यांनीं काय आम्ही काय किंवा इतर कोणी काय कितीहि शंख केला तरी निष्पन्न काय होणार ? राघोबादादा आणि आनंदीबाई या हतभागी जोडप्याला नाटकें कादबऱ्यांतून राक्षसी पेहराव चढविणाऱ्यांनीं पटवर्धन नातू प्रभृतीनें महाराष्ट्राचा सर्वतोपरी घात करण्यात किती चिळस आणणारें निर्घृण वर्तन केले, इकडे लक्ष पुरविल्यास अस्तनींतले निखारे बरे पण झग्यांत वावरणारे हे देशद्रोही विंचू नकोत, असे त्यांस वाटल्याशिवाय राहणार नाहीं.

१६. आम्हांला स्वतः या वेदोक्त आणि पुराणोक्ताला वाजवीपेक्षां फाजील महत्त्व द्यावे असें वाटत नाहीं. कारण सध्यांचा मनूच तसा आहे. प्रचलीत कालमानाचा आणि मतस्वातंत्र्याचा

विचार केला तर हें वेदोक्तपुराणोक्ताचें बंड महाराष्ट्रांत इतःपर पुनश्च जीव धरील असें वाटत नाहीं. आब्राह्मणचांडाळांच्या धर्मविषयक कल्पना नवीन मन्वंतराच्या भट्टीतून तावून सूलाखून बाहेर पडत आहेत, भूतकालीन् पौराणिक धुडगुसाचा धार्मिक कल्पनांवरील शेकडों शतकांचा मळ जळून खाक होत आहे व हिन्दुधर्माचें खरें व्यापक व शुद्ध स्वरुप सर्वांना दृग्गोचर होऊं लागलें आहें ; इतकेंच नव्हे, तर एकराष्ट्रीयत्वाच्या शुद्ध तत्वांचा उदय होऊन स्वराज्याच्या उषःकालाच्या साखरझोंपेंत विश्वबंधुत्वाचीं गोडगोड स्वप्नें पडत आहेत. अशा आशापूर्ण स्थितींत हें वेदोक्त पुराणोक्ताचें बंड पुनः उपस्थित व्हावें किंवा होईल असें वाटत नाहीं. आज हिंदु मुसलमान, हिंदु-पारशी, हिंदु यहुदी असे भिन्न भिन्न समाज जेथें यदृच्छेनें हातांत हात घालून राष्ट्रीय सौभाग्याकरितां झगडण्यास किंवा प्रयत्न करण्यास सिद्ध झाले आहेत, तेथें हा जुनापुराणा फोलकट वाद कितपत उपस्थित होईल व यदाकदाचित् झालाच तर कितपत जीव धरील याची आम्हांस फार शंका आहे. खरोखर म्हटलें तर या वादाचीच अतःपर कांही आवश्यकता नाही. हा नुसता आतां विशिष्ट हक्कांचा प्रश्न आहे. ते ह्क्क यथाविधि पाळण्याची किंवा नेहमीं यथासांग बजावण्याची कुवत चतुर्वर्णापैकीं एकहि समाजांत उरलेली नाहीं. व्यवहार पहा. ब्राह्मण सदराखाली मोडणाऱ्या समाजाची दिनचर्या पाहिली तर पौराणिक परशुरामाच्या ' सेवा सर्वत्र कर्तारं ' या शापाप्रमाणें तेहि शूद्रवत् आंचरण करूं लागले आहेत. कांहींनीं वैश्यवृत्ति पत्करलेली आहे व क्वचित् क्षात्रधर्माचाहि अवलंब करीत आहेत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ' ब्राह्मण ' या नामाभिधानापेक्षां ब्राह्मण्याचें अधिक विशेष चिन्ह किंवा पुरावा त्यांच्यापाशीं मुळींच उरलेला नाहीं. अर्थात् वेदोक्त कशाशीं खातात आणि पुराणोक्त विधि अळणी झाल्यास त्यांत किती मीठ घालायचें याची दख्खल त्यांना कोठली ? सध्यां तर ब्राह्मण म्हणविणाऱ्या समाजाची दिनचर्या इतकी बेफाम भडकून गलेली आहे कीं शूद्रांनाहि लाज वाटेल असे कितीक तरी हलके धंदे करण्यांत त्याला लवमात्र दिक्कत वाटेनाशी झाली आहे. आजपर्यंत चांभाराचीं दुकानें काढण्यापर्यंत, पुण्याच्या मंडईत कोंबड्या विकण्यापर्यंत मजल गेली होती ; परंतु परवा मुंबईत एका ब्राह्मणानें प्रेतसंस्कारविधीचें साहित्य विकण्याचें दुकान उघडलेलें पाहून मन खेदाने व आश्चर्यानें थक्क झालें ! आज मितीला असा एकहि बरा वाईट धंदा शिल्लक राहिलेला नाहीं कीं ज्यांत ब्राह्मणांनी हात घातलेला नाहीं. उच्चत्वाचा किंवा नीचत्वाचा तिळमात्र विचार न करतां वाटेल ते धंदे करणारांची संख्या ज्या समाजांत दिवसेंदिवस वाढत आहे, त्या समाजाला ब्राह्मण्याचा तोरा मिरविण्याचा अधिकार कोणत्या स्मृतींत सांपडतो ? क्रियालोपामुळें जर प्राचिन शूद्रांची त्रैवर्णिकांच्या उच्च वर्गांतून हकालपट्टी होऊन त्यांना निराळ्याच खालच्या वर्गांत बसावें लागलें, तर सध्यांच्या क्रियानष्ट ब्राह्मणांनीं आपल्याकरितां कोणत्या वर्गाची जागा झाडून सारवून तयार केली आहे ? यंदाच्या (सन १९१९) पुणे येथील वसंत-व्याख्यानमालेंतल्या ६ व्या व्याख्यानाच्या वेळीं एक वक्ते म्हणाले " जोशाच्या वंशपरंपरा (?) वृत्तीवर जर तुमचा डोळा तर बापजाद्यांनीं कधीं तरवार गाजवली असेल पण तेवढ्यावरच पिळाच्या पगड्या घालून तुम्ही तरी कां मिरवावें ? " होय. आम्हीसुद्धां हेंच म्हणतों. क्षत्रियांच्या वेदोक्तावर जर तुम्ही एवढा मोठा घागरीएवढा परशुरामी डोळा वटारतां आणि त्यांना शूद्रधम वगैरे शेलक्या शिव्यांनी नेहमीं प्रहार करतां, तर तुमच्या बापजाद्यांनीं कधिं कोकाळांत जानव्याची ब्रह्मगांठ हातांत धरून

जगतपालक श्रीविष्णूच्या छाताडांवर कोकणी पायतणाचा लत्ताप्रहार केल्याची कादंबरी जरी खरी मानली, तरी तेवढ्यावरच तुम्ही ब्राह्मण्याचा कोरडा दिमाख कां मिरवावा? जोडेपायतणें, भजींकडबोळीं, तिरडीचे सामान विकण्याचे शूद्रवत् राजरोस धंदे करूनसुद्धां जर एखादा ब्राह्मण ब्राह्मण्यापासून च्युत होत नसेल, तर ब्राह्मण्यांनें रेडियम धातूच्यावर सरशी केली म्हणायची! रा. रा. महादेव राजाराम बोडस म्हणतात (चित्रमयजगत् जाने. १९१९-वर्णव्यवस्था) **शिवाजी क्षत्रिय म्हणून मलाहि क्षत्रिय म्हणा असा एकदा नांगऱ्या हट्ट धरून बसला तर त्याला आपण काय म्हणूं? बाजीप्रभू रणवीर योद्धा होता म्हणून कोर्टांतील एकादा सेक्शन रायटर किंवा टायपिस्ट जर क्षात्रजातीचा डौल घालूं लागला तर हास्यास्पद होणार नाहीं काय?** नाहीं कोण म्हणतो? गुणकर्मांवरूनच जाती किंवा वर्ण ठरवावयाची बोडससाहेब जर एखादी राष्ट्रीय चळवळ सुरूं करतील तर आम्ही त्यांना मनःपूर्वक यथामति व यथाशक्ति हातभार लावण्यास एका पायावर तयार आहोंत. तथापि ही चळवळ सुरूं करण्यापूर्वी त्यांच्याच ब्राह्मणवर्गांतील ७॥/८ बंधू गुणकर्मांचा कस लागतांच शूद्राच्या वर्गांत खाडकन् 'ट्रॅन्सफर' होतील आणि अखेरीस ज्या वर्गाला सध्यां लाथांखालीं तुडविण्यांत सध्यांच्या नामधारी ब्राह्मणांच्या ब्राह्मण्याची सार्थकथा होत आहे तो शुद्र वर्ग संख्येच्या दृष्टीनें अफाट व अवाढव्य होऊन तो 'डिस्टिल्ड्'-गाळीव शुद्ध ब्राह्मणाचीच हाडें वरवंट्याखाली ठेंचूं लागेल, याचा मात्र आमच्या बोडस साहेबांनी नीट विचार करावा. परंतु गुणकर्मविभागशः जाति ठरविण्याची, निदान मानण्याची, प्राचीन पद्धती जर आतां प्रचलित नाहीं आणि ब्राह्मण म्हणविणाऱ्या आईबापाचा मुलगा ब्राह्मणच असें जोपर्यंत समजण्यांत येत आहे तोंपर्यंत वरचे बाष्कळ प्रश्न पुढें आणणें म्हणजे आपल्या खोडसाळपणाची कमाल करणें होय. एखाद्या चां. का. प्रभूला तो सेक्शनरायटर किंवा शॉर्टहॅन्ड टायपिस्ट आहे एवढ्यावरूनच, रा. बोडससाहेबांच्या मताप्रमाणें, त्याला जर क्षात्र जातीचा डौल घालण्याचा अधिकार पोंहचत नाहीं, तर आज रा. बोडसांच्याच जातीचीं जीं हजारो मंडळी सेक्शनरायटर्स, टायपिस्ट, पोस्टमन, हाटेलवाले, कोळसेवाले, जोडेबूटपायतानवाले, आचारी, भुसारी, रंगारी, धोबी वगैरे धंदे करीत आहेत त्यांना तरी ब्राह्मण्याची शेखी मिरविण्याचा अधिकार कोणत्या स्मृतींत सांपडतो? ग्रामण्यांच्या इतिहासांत जीं अनेक शास्त्रग्रंथांर्गत प्रमेयें व श्रीशंकराचार्यादि धर्मगुरूंचीं आणि शास्त्रीपंडितांचीं संमतपत्रे दाखल झालेली आहेत, तीं आमच्या बोडससाहेबांनीं पहावीं, म्हणजे त्यांना समजून येईल कीं जोपर्यंत चांद्रसेनीय कायस्थ प्रभू म्हणविणारा आपल्या पिढिजात लेखनवृत्तीपासून च्युत झाला नाहीं, मग तें लेखन जुन्या पद्धतीप्रमाणें बोरूच्या लेगणीचें असो, फ्लाइंग् डचमनच्या पोलादी टांकाचें असो किंवा सुधारलेल्या टाईप रायटींग् यंत्रावरचें असो, तो क्षात्रधर्मापासून च्युत झाला किंवा त्याला क्षात्रजातीचा डौल मिरवितां यावयाचा नाहीं, असें प्रतिपादन करण्याची कोणाचीहि-मग तो महामहोपाध्याय असो अगर प्रत्यक्ष श्रीशंकराचार्य असो-त्याची मुळींच छाती नाहीं. असिजीवि मसिजीवी हेंच चां. का. प्रभूचें खरें व्रत आहे. लेखनवृत्ती हेंच कायस्थप्रभूंच्या क्षात्रवृत्तीचें द्योतक आहे. तें त्यांनीं आजदिनतागायत अस्खलीत जतन केलें आहे आणि योग्य

वेळीं त्यांनीं असिजीवि आज्ञेप्रमाणें रणांगणांत तरवारहि गाजविली आहे. रा. बोडससाहेबांच्या विधानप्रवृत्तीप्रमाणें विचार केला तर ब्राह्मण म्हणविणारांना मात्र लेखनवृत्तीचा अधिकार कोणत्या श्रुतीनें दिला ते समजत नाहीं. कै. राजारामशास्त्री भागवत (उद्धार पृ. १०१ वर) म्हणतात, **जर परबूंमध्ये कालज्ञता नसती, तर सगळें महाराष्ट्र मंडळ हिशोबाच्या संबंधानें केवळ ब्राह्मणमय होऊन जातें. पण परबु मूळचे लेखक असून कालज्ञ पडले, त्यामुळें ब्राह्मणांचा पगडा महाराष्ट्र देशांत सर्वच ठिकाणी पडला नाहीं** पुढेंहि (पृ. ११० वर) ते म्हणतात, **हल्लींच्या काळीं-म्हणजे जो उठला तो ब्राह्मण होऊं पहातो, अशा काळींहि-परबु लोकांचा मगज न फाटतां स्थिर राहिला आहे, हें विशेष अभिनंदनीय होय.** आजपर्यंत एकाहि चां. का. प्रभुनें ब्राह्मणांच्या ब्राह्मण्याची नकल करण्याचा यत्न केलेला नाहीं, स्वतःस चुकूनसुद्धां कधिं ब्राह्मण उपाधिचा कलंक लावून घेतलेला नाहीं, फार काय पण ब्राह्मणाची मुख्य दीक्षा जी भिक्षा तिचाहि प्राणन्तीं अवलंब केलेला नाहीं या गोष्टीं रा. बोडसांसारख्या प्रच्छान्न विद्वनांस आम्ही सांगाव्या असें थोडेंच आहे ? अर्थात् का. प्रभूंनी देशकालवर्तमानानुसार आपलें असिजीवी मसिजीवी क्षात्रवृत्तींचें व्रत अजूनहि कसें परिपालन केलें आहे, हें फिद्ध करण्याइतका भरपूर पुरावा त्यांचा इतिहास केव्हांहि देऊं शकेल. शंकेखोरांनीं तो परिशीलन करण्याची तसदी मात्र घेतली पाहिजे. चां. का. प्रभू यांचा इतिहास जोंपर्यंत शाबूत आहे व तो त्यांच्या क्षात्रबीजाची साक्ष देण्याइतका खंबीर, मुद्देसूद आणि सडेतोड आहे, तोंपर्यंत ते वेदोक्त कर्मांबद्दल आपला जन्मसिद्ध हक्क सांगणारच-मग वेदोक्त कर्मे प्रचलित मन्वंतराच्या धांगडधिंग्यांत त्यांच्या हातून होवोत वा न होवोत !

१८. पुढे रा. बोडस म्हणतात '' **मराठे क्षत्रिय कीं शूद्र हा वाद शिवाजीच्या वेळेपासून चालला आहे व नुकतेंच तंजावरच्या कोर्टानें कोल्हापूरच्या महाराजांस शूद्र ठरविलें तरी तेवढ्यानें लोकांचे समाधान होत नाही.**'' आमच्या बोडसांचें मात्र आकंठ समाधान झालें आहे. कारण काय ? तर तंजावरच्या कोटानें हा निकाल दिला म्हणून. बिचारा गागाभट्ट आणि आजपर्यंतचे शंकराचार्य शहाणे कीं मूर्ख याचा निवाडा करणारा बृहस्पति अखेरीस तंजावरला उपटला ! आतां हिन्दुसमाजांतील निरनिराळ्या जातीनीं आपापलीं धार्मिक रडगाणीं या बोडसमान्य बृहस्पतीच्या दरबारीं घेऊन जाऊन त्यांचा अक्षयीचा निर्णय लावून घ्यावा. या उप्पर, शंकराचार्यांच्या मिंथा करण्याचें कांहीं कारण नाही आणि त्यांच्या पीठांचा फाजील मान राखण्याचेंहि कांहि प्रयोजन नाही नव्हे या संस्थाहि जीवंत राहू देण्यांत आतां कांही पुण्यांश राहिला नाही. आतां चतुर्वर्णांच्या ठरवाठरवीचा मामला तंजावरच्या कोर्टाकडे गेलेला आहे ; मग या जगदगुरुंच्या दिवट्यांना तेलाचे बुधले ओतून ऊगाच जळत ठेवण्यात काय अर्थ ?

तंजावरच्या कोर्टाचे हे न्यायाधीश काळे आहेत कीं गोरे आहेत, हें आम्हांला माहीत नाहीं, हा खटला कोणत्या स्वरूपाचा होता हें समजण्याचें साधन अगर निवाड्याची नक्कल यापैकीं कांहींहि आम्ही पाहिलें नाहीं व पहाण्याची पर्वाहि नाहीं. उपलब्ध इतिहासाचा धिःकार करून दिलेला निर्णय बोडसपंथी मूठभर कुत्सितांशिवाय इतर कोणाहि समंजस माणसास मान्य होणार

नाही. परंतु जे व्रणार्थ पशुच्या शिरावरि वनीं उभे काकसे त्यांना त्या निकालाचेंच मोठें कौतुक वाटावें यांत अश्चर्य नाहीं. वेळींअवेळीं एखाद्या अविश्वसनीय उदरांच्या तुटक्या दोरीच्या आश्रयानें चितपावनेतराची निंदा करण्याचें वरिकंकरण हातीं बांधणाऱ्यांना आमचा असा सवाल आहे कीं चातुर्वण्यवस्थेचें व महाराष्ट्रांतील निरनिराळ्या जातींच्या इतिहासांचे अकटोविकटो ज्ञान असलेल्या अर्वाचीन काळ्या किंवा गोऱ्या न्यायाधीशाचा निकाल जर तुम्हांला वेदतुल्य प्रमाण आहे तर विलायतेंतल्या कोर्टाच्या लो. टिळकांच्या* खटल्याच्या निकालावर मनगटें चावण्याचा इतका उपद्याप करतां कांव? कां ही देखिल एक वकीली सृष्टितील मयचेष्टाच आहे? आमचे बोडसाहेबतंजावरच्या कोर्टातल्या निकालानें हुरळून जाऊन कोल्हापुरचे महाराज शूद्र ठरल्याबद्दल मोठ्या समाधानाने टाळ्या वाजवितात; परंतु टाळ्यांच्या त्या कडकडाटांत जगद्गुरुंच्या पीठावरील अर्धा डझन स्वामी आणि काशीकर्नाटक प्रांतातले असंख्य शास्त्रज्ञ पंडित अप्रत्यक्ष रीतीनें गाढव ठरले जातात याची त्यांना शुद्ध राहिली नाहीसें दिसतें! यावरून इतकाच निष्कर्ष निघतो कीं मनुष्य कितीही जाडा विद्वान असला तरी त्याला एकदां मत्सरानें ग्रासलें कीं तोसुद्धां माथेफिरूलाहि साजणार नाहींत अशी भलभलतीं विधानें बरळू लागतो. सर्व राष्ट्राची एकी करण्याची घमेंड मारणारे विद्वान अतःपर हा परनिंदेचा नीच मार्ग सोडून देतील तर त्यांच्या विद्वतेवर फार उपकार होतील. विद्वत्तेचीं आणि सत्यशोधनाचीं प्रदर्शनें करतांना इतरांची निंदा केल्याशिवाय विद्यादेवी प्रसन्न होत नाहीं सत्याचा शिंपला हातीं लागत नाहीं असें थोडेंच आहे? पण सुंभ जळला तरी पीळ कायमच राहतो. छत्रपतीच्या राजगादीची निंदा करतांकरतांच पेशवे निजधामास गेले. सातारकर छत्रपतींना शूद्र संबोधानानें जिव्हा विटाळविणारे पटवर्धन नाना नातू ॲन्ड को. चे सगळे भागीदार निमकहरामीचा डिप्लोमा घेऊन परधामास गेले. आतां त्याच कंपनीचे आधुनिक वंशज कोल्हापूर सरकारचीं हाडें चघळण्यांत धन्यता मानीत आहेत! कोल्हापूचे महाराज निर्भेह शूद्र असोत नाहींतर अळणी क्षत्रिय असोत, ते आज छत्रपतीच्या क्षत्रिय सिंहासनावर विराजमान असून क्षात्रकर्मातहि त्याचा हात धरणारा मायचा पूत पुण्यास किंवा मुंबईस जोंपर्यंत पुढें येत नाहीं तोंपर्यंत शेंकडों बोडसांनीं तंजावर कोर्टाच्या निकालाची दवंडी घरोघर पिटली तरी त्यांचा कोणीहि क्षत्रिय मराठा हात धरणारा नाहीं. मात्र तंजावरच्या किंवा विलायतच्या कोर्टानें निकाल देण्याच्या पूर्वी खुद्द चित्पावन जातींतले बरेच लोक उघडउघड शूद्रवत् आचार करूं लागले आहेत, त्याचा मात्र ब्राह्मण्याभिमान्यांनीं वेळींच बंदोबस्त करावा, इतकी मात्र कळकीची शिफारस करणें आम्हांला भाग आहे.

१९. वर्णव्यवस्थेची वाटाघाट करतांना आणि हिंदुस्थानांतील निरनिराळ्या जातींच्या नावांचा इतिहास सांगतांना आमचे मित्र बोडससाहेब पुढें म्हणतात :—

**अमुक जातीचा इतकें म्हटल्यानें कोणाचें समाधान होत नाहीं तर ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या चारींपैकीं कोणत्या तरी एका वर्गांत आपला समावेश झाला पाहिजे असें**

* लोकमान्यांबद्दलचा आमचा वैयक्तिक आदर (पहा आमचे 'वक्तृत्वशास्त्र' पृ. ९७, १०२, १७२, २३१ पुरवणी पृ. ३) जरी बाजूला ठेवला तरी प्रस्तुत खटल्याच्या निकालावर सर्व समंजस जगाचा जो अभिप्राय पडला आहे. त्यांत आम्हीहि वाटेकरी आहोंतच. अर्थातच तंजावरच्या कोर्टाच्या निकालांवर हुरळून जाऊत रा. बोडस जसे टिऱ्या कुदूं लागले, तसें टिळक-खटल्याच्या निकालाच्या बाबतींत कोणी करील, तर शुद्ध अधमपणा होय, असे मात्र आम्ही बोडसपंथी मंडळींना बजावून ठेवतों.

प्रत्येकास वाटतें. अलीकडे इंग्रजी विद्येनें तर ही इच्छा अधिकच प्रबळ होत चाललेली दिसते. सोमवंशी, सूर्यवंशी, चांद्रसेनीय, दैवज्ञ, त्वष्टाकासार, विश्वकर्मा वगैरे नवीन नवीन नावें प्रचारांत येत आहेत त्यांतील बीज हेंच नुसते सोनार किंवा कायस्थ म्हणून चालत नाहीं; तर अमुक विशेषणयुक्त ब्राह्मण किंवा क्षत्रिय म्हटले पाहिजे. ही महत्वाकांक्षा इंग्रजी शिकलेल्यांत तर अधिकच आढळते. अहाहा, केवढा अचाट ऐतिहासिक शोध, किती दांडगी ही सूक्ष्मविवेचक दृष्टि, केवढी अवाढव्य सत्यप्रियता आणि ह्यूमन सायकॉलजीचें केवढें विस्तृत ज्ञानभांडार हें !

वरील उद्‌गार काढतांना आम्हांला असें वाटतें, रा. बोडससाहेबांच्या विचार-दुर्बिणीपुढें त्यांच्या चित्पावन जातीचा गतेतिहास मूर्तिमंत उभा ठाकलेला असावा आणि ब्राह्मणपणा प्राप्त करून घेण्यासाठी व चतुर्वर्णाच्या एक उच्चवर्गात आपली कायमची वर्णी लावून टाकण्यासाठीं चित्पावनांनीं ज्या हालचाली उर्फ उलाढाली केल्या त्याचेंच प्रतिबिंब वरील उद्‌गारांत उमटविण्याची त्यांना प्रेरणा झाली असावी. चांद्रसेनीय किंवा दैवज्ञ इ. नांवें नवीन आहेत कीं प्राचीन आहेत हें ठरवायला रा. बोडसांची कांही जरूर नाहीं; परंतु चित्पावन संज्ञेचा कर्मसंन्यास करून कोंकणस्थ या स्थलवाचक अभिधानाचा बाप्तिस्मा १९ व्या शतकांत चित्पावनानीं कां घेतला* आणि भरतखंडांतील दशविध ब्राह्मणांच्या यादींत या जातीचें नांव कोठे व कोणत्या नंबरावर आहे, हें रा. बोडसांनीं दाखविण्याचा यत्न केल्यास तो कांहींतरी श्लाघ्य होईल. चित्पावनानीं पेशवे नोकरशाहीच्या दमधाटीवर स्वतःच्या जातीस कोंकणस्थ या स्थलवाचक शब्दापुढे ब्राह्मण हा नवीन शब्द जोडून संबोधण्याचा उपक्रम सुरूं करतांच बिचाऱ्या प्राचीन महाराष्ट्र ब्राह्मणांनाहि देवस्थ संज्ञेच्या बुरख्याची ओढणी घ्यावी लागली. चित्पावनांनीं ब्राह्मण बनण्याकरितां केलेल्या घालमेलींचा इतिहास फार विस्तृत आहे. त्याची थोडीफार कल्पना परिशिष्टांत दिलेल्या त्यांच्याविषयींच्या अनेक उताऱ्यांवरून येईल. चांद्रसेनीयादि इतर जातींच्या नांवांच्या अर्वाचीनत्वावर टीका करण्यापेक्षां रा. बोडसांसारखे इतिहासपंडित स्वज्ञातीच्या इतिहासाचें संशोधन करतील तर 'मी हांसे लोकाला आणि शेंबूड माझ्याच नाकाला' असा आत्मपरिचय त्यांना आल्याशिवाय खास राहणार नाही.

चांद्रसेनीय कायस्थ प्रभू हें ज्या जातींचें नांव आहे त्या जातीचा इतिहास या नांवांत आहे. हें नांव "कोंकणस्थ" संज्ञेप्रमाणें सुटसुटीत नाहीं, मालगाडीप्रमाणें लांबलचक आहे, त्याला इलाज नाहीं. अगदीं प्राचीन काळच्या दस्तऐवजी पुराव्यांच्या भानगडीत न पडता प्रस्तुत पुस्तकांतील चां. का. प्रभूंवरील दुसऱ्या ग्रामण्याचा इतिहास पाहिला तरी त्यांतील दस्तऐवजांतसुद्धां या लांबलचक नावाचा स्पष्ट उल्लेख केलेला आढळून येईल. सदहू ग्रामण्य १५ व्या शतकांतलें आहे. या एकाच मुद्यावरून असें सिद्ध होतें कीं रा. बोडसांच्या कल्पनेप्रमाणें हे नांव इंग्रजी झाल्यावर कोणा मतलबी शहाण्याच्या टाळक्यांतून बाहेर पडलेलें नाहीं किंवा चित्पावनांप्रमाणें चां. का. प्रभूंनीं कांही सामाजिक अगर राजकीय स्वार्थासाठीं नवीन लावून

* आता तर ही मंडळी तेंहि नामामिधान सोडून 'दक्षिणी ब्राह्मण' ह्मणवू लागले आहेत. कांही दिवसानी उत्तरी, पश्चिमी, ईशान्यी ब्राह्मणांचेहि अवतार हिंदुस्थानावर स्वाऱ्या करणारसें दिसतें.

घेतलेलें नाहीं. वर्णाश्रमव्यवस्थेची पाळेंमुळें हुडकिणारांनीं व इतर ज्ञातीच्या निंदेंवर स्वज्ञातीचें स्तोम माजविणारांनीं, ज्या परजातींच्या इतिहासावर त्यांना टीका करावयाची असते तो इतिहास मुळीच अभ्यासून न पहातां, मनःपूतं समाचरेत् मल्लीनाथी करणें म्हणजे आपल्या विद्वत्तेला अधम ठरविण्यासारखें आहे. बोडसंपथी अष्टपैलू विद्वान एखाद्या वादग्रस्त विषयावर लेखनपाटव गाजविण्यापूर्वी त्याचा सांगोपांग अभ्यास करण्याची तसदी घेतील, तर त्यांच्या विद्वत्तेस न शोभणारे उपरिनिर्दिष्ट वादविषयक मुद्दे लिहिण्यास त्यांची शुद्ध मनोदेवता कधीच प्रेरणा करणार नाहीं. चां. कां. प्रभूंचा इतिहास व तद्विषयक शेंकडों पौर्वात्य व पाश्चिमात्य इतिहास-शास्त्र्यांनीं ठरविलेले त्यांच्या संज्ञेबद्दलचे एथ्नॉग्राफिकल सिद्धांत रा. बोडसांनीं मुद्दाम अवलोकन करून आपल्या विचारसरणींत सुधारणा करावी अशी विनंति आहे.

सरतेशेवटी रा. बोडसवर्गीय विद्वज्जनांस एक अत्यंत कळकळीची प्रार्थना आहे. त्यांच्या बहुश्रुतपणाचें, विद्याव्यासंगाचें आणि विद्वत्तेचें आम्हांला कौतुक वाटतें. ते आमचे देशबंधू म्हणून आम्हांला मोठा अभिमान वाटतो. आज चित्पावन समाज बुद्धिमत्तेच्या बाबतींत सर्व हिंदु समाजाच्या अग्रेसर भागीं उभा आहे हें आम्ही प्रांजळपणें कबूल करतों. परंतु या मंडळींनीं वारंवार जुन्या वादांची थडगी उकरून सिद्ध झालेल्या सिद्धांताची हाडकें पुनःपुन्हा धूत बसण्याचा अव्यापारेषू व्यापार करण्यापेक्षां आपल्या विद्वत्तेचा सत्करणी उपयोग केला तर या महाराष्ट्रावर फारफार उपकार होतील. ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर किंवा वेदोक्त आणि पुराणोक्त हा वाद आजपर्यंत खोडसाळ ब्राह्मणांनींच-विशेषतः चित्पावनांनींच-उपस्थित केल्याची साक्ष इतिहास देत आहे. याउप्पर हा राष्ट्रविघातक व आत्मविनाशी धंदा ते सोडून देतील तर फार बरें ! ब्राह्मणेतर किंवा चित्पावनेतर जातींची कुचाळी केल्याशिवाय नॅशनॅलिझमचा यज्ञ जर विधिपूर्वक झाल्यासारखें वाटत नसेल, तर मग खुशाल चालूं द्या तुमचा परनिंदेचा शिमगा. परस्पर वैराच्या होळींत महाराष्ट्राचें सरपण पडतच रहावें अशी जर परशुरामाची इच्छाच असेल, तर त्याला तुम्हीं तरी काय करणार ? परंतु राष्ट्रैक्याची पुराणें झोडणाऱ्या तुमच्यासारख्या पुराणिकांचा मेंदू अझूनहि मत्सराच्या डबल न्युमोनियांतून मोकळा होईल, अशी आशा प्रदर्शित करून या वादाला आम्ही येथेंच मुक्ती देतों.

२०. निरनिराळ्या जातींत फूट फाडून राष्ट्रीय स्वातंत्र्याचा नाश ब्राह्मणांनीच कसा केला, या बाबतींतले कै. प्रो. भागवत यांचे कांही स्पष्टोद्‌गार अलीकडच्या मेंदु भडकलेल्या ब्राह्मणांना शुद्धीवर आणण्यास उपयोगी पडतील म्हणून खाली देत आहेंत. "ब्राह्मणांचे जातिभेदसंबंधीं स्तोम वाढलें, खरोखर पेशवाईपासून, रस्त्यावर थुंकल्यास रस्ता बाटेल, म्हणून गळ्यांत थुंकण्यासाठीं एक मडकें बांधून अतिशूद्रांनीं शहरांतून फिरावें, हा हुकूम पाहिल्याने फिरविला पेशव्यांनीं. धर्मगुरूंच्या हातीं निरंकुश धर्मगुरूंच्या हातीं निरंकुश धर्मसत्ता पहिल्यानें असतेंच तींत आणखी निरंकुश राजसत्ता मिळाली, म्हणजे इतर लोकांस ते अगदी दुःसह होतात. जसजशीं वर्षे लोटतील, तसतसा तिदान आमच्या या प्रियदेशांत ब्राह्मण व क्षत्रिय या दोहोंमधील विरोध ब्राह्मणांनी अधिक शहाणपणा न दाखविल्यास ढेंगांनीं वाढत जाण्याचा संभव दिसतो.

कोल्हापूरकरांचें नुकसान सर्वस्वीं केलेलें पेशव्यांनीं ; पेशव्यांनीं पटवर्धनांस दक्षिण महाराष्ट्रात जहागिरी दिल्या त्याचें मुख्य कारण शिवाजीच्या वंशास डोंकें वर उचलूं न द्यायचें हें ; जी सातारची गादी क्षत्रियांनीं स्थापिली, तिचा सर्व अधिकार हळूहळू बळकावून छत्रपतीस बाहुलें करून ठेविल पेशव्यांनींच ; पुढें खडकीच्या लढाईत महाराष्ट्राचें व त्याच्याबरोबर मऱ्हाठ्यांचे स्वातंत्र्य सर्वस्वीं घालविणारे पेशवेच ; परदेशीयांस आंत पाहिल्याने आणणारे पेशवेच ; शिंदे व होळकर यांच्या शहाणपणाच्या मसलतीचा तिरस्कार करून पाणिपतास मऱ्हाठ्यांचा सत्यानास करून टाकला पेशव्यांनींच, ज्या पेशव्यानें शाहूच्या बायकोस गांजिलें व साक्षात् शिवाजीची सून ताराबाई हिचा पदोपदीं अपमान केला, त्याच्याच चुलत बंधूनें ; बडोदेकर व नागपूरकर हे दोघे खुद्द शाहूछत्रपतीनें वाढविलेले, त्यामुळें पेशव्यांचा व त्यांचा प्रायः विरोधच असे ; शिंद्यावर पहिल्यानें पेशव्यांचे उपकार होते, पण नाना फडणिसानें ब्रह्मणांची सत्ता वाढविण्यासाठीं व क्षत्रियांची अजिबात मानहानि करून टाकण्यासाठीं, शिंद्याबरोबर विरोध माजविला महादजी जर त्यावेळी नसता तर शिंद्याचेंहि सर्वस्व नाना न चुकता ; अहल्याबाईस बुडविण्याच्याही पेशव्यांच्या मसलती चालल्याच होत्या ; व अखेरीस इंदुरकरास बुडविण्यासाठी पेशव्यांना कावा करून शिंद्यास आपणांकडेस ओढिलें, पण यशवंतरावानें पुण्याच्या लढाईची मात्रा दिली, तिच्या ठसक्यानें पेशव्यांचा दुष्ट ज्वर लागलाच नरम पडला. **जसजसा मऱ्हाठ्यांच्या इतिहासाचा फैलावा होत जाईल, तसतशा या ठळक गोष्टीं महाराष्ट्र क्षत्रियांच्या मनांत विशेष वागतील, व त्यामुळें जर ते ब्राह्मणांचा द्वेश अधिक करूं लागले, तर निदान आम्ही तरी त्यांस दोष लाविणार नाहीं, ज्यांचे सर्वस्व आम्हीं बुचाटून घेतलें किंवा ज्यांस सर्वस्वीं बुडविलें किंवा बुडविण्यासाठीं यत्न केला, त्यांनी जर आमचा द्वेष करूं नये, तर करावा तरी कोणाचा ?** आतां झाली गोष्ट झाली, हें खरें आहे. पण तशी गोष्ट पुनःन होऊं देण्याविषयीं आम्हां ब्राह्मणांस फार जपलें पाहिजे ; व शाहूस अभिषेक होईपर्यंत मऱ्हाठ्यांनी केलेल्या महापराक्रमांवर झांकण टांकून, शुद्ध जात्यभिमानानें पेशव्यांस यश आलेल्या क्षुद्र लडायांच्या फुशारक्या मारण्याचें सोडून दिलें पाहिजे. ब्राह्मणांविषयीं इतर जातींची पूज्यबुद्धि असते, ती, जर आम्हा धर्मगुरूमध्ये ते अलिकडेस यत्किंचित् काहीं उणीव पहातील तर, समूळ धुऊन जाईल व आमच्या पाठीमागच्या उखाळ्या पाखाळ्या निघून, आम्हांस तोंड दाखविण्यास देखील जागा रहाणार नाहीं, जितकें आम्हांस जपून वागलें पाहिजे, तितकें जपून इतरांनी वागण्याची गरज नाहीं. कारण बोलून चालून ते धर्मगुरू नव्हत. आजपर्यंत आम्हीं धर्मगुरूंनींच जपून वागून जर सदुदाहरण घालून दिलें नाहीं, तर ज्यांचे आम्ही धर्मगुरू त्यांनी कित्ता तरी कोणता वळवावा ? **पेशव्यांनीं जें उदाहरण घालून दिलें, तें तसें घालून देण्यापेक्षां जर मुळींच घालून दिलें नसतें, तर बरें झालें असतें.** आतां तरी ब्राह्मण चांगलें उदाहरण घालून देतील, अशी आशा बाळगतो. पण अलीकडेस ज्या सर्व गोष्टी घडून आल्या व घडून येत आहेत, त्यावरून विचार करितां **ब्राह्मणांचा आपण स्वतः निराळे '' लोक '' किंवा '' जन '' समजण्याचा विचार दिसतो.** अशा रीतीनें ब्राह्मणांनी भेद माजविणें शहाणपणाचें काम नव्हे, असें म्हटल्याशिवाय आमच्यानें रहावत नाहीं.''

(उद्गार पृ. १८०–१८१.)

२०. लोकशिक्षणनामक मासिक पुस्तकाच्या पहिल्या वर्षाच्या १२ व्या अंकांत रा. वि. का. राजवाडे यांनी महाराष्ट्रांतील बुद्धिमान् प्रतिभावान् व कर्त्या लोकांची मोजदाद केली असून शके १७३९ ते शके १८३५ (सन १८१७–१९१२) पर्यंतच्या [लोकोत्तर ?] पुरुषांची यादी दिली आहे. प्रत्येकानें समाजहित काय केलें आहे तें त्याच्यां नांवापुढे दर्शविलें आहे. रा. राजवाड्यांनीं प्रस्तुत यादीच्या अग्रस्थांनीं चिंतामणराव आप्पा सांगलीकर यांचे नांव दाखल केलें आहे. आपल्या यादींत अग्रमान दिलेल्या या बूद्धिमान प्रतिमान प्रतिभावान व कर्त्या पुरुषानें समाजहित काय केलें, याबद्दल आमचे राजवाडे म्हणतात :–बरा संस्थानिक, परभु ग्रामण्य. दिग्विजयीपणा व लोकोत्तरपणा प्राप्त व्हायला येवढें भांडवल पुरेसें असतें, हा एक नवीन शोधच लागला म्हणायचा ! मथळ्यावर रा. राजवाडे स्वतःच म्हणतात.––

**'' विचार सामाजिक आहे तेव्हां कोणत्याही प्रकारें समाजाच्या हिताला ज्यांनी थोडा किंवा फार हातभार लाविला अशाच व्यक्तींचा तेवढा या मोजदादींत समावेश होतो. एखादा माणूस मोठा बुद्धिमान किंवा प्रतिभावान असला, परंतु समाजाच्या उपयोगी तो यत्किंचितही पडला नाहीं, तर त्याची गणना समाजहितेच्छूंच्या मोजदादींत करितां येत नाहीं ...... तसेंच कोणी बुद्धिमान माणूस एखाद्या समाजांत जन्मला व तो समाजाचें अनहित करूं लागला, तर त्याची गणना समाजहितेच्छूंत करितां येत नाहीं. सबब बुद्धिमान परंतु आत्मसंतुष्ट संन्याशी व समाजहितनाशक माणसें ह्यांना वगळून बाकी जेवढ्या बुद्धिमान, कर्तृत्वमान व प्रतिभाशाली व्यक्ती गेल्या शंभर वर्षांत मराठा (?) समाजांत झाल्या त्यांची याद देण्याचा प्रयत्न करितों. ''**

चिंतामणराव आप्पा पटवर्धनांनीं ' परभु ग्रामण्य ' यज्ञ करून त्यांत बऱ्याच चां. का. प्रभुंच्या आहुति दिल्या ही गोष्ट इतिहास नाकबूल करीत नाहीं. इतिहास संशोधन करण्याचें जरी कोणी नाकारलें तरीहि आप्पांची ही दिग्विजयी कामगिरी कच्च्या पाऱ्याच्या रसायनाप्रमाणें महाराष्ट्रेतिहासाच्या आंगावर फुटून निघाल्याशिवाय रहाणार नाहीं, इतकी जालीम आहे. श्रीमंत सांगलीकर बुद्धिमान् होते, कर्तृत्ववान् होते, प्रतिभावान् होते, चित्पावन होते व ब्राह्मणहि होते. परंतु या त्यांच्या सर्व भांडवलाचा व्यय सातारकर छत्रपतीच्या गादीची होळी करण्यासारख्या व ' परभु ग्रामण्या ' सारख्या अधम कार्यांत झाल्यामुळें फार वाईट वाटतें. ग्रामण्यांत पुढाकार घेणारांस कोणत्याहि वेळीं कोणत्याहि विचारी पुरुषानें शहाणपणाचें किंवा दिग्विजयीपणाचें सर्टिफिकीट दिलेलें नाहीं. ' परभु ग्रामण्य ' हीच जर बुद्धिप्रभावाची, कर्तृत्वसर्वस्वाची आणि प्रतिभासंपन्नतेची कसोटी मानली, तर बाळाजीपंत नातू, दादंभट पेणकर इत्यादि कारस्थानी मंडळींची तरी कोणत्याबाबतींत कमतरता होती ? त्यांचीहि गणना या दिग्विजयी महापुरुषांच्या यादींत झाली पाहिजे. ' परभु ग्रामण्य ' करण्यांत अग्रेसर होणाऱ्या शहाण्यांची आजतागायत नांकठेचीच झालेली आहे व चां. का. प्रभुज्ञातीच्या बाणेदार वर्तनापुढें त्यांच्या बुद्धिप्रभावानें सपशेल हारच खाल्ली आहे. चित्पावनांशिवाय कोणत्याहि इतर समाजानें, सातारच्या छत्रपतीनें, जगद्गुरू शंकराचार्यानें, काशीकर्नाटकांतील अग्रगण्य विद्वान पंडितांनीं, कोणीही

ग्रामण्यप्रकरणाकडे आजपर्यंत सहानुभूतिपूर्वक पाहिलेलें नाहीं किंवा त्यास उत्तेजनहि दिलेलें नाहीं. सारांश, ग्रामण्यांचीं बंडें उपस्थित करणें हें सज्जनांनीं केव्हांहि निंद्यच मानलेलें आहे. हें जर खरें, तर चिंतामणरावांना दिग्विजयी महापुरुषांच्या लिष्टांत अग्रभागीं ठेवण्यांत रा. राजवाडे यांनीं काय एवढा मोठा लोकोत्तर दिग्विजय केला ? बाकी, ' परभु ग्रामण्य ' करून किंवा त्या ज्ञातीच्या निष्कलंक इतिहासावर कुत्सित शिव्याश्रापांच्या डांबरीचे बुधले ओतून जर चित्पावन महाशयांची इतिकर्तव्यता व लोकोत्तरता सिद्ध होत असेल तर आजलाहि असल्या महापुरुषांची वाण चित्पावन समाजांत मुळींच पडणार नाहीं. या बाबतींत खुद्द आमच्या राजवाड्यांनींच पुणें–भारत इतिहास संशोधक मंडळाच्या विद्यमानें ही लोकमान्यता मिळविण्याचा धडा घालून दिलाच आहे, तेव्हां त्यांची परंपरा चालवायला एकापेक्षां एक सवाई दिढी राजवाडे कितीकतरी पैदा होतील ! आधींच भा. इ. सं. मं. चा पाया सत्याच्या कॉंक्रीट सिमेंटावर उभारलेला आहे, तेव्हां या दिग्विजयी परंपरेचा डोला कधिंकाळीं कोसळून पडेल असें भाकित करण्याची आवश्यकताच नाहीं.

रा. राजवाड्यांच्या लिस्टामुळें ' परभु ग्रामण्या ' पासून समाजाचें हित काय झालें, हा एक मोठा विचाराचा प्रश्न उद्भवतो. ब्राह्मण व चां. का. प्रभू यांच्यांत हाडवैर उत्पन्न झाल्यामुळें महाराष्ट्राच्या सामाजिक हितात व वैभवांत भर पडली काय ? चिंतामणरावांनीं नातुप्रभृतींच्या सहाय्यानें एका बाजूस ग्रामण्यांचा बॉंब पेटवून दुसऱ्या बाजूनें कृष्णकारस्थानें लढवून छत्रपतीच्या सिंहासनाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडविल्या, हेंच तें समाजहित काय ? क्षत्रिय मराठ्यांच्या वेदोक्ताबद्दल आणि ' शूद्राधम परभूं 'च्या अग्निहोत्राबद्दल तीन हजार चित्पावनांनीं मालकम साहेबांच्या पुढें जाऊन बोंब मारली व कर्नल ओव्हिन्सला साथीदार बनवून भर मध्यरात्रीं प्रतापसिंहाला एका वस्त्रानिशीं राजवाड्यांतून खेंचून काढून, त्यांच्या चिटणीसाला व इतर कारभाऱ्यांना बिनचौकशीनें दोनदोन तीनतीन वर्षें तुरुंगांत कुझविलें, हेंच कां तें राजवाड्यांचें समाजहित ? तारीख १६ जुलै सन १८४१ रोजीं जनरल रॉबर्टसन यानें इष्ट इंडिया कंपनीच्या प्रोप्रायटर्सच्या बोर्डापुढें जें व्याख्यान दिलें, त्यांत ते म्हणतात :— *This shows that the Brahmins had been unceasing in their endeavours to injure the Raja. They had even gone so far as to declare that *he was no Hindoo;* and Chintamun Row of Sanghli, a neighbouring Brahmin chief, had circulated a manifesto all over Hindostan, saying that *he was an enemy to the national faith.* समाजहित साधण्याची हीच कां ती रीत ? ग्रामण्यामुळें चां. का. प्रभू व क्षत्रिय मराठे–नव्हे, सर्व चित्पावनेतर समाज–याचीं मनें उद्विग्न झालीं, त्यांनीं राज्यकारभारांतून आंगें काढलीं आणि यामुळें सर्वच

*भावार्थ :—यावरून असें दिसून येईल कीं राजाचा सर्वस्वीं घात करण्याच्या कामांत ब्राह्मणांचे प्रयत्न जारी चालूं होते. फार काय पण ' हा राजा हिंदुच नव्हे ' असें प्रतिपादन करण्यापर्यंत त्यांची मजल गेली होती आणि शेजारचा ब्राह्मण जहागिरदार सांगलीकर चिंतामणराव यानें तर सगळ्या हिंदुस्थानभर एक जाहीरनामा काढून असा पुकारा केला कीं हा राजा (प्रतापसिंह) राष्ट्रीय धर्माचा शत्रू आहे.

महाराष्ट्रांत जातिभेदाचा व जातिमत्सराचा सांवळागोंधळ उडाला, त्याचेंच नांव समाजहित आहे काय ? जनरल रॉबर्टसन पुढें म्हणतात :—" *this was not the first time that the Brahmins had made similar attempts to procure the interference of the British Government ......I have been thus particular in regard to this case, as it displays how little the parties regarded truth, *when the object was to injure or annoy the Raja.*" काय ही या चित्पावन वीरांची छत्रपतिनिष्ठा ! केवढें हें अचाट राष्ट्रप्रेम ! देशभक्तीचा केवढा महिमा ! सत्याची केवढी प्रीति आणि चिकाटी आणि समाजहिताचा केवढा मोठा वैभवपर्वत हा ! ! स्वदेश बांधवांची हाडें फोडण्यासाठीं परक्यांना पाट्यावरवंट्यासह आमंत्रण करणारीं हीं वीररत्नें हिंदमातेच्याच कुसव्यांतलीं काय ? शंका येते. मि. डन्लॉप नांवाचे एक गृहस्थ ता. १२ एप्रिल १८३७ च्या आपल्या पत्रांत म्हणतात :—†" with regard to Chintamun Row's friendly intercourse between him and the Sattara Raja, it seems to be highly improbable for several reasons. He is a zealous, I may say, *bigoted Brahmin*, and *feels extreme enmity at the Raja* for his encouragement of the Purbhoo caste in the performance of Brahminical caremonies, which he has taken up and written against in the spirit of a polemic." आद्यछत्रपती श्रीशिवाजीमहाराजांच्या हिंदवी स्वराज्याचें हिंदवी स्वराज्याचें सिंहासन आपल्या स्वार्थाच्या होळींत जाळून पोळून खाक करणाऱ्या चिंतामणराव नातूप्रभूतींच्या राष्ट्रहितविध्वंसक लीला म्हणजे एका स्वतंत्र इतिहासाला पुरून उरतील इतक्या व्यापक, विस्तृत आणि भयंकर आहेत. या लीलांनी काय समाजहित साधलें असेल, तें रा. राजवाड्यांनीं अगर त्यांच्या कोणत्याहि बगलबच्यानें दाखवून सिद्ध करावें, असें आम्हीं आव्हान करतों. ग्रामण्यांपासून देशाचें हित काय झालें किंवा त्यांच्या उपद्यापी म्होरक्यांनी काय समाजहित साधलें, त्याची भरभक्कम साक्ष सध्याची अवनत देशपरिस्थितीच देत आहे. या घाणेरड्या व मनोवृत्ति क्षुब्ध करणाऱ्या विषयाला अधिक न वाढविणें हेंच चांगलें.

२१. महाराष्ट्रांत जातिभेद होता किंवा नव्हता, असल्यास मऱ्हाठेशाहीचा ऱ्हास होण्यास तो सर्वांशी किंवा निदान अल्पांशीं तरी कारणीभूत झाला की नाहीं, हा एक चर्चेचा प्रश्न ' मराठे आणि इंग्रज ' पुस्तकानें अलीकडे उत्पन्न केला आहे. ठिकठिकाणचे निरनिराळे विद्वान्

---

*भावार्थ :—ब्रिटीश सरकारनें येऊन मध्यस्थी करावी म्हणून कोलाहल करण्याचा ब्राह्मणांचा हा कांहीं पहिलाच प्रयत्न नव्हे. . . . . .या खटल्यांत मी विशेष लक्ष देऊन पाहिलें आणि ज्या अर्थी त्या (ब्राह्मणांचा) उद्देश राजाला अपाय करणें, निदान त्याला चिडविणें हा असल्यामुळें, त्यांच्या पक्षाला सत्याची कितपत चाड आहे, तें दिसतच आहे.

†भावार्थ :— :—सातारच्या राजाची आणि चिंतामणरावाची मैत्री असेल असें अनेक कारणांवरून मुळींच संभवत नाहीं. तो (चिंतामणराव) मोठा साहसी—नव्हे मी तर म्हणतो पक्का हेकेखोर ब्राह्मण आहे; वेदोक्त कर्म करणाऱ्या प्रभू लोकांना राजाचें पाठबळ असल्यामुळें तर तो राजावर अतिशयच जळफळत असतो. प्रभूंच्या वेदोक्तावर चिंतामणरावानें आकांडतांडव करणारे बरेच लेख लिहिले आहेत.

आपापल्या मताप्रमाणें ही चर्चा करीत आहेत. खुद्द रा. केळकर यांनींहि हा प्रश्न सोडविण्याचा त्यांच्या पुस्तकांत यत्न केलेला आहे. कै. प्रो. लिमये या निस्पृह इतिहासज्ञानें सुप्रसिद्ध '' विविधज्ञानविस्तार '' मासिकांतहि दोन उत्कृष्ट लेख लिहिले होते. नुकतेच पुणें येथील वसंतव्याख्यानमालेंत प्रो. भानूंनीं याच प्रश्नाची चर्चा केली ; आणि रावबहादुर चिंतामणराव वैद्य यांनींहि चित्रमयजगत् (मे १९१८ च्या अकांत) हा प्रश्न आपल्या दृष्टीनें सोडविण्याचा प्रयत्न केला आहे.

रा. केळकरांच्या चर्चेचा विचार केला तर त्यांचा सारा झोंक सदरहू प्रश्नाचें उत्तर नकारार्थी ठेवण्याचाच असल्यामुळें, शक्य तितक्या सावधगिरीनें, शद्बयोजनाकौशल्यानें आणि विधानपटुत्वानें त्यांनी जातिभेदाचा प्रश्न सहज लीलेनें अज्जीबात फेंटाळून लावला आहे. त्यांची विधानपद्धति नेहमींच त्रयराशिकी धर्तीची असते ; मग त्यांना सम किंवा व्यस्त प्रमाणाचें भानच रहात नाहीं. प्रस्तुत प्रकरणीं चर्चा करतांना ' जातीभेद ' शद्बाच्या उच्चाराबरोबर निरनिराळया अर्थांच्या जेवढ्या म्हणून छाया उत्पन्न होतात, तेवढ्यांचा पुरापूर आधार घेऊन रा. नरसोपंतांनीं आपलीं विधानें वकीली धाटणीच्या भडक रंगांत रंगवून सोडली आहेत. सरतेशेवटीं आस्तिपक्ष किंवा नास्तिपक्ष यांपैकीं एकाचाहि स्पष्ट आधार न धरितां, जातिभेद असलाच तर राज्यविनाशक इतर कारणांशीं तुलना करतां रुपयाला पै कवडी इतकाच असेल, अशा अर्थाचा त्रिशंकूवजा अभिप्राय देऊन त्यांनी या वादग्रस्त प्रश्नाची रजा घेतली आहे. रावबहादुर चिंतामणराव वैद्यांनीं ' मराठेशाही कशानें बुडाली ? ' या प्रश्नाचें निदान ठरवितांना बऱ्याच वरच्या दर्जाची विचारसरणी अंगिकारिल्यामुळें त्यांच्याकडूनहि या जातिभेदाच्या प्रश्नाची व्हावी तशी मीमांसा झाली नाहीं ; आणि त्यांचा लेख बाह्यात्कारीं जरी केळकरांच्या विधानांचें खंडण करणारा आहे असा दिसतो, तरी सत्यशोधनाच्या गांवी जातांना त्यांच्याहि विचारसरणीला अखेर केळकरांच्याच चकारीला येऊन भिडावें लागलें. प्रो. भानूंनीं मात्र स्पष्ट नकारार्थी ' जातिभेदामुळेंच मराठी राज्य नष्ट झालें असें म्हणणें चुकीचें आहे.' असा रोखठोक अभिप्राय दिला. वरील विद्वान् मंडळींच्या या प्रामाणिक मतांबद्दल संशय व्यक्त करणें महापाप आहे. परंतु त्यांनी या प्रश्नाचा एकतर करावा तितका विचार केलेला नसावा अगर तितकी साधनसामुग्री तरी त्यांना उपलब्ध झालेली नसावी, असें आमचें प्रामाणिक मत आहे. ज्या विद्वानांच्या अभिप्रायांची आज बहुजनसमाजांत मान्यता आहे, त्यांनींच उडवाउडवीचीं विधानें करणें बरें नव्हे, असें आम्हाला वाटतें. कै. न्या. रानडे हे वरील मंडळींपेक्षा कांहीं कमी विद्वान संशोधक नव्हते ! त्यांनीं पेशव्यांच्या रोजनाम्याबद्दल लिहिलेल्या निबंधांत असें स्पष्ट नमूद केलें आहे कीं '' **जातिमत्सराचा इतका बडेजाव माजला कीं जूट होणें अशक्य झालें व राष्ट्रहिताच्या ऐवजीं आपलीच तुंबडी भरण्याकडे प्रत्येक प्रबळ सरदारांचें लक्ष गुंतलें. यावेळीं ब्राह्मणमंडळी म्हणजे अगदीं तर्र झालेली. खरे राज्यकर्ते आपण, आपणांस इतर जातींपेक्षां विशिष्ट हक्क व सवलती असावयास पाहिजेत असें ते समजत.**'' रा. व. वैद्यांच्या मताप्रमाणें यांत ' उच्च राजकीय कल्पनांचा अभाव ' कदाचित् असू शकेल, परंतु जातिमत्सर मुळींच नव्हता हें विधान

मात्र येथें सपशेल खोटें ठरत आहे. रा. ब. म्हणतात " मराठीराज्याच्या नाशास जातिभेद (जातिमत्सर ?) कारणीभूत झाला नाहीं व राष्ट्रहितसंवर्धनाचे कामीं जातिभेद आड येऊं शकत नाहीं. " ' नाहीं 'च म्हटल्यावर कोण काय करणार ? चित्पावन नोकरशाहीनें रुजविलेला जातिमत्सराचा कालकूटवृक्ष राष्ट्रहितसंवर्धनाच्या बाबतींत कसा मध्येंच आडवा पडला हें इतिहास स्पष्टच सांगत आहे. अहो इतिहासच कशाला ? पेशवाईंतल्या जातिभेदाचा अमानुष छळ अझूनहि चित्पावनेतर महाराष्ट्रीयांच्या हृदयांत तिडका आणीत आहे, हा परिणाम कशाचा ? राजमदाच्या धुंदींत किंवा धर्माच्या पांघरुणाखालीं इतर महाराष्ट्रीय समाजांचा छळ करणारे ते चित्पावनहि गेले आणि तो छळ सोसणारेहि पंचतत्वांशीं समरस होऊन नामशेष झाले, तरीसुद्धां अझूनहि चित्पावनेतर समाजांस त्या छळांच्या कळा याव्यात, हें विलक्षण नाहीं काय ? सध्यांहि जातिमत्सराच्या कळा अनुभविणारे जर विद्यमान आहेत, इंग्रजांच्या समतोल व समरुप सवाई सोट्या राजपद्धतीच्या अमदानींत त्या कळांत वारंवार अधिकाधिक भर घालणारे बृहस्पति जर खुद्द चित्पावनांत आज आपला जातिभेदाचा धडा गिरवीत आहेत, तर स्वायत्त चित्पावनी पेशवाईच्या काळांत जातिभेदच नव्हता, या उडवाउडवीच्या पोटांत काय स्वार्थ असेल तो असो. शिवाजीच्या पदरीं ७०० पठाण होते, पानपतच्या मोहिमेंत इब्राहिमखान गारद्यानें शिकस्त केली, पेशव्यांच्या फौजेंत महार होते, सखाराम हरी गुप्ते—कायस्थ प्रभू—यानें चित्पावन राघोबासाठीं आत्मयज्ञ केला, असल्या उदाहरणांनीं जातिभेदाचा प्रश्न सुटणें शक्य नाहीं. याच त्रयराशिकी पद्धतीनें जर विचार केला तर सध्यां—निरनिराळ्या सर्व जातींची मंडळी भेदभाव विसरून इराण्याच्या एकाच हाटेलांत चहा बिस्कुटें झोडीत असतांना–इंग्रजी अमदानींत जातिभेद मुळींच अस्तित्वांत नसला पाहिजे आणि असलाच तर तो सांप्रतच्या होमरूल–चळवळीला मुळींच बाधक होत नसला पाहिजे ! पण वस्तुस्थिती तशी दिसत नाहीं. बहुतेक सर्व कामापुरतेच मामा असतात. चहा ढोसतांना, टिफीनी करतांना, फंडांची शक्कल काढतांना, व्याख्यानें देतांना, राष्ट्रीय पुराणें झोडतांना मात्र किंचित् जातिभेदाचा ताप उतरलासा दिसतो; परंतु चहाचा पेला पालथा पडला, फंडाचा हंडा भरला कीं तापाची डिग्री वाढूं लागते. फार दूर कशाला ? वर्तमानपत्रें पहा. राष्ट्रीयत्वाचा मोठा टेंभा मिरविणारी आणि विश्वबंधुत्वाच्या टिमक्या पिटणारीं कित्येक पत्रें या जातिभेदाच्या अंमलाने तर्र झालीं कीं कसे पोरकट आणि क्षुद्र विचार बरळूं लागतात, हें आम्हीच सांगितलें पाहिजे असें नाहीं. निःपक्षपणानें विचार केला तर सध्यांहि जातिमत्सर बराच आहे. अर्थात् त्याची उत्पत्ति पूर्वीच केव्हां तरी झालेली असली पाहिजे खास. इंग्रजी अंमल सुरूं झाल्यावर या मत्सराची प्राणप्रतिष्ठा झाली असें मानण्यास बिलकूल आधार नाहीं;/शिवाजी महाराजांच्या वेळीं जातिमत्सर जवळजवळ नव्हताच;* तेव्हां जातिभेद–म्हणजे जातिमत्सर–याचा उत्पत्तिकाळ कोठेंतरीं मध्यंतरींच असला पाहिजे, हें निर्विवाद होय. ग्रामण्यांचा साद्यंत इतिहास आतां प्रसिद्ध होत आहे. पेशवाई काळांतील राष्ट्रविनाशक जातिमत्सराच्या इतिहासाचें हें

---

* " महाराष्ट्रपणाचा अभिमान जर जात्याभिमानांत नाहींसा होऊन जाता, तर (रामचंद्रपंत, प्रल्हादपंत इ.) ब्राह्मणमंडळींच्या व मुरार बाजी, बाजी प्रभु, खंडो बल्लाळ यांच्यासारख्या कायस्थ मंडळींच्या हातून जीं श्लाघनीय व स्मरणीय कृत्यें घडून आलीं, तीं निःसंशय आलीं नसतीं." कै. भागवत. उद्गार पृ. १८८.

साहित्य रा. केळकरादि विद्वानांना उपलब्ध झालें नसेल; झालें असल्यास, त्यावर नजर टाकायला त्याना फुरसद झाली नसेल; किंवा शतसांवत्सरिक श्राद्धाच्या धामधुमींत तें त्यांना हस्तगतहि होणें शक्य नसेल. परंतु आतां जी माहिती प्रसिद्ध होत आहे त्यावरून कोणालाहि स्पष्ट स्पष्ट दिसून येईल कीं मराठेशाही बुडविण्याच्या कामीं जातिमत्सराचा परिणाम रा. केळकर म्हणतात त्याप्रमाणें पै कवडीचा नसून, त्याची व्याप्ति खचित कांहींतरी अधिक असली पाहिजे. ग्रामण्यांच्या बंडाचा हेतू, त्याचा धिंगाणा आणि चित्पावनेतरांचा पाडाव करण्यासाठीं चित्पावनांकडून वेळोवेळीं झालेले अत्याचार पाहिले कीं जातिमत्सराच्या इतक्या असंख्य कवड्या जमा होतील कीं जातिभेद नव्हता जातिभेद नव्हता म्हणून नाकानें कांदे सोलणारांच्या आंगावर त्या कवड्यांची झूल दुर्गादेवीच्या भुत्याप्रमाणें खुशाल घालतां येणें शक्य आहे. ज्या विद्वानांनीं ऐतिहासिक सत्याचा अभिमान धरून पूर्वी घडलेल्या पातकांची जनतेला आठवण करून देऊन, त्या पातकांची पुनरावृत्ति न होऊं देण्याबद्दल खटपट करायची, तेच विद्वान् जर फाजील स्वाभिमानाच्या भरीं पडून वाईट गोष्टींबद्दल कानांवर हात ठेऊं लागतील, तर त्यांच्या विद्वत्तेचा दुरुपयोग होत आहे, असें कष्टानें म्हणणें अनिवार्यच होऊन बसेल.

२२. ग्रामण्यांच्या इतिहासानें महाराष्ट्रातील पेशवे नोकरशाहीच्या वेळच्या जातिमत्सराचें जें भेसूर स्वरूप आतां उघडकीस येत आहे, त्याचा राष्ट्राच्या स्वातंत्र्यनाशावर केवढा परिणाम झाला असेल हें वाचकांनींच अजमावून पहाण्याची कृपा करावी. या जातिमत्सरानें शिवाजीमहाराजांनीं रक्ताचें पाणी करून स्थापलेली स्वराज्याची राजगादी धुळीस मिळवली. छत्रपतीच्या अभिमानी एकनिष्ठ समाजांचा तेजोभंग याच जातिमत्सरानें केला. नवीन नवीन सरदारांचीं वर्णी लाऊन छत्रपतिपक्षाच्या जुन्या पिढीजाद सरदारांच्या तलवारींना याच जातिमत्सरानें अक्षयीचा गंज चढवून त्या नामशेष केल्या. 'आम्ही पेशव्यांचे सेवक, सातारकरांना कोण ओळखतो ? ' अशा अर्थाचे निमकहरामपणाचे उद्‌गार नाना फडणीसाच्या तोंडून वदविणारा हाच जातिमत्सर. घरचे टांकून दारच्यांच्या गळ्यांत मिठ्या मारण्याची प्रवृत्ति याच जातिमत्सरानें उत्पन्न केली. जातिमत्सरानें ग्रस्त होऊन ' पेशव्यांनीं एक ब्राह्मणजातीच्या हातांत सर्व सत्तेची किल्ली ठेवण्याविषयीं भगिरथ यत्न केले, म्हणून मऱ्हाठ्यांचा व त्यांच्या प्रियदेशाचा घात झाला.' महाराष्ट्रांत निमकहरामी व लुटारूपणाचा धडा याच जातिमत्सरानें घालून दिला. या लुटारूपणाचे आद्यप्रवर्तक हिंदु म्हणविणारे पहिले रावबाजी यानीं लुटीच्या निमित्तानें हिंदुस्थानांत हिंदु यात्रेकऱ्यांचा अमानुष छळ केल्यांचें महशूरच आहे. परशुरामभाऊंचा जवळचा नातलग कोन्हेर त्रिंबक पटवर्धन यांनीं करवीर शंकराचार्यांचा मठ जाळूनपोळून फस्त केला व शंकराचार्यांच्या आत्महत्त्येचें पुण्य जोडलें, त्याच्या मुळाशीं करवीरकर भोंसल्याबद्दलचा जातिमत्सरच होता. याच जातिमत्सरानें चिंतामणराव पटवर्धनसारख्या तलख कर्तबगारीच्या सरदाराची सारी मर्दुमकी अधम कार्यांत खर्ची पडली. याच जातिमत्सराला पेशव्याचा राजाश्रय मिळाल्यामुळें त्याचें पर्यवसान अखेर नृशंसपणा व कृतघ्नपणा यांत होऊन, हरीपंत भावे, बाळाजीपंत नातू, बाळकोबा केळकर, नागो देवराव याच्यासारखीं राक्षसी वृत्तीचीं माणसें या

हतभागी महाराष्ट्रभूच्या कुसव्यांत पैदा होऊं लागलीं. चित्पावनेतर ब्राह्मणजातींचा नूर सपशेल मावळून टाकून त्यांना नामोहरम करून टाकले याच जातिमत्सरानें. अशा या पेशव्यांच्या अमदानींतल्या जातिमत्सराच्या किंवा जातिभेदाच्या घातुक लीला कोठवर वर्णन कराव्या ? या जातिभेदाचा मराठेशाहीवर कांहींच परिणाम झाला नाहीं किंवा जातिभेद मुळीं नव्हताच, असें ज्यांचें अझूनहि प्रामाणिक मत असेल, त्यांनीं अतःपर ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर चळवळींच्या नांवानें खडे फोडण्याचा धंदा सोडून द्यावा आणि ही चळवळ सांप्रतच्या होमरूल-आकांक्षाना विरोध करणारी आहे, असें प्रतिपादन न करण्याची तरी कृपा करावी. सध्यांची *ब्राह्मणेतरांची चळवळ त्याच्या विशिष्ट हक्कांच्या पुनरुज्जीवनार्थ आणि संरक्षणार्थ आहे, असें स्पष्ट दिसतें. पेशवाईंत त्याच्या सर्व हक्कांच्या झालेल्या पायमल्लीचा कटु अनुभव त्यांना मूर्तिमंत दिसत असूनसुद्धा त्यांनीं सध्यांच्या ब्रिटिश अमदानींत स्वतःच्या हक्कांचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला नाहीं तर तो करावा तरी केव्हां ? हा यत्न ते न करतील तरच त्यांचे पूर्वज त्यांना आत्मघातकी म्हणून शाप दिल्याशिवाय खचित राहणार नाहींत. अस्पृश्यांची चळवळ तर बोलूनचालून निवळ प्राणत्राणपरायणार्थच आहे. वर वर्णन केलेली पेशवाई अंमलांतील जातिमत्सराची वावटळ राष्ट्रहितसंवर्धक कार्यांत आड आली नाहीं, असें कंठरवानें सांगणारांना ह्या सध्यांच्या चळवळीं राष्ट्रहितविघातक आहेत असें म्हणण्याचा बिलकूल अधिकार नाहीं. पूर्वीच्या जातिमत्सराची तीव्रता सांप्रतच्या ब्राह्मणेतरांच्या चळवळींत खास नाहीं; शिवाय गंध लावूं नका, देवपूजा करूं नका, धोतरे नेसूं नका, श्वास सोडूं नका, उच्छ्वास घेऊं नका, ब्राह्मणांच्या रस्त्यावर थुंकू नका इत्यादि हलकट छळ करण्याची सध्यांच्या ब्रिटिश अमदानींत ब्राह्मण्याचा सुका किंवा ओला टेंभा मिरविणारांची छाती नाहींच नाहीं. असें जर आहे तर आपापल्या विवक्षित समाजांच्या हितरक्षणार्थ ब्राह्मणेतरांनीं चालविलेल्या कायदेशीर चळवळी राष्ट्रहितविनाशक कशा ठरतात हें कोणी बृहस्पति समजाऊन सांगेल काय?

२३. राष्ट्र जागृत झालें कीं त्यांतील प्रत्येक समाजाच्या घटकावयवांत चळवळ सुरूं होते; किंबहुना असेंच खरें आहे कीं चळवळींच्या प्रमाणावरूनच राष्ट्रीय जागृतीचें प्रमाण ठरलें जातें. अर्थात् शहाण्या ब्राह्मणांनींच काय ती चळवळ करावी, त्याचीच चळवळ काय ती खरी " राष्ट्रीय " आणि इतरांनीं मात्र आढ्याला तंगड्या लावून ब्राह्मण करतील ती पूर्वदिशा खुशाल पहात बसावी, असें म्हणणें केवळ अन्यायाचेंच नव्हे तर मूर्खपणाचे होईल. ब्राह्मणेतर ब्राह्मणांच्या चळवळींपासून अलिप्त रहातात आणि ब्राह्मणांच्या " राष्ट्रीय " तंबोऱ्याच्या तारांशीं आपला स्वर एकजीव करीत नाहींत; हें असें कां होतें याचें कारण ब्राह्मणांनींच वास्तवीक शोधून पाहिलें पाहिजे. ब्राह्मणेतरांच्या सर्व बऱ्यावाईट चळवळींच्या नांवानें खडे फोडण्यापेक्षा, आज ब्राह्मणेतर ब्राह्मणांच्या खांद्याशीं खांदा भिडवून उभे रहाण्यास कां नाखूष आहेत, याचें मूळ राष्ट्रीयत्वाचीं दांभिक पुराणें झोडणारे पुराणिक नीट शोधून काढून आपल्या वर्तनांत सुधारणा करतील तर ब्राह्मणवर्णाबद्दल अझूनहि पूज्यबुद्धी बाळगिणारे ब्राह्मणेतर त्यांच्याशीं सहकारिता करण्यासाठीं

*यांत सगळेच ब्राह्मणेतर समाज आहेत असें मुळींच नाहीं, विशेषतः चां. का. प्रभू तर मुळींच नाहींत.

खात्रीनें आपला हात पुढें करतील. इतकेंच नव्हे, तर " ब्राह्मणांस जर धर्मगुरुत्व आपलें रहावें अशी खरोखरी इच्छा असली, तर महाराष्ट्रांतील क्षत्रियांची निंदा करण्याचें त्यांनीं पहिल्यानें सोडून द्यावें. " असे कै. प्रो. भागवत यांनीं सन १८८७ मध्यें जे अत्यंत कळवळ्यानें उद्गार काढले, त्यांचें मर्म अझूनहि त्याना नीट पटेल असा भरंवसा आहे. पंढरीचा विठोबा श्रीविष्णूचा अवतार, पण तो चोखामेळ्यासारख्या अतिशूद्राच्या घरीं जेवला ना ? अनंत भट्टासारख्या उच्चवर्णीय महाराष्ट्र ब्राह्मणाने त्याच अतिशूद्र चोखामेळ्यांचें अभंगलेखकाचें काम केलें ना ? अहो, ज्या महाराष्ट्रीय समाजांनीं नब्राह्मण व यावनी साधूसंतांच्या पायांवर आपलीं मस्तकें मोठ्या प्रेमानें, उल्हासानें व भक्तीनें झिजीविण्यांत जीवितसार्थक मानलें, ते समाज तुम्हां ब्राह्मणांचा आदर करायला केव्हांहि मागेंपुढें पहाणार नाहींत. पण हें केव्हां ? जेव्हां आपल्या सद्वर्तनानें तुम्ही ब्राह्मण आहांत हें त्यांना प्रत्यक्ष पटवाल तेव्हां.

**न कुलेन न जात्या वा क्रियाभिर्ब्राह्मणो भवेत् ।**
**चाण्डालोपि हि व्रतस्था ब्राह्मणः स युधिष्ठिर ॥**

कोणीहि कुळानें किंवा जातीनें ब्राह्मण बनत नसतो, सदाचारानेंच मनुष्य ब्राह्मण बनतो. चाण्डालाचे आचरण जर उत्तम असेल तर त्याला ब्राह्मण म्हणावें--तोच खरा ब्राह्मण; असें वैशंपायनानें युधिष्ठिरास स्पष्ट सांगितलें आहे. आडनांवाचे ब्राह्मण हे कांहीं खरे ब्राह्मणच नव्हत. सदाचाराच्या माहात्म्यापुढें उत्पत्तीचा नीचपणा किंवा संकरजत्वाचा प्रसिद्धपणा कोणीहि विचारांत घेणार नाहीं. आमच्या चित्पावन देशबंधूंच्या उत्पत्तीचा इतिहास कसाहि असो, आम्हांला त्याच्याशीं कांहींएक कर्तव्य नाहीं. ब्राह्मण्यत्वाची सनद त्यांनीं पेशव्यांच्या अंमदानींत पटकविलेली असो, नाहींतर नोहाच्या जलप्रलयापूर्वी मिळविलेली असो, त्याचाहि वाद आम्ही घालूं इच्छित नाहीं. फक्त, स्वतःच्या ब्राह्मण्याला साजेशोभेसें कोणतें शतकृत्य या समाजानें आजपर्यंत केलें आहे, तें कोणी ऐतिहासिक पुराव्यानिशीं दाखवून द्यावें. ब्राह्मण उपाधीमुळें धर्मगुरुत्वाचा मान स्वतःकडे हे चित्पावन ओढून घेत असतात; ब्रह्म जाणणारा तो ब्राह्मण, इतकी सतीच्या वाणाची व्याख्या जरी त्याना लागूं करण्याचें सोडून दिलें, तरीसुद्धा धर्मगुरुला उचित असा मनाचा उदारपणा, वृत्तीची समता, तपश्चर्येचा सात्विकपणा यापैकीं कोणता गुण कोणत्या चित्पावनानें जगाच्या नजरेस कधि पाडला आहे ? ग्रामण्यांचीं बंडें करून इतर समाजांचा छळ करणें हें ब्राह्मण्यांचें लक्षण काय ? स्वतःच्या मुठभर जातीला ब्राह्मण्याचा लटका मुलामा देतांना इतर ब्राह्मण समाजाचाहि न भूतो न भविष्यति छळ करून त्याना पार रसातळाला नेऊन चिणणें हें ब्राह्मण्य कोणत्या वेदांत वर्णिलेले आहे? स्वतःच्या भाडोत्री ब्राह्मण्याची कायमची थप्पी लावण्यासाठीं राजकीय सत्तेच्या जोरावर हाणमार, जाळपोळ, धरपकड इत्यादि राक्षसी वर्तनाने साऱ्या जनतेला त्राहि भगवन् करून सोडणें, हेंच ब्राह्मण्याचें लक्षण असें कोणत्या स्मृतीत सांगितलें आहे ? चित्पावन समाजाचा इतिहास व पेशवे नोकरशाहीचा इतिहास हीं एकाच वस्तूचीं दोन आंगें होत. हा इतिहास कसाहि उलटसुलट करून वाचला तरी चित्पावनांनीं आपल्या ब्राह्मण्याच्या समर्थनार्थ आजपर्यंत एकहि सर्वमान्य सदाचारसंपन्न शतकृत्य केल्याचें आढळून येत नाहीं, असे फार दिलगिरीनें म्हणावे लागते. नुसता ग्रामण्यांचाच इतिहास पाहिला

तरी त्यांतसुद्धां चित्पावन जातींतील विद्वान व पढिक शास्त्री पंडितांनीं शूद्रातिशूद्र चाण्डाळ किंवा बिलंदाज ठगांनाहि शोभणार नाहींत अशींच नृशंस कृत्यें केल्याची साक्ष तो इतिहास देत आहे. सध्यांहि निवृत्तमांसतेची शेखी मिरविणारे अनेक चित्पावन विद्वान् वेळींअवेळीं सवड सांपडतांच चित्पावनेतरांची मनमुराद निंदा करून त्याचीं हाडें चघळण्यात ब्राह्मण्यत्वाचा कळस झाला असें मानीत आहेत. धाकदपटशानें किंवा बळजबरीनें ब्राह्मणपणा मिळविल्याचें किंवा मिळविण्याचा प्रयत्न केल्याचें उदाहरण भारतीय वर्णाश्रमधर्माच्या प्रचंड इतिहासात फक्त चित्पावनांचेंच होय. याच्या इतिहासांत ब्रह्मदेवानेंच एक मोठी घोडचूक केली. ती हीच कीं त्यांच्यावर वाढलेले मागासलेपणाचें कवच आस्तेआस्ते फोडून उन्नतीच्या मार्गांत त्यांना क्रमशः न आणतां, त्यांच्यावर एकदम आधिभौतिक वैभवाची अवाचित खैरात करण्यास सुरुवात केली. त्याचा परिणाम असा झाला कीं आधिभौतिक वैभवानें त्यांचे डोळे उरफाटून जाऊन अध्यात्मिक उन्नतीची त्याना पर्वा राहिली नाहीं. अर्थात् चित्पावनांत आजपर्यंत कोणीहि संत निर्माण झाला नाहीं, नांव घेण्यासारखा राष्ट्रकवी जन्माला आला नाहीं आणि साऱ्या हिन्दुसमाजाच्या जगद्गुरूच्या पीठावर आजपर्यंत एकहि चित्पावन विराजमान झाला नाहीं. अध्यात्मिक बाजू जर आधिभौतिक वैभवाच्या तोडीनेंच परिणत झालेली असती तर सत्तामदाच्या धुंदींत ग्रामण्यासारखे बोल्शेविझम्चे प्रकार त्यांच्या हातून खास घडले नसते. सर्वांभूतीं समान दृष्टी ठेवणें, धर्माविषयक आचार व विचार स्वतःच्या निष्कलंक व एकनिष्ट वर्तनाने जिवंत राखणें, इतर समाजांची धर्मपिपासा अमृततुल्य उपदेशानें तृप्त करणें आणि स्वतः निरीच्छपणानें वागून धर्माच्या बाबतींत मधुकरकमलपरागन्यायानें सर्वांचीं अंतःकरणें शांत करून त्यांचा आपल्याविषयींचा आदर वृद्धिंगत करणें, हीं जीं ब्राह्मण्याचीं स्थूल लक्षणें त्यांनाहि चित्पावन समाज पूर्णपणें पारखा होण्याचें कारण ही आध्यात्मिक दृष्टीची उणीव हेंच होय. ही उणीव जोंपर्यंत भरून निघणार नाहीं, जोंपर्यंत चित्पावनसमाज इतर महाराष्ट्रीय क्षत्रिय ब्राह्मण वैश्यादि समाजांच्या निंदेच्या भांडवलावर आत्मस्तोमाच्या वखारी थाटण्याचा निंद्य उपक्रम सोडणार नाहीं, आणि जोंपर्यंत खऱ्या ब्राह्मण्याला काळीमा लावणाऱ्या अहंमन्यतेच्या तोऱ्याला ते कायमची मुक्ती देणार नाहींत, तोंपर्यंत त्यांच्या ब्राह्मण्याबद्दल कोणाचीहि कधींहि खात्री पटणार नाहीं, त्यांच्याशीं सहकारिता करायला कोणताही समंजस समाज केव्हांहि सिद्ध होणार नाहीं आणि जे चित्पावन आज स्वतःस मोठे डुड्ढाचार्य समजून स्वज्ञातीचा एक स्वतंत्र " राष्ट्रीय " संघ बनवूं पहात आहेत, ती त्यांची सवत्या सुभ्याची वृत्तीच अखेरीस त्यांना महाराष्ट्रीय चतुर्वर्ण समाजांच्या संघांतून कायमचा चाट देण्यास चुकणार नाहीं, हें त्यांनीं पूर्ण लक्षांत ठेवावें. चित्पावनांचा गतेतिहास आणि त्याची सांप्रतहि सर्व प्रकारच्या व्यवहारांत पदोपदी दृष्टीस पडणारी पुनरावृत्ति पाहून, अस्सल चित्पावनाची मनोवृत्ति तरी कोणकोणत्या तत्वांची असावी, असा सहज विनोदानें आम्ही एकदां आमच्या एका चित्पावन B. Sc. मित्रास विचारिलें. त्यानें चटकन् कागद घेऊन

| | |
|---|---|
| सत्व | 0 % |
| रज | 25 % |
| तम | 75 % |
| कंप्लीट चित्पावन | 100 % |

असें लिहून दिलें. हा विनोदच झाला. तथापि यांतहि बरेंच तथ्य आहे, असें दिसून येईल. या पृथःकरणांतली प्रमाणें केव्हां बदलतील तीं बदलोत ! सध्यां तरी चित्पावन वर्तमानपत्रें, किंवा इंदुप्रकाशासारखीं चित्पावनलेली वर्तमानपत्रें, चित्पावन ऐतिहासिक संस्था, चित्पावन लेखक, चित्पावन वक्ते यांच्या चळवळींकडे पाहिलें, तर रजोगुणाच्याहि ठिकाणींहि लवकरच शून्य येऊन तमोगुण मात्र सबंध शेंकडा हबकणार असें वाटतें ! महाराष्ट्राचें दुर्भाग्य दुसरें काय ?

मागला इतिहास सोडला आँणि अगदीं चालू काळचा इतिहास जरी पाहिला तरी हेंच दिसून येतें कीं चित्पावनांशिवाय महाराष्ट्रांतील इतर कोणत्याहि जाती केव्हांहि एकमेकांचा जातिमत्सर करीत नाहींत. आधुनिक चित्पावन राष्ट्रीयत्वाचा कितीहि डौल आणोत, त्यांची प्राचीन वरपगड्याची वृत्ति जागृत झाली कीं तेथें हटकून एकीची बेकी होते, असें अनेक उदाहरणांनीं सिद्ध करून देतां येण्यासारखें आहे. इतरांना उपदेश करण्यापूर्वी चित्पावनच जर आपलें चित्त पावन करण्याचा प्रयत्न करतील तर महाराष्ट्रांत जातिमत्सर औषधालासुद्धा मिळणार नाहीं, एवढी हमी आम्ही देतो. इतर समाजांचा तंजोभंग करून स्वतःची व स्वज्ञातियांची टिमकी पिटण्याचे दिवस आतां उरले नाहींत किंवा दुसऱ्यांच्या कुचाळ्या करून स्वतःच्या स्तोमाला पॉलीश चढविण्याचेहि हे दिवस नाहींत, हें आमच्या चित्पावन देशबंधूंनीं अझूनहि लक्षांत आणल्यास महाराष्ट्रावर फारफार उपकार होतील. ' तुम्ही ब्राह्मणांना कां शिव्या देतां ? असा ब्राह्मणेतरांना सवाल करण्यापूर्वी ब्राह्मणच आपल्या नित्य वर्तनाचा इतिहास शुद्धीवर येऊन पहातील, तर सध्यां नुसत्या शिव्यांवरच भागत आहे, याबद्दल ब्राह्मणेतरांचे ते आभारच मानतील. कांहीहि विशेष कारण घडलेलें नसतांहि ब्राह्मणेतरांच्या हृदयाला घरें पाडण्यासारखी निंदा, कुचेष्टा किंवा व्यंगोक्ती आजपर्यंत आम्हीं कधींही केलेली नाहीं, असें परशुरामाच्या शपथेवर मुळामुठेच्या संगमांत उभे राहून सांगायला आज चित्पावन तयार आहेत काय ?

२४. मुत्सद्देगिरी व राजकारण या दोन गोष्टींचा चित्पावनांचा मागील इतिहास पाहिला तर त्यांतहि त्यांनीं नांव मिळविल्याचें दिसत नाहीं. सध्यां राजकीय क्षेत्रांत दंड थोपटून दोन हात करण्यास सरसावलेल्या महाराष्ट्रीय वीरसैन्यांत चित्पावन कॅप्टनांची, कर्नलांची व रिक्रूटांची संख्या बरीच आढळते. निश्चित ध्येयाकरितां--मग तें कांहींहि असो--सर्वस्वत्याग करणारी मंडळी अलीकडे चित्पावन समाजांत बरीच निपजूं लागली आहेत, आणि चालू इतिहासाचीं बरीचशीं पृष्ठे त्यांच्या स्वार्थत्यागांनीं चित्रित झालेलीं पहाण्यांत येतात. भारतीय राजकीय क्षेत्रांतील हक्कांबद्दलचें युद्ध सध्यां चालूंच आहे, तेव्हां यशापयशाचें निश्चित भाकित आतांच करणें, बरेंच धाडसाचें होईल. शिवाय देशाच्या सर्वच प्रकारच्या परिस्थिति-क्षेत्रांत अंधार पडल्यामुळें, कोणाच्या का कोंबड्याच्या आरवण्यानें होईना, पण एकदां उजाडो, असें सर्व भारतवासीयांना होऊन गेलें आहे. अर्थात् युद्धक्षेत्रावर चित्पावनांची फलटणें विक्टोरिया क्रॉसचीं पदकें अधिक पटकावतात कीं बंगालच्या चित्रगुप्त कायस्थांच्या सेना अधिक बहाद्दरी गाजवितात, याचें भविष्य करण्याचा रिकामटेंकडा धंदा करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. तथापि घोड्यांच्या शर्यतींत पैजेचीं टिकिटें खरेदी करण्यापूर्वी शर्यतभक्त जसे प्रत्येक घोड्याच्या

पूर्वेतिहासाचें काळजीपूर्वक अध्ययन करतात, त्याप्रमाणें मुत्सद्देगिरी आणि राजकारण यांत चित्पावन समाजानें आजपर्यंत कोणकोणत्या शर्यती जिंकल्या आहेत, त्यांचा इतिहास पहाण्यास कांहीं हरकत नाहीं.

मागील इतिहासावरुन असें निश्चित सांगण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं कीं चित्पावनांत मुत्सद्देगिरी फार कमी होती आणि राजकीय क्षेत्रांत तर त्यांना कधींहि यश आलेलें नाहीं. चित्पेवन मुत्सद्यांत जर खरोखर कांहीं मुत्सद्देगिरी असती तर त्यांना पेशवाई बुडविण्याचा त्यांच्यावर प्रसंगच आला नसता. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतरच्या तों राजारामाला अभिषेक होईपर्यंतच्या क्रांतीचा आणि राष्ट्रीय संकटांचा काळ, आणि थोरल्या माधवराव पेशव्याच्या मृत्यूपासून तों शेवटच्या रावबाजीच्या यःपलायते सजीवतेपर्यंतचा काळ, या दोन काळांची आपण तुलना केली, म्हणजे वरील विधानांची सत्यता पटेल. पहिल्या काळांतले सारे मुत्सद्दी महाराष्ट्र (देशस्थ) ब्राह्मण, क्षत्रिय मराठे व चां. का. प्रभ. हे होत आणि दुसऱ्या काळांतलें राजकीय क्षेत्र शुद्ध चित्पावनांनीं गजबजलेलें होतें; उगीच इखादा सखाराम बापू बोकीलासारखा देशस्थ वाटाणा मुत्सद्यांच्या आमटींत नांवाला हातीं लागतो इतकेंच. पहिल्या काळांत, संभाजीच्या मृत्यूनंतर महाराष्ट्राला अवरंगझेबासारख्या सर्वसमर्थ जबरदस्ताशीं तोंड द्यायचें होतें आणि दुसऱ्या काळांत नुसत्या युक्तीबाज आणि अल्पसमर्थ अशा इंग्रजी व्यापारी मंडळीशीं डावपेचांचा शुद्ध बुद्धीबळाचा खेळ खेळावयाचा होता. पहिल्या प्रसंगी महाराष्ट्राची मान अवरंगझेबाच्या तलवारीच्या पात्यावर मूर्तिमंत टेंकलेली होती, दुसऱ्या प्रसंगीं महाराष्ट्र आसनमांडी–किंवा म्हणा वाटेल तर वीरासन–घालून टोपकरांशीं बुद्धीबळाच्या सामन्याच्या हारजिकीवर आपल्या सोक्षमोक्षाची किमया करीत होता. पहिल्या प्रसंगांतली सतीच्या वाणाची तीव्रता दुसऱ्या प्रसंगांत मुळींच नव्हती. असें असूनसुद्धां पहिल्या प्रसंगांतल्या मुत्सद्यांनीं नुकताच स्थापन झालेला व एकाकी ढांसळून पडलेला हिंदवी स्वराज्याच्या टोलेजंग रायगड हां हां म्हणतां आपल्या हातांवर झेलून धरला आणि त्याची पुनश्च भक्कम पायावर उत्कृष्ट उभारणी करून अवरंगजेबासारख्या सहस्त्रबाहू व सहस्त्राक्षालासुद्धां तोबा तोबा म्हणण्यास भाग पाडावें आणि दुसऱ्या प्रसंगांतील मुत्सद्यांना पेशवाईवर तिलांजली देण्यापलीकडे गत्यंतरच नसावें, यावरून काय सारांश निघतो तो वाचकांनींच अजमावून पहावा. रा. ब. चिंतामणराव वैद्यांचा तर्काप्रमाणें दुसऱ्या प्रसंगीं राष्ट्रांत खऱ्या स्वदेशाभिमानाचा दुष्काळ होता, ह्मणून अल्पसमर्थ टोपकरांच्या झगड्यांत सर्वसमर्थ पेशवे हटले, जसें जरी मान्य केलें तरी स्वदेशाभिमानाचा दुष्काळ उत्पन्न करण्याची पेशव्यांवरची जबाबदारी कांहीं टळत नाहीं. पहिल्या प्रसंगांत जर स्वदेशाभिमान होता तर तो नष्ट करण्याच्या पातकांतून दुसऱ्या प्रसंगातल्या मंडळींची सुटका होत नाहीं. शिवाय स्वदेशाभिमानावांचून नुसतें लष्करी सामर्थ्य किंवा मुत्सद्देगिरीचा दिमाख राष्ट्रसंरक्षणाच्या कामीं उपयोगी पडत नाहीं, हें समजून उमजून राष्ट्रांतल्या स्वदेशाभिमानाचा वृक्ष स्वार्थाच्या करवतानें कांपून खच्ची करणें, यांत मुत्सद्दीपणा तो काय राहिला? पूर्वी स्वदेशाभिमान होता तर तो काय कोणी घालविल्याशिवाय गेला? अर्थात्

तो पेशव्यांनीच ज्याअर्थी घालविला त्याअर्थी त्यांच्या मुत्सद्दीपणाच्या वखारींत पुढें शेणाच्या पणत्या कां लागल्या हें निराळें सागण्याची जरूरच नाहीं. पहिल्या प्रसंगांतल्या मुत्सद्यांनीं व लढवय्यांनीं मुत्सद्दपणाचे व राजकारणाचे धडे वशंपरंपरेनें मिळविलेले असून शिवाय त्यांत खुद्द शिवाजी महाराजांच्या खास वळणाची भर पडलेली होती. स्वदेशाभिमान व स्वराज्यभिमानाच्याच तोडीनें या मंडळींनीं आपली स्वामीनिष्ठा, सत्यप्रियता आणि इमान हीं चोख राखल्यामुळेंच शिवाजीचा मुलगा राजाराम याच्या वैयक्तिक अप्रबुद्धतेबद्दल चकार शब्द न काढतां किंवा अवरंगझेबाच्या फाटाफूट करण्याच्या कारस्थानाला बळी पडण्याइतकी स्वार्थाची विकारवशता यत्किंचित्‌हि न दाखवितां, फक्त शिवरायाच्या नांवाचा अभिमान धरून त्यांनीं न भूतो न भविष्यति अशीं स्वार्थत्यागाचीं अनेक संस्मरणीय कृत्यें केलीं, शिवाजीच्या हिंदवी स्वराज्याला महाबलीष्ट अवरंगझेबाच्या घशांतून खेंचून बाहेर काढलें आणि महाराष्ट्रीयांच्या मनगटांतील अनुवंशिक पराक्रमाचा ठोंसा तत्कालीत प्रतिस्पर्ध्यांना सणसणीत ठणकावला. उलटपक्षीं दुसऱ्या प्रसंगांतल्या राजकारणी मुत्सद्यांचीं व लढवय्यांचीं कृत्ये पहा. ज्यावेळेला बाजीरावावर प्रसंग आला, त्यावेळेला एकट्या बापू गोखल्याशिवाय एकहि चित्पावन सरदार त्याच्या पाठीशीं उभा राहिला नाहीं. एकाहि मुत्सद्याची अक्कल त्याच्या सहायास आली नाहीं. उलट श्रीमंतांचें तळपट झालें तर होवो, पण माझ्या वाट्यास आलेल्या जहागिरीला उपसर्ग न लागो, म्हणून प्रत्येक चित्पावन सरदार आपापल्या बांधरुंदी पाहूं लागला. कित्येक इंग्रज रेसिदंटाच्या मंदिराचे उंबरठे झिजवून त्या नंदीच्या पृष्ठभागाला स्पर्श करून ' त्राहि माम् पाहि माम् क्षमस्व ' म्हणून कान उपटूं लागले कित्येकांनीं तर उघडाउघड घरभेद्येपणा करून श्रीमंतांची राजकारणांतलीं बिंगें चव्हाट्यावर आणल्याबद्दल अभयपत्रें मिळविलीं. पेशव्यांचें उच्चाटण झाल्यावर शिंदे आणि होळकर यांनीं कंपनी सरकारला पाय लावण्याकरितां मागाहून जी उठावणी केली, त्यावेळीं तरी कोणी चित्पावन सरदारांनीं त्याना हातभार लावला काय? ज्याची त्याची स्वार्थावर नजर ! राजारामाच्या वेळच्या राजकारणी मंडळींनीं जर असाच स्वार्थ पाहिला असता, तर अवरंगझेबानें त्यांच्यावर जहागिरींची नुसती खैरात केली असती आणि यावेळीं महाराष्ट्र ब्राह्मणांचीं, क्षत्रिय मऱ्हाठ्यांचीं व चां. का. प्रभूंचीं अनेक संस्थानें नजरेस पडलीं असतीं. पण ते बिचारे भोळे पडले स्वामीनिष्ठ, खाल्ल्या मिठाचा अभिनाम धरून जिवाची तमा न बाळगणारे आणि खऱ्या राजकारणी मुत्सद्देगिरींत मुरलेले ! आज महाराष्ट्रांत जीं अनेक चित्पावनांचीं संस्थानें हयात आहेत, त्यांचा पाया ' त्राहि माम् ' वरच उभारलेला आहे, हें आणखी विषद करून सांगण्याची आवश्यकता नाहीं.

खरें म्हटलें तर राजकारणाच्या पाठशाळेंत चित्पावनांचा नुकताच कोठें प्रवेश झाला होता. राजकारणाची पहिली श्री सन १७१४ त त्यांनीं कुठें घटवायला घेतली. पण जात्याच ते ऊर्ध्व महत्वाकांक्षी असल्यामुळें, तिच्या प्रत्येक फुसक्या उसाळीबरोबर चढत चढत त्यांनीं केवळ सहा वर्षांच्या अवधींतच राजकारणाच्या ' ॐ नमः सिद्धं ' पर्यंत मजल मारल्याचें पहिल्या

बाजीरावाच्याच तोंडून* जाहीर केलें. बाजीरावानंतर तर काय राजकारणाच्या इत्यलम्‌चाच पुंकारा अथेति होत गेला. परंतु खऱ्या अनुभवी व कसलेल्या मुत्सद्यांनीं पेशवे नोकरशाहीच्या डांवपेंचांस कंटाळून राजकारणांतून आपापलीं आंगे काढून घेतांच पेशवाईत राजकारणाचें व मुत्सद्देगिरीचें नुसतें मढेंच उभें राहिलें. अर्थात्‌ पंजांत सांपडलेल्या उंदराला गटकावण्यापूर्वी मांजर जसें त्याच्याशीं टिवल्याबाव्हल्या करीत असतें, त्याप्रमाणें ता म्हणतां ताकभात ओळखणारे आणि उडत्या पांखरांचीं पिसें डोळे मिटून मोजणारे इष्ट इंडिया कुंफणीचे मुत्सद्दी, पेशवाई राजकारणाच्या मढ्याशीं तहनाम्यांचे आणि वकीलातीचे डांव चैनीनें खेळत बसले यांत कांहीं नवल नाहीं. भुसभुशीत मुत्सद्देगिरीच्या भरंवशावर पुण्यास स्वतःची मध्यवर्ती सत्ता स्थापन करून, शिरजोर होऊं पहात असणाऱ्या शिंदे होळकरादि सुभेदारांची उचलबांगडी करून त्याना दूरदूर लांबलाबच्या सुभ्यांवर पांगून ठेवण्याची पेशव्यानीं जी हिकमत लढविली, ती देखिल मुत्सद्दीपणाच्या अभावामुळें अखेर त्यांच्याच आंगांवर शेकली ना! फार काय पण या सुभेदारांचे चित्पावनेतर दिवाण कायकाय मसलती लढवीत होते किंवा आपल्या धन्याच्या अक्षयीच्या वैभव-स्थैर्याकरिता कोणकोणतीं धोरणे अंमलांत आणीत होते, याचा देखिल मागमूस ज्या मध्यवर्ती सत्तेच्या पेशव्यांना किंवा त्यांच्या चित्पावन मंत्र्यांना अजमावता आला नाहीं, त्यांच्या मुत्सद्दीपणाची किंवा राजकारणी धोरणाची कोणाला कींव येणार नाहीं ? एवढी मोठी पानपतची मोहीम लढायला गेलेले सदाशीवराव भाऊसाहेब. पण त्यालासुद्धां गोविंदपंत बुंदेल्याचे डावपेंच उमगले नाहींत आणि सरतेशेवटी त्याच गोविंदपंतानें पानपतास भाऊचा बळी देऊन महाराष्ट्रांतील तीन लाख बांगड्या फोडल्याची पुण्याई जोडली. नाना फडणीसाच्या मुत्सद्देगिरीबद्दल मोठी बोलबा आहे. याबद्दल विस्तृत विवेचन करायला याठिकाणीं अवकाश नाहीं. परंतु ज्याच्या प्रत्येक डांवपेचानें श्रीमंतांचा पाय अधिकाधिक खोल चिखलांत रुततच गेला, त्याच्या मुत्सद्दीपणाबद्दल कोण शहाणा तारीफ करील तो करो. या मागल्या गोष्टीं सोडून दिल्या आणि अगदीं अलीकडे येऊन कित्येक संस्थानांतील चित्पावन दिवाणांच्या किंवा कारभाऱ्यांच्या कर्तबगारीकडे लक्ष दिलें, तरीहि मुत्सद्देगिरी किंवा राजकारणीपणा यांतहि कोणी विशेष सुधारणा दाखविल्याचें दिसत नाहीं. उलट कोल्हापूरच्या बरव्यांसारख्यांनीं संस्थानचें नांव बद्दु केल्याचीं उदाहरणें मात्र बरीच दाखवितां येतील.

२५. पुण्याला कोल्हापूरचें कडकडीत वावडें आहे, ही गोष्ट आतां कोणास नव्यानें सागण्याची जरूर नाहीं. त्यांतल्या त्यांत महाराष्ट्राचे मुर्धाभिषिक्त कुळकर्णी केसरीकार आणि करवीरकर छत्रपति यांच्यांत असलेलें अहिनकुलाचें नातेंहि तितकेंच लोकविश्रुत आहे. केसरीकर मधूनमधून करवीरकरांवर आपली कुळकर्णी लेखणी चालवून छत्रपतींची मोफत जाहीरात देतच असतात. त्यात अलीकडे कुळकर्णी–वतनाचा प्रश्न उपस्थित झाल्यापासून तर आमच्या या पुणेकर राष्ट्रीय कुळकर्ण्याचा बराच तडफडाट झाल्याचें वरचेवर दिसून येतें; शिवाय कोल्हापूरांत हा प्रश्न उपस्थित झाल्यापासून त्या तडफडाटाची डिग्री कमाल मर्यादेवर

*थोडक्या भांडवलावर आणि पोटापुरत्या अकलेवर देशभक्तीची, लोकसेवेची किंवा विद्वतेची पदवी अलीकडे मुळामुठा युनिवर्सिटींतून कशी पटकन्‌ मिळते आणि अप्रसिद्ध किंवा कुप्रसिद्ध उमेदवार तिच्या पचनीं पडतांच चटकन्‌ कसा पांढराफेक सुप्रसिद्ध दे. भ. होऊन बाहेर पडतो, हें आतां पुष्कळांच्या ध्यानात आलेलेंच आहे. त्याचप्रमाणें राजकारणाचे गड्डेहि अलीकडे बरेच मॅन्युफॅक्चर होऊ लागले आहेत.

भडकलेली दिसते. आम्ही स्वत: कांहीं कुळकर्णी नव्होत किंवा कुळकर्ण्यांच्या वाटाघाटींत आमचें हितहि नाहीं व अहितहि नाहीं. तथापि रामनामाच्या उच्चाराबरोबर पिशाच्च जसें बेफाम भडकतें, तसे कोल्हापूर आणि कुळकर्णी हे दोनच शब्द कानीं पडतांच, आमचे पोक्त विचारी केसरीकारहि कसे अद्वातद्वा बरळूं लागतात हें पहाणें अलीकडे बरेंच करमणुकीचें साधन झालें आहे

सन १९१३ सालीं ' मुकुंदराय ' नांवाच्या एका आधुनीक कवीनें ' कुळकर्णीलीलामृत ' नांवानें एक छोटेखानी विनोदप्रचुर ओवीबद्ध पुस्तक लिहिलें व तें कोल्हापूरच्या सत्यशोधक समाजानें छापून प्रसिद्ध केलें. या पुस्तकाचा परामर्ष केसरीचे त्यावेळचे संपादक रा. नरसोपंत केळकर यानीं ३० सपटेंबर व ७ आकटोबर १९१३ च्या अंकांत दोन मुख्य निबंध लिहून घेतला आहे. वास्तवीक केसरीच्या नेहमींच्या सांप्रदायाप्रमाणें या विनोदी चोपड्याची विल्हेवाट पोंचट पोंच देऊन लावायला पाहिजे होती. परंतु या चोंपड्याच्या मळपृष्ठावरच कोल्हापूर आणि कुळकर्णी हे दोन शब्द दिसतांच, सत्यशोधक समाजाची, करवीरकर छत्रपतीची आणि त्यांच्या दिवाणादि हस्तकांची यथेच्छ खोड मोडण्याची इतकी चांगली संधी आमचे केसरीकार कशी दवडतील ? त्यांनीं पुस्तकाला उलटें सुलटें करून त्याचा ग्रंथकार, प्रकाशक, अर्पणपत्रिका आणि आभारप्रदर्शन इत्यादी बाबीं चटचट आपल्या एडीटरी नेत्रकटाक्षानें वरवर अवगाहन करून पटदिशीं निष्कर्ष काढला कीं " हें अमृतरूपी विष कांहीं तरी सैतानी विध्वंसपर कृत्य करण्यास अवतरलें आहे, अशी कोणाचीहि तेव्हांच खात्री होईल." केसरीचें वाक्य म्हणजे ब्रह्मवाक्य ! त्याना कुळकर्णी–प्रकरणावर केव्हां तरी एकदां तांडवनृत्य करायचें होतेंच. इतक्यांत हें कुळकर्णीलीलामृताचें चोपडें त्यांच्या हातीं पडलें, मग सारासार विचाराची विभूत फूं करून फुंकल्यावर त्यांच्या बेशुद्ध आकांडतांडवाला रंग कां चढणार नाहीं ? केसरीकारांनीं दोन मुख्य निबंध लिहून या चोपड्याची नाहक जाहीरात देण्याचा अव्यापारेषु व्यापार केला नसता, तर त्याच्या जननमरणाची वार्ताहि कोणास कळली नसती. प्रस्तुत प्रसंगी कुळकर्णीलीलामृताचें परीक्षण करण्याचें हें स्थळ नव्हे, जरूर नाहीं किंवा त्याची पाठ थोपटण्याचें वकीलपत्रहि आम्ही घेतलेलें नाहीं; परंतु केसरीकारानें त्याच्याबद्दल जो मोठा शिरा ताणताणून गवगवा केला तो मात्र निवळ परांचा कावळा होय, इतकें मात्र येथें सांगणे जरूर आहे. केसरीकाराचें आकांडतांडव, तें पुस्तक प्रेस आक्टाखालीं जप्त करण्याबद्दल त्यांनीं सरकाराला केलेली शालशिष्ट ' राष्ट्रीय ' शिफारस आणि कोल्हापूरच्या दारूखान्यांत तयार झालेल्या ' ब्रह्मद्वेषाच्या ' बेवड्याचा त्यांना लागलेला ठसका पाहून हें भयंकर प्रकरण काय आहे म्हणून आम्ही हें पुस्तक मुद्दाम आणवून समग्र वाचलें. सदहू लीलामृतावर चर्चा करून रा. केळकरांनीं केसरीच्या वाचकांना तर असें भासविण्याचा प्रयत्न केला कीं कुळकर्णीलीलामृत पुस्तकाने महाराष्ट्रांतील निरनिराळ्या जातींचा जणुंकाय सत्यानाश करण्याची वेळ आणली; जातिमत्सराच्या ज्वालामुखीने पेट घेतला; आणि राष्ट्रीयपणाच्या चबुतऱ्याखालीं या महाग्रंथानें ज्वालाग्राही बांबगोळ्यांचा ढीग रचून ठेवला. जो कोणी हें पुस्तक वाचील त्याला असेंच आढळून येईल कीं केसरीकार म्हणतात तसा भयंकर प्रकार त्यांत कोठेंहि आढळून येत नाहीं. तें एक नाट्यकलारुकुठार, नाटक्याचेतारें, सुदाम्याचे पोहे इत्यादि पुस्तकांप्रमाणेंच एक विनोदी पुस्तक असून त्यांत कुळकर्ण्यांच्या लोकविश्रुत चेष्टा वर्णन केलेल्या आहेत. कुळकर्ण्यांच्या चेष्टा

हरदाससुद्धां आपल्या कथांतून चमत्कृतीचें विनोदी तिखटमीठ लावून वर्णन करीत आले आहेत आणि

शोणार शिंपी कुळकर्णी आप्पा ॥
याची शंगत नकोरे बाप्पा ॥

ही सुप्रसिद्ध उक्ती लहानलहान पोरांटोरांच्यासुद्धां तोंडीं असते. पण केसरीकाराप्रमाणें कुळकर्ण्यांच्या कढाने उकळत असणाऱ्या कोणत्याही दीडशहाण्यानें त्या हरदासांवर किंवा पोरांवर १५३-अ खालीं किंवा १२४अ खालीं खटला करण्याची बदसल्ला केव्हांहि दिल्याचें आमच्या ऐकीवांत नाहीं. पण आमचे केसरीकार पडले सूक्ष्मदृष्टि आणि त्यांत पडली वकीली दृष्टीची भर. त्यांनीं चटदिशी शेरा ठोकला--**त्यांतील निंदा इतकी उघड व बेलगामी आहे कीं जातिजातींत वैमनस्य उत्पन्न करणें हा परिणाम या पुस्तकापासून होण्यासारखा असल्यामुळें, ' आंग्लनृपकृपेंकरून निर्विघ्न श्रवण घडो ' असा जरी आशीर्वाद सदर ग्रंथाला ग्रंथकर्त्यानें सरकाराकडून मागितला आहे तरी सरकारच्या नजरेंतून असलें हें जातिविद्वेषकारक खोडसाळ पुस्तक कितपत सुटेल, याबद्दल शंकाच वाटते.** हा शेरा झाला वर्तमानपत्री निस्पृहतेचा आणि सत्याप्रियतेचा. पण केसरीकार स्वतः पडले अट्टल प्रगमनशील आणि वाढत्या बांध्याच्या सहानुभूतीचे. त्यांनीं पोक्त विचार केला कीं हा लीलामृतकर्ता बहकला तर बहकला, पण कसा झाला तरी तो आहे आपला देशबंधु म्हणून केसरीकारानें शेवटीं एक कळवळ्याची पुस्ती जोडली कीं '' **पण एकानें गाय मारली म्हणून दुसऱ्यानें वासरूं मारावें असें नाहीं, यामुळें हें लीलामृत १५३अ-खालीं किंबहुना नव्या प्रेस आक्टाखालीं येण्यासारखें निःसंशय आहे तरी तें प्रत्यक्ष जप्त होऊं नये.**'' १५३अ काय, १२४अ काय किंवा नवा जुना प्रेसआक्ट काय, या सर्वांत आमचे केसरीकार पुरे डुंबलेले; अर्थात् सरकारची नजर-मेहनत वाचविण्याच्या कामीं त्यानीं सरकारांस दिलेला इषारा राष्ट्रीय नव्हता असें कोणी म्हणावें ? केसरीचें कोणतें कृत्य राष्ट्रीय नसतें ? पण या राष्ट्रीय सेन्सारी दृष्टीच्या कक्षेंत त्यांची स्वतःचीं, स्वज्ञातियाचीं व स्वपक्षियांचीं कृत्यें मात्र कधींच सांपडत नाहींत. स्वज्ञातियांचे ग्रंथ-मग ते कितीहि उघड व बेलगामी निंदेनें भरलेले असोत त्यावर सरकारी कायद्यानें डोळा फिरवतांच मात्र महाराष्ट्राचा अपमान होतो, महाराष्ट्राच्या राष्ट्रीय इभ्रतीवर वज्राघात पडतो, व अन्यायाचा जुलमांचा कळस होतो. केसरीकार '' मवाळांनों पळूं नका '' अशीं शिमगा करणारीं पुस्तकें मोठ्या प्रेमानें मिटक्या मारमारून वाचतात, त्यावर स्तुतिपाठांचा वर्षाव करतात. कां ? तर तें राष्ट्रीय-प्रेम-मालेचें सुगंधित पुष्प ! कुळकर्णीलीलामृतासारख्या शुद्ध विनोदी पुस्तकाबद्दल एवढी कोल्हेकुई करणारी केसरीकार केळकरांची कायदेबाज सूक्ष्म राष्ट्रीय दृष्टी, भारत इतिहास संशोधक मंडळाच्या चतुर्थ अहवालाचें परीक्षण करतांना कोठें गेली होती ? कुळकर्णीलीलामृत जातिजातींत हटकून द्वेष उत्पन्न करणारें दिसावें आणि रा. राजवाड्यांचा ' शिवराज-प्रशस्ति व कायस्थ धर्मदीप ' हा निबंध राजस, गोंडस आणि ऐतिहासिक विद्वत्तेचा काढा वाटावा यांत त्यांच्या दृष्टीला दोष न देतां, केसरीकंपूच्या राष्ट्रीय महिम्याची खरी खुब्बी येथेंच आहे, इतकें मात्र स्पष्ट म्हणावें लागतें.

२६. द्वैतभाव आणि मत्सर यांच्या तडाख्यांतून महाराष्ट्राची सुटका करण्याचा यत्न करण्याऐवजीं त्याना दिवसेंदिवस अधिकाधिक प्रज्वलीत करण्याकडे आमच्यांतील मोठमोठ्या शहाण्यासुर्त्या विद्वानांची अक्कल कशी झोकांड्या खाऊं लागते याचीं वरच्याप्रमाणें उदाहरणें आम्ही देत बसलों तर एक मोठा थोरला स्वतंत्र ग्रंथच होईल. या बाबतींत लोकधुरिणत्वाचें वीरकंकण हातीं बांधलेल्या आणि लोकमताला राष्ट्रहितसंवर्धक वळण लावण्याचें पुण्य कृत्य आंगिकारलेल्या विद्वानांनींच आपल्या मनोवृत्तींत उदारपणाचा भाग अधिक दाखविल्यास त्यांच्या कर्तबगारीचा खराखुरा आदर बहुजनसमाजांत अधिक वाढेल. द्वैतभावानें आणि शुद्ध जातिमत्सरानें महाराष्ट्राचे केवढें अनिर्वाच्य नुकसान केलें हें या ग्रामण्यांच्या इतिहासावरून जबाबदार पुढारलेल्या समाजांनीं जर अझूनहि नीट शिकण्याचा यत्न केला नाहीं, तर इतिहासाचा खरा उपयोग काय असतो हें उमजण्याची महाराष्ट्राची लायकीच नाहीं, असें म्हणणें नाइलाजास्तव प्राप्त होईल. आपल्या पूर्वजांच्या हातून ज्या ज्या घोडचुका घडल्या त्याचा पुनरुच्चर लौकीकी दृष्ट्या कानाला कडू व जिभेला आंबट लागणें शक्य आहे; परंतु ऐतिहासिक महत्वाच्या दृष्टीनें त्याचा कडूपणा व आंबटपणा आमच्या भावी वर्तनशोधनाच्या कामीं हेमगर्भ मात्रेपेक्षांहि वरचढ गुणकारक ठरल्याशिवाय रहाणार नाहीं.

सध्यां आपण सर्व महाराष्ट्रीयजन उत्क्रांतीच्या काळचक्रांत परिभ्रमण करीत आहोंत. मागील काळांतील पुण्याईचा वाजवी अभिमान बाळगितांनाच कृत पापांच्या क्षालनाचेंहि कटुकर्तव्य आपण बजाविलें पाहिजे जातिभेदानें आधींच महाराष्ट्रीय हिंदुसमाजाची घडी विस्कळीत झाली आहे आणि एकीचें चक्रहि पार खिळखिळें केलेलें आहे. पायथ्याशीं पडलेला बेकीचा, द्वैताचा आणि मत्सराचा केरकचरा झाडून साफ करण्यापूर्वी, उच्च वातावरणांतील उच्च कल्पनांच्या कोरणीनें सामाजिक वैभवाच्या मनोऱ्याच्या वरच्या भागांवर आपण कितीहि कलाकुसरीचीं कामें केलीं तरी पायथ्याला भिडलेल्या केरकचऱ्यांतील झुरळे व वाळवी कधीं ना कधीं तो मनोरा ढांसळून पाडल्याशिवाय खास रहाणार नाहींत. हिंदुसमाजरूपी विराट पुरुषाच्या मर्मस्थानीं झोंबलेलें जातिमत्सराचें काळकूट विष राष्ट्रीयत्वाच्या किंवा विश्वबंधुत्वाच्या कोरड्या गप्पांच्या मलमपट्ट्यांनीं नाहींसें होणें शक्य नाहीं. त्याचें उच्चाटण करायला कांहींतरीं जालीम रसायन पोटांतच घेणें भाग आहे. रोग ' क्रॉनिक ' असल्यामुळें काढ्याचीं बरींच सप्तकें घ्यावीं लागतील हें निर्विवाद आहे. अशा प्रकारचा कांहींतरी प्रयत्न करण्याची हिंदुसमाजाला प्रेरणा व्हावी व त्यांना निश्चित दिशेनें औषधोपचार करण्यास सुलभ जावें, ह्मणून आम्ही ' ग्रामण्याचा साद्यंत इतिहास ' हें रोगाचें तंतोतंत निदान ठरविणारें चिकित्सापत्रक महाराष्ट्रीयांपुढे ठेवीत आहोंत. याच्या परिशीलनानें जातिमत्सराचा व द्वैतभावाचा जुनाट रोग महाराष्ट्रीय हिंदुसमाजांतून अज्जीबात घालविण्यासाठीं एकजुटीनें प्रयत्न करण्याची प्रेरणा ती प्रतापगडची श्रीभवानी सर्वांना देवो, अशी त्या राष्ट्रदेवतेची अत्यंत कळकळीनें करुणा भाकून, लेखनीस कांहीं वेळ विराम घेण्याची परवानगी देतो.

देशबांधवांचा नम्र सेवक,
**केशव सीताराम ठाकरे.**

॥ श्री ॥

# ग्रामण्यांचा साद्यंत इतिहास.

## (चांद्रसेनीय कायस्थ प्रभू.)

---

## ग्रामण्य पहिलें.

### तालभोपाळचें ग्रामण्य. (शालीवाहन *शकापूर्वी ६५६ वर्षे.)

मगध देशाचा प्रख्यात क्षत्रिय राजा महापद्मानंद हा मोठा धनलोभी असल्यामुळें त्यानें आपल्या प्रजेवर अत्यंत भयंकर जुलूम करून पैसा उकळविला. स्वतः क्षत्रिय असूनहि त्यानें इतर क्षत्रियांवर पैशांसाठी इतका पराकाष्ठेचा जुलूम केला कीं, पुराणांतरीं त्याला परशुरामाची उपमा दिली आहे. त्याच्या अनन्वित जुलमाला त्रासून हजारों क्षत्रिय वीर आपल्या कुटुंबांसह देशांतरास गेले. त्यावेळीं चांद्रसेनीय कायस्थ प्रभूंचीं बरीचशीं स्थायिक कुटुंबेंहि या प्रसंगीं स्वदेशत्याग करून बाहेर पडलीं. त्यांपैकीं कित्येक नेपाळांत, कित्येक काश्मिरांत आणि सुमारें ८० कुटुंबें तालभोपाळ येथें येऊन राहिलीं. या वेळीं तेथें जुनाट यावनी सत्ता होती. तेथील अधिकारी यवन खरे, परंतु हिंदु लोकांवर त्यांची दयार्द्रदृष्टी होती. त्या ठिकाणच्या राजकारणी लोकांच्या सल्लामसलतीनें हीं ऐशीं कुटुंबें तेथें वस्ती करून राहिलीं. ही मंडळी राजकारणांत व बुद्धिमत्तेंत चांगली तरबेज आढळल्यामुळें या ठिकाणीं त्यांना लवकरच उत्तम प्रकारचा राजाश्रय मिळाला ; आणि महापद्मानंदाच्या जुलमाची स्मृति हळुहळू या नवीन राजाश्रयाच्या पडद्यामागे अंधुक अंधुक होत गेल्यामुळें या मंडळीनें तालभोपाळास कायमचीच वस्ती केली. परंतु किती झालें तरी गत स्वातंत्र्याचें राजकीय वैभव आणि दर्जा यांचे स्मरण या नवीन सुखावह परंतु परतंत्र स्थित्यंतरांतसुद्धा त्यांच्या मनोवृत्ति अस्वस्थ केल्याशिवाय राहिलें नाहीं. गत वैभव पुनश्च कसें प्राप्त होईल ही त्यांची इच्छा केव्हांहि नष्ट झाली नव्हती आणि त्या दिशेनें त्यांचे प्रयत्न सतत चालू होते. " ठाकरे " या उपनांवाच्या कोणी एका चां. का. प्रभू वीरानें चितोडाजवळ एक लहानसें संस्थानही स्थापन केलें. यवनी राज्यकर्त्यांचा लोभ संपादन करून कोणी जहागीरदार झाले, कोणी सरदार झाले, तर कोणाला लेखनवृत्तीवरच निर्वाह करावा लागला. त्यावेळीं **बलदेवजी प्रभु** व **हरिलालजी प्रभु** हे दोन गृहस्थ मोठे प्रसिद्ध असून या जातीचे पुढारी होते. राजदरबारांत त्यांचें वजन व मानमरातब मोठा होता. तथापि गतवैभवाच्या तोडीचें याहिपेक्षां उच्च असें राजकीय क्षेत्रांतील स्थान पुनरपि आपणांस प्राप्त व्हावें, याकरितां त्या देवभोळ्यांनीं आपल्या कुलगुरुंच्या हस्तें एक अनुष्ठान करण्यास सुरवात केली.

---

* इतिहासकारांनीं दिलेला हा काळ वादग्रस्त आहे. आद्यशंकराचार्यापासूनचे दहावे आचार्य विद्याशंकर भारती यांनी या ग्रामण्यांचें निराकरण केलेलें आहे. आचार्यांचा निर्याणकाळ अझून निश्चित झालेला नाहीं. त्यांच्या उपलब्ध कुंडलीवरून तो शा. श. पूर्वी ९९१ वर्षे ठरतो. प्रत्येक परंपरेची कालमर्यादा अजमासें २० वर्षे धरल्यास विद्याशंकर भारतीचा काळ शा. श. पूर्वी ६३१ वर्षे येतो. म्हणून बखरकारांचा वरील काळ आम्ही कायम ठेविला आहे. कोणी ज्ञात्याने या काळाचा निश्चत उलगडा केल्यास त्याचा आम्ही सामार स्वीकार करूं.

यावेळीं कोणीएक संन्याशी बुवा तेथील कारभाऱ्यांजवळ दानाध्यक्ष होते. चां. का. प्रभु जातीचे पुढारी बलदेवजी व हरिलालजी अनुष्ठान करीत आहेत हें वर्तमान त्यांना समजलें. अनुष्ठानाचा प्रयोग मैथिली होता, त्यामुळें विशेष कांक्षा येण्यास कारण झालें. जारणमारणाच्या प्रयोगाप्रमाणेंच हाही एक प्रयोग असेल असें वाटल्यामुळें म्हणा किंवा तशी मुद्दाम कल्पना केल्यामुळें म्हणा, त्या संन्याशानें या प्रकरणाचा फार बारकाईनें तपास चालविला. परंतु हें प्रकरण काय आहे याचा स्पष्ट व प्रत्यक्ष खुलासा खुद्द बलदेवजी किंवा हरिलालजीं यांस भेटून करून घेण्याचा मनाचा मोकळेपणा किंवा धैर्य संन्याशीबुवानें किंवा कोणीहि दाखविलें नाहीं. चां. का. प्रभू ज्ञातीची पूर्वापार कुलगुरु रामनाथ नांवाचे मैथिली ब्राह्मण होते. ते तालभोपाळच्या ८० कुटुंबांचीं सर्व वैदिक कर्मे चालवीत असत. ते अनुष्ठान चालवीत असतांना या संन्याशी बुवानीं व त्याच्या इतर हस्तकांनीं " यवनराजा तुम्हांस धरून नेणार आहे " अशी भीती घातल्यामुळें अनुष्ठानाचें कार्य अर्धेच टाकून गुरूजीबावा आपल्या **संगिया** गांवीं निघून गेलें व अनुष्ठानास बसलेले इतर ब्राह्मणही पळून गेले ! मात्र जातांना रामनाथ गुरुजींनीं आपली पुरोहित-वृत्ति व अनुष्ठान आपल्या तीन शिष्यांकडे सोपविलें. त्यात **रामनारायण** हा शिष्य मोठा विद्वान् असून अनुष्ठान-प्रयोगांतहि मोठा हुशार होता व त्याचा प्रभुज्ञातीवर लोभही होता. मध्यंतरी संन्याशीबुवानें कारभाऱ्यामार्फत यवनराजास कळविलें कीं राज्याच्या अभिलाषानें बलदेवजी व हरिलालजी यांनी अनुष्ठान करण्यास सुरूवात केली असून स्वामीस अपाय करण्याचा त्यांचा उद्देश आहे. संन्याशी कधिं खोटे बोलतो ? झालें. यवनाधिपतीनें रामनारायणादि तीनही ब्राह्मण शिष्यांस ठार मारून टाकण्याचा हुकूम फर्माविला. ही गोष्ट रामनारायणास समजतांच त्यानें शिखासूत्रांचा त्याग करून संन्यास घेतला व **चंद्रेश्वर स्वामी** हें नांव धारण केलें. तेव्हां यवनेश्वरानें हुकूम रद्द केला. त्यावर बलदेवजी व हरिलालजी हे यवनाधिपास जाऊन भेटले आणि त्याची नीट समजूत करून सांगितले कीं, " हें अनुष्ठान यजमानांच्याच कल्याणाकरितां आम्हीं करीत आहोंत. " भोपालेश्वरानें पुष्कळच बारकाईनें तपास करून पाहिले, परंतु बलदेवजी व हरिलालजी या उभयतांचेंच म्हणणें शेवटीं खरें ठरलें आणि संन्याशी बुवांची लुडबुड उघडकीस आली. यवनाधिपतीनें बलदेवजीला " अनुष्ठान अव्याहत चालवावें " असा हुकूम सोडला. **रामनारायण** यानीं अधींच संन्यास घेतल्यामुळें त्याच्या शिष्यवर्गानें अनुष्ठानाची समाप्ती यथासांग केली.

बलदेवजी प्रभृतींना हाणून पाडण्याच्या कारस्थानांत स्वतःच पालथे पाडण्याचा उलटा प्रसंग आल्यामुळें, संन्याशीबुवांच्या मनाला मोठाच पीळ पडला. दिवसेंदिवस बलदेवजी व हरिलालजी यांचे वजन दरबारांत फारच वाढूं लागलें व ते मोठ्या हुद्यांवरहि चढले. त्यांच्यापुढें कोणाचेंच तेज पडेनासें होऊन भोपालेश्वर यवनराजा त्यांच्या सर्वस्वीं अंकित झाला. सर्व बाजूंनीं हताश झाल्यावर सरतेशेवटीं, ' भटा तुझें वर्म काय तर सुताचें जानवें, ' या न्यायाची कांस धरून संन्याशीबावानीं चां. का. प्रभूंवर ग्रामण्य उभे केलें. हेंच पहिलें ग्रामण्य होय. राजकीय क्षेत्रांतील स्पर्धेमध्यें प्रतिपक्षाचा पाडाव करण्याच्या कामीं स्वतःची कर्तबगारी व बुद्धिमत्ता कुचकामाची

ठरल्यावर निदानीचा उपाय म्हणजे धार्मिक हक्कांचा प्रश्न उभा करून कायस्थ प्रभूंचा सामाजिक दर्जा कमी प्रतीचा ठरविण्यांत बुद्धिसर्वस्व खर्च करण्याच्या (म्हणजेच ग्रामण्य उभारण्याच्या) कल्पनेचा अग्रमान या संन्याशीबुवांचा आहे. हें ग्रामण्य शालिवाहन शकापूर्वी ६७१ या वर्षी सुरूं झालें व तें सुमारें १५ वर्षें चाललें होतें. चां. का. प्रभु व त्यांचे पुढारी बलदेवजी व हरिलालजी हे खरे क्षत्रिय नव्हते व त्यामुळें त्यांना वेदोक्त कर्में करण्याचा अधिकार नाहीं असा आरोप करून, प्रभु ज्ञातीची धर्मकृत्यें वैदिकमंत्रानें चालविणाऱ्या रामनारायणाच्या तीन ब्राह्मण शिष्यांस त्या सन्याशीबुवानीं बहिष्कृत केलें. याचा निकाल लावून घेण्यासाठीं बलदेवजी व हरिलालजी हे काशीस गेले. तेथें यावेळीं **श्री विद्याशंकरभारती शंकराचार्य स्वामी** यांचा मुक्काम होता. त्यांची खात्री करून देऊन त्यांना घेऊनच दोघे तालभोपाळास परत आले. शालिवाहन शकापूर्वी ६५६ व्या वर्षी **श्रीमत्शंकराचार्य श्री विद्याशंकरभारती** हे तालभोपाळास आले.

रामनारायणाचे तीन शिष्य अपंक्त पडतांच त्यांनींही मोठी खटपट चालविली होती. श्रीशंकराचार्यांची स्वारी येतांच त्यांनीं मोठी सभा भरविली. या सभेंत पुष्कळच भवति न भवति झाली ; परंतु दानाध्यक्ष संन्याशीबुवा यांचा दुराग्रह कांही केल्या सुटेना. श्रीमज्जगदुरूंनीं पुष्कळच समजूत घातली, पण बुवा ऐकेनात. तेव्हां त्या तीन अपंक्त शिष्यांस आपल्याबरोबर पंक्तीस भोजनास घेऊन स्वामींनीं वाद मिटविला. खुद्द जगदुरुनींच त्यांना आपल्या पंक्तीला घेऊन भोजन केलें तेव्हां सगळा बखेडा आपोआपच मिटला गेला. याप्रमाणें या पहिल्या ग्रामण्याचा शेवट झाला.

---

# ग्रामण्य दुसरें.

## जोगाईच्या आंब्याचें ग्रामण्य. (शके १३९१ इ. स. १९६९).

**जोगाईचें आंबे ऊर्फ आंबेजोगाई हें गांव निजामसरकारच्या राज्यांत औरंगाबाद प्रांतांत परभणी परगण्यांत गोदावरी नदीच्या कांठीं आहे. मुसलमानीत यास '' मोमीनाबाद '' असे नांव होतें. यावेळी हसन गंगूच्या बाहामनी वंशांतील दुसरा सुलतान महमंदशहा (सन १४६३–८२) हा राज्यावर होता. महमंद गवान या नावांचा त्याचा वजीर मोठा कर्तबगार माणूस होता. यावेळीं––**

अष्ट दिशा व्यापून पृथ्वीवर यवनच जाहले. त्याजवर मंडणमिश्र यांणीं जैनमत स्थापून सर्व याती कर्मभ्रष्ट केल्या. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र याती ऊपयाती यांत वर्णावर्णाची रीत राहिली नाहीं. यवनांची सद्दी चालल्यावर तीन चारशें वर्षें अजमास भ्रष्टाकार जाहला. किंचित् आपले धर्म चालले. नंतर श्रीशंकरावतार शंकराचार्य प्रगट होऊन जैनमत खंडण केलें. व मंडणमिश्राशीं वाद घालून त्यास जिंकोन धर्मस्थापना केली. तेव्हां ब्राह्मण इत्यादि याती आपलाले पूर्वधर्म शास्त्रयुक्त चालवूं लागले. तेव्हां चांद्रसेनीय कायस्थ प्रभु आपल्या धर्मे चालत होते. ते समयीं कोणी शास्त्रविहीन आग्रही ब्राह्मणांनीं द्वेष वाढवून चांद्रसेनीय कायस्थांस वेदाधिकार नाहीं, ह्मणोन कर्ममार्गास अडथळें केले. सावित्रीपासोन मंडणगडपर्यंत तट घालोन खटले करूं

लागले. तेव्हां कोंकणप्रांतीं **हरी घोलकर*** प्रभु प्रमुख आणखी प्रभुगृहस्थ व ब्राह्मण मिळोन भांडत मोंगलाई अंमलदार याजवळ गेले. तो यवन अधिकारी होता. तो बोलला जे, तुमचे शास्त्रप्रकरणांत आम्हांस माहितगारी नाहीं. तुमचें हिंदूंचें क्षेत्र श्री वाराणसी. तेथें जाऊन निश्चय करून आणाल त्याप्रमाणें आम्ही चालवूं. त्याजवरून कांहीं ब्राह्मण व प्रभु मंडळी श्री वाराणसी क्षेत्रास जाऊंन क्षेत्रस्थानी मोठमोठे पंडित शास्त्री ब्राह्मण विद्वान महासमर्थ यांप्रति प्रार्थना केली आणि आपलालें रीतीनें ग्रंथ समजाऊन वर्तमान सांगितले. तेव्हां **श्रीपाद गुरु गोंविंदभट्ट** महाविद्यावंत होते, त्यांणीं वाराणशींत मणिमुक्त मंडपीं समस्त पंडित मंडळी मिळवून सभा केली. शास्त्रमतें वादप्रतिवाद भवति न भवति होता, **प्रभु हे चांद्रसेनीय कायस्थ क्षत्रियवंश खरे. याती शुद्ध यांस त्रिविध कर्मे षोडश संस्कार वेदाधिकार आहेत.** असा शास्त्राधार स्थापून सर्व ब्राह्मणांची समजूत जाहली. नंतर ब्राह्मण कर्ममार्ग चालवणे यास मान्य जाहले, तेव्हां सर्व शास्त्रांचीं व पुराणांतरीचीं मतें पाहून " गोविंदभट्टी " ग्रंथ करून दिल्हा. नंतर ते संन्याशी जाहले. **गोविंदभट्टीमध्यें तीन कर्मे, चौल उपनयन समावर्तन इत्यादि षोडश संस्कार चांद्रसेनीय कायस्थ प्रभु यांसीं वेदाधिकार गायत्रीचा उपदेश करावा, असें आहे.** महारुद्रादि अनुष्ठानें ब्राह्मणद्वारा करावीं. वैदिकमंत्रें नानाशांति, होम हवनें, विधियुक्त श्राद्धपक्षीं चरुपिंडप्रदानें इत्यादि करावीं. असे चांद्रसेनीय प्रभूंस पहिले धर्म चालवून दिल्हे. त्यांत कांहीं आक्षेप न घेतां चालवावे. असें सर्व ब्राह्मणांस सांगितलें व प्रभुमंडळीस सांगितलें जे, **तुम्हांस शास्त्रमतें वेदकर्मास व षोडश संस्कारांस अधिकार आहे.** त्याअन्वयें प्रस्तुत गोविंदभट्ट* हा ग्रंथ करून दिल्हा आहे. तरी रेणुका माहात्म्यांतील व्यासोक्ति श्लोक :--

**सदाचारपरा नित्यं रता हरिहरार्चने ।**
**देवविप्रपितणां वै अतिथीनां च पूजकाः ॥ १ ॥**

**यज्ञदानतपःशीला व्रततीर्थरताः सदा ।**
**गर्भाधानं पुंसवनं सीमंतो जातकर्म च ॥ २ ॥**

येणेंप्रमाणें संस्कार व यजन अध्ययन व दान एकूण तीन कर्मे करावयास अधिकार शास्त्रमतें सांगोन आचरण करावें व करवावें असें ब्राह्मणांस सांगोन खटला मोडिला. तेसमयीं प्रभुमंडळी याणीं गुरुदक्षणा आपले ज्ञातीच गुरुत्व दिल्हे. नंतर ते संन्याशी जाहले. त्यांचे शिष्ये तीघेजण होते. ते असामी :--

**१ महाबलेश्वर करवे, १ वटेश्वरभट, १ दिनकरभट्ट टकले.** एकूण तीन ब्राह्मण देशस्थ त्यांजपाशीं शिष्यत्व करून होते. ते सर्वप्त प्रभु मंडळीस गुरु, आपली प्रतिमा करून देऊन सदरहूप्रमाणें तीन कर्मे व षोडश संस्कार वेदोक्त मंत्रे चालवावयास सांमोन गोविंदभट्टी ग्रंथ समागमें देऊन वाराणशीहून दक्षिणेस, प्रभुमंडळी व ब्राह्मण समुदाय गेले होते त्यांची रवानगी

---

* इतिहासप्रसिद्ध बाळाजी आवजी चिटणीस (निसवबत छत्रपति शिवाजी महाराज) यांचे हे पूर्वज होत.

* गोविंदभट्टीस " कायस्थपद्धति " असे नांव आहे. या ग्रंथांत कित्येक लबाड व कुभांडी ब्राह्मणांनीं अलीकडे फेरफार व घुसडाघुसड केली असल्याचें समजतें.

जाहली. त्यासीं अजमासें वर्षें आठ साडेआठशें* जाहलीं ते दक्षिणेस आले. यावर जागजागचे अमलदारांस व ब्राह्मणांस हें वर्तमान सांगितलें. तेव्हां त्यांणीं सर्व ब्राह्मणांस सांगितलें जे, वाराणशीळून निश्चय होऊन आला त्याप्रमाणें प्रभु चांद्रसेनीय यांचे धर्म संस्कार चालविणें त्याजवरून गोविंदभट्टीचे अन्वयें चालवू लागले.

याप्रमाणें हें दुसरे ग्रामण्य निकालांत आलें.†

---

# ग्रामण्य तिसरें.

## जुन्नर किंवा विजापुरचें ग्रामण्य (शके १५८५ इ. स. १६६३).

**या ग्रामण्याचें नक्की साल उपलब्ध नाहीं. रा. रामराव नारायण प्रधान यांच्या मतें " हें जें विजापुरचें ग्रामण्य म्हणवितें तें असावे. " याची कांहींच हकिकत उपलब्ध नाहीं. कायस्थ प्रभूंच्या बखरींत जुन्नरच्या ज्या ग्रामण्याचा उल्लेख केला आहे त्यावरून पाहता जुन्नरचें ग्रामण्य तेंच विजापूरचें ग्रामण्य असावें असें वाटतें.या ग्रामण्याबद्दल प्रभुकुलदीपिकाकार म्हणतात " नुलकर काशीस जाऊन निराकरण करून शंकराचार्यांचीं पत्रें घेऊन आलें. " बखरींत हकिकत आहे ती अशी :--**

अविंधराज्य यामुळें सर्व जातीचे मलिन आचार, ब्राह्मण यातींत भक्षाभक्ष करण्यांत विधिनिषेध मानीत ना, तेव्हां कोणी भटोबा दीक्षित वाराणशी क्षेत्रीं गेले. तेथें शास्त्रविचार पाहतां कलियुगीं यज्ञाशिवाय हीन कर्मे मांसभक्षण नसावें. असें पाहुन दक्षिणदेशीं ब्राह्मणांस असें सांगून वर्तवू लागले. त्यापासून दक्षिणदेशींचे ब्राह्मण नर्मदे अलिकडील चालवूं लागले. नर्मदा उत्तरतीरींचे ब्राह्मण ऐकेनात. ते अद्यापी सामवेदाध्यवन व व्याकरण शास्त्राध्ययन मांसाहार करितात. दक्षिणेंत भटोबा दीक्षितांनीं आचार करविला त्यापासून शुद्ध आचरणें चालवूं लागले. त्यास $ चारशें वर्षे अजमासें जाहलीं. त्या अन्वयें प्रभुमंडळीही आचरावयास लागली. मध्ये जुन्नरप्रांती कोणी ब्राह्मणांनीं ग्रामण्य केलें. तेव्हां प्रतिष्ठितांनीं आणि क्षेत्रस्थ पंडित शास्त्री यांहि शास्त्रविचार

---

* चां. का. प्रभूंच्या इ. साधनें यांत प्रसिद्ध झालेल्या " कायस्थ प्रभूंची बखर " यांतून वरील उतारा घेतला आहे. ही बखर शके १७९७ सन १९७५ त लिहिलेल्या अस्सल पत्राच्या आधाराने लिहिलेली आहे.

† (१) " पूर्वी ग्रामण्य शके १३९१ सालीं झालें. त्या समई टकले यांनी निराकरण केलें जोगाईच्या आंब्याचे ठिकाणीं. "

—प्रभुकुलदीपिका, पृ. १५२

(२) " पूर्वी ग्रामण्य जोगाईचे आंब्यास जालें, शके १३९१ ते समई निळकंठ गुरू गोसावी यांनीं काशीस जाऊन शंकराचार्य आणून समाधान केलें. "

—रा. राजवाडे कृत म. इ. सा. खंड ६ लेखांक ४४४.

‡ ग्रामण्याच्या कोणत्याच यादींत या ग्रामण्याचे साल दिलेलें नाहीं. शके १७१७ त लिहिलेल्या बखरींत " अजमासें १३२ वर्षे झालीं "असे स्पष्ट लिहिलें आहे. शिवाय कमळाकर भट्ट हे गागाभट्टाचे बंधु असून सन १६६८ त हयात होते. त्यावरून या ग्रामण्याचें साल शके १५८५ सन १६६३ असावें असें वाटतें व म्हणूनच तें वर दिलें आहे.

**प्रभुकुलदीपिका पृ. १५३.

" दुसरे ग्रामण्य कोंकणांत जालें. ते समयीं काशीस जाऊन पत्रें आणून निराकर्ण जालें, शक-"

—रा. राजवाडे कृत म. इ. सा. खंड ६ लेखांक ४४४.

$ शके १७१७ पूर्वी चारशें वर्षे म्हणजे शके १३१७.

पाहून मौंजीबंधनादि संस्कार प्रभुमंडळी चांद्रसेनीय कायस्थांस आहेत, असें बालबोध शास्त्रोक्त पत्र लिहून शक व संवत्सर मिती घालून जुन्नरकर जोशी यांस पाठविलें. त्याप्रमाणें तेथें संस्कार कर्मे चाललीं. त्यास वर्षे अजमासें १३२ जाहलीं. ‡ त्याच कारकिर्दीत **कमळाकरभट्टजी** याणीं काशीमध्यें **शूद्रकमळाकर** ग्रंथ, सर्व पुराण शास्त्रांतील सम्मतें पाहून केला. त्यांत चांद्रसेनीय कायस्थ क्षत्रिय प्रभु यांची उत्पात्ति लिहिली आहे.

कै. ना. न्यायमूर्ती का. त्रिं. तेलंग, हे "मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष" (पृ. १६०) येथे ह्मणतात :—

"कायस्थ प्रभूंची बखर वाचली ह्मणजे असें सिद्ध होतें की वेळोवेळीं विजापूर येथील मुसलमानी राज्याच्या हिंदुप्रजेमध्यें तंटे होत ; तेव्हां त्याचा निकाल करण्याकरितां राजाची मदत ते लोक घेत असत. उदाहरणार्थ कोंकणामध्यें ब्राह्मण व प्रभु यांचा तंटा लागला तेव्हां दोन्ही बाजूंचे लोक विजापूर येथील मुसलमान सुभेदाराकडे दाद मागण्याकरितां गेले, तेव्हां तो म्हणाला 'आपण मुसलमान आहों तुमच्या शास्त्राचें आम्हांस बिलकूल ज्ञान नाहीं ; उत्तम मार्ग म्हटला म्हणजे,तुम्ही आपलें मुख्य पवित्र स्थान जें काशी क्षेत्र तेथें जावें, व तेथील पंडितांकडून आपल्या तंट्याचा निकाल करून घ्यावा. निकाल अंमलात आणणे आपले काम. तें आपण करूं' असें त्यानें वचन दिलें. बखरींत पुढें असा मजकूर आहे कीं, दोन्ही बाजूंचे लोक खरोखरच काशीस गेले. तेथे पंडितांची मोठी सभा भरविली व पुष्कळ वादविवाद होऊन अखेरीस असा निर्णय झाला कीं **प्रभूलोक मूळचे अस्सल क्षत्रिय आहेत, वेदांत सांगितलेलीं कर्मे करण्याचा त्यांना अधिकार आहे व गायत्री मंत्र ह्मणण्यासही ते अधिकृत आहेत.** तेव्हां ब्राह्मणांचें समाधान झालें व नेहमींप्रमाणें प्रभूलोकांकरितां वेदकर्मे करण्याचें त्यांनीं कबूल केलें. याप्रमाणें सर्व व्यवस्था चालली." अशा रीतीनें हें तिसरें ग्रामण्य समाप्त झालें.

---

# ग्रामण्य चौथें.

## रायगडचें ग्रामण्य (शके १५९१, सन १६६९).

**शिवाजी महाराजानीं मऱ्हाठी स्वराज्याचें कंकण हातांत बांधून अत्यंत अल्पावकाशांत दख्खनमधून मुसल्मानी सत्तेचें उच्चाटन करून स्वराज्याच्या जरीपटक्याबरोबरच स्वधर्माचा झेंडा उच्च फडकावला. या इतिहासप्रसिद्ध राष्ट्रीय कामगिरींत साह्य करणारी जीं जीं प्रमुख कतृत्ववान् माणसें यदृच्छेनें शिवाजीला लाभली त्यात बाळाजी आवजी चित्रे चिटणीस हे अग्रगण्य होत. बाळाजीच्या अचाट बुद्धिमत्तेच्या तोडीचा पुरुष फक्त तोच. त्याचा पराक्रम जितका व्यापक तितकी त्याची स्वामीभक्तीही अभंग होती. मराठे राज्यकर्त्यांच्या व पेशव्यांच्या अमदानीत स्वपराक्रमानें उदयास आलेलीं सगळ्या महाराष्ट्रांत जितकीं घराणीं आहेत, त्या सर्वांत चिटणीसांच्या घराण्याचा स्वामीभक्तीमध्यें पहिला नंबर आहे. या घराण्यांतील प्रत्येक पुरुषानें—प्रसंगोपात् स्त्रियानींसुद्धां—आपल्या स्वामीभक्तीची कमाल करून शेवटपर्यंत मराठी**

‡ शके १७१७ पूर्वी १३२ वर्षे म्हणजे शके १५८५.

राज्याची मोठ्या इमानदारीनें सेवा केली. पिढ्यान्‌पिढ्या एकसारखें स्वामीसेवेचें व्रत एकनिष्ठेनें पाळणारें एखादे घराणें महाराष्ट्राच्या किंवा हिंदुस्थानच्याच काय, पण जगाच्या इतिहासांत तरी असें सापडेल किंवा नाहीं याची शंका आहे. निष्कपट स्वामीभक्ती, कडकडीत निस्पृहता, अचाट बुद्धिमत्ता, टापटिपीचा कारकुनी बाणा आणि बिनचूक धोरणी दृष्टी या विशेष गुणांच्या योगानें शिवाजीमहाराजांना बाळाजी इतका प्रिय झाला होता कीं '' बाळाजी माझा प्राण '' असें त्यांनीं वारंवार म्हणावें. बाळाजीच्या सल्लामसलतींवाचून महाराजांचे कोणतेहीं राजकारण होत नसे. मूर्ती दोन पण कृती एक ; आचार विचार एक ; याप्रमाणें महाराज व बाळाजी यांची जोडी यदृच्छेनें एके ठिकाणीं मिळाली व तिने आपल्या संयुक्त कर्तबगारीनें सर्व हिंदुस्थान हालवून सोडलें. बाळाजींच्या सल्ल्यावांचून राज्यात पानही हालेना. दरबारांत बाळाजीचें वजन व वचक फार वाढला. बाळाजीपुढें अष्टप्रधान व सरदार इत्यादिकांचे तेज मुळींच पडेना ! बाळाजीच्या बुद्धिमत्तेपुढें वेळोंवेळीं सर्वांना खालीं मान घालावी लागे. अशा प्रकारें वारंवार तेजोभंग होऊं लागल्यामुळें पेशवे वगैरे ब्राह्मण सरदारांच्या मनांत बाळाजीबद्दल वैषम्य उत्पन्न झालें व ते आंतून त्याचा द्वेष करूं लागले. परंतु महाराजांची बाळाजीवर विशेष कृपा असल्यामुळें व ते त्याच्या संरक्षणास सदैव तत्पर असल्यामुळें बाळाजीचा एक केंसही वांकडा करण्याचें धैर्य कोणास होईना ! एकदां तर बाळाजीला विषप्रयोगहि करण्याचा प्रयत्न या मत्सरी दरबारी मंडळीनें केला. परंतु बाळाजीच्या धूर्ततेनें व महाराजांच्या दक्षतेनें तो दुष्ट बेत सिद्धीस गेला नाहीं. अशा प्रकारें बाळाजी व दरबारी मंडळी यांचा द्वेष दिवसानुदिवस वाढत गेला. या संबंधानें रा. ब. बा. आ. गुप्ते यांनीं चां. का. प्रभूंच्या इतिहासाचीं साधनें नामक मासिकांतील '' ग्रामण्याच्या हकिकती '' त उल्लेख केला आहे तो असा :--

बाळाजी आवजी चिटणीस चांद्रसेनीय कायस्थ प्रभु यांजवर महाराजांचा पूर्ण लोभ, व यांचें निष्ठेनें वागणें होतें, व राज्यकारणाचे व राज्य साधण्याचे प्रसंग हरवक्त चालू होते. तेव्हां राज्यकारणीं लिहिणें चिटणीसी, त्यांत विश्वासू , कल्पक, कर्तेपणा व स्वामिलोभ यामुळें सर्व राज्यकारण संस्थानिकांकडील बोज ठेवून सर्वाध्यक्षपणें वागूं लागले. यामुळें पेशवे यांचे वागणें तेज कमतर सहजीं जाहलें. चिटणीसीस कारभार, गुप्तपणा व एकांत सहजीं येतो ; तो होऊं लागल्यामुळें पेशवे व कारभारी मंडळ यांस वैषम्य वाटून द्वेषास प्रवर्तक झाले. परंतु कारभारांत वगैरे अकलेनें चिटणीस यांस माजी करावें ही आक्रमणशक्ति नाहीं. खावंद सुज्ञ जबरदस्त यामुळें न चाले.

याच सुमारास दुसरी एक अशीच महत्वाची परंतु विषादकारक गोष्ट घडून येत होती. आणि बाळाजीसारखा तडफदार दृढनिश्चयी माणूस जर त्यांत मन न घालता तर मराठी राज्यसंस्थापना ही गोष्ट स्वप्नवत् झाली असती. शिवाजीमहाराजांचे वडील शहाजी हे एक त्याकाळचे मोठे मातबर उमराव होते व त्यांना विजापूरच्या सुलतानाकडून राजा हा किताब मिळाला होता ; इतकेंच नव्हे तर शहाजीराजे त्या वेळचे '' किंगमेकर '' च होते, असा सर्व स्वदेशी विदेशी इतिहासकारांचा एकमताचा अनुवाद आहे. शिवाजीमहाराज स्वराज्यसंस्थापनेचा उद्योग करीत होते हें खरें, पण त्यांचें कूळ म्हणजे केवळ एका बड्या सरदाराचें असून त्याच्या तोलाचीं दुसरींहि पुष्कळ मराठ्यांचीं घराणीं त्यावेळीं अस्तित्वांत होतीं. त्यापैकीं ज्या कांही थोड्या मराठे सरदारांनीं शिवाजीस साह्य केलें होतें ते त्यास आपला पुढारी मानीत होते. आणि

राजकारणप्रसंगीं जेव्हां तो उच्चासनावर बसे तेव्हां ते त्याला मुजरेही करीत. परंतु शिवाजीच्या कर्तबगारीची किंवा तिच्या ऐतिहासिक महत्वाची खरीखुरी जाणीव त्यांना न झाल्यामुळें, केवळ वजनदार सरदारकीच्या समानतुल्य भावनेमुळें, शिवाजीपुढें वांकून मुजरे करण्याच्या कामीं त्यांची संकोचवृत्ति वारंवार आड येऊं लागली, त्यांची शुद्ध मनें दिवसेंदिवस गढूळ होत चालली आणि कित्येकांनीं तर शिवाजीच्या दरबारास हजर राहण्याची टाळाटाळ चालविली. दूरदर्शी शिवाजीमहाराज व तीव्रबुद्धी भाळाजी यांनीं हीं गोष्ट प्रथमपासूनच ताडली होती व या गोष्टीला काय उपाय करावा याबद्दल उभयतांच्या गुप्त मसलतीही चालल्या होत्या. त्यांत बाळाजीनें महाराजांस असें समजाविलें कीं, '' पायाशुद्ध * राजगादीची स्थापना करून राज्याभिषेकानें महाराज हें पद आपण प्राप्त करून घेतल्याशिवाय या लोकांची तोंडें बंद व्हावयाचीं नाहींत. '' बाळाजीचें म्हणणें सप्रमाण, अर्थात् तें महाराजांस तेव्हांच पटलें आणि त्यांच्याच अनुमतीनें बाळाजीनें हा प्रश्न दरबारांत उघडउघड काढून त्यावर चर्चा केली. त्यावेळीं क्षत्रियाशिवाय इतरांस राज्याधिकाराचा हक्क नाहीं, असें म्हणून पेशवे पंडितराव वगैरे ब्राह्मणांनी व मराठे सरदारांनीं त्याचा निषेध केला. शिवाजी महाराज शूद्र असतां त्यांस राज्याभिषेक करणें म्हणजे धर्मच बुडविणें होय, असें निक्षून सांगून त्यांनीं बाळाजीचें म्हणणें अगदींच फेटाळून लाविलें आणि धर्माच्या पोंकळ सबबीखालीं आपल्या अंतःकरणाचा पोकळपणाहि व्यक्त केला. बाळाजी आपल्या बुद्धिचातुर्यानें सर्वांस निरुत्तर करीत होता ; परंतु शेवटीं ब्राह्मणांनी हेका धरून आपला हट्ट शेवटास नेला. या कामीं महाराजांचे मुख्य प्रधान पेशवे मोरोपंत पिंगळे हे विरुद्ध पक्षाचे अध्वर्यू होते. काय वाटेल तें होवो महाराजांस विधियुक्त राज्याभिषेक करवीनच असा आपला दृढनिश्चय बाळाजीनें तर स्पष्ट बोलून दाखविला. तेव्हां पूर्वीच्या मत्सरांत अधिकच भर पडली व द्वेषाग्नीच्या ज्वाला भडकूं लागण्याचीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं. निश्चयी बाळाजी म्हटल्याप्रमाणें राहणार नाहीं हें मात्र त्याचे प्रतिस्पर्धी जाणून होते.

राजकीय वातावरणांत होत असलेल्या फेरफारांच्या योगानें ज्या मोठमोठ्या भानगडी उत्पन्न होत त्यांत बाळाजीवर वर्चस्व करण्याची ताकद व धैर्य त्याच्या प्रतिस्पर्ध्यांत नसल्यामुळें शिवाजी महाराजांच्या दरबारी मंडळांत दुफळी पडली. एका बाजूला शिवाजी व बालाजी आणि दुसऱ्या बाजूला प्रधानमंडळ व मराठे सरदार. उभयपक्षीं स्पर्धा चाले. पण बाळाजीच्या प्रतिपक्षाचा द्वेष मात्र भयंकर वाढूं लागला. इतक्यांत बाळाजीनें स्वतःच्या मुलांच्या मुंजी करण्याचें ठरवून समारंभ सुरू केला.

तेव्हां ब्राह्मण्याचें बल काढून ग्रामण्य करण्यास प्रारंभ केला. बाळाजी चिटणीस यांचे पुत्र ज्येष्ठ आवजी बाबा म्हणोन होते, त्यांचा व्रतबंध करावयाचा त्या समयीं पिंगळे यांणीं ब्राह्मणांकडून कुचेष्टा करून बोलणें घातलें जे, तुम्ही क्षत्रिय म्हणोन तीन कर्मे करीत आलां व करितां त्यास कलीत क्षत्रिय नाहींत. तेव्हां तुम्ही क्षत्रिय कंठील व ब्राह्मणही तुम्ही नव्हे त्या

---

* आन. किंकेड साहेब आपल्या अभिनव इंग्रजी '' महाराष्ट्राचा इतिहास '' पृ. २४४ वर येणेंप्रमाणे स्पष्ट खुलासा करतात :–

"For although the high-spirited Deccan nobles gladly followed Shivaji in the field, they were un-willing in private life to concede to him any precedence. And at state dinners they resented that a Bhosale should sit on a seat raised above those assigned to Mohites, and Nimbalkars, Savants and Ghorpades. He spoke of the matter to his secretary, Balaji Abji Chitnis, and the latter urged him the royal crown from the hands, not of a Moghal emperor, but of a Benaras priest. The King consulted his mother Jijabai, the saintly Ramdas and his favourite goddess Bhavani and found them all favourable to his secretary's suggestion."

अर्थी मुंजी करूं नये. करूं देणार नाहीं. त्याजवरून चिटणीस यांणीं सांगून पाठविलें की, कारभारासंबंधी द्वेष, त्यास कामानिमित्तें सरकार कल्याणाची चाकरी करून आम्हांस माजी करून हात दाखवावा. तें सोडून ब्राह्मण्यावर येऊन सांगून पाठवितां हें आश्चर्य आहे पूर्वीपासून वेदोक्त तीन कर्मे आचरण करीत आलों आहों व ब्राह्मण करीत आले. नवीत आहा असें नसतां कलींत क्षत्रिय नाहींत म्हणतां हें, रिकामे दांत खाऊन अवलक्षण देणे चांगले दिसत नाहीं. वरकड मार्गें करीत आलों. पुढेही होईल. तुम्हीच एक ब्राह्मणांत अध्वर्यु आणि तुमचेच हुकुमांत सारे ब्राम्हण आहेत असे नाहीं. बहुत थोर ब्राह्मण पुष्कळ आहेत. शास्त्रग्रंथ लटके होतील असे घडणार नाहीं. लटिका कलह वाढवूं नये.

परंतु या उत्तराने पेशवा व त्याचे पक्षपाती यांचा दुराग्रह सुटला नाहीं. बाळाजीनें मुंजी थांबविल्या नाहींत, तेव्हां ब्राह्मणांनीं हातघाईवर येऊन दंगा करण्यास सुरवात केली. रघुनाथपंत अमात्याने घटिका विछिन्न करून घंगाळ उडवून टाकलें. मोरोपंत पेशवे व बाळंभट चितळे यांस बाळाजीनें सांगितलें कीं, '' तुम्ही महाराजांच्या पट्टाभिषेकाचा विषय चित्तांत धरून निक्षेप करीत आहांत त्याअर्थी मी अशी प्रतिज्ञा करितों कीं, प्रथमतः महाराजास राज्याभिषेक करवून नंतर माझ्या मुलांच्या मुंजी करीन. मत्सरानें फुरफुरलेल्या या दांभिक धर्माभिमानी ब्राह्मणांची समजूत घालण्याचा अटोकाट यत्न करण्यांत आला. परंतु मत्सर दुराग्रह न सुटे तेव्हां त्या सालीं मुंजी तहकूब करून नंतर हें सर्व वृत्त महाराजांस श्रुत केलें. व परस्परें ऐकण्यांतही सरकारांत आले. तदनंतर एक-दोन रोजी महाराजांनीं चिटणीस यांस एकांती बोलावून आणून या गोष्टीची चर्चा भवति न भवति फार जाहली . . . . . . क्षत्रिय आहेत किंवा नाहींत हें दाखवावयाचें परंतु यास अनुकूल ब्राह्मण मंडळी होणार नाहीं. याकरितां तुम्हांसही अडवून बोलतात. वरकड त्यांचें कांहीं चालतच नाहीं. परंतु तुम्हीं आपलें प्रकरण क्षेत्रांस पाठवून संमतें आणवावीं आणि कार्यसिद्धी करावी.

याप्रमाणें मुंजी तहकुब करून घडलेलें वर्तमान बाळाजीनें महाराजांस कळविलें. बाळाजीची प्रतिज्ञा ऐकून महाराजांस मोठा संतोष वाटला. त्यांनी लागेल ती मदत देण्याचें बाळाजीला आश्वासन दिलें. त्यानंतर महाराजांबरोबर गुप्त मसलत करून बाळाजीनें काशीहून गागाभट्ट नामें महापंडित आणून त्याच्या हस्तें राज्याभिषेक करवावा असें ठरविलें. तेंव्हा महाराजांच्या अनुमतीनें गागाभट्टास आणण्याकरितां त्यानें केशवभट्ट पंडित, भालचंद्रभट्ट पुरोहित व सोमनाथभट्ट कात्रे या त्रिवर्गांस गागा भट्टजीस आणण्यास काशीस रवाना केलें. या त्रिवर्ग भट्टजीनीं काशीस जाऊन महाराजांच्या पैशाचा मात्र फन्ना उडवला व गेले तसे हात हालवीत परत आले. येतांना ' शिवाजी महाराजांस छत्र सिंहासनाचा अधिकार नाहीं ' अशा अर्थाचें गागाभट्टाचें पत्र मात्र घेऊन आले. त्यावरून महाराजांसहि वाईट वाटलें. आपला सर्व व्यूहच ढांसळून तडतो कीं काय असें त्यांना वाटलें. तेव्हां बाळाजीनें महाराजांस समजाविलें कीं, या पंडित व सर्वज्ञ ह्मणविणाऱ्या ब्राह्मणांस आपल्या पूर्वजांविषयीं असावी तितकी माहिती नसल्यामुळें त्यांना आपलें प्रकरण गागाभट्टास नीट समजावितां आलें नाहीं. तेव्हां पुन्हां दुसरा कोणी जाणता माणूस पाठविला पाहिजे. आपल्या पदरच्या ब्राह्मणमंडळींनें जाणूनबुजून हा खोडसाळ प्रकार केला असला पाहिजे हें महाराजास न समजण्याइतके ते दुधखुळे खास नव्हते. म्हणून त्यांनीं निळो येसाजी प्रभू पारसनीस यांस पाठविण्याविषयीं सांगितलें. त्यावरून

निळो येसाजी काशीस गेले, त्यांनीं गागाभट्टजींस सर्व मजकूर यथातथ्य समजावून सांगितला व शिवाजी राजे शुद्ध क्षत्रिय आहेत अशी त्यांची खात्री करून दिली. शिवाजी महाराजांची वंशावळ उदेपुराहून आणून, तेथील राजघराण्यांतीलच हे एक राजपुरुष आहेत असा पुरावा बाळाजीनें आधींच आणून निळो येसाजीजवळ दिला होता. त्यावरून खात्री होऊन गागाभट्टजी रायगडास आले.

रायगडास आल्यावर गागाभट्टांनीं आपल्या पूर्ण खात्रीकरितां पुन्हां चौकशी करून अनेक ग्रंथ पाहून शेवट असा निर्णय केला कीं ' शिवाजी महाराज हे शूद्र ; त्यांना राजसिंहासनाचा अधिकार नाहीं. ' येथेंहि गागाभट्टाच्या कानाचा चावा घेण्यास मत्सरी चिलटांनीं संधि साधली नसेल असें म्हणवत नाहीं. आमच्याजवळ असलेल्या एका अप्रकाशित बखरींत म्हटलें आहे :––

श्रीमन्नंदनवन गौरी त्रिकंटक वाराणसी क्षेत्रस्थ गागाभट्ट भट्टोजी दिक्षित वंशान्वय संजात श्रीमन्रा सिंहासनाधीश्वर महाराजाधिराज श्रीमछीवाजी महाराज यांस पट्टाभिषेक करण्याकरितां श्री महाक्षेत्रीहून आणिल. तें समयीं चांद्रसेनीय प्रभु कायस्थ यांचा सिंहासनाधिकार हे क्षत्रिय आसा निर्णय करून शूद्रास अधिकार नाहीं असें स्पष्ट नूतन गागाभट्टी म्हणोन ग्रंथ संपूर्ण शास्त्र पौराणांतर इतिहास वाक्यें आनकूल घेऊन केला. ते समयीं मोरोपंत पेशवे व निलो सोनदेव मजमदार याणीं गागाभट्टास येकांतीं आपलें घरीं नेऊन नानाप्रकारें समजाविलें कीं तुम्हीं प्रभूंचा अधिकार राज्याचा स्थापित केला. शुद्राधिकार नाहीं. तेव्हां यांचे कुळांचें ठायीं कोणी उत्पन्न होईल तो आमचा अधिकारी असाच निर्णय झाला. म्हणोन आपले स्वसामर्थ्यें राज्य करतील. सिंहासनाधीश्वर होतील. परंतु महाराजांनीं श्रम करून तुम्हांस आणले यांचा अधिकार तरी नाहीं उगाच ईश्वर वरप्रसादेकरून भाग्यवान होऊन ऐश्वर्यवान जाल्यामुळें तुम्हीं एखादा विचार काढून यास राज्याभिनिवेश कराल हाच विचार यांतील किंवा दुसरा प्रकार तो सांगावा.

शिवाजी महाराजांना राज्याभिषेक करण्याकरिता भीम प्रयत्न करून बाळाजीनें गागाभट्टास रायगडास आणलें तेव्हांच त्याचे प्रतिपक्षी चीत होऊन गेले. पुढे जेव्हां गागाभट्टानें राज्याभिषेकाचा अधिकार बाळाजीसच आहे, शिवाजीस किंवा इतर दुसऱ्या कोणासही नाहीं असें सांगितलें तेव्हां तर या ब्राह्मण मंडळीचा धीर अगदींच सुटला व त्यांनीं आपल्या पगड्या लागल्याच फिरविल्या. बाळाजीला राज्याभिषेक होण्यापेक्षां तो शूद्र (?) शिवाजीस झाला तरी पत्करला. असा विचार करून मोरोपंतादि मंडळीनें गागाभट्टाजवळ तसे बोलणें चालविलें.

त्यावरून गागाभटजीनीं सांगितले कीं हे चांद्रसेनीय क्षत्रिय यांचाच अधिकार सिंहासनाचा. याणीं हजारो रुपये खर्च करून आपला स्वधर्म निर्णय करण्याकरितां केले आणि त्यांचे पूर्वापार जाणून आम्हीं मान्य करून क्षेत्रीं ग्रंथ करून आणिला. व त्यांनीं आम्हांस अगत्यांनी आणिलें त्यापेक्षां आधर्म करणें, ज्ञातीस दोष ठेवणें हे महान्निंद्य कर्म. आमचे हस्तीं कसें होते. अशी गोष्ट तुम्हीही बोलों नये.

**मशारनिल्हे उपद्व्यापी मंडळींची गागाभटजीनीं याप्रमाणें संभावना करतांच शेवटचा उपाय म्हणून खुद्द शिवाजी महाराजांचे कान भरतां आले तर पहावेत म्हणून ते त्यांची भेट घेण्यास गेले, आणि––**

मोरोपंतानी व निलोपंतानी सविस्तर मजकूर माहाराजास समजाविला. आणि तुम्ही शुद्र,तुमचा सिंव्हासनस्थ होण्याचा अधिकार नाहीं असें स्पष्ट भटजीनीं आम्हाजवळ सांगितले. तेव्हां आम्हीं त्यास विचारलें कीं महाराजानीं एवढा साहस करून आपल्यास आणिलें कारण मिळोन संपूर्ण पृथ्वींतील सार्वभौम पदवी आपणास प्राप्त असावी, करावी, त्याप्रमाणें ईश्वर अनुकूल होऊन येश येत आहे. तेव्हां गागा भटजीनीं तरी आपला अधिकार काहीं निर्णय केला. यावरून बाळाजी बाबानीं आपले साधनाकरीतां आपल्यास भरीस घालोन आपला मतलब साधून आपली शुद्धता केली.

दुसरी एक आम्हांजवळील अप्रकाशित बखर म्हणते :––

गागाभट्टी* केली तीसमयीं कायस्थप्रभु क्षेत्रीय राजाधिकारी ठरविले. त्रयकर्माधिकारी. ते रघुनाथपंत अमात्य याणीं पाहून राजास सांगितलें गागाभट्टास आणोन तुम्ही आपले घर आपले हातून बुडवून प्रभुचे हरीं राज्य घातलें. आज तुम्हीं धणी आहांत परंतु शुद्र. तुमचा अधिकार नाहीं. असा निर्णय साफ लिहिला.

**याप्रमाणें मोरोपंत पेशवे, निळो सोनदेव व रघुनाथपंत अमात्य हे निघे राज्यभिषेकाच्या कट्टे विरूद्ध असलेले ब्राह्मण आतां राज्याभिषेकाला अनुकूळ असा वेदांत सांगूं लागले. त्यांच्या एकांताचा महाराजांच्या मनावर परिणामहि झाला. बखर पुढें म्हणते :––**

आपल्या प्रयत्नाची निर्फळता दिसोन आली. त्यावरून त्यांची बोलणी यथार्थ अंतःकर्णास वाटून गागाभटजीस महाराजांनीं एकांती नेऊन हे उभयता कारभारी घेऊन ग्रंथ काढवून कल्पना घेऊन नानाप्रकारें विचारिलें. परंतु क्षत्रिय वर्ण शुद्ध यांस दोष आमचे हस्ते लाववत नाहीं असें गागाभटजीनीं साफ उत्तर केलें. तेव्हां बरें बोलूं म्हणत ती वेळ कचेरी मोडून भालचंद्र भट पुरोहित यास महाराजांनीं सांगून धर्माधिकार तुम्हांस वंशपरंपरेनी देऊं. परंतु आमचा अधिकार राज्याचा ग्रंथ संमते निर्णययुक्त करऊन प्रभूस दोष ठेऊन अधिकारापासोन च्युत करावे अस सांगितल्यानंतर भालचंद्र भटजीनीं गागाभटजीस कांहीं लोभप्रद भाषण करून दोष लावितों असे बंलोन आभय घेऊन महाराजांस श्रुत केलें. नंतर चांद्रसेनीय यांस दोष † ठेवून महाराजास अधिकारपरत्वें वाक्यें लाविलीं.

**वास्तविक शिवाजी महाराजांना विधियुक्त राज्याभिषेक व्हावा ही मूळ प्रतिज्ञा बाळाजी आवजीची. अर्थात् शास्त्रसंमतानें त्यांच्यावर जरी गागाभट्टानें राज्याभिषेकाची शाब्दिक बळजबरी करण्याचा घाट घातला होता, तरी बाळाजीनें त्याला मुळींच संमति दिली नाहीं. परंतु नेहमीं द्रविडी प्राणायामाच्या कसबांत मुरलेल्या त्याच्या ब्राह्मण प्रतिस्पर्ध्यांना आतां मात्र**

---

* गागाभट्टी हा ग्रंथ निःपक्षपाताने लिहिला नाहीं असा गागाभट्टावर जो आरोप आहे तो खरा आहे याचें हें बलवत्तर प्रमाण आहे.

**बाळप्रभूला राज्याभिषेक खास होणार ही भिती पडून त्यांनीं शिवाजी महाराजांना आपल्या उलट्या कारस्थानीं मंत्रांनीं भारण्याचा व्यर्थ यत्न केला. असो ! कोणत्या कां मार्गानें होईना, अखेर बाळाजीचे प्रतिस्पर्धी बाळाजीच्याच प्रतिज्ञेचा पुरस्कार करण्यास तयार झाले. याप्रमाणें व्यवस्था होऊन राज्याभिषेकाची तयारी झाली. तरीसुद्धां गागाभट्टाचें मन तयार होईना ! पण––**

शिवाजीचें भरगच्ची स्वागत अनुभवून गागाभट्ट अगदीं खुष झाले, व त्यांनींच कल्पना काढीली कीं, मुसलमान पादशहा सिंहासनावर बसून छत्र, अबदागीर इत्यादि राजचिन्हें जर धारण करितात, तर मग इतका पराक्रम करून ज्यानें एवढें राज्य स्थापिलें, त्या शिवाजीनें राजचिन्हें धारण करूं नयेत हे काहीं योग्य नव्हे. * या (महाविद्वान् पंडितास राज्याभिषेक) समारंभाकरितां मुद्दाम आणविलें होतें. परंतु राज्याभिषेकाच्या वेळेस लागणारे मंत्र गागाभट्ट म्हणेना. सबब राजकीय धोरण त्याजपुढें मांडावें लागलें.†

**वरील हकिकतीप्रमाणें एकंदर प्रकार होऊन नंतर गागाभट्टानें शिवाजीस राज्याभिषेक करविला. राज्याभिषेक समारंभ समाप्त होतांच बाळाजीनें** लागलेंच आवजी बावा यांच्या व्रतबंधाचा समारंभ मोठा करविला. सर्व शिष्ट व **महाराज** समारंभांत येऊन सांग केला. ग्रामण्यें बहुत वाढून उपहास कटकट कांहीं जाली नाहीं. थोडक्यांतच परिमार्जन होऊन मत्सर पाहणार त्यांची निशा जाहली.

**गागाभट्टीमध्यें गागाभट्टानें आपल्या जातीला दूषण लागेल असा मजकूर मागाहून घातला हें वर्तमान बाळाजीस समजलें :––**

ते समयीं बाळाजी बावांनीं गागाभटजीस विचारलें. त्यांणीं उत्तर केलें कीं बाबा, हा समय असाच आहे. समजेल त्यास या ग्रंथेकरून तुम्ही अधिकारी योग्य आहांत. न समजल्यास नीटच आहे. लिहिलें तें प्रमाण बोलोन व्यंगीतें गुह्य होती ती समजविली.

**याप्रमाणे हें ग्रामण्य निकालांत निघालें. यावेळचें एक पत्र उपलब्ध झालें आहे तें असें :––**

राजमान्य राजश्री समस्त चांद्रसेनीय प्रभु लोक वर्णोचित स्वधर्मपारायण यांस :––

प्रति रघुनाथ पंडित ' पंडितराव ' कृतानेक आशिर्वाद. तुम्हां लोकांचे घरीं पंचमहायज्ञ व श्रावणी व मुंजी व इष्ट पूर्तादिक सकल कर्मे यथोचित मार्गें करण्यास ब्राह्मणांचे तर्फे खळखळ होती यास्तव समस्त पंडित मंडळी श्रीमत् महाराज राजश्री राजे यानीं मेळवून ' ज्याचा जो धर्म त्याचा त्यांनीं करावा. त्यांत कोणी बखेडा करूं नये. धर्मस्थापनेकरितां आमचें साहस त्यांत अधर्माचा दोष न यावा ' अशी आज्ञा जाली. " त्यावरून यथाशास्त्रार्थ ग्रंथावलोकन करून निर्णय चांद्रसेनी शुद्ध क्षत्रियवर्ण सिद्ध जाल्यानंतर श्रीक्षेत्रीं सरकारांतून गोविंदभट्ट खेडकर यांस राजश्री बाळाजी आवजी चिटनवीस यांनीं विनंती महाराजांस केल्यावरून पाटविलें. तेथें श्री मच्छंकराचार्यान्वय सद्गुरू अनंतदेव स्वामी व गागाभट्ट आदि क्षेत्रस्थ यांनीं निर्णय करून शास्त्रमार्गें तुमचा धर्म यथोचित संमती लेहून पाठविली. चांद्रसेनी दालभ्यगोत्री प्रसिद्ध राहतील

* मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष, पृ. १६४.

† कित्ता. पृ. १६३

ते क्षत्रियवर्ण कलयुगी आहेत. त्यावरून कोंकण प्रांतीं महालोंहाली कळविलें आहे. तीं पत्रें कोणीं न दाखवितां द्वेष बुद्दीनीं कर्म करण्याचालविण्यास बखेडा करतील ते देवाब्राह्मणांचे द्रोही व राजदंडास अधिकारी होतील व ज्ञातीचे अपराधी समजोन यथा शास्त्र वेदोक्त कर्म करावें. मिती शके १५९१ सौम्यनाम संवत्सरे, मार्गशीर्ष शु।। ११ सु. सितेन सबेन आलफ बहुत काय लिहिणें हे आशिर्वाद.

याच ग्रामण्याबद्दल आणखी कांही संशोधकांचे उतारे उपलब्ध आहेत, ते खालीं नमूद करून हें चतुर्थ ग्रामण्य येथें पुरें करूं.

(१) " तिसरें ग्रामण्य रायगडीं बाळाजी आवजी चिटणीस यांचे पुत्राचें मुंजी समयीं रघुनाथ पंत अभात्यानें केलें. घटिका विच्छिन्न करून आरंभ केला तेसमयीं शिवाजी महाराजांनीं ब्राह्मण मिळवून शास्त्रार्थ करून पंडितराव यांचीं पत्रें देऊन ग्रामण्याचें निराकरण केलें. शके १५९१ (इ. स. १६६९) " प्रभु कुलदीपिका पृ. १५०.

(२) " तिसरें ग्रामण्य चिटणीसांचें आवजी बल्लाळ याचे मुंजी समयीं रघुनाथपंतीं केलें तें निराकर्ण गणेश जोशी दिक्षित शास्त्री टलके यांनीं केले शके १५९१. "

–रा. राजवाडे म. इ. सा. खंड ६ लेखांक ४४४ पृ. ५२३.

(३) " बाळाजी आवजीचे चिरंजिवाचा व्रतबंध, शके १५९५ साधारण नाम संवत्सरे सन इहिदे सबैन अलफ.

ब्राह्मण यांनीं ग्रामण्य घंगाळ लवंडिलें. मंत्रानुप्रचित मुलाची पाहून रजा दिली सबब शुद्रास राज्याभिषेक करणें अभिमान धरून संमत काशीचे आणले. नंतर गागाभट आले. त्यास संमत न देता ब्राह्मण. तेव्हां चिटणीसासी तंटा केला. हा कलुष मनांत आणून कारभारी अनकूल जाले. मंत्रोपदेश करविला. नेम पूर्वी ठरला होता सा।। चांद्रसेनीस न करणें. गागाभटजी लि।। त्यास आणावयास गोविंदभट खेडकर पाठविले. निळो सोनदेव याची मुजूमी काढली. पुढें रघुनाथपंत चांदीहून आले. त्यांनीं रदबदली करून वस्त्रें मुजुमींची दिली. शके १५९३ विरोधकृत संवत्सर, इसन्ने सबैन अलफ.

–रा. राजवाडेकृत म. इ. साधनें, खंड ६ लेखांक ४५९, पृ. ५४६/४८.

# ग्रामण्य पांचवें.

## कल्याणप्रांतीचें ग्रामण्य (शके १५९३ इ. स. १६७१).

हे ग्रामण्यहि श्रीशिवछत्रपतीच्या कारकीर्दितच झालें परंतु या ग्रामण्याची सविस्तर हकिकत उपलब्ध व्हावयाची आहे. रा. रामराव नारायण प्रधान म्हणतात :—

" (हें) ग्रामण्य कल्याणप्रांतीं झालें. ते समयीं रघुनाथ पंडित यांचीं पत्रें. कोकणप्रांतीं येऊन निराकरण केलें. शके १५९३." प्रभुकुलदीपिका, पृ. १५३.

–रा. राजवाडे मू इ. साधनें, खंड ६, लेखांक ४४४ येथें म्हणतात :––

या ग्रामण्यासंबंधानें आम्हांस एक पत्र उपलब्ध झालें आहे तें येथें देतों :––

" महाराज राजश्री शिवराज वर्णाग्रामोची व यथा शास्त्रोक्त स्वधर्मपरायण राजमान्य राजश्री समस्त प्रभु लोकासी प्रती पंडित रघुनाथ कृतानेक आशिर्वाद तुम्हां लोकांचे घरी पंचमहायज्ञ व श्रावणी इष्टपुर्तादिक सकल कर्मे यथोचित मार्गे रावयाची. तुमचे तर्फेनें व ब्राह्मणाचे तर्फेनें खळखळ पडते. यास्तव कोणाचे कर्म मार्गे सांग होत नाहीं याबद्दल रा. बाळाजी प्रभु याणीं श्री यासी विनंती करून श्री वाराणसीस वेदमूर्ति गोविंदभट खेडकर हे पाठवून सदगुरू अनंतदेवस्वामी व गागाभट भटवंशी याजकडोन सकल शास्त्रर्थ निर्णय मार्गे तुमचा धर्म चाले असा कायस्थप्रदीप म्हणवून उत्तम ग्रंथ आणिला. तो देशामध्ये सकल ब्राह्मण लोकाशी संमत असे म्हणवून बाळाजी आवाजी अदिकरून येणेंप्रमाणें सकल धर्मकृत्य व्यवहार चालत आहे त्यावरून आपली कर्मे करीत जाणे म्हुजे सर्वासंमते असे जो कोणी शास्त्रार्थ टाकून अन्यथा पाखांड करतील ते देवाचे व ब्राह्मणाचे व राज्याचे व जातीचे अपराधी असे दंड पावेल यास्तव सदर्हू शास्त्रोक्ताप्रमाणें वर्तत जावे. कळावे शके १५९४ पुरधेवीनाम संवत्सरे, भाद्रपद शुद्ध ६ रविवार सु॥ सन सला सबैन आलफ. "

चां.का.प्र.इ. साधनें यांत प्रसिद्ध झालेली बखर, ग्रामण्याची हकिकत, प्रभुरत्नमाला, एर्थ्नाग्राफिकल नोटस् इत्यादि पुस्तकांत या ग्रामण्याचा उल्लेख नाही. म.इ. साधनें खंड ६ यांत लेखांक ४५९ मध्यें रा. राजवाडे यानीं जी यादी दिली आहे, तींतही याचा उल्लेख नाहीं.

छत्रपती शिवाजीच्या कारकीर्दीत ग्रामण्याची सुरवात शके १५८४ इ.स. १६६२ सालीं झाली. असा आमच्या जवळील एका बखरींत उल्लेख आहे. चौथ्या ग्रामण्याच्या शेवटीं रघुनाथ पंडिताचें जें पत्र दिलें आहे तें शके १५९१ (इ. स. १६६९) चें आहे. छत्रपती शिवाजीस राज्याभिषेक (इ. स. १६७४) शके १५६९ आनंदनाम संवत्सरे ज्येष्ठ शु॥ १३ स झाला प्रस्तुतच्या पांचव्या ग्रामण्यचें साल रा. रा. ना. प्रधान, शके १५९३ (सन १६७१) हें देतात, व रा. राजवाडे यांच्या पहिल्या यादींत शके १५९७ (इ. ६. १६७५) हें साल दिलें आहे. वर दिलेलें पत्र शके १५९४ (इ. स. १६७२) चें आहे. या दोन्ही ग्रामण्याच्या सनांचा व हकीकतीचा विचार करितां आम्हांस असें वाटतें कींऐ हें सर्व ग्रामण्य एकच शके १५८४ पासून शके १५९७फर्यंत चालतलें होतें. छत्रपतीस राज्याभिषेक केल्यानंतर गागाभटजींनें बाळाजीच्या मुलांच्या मुंजी लावल्या त्या शके १५९६ मध्येंच. यावरूनहि हीच गोष्ट सिद्ध होते. रघुनाथपंत अमात्याची शके १५९१ व शके १९५४ चीं दोन्ही पत्रें शिवाजीया आज्ञेवरून लिहिलेलीं आहेत हें उघडच आहे. त्यावरून असें अनुमत होतें कीं शिवाजी मधूनमधून ब्राह्मणांस दाबांत ठेवीत होता व " खावंद सूज्ञ जबरदस्त " यामुळेंच या ग्रामण्यांत ब्राह्मणांकडून अत्याचार घडून प्रभु लोकांस विशेष त्रास झाला नाहीं.

# ग्रामण्य सहावें.

## यमाजी शिवदेव याचें ग्रामण्य. शके १६६९ इ. स. १७४७.

**शाहू महाराज यांचे कारकीर्दीत यमाजी शिवदेव मुतालिक निसबत प्रतिनिधि यांणीं ग्रामण्य केलें. त्यांतील मजकुराचा तपशील :––**

छत्रपती शाहु महाराजांच्या कारकीर्दीच्या शेवटीं त्यांच्या प्रकृतीस स्वास्थ्य नव्हतें. त्यावेळीं गोइवद खंडेराव चिटणीस व शिवाजी खंडेराव चिटणीस हे राज्याचा कारभार करीत असल्यंमुळें सर्व राज्यसुत्रें त्यांच्याच हातीं होतीं.

जीवाजी खंडेराव चिटणीस व गोविंद खंडेराव चांद्रसेनीय कायस्थ प्रभु, यांजवर महाराजांचा पूर्ण लोभ व त्यांचें निष्ठेनें वागणें म्हणून यांजवर फार विश्वास. त्यांत प्रतिनिधि हुजूर खासगी वगैरे कारभार पाहत होते. त्यांजकडून यामाजीपंत सर्व काम चालवित होते. तरंतु मोठे राज्यकारणाचे वगैरे महाल सुभे या कामांत पंत प्रमधान यांची व यमाजीपंत व जगजीवन परशराम ऊर्फ दादाबो प्रतिनिधि यांची चुरस वागूं लागली. त्यांत गोविंदराव व बाळाजीपंत नाना प्रधान पंत याचा अति ऋणानुबंध व नाना पेशवे यांचें बोलणें व गोविंदराव याचे बेत संरकारांत चालत असत. महादोबा बाबा पुरंदरे मुतालिक निसबत पंतप्रधान हे हुज़रीं हरकामांत विश्वासें खावंदासीं वागत असोन यमाजीपंताचे हरवक हरएक कामांत मोडते येऊन परस्परें कोणाचें करणें कोणाचे मनांत येऊं देत नसत. गोविंदराव यांची व महादोबा बाबा यांची जुगल एकदीली वागून ते यमाजीपंत यांच्या वागणुकीचा कारभार आग्रही असे याजमुळें तं चालूं न देत. तेव्हां यमाजीपंत अतिद्वेष करण्यास प्रवतृला. परंतु कारभारासंबंधी महाराजाचे कृपेच्या जोरामुळें न चाले. तेव्हां ग्रामण्याचा विचार ब्राह्मणांवर येऊन कांहीं ब्राह्मणसमुदाय जमा करावें परंतु तें न चालें. तेव्हां माहुली वगैरे ठिकाणीं कर्मास अटकाव करावा ही योजना केली. त्यांत यमाजीपंत जातीनें पढिक दोन शास्त्रें अध्ययन असे होते. तेव्हां प्रभुज्ञातीवर दोष अनेक तऱ्हेचे विद्याबलें आणून ग्रंथ एक केला परंतु न चालें. माहुली येथें कर्मास बखेडा केला.

**याबद्दल बखरींत म्हटलें आहे कीं :**

शाहू महाराज राज्याधिकारी जाहले. त्यांचें कारकीर्दीत येथास्थित चालत असतां प्रतिनिधीचे कारभारी यमाजीपंत याणीं ग्रामण्य केलें. खोट्या नूतन कवितेच्या फकीका ग्रंथांत अनन्वित लाऊन कटकटी करूं लागले. तेव्हां शाहुराजा याणें कै. श्रीमंत नानासाहेब यांस सातान्यास बोलावून मनास आणावयास सांगितले.

**तेव्हां बाळाजी बाजीरावांनीं शाहू महाराजांस पत्र पाठविलें :**

श्रीमंत क्षत्रियकुलावतंस महाराज राजश्री छत्रपति स्वामीचे सेवेसीं, विनंति सेवक बाळाजी बाजीराव प्रधान कृतानेक विज्ञापना सेवकाचें वर्तमान तारीख १९ साबान महाराजाचे कृपावलोकेंकरून यथास्थित असे. विनंति प्रस्तुत सातारे यासीं ब्राह्मणांनीं गलबला केला आहे. त्यास काशींतील उभयतटांचे ब्राह्मण कलह करीत आहेत. त्याचें वर्तमान महाराजांनीं

मनास आणून समजावीस करून लावून द्यावे. प्रभूचें सुदामतप्रमाणें चालत आलें आहे. त्याप्रमाणें चालवावें. त्यास अडथळा होऊं नये. [स्वदस्तूर] पूर्वापार चालत आले ते चालवावे, नवीन कज्या योग्य नाहीं. ब्राह्मणाचा निर्गमही स्पष्ट आज्ञा करून करणार महाराज समर्थ आहेत सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

**नानासाहेब पेशव्यांचें याप्रमाणें पत्र येतांच रघुनाथ पंडित व शाहु महाराज यांनीं यमाजीपंताची समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. परंतु '' यमाजीपंती '' नांवाचा विश्वामित्री मजकुराचा एक ग्रंथ करून गागाभट्टावर चढाई करण्याच्या कोत्या आढ्यतेनें फुगून गेलेल्या यमाजीपंतावर त्याचा कांहींएक परिणाम झाला नाहीं.**

महाराजांनीं क्षेत्रास पत्र दिलें. तें वर आपले हातच्या अक्षरांच्या ओळी लिहून दिलें. व पंडितराव रघुनाथ पंडित यांचे पत्र दिलें. आणि पूर्वीपासून वेदोक्त कर्मे चालत होतीं त्याप्रमाणें चालविलीं तीं पत्रें.

(१) वेदशास्त्रसंपन्न समस्त ब्राह्मण क्षेत्र खंडे व क्षेत्र महाऊली उभय कृणातीर यांसीं आज्ञा केली ऐशी जे, प्रभु हे पुरातन प्रांतीचे आणि तुम्हीहि याच प्रांतीचे प्रभू यांचीं क्रियाकर्मांतरें व शुभकर्मे व उत्तरकार्ये, जें पुरातन चालत आलें तें तुम्हीं जाणतच आहां ज्याप्रमाणें पूर्वीपासून चालवीत आलां आहां. त्यास प्रस्तुत याच्या क्रियाकर्मांतराचा प्रसंग पडला आहे. त्यास पुरातन विजापूरचे वक्तीं व कैलासवासी शिवाजीमहाराज यांचे वेळेस, व कैलासवासी संभाजी महाराजांचे वेळेस व कैलासवासी राजाराम महाराज साहेब मातोश्री ताराऊ साहेब यांचे वेळेस व हल्लीचे कारकीर्दीत चाल चालत आली त्याप्रमाणें उत्तरकार्ये व सर्व कर्मे चालवीत जाणें जुनें न मोडणें. नवें न करणें. पुरातन चालीप्रमाणें चालविणें. [खुद्द महाराजाचे दस्तूर :–] पुरातन चालवीत आलां त्याप्रमाणें चालवणें. नवे न करणें. जुनें न मोडणें. लिहिल्याप्रमाणें वर्तणें बहुतकाय लिहिणें हे विनंति. मि॥ कार्तिक शु. १५, शके १६७२.

**तसेंच महाराजांच्या आज्ञेवरून रघुनाथ पंडितानींहि एक आज्ञापत्र काढिलें :––**

(२) वेदशास्त्रसंपन्न राजमान्य माजश्री उभयक्षेत्र माहुली व परशुराम, स्वामी गोसावी यांसी, प्रति रघुनाथ भट पंडितराव नमस्कार विनंती उपरि, प्रभूंच्या क्रियेचा गुंता पडला यामुळें महाराज राजश्री स्वामींनीं आज्ञा केली जे, पूर्ववत् कैलासवासी शिवाजी महाराज यांचे कारकीर्दीपासून क्रिया चालत असेल त्याप्रमाणें चालवावें म्हणोन महाराजांनीं आज्ञा केली त्याजवरून हें पत्र तुम्हांस पाठविलें आहे. तरी सुदामतप्रमाणें मनास आणेन क्रिया चालती करणें. बहुत काय लिहिणें हे विनंति.

याप्रामणें शाहु महाराजांनीं जरी व्यवस्था केली तरी त्याचा कांहीएक उपयोग झाला नाहीं. प्रतिनिधी व चिटणीस यांच्यांत वैमनस्य पाडावें हा जो यमाजीपंताचा उद्देश तो या ग्रामण्याच्या योगानें उत्तम तडीस गेला. राज्यकारभारांत दोन तट झाले. चिटणीसांच्या पक्षाचा पूर्ण पाडाव करण्यासाठीं यमाजीपंतानें कंबर बांधली. इतक्यांत बाबुराव खंडेराव चिटणीस यांनीं प्रयागक्षेत्रीं जाऊन तेथें अतिरुद्र होम करविला. मग काय विचारतां ? आगींत तेलच पडलें. ग्रामण्याचें स्वरूप उग्रतम झालें व ब्राह्मणांनीं जारीनें बखेडा सुरुं केला.

तेव्हां नारायण दीक्षित यांनीं कांहीं ब्राह्मणतेथील चित्पावन मिळवून. यमाजी पंताचें लिहिणें गेल्यावरून बखेडा करणें मांडिला.

नंतर आज्ञा महाराजांनीं स्पष्ट केली कीं, लबाड कारभार आहे, परत जावें. परत लावून दिल्हें. कांहीं चालत नाहीं. कर्मे वगैरे पूर्ववत यथास्थित चाललीं. यमाजी पंतांचें चाललें नाहीं, तेव्हां अतिरोष दीर्घद्वेष वाढला. पुढें कांहीं दिवशीं महाराजांस व्यथा झाली. फार हैराण त्यांत सौभाग्यवती राणीसाहेब दादोबा प्रतिनिधि व आपण होऊन वाड्यांत बंदोबस्त करून पेशवे व चिटणीस यांनी वाड्यांत जाऊं नये असें केलें. आपल्या चौक्या बसविल्या. यांहीं आपल्या चौक्या बसवून बळेंच जावें असें होत आले. तो महाराजांचा काळ जाला. महाराजांनीं बंदोबस्त करावा. दत्तक घ्यावा प्रतिनिधिचें पारपत्य करावें. फारच यानें बखेडा केला. उद्दाम झाले. त्यानंतर काळ जाला ; तेच दिवशी दादोबा प्रतिनिधिस धरले व यमाजीपंत पळाले. ते कुणबीणीचें लुगडें नेसून कणगींत लपलें तेथें ठिकाण लावून तसेच बांधून आणिले. उभयतास बेड्या घालून कैद केलें. आणि बंदोबस्त केला. ऐसी ग्रामण्याची समाप्तनी झाली. पुढें कांहीं दिवसांनीं सोडल्यावर यमाजीपंतांनीं स्वदस्तूरचें गोविंदराव यास निखालसतेनें पत्र लिहिलें, तें यमाजीपंताचें पत्र--राजाश्रिया विराजित राजमान्य राजश्री गोविंदराव, गोसावी यांशीं, स्नेहपूर्वक यमाजी शीवदेव विनंती येदील कुशल जाणोन स्वकीय लेखन केलें पाहिजें. विशेष कालीं छ २५ सावानी श्रीमंत, राजश्री प्रतिनिधि यांचे व श्रीमंत मातुश्रीचें दर्शन घेऊन वाड्यांतयेऊन राहिले. आम्हीही समागमें होतों. आम्हास आंपले वाड्यांत राहणें म्हणोन आज्ञा केली त्याजवरुन वाड्यांत येऊन राहिलों. आपल्यास वर्तमान कळावें म्हणोन लिहिलें आहे. तुम्ही पत्र पाठविले तें पावोन परम समाधान झालें. तें पत्रीं लिहतां येत नाही. भेट व्हावी हा हेतू चित्तांत उत्पन्न होऊन आपल्या मनांत . . . . . . . .पत्रीं लिहिला पाहिजे. सारांश गोष्टीनें . . . . . . . बंधूत विपर्यास येता तोच प्रकार घडोन आला नाहीं. तरी तुमच्या आमच्या स्नेहांत प्रीतिअंतर पडावें असें नव्हतें. झाल्या गोष्टी त्या कालानुरुप घडोन आल्या. त्यांचे स्मरणहि करूं नये. पुढें पूर्ववत प्रमाणें प्रतीची वृद्धि करणें विहित आहे . . . . . . . लोभ असोंदीजे हे विनति. ''

**वरील हरिकतीखेरीज करून या ग्रामण्यांसंबंधी आमच्या जवळच्या कागदपत्रांत खाली दिल्याप्रमाणें आणखी माहिती सांपडते :--**

### बखर १ ली :

" यमाजीपंतांनीं ग्रामण्य उभे केलें. ते समयीं चिंतामण भट टकले यांस सुंदरबा पोतनिसीकडील कारकून याणीं आणून दिल्हें. चिंतामणवावा काशीस जाऊन चार हजार ब्राह्मण कासी वगैरे जमा करून विवाद केला. यमाजीपंताचे म्हणणे एक गोत्रत्रय कर्माधिकारी नीट आहे. बापुजी खंडेराव यांचे म्हणणें गोत्रे लाऊन द्यावी. त्यामुळें निर्णय न जाला. नानासाहेब पेशवे याणी समारोप करून ग्रामण्य मोडले. ''

### बखर २ री :

" प्रतिनिधीकडून यमाजी शिमदेव वगैरे लहानथोर कारभार यांचे आईसाहेबांनी आपल्यास मिळोन अधिकारी करून आईसाहेब गोविंदरायास आनकूळ नाहीं, हे बरे आहे. आईसाहेबास गोविंदराव अनकुळ नाहीत हे चांगले आहे. सबब व पुर्वी शूद्रास अधिकार नसता वेदकर्माधिकारी

राजास केले. आतां पाठिराखे महाराज नाहींत आणि ब्राह्मण धर्मास बाळाजीपंत नाना वाकडे जाणार नाहींत जाणून दाहावीस हजार ब्राह्मण गोळा करून ग्रामण्य सजले. त्यामुळें गोविंदरायानींही ब्राह्मण कांही मेळविले. सभा झाल्या त्यांत त्रयकर्माधिकारी चांद्रसेनीय दाल्भ्य चतुष्ट्य नामाधिकारी चिटनीस खरे ठरले. ''

**एका पत्रांतील मजकूर :**

पूर्वी श्रीमंत छत्रपती महाराज शाहुराज यांचे कारकिर्दित पंत प्रतिनिधी यांचे कारभारी येमाजी सिवदेव याणी त्रिकर्मांचा अधिकार नाहीं म्हणोन कलह वाढविला त्याजविशीं माहाराज याहीं सिष्टांची सभा करऊनं ग्रंथांतरी शोध पाहून च्यांद्रसेनीय कायस्थ प्रभु त्रिकर्माचे अधिकारी हे खरे ठरविल्यानंतर येमाजी सिवदेव याणी आग्रंह सोडिला.

**म. इ. साधनें, खंड ६, लेखांक ४४४ :**

'' ग्रामण्य यमाजी शिवदेव यांनी केले. ते समयीं काशीहून ब्राह्मण व चिंतामण गुरुजींनी निराकरण केलें. ''

**म. इ. साधनें, खंड ६, लेखांक ४५९ :**

'' यमाजीपंत १६७१ ज्येष्ठ शुक्ल नाम सन खम सैन मया अलफ, यांनीं द्वेष उत्पन्न केला, आईसाहेबास मिळोन, गोविंदराव चिटणीस व पेशवे यास कारभार करुं न देणें विचार, सबब पेशवे याजला कैद करून कासाईचे किल्ल्यावर ठेविले. वर्षभर होते. ''

**या ग्रामण्यासंबंधानें आणखी जीं पत्रें आम्हांस उपलब्ध झालीं आहेंत तीं येणेंप्रमाणें :–**

## पत्र १ लें

श्री.

श्री मन्माहाराज छत्रपती स्वामीचे शेवेसी. विनंती शेवक बाळाजी बाजीराव प्रधान कृतानेक विज्ञापना येथील वर्तमान ता। छ १रबीलावल पर्यंत स्वामीचे कृपावलकने करून सेवकाचे वर्तमान यथास्थित असो वि ॥. प्रभु चांद्रसेनीय कायस्थ यांचे ज्ञाती विषयी राजश्री येमाजीपंत आण्णा यांणीं ग्रामण्य केले त्यास पूर्वीप्रमाणें ज्ञातिधर्म चालत आल्याप्रमाणें चालतात त्यास नवीन खटले वाढले त्यास चालत आल्याप्रमाणें चालविणार स्वामी समर्थ आहेत. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

## पत्र २ रें

श्री.

'' वेदशास्त्र संपन्न राजमान्य राजश्री **उभय क्षेत्र माहुली व परशराम स्वामी गोसावी** यांसी.

प्रति रघुनाथभट पंडितराव नमस्कार विनंती उपरी प्रभु जातीकडे कर्मे चालावी न चालावी याबद्दल कासी क्षेत्रस्थ वगैरे ब्राह्मण या उभयतांचे भोलण्यावरून गुंता पडला होता ; परंतु बहुत शास्त्रसंमती ग्रंथावरून निरमत्सर शास्त्री पंडिताचे विचार करु पाहता जे धर्म चालत आले

आहेत त्याप्रमाणे पुढें चालावे. प्रभुचें अनादि पहातां क्षेत्रियांत तर प्रभुज्ञाती आहे. केवळ नवी म्हणावी वादविवाद करावा हें योग्य नाहीं. म्हणोन क्षत्रिय कुळावतंस राजश्री स्वामीनी उभयताचे ब्राह्मणांस स्पष्ट सांगून समस्त ब्राह्मण क्षेत्रादि यांस पत्रे लिहिण्याची आज्ञा जाहाली त्याजवरुन हे पत्र तुम्हास लिहून पाठविले आहे. तरी पूर्वीप्रमाणें प्रभुज्ञातीकडे कर्मे व्रतबंधादि, गर्भादान व क्रियादि सर्व परंपरागत चालत आली आहेत त्याप्रमाणे निरवेध स्वामीचे आज्ञेप्रमाणे चालवीत जावी. पुन्हा बोभाट न पडे ते करणे मि॥ कार्तिक व॥ १५ शालिवाहन शके १६७१ बहुत काय लिहिणें हे विनंती.

## जस्टिस रानडेकृत म.स. उत्कर्ष पृ. १५५-१५६.

" शाहूराजाच्या कारकीर्दीत बाळाजी बाजीराव पेशवे असतांना, ब्राह्मण व प्रभु यांच्यामध्यें फार दिवसांपासून चाललेला तंटा मिटविण्याचें काम सरकारकडे आलें हा तंटा पूर्वीपासून म्हणजे शिवाजीच्या वेळेपासून चाललेला होता असें दिसतें व त्या वेळेस तंटा मिटवून जो समेट केला होता, त्याप्रमाणें संभाजी, राजाराम यांच्या संबंध कारकिर्दीत व शाहू राजाच्या अर्ध्या कारकीर्दीभर व्यवस्था चालली होती. पण शाहूच्या कारकीर्दीच्या दुसऱ्या हप्त्यास प्रारंभ झाला, तोंच या कलहाग्नीनें पुनः पेट घेतला. त्यावेळेस शिवाजीप्रमाणें शाहूचीहि प्रभूलोकांवर बहाल मर्जी असे. प्रभूलोकांचा जो इतिहास आहे, त्यांत त्या वेळेच्या ब्राह्मणांवर असा एक आरोप आणिला आहे की प्रभूज्ञातीची नालस्ती करून त्याला दर्जा कमी करण्याच्या हेतूनें प्राचीन पौराणिक व सह्याद्रीखंडासारख्या इतर ग्रंथात कांही नवीन श्लोक ब्राम्हणांनी मुद्दाम* घुसडून दिले आहेत. बाळाजी बाजीराव पेशवे यांचेकडे हा कज्जा आला, तेव्हा पेशव्यांनीं शाहूराजाकडे एक खलिता पाठविला. आणि प्राचीन वहिवाट सोडूं नये, ब्राह्मणांनी उपस्थित केलेले नवीन कज्जे तात्काळ मोडून टाकावेत, व या बाबतींत ब्राह्मण लोकांना कायमचें व स्पष्ट असे एकसहा हुकूम सोडावेत, अशी त्या खालित्यांत शिफारस केली. तेव्हां लागलीच शाहुनें कृष्णानदीच्या तीरावरील खंदे व माहुली येथील समस्त ब्राह्मणवृंदास असे हुकूम सोडिले की, विजापूर येथील बादशाही अमदानींत, तसेंच शिवाजी, संभाजी, राजाराम व ताराबाई ह्यांच्या कारकिर्दीत त्याचप्रमाणें चालू (शाहूच्या) राजाच्या पूर्वभागांत, ज्याप्रमाणें और्ध्वदेहिक व इतर धर्मकृत्यें ब्राह्मण करीत आले तशींच त्यांनी पुढेंही करावीत. कोणतीही नवीन गोष्ट न करितां पूर्वापार वहिवाट तशीच चालू ठेवावी. तींत बदल करूं नये. महाराजसरकारचें हें आज्ञापत्र ब्राह्मणांस आलें त्याच वेळेस पंडितराव रघुनाथ यांनी सदरहू ब्राह्मणास एक विनंती पत्र पाठविलें, त्यांत शाहूमहाराजांची आज्ञा काय आहे हें थोडक्यांत लिहून प्राचीन वहिवाट बंद झाली आहे ती पुनः

---

* ही गोष्ट कांही निव्वळ कल्पना नाहीं किंवा " सांगण्यांत येते " पैकी दंतकथा नाहीं. अगदी अलीकडे अलीकडे पेशव्यांच्या नोकरशाहीचा अंत होण्याच्या सुमारास खुद्द सांगलीस चिंतामणराव पटवर्धनाच्या आश्रयाखाली खोडसाळ मजकूर घुसडलेले ग्रंथ तयार करण्याची एक गिरणच काढण्यांत आलेली होती. या गिरणींत तयार झालेले मालाचे नमुने आता बरेच उपलब्ध झाले आहेत. शिवाय प्रसिद्ध ग्रंथांचा नायनाट (confiscate) करण्याबद्दल पाश्चात्यांनाच कांही हंसायला नको. ग्रँट डफची जबानी पहा ; " They (Chitpawuns) carefully suppress or destroy all copies of the *Syadree kind*, where their origin is mentioned, and a respectable Bramin of waee was, a few years ago, disgraced by Baji Rao for having a copy of it, " (Vol. I p. 8-9, Cambray Ed : )

सुरू करावी अशी त्यांना विज्ञाप्ति केली होती. येणेंप्रमाणें हुकूम सुटले होते, तरी या दोन ज्ञातींमध्यें चाललेल्या भांडणाची खरोखर इतिश्री काही झाली नाही. कारण कीं, प्रतिनिधी जगजीवनराव पंडीत व त्यांचे गुमासते यमाजी, हे दोघे गृहस्थ सातारा येथें शाहूतर्फे सर्व कामांची व्यवस्था पहात होते. ते शाहू राजे यांचा अंत:काळ जवळ येऊन ठेपला होता म्हणून आज्ञापत्रांत लिहिलेली व्यवस्था मान्य करीनात. पुढें शाहूराजे वारले तेव्हां बाळाजी बाजीरावानें प्रतिनिधि व त्यांचे गुमासते यमाजी या दोघांनाही अटकेंत ठेवलें. व प्रभूजातींतील घराण्यामध्यें धर्मकृत्यासंबंधी पुर्वापार जी वहिवाट होती तीच चालू ठेवण्याबद्दल हुकूम सोडिले. ''

**टीप** :—खाली दिलेल्या एका अस्सल आज्ञापत्रावरून असें सिद्ध होतें कीं शाहुमहाराजांच्या कारकीर्दीत राज्याभिषेक शक २९ म्ह० शा० शक १६२५ इ० न० १७०३ मध्ये वरील मोठ्या ग्रामण्याशिवाय आणखी एक बखेडा झाला होता आणि त्यांचे या आज्ञापत्रानें निराकरण केलें. या बखेड्याचें विशेष कागदपत्र अझून उपलब्ध व्हावयाचे आहेत.

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक २९ सर्वजितनाम संवत्सरे कार्तिक बहुल चतुर्दशी क्षत्रिय कुलावंतस श्रीराजा शाहू छत्रपती स्वामी यांनी समस्त प्रभु क्षत्रिश्री यांस आज्ञा केली ऐसीजे. पूर्वी परशुराम रामचंद्र व रामचंद्र महादेव मांडवगडकर कायस्थ ज्ञाति हे उभयतां श्रीक्षेत्रस्य येऊन समस्त क्षेत्रस्य ब्राह्मणांची सभा गंधाक्षतेची करून आपले ज्ञातींत कर्मलोप जाहला आहे तो कर्माधिकार चालत असावा या हेतूनीं सर्व ब्राह्मणांस विनंति केली. नंतर सर्व ब्राह्मणांनी अनेक प्रकारचे ग्रंथ पाहून यांचे परंपरेची कुळाची व्यवस्थेवरून गागाभट्टकृत पद्धती अन्वयें मूळ पाहतां चांद्रसेनी क्षत्रिय यांजपासून यांची संगत लागली, तेव्हां क्षत्रिय धर्मास अर्ह आहेत असें शिष्ट संमतें ठरून कळविल्यावरून तुमचे ठायीं क्षत्रियत्व संभवतें. तुम्ही उभयतां मांडवगडचे राहणार. तुम्हांस आचारास निर्णययुक्त सांगितल्यावरून तुम्हांस ब्राह्मण भोजन करावें अशी इच्छा होऊन विनंति केल्यावरून समस्त ब्राह्मणांनी विचार केला कीं तुमचे ठायीं क्षत्रियत्व नव्हे म्हणून आरोप आला, यास्तव कर्मे बंद केलीं. त्याची व्यवस्था सर्व समजून घेतली. कर्म लोपास्तवकर्म चालविणें विषयी सर्वाठायीं राजाज्ञा असावी म्हणून ब्राह्मणांनी विचार करून हुजूर समजाविलें. त्यावरून ब्राह्मणांची नांवनीसीवार संमतयुक्त पत्र जहालें तें स्वामीस निवेदन केलें. तें पत्र पाहुन येथेंही शिष्ट आहेत त्यांस मिळवून ग्रंथाधारें शिष्टमुखें क्षत्रिय मार्गाचा निश्चय सर्वमुखें ऐकून घेऊन पत्रें देण्याविषयीं आहे, तरी तुम्ही मांडवगडकरी उभयतां क्षत्रियान्वय यांजकडे कर्म क्षत्रियांचें चालत आहे त्याप्रमाणें यथाशास्त्र चालत आहे त्याप्रमाणें चालवीत जाणें आणि तुम्ही यांसी अन्नव्यवहार चालत आल्याप्रमाणें चालवीत जाणें जाणिजे. चंद्र २१ माहे सफर सुमसाम मयाव आलफ बहुत काय लिहिणें. मोर्तब. ''

प्रभुरत्नमाला परिशिष्टांक ५.

---

# ग्रामण्य सातवें.

## सदाशिव चिमणाजी ऊर्फ भाऊसाहेब यांचें ग्रामण्य.

## (शके १६८१ इ. स. १७५९).

ग्रामण्यांचा इतिहासाच्या बाबतींत वाचकांनी एक गोष्ट नीट लक्षांत ठेवली पाहिजे कीं उपलब्ध कागदपत्रांवरुन जी जीं सालें प्रत्येक ग्रामण्याला दिलेलीं आहेत, त्याच विवक्षित सालीं तें ग्रामण्य झालें असें कांहीं निश्चित म्हणतां येणार नाहीं ; म्हणजे कित्येकांत ग्रामण्याच्या सुरवातीचें साल दिलेलें आढळतें, तर कित्येकांत त्यांच्या निराकरणाचें साल नमूद केलेलें आढळतें. त्याचप्रमाणें एकाच्या निराकरणाचा काळ आणि दुसऱ्याच्या पुनरुज्जीवनाचा काळ यांच्या दरम्यान हें ग्रामण्याचें बंड अगदीं थंड पडलें असेल, असेंहि मानण्यास जागा नाहीं. कायस्थ प्रभू ज्ञातिविषयीं मत्सरांनीं पछाडलेल्या ब्राह्मणांची घुसफुस ही कधिं गुप्त तरी कधिं उघड रीतीनें सतत चालूंच असे. एखाद्या जबरदस्ताचें आज्ञापत्र निघालें कीं या मत्सरी दिवाभितांनीं आपल्या ढोलींत तोंड खुपसून लपावें ; परंतु एखादा प्रभुद्वेष्टा भाऊसाहेब म्होरक्या पुढें आला कीं या दिवाभितांनीं भरभर त्याच्या निशाणाखालीं जमा वहावें. कल्याणकर लिखिते यांज कडून आलेल्या ग्रामण्याच्या हकिकतीच्या कागदपत्रंतील खालीं दिलेलीं दोन अस्सल पत्रें पाहिलीं म्हणजे या विचारसरणीस पुष्कळ पाठबळ मिळतें. त्यांतल्या त्यांत विशेष आश्चर्याची गोष्ट हीच कीं ६ व्या ग्रमण्याच्या वेळीं जो नानासाहेब पेशवा प्रभूंच्या ग्रामण्याचा बंदोबस्त करण्याकरितां शाहूमहाराजांच्या आज्ञापत्राची याचना करतो, तोच नानासाहेब (खालील उतारा नं० ६ पहा) शाहूच्या निघनानंतर स्वतःच ग्रामण्याच्या आगींत तेल ओतण्यास पुढाकार घेतो. यावरुन पुण्याचे राजे या ग्रामण्य बंडाचे खास आश्रयदाते होते, हें सिद्धच होत आहे ; शिवाय राजाश्रयाशिवाय नुसत्या कोरड्या ब्राह्मण्याच्या जोरावर कोणालाहि इतका बंडावा करतां येणें केव्हांहि शक्यच दिसत नाहीं.

(१) '' राजश्री दाजी त्रिंबक गोसावी यांसीं. सुरुसन इसने तिसेन मया व अलफ सरकारांतुन परभु ज्ञातीच्या ठराव करून पत्रें सादर केली असतां तुम्ही भोरास चंपा शष्टीचे उत्साहांत ब्राह्मण भोजन व होमपत्राखेरीज जास्ती कर्मे केली सबब तुम्हांपासून गुन्हेगारीचे ऐवजी ब्रम्हदंड सु॥ सरकारांत घ्यावयाचा करार केला तो ॥ देणे तो राघो विश्वनाथ गोडबोले याजकडे गाडदी दि॥ सैद अबदल्ला वगैरे यास आकार पैकीं रु. २५ पंचवीस हजार देवीले असते तरी पावते करून पावलीयाचे कबज घेणे. जाणिजे छ. २१ मोहरम. बार. ''

(२) राजश्री मैराळ त्रिंबक गोसावी यांसी सु॥ इसने तिसैन मया व अलफ सरकारांतून परभुजातीचा ठराव करून पत्रें सादर केली असतां तुम्ही भोरास चंपा शष्टीचे उत्साहांत ब्राह्मण भोजन व चरुहोमपत्राखेरीज जाजती कर्मे केलीं सबब तुम्हापासून गुन्हेगारीचा ऐवज ब्रह्मदंड सु॥ सरकारांत करार केला वे वा॥ देणें तो राघो विश्वनाथ गोडबोले याजकडे गाडदी दिमत सैद अबदल्ला वगैरे यास आकार रु. २,००० (दोन हजार) देविले असते तरी पावते करून पावली याचे कबजा घेणें. जाणीजे छ. २१ मोहरम. बार. ''.

इ. स. १७५१ सालच्या एका पत्रावरुनही हीच हकिकत खरी ठरते. तें पत्र असें :—

(३) १५ मे १७५१.

पौ. श्रावण शु. १० सोमवार शके १६७३ प्रजापति नाम.

तीर्थरूप दादा वडिलांचे शेवेसी—

अपत्यें बाळकृष्ण दिक्षित पाटणकर यांचे शिरसाष्टांग नमस्कार विनंती उपरि येथील क्षेम ; ज्येष्ठ वदि २ देशाचा जाणोन वडिलांच्या आशिर्वादें मस्त सुखरूप असो विशेष. . . . . . . . . .कृष्णराव धनुर्धारी याचे पुतणीस २५ हा ऐवज आणिक पाहिजे. व परभूकडे ब्रह्मण होते त्याणीं प्रायश्चित्तें केलीं त्याचे रुपये जमा होते ते सर्वस दिल्हे . . . . . . ."

म. इ. साधनें, खंड ३ रा, पत्रक ३८४ पृ. ३५८।५९

इ. स. १७५२ च्या एका पत्रांत उल्लेख सांपडला तो :—

(४) ". . . . . . . . . परभूंनीं प्रयश्चित्तें घेतलीं त्याचे रुपये राजश्री बाबा आले म्हणजे देऊन कबजे पाठवितों . . . . . . . ."

म. वि. साधनें, खंड ३, लेखांक ४१७, पृ. ३८३

रा. वि. का. राजवाडे यांच्या यादींत म्हटलें आहे तें असें :—'

(५) ग्रामण्य सदोबा भाऊ साहेबीं उल्लेख केला. तें नानासाहेब पेशव यांनी मना केलें. भाउसाहेब पानपतांत गत झालें.

म. इ. साधनें खंड ६, ले. ४१४.

प्रस्तुत ग्रामण्यांत पुढारपणाचा मान सदाशिवराव भाऊंनीं आपल्याकडे घेतला होता. या ग्रामण्याची हकिकत उपलब्ध नाहीं. परंतु इतकें मात्र खास कीं या ग्रामण्याच्या योगानें प्रभुज्ञातीचा छळ बराच झालेला होता. नाहीं तर सर्व कायस्थ प्रभूसरदारमंडळाला याच वेळीं एकदम पुण्याच्या चित्पावन् बजबजपुरीला रामराम ठोकून बडोदें, ग्वालेर, नागपूर, इंदूर, धार, देवास वगैरे संस्थानांत प्रयाण करण्याचें आणखीं एखादें कारण असेलसें वाटत नाहीं. कित्येक प्रभुमंडळी पुण्यांत राहिली खरी, परंतु त्यांनीं उदासीन वृत्ति पत्करून राजकारणांतून आपलें अंग काढून घेतलें. यावेळीं पुण्यांत चित्पावन नोकरशाहीच्या वैभवाचा अगदीं कळस झाला होता आणि या कळसावर आणखी मखमलाशी करायला करवीरकरांची औट घटकेची पेशवाई भंगणारे सदाशिवराव भाऊसाहेब हे आपल्या एका हातांत क्षात्रवृत्तीच्या घमेंडीची तरवार आणि दुसऱ्या हातांत भाडोत्री ब्राह्मण्याच्या अभिमानाची ग्रामण्याची चूड घेऊन पुढें सरसावलेले. सदाशिवराव भाऊंच्या उद्दाम स्वभावामुळें प्रभु मंडळी सहसा त्याच्या कोणत्याही भानगडींत पडत नसत. प्रभु समाजाबद्दल ज्वलज्जहाल द्वेषामुळें आणि ग्रामण्यानें त्यांचीं मनें बेसुमार दुखाविल्यामुळें प्रभु सरदारांपैकीं एकही सरदार भाऊबरोबर पानपतास गेला नाहीं सखाराम हरीस बरोबर द्या म्हणजे पानपताची मोहीम फत्ते करून येतों असें भाऊंचें नानासाहेबाजवळ आग्रहाचें मागणें होतें. परंतु दादासाहेबांनी तें साफ नाकारलें व स्वतः सखाराम हरीचीहि त्यास

संमति नव्हती. तेंव्हां भाऊची कांहींतरी समजूत पटावी म्हणून नानासाहेबानें विश्वासराव यास बरोबर दिलें. पानपतच्या स्वारीवर निघतांना सदाशिवराव भाऊंनीं सखाराम हरीदास दम भरून सांगितलें कीं, '' ठीक आहे, हिंदुस्थानांतून परत आल्यावर पाहून घेईन. साऱ्या कायस्थांची डोचकीं मेखसूंखालीं फोडून टाकीन. याद राखवून ठेवा. '' यावर सखाराम हरीनें एवढेंच उत्तर दिलें '' हिंदुस्थानांतून श्रीमंतांनीं आधीं सुखरूप परत यावें ; मग आमचीं डोचकीं आणि आपलें मेखसूं आहेच. '' यावरून असे वाटतें कीं भाऊसाहेब पानपतास जाऊन काय धार मागणार होतें याची या अनुभवी मुत्सद्यानें चांगलीच अटकळ केली होती. ग्रामण्याचे म्होरके भाऊसाहेब हिंदुस्थानच्या दौऱ्यावर गेल्यामुळें ग्रामण्याच्या चळवळ्यांच्या नाड्या आंखडल्या आणि तें जवळजवळ थंडावलें.

या ग्रामण्याच्या संबंधाने विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही कीं प्रत्यक्ष नानासाहेब पेशव्याच्या या ग्रामण्यास पाठिंबा मिळतो. यमाजी शिवदेवाच्या ग्रामण्याच्या वेळीं याच नानासाहेबानें शाहूमहाराजांना प्रभूंच्या तर्फे पत्र लिहिलें होतें व तडजोडीनें काम होईना तेव्हा त्यानें ग्रामण्याचे पुढारी जगजीवनराव प्रतिनिधि व त्याच्या वेदशास्त्रसंपन्न मुतालीक यमाजी शिवदेव या दोघांनांही कैदेंत टाकून ग्रामण्य मोडलें. तोच नानासाहेब पेशवा यावेळीं ग्रामण्यास रूकार देतो, ही आश्चर्याची गोष्ट नव्हे काय ? परंतु आश्चर्य कसलें ? छत्रपतींचें राज्य घशांत उतरण्यासाठीं जे नानातऱ्हेचे डावपेंच या पाशव्यानें लढविलें त्यापैकींच हा एक डाव होता. सुरवातीलाच ग्रामण्याचा पुरस्कार करून प्रभूंच्या विरूद्ध तो जातां, तर त्यास पेळवाईंचीं वस्त्रें मिळाली नसती. रघोजी भोसले, बाबुजी नाईक बारामतीकर इत्यादिकांवर मात करून पेशवाईबरोबर नकळत मराठेशही घशांत उतरविण्यास नानासाहेबाला चिटणीसांच्याच खुषमजाची जरूर होती आणि चिटणीस पडले कायस्थ प्रभु. तेव्हां नानासाहेबानें ग्रामण्याच्या भानगडीतून त्यावेळीं अंग कां काढलें होतें याचा उलगडा सहज होतो.

या आमच्या विधानाच्या पुष्टीकरितां वर जीं एक दोन पत्रें दिलीं आहेत त्यावरून कदाचित कोणाचें समाधान व्हावयाचें नाहीं. म्हणून खुद्द नानासाहेब पेशव्यांचें एक पत्र उपलब्ध झालें आहें तें येथें देतो :—

(६) [५००] श्री. १४ जुलै १७५९.

पौ. ॥ आषाढ वद्य १४ शनवार शके १६८१ प्रमाधीनाम संवत्सरें.

वेदशास्त्रसंपन्न राजश्री वासुदेव दीक्षित स्वामीचे शेवेसी :—

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित असलें पाहिजे. विशेष, पूर्वी परभु याणीं आपणांस गोत्रें लावावी याविशीं पत्रें काशीस पाठविली होती. त्यांस तीं पत्रें कैलासवासी दीक्षित बाबा यांचे हातास आली होती म्हणून ऐकिलें होतें. त्यावरून आपणांस तेथून तीं पत्रें आणावावी म्हणून सांगितलें होतें आपण श्रीस पत्रें लेहून तीं पत्रें आणवतों म्हणोन सांगितलें. त्यास श्रीचे पत्राचे उत्तरही आले असेल. पत्रें

आली असलीं तर तींच पत्रें पाठवावीं, अथवा पत्रें दीक्षितबाबाजवळ आलीं नसलीं तरी उत्तर आलें असेल तें लिहावें. त्यासारखें येथें परभां जवळ पत्राचा शोध केला जाईल. पत्रें परभांजवळ न राहावी या करितां शोध करून जाईल. पत्रें परभांजवळ न राहावी या करितां शोध करून आणावीं लागतात. इ. ॥ आषाढ वद्य ५ बहुत काय लिहिणे. हे विनंती. ''

मराठ्यांच्या इ. साधनें, खंड ३ रा, पृ. ४५८/५९.

सदाशिवराव भाऊ पानपतास गेल्यामुळें हें ग्रामण्य निकालांत आलें असें म्हणतां येत नाहीं :—

(७) [५२४] श्री. १२ ऑगष्ट १७६१.

'' वेदशास्त्र संपन्न राजश्री दीक्षितस्वामीचे शेवेसी :—

चरणरज बापुजी महादेव सां नमस्कार विनंती येथील क्षेत्र . . . . . . . .ग्रामण्य आहे तैसेंच आहे. < कळलें पाहिजें.''

कित्ता. पृ. ४७६-७७.

परंतु पानपतचा एळकोट उडाल्यावर भाऊसाहेब परत येण्याची आशा समूळ नष्ट झाली तेव्हांच हें ग्रामण्य निकालांत निघालें.

---

# ग्रामण्य आठवें.

## नारायणराव पेशवे यांचें ग्रामण्य (शके १६८१ इ. स. १७७३).

रामराजे महाराज व माधवराव बल्लाळ पेशवे यांचे कारकीर्दीत यथास्थित चाललें. ग्रामण्य झालें नाहीं. पुढे नारायणराव बल्लाळ पेशवे झाले. त्यांणीं ग्रामण्य केलें त्यांतील हांशील :—

**मागें झालेल्या कोणत्याही ग्रामण्यापेक्षां हें ग्रामण्य फारच जोराचें होतें. याचे कारण खुद्द राजसत्ताधारी पुरुषानें हें ग्रामण्य उभें केलें होतें. सातारची राजगादी चित्पावन नोकरशाहीच्या वाळवीनें आधींच पोंखरून ठेविली होती आणि आतां तर खुद्द सातारच्या राजांच्या हातीं यत्किंचितहि सत्ता नसून ते राजकीय कैदखान्यांत ठेविले गेले होते. तरीसुद्धां पेशवाईची वस्त्रें सातारच्या महाराजांकडूनच पेशवे घेत असत, म्हणून त्यांच्या शालीनतेबद्दल ' मराठे आणि इंग्रज ' कर्ते त्यांचे कौतुक करतात.**

**नारायणराव पेशवा हा फार उद्दाम व मगरूर होता. यानें आपल्या थोड्याच महिन्यांच्या कारकीर्दींत ज्या कांहीं गोष्टीं केल्या त्यांचें सूक्ष्म निरीक्षण करणारास असें दिसून येईल कीं त्याच्या अंगीं मुत्सद्दीपणाचा पूर्ण अभाव होता. तो स्वभावानें फार उतावळा , हेकेखोर व हलक्या कानाचा होता. परिणामाकडे लक्ष न देतां वाटेल तें करण्यास हा बिलकूल मागेंपुढें पहात नसे. थोरल्या माधवरावाच्या लक्षांत आपल्या बंधूंचे हे गुण लक्षात आले होते व याच्या कपाळीं राज्य नाहीं असें भाकीतहि त्यांनीं केलें होतें.**

नारायणराव बल्लाळ वस्त्रें घेण्याकरितां सातान्यास आले. वस्त्रासमयीं मनोदयानुरूप कांहीं मतलब महाराजांचें करून द्यावे असें ठरावांत असतां, नारायणरावाचा जातीनें शरीर सामर्थ्य व तारुण्यमद प्रकृत ही उद्दाम असा गर्विष्ठ स्वभाव होता ; त्यायोगें वस्त्रांचे समयीं कांहीं एक व्हावयाचें नाहीं म्हणोन उरुबुरू बोलले. यावरून महाराजांची मर्जी जाऊन शिव्या देऊन वस्त्रें दत नाहीं बोलले. तत्कास लावून घेऊं असें यांणीं उत्तर केलें. यावरून महाराजांच्या मुखातून शब्द निघालेजे, माजोन्या निसंतान होऊन मरशील. तुझे वाटोळें होईल. हा श्राप झाला. आणखीहि फार श्रापें करून बोलले. नारायणराव याणीं वस्त्रें तशीच-घेतलीं. शके १६९४ नंदन नाम संवत्सरे सन सल्ला सबैन मार्गशीर्ष मास. वस्त्रें घेऊन दरवाज्याजवळ निघतांच मशालेची झग्यास बत्ती लागून झगा पेटला. आणखी अपशकून. पुढें हत्तीजवळ गेले जरीपटका हत्तीवर होता. जरीपटक्याची काठी मोडून तो खालीं पडला. दोन अपशकून झाले. नंतर पुण्यास आले. फारच अविचारी वागणें उन्मादपणा राज्यमदेंही वागूं लागला. लोकांच्या स्त्रिया चांगल्या त्यांवर बलात्कार हळदकुंकवास नेऊन करावा. अगर बातमी लागल्यास पालखी पाठवून जबरी करावी. सातार संस्थानची निंदा करावी. असा फार अविचारपणा आरंभिला. व प्रभु ज्ञातीवर ग्रामण्याचा प्रारंभ केला. या ज्ञातीचा तिरस्कार करावा. प्रभु म्हणून संज्ञा चालत आली. राज्यपत्रें व पेशवे प्रतिनिधि इनामपत्रें वगैरे प्रभु अशीं चालत आलीं तीं यांणीं मोडून परभू म्हणावें असा प्रारंभ केला. प्रणाम न म्हणतां दंडवत म्हणत जावें. स्नान संध्यादि कर्मे करूं नयेत. दुहेरी धोत्रें नेसावीं. गंध आडवें लावूं नये. घरी ब्राह्मण येऊं नये. अशा अनेक तऱ्हा काढून छलकपणा करण्यास आरंभ केला. यामुळें नारायणराव यांस पर्याय, बहुत तऱ्हेनीं बहुतांकडून बोलविले. परंतु दुराग्रहचछ मोठा धरिला. आपली मंडळीही मोठमोठी प्रसिद्ध दरबारीं वागणार भीडही त्यांचें वडिलांनीं फार बाळगिली. परंतु नारायणराव यांणीं कांहीं मर्यादाच ठेविली नाहीं. तेव्हां दरबार सोडून मंडळी आपले घरीं बसंली. या उपर या राज्यांत आमची राहण्याची शोभा नाहीं. ज्या गोष्टी कधींच घडल्या नाहींत, त्या आमच्या वास्तु कशा घडतील. आम्हास निरोप द्यावा. जिकडे मार्ग फुटेल तिकडे सर्व ज्ञाति जाईल. म्हणत असतां हें घडावयाचें नाहीं म्हणोन अडचणी बहुतच पाडिल्या. रामशास्त्री बावापाशीं शास्त्रार्थ पाहून आपण आज्ञा करावी म्हणल्यावरून शास्त्रावर काय आहे शास्त्र पाहतो कोण. तुम्हांस [वेदोक्त कर्मे करण्याचा] अधिकार आहे, परंतु प्रभुत्व यांजपाशीं आहे. ते सांगतील तसें वर्तणे प्राप्त. असें इकडे म्हणत त्यांसहि (पेशव्यांस) या ज्ञातीचें ग्रामण्य करूं नये. ते कांहीं सामान्य अधिकारी नव्हत. विचार पाहून सांगावें असें बोलले. परंतु स्वामित्वापुढें उपाय नाहीं. ब्राह्मण कोंकणांत वगैरे ठिकाणीं पुण्यातील मजकूर ऐकून मनस्वी दंगे करूं लागले . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

वाड्यांत (प्रभु) मंडळीस बोलावून नेलें. नारायणराव साहेब देवघरांत होते ; रामशास्त्री बावा व आणखी मंडळी तेथें एकीकडे बसून आपली मंडळी गेल्यास आपले जवळ बोलाविलें आणि सांगितलें कीं, तुम्हास दोन चार वेळ सरकारांतून ताकीद झाली असतां तुम्ही आचरण करितां राहत नाहीं. हल्लीं सरकारची आज्ञा आहे. हे न केल्यास सरकारमर्जी राहणार नाहीं व मान्यता घातल्याखेरीज तुमचे वाड्यांतून बाहेर जाणें होणार नाहीं. त्याजवर आपले मंडळीनें निर्भीडपणें उत्तरे केलें कीं, यापाठीमागें असें कोणीच म्हटलें नाहीं, व कोणी केलें नाहीं. आपण सांगतां यांस कांहीं शास्त्रप्रमाण आहे किंवा नाहीं ; जबरीनें सांगणें तेव्हां जुलूमच म्हणावा. शास्त्रीबावास

विनंति केली कीं, आपण साक्षांत धर्ममूर्ति सर्वांस मार्गांनीं चालवणार. आम्हांविशीं सर्व शास्त्र आपलें कोठें गेलें. अनन्वित झालें असतां आपण पहावें, कांहीं बोलूं नये ; हा धर्म कोठील. त्यावर शास्त्री बावानीं उत्तर केलें जे, '' बाबाहो तुम्ही म्हणतां तें प्रमाण, परंतु प्रभू कोपला आहे. त्याची मर्जी. ते आज्ञा करतील तीच मान्य म्हणेन वर्तावें हेंच बरें. सांप्रतचा समयच असा आहे. पुढें कृपाही तेच करतील.

**प्रत्यक्ष न्यायमुर्ती रामशास्त्र्यांनींच याप्रमाणें उत्तर देतांच प्रभुमंडळींचा अगदीं नाईलाज झाला. यादीवर संमतीच्या सह्या घातल्याशिवाय वाड्यांतून जाऊंच देतना. तेव्हां प्रभुमंडळीनीं नाइलाजास्तव नारायणरावाच्या नऊ कलमी कतब्यावर *मान्यतेच्या सह्या दिल्या. तो कतबा असा :—**

**१——वैदिकमंत्रें करून कांहींच कर्म करणार नाहीं.**

**२——वैदिकमंत्रें येत असतील त्यांचा उच्चार करणार नाहीं.**

**३——भाताचे पिंड करणार नाहीं.**

**४——देवपूजादिक विहित कर्मै पुराणोक्त मंत्र करूनच करूं व ब्राह्मणभोजन आपले घरीं करणार नाहीं.**

**५——शालिग्रामपूजा करणार नाहीं.**

**६——ज्या देवास शूद्र जातात त्या देवास जाऊं.**

**७——ब्राह्मणांना दंडवत मोठ्यानें ह्मणत जाऊं व आपले जातीतही दंडवत ह्मणत जाऊं.**

**८——वैदिकब्राह्मण व आचारी व पाणके व शागीर्द ब्राह्मण बायका चाकरीला ठेवणार नाहीं व आपले घरीहीं ठेवणार नाहीं.**

**९——आमच्या जातीमध्यें संतोषें पाट लावतील त्यांना आम्ही अडथळा करणार नाहीं.**

**याप्रमाणें जुलमानें सह्या घेतल्यावर वाड्यांत बोलावून नेलेल्या प्रमुख प्रभुमंडळींची सुटका झाली. हें वर्तमान प्रभुमंडळास कळतांच त्यांना अत्यंत उद्वेग होऊन संताप आला असल्यास नवल तें काय?**

**याच वेळीं नारायणरावानें दादासाहेब व आनंदीबाई यांचाही मनस्वी छळ चालविला होता. सुर्यदर्शनाशिवाय अन्नग्रहण करावयाचें नाहीं असा दादासाहेबांचा नेम होता आणि प्रतिबंध तर इतका कीं त्यांना कित्येक दिवस सुर्याचें दर्शन होऊं नये. त्यामुळें तीन तीन दिवस उपोषणें**

---

* सत्तेपुढें शहाणपण कसें चालत नाहीं आणि नाईलाजास्तव वाटेल त्या प्रकारच्या कतब्यावर मान्यतेची सही कशी द्यावी लागते याचा अनुभव आमचे परम मित्र संशोधक रा. रा. पां. नं. पटवर्धन यांना अझून यावयाचा आहे. परंतु तो अनुभव कसा असतो या बद्दलचा प्रत्यज्ञ परिचय त्यांना रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर हे खात्रीने नीट पटवून देतील आणि असल्या बळजबरीने लिहून घेतलेल्या पत्राची किंमत व्यावहारिक किंवा ऐतिहासिक दृष्ट्या किती कवडीमोल असते, याचा ते स्पष्ट खुलासा करतील. कारण स्वदेशी चळवळीच्या धामधुमींत त्यांना ठाण्याच्या तुरुंगात असल्याच एका माफीच्या कतब्यावर मान्यतेची सही करून मुक्त व्हावें लागले. ' तुम्ही खुशाल सही करा, त्यानें तुमच्या शीलाला यत्किंचित्हि अपाय होणार नाहीं, अशी आम्ही हमी घेतो ' अशा अर्थाची जाहीर नोटीस प्रसिद्ध करणारी केसरी हिंदुपंचासारखीं पत्रें जशीं रा. केळकरांच्या वेळीं होतीं, तशीं वरील कायस्थ प्रभूंच्या अंमदानींत असतीं, तर त्यांनींहि कदाचित या नोटीसवजा आगाऊ प्रायश्चित्ताचा किंवा जाहीर आश्वासनाचा मार्ग खातरीने स्वीकारला असता.

**पडत असत. आनंदीबाईस तर अत्यंत नीचपणानें वागविलें होतें. तिला धड नेसावयासही न देतां नग्नच ठेवण्यांत येई ; कारण कदाचित् *लुगड्यामध्यें कागदपत्र लपवून ठेवील ! इतकेंच नव्हें तर–लिहिण्यास संकोच वाटतो–गुप्त भागांत कागदपत्र ठेवले असतील कीं काय या शंकेनें वारंवार तपास करण्यांत येत असे, असें म्हणतात. हा छळ अमानुष नव्हे असें म्हणणारा मनुष्य सांपडणें कठीण !**

. . . दादासाहेब यांस फार प्रतिबंध, व साताऱ्यासही अडचण व या ज्ञातिप्रकरणी निकर्ष असें चाललें, तों भाद्रपद मास आला. तेव्हां दादासाहेबांकडील राजकारण उभें राहिलें, यांत व्यंकटराव काशी प्रभू यांनीं सखाराम हरी प्रभू यांचे संमतें आनंदीबाई दादासाहेबांची बायको यांजकडे संधान करून सुमेरसिंग, खरगसिंग, महंमद ईसंफ जमादार, व गार्द्याचे दिवाण रामचंद्र दाजी प्रभू होते त्यांची चौकी बंदोबस्त वाड्यांत असे. तिथे फितुरी झाली. व्यंकटराव काशींनी दादासाहेबांची हरयुक्तीनें नारायणरावास कैद करून धरावें अशी चिटी सुमेरसिंग वगैरे गार्दी जमादारास घेतली. ती आनंदीबाईस दिली. गार्दी यांची खात्री न होय. धरलेले सुटल्यावर आमचा बचाव होणार नाही, तेव्हां धरावें ते ध चा मा आनंदीबाईनें करून मारावें असें करून देऊन चिटी पाठविली ; ती सुमेरसिंगास दिली. नंतर गर्दी झाली. नारायणराव मारले गेले.

शके १६९५ विजयनाम संवत्सरे सन अर्बा शितैन मया व अल्लफ भाद्रपद शुद्ध १३. फारच गलबा शहरांत व वाड्यांत झाला. तेव्हां सखाराम हरी बक्षी व चिंतो विठ्ठल वगैरे दादासाहेब प्रकरणीं मंडळ वाड्यांत जमा झालें. दादासाहेब यांची द्वाही फिरविली. बाहेरील कारभारी नाना, व हरिपंत, वगैरे यांणीं–काय बातमी, फौजेची तयारी वगैरे करून कशी खबर. दोघे खासे, राज्यास गर्दी, आंत कायम तरी कोणी आहे नाहीं,–याकरितां पाहून येण्यास पाठविले. भवानराव प्रतिनिधि व बजाबा पुरंदरे, त्रिबंकराव विश्वनाथ पेठे असे गेले ; तों नारायणराव मारले गेले. दादासाहेब कायम कचेरी झाली. नजरा चालल्या पाहून आपल्या जातीची खात्री करून बाहेर येऊन वर्तमान कळविल्यावर फौजा वगैरे सर्व जाग्यावर जाऊन दादासाहेब द्वाही शहरांत फिरली. नंतर दहन शवांचे होणें. तयार झाली. तेव्हां सखाराम हरीनीं विनंती केली कीं आमची ज्ञाती प्रकरणीं याद नारायणराव यांनी लिहून घेतली ती आणवून फाडल्याविना शव नेऊं नये. तेव्हां नानाकडे चोपदार पाठवून यादी आणविरी. नानांनी उत्तर केलें कीं, यादी रूमालात आहे, स्नान केल्यावर काढून देतों. तो निरोप परत आला. त्यावरून पुनः चोपदार दादासाहेबांनी पाठविला कीं, आतांच याद रूमाल शिवून काढून देणें. तेव्हां नानांनी रुमाल आणून काढून दिली. ती याद सखाराम हरीस दिली. यांनीं विनंती केली कीं, आपले हातें फाडून द्यावी. तेव्हां दादासाहेबांनीं श्रीकार फाडून दिली, ती व्यंकटराव काशीचे हातीं सखारम हरीनें दिली. व्यंकटराव काशीनेंती याद फाडून पूरजे करून शवावर टाकीले. नंतर शव उचलून पुढील विधि झाला. असा ग्रामण्याचा परिणाम झाला.

---

* " मग दादासाहेबांचा बंदोबस्त करून ठेविले देवपूजा करूं देऊं नये ; कीं या योगानें माझा भाऊ मारला असें म्हणोन खोलींत ठेविले. दादासाहेब अर्ध्यप्रदान सूर्यदर्शन घेतल्याविना अन्न भखूं नये. हा नेम होता. खोलींत राहिल्यामुळें पांच उपोषणें जाहलीं व दादासाहेबांचे स्त्रियेस लुगड्यांत फंदाचे कागद लपविले या निमित्यानें लुगडे फेडून छळणा करावी."

रा. ब. साने संशोधित नागपूरकर
भोसल्यांची बखर.

येथवर या ग्रामण्याची हकिकत दिली. आतां इतर प्रसिद्ध पुस्तकांतून व अप्रकाशित बखरींतून माहिती मिळाली ती देतों :—

## (१) रा. वि. का. राजवाडे :—

ग्रामण्य नारायणराव बल्लाळ यांनी केलें. आठवे महिन्यांत मारले गेले. दादासाहेबी याद घेतली ती देविली. सखाराम हरीस.

म. इ. साधनें खंड ६ ते ४४४.

## (२) ग्रामण्याची अप्रकाशित बखर.

नारायण बल्लाळ यांनी चिटणीस पोतनीस यांस बसवून तुमचे मंडळीत पाट लागत होते आतां तुम्ही त्या चालीप्रमाणें चालावे म्हणून नऊ कलमे लेहून घेतली. न द्यावी तरी उठण्याची रजा नाहीं. जबरदस्तीच केली. निरुपाय जाणून लेहून दिल्हे. पुढें राघोबादादानीं सुमेरसिंगास लेहून दिल्हे कीं नारायणरायास धरून दिल्हे असता तुजला तीन लाख बक्षिस. तलबेशिवाय देऊ. त्यावरून कबूल करून चिटी लेहून घेतली. नंतर आपसांत जाऊन विचार करिता न सापडले तरी आपली बायकामुले ठाणकास देतील याजकरिता सापडेल तर धरून देऊ नाहीं तरी मारूं. कबूल असेल तरी लेहून द्या. नाहीं तरी आम्ही कबूल करीत नाहीं. त्यासमयीं आनंदीबाईनी सदाशिवपंत* सोनी कारभारी याजपासोन धरावे लिहिले होते त्या ध चा मा करविला. ती चिठी घेऊन नारायणराव यास सुमेरसिंगानी मारिले. ते प्रेत सन्निध असता सखाराम हरीस दादासाहेबांचा करार होता कीं नारायणराव हस्तगत जाला म्हणजे तुमची चिटी त्यासमयीं देऊं. त्याप्रमाणे सखाराम हरीनी विनंती केली. चिटी देवावी. दादासाहेबी तत्काल परवानगी देऊन चिटी परत देविली.

## (३) का. प्र. इ. साधनें यांतील " कायस्थ प्रभूंची बखर ".

पुढें माधवरावसाहेब समाप्त होऊन नारायणसाहेब अधिकारी जाहले. पूर्व वय, त्यांत यमाजीपंत यांचे ग्रामण्यापैकी द्वेषबुद्ध (कांही लोक) होते, त्यांणीं पूर्वजांचा मनोदय सिद्धीस न गेल्याचा द्वेष ध्यानांत आणोन नारायणयावसाहेब यासीं अनन्वित फकिका कलेल्या समजवून देऊन ग्रामण्य केलें. आणि प्रभुमंडळीपैकीं (कांही लोकांस) वाड्यांत बोलावून नेऊन जबरदस्तीनें (त्यांची) धोत्रें फाडून जानवी तोडातोड करून लिहून घेतले. नंतर नारायणरावसाहेब थोडकेच दिवशीं परधामास गेले. उपरांतिक दादासाहेब यांजकडे अधिकार प्राप्त जाहला. ते स्वतः सूज्ञ वेदशास्त्रनिपुण त्याणीं सर्व गोष्ट समजून घेऊन ग्रामण्यांतील मनुष्यांची बहुत निर्भत्सना करून सर्व प्रभुमंडळीस आपआपले कामावर येण्याविषयीं सांगोन पाठविल्यावरून, अगोदर श्रुत होतें व प्रभुंनीं ही हकिकत समजवून दिल्ही. नंतर ते बोलिले जे, अन्नाहुति केली, त्यासारिखे फळ प्राप्त जाहले. आतां मागील जाहले गोष्टीचा विधिनिषेध न मानिता स्वस्थ चित्तें आपापली काजकामें करित जाणें. असें अश्वासन देवून नारायणराव यांणीं जबरदस्तीनें पत्र घेतलें होतें तें तेच समयीं आशौचांत आणवून सर्वादेखत फाडून टाकलें.

---

* कांहीं कागदपत्रांतून " सखारामपंत सोहनी " असा स्पष्ट उल्लेख सांपडतो.

# ग्रामण्य नववें.

## हरिपंत फडके व आपा बळवंत यांचें ग्रामण्य

## (शके १७११ इ. स. १७८९).

कारकिर्द शाहूमहाराज धाकटे पेशवे सवाई माधवराव यांचे कारकीर्दीत सन तिस्स मया व अल्लफ शके १७११ सौम्यवान संवत्सरे. ग्रामण्यें झाली तो मजकूर.

**चांद्रसेनीय कायस्थ प्रभूंच्या इतिहासाचीं साधनें यांत प्रसिद्ध झालेल्या कायस्थ प्रभूंच्या बखरींत या ग्रामण्याची हकिकत अशी दिली आहे :—**

नारायणरावसाहेबांची पत्नीगंगाबाई यांचें उदरीं सवाईमाधवरावसाहेब जन्मले. त्यासंनिध बाळाजी जनार्दन फडणवीस द्वितीय सृष्टी उत्पन्न करणार महा बुद्धिमान कारभारांत वागत असतां, पूर्वील नारायणरावसाहेब यांणीं जें ग्रामण्य केलें, त्याचा मजकूर वास्तविक किंवा गैर वास्तविक यांतील आशय कसा, हा समजून घेण्यास्तव श्रीवाराणशीक्षेत्रस्थ ब्राह्मणांस पत्र पाठविलें. त्यांतील संशयनिवारणार्थ उत्तरप्रत्युत्तयासह बालबोध अक्षराचें पत्र लिहून आलें, त्यांवरून त्यांची खातरजमा जाहली तेंच पत्र बार केलें. विपतशील.

'' *स्वस्तिश्रीमद्दंडकारण्यांतर्गत भीमरथीनाभिहृदयसंगत्योपलक्षित पुण्यारण्यग्रामस्थ दाक्षिणात्य राजर्षि धर्माधिकारी प्रांत पुणें व समस्त ब्राह्मणांप्रति.

† आर्यावर्तदेश आनंदवनत्रिकंटकविराजिताविमुक्तक्षेत्रस्थभटधर्माधिकारिशेषप्रभृती नामनेका नतयो विलसंतु ॥ माघशुक्लसप्तम्यावधि अत्रत्यक्षेममस्ति भावत्कमं तदनुदिनमध्यधिकमाशास्महे ॥ विशेषस्तुभाषया.—

राजश्री बाळाजी जनार्दन फडणवीस यांणीं पुण्याहून मार्गशीर्ष शुद्ध दशमीचीं पत्रें पाठविलींती पावलीं. तिथें लिहिलें कीं, प्रभूंचे ग्रामण्य येथें पडलें आहे. त्यास प्रभूंचेंआचरणाचा ग्रंथाधार कसा आहे ? त्याजवरून आह्मीं सर्वांनीं, गागाभट्टकृत, ' गागाभट्टी ' ' कायस्थप्रदीप, ' गोविंदभट्टकृत ' गोविंदभट्टी, ' स्कंदपुराणांतर्गत ' रेणुकामाहात्म्य ', कमळाकरभट्टकृत ' शूद्रकमलाकर, ' ' जातिविवेक ' इत्यादि निबंधग्रंथ पाहून तुह्मांस लिहिलें आहे. हें पाहिल्यावरून आपले ध्यानांत येईल.

---

* कल्याणकारक, सुशोभित अशा दंडकारण्यनामक देशांतील भीमानदीच्या ' नाभि आणि हृदय यांच्या संगत्यानें उपलक्षित ' म्ह. (भीमानदीच्या काठीं असून तिचाच पोट भाग अशा ?) पुणें नामक ग्रामांत राहणाऱ्या दक्षिणदेशीय, राजर्षि, धर्माधिकारी व समस्त ब्राह्मण प्रांत पुणें यांप्रति.

† आर्यावर्तनामक देशामध्यें, आनंदवन आणि त्रिकंटक या नांवाच्या दोन अतिपवित्र स्थलांनी सुशोभित अशा अविमुक्त क्षेत्रांत (काशींत) राहणाऱ्या भट, धर्माधिकारी आणि शेष इत्यादि उपनामानीं युक्त ब्राह्मणांचें अनेक नमस्कार विलसित होवोत. माघ शुद्ध सप्तमीपर्यंत येथे राहणारांचे क्षेम असे. आपलें क्षेम उत्तरोत्तर प्रतिदिवशीं वृद्धिंगत असावें अशी आम्हीं आशा करितों. विशेष :—

*कायस्थास्त्रिविधाः प्रोक्ताश्चित्रगुप्तस्थथापर ॥ दालभ्यगोत्रःक्षत्रजस्तु तृतीय संकरात्मजः ॥ तत्र चित्रगुप्ताद्युत्पत्तिः ॥ पद्मपुराणे ॥ सृष्ट्यादौ सदसत्कर्मज्ञप्तये प्राणिनां विधिः ॥ क्षणं ध्याने स्थितस्तस्य ब्रह्मकायाद्विनिर्गतः ॥१॥ दिव्यरूपः पुमान् हस्ते मषीपात्रं च लेखनीम् ॥ चित्रगुप्त इतिख्यातो धर्मराजसमीपतः ॥२॥ प्राणिनां सदसत्कर्मलेख्याय स नियोजितः ॥ ब्राह्मणोऽतींद्रियज्ञानी देवाख्यो यज्ञभुक् सदा ॥३॥ भोजनादौ सदा तस्मा आहुतिर्दीयते द्विजेः ॥ ब्रह्मकायोद्भवो यस्मातकायस्थो ज्ञातिच्यते ॥४॥ नानांगोत्राश्च तद्वश्याः कायस्था भुवि संति वै ॥ यावरून कऱ्हाडप्रांतीं व खानदेश संगमनेरप्रांतीं कायस्थ ब्राह्मण ह्मणून आहेत हे ब्रह्मकायस्थ होत.

अथ चांद्रसेनीयक्षत्रियकायस्थोत्पत्तिः ॥ स्कंदपुराणे रेणुकामाहात्म्ये ॥ स्कंद उवाच ॥ एवं हत्त्वाऽर्जुनं रामः संधाय निशितान् शरान् ॥ अन्वधावत्स तान् हंतु सर्वानेवाऽसुरान् नृपान् ॥१॥ केचिग्दगनमाश्रित्य केचित्पातालमाविशन् ॥ जटां कृत्वात्मनः केचित्ब्रह्मवेषधारयन् ॥२॥ बभूवुस्तापसाः केचिद्वनमाश्रित्य तद्भयात् ॥ तत्रैवावस्थिताः ॥ केचिद्वभूवुर्नटनर्तकाः ॥३॥ केचिद्वैतालिकाः शूरा राजानस्तद्भयार्दिताः ॥५॥ सगर्भा चंद्रसेनस्य भार्या दाल्भ्याश्रमं गता ॥४॥ ततो रामःसमायातो दाल्भ्याश्रममनुत्तमम् ॥ पूजितो मुनिना रामो ह्यर्ध्यपाद्यासनादिभिः ॥५॥ ददौसध्यान्हसमये तस्मै भोजनमादरात् ॥ ददौ दाल्भ्यो मुनिश्रेष्टो भार्गवाय महात्मने ॥६॥ भोजनावसरे तत्र गृहीत्वाऽपोशनं करे ॥ रामस्तु याचयामास ह्दिस्थं स्वमनोरथम् ॥७॥ तस्मै प्रादादृषिः कामं भार्गबाय माहात्मने ॥ याचयामास रामाद्वै कामं दाल्भ्यो महामुनिः ॥८॥ ततो द्वौ परमप्रीतौ भोजनं चक्रतुर्मदा ॥ भोजनांते महाभागावासने उपविश्य च ॥९॥ तांबूलानंतरं दाल्भ्यः पप्रच्छ भार्गव प्रति ॥ यत्त्वया प्रार्थितं देव तत्त्वं शंसितुमर्हसि ॥१०॥ श्री राम उवाच तवाश्रमे महाभाग सगर्भा स्त्री समागता ॥ चंद्रसेनस्य राजर्षेः क्षत्रियस्य महात्मनः ॥११॥ तन्मे त्वं प्रार्थितं देहि स्त्री सगर्भां महामुने ॥ ततो दाल्भ्यः प्रत्यवाच ददामि तव वांछितम् ॥१२॥ यन्मया प्रार्थिमं देव तन्मे दातुं त्वमर्हसि ॥ ततः स्त्रियं समाहुय चंद्रसेनस्य वै मुनिः ॥१३॥ भीता सा चपलापांगी कंपनामा समागता ॥ रामाय प्रददौ भीतां रामः प्रीतमना अभूत् ॥१४॥ श्रीराम उवाच ॥ यत्त्वया प्रार्थितं विप्र भोजनावसरे पुरा ॥ तन्मे शंस महाभाग ददामि तव वांछितम् ॥१५॥ दाल्भ्य उवाच ॥ प्रार्थितं छन्मया पूर्व राम देव जगग्दुरो ॥ स्त्रियो गर्भममुं बालं तन्मे दातुं त्वमर्हसि ॥१६॥ ततो रामोऽब्रवीद्दाल्भ्यं यदर्थमहभागतः ॥ क्षत्रियातकरश्चाहं तं त्वं याचितवानसि ॥१७॥

---

* कायस्थ तीन प्रकारचे सांगितले आहेत. एक—**चित्रगुप्त** कायस्थ, दुसरा–**क्षत्रज** म्ह० चंद्रसेन राजा जो क्षत्रिय त्यापासून झालेला, ज्यास दाल्भ्य ऋषीनें उपदेश केला म्हणून दाल्भ्यगोत्री म्हणतात. तो चांद्रसेनीय कायस्थ आणि तिसरा–संकरजातीपासून झालेला **संकरज कायस्थ**. त्यांपैकीं चित्रगुप्तादिकांची उत्पत्ति पद्मपुराणांत सांगितली आहे ती अशी कीं,–सृष्टीचे आरंभीं ब्रम्हदेव, प्राणिमात्राचें पुण्यकर्म व पापकर्म कसें कळेल याचें क्षणभर चिंतन करीत राहिला तेव्हा त्याच्या देहापासून दिव्यरूपधारी, हातांत दौत व लेखणी धारण करणारा, ज्याला **चित्रगुप्त** असें म्हणतात तो पुरुष उत्पन्न झाला.तेव्हां त्याला ब्रह्मदेवानें, तूं यमराजाजवळ राहून प्राणिमात्राचें पुण्यकर्म व पापकर्म ल्याहावें असें सांगितलें. तो अतींद्रंयज्ञानी ब्राम्हण आणि यज्ञांत नित्य हविर्भाव घेणारा देवरूपीही होय. ज्याला ब्राह्मणादि ' द्विज, ' भोजनाचें आरंभीं नित्य ' **चित्रगुप्ताय स्वाहा** ' अशी अन्नाहुति देतात. तो ब्रह्मकायापासून म्हणजे ब्रह्मदेवाच्या देहापासून उत्पन्न झाला म्हणून त्याला **कायस्थ** असें म्हणतात. या भूमीवर त्यांचे वंशांतील अनेक गोत्रांचें कायस्थ आहेत.

प्रार्थितश्च त्वया विप्र कायस्थं गर्भमुत्तमम् ॥ तस्मात्कायस्थ इत्याख्या भविष्यति शिशोः शुभा ॥१८॥ *जायमानो यदा बालः क्षत्रधर्मा भविष्यति ॥ ततो दाल्भ्यः प्रत्युवाच भार्गवंप्रति हर्षितः ॥१९॥ माकुरूष्वात्र संदेहं दुर्बुद्धिर्न भविष्यति ॥ एवं रामो महाबाहो हित्वा तं गर्भमुत्तमम् ॥२०॥ निर्जगामाश्रमात्तस्मात्क्षत्रियांतकरः प्रभुः ॥ ततः प्रकुपितो रामो ननावषधराथृपान् ॥२१॥ ज्ञात्वा नारदवाक्येन अजघ्नानपि चावधीत् ॥ धारयंतो मुखेंऽगुष्टान् प्रार्थयंतोऽभयं नृपाः ॥२२॥ स्थितास्तरेषां बली रामो दत्तवानभयं तदा ॥ हत्वाऽदौ हैहयान् कोपात्पितुर्वधमनुस्मरन् ॥२३॥ स्कंद उवाच ॥ कायस्थ एष उत्पन्नः क्षत्रिण्यां क्षत्रियात्ततः ॥ रामाज्ञया स दाल्भ्येन क्षत्रधर्माब्दहिषकृतः ॥२४॥ दत्तः कायस्थधर्मोऽस्मै चित्रगुप्तस्य यः स्मृतः ॥ प्राप्तकायस्थनामत्वाल्लेख्यावृत्तिश्च भूभृताम् ॥२५॥ **[तस्य भार्या कृता चित्रगुप्तकायस्थवंशजा ॥ तद्वंशजाश्च कायस्था दाल्भ्यगोत्रास्ततोऽभवन्] ॥२६॥ दाल्भ्योपदेशतस्ते वै धर्मिष्ठाः सत्यवादिनः ॥ सदापचारपरा नित्यं रता हरिहरार्चने ॥२७॥ क्षत्रियाणामयं धर्मः कृतं मौंजीनिबंधनम् ॥ यत्किंचिद्वैदिकं जाप्यं नवग्रहमखादिकम् ॥२९॥ नानाशांतिं च विधिवदृत्विग्भिरेव कारयेत् ॥ षण्णां च कर्मणां मध्ये त्रीणि कर्माणि जीविका ॥२९॥ एवं या प्रकारेंकरून प्रभु क्षत्रिय चांद्रसेनीय कायस्थ दाल्भ्यगोत्री यांची उत्पत्ति आहे.

मोठ्यांचे आग्रह बहुतच पडले तेव्हां शास्त्र राखून त्यांची समजावीस करणें प्राप्त ह्मणोन क्षत्रियत्वनिराकरणार्थ एक भागवतवाक्य लिहिलें. तें कोणें ? तर, '' *****नंदांतं क्षत्रियकुलं क्षत्रियत्वमनीनयदितिः** '' ॥ याचें उत्तर--ह्या वाक्येंकरून सर्व क्षत्रिय मेले ऐसी गोष्ट कैसी घडेल. वाक्यार्थ काय म्हणाल तर--नंदराजापर्यंत क्षत्रियव्यवहार (राजधर्म), अनंतर क्षत्रिव्यवहार (राजधर्म) जाईल. शरीरस्थ गर्भ मागितला ह्मणोन कायस्थ व्यवहार. क्षत्रियपर्याय प्रभुव्यवहारी जाहल म्हणोन ज्ञाती नष्ट न जाहली. तसीच दुराग्रही पुरुषांचे समाजविशीकरितां, वैदिकक्रम निषिद्ध पाराशरस्मृतीचा एक चतुर्थ चरण भलताच करून गागाभट्टी लिहिली. तो कोणता ? तर,--'' †**कपिलाक्षीरपानेन ब्राह्मणीगमनेन च ॥ वेदाक्षरविचारेण कायस्थः पतितो भवेत् ॥१॥** याचें उत्तर-अशीच जर स्मृति आहे तर सामान्यतः कायस्थत्रयासही निषिद्ध जाहलें. तेव्हां ब्रह्मकायस्थांसहि निषिद्ध होईल, आणि मूळचा पाराशरस्मृतिग्रंथ काढून पाहिला, तेथें या स्मृतीचा चतुर्थ चरण '' ‡**शूद्रश्चांडालतां व्रजेत्** '' असा आहे, '' **कायस्थ पतितो भवेत्** '' असा नाहीं. वैदिककर्मनिषेधक स्मृतिवचन एकच लाविलें, आणखी निषेधक वाक्यच नाहीं. स्मृतितात्पर्यांत, वर्णत्रयास वैदिककर्माचा विधि सिद्धच आहे. शूद्रास मात्र निषेध. अन्य

* परशुरामाचें भाषण ऐकून हर्षित झालेला दाल्भ्य ऋषि बोलिला कां, हे रामा-मी हा राजपुत्र मागितला म्हणून तुम्ही निःक्षत्रिय पृथिवी करण्याचा आपला हेतु पूर्ण झाला नाह असें मनांत आणूं नये. हा दुर्बुद्धि होणार नाहीं.

यावरून परशुरामाची क्षत्रिय नाहीसें करण्याची '' पॉलिसी '' क्रूरकर्म केल्याशिवाय सिद्धीस नेण्याची युक्ति दाल्भ्य ऋषीनें काढिली असें दिसतें.

** हा मजकूर गोविंदभट्टानें व गागाभट्टानें मागाहून ढकललेला आहे. मूळ ग्रंथांत नाहीं.

*** नंदराजापर्यंतच क्षत्रियांचें कुळ राजधर्म पावेल.

† कपिला गाईच्या दुधाचे प्राशनानें, ब्राह्मणाच्या स्त्रीचेठाई गमन केल्यानें, आणि वेदाक्षरांचा विचार (अध्ययनादिक) केल्यानें कायस्थ, पतित (जातिभ्रष्ट) होतो.

श्रीवेंकटेश्वर प्रेसनें छापलेल्या पाराशरस्मृतींत (पृ. ९) '' कपिलाक्षीरपानेन ब्राह्मणीगमनेन च ॥ वेदाक्षरचारेण शूद्रस्य ध्रुवम '' असा चरण आढळतो.

‡ शूद्र चांडालत्व पावेल.

संकरजातीयांचा शूद्रांत अंतर्भाव करून या तिहींचा निषेध होतो. चतुर्थ चरण तसा कल्पिला तर, शूद्रादिकांस वैदिककर्मनिषेध नाहीं, असें होईल. ह्मणून कल्पितांच नये. अत एव, गागाभट्टांनींही त्यांचे पद्धतीत विशेष वैदिक मंत्र स्पष्ट लिहिलेच आहेत. पूर्वी स्वजातीमध्यें लहानमोठे अनाचार होते। त्यामुळें ज्ञातिविहित कर्माधिकारें जातीहानि जली. याचें उत्तर–हे कलिगुगपरत्वें सर्व ज्ञातींमध्यें अनाचार असतच आहेत. ते कोणते ह्मणाल तर–कर्नाटक प्रांतीं ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण चांगले आहेत. त्यामध्यें प्रत्यक्ष बहीणीची कन्या (भाची) इचा मासासमागमें विवाह होऊन संतति होत्ये. हे लोकविरूद्ध, शास्त्रविरूद्ध, अनाचार, मिश्रमैथिल याचे ज्ञातिमध्यें प्रथम पंचवीस वर्षांची कुमारी, नंतर विवाह होऊन संतति होत्ये ; हाहि मोठाच लोकविरूद्ध, शास्त्रविरूद्ध, अनाचार आहे. असें असतां त्यांचे षट्कर्माधिकार व ज्ञातीची हानि जाहली नाहीं. तेव्हां प्रभूंचीच कैसी होईल ? एकच दाल्भ्यगोत्र असोन गोत्रींच सर्व विवाहादिक कर्मे होतात ह्मणून ज्ञातिकर्महानि जाहली. याचें उत्तर–ज्या ऋषींचा जो वंश तो ऋषीं त्या वंशाचें गोत्रक्षत्रियवर्णच भिन्न. क्षत्रियांस गुरुगोत्र प्रसिद्ध आहे. दुल्भ्य ऋषीनें पालन करून उपदेश केला ह्मणून दाल्भ्यगोत्र लागलें. एतावता बाध नाहीं. पूर्वीहि सुर्यवंशीं व सोमवंशीं इत्यादि व्यवहार चालतच असोन सांप्रतही अमुक कुळींच इत्यादि व्यवहार चालतो. कुल वंश शब्दमात्र. अर्थभेद नाहीं. [*चंद्रसेन राजा याचा पुत्र सोमराज यानें चित्रगुप्त ब्रह्मकायस्थ याच्या वंशजाची कन्या विवाहिली ; तेव्हां त्या जायेपासून संतति जाहली ते प्रतिलोम.] याचें उत्तर––''****ब्राह्मण्यां क्षत्रित्सूतः** ''इत्यादि वाक्येंकरून सूतज्ञात प्रतिलोमापेक्षां उत्तम. '' †**प्रतिलोम इदमंगीकृत्यापि ब्रूम इति न्यायेन.** '' वस्तुतः ब्रह्मदेवशरीरापासून जाहला ह्मणून तो ब्रह्मकायस्थ. परंतु तो चतुर्वर्णविगळा देव, देवगंधर्वजाति. पूर्वी क्षत्रिय राजें याहीं देवगंधर्व यांच्या कन्या बळात्कारें अथवा संतोषें विवाहिल्या ; असें पुराणांतरीं बहुत स्थळीं आढळतें. शुक्राचार्यांनीं आपुली कन्या देवयानी ययाति राजास दिल्ही. तेव्हां या क्षत्रिय कायस्थास प्रतिलोमताही नाहीं. उत्तमप्रति सूत, त्याचा क्षत्रियांतच अंतर्भाव. त्यासही सर्व क्षत्रियकर्माधिकार आहे. चांद्रसेनीय क्षत्रिय कायस्थ कोणते ? याचें उत्तर––दाल्भ्य गोत्र कायस्थ प्रभु ऐशी आबालवृद्धपर्यंत ज्याची प्रसिद्धता असेल, तो चांद्रसेनीय कायस्थ. तर यास प्रभु ह्मणण्याचा प्रघात कसा पडला, याचें उत्तर––'' ‡**चत्वारस्तनया आसन्सोमराजस्य विश्रुताः ॥ विश्वनाथो महादेवो भानुर्लक्ष्मीधरस्तथा ॥१॥ संख्यावानप्यसंख्योऽभूद्विश्वनाथो महाप्रभुः ॥ निवासः श्रीसरस्वत्यो रूपौदार्यकलाश्रयः ॥२॥ स्कांदे रेणुकातात्म्ये एत्थमुक्तं** '' यावरून महासमर्थ होतो त्यास प्रभु ह्मणतात, **विश्वनाथ** यास सर्वहि **प्रभु** ह्मणूं लागले, ह्मणून **प्रभू** व्यवहार रूढ पडला. सांप्रताहि ज्याणें जो रोजगार उदीम धंदा केला त्या व्यवहाराचें उपनाम पडतें व तेंच परंपरागत चालतें. त्याचा मूळपुरूष चंद्रसेनपुत्र सोमराज एकच, तेव्हां विवाहादिक कर्मे कोणाशीं जाहलीं ? याचें उत्तर––पूर्वी दोनच क्षत्रियांचे वंश, एक सूर्यवंश व एक सोमवंश यांचे परस्परें विवाह होतच असतां यदु, कुरु, पंडु,

* हा मजकूर खरा नाहीं असें वर दाखविलेंच आहे.

** क्षत्रियापासून ब्राह्मणीचे ठाई होतो तो सूत.

† हें, सूत हा प्रतिलोमच आहे असा पक्ष घेऊनही आम्ही बोललों तरी.

‡ सोमराजाचे–विश्वनाथ, महादेव, भानु आणि लक्ष्मीधर असे प्रख्यात चार पुत्र होते, त्यांत विश्वनाथ हा महापंडित, असंख्य गुणांनीं युक्त, लक्ष्मी आणि सरस्वती यांचें अधिष्ठान आणि रूप, औदार्य व कला यांचा आश्रय असा महाप्रभु (महा-समर्थ) झाला. असे स्कंदपुराणीं रेणुकामाहात्म्यांत सांगितलें आहे.

एकाचीच संतति, यादवाची कन्या सत्यभामा कृष्णास दिल्ही असें पुराणांतरीं बहुतांस्थळी आढळतें. सर्व सृष्टिक्रम असाच आहे. पूर्वी ब्रह्मदेवाचें शरीरापासून चतुर्वर्ण उत्पन्न जाहले ; तेव्हां मुळ पुरुषाची रचना अनादिसिद्ध, व्यवहार चालत आला आहे तो खरा. ब्रह्मदेवाचे दिवसांत दश अवतार होतात. त्यास पन्नास वर्षे जाहलीं आहेत. तॄहां कोणत्या दिवसात परशुरामावतार जाहला हें परमेश्वर जाणें. तेव्हां अनादि व्यवहारच प्रमाण. आणखी स्कंद वाक्य, '' ***धारयंतो मुखेंऽगुष्ठान् प्रार्थयंतोऽभयं र्नपाः ।। स्थितास्तेषां बली रामो दत्तवानभयं तदा** '' तेव्हां आणखी क्षत्रिय राहिलेच होते ते हे एकच मिळाले. सारांश भगवदिच्छेकरून सृष्टि निर्माण जाहली. अनादिसिद्ध व्यवहार भगत्सत्तेनें चालिला तो प्रमाण. ऋषीकुळ नदीमूळ पाहूं नये. ऋषिउत्पत्ति पाहतां '' ****हरिणी गर्भसंभूतो ऋष्यशृंगो महामुनिः ॥ तपसा ब्राह्मणो जातः केन जातेन कारणम् ।।१।। धीवरीगर्भसंभूतो व्यासो द्वैपायनो मुनिः ॥ तपसा ब्राह्मणो जातः केन जातेन कारणम् ।।२।। उर्वशीगर्भसंभूतो वसिष्ठश्च महामुनिः ॥ तपसा ब्राह्मणो जातः केन जातेन कारणम् ।।३।।** ऐसेच पृथ्वीचे ठाई कित्येक निर्माण जाहले. त्यांचें वर्णन किती कोठवर करावें. विश्वामित्र क्षत्रिय होत्साता ऋषींत मिसळला. तसाच वाल्मीकही. कोकणस्थांचा सप्रवरसंबंध होतो. उत्पत्ति पाहतां प्रकारांतर. तस्मात, '' †**कस्यदोषः कुलेनास्ति व्याधिना को न पीड्यते** '' असें आहे. भगवतकृत मोडोन आपण नूतन स्थापूं गेल्यास भगवंतास कसें मानेल ! मानावयाचें नाहीं. हें दृष्टोत्पत्तीस येतच आहे. विषाची परीक्षा पाहाणारांनीं पाहूं नये. पंडु व धृतराष्ट्र यांची उत्पत्ति व्यासापासून. पांडव यांची उत्पत्ति एकापासून एकेक ऐसें जगप्रसिद्ध ग्रंथातरीं वर्णन. त्यांनीं अश्वमेधादिक यज्ञ केले, त्यांचे घरी लक्षावधि ब्राह्मण जेविले, स्वर्गी घंटारव जाहलें. द्रौपदीस पंच भ्रतार. तिणें स्वहस्तें लक्षावधि ब्राह्मणांस अन्नें वाढिलीं. महासती होय दोष ठेवितां रौरवप्राप्ति. तात्पर्य '' ‡**बलीयसी केवलमीश्वरेच्छा** ''।। शके १७०१ विकारीनाम संवत्सरे. माहे आश्विन शुद्ध ८ मी रविवासरे. इत्यलम्. श्री शुभंभवतु. ''

येणेंप्रमाणें समजून घेऊन माधवराव साहेब पंधरा वर्षांचे होईपर्यंत कधीं कांहीं कटकट न होतां यथास्थित चालत आलें. सवाईमाधवराव यांची ' विनाशकाळीं विपरीत बुद्धि ' होण्याचें कारण पेणकर ब्राह्मणांचा व प्रभु याचे उपाध्ये टकले यांचा आपाजी यशवंत प्रभु यांचे घरीं पेणेंत प्रयोजन होत असतां तेथें कलह वाढून पेणकर ब्राह्मण यांणीं खटला केला. त्यांसही कोलटकर मामलेदार यांणीं पुण्यास आणोन समजून सांगावयाचें तसें सांगितलें परंतु न ऐकतां दुराग्रहस प्रवर्तक होऊन श्रीमंतांकडे जाऊन फिर्याद केली. आणि नारायणराव साहेब यांचे अनन्वित हेतु पूर्णतेस न गेले. यांचें वृत्त समजून घेऊन ग्रामण्य उभें करण्याची वीरश्री घातली. आणि पुणें मुक्कामीं बहुतेक ब्राह्मण जाऊन प्रभुलोकांचा उपहास करण्यास प्रवर्तले ते समयीं श्रीमंतांनीं

* तेव्हां आपल्या मुखात अंगुष्ठ धारण करणारे, अभय मिळण्याची इच्छा करणारे असे कितीएक राजे शरण आले असतां त्यांसऊ महाबली तो राम, अभय देता झाला.

** हरिणीच्या गर्भापासून झालेला महामुनि ऋष्यशृंगी केवळ तपश्चर्येनेंच ब्राह्मण झाला. तेव्हा मूळच्या जातीचें कारणत्व काय करावयाचे आहे ? कोळ्याच्या स्त्रीचे गर्भापासून झालेला मुनि द्वैपायन व्यास तपश्चर्येनेंच ब्राह्मण झाला. तेव्हां मूळच्या जातीचें कारणत्व काय करावयाचें आहे ? तसाच अुर्वशीच्या गर्भापासून झालेला महामुनि वसिष्ठ तपश्चर्येनेच ब्राह्मण झाला. तेव्हां मूळच्या जातींचे कारणत्व काय करावयाचे आहे ?

† कोणाचे कुळांत अगदीं दोष नाहीं ? कोण व्याधींनें पीडित होत नाहीं ? तर सर्वांचे कुळांत काहींना कांहीतरी लहानमोठा दोष असतो व सर्वांस लहानमोठा कांहीतरी व्याधि होतच असतरो.

‡ केवळ इश्वराची इच्छाच बलवत्तर आहे.

शास्त्री व पंचाईत मिळवून शास्त्रें मतें पाहतां चालत आलें तसें चालवावें. असें समजून नानाफडणीस यांचे समक्ष पंचाईत मनास आणावी ह्मणोन आज्ञा होऊन असामींनीं केलें त्यांची नांवनिशि.

| | |
|---|---|
| १ यज्ञेश्वर शास्त्री. | १ आनंदराव जुनरकर. |
| १ भास्कर दीक्षित. | १ दिनकरपंत भडभडे. |
| १ सदाशिवभट दात्ये. | १ मोरबा भावे. |
| १ गोविंदराव पिंगळे. | |
| ४ | ३ |

सदरहू असामींस आज्ञा जाहली. त्याणींही समजून घेऊन पेणकर ब्राह्मण यांसीं खटला न करणें विषयीं समजून सांगों लागलें. न ऐकतां दुराग्रहास प्रवर्तोन जुने कोटांत चिटणीस यांचे वाड्यावर खटला करावयाकरितां दोन वेळा गेले. ते समयीं आयाशास्त्री द्रवीड न्यायाधिशीच कामावर होते ते ब्राह्मणांस अनुकूल या बळावर बेगुमान देणें. आयाशास्त्री यांचा जमात व दांडगे ब्राह्मण, मजुरीचे चार चार पैसे द्यावयाचे करार करून समागमें घेऊन ब्रुहुत समुदाय मिळोन प्रभूंवर चालून गेले. ते वेळेस ब्राह्मणांची व प्रभुंची मारामार जाहली. आणि ब्राह्मण कित्येक जखमी जाहले, व आयाशास्त्री यांचा जामात जखमी जहाला. व प्रभुलोकही जखमी जाहले. नंतर ब्राह्मणांनीं पळ काढून नाना फडणीस यांजकडे फिर्यादीस गेले, आणि बहुत प्रकारें कागाळी सांगों लागलें. ते समयीं नाना फडणीस याणें ब्राह्मणाचा बहुतच निषेध केला, कीं सास्त्रसंमतें समजून असतां दुराग्रहानें त्यांजवर चालून जाऊन दुर्लौकिक केला. हें नीट नव्हे. तुह्मींच आजपर्यंत वडीलार्जित परंपरागत प्रभुंचें कार्य व वेदोक्त कर्म करीत आलां आणि हल्लीं त्यांचा आश्रय गेल्यामुळें द्वेषबुद्धि करून खटला करतां हा सिद्धिस जाणार नाहीं. याप्रमाणें सांगितलें. तें न ऐकतां बळें जाऊन खटला करणें याचें कारण काय ? या उपर यांसी खटला केला असतां मुलाजा होणार नाहीं. प्रतिष्ठेस हानी होईल. अशी ताकीद देऊन ब्राह्मण घालविले. नंतर थोरथोर शास्त्री श्रीमंतांनीं बोलावून शास्त्रार्थ विचारिला, तेव्हां शास्त्री यांणीं उत्तर केलें कीं प्रभ चांद्रसेनीय यांसीं सर्व कर्मांस अधिकार आहे. सभा करून शास्त्रार्थ सांगावयाची मर्जी असल्यास जो शास्त्रार्थ ग्रंथांतरीं वास्तविक आहे तो सांगणें. पेणकर ब्राह्मण व्यर्थ दुराग्रहास प्रवर्तले याचें कारण नाहीं. पहिला दाखला पाहतां मुक्तक्षेत्र काशी तेथें शिष्ट ब्राह्मणांनीं निर्णय ठरविला तोच प्रमाण आहे. त्यास दोष ठेऊन दुसरा प्रकार करी असा कोण समर्थ आहे ? प्रभु ज्ञातीचे गुरु आबा टकले हे सर्व शास्त्रीं निपुण आहेत ते शास्त्र विरुद्ध आचरणार नाहींत. सभा करून सांगितलें असतां टकले यांचें बोलणें प्रमाण ठरेल. शास्त्रनुमतें वेदाधिकारी आहेत अशी खातरजमा आहे त्यापेक्षां आतां युक्ति करावी जे, सभेमध्यें अनृत भाषण करीतां येत नाहीं याजकरितां तूर्त सभा करूं नये. मोघम पूर्ववत चालत आलेप्रमाणें हें सांगावें असें ठरवून ब्राह्मणांस अतःपर गटला करणें याचें कारण नाहीं. याप्रमाणें ताकीद केली. खटल्यास प्रारंभ शके १७१७ श्रावण शुद्ध ७ ते माहे आश्विन मासपर्यंत प्रभुमंडळी जोंत नव्हती. आपलालें घरींच

होते. आश्विनमासीं माधवराव साहेब कैलासवासी जहाले. नंतर नाना फडणीस याणें प्रभुमंडळीस बोलावून समक्ष सांगितलें जे, इतःपर ब्राह्मणानें तुमंसी खटला करूं नये अशी निक्षून ताकीद केली. तुह्मीं सरकार कामें बंद न करितां स्वस्थचित्तें आपले कामकाजावर येऊन पूर्ववत् कामें चालवावीं. येविशीं, समजुतीचें अन्वयें बहुतेक सांगोन खटला मोडिला. पुढें श्रीमंत बाजीराव साहेब राज्याधिकारी राज्याचे कामावर आले ते समयीं चिटणीस सर्व प्रभुमंडळी यांणीं विनंति केली कीं, विनाकारण पेणकर ब्राह्मण यांणीं खटला करून कर्मांतर चालवणें यासीं आडाआड केली, त्याजवरून बाजीवार साहेबांनीं चौकशी मनास आणून प्रांतोप्रांती शिक्यांनिशीं सनदा करून दिलेल्या असोन ' पूर्वीपासोन कर्मांतर चालत आलेप्रमाणें चालवीत जाणें. दिकत न घेणें. ' या प्रमाणें स्वदस्तुर लेखन होऊन चालूं लागले.

**रायबहादुर बाळकृष्ण आत्माराम गुप्ते यांनीं जी ग्रामण्याची हकिकत प्रसिद्ध केली आहे त्यांत त्यांनीं प्रख्यात बखरनवीस मल्हार रामराव चिटणीस यांची पत्रें नमूद केलीं आहेत तीं येणेंप्रमाणें :—**

## पत्र नंबर १.

**पौ छ ९ जिलकाद श्रावण रोज वर्दी पुण्याहून लक्ष्मणराव गोविंद व मल्हार रामराव चिटणीस यांणीं रामराव चिटणीस यांस पाठविली. रोजचें वर्तमान. बार.**

नारायणराव यांची यादी घेऊन फाडली. हा आकस हरिपंत फडके व आपा बळवंत यांनीं धरून सूड घ्यावयाचा म्हणून पेणकर ब्राह्मण पुढें करून प्रारंभ केला. तो ऐसाजे, पेणेंस ग्रामण्यें ब्राह्मणंनीं गर्भादानास होमास चरू करणार नाहीं म्हणोन कोणी गृहस्थाचे घरीं आग्रह केला. त्यावरून कोलटकर सुभेदार अनुकूल होऊन कज्या पाडिला आणि दहापांच कलमें , चरू करूं नये, व चार दिवस मुंजीचा अग्नि ठेवूं नये, (शवा) सह गमन करूं नये. पिंडास चरु होतो तो करूं नये, असें दोनशें ब्राह्मणांचे संमतें पत्र करून याप्रमाणें प्रभू मान्य होतील तरी त्यांचे घरी जावें, नाहीं तर जाऊ नये. असें केल्यामुळें वर्षभर कर्मे व हव्यें राहिली. अगत्यें करणेंच त्यांनी लग्न-विवाह इत्यादि दुसरे महालांत जाऊन करावीं ; असें झालें. तेव्हां तेथील गृहस्थ पुष्कळ येऊन ज्ञातीस कळविलें. त्यावरून गणपतराव कोलटकर मामलेदार यांस मजकूर कळविला कीं, तुमचे बंधू महालीं बाबूराव आग्रहास पडून [असीं कामें] करितात याजवरून गणपतराव यांनीही लिहिलें. परंतु त्याचीं उत्तरें ब्राह्मण ऐकत नाहींत ऐसी येत गेलीं. . . . .नंतर बाबूराव कोलटकर गणपतराव यांजकडे पुण्यास आले. तेव्हां गणपतराव यांनी बहुत निषेध केला. त्यावरून (प्रभुलोक) यांचें ग्रंथांतर कसें आहे तें आम्हीं समजू तेव्हां करणें तें करूं असें म्हणून लागले. वेदशास्त्रसंपन्न राजश्री आबा गुरूबावा व थोरले गुरूबावा जाऊन त्यांची खात्री केली कीं, चालतें हें कांहींच नाहीं. यांस अधिकार विशेष आहे. तेव्हां ते बोलिले कीं ब्राह्मण आग्रही. तेथील शिष्ट दहा पांच आणवितों, आमची खातरजमा केली तशी त्यांची करावी. नंतर ते ब्राह्मण त्यांनीं आणविलें, यावर त्यांहीं सारें ग्रंथ दाखविल्यावर गागाभट्टी गौण आहे त्यास संमत पत्र केलें तें फाडावें. याप्रमाणें ब्राह्मण मान्य होऊन कोलटकरांची पत्रें व या ब्राह्मणांचीं पत्रें रवाना झाल्यावरून पूर्वीप्रमाणें सहा चार महीनें चालिलें. पुनः कोणी कोणी दिक्कत करूं लागले. कोलटकरांचें ही न मानीत. तेव्हां गुरूबाबांचे दोन ब्राह्मण कोलटकरांचें

स्वाधीन केले. आणि हे सरकारचे ब्राह्मण म्हणोन कार्ये चालावीं अशीं केली त्यांनी सहा चार महिने चाविले असतां एके दिवशीं कोलटकरांकडे कथा झाली त्यांत सारे ब्राह्मण मिळाले. तेथें त्या दोघा ब्राह्मणांस बुका, प्रसाद, खिरापत आम्हांबरोबर द्याल तर आम्हीं घेणार नाहीं म्हणून आग्रह करून उठून चालल. सुभेदार यांनीं विचारीलें यांजकडे काय दोष ? तरी प्रभूंकडे हे मनस्वी कर्मे करितात असें म्हणून निघोन गेले. दुसरे दिवशीं सारे एकत्र होऊन प.वीं संमत पत्रें घाडलीं तसेंच आणखी केलें. त्याजवरून कोलटकर यांनीं नेऊन विचारिलें तुमचे पद्धतीप्रमाणें पूर्वील चालींपेक्षां विशेष कुणी केलें ? तुमच्याच पोथ्या यांस दिल्या. तेव्हां बोलूं लागल कीं, आम्हीं पूर्वी करीत होतीं तेंच ठीक नाहीं. हल्लीं ठरवूं तसें करावें. त्याजवरून कोलटकर बोलले. गागाभट्टांनी पद्धती केली तशी तुम्हीं नवी कशी ती करावी. चाललें ते कोणत्या आधारारून न करावें म्हणतां तें समजवावें, पुढील पद्धति कोणत्या आधारावरून करणार तें लिहून द्यावें त्याजवरून कागद लिहून दिला जे, म्हणतों याप्रमाणें समजून देऊं नंतर सर्व आपले ठायी विचारास बसले. निषेध कशावरून व पुढें काय कयावें ते कांहीं सिद्ध न होय. तेव्हां दांडगावे आरंभून जो संमत न करील घरीं जाऊं नयें. हें अरंभिलें. ते समयीं कोलटकर सुभेदार सुद्धां सत्राघरांनीं संतम न केलें. म्हणून तितकीं घरें वर्ज्य केलीं. आणि शेंप्रनास एक झालें. ते समयीं कोलटकर यांनी सदरहू झालें वर्तमान सविस्तर पुण्यास श्रीमंतांस लिहिलें. तें पत्र नाना फडणवीसांनीं वाचून शास्त्रीबाबाकडे पाठविलें. शास्त्रीबाबांनी पाहिलें, नंतर ब्राह्मण दांडगावे करितात ते मसाले करून आणावे ऐशी नानाची परवानगी सरसुभे यांस झाली, आणि त्यांपैकीं पंचवीस तीस ब्राह्मण मुख्य मुख्य यांजवर दहादहा वीसवीस असे मसाले रुपये एकशें साठ करून गार्दी पाठविले. तेव्हां जितक्यांनीं संमतें केलीं तितकें एक होऊन मसाला देऊन शंभर ब्राह्मण पुण्यास आले. सरसुभ्यांकडे व शस्त्रीबाबांकडे न जातां प्रभूंसाठीं आम्हांवर जुलूम होऊन गार्दी मसाले करून अप्रतिष्ठा केली वगैरे मनस्वी वल्गना करीत गावांत हिंडू लागले. नंतर सरसुभे यांनी माणसें लावून आणून बसवून पंचवीस तीस असामी बोलाविले असतां इतके कां आलांव ? प्रथम संमतें केलीं तीं कां फाडिलीं व पुनः कां आणखी केलें ? आजपर्यंत कसें करीत आला ? आतां कां नाहीं म्हणतां ? व पुढें कोणते संमतें कसें करणार ? हें लिहून द्या म्हणून तसदी केली. तेव्हां सर्व ब्राह्मण पेणेस जाऊन दहावीस असामी राहिले आणि लिहून देतां ठीक न पडे. तेव्हां इतकी दिवस करीत आलों ते चुकलों पुढें आम्हांस करूं तयेसें वाटतें. मागें केलें त्याचें प्रायःश्चित घेऊं ऐसी लिहीणी बाहेर पडलीं. बाहेर ही चार घरें फिरों लागले. नानापाशीं एकदोन वेळ उभे राहिले. त्यांनीं सरसुभ्यांकडे जा, ते समजावतील, गम उत्तर सांगूं. हेंच उत्तर केलें. त्यांजवर आपा बळवंराव यांनी त्या ब्राह्मणांस आश्वासन देऊन आम्हीं तुमची दाद लावितों. मसाला देववितों. प्रभूंचे पारिपात्य करणें आहेच. यांद माघारी घेतली. तें पूर्वील वैर मनांत धरून नानापाशीं जाऊन बोलिले. हें काय ? शिष्ट ब्राह्मणाची प्रभंसाठी अप्रतिष्ठा होते. प्रभू मनस्वी कर्मे करितात हें काय ? असें बोलिले. तेव्हां नानांनीं उत्तर केलें जे, आम्हीं सर्व समजलों आहोत. तुमचें बोलणें भांडाळपणाचें. पुर्ते समजलांच नाहीं. सरसुभा मनास आणून आम्हांस समजवतील तें करूं. नंतर आप्पा बळवंत अय्या शास्त्र्यांचे घरीं आले, व यांस आपले घरीं आणिलें. आणि पेणकरांचा अभिमान धरावा असें करून शास्त्रीबुवांकडून नानासीं एकदोन वेळां बोलाविलें. नानांनीं उत्तरें साफ केलीं. शास्त्री बावा म्हणूं लागले जे, ब्राम्हण ही बहुत एक विचार करितात. हेही मनस्वी कर्मे करितात याचा विचार करावा. असें बहुत आग्रह करून

विचारितां नानांनीं उत्तर केलें कीं, आम्हांस यांत पडावयाचें नाहीं व काहीं करावयाचें नाहीं. ब्राम्हण व प्रभू चित्तस येईल तसें करोत. तितल्यावर आप्पा बळवंत व शास्त्री व ब्रह्मण विचार करून सिद्धांत केला जे, वाद कशास सांगावा. सारे ब्राह्मण एक संमत करून दहा पाच हजार संमतें त्याजवर करून नानास दाखवावीं. मग सहजच ते बहुतांत येतील. पडल्या फळाची परवानगी ब्रह्मण व प्रभू कांहीं करोत अशी झालीच आहे. म्हणोन एक संमताची यादी करून वरती नारायणराव साहेबांचे वेळचीं कलमें लिहून, यमाजीपंताची पद्धति पंचसंस्कारी ती काढून, अय्या शास्त्री यांजकडे नित्य पेणकर वगैरे ब्राह्मणानीं मिळावें. तेथें आपले गुरूबावा नित्य जात. तेथें नित्य भवति न भवति व्हावी. त्यात आबा गुरूजींनीं ग्रंथाधारें करून सर्वांस कुंठित करावें पूर्वील ग्रंथाधारें हे शुद्ध लोक 'चतूरनाम्रा' (?) प्रसिद्ध असे आहेत. हें व 'सुवर्णाश्व स्वरूपाढ्या' (?) इत्यादि लक्षणें लिहिलीं त्यानीं युक्त त्या ज्ञातीस जे धर्म ग्रंथीं असतील ते यांनीं करावे, व करीत आहेत. मध्यें गागाभट्टांनीच या ज्ञातीचें घर बुडविलें. त्याशींच यांचा वाद हे. ग्रंथ कसा केला. नवीन फकिकामंत्र कां केलें, कोणतें संस्कारीं वैदिक मंत्र. कोणते संस्कार अमंत्रक सें कां लिहिलें. अधिकारी नाहींत तरी कोठेंच नसावे. तेव्हा ग्रंथ खोटा, परंतु काल देश वर्तमान जेथें जसें चालेल तसें चालतात. आणि तुम्हीं गागाभट्टींनीं केलें तेंच करूं नये म्हणणार, तेव्हां आज तरी तसा श्रेष्ठ नवीन पद्धति कोण कशी करितो, व कोणत्या आधारें ती करावी असें त्या ज्ञातीचें म्हणणें. मध्यें यमाजीपंती झाली, ती तुम्हीं काढितां त्यांचा यांचा राज्यकरणीं द्वेष म्हणून ग्रामण्य केलें तें चाललें नाहीं. हे करितच आहेत. पंचसंस्कारी तुम्हीं म्हणतां तरी मुंजी तर त्यांच्या येथें अस्खलित चालतात. यमाजीपंतीं पंचसंस्कारी लग्नादारभ्य असें लिहिलें तरी तेव्हांपासून व्रतबंध रहावे ते तुम्हींच करतां, व वाडवडील करीत आले. याचें प्रायश्चित्त काय ?

असें बोलणें झाल्यावर सर्व सभा कुंठित झाली. गुरूबावांनीं उत्तर प्रत्त्युत्तर सभेंत करण्याची बाकी ठेवीलीं नाहीं, असें झालें. पेणकर संमतपत्रें घेवू घरोघर हिंडूं लागले, परंतु सर्व सभेंत मंडळी होतीच. ग्रंथ गुरूबावांनीं दाखविले. यामुळें संमतें होण्यास विचार त्रिमंतकाचार्य (?) शास्त्री ही शास्त्राधार इकडील संमतें बोलत होते. व आयाशास्त्री यांजकडे ही दोन चार वेळ जाऊन तुम्हीं करितां हें अयुक्त. आम्हांस हें शुद्धसें ठाऊक आहे. ते बोलले श्रीगिरीकर शंकराचार्यही येथें आले आहेत, त्यांजकडे संमताची यादी नेली. त्यांनीं उत्तर केलें. आम्ही धर्मसंस्थापक. उच्छेद करणें तें संमत घालावयाचें नाहीं. असें बोलले. पंडितांच्या घरोघर आपा बळवंताचा प्यादा घेवून हिंडूं लागले. तेव्हा पंडित मंडळीनें उत्तर कालें कीं, एका बाजूस राबशास्त्रीबावांचें संमत व एका बाजूस श्रीमंतांचें संमत असें होईल तेव्हां आम्हीं संमतें घालूं आम्हीं कोणी ग्रामणिक नव्हेत. संमतपत्रें कशास पाहिजेत. ळी राजधानी. येथें सभा करून पंडितांस विचारावें. त्याप्रमाणें श्रीमंतांनीं आज्ञा करावी लबाड आहांत. आयाशास्त्र्याचा व आपाचा निरोप सांगतां त्यास त्यांचें संमत याजवर अगोदर कां नाहीं. त्यांचें संमत करून आणावें. यादींत पंचसंस्कार लिहिले त्यास आबचे बाप आजे वडील त्या ज्ञातीचे व्रतबंध करीत आंले. आम्हींही केलें. त्यांच्या अस्थि शुद्ध करून वडिलांस प्रायश्चित द्यावें, व आम्हीं घ्यावें तेव्हां असंमत होईल. असें बोलून पंडितांचीं संमते न झालीं. मग चहूंकडे संमतें होत नाहींत असें वाजलें, तेव्हां किरकोळ करणारही सरले. गंगाधर दीक्षितांकडे आपा बळवंताचा प्यादा

गेलाजे. आपांनीं विनंती केली आहे. तेव्हां दीक्षितांनीं उत्तर केलें. तुम्हीं प्यादे लावून करणार, आम्हीं आपांचे चाकर नाहीं. आपा कोण ? ' आम्हीं करीत नाहीं ' म्हणून सांग जा. असें झाल्यावर आम्ही शास्त्रीबाबांकडे चिटी पाठविली कीं, ब्राह्मण दांडगावा करून मध्येंच ज्ञातीचा उच्छेद करणार. आपण अधिकारी सर्वज्ञ. आम्हीं कसें चालावें. पूर्वीपासून आश्रय आपला. अशी चिटी पाठविली. त्याचें उत्तर आलें जे, आम्हीं यांत नाहीं कोणी शिष्टही मिळणार नाहींत. अशुद्ध गोष्ट परंतु सरकारकडे व नानाकडे तुम्हीं सर्व ज्ञातींनी उभे राहून बोलावें. सरकार नाहीं व शास्त्रीबाबा नाहीत. आणि मध्येंच ग्रामण्य होतें. आम्हांस कोणी त्रता नाहीं कीं काय ? हें विचारावें असा निरोप आला. संमताची यादी चालावयाची राहिली. नंतर आयाशास्त्री यांनी नानांचे कानावर घातलें. ब्राह्मण असा विचार करीत होते. परंतु शिष्ट कोणी संमतें घालीत नाहींत ? सरकारचे नेट व अज्ञा कारकून असावा. त्याजवरून नानांनी सांगितलें जे, आम्हांस यांत पडावयाचे नाहीं. म्हणून प.वींच सांगितले हें सिद्धीस जाचयाचें नाहीं. पूर्वी यमाजीपंत आदिकरून कोणी केलें तें सिद्धीस न गेलें. रिकामें अनर्थास कारण. तुम्हीं कराल तें सिद्धीस जाणार नाहीं. हें मात्र ते दिवशीं सांगितलें नाहीं. यमाजपिंती पंचसंस्कारीं केलें आहे तरीं मुंजी कां राहिल्या नाहींत. तुम्हींच करितां. तेव्हां सहजच त्यांचें केलेलें मोडलें गेलें. चालें नाहीं. हें सिद्ध जालें. परंतु याचा विचार तुम्हीं कांहीं पाहिला आहे कीं काय ? आणि त्यांचा एक उपाध्या पोथ्या घेऊन (रेणूकामाहात्य व एक दोन ग्रंथ घेऊन) हिंडतो. त्यांत कांहीं कांही आधार आहे तेव्हां त्यास मोडावयाजोगें तुम्हांपाशीं कांहीं आहे कीं नाहीं, म्हटलें. तेव्हां शास्त्री यांनी उत्तर केलें कीं, पोथ्या पुराणांतरच्या खऱ्या परंतु अनाचार आरोप ज्ञातीवर आहेत. पूर्वीचे, परंतु आलीकडे नाहीं. याजवर नानांनी उत्तर केलें आम्ही लहानपणीं पलांडुभक्षण करीत होतों. पलांडुभक्षणीं पुनरुपनयन हें कळल्यावर टाकीलें. म्हणून पूर्वी करिता होतां तें करा, असें सांगून तुम्हीं आम्हांस भ्रष्ट करावें कीं काय. चांगले केल्यास वाईट करा कां म्हणावें. अधिक केल्याचेच फळ पावखतील. आम्हीं यांत नाही. सर सुभ्यांकडे ब्राह्मणांनीं जावें तें समजावतील तें करूं. असें झाल्यावर शास्त्री सई (फत्ते) होऊन आले.

## पत्र नंबर २ पो॥ छ १९ जिलकाद श्रावणमास.

यापुढें आयाशास्त्री व दादाशास्त्री लिमये व आपा बळवंत प्रमुख होऊन ग्रामण्य चालविलें, तों श्रावणीची संधी आली. गुरूबबांस पेणकर ब्राह्मणांनीं जाऊन शपथ घातली कीं, प्रभुंचे घरीं जाऊं नये, त्याजवरून नानांचे कानावर घातलें. तेव्हां सरसुभ्यानें जनोबास आणून ताकीद केली कीं, ब्राह्मणांस निक्षून ताकींद करणें, श्रावण्य चालू देणें, त्याप्रमाणें त्यांनी ब्रह्मणांस ताकीद केली. परंतु आम्हीं ऐकत नाहीं, उत्तर केले. गुरूबाबांस ओंकारेश्वराचे देवळापाशीं चतुर्दशीस नेऊन जाजम टाकून बसविलें. भोंवते ब्रह्मण बसले. मनस्वी बडबड करणें चाललें तेव्हां पुनः नानांचे कानावर घातलें. जनोबास नाना बोलले कीं, काम तुम्हांस रेंटत नाहीं हें काय म्हणून ? वरील दिवाणखान्यांत श्रीमंत बसले तेथें दादोपंत शास्त्री बोलावून जाऊन हा विषय तुमचा, यांचे ऊपाध्ये आणून ब्राह्मणांस सांगून उद्यांचे कर्म चालतें करणें, म्हणून सांगितलें. त्यंनीं शास्त्रीबाबास कळविलें. शास्त्रबाबा तेच सबयीं पालखीत बसून वाड्यांत आले. तेथून ब्रह्मणांस

बोलावू पाठविलें जे, चौघे जण जाबसलास येण. दादाशास्त्री व आयाशास्त्री देवास म्हणून जाऊन तेथेंबसलेहोते. तेव्हां दादाशास्त्री यांनी उत्तर केलें जे, चौघे येत नाही. येथे शास्त्रीबाबांनीं याव अगर आम्हीं सारेच येऊं. इतकें म्हणून उभयतां उठून गेले. पुनः शास्त्रीबाबांनीं दोन ढालाईत एक चोपदार व एक कारकून पाठविला. सरकार आज्ञा आहे. जाबासलास चौघानी यावें, नाहीं तर आह्मी नेऊं तेव्हां पेणकर चौघे आले. नंतर दुसरा चोपदार व कारकून पाठविंला जे, आबागुरूजीस पाठवून देणें. कारकून व ढालाईत व चोपदार गुरूजीस घेऊन येत असतां नारायण जोशी पेणकर धावून जाऊन आबाचे पायांस मिठी घातली. ब्राह्मुंवर आला तेव्हां कारकून बोलला कीं, याउपर तोंडान मारून जाऊं म्हणून ढालाईतास सांगून त्यास ओढून आबास घेऊन आले. शास्त्रीबाबा यांनी आबास विचारिलें जे, तुम्हीं श्रावणी करूं नये म्णतां हें कोणत्या आधारावरून. कोणी शास्त्र पाहिलें आहे कीं काय ? तेव्हां आम्हीं पाहिल नाहीं. म्हणून उत्तर केलें. यांस अधिकार नाहीं, महणून म्हणतां आणखी तुमचा बोलणार कोणीं याहून समजलेला आहे कीं काय ? म्हणून विचारीलें. तेव्हां नाहीं, म्हणोन जबाब दिला, याजवर शास्त्रीबाबा बोलले तुम्ही करीतां हें परिणामाचें नव्हे. मागें यमाजीपंतीं केलें तें शेवटास गेलें नाहीं व नारायणराव साहेबांनीं केलें तेहीं शेवटास गेलें नाहीं. तुम्ही काय पदार्थ यांजवर ब्राह्मण बोलू लागले आपण शास्त्रसंमतें विचार करून ठरविलीत तें आम्हीं ऐकूं, तोंपर्यंत श्रावणी करूं लागल्यास दंगा करूं, डोंचकीं फोडूं, अनर्थ करूं, त्याजवर गुरूजीस शासत्रबावांनी विचारिलें जे तुम्हीं कसें करीत आलां सांगणें. यांनी उत्तर केलें यथाविधि होम चरू करून याज्ञिक करीत आलों. याप्रमाणें चतुर्दशीस झालें. पौर्णिमा श्रावणी ब्राह्मण दंगा करणार याजवरून नाना श्रावणीस बसले. त्याजकडे चिटी पाठविली. सर्व गृहस्थ आम्हीं मिहोन बसलों. नानांनीं जनोबास आणून बंलले, तुम्हास काम सांगितल्याप्रमाणें करण्याचा ऐवज नाहीं. म्हणोन दादोपंतासही आणून रागें भरले जे, तुम्हांस श्रावणी चालविणविशीं सांगितलें असतां, हें कायव? आतां चालवाव्या असें सांगितलें. दिवस विचारिला तो तीन घटका राहिला. तेवहां आतां श्रावणी आटोपणार नाहीं तेव्हा कसें करावें हें शास्त्रिबाबांस विचारून येणें तो अस्तमात झाला. म्हणोन दादोपंतांस तुमहीं जाऊन प्रभू ज्ञातीस सांगावें घोळाखाली हा समय झाला. त्यास भोजनास उठावें. श्रावणी हस्ताक्षर अगर श्रावणावर यथास्थित करवूं, आपण संशय न धरावा. भंजनास उठावें. याप्रमाणें नानाकडे जाऊन येऊन येथे बोलले. आम्हीं उत्तर केलें जे, या मंडळीस आणिलें सरकारांतून पाठवून समजूत करणें पडली. बरें असो. सरकारांतून अथवा शास्त्रीबाबांकडून डथळा झाला नाहीं. ब्राह्मणांचे आग्रहास्तव होतां होतां समय झाला. असें रुसव्याचे अर्थ बहुत बोललों. आमचें ज्ञातीस कोणीच त्रता नाहीं, असें झालें. श्रावणी राहिली. सारीच कर्मे बंद झालीं. याचा मार्ग काय म्हणोन बोलल्यावर, फिरून नानाकडे व शास्त्रीबाबांकडे गेले. उबयतांचा निरोप घेऊन दहा घटिका रात्रीस आले जे ऊदईक वरकड कर्मे चालण्याचा बंदोबस्त करून देऊं म्हणोन आज झाली ही गोस्ट आम्हांस देऊन भोजनास उठवें. असें बोलले. नंतर आम्हीं सर्वत्र भोजनास उठलों. प्रतिपदेस तृतमीय प्रहरीं सभा करून पेणकर नेऊन निषेध केले जे, तुम्हीं केलें हें ठीक नाहीं. चालते तसें चालवावें परिणाम शुद्ध नव्हे. तुमचें बोलणें गंगाधर दीक्षित त्रिंबकशास्त्री यांस समजावणें. त्यांचे गुरूजीही उबयतांकडे जातील असें बोलण्यास प्रारंभ झाला आहे.

### पत्र नंबर ३ पो ॥ छ ३० जिलकाद भाद्रपद मास.

आपा बळवंत सर्वाध्यक्ष होऊन पूर्वी नारायणराव साहेबीं केला संकल्प सिद्धीस न्यावासा करून पेणकर वगैरे ब्राह्मणसुद्धां दंग्यास प्रारंभ केला. तात्या चिटणीसांचे घरीं जाऊन शें पन्नास ब्राह्मण दरवाज्यांत बसून, सायंकाळपर्यंत उपोषण केलें. आच्यारी, पाणके, हातीं द्यावे. तुमचे हातीं द्यावयाचे नाहींत. सरकारांतून मागतील तेव्हां देऊं (असें प्रभूंनीं) उत्तर केलें, व नाना व शास्त्रीबावांचे कानावर घालविलें. तेथें उत्तर झालें जे, ब्राह्मण म्हणतील तें ऐकावें. त्यावरून पेणकरांस सांगितलें जे, ब्राह्मण आमचे वाड्यांतील गेले. आम्हीं घालविले, तर त्यांचीं नांवें लिहून द्या. त्याचें उत्तर केलें जे, सरकार मागतील तेव्हां देऊं, नंतर शास्त्रीबावांकडून कारकून व प्यादे येऊन ब्राह्मणांस बोलले जे, तुम्हीं म्हटल्याप्रमाणें त्यांनीं कबूल केलें. मग दुराग्रह कां करितां, म्हणून उठवून नेले. अशा मजलीस आलें आहे.

### पत्र नंबर ४ पो ॥ छ ३० जिलकाद भाद्रपद.

तात्या चिटणीसांचे वाड्यांत ब्राह्मण येऊन दंगा करावा जानवीं घ्यावीं, धोत्रें दुहेरी करावीं, हा बेत झाला. तेव्हां आम्हीं सर्व हुशार होतों, यामुळें परतोन गेले. आपा बळवंताचें म्हणणें नानापाशीं पडलें कीं, नारायणराव साहेबांची याद परत घेतली. त्यांचा सूड मला घेणेच. नाना बोलले इतका आग्रह कशास करितां, तात्या व आम्हीं एक होऊन ठरविलें तें करावें. तेव्हां तुमचें ऐकणें नाहीं. म्हणून बोलून गेले. ब्राह्मण पुढें करून दुराग्रहे हा अविचार करावा. हीच शेवटची मजल आणली आहे. बरें ईश्वर त्राता. घडेल तें लिहूं. तीर्थविधि एकंदर तिकडील राहिल्या असतील त्या पत्र पावतांच व्हाव्या. इकडील व कोकणांतील करविल्या. श्राद्धपक्ष ब्राह्मणभोजन करणें त्याऐवजीं दहावीस गाई मिळवून त्यांस अन्न घालावें. असा इकडे बेत केला आहे. त्यांस सदरहू अन्वयेंच तिकडे असावें.–नीलकंठराव यांचे येथें उत्साह त्यास ब्राह्मण हरदास उभा करूं नये. तो उभा राहतो तुम्हीं बसतां हें नीट नाहीं हाही घोळ घातला आहे. येणेंप्रमाणें जिलकाद महिन्यांतील वर्तमान. जिवबाचा मात्र दुराग्रह आहे. गुरूबावांनीं सर्व पंडित मंडळींची खातरजमा यथास्थित केली आहे. आयाशास्त्रीही पल्यावर आहेत. परंतु सरकार आज्ञा व पुढें काय निकाल करतील पहावें. शास्त्रीबावांनीं सरकारच्या वतीनें बोलावें, आणि सर्व पंडितांनीं इकडील बोलावें असा घाट आहे. श्री कोणते थरास नेईल तें नेवो. हे तरी पूर्व उसनें उगवण्यावर आले आहेत. हरीपंत तात्यांनीं गंगाधर दीक्षित यांस एकांतीं विचारिलें जे, तुम्हांकडे मनास आणणेचें आध्वर्यव आलें त्यांत काय ध्यानांत आलें ? तेव्हां उत्तर केलें जे, प्रभूंच्या उपाध्यांनीं दोन चार ग्रंथ आणून दाखविले. पेणकरांस दाखवा म्हटलें. त्यांजपाशीं ग्रंथ नाहीं. यमाजीपंताचें पत्र घेऊन हिंडतात, तेव्हां काय मनास आणावें. तेव्हां तात्यांनी खंबीर काढिला जे, आपाबळवंत केवळ दुराग्रह करितात असें आम्हांस करणें नाहीं.

### पत्र नंबर ५ पो ॥ छ १४ जिलकाद मिति भाद्रपद शुद्ध ११.

पंडित मंडळीचा प्रकार तो चांगलाच झाला आहे. तात्या आल्यावर घरोघर ब्राह्मणांनीं दंगा करणें राहिला. ब्राह्मणभोजन हव्यें कव्यें ही राहिलींच तेव्हां नाना, तात्या व आपा बळवंत बसून

विचार झाला. तेव्हां दुराग्रह विशेष करणें ठीक नाहीं. जेंव्हा तेही दुराग्रहास पडतील तेव्हां तुमचा दाब राहणार नाहीं. काय बंदोबस्त करणें तों शास्त्रीबावांकडून करवावा. प्रभूंनीं एका केला आहे व जमेतही होत आहे. तेव्हां हे ठीक नव्हे. त्याजवरून आपा बळवंत विचारांत पडून सरकारांतून पन्नास बारगीर मागून घेतले, ते नेहमी चौकीस त्यांनी आपल्या वाड्यांत बसविले. बाहेर जाणें तेही बहुत खबरदारीने जात. नानांचें म्हणणें आम्हांस प्रभूंचाही पक्ष करणें नाहीं, व ब्राह्मणांचाही करणें नाहीं. शास्त्री करतील तें करोत. तात्यांचा खंबीर उणें होईल तेंच करावयाचें. आपा बळवंत बोलले, मी त्यांस युक्तीनें राजी करून उणें करितों अशी प्रतिज्ञा केली. त्याजवरून त्रिंबकरावानें तात्या चिटणीसांशीं बहुत साफीचीं हितशत्रुत्वपणाचीं बोलणी फार केलीं. उत्तरें ही निर्भिडपणें सडकून शेवटचे मजलीचीं केलीं. याजवरून यत्न थकून राहिले.

**पत्र नंबर ६ पो ॥ छ २२ जिल्हेज.**

आयाशास्त्री यांनीं एक दोन वेळ नानांचे कानावर घातलें जे, शास्त्रार्थ पाहतां यांचे ज्ञातीचें ठीक आहे. त्याजवरून उत्तर केलें वाजवी असेल तसेंच पाहून करावयाचें. याजवरून ग्रंथ मिळवावे, दाखले पहावे, हेंच चाललें आहे. दंगा करणें तर तूर्त तहकूब आहे. तात्याचा खंबीर आहे तोच आहे. श्रावणी, पक्ष, श्राद्धें, सर्वांची राहिलीं. आम्हांस कांहींच करणें नाहीं, म्हणून बसलों आहों. तूर्त पुस्तकाचा प्रसंग पडला आहे, मिती भाद्रपद वद्य पंचमी बुधवार.

तात्या व आपा नानापाशीं बोलले जे, आज आमचे घरीं ब्राह्मण उपोषित बसलें. असें विहू करून बोलतांच नानांनीं उत्तरास प्रारंभ करून बोलू लागलें कीं, मागें बहुतांनीं केलें तें शेवटास गेलें नाहीं. नारायणराव यांनीं कागदपत्र घेतले ते प्रसंगोचित त्यांनी काढून घेतले. पुढें ही त्यांचे दिवस असेच राहतील असें नाही कोणी तरी दैववान होऊन तो प्रभूंस अनुकूळ झाल्यानें त्यांचा वेळ पडल्यास, हें शल्य त्यांचे मनांतून जाणार नाहीं, तेव्हां या गोष्टीचा उद्योग करणें प्राप्त कार्याअंतीं प्रभूंसही देणें प्राप्त येईल. तेव्हां पत्र घेतल्याचें सार्थक काय ? दुसरें, ते अतिभाग्यवान. तुम्हीं कधींचे. त्यांशीं स्पर्धा करणें उचित नाहीं. तुम्हीं सत्ताबळें केलें तरी, त्यांजवर जबरदस्ती करण्याचें कारण काय ? त्यांजकडून कोणतें आग्रहांचें बोलणें पडलें आहे. सर्व सोडून बसले आहेत. पुढें बोलत देखील नाहींत. ओढाओढ कराल तर मरावयास टेंकले आहेत. एकी करून जमाल तरी किती जणास माराल ? लौकीक काय होईल ? ते काय वांकडें बोलतात, याचा विचार करा. शास्त्राधार पाहतां ते वावगे चालत नाहींत. चालतात त्याहून त्यांनीं अधिक करावें परंतु त्यांचे करणें सर्व तुमचे स्वाधीन. तुम्हीं करितां तेंच ते करितात. त्यांचे जातींत ब्राह्मण नाहींत. तुम्हांसच ब्राह्मण्यांचें अगत्य, आणि उपाध्येपणा करितां. त्यांचं असें नाहीं. मग रिकामी कटकट वाढवावी यांत जीव नाहीं. तुम्हीं कांहीं बोल बोलतां व ऐकतां म्हणून ब्राह्मण तुमचें दारीं बसतात. आमचे दारीं कां बसत नाहींत. स्पष्ट तुम्हीं कां बोलत नाहीं. ब्राह्मणांजवळ बोलण्याचे कारणाचा ऐवज तरी काय आहे. प्रभूंचे उपाध्यांनीं चार पुस्तकें काढून मोठ्या हंगामाचे सभेत पंडित ब्राह्मणांस कायम केलें, तेव्हां तोंडें काढून कोणीच कां न बोललेत. दबून घरांत करितात इतकेंच चांगलें. दाब ठेवून त्यांनी वागावें, आणि गंगाधर दीक्षित यांस हा सर्व इतिहास नानाचे बोलण्याचा बोलून पुढें विचार काय करावा ? नाना मनावर घेत नाहींत. तेव्हां आपणास

बोलतां येत नाहीं. परंतु हें ठीक नाहीं. ब्राह्मणांस काय सांगावें ? त्यावरून दीक्षितांनी उत्तर केलें कीं, सभेंत अथवा त्यांचे शास्त्र पाहू जातां काहीं ठीक नाहीं. त्यापेक्षा चालतें तें चालावें हें चांगलें. असें करण्याचें नसल्यास तुम्हांकडे स्वामित्व आहे. मर्जीस येईल तें सांगावें. आम्हांस विचारिलें तरी शास्त्राधारें सांगणें पडेल. प्रभूंचा उपाध्या समजून घेईल तें मान्य. असें प्रभूंस असतां त्यांचीच समाजाविशी येथील मंडळीकडोन होणें कठीण आहे. पुस्तकेंही नवीन नव्हेत. गागाभट्टी व यमाजीपंतीं झाली असतां त्या अन्वयें चाललें नाहीं. त्यांतही वावगें नाहीं. ते नवीनच. तो उपाध्या प्राधान्य म्हणून बोलतो. त्याचें उत्तर होत नाहीं. तेव्हां शास्त्र लटकें कसें कोणी म्हणावें. त्यांचा अनाचार चित्तांत आणून म्हणावे तरी सारे सारखेच. आम्हांस ते तरी कसें काय आहे ? अन्योन्य नवीन आहे असें नाहीं. बहुत समुदायामुळें लोपलें जातें, इतकाच अर्थ. वरकड जेथे ब्राह्मण समजोन आहेत तेथें वावगें त्यांजकडेही नाहीं, असें नाहीं. म्हणोन अनाचार ही म्हणतां येत नाहीं असें ही बोलले. आपण गंगेस (?) केलें तसें चालावें मान डोलवून द्यावी हें नीट.

**पत्र नंबर २० पो ॥ छ २८ रबिलाखर पौष मास.**

हरीपंत तात्यांचे पोटांत दुखत आहे. आमचा सर्वांचा निश्चय झाला आहे जे, पंडितांची सभा करून गंगाजळी सभेंत ठेवून मागील ग्रंथ पाहून सांगावें. मागील ग्रंथ दूषित असल्यास फाडून टाकावे. तुम्हीं करून द्याल तो श्रीकाशीस नेऊन तेथें मान्य झाला म्हणजे तसेंच चालवूं नाहींतर आम्ही कांहींच करीत नाहीं. मग बलात्कार करितां हेंच निष्ठुर बोलावें, याप्रमाणें गुरुबावाचे संमत आहे. जमादिलावल.

**पत्र २१ पो ॥ छ २ जमादिलावल.**

पेणकर ब्राह्मण कज्या करीत बसले आहेत, त्यांणीं पौष वद्य १० रविवार प्रातःकाळीं तोफेबरोबर वेदशास्त्र गुरुबावांचे घरीं दोन ब्राह्मण बातमीस पाठविले. घरीं आहेत नाहींत म्हणून चौकशी केली, तों दार उघडून बाहेर येतात तों हे बसले आहेत, गांठ पडल्यावर चार तैलंग मिळवून त्रिंबकराव तात्या चिटणीस यांजकडे सांगून पाठविलें. त्यांणीं चार माणसें पाठवून आबा तैलंगासमवेत घेऊन कोटांत आले. हें वर्तमान पेणकरांस समजतांच पन्नास पाऊणशें ब्राह्मण दरवाज्यांत गल्ली रोखून बसले. आबा कोटांत तुमचे घरीं आला. त्यास हवालीं करा म्हणो लागले. तुमचे स्वाधीन करीत नाहीं, असें उत्तर केलें. याजवर ब्राह्मणांनीं जमाव केला. आम्हांकडीलही स्वकीय गृहस्थ दोन चारशें मिळाले. गल्लींतून कोणास येऊं फिरूं देईनात. नारो महादेव राजश्री बाजीराव भाऊकडेस होता, त्यास गल्लींतून येतांना धरून बसवून धोत्र सोडिलें व जानवें तोडिलें तो तसाच त्यांजवळ बसला राहिला. वो आया शास्त्री यांणीं राजश्री नाना व तात्या यांजकडे आपले मतलबाप्रमाणें सांगितलें. बोलले परंतु ते दिवशी मनावर घेतलें नाहीं. ती ॥ राजश्री भाऊसाहेब प्रातःकाळींच तात्यांचे वाड्यांत बातमी लागतांच गेले. आम्हीं गृहस्थ जमा करून भोजनोत्तर जिवबाचे घरी जाऊन त्यांस घेऊन गेलों. कारभारी यांस दोन तीन चिट्या पाठविल्या. ब्राह्मण दंगा करितात हें आपल्या राज्यांत ठीक नाहीं. सभा करून धर्माधारें सांगाल त्यास मान्य आहों. त्याचें उत्तर ते दिवशीं आलें नाहींच. ते दिवशीं

प्रहर-रात्रपर्यंत वाट पाहिली, नंतर गृहस्थ दरवाज्यांतून ब्राह्मणांचे अंगावरून आपआपले घरोघर गेले. एकादशी इंदुवारीं ब्राह्मण जमा झाले. आपले गृहस्थ दहा-वीस पन्नास पाऊणशें जमा होऊन दरवाज्याने वाड्यांत येत गेले. जमाव पुरा होतो हे पाहून ब्राह्मणांनीं दाटी करून वाड्यांत येऊं लागले. असें होत होतें. ब्राह्मणांनीं निकर्ष करून मराठी माणसें दरवाज्यांत उभीं होतीं त्यांची वस्त्रे व काठ्या घेऊन मारूं लागले. इतक्यांत आयाशास्त्री यांचे जावई, दहा वीस तैलंग द्रावीड घेऊन येऊन लगट करून दरवाज्याचे उमऱ्यावर येऊन बसले, आणि तुम्हीं असें कां करितां तुम्हांशीं कांहीं बोलावयाचें आहे, म्हणून फळीस हात लावून वरकड ब्राह्मणांस इशारत करून दरवाज्याची फळी ढकलली. वाड्यांत जबरदस्ती करून येतात हें पाहून दरवाजा लाविला. त्या घालमेलींत जांवई व एक शागीर्द ब्राह्मण आंत आला. दरवाजा लावितां मोठा हुमाव झाला. आंतून शंभर दोनशें माणसें व बाहेरून शेंदोनशें ब्राह्मण रेंटारेंट करितां मोठा दरवाजा मोडून ते आंत आल्यावर दहावीस ब्राह्मण मरतात. ब्राह्मण मेल्यावर आम्हींही राहतों हें घडत नाहीं. असें समजोन आम्हीं, आपले ज्ञातीचा पांचचारशें जमाव झाला यासह, दरवाज्याजवळ आंतील अंगें उभे राहून दरवाज्याचे भिंतीवर उभे राहून कवलें मारावयास प्रारंभ केला. चुकावून कवलें मारिलीं. तेव्हां ब्राह्मण दरवाजा सोडून मारुतीजवळ गल्लींत व पाटणकर यांचे वाड्याजवळ जाऊन उभे राहून हाका मारूं लागले. कवलांचे मारापुढें येऊं न पावत. तेव्हां आम्हीं दरवाज्यांत येत नाहीं पुढें गल्लींत उगेच बसतों मारूं नका असें म्हणों लागलें. उत्तम आहे म्हणोन मना केले. सोमवार एकादशीस जलस्पर्श नाहीं, मग अन्न कोठील. जाहले वर्तमानाच्या तात्यांस व नानास तीन वेळा चिठ्या पाठविल्या. तेव्हां कारकून पाठवून द्यावा म्हणोन उत्तर जासूद आला. याजवरून जिवबा व रावजी आपाजी यांस पाठविलें. ते तात्यांकडे गेले. दादोपंत व आयाशास्त्री तेथेच होते. त्यांचीं व यांची बोलणी बहुतच झालीं. त्यांतील सारांश तुमचा जो आबा गुरूबाबा तो स्वाधीन करा. नाहीतर ब्राह्मण ऐकत नाहींत. अग्रहास पडूं नका. पडल्यास पेचांत याल, गुन्हेगाऱ्या द्याल. माझें बोलणें नव्हे, सरकार आज्ञा समजोन करावी. तात्याही बोलूं लागले. उत्तर केलें जे, आबा आमचे घरीं नाहींत, कोठें दंग्यांत गेले तें समजलें नाहीं. दोन दिवस अन्न पाणी बंद. ब्राह्मण उठवावेत. आबांचा शोध करून येऊन सांगतील ती विनंती करूं तुम्हीं सरकारांतून काय सांगणें तें सांगा. पेणकर यांचें ऐकणार नाहीं. असें म्हटल्यावर आयाशास्त्री यांस व पेणकर यांस उठून जावें म्हणून निक्षून सांगितलें. तों तोफ झाली. परवानगीचे प्यादे दिले असतां ब्राह्मण उठले नाहींत. तिसरे दिवशीं त्रयोदशीस जिवबा व रावबा तात्यांकडे गेले. तात्या बोलले आबास कां हवालीं करीत नाहीं. लबाड कारभार. परिणाम लागणार नाही. म्हणून दाटून बोलू लागले. तेव्हां यांणीं उत्तर केलें जे, तोंड आटपून बोला. तुमचें सोसणार नाहीं. न्यायेंकरून सांगा, अगर सरकारांतून सांगा. त्यास राजी म्हणत असतां दापतां तरी आम्हीं जिवावर उदार मरतों. मग धंदा रोजगाराची काळजी कोणास. श्रीमंतांचें राज्य सोडून जावयाचें नाहीं. मरून राहूं. डोंचकीं मारा. अशीं निकडीची उत्तरें केली. नंतर दोनप्रहरीं दादोपंत येऊन ब्राह्मणांपाशी बोलून वाड्यांत आले. त्यांणीं उपोषित गृहस्थमंडळी बसली तें पाहिलें, निकडीची उत्तरें ही समजोन घेतलीं, आबांस हवालीं करा म्हणजे

ब्राह्मण उठवितों असें म्हणूं लागले. आबा आम्हांजवळ नाहींत व हें घडावयाचें नाहीं म्हणोन सांगितलें तेव्हां ते निघोन गेले. नंतर आमचे प्राण जातात पाणी पाहिजे. शेंपन्नास बाहेर पडोन नदीस जाऊन पाणी आणितों. यांत ब्राह्मणांच्या हत्या होतील. आम्हांकडे शब्द नाहीं. असें नानास लिहून पाठविलें. त्यांणीं दादोपंतास नेऊन त्यांस तात्यांकडेस पाठविलें. आया शास्त्री व बाबा फडके व दादोपंत यांस पाठवून दिले. ते दरवाज्याजवळ ब्राह्मणापाशीं येऊन आम्हांस बोलाविल्यावरून दरवाजा उघडून आम्हीं गेलों, आंत ब्राह्मण आले. त्यांणीं अतिशयेंकरून पागोटें जाळलें त्यांस नेऊं द्यावें. (?) म्हणोन शास्त्री यांणीं सांगितलें. त्यावरून पागोटें दिलें. झाले तें उत्तम झालें. तुम्हीं व ब्राह्मणांनीं कांहीं मनांत आणूं नये. उठोन जावें. असें सांगोन ब्राह्मणांस नमस्कार करावा. त्यावरून बोलणें पडोन आमचा गृहस्थ तीन दिवस उपोषित जानवें धोत्र विरहित आहे यांसी काय आज्ञा. त्यावरून धोत्र व जानवें द्यावें. उत्तम म्हणोन निरोप दिले. ते ब्राह्मण घेऊन गेले.

### पत्र २२ पो ॥ छ ९ जमादिलावल माघ मास.

पेणकरांच्या कज्याचा मजकूर पेशजीं लिहून पाठविला आहेच. त्या आलिकडे वद्य चतुर्दशीस सायंकाळी वे॥ गुरुबावा वे ॥ गंगाधर दिक्षित यांजकडे जाऊन शास्त्रीबावांनी मनास आणायांस सांगितलें त्यापासून आम्हीं तुम्हांजवळ आहों. ' पेणकरांनी दंगा केला म्हणून एकीकडे राहिलों. आतां तुम्हाजवळ आलों. ' राजश्री तात्यांकडे घेऊन चला, म्हटलें. त्याजवरून ते दिवशीं आबा आम्हांकडे आले. उदईक आज्ञा होईल तरी भेटीस घेऊन येतों, म्हणोन कारकूनाबरोबर सांगून पाठविलें. उत्तम आहे. तुम्हांजवळ असों द्या; आणवूं तेव्हां घेऊन या, असें उत्तर आलें. दुसरे दिवशीं अमावस्येस गुरुजीस दीक्षित घेऊन " तात्यांची भेट केली. भेटल्यावर " हे आमचे ओळखीचे नित्य पंडितांत येत असतात. " " पळालां कां " म्हणून विचारिलें. पेणकरांनीं दंगा केला विशोभा करतील म्हणोन एकीकडे राहिलों परंतु सरकारांत गंगाधर शास्त्री व त्रिंबक शास्त्री यांजवळ हजीर आहों आम्हांकरितां यजमानाकडे चौकी बसली ते उठवावी असे बोलले. नानांशीं बोलून उठवूं परंतु श्रावणी पासोन कोणंकडे कांहीं करूं नये, असें सांगितलें असतां यजमानाकडे कार्ये केलीं आहेत, म्हणोन पेणकर म्हणतात. असें रागें भरून बोलूं लागले. पेणकर म्हणतात, हें मुद्यानिशी आंमीं लावावें, म्हणजे अवज्ञा झाली ती कबूल करूं, नाहीं तरी सरकार आज्ञेप्रमाणें चाललों आहों. पुढें सांगाल तसे करूं असें उत्तर करून निरोप घेतला. गंगाधरशास्त्री यांस तुमच्या जिम्मेस असों द्यावे. म्हणोन निरोप दिला. ते दिवशीं गार्दी नानास विनंती करून उठवावे म्हणोन दादोपंतास त्यांनी सांगितलें. तो दिवस त्यांची गांठ न पडली म्हणून तसाच गेला. दुसरे दिवशीं परवानगी घेऊन गार्दी उठवून नेले. याजवर जिवबा तात्यांकडे गेले. तुमचे गुरूबाबा येऊन भेटले. मग चौकी उठविण्याविशीं रदबदली कां केली नाहीं. तेव्हां तात्या बोलले गुरूबावा केव्हां भेटले, कोठें होते, हें समजलें नाहीं. व चौकी परक्यांची नव्हती चौकीदार जाणारांस जाऊं देतो व येणारास येऊं देतो, मग दिकत ती कोणती ? तेव्हां मर्जीस येईल तेव्हां उठवाल. म्हणोन आलों नाहीं. असें बोलिले, तें ऐकून भोजनास गेले. दादोपंत बसले होते. ते बोलूं लागले जे, गोविंदराव बावा रामाजीबावा वेडे नव्हते. नारायणराव साहेबाजवळ लिहून दिलें तें समजूनच लिहून दिलें, त्याप्रमाणेंच वर्तावें. आग्रह करूं नका. यांत नऊ कलमें म्हणत नाहीं.

एक मंत्र व सीक (?) खेरीज करून करावें असें सांगूं लागले. लिहून घेणार व देणार गेले. त्या मागें तात्या आहेत. त्यांचे विचारास येऊन सरकारांतून सांगतील त्याप्रमाणें करूं उत्तर कां करितां ? तात्यावर निमित्त कां ठेवितां ? यजमानास जाऊन सांगतों. सांगतील तसें येऊन बोलूं असें म्हटलें. चार घटका बसा, तात्या भोजनोत्तर तुम्हांशीं बोलतील. तुम्हीं सांगितलें हेंच सांगणें होय. असें उत्तर करून निघून आले. त्याजवर द्वितीयेस शास्त्री यास सांगून पाठवून गुरुजीस नेले. पेणकर ब्राह्मणांशीं पंचमीपर्यंत तुमचा फडशा करून निरोप देऊं म्हणून करार केला होता. ती मुदत झाल्यावरून त्यांची गर्डबड आहे. फिरोन दंगाही करणार असें ऐकितों. तात्याकडे जाऊन आमची मुदत सरली. पुढें आज्ञा काय ? म्हणोन विचारलें. त्यावरून एका दों दिवशीं सांगूं म्हणोन उत्तर केलें असतां, आजच पेणकर मंडळी दादोपंताचे घरीं जाऊन बसली म्हणोन कळलें. त्याजवरून शोधास पाठविलें. त्यांस दादोपंतच नानाचे वाड्यांत भेटले. त्यांचे तोंडींही ऐकिलें आहे. खरें आहे. पुढें काय होईल तें समजेल तसें लिहूं.

### पत्र नंबर २४ पो।। छ २७ जमादिलावल

नाना मैराळ व सज्याबरोबरील पत्रें पावलीं, वडगांवचींही पत्रें पावलीं. ग्रामण्याचा मजकूर पेशजी लिहिला. त्याजवर तात्यांनीं जीवबास नानापाशीं नेऊन त्याजपासून पूर्वी नारायणराव साहेबीं समजोन केलें आहे. तुमचेही गोविंदराव बावा व रामजी बावा सर्व जात होते. त्यांणीं समजोनच पत्र लिहून दिलें. त्यास तुम्हीं रिकामे ओढितां तेही तसेंच चालावें असें बोलले. यांणीं जाऊन सांगतों असें उत्तर केलें. नंतर तात्यांपाशीं निरोप पाठविला. जें हें सांगणें व करणें पडतें. त्यास आमचें म्हणणें वावगें नाहीं. सर्व ज्ञातीचें म्हणणें सभा करून आमची ज्ञात कोण हें ठरवून द्यावें. नंतर सरकार आज्ञा, कर्मे सांगाल तशी करणें प्राप्त. परंतु सरकारांतून सांगणें तें विचारें सांगावें. असें म्हणून आले. त्याजवर आणखी जिवबास नेऊन सांगितल्याप्रमाणें पत्र परिच्छिन्न द्यावें. वादूं नये असें असतां त्यांनीं सांगितलें. यांणीं उत्तर केलें हा विचार सर्वांचे मुख्य रामराव बावा चिटणीस ते तेथें नाहींत व नीळकंठराव गंगेस गेले आहेत, त्यांस लिहून आणवूं. नंतर सांगणें तें सांगूं म्हणोन आले. तेव्हां पत्र देत नाहींत हें समजलेंच. त्याजवर ब्राह्मण येऊन दंगा करावा असा घाट आहे. आया शास्त्री यांजकडे एके दिवशीं ब्राह्मण बसले. असें चाललें आहे. आपा सासवडास गेले होते. तेही आल्यावर शेवट काय होतो हें समजेल. नेट सोडिल्यास ग्रासतात. जाणोन नेट सर्वांचा चांगलाच आहे. या प्रवाहामुळें कांहींच सुचत नाहींसें झालें आहे. वडिलांचा आशिर्वाद काय शेवटास लावील तें खरें. भार एक श्रीवर आहे. वरकड कोणी बोलावयास जागा किंवा आश्रय नाहीं हें समजलेंच आहे. आबालवृद्ध दगडमार करितात तितके सोसून होईल तसें शेवटपर्यंत पहातां निर्वाह करणार श्री समर्थ. वरकड यातना कोणतीही सोसणें बाकी राहिली नाहीं. झालें वर्तमान कळावें. होईल तें मागाहून लिहूं. मोठा दुराग्रह. नारायणराव यांणीं लिहून घेतलेली यादी त्याप्रमाणें मान्यतेची करून द्यावी. याबद्दल हरतऱ्हेनीं ज्ञातीस कर्मांची अडचण व राजश्री हें प्रकरण फंद फितूर वगैरे तुफान आदावती उपमर्द करणें हें सत्तांबळें व ब्राह्मणवाद आणि राजेपणाचें स्वामित्व, त्यांचे घरीं अधिकार जबरीमुळें आला. त्याबळें ज्ञातीस

त्राता नाहीं. शास्त्र व विचार न पाहतां उपहास चालला. तेव्हां सर्वांनीं विचार केला कीं, जे ते जबरदस्ती जुलूम करतील ते सोसावे. जसा प्राण वांचेल तसा वांचो-मरेल तो मरो. ईश्वरेच्छा. ईश्वरानें डोळे झांकिले. जे दिवशीं उघडून पाहील ते दिवशीं सुदिन, परंतु एकवेळ नारायणरावाचे कारकीर्दीत लिहून घेतलें, तसें आणखी देणें हें तरी याउपरी परिच्छिन्न घडावयाचें नाहीं. प्राण गेले तरी जावोत. असा निश्चय होऊन उत्तरें साफ केल्यावरून महालोमहालीं सरकारी पत्रें नारायणराव यांचे कारकीर्दीस नऊ कलमें यादी अन्वयें पत्रें घातलीं.

याप्रमाणें उपहास मांडला. बडबड झाली. असा सहा वर्षे काल काढला, त्या त्या तऱ्हेनें निर्वाह कळेल तसा केला, परंतु कबूल किंवा टांकास गुंतणें हें केलें नाहीं. नंतर शके १७१७ राक्षसनामसंवत्सरे सन खमस तिसैन मया व अल्लफ आश्विन शुद्ध १३ त्रयोदशीस माधवराव नारायण प्रधान गणपतीचे दिवाणखान्यांतील खिडकींत उभे होते. भाद्रपदापासून भ्रमिष्ठ होतेच. खिडकींतून उडी टाकिली. पाय मोडून मांडीचें हाड मोडलें. आश्विन शुद्ध पौर्णिमेस काळ झाला. ग्रामण्य उपद्रव वगैरे समाप्त झाला. राज्यक्रांतीची फिकीरच प्राप्त झाली. नंतर बाजीराव रघुनाथ आले. त्यास वस्त्रें झालीं. आपले ज्ञातिमंडळींनीं बाजीराव यांस विनंती केली कीं, सात वर्षे ग्रामण्य पडलें, त्यावरून त्याणीं आपले हाते विनंतीचिटीवर तीन ओळी स्वदस्तूर लिहून दिल्या. चिटी नीळकंठराव रामचंद्र पागे यांचे हातची आहे ती.

**चिटी नीळकंठराव रामचंद्र याणें बाजीराव रघुनाथ पेशवे यांस विनंती लिहिली ती—**

शेवेसीं विज्ञापना, आमचे ज्ञातीचें ग्रामण्य सात वर्षे पडले आहे, त्यास कैलासवासी श्रीमंत नानासाहेब व श्रीमंत दादासाहेब व श्रीमंत थोरले माधवरावसाहेब यांचे कारकीर्दीत मुंजी व श्रावण्या वगैरे संस्कार चालत आले त्याप्रमाणें पुढें चालवावे.

बाजीराव रघुनाथ प्रधान याचीं चिटीवर स्वदस्तूरचीं अक्षरें. पूर्वीपासून चालत आलें त्याप्रमाणें चालावयास येईल. नवीन आक्षेप पडला आहे तो मजकडून पडणार नाहीं.

या ग्रामण्यासंबधानें आणखी जे कागद उपलब्ध झाले आहेत ते खालीं दिले आहेत :—

**(१) बाजीराव रघुनाथ पेशवे याचें पत्र**

वेदशास्त्रसंपन्न समस्त ब्राह्मण धर्माधिकारी ज्योतिषी क्षेत्र प्रयाग स्वामी गोसावी यासी. सेवक बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार सु॥ तिसेन मया तैन व आलफ समस्त दालभ्य कायस्थ प्रभु चांद्रसेनीय याचा व पेणकर ब्राह्मण याचा प्रभुचे आचरणाविषयी कजिया पडून आठ नऊ वर्ष ग्रामण्य वाढले. पेणकर ब्राह्मण याणी सरकारची पत्रें घेऊन प्रांतात पाठवून प्रभुकडील कर्मं बंद केली. सबब प्रभु व ब्राह्मण सरकारांत फिर्याद आले. त्याजवरुन उभयतांचे सरकारांत लेहून घेऊन शिष्टसमते मनास आणिता पूर्वीपासून प्रभुचे घरी कर्मं चालत आहेत त्याप्रमाणे पुढेही चालवावी असे ठरले. त्याजवरून हे पत्र सादर केले असे. तरी त्या प्रमाणे पूर्वापार गागाभट्टीप्रमाणे प्रभू याजकडे कर्में चालत आली त्याप्रमाणें पुढेही चालवीत जाणे. दिकत न करणे. जाणिजे छ. २९ जिल्काद. बहुत काय लिहिणे मोर्तब सु ॥.

## (२) पुण्याच्या ब्राह्मणांचें पेणकर ब्राह्मण यांस पत्र

स्वस्ती श्रीमत् सर्वोपयायोग्य वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री समस्त ब्राह्मण यांसी.

प्रती नारायण जोशी प्रमुख समस्त पेणकर मुक्काम पुणें याचा कृतानेक शिर सा॰ नमस्कार विशेष. आपण पत्र पाठविले ते पावले. प्रभुमंडळीकडे कार्य प्रयोजन चालविण्याचा अडथळा आहे त्यास श्रीमंत रा॰ लक्ष्मणराव तात्या याणीं आम्हास लिहिले होते. त्याचे उत्तर येथून पाठविले आहे. त्याची नक्कल तुम्हाकडे पाठविली आहे. त्याजबद्दल दरबारी गृहस्थाचा जाबसाल पडेल तो आपण करून निभावणी करावी. गागाभट्टीची पोथी साद्यंत प्रयत्नें करून आणविली म्हणोन लिहिले त्यास तुमचे लिहिल्यावरून गागाभट्टीचे पुस्तक संपूर्ण पाहिले. त्याप्रमाणें चाल चालत आली आहे. त्या पुस्तकाअन्वये यथास्थीत आहे. त्याप्रमाणें चालवावे. कोणते गोष्टीविषयी दिकत घेऊ नये. तूर्त सरकारांतून सरकार ब्राह्मण चालवावयास देतील त्याचे हातून यथापूर्वक चालत आले त्याप्रमाणें पुढेही चालवावे. कोणेविषयी अडथळा पडू देऊ नये. पूर्वापार चाल चालत आली आहे त्याविषयी संशय कोणास असल्यास त्याणी संशयनिवृत्ती करण्यास पुण्यास यावे. संशयनिवृत्ती होईल. कळावे बहुत काय लिहिणे. कार्तिक शु॥ ९ रविवार. हे विनंती. शके १७०९ प्लवंग नाम सं॰

## (३) पेशवे श्रीमंत माधवराव नारायण यांचें आज्ञापत्र

वेदशास्त्रसंपन्न राजश्री समस्त ब्राह्मण व धर्माधिकारी उपाध्ये जोतिषी प्रां॥ कऱ्हाड स्वामी गोसावी यांस.

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सु॥ तिसैन मया व अलफ को॥ पेण पो॥ साकसे येथील समस्त ब्राह्मण याणीं हुजूर येऊन निवेदन केले कीं श्रीमंत कैलासवासी नारायणराव साहेब यांचे कारकिर्दीत परभूचे कर्माचरणाविशई सरकारांतून ठराव करून दिल्हा त्याप्रमाणें त्याणीं वर्तावें. तें न करितां आपला धर्म सोडून मनश्वी वर्तणूक करून चोरून ब्रह्मकर्मे करितात येविसी त्यास ताकीद होऊन बंदोबस्त जाला पाहिजे म्हणोन त्याजवरून मनास आणितां पेशजी कैलासवासी तीर्थरूप रावसाहेब यांचे वेलेस चौकशी होऊन परभूचे वर्तणुकेविसी कलमांचा ठराव जाला त्या प्रे॥ त्याणीं सरकारांत कतबा लेहून दिल्हा त्यांतील कलमें बितपसील.

**या ठिकाणीं आधुनिक पुणेंकर संशोधकांना आनंदाच्या गुदगुल्या उत्पन्न करणारा व नारायणराव पेशव्याच्या चितेवर पावन झालेला पृ॰ ३९ वर नमूद केलेला नऊ कलमी कतबा दिलेला आहे.**

—येणे प्रमाणें नवकलमें लेहून दिल्ही असतां परभू आपले घरीं चोरून ब्रह्मकर्मे करितात यामुलें पेणकर ब्राह्मणाचा व त्यांचा कजिया वाढोन परभूचे घरचीं सर्व कर्मे बंद जाली त्यास येविसीचा हालीहि विचार करितां परभूचे कर्माचरणाविशई पेशजी चौकसी होऊन कलमें ठरावून दिल्ही आहेत त्याप्रमाणें त्यांणीं वर्तावे ते न करितां आपला धर्म सोडून चोरून मनश्वी वर्तणूक करितात हे आनुचित. पेशजी कलमे ठरावून दिल्ही आहेत तीच योग्य ऐसे शिष्ट संमते ठरोन पुण्यांत परभूचीं घरें आहेत त्यास हुजूर ताकीद करून हें पत्र तुम्हास सादर केले असे. तरी

प्रां मा।र येथें परभूचीं घरें असतील त्यांस निक्षूण ताकीद करून सदरहू कलमाप्रमाणें वर्तवीत जाणें. जाणिजे छ. २३ जमादिलाखर आज्ञाप्रमाण.

लेखनसीमा.

बार.

ग्रामण्यांच्या बखरींतला मजकूर वरवर पाहून आपलें मत बनविणारांना सकृद्दर्शनीं असें वाटण्याचा संभव आहे कीं नाना फडणीस ग्रामण्याच्या भानगडींत स्वतः मुळींच पडला नाहीं, उलट त्यानें बंडखोर ब्राह्मणांना वेळोंवेळीं समज देऊन ग्रामण्याचे बखेडे करण्यापासून परावृत्तच केले. परंतु कायस्थ प्रभूंच्या धार्मिक हक्कांबद्दल त्याचें स्वतःचें मत काय होतें, कायस्थ प्रभूंवर होत असलेला छळ व जुलूम हे वाजवी होते कीं अन्यायाचे होते, हें मात्र स्पष्ट व्यक्त न होऊं देण्याइतकी आपल्या वर्तनाची सफाई त्यानें ठेवली होती खास. तथापि बखरींतील पत्रव्यवहाराच्या त्रोटक विवेचनांतून दृष्टी काढून, इतिहासाच्या विस्तृत क्षेत्रांत प्रत्यक्ष प्रवेश करून चोंहोंकडे दृष्टी फेंकली तर मात्र असेंच प्रत्ययाला येईल कीं ग्रामण्याच्या रंगभूमीवर स्वतः तटस्थपणाचा मुखवटा घालून देवपार्टी आणि राक्षसपार्टी यांची तोंडमिळवणी करण्याचा नाना फडणीसानें जो पार्ट केला तो निवळ पार्टच होय आणि नाटकांतल्या सर्व प्रमुख-प्रमुख पात्रांचीं सूत्रें तोच स्वतः अलिप्त राहून गुप्तपणानें हालवीत असावा. श्रीशिवछत्रपति–वंशज सातारकर यांच्या वेदोक्ताचा प्रश्न इतका हडसून खडसून सिद्ध झालेला असतांनाहि, ज्या अर्ध्या शहाण्या नानानें त्यांच्या घराण्यांतली चालू वैदिक कर्मे बंद पाडवून तेथें मुद्दाम पुराणोक्ताचा प्रघात पाडला, तोच नाना चां. का. प्रभूंच्या ग्रामण्यांत अगदी साधूप्रमाणें वागला असेल असें म्हणणें किंचित् धारिष्टाचें होईल. काशीच्या ब्राह्मणांस नाना फडणीसानें जें पत्र लिहिलें त्याचें आलेलें उत्तर वर दिलेंच आहे. हा इतका उपद्व्याप नानासारख्या चतुर मुत्सद्यास करण्याचें कारणच नव्हतें. गागाभट्टासारख्या अग्रगण्य पंडितानें ज्या गोष्टीचा निकाल कधींच कायमचा लावून टाकला होता, त्याच प्रकरणीं पुन्हां काशीच्या पंडितांचें मत घेण्याचें कांहींएक प्रयोजन नव्हतें, ही गोष्ट नानासारख्या साडेतीन शहाण्यांत मोडणाऱ्या मुत्सद्याच्या ध्यानांत येऊं नये हें विलक्षण होय! पण वस्तुस्थिती मात्र तशी नाहीं. नारायणरावाच्या कारकिर्दीत सखाराम हरीच्या व निळकंठराव पाग्यांच्या तलखपणानें भेदरून जाऊन, नारायणरावाला धरण्याच्या कटाची कुणकुण कळली असतांनाहि खुनाच्या आदल्याच रात्रीं नाना पुण्याहून सासवडाला पळून गेला. या त्याच्या पलायनाच्या मुळाशीं ग्रामण्याच्या भानगडीचा संबंध असावा असा तर्क आहे. इतिहाससंशोधन जसजसें होईल तसतसें याहि मुद्याचें स्पष्टीकरण केव्हां तरी होईल असा भरंवसा वाटतो. परंतु सवाईमाधवरावाच्या वेळचें जें आज्ञापत्र वर दिलें आहे तें आमच्या या तर्कास पुष्कळच बळकटी आणणारें आहे. सवाईमाधवराव ता. १८ एप्रिल सन १७७४ मध्यें जन्मला. वरील पत्राची तारीख फाल्गुन वा। १० शके १७११ सन १७८९ आहे. अर्थातच त्यावेळीं सवाई माधवरावाचें वय अवघें १५ वर्षांचें होतें. त्याला मरेपर्यंत नानाचा प्रतिबंध व कांच भयंकर होता. त्याला कोणतीही गोष्ट मुखत्यारीनें करितां येत नव्हती, हें महशूरच आहे. तेव्हां वरील आज्ञापत्र नाना फडणीसाचेंच होय यांत शंका नाहीं. शिवाय असल्या भानगडीच्या प्रकरणांत स्वतंत्र बुद्धीनें आज्ञापत्र काढण्याइतकें सवाईमाधवरावाचें वयहि नव्हतें.

सातारच्या महाराजाच्या घराण्यात वेदोक्त कर्मे बंद करून तीं पुराणोक्त विधीनें नानानें चालूं केलीं या संबंधानें एक पत्र उपलब्ध झालें आहें ते असें :

नाना फडणविसाचें पत्र.

श्री.

राजश्री बाबुराव स्वामीचे शेवेसी–

विनंती उपरी तुम्ही पत्रे पाठविली ती पावलीं राजश्री स्वामी यांची मुंज्य वैशाख वद्य पंचमीस आठ घटकाचे मुहूर्तावर समारंभेकरून जाहली पुढें लग्नाचा समारंभ उत्तम जाहाला पाहिजे पाच–सात दिवस अवकाश असावा याजकरिता जेष्ठ शुद्ध द्वीतीयेस लग्नाचा तीथीनिश्चय केला आहे **पुराणोक्त विधीनें मुंज्य जाहाली येणेंकरून बाईसाहेब आदिकरोन सर्वांस संतोष वाटला** किल्याखालीं उतरावयाचा मुहुर्त द्वादसीस योजिला आहे त्यास दोनसे स्वार चांगलें समागमें येक कारकून प्रामाणिक असे मुहुर्तापूर्वी येथें लौकर पाठवावे आज्ञेचे लक्ष धरुन पंधरा हजार पावेतों कार्य उरकून घेतों म्हणोन लिहिले तें सविस्तर कललें **असीयास श्रीमंत माहाराजाची मुंज्य वद्य पंचमीस पुराणोक्त विधिकरून बाईसाहेबांस संतोष वाटून जाहाली ही गोष्ट तुम्ही फारच उत्तम केली.** . . . . . . . . . . . . . . . .जेणेंकरून चांगले दिसे ते तुम्ही कराल हेच समजले आहे. . . . . . . . . . . . . . . . .ता।। छ. २३ रा।खर हे विनंती. पै।। छ. २४ रा।खर.

**(प्रो. डोंगरेकृत सिद्धांतविजय, परि. पृ. १०६.)**

आमच्या जवळील एका अप्रकाशित बखरींत खालील मजकूर आहे :—

माधवराव नारायण पेशवे यांचे कारकिर्दीत काशिनाथ आबा गुरुबोवा याणीं नाना फडणीस व हरिपंत फडके याणीं चांद्रसेनीविसी दुराग्रह करू नका तुम्हास पाच हजार रुपयेचा गाव इनाम करून देतो बोलले. ते न ऐकता व्रत्तीचा लोभ धरून पंडितास कुंठीत केले. तेव्हां बाजीराव पेशवे याणी धर्म चालवण्याविसी पत्रे दिल्ही.

**दुसऱ्या एका अप्रकाशित बखरींत माहिती आहे ती**

(नारायणरावाची चिठी दादासाहेबानीं सखाराम हरीस परत दिली) हें हरीपंतास माहीत होते. त्याणी व आपा बळवंत याणीं एकविचार करून नाना फडणवीस याजला समजाविलें कीं ब्राह्मणांचा आणि प्रभुंचा कांहींच भेद समजुती येत नाहीं. याजकरितां त्याजला आचाराविषयीं शिक्षा जाली पाहिजे. येविषयीं यमाजी शिवदेव याचे कारकिर्दीत ग्रामण्य जाले. ब्राह्मण बहुत मिळाले परंतु ज्ञातनिर्णय जाला नाहीं. भाऊसाहेब पाणपतास जातां या लोकांस बोलाविले असतां बराबर गेले नाहींत. असे उन्मत्त. यास्तव परत आल्यावरी समाचार घेऊं बोलले ते बहुतेकांचे श्रवणी आहे. आज्ञा जाली असतां त्यांचे शब्दापासून व धर्मसंस्थापनेपासून मुक्त होऊ. असें बोलता नानानीं उत्तर केलें कीं या गोष्टीचा साहस ज्याणीं केला त्याचे कल्याण जाले नाहीं. भाऊसाहेब परत कोठें आले तेव्हां तुम्ही आग्रह धरू नये. त्यासमयी हरीपंतानीं पुन्हां उत्तर केले कीं ती गर्दी जाली त्यांत आपण होता. केवळ प्रभुमुळे नाश जाला. सर्वांचा एकवेळ समाचार

घ्यावा असे मनांत येते. आज्ञा जाली पाहिजे. नाना भिडेमुळे उगेच राहिले. हरिपंतानीं पडते फळाची परवानगी घेऊन प्रांतांत कागद पाठवून ब्राह्मण पुण्यास जमा करून ग्रामण्य केलें. पुढें त्रिंबकराव तात्या चिटनिवीस याचे वाड्यावरी ब्राह्मण चालोन जाऊन कलागत केली. मारामार होऊन ब्राह्मण श्रीमंताकडे रुबरू फिर्यादीस गेले. सवाईमाधवराव पेशवे याणीं तुम्ही परभारे जाऊन कलागत करून मार खाता आणि फिर्यादीस येता. आम्ही त्याजवर जुलुम कसा करावा तुम्ही दांडगाई करून त्यांचे घरी का गेला. आम्हास विचारू नका. तुम्ही ते मरा असे बोलल्यावरून त्याणी तीच रजा जाली मानून पुन्हा जाऊन दगड नल्ये घरावर फेकू लागले. घरांत वागण्यास अडचण धोंडा बसण्याचे भय होऊन त्याचे वाड्यांत सात आठसे स्वज्ञात होती त्याणीं सोडगी जळाऊ लाकडे आणिली. त्यांतील एक एक उचलोन धावले. आणि मारीत गणपतीचे दरवाजापर्यंत काढून लाविले. मोठा दंगा माजला. सरकारांत जाहीर जाले. चिटणीस, पोतनीस, निलकंटराव, हैबतराव, शंकर नारोलकर, खंडेराव दौलत वगैरे बोलावून नेऊन विचारले. याणीं सांगितले प्राणच घेण्यास ब्राह्मण आल्यावर साप जंगलात राहतो परंतु सेपुट उडवले म्हणजे चावतो. तसे आम्हास मारू लागल्यावर त्यांचे तोंडाकडे पाहणे कसे घडेल ? या करितां मारले. आतां धणी आहांत पाहिजे तसे करावे. ऐकून घेऊन तुम्ही पंचाइतिस राजी शास्त्रार्थास आहा कीं नाहीं. याणीं उत्तर केले कीं गीता गंगा ठेवून पंडित सांगतील त्यास कबूल आहो. बरे म्हणून उत्तर जाले. विचार करितां रामशास्त्री याणीं उत्तर नानास दिल्हे कीं त्यांचे स्त्रियानीं पाक केला असतां आपण जाऊन जेवावे त्याणीं वाढावे त्यांत भेद नाहीं. ते आपण एकरूप. असें सांगता सभा करणें राहिले. पुढें माधवराव नारायण हवेली वरून पडले, वारले. नंतर बाजीराव रघुनाथ आले त्याणी सनदा माहालोमाहाली देऊन मोकलीक केली.

**रा. वि. का. राजवाडे यांनीं मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड ६ यांत ज्या दोन जुन्या याद्या प्रसिद्ध केल्या आहेत त्यातील मजकूर :—**

(१) लेखांक ४४४.

ग्रामण्य माधवराव नारायण शके १७१४ ता।। १७१८ काशीहून पत्रें सरकार श्रीमंतास आलीं. नंतर (आपाशास्त्री) पंचाईत झाली. सोडचिठ्ठीचीं पत्रें बाजीराव रघुनाथ यांची झाली. एकवेळ याद जाली राहिली. दुसऱ्यानें पत्रें जाली

(२) लेखांक ४५९.

पेशव्यास राजधानी प्राप्त झाल्यावर संपूर्ण ब्राह्मणमंडळी वेदविद्याअधीत. क्षत्रिय चांद्रसेनीय लेखन विद्येंत प्रवीण उदरनिर्वाह करून होते. सबब बराबरीनें वागले. चांद्रसेनीय थोडे, ब्राह्मण फार म्हणून द्वेष वाढला. परंतु कर्मलोप जाहला नाहीं. आपाजी यशवंत बिरवाडी त।। रायगड, पेणचा मामला सरकार अमलांत ब्राम्हणांनीं दंगा केला म्हणून सरकार हुकूम मार्गाचा सांगता दुराग्रहावर येऊन गैरसमजूत हरी बल्लाळ फडके यास समजाऊन ग्रामण्य केले. तेव्हां रामशास्त्री प्रभुणे माहुलीकर यास नानाफडणीसानीं चिठी पा।। याचा शास्त्रार्थ कसा ? त्याचे उत्तर त्यांनीं पाठविले या करण्यानीं फार मेले यश आले नाहीं. आपण कजियात पडूं नये. तेव्हां याची प्रचीत

पाहणें, हरीपंत बोलोन, शके १७०९ प्लवंग संवत्सर, सनसमान समानीन मया व अलफ, उत्पन्न केले. शास्त्री वर्तमान तावत्काल ग्रामण्य जालें नाहीं. बंद होतें नंतर शके १७११ कार्तिक शु।। ३ रामशास्त्री वारले. आपाशास्त्री अधिकारी जाले न्यायाधिशींत. तेव्हां सनदा पाठवून कर्म बंद केलें. अग्रहास हरीपंत पडले. आपाशास्त्री यास आरोप आणला. त्यानीं सन्यास घेतला. शके १७१६ आनंदनाम संवत्सरे ज्येष्ठ शु।। ७. नंतर माघमासीं मोंगलावर श्रीमंताची स्वारी तयारी झाली. खर्ड्यावर फत्ते झाली. आश्विन शु।। १२ श्रीमंतानीं उडी टाकलीं. पुढें चिटणीस व निळकंठराव व रावजी आपाजी यांनीं बाजीराव प्रधान यांची रजा घेऊन पत्रें सरकारचीं माहालोमहालीं घेऊन कर्म मोकळें केलें. त्या शास्त्र्यांत पंडित यांचीं नांवें :—

| | |
|---|---|
| १ बाळशास्त्री टोकेकर. | १ त्रिंबकशास्त्री. |
| १ नरसिंहशास्त्री गुर्जर | १ सूर्य नारायणशास्त्री. |
| १ परशरामशास्त्री | १ बाळशास्त्री चंदावरकर. |
| १ रामचंद्र दिक्षित बाम | १ त्रिमलाचार्य. |

यांनीं सनदा चांद्रसेनीस शके १७१९ पिंगलनाम संवत्सरे समान तिसैन मया अलफ वैशाख मासीं पुढें आपाशास्त्री काशीस गेले. काशीकरांनीं पत्र पाठविलें. त्याचें उत्तर इकडून गेलें. पुढें शके १७३९ इंग्रजी झाली.

---

# ग्रामण्य दहावें

## चिंतामणराव पटवर्धन व नीळकंठशास्त्री थत्ते यांचें ग्रामण्य.

**शके १७४९ इ. स. १८२७**

**प्रतापसिंह महाराज कारकीर्द नीळकंठशास्त्री थत्ते व बाळाजीपंत नातू व चिंतामणराव आपा पटवर्धन सांगलीकर हे प्रमुख होऊन ग्रामण्य केलें यांतील हांशील.**

नीळकंठ शास्त्री थत्ते यांणीं उद्योग मनांत आणिला जे, बडोद्यास विठ्ठलराव देवाजी प्रभू गायकवाड यांचे दिवाण यांजकडील जीवनराव मल्हार प्रभू वकील निसबत गायकवाड यांशी बोलणें घातलें जे. विठ्ठलराव दिवाणजी हे दैववान निघाले. बहुत धर्म करीत आहेत. आपले ज्ञातींत कुलदीपक झाले आहेत. त्यांस ज्ञातीविषयीं पेशजीं ग्रामण्यें बहुत झालीं. परंतु निर्णय खास ठरून झालें नाहीं, त्यास मी अनुकूळ आहें. सर्वत्र अनुकूळ करून घेऊन शास्त्रग्रंथ मिळवून व तुमचे ज्ञातीपाशीं असतील तेही आणवावे. आणि निर्मळ कर्म, धर्म, चांद्रसेनी ज्ञातीचे जे तुमचे आहेत ते ठरवून सर्व सम्मतांनीं करून देतों. कांहीं धर्म, खर्च असा जो करितात तो माझे विद्यमानें, या निमित्तें केलें असतां ज्ञातीचा उद्देश सत्पात्रीं धर्म यथायोग्य होईल व मलाही काशीस जाणें आहे, त्या मार्गें येंईन माझा सत्कार होऊन काशीयात्रा परिपूर्ण होई अशी संभावना व्हावी. बहुत कांहीं म्हणणें आहे असें नाहीं. पांचपंचवीस हजार आपण केले असता सहजीं होईल. याप्रमाणें सफाईचीं बोलणीं केलीं. यावरून यांणीं उत्तर केले कीं, मी सर्व कच्चा आपला मनोदय

लिहितों परंतू आपलें आशीर्वाद पत्र असावें. म्हणजे माझे लिहिण्यास नीट पडेल. त्याजवरून नीळकंठ शास्त्री यांणीं पत्र लिहून दिलें तें विठ्ठलराव देवाजी यांचें नांवचें. त्यांत चिरंजीव म्हणोन पिता पुत्रवत् मजकूर—कोकणांत कांही खटलें पडलें आहेत तो मजकूर चिरंजीव राजश्री अमृतराव बाबा व राजश्री जीवनराव दिवाणजी यांस विदित केला. त्याविशीं ग्रंथ शोध करीत आहों. त्या प्रांती याचा शोध आपलाही असेलच शोध करून इकडे रवाना करावा. त्या ग्रंथांवरून विचार करून ठेविला असतां उपयोगी फार होईल येविशीं लिहून काय कळवावें. म्हणोन नीळकंठ शास्त्री यांचे पत्र.......नंतर सखाराम हरीचे पुत्र रामराव आण्णा देशी आले होते. ते परत बडोद्यास जातां ते विठ्ठलराव दिवाणजींचे व्याही त्यांस अमंत्रण करून भोजनास नेऊन पोशाख दिला. आणि या ज्ञातीप्रकरणीं विठ्ठलराव दिवाणजीस बोलणेंचे पर्याय सर्व मज़कूर लिहून बडोद्यास रवाना केले आहेत. त्यावरून दिवाणजीस बहुत संतोष व आवड होतीच. शास्त्रीबावांशीं बोलणें केलें. शास्त्रीबावांचे बोलणें पडलें जे, सर्व अनुकूळ समाधानें करून जे अनुकूळ होतील त्यांची संमतें करून घ्यावीं. असें सांगितलें. त्याजवरून राघवाचार्य रामानुज आदिं करून यांचे शास्त्रांची विवक्षा होऊन अनुकूलता झाली. आणि संमताची याद शास्त्रनिर्णय शास्त्रार्थ चांद्रसेनीय ज्ञातीचे ठरावून लिहून दिलें याजवर नीळकंठ शास्त्रीं थत्ते यांस हें सर्व वर्तमान कळल्यावर त्यांचें बुद्धीस भ्रंस झाला कीं, आपणांस लाभ मनाजोगा होत नाहीं व आपण आपले हात राखून दाब ठेवून उपकार दाखविणें, जरब देणें, हें कांहीं राहिलें नाहीं. झालें हें नीट न झालें. याजवरून जीवनराव वगैरे यांस बोलावून नेऊन बोलणें केलें जे, तुम्हीं राघवाचार्य प्रमुख मंडळीच्या संमतांची याद केली, याजवरून कांहीं शास्त्री मंडळी वगैरे 'आमचे ज्ञातीचे यांणीं फाट खाल्ला आहे कीं, ते सर्व मंडळीस अनुकूळ करून शास्त्रार्थ वगैरे करण्याचें कारण काय ? आम्हीं पांच सात मंडळी व आपण मिळून याद ठरवून दिली असती.' याजवर आम्हांशीं व आपल्यासारिखे महापंडितांशी बोलावयाचें सामर्थ्य पृथ्वींत दुसरें कोणास आहे ? त्यास असें करणें केलेंत, यामुळे फाटाफूट होती असें दिसतें. मला या मंडळींत बसणें प्राप्त येईल उपाय नाहीं. असें बोलल्यावर यांणीं उत्तर केलें कीं, सर्व आमची मदार तुम्हांवर. तुम्हीं हें सर्व उपस्थित करुन हल्लीं हें सांगतां याजवरून आंश्चर्य वाटतें, आपले मनांत काय आहे तें सांगावें. त्याजवरून उत्तर केलें कीं, असें तुम्हीं म्हणतां त्यास मी कांहीं तुम्हांस सांगितलें नाहीं. व बोललों नाहीं. तुमचा लबाड कारभार, माझा मला विचार पाहणें प्राप्त. तुम्हीं मजकडे येऊं नये. माझे गळां पडूं नये. या उपर तुम्हीं बोलणीं बोलू लागल्यास मला कळेल ती रचना आतां करणें प्राप्त आहे. असें अंती संतापून नीतिमानावर जाऊन यांस निरोप दिला. नंतर यांणीं राघवाचार्य आदि शास्त्रीमंडळ यास हा मजकूर श्रुत केला. शास्त्रीबाबा अनुकूळ होऊन इतका ग्रंथ करवून हल्लीं नांश करावयास प्रवृत्त होतात, याजवरून हें या सर्व मंडळींनी निश्चय करून सांगितले कीं, नीळकंठ शास्त्री याचे बडोद्यांस बजिन्नस दस्तऐवज असतां आपणच उद्भव करून असें मत्सरपणास प्रवर्तलां त्यास आम्ही सर्वत्र अविद्वान आहोंत आणि ते विद्वान आहेत असें नाहीं व आम्हीं जें केलें तें शास्त्र पाहून विचक्षणा करूनच केलें आहे. काय आम्हांशीं बोलतील त्याचे उत्तरास आम्ही हजर आहोंत. नीळकंठ शास्त्री यांचे व्याही बाळाजीपंत नातू हे इंग्रेजी सरकारांत पेशवे दरबारीं यामुळें पटवर्धन रास्ते, ढमढेरे आदिकरून मुत्सद्दी मातबर व कोंकणस्थ ज्ञाती,

शास्त्री पंडित हा तट ; व राघवाचार्य रामानुज व वज्रटंक शास्त्री आदि पंचद्रविड मोठे विद्वान त्यांत राघवाचार्य इंग्रेजी सरकारांत शाळेच्या कामावर मुखत्यार व चिंतामण दीक्षित व वज्रटंक शास्त्री व सखाराम शास्त्री व नारायण शास्त्री प्रभृति मंडळीचा हा येक तट होऊन दुफळी झाली. ते आपल्या मंडळीच्या संमताच्या यादी करूं लागले. करवीर स्वामी पुण्यास जाण्याचे बेतानें नगरानजीक किल्ले सातारा या मार्गे जाण्याचे अशा बेतानें क्षेत्र माहुली मुक्कामी आले. तेथें श्रीमन्महाराज राजश्री. छत्रपति स्वामीची स्वारी शके १७४७ ज्येष्ठ व ॥ एकादशीस श्रीकृष्णास्नास गेली. तेथें श्रीस्वामीचें दर्शन घेतले. स्वामींनीं पोषाख तीबट दुपेटा जवाहीर कंठी शिरपेंच प्रसाद दिला. सातान्यांस येण्याविशी आमंत्रण केलें. सरकारस्वारी आली. दुसरे दिवशीं मुत्सद्दी मंडळी पंडितराव व शास्त्री सारे सामोरे जाऊन-आणिले. ठकार दीक्षित यांचे वाड्यांत जागा देऊन ठेविले. सामान सरंजाम सरकारांतून दिला. दुसरे दिवशी स्वामींनी मुत्सद्दी मंडळी यांचे घरी जावें. पादपूजा घ्यावी. असें ठरल्यावरून पंडितराव यांचे घरीं गेले. बळवंतराव चिटणवीस यांणीं ही विनंती केली. तों स्वामींनी सांगितलें कीं, कोठें जाऊं नयें. असे महाराजांनी सांगितलें तेव्हां कसें करावें ? आम्हीं बोरगांव जैतापुरी गेलों आहों. भिक्षा घेतली. भोजन झाले आहे. त्याजवरून महाराजांस विनंती केली. तेव्हां आज्ञा झाली कीं. सांगितले होतें खरें परंतु सर्वांचेच घरी जावें असें सांगतों म्हणोन त्यांजकडील कारकून गोविंदराव हणमंतराव यांस बोलावून सांगितलें. त्याजकरून अमात्यपंत गोविंदराव दिवाण यांचे पुत्र, दाजी उपाध्ये, केशवराव अगटे, नाना अगटे, बळवंतराव बक्षी यांचे घरी स्वामींची स्वारी जाऊन पादपूजा झाली. पुनः बळवंतराव चिटणीस यांणीं विनंती केली कीं, स्वारी घरीं यावी, मंडळींचें भोजन व्हावें, पूजा घ्यावी, यास दिवस मुकरर करून सांगावें. त्यास काका दीक्षित व्यास ही तेथें होते. त्यावरून उदईक शुक्रवारी आषाढ शुद्ध १ प्रतिपदेस सरकारास मेजवानी आहे. द्वितीयेस ब्राह्मणमंडळीस भोजन आहे. तृतीयेस रविवारीं येतों अशी आज्ञा झाली. त्यावरून तरतुदीस लागले. आणि शुक्रवारी पुनः जाऊन अमंत्रण केलें. दीक्षित ही होते. ते बोलले कीं, जागा स्थल पहावें. चार पाणके येथील येतील त्यांस जागा पहावी. आच्यारी गांवांतील करावे तेहे आल्यास उत्तमच आहे. तेव्हां काकास सांगितले कीं तुम्हीं जाऊन पहावें व करावें. तेव्हां काका दीक्षित घरीं येऊन जागा पाहून सोंप्यांत स्वयंपाक करावा मागील दुजोडी व माजघर भोजनास जागा करावी. पूजेस जागा पुढील सोप्यांत करावी. असें ठरवून गेले. नंतर तूप शालजोडी धोतरजोडा स्वयंपाकाचें साहित्य होऊन सडासंमार्जन केलें. तेव्हां क्षेत्रमाहुली येथील शिष्ट दहापांच यांस आमंत्रण केलें. गांवांतही कोणाकोणास आमंत्रण केलें. आपल्या सर्व ज्ञातीस स्वामींची पूजा होती, प्रसादास यावे; म्हणोन आमंत्रणें केली. सरकारास वर्तमान कळविलें. शनवारीं संध्याकाळीं आच्यारी पाणके येणार ते यावे, म्हणोन निरोप पाठविला. तेव्हां स्वामींनीं बाबाजीपंत सरकारचे कारकून तेथें कामावर ठेविले होते, त्यांस सांगितलें कीं, तुम्हीं कारखांना अच्यारी पाणके भांडी घेऊन जाऊन तरतूद करावी. त्याजकरून बाबाजीपंत घरीं आले. जागा पाहून सामान भाजीपाला पाहिला. भांडी पाठवून देतों आणि दहा घटिका रात्रीस येतों म्हणोन गेले. भांड्यांस माणसें पाठविलीं. त्याणीं ठकाराच्या वाड्यांतून भांडीं पाठविलीं. नंतर दोन घटकेंनी

बाबाजीपंतांनीं चिट्टी पाठविली कीं, उद्या रविवारीं सरकार मंडळीस मेजवानी आहे आपण तरतूद करूं नये, भांडी परत पाठवावीं अशी आली. तेच समयीं चिट्टी घेऊन दहा घटिका रात्रीस बळवंतराव व बाबाजी सरकारवाड्यांत गेले. सरकारास झालें वर्तमान काका दीक्षित सुद्धा समजाविलें. आमंत्रण करून स्वयंपाक चालीस लावण्यापर्यंत येऊन अशी चिट्टी आली. तों चिंतोपंत भाटे व विसाजीपंत शेवड्ये खाली होते त्यांस बोलाविलें. दीक्षितांस विचारिलें कीं, ब्राह्मण यांचे घरी जेवतात कीं नाहीं, आजपावेतों कसें केले तेव्हां दीक्षित व चिंतोपंत व विसाजीपंत यांणीं उत्तर केले कीं, उत्साह महोत्साह होतात, हजारो ब्राह्मण जेवितात. आम्हीं जेवितों. हें वर्षोनवर्ष चालत आले आहे, असें असतां स्वामींनीं कबूल करून असे कां सांगावें. दीक्षितांनीं सांगितलें कीं, हा कालपर्यंत कांहीं दिक्कत नव्हती. चार घटिका रात्रीस कसें निर्माण झालें नकळे. असें म्हटल्यावरून स्वामीकडील कारकुनास बोलावूं पाठविलें. नागो देवराव व हणमंतराव आले, त्यांस बसवून वरकड मंडळीस बाहेर बसविलें, आणि त्यांचे समक्षच बोलणें झाले कीं, बळवंतराव यांचे आमंत्रण घेऊन स्वयंपाकाची तरतूद होऊन शेवटीं असें फसविलें. यांचे कारण काय ? तसेंच करणें तरी अगोदर सूचना करावयाची होती. हें ठीक न केलें. तेव्हां नागो देवराव व हणमंतराव याणीं उतर केलें कीं हें सरकारापर्यंत कशास आणिलें, स्वामीपाशींच यावे तेच कृपा करतील. सरकारांनी उत्तर केलें कीं हें झालें हें नीट न झालें. बळवंतराव यांचा बखेडा झाला याची वाट काय ? त्यांणीं अदालतींत अर्जी दिल्यास तुम्हांस जाबसालास यावें लागेल. या कामाचा फैसला झाल्याखेरीज स्वामींचें जाणें कसें होईल. इंग्रेज बहादूर तरी मनास आणतील. वर्षोनवर्षे वहिवाट चालली ती कशी मोडतील. आमचे राज्यांत तरी होणारच नाहीं. पुण्यांतील दाबास आम्हीं भ्यावयाचे नाही. अशीं स्पष्ट उत्तरें झालीं. त्यास इतक्याचे कारण नाहीं. बळवंतराव तेथे आले असतां स्वामी कृपाच करतील. फार चागलें आहे. आपसांत समजले असतां आम्हांस गरज नाहीं. बळवंतराव यास जावें अशी आशा केली. त्याजवर काका दीक्षितांस घेऊन स्वामीकडे गेले. दर्शन घेतलें. वचन दिलें त्याप्रमाणें शेवटास नेलें. पेशजीं तरतूद सर्व झाली. म्हणून विनंती केली. त्यास बागेंत भोजन करावें. येतों बोलले. तेव्हां स्वयंपाक डोईवर घेऊन जावयाचें कारण नाहीं. म्हटल्याप्रमाणें येणें व्हावें किंवा कसें ? आज्ञा व्हावी. त्यावर काका दीक्षित सांगतील तसे करूं. आमचा गुंता नाहीं म्हटलें. कारभारी यांणी दीक्षित आपणांशीं बोलतों, म्हणोन बाहेर बोलाविले. आम्हीं विनंती करतों. घडेल असें बोलले. दीक्षितांनीं उत्तरे करणें तीं साफ केलीं. तुम्हीं ठीक न केले. आम्हांस यांत बोलावयाचें नाहीं. घडेल तसें घडो. त्याजवर कारभारी स्वामीकडे गेले स्वामींनीं विचारिलें कीं, तुम्हांस राजांनीं का बोलाविलें होतें ? तरी यासाठीच बोलाविलें होतें. चिठ्ठी कोणी पाठविली ? ती आम्हीं पाठविली. तुम्हांस कारण काय पडलें होतें? लबाड कारभार कां करावा ? आतां मजला कां विचारितां? कळेल तसें तुम्हींच सांगा, म्हणोन निंदा केली. कारभारी बाहेर आले. आणि सांगितलें कीं, आतां निद्रा करावी, काही चिंता करूं नये. चार घटिका अधिकउण्या लागल्यास लागूं द्याव्या. रात्र दोन प्रहर होईल. स्वामी पहाटेस तीन घटका रात्री उठतात, तेव्हां बोलून आम्हीं आज्ञा घेऊं. स्वयंपाक चालू करण्याची आज्ञा घेऊन सांगून पाठवितों. आतां आपण घरास जावें. दीक्षित चलावें बोलले. त्यावरून तीन प्रहर रात्रीस शनिवारी घरी आले. याप्रमाणे वर्तमान झालें. हें सर्वत्र मंडळीस बोलावून आणून सांगितलें. आणि सदरहू मजकूर लिहिला. तों पहाटची तोफ झाली. नंतर हरभट अकले यांस

दीक्षितांकडे पाठविलें कीं, पहाटेस निरोप यावयाचा तो अद्याप आला नाही. याचें कसें व श्रीमन्महाराजांकडे विठ्ठल अमृत यांस पाठविलें की, आज्ञेप्रमाणे स्वामीकडे जाऊन तीन प्रहर रात्रीस आलों. असें वर्तमान झालें म्हणोन विनंती करावी ती केली. हरभट काका दीक्षितांस घेऊन स्वामीकडे गेले. दोन तीन घटिका दिवस आला. बळवंतराव यांजकडे अद्यापि निरोप गेला नाहीं. उशीर झाला म्हणोन बोलले. तेव्हां स्वामीनीं उत्तर केले कीं, तुम्हीं गांवांतील चार शिष्ट बोलवा. इकडील मंडळीही येईल. आम्हीं येतों. असें संगितल्यावरून काका दीक्षित वाड्यांत आले. महाराजांस विनंती स्वामींनीं याप्रमाणें सांगितलें म्हणोन केली. त्यावरून सरकारचें बोलावणें बळवंतराव यांस आलें. बळवंतराव वाड्यांत आले. सरकारनें दीक्षितांस सांगितलें कीं, तुम्हीं येथील शिष्ट कोण सांगणें ते सांगावें. आणि स्वामीस नेऊन पूजेचा समारंभ करावा. बळवंतराव यांस आज्ञा केली कीं, स्वामी येतात, मंडळी येतील, प्रहर दिवस आला. जलदी करून अटोपावें. बाबाजीपंत सरकारचे कारकून यांस जाऊन तरतूद करावी. अशी आज्ञा केल्यावरून बळवंतराव घरीं आले. स्वयंपाक आच्यारी, पाणके, कारकून लावून तयारी झाली. दोन प्रहरीं स्वामींस बोलवावयास बाबाजी चिटणीस व काका दीक्षित गेले. स्वामीची स्वारी मंडळीसुद्धां निघोन आली. वरकड मंडळी गृहस्थ व शिष्ट आले. देवापुढे सोप्यांत स्वामीस जागा रांगोळी कणे घालोन केली. तेथें स्वामी बसले. पूजा बळवंतराव यांनीं केलीं.

येणें प्रमाणे स्वामीचीं पूजा होऊन ब्राह्मण मंडळीचीं पात्रें मागील दुजोडी सोपा व माजघर व पुढील मागील चौकांत मंडप दिले तेथें ठेविलीं.

| कित्ता | मंडळी | कित्ता | मंडळी |
|---|---|---|---|
| ७५ | स्वामीकडील मंडळी स्वामी सहवर्तमान. | १ | तात्या उपाध्ये. |
| २ | रंगोपंत दादा संस्थान चाफळ. | १ | . . . . उपाध्ये |
| १ | भाऊ पंडितराव. | ७ | क्षेत्र माहुली. |
| १ | दाजीबा उपाध्ये | ५ | क्षेत्र माहुली संगम. |
| २ | नरसिंगराव लेले. | २ | नागेश भट्ट अभल व हरभट अकले. |
| १ | माधवराव मुनशी | १ | राघोपंत वैद्य. |
| २५ | गांवांतील मंडळी. | १ | महागांवकर. |
| १०७ | | १८ | |
| | | १२५ | |

प्रथम पंक्तीस सवाशें पात्र झालें. यांस विडे दक्षणा शिष्टसंभावना अत्तर गुलाब दिलें. नंतर बळवंतराव यांस स्वामींनीं प्रसाद पैठणी पागोटें व ज्याहानाबादी दुपेटा दिला. प्रभू ज्ञातीची मंडळी प्रसादास बोलाविली होती त्यांणीं स्वामीपुढें नारळ ठेविलें. सर्वांस स्वामींनीं प्रसाद नारळ दिलें. नंतर स्वामींची स्वारी पालखीत बसून दरवाज्याबाहेर गेली. तेथें निरोप घेऊन माघारे आले. नंतर आगंतुक ब्राह्मण व प्रभू मंडळी वगैरे यांचीं पात्रें मांडिलीं २०० आगंतुक ब्राह्मण, १०० गृहस्थ मंडळी गांवांतील, मिळोन सुमारें ३००.

सदरहू मंडळीसीं व ब्राह्मणांचीं भोजनें झालीं. विडे देऊन सर्वांस निरोप दिले. मिती आषाढ शुद्ध ३ रविवार शके १७४७ पार्थिवनाम संवत्सरे सुरुसन सीत अशरीन मयातेन व अल्लफ. मुकाम सातारा

स्वामींची स्वारी सातान्यांतून जाऊं लागली तेवेळेस पत्र द्यावें म्हणोन विनंती केली त्याजवरून पत्र दिलें तें :

श्री. शंकर

शिक्का

**श्रीमच्छंकराचार्यन्वय संजाताभिनव श्री विद्याशंकरभारतीस्वामी करकंजोद्भव * * * * * * * * ***

**श्रीविद्यानरसिंह भारतीस्वामीकृत नारायण स्मरणानि.**

वेदशास्त्र संपन्न राजमान्य राजश्री समस्त ब्रह्मवृंदे क्षेत्रस्थ वगैरे वास्तव्य प्रभृति प्रांत यांसी आज्ञा केली ऐसी जे, राजश्री बळवंतराव चिटणवीस संस्थान सातारा यांणीं हूजूर विनंती केली कीं, आमची चांद्रसेनीय कायस्थ प्रभू ही ज्ञाती यांचा ज्ञातिधर्म पूर्वीपासून आजपर्यंत वहिवाट जी चालत आली त्याप्रमाणें वागत असतां नवीन हल्लीं ब्राह्मण तंटा करितात त्यास आजपर्यंत जसें चालत आलें तसें चालवावें. नवीन तंटा न होई असा बंदोबस्त करून देणार स्वामी समर्थ आहेत. म्हणोन श्रुत केलें. याजवरून हें आज्ञापत्र सादर केलें असे. तरी पूर्वीपासून आजपर्यंत जसा ज्ञातिधर्म चालत आला असेल त्याप्रमाणे चालविणें. नवीन तंटा करूं नये. विशेष लिहिणें तें काय. शके १७४७ पार्थिव नाम संवत्सरे आषाढ मास.

याउपरी करवीरकर शंकराचार्य करवीरकराच्या उपद्रवामुळे बंदोबस्त करून घेण्याकरितां पुण्यास गेले. ते पर्वतीस होते. त्यांजकडे नीळकंठ शास्त्री आपले तटाचे ब्राह्मण घेऊन एक यादी, प्रभूज्ञातीवर नानापरीचे दोष देऊन चांद्रसेनीय ज्ञातीचे शास्त्रार्थ राघवाचार्य प्रभृतीनीं लिहून दिला तो खोटा अशा संमताची जाऊन समजाविली. राघवाचार्य प्रभृतींची मंडळी जाऊन बोलली कीं, शास्त्रार्थ खोटा आम्हीं म्हणणार नाहीं. निर्णय सिद्ध आहे. आणि वज्रटंक शास्त्री यांणीं कतबा वैशाख शुद्ध ४ शनिवारीं दिला. त्यांतील मजकूर या ज्ञातीकडे वेदोक्त कर्मे व्हावीं येविषयीं आपण अनुकूल अशा साधनाचें पत्र नीळकंठ शास्त्री थत्ते यांचें स्वदस्तुरें दाखवून देवूं. तरी येविषयीं वाद सांगणार नाहीं. व आज्ञेप्रमाणे प्रायश्चित घेऊं. दस्तूर खुद. म्हणोन दिलें. त्याजवर थत्ते शास्त्री यांस सांगितलें कीं, तुम्हीं याप्रमाणे कतबा देऊन निर्वाह करून घेणें. त्यावरुन वैशाख शुद्ध ७ स थत्ते यांणीं कतबा दिला. त्यांतील मजकूर आमचा लेख निघाल्यास स्वदस्तूर आमचा अशी स्वामीची व राजश्री चिंतामणराव आपा पटवर्धन यांची खातरी झाल्यास स्वामी आज्ञा करतील त्यास मान्य, म्हणोन उभयतांचें निर्णयास थत्ते यांचे हातचे अस्सल पत्र पाहिजे तें राजश्री विठ्ठलराव दिवाणजी यांजपाशीं बडोद्यास. तें येण्यास दिवसगत लागली, याजमुळें वेदशास्त्रसंपन्न राजश्री नीळकंठ शास्त्री यांणीं मध्यें येऊन विनंती केली कीं, वज्रटंक यांणीं कतबा दिला परंतु आमचें पत्र नाहीं, असतें तरी रुजुवातीस येतें. उगेंच आम्हांवर कतबा

टाकून आमची अबरू मलीन केली. याजकरितां स्वामींनीं पत्र करून दिलें पाहिजे. त्याजवरून रुजुवातीस पत्र येत नाही. त्यापेक्षां ब्राह्मणावर निमित्त आलें त्यावरुन त्यांस पत्र करून दिलें. त्यांत मजकूर–वज्रटंक तुमचें पत्र असा स्वदस्तूर काढून दाखवा म्हणोन दोन महिने बोलत आले. परंतु बोलण्याप्रमाणें दस्ताऐवज निघाला नाहीं. यास्तव तुमचा मुचलका तुम्हांस परत दिला असे वज्रटंक यांणीं तुम्हीं पत्र दिलें म्हणोन सांगितलें तें मृषा. वज्रटंक यांचें पत्राविशीं बोलणें उपयोगी नाहीं. असें ध्यानीं आणून तुम्हांस हें पत्र करून दिलें असे. तरी परस्पर सर्व विरोध टाकून ब्राह्मणांनी स्वस्थ असावें. मिती वैशाख वद्य १० शके १७४८.

येणेंप्रमाणें पत्र लिहून वेदशास्त्र सं॰ राजेश्री मल्हार श्रोत्री यांजपाशीं तिराईत अमानत ठेऊन श्रोत्री यांस राजश्री चिंतामणराव पांडुरंग मिरजकर यांचे विद्यमानें ताकीद केली कीं, तें यांचे हातचें अस्सल पत्र रुजुवातीस आलें असतां हें पत्र तुम्हांपाशीं अमानत ठेऊन आम्हांस माघारें द्यावें. अथवा पत्र नच आलें तरी उभयतां एक होतील तेव्हां नीळकंठ शास्त्री थत्ते यांचे हवाली करावें. म्हणोन श्रोत्री याजपाशीं ठेविलें असतां इतक्यांत थत्ते शास्त्री यांचे हातचें अस्सल पत्र रुजुवातीस प्रविष्ट झालें. तेंव्हा वज्रटंक शास्त्री प्रभृति ब्राह्मण येऊन उपोषित बसले कीं, थत्ते यांणीं रुजुवातीस यावें. आणि श्रोत्री यांजपाशी अमानत लेख आहे तो आणवावा. त्याजवरून श्रोत्री यांजकडे ब्राह्मण बसविले कीं, पत्र कराराप्रमाणे माघारें द्यावे. त्यांणीं येऊन विनंती केली कीं, सायंकाळी पत्र आणून देतों. येविशीं दरम्यान चिंतामणराव आपा मिरजकर यांस देऊन श्रोत्री घरीं गेले. आणि नीळकंठ शास्त्री यांस मिळोन पत्र न देता धटाईच्या गोष्टी सांगून पुण्यांत तुळशीबागेंत ब्राह्मणांचा जमाव करूं लागले. तेथें निरोप सांगून पाठवितांच ब्राह्मण जिकडील तिकडे गेले. ते दुसरे दिवशी पांडुरंग रामचंद्र ढमढेरे यांचे वाड्यांत मिळोन आपले जागीं विचार करून रुजुवातीस येतों. राजेश्री चिंतामणराव आपा मिरजकर व आनंदराव ढाकफलकर वकील निसबत आंगरे प्रभृति थत्ते व नातू याचे तर्फेनें तिराईत आले. त्यांचे विचारें पत्र पाहिलें. तों चिरंजीव म्हणोन पितापुत्रवत् त्यांत मजकूर कोंकणांत कांहीं खटले पडले आहेत तो मजकूर चिरंजीव राजेश्री अमृतराव बाबा व राजेश्री जीवनराव दिवाणजी यांस विदित केला. म्हणोन पत्र आलें होतें तें दिवाणजीस दाखविलें. त्याविशीं ग्रंथशोध करीत आहों. त्या प्रांतीं याविशीं आपलाहि शोध असेलच. शोध करून इकडे रवाना करावा. त्या ग्रंथावरून विचार करून ठेविला असतां उपयोग फार होईल. येविशी लिहून काय कळवावें म्हणोन नीळकंठ शास्त्री याचे हातचें निखालस पत्र खरें असें ठरलें. ते तिराईत गेले, तेव्हां वज्रटंक शास्त्री यांणीं कतबा टाकिला. त्याप्रमाणे पुरवणी होऊन वादास खरे आले. व नीळकंठ शास्त्री चिरंजीव म्हणोन पत्र लिहून अगत्यवाद लिहितात, व पेणकर ब्राह्मणांचे पत्रही दाखवतात व ग्रंथ पाठवावा म्हणजे फार उपयोगी पडेल. म्हणोन थत्ते लिहितात. तेव्हां थत्ते शास्त्री अनुकूल होतात. जर करितां हे चांद्रसेनीय नाहीं तरी हे ज्ञाति त्यांस अनुकूल कशी होईल. यावरन त्यांशींही खातरीच व त्यावरून वेदशास्त्रसंपन्न राजश्री राघवाचार्य प्रभृति जे त्रिविध त्यांसच कायस्थांचा शास्त्रार्थ निवडून दिला. त्या अर्थी चांद्रसेनीय ज्ञाति हीच असें निश्चयें केलें. हेंच खरें याप्रमाणे झाल्यावर शंकराचार्य यांणीं आपले ज्ञातीस पत्र करून दिलें.

## श्रीशंकराचार्यस्वामीचें पत्र.

### शिक्का.

श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्य पदवाक्यप्रमाणपारावारपारीण यमनियमासनप्राणायाम-प्रत्याहरध्यानधारणासमाध्यष्टांगयोगानुष्ठाननिष्ठ तपश्चक्रवर्त्यनाद्यविच्छिन्नगुरुपरंपराप्राप्त-षड्दर्शनसंस्थापनाचार्य व्याख्यान सिंव्हासनाधीश्वर सकलनिगमागसारहृदय वैदिकमार्गप्रवर्तक सर्वतंत्रस्वतंत्र श्रीमहाराजधानीपंचगंगातीरवासकमलानिकेतनकरवीरसिंव्हासनाधीश्वर-श्रीमच्छंकरभगत्पादजान्हवीजनित श्रीविद्याशंकरपादपद्माराधकश्रीविद्यानृसिंहभारती स्वामिकृत श्रीभासकपरिवाराणामनुदिनमेधमानभव्यप्रदनारायणस्मरणानि.

स्वस्तिश्रीमत्पद्मसेवोत्तम वेदशास्त्रसंपन्न राजश्री समस्त क्षेत्रस्थ प्रांत प्रभृति ब्राह्मणान्प्रति मंगलं दिशतु. विशेषस्तु अत्रत्यक्षेमपरिज्ञानपूर्वकं कुशलज्ञापनेन भवद्भिः पत्रद्वारा संतोषः प्रापणीयः ततस्तदनंतरं आज्ञा होती जे, शके १७४७ पार्थिवनाम संवत्सरांत संस्थान देवतेचें आगमन पुण्यासंनिध पर्वती येथें झालें. तों पुण्यग्रामस्त ब्राह्मणांत तट पडोन दुफळी राजेश्री बळवंतराव मल्हार चिटणीस घोलकर व भिवराव विठ्ठल व भगवंतराव मल्हार खासनिवीस नाडकर संस्थान सातारा व नारायणराव सीताराम व विठ्ठल बाबाजी फणसे व विठ्ठलराव देवाजी दिघे व आनंदराव रावजी तासकर प्रभृति समस्त चांद्रसेनीय कायस्थ प्रभूज्ञातीचे धर्म वादानें झाली, त्यांत वेदशास्त्रसंपन्न राजश्री राघवाचार्य प्रभृति मंडळी गृहस्थाशेष यांचें शास्त्रानुमतें प्रतिपाद्य कीं चांद्रसेनीय कायस्थ प्रभू यांस वैदिक कर्मत्रयाधिकार आहे व वेदशास्त्रसंपन्न राजेश्री नीळकंठ शास्त्री प्रभृति अशेष गृहस्थ मंडळी यांचें प्रतिपादन करणें कीं चांद्रसेनीय कायस्थ प्रभू यांस वैदिक कर्मत्रयाचा अधिकार नाहीं, येविशीं उभय तटांस आज्ञा केली कीं, ज्ञातिधर्म जे जे पूर्वापार चालत आले आहेत त्याप्रमाणें चालतील. तुम्ही ब्राह्मणांनीं एकरूप असावें त्यावरून राघवाचार्य प्रभृति मान्य झाले. नीळकंठशास्त्री प्रभृति यांचें म्हणणें कीं, आम्हीं यादी लिहून देतों. त्या यादीवर श्रीनीं रुजू करून त्याप्रमाणें सर्वांचीं संमतें व्हावीं. म्हणजे आम्हीं मान्य आहों. यांतील चौकशी पाहतां शके १७४६ चे सालीं नीळकंठ शास्त्री यांणीं राजश्री विठ्ठलराव दिवाणजी यांस पत्र देऊन कोकणांत कांहीं खटले उत्पन्न झाले आहेत. त्याविशीं आम्हीं ग्रंथशोध करीत आहों. तुम्हीं तिकडे शोध करून ग्रंथ पाठवावे म्हणोन लिहिल्यावरून येथें चार शास्त्रज्ञ होते. त्यापासून शास्त्राधार संमताचा पट करून त्याकारणास्तव घेतला. नंतर नीळकंठ शास्त्री यांणीं बुद्धीस विपर्यास आणून आम्हीं यांत नाहीं असीं अक्षरें श्री ओंकारेश्वरीं नंदिकेश्वराचे पाठीवर हात मारुन बोलिले. पुढें तुळशीबागेंत जमाव करून प्रभूंस कर्मत्रयाचा अधिकार नाहीं. व चांद्रसेनीय कायस्थांची उपलब्धी नाहीं. असें आम्हीं म्हणणार नाहीं, असें ब्राह्मणांचे म्हणणें पडलें. प्रभूंस कर्मत्रयाचा अधिकार नाहीं. अशीं सर्वांची संमतें झाली. कलह मिटला असतां त्या संमतीपटापैकीं दोनचार ब्राह्मणांस पूर्वांग उत्तरांग प्रायश्चितें थत्ते शास्त्री यांणीं दिलीं. बाकी तट झाला. तेव्हां उपाय नाहीं म्हणोन हल्लीं यादी करून राघवाचार्य यांचे तटांतील ब्राह्मणास प्रायश्चित्ती ठरवून एकी करावी असा पर्याय दिसोन आला. तों वेदशास्त्रसंपन्न राजश्री वज्रटंक

शास्त्री यांणीं कतबा श्रीसन्निध टाकिला. त्यांतील मजकूर वेदशास्त्रसंपन्न राजश्री नीळकंठ शास्त्रीबाबा थत्ते याचे, प्रभूंचे घरी वेदोक्त कर्म व्हावें येविषई अनुकूल अशा साधनाचें स्वदस्तुरचें पत्र प्रभू यास लिहून दिलें तें श्रीस दाखविल्यास श्रीची आज्ञा होईल त्याप्रमाणें प्रायश्चित्त घेऊन आज्ञेप्रमाणे राहूं; येविषयीं वाद सांगणार नाहीं. मिती वैशाख शुद्ध ४ गुरौ शके १७४८ व्ययनाम संवत्सरे हे विज्ञापना हस्ताक्षर खुद्द म्हणोन. त्यावरून नीळकंठ शास्त्री थत्ते यांशीं आज्ञा केली कीं, तुम्हीं या कतब्यावर कतबा देऊन पुरवणीस उभें राहणें. त्यावरून थत्ते शास्त्री यांणीं कतबा दिला. त्यांतील मजकूर प्रभूंचे घरीं वेदोक्त कर्म व्हावें अशा साधनाचें आमच्या स्वदस्तुरचें पत्र आणून आपलेस दाखवू म्हणोन वज्रटंक याणें लिहून दिल्हे आहे त्याप्रमाणें आमचें स्वदस्तुर पत्र प्रभूंच्या येथें वेदोक्त कर्म व्हावें येविषयीं आणोन दाखवावें. त्याची चौकशी माझे हातचें खरें किंवा खोटें याची होऊन श्री स्वामीची व राजेश्री चिंतामणराव आपा यांची खातरी झाली म्हणजे स्वामी आज्ञा करतील त्याप्रमाणें ऐकूं. मिती वैशाख शुद्ध ७ शके १७४८ व्ययनाम संवत्सरे हे विज्ञापना. म्हणोन त्यावरून सदरहू पत्र नीळकंठ शास्त्री यांचे हातचे विठ्ठलराव दिवाणजी याजपाशीं बडोद्यास त्यास येण्यास दिवसगत लागली. तेव्हां निळकंठ शास्त्री थत्ते याणीं मध्ये येऊन विनंती केली कीं, पत्र आमचे हातचें असतें तरी रुजुवातीस येतें. पत्र आमचे हातचें नसतां वज्रटंक यांणीं कतबा टाकून आमची अबरू मलीन केली. त्यास श्रीनीं. त्यास कृपा करून येविशीं मजला पत्र करून दिलें पाहिजे. त्यावरून त्यांस पत्र लिहून तिराईतींत ठेविले तें असें. वज्रटंक शास्त्री यांणीं, तुम्ही प्रभूंस वेदोक्त कर्म व्हावे, असें साधनपत्र स्वदस्तुरचें दिलें तें काढोन दाखवितों; म्हणोन ते दोन महिने बोलत आले. परंतु बोलल्याप्रमाणें दस्ताऐवज निघाला नाहीं. यास्तव तुमचा मुचलका तुम्हांस परत दिला. असें वज्रटंक शास्त्री याणीं तुम्हीं प्रभूंस पत्र दिलें म्हणोन सांगितलें तें मृषा, वज्रटंक यांचें पत्राविषयीं बोलणें उपयोगी नाहीं. असें ध्यानीं आणोन तुम्हांस हें पत्र करुन दिलें असे. तर परस्परें सर्व विरोध टाकून ब्राह्मणांनी स्वस्थ असावें. विशेष लिहिणें तें काय? वैशाख वद्य १० शके १७४८ म्हणोन. याप्रमाणें लिहून वे ॥ राजेश्री मल्हार श्रोती यांजपाशीं तिराईत ठेविलें. आणि श्रोती यांस ताकीद केली कीं, नीळकंठशास्त्री याचें हातचें अस्सल पत्र बडोद्याहून रुजुवातीस आल्यास हें पत्र आमचें तुम्हांपाशी अमानत आहे तें परत मागें द्यावें. पत्र नच आलें तरी उभय ब्राह्मणाचें ऐक्य होईल तेव्हां नीळकंठशास्त्री यांचे हवाली करावें. नंतर बडोद्याहून नीळकंठशास्त्री थत्ते यांचे हातचें अस्सल पत्र रुजुवातीस आलें. तेव्हां वज्रटंक शास्त्री प्रभृति ब्राह्मण येऊन उपोषित बसले कीं, थत्ते शास्त्री यांणीं रुजुवातीस यावें आणि मल्हार श्रोती यांजपाशीं अमानत पत्र आहे तें परत आणवावें. त्यावरून श्रोती यास कराराप्रमाणें पत्र मागें द्यावें म्हणोन सांगून पाठविलें असतां पत्र न येई, तेव्हा पांच आसामी ब्राह्मण तगाद्यास बसविले. नंतर श्रोती यांणीं राजश्री चिंतामणराव पांडुरंग मिरजकर यांचे विद्यमानें येऊन विनंती केली कीं, पत्र सायंकाळी आणून देतों म्हणोन कबूल करून मिरजकर यांचे दरम्यान गतीनें घरीं गेले. आणि पुण्यांत नीळकंठ शास्त्री यांस मिळोन फळी बांधोन बसले तदनंतर दुसरे दिवशीं तुळशीबागेंत सभेचें बोलावणें केलें. तेथें ब्राह्मण जमा झाले. हें वर्तमान कळतांच राजश्री खंडो सीताराम वकील निसबत आंग्रे व बाबा ठोंसर यांजबरोबर ब्राह्मणांस

सांगून पाठविलें कीं, नीळकंठ शास्त्री पत्राचें रुजुवातीस न येतां पुण्यांत बसले. तुम्हीं तेथें काय म्हणोन जमा झालां. इतके ऐकताच ब्राह्मण जिकडील तिकडे गेले. दुसरे दिवशी राजेश्री पांडुरंग रामचंद्र ढमढेरे यांचे वाड्यांत सभा करून पुण्याचे तट बांधून बसले. पुनः नीळकंठ शास्त्री यांस तुमचे हातचें दस्ताऐवज पत्र आलें. रुजुवातीस येणें म्हणोन आज्ञा सांगून पाठविली असतां, आपण न येतां थत्ते शास्त्री याणीं राजेश्री बाळाजीपंत नातू यांचे विचारें दहा गृहस्थ तिराईत चिंतामणराव आपा मिरजकर व आनंदराव ढाकेफलकर वकील निसबत राजश्री चिमाजी आपा व खंडो सीताराम वकील निसबत आंग्रे इत्यादिक चाणाक्ष दहा गृहस्थ मंडळी, पिशाच लिपीचें पत्र होतें म्हणून परीक्षेस पाठविली. त्यांचे विचारास सदरहू पत्र नीळकंठ शास्त्री थत्ते यांचे हातचे खरें. थत्ते शास्त्री पिशाच लिपी व बाळबोध दोन्ही लिपी लिहितात. असें ठरलें. तें पत्र तपशीलवार :—

" सहस्त्रायु चिरंजीव विजयीभव राजश्री विठ्ठलराव दिवाणजी यांसी प्रती नीळकंठ शास्त्री कृतानेक आशिर्वाद येथील कुशल तागाईत आश्विन शुद्ध त्रयोदशी पावेतों जाणोंन स्वकीये लेखन आनंदवीत जावें. विशेष आपलेकडील वर्तमान तेथोन विद्वान येतात त्यांचें मुखें श्रवण होऊन परम समाधान होतें तें किती लिहावें. कोकणांत कांही खटला पडला आहे, तो मजकूर चिरंजीव राजश्री अमृतराव बाबा व राजेश्री जीवनराव दिवाणजी यांस विदित केला. ब्राह्मणाकडील पत्र आलें होतें. तें दिवाणजींस दाखविलें त्याविषयीं ग्रंथशोध करीत आहों.. त्या प्रांतीं याविषयीं शोध आपलाहि असेलच. आणखीही शोध करून इकडे रवाना व्हावा. म्हणजे ते ग्रंथ वाईकडील सांपडतील. त्या ग्रंथांवरून पक्का विचार करून ठेविला असतां समयीं फार उपयोग होईल. याविषयीं फार लिहून काय कळवावें. इकडील वर्तमान राजेश्री रामराव याणीं विदित केलेंच असेल. ईश्वरचरणीं आपली निष्ठा आहे. तदनुरूप ईश्वर कृपा करीतच आहे, पुढेंही करील. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशिर्वाद." म्हणोन हें पत्र चतुष्टाईनें दहाजणांच्या विचारें नीळकंठ शास्त्री यांचें हातचें खरें असें ठरलें. तत्राप चित्तांतील द्वैत सुटून ब्राह्मणांतील कलह मिटावा हें चित्तांत न वागे. नंतर वे।। राजश्री धोंडभट्ट खरे प्रभृति द्रविड ब्राह्मण मंडळी असामी ४० चाळीस यांणीं नीळकंठ शास्त्री थत्ते यांस बहिष्कार घातला. कारण पूर्वी शास्त्रानुमतें आपला अनुसर असोन पत्रास नाकबूल जाऊन पांच चार ब्राह्मणांस वृथा प्रायश्चित्तें दिलीं. तदुत्तर दुसरे दिवशीं बहिष्कारामुळें आपले तटात मिळावें असें चित्तांत आणून राहातेकर यांचे वाड्यांत आपलेच फळीचे ब्राह्मण जमा करून नीळकंठ शास्त्री दर ब्राह्मणास वसंतपूजेनिमित्त एक आंबा व अर्धा रुपया देऊन आपणांस गंधाक्षत करूं लागले. तेथेंही खरे यांनी जाऊन बहिष्कार सांगितला. त्यावरून बाळाजीपंत नातू यानीं चौकीचे प्यादे आणून धोंडभट्ट यांस कंपिनी सरकारच्या फरासखान्यांत पाठवून नीळकंठ शास्त्री यांस गंधाक्षत केली. नंतर धोंडभट्ट खरे यांनी कंपिनी सरकारांत गारपिरावर आपल्या अबरूबद्दल नातू यांजवर फिर्याद केल्यावरून नातू यांस सरकारांत बोलावून ऊत्तरे निरुत्तरें परस्परें समक्ष होऊन चौकशीअंती बहिष्कार खरा असें ठरलें. राहातेकर यांचे वाड्यांतून ब्राह्मणांस खुद्द श्रीसंनिध आले व राघवाचार्य प्रभृति ही जमा होऊन उभय तटांनी मान्यता लिहून दिल्या कीं, श्रीची आज्ञा होईल

त्याप्रमाणें मानणें. परंतु नीळकंठ शास्त्री यांचा दुराग्रह कीं, चांद्रसेनीय कायस्थ यांचा शास्त्रार्थ खोटा म्हणोन संमति व्हाव्या. तेव्हा सशास्त्र असतां खोटें संमत देणें हें अनुचित यामुळें तट ते काळीं तसेच राहिले. तों इतक्यांत, भगवंतराव मल्हार खासनिवीस व आनंदराव रावजी तासकर, चांद्रसेनीय कायस्थ प्रभु हे दर्शनास येऊन त्यांनी समक्ष वृत्त निवेदन केलें कीं, ब्राह्मण आपसांत कलह करून आमच्या ज्ञातीस वैदिक कर्मत्रयाधिकार नाहीं म्हणोन यादी करितात असें परभारा ऐकितों, परंतु आमचे घरीं परंपरागत वैदिक मंत्रेंकरून संस्कार चालत आहेत. पूर्वीपासून शास्त्रज्ञ व शास्त्रें नव्हती, आतांच नवीन झालीं असें नाहीं. मागें ही ब्राह्मणांनीं एक दोन वेळ कांहीं खटला उपस्थित केला होता, त्याचा निर्णय शास्त्रानुमतें त्यावेळींच झाल्याची वहिवाट चालू असतां आतां आपसात तंटा करून उगीच यादी करणार त्यांस श्रीसाक्षाच्छंकर धर्मसंस्थापक आहेत, तेथें आणिकांसारखें व्हावयाचें नाहीं. त्यावरून त्यांस आज्ञा केली कीं, पूर्वी खटला झाला ते काळीं शास्त्रानुमतें निर्वाह झाल्याचे साधन तुम्हांपाशीं आहे किंवा कसें ? त्यावरून त्यांणीं दहावीस साधनें आणून प्रत्यक्ष दाखविलीं. ती बितपशील.

१. बाळाजी बाजीराव प्रधान यांचें पत्र छत्रपति सातारकर यांचे नांवें, त्यांत मजकूर प्रभूंचे सुदामत चालत आहे त्याप्रमाणें चालवावें त्यास अडथळा होऊं न द्यावा. पूर्वापार चालत आलें तें चालवोन नवीन कजिया उपयोगी नाहीं. ब्राह्मणाचा निर्गम स्पष्ट आज्ञा करून करणार महाराज समर्थ आहेत. शेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना म्हणोन पत्र.

पेणकर यांणीं ग्रामण्य केलें, त्याचा निर्णय शास्त्रसंमत झाला, ते काळचीं पत्रें

(१) पूर्ववत चालत आल्याप्रमाणें चालवावें म्हणोन पेशवे सरकारची परवानगी होऊन यादी झाली ती बितपशील––

(१) यादी प्रभूंचें ग्रामण्य पांच सात वर्षे पडून कर्मे बंद झालीं, त्यास स्वामींनीं कृपा करून पूर्वीपासून कर्मे वगैरे चालत आलीं आहेत त्याप्रमाणे चालविलीं पाहिजेत, म्हणोन ज्या ठिकाणीं प्रभूंची घरें असतील तेथील मामलेदारास लागतील तीं पत्रें.

(१) सदहू अन्वयें जोशी, उपाध्ये, धर्माधिकारी व समस्त ब्राह्मण यांचे नांवें पत्र.

पूर्वीपासून कर्मे मुंजी वगैरे चालत आलीं आहेत त्याप्रमाणे चालवणें म्हणोन सदरहू अन्वयें मामलेदार तालुके निहाय यांस व ब्राह्मणांस लागतील तीं पत्रें देवावी देणें––लिहिणें.

छ॰ ६ रमजान सन सबा तिसैन फाल्गुन मास सदहू यादीवर––"देवावें" बाळाजी जनार्दन फडणीस. व "देणें" बाजीराव रघुनाथ प्रधान. व मखलाशी रामचंद्र हरी फडके.

१ ते सालीं सनदा होणें राहिल्यावरून दुसरे सालीं याद झाली ती बितपशील––

यादी समस्त दालभ्य कायस्थ प्रभु यांचा व पेणकर ब्राह्मण यांचा प्रभूंच्या आचरणाविसी कज्या पडून आठ नऊ वर्षे ग्रामण्य वाढलें. पेणकर ब्राह्मण यांणीं सरकारचीं पत्रें घेऊन प्रांतांत पाठवून कर्मे बंद केलीं सबब प्रभु व ब्राह्मण सरकारांत फिर्याद आले. त्यावरून उभयतांचें सरकारात लेहून घेऊन शिष्टसंमेत मनास आणितां पेशजींपासून गागाभट्टीप्रमाणें प्रभूंचे घरीं कर्मे चालतात त्याअन्वयें पुढें ही चालवावीं. असें ठरून हें पत्र तुम्हांस सादर केलें असें. तरी गागाभट्टीप्रमाणें चालत आहे त्याप्रमाणें पुढें ही चालवीत जाणें, दिकत न करणें म्हणोन सुरुसन समान तिसैन मया व अल्लफ लागतील तीं पत्रें.

(१) जोशी, उपाध्ये, धर्माधिकारी समस्त ब्राह्मण महालनिहाय यांस.

(१) महालनिहायचे मामलेदार, सरदार व संस्थानी यास.

सदर्हू अन्वये जोशी, उपाध्ये, धर्माधिकारी व समस्त ब्राह्मण महालनिहायचे-कमावीसदार सरदार व संस्थानी यांस लागतील तीं पत्रें देणें--

सदरहू यादीवर देणें बाजीराव रघुनाथ प्रधान,संमत बाळशास्त्री, मखलाशी तात्या गुरुजी.

याप्रमाणें शिक्क्यांनिशी सनदा प्रांतोप्रांतीं गेल्या त्यांपैकीं एक वार केली ती बितपशील.

वेदमूर्ति समस्त ब्राह्मण धर्माधिकारी उपाध्ये व ज्योतिषी क्षेत्र प्रयाग गोसावी यांशीं--

येथें बाजीराव रघुनाथ प्रधान यांच्या वरील पत्राची नकल पुन्हां दिलेली आहे.

(१) चांद्रसेनीय कायस्थ प्रभु यांचे कुलोपाध्याय वे ॥ आबाशास्त्री टकले तळेकर यांजवर पेणकर यांणीं श्री अविमुक्त क्षेत्रीं दुर्भाषणें वाजविल्यावरून (?) आबा यांणीं क्षेत्रस्थ ब्राह्मण यांचें पत्र बाजीराव रघुनाथ प्रधान यांस श्री काशीहून पाठविलें तें बितपशील--

स्वस्ति श्री. . . . . .श्रीमत् बाजीराव प्रभुवर्यपंडित मुख्यप्रधानेषु--

आश्रित नारायणभट्ट तथा लालभट्ट तथा गोपीनाथभट्ट रामपंत शेष तथा हरिराम दीक्षित काळे तथा सोमनाथपंत पुणतांबेकर एतत्प्रभृति समस्त काशीस्थब्राह्मणकृतानेकाशिर्वादाः वरीवर्ततां विशेषस्तु भाषया. भाद्रपद शुद्ध त्रयोदशीपर्यंत समस्त सुखरूप असो विशेष. वेदशास्त्रसंपन्न आबा शास्त्री टकले त्रिस्थळी यात्रेस श्रीक्षेत्रीं आले. तीर्थविधि कालाष्टक ब्राह्मण भोजनादि सर्व केलें. नंतर गोविंदभट्ट वर्तक पेणकर येथें पूर्वीच आले होते त्यांणीं घरोघर सांगितलें कीं, आबाभट्टजी हे प्रभूंचे उपाध्ये प्रभूंकडे हव्यकव्यें कार्यप्रयोजनें चालवितात. त्यास प्रभूंचें ग्रामण्य झालें आहे याजमुळें हे अपांक्त आहेत. त्याजवरून आम्ही सर्व ब्राह्मण मिळोन आबाभटजीस विचारिलें कीं, तुमचें वृत्त कसें आहे तें सांगावें. आबाभटजींनीं उत्तर केलें कीं, आम्ही पांच साहा वर्षे नागपूर प्रांतीं होतों. श्रीमंत बाजीरावसाहेंब पुण्यास तेव्हा आम्ही पुण्यास आलों. आम्हांस अपांक्त व्यवहार ठावकाच नाहीं. श्रीमंत महाराजानीं कृपाळू होऊन वेदशास्त्रसंपन्न बाळशास्त्री बाबा यांजकडे प्रभूंचे ग्रामण्याची पंचाईत नेमून दिली. शास्त्रीबावांनीं पेणकर ब्राह्मणाचीं व प्रभू या उभयतांचीं मान्यता पत्रें लिहून घेऊन सर्व शिष्टमतें ठराव केला कीं पूर्वीपासून प्रभूंचे घरीं गागाभट्टीप्रमाणें कर्म चालत आहे त्याप्रमाणें पुढें ही बिनदिकत चालवावें. याप्रमाणें ठराव होऊन श्रीमंत महाराजांचीं पत्रें प्रांतोप्रांतीं गेली. ग्रामण्य मोडलें. प्रभूंकडे हव्यकव्ये कर्मप्रयोजनें चालतीं झालीं. आमचा व्यवहार हा काळपर्यंत पंचद्राविडांत अनुस्यूत चालत आहे. आमचे घरी चिरंजीवाचें लग्न जाहलें. पुण्यांतच केलें. वे॥ जगन्नाथभट्ट उपाध्ये आठघरे यांची कन्या केली. लग्नामध्ये पंचद्राविड ग्रामस्त शिष्ट सर्व आले होते. गंधाक्षता भोजनादि व्यवहार सर्व झाले असें उत्तर केलें. याचे दाखले येथें ही दोनचार पुरले, परंतु कितेक ब्राह्मणांनीं आपले आपल्यांत संशय घेऊन तड केले. विवाद बहुत होऊ लागलें. तेव्हां आम्ही सर्व एकत्र मिळोन विचार केला कीं. श्रीमंत महाराजांस पत्र ल्याहावें. पत्राचें उत्तर येईल त्याप्रमाणें सर्वांनीं वर्तणूक करावी. याप्रमाणे निश्चय करून स्वामींस विनंतिपत्र लिहिलें आहे. त्याचें उत्तर सत्वर पाठवावें म्हणजे

सर्व ब्राह्मणांचे क्लेश दूर होतील. ब्राह्मणांचे क्लेश दूर करणें अतिश्रेयस्कर आहे, स्वामी जाणतच आहेत. यास्तव उत्तर अतिसत्वर पाठवावें.

सदहू अविमुक्तक्षेत्रस्थांचें पत्र पुणे मुक्कामीं येऊन राजश्री बाजीराव पंडित प्रधान यांणीं वेदशास्त्रसंपन्न राजश्री बाळशास्त्री यांस या पत्राचें उत्तर द्यावे म्हणोन सांगितलेंवरून बाळशास्त्री व ग्रामस्त पुणेकर यांची पत्रें श्री काशिक्षेत्रीं गेल्यावरून तेथें क्षेत्रस्थांनीं चौकसी शास्त्रानुमतें करून पत्रें दिल्हीं. त्यांपैकी ग्रामस्त पुणेकर यांचे नांवें पत्र आलें तें बितपशील--

स्वस्तिश्रीमद्दंडकारण्यांतर्गत भीमरथीनाडिद्दयसंगत्योपलक्षीत्त पुण्याख्य ग्रामस्छ दाक्षिणात्यराजर्षि धर्माधीकारि प्रांत पुणें व आठघरें व समस्त ब्राह्मणान्प्रति--

आर्यावर्तैकदेश आनंदवनत्रिकंटकविराजित आविमुक्तक्षेत्रस्छ भट्टधर्माधिकारिशेष प्रभृत्तिनामनेकानतयो विलसंतु चैत्रशुक्लपंचम्यवधि अत्रत्यक्षेममस्ति भावत्कं तदनुदिनमेधमन-माशास्मे विशेषस्तु भाषया--

आपण माघकृष्ण दशमीची पत्रे पाठविली ती पावली लिहिलें कीं, वे।। आबाशास्त्री टकले अपंक्त नाहींत. त्याचा व्यवहार पंचद्राविडांत हा काळपर्यंत चालत आहे. त्यांचे चिरंजीवास वेदमूर्ति जंगनाथभट उपाध्ये ग्रामस्त पुणेकर याणी आपली कन्या सर्व ग्रामस्ताचे विचारे दिल्ही. लगन शके १७१९ माघमासीं झालें. लग्नात सर्व पुण्यांतील शिष्ट ब्राह्मण व ग्रामस्थ गेले होते. अन्नव्यवहार त्यांचे घरीं अनुभ्यूत चालत आहे. दिकत नाहीं. आपण भटजी विषई संषय धरूं नये. तशी वेदशास्त्रसंपन्न राजेश्री बाळशास्त्री बावा प्रभृति पंडित मंडळीची पत्रेंही असींच आलीं आहेत. त्यांत लिहिलें कीं श्रीमंतांचे आज्ञेकरून सर्व शिष्ट मंडळ पांचचार वेळां मिळोन गागाभट सूचित मार्गावलंबेकरून प्रभु यांणीं चालावें हें संमतपत्र झालें आहे. पूर्वीहि त्याप्रमाणेंच अनुष्ठान प्रभूंकडे चालत आहे. प्रभू यांचेकडे कर्मे गागाभटीवरून चालवावी याप्रमाणें पत्रें श्रीमंतांचीं प्रांतांत गेलीं आहेत. दिकत नाही. असें लिहिलें. त्याजवरून वे।। आबाशास्त्री टकले यांसी आम्हीं विचारिलें कीं, तुम्ही प्रभूंचे कुळोपाध्याय, प्रभूंचा ज्ञातिविषय कसा आहे ? यास आधार काय? पुण्यास निश्चय कोणते ग्रंथावरून झाला? तेव्हां आबाशास्त्री यांही उत्तर केलें कीं गागाभट्टकृत कायस्थप्रदीप, गोविंदभट्टकृत गोविंदभट्टी, स्कंदपुराणांतर्गत रेणुकामाहात्म्य, कमळाकरभट्टकृत शूद्रकमळाकर, ज्ञातिविवेक इत्यादि निबंध ग्रंथ पहावे म्हणजे आपले ध्यानांत येईल. त्याजवरून आम्ही हे सर्व ग्रंथ पाहिले तों हे क्षत्रियान्वय चांद्रसेनीय प्रभु कायस्थ दाल्भ्यऋषीनें क्षत्रियांतकर भार्गवरामाचे आग्रहास्तव शस्त्र धारणरूप क्षात्रधर्म टाकवून कायस्थ धर्म लेखनवृत्ति यांस दिली. ऋषीनें पालन करून उपनयनादि संस्कार केले. यास्तव दाल्भ्यगोत्र असा निर्णय पूर्वोक्त ग्रंथ पाहतां होतो. आपण ठराव केला तोहि देशकालानुरूप यथायुक्तच केला असेल. सांप्रत वे।। आबाशास्त्री टकले त्रिस्थळी यात्रा संपादून पुण्यास गेले आहेत. येथें कांहीएक कोंकणस्थांनी व्यर्थ अत्याग्रह करून तड केला आहे यास्तव आम्ही सर्वांनीं लिहिलें आहे. तपशीलवार—

संमतोऽयमर्थः (महाराष्ट्रानां) ४० सह्या.

संमतोऽयमर्थः (चितपावनानां) २१ सह्या.

संमतोऽयमर्थः (वाजसनेयिनां) ४ सह्या.

संमतोऽयमर्थः (करहाटकानां) ९ सह्या.

संमतोऽयमर्थः (करनाटकानां) ७ सह्या.

एतत्प्रभृति अविमुक्तक्षेत्रस्थ दोन अडीच सहस्त्रपर्यंत ब्राह्मण आबा शास्त्री टकले यांचा संग्रह केला असे. कळावें सुज्ञान्प्रत्यलं पल्लवित्येनेत्यनेकानतयो विलसंतु. शके १७२३ दुर्मतिनाम संवत्सरे संवत् १८५८.

येणेप्रमाणे असा कागद व दोनशें वर्षांचे पलीकडील लिपींचें जीर्ण रेणुकामाहात्म्य सबंध आणून दाखविलें आणि उभयतानीं विनंती केली कीं, पूर्वापार वहिवाट मौंजीबंधनादि प्रतिवर्षी श्रावणी वैदिकमंत्रेंकरून चालत असतां उगाच आपसांत ब्राह्मण कलह करून अमर्याद भाषणें करितात. येविशींची वहिवाट व कागदपत्र पाहून आज्ञा करणार श्रीसमर्थ आहेत. त्यावरून पाहातां ब्राह्मण आपल्यात कलह करून भांडतात. त्यांत राघवाचार्य व वज्रटंकशास्त्री यांचे तटाचें म्हणणें कीं, चांद्रसेनीय कायस्थ यांस कर्मत्रयाधिकार आहे आणि निळकंठशास्त्री थत्ते याचे तटाचे चांद्रसेनीय यांस कर्मत्रयाधिकार नाहीं. असे परस्परे वादविवाद होत असतां, उभय तटानीं मान्यता दिल्या कीं, श्रींची आज्ञा होईल त्यास आम्ही मान्य. त्यांत राघवाचार्य प्रभृतींचें म्हणणें कीं, चार शिष्ट पंडितास मध्यस्थ नेमून श्रीसंनिध सभा व्हावी. त्यांचे विचारें शास्त्रानुमतें ठरेल त्यास मान्य अथवा प्रतिपक्षी यांणीं तुळशी गंगोदक घेऊन अगर देवालयीं शिरून चांद्रसेनीय यांस कर्मत्रयाधिकार नाहीं म्हणोन सांगावें; त्यास मान्य किंवा श्रीकाशीक्षेत्री व म्हैसुरादि प्रांतांत मोठी मोठी क्षेत्रे आहेंत तेथें उभयतांनी आपलाले प्रतिपाद्य पक्ष लिहून पाठवावे. तेथें ठरोन येईल त्यास ही आम्ही मान्य. परंतु यातून कोणत्याही पक्षास श्रीसन्नीध नीळकंठ शास्त्री यांणीं ग्रहण करून मान्य केलें नाही. तेव्हां तट तसेच राहिले. नंतर मार्गशीर्ष शुद्ध चतुर्थीस व पंचमीस राजेश्री भाऊ दातार यांचे वाड्यांत नीळकंठशास्त्री थत्ते प्रभृतींनी आपल्याच मिळाफातील चार मध्यस्थ नेमून राघवाचार्य याचे तटापैकीं एक राघवाचार्य यांस मात्र बोलावणें करून मठास न कळवितां गावांतच सभा केली. तेथें पूर्वपक्ष उत्तरपक्ष दिनशेष च्यार घटिकांपासून चौदा घटिका रात्रपावेतों झाला. तेव्हां राघवाचार्य यांणीं मध्यस्थांस सांगितलें कीं, तुम्ही तुळशी गंगोदक घेऊन बोलावें. ते अमान्य करून तदुतर निखालस वेव्हारिकावर शास्त्र सोडून आले. तेव्हां तुम्हांस काय सांगावे. गोपाळराव रामचंद्र पटवर्धन जमखंडीकर व बळवंतराव महादेव रास्ते प्रभृति यांणीं तर राघवाचार्य यांस पदर पसरून मागून आम्ही सागतों तें ऐकावें असा आग्रह केल्यावरून शास्त्रानुमत सोडून चौघांचे विचारें अशी यादी झाली ती बितपशील—

यादी प्रभू यांस वैदिक कर्माचा अधिकार नाहीं परंतु चांद्रसेनीय कायस्थ यांस वैदिक कर्माचा अधिकार आहे किंवा नाहीं याचा निर्णय व्हावयाकरितां राजश्री भाऊ दातार याचे वाड्यांत पुणे कसबे येथें मार्गशीर्ष शुद्ध चतुर्थीसह पंचमी शके १७४८ व्ययनाम संवत्सरे या मितीस सभा होऊन तेथें निर्णय ठरला कीं, चांद्रसेनीय कायस्थांस वैदिक कर्माचा अधिकार नाहीं असें सर्वांचेमतें ठरल्याविषयीं संमते म्हणोन लिहून त्या यादीवर त्याच बैठकीस राघवाचार्य यांचे संमत घेऊन राघवाचार्य यांजबरोबर त्याच बैठकीस धोंडभट्ट खरे प्रभृति द्रवीड याचा आक्षेप अपशब्दांचा

चित्तांत आणून नीळकंठ शास्त्री यांणीं गंधाक्षता केली. नंतर दुसरे दिवशीं श्रीसन्निध नीळकंठ शास्त्री प्रभृति येऊन विनंती केली कीं, आम्हीं आपसांत समजलों. त्यास सर्वांची गंधाक्षता व्हावी. त्यावरून त्यास आज्ञा झाली जे, स्वारी पुणेसन्निध पर्वती मुक्कामीं असतां तुम्हीं परभारे गावांत सभा करून समजलां त्यापक्षी आमचे समक्ष गंधाक्षतेचें प्रयोजन काय आहे? असें सांगोन स्वारी करवीरास जाण्यास प्रस्थानें निघोन मोतीबागेंत गेली. तेथेंही दुसरे दिवशीं मिळोन आले आणि विनंती केली कीं, आम्हीं समजलों आणि श्रीस शरण आलों. तरी श्रींनीं गंधाक्षता सर्वांची करून शहरांत चलावें व चार दिवस राहून नंतर जाणें व्हावें. त्यावरून सर्वास गंधाक्षता करून दुसरे दिवशीं गोखल्याच्या वाड्यांत येऊन सात आठ मुक्काम करून स्वारी करवीरास निघोन गेली. यावरून विचार पहातां चांद्रसेनीय कायस्थ प्रभु यांची वहिवाट पूर्वापार जातककर्मादारभ्य मौजीबंधनादि संस्कार व प्रतिवर्षी श्रावण्या वेदकर्मे करून होतच आहेत. त्यांत मुंजीबंधन व श्रावण्या वैदिक कर्माशिवाय होत नाहीत असे शिलशिले त्यांचे असोन कोणी तंटा करितात तो व्यर्थ आग्रह, असें आर्थीच होतें. व पेणकराचें ग्रामण्या अंती यादी व सनदा यात प्रत्यक्ष दालभ्य कायस्थ म्हणोन लिहितात तेव्हां दालभ्य तेच चांद्रसेनीय आणी पेशवाई कारकीर्द ब्राह्मणांची जबरी आग्रहेंकरून कोणतीही गोष्ट करण्यास शक्य, परंतु यांची रूढी व शास्त्र बलवतर जाणून 'पूर्ववत' म्हणोन सनदा प्रांतांत देतात आणि त्या सनदात लिहितात कीं, प्रभु यांचा व पेणकर यांचा आचरणावरून तंटा पडून पेणकर यांणीं सरकारचीं पत्रें प्रांतांत पाठवून प्रभूंकडील कर्मे बंद केलीं. नंतर उभयता सरकारांत फिर्याद आले, त्यावरून उभयतांचें लिहून घेऊन शिष्टसंमते मनात आणितां गागाभट्टी अन्वये पूर्ववतप्रमाणे कर्मे प्रभु यांजकडे चालवावीं असें ठरलें त्याप्रमाणे चालवीत जाणें. दिकत न करणे. अशीं संदिग्ध पत्रें लिहितात. तेव्हां पूर्वी यांजकडील पत्रें सरकारची पाठवून कर्मे बंद केलीं तीं पुराणोक्त असतीं तरी बंद करण्याचें प्रयोजनच नव्हतें. वैदिक कर्मे चालत होतीं म्हणूनच कलह करून पत्रें पाठवून बंद करितात. त्याची चौकसी शिष्ट संमतें होऊन पूर्ववत प्रमाणें ठरलें म्हणून लिहितात. शिष्टानुमतें शास्त्रसंमतें मागील आचरणांत न्यूनाधिक्य नाहीं. पूर्ववत् निर्णय होतो. तेव्हां पेणकर ब्राह्मण वादास खोटे जाहले. व चांद्रसेनीय प्रभु खरे जाले. हा एक पक्ष, व पूर्वापार वैदिकमंत्रें करूनच याजकडे कर्मे चालत आलीं हा एक पक्ष. एकूण दोन पक्ष सनदा व यादींवरून सिद्ध होतात व श्री अविमुक्तक्षेत्रीं चांद्रसेनीय कायस्थ प्रभु यांचे कुलोपाध्याय यांजवर मिथ्यापवाद दु:शब्द वे।। गोविंदभट्ट वर्तक यांणीं क्षेत्रीं वाजविल्यावरून श्री क्षेत्रींचे क्षेत्रस्थ यांनी बाजीराव पंडीत प्रधान यांस पत्र पाठविल्यावरून येथील शास्त्रनिर्णय ठरल्याप्रमाणे वे।। बाळशास्त्री प्रभृति पंडित मंडळीस लिहिण्याविसीं सांगितलें. त्यांची पत्रें क्षेत्रस्थांस गेल्यावरून क्षेत्रस्थ यांणीं वे।। आबाशास्त्री टकले यांसी विचारिलें कीं, तुम्ही प्रभूंचे कुलोपाध्याय. यांचा ज्ञातिविशय कसा आहे ? पुण्यास कोणत्या ग्रंथावरून निश्चय जाला ? तें ग्रंथ क्षेत्रस्थ यांणीं टकले यांस विचारून ते प्रत्यक्ष पाहून निश्चय करून लिहितात कीं, **हे क्षत्रियान्वये चांद्रसेनीय कायस्थ प्रभू दाल्भ्यऋषीनें भार्गवरामाच्या आग्रहास्तव शस्त्रधारणरूप क्षात्रधर्म टाकवून कायस्थधर्म लेखन वृत्ति यांस देऊन ऋषीनें पालन करून यांचे उपनयनादि संस्कार केले** म्हणोन मोठमोठे विद्वज्जन पंडित

स्वदस्तूरसंमते आपलालीं पृथक् पत्रावर करून समस्त ब्राह्मणांस लिहितात. तेंव्हां ते दालभ्य कायस्थच चांद्रसेनीय कायस्थ प्रभु यांची परंपरागत रूढी व त्याप्रमाणेच शास्त्रानुमतें शिष्टसमतें सनदा आहेत आणि ते काळीं पुणेमुक्कामीं शास्त्रनिर्णयास कोण कोण पंडित होते ? याची चौकशी पाहतां शके १७४६ चे सालीं विठ्ठलराव दिवाणजी यांणीं वेदशास्त्रसंपन्न राजश्री त्रिंबकशास्त्री रामदुर्गकर यांस पत्र पाठविलें कीं, उगीच कोणी ब्राह्मणानी येथें खटला उपस्थित केला आहे. त्यास आपलें येणें जाल्यास उत्तम. त्याचें उत्तर आलें त्यांत मजकूर तूर्त म्हैसूरकर राजे यांणीं आम्हांस स्वास्थ करून देऊन राहवून घेतलें आहे. तुमचा निर्णय बाजीराव साहेब यांचे कारकीर्दीत रामचंद्र दीक्षित वोक व त्रिमंगलाचार्य व नरसिंह शास्त्री गुर्जर व परशुराम शास्त्री वोक व बाळशास्त्री चंदावरकर व बाळशास्त्री न्यायाधीश व आम्ही मिळोन शास्त्रार्थ निवडला आहे यावरून पहाता हे मोठमोठे पंडित शास्त्रविषयात श्रेष्ठ व तदान्वयें श्री काशिक्षेत्रस्थांचें शास्त्रनिर्णयाचें पत्र व त्या पत्रांत जे ग्रंथ लिहिले आहेत ते सांप्रत प्रत्यक्ष पाहतां. **हे चांद्रसेनीय कायस्थ प्रभु क्षत्रिय व कर्मत्रयाधिकारी असें सिद्ध होतें** व हली दोन वर्षे पुण्यांत कांही ब्राह्मणांनीं तड करून खटला केला असतां शास्त्रार्थ कुंठित न होता राघवाचार्य यास पदर पसरून मागोन घेतात तेव्हां शास्त्रार्थ खोटा म्हणण्यास् कक्षा चालत नाहीं म्हणोन से-दोनसे ब्राह्मणांत आचार्य यांस पदर पसरून मागतात असें सिद्धच. त्यांत पदर पसरून जी यादी ठरावीतात त्यांत लिहीतात कीं प्रभुस वैदिक कर्माचा आधीकार नाहीं. परंतु याचाही अर्थ पाहातां आधीकार नाहीं असें लिहून परंतु शब्दे आपणच संशयांत पडतात. नाहीं असें स्पष्ट झाल्यावर संशयपर परंतु शब्दाचे प्रयोजन नाहीं.तस्मात त्यास वैदिक कर्माचा आधीकार नाहीं असी च्यांद्रसेनीयविद्वेषी यांची खात्री होत नाहीं. व पुढें लिहीतात कीं च्यांद्रसेनीय यांस वैदिक कर्माचा आधीकार आहे किंवा नाहीं, याचा विच्चार पाहातां सर्वांच मतें नाहीं असें ठरलें. तेव्हां वैदिक कर्मांचा अधिकार आहे किंवा नाहीं याची पुर्वी खात्री नाही झणोन निश्चयाकरितां जमा जाले असे असोन **शास्त्रमतें न म्हणतां सर्वांचे मतें म्हणोन** यादी लिहून समति करितात तेपक्षी पूर्वी खात्री नाहीं म्हणोन संशय आहे किंवा नाहीं त्याचा नीर्णय शास्त्रमतें न होता सर्वांच मते हा शुद्ध आग्रह शास्त्रविचार जाला नाहीं असे त्या यादीवरून होते. तेव्हां दोन वर्षे निलकंठ शास्त्री प्रभृतिनी तड माजवीला हा वृथा. पूर्वी निलकंठ शास्त्री याणी पत्र दिल्हे. चिरंजीव म्हणोन आगत्यवादे लिहीतात. ग्रंथ शोध आम्ही करित आहो तुम्हीही तिकडे करून इकडे पाठवावे. पक्का विचार करून ठेविला असतां फार उपयोग होईल म्हणोन लिहितात तेव्हा हे महापंडित, कांही विचार करूनच पत्र लिहिले. पक्का मात्र विचार करणे राहिला. तेव्हां ते पत्र पूर्वी निष्कपट बुद्धिनें लिहिले ते शास्त्रमते खरे, ते काली 'क्षात्रधर्मात् बहिष्कृतः' या वचनें करून येक शस्त्रधारणरूप अशी बुद्धि शास्त्रज्यन्यस्थत होती. पुढें कांहीं चित्तात विपर्यास द्वेष बुद्धिचा जाल्यावरून त्याच वचने सर्व धर्म गेले असा त्याच वाक्याचा उलट अर्थ करून वृथेव वाद वाढविला. वज्रटंकशास्त्री याणी कदबा दिल्याप्रमाणे पुरवणी जाली. निळकंठशास्त्री थथे याजकडून कतब्याप्रमाणें पुरवणीचा सेवट लागला नाहीं. पुर्वी पत्र दिल्हे ते यथाशास्त्र हाशील आपणच पत्र राजश्री विठलराव दिवाणजीस देऊन पुढे आपणच त्यास नाहीं म्हणोन वज्रटंक

यांचे तडांतील ब्राह्मणास पूर्वांग उतरांग प्रायश्चीते दिल्हीं आणि हाल्ली गंधाक्षत होते समई त्यांत जे प्रमुख वज्रटंकासह यास प्रायश्चितरहित गंधाक्षतेस घेतले. यावरून पाहता **चांद्रसेनिय यांस सशास्त्र वैदिक कर्मत्रयाधिकार आहे.** तेव्हां दोष तो कोणाकडेच नाहीं. असे असोन निळकंठशास्त्री याणी पुर्वांग उतरांग ब्राह्मणास प्रायश्चिते दिल्ही याचा अपवाद मात्र त्याचे माथा आला. हे कर्म निळकंठशास्त्री याजकडून अनुचित जाले. थथे शास्त्री याणी विठलराव याचे नावे पत्र लिहलें ते सदरी बार आहे. त्यावरून विचार पाहाता हे ज्ञाती च्यांद्रसेनीय कायस्थ प्रभु यांस वैदिक कर्मत्रयाधिकार, हे निलकंठशास्त्री याची खात्री ह्मणोन हे शास्त्रज्ञ ज्ञाते असे पत्र लिहितात. नंतर विपर्यास बुद्धीस जाल्यावर आह्मी पत्रच दिल्हे नाहीं असें कुभांड करून प्रभुंचा अनादर पर्याय माहाराष्ट्र शुद्र भाषणे परभु हेच रुढित आणून परभूस कर्मत्रयाधिकार नाही अशी तुळसीबागेत गुदस्ता सर्व ब्राह्मणांची समती करून घेतली. चांद्रसेनीय यांची उपलब्धीच नाही असेही निळकंठशास्त्री याचे म्हणणें. परंतु त्यास सर्व ब्राह्मणानीं समत दिलें नाही कीं च्यांद्रचेनिय प्रत्यक्ष हे असोन नाहीं कसे म्हणावे ? यावरून पाहता हे ज्ञाती चांद्रसेनिय कायस्थ प्रभू कर्मत्रयाधिकारी अशी थथे शास्त्री यांची खात्री. पुढें द्वेशबुद्धी जाल्यावर परभु हे अन्य ज्ञाती कल्पून यास आधीकार नाही ह्मणतात आणि चांद्रसेनिय याची उपलब्धीच नाही असे ह्मणतात. तव्हां चांद्रसेनियास शास्त्रआधिकार यास नाहीं ह्मणे यास लाक्षा चालणार नाहीं ह्मणोन उपलब्धीच नाहीं हेच यातील कारणहासील या ज्ञातीचा कर्मे लोप करावा हेच दृढ मानस, च्यांद्रसेनिय यास वैदिक कर्मत्रयाधिकार आहे म्हणोन परभु हे ज्ञाती भिन्न पाडून च्यांद्रसेनिय यांची उपलब्धी नाहीं ह्मणोन वाजवितात. पुढें चांद्रसेनिय कायस्थ प्रभु हेच ज्ञाती शुद्र भाषा भेद परभु असे सिद्ध जाले. तेव्हां च्यांद्रसेनिय यांसच कर्मत्रयाधिकार नाहीं ह्मणोन वाद प्रतिवाद करू लागले. त्याची समाप्ति शास्त्रआधार सोडून पदर पसरून करितात. तेव्हां राघवाचार्य याणीं शास्त्रार्थविषई प्रतिज्ञा केली ते खरी. निळकंठ शास्त्री याचा व्यवहार येविसीचा शास्त्रजन्य नव्हे. शुद्वआग्रही. कारण पुर्वी अश्विन मासी परभारे तात्या काकिर्डे याजपासून कांही ब्राह्मणास द्रव्यलोभास्तव देकार करून च्यांद्रसेनीय यांस कर्मत्रयाधिकार नाहीं म्हणोन यादी करून त्यावर समती घेऊ लागले ते काळी राघवाच्यार्य याचे तडांतील ब्राह्मणास काही द्रव्य लोभ दाखऊन तिनच्यार ब्राह्मण फिताउन नेले. त्यांस काकिर्डे याणी सांगितले कीं, निळकंठशास्त्री व राघवाच्यार्य परभारे कलह करित आहेत तो कलह आपल्यास कशास पाहिजे. तुम्ही यादीवर समत करून आमच्या तडांत यावे. त्यावरून ते ब्राह्मण लोभें मान्य जाले, परंतु त्या ब्राह्मणांचे ह्मणणे कीं, निळकंठशास्त्री यासी तुम्ही गंधाक्षतेस बोलाऊ नये. कारण धोंडभट खरे प्रभृती द्रवीड मंडळीनें त्यास बहिष्कार घातला आहे. तेव्हां काकीर्डे मान्य न करित याजमुळे ते ब्राह्मण उठोन आले. यातील आर्थ पाहातां च्यान्द्रसेनीय यांचा कर्मलोप करण्याविषई द्रव्यही खर्च करून परभारें साधन करितात व मार्गसीर्ष मासी पुढें सर्वांचे बिच्चारे शास्त्रार्थ न होता यादी ठरवितात. त्यापुर्वीच कृत्रीम करून समतें करून ठेवितात असें सिध्ध होतें. वस्तुतः विचार पाहातां वर्ण मात्रांस गुरू ब्राह्मण. शास्त्राधारे सर्वांस वागवावे हा आधिकार असता च्यांद्रसेनीय याचा शास्त्रार्थ सोडून त्यांस आधिकार नाहीं म्हणोन कुभांड केले तेव्हां ब्राह्मणच त्या ज्ञातीस वादी जाले. ते पक्षी वादी दानधर्मे करून आगर कसाही वस्य करून त्याणी पुर्वी समती पट दस्तैवज साध्य

केला त्यास द्रव्य खर्च करून साधन करून घेतलें ह्मणोन म्हणतात आणि आपण अशास्त्रास द्रव्य परभारें देवऊन लोभविष्ट ब्राह्मण करून समती घेतात तेव्हां च्यांद्रसेनीय याजबरोबर कलह शुद्ध आग्रही. वास्तविक विच्यार पाहाता स्कंदपुराणी सह्याद्री खंडांतरगत रेणुका माहात्मी च्यांद्रसेनीय कायस्थ प्रभु याचा निर्णय लिहीला आहे. तेथे स्पष्ट वैदिक कर्मत्रयाधिकारी म्हणोन **षण्णांच कर्मणामधे त्रिणि कर्माणिजीविका** असे प्रसिद्ध आहे. त्यांत क्षात्र धर्मात् बहिष्कृतः या वचनावर सर्व कर्मापासुन त्यक्त होते तरी त्याच ग्रंथी पुढें साहा कर्मापैकी तीन कर्मे करून निर्वाह करावा ह्मणोन सांगण्याचें प्रयोजन नवते. ते पक्षी एक शस्त्रधारणरूप क्षात्रधर्म टाकऊन बाकी धर्म त्यास आहेत असे सिध्धच. तत्राप दुसरा आर्थ पाहातां श्रीभार्गवानें प्रतिज्ञा केली ती संपुर्ण क्षात्रधर्म त्यागाविना वध प्रतिज्ञेची फलोप्ती येणार नाहीं असाही भाव धरावा तरी तो संभव होत नाहीं. कारण भार्गव राम परमज्ञाता. त्यांत ब्राह्मण आणि संपूर्ण क्षत्रीय द्वेषबुध्धीच होते असेंही नाहीं. कांहीं औदासीन व कांही दुष्ठ तेव्हां औदासीनाचा वध करावा तरी त्यात पातकच निर्माण होईल. ते पक्षीं औदासीनाचा वध तो भार्गवानें केलाच नाहीं. दुष्ट होते त्याजविसी प्रतिज्ञा औदासीनाचे हत्येनें पातकमात्र होईल ह्मणोन वध न केला. यास प्रमाण पाहाता जनकादीक यासी विरोध अगर वध केला नाही तेव्हां संपुर्ण क्षत्रीय याचा नाष केला असा भाव नाहीं. जसे ओदासीन राहिले त्यांचे सर्व धर्म राहिले. तेणेकरून वधप्रतिज्ञेसबाध न आला. तसेच गर्भरक्षणार्थ दालभ्य ऋषीनें भार्गवाचें वचन घेऊन रक्षण केले. तेव्हां त्या गर्भाचे ठाई भार्गवाचे वधप्रतिज्ञेचा लेश राहिलाच नाहीं. **तत्राप रेणूकामाहात्मीं वचन रामौवाच ।। जायमानो भवेदबालः क्षात्र धर्मा भविष्यति ।।** या वरून पुर्वे वाक्यें करुनच सर्व धर्मापासुन त्यक्त होता तरी पुढें रामच म्हणतो कीं हा पुढें क्षात्रधर्मा होईल. ते पक्षी त्याच वचनें करून तो धर्म गेलेच नाहीं. नंतर **दाल्भ्यौवाच ।। भाकुरुध्वात्र संदेहो दुर्बुद्धिन भविष्यति** यावरून पाहता भार्गवाची वधप्रतिज्ञा दुर्बुध्धीचे ठाई त्या दुर्बुध्धीपासुन ऋषीवचनें करून गर्भीच मुक्त झाला तेंच काली द्वेषरहित दुष्टकर्मी औदासीन त्यांचे सर्व कर्म राहिलें. तेथें भार्गवाची वध प्रतिज्ञा राहिलीच नाही. याचे एक शस्त्रविद्येसिवाय बाकीं धर्म राहिले त्याणे वधप्रतिज्ञेस बाध आला नाही. प्रत्यक्ष त्रीणी कर्माणी जिवीका म्हणोन वचन आहे ते न पहातां एकाच वचनाचा आर्थ वैपरीत्यभावे सर्व धर्म गेले ह्मणोन कक्षा घेणें हे अशास्त्र. इत्यादि अन्वयावरून पाहातां पुणे मुकामी निळकंठ शास्त्री प्रभृति ब्राह्मणांनीं आग्रही तंटा करून दोन वर्षे तड पाडून ब्राह्मणांत दुफली केली होती हें खोटे, असे शास्त्रांनुमतें व यादी व सनदा पत्रे व श्रीअवीमुक्त क्षेत्रीचें समत पत्र व च्यांद्रसेनीय कायस्थ प्रभु यांचे पारंपर्य आचरणावरून सिद्ध होतें. यावरुन आज्ञा होती जें राजश्री बळवंतराव मल्हार चिटणीस घोलकर व भिवराव विठल व भगवंतराव मल्हार खासनिवीस नाडकर संस्थान सातारा व नारायणराव सिताराम व विठलराव बाबाजी फणसे व विठलराव देवाजी दिघे व रावरावजी तासकर प्रभृती समस्त क्षेत्रियान्वय च्यांद्रसेनीय कायस्थ प्रभु यांची वहिवाट पुर्वापार वैदिक कर्मत्रयाधिकारे करून परंपरागत चालत आल्याप्रमाणें अव्याहत पुढेंही चालवित जाणे. विशेष लिहीणे तें काय. शके १७४८ व्यय नाम संवत्सरे माघ मास महानुशासनं वरिवर्ति

इत्यलं

आतांपर्यंत उद्धृत केलेल्या वरील हकीकतीवरून वाचकांना हे कळून आलेंच असेल कीं चित्पावन नोकरशाहीच्या श्रीमंत आश्रयाखालीं वावरणारे जवानमर्द ब्राह्मण ( ? ) वीर मराठी साम्राज्याच्या चिरस्थाइत्वापेक्षां स्वतःच्या ब्राह्मण्याचे डोले नाचविण्यांतच गर्क होऊन गेले होते. मुंबईचे टोपीकर, म्हैसूरचे वाघ किंवा हैदराबादचे लांडगे यांना पायबंद लावून छत्रपतीच्या भगव्या झेंड्याची इभ्रत वाढविण्याचा यत्न करण्याऐवजीं, स्वतःच्या भाडोत्री ब्राह्मण्याची महति वृद्धिंगत करण्यासाठीं, खुद्द मराठी रियासतीच्या पिढीजात चित्पावनेतर स्वदेशबांधवांच्याच तंगड्या छाटण्याचा उपक्रम करण्यांत ते अगदीं गढून गेले होते. सातारकर धन्याला धत्तुरा दाखवून विश्वासघाताच्या फोडणीनें खमंग बनविलेला नोकरशाहीचा मलीदा खाऊन खाऊन परान्नपुष्ट झालेले मुळामुठासंगमनिवासी चित्पावन तरवारबहाद्दर आतां तरवारीकडे न पाहतां स्वतःच्या गळ्यांतील जानव्याची ब्रह्मगांठ कुरवाळूं लागले. प्रस्तुत ग्रामण्याच्या वेळीं बाळाजीपंत नातू. चिंतामणराव पटवर्धन आणि निळकंठशास्त्री थत्ते या दिग्विजयी त्रयीनें अनंत अत्याचार केले. त्या सर्वांची संभावना अगदीं बारक्यांतल्या बारक्या टायपांत केली तरी ' मराठे आणि इंग्रज ' पुस्तकासारखीं तब्बल दोन पुस्तकें भरुन निघतील. या ग्रामण्यासंबंधी बरेचसे कागदपत्र रावबहादुर डोंगरे यांनीं शोधून काढले आहेत व ते त्यांनीं आपल्या '' सिद्धांतविजय '' नामक ग्रंथातहि प्रसिद्ध केले आहेत. या त्यांच्या कामगिरीबद्दल चां. का. प्रभू समाजानें रावबहादुरांचे कृतज्ञतापूर्वक आभारच मानिले पाहिजेत. यापुढील हकीकत रा. ब. डोंगरे यांच्याच शब्दात खालीं देतों :––

'' चांद्रसेनीय कायस्थ प्रभु व ब्राह्मण ह्या जातींमध्यें पेशवाईत बरींच ग्रामण्यें झाली होतीं, हें मागें सांगितलेंच आहे. अशा प्रकारचे आणखी एक ग्रामण्य पेशवाई बुडाल्यानंतर श्री. चिंतामण पांडुरंग पटवर्धन सांगलीकर यानीं पुढाकार घेऊन बाळाजीपंत नातू पुणेकर व निळकंठ शास्त्री थत्ते याच्या मदतीनें, आपणांस पाहिजेत तसे नवे ग्रंथ सांगलीस तयार (अ) करून घेऊन सन १८२५ च्या सुमारास साताराप्रांती ऊभे केलें होतें. त्यांवेळीं बळवंतराव मल्हार चिटणीस सुमंत चां. का. प्रभु यांनीं करवीर मठाधीश्वर श्रीमत् शंकराचार्यांस विनंती केली होती कीं. ' ब्राह्मण आमच्या कर्मास विनाकारण अडथळा करून तंटा करीत आहेत ह्याचा बंदोबस्त व्हावा.' त्यावरून स्वामींनीं सर्व ब्रह्मवृंदास आज्ञा केली की '' पूर्वीपासून जसें चालत आलें आहे तसें चालवावें; तंटा कोणी करूं नये.'' परंतु ' आम्ही म्हणतो तसा ठराव स्वामी करतील तर तो आम्हास मान्य आहे.' असें म्हणणारा ब्रह्मवृंद ह्या वरील ठरावास थोडाच जुमानणार होता ! माहुली वगैरे क्षेत्राच्या ब्राह्मणानीं चिंतामणराव सांगलीकरास श्रीमंतांचे (पेशव्याचे) ठिकाणी स्थापून चां. का. प्रभूंस शूद्र बनविण्याच्या राष्ट्रीय कामावर (ब) त्याची नेमणूक केली. सांगलीकरानीं पाहिलें की शंकराचार्यास सामील करून घेतलें असता आपलें काम श्रीगणपतीच्या कृपेकरन निर्विघ्नपणें पार पडेल; पण आपल्या अधिकाराचा बोज राहावा असें स्वामीस वाटत असल्यामुळें ते सांगलीकरांच्या कटांत येईनात. तेव्हां स्वामीस बागुलबोवा दाखवून त्यांस आपल्या मुठींत आणून त्यांच्याकडून आपणांस पाहिजे त्या मतलबाची प्रभूंविरूद्ध यादी सहीशिक्यानिशी शके १७४७ सालीं पर्वती मुक्कामीं

**करून घेतली. व पुढें दोन वर्षांनीं (शके १७४९) त्या यादीच्या नकला सर्वदेशभर ७५ ठिकाणीं पाठवून प्रभू लोकांस शूद्र बनविण्याचे कामास (क) चांगलीच सुरवात केली.''**

(अ) '' सेवेसी सा. नमस्कार विज्ञापना ता. छ २ र।। कर पावेतो यथास्थित आसे विशेष. आलिकडील वर्तमान तर सांगलीस ग्रंथ जाला तो दुतर्फा स्वामीचे पत्री जाहल्यामुळें मनोदयानुरुप शेवटास गेला नाहीं त्यास हाली मुंबईचे मुख्य साताऱ्यास येणार तेथें मु।। किती दिवस होईल नकळे त्यासंधीत वाई वगैरे समस्त ब्राह्मण हजार दोन हजार जमाव होऊन साहेबाजवळ फिरयाद करावी जे या ज्ञातीप्रकर्णी यामागें शंभर वर्षात चार पाच ग्रामण्ये जाली त्यात या ज्ञातीचे कबूल कतबे वगैरे सरकारांत येऊन याचे वागणुकीचा ठराव जाला त्याप्रे।। याणीं वागावे ते दांडगाईन वागणूक जाहली हालीही दांडगावा करून जी गोष्ट इ।। ता।। या ज्ञातींत आचरण जाहले नाही ते हाली महाराजाचे पुस्तपन्यामुळे आचरतात याचा बंदोबस्त सरकारांतून आपण केल्याविना होत नाहीं यास्तव महाराजास निखालस स्पष्ट सांगून याचा पुस्तपना न होय आणि हाली सांगलीस ठराव होऊन पत्रे क्षेत्रोक्षेत्री गेली आहेत त्याप्रे।। हे वागणूक करीत असे जाहले प।। हा येक बेत दुसरा मनसुबा ब्राह्मणानी जमाव होऊन सदरी लिहिल्या प्रे।। वागणुकेचे साहेबाचे जाहिरण्यात आणून आपले वाड्यावर चालून घेऊन मारामारी करून आबरू घ्यावी त्यांत जे जाया होतील ते होतील असाही निग्रह करावा याच तटास आल्यास बल आणावे असे आहे सारांष साहेब तेथे आल्यावर या गोष्टीचा उपक्रम सर्व मिळोन करावा यांत जे घडेल ते घडो असा बहुत निकर्श होऊन करण्याचा बेत आहे अैकिले वर्तमान लिहिले आहे यासंधीत आपण केले ते सेवटास न्यावे असी योजना याची जाहली आहे त्यास आपला सांभाळ आजपर्यंत ज्यांही केला त्यानी या समई कृपा करुन अभिमान धरून संरक्षण केल्यास पार पडेल इकडील बेत आपण केले ते सेवटास नेण्याविसी बहुत आग्रहाचे बोलावे असे आहे अद्यांत अैकिले ते श्रुत व्हावे या करिता लिहिले आहे. सेवेसी श्रुत होय हे वि।।.

सिद्धांतविजय पृ. ११३–१४.

(ब) श्री गणपतीर्जयति.

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री समस्त ब्राह्मवृंद उभय क्षेत्र माहुली स्वामीचे सेवेसी.

विद्यार्थी चिंतामणराव पांडुरंग साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ता।। अधिक आषाढ शु।। १३ पावेतो यथास्थित असे विशेष. परभु हे चाद्रसेनी नव्हेत संकर कायस्थ ज्यात्योद्भव शूद्राधम यास वेदकर्माचा अधिकार नाही व च्यांद्रसेनासहि अधिकार वेदकर्माचा नाही व त्या ज्ञातीची उपलब्धीही नाही. असें असतां परभु हे आलिकडे चांद्रसेनी म्हणवू लागले व आपले ज्ञातींत वेदोक्त कर्म व्हावी येविसी आपले साधनाकरितां म्हणोन पुण्यांतील कांही ब्राह्मणास परभूंनीं लोभाविष्ट केले. त्या ब्राह्मणांनी चांद्रसेनी कायस्थ यास वेदकर्माचा अधिकार नसता अधिकार आहे म्हणोन परभुजवंल शास्त्रार्थ लिहून दिल्हा, याजमुलें ग्रामण्ये होऊन ब्राह्मणांत तट जाहले. गंधाक्षता वर्ज जाहली. व सोनार हे रथकार यास वेदकर्माचा अधिकार आहे असे

कांहीं ब्राह्मणांचे म्हणणे व जीनगर हे चर्मकतुल्य चर्मी काम करतात त्यास गल्यात जानवीं घालण्यास आधिकार नाहीं असे असता गल्यांत जानवी घालतात व अलिकडे पुण्यांत ब्राह्मणांचे व शुद्रांचे हावदांत पाणी भरतात. म्हणोन श्री गोदा यात्रोद्देशे शके १७४७ पार्थीव नामसंवत्सरांत श्री स्वामी जगग्दुरु यांची स्वारी पुण्याचे सांनिध्य पर्वतीचे मुक्कामास गेली. तेथें समजले व आम्हीही पुण्यास गेलो. पुण्यांतील ब्राह्मण व ग्रहस्थ श्रीचे दर्शनास आले व आम्हीही दर्शनास गेलो. ते समयी ब्राह्मणांचे म्हणणे पडले त्यांतील भाव. स्वामीचे आगमन जाहले व आपलीही स्वारी आली आहे. श्रीमंतांचे ठिकाणी आपण विद्यमानी आम्हास. ब्राह्मणप्रभु ब्राह्मण्याचा कारभार हा खटला मनास आणून तोडावा. सर्वाची गंधाक्षता करावी. म्हणोन. त्याजवरून श्रीमंत कैलासवासी माहाराज छत्रपती संस्थान सातारा व श्रीमंत कैलासवासी पंतप्रधान यांच्या कारकीर्दीत परभु यांची ज्ञाती कसी व त्यास वेदकर्माचा अधिकार आहे किंवा नाहीं व त्यांचें आचरणाचा पाठ कसा याची चौकसी जाहली त्यांत कसकसे ठरले व परभुजवळ चांद्रसेनीय कायस्थास वैदिक तीन कर्माचा अधिकार आहे असा शास्त्रार्थ लिहून दिल्हा तो युक्त किंवा अयुक्त हे पाहावे याकरितां कायस्थाची उत्पती चित्रगुप्त व चांद्रसेनादी कायस्थ यांची कसी व त्यास वेदकर्माचा अधिकार आहे की नाही याचा व दुसरा प्रकार सोनार हे रथकार होत किंवा नव्हेत व त्यांस वेदकर्माचा अधिकार आहे किंवा नाही याची चौकसी ग्रंथावरून सिष्टानुमतें व तिसरा प्रकार जीनगर यास गल्यांत जानवी घालण्यास अधिकार नाहीं असें असतां गल्यांत जानवी घालतात त्यास यांचा पूर्वापाठ कसा याचीही चौकसी पाहून सारांश करून श्री स्वामीस समजाविला आणि विनंती केली त्यातील भाव. चौकसी केली ती अयुक्त किंवा सप्रमाण याचा विचार स्वामीनी करून सदरहू सारांशाअन्वये चालणेंविसीं श्री कासीक्षेत्रादी क्षेत्रस्थ व पुण्यग्रामादि ग्रामस्त ब्राह्मण वगैरे यास पत्र द्यावयास आज्ञा व्हावी म्हणोन त्याजवरून सदरहूचा विचार श्री स्वामीनी करून सदरहू सारांशांत चौकशी केल्याचे प्रकार कसकसे लिहिले ते वगैरे सर्वास कलावे. सारांशाअन्वये सर्वांनीं चालावे याजकरितां सारांश वार करुन निर्णयाची याद व पत्रें लिहून दिल्ही आणि जिकडील तिकडे पाठविण्याविसी आज्ञा जाहली. त्याजवरून आपले नांवचे पत्र व याद पाठविली आहे. पोहोचल्याचे उत्तर श्रीचे नांवे पाठवावे. बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंती.

(क) श्री विद्या नरसिव्ह भारती स्वामी संकेश्वर याणी वेदशास्त्रसपन्न परम सिषोतम राघवाचार्य यास पत्र सही सिक्यानसी कार्तिक शु॥ १० शके १७४८ व्येय नाम सवत्सेरी लिो पौ थोडे हसील म॥र फालगुनमासी आम्ही श्री गोदावरी यात्रेस जाण्या बो। पुण्यानजीक पर्वतीचे मु॥ जाऊन राहिलो त्यासमयी च्यांद्रसेनीय ज्ञातीचे शास्त्रार्थ व॥ ब्राह्मणांत तंटा पडला होता तेव्हां उभयपक्षीचे ब्राह्मण दर्शनास येऊन म॥र समजाविला त्यासभेत तुम्ही बोलला की स्वामीनी गंगोदक व तुल(सी) घेऊन श्रीदेवासनिध बसून निरमछरपणें च्यांद्रसेनिये ज्ञातीस वेदकर्म अधिकार आहे किंवा नाहीं हे सत्ये सांगावें आथवा निरमछर शास्त्री पंडित माहनेक्षत्री बसवून शास्त्र समते निरणय करून सांगावे परंतु त्यावेली च्यांद्रसेनीय शास्त्रार्थ विषयखंडन मंडन करून पत्रे दिल्ही कारण चिंतामणराव याचे मनी च्यांद्रसेनीय याचा द्वेष कोपिपक्षो आणखी

च्यांद्रसेनिये ज्ञातीचे द्वेषाचे आग्रगण्य बालाजीपंत नातु विपरित बोधिता नातु आमचे संस्थानास उपद्रव करतील या भितीस्तव नातूचे मनोधारणार्थ मुद्रापूर्वक पत्रे दिल्ही परंतु ती पत्रे मिथ्या स॥ हली रद करून च्यांद्रसेनीय ज्ञातीविसी शास्त्र ग्रंथ ग्रंथ समती पाहता च्यांद्रसेनाना वैदिक कर्म अधिकार सत्ये आहे त्याजवरून हे पत्र तुम्हांस लिहिले आहे.

'' या यादीच्या प्रत्येक नकलेबरोबर श्रीशंकराचार्य स्वामीच्या नांवचे एकेक पत्र जोडलें होतें. (ड) निळकंठ शास्त्र्यांनीं देखील पुण्यास प्रभू विरूद्ध झालेल्या दोन सभांचा ठराव व श्रीशंकराचार्यांच्या यादीची माहिती माहुलीच्या समस्त ब्रम्हवृंदास देऊन सांगलीकरापेक्षां आपण कमी नाहीं (इ) असें दाखविलें. बाळाजीपंत नातुमात्र ब्रम्हवृंदास पत्रें याद्या वगैरे लिहिण्याच्या भानगडींत न पडतां फक्त श्रीशंकराचार्यास पकडींत धरून बसले होते.''

(ड) (श्री विद्यानरसिंहभारतीशंकाराचार्यांचें पत्र-ब्रम्हवृंद क्षेत्र माहुली यास) परभु हे चांद्रसेनीय नसून संकरज आहेत. त्यास वेदकर्माचा अधिकार नाहीं त्यांजकडे कोणी वेदोक्त चालवू नये. चालविल्यास तो ब्राह्मण भ्रष्ट समजला जाईल. तसेच सोनारास वेदाचा अधिकार नाहीं. जिनगर लोकांस जानवी देऊं नये चिंतामणराव पटवर्धन यानी ह्या गोष्टीचा निर्णय करून आम्हास समजाविला तो आम्हास पसंत आहे वगैरे. आश्विन शु॥ १० शके १७४९.

सिद्धांतविजय, पृ. १०७.

श्री

(इ) वेदशास्त्रसंपन्न राजश्री समस्त ब्राह्मण क्षेत्र परशराममाहुली यासी

निलकं(ठ) शास्त्री येते व मल्हार श्रोती व दाजी दिक्षीत बोक व कुपाशास्त्री व गोविंदाचार्य आष्टपुत्रे व वामनशास्त्री साठे प्रमुख समस्त ब्राह्मण मुकाम पुणे साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल तागाईत चैत्र शुद्ध द्वादसी पावेतो जाणोन स्वकीय कुशल लिहित असावे विशेष पूर्वी शके १७४५ फालगुण शु॥ १३ शके १७४७ चैत्र येकादशी अशा दोन सभा तुलसीबागेंत जाहल्या तेथे सर्वाचें मतें परभूस वेदकर्माचा आधिकार नाहीं असे ठरोन सर्वांची संमते जाहली. नंतर ज्याणीं परभूपासून द्रव्य घेतले होते त्यापैकीं कितेक ब्राह्मणास आनुताप होऊन ज्ञातीस शरण येऊन प्रायेश्चित घेऊन लेहून दिल्हे कीं परभूनी द्रव्य देहून चांद्रसेनीय कायेस्थास वेदकर्माचा आधिकार आहे आसा शास्त्रार्थ ब्राह्मणापासून लेहून घेतले व चाद्रसेनी कायेस्थ प्रभु यास वैदिक तीन कर्मचा आधिकार आहे आसा पट करून त्यावर समंते करून घेतली असी समज्यावरून विचार करिता ब्रहदज्याती विवेक हेमाद्री माधव प्रभृति सकल ग्रंथी च्याद्रसेनि ज्याती काय लिहिली नाही शुद्रकमलाकर ग्रंथी पद्मपुराणातील म्हणोन वचन लेहून च्यांद्रसेनी कायेस्थ ज्याती वेगळी लेहून पद्मपुराणांतील वचन लेहून त्या जातीस शुद्र साधारण धर्म लिहिले व परभूनी गागाभट याजकडून कायस्थधर्म प्रदीप ग्रंथ करविला त्यात च्यांद्रसेनी कायस्थ प्रभू सज्ञेक दक्षण देशात आहेत असे लिहून त्याच ग्रंथी च्यांद्रसेनीयास पद्मपुराणांतील वचन लेहून वेदोक्त कर्माचा आधिकार नाहीं असें स्पष्ट लिहिले व कल्पीत श्लोक संस्कार करण्यास लिहिले व हरीवंशात व त्याचे टीकेत व विष्णुपुराणांत व त्याचे टीकेत व विष्णु स्मृतीत लिहिले आहे त्यास क्षेत्रिय शत्रु वध्य प्रतिज्ञेची सिद्धी वंध अथवा वध्य क्षत्रीय ज्यातीस वेदोक्त

कर्मापासून चुत केल्याशिवाय होत नाहीं असे स्पष्ट लिहिले आहे त्याजवरून श्री भार्गवराम याची क्षत्रियवधप्रतिज्ञेची सिध्धी वध न करिता वेदोक्त कर्मछदावाचून होत नाही इत्यादिप्रमाणे करून चांद्रसेनास वेदोक्त कर्माचा आधिकार नाहीं असे शके १७४८ मार्गसिर्षमासी राजश्री भाऊ दातार याचे वाड्यात व मोतीबागेत तेथे दोन सभा होऊन ज्याणी परभूजवळ च्यांद्रसेनीयास वेदोक्त तीन् कर्माचा अधिकार आहे असे लिहून दिल्हे त्यास हे वर्तमान शास्त्रीय विच्यारणा होऊन सर्वाचे मते ठरोन ज्यानी परभूस लेहून दिल्हे होते त्याचे सर्वाचे समंते प्रभु च्यांद्रसेनियास वेदोक्त कर्माचा आधिकार नाही असे जाले व जगदुरु श्री शंकराचार्य याणी याच आन्वये समस्त ब्राह्मणाची नावे पत्रे करून दिल्ही असे हा म॥ आपणास कळावा सर्वानी आपआपले धर्मात शरण असावे व जो आमार्गे चालेल त्यास सिक्षा आसावी परभु प्रकरणी जागोजाग क्षेत्रस्थाची वगैरे समंते व कागद पत्र सकल वेदशास्त्रसपन्न राजश्री दाजी दिक्षीत वोक याजवळ समस्ताचे विच्यारे आहेत तेथे ज्यास प्रयोजन लागेल त्याणी पाहावे हे विनंती.

स. विजय प. शि. ६ पत्र ४.

**सुप्रसिद्ध ' चित्पावन आयागो ' राजमान्य बाळाजीपंत नातू यांनी जगदुरु श्रीशंकराचार्य यांचा जो अश्रुतपूर्व सन्मान आणि न भूतो न भविष्यति अशी बरदास्त ठेविली होती, त्याचें वर्णन आम्ही पामरानें कायट करावें ? तें खुद्द श्रीशंकराचार्यांच्याच शब्दांनी वाचकांपुढें ठेवलेलें बरें. ईष्ट इंडिया कुंफणीच्या धारवाडच्या सुभ्यानें, म्हणजे कलेक्टरानें, जगदुरूंच्या मागें लागलेल्या नातूरूप बहिरीससाण्याच्या शक्तीला पायबंद लावल्यावर हातांत गीता घेऊन श्रींनी जें खऱ्या कबुलीजबाबाचें पत्र लिहून दिलें त्याची नकल ता. ९ माहे नवंबर सन १९०३ च्या ' सुधारक ' पत्रांत प्रसिद्ध झाली होती. त्याबद्दल संपादकानें खालीलप्रमाणे उद्गार काढले होते :—**

## श्री शंकराचार्यांची तारांबळ.

सातारचे छत्रपती राजे प्रतापसिंह महाराज राज्यपदभ्रष्ट झाल्यानंतर त्यांची दाद लावण्यासाठीं म्हणून रा. रंगो* बापुजी नांवाचे एक गृहस्थ विलायतेस गेले होते. तेथें त्यांनी आपल्या धन्याची गादी त्यास परत मिळावी म्हणून पराकाष्ठेचे प्रयन्त केले आणि सरकार

* रोहिडेश्वरासमक्ष, दादोजी कोंडदेवाला साक्ष ठेवून, आद्य श्री शिवछत्रपति महाराजांनी ज्या कायस्थ प्रभूशीं ' स्वराज्यस्थापनेची आणभाक ' केली, त्या दादजी नरस प्रभूचे रंगो बापूजी हे पांचवे खास वंशज होत.ज्या दादजी नरस प्रभूनें शिवाजीशीं ' स्वराज्यस्थापनेची आणभाक ' वाहिली, त्याच्याच खास वंशजावर छत्रपतीच्या गादीच्या चिरस्थाईत्याकरितां म्हणजे हिंदवी स्वराज्याकरितां विलायतेच्या पार्लमेंटपुढें झगडण्याचा आलेला योग कितीहि खेदकारक असला तरी त्याहि योगांत कुतुहल उत्पन्न करण्याचें सामर्थ्य खास आहे. रंगो बापूजीचें चरित्र आणि त्यानें विलायतेंत सतत सात आठ वर्षें छत्रपतीचे प्रतिनिधी व वकील या नात्यानें बजावलेली स्वार्थत्यागपरिपूर्ण अद्भूत कामगिरी यांचा इतिहास अत्यंत मनोरम, उपदेशपूर्ण आणि महाराष्ट्राच्या निसर्गजात राष्ट्रीय तडफीचा द्योतक असा आहे. विलायतेंतल्या पार्लमेंटपुढें या कायस्थ प्रभूवीरानें जीं व्याख्यानें दिलीं व स्वतः एक छोटेखानी इंग्रजी वर्तमानपत्र चालवून छत्रपतींच्या पदच्युततेच्या अन्यायाबद्दल तेथील जें लोकमत जागृत केलें, त्याबद्दलचीं पुस्तकें व इतर लेख पाहिलें कीं मन आश्चर्यानें थक्क होऊन जातें, या वक्त्याच्या स्पष्टोक्तीपूर्ण वक्तृत्वानें वाचकांचें हृदय हादरूं लागतें आणि त्याने पार्लमेंटपुढें मांडलेल्या अस्सल लेखी दांडगा पुरावा पाहून रंगो बापूजीच्या विद्वत्तेबद्दल, कळकळीबद्दल व छत्रपतींच्या ठायीं असलेला अनन्य भक्तीबद्दल त्याचे धन्यवाद गावे तितके थोडे असें वाटूं लागतें. आम्ही यथावकाश या प्रभूवीरांचे साग्र चरित्र प्रसिद्ध करणार आहोंत; त्यावरून हिंदवी स्वराज्याचे डेप्यूटेशन विलायतेंत नेण्याचा आद्यमान चां. का. प्रभू समाजाचा आहे, हें ठसठशीत रीतीनें सिद्ध होईल.

दरबारी केलेली मेहनत फुकट गेल्यावर निराश न होतां इंग्रजी भाषा शिकून विलायतेंत लोकमत जागृत करण्याकरितां व्याख्यानें देण्याचा क्रमही यांनीं सुरू केला होता. विलायतेंत आपण कोणती कामें केलीं याबद्दलची सविस्तर हकिकत आपल्या देशांत आपल्या धन्यास कळावी म्हणून या स्वामीनिष्ठ व उद्योगी गृहस्थाने आपल्या प्रयत्नांची कच्ची हकिकत स्वहस्तें मराठी भाषेंत मोडी लिपींत विलायतेंतच शिळाछापानें छापून त्याचीं पुस्तकें बांधवून इकडे रवाना केली.*** पुण्यांतील कित्येक जबरदस्त व दुराग्रही ब्राह्मणांच्या हट्टामुळें जगद्‌गुरुंस आपला अधिकार, आपलें मत, व सत्यनिष्ठा कशी गुंडाळून बाजूस ठेवावी लागली तें दृष्टोत्पत्तीस येणार आहे. या ब्राह्मणांचे वंशज हल्लीं पुण्यांत हयात आहेत. त्याना आपल्या पूर्वजांनीं धर्मगुरूंशीं केलेली दंडेली व त्यांची इतर कृष्णकृत्यें लोकांच्या आज नजरेस यावीं हें आवडणार नाहीं.

**इतका स्पष्टोक्तीचा प्रस्ताव करून सुधारकाच्या संपादकाने जगदुरूंचें आज्ञापत्र त्यांतील कित्येक महत्वाच्या विशेष नामांच्या ठिकाणीं ''. . . . . . . .'' अशीं टिंबे देऊन प्रसिद्ध केलें, याबद्दल या पुस्तकांत-इतक्या उशीरानेंच कां होईना, पण—त्या संपादकाचे आम्हीं जाहीर रीतीनें आभार मानतों. स्थानिक संपादकीय जबाबदारी व साप्ताहिक पत्रांत नेहमींच भासणारी जागेची उणीव, या दोन गोष्टी लक्षांत घेतां, सदर्हू पत्र शब्द सोडलेल्या धड्याप्रमाणें छापण्यांतहि संपादकानें चां. का. प्रभू ज्ञातीवर एक उपकारच केला, असें म्हटलें पाहिजे. परंतु पुण्यास " Ethnographical Notes " च्या चां. का. प्रभू संपादकानें याच पत्राचा उतारा आपल्या महत्वाच्या पुस्तकांत पुनर्मुद्रीत करतांना स्वतःजवळ या पत्राची समग्र नकल रंगो बापुजीच्या मोडी पुस्तकांत असतांनाहि टिंबांच्या बुरख्याखालीं लपून बसलेल्या महत्वाच्या शब्दांना आणि वाक्यसमुच्यांना मुळींच वर डोकें न काढूं देण्याची इतकी काळजी कां घ्यावी याचा आम्हांला उलगडा होत नाहीं. असलीं अत्यंत महत्वाचीं आज्ञापत्रेसुद्धां 'समग्र' न छापण्यांत ज्यांच्या विनयाचा अतिरेक होतो, त्यांच्या हातून इतिहासाची सेवा काय होणार हें दिसतच आहे. असो. ऐतिहासिक सत्यनिरूपणाच्या दृष्टीनें आम्हांला मात्र त्या विशेष नामांचा तिळमात्र मुलाजा राखतां येत नाहीं किंवा टिंबांच्या आड लपलेल्या बऱ्याच महत्वाच्या मजकुराला अतःपर तसेंच अंधारांत दडवून ठेवतां येत नाहीं याबद्दल फार फार दिलगिरी वाटते. सदर्हू पत्र येणें प्रमाणे :—**

श्रीशंकर

मठाचा शिक्का

श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य वर्य श्रीमच्छंकराचार्यान्वय संजाताभिनव श्री विद्याशंकर भारती स्वामी करकंजोद्भव श्री विद्यानरसिंह भारतीकृत नारायेण स्मरणानि.

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री समस्त ब्रह्मवृंद क्षेत्रस्थ वगैरे वास्तव्य प्रभृति प्रांतानिहाय यांस आज्ञा केली ऐसीजे—चांद्रसेनीय कायस्थ प्रभु या ज्ञातीचे मंडलीशीं आति दीर्घद्वेषी रा. चिंतामणराव पांडुरंग पटवर्धन व बाळाजीपंत नातु व निळकंठशास्त्री थत्ते वगैरे ब्राह्मण यांनीं शास्त्र व ग्रंथसंमतीखेरीज ग्रामण्य करून पुणें मुक्कामीं आम्हांपासून चांद्रसेनीय प्रभु मंडळीचे धर्म व कर्मे उच्छेदाविसी पत्रें घेतलीं. तेवेळीं आम्ही मठाचे संस्थानास स्वास्थ्य आहे त्यास उपद्रव

होईल या भीतिस्तव दिल्हीं. परंतु ते समयीं परस्परें उभय पक्षीचे ब्राह्मणांत तड पडून शास्त्रसंमति ग्रंथानुधारें निर्मत्छरपणें श्रीनारायेणस्मरोन वास्तविक पाहतां **चांद्रसेनीय कायस्थ प्रभु यांस अनादि वेदकर्मे करण्यास अधिकार आहे.** त्याप्रमाणेच वेदशास्त्रसंपन्न रा. राघवाचार्य यांस आम्ही पत्र कार्तिक शु।। १० शके १७४८ व्ययनाम संवत्सरी लिहिलें व प्रभुमंडळीत रा. बळवंतराव चिटणीस व विठ्ठलराव देवाजी वगैरे यांचें नांवेही पत्र दिल्हे वगैरे मजकुर चिंतामणराव पटवर्धन व बाळाजीपंत नातुस कळवून या उभयेतांची मर्जी आम्हावर फार रुष्ट होऊन बोलणें घातले आणि आम्हांस पेंचांत आणण्याबद्दल नानाप्रकारचीं तुफानें उत्पन्न करून जरब घालूं लागले. तेव्हां आम्हीं लाच्यार होऊन संस्थानचे संरक्षणाबद्दल आशा धरून उभयतांचें बोलणें कबूल करून म्हणती तें करावें किंवा देह समाप्त करावा असेंच प्राप्त जाहलें. ते समयीं चिंतामणराव यानीं मनास आलें तसें कल्पित शास्त्रविरहित चांद्रसेनीय प्रभुज्ञातीस वेदकर्मे उच्छद आणि बाधक सारांशाच्या यादी य पत्रें आम्हांपासून आश्विन शु।। १० शके १७४९ सर्वजित नामसंवत्सरांत आमचे सिके मोर्तब व स्वदस्तुरचें निशाणानिशी पुरीं करून घेतलीं, त्यांतील हांसील भाव चिंतामणराव याणीं विनंती केली कीं ही चौकसी केली ती युक्त किंवा सप्रमाण याचा विचार स्वामींनीं करून सदर्हु सारांशान्वयें चालण्याविसीं श्रीकासीक्षेत्रादि क्षेत्रस्थ व पुण्य ग्रामादि ग्रामस्थ ब्राह्मण वगैरे यांसी पत्रें द्यावयाविसी आज्ञा व्हावी म्हणोन त्याजवरून सदर्हुचा विचार पाहता चिंतामणराव याणी चौकशी ग्रंथावरून मागील पाठाची केली ते यथायोग्य सप्रमाण असे जाहले. सदर्हु सारांशांत चौकशी केल्याचा प्रकार कसकसे लिहिले ते वगैरे सर्वांस कळावे सारांशा अन्वये सर्व ब्राह्मणांनीं चालावे याजकरितां सारांश बार करून निर्णयाची याद केली त्यांतील हांसील. चांद्रसेनीय यांस वेदकर्माचा अधिकार नाही व त्या ज्ञातीची उपलब्धीही नाहीं. परभु हे चांद्रसेनी नव्हेत. संकर कायस्थ जात्योद्भव. यांसहि वेदकर्माचा अधिकार नाही म्हणोन ज्या यास आथवा चांद्रसेनी म्हणोन त्यांस वेदोक्तकर्मे करण्याविसी सर्वथा अनुमोदन देऊ नये. जर करितां कोणी अनुमोदन देईल किंवा त्यांचे घरीं वेदोक्त कर्मे करील किंवा करवील तो वेदबाह्य श्रीदेवाचा व मठाचा व ब्राह्मणांचा अपराधी दंडास योग्य वगैरे कुचुद्ये तर्कटी अनन्वित मजकुराचीं पत्रें चिंतामणराव याणें आपली प्रौढी मोठेपणा जनांत दिसण्यांस निमित्यास जागा करून आमचें नांवांनीं त्यांनींच लिहून जागोजागीं पाठविली. त्या सारांशाचे यादींत **छत्रपति यांची आमर्यादा करून** याचा मगदूर नसता मगरूरीनें भोसलेवंशावतंस श्रीशंभूराजाचा पुत्र श्री शाहूराजा सातारा राजधानी. परंतु अनादी सांप्रदाय पाहतां **छत्रपति सरकारास क्षेत्रीयकुलावतंस श्रीराजा** म्हणोन क्षेत्रक्षादि ब्राह्मण शास्त्री पंडीत व अष्टप्रधान वगैरे सुद्वां पूर्वीपासून हल्लीपर्यंत लिहीत आले. चिंतामणराव याचे मनी क्षेत्री बुडाले. परंतु शास्त्रग्रंथ पाहता **क्षेत्रिय ज्ञाति आहे.** दुसरे पत्रांत पहा. श्रीमंताचे ठिकाणी आपण विद्यमानी आहों हे अविचारी चिंतामणरावच लिहितात. परंतु छत्रपतीस असें गैरशिस्त लिहिणें पेशवे यांचा देखील मगदूर नहुता व पेशवे याची योग्यता जनजाहीर आहे. या मतिमंदास कशी शोभेल? हा केवळ अज्ञपणा व हे गृहस्थ शास्त्री अथवा पंडितही नव्हेत. पटवर्धन यांचे तडांतील निळकंठ शास्त्री थत्ते यांस आम्ही श्रीची शफत घालून पुणें मुकामींच मनोभाव सफाबद्दल विचारले. तेव्हां त्याणीं सांगितलें कीं चांद्रसेनीय प्रभुज्ञातीस वेदकर्म अधिकार ग्रंथग्रंथ पाहतां आहे. परंतु बाळाजीपंत दादा नातू

व चिंतामणराव आप्पा पटवर्धन यांचा आग्रह, सबब ते म्हणतील त्याप्रमाणें मला करणें प्राप्त व स्वामीनींही उभयतांचे मनसमजुतीप्रमाणें तूर्त करावें यांत चांगलें आहे. परंतु आम्ही थत्ते यांस विचारिलें कीं तुम्ही चांद्रसेनीय प्रभुकडे शास्त्रार्थ पूर्वी लिहून दिले हे खरें किंवा खोटें हेंच सत्य सांगावें. तेव्हां थत्तेशास्त्री यांणीं उत्तर केलें कीं हे बजिन्नस चांद्रसेनीयप्रभु यांस वेदकर्म अधिकार ग्रंथानरूप आहे म्हणोन मी पत्र लिहिलें तें खरें आहे. नंतर आम्ही उत्तर केलें कीं प्रभुज्ञातीस वेदकर्माचा अधिकार आहे याप्रमाणेंच आम्हीही जाणतों. तेव्हां आम्ही या ज्ञातीचे वेदकर्माचा उच्छेद कसा करावा? नंतर [illegible] [illegible] उत्तर केलें कीं प्रभुज्ञातीचे जाजती धर्म वाढवून शेर होऊं देऊ नयेत अशी उभयतांची म्हणणी वगैरे कारणें तूर्त अनेक प्रकारचीं आहेत. सबब गानरूप चालावे. आपण व आम्ही आज प्रभुज्ञाती बुडाली म्हणाले म्हणून ही ज्ञाति उच्छेद होऊन बुडती असें तर कधींच होत नाहीं. परंतु **आज उभयतांचे न ऐकावें तरी स्वामीस व मला फार अडचणी येतील सबब** त्यांचे म्हणण्याप्रमाणे जरब ठेवून तूर्त लोटालोट करावी. मग पुढें पाहतां येईल. अशीं उत्तरें प्रत्योत्तरें निलकंठशास्त्री यांसी आमची श्रीचे पुजेसंन्निध शपथ प्रमाणांनी गुप्त बोलणीं जाहलीं. हे शास्त्री नातू व पटवर्धन यांचे तडांतील असतां गुप्त आम्हांकडे बोलतात. प्रभूस वेदकर्म अधिकार नाहीं आणि हेच शास्त्री त्याजकडे सांगतात चांद्रसेनी प्रभूस वेदकर्मे अधिकार आहे आणि हेच शास्त्री त्याजकडे सांगतात चांद्रसेनी प्रभूस वेदकर्म अधिकार नाहीं आणि थत्ते याजपासून हा कलह निर्माण जाहला. हे दुलग बोलून भितात व आम्हांसही भयंकर प्रकार सांगतात. त्याजमुळें आम्हीही भयाभीत होऊन स्तब्ध जाहलों. त्यासमयीं आम्हापासून पत्रें घेऊन चांद्रसेनीय प्रभुज्ञातीकडील वेदकर्मे उच्छेदक पत्रें घेऊन धर्मशास्त्र ग्रंथास बाध आणून आम्हांस ज्ञातिउच्छेदाचे दोषांत घातले. **दुसरे ग्रंथात नवीन कल्पित श्लोक कोटि रचून लिहून कालांतरी त्या ग्रंथासही खोटेपणा आणिला.** असे प्रकारे यादी सारांश व पत्रें लिहिलीं. हे कागद ब्राह्मण शास्त्री पंडित विद्वान क्षेत्रक्षेत्राचे ठायी पाहून ही स्वामीची पत्रें म्हणोन हसतील हा दुरलौकिक संस्थानचा केला. परंतु हे सारांष व पत्रें ही जे पाहतील ते साफ समजतील संस्थानचे लिहिण्याचे सांप्रदायाप्रमाणें नाहींत. असे अनेक प्रकारचे पेचांत घातलें. त्याजवरून चित्तास त्रास उत्पन्न जाहला कीं हा देह विसर्जन करावा. या दिलगिरींत होतो. तो इतक्यांत आणखी अनाहूत संकट प्राप्त जाहलें. प्रथम ज्यावेळी आम्ही नातु व पटवर्धन यांचे म्हणण्याप्रमाणें प्रभु ज्ञातीचे धर्म वैदिककर्मउच्छेदक तर्कटी सारांष व पत्रे देण्याचे कबूल केले नहुते त्यासंधीत ब्राह्मणापासून गोव्याचें तुफान आम्हांस पेचात आणण्याबद्दल उभें करून चिंतामणरावच आम्हास खबर देतात. परंतु हा मजकूर आम्हांस माहीत नाहीं म्हणोन सांगितले. परंतु आम्ही बहुत भयाभीत होऊन बालाजीपंत नातु व चिंतामणराव पटवर्धन यांचें बोलणे कबूल करून **सारांषाच्या यादी व पत्रें त्यानीं जी लिहिली ती गैरशिस्त असतां कांही न बोलता पुरी करून दिल्ही.** परंतु आम्हांस प्रथम जरब पडून या उभयतांचे म्हणण्याप्रमाणें आम्ही करण्यास आम्ही अनकूल राहून करावे म्हणोन हे तरकट उभे केले होते. तो मजकूर कोण धारवाड सुभ्याचे साहेबास कळवून त्यांणीं आमची चौकशी केली. त्यास्तव आम्हास गुप्त येकटयास साहेबांनीं नेऊन श्रीची शफथ व गीता हातां म्हणोन सत्ये खरे असेल ते सांगावें कीं गोव्यास तुमचे तर्फेनीं सातारचे

राज्य कोणी वगैरे गेली व आली किंवा कसा मजकूर आहे तो खरा सांगावा. तुम्ही वेदबाह्य गोसावी आहा. खरे तेंच बोलावे. तेंव्हा आम्ही श्रीगीतेची पोथी हातांत घेऊन श्रीनारायणाचे शफतफुरसर सांगितले कीं हे सारे खोटे तुफान आम्हावर उभे केले. साहेब बोलले तुम्ही ब्राम्हणांचे गुरु तुम्हांवर तुफान उभे करण्याची सबब काय ती सांगावी. तेव्हां आम्ही उत्तर केले की पुणे वगैरे ठिकाणचे ब्राम्हणांनी बळवंतराव चिटणीस सातारकर व विठ्ठलराव देवाजी बडोदेकर यांचा द्वेष करून प्रभु ज्ञातीचे धर्माकर्मात तंटा उत्पन्न करून ग्रामण्य केले. त्यांत मुख्य चिंतामणराव पटवर्धन व बाळाजीपंत नातू यांच्या म्हणण्यांत प्रभू ज्ञातीची कर्मे बंद करावी. परंतु या उभयतांचे द्वेषाचे बोलणे सबब आम्ही प्रथम कबूल केलें नाहीं. तेव्हां आम्हावर असी तुफानें उभी केली. ते वेळी आम्ही लाचार होऊन संस्थानमठास इनामगांव वगैरे आहे हे जप्त होईल या भयामुळे पटवर्धन नातूनी जें सांगितले त्याप्रमाणे कबूल करून पत्रें व यादी दिल्या. त्या गैरशिस्त असतां आम्ही कांही न बोलता दिल्या. असा मजकूर जाहला असतां साहेब गोवा आणि सातारचे वगैरे मजकुराची सबब विचारितात. परंतु हा तुफानाचा मजकूर आम्हास कांही माहीत नाहीं आणि येविसी साहेबानी पुरी चौकशी करावी. मी सन्यासी गोसावी. मला या कामाची गरज काय याप्रमाणें श्रीची शफथ करून सांगितले. नंतर साहेबांनी सांगितलें प्रभूचे जातीचे खटल्याचा मजकूर आम्ही ऐकत आहो आणि तुम्हीहि कोणास भेऊं नये. पेशजीप्रमाणे तुमचे मठाकडे गांवखेडीं चालतील. तुम्ही सारे ब्राम्हणांचे गुरु असतां तुम्हांस बुडवण्याबद्दल हें काम उभे केले येविसी आम्ही चौकशी केली. व तुम्हीही साफ सांगितली. परंतु या कामांत एक दोन खोटे तरकटी माणसे आहेत यांजवर स्वामीनीं भरंसा ठेऊं नये. आम्ही उत्तर केले की खोट्याचा सहवास आम्हीं करणार नाही. साहेंबानी उत्तर केले की ठीक सांगून आम्हांस निरोप दिला. हें ही अरिष्ट ईश्वरांनी दूर केलें. तों क्षेत्रस्थ ब्राम्हण व शास्त्री पंडीत कितेक दर्शनास येऊन विनंती केली कीं चिंतामणराव पांडुरंग पटवर्धन सांगलीकर यांनीं स्वामीचे नांवें पत्रें व सारांषाच्या यादीवर स्वामीचे निशाण व सिकेमोर्तबानसी करून घेऊन जागोजाग पाठविली त्यांत **चांद्रसेनीय कायस्थ प्रभू ज्ञातीचे धर्मकर्माविसी वगैरे फार दूषणें ठेऊन विथर (?) विस्तारे शास्त्रसंमतीवितरिक्त मनमानसे लिहिलें आहे त्यास हे प्रकार खरे किंवा खोटे हें स्वामीनीं पुरा विचार करून न पाहता हे कागद दिल्हे. परंतु स्वामीचे नांव व मठाचे नांवाचा दुरलौकीक फार पटवर्धन याच्या लिहिण्यानी जाहला** हे सत्य किंवा असत्य वाटत असल्यास स्वामीनीं श्रीसान्निध बसून गीता गंगाजळीसह बिल्वपत्रें व तुळसीपत्रें घेऊन निर्भत्छरपणें निर्बंध ग्रंथ पाहून सांगावे आथवा जे निर्भत्छर पापभीती जाणणारे शास्त्रीपंडित यांस बसवून निबंध ग्रंथपाहून जे शास्त्रनुमते ठरले त्याप्रमाणे उलट पत्रे ल्याहावी. त्याजवरून स्वामी कृपाळू होऊन निर्भत्छरपणे श्रीसन्निध्य बसून गागाभटी व गोविंदभटी व कमलाकरक्रुत शूद्रकमलाकर, ज्ञीतीविवेक व स्कंदपुराणांतरंगत शयद्रिखंडात्मक रेणुकामहात्म वगैरे निबंधग्रंथ सत्य स्मरोन पाहतां चांद्रसेनीय कायस्थ प्रभु यास वैदिककर्माधिकार सत्य आहे. क्षेत्रीयान्वय चांद्रसेनीय प्रभु यांस दालभ्य ऋषीने क्षेत्रियांतकर भार्गवरामाचे दुराग्रहास्तव शस्त्रधारणरूप क्षेत्रधर्म टांकऊन दालभ्य ऋषीनीं पालण करून वैदिक कर्मेकरून उपनयनादि संस्कार करून पुढे परंपरागत चालत आले. प्रभुज्ञातीचे संरक्षण दालभ्य ऋषिनीं केले सबब प्रभुज्ञातीस दालभ्य गोत्रउच्चार चालत

आहे. परंतु ग्रंथ ग्रंथावरून पुरा विचार करून पाहतां प्रभुज्ञातींत गोत्रे निरनिराली आहेत. असें असतां चिंतामणराव पांडुरंग पटवर्धन याणी आती द्वेषबुद्धीने कुचुद्ये करून या तरकटी सारांशाचे यादीत लिहिले की परपुरुषापासून उत्पन्न जाहला जो पुत्र तो परभु कायस्थ ते दालभ्य गोत्रेकरून परस्परे विवाह करितात. **येक गोत्र म्हणोन लिहिले हें सर्वथा खोटे** हे शास्त्र व ग्रंथसंमतीखेरीज विचार न करितां असे जे विपरीत जागोजागी खोटे लिहून विद्यमान चिंतामणराव याणी आपले घालून आमचे नांवे जी पत्रे व यादी चांद्रसेनीय प्रभुज्ञातीचे धमवेर्दकर्मे उच्छेदाविसी आम्हापासून घेऊन जागोजागी जी पाठविली **ती दरोबस्त रद्द करून हे पत्र लिहिले आहे.** तरी समस्त ब्राम्हण शास्त्री पंडीत व धर्माधिकारी व जोसी उपाध्ये क्षेत्र क्षेत्रस्थानी व ग्रहस्थांनी व चांद्रसेनीय समस्त ज्ञातीनी व राज्यअधिकारी असतील त्यानी वगैरे हरकोणी त्या यादी व पत्रे येकंदर मजुर न धरितां **चांद्रसेनीय प्रभुज्ञातीतील वेद कर्माधिकार आहे हे त्रिवाच्य सत्ये श्री देवग्रही बसून हें पत्र लिहून सर्वांस कलावयाकरितां पाठविलें आहे.** तरी प्रभुज्ञातील वैदिक कर्मे परंपरागत चालवीत जाणे. दिकत न करणे. विशेष काय लिहिणे रा. मिती कार्तिक शु।। ९ शके १७५२ विकृतिनाम संवत्सरे **महानुशासनं वरिवर्ति.** इत्यलं.

**चिंतामणराव पटवर्धन व बाळाजीपंत नातु यांच्या ह्या प्रकारच्या लीला चालल्या असल्यामुळें चिटणीसप्रभृती प्रभुमंडळींची खात्री होऊन चुकली की आतां श्रीशंकराचार्य किंवा ब्राह्मण यांच्यावर भरंवसा ठेऊन बसवण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आपले संस्कार वेदमत्रांनी स्वतःच करूं लागल्याशिवाय निभाव नाहीं. असें निश्चित करून त्या बाबतीत छत्रपति सरकारकडे चिटणीसांनी अर्ज दिला, त्याचें आलेलें उत्तर येणेप्रमाणें :—**

यादी सरकार श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपति राजमंडळ हूजूर सातारा सुाो समान अशरीन मयातैन व आलफ राजश्री बळवंतराव मल्हार प्रमुख समस्त चांद्रसेनीय कायस्थ प्रभु याणी हूजूर आजीं दिल्ही कीं ब्राह्मणाने पुण्यांत वगैरे ग्रामण्य करून पूर्वीपासोन वेदोक्त कर्मे आजपर्यंत करीत आले त्याअन्वयें न करितां कोणी ब्राम्हणांनी आमचे ज्ञातींत येऊं नये व कांही कर्मे करूं नये अैसा तट केला आहे. तेव्हां आम्हास गर्भादानापासून आमरणांत कर्मे सारी करणे येतात. ब्राम्हण आले असता आम्हाकडून मनाई नाही परंतु न आल्यास आम्हास सारी वेदोक्त कर्मकर्मे चालवणे येतात. येविसी काय आज्ञा ती जाहली पाहिजे. म्हणोन ऐसी यास पुर्ववतप्राो ब्राह्मण येऊन न करीत तरी ज्ञातिधर्मात ज्याचे ते मुख्त्यार. सरकार दखल करीत नाहीत. त्यांस तुम्ही ब्राह्मणासिवाय आपले ज्ञातीचा बंदोबस्त कर्माविसी ठेऊन चालविले असतां मनाई व मदत नाहीं. कुंपणी सरकारांतूनहि या सरकारांत सदरहू प्रो जबाब आला आहे. छ० ३० मोहरम मु।। तारीख २४ आगष्ट सन १८२७ इसवी. मोर्तब असे.

महाराजांचें हें आश्वासन मिळतांच प्रभु-मंडळीनें शके १७४९ सालीं सातान्यास सभा भरवून ठराव मोठा महत्त्वाचा आहे. तो साताराच्या प्रभुमंडळीने ठिकठिकाणच्या ज्ञातीबांधवांस पाठविला होता. त्याची साग्र नकल येणेंप्रमाणें :—

यादी समस्त चांद्रसेनीय कायस्थप्रभु-शके १७४९ सर्वजितनामसंवत्सरे-आमचे ज्ञातीत ब्राह्मण आजपर्यंत वेदोक्तकर्म शोडस संस्कारयुक्त हस्त श्राध्धादि वगैरे त्रयकर्माधिकारपणें

करीत आले असे असून वारंवार तंटेबखेडे करावे आणि दुरभाषणे मानहानी उपहास करावी आपणच येऊन कर्मे करावी गोड बोलावे आर्जव करावे पुन्हा त्यांनी तंट्यात सिरोन तट करोन वल्गना करावा त्रयकर्मास अधिकार आहे म्हणावें सवेच नाही हे तंट्यास आल्यावर म्हणाये अैसी तऱ्हा करावी. पेशवे बालाजी बाजीराव यांची पत्रे व राजपत्रे वगैरे प्रभु म्हणेज पुरवीची असोन **परभु** हे चालविले हाली **परभ्यापरयंत** यादीत लिहिले आहे. परंतु कासी क्षेत्राची पत्रे अैसी (८०) आसामी ब्राह्मण मंडळीचे संमताचे व पुढेही बाजीराव कारकिर्दीपरयंत पुर्वापार चालवावे हे सिक्यानिसी सनदा असे असून पुन्हां पुण्यांत आलिकडे बखेडा करून विटंबणा उपहास व मनस्वी दूरभाषणें करून सभा तुलसी बागेंत वगैरे ठिकाणी केल्या. यांत आम्ही मनुष आबरु आहे की नाही हा विचार न करिता आबरुचा जीव सतका (?) आहे हे मनांत न आणिता हाजारोनी बडबड करून क्षेत्रोक्षेत्री पत्रे पाठविली आणि कर्मे चालण्यास आडचणी पाडली. श्रीशंकराचार्य ब्राह्मणांचे स्वामी त्याणी ही यादी व राघवाचार्य यांस पत्र सिकेमोर्तबानिसी दिले त्यात निखालस क्रुम बखेडा केला हे उध्धार आणोन तीन कर्माचा वगैरे अधिकार लिहून दिला असता समेट करून पोटांसं धरोन समारोप करतील हा मार्ग बहुत पाहिला. सेवट महाबळेश्वरी बखेडा तीर्थविधी श्राध्धास पाडला. आपणास चालवून करणे प्राप्त आलें व निसीक कळले. दिवसेदिवस उपनर्द करितात. व सेवटावर द्वेषबुद्धीनें निकर्ष करून ज्ञातींच बुडवावी हे आरंभिले त्याअर्थी आपले तीन कर्मा पोच गर्भाधान आष्टमांगल्यादि अग्नी सिद्ध करितात तोच अग्नि स्मार्थ हा पुढे चालावा परंतु खटपट होत नाही यामुळे करीत न आले परंतु हाली करावा व श्राध्धी आपण आपले बसावे म्हणजे तरी पोटासी धरतील तह करून चालते तीन कर्मे वेदोक्त शोडषसंस्कार हास्तश्राध्धादि बसून करितात ते करतील कटकटीचा समारोप करतील परंतु ते न करितां हाली सभा करून इकडे ब्राह्मण आले त्यास मारहाण करून बहिष्कार घातला व पुढे कोणी ब्राह्मणांनी अनुष्टानादि जाऊन करू नये करतील त्यास बहिष्कार पडेल वगैरे आन्योन्य भाषणे वगैरे केली त्यास ब्राह्मण आपलेहून येणें बंद केले असता आमची कर्मे बंद होतात ती आम्हास मुखत्यारपणे आपले ज्ञातीचा बंदोबस्त ब्राह्मणाशिवाय येऊन करणे आले ते तीन कर्मे आहेत ती तजवीज तीन कर्मे मिळतात व देतात यात तोटा नाही. व पुण्यांत व हाली ब्राह्मणांची वागणेच फजेती व विटंबणा करितात आमचे काय जाते हे समजोन आहोत पुरवी पासोन कर्मे वेदोक्त शोडष संस्कार श्राध्धादि करीत आलो असे चालू करून बखेडा कोणीही करणार नाही करील तो बहिष्कृत म्हणोन क्षेत्रो क्षेत्राची संमते महाराज व कुंपिनी सरकार पेट्यासुद्धां व पुण्यांत तंटे करणार याचे संमताने सिकादि होऊन वर महाराजाचा सिका करून दिला म्हणजे आम्ही नवीन ज्याजती आरंभिले काय असेल ते समारोप करावा ते न करिता ते करीत आहेतच. व आमची गरज सोडोन आमचीच फजिती आरंभून दिकार करितात त्या अर्थी आम्हांसही त्याची गरज नाही केले हे व आणखी पाहिजे ते ब्राह्मणासिवाय आपले ज्ञातीत मुख्त्यारपणे पाहिजे ते चालवू व कर्मे ज्ञातीची चालवणे तेव्हा सहजात साहा कर्मे करणे येतात ती करू आमचे ज्ञातीत ब्राह्मणानी दखल करणें गरज नाही. आम्हास मात्र म्हणतात हे नवीन करतात ब्राह्मण आपले कर्म सोडून दुसरियाचे करितात परंतु ब्राह्मण ज्ञाती सर्वास मान्य व मायपोट सर्वांचे समाधान ठेवून वाजवी चालवावे ते न करिता आपण सर्वांची कर्मे करितात

तीन वर्णांची कर्मे सारी आपण आपला धर्म सोडून करितात क्षत्रियांचे कर्म शस्त्रधारण वगैरे करितात व आम्हास लेखनवृत्ती भार्गव रामानी शस्त्र सोडवून उपजीविकेस दिले ते आपण चालवून आमची उपजीविका बुडवीत चालले. वैशाची कर्मे सेतकी उदीम वाणीपणाची दुकानें हेच घालून व व्याज बटा वगैरे ते आपण करितात व शुद्रांचे कर्मसुद्धा करून सिपायांत शुद्रासारखी पागोटी बांधून प्यादेगिरी वगैरे नीच कर्मे पतकरून करावयाची कोणास उपजीविकेस कुटुंब संरक्षणास जागा न ठेविता आपण करावे व जमीन वगैरे इनाम घेतेसमई भट म्हणवून दानपत्र वंशपरंपरेचे करून घ्यावे रोजगार व्यापाराचा करावा भट म्हटले असता रागास यावे पंत व दरखदार म्हणविले पाहिजे तीन ज्ञाती व इतर सुद्धा भिकेस लावून अतिनीच कसबिणीस लावण्या सिकवून मागे सारंग्या वाजवाव्या गावे अशा अनेक तऱ्हा काय म्हणून उचाराव्या असे करण्याचा आक व बहिष्कार करून ब्राह्मणांनी कर्म जे शास्त्रांत आहे ते सोडून कोणी करू नये हे न करिता म्हणतात जे ब्राह्मणांनी आग्नि सिद्ध केला तो माघारी घ्यावा मग तुम्हांस पाहिजे तरी आठा दिवसांनी करावे म्हणजे त्यास मुंजीत येज्ञोपवीत व लग्ने करून स्त्रिया करून ब्राह्मणानीच याज्ञिक करून दिल्या असे अनेक काय म्हणून परत द्यावे आम्ही तरी ब्राह्मणांचे उतीर्ण काय व्हावे व हे याजवर उत्तरास लाच्यार हे मनात न आणिता गरीब आम्हासारखे अनेक सर्व ज्ञातीस हरतऱ्हेने दाबावे येकामागे येक लच्यांड लावून उपहास करून आपण सर्व करावे ते बाहेर येऊ नये आमची पाठच घ्यावी असे होते. लहान तोंडी थोर घास घेउ नये ते फारच बरे वाईट केले असता त्यास दोष कोणी ठेवावा परंतु मनांत समजोन करावे ते न होता फक्त द्वेषबुद्धीने होते की नाही हे मनापुर्त निर्मछरपणे पाहिले असता दिलात येईल कर्मे बंद जाहली असता ज्याचे ते कसे चालवितील म्हणतात त्यास हा मार्ग काही ज्ञातीत त्याणीच दाखविला आहे की पुणतांब्यास नाहाव्याचे तटानी कसे केले हे विदितच आहे आम्हास मात्र दाबल्यास उपाय काय ज्ञातीतील सदरी सारा मजकूर लिहिला आहे परंतु तो मनात काहीच न आणिता ब्राह्मणानी केले हे फारच आनुचित हे मनात न वागविता दुराग्रह बुद्धीनें विचार न करिता तटच माजवून ब्राह्मणांनी आपल्यास सोडिल्यास आपली कर्मे आपण यथामतीने जसे चालले तसे ब्राह्मणाची गरज न ठेविता चालवावी लागतील त्यास ब्राह्मण जो ब्राह्मणाचा बहिष्कार बेआबाचा दरकार न ठेविता आपली गरज बाळगतील आमच्या बच्याव करु असे न म्हणता निसीकपणे जो घरी येऊन कार्य वगैरे वेदोक्त कर्मे यथासांग चालविल्यास मनाई न करिता येऊ द्यावे परंतु त्याचे हातून कर्म चालवावे. परंतु ब्राह्मणास भुलथाप देऊन आपले हाते त्याचे **कुटुंबघात करून ब्राह्मणास बोलावून आणून त्याचे हाते कर्म करुं नये. आपण आपले कर्म यथा ज्ञाने जसी होतील तसी चालवावी. येविसी सरकारास स्वज्ञातीने विनंती करून आज्ञा घेऊन ब्राह्मणाचा आटक न धरिता षट्कर्मांतील यजन आध्यायन दान ही तीन कर्मे पुरवीपासोन वेदोक्त आपली चालत आली आहेत ती व हाली ब्राह्मण न येण्यामुळे याजन आध्यापन प्रतिग्रह ही तीन कर्मे नवीन करणे प्राप्त जाहली येथून षट् कर्मे आपली स्वज्ञातीतच करीत जावी दुसरे अन्य ज्ञातीत जाऊन त्याचे कर्म स्पष्ट चालवू नये व त्याचा प्रतिग्रह घेऊ नये.** ही यादी सर्वानुमते ठरली असे. या प्रो जो न वर्तेल तो ज्ञातिबाह्य. मि॥ ज्येष्ठ शु॥ १० इंदुवासर मु॥ शाहुनगर नजिक किले सातारा छ. ९ जिलकाद सु॥ सबा आशरीन मया तैन व आलफ.

असला महत्वाचा ठराव नुसता पसार करूनच चिटणीसप्रमुख सातारकर प्रभु मंडळी स्वस्थ बसली नाहीत. त्यांनी एकेक यादी प्रत्यक्ष आचारणाकरितां ठिकठिकाणच्या ज्ञातिबांधवांस पाठविली. ही यादी येणेंप्रमाणे :--

श्री

राजश्रीयाविराजित राजमान्य राजश्री समस्त च्यांद्रसेनीय कायस्थ प्रभु मंडळी वास्तव्य तासगांव व मिरज व करवीर शाहापुर बेळगांव स्वामीचे शेवेसी.

पोष्य बलवंतराव मल्हार चिटणीस सांष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल त॥ छ २१ रजब पावेतो येथास्थित जाणोन स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष पेशजी ज्ञातीप्रकरणी म॥र लिहिलाच आहे त्यास ब्राह्मण मंडळी येक होऊन तट आला आहे त्यास स्वछे वेदोग्त कर्मे म्हणून यादी लिहून चालत आल्याप्रमाणे चालऊ अैसी समतांची यादी करून करितात अैसे होते नाही तर मोडत नाही कोणी ममतेतील वगैरे जेथे येथील स्वामीत्वाची जरब वगैरे तेथे चालत आले तसे चालले उगेच का वाढविता अैसे म्हणून लेपट मारून चालते ते चालवितात परंतु चहूंकडे बखेडा मोडतो अैसे नाही हूल करणे तंटे करणे व ज्याचा जोर जसा जेथे पडेल तेथे तसे दंगा वगैरे तंटे करणार त्यास हाली तट आहेच व पडला आहे त्यास सरकार आनकूल आहे कंपनी सरकारची यादी आली तिची नकल पाठविली आहे. सरकारची यादी तपसीलवार तंटा आमुक कारणेंच पडला व वारंवार पडत आला व पडतो त्यास सदरहू कंपनीची यादीचा म॥र जमेस धरून तुमचे तुम्ही कार्ये वगैरे याज्ञिक विषय करावा चालवावे ब्राह्मणाची गरज ठेऊ नये. मुख्तियारपणे करावे यैसे सिक्यानिशी करून ध्यावे व प्राप्त होणे हा समय आहे. तीन कर्मेस अधिकार आहेच व तीन कर्मे आणखी तीही या करण्यानी प्राप्त होऊन शटकर्मे करणे मिळतात व होतात तयास दान देणे व घेणे आपले आपणात करणे येईल वगैरे तुटक जाल्यावरी करावे लागेल त्यास मग त्यास विचार वगैरे नाही हा आपले ज्ञातीचा समाजला पाहिजे. गरज न ठेवता चालले पाहिजे पुढे ब्राह्मण उमजून वृत्ती व. . . . डू लागले सबब चालत आले तसे आम्ही चालवितो असे जाल्यास समताची यादी करून घेऊन त्यावर सरकारचा सिका करून घेऊन करावे परंतु वारंवार झाकून हारवक्त तंटे व लाथा घेणे व लजीत होऊन आडून वागणे नीट नाही आसे वाटते व सरकार आनुकूल वगैरे प्रसंग वारंवार प्राप्त होतात असे नाही याचा सर्वांनी विचार करून सर्वांनी येकसारखे वागले पाहिजे ज्ञातीचे काम येकांनी येक वोढणें करणे न व्हावे अैसे जाले पाहिजे येविसी सर्वांचा विचार पोक्त करून जलद उत्तर यावे ते संमत याद करून उत्तर यावे परंतु फाट घेऊन तुटक करून यासमई साधून ब्राह्मणावाचून आडत नाही याची कर्मे करितात आसे होऊन पुढे ते ब्राह्मण आनकुल होऊन जाल्यास पुढे वारंवार तंटा नाही नीट चालले नाहीपेक्षा त्यांची गरज नाही ये कर्म ब्राम्हणाप्रमाणे आपले ज्ञाती चालतात चालवितात येविसी सरकार हुकमानी जाले अैसे होऊन होते येकवेल तुटक व्हावे हे फार चांगले आसे इकडील सर्वांचे विचारे ठरते लिहिले आहे. निरंतर पत्र पाठवून संतोषवीत जावे. बहुत काय लिहीणे लोभ कीजे हे विनंती.

आधुनिक बोलघेवड्या कायस्थ प्रभू कॉन्फरन्सवाल्यांप्रमाणे यादी काढूनच चिटणीस स्वस्थ राहिले नाहींत. यादीप्रमाणें व सातारकर मंडळीच्या ठरावाप्रमाणें वागण्यास इतरत्र लोकांना धीर यावा म्हणून त्यांनीं स्वतः अग्नीहोत्र घेतलें. चिटणीसांनीं (परभूनें) अग्नीहोत्र घेतलेलें पाहून व ऐकून महाराष्ट्रांतील ब्राह्मणांत हाहाकार उडाला. हिंदुधर्म बुडाला, प्रळयाची वेळ आली ! असें ब्राह्मण्याभिमान्यांस वाटून त्यांनीं महाराजांस अर्जी केली :—

चिटणीस यानीं अग्नी सिध्ध केला आहे तो काढून टाकावा, असी त्यांची वहिवाट नाहीं. कै. शिवाजीमहाराज शाहुमहाराज व पेशवे यांचे कारकीर्दीत असी चाल नव्हती. चिटणीस नवी पाडू पाहतात. तर त्याचा बंदोबस्त व्हावा. (कार्तिक व॥ २ शके १७५०)

त्यावर चिटणीस यांनीं महाराजांस कळविलें कीं :—

ब्राह्मण आमचे गर्भादिनादि संस्कार पूर्ववत वेदोक्त चालवीत नाहींत व चालू देत नाहींत नवीन ग्रंथरचना करितात आम्ही नेहमींप्रमाणें जो अग्नी सिद्ध केला आहे तोच ठेविला आहे यांत कांही नवीन प्रकार नाहीं तेव्हां स्वामींनीं चौकसी करून निकाल लावावा. (कार्तिक शु॥ १ शके १७५० सर्वधारी नाम संवत्सरे)

ब्राह्मणांनीं महाराजांस आधी देखील एक यादी पाठविली होती :—

अलीकडे परभु आपला ज्ञातीधर्म सोडून वेदकर्म करण्याविसी ब्राम्हणास लोभाविष्ट करितात तेव्हा त्यास सिक्षा करून बंदोबस्त व्हावा जे ब्राम्हण त्यांचे घरी वेदोक्तकर्म करतील त्यास बहिष्कृत करावे तंटे होऊन मारामाऱ्या होतात त्याचा बंदोबस्त व्हावा नाहींतर कांहीं ब्राम्हण मरतील बंदोबस्त जाला म्हणजे आम्ही जयजयकार करू ते महाराजास श्रेयस्कर (आश्वीन शु॥ १ शके १७४९)

यापुढील हकिकत प्रो. डोंगरे यांच्याच शब्दांत येथें देतों :—

वर सांगितल्याप्रमाणें प्रभू व ब्राम्हण जातींत ग्रामण्य चालूं असतांच, सांगलीकरांनीं प्रभूविरुद्ध शके १७४७ सालीं श्रीशंकराचार्यांकडून मिळविलेल्या यादींत 'कलींत क्षत्रिय नाहींत; कै. शिवाजीमहाराज, संभाजीमहाराज व शाहुमहाराज यांनीं क्षत्रिय मुळींच नाहींत असें ठरविल्याचे दाखले महाराजांच्या दप्तरांत बार झालेले आहेत.' असा सर्वथैव खोटा मजकूर घुसडून दिला होता. म्हणून क्षत्रिय मराठे मंडळीनें ता. २७ जुलई सन १८२७ रोजीं राजमंडळास अर्ज केला कीं, 'यादी परत आणवून किंवा दुसऱ्या रीतीनें ब्राम्हणांनीं खोटीं विधानें करून लोकांचा मुद्दाम गैरसमज केला आहे तो घालवावा; नाहींतर आम्हास आपला विचार करणें भाग पडेल वगैरे.' पण समोर असलेल्या कागदपत्रांवरून राजमंडळानें ह्या बाबतींत मन घातलें असें दिसत नाहीं.......पुढें सन १८३० सालीं महाराजांस पूर्ण मुखत्यारी मिळाली. त्यानंतर महाराजांनीं क्षत्रिय मराठ्यांच्या वेदोक्ताच्या हक्कासंबंधाचा विषय हातीं घेऊन ७/८ वर्षे अव्याहत श्रम करून सर्व वादग्रस्त मुद्यांचा पंडितांकडून निकाल करवून, आपलें व आपल्या आप्तस्वकीयांचें क्षत्रियत्व सर्वमान्य रीतीनें स्थापित केलें.

" कलींत क्षत्रिय मुळींच नाहींत म्हणून ब्राम्हणांखेरीज इतरांस वेदोक्ताचा अधिकार नाहीं " हा वादाचा मुख्य मुद्दा असल्यामुळें क्षत्रिय मराठे व चां. का. प्रभू ह्या जातीचे लोक पंडितांच्या सभेंत वाद करून आपल्या जातींचे क्षत्रियत्व सिद्ध करण्याकरितां एकत्र झाले हें अगदीं स्वाभाविकच आहे. श्रीमन्महाराजांनीं वे. शा. विठ्ठल सखाराम उर्फ आबा पारसनीस, चां. का. प्रभू ह्या विद्वान गृहस्थास क्षत्रियांच्या तर्फे वकीलपत्र दिलें होतें. व विरुद्ध पक्षानें वे. शा. राघवाचार्य गजेंद्रगडकर ह्या अत्यंत विद्वान पंडितास आपल्या तर्फे वाद करण्याकरितां नेमिलें होतें. आबा पारसनीस जसे फारशींत निपूण होते तसेंच संस्कृतांतही असून त्यांचें दोन शास्त्रांचें अध्ययन झालें होतें. साताऱ्यास हल्ली ज्या वाड्यांत शहरफौजदार कचेरी आहे त्या ठिकाणीं त्या वेळीं संस्कृत पाठशाळा असून ही जागा वादाकरितां पसंत केली होती. ह्या पाठशाळेंत उभयपक्षांचा वाद कित्येक दिवस लेखी पूर्वपक्ष-उत्तर-पक्ष- पद्धतीनें चालला होता. ज्या दिवशी पंचांचा ठराव व्हावयाचा ते दिवशीं पुण्याहून बेळगांव पर्यंतच्या प्रातांतील हजारों ब्राम्हण साताऱ्यास निकाल ऐकण्याकरितां पाठशाळेपुढें जमले होते. आपल्याविरुद्ध निकाल देणारांची साधल्यास डोकीं फोडून सूड घेण्याची विद्या भिक्षुक वर्गास चांगली अवगत असल्यामुळें, निकालाच्या दिवशीं कदाचित क्षत्रियपक्षाभिमानी पंडितांचा अपमान होईल ह्या भीतीनें महाराज स्वतः नागव्या तरवारीनें पाठशाळेपुढें बंदोबस्त करीत होते.

**--सिद्धांतविजय, प्रस्तावना, पृ. ९।१०**

**क्षत्रियांचें क्षत्रियत्व प्रस्थापित करून यशस्वी झाल्यावर आबा पारसनीसाचा महाराजांनीं फार मोठा गौरव केला. महाराजांचा राज्याभिषेक समारंभ निर्विघ्नपणें पार पडल्यानंतर आबा पारनीसांच्या विनंतीवरून महाराजांनीं त्यांस अप्रतीम कामगिरीचा उल्लेख करून आपल्या शिक्यामोर्तबानिशीं आज्ञापत्र स. १८३८ त करून दिलें.**

श्रीमंत चिंतामणराव आप्पा पटवर्धन आणि ' तरकटाचे शिरोमणी ' बाळाजीपंत नातू या राष्ट्रपुरुषांनीं सातारकर छत्रपति महाराज यांच्या उच्चाटणाबद्दल जे जे अनन्वित अत्याचार केले त्याची साधारण कल्पना उपोद्घातांत दिलेली आहे; येथें फक्त श्रीमंतांनीं नीळकंठशास्त्री थत्त्यासारख्या विवेकभ्रष्टाला हातीं धरून छत्रपतींचे अभिमानी जे चां. का. प्रभू यांचा नायनाट करण्यासाठीं आणि त्यांचा राजकीय, धार्मिक किंवा सामाजिक दर्जा कवडीमोल ठरविण्यासाठींच केवळ नव्हे, तर त्यांना लोकदृष्टीनेंहि पाण्यापेक्षांपातळ बनविण्यासाठीं जीं जीं कारस्थानें केलीं त्यांचाच उल्लेख करावयाचा आहे. चांद्रसेनीयांना **शूद्राधम** ठरविण्याकरितां श्रीमंत आप्पासाहेबांनीं आपल्या विवेकशून्य शास्त्रीहस्तकाच्या हस्तें चां. का. प्रभूंच्या उत्पत्तीबद्दल. जो नवीन पांचवा वेद निर्माण केला त्याची एक नकल आम्हांस उपलब्ध झाली आहे. ती आम्ही जशाच्या तशी खालीं मुद्रित करीत आहोंत. त्यावरून इतकें सिद्ध होतें कीं श्रीमंत आप्पासाहेब जसे तरवारबहाद्दर होते तसे वेदशास्त्रपारंगतहि होते आणि सुप्रसिद्ध शाहीर अनंतफंदीनें आपल्या कटावांत त्यांच्यासंबंधानें " कर्ममार्गामाजी सुलक्षणी, * * ज्याला जितुके पाजतील पाणी, त्याला पिणें प्राप्त मुक्यांनी " वगैरे जे स्तुतिपाठ गायले आहेत, ते अस्थानीं होते असें कोण म्हणेल?

श्रीमंत आप्पासाहेबांच्या खास आश्रयाखालच्या ' धी सांगली न्यू *शास्त्र मॅन्युफॅक्चरिंग फॅक्टरी ' तल्या स्वदेशी मालाचा एक मासला तर पहा :—

"संकर ज्याति परभु कायस्छो उत्पत्ति ॥ शयाद्रिखंडेपि कमलाकरेण चितः माहिष्य वनिता सुनु वैदेहाय प्रसुयते ॥ सकास्छ इति प्रोक्त तस्य कर्म विधीयते ॥ १ ॥ लिपिनां देशज्यातिनां लेखनं ससमाचरेत् गणकत्वं विचित्रंच बिजपाटि प्रमेद ताः.... म सुद्र जातिभ्या पंच संस्कार वानसौ चतुरवर्ण श शेवाहि लिपि लेखन साधनं ॥ सिखा यज्ञोपवितंच वस्त्र प्रारक मंभसा स्पर्शनं देवता नाच कायस्छोयं विवर्जेतः क्षेत्राद्दशायाममाहिष्य ॥ विप्रोहि प्राजो वैदेहा इति ॥ अथ नृसिव्ह पाराशर निळकंठ भटेन ॥ राम उवाच ॥ माहिष्य वनिता सुनं वैदेहाय प्रसूयते ॥ स कायस्छ इति प्रोक्तः सिंदुतिर निवासकः दालभ्याश्रमं प्राप्तः कायस्छो लिपिलेखकः ॥ तन्ममा चक्ष्व भगवान्माया मानुष विग्रह ॥ राम उवाच ॥ पुरा रामेण निहंतः कार्तिविर्यो महबलः तदा माहिष्मति लोकाः पलायन पराभवन् ॥माहिष यस्य कन्या तु सरूपा तनुमध्यमा ॥ दालभ्याश्रम मनुप्राप्ता त्राहि त्राहिति वादिनि ॥ तदा दाल्भ्यो महातेजः ऌपथा क्लिन्न मानसः ॥ एहि बाले ममवने तत्र त्राणं भविष्यति ॥ तदा प्रभूति सा तंत्र वास चक्रे चिरं मुदा ॥ कन्या त्वे स्छापयो मास दाल्भ्यो वेद विदावरः कदाचिद्दैवयोगेन वैदेहा रन्यस्य संगति ॥ वेदवृत उवाच ॥ कौ सौ वैदेह कस्तत्र कथंत स्याश्च संगति तन्ममाच स्वेदवश राम राजिव लोचन ॥ राम उवाच ॥ ब्राह्मण्यां वैश्यतो जातो ॥ वैदेहो नामतः किला ॥ तिथार्थि पर्यटन्पृथ्वि तिर्थस्ना(ना)र्थमागतः ॥ मार्गे द्रद्वा श्रमं पुण्यं नाना दुम समाकुलं ॥ नाना पक्षि समाकिर्णमत् कोकिलनादितं ॥ सुछाय सुतलं रम्यं नाना

* या वेळीं दरोबस्त शास्त्रांच्या ग्रंथांतूनहि नवीन श्लोक घुसडून देणें किंवा त्यांतील कांही मजकूर गाळणें अथवा व्यंगार्थी करुन ठेवणें अशा प्रकारचाहि यत्न झाला असावा, असा आम्हांला जबरदस्त संशय येतो. कारण छापखान्यांचा व वर्तमानपत्रांचा प्रसार झाल्यावरसुद्धा संस्कृत ग्रंथांत घालघुसड करण्यास ज्या समाजांतील मंडळीची छाती अझूनहि कचरत नाही, त्यांनीं निव्वळ हस्तलिखित पोथ्यांच्या काळांत काय काय अत्याचार केले असतील ते ईश्वराला व त्यांनाच माहीत. सन १८६४ सालीं श्रीधर शिवलाल मारवाडी याच्या ज्ञानसागर छापखान्यांत ' बृहत्पाराशर स्मृति ' नांवाचा ग्रंथ छापत होता. त्या छापखान्यांतले प्रुफरीडर कृष्णशास्त्री साठे यांनीं त्यांतल्या १२ व्या अध्यायांत ब्रह्मनिरूपणाच्या मजकुरांत खालील ३ बनावट श्लोक खुशाल दडपून दिले :—

> **इत्येतत्ध्यानमार्गंतु वदंति कवयो द्विजाः ॥**
> **कौंकणाश्चित्तपूर्णास्ते चित्तपावन संज्ञकाः ॥ ४२ ॥**
> **ब्राह्मणेषुच सर्वेषु यतस्ते उत्तमामताः ॥**
> **एतेषां वंशजाः सर्वे विज्ञेया ब्राह्मणाः खलः ॥ ४३ ॥**
> **माध्यंदिनाश्च देशस्था गौड द्राविड गुर्जराः ॥**
> **कार्णाटातैलंगाद्यपि चित्तपूर्णस्य वंशजाः ॥ ४४ ॥**
> **अतः चितस्य पूर्ण यो निंद्यातस्य क्षयो भवेत् ॥**

ही बनावट गोष्ट प्रथम इंदुप्रकाशचे संपादक कै. विष्णुशास्त्री पंडीत यांनीं उघडकीस आणली; म्हणून ज्या मूळ ग्रंथावरून छापील प्रत तयार झाली होती ती बाबा फाटकांची जुनी हस्तलिखित प्रत मागवून शोध केला तों त्यांतहि कृष्णभट साठ्यानें आधींच हे नवीन श्लोक घुसडून त्या अध्यायाचे अथपासून इतिपर्यंत क्रमांकहि खोडून बदलून ठेवले होते. हें प्रकरण पुढें कोर्टापर्यंत गेले होतें. अशाच प्रकारचा दुसरा एक प्रयत्न घाटे आणि भाटे या नावांच्या गृहस्थांनीं केल्याचें आमच्या ऐकिवांत आहे. मेसर्स साठे भाटे घाटे खटपटे ॲन्ड को. चा हा खोडसाळपणा जर इंदुप्रकाशनें चव्हाट्यावर आणला नसतां, तर आमच्या राजवाड्यांची 'क्षितिपावन' व्युत्पत्ति ज्ञानकोशांतहि बिनदिक्कत जाऊन बसली असती. अझूनहि बसणार नाहीं असें नाहीं. भा. इ. सं. मं. सारखी राष्ट्रीय संस्था तरी पुढेंमागें हा क्षितिपावन बाप्तिस्म्याचा विधि सफाईत खास उरकून घेईल, अशी अपेक्षा करण्यास पुष्कळ जागा आहे. [पहा :—इंदुप्रकाश ता. १६ जून १८०३.]

पुष्पं सुवासितं ।। श्रमापनोदक द्रदवा वासं चक्रेति हर्षितः ।। कदाचित्फल पुष्पार्थ समायाता सुकन्यका ।। साद्रद्य तेन सश्रोणि नवयौवन *शालिनी ।। सुकेशि चंद्रवदना वृत्तपिनद्यतस्तनि ।। सुनासाकुंददशना सुधरा पद्मलोचना ।। बिंबोष्टी तनुमध्याच मतद्दिरदगामिनी ।। मुखपद्मसुंगंधेन पुष्पोचालिन षद्दा ।। कर पल्लव कात्याहि जित पल्लव कोमला ।। चित्रवस्त्रपरितांगि पुष्पहार विभूषिता ।। कर्णावतंस विन्यास जित हेम विभुषण ।। एकाकि निवने दृष्ट्या मदविन्हल मानसा ।। सापितं चारू सर्वांगं दृष्टवा कामेन पिडिता ।। एवं तौ सगतौ तत्र कामलिला विमोहितौ ।। तस्मा तस्यां तदा जातः कायस्छो परनामकः ।। सदा दाल्भ्यो नसा पृष्ट्वा कस्मात वसूतो भवेत् । तन्ममा चक्ष्व कल्याणि यथातथ्य मगागतः ।। कन्योचाच कश्चिद्देदेहको नाम तवाश्रमपदें गुरौ ।। आगतो मुनिरूपेण सिंदुस्नानार्थ मादरात ।। तत्संगाज्जनितः पुत्रौ रूपोदार्य गुणान्वितः ।। पालनीयः प्रयत्नैन पुत्र वत् तद्‌मुने ।। तदा प्रोवाच समुनिः परक्षेत्रोद्भव सूतः ।। परभूरिति संज्ञाच लोके ख्यातिर्भविष्यति ।। प्रोक्तोपजिविका तेन कर्मे तस्य विधायते ।। लिपिनां देशजातानां लेखनं स समाचरेत ।। गणकत्वं विचित्रत्वं बिजपाठि प्रभदेतः ।।आधम शुद्र जातिभ्यः पंचसंस्कार वानसौ अष्टमांग लयमाद्य स्यातंन्नामकरणं तथा अन्नप्राशनं चौलंच विवाहः पंचमस्मृतः ।। चातुर्वर्ण्य** सेवादि लिपि लेखन साधनं ।। व्यवसायः शिल्पीकर्म सज्जीवन मुदाहृत ।। शिखा यज्ञोपवितंच वस्त्रमास्तु मंभसा ।। स्पर्शनं देवतानांच कायस्छोद्यो विवर्जयत् ।। इति निलकंट कृत निबंध ग्रंथेपु निहितं ।। अनेवि ।। कायस्छ भार्याया परेण व्यभिचारिताः उत्पादितः स परभु कायस्छ परिकिर्तितः ।। शुद्रधर्मो धर्महिनो लिपिलेखन वृत्तिमान ईति शयाद्रि खंडे ।। चिंतामणराय कृत सारांष निबंधेषु लिखितं ।।

**प्रस्तुत राष्ट्रीय महाकाव्य आम्हांला जसें मिळालें तसें अक्षरशः छापलें आहे. यांतील नकलकाराच्या शेंकडा शंभर चुका जरी बाद केल्या, तरी काव्यकर्त्याच्या अगाध पांडित्याचा व संस्कृतभाषापारंगतत्वाचा पराक्रम त्यांत किती उज्वंल रीतीनें झळकत आहे, हें आंधळ्यासहि दिसेल. सदर्हू महाकाव्य सांगलीकर श्रीमंतांचे आधुनिक अवतार इतिहास संशोधनेश्वर विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांच्या तडाक्यांत कसें सांपडलें नाहीं कोण जाणें ! नाहींतर त्यांनीं '' शिवराज प्रशस्ति व कायस्थधर्मदीप '' या आपल्या निबंधाला अशी कांहीं चुरचुरीत फोडणी दिली असती कीं ज्याचें नांव तें ! असो. प्रस्तुत महाकाव्यांतील प्रलाप किती निरर्गल आहेत हें कोणास सांगण्याची अवश्यकता नाहींच; तेव्हां त्याबद्दल अधिक विवेचन करून आम्ही आमची लेखणी विटाळविण्याचें साफ नाकारतों. तथापि, सदर्हू काव्याचा कर्ता आणि त्याची जात यांच्या दर्जाला, शीलाला व ऐतिहासिक लौकिकाला न शोभण्यासारखें एक अक्षरही त्यांत नाहीं, इतकी मात्र शिफारस केल्याशिवाय पुढें जाणें बरें नाहीं.**

**सदाशिवराव भाऊ आणि नारायणराव पेशवा यांच्या अपुऱ्या इच्छा पुऱ्या करण्यासाठी श्रीमंत चिंतामणरावासारखा नेता कंबर कसून सज्ज झाल्यावर ग्रामण्याच्या नाटकास रंग**

* या एकंदर वर्णनशैलीवरून श्रीमंत सांगलीकर मोठे प्रतिभासंपन्न कवि केसरीहि होते असें दिसते.

** येथें मात्र चिंतामणराव सपशेल घसरले. कायस्थ प्रभूंना शूद्राधम ठरविण्याच्या या धामधूमींत त्यांनी चतुर्वर्णांच्या अस्तित्वाबद्दल चुकून साक्ष दिली आहे.

कां चढणार नाहीं? हां हां म्हणतां सांगली फॅक्टरींतला शास्त्रांचा माल चहूंकडे प्रसार पावला आणि चां. का. प्रभूंना ठिकठिकाणीं जेथें सांपडतील तेथें वेदोक्ताच्या वरवंट्याखालीं ठेंचण्याच्या राष्ट्रीय चळवळींना ऊत आला. निःक्षत्रीय पृथ्वी करणाऱ्या परशुरामाची कथा अझून जरी कल्पित कादंबरीच मानली जाते; तरी त्याच्या नांवाच्या अभिमानी श्रीमंतांनीं निःकायस्थ पृथिवी करण्याचा जणूं काय संकल्पच सोडला होता. पण क्षत्रिय बेटे पडले लुच्चे ! त्यांनीं एक नाहीं दोन नाहीं एकवीस वेळां परशुरामाला चकवून पुन्हां उरले ते उरलेच तेव्हां आमच्या आप्पांना तरी यश कसें येणार? त्यांनीं सोडलेल्या नवीन स्वकृत शास्त्राचे फर्मान देशोदेशीं व गांवोगावीं पाठवून क्षत्रिय कायस्थ प्रभूंना शूद्राधम ठरविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. या फर्मानांपैकीं एकाची नकल आम्हाला मिळाली असून तिच्यांतील मजकुरावरून चिंतामणरावांनीं खुद्द श्रीमंत पेशव्यावरहि तिप्पट सरशी केली, असें आढळून आलें. बिचारा उल्लू नारायणराव पेशवा कायस्थ प्रभूंना फक्त नऊ कलमीच कतबा मान्य करावयास सांगत होता; पण या वेळच्या ठिकठिकाणच्या फर्मानांत चार कम नऊ त्रिक सत्ताविस कलमांचा कतबा कायस्थ प्रभूंच्या छाताडावर भिरकावून देण्यांत आला होता. हा तेवीस* कलमी कतबा येणेंप्रमाणें :—

१ एकेरी धोत्रे नेसू नये.
२ दुहेरी धोत्रे नेसावी.
३ उभे आडवे गंध लावू नये.
४ गंधाचा टिळा लावावा.
५ ब्राम्हणासारखे आसन घालून बसूं नये.
६ सोवळी नेसूं नये.
७ पक्षास अथवा श्राद्धास भाताचे पिंड देऊं नये.
८ शालीग्राम व बाण व मृत्तिकेचे पार्थिव करून पुजा करू नये.
९ रुद्राक्षधारण करू नये.
१० याचे घरी जातिजेवण जाले तरी साखळीनें गंध लावूं नये.
११ ब्राह्मणभोजन कर्णे तरी ब्राह्मणाचे घरी सिधा देऊन ब्राह्मणाचे घरी जेवावयास जावे.
१२ ब्राह्मण शागीर्द अथवा स्वैपाकी ठेवूं नये.
१३ याचे घरी रात्रीस कोणी जाऊं नये.
१४ कोणी ब्राह्मणाचे घरी व रस्त्यांत ब्राह्मणदर्शन जाले असता दीर्घ दंडवत घालावे.
१५ याचे घरी नवरा मरेल तिचे केस काढू नये गंधर्व पाट लावावा.
१६ याचे घरी दही व दुध सर्व प्रजातीनें घेऊं नये.
१७ ब्राह्मण सोवळे नेसून देवाची पुजा करतील त्या देवाची पुजा करू नये.
१८ तुळसीबेल तोडू नये.

*साखरेचा खाणार त्याला देव देणार ! भारत-इतिहास संशोधक मंडळाचे एक संशोधक रा. रा. पांडुरंग नरसिंह पटवर्धन यांनीं मोठ्या श्रमानीं कुठें नऊ कलमी कर्तव्याची याद पैदा केली आणि ती त्यांनीं " प्रभूप्रकरणीं दोन निवाडपत्रें " या मथळ्याखालीं मंडळाच्या दिग्विजयी अहवालांत छापूनहि काढली. घ्या म्हणावें ही २३ कलमीं याद ! शोधा एखादा वांईकर भटजीचा गळाठा आणि ठेवा त्यांचें अस्सल मंडळाच्या दप्तरांत शाबूद ! किती झालें तरी निवाडपत्रच ना तें ?

१९ नवरात्रांत होम व सप्तसतीचा पाठ करूं नये.

२० ब्राह्मणाचे हाताने रुद्राभिषक करू नये.

२१ देव ब्राह्मण व गाय यांची पुजा करावी.

२२ देव ब्राह्मणाची अवकृपा करू नये. मन्याचा अभिशक करावा.

२३ याचे घरी अठरा जाती व विलम जाती सकरज्याती कोणी याच घरी जिवनपाणी घेत असल्यास आजपासून घेऊं नये.

**ह्या तेवीस कलमी कतब्यावर कायस्थ प्रभूंच्या सह्या घेण्याचा उपद्व्याप या खेपेस न करितां त्या सर्व—**

देशांत व राज्यांत हे परभु जेथे राहतील ते स्थळी वर लिहिले अन्वय तुम्ही सर्वत्र जातीने वर्तावे याप्रमाणे देशोदेशी आज्ञा रवाना केली आहे. जोसी उपाध्ये धर्माधिकारी राज्याधिकारी देशपांडे व कारभारी व कुळकर्णी व पाटील व सेटे महाजन मुकादम याणे आज्ञाप्रमाणें ताकीद प्रजातीस एक एक पत्राची नकल देऊन गांवोगांवीं नकल रवाना करून जेथे देवस्थान नाक्यावर असेल त्या देवळांचे खांबावर नकल करून खांब्यास चिकटऊन ठेवावी ही आज्ञा आमान्य केल्यास दश पुरवज व दश परमपरा नरक.

**अशी ग्रामण्यप्रचारकांची आज्ञा होती. इतके सगळें झालें तरी क्षत्रिय कायस्थ प्रभू आपल्या प्राचीन परंपरेच्या इतिहासाची जणूं काय पुनरावृत्ति करण्यासाठीं शिल्लक उरले ते उरलेच ! ज्यांनीं परशुरामाला दाद दिली नाहीं ते चिंतामणराव आप्पांना कसची देतात ?**

**या ग्रामण्याची बहुतेक सर्व उपलब्ध माहिती येथवर दिली. आतां शेवटीं श्रीशंकराचार्यांचीं कांहीं उपलब्ध आज्ञापत्रें येथें नमूद करून या ग्रामण्याची रजा घेऊं.**

[१] **शिक्का**

श्रीमत् परमहंस परिव्राजकार्य............श्रीशृंगेरी श्रीविद्या शंकर पादपद्माराधक श्री शृंगेरी शंकर भारति स्वामिभिः ।

अस्मदत्यंत प्रियशिष्य गुरुभक्तिपरायण राजमान्य राजेश्री देश व कोकण राहणार चांद्रसेनीय कायस्थप्रभु क्षत्रिय यांसी आशिर्वादपूर्वक श्री नारायण स्मरणानी तुंगभद्रातीर कुंडलिस्थानि सिवपुजातत्पर आहो. तुम्ही पत्र राजश्री अमृतराव कृष्ण प्रभु क्षेत्रि देशपांडे प्रांत चेऊल याजबरोबर पाठविले ते संस्थानी ज्येष्ठ वद्य पंचमी प्रविष्ठ जाहाले. त्यांतील अर्थ आपले स्वज्ञातींत तीन कर्माचा अधिकार आहे त्यास ब्राह्मण बखेडे करतात येविसी पुरवी श्रीमंत छत्रपति महाराज शाहूराजे यांचे कारकीर्दीत पंत प्रतिनिधी यांचे कारभारी यमाजी सिवदेव याणी त्रिकर्माचा अधिकार नाही म्हणोन कलह वाढविला त्याजविसी **छत्रपती महाराज याणी सिष्टाचार सभा करून ग्रंथातरीचे शोध पाहून चांद्रसेनीय कायस्थ प्रभु क्षेत्रिय कर्माचे आधिकारी हे खरे असे ठरल्यानंतर येमाजी सिवदेव याणी आग्रह सोडिला पुढे पेशवाईत श्रीमंत माधवराव नारायण प्रधान यांचे कारभारी नाना फडणवीस व हरीपंत फडके यांचे** आश्रयानें कोंकणस्थ ब्राह्मणांनी ग्रामण्य करून पुणे मुकामी रामशास्त्री प्रभृती सिष्टाचार सभा

होऊन ग्रंथातरी निर्णय पहातां स्पष्ट न सांगवे कारण सरकारचे लक्ष समजोन श्री क्षेत्र वाराणसी येथें लिहून पाठविले तेथे निश्चय ठरोन येईल त्याप्रमाणे चालावे नंतर श्री क्षेत्रीहून पत्रे आली त्यांत निश्चय चांद्रसेनीय कायस्थ प्रभु क्षेत्री त्रिकर्माचे अधिकारी हे समाजोन कलह वाढू दिला नाहीं. नंतर वेदशास्त्रसंपन्न रा. रा. निळकंठ शास्त्री थथे यांस बडोद्याहून राजश्री विठ्ठलराव देवाजी निसबत गाईकवाड याणी पत्र पाठविले की आमचे ज्ञातीस त्रिकर्माचा अधिकार असता ब्राह्मण तंटे करितात येविसी ज्ञातीचा निर्णय कसा आहे तो लेहून पाठवावा त्यावरून थथे याणी लिहिले की मी कांहीं ग्रंथ पाहिले त्यांत तुमचे ज्ञातीस तीन कर्माचा अधिकार आहे आणखीही ग्रंथ अवलोकन करितों असे उत्तर पाठविले हे वर्तमान ब्राह्मणास समजले त्यावरून त्याणीं ग्रामण्य केले तेव्हां पुण्यांत कोल्हापुरकर स्वामी पर्वतीचे मुकामी आले होते त्याचे समक्ष सिष्टाचार सभा करून वे. सं. रा. रा. राघवाचार्य व वज्रटंक शास्त्री याणी ग्रंथाचे निर्णयावरून हे चां. का. प्रभु क्षेत्रीय त्रिकर्माचे अधिकारी असी खातरजमा करून देऊन स्वामीजवळोन याद ठरावोन घेतली त्यावर कन्यागती वाई क्षेत्री कृष्णातिरी रा. बळवंतराव मल्हार चिटणीस पंडित सुमंत हे तीर्थ विधि करणे याकरिता आले होते क्षेत्रस्थ ब्राह्मणांनीं यांस वेदोक्त कर्माचा अधिकार नाही म्हणोन ग्रामण्य करोन हागामा केला पुढे चिटणीस सातारा मुकामी जाऊन श्री. छत्रपती माहाराज यास समजाऊन तेथे सिष्टाच्या सभा केल्या त्यांत ग्रंथांतरीच्या पुरवण्या करून दिल्या त्याजवरून ब्राह्मणसमुदाय याची खातरजमा जाहली की हे त्रिकर्माचे अधिकारी हे समजोन चिटणीस यास स्मार्त अग्नी सिद्ध करावयास सांगोन चालता केला. असे असतां ब्राह्मण अनावर त्यास स्वामींनी ग्रंथातरीचा शोध पाहून ज्ञातीस्वधर्मास कर्म ते करून देण्यास स्वामी समर्थ आहेत. म्हणोन लिहिले आहे ते अवगत जाहाले ऐसीयास तुमचे ज्ञातीविसी आम्ही येथे ग्रंथातरी शोध पाहिला ते ग्रंथ :—

| | | |
|---|---|---|
| १ रेणुकामाहात्म्य | १ कालीपुराण | १ भविष्योत्तरपुराण |
| १ कात्यायनी तंत्र | १ पद्मपुराण | १ शूद्रकमलाकर |
| १ शयाद्रिखंड | १ नारदपुराण | १ गागाभट्टी |
| १ परशराम स्मृती | १ स्कंदपुराण | १ परशरामप्रताप |
| १ जातिविवेक | १ गोविंदभट्टी | |

१४

इत्यादि ग्रंथ पाहिले निर्णय केले व पूर्वी स्वामीनी वर्णाश्रम धर्म स्थापन केले तेही पाहता तुम्ही चां. का. प्रभु क्षेत्रीय त्रिकर्माचे अधिकारी येविसीचे निर्णय श्रीक्षेत्र वाराणसी येथे सिष्ट समुदायाच्या सभा होऊन पत्रे लिहिली. श्रीपरशरामाने निक्षत्री पृथ्वी केली तत्रापि त्रेतायुगापासोन द्वापार कलयुगाचे आदी परयंत क्षेत्रीय राजे राज्य करीत होते तेव्हा निक्षत्री पृथ्वी जाली असा संभव होत नाहीं. कारण कलीयुगांत जन्मजय राज क्षत्रीय याणी सर्पसत्र केले हा इतिहास भारती प्रसिद्धच आहे पुढे कलीयुगाचे प्रारंभापासून माहानंद राजापर्यंत वर्षे ३१४७ पावेतों क्षेत्री व पुढे दिलस राजे व रजपुत राजे व यवन जाहाले त्याचा तपशील शके १६१९ ईश्वर नाम संवत्सरे पर्यंत :

## (येथें तपशील दिला आहे तो वगळला आहे)

याप्रमाणें ग्रंथांचे आवलोकन करून व श्रीवाराणसी येथील सिष्टांची पत्रे व गोत्रे व हास्तनापुर राज्याची परिनालिका व स्वामीनें वर्णाश्रम धर्म स्थापन केले त्यांतही अवलोकन करितां नोंद राजा क्षेत्री कलयुगांचे ३१४७ वर्षे बंगालीयातून जैसिंग रजपुत येऊन पदच्युत केला ते रजपुत क्षेत्री राजे याजपासून अन्यक्षेत्री उत्पन्न जाहले ते बलोतर फार होऊन उत्तर दिसेस राज्य करू लागले तेव्हा क्षेत्री पराभव होऊन पळोन माळवदेसी मांडवगडास आले तेथेही रजपुताने उपद्रव केला त्याकाली तेथुनही पळोन दक्षिण देसी आले क्षत्र धर्मानी वागावे तरी रजपुतापुढे उपाय न चाले उदार निर्वाहा चालला पाहिजे तेव्हा कलीमध्ये माहालय वीरभोग्य वसुंधरा याचे मनन करून क्षेत्र धर्म सोडून प्राणरक्षणास्तव पुरवी परशरामाने चांद्रसेनाचे पुत्रास कायेत गर्भरक्षण केला म्हणोन कायस्थ म्हणतात व दाल्भ्य ऋषीनें रक्षण केले म्हणोन दालभ्य गोत्र व लेखन विद्येचा अधिकार लावून दिल्हा आहे त्यांचे कुल राजे यांचा अमात्य मंत्रीपणा करीत होते त्यास प्रभु म्हणत होते असे ग्रंथातरी प्रसिद्ध आहे हे समजोन तोच धर्म चालवून उपजीविका चालवीत आले त्यातील काही क्षेत्रीय कर्नाटक* प्रांती गेले त्यांची व या प्रांतातील क्षेत्रिय राजे आहेत त्यांचे व यांचे कर्म ग्रंथाचे आधाराप्रमाणे आहे. कांही क्षेत्री कोंकणप्रांतीं आले ते चांद्रसेनीय कायस्थ प्रभु क्षेत्रीय म्हणूंन तुम्ही हाली वेदोक्त त्रिकर्माचे अधिकारी लेखन विद्येनें निरवहा करिता हे विदितच आहे. व दुसरे कोकणप्रांती समुद्रतीरी परभु म्हणोन म्हणतात त्यास तिकडे असी चाल आहे की जो कोणी इंग्रजी लिहितो त्यास कोणतेही जातीचा असो त्यास परभु म्हणतात, परंतु चांद्रयसेनीय कायस्त प्रभुं दालभ्य गोत्री क्षेत्री म्हणतात, या भावे ते परभु होत नाहीं. तुमचा क्षत्रधर्म सुटला म्हणोन वेदोक्त त्रिकर्माच्या अधिकाराचा लोप जाहला नाही याप्रमाणे मठांत सिद्धांत ठरला याप्रमाणे प्रांतांत वेदशास्त्रसंपन्न धर्माधिकारी व जोतिषी व उपाध्ये व समस्त ब्राह्मण यांस आलाहिदा पत्र दिले आहे तुमचे क्षेत्रीय धर्माचे अहनिकाचे पुस्तक आच्यार्याने केले ते पाठविले आहे त्याधर्मानें चालावे हे सर्वांस मान्य करणे. शके १७५२ विकृति संवच्छरे आषाढ व॥ १०.

---

*तीन अनभ्यस्त लेखकांनी पौराणिक धाटणीवर एक बखरवजा लिहिलेलें भारूड ठाणें येथील ' मराठी दप्तरांतील १ ला रुमाल ' म्हणून सन १९१७ सालीं प्रसिद्ध झालें आहे. संशोधकानें व प्रकाशकानें या भारूडाचे महत्व प्रस्थापित करण्यासठीं सर्टिफिकीटांच वगैरे बराच फार्स केला आहे. परंतु हें भारूड म्हणजे निवळ ऐकीव ऐतिहासिक गप्पांचे एक अव्यवस्थित व अविश्वनीय पोळें आहे. यांत ऐतिहासिक सत्यापेक्षां हरदासी गप्पांचा भरणाचे रगड आहे. अशा चोंपड्याच्या अभिमानी संशोधकानें—रां. रा. पांडुरंग नरसिंह पटवर्धनांनीं त्यांतल्याच चारदोन ओळींच्या दिमाखावर प्रभू वीरांगना सावित्रीबाई ठाणेदारणीचा इतिहास कादंबरी ठरविण्याचा उपद्व्याप केला आहे. रा. पटवर्धनांचा सारा भर इतक्याच मुद्यावर कीं (१) एक दोन बखरीशिवाय सावित्रीबाईची माहिती इतरत्र छापलेली नाहीं व (२) कर्नाटकांत कायस्थ प्रभू कधिं त्या काळापूर्वी गेल्याचें या खंद्या संशोधकमहाराजांस विदींत नाहीं; आणि म्हणून त्यांच्या मतें हा इतिहास खोटा. या आज्ञापत्रांत खुद्द श्रीशंकराचार्य चां. का. प्रभूंचा इतिहास थोडक्यांत देऊन असें स्पष्ट नमूद करीत आहेत कीं " त्यांतील कांहीं क्षेत्री कर्नाटक प्रांतीं गेले " या शेन्याचा रा. पटवर्धनांच्या संशोधन दृष्टीवर कांही उजेड पडेल असा भरवसा आहे. रा. पटवर्धनांच्या डोळ्यापुढें पडलेला अंधार घालविण्याचें हें स्थळ नव्हे.

पटवर्धनांनी हा वाद उपस्थित करतांच मुंबईचे कोणी शहाणे वाळींबे यांनीं तर ज्ञानप्रकांशात 'सावित्रीबाई ही चित्तपावन वीरांगना ' म्हणून कर्णा फुंकला आणि सातारा जिल्ह्यात भोसे गांवी भिकंभट अग्निहोत्र्यांच्या घरीं यासंबंधानें कागदपत्र आहेत असें प्रसिद्ध केलें. म्हणून आम्ही प्रत्यक्ष तपास करतां रा. वाळींब्यांनीं ही नुसती लोणकढी गप्प मारली असें उघडकीस आलें. तेथें कोणीहि त्या नांवाचा अग्निहोत्री नव्हता व नाहीं. अशा प्रकारचा हलकटपणा करून इतिहासाचीं साधनें तयार होत नसतात हे. रा. वाळींब्यासारख्या उपद्व्याप्यांनीं खूप लक्षांत ठेंवावें.

[२] ॥ श्री ॥

श्री नारायणस्मरणानि

शिक्का

श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य * * * शृंगेरी श्री विद्याशंकर देवदिव्य श्री करकमल संजात पादपद्माराधक श्रीशंकराचार्यान्वित श्री बाळकृष्ण भारथी स्वामिभिः

श्री मदुमारमण चरणसेवाधुरिण दानधर्म परोपकार समाराधनादिकंत विख्यात प्रसिद्ध हरि गुरु भक्ति सेवा तत्पर सकल नीतशास्त्र प्रविण गौब्राह्मण प्रतिपालक लक्ष्मीनिवासविलाससंपन्न नित्य अन्नदानकीर्तिप्रसिद्ध अस्मदत्यंत प्रेमप्रिय श्री गुरु भक्तिपरायण राजमान्य राजश्री समस्त चांद्रसेनीय कायस्थ प्रभू विषईकृत संप्रीति विनयार्थ आशीर्वादपूर्व कृत आधीक वैशाख वद्य ७ सप्तमी तद्नंतर समस्त जोशी व उपाध्ये यांचा व तुमचे ज्ञातीचा वेदोक्त कर्मावरून तंटा पडिला ह्मणोन तुम्ही आपले कुळ उपाध्ये टकले यांस आणोन आपलेकडील कर्मे चालउन जोशी उपाध्ये यांजकडील वृत्ती बंद जाहाली मेहनत माहाडकर जोशी उपाध्ये याणी आपला मजकुर माहाड मुकामी समजाविला येविशी चौकशीपाहातां चांद्रसेनीय कायस्त प्रभु यांची वहिवाट पूर्वापार चालत आली त्या प्रमाणे चालत आहेत दरम्यान पेशवे श्रीमंताचे कारकीर्दीत येक दोन वेळां ब्राह्मणानी व्यर्थ तंटा केला त्याचा नीर्णय तें काळींच सरकारातुन शीष्ट समतें होऊन निर्वाह जाल्याचे दाखले व श्री वाराणशी क्षत्रीचें पत्र इत्यादि अन्वये वहिवाट असोन हाल्ली ब्राह्मण आपल्यात तट करुन त्या ज्ञातीवर दोषांदोष पाहातात याचा विचार पाहातां त्या ज्ञातीकडे वेदोक्त कर्मे व्हावी येविशी आपण अनुकुळ अशा साधनाचें नीळकंठ शास्त्री थथे यांचे स्वस्तुर पुणियाहुन राजश्री विठलराव देवाजी यांस बडोद्यास पत्र गेले हें दाखउन दाख (डांक?) उत्तर येविशी वाद सांगणार नाहीं व अज्ञेप्रमाणे प्रायश्चित घेउ दस्तुर खुद म्हणोन करवीरकर स्वामीकडे कतबा वज्रटंकशास्त्री याणी दिल्हा त्याजवर थथे शास्त्री यास आज्ञा केली कीं तुम्ही या प्रमाणे कतबा देउन निर्वाह करून घेणे यावरून वैशाख शुद्ध ७ शके १७४८ याणीहि कतबा दिल्हा त्यांतील मजकूर आमचा लेख निघाल्यास स्वस्तुर आमचा असी स्वामीची व राजश्री चिंतामणराव आपा यांची खातरी जाहाल्यास स्वामी आज्ञा करितील त्यास मान्य म्हणोन त्याजवरुन उभयतांचे नीर्णयास थथे यांचे हातचे असल पत्र पाहिजे तें राजश्री विठलराव देवाजी यांजपाशी बडोद्यास आहे ते येण्यास दिवस गत लागली कांही दिवसांनी थथे शास्त्री याचे हातचे असल पत्र रुजुवातीस प्रविष्ट जाहालें तें राजश्री चिंतामणराव मिरजकर व आनंदराव टोके फळकर वकील निसबत चिमणाजी आपा व खंडो शीताराम वकील निसबत आंगरे प्रभृती थथे व नातु यांचे तर्फेने तिराईत आले ह्यांचे विचारें पत्र पाहिलें तो चिरंजीव म्हणोन पितापुत्रवत त्यांत मजकूर चिरंजीव राजश्री आमृतराव बाबा राजश्री जीवनराव दिवाणजी याशी विदित केला ब्राह्मणाकडील पत्र आलें होतें तें दिवाणजीस दाखविलें त्याविशी ग्रंथ शोध करीत आहो त्या प्रांति याविशी ग्रंथ शोध करीत आहो त्याप्रांति याविशी शोध आपला असेलच शोध करून इकडे रवानगी करावी त्या ग्रंथावरून विचार करुन ठेविला असतां उपयोग फार होयील येविशी लेहून काय कळवावें

म्हणोन निळकंठ शास्त्री यांचें हातचे निखालस पत्र खरें असे ठरोन ते तिरायित गेले निळकंठ शास्त्री तो चिरंजीव ह्मणोन पत्र लेहोन अगत्यवादे लिहितात व पणवेलकर ब्राह्मणाचें पत्र दाखवितात व ग्रंथ पाठवावे म्हणोन लिहितात तेव्हां थथे शास्त्री अनकुळ होतात जर करीतां हे चांद्रसेनीय नाहींत तरी हे ज्ञाते त्यास अनकुळ कसे होतील त्याजवरून वेदशास्त्र संपन्न राजश्री राघवाचार्य प्रभृतींनें त्रिविध कायस्ताचा शास्त्रार्थ त्यासच निवडुन दिल्हा त्या अर्थी चांद्रसेनीय ज्ञाती हीच असें निश्चयांत आलें तत्रापि या ज्ञातीची परंपरा आचार पाहातां जातकर्मादारभ्य मुंजीबंधनसह संस्कार चालतच आहेत तेव्हां चांद्रसेनीय हेच ज्ञाती म्हणवितात ते खरें परंतु पूर्वी एकदोन वेळां ब्रांम्हणानी तंटे काय समजोन केले ते काळीं काय ठरलें याचा नीर्णय पाहातां जा काळीं ब्राम्हणांनी तंटा निर्माण केला त्या काळीं शास्त्रसमतें निर्वाह करून हे ज्ञाती आपले आचरणानी चालत आहेत त्यात पेणकरं याणी आठ नउ वर्षे ग्रामण्य पेशवाई अमलात केलें त्याचा निर्वाह कसा जाहाला त्याचा दाखला पाहातां पुणे मुकामी शिष्ट समत्तें पाचच्यार सभा होऊन पुर्वापार चालत आल्याप्रमाणे चालवावें असें ठरून बाळाजी ज्यनार्दन फडणीस याची देवावयाची यादी त्याप्रमाणे दुसरे शके १७१९ साचे साली राजश्री बाजीराव रघुनाथ प्रधान याचे देण्याची यादि होऊन त्या प्रमाणे शिक्यानशी सनदा प्रांतोप्रांति मामलेदार व ज्योतिषी व धर्माधिकारी याशिं गेल्या किं समस्त दालभ्य कायस्थ प्रभु यांजकडील कर्मे पेणकर याणी खटला करून सरकारची पत्रें पाठउन बंद केली त्याज वरून प्रभु व ब्राम्हण हे सरकारांत फिर्याद आले त्याजवरून उभयतांचें लेहून घेऊन शिष्टसमतें मनास आणितां पूर्वि चालत आलें याप्रमाणें चालवावें त्यापेक्षा पूर्ववत् ठरलें तेव्हां वादासहि ज्ञाती खरी जाहाली याजकडील कर्मे बंद केलीं ती वेदोक्त चालत होतीं म्हणोन बंद केलीं पुढें चौकशी अंती पूर्वापार वहिवादी अन्वयें सनदा यांशि होतात तेव्हां दालभ्य कायस्त म्हणजे चांद्रसेनीय प्रभुची अपरंपर्याय रकारभिन्नत्वे परभुमात्र लोकोपवाद असें त्याहि सनदेवरून सिद्ध होतें यास प्रमाण पाहातां कीं वाराणशी क्षेत्रीचें समतपत्र प्रमुख भट प्रभृति त्र्यांशि पंडित मंडळी याचे ज्याचे त्याचे सहींचें स्वदस्तुर पत्र असल धर्माधिकारी व आठघरे याचे नावें त्यांत लिहिलें की तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें वेदशास्त्रसंपन्न बाळशास्त्री बाबाप्रभृति पंडीत मंडळींची पत्रें आलीं तीं पावलीं तेथें लिहिलें कीं पांच चार वेळां श्रीमंताचे आज्ञेवरून मिळोन गागाभट्टीकृत्मार्गावलंबें प्रभु यांजकडे कर्मे चालवावी असें ठरलें प्रांतात सनदाहि गेल्या त्याजवरून वेदमूर्ती आबाशास्त्री टकले यांशि आम्ही विचारिलें कीं या ज्ञातीचे कुळ उपाध्ये तुम्हीं याचा विषय कसा आंहे पुण्यात ठराव कोणत्या ग्रंथावरून केला त्याणी उत्तर केलें कीं गागाभट्टकृत कायस्तप्रदीप गोंदभटकृत गोविंदभट्टीस्कंद पुराणांत्तर रेणुकामाहात्म कमळाकरभट्टकृत शूद्रकमळाकर ज्ञातीविवेक इत्यादि निबंध्ध ग्रंथ पाहावे म्हणजे आपले ध्यानास येईल त्याजवरून आम्हीं हे सर्व ग्रंथ पाहिले तों हे क्षेत्रीय अन्वय चांद्रशेनीय कायस्त प्रभु दालभ्य ऋषिनें पालन करून उपनयनादि संस्कार केले भार्गवरामाचे आग्रहास्तव शस्त्रधारणरूप शस्त्रविद्या टाकून कायस्त धर्मलेखनवृत्ती यांस दिल्ही दालभ्य गोत्र असा निर्णय पूर्वोक्त ग्रंथ पाहातां होतो म्हणोन याप्रमाणे श्रीक्षेत्रीचे पंडीत मंडळींचें असल पत्र ज्याचे त्याचे सहींचें प्रत्यक्ष पाहिलें तेव्हां या ज्ञातीची पूर्वापार वहिवाट समकम षोडश संस्कार चालत आले

त्यावरून हे चांद्रसेनीय कायस्त प्रभु खरे व त्याप्रमाणे पुढें पेणकराचे ग्रामण्य अंती निर्णय होऊन दालभ्य कायस्त ह्मणोन प्रत्यक्ष सनदा व येथें जा ग्रंथावरून नीर्णय केले ते ग्रंथ प्रत्येयास श्री काशीक्षेत्रस्थ याणी पाहुण चान्द्रसेनीय कायस्त प्रभु ह्मणोन लिहितात व प्राचीन दाखले पाहाता राजपत्री व बाळाजी बाजीराव प्रधान यांचे पत्रांत प्रभु असेंच आहे तेव्हां हे चांद्रसेनीय प्रभु कर्मत्रयाधिकारी असें सिध्धच आहे त्याप्रमाणे अनकुल ते विशी नीलकंठ शास्त्री पत्र लेहून स्वदस्दुर देतात त्याप्रमाणे राघवाचार्य प्रभृतीनेहि शास्त्रार्थ पाहुन निवडून दिल्हा त्याची पुरवणी त्यांत ज्ञातींचें पारंपर्य आचरणावरून व सनदापत्रें व क्षेत्रीची समतें त्यांत जे ग्रंथ लिहिले त्यावरून पाहातां हे ज्ञाती क्षेत्री चान्द्रसेनीय कायस्त प्रभु कर्मत्रयाधिकारी खरे व वज्रटंक शास्त्री वादास खरे जाहाले व निळकंठ शास्त्रीचाहि पूर्वीचा लेख खरा पुढें उगेच विपर्यास बुध्धीनें ब्राह्मणास प्रायश्चितें दिल्ही तें खोटें असें ठरले असे म्हणोन श्रीमत्परमहंस श्रीविद्यानृसिंहभारथी संस्थान मठ करवीर यांही पुण्यासंन्निध पर्वतीचे मुकामी सारांश करून राज्यश्री विठलराव देवाजी यांस दिल्हा तो हाल्ली आह्मांस दाखविला त्या अन्वयें आम्हीं ग्रंथ शोधुन पाहिलें तों हे क्षेत्री चांद्रसेनीय कायस्त प्रभु कर्मत्रयाधिकारी खरे याचा शास्त्रार्थ पारंपर्य वहिवाट पाहातां वेदोक्त कर्मे यांजकडे चालत आल्याप्रमाणे करावी उगाच आग्रह बुद्धीनें ब्राम्हण कोण्ही तंटा खोटा करितात तो करूं नये सर्वा ब्राम्हणानी वेदोक्त कर्मे यांजकडे चालवावी म्हणोन हें पत्र तुम्हास दिल्हे असे. शके १७५३ खरनाम संवछरे सेवा धुरीण विषई विशेष कीं लेखन इत्यलं.

## [३] शिक्का

श्री मत्परमहंस परिव्राजकाचार्य * * * श्री विद्या शंकर देवदिव्य श्रीपादपद्माराधक शृंगेरी श्रीनृसिंव्हभारती स्वाभिभिः ।। श्री श्री * * *

सांप्रत श्रीमटाहून श्रीमुखसाद केले जातोजे. विशेष पूर्वी चंनपटण यथून लाटसाहेबबाधूर याणे श्री शृंगेरी मठास पत्र पाठविले आहे. कोंकणस्थ ब्राम्हणा व चांद्रसेनी कायस्थ प्रभु या उभयथाचा जातीविषई तंठा पार दिवस आहे. ब्राह्मण पाराधुखी (?) होउन अम्हचे घरात् दाह वत्रे (वर्षे ?) पर्यंत सहस्त्रा...ष्य परम प्रयासे करितात म्हणहून राजेश्री चिंतामणिराव पटवर्धन याणी धवलत्नद्दार कुंफणी सरकारत् परस्परा अर्ज केले की सदरी दोन जातीचा तंटा कुंफणी सरकाराकडून पैसल करून घ्यावी. या विशई कुंफणी सरकारा... होत नाहीं कायदेस विरुत्ध मणहून श्रीमत्छंकराचार्यस्वामी मठास ज्यातीचा तंटा पैसल करून उत्रे पाठवावे मणहून कुंफणी सरकाराथून लिहिले आले नंतर सर्व वेदशस्त्र पुराण ब्राम्हण महान राजे याचे संम्मत घेऊन सर्व ब्राम्हणास आज्ञा श्री मठाहून केले तो जे आसेतुहिमाचलपरिर्यंत सपूर्ण ब्राम्हणानी वेदोक्त कर्म चांद्रसेनी कायस्थ प्रभु : यांचे घरी तीन कर्म चलवावे त्यास राजे सुभे राज निक्षेत्रपट प्रात परगणे कसबे मौजे विद्वान महान् ब्राम्हण राजाधिका मामलेधार जमीधार व ईतर अशे व जातीवाले याणे श्रीमुखाआज्ञेप्रमाणे भूयो भूयो कितभिः संन्मानियः कलुधर्म संस्थापनायां साभिमानीषु विशेष किं लेकनं ईतोप्याधिक श्रेयः इति नाराणस्मृतिः श्रीशालीनृपपराक्रमी सेके १७६१ चैत्र शुक्ल प्रतीपदा श्री.

---

# ग्रामण्य अकरावें.

## ब्रह्मनाळकर बुवांचें ग्रामण्य. शके १८२५, सन १९०४.

पेशव्यांच्या नोकरशाही बंडाच्या मृत्युबरोबर ग्रामण्य-प्रकरणही ओंकारेश्वरावर गेलें असेल आणि इंग्रेजांच्या एकछत्री राज्यांत महाराष्ट्रांतील ब्राह्मण म्हणविणारा सर्व पूर्वीच्या राष्ट्रविनाशक संकुचित कल्पना पार विसरून गेला असेल, अशा कल्पनेचा उदय विसाव्या शतकाच्या उदयाबरोबर होतो न होतो तोंच कायस्थ प्रभूंच्या हितशत्रूंनी आपल्या पेशवाई राजवटीचा धडा पुन्हा घोंटाळण्यास सुरुवात केली. हिंग तर गेलाच पण गोणत्याचा वास कांहीं जात नाहीं. आतांपर्यंतच्या ग्रामण्यांत कोणीतरी अलबत्या गलबत्या पुढारी असे. परंतु निःकायस्थ पृथिवी करण्याचा चित्पावनांचा जो परशुरामी बाणा तो ते अझून विसरले नाहींत आणि म्हणूनच यावेळेस ग्रामण्याच्या चळवळ्यांनीं स्वतःच्या तोंडांवर अज्ञातपणाचा बुरखा घेऊन खुद्द शंकराचार्यांच्या हस्ते हा निःकायस्थ-विधि उरकविण्याचा उपद्व्याप केला !

संकेश्वर मठाधिष्टित श्रीशंकराचार्य (पूर्वाश्रमीचे ब्रह्मनाळकर हरदास) हे सन १९०४ सालीं संचारार्थ निघाले असतां त्यांचा मुकाम महाड येथें झाला. त्यावेळीं महाडकर चां. का. प्रभु मंडळीनें श्रीची पाद्यपूजा करावयाचें ठरवून, रा. द्वारकानाथ गणेश देशमूख वकील यांचें मार्फत श्रीस विनंती केली असतां पुराणोक्त पूजा करीत असल्यास पूजा ग्रहण करूं असा श्रीकडून जबाब मिळाला. महाड येथें ज्ञातिबांधवांची जी सभा झाली तिचे अध्यक्षांनीं समस्त ज्ञातीबांधवांस विनंतिपत्र काढलें होतें तेंच येथें देतोः–

श्री.

राजश्रीयाविरजित राजमान्य राजश्री समस्त चां. का. प्रभुमंडळी वास्तव्य यांचें सेवेसीं :––

माहाड येथील चांद्रसेनीय कायस्थ प्रभु मंडळीचा कृतानेक सिरसाष्टांग नमस्कार विनंती विशेष. श्रीमत् शंकराचार्य स्वामी मठ संकेश्वर यांची स्वारी माहाड येथे आली असतां मिती माघ व ॥ १४ सोमवार शके १८२५ ता. १५ फेब्रुवारी १९०४ इसवी रोजी श्रीस रा. रा. द्वारकानाथ गणेश देशमुख वकील यांही पाद्य पुजेरितां निमंत्रण केलें. तें श्रीनीं मान्य करून पुजेची तयारी होऊन मंडळी जमा झाली असतां स्वामीनीं पुराणोक्त पुजा कराल तर पुजेस येऊ असा पुर्वापार वहिवाटीविरुद्ध आणि पूर्वीच्या स्वामीच्या आज्ञापत्रास अमान्य असा जबाब दिला. त्यावरून त्या पुजेचा विचार रहित करून सदर तारखेस येथील ज्ञातिबांधवांची सभा भरवून त्यांत ठराव जाहला कीं :––

" सभेपुढें जाहलेल्या जबान्या व एकंदर घडलेली हकीकत पाहतां असें स्पष्ट होत आहे कीं प्रत्येक ज्ञातीस कायकाय अधिकार आहेत याची माहिती स्वामीस असली पाहिजे. आपल्या ज्ञातीस पूर्ण अधिकार कायकाय आहेत त्याबद्दल फार वर्षापासून जुने ग्रंथाच्या आधारें शास्त्रीपंडित वगैरे यांच्या अभिप्रायानें स्वामींकडून निर्णय होऊन त्याप्रमाणें फार वर्षे वेदोक्तकर्मे करण्याची आपले ज्ञातींत वहिवाट चालत असोन पुरा तपास न करितां अगदीं अन्यायानें स्वामीनीं पुराणोक्त पुजा कराल तर येऊं असें सांगितले हे स्वामीचे करणें ज्यांजकडून योग्य न्याय व्हावयाचा त्यांजकडून अदूरदर्शीपणाचे व अन्यायाचे व जुलमाचे जाहले आहे."

असा ठराव करण्यांत आला आहे. यासाठीं आपल्यास विनंती करण्यांत येते कीं आज कित्येक शतकें आपल्या ज्ञातीकडे वेदोक्त कर्मे होत असतां कांहीं उपद्व्यापी मंडळीच्या आग्रहावरून स्वामीनीं ज्याअर्थी आपल्या अधिकारास न शोभण्यासारखा जबाब दिला आहे त्याअर्थी या कामाचा निर्णय श्रीकडून पूर्वापार पद्धतीस अनुसरून असा मिळेपर्यंत येथील मंडळीनी त्यांस धर्मगुरू या दृष्टीनें जे मान द्यावयाचे ते देण्याचे रहित केले आहेत. तरी सदर्हू ठराव पाहून श्रीची स्वारी आपले तिकडे गेल्यास ज्ञातीच्या अपमानाची वरील गोष्ट लक्षांत घेऊन श्रीशीं आपले वर्तन राहील अशी उमेद आहे.

पूर्वीच्या आज्ञापत्राविरुद्ध हालीं स्वामीकडून कां सांगणेंत आलें याबद्दल स्वामीकडे खुलासा विचारावा असें आमचें मत आहे. याबद्दल आपला अभिप्राय लिहून यावा. कळावे हे विनंती.

**सिताराम वासुदेव कारखानीस, सभेचे प्रेसिडेंट.**

याप्रमाणें विनंतीपत्रें ठिकठिकाणीं रवाना झालीं असतां इकडे वर्तमान पत्रांतून याप्रकरणासंबंधानें चर्चा सुरूं झाली. त्यांतून एकदोन उतारे येथें घेतों :—

(१) हल्लीं संकेश्वर पीठाधिष्ठित श्रीशंकराचार्य–पूर्वाश्रमीचे ब्रम्हनाळकर हरिदास–संचारासाठीं कोंकणप्रांतीं गेले आहेत. श्रीनें शिखासूत्राचा त्याग केला, परंतु त्याबरोबर पूर्वाश्रमींच्या मायापाशांचा त्याग केलेला दिसत नाहीं. स्वारीबरोबर त्यांचे गोत कधीं घोड्यावर तर कधीं हत्तीवर मिरवत जात असते. त्यांच्या कथेकरी वृत्तीचाही त्यांस अद्यापि विसर पडला नाहीं. कारण आपल्या भाषणांत शृंगारादि रसांनीं व कोटिक्रमांनीं शोभा आणण्यांत ते कमीपणा मानीत नाहींत आणि मठाच्या परंपरेविरूद्ध उपदेश करण्यासही कमी करीत नाहीं. स्वामींना दोष देण्यास एवढी एकच जागा असती तर त्याबद्दल लेख लिहिण्याचे कारण नव्हतें. परंतु स्वामीनीं आपल्या वर्तनांत नवीन स्थितीस अनुलक्षून थोडा साळढाळपणा धरावयाचा तो न धरितां जुन्याकाळीं मान्य ठरलेल्या वहिवाटीसही हरताळ लावण्याचा क्रम ठेविला आहे हें पाहून फार वाईट वाटतें. महाड येथें रा. द्वारकानाथ गणेश देशमुख वकील (हे कायस्थ प्रभु ज्ञातीचे आहेत) यांनीं स्वामीस पाद्यपूजेस पाचारण केलें होतें. पाद्यपूजेची सर्व तयारी झाल्यानंतर कित्येक दुराग्रही लोकांच्या सल्ल्यानें स्वामीनीं हट्ट धरिला कीं पुराणोक्त मंत्राने पूजा कराल तर येऊं. रा. देशमुख यांनीं नानाप्रकारें समजून सांगितलें कीं कायस्थांस वेदोक्ताचा अधिकार आहे त्याबद्दल हवा तितका पुरावा देतों व वहिवाट दाखवितों. पण स्वामीनीं त्याकडे लक्ष दिलें नाहीं. उलट शिवाजी महाराज क्षत्रिय नसतां गागाभट्टास लांच देऊन त्याकडून क्षत्रिय म्हणवून घेतलें यामुळें त्याच्या वंशाचा अधःपात झाला असे अपवित्र उद्गार काढून स्वामीनीं आपल्या श्रोत्यांस दुखविलें. त्याशिवाय कायस्थ प्रभूंचे आपण गुरू म्हणून म्हणवीत असत. त्यांच्या ज्ञातीबद्दल अगदीं अक्षम्य अज्ञान दाखविलें. अशा रीतीनें स्वामी आपल्या संचारांत जेथें जातील तेथें तेथें कलीचा संचार करीत चालले आहेत.

सुधारक, सोमवार, मि।। फाल्गुन शु।। ६ शके १८२५

(२) करवीर संकेश्वर मठाधीश श्रीशंकराचार्य सारख्यांनीं आपला मठ सोडून देशसंचार करूं लागणें यांत जरी कांहीं विशेष नाहीं तरी हा संचार होत असतां श्रींनी व्याख्यानें देणें ही गोष्ट विशेष आहे. याबद्दल श्रीचें अभिनंदन करणें अवश्य आहे. परंतु एकार्थी श्री हीं व्याख्यानें देण्याचा नाद सोडून देतील तर बरे कारण नुकतेंच त्यांनीं महाडास जें व्याख्यान दिलें तें वाचून पाहतां त्यावरून त्यांचा दुराग्रही स्वभाव इतर धर्म व मतें यांविषयीं अनुदार वृत्ती, इतिहास-ज्ञानाचा अभाव, प्रस्तुत धर्मविषयक चळवळी विषयीं अक्षम्य अज्ञान इत्याद्यनेक गोष्टीं दिसून येतात. दुसरें असें कीं श्रीची स्वारी वैदिक पौराणिकांच्या लक्षांत मन घालून आपल्या अनुयायांस दुखवीत असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. श्रीशंकराचार्यांची गादी आपण चालविणारे असें सांगणारांनींसुद्धां एका उच्च वर्णाच्या गृहस्थाच्या येथें जावयाच्या वेळीं वैदिक पौराणिकांचें घोडें पुढें आणावें ही किती शोचनीय गोष्ट आहे !

सुबोधपत्रिका, ता. २८।२।१९०४

(३) स्वामीमहाराज हे आपल्या लवाजम्यानिशीं व पूर्वाश्रमींचीं मुलेंबाळें, जामातादि करून सर्व गोतवळा बरोबर घेऊन फिरतात हें कांहीं अंशीं गैर आहे हें स्वामींच्या लक्षांत आलें पाहिजे. तसेंच नुसत्या पुड्या मिळविण्याकरितां किंवा दक्षिणा मिळविण्याकरितां देशोदेशीं हिंडावयाचें नाहीं तर जातीजातींतील तंटे मिटविण्याकरितां तसेंच खऱ्या धर्मतत्वाची माहिती देण्याकरितां व हल्लींच्या काळीं आर्यधर्माचें पालन कशा रीतीनें करितां येईल हें लोकांस शिकविण्याकरितां फेरी करावयाची हेंहि स्वामीनीं विसरतां कामा नये. आमच्या विश्वसनीय बातमीदाराकडून असे कळतें कीं स्वामीनीं आपल्या वर्तनानें एका जातीला विनाकारण दाखविलें आहे. कायस्थ प्रभु यांना वेदाधिकार आहे किंवा नाहीं याचा निकाल पेशवाईत ठरून गेला आहे. कायस्थ प्रभु जात क्षत्रियापासून झालेली आहे असा ऐतिहासिक पुरावा त्यांनीं जमविलेला आहे. त्याचीं धर्मकृत्यें वेदोक्त रीतीनें चाललेली आपण पाहतों. प्रभुज्ञातीचीं धर्मकृत्यें चालविणारे ब्राम्हणच आहेत हें सर्वविश्रुत आहे. अशा स्थितीमध्ये स्वामीमहाराजानीं त्या जातीचा अपमान करावा व त्यांना ' पुराणोक्त ' पूजेचा फक्त अधिकार आहे असा आग्रह धरून एका प्रभूचे येथील आयते वेळीं निमंत्रण नाकारावें हें आमचे मतें फार गैर आहे. आम्हांस वेदोक्ताचा अधिकार आहे असें त्या जातीचे लोक सिद्ध करावयास तयार असतां स्वामीनीं आपलाच आग्रह चालवावा हें स्वामींच्या समबुद्धीला गैर दिसतें. स्वामीनीं आपण सर्वजातीचे गुरू आहोंत हें विसरतां कामा नये..........' गागाभट्टानें चोवीस लाख रुपये लांच खाऊन छत्रपती शिवाजीमहाराजांना शुद्ध मराठे असतांना क्षत्रिय बनविलें व म्हणूनच शिवाजीच्या वंशाचा नायनाट झाला ' अशा प्रकारचा अव्यापारेपु व्यापार स्वामीनीं करणें गैर आहे. या योगानें ते आपल्यास हास्यास्पद करून घेतील.

सुबोधपत्रिका, ता. २७।३।१९०४.

(४) '' आचार्यांस प्रश्न ''

रा. रा. सुधारककर्ते यांस :—

वि. वि:—नुकतेच संकेश्वरचे श्रीशंकराचार्य महाडास गेले होते त्यावेळीं त्यांनीं कायस्थ प्रभु ज्ञातींतील लोकांना वेदोक्त (कर्मे) करण्याचा अधिकार नाहीं असे आपलें मत दिलें, त्यावर माझे

खालील प्रश्न आहेत. (१) जी गोत्रें ब्राम्हण व क्षत्रिय याना समान आहेत तीं कायस्थ प्रभूंचीही आहेत असें जर आहे, तर ते ब्राह्मण कीं क्षत्रिय ? (२) वेदोक्ताचा अधिकार ब्राह्मण क्षत्रिय व वैश्य या तीन वर्णांना आहे. या तिन्ही वर्णांपैकी कायस्थ प्रभु नव्हेत हे श्रीशंकराचार्य कोणत्या आधारावर ठरवूं शकतात ? (३) कायस्थप्रभूंच्या घरीं हल्लीं वेदोक्त चालविणारे ब्राह्मण आहेत त्यांच्या मतास कांहींच मान नाहीं काय? (४) श्रीशंकराचार्यांची गादी ही ब्राह्मणांतल्या कांहीं विशिष्ट मताच्या लोकांकरितां जर असेल तर गादीचें जगद्गुरुत्व कसें राहतें ?

आंग्राची वाडी, आपला,

गिरगांव, मुंबई. **दामोदर रामचंद्र चिपळूणकर,**

(कोंकणस्थ ब्राह्मण).

**सुधारक, ता. ९ मे सन १९०४.**

याप्रमाणें महाडास ग्रामण्याचें बीज पेरून श्रीजगद्गुरूंची स्वारी संचारार्थ पुढें निघाली असतां ज्या ज्या ठिकाणीं गेली त्या त्या ठिकाणीं त्यांनीं हें प्रकरण उपस्थित केलें. त्यामुळें सर्व चां का. प्रभु समाज अगदीं बेदील होऊन गेला. ठिकठिकाणीं या प्रकरणाची चळवळ चालू असतां श्रींची स्वारी भिवंडी येथें गेली. त्या वेळीं तेथील चां. का. प्रभू ज्ञातीचे पुढारी वकील रा. महादेव बाळकृष्ण ताम्हणे यांनीं श्रींना पाद्यपूजेचें आमंत्रण केलें आणि स्वामींनींही त्याचा स्वीकार केला. परंतु महाड येथें जो प्रकार झाला त्याचीच पुनरावृत्ति याहि ठिकाणीं झाली. ' वेदोक्ताचा तुम्हांस अधिकार नाहीं तेव्हां पुराणोक्त पूजा कराल तर येऊं ' असा जबाब श्रीनीं दिला. तेव्हा पाद्यपूजेचा बेत रहित करून महाडकरांप्रमाणेंच भिवंडीकरांनीं श्रीस जगद्गुरू समजावयाचें नाहीं असें ठरविलें. या वेळीं स्वामीनीं जातीचा अपमान करून पूर्वापार वहिवाट व आज्ञापत्रें याविरूद्ध वर्तन केल्याबद्दल स्वामीवर कायदेशीर तजवीज करावी असा भिवंडी येथील प्रभु मंडळीचा विचार होता. परंतु एकानें मूर्खपणानें गाय मारली म्हणून दुसऱ्यानें वांसरूं मारूं नये आणि जगद्गुरूच्या गादीवर असलेल्या व्यक्तीने कोर्टाची पायरी चढण्याचा प्रसंग कायस्थ प्रभूंनीं आणला हा निष्कारण अपवाद आपणावर येऊं नये, म्हणून उदार मनानें हा विचार यांनीं सोडून दिला. इतक्या अवधींत श्रीची स्वारी ठाण्यास आली. ठाणें याथील प्रभु मंडळीनें त्यांच्याबद्दल तीव्र उदासीनता दाखविली व श्रींच्या स्वारीची गावांत मिरवणूक येत असतां प्रभुमंडळीनीं आपापल्या घरांची दारें बंद ठेवून त्याचा निषेध व्यक्त केला. त्यानंतर स्वामींची स्वारी मुंबईस येऊन परत गेली व हें ग्रामण्य-प्रकरण तसेंच राहिलें.

परंतु कायस्थ प्रभुसमाज स्वस्थ मात्र बसला नाहीं. श्रीजगद्गुरुस्वामी विद्याशंकर भारती यांची स्वारी मुंबईस सन १९१३ सालीं आली असतां ठाणे येथील मंडळींनें पुढाकार घेऊन श्रींची मुलाखत घेतली व त्यांना हें सर्व प्रकरण समजाऊन दिलें. त्यावरून स्वामींची खात्री झाली कीं कायस्थप्रभूंचे म्हणणे रास्त आहे. त्यावरून त्यांनीं आज्ञापत्र दिलें. तें खालीं दिलें आहे :

॥ श्री ॥

यादी रावबहादूर प्रभाकरराव गुप्ते वास्तव्य ठाणें यांजकडे सर्वाधिकारी नि॥ श्रीजगद्गुरू संस्थान पीठ करवीर (मठ करवीर, संकेश्वर, पैठण इ०) यांजकडून. सुमारें १० वर्षांपूर्वी श्रीगुरुस्वामी विद्या नरसिंह भारती जगदगुरू शंकराचार्य याची स्वारी माहाडास गेल्या वेळी चांद्रसेनीय कायस्थ प्रभु ज्ञातीवर्गाकडून वेदोक्त पाद्यपूजा घेण्याचे ठरले असतां सदरहू

वर्गाविरूद्ध असलेल्या लोकांनीं अनेक अडचणीं श्री पुढें आणिल्यामुळें त्यावेळीं वेदोक्त पाद्यपूज्या जाहाली नाहीं यामुळे चांद्रसेनीय कायस्थ प्रभु ज्ञातीवर्गाचा जो अपमान जाहला व त्यामुळें तो वर्ग उदासीन जाहला ही गोष्ट सांप्रतचे करवीर पीठाधिष्ठित जगत्‌गुरू श्री विद्याशंकर भारती स्वामी शंकराचार्य महाराजांनां चांगली वाटली नाहीं. यामुळें सदरहू हकीकती संबंधानें संस्थानाकडूनच खुलासा होणें इष्ट वाटल्यामुळें श्री जगद्‌गुरू स्वामी महाराजांनीं सकळ शिष्यवृंदास जाहीर आज्ञापत्र बार अंक $\frac{१७}{१८३५}$ चें काढले आहे त्याची अस्सल प्रत आपलेकडे दाखल्यास पाठविली आहे. ती समस्त चांद्रसेनीय कायस्थ प्रभु वर्गांतील मंडळींत प्रसिद्ध करण्याची तजविज मेहेरबानीनें करावी. आपण संस्थानचे पूर्ण साभिमानी अगत्यवादी आहांत विस्तारे ल्याहावे असें नाहीं. २०।७।१३. (सही इंग्रजी) जी. एस्. पिशवीकर,

सर्वाधिकारी नि।। जगद्‌गुरू.

——आज्ञापत्र——

श्रीमत्करवीर धर्मपीठाच्या चातुर्वर्ण्य शिष्यवृन्दांतील चान्द्रसेनीय कायस्थ प्रभु ज्ञातिवर्ग क्षत्रियवर्णाचा असून या ज्ञातिवर्गात वैदिक कर्माधिकार पूर्वापार चालत आलेला आहे. मध्यंतरी शके १७४७ चे सुमारास वस्तुस्थितीचा विपर्यास करून चान्द्रसेनीय कायस्थ प्रभूंनां वेदाधिकार नाहीं म्हणून ग्रामण्य माजलें होतें. तत्कालीन करवीर पीठाधिष्ठित जगद्गुरू श्री विद्यानृसिंह भारती (मठ करवीर, संकेश्वर, खिद्रापूर, पैठण इत्यादि.) यांची स्वारी पुण्यास पर्वतीच्या मुकामीं झाल्यावेळीं त्या वेळच्या कांहीं राजकीय पुढाऱ्यांच्या दुराग्रहामुळें श्री संस्थानास अपाय होऊ नये ह्मणून चान्द्रसेनीय वर्गाविरूद्ध आसलेल्या मंडळींचा शास्त्रार्थ मान्य करून तदनुरोधानें श्रीसंस्थानांतून आज्ञापत्र दिलें गेलें होतें. पुढें चान्द्रसेनीय वर्गांतील लोकांकडून त्या संबंधानें श्रीसंस्थानाकडे विनंति करण्यांत आल्यावरून त्यांच्या ज्ञातिविषयीं सर्व प्रकारचा शास्त्रार्थ योग्य प्रकारें पाहून चान्द्रसेनीयांना वेदाधिकार नाहीं ह्मणून दिलेलें आज्ञापत्र रद्द करून ते वैदिक धर्माधिकारी असल्याचा निर्णय श्रीविद्यानृसिंह भारती स्वामिपादांनीं करून आज्ञापत्रे पाठविलीं त्यांतील मुख्यतः मजकूर असा आहे :——

वेदशास्त्रसंपन्न राघवाचार्य यांना श्री संस्थानाकडून आज्ञापत्र गेलें त्यांत या ग्रामण्यासंबंधाने चान्द्रसेनियांना वेदाधिकार असल्याबद्दल राघवाचार्यांनी शास्त्रार्थ दिला होता पण त्याचा विचार न होता तत्कालीन राजकीय पुढाऱ्यांकडून श्रीसंस्थानास अपाय होईल या भीतीनें चान्द्रसेनियांच्या वैदिक कर्मास बाधक असें आज्ञापत्र कसें दिलें गेलें याची साद्यन्त हकीकत लिहून पत्राच्या शेवटी आज्ञापिलें आहे कीं, " यद्ग्रंथानुरोधेन चान्द्रसेनीय कायस्थानां वैदिककर्माधिकारी बाधकं पत्रं प्रतिपक्षी अस्मत्सकाशात गृहीतवान् तादृश्यग्रंथीयवचनैरेव चान्द्रसेनीयानां वैदिककर्माधिकार बोधनसंभवात् भवदीयःशास्त्रार्थः सत्यः चान्द्रसेनीय विद्वरिणान्तु संस्थानोपद्रव भीत्यादत्तंशासनपत्रं वंचनार्थ पर्यालोचनेन मिथ्यैव "

श्रीविद्यानृसिंह भारती शंकराचार्य यांचें समस्त ब्राह्मणास पत्र शके १७५२ सालाचें यांत " जीं पत्रें व सारांशाच्या यादी चान्द्रसेनीय प्रभूज्ञातीकडील वैदिक कर्मे उच्छेदाविसी आम्हापासून घेऊन जागोजागी पाठविली ती दरोबस्त खोटी, सबब रद्द करून हल्ली हे पत्र लिहिलें आहे. तरी चान्द्रसेनीय कायस्थ प्रभूज्ञातीस शास्त्रग्रंथानुमते वेदकर्माधिकार आहे हें त्रिवाच्य सत्ये

श्रीदेवागृहीं बसून हें पत्र लिहून सर्वांस कळावयाकरितां पाठविलें आहे, तरी प्रभुज्ञातीकडे वैदिककर्मे परंपरागत चालवीत जाणे ''

याप्रमाणें वरील ग्रामण्यसंबंधानें श्रीविद्यानृसिंह भारती स्वामी जगद्‌गुरू यांनी योग्यप्रकारें निकाल केला होता. अर्थातच चांद्रसेनीयांचे प्रतिपक्षी ब्राह्मणांना तो शेवटचा निर्णय बरा वाटला नाहीं तरी इतर ब्राह्मणांस तो निर्णय मान्य होऊन चांद्रसेनीय कायस्थ प्रभुज्ञातींतील वैदीक परंपरा कायम राहिली ही समाधानाची गोष्ट आहे.

सुमारें १० वर्षांपूर्वी इकडील श्री गुरुस्वामिपादांचें संचारोद्देशें महाडास जाणें झाल्या वेळीं तेथील चान्द्रसेनीय कायस्थ प्रभु मंडळीनीं मोठ्या प्रेमभावानें श्रीची पाद्यपूजा करण्याचें ठरवून श्रीस विनंति केली व श्रीगुरुपादांनाही विनंतीस मान देऊन वेदोक्त पाद्यपूजा घेण्याचें मान्य केलें. पण चान्द्रसेनीयांच्या विरुद्ध पक्षांतील लोकांनीं श्रीपुढें अनेक प्रकारच्या अडचणी हट्टानें आणिल्यामुळें व त्यास श्रीबरोबर असलेल्या कार्यकारी मंडळीचेंही अनुकूल मत पडल्यामुळें श्रीगुरुंच्या मनांतून चान्द्रसेनीयांची वेदोक्त पाद्यपूजा घेण्याचे असतांही ती वेदोक्त पाद्यपूजा झाली नाहीं. त्यामुळें चान्द्रसेनीय कायस्थ प्रभू वर्गाचा संस्थानाकडून अपमान झाला व तो वर्ग श्रीसंस्थानाविषयीं उदास झाला ही गोष्ट चांगली झाली नाहीं. त्यावेळी श्रीगुरुमहाराजाबरोबर संस्थानांतील कागदपत्राचा पुरावा असता तर प्रतिपक्षीयांच्या व संस्थानचे कार्यकारी मंडळीच्या आग्रही सल्याचा कांहीं उपयोग न होतां प्रभु मंडळीकडून वेदोक्त पाद्यपूजा श्रीगुरुमहाराजांनी घेतलीच असती यांत तिलप्राय शंका नाहीं.

अलीकडे इकडील संस्थानचे सर्वाधिकारी रा. रा. गुंडो सखाराम पिशवीकर यांनी संस्थानच्या दप्तरांतील अवशिष्ट राहिलेली कागदपत्र शोधून काढून ते व इतर पुरावा संस्थानदेवतेपुढें मांडला. तो अवलोकन करून आणि शास्त्रीय ग्रंथ पाहिल्यावरून इकडील पूर्ण खात्री झाली कीं, चान्द्रसेनीय कायस्थ प्रभुज्ञातीस वेदाधिकार आहे इतकेंच नव्हे तर विरुद्धपक्षीयांनी इतकी खटपट केली तरी त्याच्यांत वैदिक कर्माची परंपरा आजवर अबाधितपणें चालू राहिली आहे. आतां महाड येथें चान्द्रसेनीय कायस्थ प्रभुज्ञातीचा जो अपमान झाला व त्या ज्ञातींत श्रीसंस्थानाबद्दल जी उदासीनता उत्पन्न झाली ती दूर होण्याकरितां श्री संस्थानाकडूनच खऱ्या हकीगतीचा खुलासा होणें इष्ट आहे असें संस्थानदेवतेस वाटल्यावरून या पीठाच्या चातुर्वर्ण्य शिष्यवृंदास अशी आज्ञा करण्यांत येते कीं :

'' चान्द्रसेनीय कायस्थ प्रभुज्ञातिवर्ग या पीठाच्या चातुर्वर्ण्य शिष्यवृंदांतीतील क्षत्रिय वर्णाचा असून त्यांस वैदिक कर्माचा पूर्ण अधिकार आहे. त्यांच्यांत वैदिक कर्मपरंपरा चालत आलेली आहे व ती तशीच अबाधितपणें चालवीत जावी अशी संस्थांनदेवतेची आज्ञा आहे. ''

**ब्रह्मक्षत्रविशःशूद्राःसर्वेवर्णाःपरस्परम् ।**
**प्रीतिमंतो धर्मरतानन्दन्तुसुखशालिनः ॥ १ ॥**

इति शिवम्.

मिति आषाढ वद्य २ शके १८३५ प्रमादिनाम संवत्सरे ता. २० माहे जुलई सन १९१३ इ. मुक्काम शहर मुंबई. **महानुशासनंवरीवर्ति.**

बारअंक $\frac{१७}{१८३५}$

# ग्रामण्यांचा साद्यंत इतिहास.

## (क्षत्रिय मराठे.)

" जर महाराष्ट्र ब्राह्मण खोटा ब्राह्मणत्वाचा हट्ट धरून क्षत्रियास लोळविण्यास पहातील, तर जी आमची महाराष्ट्रभूमी आजपर्यंत कधींच तदभिमत दुराग्रही जातिभेदाचें माहेर झाली नाहीं, ती तशी पुढें होण्याचा संभव नाहीं. तेव्हां क्षत्रियच त्यास उलट लोळवून टाकतील."

कै॰ भागवतांचे ' मऱ्हाठ्यांच्या संबंधानें चार उद्‍गार ' पृ. १८४.

मराठे क्षत्रिय आहेत कीं नाहींत, असल्यास त्यांना वेदोक्त कर्मे करण्याचा अधिकार कां नसावा, हा वाद अगदीं अर्वाचीन आहे. महाराष्ट्रांतील हिंदू राजघराण्यांचा इतिहास पाहिला तर त्यांत एकच गोष्ट अगदीं ठळकपणानें दिसून येते की क्षात्रधर्माचें परिपालन पूर्वापार तों आजपर्यंत जर कोणीं एकनिष्ठेनें केलें असेल तर तें क्षत्रिय मराठ्यांनींच. महाराष्ट्रांतील प्राचीन जुनें मराठ्यांचें राजघराणें म्हटलें म्हणजे जाधवांचें. जाधव म्हणजेच यादव. राजसत्ताधारी यादव हे श्रीकृष्ण परमात्म्याच्या थोर कुळांतले. श्रीकृष्ण हा सर्वसंमत क्षत्रिय होता. तेव्हां अर्थातच यादव व त्यांपासून उत्पन्न झालेले जाधव हेही क्षत्रियच होत. जाधवांच्या काळीं क्षत्रिय मराठे खास होतें. खुद्द ज्ञानेश्वरानीं देवगिरीच्या रामदेवरावाला " क्षत्रिय कुलावतंस " म्हटलें आहे. जाधवांच्या राजकीय सत्तेचा अस्त झाल्यावर मुसलमानांची सत्ता महाराष्ट्रांत अप्रतिबंध चालूं झाली. मुसलमानांच्या अव्वलीपासून तों श्रीशिवाजीमहाराजांची सत्ता दृढमूल होईपर्यंत दक्षिण हिंदुस्थानांतील साऱ्या हिंदूसमाजाला परधर्मीयांसी टक्कर देण्यांत गुंतल्यामुळें आपापल्या धार्मिक आचारांचें यथाशास्त्र पालन करणें केव्हांही शक्य नव्हतें. त्यामुळें हिंदुधर्मानुयायी लोकांना प्रसंग पडेल त्याप्रमाणें वारा वाहील तशी पाठ फिरवून धर्मजागृतीपुरता आचार व विचार जिवंत राखण्यांपलीकडे अधिक कांहीं करतां येत नसे व तें त्यांनीं प्राणैःकंठैर्गतेरपि केलें, हेंच अधिक स्तुत्य केलें. मुसलमानी अमदानींत क्षत्रिय हिंदूंपैकी अग्रेसरत्वानें पुढें आलेल्या जाती कायत्या दोन, एक चां. का. प्रभु व दुसरे मराठे. पैकीं चां. का. प्रभूंची संख्याच मुळीं अल्प असल्यामुळें त्या काळच्या इतिहासांत त्यांचा उल्लेख व्हावा तितका झालेला नाहीं ; कदाचित् थोडाफार झाला असल्यास तो तुरळक तुरळक नामनिर्देशापलीकडे अधिक उपलब्ध तरी नाहीं. संख्येनें व ऐतिहासिक महत्वानें मराठे अधिक, यामुळें त्यांचा निर्देश इतिहासांत पुष्कळ आढळून येतो. श्रीकृष्णदेवाच्या अवतारानें पुनित झालेल्या देवगिरीच्या जाधवाच्या कुळांत उत्पन्न झालेली जीजाबाई आणि श्रीरामावतारनें अलंकृत झालेल्या मेवाडच्या भोंसले घराण्यांतील शहाजी या जगद्वंद्य मातापित्याच्या उदरीं श्रीशिवाजीमहाराजांचा जन्म झाला. त्यांनीं अविश्रांत परिश्रम करून खरोखरच शून्यापासून ब्रह्म उत्पन्न करावें त्याप्रमाणे स्वराज्यस्थापना करून मराठ्यांचा क्षात्रधर्म अधिक उज्वल केला व स्वपराक्रमाचा चौखंडी धौशा गाजविला. हा काळ उत्क्रांतीचा होता. हिंदूधर्म आणि हिंदूसाम्राज्य यांच्या उन्नतीचा होता. प्रतापसूर्य श्रीशिवाजीमहाराज यांचा महाराष्ट्रीय क्षितिजावर उदय होतांच क्षात्रवृत्तीचीं स्तवनें गात गात त्याचें स्वागत करायला जे दोन चंडोल आत्मस्फूर्तीनें पुढें सरसावले ते मराठे (मावळे) आणि चांद्रसेनीय

कायस्थ प्रभू समाज हे होत. एकदील झालेल्या या दोन समाजांच्या एकीनें शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याच्या महत्वाकांक्षेला न भूतो न भविष्यति असें चैतन्य प्राप्त होऊन हां हां ह्मणतां मयाच्या नगरीप्रमाणें सह्याद्रीच्या धुळीच्या कणांतून स्वराज्याचा टोलेजंग प्रासाद निर्माण झाला. ह्रदयांत सदैव खेळत असलेली स्वराज्यस्थापनेची गुजगोष्ट श्रीशिवाजीमहाराजांनीं प्रथम दादजी नरस प्रभू देशपांडे या चांद्रसेनीय कायस्थ प्रभूच्या कानांत सांगितली आणि दादोजी कोंडदेवाच्या विद्यमानें रोहीडेश्वराच्या स्वयंभू पिंडीसमक्ष शिवाजी व दादजी प्रभू यांच्या परस्पर आणाभाका झाल्या, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. कायस्थ प्रभूंच्या अनुवंशिक मुत्सद्देगिरीचा धनुर्धारी मराठ्यांच्या तलवारीशीं संयोग होतांच, यक्षिणीच्या कांडीप्रमाणें साऱ्या महाराष्ट्राचा नूर बदलून गेला. एकसमयावच्छेदेंकरून स्वराज्यांचा चौघडा सर्व हिंदूंच्या ह्रदयांत रात्रंदिवस झडूं लागला. डोईजड झालेलें गुलामगिरीचें कवच धाडकन् कोंसळून पडल्यामुळें, त्याच्या दणक्याखालींच स्वार्थी भावनांचा चुराडा उडून, सर्व महाराष्ट्रीय हिंदू समाजांत स्वार्थत्यागाची कल्पना विद्युत्वेगानें सणसणाट करूं लागली. मुसल्मानी सत्तेच्या गुळचट मानपानाची तोंडास मिट्टी बसल्यामुळें, कडूच कां होईना पण स्वयंनिर्णय-तत्त्वाचा अक्कलकाढा चोखण्यास राष्ट्राची जिभली वळवळ करूं लागली ; आणि सन १६४६ त तोरणगडावर शिवबाने स्वराज्याचें तोरण बांधून महाराष्ट्राच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याचे निशाण उंच फडकवितांच, त्याच जिभल्यांनीं '' श्रीशिवाजीमहाराजांचा विजय असो '' अशा गगनकटाहभेदी आरोळ्या ठोंकल्या. या आरोळ्यांचा प्रतिध्वनि सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांत आपला स्फूर्तिदायक पडसाद उमटवूं लागतांच सर्व दर्जाचे व सर्व जातीचे हिंदू लोक भराभर शिवाजीच्या निशाणाखालीं जमा झाले आणि त्यांनीं आपल्या संघटित शक्तीनें शिवाजीच्या स्वराज्यस्थापनेच्या कल्पनेला व्यापक स्वरूप आणलें.

मराठी राज्याचा अंमल चोंहीकडे बसून हिंदूंच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याचा वचक केवळ हिंदुस्थानांतच नव्हे, तर रूमशामच्या यवनी सिंहासनाच्या पायथ्याशीं जाऊन भिडतांच, शिवाजीमहाराज व त्यांचे मुत्सद्दी यांना यवनी अंमलाखाली मलीन झालेले हिंदूंचे धार्मिक आचारविचार पुनरुजीवन करण्याची इच्छा सहाजीकच झाली. शिवाय, महाराष्ट्रीय हिंदूंचा ओढा निसर्गतःच धर्मप्रवृत्तीकडे असल्यामुळें, राजकीय स्वातंत्र्याची इमारत चिरंजीव करण्याकरितां धर्मस्थापनेच्या उद्देशाची कोनशिळा तिच्या पायांत प्रथम बसविणें हेंच आपलें आद्यकर्तव्य आहे, असें शिवाजीसारख्या चाणाक्ष राष्ट्रपुरुषानें ताडलें, यांत त्यांची दूरदृष्टीच विशेष दिसून येते. महाराष्ट्राच्या धर्मप्रेमाच्या मर्मालाच याप्रमाणें चेतना देतांच, शिवाजीमहाराज हे अवतारी पुरुष आहेत, ही पवित्र भावना चारी वर्णांच्या आबालवृद्धांत जागृत झाली आणि शिवाजीनें तारुण्याच्या पूर्वरंगांत ह्रदयावर कोरून ठेवलेल्या

प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ।
शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ॥

या उद्देशमुद्रेप्रमाणें '' हिंदुधर्म प्रतिपालक '' ही कीर्ती प्रतिपच्चंद्ररेखेव वृद्धिंगत होऊं लागली. शहाजी राजांची मुत्सद्देगिरी व शौर्य हीं जितकी शिवाजीमहाराजांत प्रतिबिंबित झाली

होती, तितकीच किंबहुना त्याच्या शतपट त्यांच्या मातोश्रीची धार्मिक प्रवृत्तीहि त्यांच्यांत रसरसलेली होती; म्हणजे राजकीय क्षेत्रांत महाराज जरी सवाई सिंह होते तरी धार्मिक क्षेत्रांत त्यांच्याइतके मनाचे मवाळ तेच होते. धार्मिक प्रवृत्तीकडे जात्याच ओढा असल्यामुळें आणि तो ओढा शंभर नंबरी कसाचा असल्यामुळेंच समर्थ रामदासासारख्या निस्पृही वैरागी आणि सत्यप्रिय महापुरुषानें त्यांना पट्टशिष्यत्वाचा अग्रमान दिला व तुकारामासारख्या सिद्धानें त्यांना '' निश्चयाचा महामेरु '' अशी संज्ञा दिली. अर्थात् '' हिंदुधर्मसंस्थापन '' व '' गोब्राह्मण प्रतिपालन '' या उद्देशाविषयीं जनतेला लवमात्रहि संशय न येण्याइतकें महाराजांचें अंतर्बाह्य वर्तन शुद्ध होतें.

स्वराज्याचा पाया शिवाजीसारख्या महापुरुषाच्या हातून ठाकठीक बसल्यावर हिंदूधर्माचाही पाया पुनःश्च ठाकठीक बसवून धर्म व राजकरण यांची अभेद्य जोडी एकत्र करण्याचा विचार निघाला आणि त्याचें पर्यवसान शिवाजीमहाराजांना शास्त्रोक्त राज्यभिषेक करावा या बेतांत झालें. हा राज्याभिषेकाचा प्रश्न त्या काळच्या परिस्थितीचा विचार करतां इतका महत्वाचा व अत्यावश्यक होता कीं, त्याला विरोध करण्याची नुसती कल्पना करणारें मस्तक महाराजांनीं जरी तत्काळ छाटून टाकलें असतें तरी त्यांनीं अफझुलखानाच्या वधाइतकेंच महत्वाचें राष्ट्रीय कार्य केले, असा इतिहासकारांचा शेरा खात्रीनें पडला असता. परंतु शेवटीं त्या महत्वाच्या कार्यांत '' भटच पडला.'' राज्याभिषेक फक्त क्षत्रियाला होतो, इतरांस नाहीं, असें पडलें शस्त्र ; आणि शिवाजी पडला ' मराठा '. मराठा म्हणजे कोण ? लागली शास्त्र्यांचीं डोकीं एकमेकांवर फुटायला. झालें. ठरलें. मराठा ह्मणजे शूद्र. शूद्राला राज्याभिषेक व्हावयाचा नाहीं. मराठा ह्मणजे शूद्र ? बरोबर. मुळीं, सध्यांच्या युगांत ब्राह्मण व शूद्र हे *दोनच वर्ण कायते शिल्लक, बाकीचे कधींच गेले विलायतेच्या सफरीला निघून. ही धडधडीत शास्त्रप्रणित मल्लीनाथी. जर शिवाजी ब्राह्मण नाहीं तर तो† शूद्राशिवाय आणखी कोणत्या वर्णाचा असेल ? अर्थात् ब्राह्मणांनीं व पिंगळ्यासारख्या स्वामिनिष्ट ब्राह्मण मुत्सद्यांनींसुद्धां राज्याभिषेकाची कल्पना समूळ हाणून पाडण्यासाठीं कांस मारली. परंतु

*'' नंदांतं क्षत्रियकुलं हें हवें असल्यास मगध देशास लागूं होईल. पण आमच्या महाराष्ट्र मंडळास कदापि लागूं होणार नाहीं. आमचे पूर्वज कांहीं आम्हापेक्षां कमी ब्राह्मण होते असें नाहीं. एका प्रकारानें त्यांचें ब्राह्मण्य निःसंशय आमच्यापेक्षा अधिक जाज्वल्य होतें. तरी ते सर्व हीं कुळें अस्सल क्षत्रिय समजत. गागाभट्टानें शिवाजीची मुंज केली, ती असला विचार केल्याशिवाय नव्हे. असें असतां दुराग्रहानें त्यांस ' कुळंबट ' किंवा ' कुळंबी ' किंवा ' शूद्र ' म्हणणें, वरील ब्राह्मण मंडळीचे जर आम्ही अस्सल वंशज खरे तर, आम्हांस बिलकूल शोभत नाहीं ''

कै. प्रो. भागवत म. सं. चा. उद्गार पृ. १९३.

†'' शिवाजीसारख्या अवतारी पुरुषानें ज्या जातींत जन्म घेतला, ती जात जरी चांडाळांपेक्षाही हलकी असली, तरी ब्राह्मणांस वंद्य झाली, असें आम्हीं समजतों. पण शिवाजीची आई जाधव कुळांतली व जाधव हे यादव, अर्थात् अस्सल क्षत्रिय. ज्या कुळाचा व यादवांचा संबंध झाला तेंहि अस्सल क्षत्रिय कुळ असलें पाहिजे.*** तेव्हां भोंसले वगैरे सर्व ' मऱ्हाठे ' म्हणविणारी जात अस्सल क्षत्रिय होय. त्यांस शूद्र म्हणून किंवा कुळंबट म्हणून जर अविचारानें आमचे ब्राह्मणबंधू गालिप्रदान करतील, तर फुकट मोठ्या वाग्दोषास पात्र होतील व देवाच्या घरीं निःसंशय अपराधी ठरतील.''

कित्ता—पृ. १८७.

विद्वान देशभक्त महादेवराव राजाराम बोडस, एम.ए. एलेल्बी यांना ' चित्रमय जगत् ' (जाने. १९१९) च्या अंकांतील त्यांच्या ' वर्णाश्रम व्यवस्था ' लेखाप्रीत्यर्थ प्रस्तुत टीपेंतील कै. भागवतांचे विचार आम्ही मोठ्या नम्रपणानें आहेर करतों.

महाराष्ट्राचें भाग्य म्हणून म्हणा किंवा त्याला स्वतंत्र राज्यस्थापनेचा ऐतिहासिक सुखसोहळा याच जन्मीं याच डोळा पहावयाचा होता म्हणून म्हणा, या लेखाच्या शिरोभागीं उद्धृत केलेले कै. भागवतांचे स्पष्टोद्‌गारच अखेरीस खरे झाले ! तत्कालीन् ब्राह्मणांच्या दुराभिमानाला लोळवून सपशेल चीत करायला अखेर एक क्षत्रिय वीरच पुढें सरसावला ! !

श्रीशिवजयंति किंवा श्रीशिवराज्याभिषेकोत्सव करणाऱ्या आधुनिक पुणेकर देशभक्तांना शिवकालीन चां० कायस्थ प्रभू वीर व वीरांगना यांची जरी किंमत वाटत नसली आणि इतिहासविषयक नवीन ग्रंथांतून त्यांना सफाई चाट देण्याचा त्यांचा मनोदय पेशव्यांच्या पायांच्या पुण्याईनें तडीस गेला, तरी खरा इतिहास ज्यावेळीं श्रीछत्रपतीचा जयजयकार करतो त्यावेळीं बाळाजी आवजी चिटणीसाचाहि जयजयकार करतो, प्रभू बाळाजी आवजी चिटणीस हा दुसरा शिवाजीच होता असें म्हणण्यांत लवमात्र अतिशयोक्ति व्हावयाची नाहीं. शिवाजीमहाराजांना शास्त्रोक्त राज्याभिषेक करण्याची प्रतिज्ञा पार पाडतांना त्यानें दुराग्रही ब्राह्मणांचा छळ कसा सोसला आणि सरतेशेवटी आपल्या निश्चयी व ओजस्वी बुद्धिप्रभावानें ती प्रतिज्ञा कशी पार पाडली, त्याचा इत्यंभूत मजकूर चां. का. प्रभूंवरील चवथ्या ग्रामण्यांच्या इतिहासांत दिलेला असल्यामुळें त्याचा पुनरुच्चार येथें करीत नाहीं. स्वतःच्या कोरड्या ब्राह्मण्याच्या अभिमानापुढें प्रत्यक्ष राष्ट्रहिताचा आणि कृतज्ञतेचाहि बळी देण्यास त्या वेळच्या ब्राह्मण म्हणविणारांनीं मागेंपुढें कसें पाहिलें नाहीं, आणि कांहीं काळपर्यंत जरी त्यांनीं राष्ट्रैक्याचे पोवाडे इतर महाराष्ट्रीयांबरोबर गाण्यास कांकूं केलें नाहीं तरी परोत्कर्षाची वेळ येतांच त्यांच्या कपाळाच्या शिरा कशा ठणकूं लागल्या, हें वाचकांस त्या मजकुरावरून स्पष्ट दिसून येईल. ज्या शिवाजीमहाराजांनीं केवळ सार्वजनिक राष्ट्रीय भावनेनें स्वराज्य स्थापनेचा जगड्व्याळ उपक्रम केला, चारहि वर्णांना ' महाराष्ट्रीय ' या एकाच सूत्रांत ओंवण्याचा उदात्त प्रयत्न केला, त्याच शिवाजीवर आणि त्याच्या निस्सीम पक्षपाती चांद्रसेनीय कायस्थ प्रभू मुत्सद्यांवर ग्रामण्यांचा हल्ला चढवून ब्राह्मण म्हणविणाऱ्यांनीं अशा रीतीनें स्वराज्याच्या जरीपटक्याशेजारीच जातीभेदाचा उलटा खराटा बांधण्याचा नीच उपव्याप केला.

शिवावतारापूर्वीच्या देशकालपरिस्थितीचा विचार केला असतां, त्यावेळीं महाराष्ट्रांत छोटेखानी राज्यक्रांत्यांच्या लाटांवर लाटा इतक्या त्वरेनें एकींतएक मिसळून उसळत येत होत्या कीं खुद्द ब्राह्मण म्हणविणारांनाहि आपल्या ब्राह्मण्याची दाद नव्हती ; मग नेहमींच हातांत शस्त्र धारण करून शत्रूंपासून देशाचा बचाव करण्यांत पिढान्‌पिढ्या गुंतलेल्या क्षत्रिय मराठे वीरांना क्षत्रियांच्या धर्मकर्माचरणाविषयीं विसर पडला असल्यास यांत काय नवल ? चारी वर्णांच्या धर्माचरणावर कालगतीनें पडलेला विस्मृतीचा उकीरडा साफ झाडून महाराष्ट्रांत त्याचा जीर्णोद्धार करण्यास वैदिक सनातन धर्माच्या खजिन्याच्या किल्ल्यांचा जुडगा कडोसरीस बाळगिणारा *ब्राह्मणबच्चा कोणीच पुढें येईना. हें कार्य करण्यास भगवदिच्छेनें शिवाजी हा क्षत्रिय मराठा पुढें आला, त्यानें धर्म व राजकरण ही अभेद्य जोडी

* " पेशवाई होण्याच्या पूर्वी एकट्या ब्राह्मण जातीनें म्हणून महाराष्ट्रांत कांहीं केलेलें नाहीं " कै. प्रो. भागवत. उद्‌गार पृ. १८२.

पुनरुज्जीवित व निगडित केली आणि क्षत्रियांच्या पूर्वापार प्राचीन वहिवाटीप्रमाणें स्वतःस राज्याभिषेक करून घेण्याचा निश्चय केला असतां, ब्राह्मणांनीं पुनश्च त्याच विस्मृतीच्या उकीरड्यांत लोळावें व शिवाजीसारख्या राष्ट्रपुरुषावरहि तो उकीरडा उधळण्याची दिक्कत बाळगूं नये, इतकें नीच कृतघ्नतेचें उदाहरण जगाच्या इतिहासांत हेंच ! मराठे जात्याच क्षत्रिय असल्यामुळें त्यांना वेदविहित कर्में आचरण्याचा अधिकार निःसंशय होताच ; परंतु त्यांना त्यांची जाणीव मात्र उरली नव्हती. मराठे क्षत्रिय असल्यामुळें वेदाधिकारीच आहेत व शिवाजीमहाराजांना राज्याभिषेक वेदोक्तच झाला पाहिजे असें प्रतिपादन करून बाळप्रभूनें आपल्या सर्व प्रतिपक्षियांस निरुत्तर केलें. विरुद्ध पक्षियांच्या दुराग्रहामुळें बाळाजीचे सर्व प्रयत्न फुकट जातात कीं काय असा सुमार वाटूं लागला. परंतु संकटाची परंपरा जसजशी जास्त येईल तसतशीं अंगीकृत कार्य पार पाडण्याची धीमंताची उमेद वाढतच जाते. त्याप्रमाणें बाळाजीनें शिवाजीमहाराजांच्या वंशावळीचा पत्ता लावला. त्यांचें मूळ मेवाडच्या राजघराण्यांतून श्रीरामचंद्रापर्यंत अस्खलीत सिद्ध केलें. गागाभट्टासारख्या बृहस्पतीला अनुकूळ करून घेऊन आपलें क्षत्रियत्व व त्याबरोबर दरोबस्त मराठ्यांचें क्षत्रियत्व बाळाजी आवजीनें पुनश्च प्रस्थापित केलें. अशा रीतीनें मराठ्यांच्या वेदोक्त कर्माधिकारांची व क्षत्रियत्वाची प्रस्थापना करण्याच्या कामीं एका चांद्रसेनीय कायस्थ प्रभू वीराचाच स्वार्थत्याग खर्ची पडलेला आहे.

जातिभेदाचें बीजारोपण करण्याचा मान ब्राह्मणांकडे जातो. खुद्द शिवाजी विरुद्धच वेदोक्ताचें बंड उभारून जातिभेदाच्या जोडीनेंच कृतघ्नतेचेंहि पातक तत्कालीन् ब्राह्मणवर्गाकडून घडलें, हें नमूद करायला आमच्या लेखणीस फार कष्ट होत आहेत. शिवाजी महाराजांच्या व्यापक राष्ट्रीय भावनेचा, उदात्त विचारसरणीचा व कनवाळुपणाचा गैरफायदा घेऊन, ही वेदोक्ताची बंडाळी ब्राह्मणांनीं ठिकठिकाणीं या नाहीं त्या रूपानें चालूंच ठेवली होती, असें इतिहासावरून दिसतें. या वंडाळीमुळें महाराष्ट्रांतील एकदील झालेल्या जातीजातींत फूट पडेल आणि एवढ्या दुर्घट परिश्रमानें, हजारों वीर-कलिजांचे बळी देऊन स्थापन केलेली मराठेशाही हां हां म्हणतां पुनश्च परक्या लांडग्यांच्या भक्षस्थानीं पडेल, ही विवंचना शिवाजी महाराजांना रात्रंदिवस त्रस्त करीत होती, असें त्यांच्या खालीं दिलेल्या फर्मानावरून उघड होत आहे.

प्रतिपच्चंद्ररेखेव
वर्धिष्णुर्विश्ववंदिता ॥
शाहसूनोः शिवस्यैषा
मुद्रा भद्राय राजते ॥

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३ नलनाम संवत्सरे माघ शुक्ल ५ क्षेत्रीये कुलावतंस श्री राजा सिवाजी छत्रपती स्वामी याणी समस्त ब्राह्मणवेदपाटी व ग्रहस्थान व क्षेत्रीय मंडली तथा प्रभु ग्रहस्थान व वैश्य ज्ञाती व शुद्रादी लोकान तथा जमेदार व वतनदार व रयेत वगैरे सर्व ज्ञाती हिंदु महाराष्ट्रांन तथा महालानि देश व तालुके व प्रांतानिहाय वगैरे यांस आज्ञा केली असिजे. हिंदु ज्ञातीत आनादि परंपरागत धर्मशास्त्राप्रमाणे धर्म चालत अले असतां अलीकडे काही दिवसात येवनी आमल जाहल्यामुळे काही ज्ञातीतील लोकास बलात्कारे धरून भष्ट केले व कितेक जागीची दैवते जबरीने छिन्नभिन्न केली. हिंदु ज्ञातीत आहाकार जाहला. गाय ब्रांह्मणसह

धर्म उत्छद होण्याचा समये प्राप्त जाहला. त्याजवरून श्री ईश्वरी कृपेनें आमचे हाते श्रीसांबजीने यवन वगैरे दुष्टास शासन करऊन पराभवाते गेले व राहिले ते शत्रू पादाक्रात होतील. परंतु लिहिण्याचे कारण की या सरकारांत राज्याभिषेक समई क्षेत्रक्षेत्रादि क्षेत्रस्थ ब्राह्मण बहुत ग्रंथ अनादि सर्व जमा करून धर्मस्थापना जाहली त्यांत श्री कासी क्षत्रस्थ सिष्ट ब्राह्मणांत काही तड पडून हाली ग्रंथ पाहता भटजीकडून तफावत जाहली आहे. ठरले त्याजवरून हली पुन्हा शास्त्री पंडित व मुदसदी व कारकून यांस आज्ञा होऊन ज्ञातिविवेक व स्कंद पुराणांतरगत श्याद्रीखंड अदी माहन ग्रंथी निरणय सर्व ज्ञातीविसी जाहले आहेत ते वगैरे सर्व ग्रंथानुमते व जसे ज्याचे धर्म अनादी चालत आले त्याप्रमाणें निरवेध चालावे अगर ज्या ज्या ज्ञातीस वेदकर्माचा अधिकार असून येवनी जाहल्यामुले आथवा ब्राह्मणानी काही द्वेषबुध्धीने शास्त्रांनरूप कर्मे न चालविता मलीन जाहली असतील ती त्या ज्ञातीचे मंडलीनी पुरी पाहून ज्याची त्याणी नीट वहिवाट आचरणे. ज्या ज्ञातीत जसी परंपरा चालत आली त्याप्रो चालवावी. जो कोणी द्वेषबुध्धीने द्रव्येलोभास्तव ब्राह्मण शास्त्रविरहीत नवीन तंटे करून खलेल करील येविसी त्या ज्ञातीवाले यानी सरकारांत अर्ज करावा. म्हणजे शास्त्राचे समते व रुढीपरंपरा व ग्रंथ पाहून सरकारांतून निरंतर निरमत्छरपणे धर्मस्थापना कोणाचा उजूर न धरीता परनिष्ट जेव्हांचे तेव्हांच त्वरीत बंदोबस्त होत जाईल. **हली येवन उतर देसीहून येत आहे. तरी सर्व ज्ञातीने यक दिल राहून कस्त मेहनत करून सरकारची सेवा करून शत्रू पराभवाते न्यावा. यात कल्याण तुमचे सरकारचे ईश्वर करील. जाणिजे. मर्यादेयं विराजते.**

**यावरून स्वराज्याइतकीच स्वधर्माची काळजी करणारे शिवाजीमहाराज होते हें जरी सिद्ध होत असलें तरी राज्यभिषेकप्रसंगीं ब्राह्मणांनीं रुजत घातलेल्या जातिभेदाचीं जाळीं पुढेंपुढें राजकारणांतहि अडथळा आणूं लागलीं होतीं, हेंहि विशेष स्पष्ट होत आहे. तरीदेखील आमचे ' मराठे आणि इंग्रज ' कर्ते दडपून सांगायला तयारच आहेत कीं, '' शिवाजीनें ज्यावेळीं महाराष्ट्रमंडळांत एकी करून मुसलमानांपासून देशाचें संरक्षण करावयाचें योजिलें त्यावेळीं त्यानें जातिभेदाविरुद्ध व्याख्यानें दिलेलीं आढळत नाहींत.'' बिचारा शिवाजी ! त्याच्या नशिबावर अक्षरशत्रुत्वाचा मारलेला शिक्का अझून निघतां निघत नाहीं, तर त्याला अलिकडच्या मनूंतील बोलघेवड्या शिवाजीसारखीं व्याख्यानें देण्याची कला कसली अवगत असणार ? असो.**

**गागाभट्टासारख्या पंडीतानें दरोबस्त महाराष्ट्रीय ब्राह्मणांच्या समक्ष शिवाजीची मुंज वेदोक्त मंत्रांनीं लावली आणि राज्यभिषेकहि वेदोक्त मंत्रांनींच केला. या ऐतिहासिक सुप्रसंगानें मराठ्यांच्या क्षत्रियत्वाचा आणि वेदोक्त कर्माधिकाराचा पाया ठाम बसविला आणि तसें ब्राह्मण ह्मणविणारांना कबूलहि करावयास लावले. ही वेदोक्त कर्माची परंपरा संभाजीमहाराज, राजाराम व शाहू यांच्या कारकीर्दीपर्यंत अबाधित चालली होती. परंतु शाहूच्या अमदानींत चित्पावन भटाचें पाऊल राजकारणाच्या क्षेत्रांत पडतांच त्या परंपरेला पुन्हा ग्रामण्याच्या बंडाळीचा शह लागला. एकवार हडसून खडसून सिद्ध झालेल्या परंपरेचें वास्तविक उच्चाटन करून ब्राह्मणांना काय लभ्यांश मिळणार होता ? त्यांनीं जर क्षत्रिय मराठ्यांच्या क्षत्रियत्वाबद्दल आणि वेदोक्त कर्माबद्दल विरोध केला असेल तर तो खालीलपैकीं एखाद्या कारणामुळें केला असेल :—**

(१) मराठ्यांना आपलें क्षत्रियत्व व कर्माधिकार नीटसे सिद्ध करता आले नसतील ;

(२) त्यांच्या पुराव्यांचा पाया ब्राह्मणांचा Bona fide विश्वास बसण्याइतका भक्कम नसेल ;

(३) ब्राह्मणांना हिंदुधर्माच्या संरक्षणाची विशेष काळजी असल्यामुळे धर्मसंकर किंवा वर्णसंकर न होऊं देण्याबद्दल त्यांनीं शुद्ध प्रामाणिकपणाने मराठ्यांच्या धार्मिक व वार्णिक आचाराविचारांबद्दल without prejudice आक्षेप घेतला असेल ; त्यांत त्यांना दोष ठेवतां येत नाहीं ;

**अशा प्रकारची वकिली करणारे विद्वान आजलाहि पुण्यामुंबईच्या फडांत आढळतात. प्रत्येक गोष्ट परिस्थितीचा आणि ऐतिहासिक परंपरेचा नीटसा विचार न करीतां त्रयराशिकाच्या प्रमाणांत जर ठरविण्याचा प्रयत्न केला तर खऱ्या इतिहासाचें रूप कसें सफाई पालटून जातें आणि वकिली वाण्याच्या भाषाशैलीच्या झोतामुळें भलभलत्या अनैतिहासिक विधानांची कालावा-कालव बिचाऱ्या वाचकांना कशी भुरळ पाडते, यांचे प्रत्यंत्तर रा. रा. केळकर विरचित " मराठे व इंग्रज " हे पुस्तक किंचित् काळजीपूर्वक वाचल्यास खात्रीनें सांपडेल. शिवाजीच्या घराण्याच्या किंबहुना यच्चावत् मराठ्यांच्या क्षत्रियत्वाबद्दल व वेदकर्मांबद्दल आक्षेप घेणाऱ्या तीन कलमांपैकी एकीचाही आश्रय ब्राह्मण म्हणविणाऱ्यांना घेतां येणें शक्य दिसत नाहीं. बाळाजी आवजी चिटणीसानें राज्यभिषेकोपक्रमाची प्रतिज्ञा पार पाडण्यासाठीं व शिवाजीचें क्षत्रियत्व सिद्ध करण्यासाठीं जे पुरावे गोळा करून तत्कालीन् ब्राह्मणांच्या तोंडावर फेंकले आणि ज्यांनी गागाभट्टासारख्या बृहस्पतीलाही संशयछिन्न करून सोडलें, त्यांच्यापुढे कलमें १ व २ हीं तेव्हाच वितळून नष्ट झालीं. बाकी राहिलें कलम तिसरें. त्यांतला वकिली विधानांचा नाटकी भूस झाडला तर नुसतें ब्राह्मण हें नांवच शिल्लक राहतें. ब्राह्मण म्हणविणारे आपल्या ब्राह्मण्यांत किती पारंगत होते आणि अनुवंशिक ब्रह्मकर्माचा निदान प्रामाणिक तरी अभिमान जागृत रहाण्याइतकें त्यांचे स्वतःचें वर्तन, अभ्यास व अंतर्शुद्धि किती जागृतावस्थेंत होती, हें धुंडायला इतिहास-संशोधक मंडळाचे लोखंडी पिंजरेच हुडकायला नकोत. चित्पावनांचे राज्य सर्वत्र होऊन जिकडेतिकडे ब्राह्मणाला एवढा ऊत आला होता तरी पेशवाईच्या अखेरअखेरसुद्धां बिचाऱ्या *परशरामभाऊ पटवर्धनाला वेदोक्त मंत्र म्हणणाऱ्या भटांच्या दुष्काळामुळें भडाग्नीवरच स्वर्गाचा रस्ता सुधारावा लागला ना? त्याचप्रमांणे तत्कालीन् संत महासाधु श्रीधावडशीकर महाराज यांच्या समाधीच्या वेळीं तर खेडेगांव नव्हते ना ? शाहू महाराजांच्या समक्ष स्वामींची उत्तर क्रिया होणार म्हणून हजारों शास्त्री विद्वत्तेच्या शालजोड्या पांघरून तेथे जमा झाले होते; पण स्वामींचें मस्तक शंखानें**

---

* " पेशवाईसारखें ब्राह्मणी राज्य असतांना, नेहमी लागणारे धर्मकृत्यांतील मंत्रतंत्र म्हणावयाला येत नाहींत असे ब्राह्मण असावेत हें बरेंच चमत्कारीक दिसतें. परशुरामभाऊ पटवर्धनाच्या अंतकाळाचा इतिहास आहे. .... त्यांत खालील हकिकत आहे. ह्या जवानमर्द लढवय्या ब्राह्मणवीराचें प्रेत दहन करण्याकरीतां चिता वगैरे सर्व तयारी करण्यांत आली व जवळच्या खेड्यांतून कांहीं ब्राह्मणाहि आणविले. पटवर्धनाने कारकून नारो हरि करंदीकर याचे मनांत आलें की, यथाविधि मंत्रोच्चार होऊन नंतर चितेस अग्नि द्यावा, पण त्यावेळेस सर्व मंत्रविधि अवगत असणारा ब्राह्मण पैदा होईना. त्या गांवचे जोशी म्हणजे पक्के ढ. त्यांना एक मंत्र म्हणता येईल तर शपथ. अखेरीस अग्नि मंत्रसिद्ध न होतां प्रेत दहन करण्यांत आलें." म. स. उत्कर्ष पृ. १७०.

फोडण्याचा विधि अखेर एकाही शंखाला सुचला नाहीं तो नाहींच. असल्या अकटोविकटो ब्राह्मणांच्या पदरी धर्मसंकराच्या आणि वर्णसंकराच्या फाजील काळजींचे गांठोडे बाधणें किंवा त्यांच्या Bona fide ची व withouit prejudice ची सबब पुढे आणणें निवळ बाष्पळपणाचें ठरेल.

शिवाजीच्या वेळीं गागाभट्टानेंच निर्णय लावल्यामुळें तत्कालीन् ब्राह्मणांची तोंडें बंद झाली. तीं महाराष्ट्रीय राजकारणांत चित्पावनांचा प्रवेश होतांच पुन्हा उघडण्याची कारणें वरील तीन कलमांतलीं नसून, त्यांचें मूळ चित्पावनांच्या परोत्कर्षासहिष्णुतेंत बिनचूक सांपडतें. चित्पावनांच्या ब्राह्मण्यांचा वादविवाद करण्याचें हें स्थळ नव्हें खरें, तथापि त्यांच्या वैभव-नाटकाच्या नांदीला अब्राह्मणत्वाचे भेसूर स्वर कांही काळ तरी बेसूर करीत होते यांत संशय नाहीं. कांहीं कां असेना ' लवकरच ' ते राजवैभवाच्या प्रत्येक अंकाच्या प्रगतिबरोबर ब्राह्मण बनत गेले, आणि इतर महाराष्ट्रीय ब्राह्मण्यांच्या हातांत हात घालून त्यांनी क्षत्रिय मराठ्यांचा व क्षत्रिय कायस्थ प्रभूंचा तेजोभंग करण्यांचा विडा उचलला. ही परशुरामी प्रतिज्ञा पार पाडण्याच्या कामीं कोदंडाचा टणत्कार करून भरसमरांगणांत क्षत्रियाची टक्कर देणें तर शक्य नव्हतेंच नव्हतें; पण परशुरामी आख्यायिकेची परंपरा तर पुनरूज्जीवित करण्याची महत्वाकांक्षा फार. अशा परिस्थितींत त्यांनी ग्रामण्याची चळवळ फार दूरदृष्टीने हातीं घेतली. याची मिमांसा करतांना *प्रो. रा. ब. डोंगरे* म्हणतात, प्रथम ब्राह्मण आणि क्षत्रिय या दोन उच्च जातींमध्ये वैमनस्य पडून, ब्राह्मण क्षत्रियांचा पाडाव करण्याच्या उद्योगास लागले. एखाद्या जातीचे नायनाट करण्याचे दोन वर्ग आहेत—(१) शरीरवध, किंवा (२) नीचतर जातींत समावेश. ह्यापैकी पहिल्या मार्गाने क्षत्रिय जातीचा नाश करणें ब्राह्मण जातीस शक्य नसल्यामुळें, ह्यांनी दुसऱ्या मार्गाचा अवलबं करून, क्षत्रियांचें वैदिककर्म हिरावून घेऊन. त्यांस शूद्र बनविण्याचा प्रयत्न सुरूं केला. ग्रामण्यांची ही सर्वमान्य मिमांसा होय. अर्थात् मिमांसेच्या स्पष्टीकरणार्थ आपण किंचित् धर्मचर्चेचा प्रदेश सोडून प्रत्यक्ष राजकारणांतील घडामोडीकडे लक्ष दिलें पाहिजे; म्हणजे ब्राह्मणेत्तर जातींचा नायनाट करून स्वतःचें स्तोम माजविण्याकरितां त्यांच्यावर ग्रामण्यांचा हल्ला वारंवार चढविण्यांत चित्पावन नोकरशाहीचा हेतू काय होता त्याची स्पष्टता अधिक खुलासेवार होईल.

चित्पावनांच्या इतिहासाचे धागे कितीहि प्राचीन् काळापर्यंत भिडलेले असले किंवा मुद्दाम नेऊन भिडविलेले असले तरी, त्यांच्या जागरूक इतिहासाची खरीखुरी सुरूवात बाळाजी विश्वनाथापासून होते. हा गृहस्थ मूळचा श्रीवर्धन येथील कायस्थ प्रभू कुळकर्ण्याचा कारकून. तो आपलें वैभव कसोटीस लावण्याकरितां कोंकण सोडून घांटावर आला. हरयत्नानें त्यानें प्रथम धनाजी जाधवाची सेवावृत्ति पत्करून थोड्याच वेळांत त्यांने साताराच्या राजकारणी पुरूषांशी आपली जानपछान करून घेतली; इतकेच नव्हें, तर शाहूमहाराजांच्या नाटकशाळा गुलबाई आणि विरूबाई त्यांच्यापर्यंतही त्यानें आपल्या ओळखीचे क्षेत्र वृद्धिंगत केलें. प्रसंगाचा सोळा आणें फायदा करून कसा घ्यावा आणि उद्दिष्ट हेतूंपुढे कसल्याहि उच्च तत्त्वाला कॉपरखळी देऊन पुढें कसे सरकावें, यात आधींच चित्पावन समाज चांगला प्रख्या पावलेला

आहे. त्या बाळकडूप्रमाणें शिकारीच्या शुल्लक कारणावरून बाळाजी विश्वनाथ धनाजी जाधवावर उलटला आणि अन्नदात्या धन्याशीं बेइमानी करणें हें महापाप आहे किंवा नाहीं वगैरे वेदांत गुंडाळून ठेवून, त्यानें चिटणीसाच्या शिफारशीच्या व विरूबाईच्या वशिल्याच्या जोरावर शाहूमहाराजापासून पेशवाईचीं वस्त्रें पटकावलीं. बहिरोपंत पिंगळ्याला कान्होजी आंग्र्याकडून ' रक्ताचा थेंबहि न गमावतां केवळ युक्तीनें ' सोडवून आणल्याबद्दल पेशवाईचीं वस्त्रें बाळाजी विश्वनाथास शाहूने दिलीं, असें म्हणण्यांत खरी *परिस्थिती व्यक्त न होतां, उलट लिलावांत ठेवलेल्या टेबलाखुर्चीइतकीच पेशवाईच्या पदाची किंमत होती, असें म्हणावें लागेल. या बाळंभटांचे विशेष गुण म्हटले म्हणजे आर्जवी स्वभाव व कापट्यपटुता हेच होत. याच्या मागें याचा शूर व पराक्रमी पुत्र बाजीराव यानें क्षात्रवृत्तीची परमावधि करून मराठेशाहीचा दरारा बराच वाढविला व मराठामंडळाची कल्पना अस्तित्वांत आणून हिंदवी स्वराज्याच्या शामियाना भक्कम पायावर उभा राहण्याकरितां हिंदुस्थानाच्या चारी कोपऱ्यांत जबाबदार सुभेदारांच्या ठाण्यांच्या मेखा मारण्याचा अभिनंदनीय उद्योग केला. परंतु त्याच्या चरित्राचें सूक्ष्म अवलोकन करणाराला मात्र कबूल करणें भाग पडतें कीं त्याच्या सर्व पराक्रमाच्या मुळाशीं राष्ट्रीय भावनेपेक्षां स्वार्थाचा चिखलच फार सांचल्यामुळे त्याच्या सर्व पराक्रमाबद्दल उत्पन्न होणारा पूज्यभाव ऐतिहासिक दृष्टीच्या भट्टींत शून्यवत् ठरतो. हा पेशवा मोठा† शूर, ओजस्वी वक्ता, धाडसी मुत्सद्दी आणि अत्यंत भग्यवानही होता. यानें थोड्याच काळाच्या अवधींत मुख्य प्रधान व मुख्य सेनापती हे अधिकार शाहू पासून हस्तगत केले आणि पुणें ही स्वतःची स्वतंत्र राजधानी करून तेथून तो राज्यकारभार पाहूं लागला. कै. प्रो. भागवत **यांनी या पेशव्याच्या कारकीर्दीबद्दल जे संशोधन केलें आहे त्यांतील काही मुख्यमुख्य कलमें येथें देतों :—**

(१) पेशव्यांस स्वतंत्र रीतीनें पुण्यास राहूं दिलें, ही शाहूची मोठी चूक. छत्रपतीच्या अष्टप्रधानांनीं राजधानींतच असावें. साताऱ्यास पेशव्यांस ठेविलें असतें, म्हणजे त्यांस इतकें स्वातंत्र्य मिळालें नसतें. पण शाहू पडला ऐषआरामी; व बाळाजी विश्वनाथ मोठा कारकून. पहिला बाजीराव बाळाजीचाच मुलगा. त्यास महाराष्ट्र मंडळांत जितकी अव्यवस्था होईल तितकी इष्ट होती. व्यवस्था लागली, म्हणजे सातारकराकडे लागलाच लोकांचा व फौजेचाहि ओघ वळायचा तो तसा न वळावा व सर्व लगाम आपल्या हातांत रहावी म्हणून बाजीरावाचा मऱ्हाठ्यांस जिकडेतिकडे पसरविण्याविषयीं भगीरथ प्रयत्न. (२) बाजीरावानें मऱ्हाठ्यांचा देशाभिमान किंवा धर्माभिमान तरी जागरूक करावा होता. पण तेंहि त्याच्या हांतून झालें नाहीं. निझामाच्या पदरी जाऊन राहूं नये म्हणून शिलेदारांचा पगार वाढवून बाजीरावास मऱ्हाठ्यांच्या

---

* " बाळाजी विश्वनाथानें पेशवाई मिळविली ती आपल्या कारकुनीच्या बळावर, पराक्रमाच्या किंवा शौर्याच्या बळावर नव्हे. " म. चा. उ. पृ. ५१

† " बाजीरावानें अरेतुरेची लढाई काय ती दाभाड्याबरोबर मारली ती. बाकी त्यानें निझामास कोंडलें त्यांत त्याचें सैनापत्य दिसून येतें, यांत कांहीं संशय नाहीं. तरी मऱ्हाठ्यां शिपायांनी खरोखर अभिमान बाळगण्यासारख्या लढाया बाजीरावांनें किंवा त्याच्या वंशजांनी फारशा मारल्या नाहींत, इतकें येथें म्हटल्याशिवाय रहावत नाहीं. लढाया मारल्या प्रतापराव गुजरानें हंबीरराव मोहित्याने व संताजी घोरपड्यानें. त्या अवरंगझेबाच्या वेळच्या दांडग्या लढाया कोठें, व निझामासारख्या जेव्हां तेव्हां लढाई टाळणाऱ्या सरदारांबरोबर झालेल्या बाजीरावाच्या चकमकी कोठें !!! "

कै. प्रो. भागवतकृत उद्गार पृ. ४९

लुटारूपणास भर घालावी लागली. (३) मऱ्हाठ्यांचा लुटारूपणा नाहींसा करणें, हें *रावबाजीचे पहिलें कर्तव्य होतें, पण तसें न करितां उलट मऱ्हाठ्यांचा लुटारूपणा वाढविला, म्हणून ग्रांटडफ बाजीरावाची, तारीफ करितो । स्वार्थपर होऊन मऱ्हाठ्यांचा लुटारूपणा वाढविला, ही बाजीरावाची मोठी चूक निदान आम्ही समजतों. हा लुटारूपणा वाढविल्यामुळें सर्वत्र अव्यवस्था झाली, व अव्यवस्थेनें सर्व लुटून फन्ना करण्याचें दुर्निवार व्यसन लागल्यामुळें महाराष्ट्र-मंडळाचा अखेरीस घात झाला. (४) बाजीरावाची व त्याच्या बंधूची (चिमाजी आप्पाची) स्वामीभक्तीहि तितपतच होती. दोनदां तीनदां शाहूचा चिमणाजी आप्पानें उपमर्द केला. (५) ज्या खाणींतून रामचंद्रपंत, पुरंदरी नावाजलेला मुरारबाजी व चाकणास नांवाजलेला फिरंगोजी नरसाळा असलीं अमोलिक रत्नें निघालीं ती खाण निराळी व *रावबाजीची खाण निराळी. (६) उभय बंधूमध्यें स्वामिभक्ती मुळींच नव्हती व ते परार्थतेच्या गांवी स्वप्नींहि गेलेले नव्हते.

अनेक उद्‌गारांपैकी वरील सहा उद्‌गारांवरून वाचकांस बाजीरावाच्या कारकीर्दीची बरीच कल्पना होईल, असा भरंवसा वाटतो. शाहू महाराजसुद्धां बाजीरावाच्या चित्पावनी काव्याला उमगून नव्हते असें नव्हे, किंवा शाहूला देवळांतला नुसता महादेव करून हे पेशवे नंदी सारा राज्यकारभार आपल्याच शिंगावर घेऊन स्वतंत्र बनण्याचा उपद्याप करीत आहेत अशी बित्तंबातमी टोपकरादि शेजाऱ्यापाजाऱ्यांना माहीतच नव्हती, अशांतलाहि प्रश्न नव्हे. म्हणूनच सन १७४० मध्यें बाजीरावचा मृत्यू होतांच पेशवाईची झूल ताबडतोब नानासाहेबांच्या आंगावर न चढतां, प्रधानकीच्या पदाचा वारसा घड्याळाच्या लंबकाप्रमाणे कांहीं काळ इतस्ततः हेलकावे खात होता. परंतु महाराष्ट्राच्या व त्याबरोबरच अखिल हिंदुस्थानच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याचा नाश भवितव्यतेनेंच ठरवून ठेवलेला असल्यामुळें पुढें सरकविलेलें बाबूजी नाईक बारामतीकराचें प्यादें रघुजी भोसल्याला मागें घेणें भाग पडून शाहूराजाच्या मर्जीला बाळाजी बाजीरावाचाच शह लागला आणि पेशवाईचीं वस्त्रें पटकावून त्यानें अखेर सर्वांवर मात केली.

कै. " भागवत म्हणतात " पहिल्या रावबाजीने बाहेरून सर्व व्यवस्था नीट ठेवून आंतून शाहूछत्रपतीस †कसपटासारखे गणण्यास आरंभ केला. नानासाहेबांच्या कारकीर्दीच्या आरंभीच शाहू वारला. तेव्हां तर पेशव्यांनी सगळीच सत्ता बळकावली, व सातारकरांस बाहूलें करून ठेविले. (उद्‌गार पृ. ५१) " **नानासाहेबाच्या कारकीर्दीच्या बाह्य भपक्यावरून त्यांच्या अमदानीत महाराष्ट्रीयाची विशेष भरभराट झाली असें भासतें खरें, परंतु वस्तुस्थिती मात्र त्यांच्या अगदी उलट होती. क्षत्रिय मराठ्यांना नामोहरम करून ब्राह्मणांना ऊर्जीतावस्थेला––किंबहुना अत्युच्च वैभवाच्या कळवाला नेऊन पोहचविण्याची स्वतःची वंशपरंपरागत अंतस्थ महत्वाकांक्षा सिद्धीला नेण्यासाठीं या पेशव्यानें स्वतःच्या धोरणांची गति मंदविषाप्रमाणें (slow poison) ठेवण्यांत** खरोखरच मोठें चातुर्य दाखविले. संधि साधून

* प्रो. भागवत पहिल्या बाजीरावालासुद्धां ' रावबाजी ' च म्हणत असत.

†" From the best intelligence procurable there appears no reason to doubt of Bajirao's disregard of any subjection to the Shahu Raja, whom he acknowledges only for form's sake whilst his views tend apparently to fortify himself in a state of independence on him of which the Shahu Raja himself does not seem ignorant."
*p. 83 Forrest's Selections.*

त्यानें आसन्नमरण शाहूपासून सर्व मराठी साम्राज्याच्या कुलमुखत्यारीची सनद पटकविण्यांत तर लोकोत्तर कपटपाटव गाजविलें. शाहूची पट्टराणी सकवारबाई ही शिवाजीच्या भोंसले राजघराण्याला शोभेसी राजकारणी मुत्सद्दीण होती. शाहूच्या मागें ती पेशव्याच्या कारस्थानाला बळी पडली नसती तर मराठ्यांच्या इतिहासाला कांही निराळेंच रूप येण्याचा फार संभव होता. परंतु तो संभव कधिं संभवूंच नये म्हणून ज्याची रात्रं-दिवस धडपड तो नानासाहेब पेशवा थोडाच स्वस्थ बसणार ? त्यानें शास्त्रपुराणांचा आधार दाखवून, राणीच्या भावाला नरकप्राप्तीच्या पवित्र भीतीनें वश करून घेऊन, त्याच्याच हातानें सकवारबाईला शाहूराजाच्या पादुकांच्या सरणावर जियंत *जाळविली. ग्रँट डफ्नें या पेशव्याच्या कारकीर्दीबद्दल जे उद्गार काढले आहेत (**Vol. II p. 158**) ते जशाचे तसे येथेंच नमूद करणें श्रेयस्कर आहे. “His measures are marked by an excessive cunning, which Bramins, in general, mistake for wisdom; he practised all the arts of dissimulation, and was a perfect adept in every species of intrigue. A strong example of the worst species of Bramin character is shown in the manner by which he compassed the destruction of Suckwar Bye Sirkay. *** On the whole, he may be regarded as rather a favourable specimen of a Bramin in power.” पुण्याचे हे श्रीमंत पेशवे स्वतःस ‘ मऱ्हाठे† ’ म्हणवीत, पण सातारच्या मऱ्हाठा छत्रपतीचा पदोपदी अपमान करण्यास मात्र कधींहि मागेंपुढें पहात नसत. कुलीन व जातिवंत मराठ्यांस व मावळ्यांस पेशवे आपल्या नोकरींत मुळीच ठेवीत नसत;‡ उद्देश हाच कीं न जाणो, त्यांचा ओढा सातारकरांकडे- मूळरक्ताच्या वळणावर गेला तर ? फार काय पण खुद्द पेशव्यांनीं शिंदे होळकरासारखे जे नवीन मराठे सरदार उदयास आणले, ते पुढें शिरजोर होऊन आपल्याच डोक्यावर नाचूं लागतील आणि वेळीं रक्ताचा ओढा रक्ताकडे खेंचला जाऊन सातारकर छत्रपतीला सामील होतील या भीतीनें त्यांना निरनिराळ्या दूरदूरच्या

---

* “ नानासाहेबानें राजपत्नीशी केलेला कावा खरोखरींच आम्हा ब्राह्मणांना खालीं पहायास लाविणारा आहे. ” **प्रो. भागवत.**

***“ The wily Brahman-the Peshva by these arts secured his victim. *Sir James Campbell.*

† हल्लींसुद्धां ‘ मराठा ’ या शब्दाच्या अर्थाच्या लवचिकपणाचा पुरा फायदा घेऊन त्याचा निरनिराळ्या लपंडावानें कसा उपयोग करता येणें शक्य आहे, याचा उत्कृष्ट मासला ‘ मराठे व इंग्रज ’ या पुस्तकांत पाह्यला मिळेल. कोठें मराठे म्हणजे क्षत्रिय मराठे, तर लगेच पुढच्याच वाक्यार्धांत मराठे म्हणजे महाराष्ट्रांतले किंवा सरसकट महाराष्ट्रीय हिंदू अशा निरनिराळ्या अर्थसंभवाच्या पडद्यामागे बसून रा. केळकरांनीं ‘ मराठे ’ शब्दाला सर्कशींतल्या घोड्याप्रमाणे वाटेल तसा नाचविला आहे. पेशव्यांच्या किंवा ब्राह्मणांच्या अंगावर बाजू शेकते असें वाटतांच एक सर्वसामान्य ‘ मराठे ’ शब्द तोंडावर फेंकून मोकळे होण्यांत ग्रंथकार मोठें वाकबगार आहेत. शब्दांवर कोट्या लढवून साध्या सरळ विधानांना सुद्धां इंद्रधनुष्याप्रमाणें निरनिराळे रंग कसे देता येतात, निदान देता येणे शक्य आहे, हें ‘ मराठे आणि इंग्रज ’ पुस्तक नीट बारकाईनें वाचल्यास समजेल.

‡पानपतच्या मोहिमेवर निघालेल्या सरदार मंडळींची यादी पाहिली तर त्यांत बहुतेक ब्राह्मण सरदारच प्रामुख्याने दिसतात. मराठे नव्हते अशातला प्रश्न नाही; होते; परंतु ते सारे पेशव्यानींच उद्‌यास आणलेले नवीन मराठे सरदार होते. खास छत्रपतींच्या आश्रयाखालच्या मराठे सरदारांना पेशव्यांच्या अमदानींत विशेषसें प्रामणख्य नव्हतें. ‘ The old Mahratta families were now but secondary personages in the Deccan, owing the power of the Peishwas, and the consequent ascendency of the Bramins. ’ Grant Duff. Vol. II p. 140.

सुभेदाऱ्या देऊन पांगून पांगून ठेवले. कोल्हापूरकर भोंसल्यांच्या उरावर पेशव्यांच्या सत्तेचा वरवंटा कायमचा रहावा म्हणून कोल्हापूरच्या मुलखास लागून असणारा मिरजचा मोठा मुलूख पटवर्धनांच्या घराण्यास जहागीर देण्याचा मतलब हाच कीं अस्सल क्षत्रिय मराठ्यांना कधींच डोकें वरती काढतां येऊं नये. अशा अनेक धोरणांनी सातारकर छत्रपति आणि त्यांच्या सिंहासनाचा अभिमान बाळगिणाऱ्या क्षत्रिय मराठ्यांचा पेशव्यांनी तेजोभंग करण्याचा निंद्य आणि चिळस आणण्यासारखा यत्न केला. याबद्दल कै. प्रौ. भागवतांनी जे उद्गार काढले आहेत ते लपंडावी विधानाची चटक लागलेल्या पुणेकर संशोधकांनीं अवश्य मनन करण्यासारखे आहेत. प्रो. भागवत म्हणतात :— क्षत्रिय गादीची सगळी सत्ता बळकावून गादीच्या मालकास कसपटासारखे लेखण्याचा पाया अशा रीतीनें पेशव्यांसारख्या आमच्या जातिबंधूंनी महाराष्ट्र मंडळात पहिल्याने घातला, हें कबूल करण्यास आमच्या लेखणीस फार कष्ट होत आहेत. अशा रीतींने ब्राह्मण व क्षत्रिय या दोन फळ्या महाराष्ट्र मंडळामध्यें करून, घरफूट म्हणजे काय तें मऱ्हाठ्यांच्या या काळी पेशव्यांनी स्पष्ट करून दाखविलें. या काळाच्या पूर्वी या प्रकारचा जातिभेद किंवा आपमतलब महाराष्ट्र मंडळांत तरी निःसंशय नव्हता; म्हणूनच शाहुछत्रपतीस अभिषेक होईपर्यंत महाराष्ट्र मंडळाचें स्वातंत्र्य कायम राहिले होते. असो. कान्होजी आंगऱ्याच्या नेतृत्वाखाली युरोपीयन राष्ट्रांनाही भारी झालेल्या मराठ्यांच्या आरमाराचा नानासाहेब पेशव्यानें मुंबईच्या टोपीवाल्यांची मदत घेऊन नाश केला आणि इंग्रेजाची टोपी मराठ्यांना डोईजड करून ठेविली. कोल्हापुरकर छत्रपती साताऱ्च्या छत्रपतींचे अगदीं निकट संबंधी असतां या दोन घराण्यांत नानासाहेबानें शक्य तितका बेबनाव उत्पन्न केला आणि आपल्या चित्पावन सरदारांना मिरजेच्या देवडीवर कायमचे स्थापन करून कोल्हापुरकरांच्या सत्तेला कायमचा पायबंद लावला. मराठे सरदारांना घरी बसवून स्वतःच्या आप्तेष्ट चित्पावनांना सरदार बनविले. रघोजी भोसले इत्यादि क्षत्रिय मराठे सरदारांना मोठमोठी वचनें व मुलूख देऊन गार केले व मराठेशाहींतून त्यांचे नकळत उच्चाटन केलें. सारांश, मराठे सरदारांची जूट फोडून त्यांना अलग करण्यात व त्यांची सत्ता कमी करून आपल्या जातभांईची सत्ता व वैभव वाढविण्यात नानासाहेबानें शक्य ते प्रयत्न केले. शाहूच्या मृत्यूनंतर छत्रपतीच्या गादीवर तलख स्वभावाचा राजा कधींही बसणार नाहीं, अशी अंतस्थ व्यवस्था व त्याला अनुलक्षून चालविलेली नानासाहेबाची कारस्थानें पाहिली कीं डांवपेंचाचे निरनिराळे फांसे टाकून छत्रपतींच्या साम्राज्यशक्तीला संपूर्ण हस्तगत करण्यांत त्यानें शकुनीमामाच्याहि वर ताण केली यांत संशय नाही. तथापि चटकन् तोंडांत टाकलेली साम्राज्यसत्तेची गोळी पटकन् पचविणें लहानसहान काम नव्हतें! या बाबतींत नानासाहेबाला अत्यंत परिश्रम करावे लागले. अर्थातच त्याला माहाराजांच्या किंवा त्यांच्या जातीच्या धार्मिक आचारांत लक्ष घालण्यास सवड नव्हती. का. प्रभूंकर ग्रामण्याच्या उभारणीस फूस; आपल्या जातीचें श्रेष्ठत्व ठरविण्यासाठीं देशस्थ व चित्पावन यात रोटी बेटी व्यवहार सुरू व्हावा म्हणून त्याने स्वतःच देशस्थादि ब्राह्मणांच्या मुलीशीं केलेलीं लग्नें, पाताणे प्रभूंवरील ग्रामण्य, व नानासाहेबाचें इतर जातींबरोबर झालेलें वर्तन ही लक्षांत घेतां,

नानासाहेबानें सातारकर महाराजांच्या धार्मिक हक्कांकडे आपली वक्रदृष्टी फिरविण्यास दुर्लक्ष केले असेल असें म्हणतां येत नाहीं. परंतु घशात उतरलेलें राज्य त्याला पचनी पाडावयाचें होतें म्हणून आणि इतर अनेक राजकारणी व्यत्ययांमुळें तिकडे लक्ष देतां आलें नाही. लवकरच छत्रपतींच्या नशिवीं पेशव्यांचा कैदखाना लागला आणि ते पानपतला फुटलेल्या ' तीन लाख बांगडी ' ची हैवत खाऊन छाती फुटून नानासाहेब मरण पावल्यामुळें सर्वच गोष्टींना निराळें वळण लागण्याची वेळ जवळ आली. थोरला माधवराव अल्पायू होऊन अकाली न मरता, तर महाराष्ट्राच्या इतिहासाला काहीं निराळें स्वरूप येण्याचा बराच संभव होता. त्यानें चित्पावन व इतर शिरजोर झालेल्या ब्राह्मण सरदारांस दाबांत ठेवून क्षत्रिय मराठे मंडळाची प्रीति संपादन करण्याचा यत्न केला; परंतु आजानें आणि बापानें करून ठेवलेल्या पातकांचा साठा धुतां धुतांच बिचाऱ्याच्या कंठीं प्राण आले. इतकें झालें तरी सातारच्या महाराजांचा कैदखाना कांही सुटला नाहीं. धन्याच्या संपत्तीचा अपहार केल्यामुळें व साध्वी ताराबाईच्या शापानेंच जणूं काय निर्वंश होण्याच्या पंथाला लागलेल्या पेशव्यांच्या घराण्याला कीड* लागली. म्हणून या शहाण्या पेशव्यानें महाराजांना आणखी ५ लाखांचा मुलूख तैनातीला दिला ! नारायणराव पेशव्यानें तर सातारच्या महाराजांजवळून धमकीनें पेशवाईचीं वस्त्रें घेतलीं आणि ताराबाईच्या शापांत ' माजोऱ्या निसंतान होऊन मरशील ' हा छत्रचामरधारी राजपुरुषाचा शाप भरीस घातला. ही शापवणी लवकरच खरी झाली व नारायणराव मारला गेला. त्यानंतर ' प्रतिसृष्टी उत्पन्न करणार ' म्हणून चित्पावनांनी ज्याला अगदीं ब्रह्मदेवाच्या तोंडीला बसविलें आहे, त्या नाना फडणीसाची कृपादृष्टी सातारच्या महाराजांवर फिरली. नानानें सातारच्या महाराजांवर बाबुराव कृष्णाजीला जेलर नेमला

*पेशवाईच्या बाहेरून विस्तीर्ण दिसणाऱ्या वृक्षाची स्थिती आंतून भोंवर लागलेल्या माडाप्रमाणे झाली होती, हें माधवराव पेशव्यांच्या देखील लक्षांत येऊन चुकलें होतें " अंतकाळाच्या समयीं पश्चाताप होऊन त्यांनी विद्वान शास्त्री व पंडित यांस विचारिलें की पेशव्यांचे राज्यात धर्मोत्कर्ष होत आहे; दौलतींतील सर्व लोक सुखी आहेत, प्रजापालन चांगले होत आहे, असें असतां पेशव्याचें वंशास क्षय लागला व पानपतीं फौज गार होऊन दौलत बुडाली याचें कारण काय ? तेव्हां काशीकर शास्त्री यांनीं स्पष्ट उत्तर केलें कीं, स्वामीद्रोहापेक्षां थोर पातक नाहीं. धन्यास् प्रधान प्रतिबंधांत ठेवून राज्याच्या उपभोग करूं इच्छितात याच कारणानें वंशक्षय व अपकीर्ति होत चालली आहे (पृ. ६३ उत्तरार्ध, भाग १, कोल्हापूर राज्याचा इतिहास रा. रा. बाळाजी प्रभाकर मोडक यांनी केलेला.)"तेव्हां शास्त्रांमध्ये व पंडितांमध्ये अर्थात् विद्वान ब्राह्मणामध्ये पेशव्यांची कृति अनन्वित समजणारे पूर्वीही पुष्कळ होते, हें आम्हां ब्राह्मणांस एक मोठे भूषणच आहे. हें विद्वानांचें म्हणणें ऐकून " माधवरावांनी आपले कनिष्ठ बंधू नारायणराव यांस बोलावून सांगितलें कीं, सातारकर महाराजांकडे पाच लक्षांचा नवीन तालुका साताऱ्याजवळ नेमून देऊन त्यांस सुप्रसन्न ठेवावें. येणे करून संतोष न झाल्यास आणखी दोन लक्षांचा प्रांत जास्ती देऊन मर्जी सुप्रसन्न करून घ्यावी." स्वामी द्रोहाच्या पापाची निष्कृती करण्याची जी ही तोड माधवरावांनी काढली, तीवरून माधवरावास मनाचे थोर म्हणता येईल काय ? जी सर्व सत्ता सातरकरांची पेशव्यांनी बळकाविली तिचा मोबदला काय पांच लक्षांचा–किंवा फार झाल्यास सात लक्षांचा मुलुख ? उदार व निष्कपट धन्याची सर्व दौलत सवड सापडताच चाकराने बळकावून, धन्यास पहिल्यानें जेम तेम जाडया भरडया भाकरीची सोई करून ठेवावी व पुढे पाप नडूं लागेल तेव्हां पूर्वीच्या धन्यास दोन शेर दाणे मिळत होते ते तीन शेर किंवा हवे असल्यास चार शेर दाणे देण्यास हुकूम करावा; व इतकें उदारपणाचें काम केल्यानें पापाची निष्कृति होऊन पूर्वीच्या धन्याची मर्जी आपणावर सुप्रसन्न राहील, अशी जो चाकर आशा बाळगतो, त्यास आपण काय बरें म्हणू ? सारांश, स्वामिद्रोहाचा व आत्यंतिक स्वार्थपरतेचा, असे जे दोन आरोप आम्हीं आमच्या पेशवेमंडळींवर आणिले आहेत. ते काहीं स्वकपोलकल्पित किंवा आजचे नव्हते. दरोबस्त कृती लक्षांत घेऊन हे आरोप पूर्वीही पेशवे मंडळींवर आमच्याच पूर्वजांनी आणिले होते. इतकें म्हणणें येथें पुरे आहे.

कै. भागवतकृतं म. स. चा. उ. पृ. ५६-५७

होता. नानाच्या सूचनांप्रमाणें जुलूम जबरदस्तीनें त्यानें महाराजांच्या घराण्यांतील पूर्वापार वेदोक्तकर्मे बंद करून पुराणोक्त चालूं केली. राजकीय हक्कांची आधींच वाट लागली होती; आतां धार्मिक हक्कही संपुष्टांत आणले! यासंबंधांत नानाफडणीसाचें आपल्या जेलरला गेलेले पत्र (चां. का, प्र. ग्रा० पृ० ७३) वर दिलेलेंच आहे. सवाई माधवरावाच्या कारकीर्दीतले [ मि. फाल्गुन शु० ७ शके १६९९ ता. ६ मार्च १७७८ चें] एक पत्र उपलब्ध झालें आहे. तें पाहीलें म्हणजे नानाला अर्धाशहाणासुद्धां मानण्याची पंचाइतच पडते. पत्र जरी सवाई माधवरावांचें आहे तरी तें नानानेंच ' डिक्टेट् ' केलें असलें पाहिजेः--

अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री बाबूराव कृष्ण गोसावी यांसी--

सेवक माधवराव नारायेण प्रधान नमस्कार सु॥ समान सबैन मया व आलफ राजश्रीस राज्याभिषक आगोधर होऊन उपरांत मुंजी होती किंवा अगोधर मुंजी होऊन राज्याभिषेक होतो याची पुर्वील पधत कसी आहे व राज्याभिषकास व मुंजीस साहीत्य कापड अदीकरून काय लागते याचा तपशिलवार लिहून लौकर पाठविणें, येविसी राजश्री कृष्णराव आनंत यासही पत्र लिहिले आहे. तरी तुम्ही ते मिलोन सदरहू लिहिल्याप्रो करणें. जाणिजे.

हरहर! ज्या नानानें सारी पेशवाई अवलपासून अखेरपर्यंत पाहिली त्याला मराठे छत्रपतीची मुंज आधीं लागते कीं राज्याभिषेक होतो हें सुद्धां माहीत नसावें काय? पुढें, नानानें सवाई माधवरावाचा अप्रत्यक्ष रीतीनें खून केल्यानंतर रावबाजी पेशवे झाले. या पेशव्यानें जरी का प्रभूंच्या धार्मिक हक्कांच्या मान्यतेबद्दल व रक्षणाबद्दल फर्मान दिलें तरी सातारच्या महाराजांविषयीं मात्र त्यानें अत्यंत नीच वर्तन केलें.

१. सातारेयाचे राजे यांस राज्याभिषेक करावयाच्या पूर्वी मुंज करून मग राज्याभिषेक व्हावा अशी शिवाजी महाराजांची पासून चाल होती ती श्रीमंतानीं यावेळेस मना करून मुंज्य केल्याशिवाय राज्याभिषेक केला..

(शके १७३० सन १८०८-०९. पेशवाईची अखेर : पृ. १४४. इ. आणि ऐ.)

नानाफडणीसानें वेदोक्ताऐवजीं पुराणोक्त मंत्रांनीं तरी मुंजी राहूं दिल्या पण रावबाजीनें तर मुंजीच बंद केल्या! आणि हे पेशवे बहादूर महाराजांचे सनदशीर नोकर! सातारचे महाराज जर त्यांच्या मतें शूद्र होते तर त्या शूद्राचे नोकर ह्मणून पेशवाईच्या सनदा घेण्यास या वेदोनारायण ब्राह्मणवीरांना लाज कशी वाटली नाहीं हें कळत नाहीं. आणि शूद्र धन्याची नोकरी करणाऱ्या ब्राह्मणाचें ब्राह्मण्य तरी कोणत्या स्मृतीनें वा श्रुतीनें मान्य केलेलें आहे याचा खुलासा एखादा आधुनिक इतिहासपडिंत करील काय? असो. रावबाजींची कारकीर्द लवकरच समाप्त होऊन इंग्रेज बहादुरांनीं जिकडे तिकडे स्थिरस्थावर केलें आंणि शाहूच्या मृत्यूपासून म्हणजे सन १७४९ ते १८१८ पर्यंत सुमारें ६९ वर्षे हाल अपेष्टा भोगीत पडलेल्या सातारच्या राजघराण्याला पुन्हा एकदां चांगले दिवस आले.

सातारकर छत्रपति आणि त्यांचे जात भाई क्षत्रिय मराठे यांचा तेजोभंग करण्याकरितां पेशव्यांनीं कसाकसा उपक्रम केला, याची रूपरेषा वरील विवेचनावरून वाचकांच्या ध्यानांत येईल अशी आशा आहे. वरील त्रोटक विवेचनांचा यथास्थित विकास करण्याचें हें स्थल नव्हे; तरीपण कोणी ग्रंथकार हें कार्य हातीं घेईल, तर महाराष्ट्राच्या इतिहासांतील कित्येक

गुंतागुंतीचीं प्रमेयें सोडविण्याचें श्रेय त्याला खास मिळेल. असो. शत्रूचा नाश करण्याच्या ज्या दोन रूढ पद्धति आम्ही वर दिल्या, त्यापैकीं पहिली म्हणजे शरीरनाश ही तर पेशव्यांना शक्यच नव्हती, म्हणून त्यांनीं दुसरीचा म्हणजे नीचत्वांत समावेश हिचा अंगीकार केला आणि ई. इं कंपनीनें पेशवाईला रावबाजीच्या हांतून भडाग्नी देववून सातारच्या महाराजांना आपल्या खांकेत मारीपर्यंत, क्षत्रिय मराठे सर्वतोपरी हीनावस्थेला पोहोचले होते. यावरून चित्पावनांची परशुरामी तपश्चर्या-थोड्या- प्रमाणांतच कां होईना !–फलद्रुप झाली, यांत संशय नाहीं.

यानंतर श्रीमच्छत्रपति प्रतापसिंह महाराज यांची कारकिर्द सुरूं झाली. कंपनी सरकारनें त्यांना प्रथम राज्यकारभाराची कुलमुखत्यारी न देतां सर्व कारभार कौंसिल ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन या मंडळाच्या मार्फत चालविला. खाजगीकडील सर्व व्यवस्था व कारभार मात्र महाराजांच्या हातीं ठेवला होता. याप्रमाणें किंचित् स्वस्थता व स्वातंत्र्य मिळतांच क्षत्रिय मिळतांच मराठ्यांच्या धार्मिक हक्कांबद्दल महाराजांना कळकळ वाटून, त्यांचें पुनरुज्जीवन करण्याचा त्यांनीं निश्चय केला. खरोखर, प्रतापसिंह महाराजांनी हा पुनरुज्जीवनाचा प्रश्न जर त्यावेळीं हाती घेतला नसता तर क्षत्रिय मराठ्यांच्या धर्मकर्माबद्दलच्या इतिहासाचे धागे सध्यांच्या विपर्यासी संशोधन-बंडाच्या धुमधुमींत संकलीत करण्याचें काम फार कठीण होंतें, यांत मुळींच संशय नाहीं. त्यांनी चतुरसिंग भोंसले व बापु कान्होबा फडणीस यांना सातारच्या रेसिडेंटाचें पत्र देऊन सन १८१९ त उदेपुरास पाठविलें. या दोघांनीं उदेपूर, जयपूर, जोधपूर वगैरे ठिकाणच्या राणाजींची भेट घेऊन खुलासा विचारला आणि '' सातारीयाचे माहाराज सिसोदे हे आपले घराण्यांतील असे ते समजूनच आहेत '' असें छत्रपतीस कळविलें. पुढे शके १७४४ (सन १८२२) सालीं उदेपूरचा सुप्रसिद्ध भाट दीपविजय सातान्यास आला. महाराजांच्या विनंतीवरून त्यानें सर्व वंशावळीची माहिंती देऊन, साताराच्या राजघराण्याचा मेवाडच्या शिसोदे राजवंशाशीं निकट संबंध पुनश्च सिद्ध करून दाखविला. राजपुतान्यांत जेवढी म्हणून क्षत्रिय राजघराणीं आहेत, त्यांत मेवाडचें राजघराणें पहिल्या प्रतीचें अझूनहि मानण्यांत येतें. एक तर हें उदेपूरचें सिंहासन अयोध्याधीश श्रीरामचंद्रांचे ज्येष्ठ युवराज लवराज यांच्या वंशजानें राजपुतान्यांत मिळविलेलें आहे. शिवाय मुसलमानी अंमदानींत बादशहांची मर्जी संपादन करण्यांतच जीवितसाफल्य समजणाऱ्या कित्येक जोधपूर, जयपूर वगैरे रजपूत क्षत्रियांनी आपल्या मुली मुसलमान बादशहाला राण्या करून दिल्या, तरी सुद्धां ज्या मानी उदेपुराधिपतीनें बादशहाच्या रोषाची पर्वा न करितां आपलें राजकूळ निष्कलंक राखिलें, त्यानें शिवाजी महाराजांचें कुळ खरोखरच शिसोदेवंशाची अस्सल शाखा आहे अशी खात्री पटल्याशिवाय त्यांची वंशावळ आपल्या वंशावळींत सामील करूं दिली असेल काय ?

यानंतर सन १८२५ सालीं सांगलीचे चिंतामणराव आप्पा पटवर्धन यांच्या अंगांत नारायणराव पेशव्यांचा संचार होऊन त्यांनी चां. का. प्रभूंवर ग्रामण्याची तरवार उपसली. त्यावेळीं त्यांनीं कायस्थ प्रभूंच्या विरूद्ध, जगद्गुरू श्रीशंकराचार्यांना दमदाटी दाखवून जी यादी लिहवून घेतली त्यांत '' कलींत क्षत्रिय नाहींत '' इत्यादि खोटा मजकूर घुसडून दिला.

परंतु क्षत्रिय मराठे यावेळीं तरी निजलेले नव्हते. त्यांनी तावडतोब सातारच्या राजमंडळाकडे खालील अर्ज रवाना केला :—

यादी १.

यादी सरकार श्रीमन्महाराज राजश्री सातारा राजमंडळ हुजूर सातारा सु ॥ तीसा आशरीन मयातैन आलफ क्षत्रिय मराठा मंडळी याणी आम्ही क्षत्रिय व महाराज क्षत्रियकुलावतंस आसले तरी बंदोबस्त करावा नाही तरी हे आसे लिहितात ते लिहिणे चांगले नाहीं कलमें बी तपशील.

(१) ब्राह्मणाचा व चांद्रसेनीय कायस्थ प्रभु यांचा खटला दोन तीन वर्षे पडला आहे. उभयतानी परस्परे लिहिणे असले ते लिहावे परंतु पुण्याहून ब्राह्मणानी पत्रे पाठविली त्यांत क्षत्रिय नाहीत असे भाव तेव्हांच येविसी बोलावे तरी सामीलता दिसेल सबब न बोललो या पत्रांत चांद्रसेनीय व आपला मजकूर ल्याहावा ते मोघम क्षत्रिय नाहीत आसे लिहीले ती पत्रे सारी माघारी आणऊन त्यांतील ही अक्षरे काढून टाकावी.

(२) हाली चिंतामणराव पटवर्धन याणी शंकराचार्य करवीरकर याचे समते यादी करून यादी व पत्रें केली त्याचे मनांत येकंदर क्षत्रियच नाहीत असें समजानी केले नाहीसे वाटते सबब मोघम क्षत्रिय नाहीत हे लिहीले परंतु सर्व समजदार असतात आसे सर्व ठिकाणी देशोदेसी आहे आसे नाहीं व हालीचे यादींत कैलासवासी शिवाजीमहाराज व संभाजीमहाराज व शाहूमहाराज पत्रे व निर्णय ठरविला आसे जमेस धरून लिहितात त्यास सरकारी दप्तरी कोणतेही ज्ञातीविषयी निर्णय ठरून बार जाले हे नाही कोणतेही ज्ञातीत आपली कमी आहे. तरी सावरून नीट दाखविणे असी चाल आहे तेव्हा ज्याणी निर्णय केले ते आपली जात नाही आसे कसे लिहितील तेव्हा पत्रें खोटी असतील असे वाटते. यद्यपि असले तरी ज्ञातीप्रकर्णात सरकार पाहणे नाही तेव्हा ह्या पत्राचे समत लिहीणे गरज नाही दक्षण हिंदुस्थानांत चाल इकडील सहीची पत्र मानतात त्याअर्थी लिहू नये लिहिली गेली असतील तरी दुसरी पत्रें तितके जागी पाठवावी की हा मजकूर चांद्रसेनीय प्रभूचा व ब्राह्मणाचा आहे क्षत्रिय आहेत त्याचा नाहीं किंवा सारांष यादी येकंदर सारे आणवून कैलासवासी महाराजाचे निर्णय ठरले व पत्र बार केले हे व क्षत्रिय नाहीत हे काढून पाहिजे तरी रवाना करावी येविसी कसे ठरले ते ठरून उत्तर यावे हे कंपनीसरकाराकडे करणे आहे.

(३) सदरहुप्रमाणें न झाले तरी ज्ञातीवाले आपले ज्ञातीविसी मुखत्यार आहेत तेव्हां खटला नसता जो काढील त्यास पुसणे ज्ञातीविशयाने होईल सबब हे व्हावे हे चांगले आहे हा विचार कंपनीसरकारास कळवावा आसे नाहीं सबब लिहिले आहे व सरकारही ज्ञातीप्रकर्णात पाहत नाहीं त्यास चांद्रसेनीय प्रभुविसीही सरकारी कागदांत सड लिहिली आहे हे नसावे परस्परें आपले ज्ञातींत मुखत्यार आहेत सड राहिली असता सरकारी मदत ब्राह्मणाकडे आहे आसे दिसते व मुखत्यार म्हणण्यास दोष सरकारास येतो व आमचे ज्ञातीचा मार्ग पुसणे तो ब्राम्हणास पुसू किंवा आम्ही पाहू परंतु हे काही नसता लिहिणे गरज नाही सबब लिहिले आहे लिहिल्याप्रो ठरवून व्हावे....

येकूण कलमे चार ४ लिहिली आहेत पक्केपणे ठरवून पुन्हा न होय आसे व्हावे वगैरे तारीख २७ जुलई सन १८२८ इ॥.

प्रो. डोंगरे कृत सि. वि. परिशिष्ट ५ (पृ. १०२,१०३)

या पत्राचा विचार राजमंडळांने काय केला तें समजण्यासारखे कागद पत्र उपलब्ध नाहीत. इ. स. १८३० मध्यें प्रतापसिंह महाराजांस पूर्ण मुखत्यारी मिळाळी. याच सुमारास कायस्थ प्रभूंवरील ग्रामण्याचें स्वरुप अत्यंत उग्र झालेलें होतें. तेव्हां महाराजांनी क्षत्रिय मराठ्यांच्या वेदोक्ताचा प्रश्न हाती घेऊन ७/८ वर्षे अव्याहत परिश्रम करून आपलें व आपल्या आप्त स्वकीयांचे क्षत्रियत्व पुनश्च प्रस्थापित केलें. तें कसें केलें याची हकीकत विशेष लक्षांत ठेवण्यासारखी असल्यामुळें ती खालीं देतों.

'' कलींत क्षत्रिय मुळींच नाहींत, म्हणून ब्राह्मणांखेरीज इतरांस वेदोक्ताचा अधिकार नाहीं '' हा वादाचा मुख्य *प्रश्न उद्भवल्यामुळें क्षत्रिय मराठे व चां. का. प्रभू या दोघांना आपलें अनादिसिद्ध क्षत्रियत्व सिद्ध करण्याकरितां--पूर्वापार वहिवाटीप्रमाणेंच--एकत्र व्हावें लागलें. क्षत्रिय मराठे हे शौर्यात जसे श्रेष्ठ तसे चां. का. प्रभू हे शौर्यात आणि विशेषतः बुद्धिमत्तेंतहि श्रेष्ठ. याकरितां जेव्हां जेव्हां म्हणून क्षत्रिय मराठ्यांच्या धार्मिक हक्कांवर हल्ले होत गेले तेव्हां तेव्हां का. प्रभूंनींच ते सर्व आपल्या बुद्धिमत्तेच्या ढालीवर वरचेवर झेलून अक्कलहुशारींच्या समशेरीनें त्यांचा फडशा पाडलेला आहे. या वादांत क्षत्रियांच्या तर्फे लढण्याकरितां विठ्ठल सखाराम ऊर्फ आबासाहेब पारसनीस या विद्वान चां. का. प्रभू शास्त्र्याची निवडणूक महाराजांनीं केली, व विरुद्ध पक्षानें वे. शा. राघवाचार्य गजेंद्रगडकर या अत्यंत विद्वान् पंडितास आपल्या तर्फे वाद करण्याकरितां वकीलपत्र दिलें होतें. आबा पारसनीस हे जसे फारशींत निपूण होते तसेच संस्कृतांतहि पारंगत होते; इतकेंच नव्हे, तर त्यांचें दोन शास्त्रांचें अध्ययनहि झालेलें होतें. साताऱ्यांस हल्ली ज्या वाड्यांत शहरफौजदार कचेरी आहे त्या ठिकाणीं त्यावेळीं संस्कृत पाठशाळा होती. ही जागा वादाकरितां पसंत केली होती. ह्या पाठशाळेंत उभय पक्षांचा वाद कित्येक दिवस पूर्वपक्ष उत्तरपक्ष लेखी पद्धतीनें चालला होता. ज्या दिवशीं पंच निकाल देणार त्यादिवशीं पुण्यापासून बेळगांवपर्यंतच्या प्रांतांतील हजारों ब्राह्मण साताऱ्यास निकाल ऐकण्याकरितां पाठशाळेपुढें जमले होते. आपल्या विरूद्ध निकाल देणारांची साधल्यास डोकी फोडून सूड घेण्याची विद्या भिक्षुकवर्गास चांगली अवगत असल्यामुळें, निकालाच्या दिवशीं कदाचित् रक्तपाताचाहि प्रसंग येईल, म्हणून महाराज स्वतः नागव्या तरवारीनें पाठशाळेच्या पुढें बंदोबस्ताकरितां फिरत होते. सरतेशेवटीं पंचांनीं क्षत्रियांच्या तर्फे निकाल देऊन आबा पारसनीस यांच्या विद्वतेची मोठी वहावा केली. त्यावेळीं क्षत्रियांच्या अस्तित्वाबद्दल एकंदर २४ सिद्धांत पंचांनीं मान्य केले त्यापैकीं थोडे खालीं नमूद करतों :--

(१) श्रीपरशुरामानें एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय करण्याचा प्रयत्न केला, तरी केव्हांहि क्षत्रियांचा अभाव झाला नाहीं. (२) ज्या क्षत्रियांचा परशुरामानें वध केला नाहीं त्यांचे वैदिक कर्म त्यानें सोडविलें नाहीं. (३) नंदानंतर क्षत्रियांचे अस्तित्व होतें. (४) सुमित्रानंतर

* हा वाद उपस्थित करणार कोण? तर ज्यांच्या चित्पावन जातीला आपलें ब्राह्मणत्व अझूनहि धडपणें सिद्ध करतां आलें नाहीं, ते चिंतामणराव आप्पा पटवर्धन.

क्षत्रियांचें अस्तित्व होतें. (५) राज्यकर्ता जो राजा त्यास वैदिक मंत्रांनीं राज्याभिषेक होतो, सबब त्यानें तेवढें वैदिक कर्म करावें व इतर क्षत्रियांनीं करूं नये, असें नाहीं; तर कोणत्याही क्षत्रियास वैदिक कर्म विहित आहे. (६) सातारा, चंदी (तंजावर) नागपूर व करवीर येथील राजघराण्यांचें मूळ एकच असून यांचेकडे ऋग्वेदावरून कर्म चालतें. चंदीस अग्निसिद्ध असून, स्वतः राजे (शिवाजीमहाराज) ब्राह्मणांस अग्नौकरण देतात व शास्त्राध्ययन करितात. करवीरींहि वेदोक्त कर्म चालत आहे. (इ. स. १८३०). (७) नर्मदेपलीकडे क्षत्रियांकडें यजुर्वेदावरून कर्म चालतें. उदेपुरास अशीच वहिवाट आहे. सातान्यास यजुर्वेदी कर्म महाराजांनीं सुरूं करावें. (८) क्षत्रियांस मातुलकन्याविवाह वर्ज्य नाहीं. (९) क्षत्रियांत स्वज्ञातींत एकपात्री भोजन करण्याची चाल आहे, तरी वैदिक कर्मास बाध येत नाहीं.

**यावप्रमाणें मराठे क्षत्रिय व चां. का. प्रभु यांच्या क्षत्रियत्वाचा वाद उघडपणें जिंकून विजयी होतांच रा. आबा पारसनीस यांनीं त्याप्रसंगीं काढलेले सर्व सिद्धांत व त्यांचे आधार यावरून '' सिद्धांत विजय '' नामें एक उत्कृष्ट संस्कृत ग्रंथ तयार केला. हा ग्रंथ व आबा पारसनिसांचे दुसरे कांहीं ग्रंथ महाराजांनीं रेसिडेटांच्या पत्रासह उदेपुरास पाठविले. तेथील सर्व मोठमोठ्या व्युत्पन्न शास्त्र्यांनीं पारसनीसांच्या विद्वत्तेबद्दल व शास्त्रपारंगततेबद्दल वाहवा करून त्या सर्व ग्रंथांवर आपापल्या मान्यतेचे शिक्के मारले व सातारच्या महाराजांची वंशावळी उदेपूरच्या वंशावळींत दाखल करून तिची एक प्रत कंपनी सरकारच्या शिक्क्यानिशीं सातान्यास पाठविलीं. उदेपुरच्या पंडितांनीं राणाजींच्या आज्ञेवरून महाराजांस पत्र दिलें कीं,** आपल्याकडील शास्त्रार्थाचा राणाजीनी ब्राह्मणपंडितांकडून निर्णय करवून शिवानंदापाशीं दिला आहे. राणाजी व आपण पूर्वीपासून एकच वंशांतील असून व्यवहारांत कांहींएक भेद नाहीं यास्तव आम्ही आपलें शुभचिंतन करीत असतों. इकडे वैदिक कर्माधिकारी क्षत्रिय पुष्कळ असतांही दक्षिणी ब्राह्मण क्षत्रियांचा अभाव म्हणतात, ह्मावरून त्यांचे ठिकाणीं मत्सरबुद्धी वास करीत आहे असें म्हटलें पाहिजे. **या प्रमाणें उदेपुराहून पत्र येतांच महाराजांनीं सन १८३२ मध्यें सर्व मराठे क्षत्रियांस यादी पाठवून क्षत्रियांचे धार्मिक हक्क कोणते, व कसे हें खुलासेवार कळविलें. हें पत्र फारच मोठें व विस्तृत असून तें रावबहादुर प्रो. डोंगरे यांनीं छापिलेल्या '' सिद्धांतविजय '' ग्रंथाच्या परिशिष्टांत (पृ. १–१६) समग्र दिलेलें आहे.**

त्यानंतर महाराजांनीं आबा पारसनीसांचे सर्व ग्रंथ कर्नाटक प्रांतीं रवाना केले. तिकडील विद्वान् पंडितांनीं त्यांवर आपापल्या मान्यतेचें मोर्तब केलें व क्षत्रिय मराठ्यांच्या धार्मिक हक्कांबद्दल आणि ग्रंथकर्त्यांच्या विद्वत्तेबद्दल प्रशंसापूर्ण पत्रें महाराजांकडें रवाना केलीं.

### मान्यतेच्या याद्या आलेलीं ठिकाणें

(१) तंजावर संस्थान, (२) आनेगोंदी संस्थान, (३) कोच्ची संस्थान, आणि (४) म्हैसूर संस्थान.

## मान्यतेचीं पत्रें देणारे प्रमुख पंडीत

| नांव | ठिकाण |
|---|---|
| (१) पांडुरंगाचार्य भागवत | अंकलूज. |
| (२) कट्टि गोविंदाचार्य | कुरुंदवाड. |
| (३) नरसिंहाचार्य | आनेगोंदी. |
| (४) रघुपत्याचार्य | अरणी संस्थान. |
| (५) पांडुरंगाचार्य | चांद्रायणपट्टण. |
| (६) आणाशास्त्री राजपुरोहीत | म्हैसूर. |
| (७) व्यंकट रमणाचार्य | म्हैसूर. |
| (८) बाबाचार्य | तंजावर. |
| (९) श्रीनिवासाचार्य | म्हैसूर. |
| (१०) बल्लाळ नारायणाचार्य | तौळव देश. |
| (११) तमंणशास्त्री | चरकल संस्थान. |
| (१२) भीमाचार्य | आनेगोंदी. |
| (१३) दासाचार्य | म्हैसूर. |
| (१४) रामाचार्य | कोच्ची. |
| (१५) माधवाचार्य | कोच्ची. |
| (१६) माधवमताच्या तीर्थाच्या मठांचे श्रीमदाचार्यांचे शिष्यस्वामी | बेंकीपूर. (म्हैसूर संस्थान.) |
| (१७) श्रृंगेरी शंकराचार्य | शेडबाळ मुक्कामाहून. |
| (१८) उडपी संस्थानांतील आठ मठांचे स्वादीकर स्वामी | कोच्चीराज्य. |
| (१९) लक्ष्मीकांत स्वामी | विद्यानगर. |

याशिवाय क्षत्रिय मराठ्यांच्या वेदोक्त कर्माच्या प्राचीन परिपाठाबद्दल विजयानगर, तंजावर, म्हैसूर, आनेगोंदी व कोच्ची येथील शास्त्र्यांच्या रिवाजपट्ट्याहि आल्या.

याप्रमाणें सातारचे ग्रंथ सर्वत्र मान्य झाले, तरीसुद्धां ब्राह्मणांकडून वारंवार अडथळे उत्पन्न होत. तेव्हां सन १८३५ सालीं क्षत्रिय मराठे मंडळींच्या सभा होऊन सर्वांनुमतें ठरलें कीं दक्षिणीब्राह्मण वेदोक्तकर्मास अडथळे आणतात त्याअर्थी त्यांची गरज न ठेवतां

उत्तरहिंदुस्थानांतून ब्राह्मण आंणून कर्मे चालवावीं. त्याचप्रमाणें दक्षिणी व हिंदुस्थानी क्षत्रियांचा शरीरसंबंधहि सुरूं करावा. ह्याप्रमाणें वागण्यास पुष्कळ क्षत्रिय मराठे कबूल झाले व त्यांजकडून त्याप्रमाणें कबुलायतीही लिहून घेतल्या. परंतु या ठरावाची अंम्मलबजावणी झालेली दिसत नाहीं. क्षत्रिय मराठ्यांचें क्षत्रियत्व याप्रमाणें पुनः प्रस्थापित करूनच प्रतापसिंह महाराज स्वस्थ बसले नाहींत. त्यांनी स्वतः आपल्या धार्मिक हक्कांप्रमाणें वागण्यास सुरुवात केली. सन १८३६ सालीं त्यांनीं पंडितराव व राजोपाध्ये यांचा तंटा लागला असतां, मागील वहिवाटीची चौकशी करून उभयतांच्या कामाचे पंचामार्फत जाबते पाडून दिले. स्वतः महाराज व त्याचे बंधु शहाजी राजे हे उभयतां स्नानसंध्यादि कर्मे नित्य करीत असत.

राजघराण्यांतील गृह्यकृत्याची याप्रमाणें व्यवस्था लागल्यानंतर श्री छत्रपती शिवाजी-महाराजांप्रमाणें राज्याभिषेक यथाविधी करून घेण्याचा विचार प्रतापसिंह महाराजांनी केला. अभिषेक प्रयोगाची नवी पोथी तयार करवून हा समारंभ यथाशास्त्र व यथाविधी साजरा करण्यांत आला. राज्याभिषेकानंतर महाराजांनीं रा. आबा पारसनीस यांस सन १८३८ त त्यांच्या अप्रतीम कामगिरीबद्दल प्रशंसापर आज्ञापत्र दिलें.

यावेळीं प्रतापसिंह महाराजांच्या मेहनतीनें क्षत्रिय मराठ्यांचें क्षत्रियत्व प्रस्थापित झालें हें खरें, पण त्या योगानें सारा ब्राह्मण समाज महाराजांच्या विरूद्ध झाला. क्षत्रिय मराठ्यांना सर्वस्वीं चिरडून काढण्याचा ब्राह्मणांचा इतका हातातोंडाशी आलेला यत्न फुकट गेला. मग कां नाहीं त्यांची तडफडाट उडणार ? छत्रपतीला बुडवितां बुडवितां पेशव्यानांच राम म्हणावें लागले आणि कोल्हापूरकर भोसल्यांचा नायनाट करतांकरतांच परशुरामभाऊ पटवर्धनास परलोकचा रस्ता सुधारावा लागला. तरीहि निराश न होतां शेवटचें परशुरामास्त्र सोडण्याचा चिंतामणराव पटवर्धन व बाळाजीपंत नातू यांनीं उपक्रम केला आणि तो मात्र परंशुरामाच्या कृपेनें सणसणीत फळास आला. चिंतामणराव पटवर्धन व बाळाजीपंत नातु यांनीं अनेक उलटीसुलटीं कारस्थानें उभीं करून महाराजांवर कंपनी सरकाराविरूद्ध फितूर केल्याचा आरोप आणला; त्या भानगडींत प्रतापसिंह महाराज पदच्युत होऊन पुढें लवकरच सातारची गादीहि खालसा झाली. यावेळीं बाळाजीपंतानें आणि चिंतामणरावानें जे जे अत्याचार केले त्यांचा इतिहास वाचला तर आंगावर शहारे येतात, आणि स्वार्थाकरितां मनुष्य किती नीचपणाचीहि कृत्यें करण्यास भीत नाहीं, याच्या प्रत्यंतरानें मन क्षुब्ध होतें. बाळाजीपंत नातु यांचें नांव मराठ्यांच्या इतिहासात काळ्याकुट्ट बॉर्डरीमध्येंच लिहिल्याशिवाय गत्यंतर नाहीं. कारण पेशवाई बुडविण्याच्या कामीं अग्रेसर होऊन स्वराज्य बुडविण्याचें श्रेय त्यानें घेतलें व तेवढ्यानें या प्राण्याची तृप्ती न होऊन स्वतःच्या तीव्र द्वेषाला व ज्वलज्जहाल स्वार्थाला सातारच्या संस्थानाचाहि बळी घेतला! ' राष्ट्रीय ' चित्पावनांनीं या महापुरुषाच्या चरित्राचें जरूर अध्ययन करावें.

सातारचें राज्यच खलास झालें तेव्हां क्षत्रिय मराठ्यांच्या वेदोक्ताधिकाराचा प्रश्नहि निकालांत निघाला. परंतु कोल्हापूर येथें मात्र सर्व कर्मे वेदोक्त मंत्रांनींच चालूं होतीं. ही पद्धत कै. बाबासाहेब महाराज यांच्या कारकिर्दीपर्यंत अव्याहत चालूं होती. त्यांच्या कारकिर्दीत

(सन १८३७-६६) वे. शा. रघुनाथ शास्त्री पर्वते यांनी महाराजांस (बद) सल्ला दिला कीं वेदोक्त मंत्रांचा उपयोग इतर आचरणांशीं विरुद्ध असल्यानें श्रेयस्कर नाहीं. त्यावरून वाड्यांत वेदोक्त कर्मविधी बंद होऊन सर्व कर्मे पुराणोक्त मंत्रांनीं चालूं झालीं. तीं विद्यमान श्रीमन्महाराज शाहू छत्रपती यांच्या कारकिर्दीपर्यंत तशींच चालत होतीं. महाराज शाहूमहाराजांच्या मनांत आपलीं सर्व कर्मे आपल्या क्षत्रिय धर्माप्रमाणें वेदप्रणित मंत्रांनीं व्हावीं असें आलें, व त्याप्रमाणें त्यांनीं हुकूम फर्माविलें. परंतु राजोपाध्ये यांनीं त्या हुकुमाप्रमाणें वागण्याचें साफ नाकारतांच महाराजांनीं एक कमिटी नेमून तिला राजवाड्यांत पूर्वी कर्मे कोणत्या पद्धतीनें होत होतीं त्याबद्दल रिपोर्ट करावयास आज्ञा केली. या कमिटींत आपासाहेब राजोपाध्ये, रा. बा. कृष्णाजी नारायण पंडितराव सर न्यायाधीश, व रा. सा. वि. ब. गोखले हे गृहस्थ होतें. या कमिटीनें सुमारें २० इसमांच्या जबान्या घेतल्या व इतर रीतीनें तपास करून, वे. शा. पर्वतेबुवांच्या उपद्व्यापापूर्वी सर्व कर्मे वेदोक्त पद्धतीनेंच करण्यांत येत असत, असा रिपोर्ट हुजूर सादर केला. राजोपाध्ये यांनी आपला रिपोर्ट दिला नाहीं.

या कमिटीच्या अभिप्रायाप्रमाणें वागण्याचें राजोपाध्ये यांनीं नाकारतांच त्यांस कामावरून दूर करून त्यांना राजोपाध्येपणाबद्दल दिलेली जहागीर महाराजांनीं जप्त केली.

यावेळीं मराठे क्षत्रियांवर ब्राह्मणांनीं ग्रामण्यच उभें केलेलें होतें. महाराजांच्या वाड्यांत वेदोक्त कर्मे केल्यास समाज बहिष्कृत करतो व न केल्यास महाराजांकडून उत्पन्नाची जप्ती होते अशा पेचांत राजोपाध्ये व त्यांचे आश्रित होते. यावर सन १९०५ मध्यें करवीर मठाधिपति श्रीशंकराचार्य स्वामीनीं पुन्हा सर्व कागदपत्रें व मठांतील आधार पाहून आज्ञापत्र काढलें. त्यांतील कांहीं महत्त्वाचे उद्गार खालीं दिले आहेत :—

(१) श्रीछत्रपति शिवाजी महाराज हे क्षत्रिय वंशांतील असल्याबद्दल वंशवृक्षावरून पूर्णपणें सिद्ध होत आहे व त्यास वेदशास्त्रसंपन्न गागाभट्ट पंडित यांणीं क्षत्रिय कुलोचित वेदमार्गानें राज्याभिषेक केल्यासंबंधाचीं माहिती इतिहासप्रसिद्धच आहे. शिवाय राज्याभिषेक झाले वेळचें वर्णन केल्याची यादी पाहिली त्यावरून क्षत्रिय कुलास योग्य असा वेदमार्गविहित राज्याभिषेक केल्याचें पूर्णपणें सिद्ध होत आहे. यावरून श्रीशिवछत्रपति महाराज यांचें घराणें क्षत्रिय असून, वेदोक्तकर्माचा त्यास पूर्ण अधिकार आहे यांत शंका नाहीं. हा अधिकार शिवाजी महाराज यांचे वंशासही असल्याची माहिती मिळते. (२) श्रीमन्महाराज छत्रपति कोल्हापूर यांचें घराणें * क्षत्रिय असोन, त्यांचे घराण्यांत वेदोक्त कर्म करण्यांस कांहीं हरकत नाहीं असें इकडून ठरविण्यांत येत आहे.

श्रीमत्शंकराचार्यांचा याप्रमाणें ठराव होतांच कोल्हापुरास बऱ्याच ब्राह्मणांची संशयनिवृत्ती होऊन त्यांनीं सभा भरविली आणि ठराव पास केला कीं :—

क्षेत्रस्थ ब्रह्मवृंदांकडून असा निर्णय करणेंत येत आहे कीं, श्रीजगद्गुरु मठ करवीर व संकेश्वर यांनी या प्रकरणाचा केलेला निर्णय क्षेत्रस्थांस पूर्ण संमत असून करवीर ब्रह्मवृंदाचीही

---

* तंजावरच्या कोर्टानें कोल्हापुरच्या महाराजांना शूद्र म्हटल्याबद्दल श्रीयुत महादेव राजाराम बोडस यांना जो ब्रह्मानंद झाला त्याच्याशी करवीरकर मठाधिपतीचे हे उद्गार ताडल्यास शहाणपणाचा वांटा रा. बोडसांना द्यावा कीं तंजावरच्या जज्जाला द्यावा हें एक मोठें कोडेंच पडतें.

याविषयीं अशी आज्ञा आहे कीं :—श्रीशाहू छत्रपति महाराज सरकार करवीर हे क्षत्रिय आहेत. या राजघराण्यांतील नित्य नैमित्तिक गृहकृत्यें व हव्यकव्यादि धर्मकृत्यें मन्वादिस्मृतिप्रतिपादित पूर्वापार वहिवाटीस अनुसरून क्षत्रियोचित वेदोक्त पद्धतीनें होत जावींत. याविषयीं कोणीहीं संदेह घेणेंचा नाहीं. मि।। मार्गशीर्ष कृ. ९ शके १८२७ विश्वावसुनाम संवत्सरे.

याच सुमारास श्री काशी क्षेत्राचे प्रसिद्ध पंडित श्री कृष्णानंदसरस्वती स्वामी कोल्हापुरास आले. त्यानींहि करवीरकर शंकराचार्यांचा ठराव बरोबर आहे अशा मान्यतेचें पत्र लिहून दिलें. याप्रमाणें हकिकत होऊन कोल्हापुरच्या मराठे क्षत्रियांवरील ग्रामण्य निकालांत आलें.

सत्यप्रतिपादनाच्या बाबतींत सगळेंच चित्पावन कांही मत्सरग्रस्त नसतात. आजलाहि चित्पावन समाजांत शुद्ध सत्याचा अभिमान धरून आपल्या मत्सरग्रस्त जातभाईचे कान उपटणारे 'लोकहितवादि' मुळींच नाहींत असें नाहीं. सुप्रसिद्ध निस्पृह आणि **भारदस्त विविधज्ञानविस्तार मासिकांत** (एप्रिल १९१९) ग्वालेरचे स्पष्टवक्ते रा. रा. माधवरावजी लेलेसाहेब यांनीं 'नंदान्तं क्षत्रियकुलं' बद्दल विवेचन करतांना जे उद्‌गार काढले आहेत, ते येथेंच समाविष्ट करण्यासारखे आहेत. " शिवाजी महाराजांची शास्त्रोक्त विधीनें मुंज वगैरे करवून त्यांना 'क्षत्रियकुलावतंस' असें म्हणून, त्यांचें क्षत्रियत्व सिद्ध करून घेऊन, नंतर त्यांचा यथाशास्त्र राज्याभिषेक करविला गेला. त्यावेळीं किंवा त्यानंतरही या गोष्टीबद्दल आक्षेप घेऊन गागाभट्टाला किंवा तत्पक्षीय दाक्षिणात्य ब्राह्मणांना बहिष्कृत करण्याचा उपक्रमही कोणीं केल्याचें दिसत नाहीं. अशा स्थितींत कायस्थ प्रभूंच्याच क्षत्रियत्वासंबंधानें हा आक्षेप पुढे आणणें, आणि त्याला चित्पावनासारख्या–संशयित व वादग्रस्त उत्पत्ति असलेल्या, आणि त्यामुळेंच यांची राजकीय उन्नति होईपर्यंत इतर ब्राह्मणवर्गांनीं कमी दर्जाच्या मानलेल्या–पोटब्राह्मण जातींनें महत्त्व देणें, बरेच चमत्कारिक दिसतें. कोणच्याही पीठांचे शंकराचार्य चित्पावन जातीचे कधींही झालेले नाहींत. पेशव्यांच्या वेळींसुद्धां त्यांच्याशी रोटीबेटीव्यवहार करण्यांत देशस्थ ब्राह्मणमंडळी अनमान करीत असे. शिवाय प्रत्यक्ष बाजीराव पेशव्यांना नाशिकांतील परंपरांगत ब्राह्मणघाटावर गोदास्नानास जाण्यांला आक्षेप घेण्यांत आला होता. **या गोष्टींचें योग्य निराकरण होईपर्यंत निदान चित्पावन ब्राह्मणांनीं तरी या बाबतींत पुढाकार घेऊन दुसऱ्यांना नांवे ठेवणें योग्य नाहीं.** "

**क्षत्रिय मराठ्यांवरील ठळकठळक ग्रामण्यांचा इतिहास येथपर्यंत दिला. याशिवाय ठिकठिकाणीं जेथें जेथें त्यांची वस्ती आहे तेथें तेथें त्यांना धार्मिक बाबतींत अडथळे आणून त्रास देण्याचें राष्ट्रीय कर्म ब्राह्मण म्हणविणारे हल्लीहि प्रामाणिकपणानें बजावीत असतातच. याचे अगदीं ताजें उदाहरण म्हटलें म्हणजे क्षत्रिय मराठ्यांच्या उमरावती येथील श्रावणीचें होय. उमरावती येथें गुदस्त सालीं (सन १९१८) तेथील 'सुबोधमाला' नामक मासिक पुस्तकाच्या कचेरींत क्षत्रिय मराठ्यांनीं श्रावणीचा विधि सुरूं केला. ही बातमी स्वतःस ब्राह्मण समजणाऱ्या कित्येक प्राण्यांस समजताच ते जूट करून श्रावणीच्या ठिकाणाला वेढा घालण्याकरितां धांवून आले आणि हत्यारांच्या कायद्यामुळें त्यांना तलवार बंदुकीची चढाई करतां येणें शक्य नसल्यामुळें, मनोभावे श्रावणी करण्यांत तल्लीन झालेल्या श्रीशिवाजी**

महाराजांच्या जातभाईवर या महाब्राह्मणांनीं धोंड्यांचा वर्षाव करण्याची सुरुवात केली. कित्येक समंजस मराठ्यांनीं या महाब्राह्मणांच्या भडकलेल्या मेंदूला चार समजुतीच्या मात्रेचे वळसे देऊन ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न केला; परंतु पेशवाई नोकरशाहीच्या या अभिमानी प्रवर्तकांचा क्रोध कांही केल्या आंवरेना ! अखेरीस मराठ्यांनीं आपल्या अस्तन्या वर सारतांच ही ब्राह्मणसेना पळून गेली आणि क्षत्रिय मराठ्यांच्या वेदोक्त श्रावणीचा समारंभ यथासांग पार पडला. सुबोध मालेचे संपादक रा. के. बी. देशमुख यांनी "आमची श्रावणी हिन्दुधर्मशास्त्राच्या विरूद्ध आहे असें धर्मग्रंथांच्या आधारें निर्विवाद कोणीहि ठरवून द्यावें; आम्ही त्यांच्या सशास्त्र निर्णयाचा साभार स्वीकार करूं." असें आव्हाहन केलें. परंतु नेहमींच उलट्या पावलांनीं चालण्याचीं खोड आंगीमांसीं खिळलेले ब्राह्मण सरळ प्रश्नांना सरळ उत्तर थोडेच देणार ! वेशासंपन्न पुरूषोत्तम, शौचे, पोंक्षे वगैरे शिखंडी लेखकांनीं '**कर्तव्य**' नांवाच्या एका स्थानिक पत्रांतून क्षत्रिय मराठ्यांना शिव्यांची आणि अपशब्दांची लाखोली वाहण्यास सुरुवात केली. त्या लाखोलींत शूद्र, श्वान, डोंमकावळे, अशुद्ध बीजाचे वगैरे शेलकी ब्राह्मणी बिल्वपत्रें चमकत होतीं. पुढें हें प्रकरण कोर्टापर्यंत गेलें होतें. परंतु प्रतिपक्षानें माफी मागितल्यावरुन तें निकालांत निघालें. **सुबोधमाला मासिक** नसतें तर हा खोडसाळपणा ठिकच्या ठिकाणींच जिरला असता आणि या स्थानिक जुलमाचा इतिहास बहुजनसमाजाच्या नजरेस न पडतां स्थानिक स्मशानांतच त्यास मूठमाती मिळाली असती. यावरून नियतकालिक वृत्तपत्रांची आवश्यकता किती असते हें वाचकांस **नीट पटेल**. असे छोटेखानी दंगेधोपे ठिकठिकाणीं किती तरी होत असतील !!! असो.

क्षत्रिय मराठ्यांच्या ग्रामण्यांत एक विशेष गोष्ट वाचकांच्या नजरेस आणण्याची आम्ही अत्यंत नम्रतेनें परवानगी घेतों. आद्य छत्रपति श्रीशिवाजी महाराज यांच्या अंमदानींत क्षत्रिय मराठ्यांच्या धार्मिक हक्कांचे पुनरुज्जीवन करण्याच्या कामीं बाळाजी आवजी चिटणीस या चां. का. प्रभूचे भगिरथ यत्न खर्ची पडलें आणि प्रतापसिंह महाराजांच्या वेळीं तोच प्रश्न पुनश्च हडसून खडसून कायमचा करण्यात आबा पारसनीस या शास्त्रपटु चां. का. प्रभूची विद्वत्ता छत्रपतींच्या चरणसेवेंत खर्ची पडली. अलीकडच्या कोल्हापूर प्रकरणांतहि चां का. प्रभू मंडळीनींच छत्रपतींची सेवा एकनिष्ठपणानें बजावलेली आहे. राजकीय बाबतींतसुद्धां ही गोष्ट अशीच दिसून येते. श्रीशिवाजी महाराजांनीं ज्या दादजी नरसप्रभू देशपांड्यांजवळ स्वराज्यस्थापनेची आणभाक केली, त्याच्याच खास पांचव्या वंशजानें–रंगो बापूजी प्रभूनें–शेवटच्या प्रतापसिंह छत्रपतीच्या स्वराज्याकरितां खुद्द विलायतेंत जाऊन पार्लमेंटाशीं छातिठोक झगडा द्यावा, हा आश्चर्योत्पादक योगायोग फार विचार करण्यासारखा आहे. अशा रीतीनें क्षत्रिय मराठे आणि चांद्रसेनीय कायस्थ प्रभू यांची ही जोडी गेल्या अडीचशें वर्षें हातांत हात घालून वागत आली आहे. हें ऐक्य असेंच चिरकाल टिको आणि उभयतांच्या निर्विकार व निःसीम 'बिरादरकी'चें पर्यवसान या भरतखंडाच्या विपुल सौभाग्यप्राप्तींत होवो, अशी सद्गतित अंतःकरणानें त्या जगच्चालक परमेश्वराची अनन्यभावानें प्रार्थना करून हें प्रकरण पुरें करतों.

**श्री शिवाजी महाराजकी जय !**

# ग्रामण्यांचा साद्यंत इतिहास.
## [पंचाल (दैवज्ञ) ब्राह्मण.]

दैवज्ञ ब्राह्मण ही जात सांप्रत लोकव्यवहारांत ' सोनार ' या सर्वसामान्य संज्ञेनें ओळखिली जाते. या वर्गांतील बहुतेक लोक सोनें चांदी व जडजवाहीर यांचा धंदा करीत असते, परंतु वास्तवीक यांचा समावेश **पंचाल** ब्राह्मण या मुख्य ब्राह्मणवर्गांतच होतो. धंद्यामुळें जरी यांना सोनार म्हणतात, तरी सुवर्णकाराचें काम करणारे सर्वच सोनार कांहीं दैवज्ञ ब्राह्मण नसतात. मात्र पंचाल ब्राह्मण म्हणून यांच्यांतील जो मुख्य ब्राह्मणवर्ग घांटावर आहे, त्यांचें अंतर्बाह्य वर्तन शुद्ध ब्राह्मणांप्रमाणेंच असतें. त्यांतीलहि बरेच लोक अझून आपला प्राचीन पूर्वपरंपरेचा सुवर्णकाराचा धंदा करीत असून, ब्राह्मणकर्मामध्येंसुद्धां ते फा़र निष्णात असल्याचें आढळतें. कोंकण व मुंबई लत्त्याकडील दैवज्ञाची ही ब्राह्मणकर्माची परंपरा सांप्रत अवनत होत चालली आहे आणि याला कारण सांप्रतची परिस्थितीच होय. तथापि त्यांचीं नित्यनैमित्तिक धर्मकृत्यें त्यांचेच दैवज्ञ *ब्राह्मण चालवीत असतात.

शैवागम ग्रंथावरून पंचालांची उत्पति प्रत्यक्ष विश्वकर्म्यापासून झाल्याचें सिद्ध होत आहे. मनु, मय, त्वष्टा, दैवज्ञ, आणि शिल्पी हे विश्वकर्म्याचे पांच पुत्र होत. याच पांच पुत्रांच्या संततीस पंचाल म्हणतात. या पंचालांत विश्वकर्मा संततीय लोहार, सुतार, व कासार यांचाहि समावेश होतो. या विश्वकर्मा-कुलांत उत्पन्न झालेले ब्राह्मण शुद्ध असल्याबद्दल दैवज्ञ ब्राह्मण फार अभिमान बाळगितात.

सध्यांप्रमाणें पूर्वकालीं ब्राह्मण्य हें जातिविशिष्ट नव्हतें, गुणकर्मांवर अवलंबून होतें ; म्हणून पुष्कळ हीनोत्पत्तीय व्यक्ती व समाज ब्राह्मणपणाला पोहचले. मूळचे जे ब्राह्मण किंवा ज्यांनीं प्रथमतः ब्राह्मण्य मिळविलें त्यांच्यामागून इतरही लोक जेव्हां ब्राह्मण होऊं लागले तेव्हां अर्थातच त्या उभयपक्षांत स्पर्धा उत्पन्न झाली. या स्पर्धेची हकिकत **विश्वकर्मपुराण** अध्याय ३ मध्यें दिलेली आहे. ही जी स्पर्धा पौराणिक काळीं उत्पन्न झाली ती अद्यापपर्यंत चालूंच आहे. या स्पर्धेचा जो इतिहास तोच ग्रामण्यांचा इतिहास असें म्हणावयास हरकत नाहीं.

बौद्धधर्माचा उदय प्रसार व उत्कर्ष होऊन सनातन हिंदूधर्माचा बहुतेक लोप झाला असतां, पंचाल ब्राह्मणांनीं गंगेंत उभें राहून श्रीशंकराची आराधना केली. तेव्हां धर्माच्या रक्षणार्थ शंकराचा अवतार श्रीशंकराचार्य उत्पन्न होऊन त्यांनी बौद्ध धर्माचा पाडाव करून सनातन धर्म पुन्हा प्रस्थापित केला. यावेळीं पांचालांचें बरेंच वर्चस्व झाल्याचें दिसतें. श्रीमदाचार्यांनीं विश्वकर्मा जगद्गुरु आहे असें जाणून त्याच्या स्तुतीचें एक स्तोत्रही केलेलें आहे. परंतु पंचालांना यापुढें राजाश्रय मिळाला नाहीं व दिवसेंदिवस त्यांची अधोगतीच होत गेली. यानंतर यवनी अंमल होऊन एकंदर हिंदुधर्माची फार दुर्दशा उडाली. त्यांत इतरांप्रमाणेंच दैवज्ञहि निराश्रित व विपन्नावस्थेंत काळ कंठूं लागले.

---

* केवळ पोपटपंची मूढ भिक्षुकांच्या अज्ञानाबद्दल सर्वत्र तक्रार सुरूं झालेली आहे. धर्मकृत्यें यथासांग व्हावीत व तीं चांगल्या सुशिक्षित धर्मपारंगतांनींच करावी, अशा कल्पनेचा प्रादुर्भाव होत आहे. आज दैवज्ञांतहि धर्माभिमानी सुशिक्षित व पदवीधर विद्वान् बरेच निपजत आहेत. त्यांनीं ही ब्राह्मणवृत्तीची प्राचीन परंपरा पुनरुज्जीवित करण्याचें मनांत आणल्यास दैवज्ञांतहि पुनश्च मोठमोठे पंडित निर्माण होतील व जातीच्या लौकिकाची उज्वल परंपरा चिरंजीव होईल, अशी आशा आहे.

पेशव्यांचा अंमल महाराष्ट्रावर बसेपर्यंत पंचाल दैवज्ञांच्या ब्राह्मणवृत्तिबद्दल किंवा वेदोक्ताबद्दल कोणी आक्षेप घेतल्याचें आढळत नाहीं. आद्यछत्रपति शिवाजी महाराजापासून तों शाहू महाराजांच्या अंतापर्यंत ते आपल्या ज्ञातींतीलच वृत्ति चालवून आपापले व्यवसाय करीत सुखासमाधानें काळक्रमणा करीत होते. शाहूच्या मृत्यूनंतर चित्पावन नोकरशाहीला उच्चीचे ग्रह आले आणि त्यांनीं ग्रामण्याच्या बोल्शेविझमच्या घरटांत या जातीलाही भरडून काढण्यास कमी केलें नाहीं. वास्तवीक दैवज्ञ ब्राह्मण राजकीय क्षेत्रांत कधींच पडले नाहींत किंवा चित्पावन नोकरशाहीच्या राजकीय खटाऱ्याच्या कानखिळा काढण्याचाहि त्यांनीं कधिं उपद्याप केला नाहीं. ते आपला सुवर्णकाराचा आणि याज्ञिकी व्यवसाय करीत स्वस्थ बसले होते. परंतु ब्राह्मणपणाचा वज्रलेप बाप्तिस्मा पटकविण्यासाठीं धाधावलेल्या तत्कालीन चित्पावनांना या दैवज्ञांचें ब्राह्मण्यहि फुकाचें पहावलें नाही. सर्व जगांत ब्राह्मण काय ते आम्ही, बाकीचे सारे शूद्र, हें ठरविण्यासाठीं चित्पावन नोकरशाहीनें ग्रामण्यांच्या बुरख्याखाली जे जे अत्याचार केले, त्यांतील दैवज्ञांवर केलेले फारच राक्षसी व भयंकर होते. चां. का. प्रभू आणि क्षत्रिय मराठे हे दोन समाज जात्याच तरवारबहाद्दर आणि राजकारणी असल्यामुळें त्यांतल्या लोकांना पकडणें, हाणमार करणें, उपाशीतापाशी फरासखान्यांत कोंडून ठेवणे, घरांची जप्ती करणें, बायकामुलांची अब्रू घेणें वगैरे प्रकार करण्याची खुद्द नोकरशाहीचे दंडधारक पेशवे यांची छाती नव्हती, मग त्यांच्या नांवाखालीं वाटेल तो सांवळागोंधळ घालणाऱ्या भुत्यांची ती कथा काय ? पण बिचारे दैवज्ञ पडले गरीब आणि एकमार्गी ! आणि गरीबाचे काळ सगळेच असतात !! दैवज्ञांवर चित्पावनांनीं पेशवे नोकरशाहींत कायकाय अत्याचार केले त्यांचा इतिहास कोणत्याहि समंजस मनुष्याचें हृदय विदारण करण्याइतकाच तीव्र आहे. म्हणून तो होईल तितक्या सौम्य भाषेंत येथें ग्रथित करण्याचा यत्न केला आहे.

## ग्रामण्य पहिलें.

हें ग्रामण्य दुसरे पेशवे बाजीराव बल्लाळ पेशवे यांच्या कारकीर्दीत झालेलें आहे. याची समग्र तपशीलवार हकिकत उपलब्ध नाहीं व या ग्रामण्याचा सुगावाहि सन १८२५ सालच्या दैवज्ञांवरील एका खटल्यांत आलेल्या पुराव्यांच्या कागदांवरून लागला. त्यांत वेव्हारे जोशी यानीं चंद्र २७ रबिलाखर सन इहिदे सल्लासिन मयातैन व अल्लफ सन ११४० फसलीची बाजीराव बल्लाळची एक सनद दाखल केली होती. तींत " अतःपर सोनारांनीं आपल्या सोनारभटाकडून उपाध्यायिक कर्मै करूं नयेत, वेव्हारे जोशी यांचे हातून काम घेत जावें. वेदोक्त ब्रह्मकर्म सोडून देऊन पुराणोक्त कर्मे चालवीत जावीं. भाताचे पिंड करण्याची वहिवाट बंद करून कणकीचे पिंड करीत जावे " वगैरे मजकूर होता. या कतब्यावर सोनार पंचालांच्या सह्या घेण्याची खूप खटपट झाली, परंतु त्यांनीं सह्या केल्या नाहीत ; आणि याचा परिणाम त्यांना पेशवाई अंमदानींत उत्तरोत्तर फार छळ सोसावा लागला. या ग्रामण्यांत दैवज्ञ पंचालांवर फार अमानुष अत्याचार करण्यांत आले होते असें म्हणतात.

## ग्रामण्य दुसरें

शके १७१७ भाद्रपद वद्य नवमीच्या दिवशीं पुण्यांतील प्रमुखप्रमुख दैवज्ञांच्या घरांवर एकदम पेशव्यांच्या गारद्यांची घाड आली. त्यांनीं ठिकठिकाणीं घरांना वेढे दिले व सरकारी कारकुनांनीं दैवज्ञांना खडाखड बेड्या ठोंकून गारद्यांच्या पहाऱ्यांत दिवसाढवळ्या भर बाजारांतून अय्या शास्त्र्याकडे रवाना केले. घरांची झडती घेऊन पोथ्या, देव्हाऱ्यांतील देव व इतर धार्मिक विधीच्या चीज वस्तु जप्त करून नेल्या. अय्याशास्त्र्यानें मध्य रात्रीच्या सुमारास कैद्यांची भेट घेतली व जातींतील धर्मकर्मे कशीं चालवितात याबद्दल त्यांच्या लेखी जबान्या घेतल्या. आपण स्नान, संध्या, तर्पण, वैश्वदेव, गर्भादानादि सर्व संस्कार वेदोक्त मंत्रांनीं करतों असे त्यांनी जबाब दिले. नंतर त्यांस गारद्यांच्या ताब्यांत देऊन कोठड्यांत कोंडून ठेवलें. दुसऱ्या दिवशीं आणखी काही दैवज्ञांस पकडून आणले. प्रथम त्यांस खरपूस हाणमार करून गारद्यांच्या पहाऱ्यांत नाना फडणीसाचे दिवाण राघोपंत यांच्या वाड्यांत रवाना केले अय्याशास्त्र्याच्या कारकुनानें आरोपींच्या आरोपाची कानसुनावणी केल्यावर राघोपंतानेंहि आरोपीस चौदाव्या रत्नाचा प्रताप दाखवून आपल्या हाताला भाग्यवान् केलें. धर्मकर्मादि प्रघाताची लेखी जबानी घेतल्यावर त्या हतभागी आणि हतबल दैवज्ञांची रवानगी मुसक्या बांधून निरनिराळ्या चौक्यांवर करण्यांत आली. बिचाऱ्यांना दोन दोन दिवस अन्नोदकसुद्धां मिळालें नाही. या भयंकर शिक्षेचें कारण काय तर दैवज्ञ आपणांस " ब्राह्मण " म्हणवीत आणि वेदोक्त पद्धतीनें स्वज्ञातियांच्या वृत्ति चालवीत !

पांचव्या दिवशीं पुन्हा राघोपंताकडचें आमंत्रण आलें. तेथें अरोपींच्या धर्मकर्माविषयीं पुन्हा लेखी जबान्या घेण्यांत आल्या. नंतर सर्वांच्या जेवणाखाणाची व्यवस्था लावण्याबद्दल सरकारी हुकूम झाला. रविवार पेठेंत जप्तीचें घर होतें तेथें चौकीवरून एकेका आरोपीस आणीत, त्यानें स्वयंपाक करून जेवल्यावर, दुसऱ्याला आणावयाचें. आरोपीपैकीं कोणाचीहि परस्पर नजरभेट होऊं नये, हा यांतील मुख्य कटाक्ष होता.

पुढें कांहीं दिवसांनीं नाना फडणीसाकडे अय्या शास्त्र्यांची स्वारी गेली असतांना, त्यांनी दैवज्ञ प्रकरणाचा मजकूर नानांच्या कानावर घातला. सर्व बंदिवान दैवज्ञांस मुसक्या बांधून नानांच्या पुढें उभे करण्याचा हुकुम सुटला. नानांनीं सर्व आरोपीपासून त्यांच्या धार्मिक हक्कांबद्दलच्या जबान्या पुन्हा एकदां लिहून घेतल्या, व त्यासंबंधीं तुमचे काय शास्त्राधार आहेत ते दाखवा म्हणून आज्ञा केली. आम्हाला जामिनावर मोकळे केल्यास सर्व शास्त्रार्थ दाखवूं, असें दैवज्ञ ब्राह्मणांनी विनविलें. परंतु ही त्यांची विनवणी नोकरशाहीनें अमान्य करून, त्यांना पुनश्च तुरूंगांत रवाना केले. ही झोटिंगपाच्छाई पाहून दैवज्ञ समाज फार घाबरून गेला. शहरांत जिकडे तिकडे गडबड सुरू झाली. कित्येक पळून गेले, कित्येक लपून बसले आणि कित्येकांच्या घरांवर तर चौक्याच बसल्या. नंतर एका प्रतिष्ठित मातबर गृहस्थाच्या मध्यस्तीनें आय्याशास्त्र्यानें आश्वीन व० १३स कांहीं आरोपींस जामिनावर सोडण्याची मेहेरबानी केली. तथापि इतकें होईपर्यंत बिचाऱ्यांची रोजची हाणमार कांही चुकली नव्हती. बंधमुक्त होतांच प्रत्येक आरोपीच्या घरावर दुसरे दिवशी पोलीसच्या चौक्या बसल्या. मोरभट महामुनी, धर्माचार्यबुवा, बाळंभट, नाना पंडीत, सदाशिव पंडीत, जानोजी नसरापुरकर, बाळा क्षीरसागर,

बाळा जीतकर वगैरे प्रमुख प्रमुख दैवज्ञ मंडळी अझून कैदेंतच होती. त्यांना मोरोबादादा फडणीसांच्या वाड्यांत रोज रात्रीं हाणमार करण्यांत येत असे. या बिचाऱ्यांना कोणाचाच वशिला नव्हता, त्यामुळें श्रीमंतापर्यंत त्यांची दाद कशी लागणार ? आमची श्रीमंताकडे दाद लागावी, आमच्या धर्मकर्मांची वाजवी चौकशी व्हावी, आम्ही शास्त्रार्थ दाखविण्यास तयार आहोत; पण अय्याशात्री यांजकडून रोज रोज होणारी प्राणांतिक मारहाण आम्हाला आता सहन होत नाहीं, वगैरे मजकुराची त्यांनी नाना फडणीसाकडे फिर्याद करविली. ही गोष्ट आय्याशास्त्री यांस समजतांच त्याच्या तळपायाची आग मस्तकात गेली. मला न विचारता परस्पर नानाकडे फिर्याद केली, या गोष्टीनें खवळून जाऊन अय्याशास्त्र्यानें सदर्हू देवज्ञांस इतक्या अमानुष व अनिर्वाच्य तऱ्हेनें मारहाण केली कीं त्यापैकीं धर्माचार्यबुवा मार खातांखातांच मरण पावला आणि बाळंभट अत्यवस्थ आजारी पडला. नानाकडे फिर्याद जातांच त्यांनीं दैवज्ञांच्या जबान्या घेऊन त्यांस जामिनावर मोकळे केले. मात्र ही अट घातली कीं, फिर्यादीचा निकाल लागेपर्यंत सर्वांनीं रोज सकाळीं अय्याशास्त्र्यास **मुजरा** ( नमस्कार नव्हे! ) करण्यास आलें पाहिजे.

दैवज्ञांनी ठिकठिकाणांहून शास्त्राचे ग्रंथ मागविले. मार्गशीर्ष वद्य नवमीस श्रीमंतांच्या वाड्यांत सभा झाली. त्यावेळीं गारदी पाठवून एकूणएक दैवज्ञास बोलावून आणून दरवाज्याकडे बसविले. सभेंत वादाची भवति न भवति होऊन अखेर निर्णय झाला कीं **सोनार पंचाल जातीस ब्रह्मकर्म करावयास अधिकार आहे.** सर्व शिष्ठशिष्ठ विद्वान पंडीतांनीं एकमताने हा निर्णय दिला खरा, परंतु त्यानें अय्याशास्त्र्याचें मात्र समाधान झालें नाहीं. भलभलता वितंडवाद करून रागारागानें तो सभा सोडून जळफळत घरी निघून गेला.

पुढे दहाबारा दिवसांनी अय्याशास्त्रानें आपल्या मताचे चौघे शास्त्री बोलावून आणून आपल्या वाड्यांतच एक सभा केली आणि गारदी व कारकून पाठवून सर्व दैवज्ञांस तेथें बोलावून आणलें. तेथेंहि अय्याशास्त्र्याचा पक्ष व दैवज्ञ यांत बराच वादविवाद झाला. परंतु कांहीं महत्वाचीं वचनें गाळून स्वतः तयार केलेल्या जातिविवेकग्रंथ व शूद्रकमलाकर ग्रंथाधारें अय्याशास्त्र्यानें निर्णय दिला कीं सोनार ह्यांना कर्मधर्माचा अधिकार ते म्हणतात किंवा सध्यां आचरतात तसा नाहीं. ताबडतोब गारदी यांजकडून दैवज्ञांची जानवीं तोडविलीं व कांहींचीं काढून घेतलीं. धोतरें फाडून त्यांचे पंचे करवून नेसविले व गंधें पुसून टाकविलीं. ही गोष्ट पौष शुद्ध एकादशीस घडली. नंतर सर्वत्रांस गारदी यांचे ताब्यांत देऊन घरीं फक्त जेवणास जाण्याची परवानगी दिली. असा क्रम चालला असतां एके दिवशीं कांहीं दैवज्ञ मंडळी हट्टानें घरींच राहिली. त्यांना पुन्हां पकडून नेऊन पिचोडे बांधून तोंडावर मारले व पुन्हां कोठडींत कोंडून ठेवले. पुढें कांही दिवसांनीं सर्वांनीं मिळून श्रीमंताकडे या कहराचा अर्ज केला. त्यावर अय्याशास्त्र्याचा जबाब मागितला असतां शास्त्रीबोवानें प्रतिज्ञेचें उत्तर दिलें कीं, सोनारांस जर वेदाधिकार निघाला तर मी यज्ञोपविताचा त्याग करीन. पुढें एक महिन्यानें दैवज्ञांनी पैठणाहून विद्वानांचे संमतिपत्र व परांड्याहून श्रीशंकराचार्याचें संमतिपत्र आणिलें. मोरभट महामुनि यानें तैत्तिरीय ब्रह्मणभाष्य आपस्तंबसूत्र आणि गोविंदार्णव वगैरे ग्रंथ आणून कचेरींत हजर केले. अय्याशास्त्री हा आपला दुराग्रह सोडीत नाहीं असें पाहून व दैवज्ञांनीं दिलेल्या पुराव्यानें खात्री झाल्यामुळें नाईलाज होऊन, नाना

फडणीसानें अय्याशात्री यांस एकच उत्तर केलें कीं, या श्रुतिस्मृतिसंमत श्रीचे पत्रावर आणि शुद्रकमलाकर ग्रंथांतील वचनांवर शाईचा बोळा पुसावा किंवा आपण प्रतिज्ञेप्रमाणें यज्ञोपविताचा त्याग करावा. तेव्हां अय्याशास्त्री याचा उपाय हरला व त्यानीं संन्यास घेतला आणि दैवज्ञ ब्राह्मणांची या जाचांतून अखेर मुक्तता झाली.

## ग्रामण्य तिसरें.

मागें झालेल्या ग्रामण्याच्या वेळीं स्वत:ची लंगडी व कुझकी धार्मिक बाजू सांवरून भरभक्कम करण्याकरितां आणि इतर समाजांच्या धर्मकर्मांबद्दलचा शास्त्रीय आधार पोंकळ करून टांकण्याकरिता, नव्हे, अज्जीबात नष्ट करण्यासाठीं प्राचीन शास्त्र धर्मग्रंथांत चित्पावनांनीं बरांच खोडाखोड, मोडामोड व झोडाझोड करून ठेवली. मागें पृ. १२५ वर सांगितल्याप्रमाणे, आजलाहि मनुस्मृतीची किंवा कोणत्याहि धर्मग्रंथाची शुद्ध प्रत मिळण्याची पंचाईत पडते. चित्पावन नोकरशाहीनें चित्पावनांची उत्पत्ति लपविण्यासाठीं व ब्राह्मण्याचें स्तोम प्राचीन ठरविण्यासाठीं सह्याद्रीखंडाचा नाश करण्याची जी शक्कल काढली त्यामुळे इतरहि अनेक निरपराधी व बहुमोल हस्तलेखांचा ***सत्यानाश** झाला. निरनिराळ्या धर्मगंथांतून जी बरीच उपटसुंभ शास्त्रवचनांनीं घालघुसड झाली त्यांत दैवज्ञाबद्दलचें एक चित्पावनसूत्र मासल्याकरितां देतों :—

सर्वकंटक पापिष्टं हेमकारन्तु पार्थिव : ॥
प्रवर्तमान मन्याये छेदयेल्लवशः क्षुरैः ॥ २९२ ॥ मनुस्मुति.

याशिवाय दैवज्ञ सोनारांनीं वेदोच्चार करूं नये, देवळांत शिरूं नये, वेदोच्चार केल्यास जिव्हा छेदून टाकावी. संध्या केल्यास शेंडी कापावी. यज्ञोपवीत घालूं नये. घातल्यास रेड्याच्या पाठीवर मळवून घालावें. उभी निरी काढूं नये. आडवें उभें गंध लावूं नये. मौंजीबंधन करूं नये, केल्यास हद्दपार करावें. पुराण सांगूं नये, कथा करूं नये, वृत्ति चालवूं नये. वरात मिरवूं नये, यांची वरात पाहील त्यास ६ महिने दरिद्र येईल. ज्या गांवांत वरात मिरवेल तेथें महामारीची सांथ येईल. अवर्षण पडेल. अशीं एक का दोन अनेक क्षेपक धर्मग्रंथांत घुसडलेलीं आहेत. हीं सर्व क्षेपकें पुराव्यास घेऊन वेळोवेळीं पंचाल ब्राह्मणांच्या ब्राह्मण्यावर चित्पावनांनीं हल्ले चढविले. परंतु त्यांच्या हातीं अलोट राजकीय सत्ता असतांही त्यांत त्यांना केव्हांच ज़य आलेला नाहीं, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. अय्याशास्त्री यांची विल्हेवाट लागतांच मागील ग्रामण्य विझालें खरें; परंतु चित्पावनांच्या मनांतील तेढ मात्र कायम होती. अनेक कारणांमुळे बाजीरावाच्या कारकिर्दीच्या अखेरीपर्यंत दैवज्ञांना धार्मिक बाबतींत पूर्ण शांतता लाभली असेल असें वाटत नाहीं. या कालावधींतहि एक बखेडा झालाच. पण सर्वसाधारण दैवज्ञ ज्ञातीचा त्यांत समावेश करण्यांत आला नव्हता. तो प्रकार असा :–

आपल्या विधवा मुलीचा पुनर्विवाह लावण्यासाठीं धर्मशास्त्रें व धर्मगुरुं यांची संमती मिळविण्यासाठीं धडपड करणारे तत्कालिन महाधार्मिक वेदोनारायण परशुरामभाऊ पटवर्धन यांची स्वारी एकदां तासगांवाजवळ भिलवडी येथें गेली होती. तेथें कृष्णेच्या तीरावर एक देऊळ

* पहा इंग्रजी उतारा नं. ११ परिशिष्ट (चित्पावन)

आहे, त्यांत दैवज्ञ ब्राह्मणांपैकी कांहींजण अनुष्ठानास बसले होते. भाऊ देवळात गेले व त्यांनी त्यांस नमस्कार केला असतां या दैवज्ञ ब्राह्मणांनीं त्यांना उलट नमस्कार केला नाहीं. तेव्हां परशुरामभाऊंस मोठा राग येऊन त्यांनीं तुम्ही कोण असें त्या ब्राह्मणांस विचारलें. आम्हीं **दैवज्ञ सोनार ब्राह्मण** असें त्यांनीं उत्तर देतांच, भाऊंनीं आपल्या सैनिकांकडून त्यांना मरेमरेतों मारविलें. मारहाणीमुळें प्राण कसावीस होतांच त्या दैवज्ञ ब्राह्मणांनीं पाणी प्यावयास मागितलें. भाऊंनीं पाणी आणून दिलें पण तें त्यांनीं घेतलें नाहीं. दैवज्ञ ब्राह्मणाच्या हातचें पाणी आणविल्यास पिऊं इतरांच्या हातचें पिणार नाहीं असें त्यांनीं म्हणतांच भाऊंचा क्रोध भडकला. आम्हां ब्राह्मणांच्या हातचें पाणी पीत नाहीं आणि सोनारांच्या हातचें पाणी पिणार म्हणतात! श्रेष्ठ चित्पावन ब्राह्मणांचा केवढा तरी अपमान! भाऊ तरवारबहाद्दरच पडले. त्यांनीं त्या दैवज्ञांस ताबडतोब ठार मारावें असा हुकूम फर्माविला. त्या सर्व इसमांस ठार मारण्यांत आलें व आजूंबाजूंच्या गावांतील सोनारांच्या जिभा कापून टाकण्यांत आल्या. पुढें या जवानमर्द पटवर्धन ब्राह्मणवीराची शास्त्रीमंडळीनें चांगलीच कानउघाडणी केली व त्यांची खात्री करून दिली कीं सोनार हे खरे ब्राह्मण होत. तेव्हां ब्राह्मणहत्येच्या पातकाचें क्षालन व्हावें ह्मणून भाऊंनीं सोनारांवर मेहेरनजर करून त्यांना वेदोक्तकर्म करण्याचें आज्ञापत्र दिलें! हा प्रकार झाला तेव्हां पेशवे, त्यांचे अधिकारी व त्यांचे मुत्सद्दी जातभाई हे काय करीत होते व त्यांनीं भाऊंच्या या अत्याचाराबद्दल गुन्हेगारांस काय शिक्षा दिल्या याचा तपास करून कोणी चित्पावन संशोधक जगापुढें ठेविल काय ?

सवाई माधवरावाच्या जन्मानंतर पुण्यास दैवज्ञ मंडळीस नोकरशाही दरबाराचा कांहीं उपसर्ग लागल्याचें इतिहासात नमूद नाहीं; उलट सवाई माधवरावाचा जन्म झाल्यापासून त्यांची पुण्यांत बरीच चलती झाली व पुष्कळशा सवलतीहि मिळाल्या. उत्सवमूर्ती नारायणराव पेशव्याचा खून झाल्यावर त्याची विधवा पत्नी गंगाबाई प्रसूत होण्याच्या वेळीं जें राजकारस्थान रचलें, त्यांत बऱ्याच निरनिराळ्या जातींच्या समान मुदतीच्या गरोदर स्त्रिया गंगाबाईबरोबर पुरंदरास पाठविण्याचें कलम *मुख्य होतें. या स्त्रियांच्या घोळक्यांत रावजीभाई दिवेकर नांवाच्या दैवज्ञ सोनाराची बायको होती. देवाची करणी आणि नारळांत पाणी ह्मणून कर्म, धर्म, वर्म. मर्म संयोगानें दिवेकराची बायको व गंगाबाई या दोघी एकाच वेळीं प्रसूत होऊन दिवेकराच्या बायकोला मुलगा व गंगाबाईला मुलगी झाली. नाना फडणीसाचें राजकारण पार पाडण्याकरिता दाते अडनांवाची एक भटीण नेमलेली होती, तिनें मुलांची आदलाबदल करतांच सोनाराच्या पोटीं जन्माला आलेला मुलगा निमिषार्धांत चित्तपावन वेदोनारायणाचा पुत्र झाला व पेशव्यांच्या राजगादीचा मालक ठरला आणि खुद्द पेशव्यांच्या पोटीं जन्मलेली मुलगी खाडकन् सोनाराची गरीब मुलगी झाली. राजकारण काय करणार नाहीं ? हल्लीं या राजकारणी घडामोडींवर पांघरूण

---

* " बाई ही दोन महिनेची गरोदर आहे. तीस पुत्र जाहाला तर मालकच होईल. जर करिता कन्या जाहाली तर त्या मुलीस मेणाचे . . . . . लाऊन राज्यकारभार चालउं."

मराठी दप्तर–पृ. १३८.

घालण्यासाठीं अलीकडील विद्वानबरेच परीश्रम करीत आहेत. परंतु या गोष्टी नेहमीच राजकारणी वातारणांत घडून येत असतात ; नाहीं असें नाहीं. तेव्हां ऐतिहासिक सत्याचा निखारा कादंबरीच्या किंवा नाटकाच्या रेशमी रुमालांत सफाईनें लपविण्याचा यत्न करण्याची वास्तविक कांहीं अवश्यकता नाहीं. लहिरी मुकुंदा नांवाच्या एका शाहीरानें नारायणराव पेशव्याच्या मृत्यूबद्दल जो पोवाडा रचला आहे, त्यांतला एक चौक असा आहे :—

दिस मास उदास झाला। मग चिंता पडली गंगाबाईला॥ रंगमहालीं करमेना जात्ये पुरंदराला। दाहा बाळंतिणी झाल्या खबर नाहीं कळली गंगाबाईला॥ काय नालख्या पालख्या चालल्या पुरंदराला। शुद्ध सोमवार दिवशीं वेळ घटका आली तिला॥ दाई म्हणे नाना फडनवीसाला गंगाबाईचा प्रसूत व्हायचा वखत आला। एक† सोबतीण मिळाली तिला॥ दोघींची वेळ घटका कळली भगवंताला। नाना फडनवीस बोले त्या दाईला॥ सोन्याच्या वेळा चढवीन बाई तुला। तुझें माझें इमान ठावें भगवानाला॥ काढा वस्त्र डोळे दोघींचे बांधा या समयाला। कन्या झाली गंगाबाईला। पुत्र झाला दुसरे बाईला॥ ही अदलाबदल कळली नाना फडनवीसाला। दाई म्हणे नानासाहेबाला॥ गंगाबाईला पुत्र झाला। सवाई माधवराव नांव शोभे त्याला॥ सोळा वर्षे राज्य भोगलें पुणें शहराला। सत्रावें वर्षी कलिप्रहर आला॥ शिलंघन खेळोनि माधवराव घराला आला। तेथें नाना फडनवीस त्याला उणा शब्द बोलिला॥ कारंज्यावरी उडी टाकिली प्राण त्याचा गेला। तेथून ब्राह्मणांचा आचारधर्म लोपला॥१४॥ 'ॲक्वर्थ' शालीग्राम पोवाडे. आवृत्ती** १ ली सन १८९१.

गंगाबाईला झालेली मुलगी दुर्गाबाई नांवानें रावजीभाई दिवेकराच्या घरीं वाढली. पुढें तिचें लग्न एका गरीब स्थितींतल्या सोनाराबरोबर लागलें व थोड्याच दिवसांत ती मूलबाळ वगैरे कांहीं न होतां स्वर्गवासी झाली. दुर्गाबाईला आपल्या राजकारणामुळें भोगाव्या लागलेल्या आपत्तींचा थोडाबहुत तरी परामर्ष घ्यावा म्हणून नाना फडणीसानें तिच्या स्मारकासाठीं नारायणपेठेंत दुर्गादेवीचें एक देऊळ बांधविलें. त्याचा वार्षिक खर्च ४०–१–० अझूनहि पर्वति संस्थानांतून चालू असून, हें देवालय व त्याच्या आसपासची जागा तेथील स्थानिक दैवज्ञ ब्राह्मणांच्याच ताब्यांत आहे.

पेशव्यांच्या अमदानींत दैवज्ञ ब्राह्मणांवर झालेल्या धर्मसंबंधीं छलाचा इतिहास येथवर दिला. आणखींहि बरींच लहान मोठीं ग्रामण्यें झालीं नाहींतच असें कांहीं निश्चित सांगतां येणार नाहीं. या बाबतींत अझूनहि इतिहास संशोधन झालें पाहिजे. विश्वब्रह्मकुलोत्साह पुस्तकाच्या तिसऱ्या संग्रहांत श्रीशंकराचार्यांनीं दैवज्ञ बाह्मणांस आज्ञापत्रें दिलेलीं प्रसिद्ध आहेत. त्यांच्या निरनिराळ्या वेळच्या तारखा पाहिल्या म्हणजे सबंध पेशवाईभर या नाहीं त्या सबबीखालीं दैवज्ञांवर ग्रामण्यांचा स्टीमरोल फिरतच असावा असें स्थूल मानानें मानण्यास कांहीं हरकत नाहीं.

† हा शब्द 'सोनारीण' असाच असला पाहिजे. मूळची हस्तलिखित प्रत वाचतांना चूक झाली असावी असें वाटतें.

* प्रस्तुत पुस्तकाच्या २ ऱ्या आवृत्तींत (सन १९१२) या कडव्याला रा. शालीग्राम यांनीं अज्जीबात चाट दिला आहे. तरीहि प्रस्तावनेंत ही दुसरी आवृत्ति 'कांहीं फरक न करिता' छापल्याचें सांगायला मात्र ते मुळींच विसरले नाहींत.

मागें वर्णन केलेल्या परशरामभाऊ पटवर्धनांच्या पराक्रमानंतर पेशवाईचा लय झाला व पेशव्यांच्या ' श्रीमंत ' पदवीचा मान आपणच घेऊन धर्मरक्षणार्थ स्वयंसिद्ध तयार झालेल्या चिंतामणराव आपा पटवर्धनांनीं सोनारांवर ग्रामण्य केलें. सोनारांविषयींचा उल्लेख त्यांनीं शंकराचार्यांकडून बळजबरीनें घेतलेल्या आज्ञापत्रांत केलेला आहे. तेव्हां त्यांचा वरप्रसाद दैवज्ञांना लाभला नसेलच असें म्हणतां येत नाहीं. परंतु या ग्रामण्याची सविस्तर हकिकत उपलब्ध नाहीं. कदाचित कायस्थप्रभु व क्षत्रिय मराठे यांच्यावरील ग्रामण्यांच्या झगड्यांत दैवज्ञांकडे लक्ष पोंचविण्यास वेदमुर्तीत्रय नातु, पटवर्धन व थत्ते यांना फावलें नसेल व त्यामुळेंच दैवज्ञब्राह्मणांचें हें ग्रामण्य तसेंच राहिलें असावें.

## ग्रामण्य चवथें. (पंढरपूरचें)

पंचालांनीं वेदोक्त कर्म करूं नये म्हणून पुण्याच्या चित्पावनांचा आग्रह पाहून पंढरपूर, सातारा वगैरे ठिकाणीं त्यांच्याशीं इतर ब्राह्मण मोठमोठे तंटे करीत असत, शके १७०० पासून पंढरपूर येथील पंचालांमधील व्रतबंध व विवाह ब्राह्मणांच्या अनन्वित त्रासामुळें शहराबाहेर होत असत. पुढें शके १७४२ सालीं आश्विन महिन्यांत पंढरपुरच्या कज्जेदलाल ब्राह्मणांनीं पंचालांविरुद्ध ग्रामण्य उभारून तेथील प्रमुख पंचालांस पकडून सातारच्या महाराजाकडे निर्णयासाठीं नेलें. महाराजांनीं ह्या तंट्याचा निर्णय लावण्याचें काम एका विद्वान् शास्त्र्याकडे सोंपविलें. परंतु असूयेची कावीळ झालेल्या शास्त्र्यांना प्राचीन ग्रंथांतील आधार व वचनें हीं काय होत ? त्यानीं पंचालांच्या विरुद्ध निकाल दिला व सोनार ब्राह्मण म्हणवितात म्हणून त्यांची गाढवावर बसवून धिंड काढावी व हत्तीच्या पायांशीं बांधून त्यांस ठार मारवावे अशी सौम्य शिक्षा देण्यास शिफारस केली. परंतु पंचालांनीं योग्य न्याय मिळण्याविषयीं महाराजांकडे स्वतः अर्ज केल्यावरून न्यायदानाच्या बाबतींत कांहीं तरी कपट झालें असावें असा महाराजांस संशय आला व आपल्यासमक्ष ग्रंथांचा पुरावा व्हावा असा महाराजांनीं हुकुम केला. तेव्हां शास्त्रीबुवांनीं आपला चष्मा साफ करून पुरावे पाहिले व राधवाचार्य यांच्या मदतीनें पंचालप्रमुख मंडळींचें व शामशास्त्री द्रविड वगैरे विद्वानांचे पुरावे व अभिप्राय घेतले व फेर निकाल दिला कीं " विश्व कर्मसंततीय ब्रम्हपंचालांस वेदादि प्राचीन ग्रंथांवरून ब्रह्मकर्म करण्याचा अधिकार असून ते पूर्वीपासून चालत आलेल्या वहिवाटीप्रमाणें ब्रह्मकर्म करीत आहेत. त्यास कोणीही प्रतिबंध करूं नये. "

या निर्णयपत्रावरून सातारा व क्षेत्र पंढरपूर येथील उपद्व्यापी लोकांस खालील ताकीदपत्रांचे फर्मान देण्यात आलें :—

शिक्का

सातारचे

महाराजांचा

राजश्री रंगू नरसिंह मामलेदार पेटा पंढरपूर.

आपल्या स्वकर्माविषयीं सोनार व्यंकाजी नाइक अरणगांवकर व सोनार भट्टजी वगैरे पंढरपूर वेदार्थ हुजूर निर्णयपत्र महाराजांची आज्ञा—सोनार कानडे पांचाल विश्वकर्मसंततीय यांसी ब्रह्मकर्म करण्याची अर्हता आहे. त्यांस कोणी दूषण ठेवण्यास गरज नाहीं. आपलें सत्य स्मरून दूषण ठेवल्यास वतनास जप्ति केली जाईल. जाणिजे चंद्र १५ जमादिलावल सुरूसन अशरीन मयातैन व अलफ. मुरजत ता. १ मार्च सन १८२० इसवी.

मोर्तबसुद्धां हस्ताक्षर बाळाराव चिटणीस.

यानंतर दैवज्ञ ब्रह्मणांवर ठिकठिकाणीं काहीं त्रोटक व स्थानिक ग्रमाण्यें झाली. त्या त्या वेळीं श्रीशंकराचार्यांनीं दैवज्ञांच्या तर्फे संमतपत्रें देऊन त्यांचे निराकरण केलें. हीं सर्व संमतीपत्रें स्थलसंकोचास्तव येथें समाविष्ट करतां येत नाहींत. जिज्ञासूंनीं तीं **वे. शा. सं. बाळशास्त्री रावजीशास्त्री क्षीरसागर** यांच्या **विश्वब्रह्मकुलोत्साह** (संग्रह तिसरा) येथें पहावीं. या सर्व संमतीपत्रांवर दैवज्ञांच्या वेदोक्त कर्माधिकाराबद्दल पूर्ण मान्यता दिलेली आहे इतकें सांगितलें म्हणजे पुरे. श्रृंगेरी मठाच्या शंकराचार्याच्या सन १८२३ च्या आक्षापत्रांत आणि काशी येथील पंडितांच्या सन १७८८ च्या संमतपत्रांत दैवज्ञ—हे पंचाल अर्थात ब्राम्हण आहेत असाच उल्लेखं आहे.

इंग्रजी झाल्यावर सुद्धां दैवज्ञांस धार्मिक बाबतींत थोडाबहुत त्रास झाल्याचें दिसतें. अव्वल इंग्रजीमध्यें वेदोक्ताचा तंटा **नगर मुक्कामीं** प्रथम उपस्थित झाला. तो निकालासाठी पुण्यास आला त्यावेळेस चित्पावन व कऱ्हाडे ब्राह्मणांच्या सभा झाल्या. दैवज्ञ पक्षाकडचे शास्त्री त्रिमलाचार्य होते त्यांनीं सोनार हे ब्राह्मण आहेत तेव्हां येथें वेदोक्त कर्म करण्यास शास्त्राची परवानगी आहे व इतर प्रांतीं वेदोक्त करण्याची चाल आहे, ज्या अर्थी ते ब्राह्मण आहेत, त्या अर्थी वेदोक्त करण्याचा त्यांना अधिकार आहे, असें सांगितलें. त्या वादाचा निकाल त्या सभेंत लागणें अशक्य होतें. कारण जे ब्राह्मण अहंकार आणि स्वार्थी या दोन पिशाच्चांनीं पछाडले गेलेले तेथें विवेक आणि सत्य कसें जागृत राहणार ? ज्यानां घरातील अन्याय किंवा जुलूम दिसत नाहींत ते इतरास न्याय देतील काय अथवा आपण जुलुम करित आहों हें त्यांच्या लक्षांत येईल काय ? तो वाद अखेरीस डि. ज. मेहेरबान राबिनसनसाहेब यांच्या पुढें गेला. त्यांनीं दैवज्ञांचा पुरावा घेतला. त्या पुराव्यामध्यें काशींतील शास्त्री व पंडितलोकांची संमति नानाशंकरशेट यांनी मिळविली होती. त्याचप्रमाणें सर्व क्षेत्रांतील पंडित व शास्त्री यांची संमति आणविली होती. त्रिमलाचार्यशास्त्री व कै.बाबाजी आण्णा पावसकर यांच्याकून ग्रंथांचा पुरावा घेऊन साहेबानीं दैवज्ञांच्या तर्फे निकाल दिला कीं, सोनारांनी आपलीं धर्मकृत्यें वेदोक्त करावी ; इतर ब्राह्मण लोक जर अडथळा करतील तर त्यांस कायद्याप्रमाणें शिक्षा होईल. या कामासाठीं जगन्नाथ शंकरशेट यांनी निरनिराळ्या ठिकाणीं मंडळी पाठविली आणि शास्त्री लोकांकडून वाद करविले.

मुंबईचे सुप्रसिद्ध दैवज्ञ नागरिक श्रीमंत जगन्नाथ उर्फ नाना शंकरशेट हे कृष्णेच्या स्नानाकरितां वांईस गेले असतांना, तेथच्या भटांनीं त्यांना शूद्र शूद्र म्हणून त्यांचा फार उपमर्द

केला व तुम्हांला कृष्णानदींत उतरून देणार नाहीं असा दम भरला. नानांनीं स्वतःच मंत्र म्हणून स्नानविधि यथासांग उरकला व ता. १९ डिसेंबर सन १८२६ रोजीं सातारचे महाराज प्रतापसिंह यांजकडे फिर्याद दाखल केली. महाराजांनीं या प्रकरणाची ताबडतोब चौकशी करून आरोपींना शिक्षा ठोंठावल्या. नंतर मोठा दरबार भरवून महाराजांनीं नानाशंकरशेटचा मोठा गौरव केला व एक बहुमोल भरजरी शाल त्यांना नजर केली. या संबंधानें ' सातारा केस ' प्रकरणाच्या विलायतेंतील प्रोसिडिंगांत (पृ. २७८) खालीलप्रमाणें उद्‌गार आहेत :—

"In this manner did they (Brahmins) annoy other persons when in the performance of their religious rites and ceremonies, enjoined by their respective castes.".

यानंतर नाशीक येथेंहि नानाशंकरशेटवर असाच प्रसंग आला. किती झालें तरी नाशीककर भट वाईकर भटजींपेक्षा अधिक जहाल आणि सवाई राष्ट्रीय असतात. त्यानीं नानांशीं जेव्हा दोन हात करण्यासाठीं आपल्या धाबळ्या कंबरेला कसल्या, तेव्हां नानांनाहि तेथच्या कलेक्टराला चिठ्ठी पाठवून हत्यारी पोलीसची पार्टी बोलावून आणून या गंगापुत्र कारट्यां ' चा बंदोबस्त करावा लागला. इ.स. १८७८ मध्यें हैद्राबाद (दक्षिण) रेसीडेन्सीच्या शिक्यानिशीं सोनारांस ब्राह्मणत्वाचें संमति पत्र मिळालेलें आहे. याप्रसंगीं सन १७५६ मधील विजयानगरच्या विजय रामराजाचें अस्सल संमतिपत्र दाखल करण्यांत आलेलें होतें. इ. स. १८७४ मध्यें मद्रास इलाख्यांत वृंदावन येथें वाद उत्पन्न होऊन पंचालांस संमति पत्र मिळालें व अग्निहोत्र चालूं राहिलें. सन १८५३ मध्यें मिरज येथें सरकारवाड्यांत जें दत्ताचें देऊळ बांधिलें त्यांतील मूर्तीची स्थापना पंचाल ब्राह्मणांच्या हातीं करविण्यांत आली. म्हैसूरसरकारच्या राजगृहीं सर्व धार्मिक कामें करणारे उपाध्याय पंचालच आहेत. याशिवाय ब्रिटिश अमदानींत न्यायकोर्टांत फिर्यादी होऊन दैवज्ञांच्या तर्फे निवाडे झालेले आहेत. त्यापैकीं मुख्य येणेंप्रमाणें :—इ. स. १८१८ सालीं चितूर जिल्हा अदालत कोर्टाचा हुकुमनामा पंचालांचें तर्फे झाला असून तो मद्रास हायकोर्टानें कायम केलेला आहे. इ. स. १८७१ मध्यें जुन्नर येथील कोर्टांत असाच एक खटला उपस्थित झाला होता. यावेळींही त्यांच्याच तर्फे निकाल झाला. पुणे येथील कोर्टांत या निकालावर अपील झालें पण तेथेंही हा निकाल कायम झाला. सन १८८३ मध्यें पाटण जिल्हा सातारा येथील कोर्टांत एक खटला झाला. याही वेळीं सोनारांचीच फत्ते झाली. याहि निकालावर सातारा जिल्हा कोर्टांत अपील झालें ; पण निकाल कायमच झाला.

प्रस्तुत विषयासंबंधानें आणखीही पुष्कळच माहिती देतां येण्यासारखी आहे. परंतु स्थलाभावामुळें तसें करितां येत नाहीं. तथापि प्रस्तुत विषयाची रजा घेण्यापूर्वी दैवज्ञांच्या वादप्राविण्याबद्दल थोडी माहिती दिली पाहिजे. ज्या ज्या वेळी दैवज्ञांना वाद करण्याची संधि मिळाली त्या त्या त्यांच्यांतील पंडितांपुढें मोठमोठ्या आचार्यांनीहि हात टेकल्याचे दाखले त्यांच्या इतिहासांत पदोपदीं आढळतात. सन १८७५ मध्यें दैवज्ञांनी शंकराचार्यास खंडणी देण्याचें नाकारलें. तेव्हां शंकराचार्यांनीं असें करण्याचें कारण विचारतांच, " आम्ही स्वतः शुद्ध बीज ब्राह्मण असून आम्हांस वेदोक्त कर्माचा पूर्ण अधिकार आहे. म्हणून तुम्हास खंडणी देण्याचें कारण

नाहीं. उलट आम्ही विश्वकर्माकुलोत्पन्न असल्यामुळें तुम्हीच आम्हां आद्यब्राह्मणांना खंडणी दिली पाहिजे. " असा खडखडीत जाब दिला. यावर प्रत्यक्ष श्रीशंकराचार्याशीं मार्गसहाचार्य या दैवज्ञ पंडितानें वाद करून त्यांना वादांत जिंकलें. हा वाद मोठा वाचनीय असून ब्राह्मण्याचा सुका डौल मारणाऱ्या मंडळींना माननीय असा आहे. त्यांनीं तो " विश्वब्रह्मकुलोत्साह " संग्रह ४ पृ. --१० येथें अवश्य पहावा, इतकी शिफारस करून हें प्रकरण येथें समाप्त करतों.

□ □

# ग्रामण्यांचा साद्यंत इतिहास.

## (देशस्थ शुक्लयजुर्वेदी माध्यंदिन वाजसनेय ब्राह्मण.)

देशस्थ शुक्लयजुर्वेदीय ब्राह्मणांना नुसते शुक्लयजुर्वेदी किंवा वाजसनेय ब्राह्मण असेंहि म्हणतात व पेशवे नोकरशाहीच्या अंमलामुळें तर्र झालेल्या चित्पावनांच्या द्वेषाचा वरवंटा या जातीवर फिरेपर्यंत हींच नांवें लोकप्रचारांत आणि सरकार दरबारांत रूढ होतीं. परंतु त्यानंतर यांना **पळशीकर**, **पळशे** व सरतेशेवटी **पळश्या** अशा कुत्सित शब्दप्रयोगाचा प्रसाद चित्पावनांकडून अलीकडे मिळत असतो, आणि या महाप्रसादाच्या पुष्टीकरणार्थ त्यांनीं बऱ्याच काल्पनिक दंतकथा निर्माण केल्या आहेत, स्मृत्यादि ग्रंथातून खोडसाळ वचनांची घुसडाघुसड करण्यांत आली आहे आणि या जातीसंबधीं गैरसमज उत्पन्न करणारे लेख अझूनहि नियतकालिकांतून वारंवार लिहिण्याचा मोह चित्पावन विद्वानांस आंवरत नाहीं. यांच्यावरील ग्रामण्यांचा इतिहास मागील प्रकरणांइतकाच चित्पावनांच्या असूयेच्या द्योतक असून, त्यांत एकच गोष्ट प्रथम लक्षांत ठेवणें अवश्य आहे. या एकाच गोष्टीला जर शु. यजुर्वेद्यांनीं 'हूं' म्हटलें असतें, तर त्यांच्यांत व चित्पावनांत कोणत्याहि प्रकारची तेढ उत्पन्न झाली नसती व यावेळीं कदाचित् एकतर शु. यजुर्वेद्यांची चित्पावनांच्या दरबारांत मोठी मान्यमान्यता तरी असती किंवा ते चित्पावनांत समरस तरी होऊन गेले असते. ती गोष्ट म्हटली म्हणजे हीच कीं राजकीय सत्तेच्या वाढत्या जोरावर ज्यावेळीं चित्पावन पेशव्यांनीं इतर प्राचीन महाराष्ट्रीय ब्राह्मणांत आपला समावेश करून घेण्यासाठीं रोटीबेटीव्यवहाराचें बळजबरीचें कलम पुढें आणलें त्यावेळी इतर ब्राह्मणांप्रमाणे शु. यजुर्वेदी पेशव्यांच्या दमधाटीला किंवा आर्जवाला न वंगतां त्यांनीं त्या कलमास कस्सून विरोध केला. शु. यजुर्वेद्यांना चित्पावनांचें ब्राह्मण्य मान्य होईना किंवा पेशव्यांच्या शुद्ध आधिभौतिक वैभवाला बळी पडून स्वतःचे शुद्ध ब्राह्मण्य गमाऊन बसण्याची इच्छा होईना ! अर्थात् राजकीय सत्तेशीं विरोध करणारांना जे छळ व जे ताप सहन करावे लागतात, ते सर्व त्यांना सहन करणें भागच पडले, यांत आश्चर्य नाहीं. असो. शु. यजुर्वेद्यांच्या ग्रामण्यांच्या इतिहासाकडे वळण्यापूर्वी त्यांच्या प्राचीन इतिहासाचें त्रोटक सिंहावलोकन वाचकांच्या सोयीसाठीं करूं, या सिंहावलोकनाच्या कामीं विशेषतः वेदशास्त्रसंपन्न पंडित यज्ञेश्वर दिक्षित भिंगारकर यांनीं शके १८०७ (सन १८८५) सालीं प्रसिद्ध केलेल्या इतिहासाचा आधार घेतलेला आहे.

श्रीयाज्ञवल्क्यानें पुण्यस्तंभ, जनस्थान वगैरे गोदातटाकींच्या क्षेत्रस्थानीं यज्ञ केले, त्यावेळीं त्याच्याबरोबर कित्येक अन्तर्वेदनिवासी शुक्लयजुर्वेदी ब्राह्मण आले, ते तेथेंच स्थाईक झाले. पुढें १३ व्या शतकाच्या प्रारंभास मुसलमानांची सत्ता कुरुक्षेत्रादि ठिकाणीं उत्तरोत्तर वाढत जाऊन त्यांच्या स्वाऱ्या गोदावरीच्या कांठच्या प्रदेशावरहि होऊं लागल्या आणि त्यांनीं अखेरीस पैठणावर हल्ला करून तें काबीज केलें. इ.स. १२९४ मध्यें अल्लाउद्दीन खिलजीनें रामदेवराव जाधवाचा पराभव करून त्याला ठार मारिलें. रामदेवरावाचा मुलगा बिंबदेव ही बातमी कळतांच देवगिरीस आला. परंतु पैठण हें देखील जेव्हां अल्लाउद्दीनच्या ताब्यांत गेलें, तेव्हां आपला इलाज चालणार नाहीं असें समजून बिंबदेव आन्हिलवाड्यास आला. लवकरच तेंही ठाणे

अल्लाउद्दीनाच्या स्वाधीन झालें. तेव्हां बिंबदेव समुद्रमार्गानें उत्तरकोकणांत पळून गेला. कोकणांत उतरतांच बिंबदेवानें प्रथमतः डभोई काबीज केली. पुढें दमण, चिंचणी, तारापूर इत्यादि शहरें एकामागून एक हस्तगत करून घेऊन, त्यानें महिमाहिम किंवा हल्लींचें मुंबई माहिम काबीज केलें. लवकरच बिंबदेवानें ठाणें, साष्टी, चेऊल इत्यादि शहरें हस्तगत करून घेतलीं व सारा अष्टागर प्रांत सर केला. त्यानें मालाड येथें आपली राजधानी करून राज्यकारभार सुरळीत चालविला. त्यानें आपल्या राज्याचे एकंदर ११ भाग करून बरोबर अकरा उमराव आले होते त्याना एकेक भाग देऊन कारभार चालविला.

बिंबराजाबरोबर जे ११ उमराव आले त्यांत **पुरुषोत्तमपंत कावळे** हे शुक्लयजुर्वेदी ब्राह्मण गृहस्थ प्रमुख होते. पुरुषोत्तम कावळे हा बिंबराजाचा बाळाजी आवजी होता. बिंबराजाच्या सर्व मोहिमा फत्ते करण्याच्या कामीं पुरुषोत्तम कावळ्यांचीच बुद्धिमत्ता व शौर्य फार कामीं आलें.

पुरुषोत्तमपंताची ही कामगिरी लक्षांत घेऊन बिंबदेवानें त्यांला १४ महालांची वृत्ती वंशपरंपरा दान दिली. त्यांत सरदेसाई सरदेशपांडेपणा आणि अष्टाधिकार* त्यांस प्राप्त झाले. त्यावरून त्यांना व त्यांच्या वंशजांना नाईकराव असें नामाभिधान पडलें. ही दान दिलेली वृत्ती प्रथम गोविंद मिटकरी गोळक याची होती. तो निर्वतल्यावर त्याची बायको चांगुणा हिनें चोवीस हजार होन घेऊन ती आत्मसंतोषें बिंबराजास विकत दिली. राजानें १ वर्ष तीन महिने त्या वृत्तीचा उपभोग घेऊन सन १२९९ मध्यें पुरुषोत्तमपंतास दान दिली.

याप्रमाणें बिंबराजाबरोबर उत्तर कोंकणांत शुक्लयजुर्वेदीयांची वसाहत झाली. बिंबाबरोबर एकंदर ११ वाजसनेयी ब्राह्मण होते. त्यांची बिंबानें उत्तम व्यवस्था लावून दिली तेव्हां ते तेथेंच स्थाईक झाले. पुढें त्यांचे नातलग वगैरे मंडळी येतां येतां उत्तर कोंकणांत त्यांची वस्ति वाढली.

या जातींत पूर्वी मोठमोठे चिरस्मरणीय असे नामांकित पुरुष होऊन गेले. सूर्यवंशी विक्रमादित्याचा वंशज शूरसेन याचे **पाठक** नांवाचे जे शुक्लयजुर्वेदी राजगुरू होते त्यांच्याच पोटीं सुप्रसिद्ध **विज्ञानेश्वर महाराज** अवतीर्ण झाले. याच शूरसेनाच्या आग्रहावरून विज्ञानेश्वरानें याज्ञवल्क्यस्मृतीवर मिताक्षरा नामक सुबोध टीका लिहिली. जगविख्यात ' **निवृत्ति ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई** ' हीं कोहीनूररत्नें महाराष्ट्राला याच शुक्लयजुर्वेद्यांच्या खाणींत लाभलीं. आद्य श्रीशंकराचार्यांशीं पैठणास वाद करणारा हस्तमलक उपासने हा शु. य. ब्राह्मण होता. श्री शिवाजी महाराजांचे वंशपरंपरेचे राजगुरू व मंत्री हे गंगातीरस्थ शुक्लयजुर्वेदीय ब्राह्मणच होते, असें इतिहासावरून दिसतें. यांपैकीच **मोरोपंत** पिंगळे हे होत. ते शिवाजी महाराजांचे पेशवे होते, व या पिंगळ्यांचा पाडाव पुढें बाळाजी विश्वनाथानें केला हें इतिहासप्रसिद्धच आहे. सख्या देवा विठ्ठला या सुप्रसिद्ध साडेतीन शहाण्यांतले **विठ्ठल सुंदर** हे शु. य. होते. आजलाहि या ज्ञातींत श्रीमंत दादासाहेब खापर्डे, रा. ब. वासुदेवराव पंडीत, श्रीमंत बाळासाहेब पंत प्रतिनिधी औंध, श्रीमंत आबाजीराव पंडीत पं. प्र. विशाळगड, रा. बा. पी. बी. जोशी जे. पी., नागपूरचे डॉ. मुंजे, राजगुरू हरेश्वर महादेव पंडीत, मुंबईचे डॉ. पुरंदरे,

* जलाधिकारश्च स्थलाधिकारो ग्रामधिकारः कुललेखनं च । ब्रह्मासनं दण्डविधेर्नियोगं पौरोहितं ज्योतिषमष्ठमेवम् ॥

डॉ. दीनानाथ बाळकृष्ण नाईक दांडेकर, इत्यादि बरींच विद्वद्रत्नें आहेत आणि नामांकित पुरुषांची परंपरा अस्खलीत कायम आहे याबद्दल कोणीहि या समाजाची पाठच थोपटील.

या शु. य. ब्राह्मणांची कोंकणांत वस्ती झाल्यावर त्यांना सामवेदी, किरवंत, पाठारे प्रभू इ. अनेक जातींच्या वृत्त्या मिळाल्या. त्याबद्दलच्या प्राचीन सनदा व लेख अनेक आहेत. त्याशिवाय अनेक मुसलमान बादशहांनीं वेळोवेळीं त्यांना वतनें व अभयपत्रेंहि दिलेली आहेत. त्यांची त्रोटक त्रोटक माहितीसुद्धां सहज १५।१६ पृष्ठांची जागा पटकांवील इतकी ती विस्तृत आहे. तेव्हां थोडक्यांत एवढें सांगितलें म्हणजे पुरें कीं यांचा राजोपाध्येपणा व वृत्तीचा अधिकार पेशवे नोकरशाहीचा उपसर्ग लागेपर्यंत सर्वत्र मान्य केला जात असे.

याप्रमाणें आपापले व्यवसाय व वृत्त्या संभाळून हे लोक सुखासमाधानानें कालक्रमणा करीत असतां उत्तर कोंकणांत पोर्च्यूगीजांचा अंमल बसून हिंदुधर्मावर हल्ले होऊं लागले. धर हिंदु कीं कर बाटवून ख्रिस्ती, असा सर्वत्र हलकल्लोळ उडाला. जेथें हिंदुधर्माची मानच फासांवर चढली तेथें या वृत्तिवान ब्राह्मणांची काय दुर्दशा उडाली असेल, याची कल्पानाच करावी हें चांगलें. या प्रसंगी सुप्रसिद्ध पुरुषोत्तमपंत कावळे यांचे वंशज अंताजी रघुनाथ व त्यांचे बंधू रामचंद्रपंत यांनीं पुण्यास जाऊन श्रीमंत पेशव्यांची भेट घेतली व वसईचें राजकारण उभें केलें. पुढें सन १७३९ त चिमाजी आप्पानें वसईचा किल्ला सर केला. या मोहिमेंत कावळे बंधूंनीं आपल्या प्रयत्नांची फार शिकस्त केली. पेशव्यांचा अंमल वसई प्रांतावर बसतांच हिंदुधर्माच्या मानेवरची तरवार दूर झाली, पण थोड्याच काळांत पेशव्यांच्या चित्पावनी वर्चस्वाचा वरवंटा सगळ्यांचाच छातीवर आदळूं लागल्याची प्रचिती आली.

वसई व साष्टी प्रांतांत चित्पावन पेशव्यांचा अंमल बसतांच हजारों चित्पावन त्या प्रांतीं येऊन कोंसळले व तेथें स्थायिक झाले. त्यांना राजकीय सत्तेचा पूर्ण पाठिंबा असल्यामुळे त्यांनीं सर्वच ठिकाणी आपापले हातपाय पसरण्यास सुरवात केली आणि या शु. यजुर्वेद्यांच्या वृत्त्या बळकविण्यास प्रारंभ केला. बळी तो कान पिळी ! बिचाऱ्या शु. यजुर्वेद्यांना दे माय धरणी ठाय होऊन गेलें. या वेळीं चित्पावन जरी सत्ताधारी होते तरी त्यांचा ब्राह्मणपणा कोणी मान्य करीत नसे आणि इतर ठिकाणीं जरी त्यांनीं दंडुकेशाहीच्या जोरावर इतर महाराष्ट्रीय ब्राह्मणांबरोबर रोटीबेटी व्यवहाराचा उपक्रम सुरूं केला होता, तरी तेवढ्यानें या शु. य. चें समाधान होईना. त्यांनीं त्यांचा ब्राह्मणपणा तर केव्हांच मान्य केला नाहीं आणि रोटीबेटीव्यवहाराला तर कस्सून विरोध केला. साम्राज्यसत्ताधाऱ्यांच्या क्षातिबांधवांशीं विरोध ? आणि तो शु. य. सारख्या अल्पसंख्यांक समाजानें ? मग त्यांचें पीठ कां होणार नाहीं ? ठिकठिकाणीं उपऱ्या चित्पावनांनीं त्यांच्या वृत्त्या बळजबरीनें हिसकावून घेण्याचा धूमधडाका चालू केला व स्वतःचें ब्राह्मण्य हिणकस असतांहि ' हे शुक्लयजुर्वेदी ब्राह्मणच नव्हत ' असा उलटा शंख फुंकण्यास सुरुवात केली. अर्थात् पेशवे नोकरशाहीनें ठिकठिकाणीं ग्रामण्यांचा जो वणवा पेटविला होता, त्यांत या शु. यजुर्वेद्यांचीहि आहुती पडली व त्यांचा अतोनात छळ झाला.

इ.स. १७४२ मध्यें अशीच एक फिर्याद पेशव्यांकडे गेली. त्यांत पळशीकर तुकंभट धर्मभेट जावळे यांनीं नमूद केलें आहे कीं जोगळेकर व फडणीस वगैरे वसई येथील चित्पावन ब्राह्मणांनीं

अग्निहोत्र उच्छेद करून श्रौताग्नी कुंडांचा उच्छेद केला. त्यावरून पळशीकरांनीं श्रीक्षेत्र नासिक व त्र्यंबक येथील ब्राह्मणांचें संमति पत्र आणून आपला श्रौताग्नी साधन करण्याचा अधिकार प्रस्थापित केला. त्यावरून त्यांचें अग्निहोत्र पुन्हां चालू झालें. यावेळी श्रीमंत पेशव्यांनीं दिलेल्या आज्ञापत्रांत खालील खुलासा केलेला आहे :—'' तुम्ही यजु:शास्त्रीय ब्राह्मण. तुमचा श्रौताग्नि गोविंदभट जोगळेकर व महादजीपंत फडणीस यांनीं विच्छिन्न करून तुम्हास अग्निहोत्राचा अधिकार नाही हें त्यांचें म्हणणें निराधार आहे. तुम्हीं पूर्वापार प्रमाणें अग्निहोत्रादि सर्व कर्मे चालू करावीं व वसईकर ब्राह्मणांनीं तुम्हांस उपसर्ग करूं नये म्हणून त्यांस ताकीद केली आहे जाणिजे, आज्ञा प्रमाण.''

इ.स. १७४८ ते पेशव्यांनीं करार करून ठाणें येथील वृत्ती शु. य. वा. ब्राह्मणांस दिल्याचा दाखला आहे. त्याच वर्षी वसई बेलापूर वगैरे ठिकाणची वृत्ती त्यांना पेशव्यांनीं करार करून दिली व मालाडच्या वृत्तीविषयींहि अभय पत्र दिलें. इस. १७५४ मध्यें कोहरें येथील वृत्ती चालण्याविषयीं पेशव्यांचीं आज्ञापत्रिका मिळाली. इ.स. १७६४ मध्यें मालाड येथील श्रीहनुमंताच्या देवालयाची प्राणप्रतिष्ठा पेशव्यांनीं हुकूम देऊन तेथील शु. य. वाजसनेयी उपाध्यायांकडूनच करविली. इतर ब्राह्मणांस त्यांनीं मनाई केली होती. इ.स. १७६५ सालीं चित्पावनांनीं अग्निहोत्राचा दुसरा खटला उपस्थित केला. वसई येथील अनंत जोशी भास्कर यांजकडे कोणी एक नारायण जोशी नांवाचा चित्पावन राहावयास जागा मागूं लागला. परंतु स्थलसंकोचास्तव त्याचें म्हणणें अनंत जोशी यानें कबूल केलें नाहीं. तेव्हां नारायण जोशानें घरांत शिरून दांडगाई करून अनंत जोशाचीं हौत्राग्नीकुंडे विच्छिन्न केलीं. तेव्हां पेशव्यांकडे फिर्याद गेली असतां अनंत जोशास हौत्रस्थापन पुन्हां करण्याचा पेशव्यांनीं हुकूम दिला. परंतु नारायण जोशी जातभाई पडला, तेव्हां त्यास कोणत्याही प्रकारें त्यांनीं शिक्षा केली नाहीं, हें सरळच झालें. इ.स. १७७५ सालीं श्री त्र्यंबकेश्वराचें देवालय बांधून पूर्ण झालें. प्रासादप्रतिष्ठेत दक्षिणद्वार शु. य. वाजसनेयांस द्यावयाचें तें चित्पावनांस देण्याचा पेशव्यांचा मानस होता. त्यावरून मोठा कलह माजून राहिला. वाजसनेय पेशव्यांच्या म्हणण्यास कबूल होईनात. तेव्हां सुमारे शेंसवाशें शु. यजुर्वेद्यांस कैद करून कर्नाटकांत रवाना केले. याविषयीं एक आर्या प्रसिद्ध आहे ती अशी :—

> कर्नाटकांत नेले क्षेत्रींचे द्विज धरूनिया तेरा ।
> यवनादि शत्रु म्हणती बाजीराया नहीं धरम तेरा ॥

या प्रकरणांत सरकारी उल्लेख असा आहे:

It seems that Bajirao ordered a Temple at Trimbak to be consecrated by Konkanasths Black Yajurvedis and not by the local White Yajurvedis. The White Yajurvedis gathered in a mob to stop the consecration and were dispersed by Bajirao's orders, several of them being sent to prison; for this the community cursed him and at Nasik

the Yajurvedis' curse is believed to have been one of the chief causes of Bajirao's mistakes and ruin.

*Bombay Gazetteer Nasik. Vol. XVI. PP. 40*

इतकी दंडेली करून पेशवे व त्यांचे जातभाई यानीं आपली इच्छा तृप्त करून घेतली खरी, पण श्री त्र्यंबकेश्वराच्या पुढील नंदीस प्रतिष्ठासंस्कार न झाल्यामुळें त्यांस पेंढ्यांत गुंडाळून कुलुपांत ठेविलेला आहे व तो आजपर्यंत आहे तसाच तुरंगांत आहे. केव्हां बेट्याची कैद सुटेल ती सुटो !

इ.स. १७७७ त सामवेद्यांस पेशव्यांनीं जें अभयपत्र दिलें आहे त्यांत त्याची वृत्ती शु. य. वाजसनेय ब्राह्मणांनींच चालविण्याबद्दल स्पष्ट अनुज्ञा नमूद केलेली आहे. इ.स. १७९७ सालीं राघोबादादा पेशव्यांचा मुक्काम मुंबईस असतां शु. य. वाजसनेय ब्राह्मणांची पूजा करून त्यांस ते दक्षिणा देत असत व त्यांचा वेदोक्त आशिर्वाद घेत असत. शेवटले बाजीराव पेशवे वैतरणासंगमीं स्नानास गेले असतां त्यांना स्नानसंकल्प सांगण्यास शु. य. वाजसनेय ब्राह्मणच होते.

याप्रमाणें खुद्द पेशव्यानीं वेळोवेळीं सनदा, आज्ञापत्रें, अभयपत्रें दिलीं असतांहि वेळोवेळीं त्यांच्या जातभाईनीं शु. यजुर्वेद्यांना छळण्याचें आपलें पवित्र काम चालूंच ठेवलें होतें. पण या प्रकारच्या बखेड्यात चित्पावनांचा दुराग्रह व अन्याय असतांना व त्यानीं पेशव्यांच्या जोरावर अत्याचार केले असतांना एकाहि प्रकरणांत कोणा चित्पावनास पेशव्यांनीं शिक्षा दिल्याचा दाखला नमूद नाहीं, ही गोष्ट विशेषेंकरून लक्षांत ठेविली पाहिजे. इ.स. १८०० च्या सुमारास यादव नाईक शु. य. यांची सून रमाबाई हिनें शिरगांवास श्री सिद्धेश्वराची लिंगस्थापना पंचायतनसुद्धा केली होती व त्या देवाची पूजाअर्चा यजुर्वेदी व चित्पावन हे उभयतां एकत्र करीत असतां सन १८०८ मध्यें वसई येथील एकोणीस चित्पावन उपव्द्याप्यांनीं एके दिवशीं पहाटेस देवालयांत शिरून ते पंचायतन लिंगासुद्धां पहारांनीं खणूं लागले. तेव्हां त्यांना श्रीमंत पेशव्यांच्या व गाई ब्राह्मणांच्या शपथा घालून हें कर्म न करण्यास शु. य. ब्राह्मणांनीं विनविलें असतांही त्यांनीं लिंगासुद्धा शाळुंकेसहित पंचायतन पहारांनीं खणून काढून तें निर्मळास नेलें. तेव्हां पेशव्यांकडे फिर्याद गेली. त्यावेळीं पेशव्यांनीं चौकशीचा मोठाच डौल घालून दोन्ही पक्षांकडून पुष्कळ साक्षीदारांच्या जबान्या वगैरे घेतल्या. त्यांत शेवटीं असें निष्पन्न झालें कीं शु. य. ब्राह्मणांस अधिकार संपूर्ण असून त्यांना विनाकारण छळण्यासाठी हा सारा प्रकार चित्पावन उपव्द्याप्यांनीं केला. त्यावरून पेशव्यांनीं आज्ञापत्रें देऊन श्रीसिद्धेश्वराची पुन्हां प्रस्थापना करण्यास सांगितलें. या खटल्यांत बाजीराव रघुनाथ पेशवे यानीं वे. रा. गंवा नाईक जावळे वगैरे शु. य. मंडळीनां जें निवाडपत्र दिलें त्यांतील उद्‌गार येणेंप्रमाणें आहेत :—

"तुम्ही वृत्त्यंशी पेशजीपासून वृत्ती अनुभवीत आलां, ब्राह्मण तुम्हांस विडा दक्षिणा देतात व तुम्ही ब्राह्मणांस देतां व तुम्ही जागजागीं देवालयें बांधोन श्रीची स्थापना करीत आलां. याची

चौकशी करितां पूर्वी बिम्बराजे यांनीं वतनें तुम्हांस दान देऊन शिलालेख करून ठेविले ते व सड, साक्ष, भोगवटा व वसईकर ब्राह्मण तुम्हांस कागदोपत्रीं ' वेदमूर्ती ' म्हणोन नमस्कार लिहितात. याप्रमाणें कैलासवासी चिमणाजी बल्लाळ व भाऊसाहेब यांचे पत्रीं नमस्कार लिहिण्यांत व ग्रंथातरीचा आशय पाहतां तेथेंही पळशे ज्ञाती भिन्न आहे असें लागत नाहीं. सदहू अन्वये ब्राह्मण कर्माची पुरवणी दिसण्यांत येते.''

असे छळांचे प्रकार शु. य. ब्राह्मणांवर ठिकठिकाणी कितीक तरी झाले. त्यांची उपलब्ध असलेली साग्र माहिती येथें छापणें शक्य नाहीं, तथापि ती वाचून मन खिन्न होतें, आणि असें वाटू लागते कीं धर्माच्या नांवाखालीं असले अत्याचार करणाऱ्या त्या पूर्वजांपेक्षा सध्याची धर्मलंड पिढी बरी; कारण ती एकमेकांचा सध्यां तसा छळ करण्यास तरी प्रवृत्त होत नाहीं. असो. त्या काळ्याकुट्ट आणि पेशव्यांच्या खऱ्याखुऱ्या कलीयुगांत चित्पावनांनीं शु. यजुर्वेद्यांस राजसत्तेच्या धमकीनें माजी करण्याकरितां ज्या अनेक खटपटी केल्या, त्यांच्या बुडांशीं शु. यजुर्वेद्यांनीं चित्पावनांशीं रोटीबेटीव्यवहार करावा व त्यांनीं आपल्या वृत्त्या निमूटपणें चित्पावनांच्या हवालीं कराव्या, हा मुख्य हेतू होता, हें पुन्हा सांगण्याचे कारण नाहीं. शु. यजुर्वेद्यांनीं चित्पावनांचा हा डांव प्रथमपासूनच ओळखला होता आणि त्यांनीं अनंत हालअपेष्टा, अपमान व नुकसान सोसूनहि त्या डांवाला आपली मान मुळींच वांकविली नाहीं. यावरून या समाजाच्या मनोनिग्रहाची व चिकाटीची कोण तारीफ करणार नाहीं ? पेशव्यांच्या अंमदानींत शु. यजुर्वेद्यांवर जेवढी म्हणून ग्रामण्यें झालीं, त्यांत एक विशेष गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे; ती हीच कीं स्वत: पेशव्यांनीं या भानगडींत आपलें आंग आहेसें कधींहि दाखविलें नाहीं आणि वेळोवेळीं त्यांनीं जरी शु. यजुर्वेद्यांना अभयपत्रें, करारपत्रें व आज्ञापत्रें देण्यांत कसूर केली नाहीं, तरीपण त्यांचा छळ करणाऱ्या चित्पावन आरोपींस त्यांनीं कधींहि शिक्षा केल्या नाहींत. या मासल्याची एकदोन ठळकठळक उदाहरणें येथें नमूद करून या प्रकरणाची रजा घेऊं.

श्रीमंत सवाई माधवराव पेशव्यांच्या कारकिर्दीत गोदावरीच्या तीरीं टोकें येथें पेशव्यांनीं व चित्पावनांनीं मोठमोठे इमारती वाडे बांधून वस्ती वाढविली, व तेथील सिद्धेश्वराचे देवालयाचा जीर्णोद्धार करावयाचें ठरविलें. यावेळीं देवाची पुन्हां स्थापना करावी व त्यांत शुक्ल यजुर्वेद्यांस वृत्यंश देऊं नये आणि तें कार्य उरकण्यासही त्यांना बोलाऊं नये असें त्यानीं ठरविलें. ही बातमी प्रवरा संगमावर राहणारे वे. शा. सं. शिवराम दिक्षित यांना समजली. तेव्हां दिक्षित मजकूर हे नाना फडणवीसांचे भेटीस पुण्यास गेले. त्यावेळीं नानांच्या जवळ असलेल्या चित्पावनांनीं दिक्षितांचा उघड उपमर्द करून त्यांस म्हटलें कीं तुम्हांस यजमानांचें पाचारण असल्यास या. तेव्हां दिक्षित हे नानांचा सत्कार न घेतांच उठून गेले व त्यांनीं नानास सांगून पाठविलें कीं प्रतिष्ठेचें कर्म आग्रहानें करूं नये. मर्जी असल्यास शास्त्रार्थ करा, नाहीतर अनर्थास पात्र व्हाल. तेव्हां नानानें उलट सांगून पाठविलें कीं तुह्मांपाशीं काय पुरावा असेल तो दाखवावा. त्यावरून दिक्षितांनीं सनदा कागदपत्रें नानाकडे पाहण्यास पाठविलीं. तेव्हां आपला पक्ष बुडतो असें पाहून चित्पावन फारच चिडले. खुद्द नानाफडणीसाचा सासरा हिरण्यकेशी शास्त्री चवताळून शु. य. च्या प्रतिनिधींस म्हणाला '' ह्या सनदा व कागदपत्रांच्या बळकुट्या करून * * * त ठेवा.''

अशा प्रकारें कोलाहल करून कागदपत्र आणणाऱ्या गृहस्थांची हेटाळणी करतांच ते बिचारे परत निघून गेले. सवाई माधवरावांस हें वर्तमान कळवावें तर ते पेशवे खरे, पण नानाच्या हातांतलें बाहुलें. तेव्हां दिक्षितांनीं नानाचीच पुन्हां एकदां समजूत घालण्याचा प्रयत्न केला. त्यावरून नानानें चित्पावनांची समजूत घालण्याचा वरवर प्रयत्न केला. हा प्रयत्न वरवर आहे हें ओळखण्याइतकी चाणाक्ष बुद्धी चित्पावन ब्राह्मणांत असल्यामुळे त्यांनीं नानालाच उलटा दम भरला आणि स्वज्ञातीच्या हिताहिताचा तो प्रश्न पडल्यामुळें, नानांनींहि त्यावर विशेष डोके खाजविलें नाहीं.

दुसरे दिवशीं टोकें येथें प्रतिष्ठासमारंभ सुरूं झाला. तेव्हां शु. यजुर्वेद्यांची खात्री झाली कीं आपली वृत्ती आतां कांहीं रहात नाहीं. तेव्हां त्यांनीं चित्पावनांकडे जाऊन त्यांची प्रार्थना केली कीं " हे भूदेवहो, तुम्ही सर्वसमर्थ आहांत, सत्ताधीश आहांत, तेव्हां तुम्ही जें कराल तें होईलच परंतु आम्हांस गंध लावावें व आमचा सत्कार करावा." या विनवणीनें उलट अधिक खवळून जाऊन वेदोनारायण चित्पावनांनीं जवळच्या यवन व शूद्र शिपायांस हुकूम करून साऱ्या शुक्ल यजुर्वेद्यांस तेथून धक्के मारून बाहेर घालविलें.

ही कागाळी शिवराम भट्ट दिक्षितांस कळतांच त्यांनीं सर्व शु. यजुर्वेद्यांस सांगितलें कीं, बाबानों शास्त्रार्थाचा प्रश्न असल्यास मी एकटा सगळ्यांस पुरा पडेन. परंतु या ठिकाणी मी काय करावें ? तुमची तयारी असल्यास प्रतिष्ठा समारंभात जाऊन दक्षयज्ञासारखा सत्कार करावा. त्यावरून सर्व शु. यजुर्वेदी समारंभाच्या मंडपांत शिरले. चित्पावन व त्याचे अनुयायी यांजवर त्यांनीं यथेष्ट हस्तप्रहार चालविले. " कोणाचे भोजनपात्रांची दुर्दशा, कोणाची शेंडी, कोणाचें धोत्र, कोणाचें यज्ञोपवीत इत्यादि धरधरून थत्ते, भिडे, फडके शास्त्री इत्यादि कोंकणस्थांस चापटपोळ्या मुष्टीमोदकांचे देहधर्म पुरीषोत्सर्जन धोत्रांत होईपर्यत यथास्थित भोजन दिलें व त्यांनीं कुंडांत पात्रप्रक्षेप केला. पळून जाऊं लागल्या कारणानें कित्यकांस गणेशटोपी घालून सर्व गात्रांचें कदन हस्त स्वरानें केलें कित्येक नागवे उघडे होऊन बसले. तेव्हां ग्रामस्थ स्त्रिया व मुलांची जी हांशी झाली ती लिहिता पुरवत नाहीं."

हा ठोकाठोकीचा प्रकार झाल्यावर चित्पावन अगदीं दीनवदन करून म्हणूं लागले कीं बाबानों आम्हांला मारूं नका, असें आम्हीं पुन्हां केव्हांहि करणार नाहीं. तेव्हां क्षेत्रस्थ शु. य. नीं समिधाहोमद्रव्यादि त्या कुंडांत घालून अग्नि प्रज्वलित करून ते घरोघर गेले. तेव्हां लज्जित झालेले चित्पावन मुकाट्यानें आपापल्या घरीं चालते झाले. यावेळीं श्रीमंत सवाईमाधवराव पेशवे आपल्या महालांत स्वस्थ बसले होते, पण चित्पावन बसले रुसून. तेव्हां श्रीमंतांनीं शिवराम दिक्षितास पालखी पाठवून बोलावून नेलें व उभयपक्षांचा समेट करून देऊन सिद्धेश्वराची प्रतिष्ठा केली.

वरील प्रकारामुळें चित्पावन जरी हतवीर्य झाले तरी त्यानीं शु. यजुर्वेद्यांशीं वरवर गोड वर्तन ठेवून, त्यांच्या सूडाचा निराळाच एक पंथ शोधून काढला. ते त्यांचा जेथें तेथें मोठा आदरसत्कार करूं लागले, मेजवान्या देऊं लागले, परंतु अंदरकी बात रामालासुद्धां न कळण्याइतकी गुप्त ठेवली. शु. यजुर्वेदी हे जसे मनानें खंबीर व शास्त्राध्ययनांत वरचढ होते, तसं श्रीमंतीच्या

बाबतींतहि ते चित्पावनापेक्षा सवाई खंबीर आणि वरचढ होते. यांच्या बायका व मुलीं ज्या वेळीं गोदातटाकीं पाणी भरण्यास किंवा कपडे धुण्यास जात असत, त्यावेळीं त्या आपल्या आंगांवर भरगच्च सोन्यामोत्याचे दागदागिने घालून जात असत. अझूनहि ही पद्धत त्यांच्यांत आहे. अर्थात् त्यांच्या श्रीमंतीचा अजमास वाटेल त्याला घरबसल्या करण्यास अडचण पडत नसे. शु. य. पैशाच्या बाबतींत धनत्तर असल्यामुळें ते कोणाचीच फारशी पर्वा करीत नसत. ही त्याची संपत्ति लुटवून त्यांना भिकेस लावल्याशिवाय ते वठणीला येणार नाहींत, असा चित्पावनांनीं बेत केला. पुढें लवकरच संधान बांधून हरीबा होळकराच्या पेंढार सैन्याकडून गोदातटाकीचीं सारी क्षेत्रें लुटविलीं. शु. यजुर्वेद्यांस राखेचे व मिरचांचे तोबरे देऊन त्यांजकडून पैकाअडका व सोनें पिळून काढलें, त्यांच्या बायकांच्या आंगावरील दागिने लुटले, असा एकच हाहाकार उडाला. पुढें शु. यजुर्वेदी जेव्हां पेशव्यांकडे फिर्याद घेऊन गेले, तेव्हां त्यानीं व सर्व चित्पावनानीं मोठा खेद प्रदर्शित केला. " हरहर ! काय हो हा अनर्थ या धनगरानें केला ! आमच्या राज्यांत ब्राह्मणांस त्रास ? मग आम्ही कशाचे ब्राह्मण ! " इत्यादि बोलून शु. यजुर्वेद्यांचे समाधान केलें व त्याचा मोठा सत्कार केला. पण हें सारें पुण्यांतल्या पुण्यांत बाहेर गंगथडीची लुटालूट चाललीच होती. या लुटालुटींत शु. यजुर्वेद्यांचे कागद सनदा वगैरेचा नाश फार झाला आणि गंगातीर उजाड होऊन शु. य. दशादिशांस निघून गेले.

शुक्ल यजुर्वेदी वाजसनेय ब्रांह्मणांमध्यें पोटभेद नाहींत, तथापि उत्तर कोंकणांतील वसाहतवाल्या शु. य. शीं चित्पावनांचा द्वेष अझूनहि कडकडीत असल्यामुळें ते ' पळश्यां 'ना मूळजातीपासून भिन्न किंबहुना अभ्रष्ट भासविण्याचा यत्न नेहमीं करीत असतात. फार दूर कशाला ?' राष्ट्रीय ' चमूचे एक कप्तान विद्वद्वर्य रा. रा. महादेवजी बोडस यानीं ' वर्णव्यवस्था ' (चित्रमयजगत् जाने. १९) लेखांत, " मुंबईतील पळशे लोकांनीं ब्राह्मण म्हणण्याकरितां कित्येकदां कोर्टाचे उंबरे झिजविले " असा कुत्सित व इतिहासाचें गाढ अज्ञान दाखविणारा शेरा ठोकलाच आहे ना ? हा शेरा वादार्थ घटकाभर खरा मानला तरी त्यांतसुद्धां शु. यजुर्वेद्यांची उर्फ ' पळश्यां'ची माणुसकी चित्पावनांपेक्षां कांकणभर अधिक सरस ठरते. " स्वतःला ब्राह्मण म्हणण्याकरितां पळश्यांनीं कोर्टाचे उंबरे झिजविले " त्यांत त्याची कायदेप्रीति व सनदशीरपणा तरी दिसून येतो; पण स्वतः सनदशीरपणाचे चौघडे अलीकडे त्रिकाळ बडविणाऱ्या चित्पावनांच्या पूर्वजांनीं स्वतःला ब्राह्मण ' ठरविण्याकरितां ' आपल्या अत्याचारी स्वार्थाला साऱ्या मराठेशाहीचा बळी दिला, त्यांत त्यांचा कोणता सद्‌गुण सिद्ध होत असेल तो सध्यांच्या चित्पावन बृहस्पतीनींच जगाला समजाऊन द्यावा हें बरें ! स्वतः एखाद्यावर हल्ला करावा आणि तो धडपडूं लागला किंवा रडूं लागला म्हणजे आपण म्हणावें ' कायहो, कितीहो हा व्रात्य ? एकसारखा रडूनओरडून आकांडतांडव करीत आहे! ' अशांतलाच रा. बोडसांच्या विधानाचा झोंक आहे. शु. यजुर्वेद्यांनीं आपलें ब्राह्मण्य सिद्ध करण्याकरितां कधींहि कोर्टाची पायरी चढल्याचें ऐकिवात नाहीं किंवा त्यांच्या इतिहासावरूनहि तसें दिसून येत नाहीं. त्यांच्या वृत्त्या हरण करण्यास सोकावलेल्या चित्पावनांनीं जेव्हां जेव्हां त्यांच्यावर हल्ले चढविले तेव्हां तेव्हां मात्र त्यांनीं त्यांस कोर्टाचे पिंजरे दाखवून आपले हक्क सिद्ध करून घेतले आहेत. वास्तविक

ज्या चित्पावनांनीं आगाशीच्या श्रीभवानीशंकराच्या लिंगाससुद्धां प्रायश्चित देण्यास सोडलें नाहीं, ते काय या भोळ्या कायदेप्रिय 'पळशां'ची पर्वा थोडेच करितात? बरें, पळशे नांव तरी कोणी काढलें ? तेंहि या अद्वितीय चित्पावन टांकसाळींतून अलीकडेच बाहेर पडलेलें आहे. अगदी प्राचीन अंधाराचा इतिहास बाद केला तरी शके १२२१ त राजा बिंबानें या गंगातीरस्थ ब्राह्मणांस कोंकणप्रांतीं आणून स्थायिक केल्यापासून तों शके १६६८ पर्यंत यांना ' यजुर्वेदी ब्राह्मण ' हीच संज्ञा होती. पोर्च्यूगीजांच्या राज्यांतसुद्धां त्यांना हेंच नांव होतें. फार काय पण चित्पावन पेशव्यांनींसुद्धां आपल्या कागदोपत्रीं यांना ' यजुर्वेदान्तर्गत वाजसनेय ब्राह्मण 'असेंच म्हटलें आहे. अर्थात् ' पळशे ' ही संज्ञा शु. यजुर्वेद्यांवर बळजबरीनें लादण्याचें पुण्य कृत्य त्यांच्याशीं अहोरात्र चुरस करणाऱ्या उपऱ्या चित्पावनांनींच संपादिलेलें आहे व या पुण्याईच्या समर्थनार्थ :—

**कैवर्तकस्य भिल्लस्य पिता भवति यो नरः ।**
**मातायां गोलकी नारी पालाश ज्ञातिरुच्यते ॥**

हा असंस्कृत व अशुद्ध श्लोक धर्मग्रंथांतहि घुसडण्यास त्यांनीं कमी केलेलें नाहीं. परंतु इतर ऐतिहासिक पुरावा जरी बाजूला ठेवला तरी श्रीमच्छंकराचार्यांनीं शके १७४५ (सन १८२३) सालीं दिलेल्या आज्ञापत्रांत असें स्पष्टच म्हटलें आहे कीं " **हे यजुर्वेदी देशस्थ ब्राह्मण. यांस कोंकणप्रांतीं येऊन भूपप्रसन्नतानुग्रहें वृत्ति संपादन करून बहुत वर्षे राहिले. तदनंतर कोंकणस्थचित्पावन यांचे ज्ञातीनें तुमच्या वृत्तिहरणार्थ इतर ज्ञाती यांस अनृत द्वेष समजावून विद्वेषता वाढवून ' पळशे ब्राह्मण ' असें सांगो लागले. परंतु तुमचे ' पळशे ' असें नांव ज्ञातीस नाहीं व शास्त्रांतही हें नांव नाहीं, द्वेषानें म्हणतात.**"

चित्पावनांनीं शु. यजुर्वेद्यांचा बराच छळ केला. तरी सुद्धां इंग्रजी अंमल असलेल्या मुंबई बेटातील शु. य. रहिवाश्यांवर मात्र त्यांच्या परशुरामास्त्राचा कांहींहि परिणाम झाला नाहीं. यांचे कारण वे. शामाचार्य नांवाच्या यजुर्वेदी ब्राह्मणास ता. १ ऑगष्ट १७२३ इ. रोजीं इंग्रज कंपनीनें एक ' पेटंट ' उर्फ सनदपट्टा वंशवतनी करून दिला होता. त्या सनद पट्ट्यानें मुंबई बेटांतील हिंदुलोकांकडील धर्मसंबंधी हक्काचें स्वामित्व त्याच्या हातीं असल्यानें चित्पावनांसारख्या उपऱ्या ब्राह्मणांची ढवळाढवळ तेथें कांहीं चालत नसे. उलट, कोणी त्याच्या अधिकारमर्यादेंत अपराध केल्यास टाऊन हॉलच्या पटांगणांत त्याच्या हातचे बाराबारा फटके खाऊन हद्दपार व्हावें लागत असे, असें म्हणतात.

पेशवाईचा अस्त होऊन इंग्रजांचा अंमल झाल्यावरसुद्धां चित्पावनांनीं शु. य. नां उपसर्ग देण्याचें आपलें पवित्र ब्राह्मणकर्म ठिकठिकाणीं चालू ठेवलेंच होतें; व आजदिनतागायतसुद्धां या प्राचीन परंपरेची री ओढणारे परशुरामाचे अवतार चित्पावन समाजांत मधून मधून दृष्टीस पडतच असतात.

इ.स. १८२३ सालीं ठाणें येथील श्रीसिद्धेश्वराच्या अर्चेबद्दल चित्पावनांनीं वाद उत्पन्न केला. त्यावरून हें प्रकरण फिर्यादीपर्यंत जाऊन अखेर निवाडा शु. यजुर्वेदी यांच्याच तर्फे झाला.

इ.स. १८५९ सालीं वसईस असाच एक खटला निघाला. तेथील शु. यजुर्वेदी ब्राह्मण ज्योतिष व उपाध्येपणाची वृत्ती चालवीत असतां चित्पावन व कऱ्हाडे यांनीं त्यांची वृत्ती बंद करण्याचा उपक्रम केला. लग्नांत वृत्तीवाले ब्राह्मणांस मुद्दाम वगळून दुसऱ्याच जोशाकडून घटिका मांडवून पत्रिकापूजन केलें. त्यावरून चौकशी होऊन वृत्यंशी शु. यजुर्वेदी यांचे तर्फे निवाडा झाला.

इ.स. १८७३ सालीं आगाशीसही वरील प्रमाणेंच प्रकार झाला. तेव्हां तें ही प्रकरण कोर्टापर्यंत जाऊन निकाल शु. यजुर्वेदी वृत्यंशी यांचे तर्फे झाला.

पेशवाईत आगाशी येथें श्रीभवानीशंकराचें देऊळ बांधिलें होतें. तें बांधिल्यापासून शु. यजुर्वेदी व चित्पावन हे देवालयांत एकत्र बसून पूजा अर्चा करीत असतां इ.स. १८७२ मध्यें पर्जन्यानिमित्त संततधाराभिषेक व्हावा म्हणून उभय जातींनीं विचार केला. परंतु चित्पावन आपला अभिषेक प्रथम व्हावा असें म्हणूं लागले व वाजसनेयी तें कबूल करीनात ! तेव्हां चित्पावनांनीं देवालयास कुलूप लावून टाकलें. हें प्रकरण कोर्टात जातां शु. यजुर्वेदी यांच्या तर्फे निकाल झाला. या खटल्यांत एका चित्पावनानें अशी खोटी साक्ष दिली कीं बर्डे या नावाच्या एका इसमास वाजसनेयाकडे जेवल्यामुळें प्रायश्चित दिलें ! वास्तविक बर्डे हा कैक वर्षे वाजसनेयांकडे जेवीत होता व त्याजबरोबर ज्या त्याच्या इतर आप्तेष्टांनीं व जातभाई चित्पावनांनीं पंक्तिव्यवहार केला त्यांना कोणी केव्हां प्रायश्चित दिलें त्याचा कांहींच पत्ता नाहीं !

शु. य. ब्राह्मणांच्या ग्रामण्यांचा इतिहास अत्यंत विस्तृत आहे. त्याचा या थोडक्या जागेंत समावेश करतां येणें शक्य नाहीं. तथापि शितावरून भाताची परीक्षा करतां येण्याजोगा मजकूर आम्ही दिला आहे. सरतेशेवटी याच ज्ञातींतील लोकप्रिय कविराज **कै. मोगरे** यांच्या प्रासादिक काव्यशब्दांत भरतवाक्य करून आम्ही या प्रकरणाची रजा घेतों.

## आर्या.

**आज उद्यां वा कालें तुमचे उद्देश सिद्ध होतील ॥
माध्यंदिनचि न इतरहि युष्मच्छमलाभ विप्र घेतील ॥ २१ ॥**

**शमुनि कालवशें हें सर्वहि लोकापवाद वावटळ ॥
जनमतवातावरणीं अविचाराचा नुरेल लेश मळ ॥ २२ ॥**

**सदसद्विचार सूर्य प्रगटुनिया लोकमानसाकाशीं ॥
अज्ञानध्वान्ताच्या विलया नेईल सर्वथा राशी ॥ २३ ॥**

**अन्योन्यवैर सोडुनि भेटाया आपआपल्या भावां ॥
गौड द्राविड सारे प्रेमानें मारतील हो धांवा ॥ २४ ॥**

**आनन्दाश्रुजलानें अन्योन्यांच्या तनूस न्हाणून ॥
म्हणतिल चुकलों मुकलों होतो निजबांधवां न जाणून ॥ २५ ॥**

## गौडसारस्वत ब्राह्मण व पाठारे प्रभू.

या ज्ञातींवरील ग्रामण्यांची हकिकत आमच्याजवळ बरीच आहे. परंतु इतर ज्ञातींप्रमाणें आपापल्या ज्ञातीच्या ग्रामण्यप्रकरणाचा इतिहास स्वतः तपासून पहाण्यास यांच्यापैकीं कोणी इतिहासज्ञ वेळेवर न आल्यामुळें तीं प्रकरणें तशीच ठेवावीं लागलीं, याबद्दल फार दिलगिरी वाटते.

---

### * परमेश्वराची प्रार्थना. *

जावो लयाला मतभेद सारा
एका वरो भारत या विचारा
महाराष्ट्र जाणो झणि ऐक्यवर्म
देवा ! जनीं चेतवि राष्ट्रधर्म.

# परिशिष्ट

## चित्पावनांचा इतिहास

ग्रामण्यांचा इतिहासावरून वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल कीं त्यांतील मुख्य चळवळ्ये चित्पावन हे होत. अमक्याला वेदोक्ताचा अधिकार आहे आणि तमक्याला नाहीं ; हा ब्राह्मण हा शूद्र ; हा अनुलोम हा प्रतिलोम इत्यादि नाना प्रकारच्या सबबी काढून इतर समाजांचा ज्यांनी सत्तामदाच्या धुंदींत अनिर्वाच्य छळ केला, ते हे चित्पावन तरी कोण ? यांचे अधिकार तरी कोणते ? यांची उत्पत्ति काय ? आणि यांना इतकें धर्मगुरूत्वाचें साम्राज्य-सिंहासन कधिं व कोणीं दिलें ? हे किंवा असलेच प्रश्न साहजीकच उद्भवतात. या प्रश्नांना समर्पक उत्तरें देणें किंवा त्या प्रश्नांची चर्चा करणें हें आमच्या ताकदी बाहेरचें आहे ; म्हणून ज्यांना हा अधिकार होता,इतिहासशास्त्री किंवा विद्वान् पंडीत म्हणून ज्यांची मान्यता आधुनिक एकाहि चित्पावनाला किंवा कोणालाहि अमान्य करतां यावयाची नाहीं, अशाच मंडळींचे उद्‌गार व त्यांनी चित्पावनांच्या इतिहासाबद्दल लावलेले शोध यांचा येथें परामर्ष घेण्याचें ठरविलें आहे. खालील उताऱ्यांत नमूद होणाऱ्या मतांबद्दल आमचें स्वतःचे असें निश्चित मत काहींहि नाहीं. लोक काय बोलतात हे आम्हीं नमूद करीत आहोंत, तें मान्य करणें किंवा खोडून टाकणें हे इतिहाससंशोधक म्हणविणाऱ्या आधुनिक विद्वानांचें काम आहे ! तें त्यांनी खुशाल करावें, आमची कांही हरकत नाही.

### (१) कै. जीवनसव चिटणीस :—

(१) सह्याद्रिखंडात चित्पावनांची उत्पत्ति परशुरामांनें कोळ्यांपासून केली अशी कथा आहे. या कथेंतील बीज अलिकडील शोधांवरून जी माहिती मिळते तिला जुळतें असें आहे ; परंतु एकंदर कथा बनावट दिसते. परशुराम आणि चित्पावन हे समकालीन असते तर द्रविडांप्रमाणें चित्पावनांचा उल्लेख भारतात आला असता. भारतात चित्पावनांचा उल्लेख नाही. तो सह्याद्रिखंडात मात्र आहे. हा ग्रंथ स्कंदोवाच या नावाखाली लिहिला गेला आहे म्हणून तो भारतानंतरचा होय.

(२) चित्पावनांचा वर्ण, त्यांचे डोळे वगैरे यहुदी लोकांशीं मिळतीं दिसतात. स्कंदपुराणांतील त्यांच्या उत्पत्तीचें जें बीज कीं, पश्चिम समुद्रांतून वाहून आलेल्या चौदा प्रेतांपासून चित्पावन केलें तें बीजही अलिकडील शोधांस बळकटी आणतें. मलबार प्रांती परशुरामशक म्हणून चालू आहे त्याला " कोल्लम आंडु " असे म्हणतात. त्याचा अर्थ ' पश्चिमेकडील वर्ष ' असा आहे. हिंदुस्तानांतील अगदीं पश्चिमेकडील लोकांत चित्पावनांचा म्हणून जो परशुरामशक तो ' पशिचमेकडील वर्ष ' या नावाने ज्या अर्थी चालू आहे त्या अर्थी त्यांत ध्वनित केलेला पश्चिमेकडील प्रदेश म्हणजे पश्चिम (अरबी) समुद्राच्या पलिकडचाच असला पाहिजे असे मानावें लागतें. तेव्हां यावरूनही चित्पावन हे हिंदुस्तानाबाहेरून आलेले लोक असावेत असें दिसते. शिवाय परशुरामशकाचा आरंभ व नोहाच्या जलप्रलयाचा काल हेही जुळतात, हे लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

(३) चित्पावनांसंबंधानें पूर्वापार ग्रह काय आहेत यासंबंधानें पाहीले तर हे लोक मोठे हुशार, बुद्धिमान व मोठे कल्पक, त्याचप्रमाणे अधिकारी व संपत्तिवान असतां व ब्राह्मणधर्माचे नियम मोठ्या काळजीपूर्वक पाळीत असतांही देशस्थ वगैरे ब्राह्मण त्यांस कमी मानीत व अजूनही थोड्या बहुत प्रमाणाने मानतात. पूर्वी त्यांचा धंदाही हलक्या प्रतीचा होता. हरकारू किंवा गुप्त बातमीदार हे लोक असत. बाळाजी विश्वनाथ यास पेशवाई मिळाल्यापासून या जातीचा वास्तविक उदय व उद्धार झाला. देशस्थ ब्राह्मण यांजबरोबर अन्नव्यवहार करीत नसत. पेशव्यांनी पंत प्रतिनिधींच्या मार्फत तैलंगी ब्राह्मणांस दुप्पट दक्षिणा वगैरे देऊन अन्नव्यवहाराची सुरूवात केली. तथापि पुरंधरे यांचे एथें पेशव्यांचे पान निराळेंच मांडले होतें. पेशव्यांनी पुढें इतर ब्राह्मणांशी शरीरसंबंध घडवून आणण्याच्याही खटपटी केल्या. संपत्ति व अधिकार हाती असल्यामुळे त्या खटपटींत त्यांना यश आलें हे स्वाभाविकच आहे. या कृतीनें पेशव्यांचा सुधारणा करण्याचा उच्च हेतु होता असें अलिकडे दर्शविण्यांत येतें. परंतु आपल्यांतील कमीपणा घालविण्याकरितां या खटपटी होत्या असेंच इतिहासावरून दिसतें देशस्थ वगैरे जुमानिनात म्हणून त्यांची वतनेंहि पेशव्यांनी काढिलीं. शेवटचा बाजीराव पेशवा यास नाशिक एथें गंगेवर एका विशेष घाटावरून (गणेश टेकडीवरून) गंगेचे स्नानास उतरूं दिलें नाही असें ग्रँटडफ म्हणतो.

(४) चित्पावनांचे पूर्वजांची माहिती व त्यांचे ठिकाण यासंबंधानें लोकांत एकदा शंका उत्पन्न झाली. तेव्हां मलबार प्रांतातील लोकांनी चित्पावनांच्या उत्पत्तीसंबंधी माहिती मिळविण्याकरिता जाहीरनामे प्रसिद्ध केले. ठिकठिकाणी जाहीरनामे लाविले असून सभेंस चित्पावन हजर होते. त्यांना आपण हिंदु आहोत हें सिद्ध करतां आले नाहीं व त्यांच्या ब्राह्मण्यासंबंधानें कोणत्याही ब्राह्मणांनीं आपली संमति दिली नाहीं. सभेंत हे लोक आफ्रिका खंडातून आलेले आहेत असें सिद्ध झालें. चित्पावनासंबंधानें जो जाहीरनामा लावला होता तो कानडी भाषेंत आहे. त्यातील बराच महत्त्वाचा भाग ' सामाजिक धर्मसुधारणा ' पृ. २७५ वरून खालीं देतों :—

आफ्रिका खण्डद इजिप्त देशदिन्द बन्दिरुव इजिप्तवान् जिप्तवान या चितपावन (कोंकणस्थ) एवं जातिय निर्णयवु. चितपावन जातीय विषयवागी नडदिरुव रिकार्डुनु साद्यंत वागि सभेयवरु विमर्शे माडिनोडिद्दायितु. मत्तु प्रतिवंदु विषयद मेलु विचार माडि सभेयवरु पट्टिरुव अभिप्रायवु सल्पददे इवुगळंनु पर्यालोचीसलु चितपावन जातियु भरतखंड इल्ल आफ्रिका खण्डदेन्दु निर्णय वागिरुत्ते. मत्तु अवर जातियवराद शोधकरु ओप्पिरुवन्ते ये सभेय वरिगू निजवागि कण्डु बन्ददरिन्द भरतखण्डद ब्राह्मणरल्ल एन्दु निर्णयवागुत्तदे. ई आफ्रिका खण्ड हअर संसर्गदल्लि भरतखण्डद दशविरुद्ध शेरदे इरुवदु सदाचारक्के योग्य वागिधे.

ई सितपावन जातीय विषय वागि इष्टु खण्डित वाद निर्णयवु ईवरिगु यारिन्दलु माडल्पट्टिर लिल्ल. चितपावनरिन्द ईग सभेगे बन्दिरुव जबाबिनल्ली निराधारवागि बरेयल्ल पट्टिरुत्तदे. आधारवु इल्लदे होदरे यल्ला ब्राम्हणर संमति यन्नादरू कळूविस बेकेन्दु सभेइन्द केळल्ल पट्टित्तु. अदरन्ते

संमति यन्नु अथवा आधारवन्नुसुद्धा कळुविस लिल्ल, आद्दरिन्द सभेयवरु विचारवाडी चितपावन जातीयु आफ्रिकाखण्ड मुन्ताद द्वीपान्तर दिन्द बन्ददेन्दु निर्णइसल्ल पट्टितु.

चितपावनरु भरतखण्ड ब्राह्मण रोळगे शेर बेक्यन्दु असत्य साधन वन्नु माडुत्तारे, आदकारण भरतखण्डद ब्राह्मणादि चातुर्वर्ण दवरु इन्था असत्यक्के अवकाश उण्टागद हागे दक्षतेइन्द सत्यसाधनवन्नु माड बेकागिरुत्तदे. सत्यमेव जयते नानृतम्.

**भावार्थ** :––चित्पावनजातीच्या संबंधानें आलेल्या साद्यंत कागद पत्रावर व त्याचप्रमाणें आणखी ऐतिहासिक गोष्टी व अन्य विषय यावर सभेच्या लोकांनीं विचार करून जे कांहीं अभिप्राय ठरविले ते चांगल्या प्रकारें अवलोकन केले असतां चित्पावन जात ही भरतखंडांतील मूळची नव्हे, तर आफ्रिकाखंडांतील इजिप्त देशांतील होय, हें सिद्ध होतें. शिवाय त्यांच्या ज्ञातींतील शोधक लोकांनीं कबूल केल्याप्रमाणें व सभेच्या सभासदांनाही खरोखर दिसून आल्यावरून हे भरत खंडांतील ब्राह्मण नव्हेत असें सिद्ध होतें. आफ्रिकाखंडांतील या लोकांबरोबर हिंदुस्तानांतील दशविध लोकांनीं मिसळून रहाणें हें सदाचारास योग्य नाहीं. या चित्पावन जातीच्या संबंधानें कोणताही निश्चयात्मक ठराव अजून झाला नाहीं. चित्पावन लोकांकडून या सभेस जें कांहीं लिहून आलेलें आहे त्यास कांहीं आधार नाहीं. आधार जरी नाहीं तरी सर्व ब्राह्मणांची संमति निदान पाठवावी असें सभेकडून कळविलें होतें. तथापि संमति किंवा आधारसुद्धां पाठविला नाहीं. याकरितां सभेनें विचार करून चित्पावन जातीचे लोक आफ्रिकाखंड नामक द्वीपांतरांतून आलेले आहेत असें ठरविण्यांत आलें आहे. चित्पावन लोक हे भरतखंडांतील ब्राह्मण लोकांत मिसळण्याकरितां अधर्मी व मतलबी आचार विचार लोकांच्या मनांत बिंबविण्याकरितां खोट्यानाट्या युक्तिप्रयुक्तीनें प्रयत्न चालवितात. तस्मात् भरतखंडांतील ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या चारी वर्णांनीं चित्पावनांच्या खोडसाळपणाकडे वेळेवर मोठ्या दक्षतेनें व सावधगिरीनें असावें. सत्याचा जय होईल.

## (२) कै. प्रो. राजाराम रामकृष्ण भागवत :––(उद्‌गार.) सन १८८७

(१) कोंकणस्थ परशुरामाबरोबर आपला संबंध लावितात, तो केवळ आपलें अतिप्राचीनत्व सिद्ध व्हावें म्हणून. दुसरा अर्थ त्यांत मुळींच नाहीं. पृ. १०६. (२) कोंकणस्थ हे मूळचे प्रायः शेतकी करणारे लोक. हे थोडेबहुत कुळकरणाच्या संबंधानें पसरलेले दिसतात. पण यांस बरकत आली. बाळाजी विश्वनाथास पेशवाई मिळाल्या दिवसापासून. पृ. १०८. (३) पूर्वी कोंकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे यांचा संकर अष्टागर प्रांतीं बराच झालेला सुप्रसिद्ध आहे. पृ. ११०. (४) चित्पावन हे मूळचे शेणवी लोकांप्रमाणें गोकर्णाच्या जवळचे असल्यामुळें, जेथें हे गेले तेथें यांनीं आपलें अतिप्राचीनत्व स्थापन करण्यासाठीं म्हणून गोकर्णाजवळ विशेष माहात्म्य माजलेल्या परशुरामाचा आपणाबरोबर संबंध जाहीर केला. पण खरोखरी पहातां हे मूळचे पूर्वी लिहिल्याप्रमाणें प्रायः शेतकी करणारे लोक असून, शंकेश्वरच्या शंकराचार्यांच्या वेळीं यांस ब्राह्मणपणाचा लाभ झाला. पृ. ११०.

## (३) कै. रा. रा. रामचंद्र भिकाजी गुंजीकर, '' सरस्वति मंडळ '' सन १८८४.

(१) पूर्वी घांटावरील देशस्थ ब्राह्मण चित्पावन ब्राह्मणांचे पंक्तीस जेवावयास बसत नसत. परंतु त्यांनीं खटपट करून एक पंगत करविली. तथापि विद्येमध्यें हे मूढ असल्यामुळें देशस्थ त्यांचा तिरस्कार करीत. म्हणून त्यांनीं नाशीक, काशी, इत्यादि स्थळीं आपले लोक पाठवून त्यांजकडून विद्या करविली. वांई, त्र्यंबकेश्वर, इत्यादि स्थळी स्वजातीयांची क्षेत्रे केली. तैलंगणांतून तैलंग ब्रह्मण आणवून, त्यांना इतरांपेक्षां दुप्पट दक्षिणा देण्याचा कायदा करून, त्यांजकडून स्वजातीय मुलांना वेदाध्ययन करविले. (२) हे लोक मनाचे सरळ नसतात ; आणि अल्पस्वल्प स्वार्थासाठी राज्याचीं राज्यें धुळीस मिळविण्याला मागेंपुढें न पहाणारे लोक या जातीमध्यें आजपर्यंत पुष्कळ उत्पन्न झाले, आणि त्यांनी आपले पराक्रम त्या रीतीनें दाखविले. (३) स्वजातीच्या हितासाठीं अन्यजातींशीं द्वेष करून त्यांचे जे वास्तविक हक्क किंवा अधिकार त्यांकडे दुर्लक्ष करणें, किंवा ते दाबून टाकणें हें मात्र वाईट. यद्यपि चित्पावन ब्राह्मणांमध्यें अशा प्रकारचे कित्येक लोक झाले खरे, आणि अजूनहि असल्या कोत्या मनाचे कित्येक त्यांच्यामध्ये आहेत, हेंहि खरें. (४) यांच्या आंगी आर्जवशक्ति हें मोठें कसब आहे आणि तेणेंकरून ते कसलेंही मोठें काम सहज तडीस नेतात. (५) या चित्पावन ब्राह्मणजातीमध्यें मुली विकून पैसे घेण्याचा धंदा फार चालतो आणि कोंकणामध्यें तर तो फारच आहे. (६) या लोकांनीं ' चित्पावन ' हा शद्व भाषेंतून मुळींच गाळून टाकण्याचा प्रयत्न केला आहे. जर त्या शद्वामध्यें कांहीं वाईट नाहीं, तर तो शद्व गाळून टाकण्याचा त्यांनी प्रयत्न कां बरें करावा? आणि ही गोष्ट खरीं आहे कीं, पुण्यामध्यें ' चित्पावन ब्राह्मण ' म्हणजे कोण, हें बहुशः अलीकडील मुलांना माहीतही नाही. अलीकडील चित्पावन सर्व आपणास ' कोंकणस्थ ' ब्राह्मणच म्हणवितात. वास्तविकपणें पाहतां कोंकणांतील चित्पावन, देवरुखे, किरवंत, कऱ्हाडे, वगैरे सर्वांस ' कोंकणस्थ ' हा शद्व लावावा. पण तसें न करतां चित्पावनांनीं आपणापुरताच हा शद्व पक्का करून घेतला. यावरून चित्पावन या शद्वापासून त्यांच्या मनामध्यें कांहीं तरी वाईट अर्थ येत होता असें दिसतें. परंतु कित्येकांनीं ज्यांचें चत्त पवित्र ते ' चित्तपावन ' असा अर्थ बसविला आहे. परंतु असा विलक्षण शद्व उत्पन्न होण्याला प्रसंग काय झाला, हें कोठेंही प्रसिद्ध नाहीं. आणि तसें त्यांचें पवित्र चित्त असल्याचें प्रमाणही दिसत नाहीं. ' पावन ' म्हणजे पवित्र हाही अर्थ पुनः ओढाताणीचाच आहे. (७) [ अ ] चित्पावन ब्राह्मण हिंदुस्थानांतील इतर ब्राह्मण लोकांपेक्षां फार गोरे असतात; त्यांचे डोळे घारे, बांधा प्रायः उंच आणि नाक सरळ असतें [ ब. ] चित्पावन ब्राह्मण ज्या प्रदेशामध्यें पूर्वीपासून राहत आले आहेत, त्या प्रदेशाला ' वर्वर ' कोंकण हें नाव आहे. [ क. ] बर्बर कोंकणाच्या थेट पश्चिमेस समुद्राच्या पलिकडे समोर आफ्रिकाखंडांतला ' इजिप्त ' म्हणून देश आहे, तेथें समुद्र किनाऱ्यापासून पश्चिमेस पन्नास कोसांवर ' बर्बर ' या नावाचें प्राचीन नगर आहे आणि त्या सर्व प्रदेशालाही ' बर्बरीदेश ' अशी सामान्य संज्ञा आहे. [ ड. ] बर्बरी देशांतील लोक हिदुस्थानांतील लोकांपेक्षा फार गोरे, त्यांचे डोळे घारे, बांधा उंच आणि नाक सरळ असतें. (८) ' चित्पावन ' हा शद्व ' जिप्तवान ' म्हणजे ईजिप्तवाला याचा अपभ्रंश; आणि ' बर्बर कोंकण ' म्हणजे कोंकणाच्या ज्या प्रदेशांत बर्बर देशचे हे लोक येऊन राहिले तो प्रदेश.

(९) या प्रदेशांतील चित्पावन ब्राह्मण आपणांस ' कोंकणस्थ ' ब्राह्मण म्हणवितात. परंतु दक्षिणेंत कानडा आणि मलबार या प्रदेशीं ' कोंकणस्थ ब्राह्मण ' हें नांव वैष्णव सारस्वतांतच आहे, चित्पावनांसनाही. तेथे चित्पावनांस ' चित्पावन ' हेंच नांव आहे, दुसरें नाहीं. (१०) गोमांतक मलबार इत्यादि स्थळीं पाहतां चित्पावनादिकांना ब्राह्मण हा शद्व कोणी लावीत नाहींत. ' ब्राह्मण ' आणि कुळंबी लोकांच्या भाषणांतील ' बामण ' हे दोन्ही शद्व तेथें केवळ सारस्वत ब्राह्मनांच लावतात, आणि चित्पावनादिकांना केवळ गुरवाप्रमाणें मानतात. मलबार प्रांतीं कोची, मंजेश्वर, इत्यादि स्थळीं सारस्वतांच्या देवळांमध्यें चित्पावनादिकांना मुळींच येऊं देत नाहींत. तेथें कित्येक स्थळीं तर सारस्वत ब्राह्मण चित्पावनांना विहिरीसही शिवूं देत नाहींत.

(4) The Peshwas, who attained sovereign anthority in the Mratha Nation, were of this class (Chitpawan, Cocanist) from this circumstance, and the power which it naturally threw into their hands, pretend to some superiority in castes; but these pretentions are not well founded. They are termed *Chitpawan* which, amongst other significations, means 'a dead body raised '. Their origin, according to what is mentioned in a Sanskrit work entitled. The Syhadree Kind was 14 dead bodies of defferent castes that had been Drowned in the sea, whence they were transported by Vishnu in his outar of Pureshram, after he had forced the sea to give up the Concan, or Pureshṛam Ksheter and re-animated to people his new country. From these 14 families sprang the Concani Brahmins, who are now distinguished by 60 surnames. The Deshist Brahmins, although they have surnames, prefer the distinction of their father's name, or the place of their residence, to their surname, which they will seldom mention.

The Concanists Brahmins, before the elevation of Balaji Vishwanath, commonly called the first, though in fact the fifth Peshwa, were not employed as clerks and men of business, but as " HARKAROOS " and spies. They carefully suppress or destroy all copies of the Syhadri Kind, where their origin is mentioned and a respectable Brahmin of Waee was, a few years ago, disgraced by Baji Rao for having a copy of it.

Grant Duff's " HISTORY OF THE MAHARATTAS. "

Cambray Edition, Page 9, Footnote.

(5) Mr. JAMES BURGES says as follows :—

Trichur is the capital of Cochin, southward Cranganore, where Jews and Syrian Christians have been established since the third or fourth Century A. D. It is the principle residence of the Black and the White Jews. BENNI ISRAILS say that their ancestors came to India about 16 or 18 hundred years ago, from a country northward (See Lands of the BIBLE-Volume 2nd, page 667) or from the northern Province to avoid persecution that followed in the train of its constant invasions by a host of conquerers. They were in number seven men and seven women who were saved from a waterygrave, on the occasion of ship-wreck, which took place near Chewl (चेऊल) about thirty miles to the south-east of Bombay. The place where they found the refuge is named Naugon (नागांव). They and their descendents met with considerable favour from the Native Princes, though they conceived themselves to be sometimes forced to conceal their principles. As they increased they spread themselves among the villages of the Konkan, particularly those near the cost lying between the Bankot river, and the road which traversers the Country between Panwel and Bhor ghaut. In their locality and also in Bombay in which they began to settle after it came into the possession of the English : their descendents are still to be found. (*Vide* page 667 Lands of BIBLE—Vol. II. by Jhon Wilson, D. D. F. R. S.). Thus their motive in coming to India was the safety of their lives and property, but although they went to a new place or to a new country they brought with them their misfortunes, and consequently the ship in which they came to their Indian refuge was wrecked near Hennery and Kennery Islands in the Indian ocean. These islands are about fifteen miles distant from Chewl which was a great emporium of trade with the Red Sea about 2,000 year ago. Of the ship-wrecked only seven women and seven men were saved and took refuge on the shores of Nagaon a village on the coast about six miles from Hennery and Kennery islands. Many of the drowned were washed away to the shores of the very village where the seven pairs took refuge, while others were carried to other shores, of which nothing was known until recent times.

Recent researches have discovered that the ancesters of the Konkanastha or Chitpawun Brahmins were probably some ship-wrecked foreigners who were cast ashore at the foot of the Sahyadri Hills. The 14 corpses of these foreigners were according to a Hindu Legend animated with life on a pyre or Chita by Parashuram as mentioned in the Hindu Puranas. The colony of these Chitpawuns was established at Chiplon. It seems that the ancestors of the Chitpawuns did not enter Konkan by land but came in from far beyond the sea. Their fair complexion, their light and grey eyes, and the legend of their ship-wreck corroborate the statement. Some say that the ancestors of this tribe have probably come by ships either from Egypt or through Egypt, while others maintain that they are the descendents of Jews from Barbary a province in Africa and that they came through Egypt.

(6) Such was their exalted position that the Peshwa at the head of the Maratha Confideracy, who held the most commanding station of any Indian sovereign, was long excluded from eating at table with any Brahmins of high cast.

Ward's India and the Hindoos.

pp. 199-200.

(7) Under the rise of Balaji Wishwanath Peshwa, who belonged to their (Chitpawan) class, the Chitpawans held a low position, and were known chiefly as *spies* or *harkaroos*. Even after several generations of power and wealth with strike attention to Brahmin rules, the purer classes of Brahmins refuse to eat with them, and it is said that when Bajirao the last Peshwa (1796-1818) was at Nashik, he was not allowed to go down to the water by the same flight of steps as the priests.

Bomay Gazetteer, (Poona) p. 101.

(8) The late Peshwa Bajiraw is the son of the famous Ragoba. Although his family is Brahminical, yet not being of the highest order, the purer, clases of Brahmins refuse to eat with them; and at

Nassick, a place of Pilgrimage near the source of Godavery, he was not allowed to descend by the same a flight of steps used by the holy priests. The Poona Brahmins affect an extreme purity, and abstain from animal food, and some of them object to eating carrots; but notwithstanding their sanctified abstinence, they are held in extreme contempt by their carnivorous brethern of Bengal and upper Hindoostan.

Description of Hindustan, By

Mr. Hamilton. Vol. II, p. 197.

(9) At length when sitting on the mountains of Concan (*i. e.* the Sayhadree range or Western Ghauts) he (Purushuram) espied on the shore below, the putrefied corpses of fourteen *Mlenchhas* (any people not Hindoos), which had floated there, borne by tides from distant lands to the Westward. Rama restored them to life, taught them religious knowledge and after converting them into Brahmins, performed his sacrifice. He, afterwads, by means of his fiery darts compelled Samudra, the Indian Neptune, to retire several miles from the foot of the Ghauts and allotted to his protegees the strip of land thus recovered from the sea. From these fourteen men sprang the Kukanastas or Concanes tribe of Maratha, and the pious Hindoo still discovers in their leneaments trace of a corpse-like expression of countenance inherited from their forefthers.

Goa and The Blue Mountains, By Richard

F. Burtoo. pp.14-15.

(10) This word is revillingly or jocosely derived from chita (चिता) the pyre, and Pavan (पावन) or pure. The two together signifying pure from the pyre. This rendering is based on *Puranic* legend which relates that Parashuram, the sixth incarnation of Vishnu, recovered miraculously from the sea the strip of land now forming the Konkan, the Sawantwadi Territory, Goa, Kanara and Malabar and made it over to Brahmans converted into that state from corpses placed on the pyre. Other would resolve the word into *Chitta* (चित्त) and

*Pavan* (पावन) the pure of heart. Both of these may be true, but the first has a historical value, as it seems to me and indicate that *the first ancestors of this tribe have probably come by ships either from some other part in India or from the opposite coast of Africa.* This is a section of the Kaunkana sub-division of the Dravidic class.

Late Rao Saheb Vishwanath Narayan Mandlik,
Journal of the Bombay Branch of the Royal
Asiatic Society January 1865.

(11) His new dominions being provided with no separate order of priesthood, Parshuram founded the caste of the Concan Brahmins, who are to this day disclaimed as such by those of the rest of India. They compose a large portion of the ruling characters in the Maratha State and in their various predatory incursions into other countries started to seek with avidity for the copies of a work containing the history of their origin,for the purpose of destroying it and the Eastern Brahmans affirm that the orders for this purpose given to their illiterate troops have produced a large and indiscriminate destruction of manuscript.

According to the fable, he created them by restoring to life the putrid bodies of some men drowned in a river or according to more general tradition of ship-wreck mariners; indicating apparently the act of foreign origin, which appearance at this day does not much discredit.

Historical Sketch of India, By Lt. Col. Mark Wilks
Vol. I. pp. 157-58.

(12) According to the Puranics, Pursuram, having extirpated the Cshettris and filled the earth with blood,wanted to perform a sacrifice, but could find no Brahman to assist, on account of his being defiled with the effusion of so much human blood. As he was standing on the summit of the mountains of Kuncan, he spied fourteen Dead Bodies stranded on the adjacent shores below; these were the

corpses of so many *Menchhas*, who had been flung into the sea by their enemies in distant countries in the west. They had been wafted by the winds and were then in a high state of putrefaction. Rama *recalled them to life*, imparted knowledge to them, and conferred on them the Brahminical ordination; and bid perform the sacrifice. From these fourteen dead men is descended the Kucanastha tribe of Marathas: thus called, because, since that time, they have always stayed and remained in the Kucan.

The Hindu Pantheon, By Edward Moor, F. R. S. p. 351.

(13) The destruction of the Kshetriyas by Parasurama; his disgust with the Brahmins, and retiring to a hermitage ; several Rishes followed; and looking on the Western sea, advised him to reclaim land from it. The sea-king promised to render to him land, as far as he could cast an arrow. He thus reclaimed a tract of land of three *yojanas* (30 miles) in breadth westward; and in length from Nisica to Canyacumari 300 *yojanas* southward, or more than 3,000 miles. He located Brahmans therein, turning the Boyijati (भोई जाति) into Brahmans; settling one ; thousand of them there; and appointing to them lands for their support. He told them that if they had any cause of sorrow, or regret, they might think on him, and he would appear. He then retired to the fane at Gokernam. The said Brahmins, to test his veracity, recalled him, without causes; whereupon being angry he condemned them to lose the power of assembling together in council; and to become servile. They accordingly mingled with *Sudra females;* and became a degraded race. Connections with Sudra women have produced the meanest case Chitpawuns.

Taylor's Oriental Mss. Vol. III. p. 705.

अलेक्झांड्रीयांतून मुसलमानांच्या छळामुळें देशत्याग करून निघालेल्या प्राचीन ज्यू (यहुदी) लोकांबद्दलचा खालील उतारा चित्पावन नोकरशाहीच्या भक्तांच्या धांगडधिंग्याशीं किती जुळता येतो तें पाहण्यासारखें आहे.

(14) They first piqued themselves upon an exact observance of law ; to which they added a great number of traditions that they pretended to have received from their ancestors, and to which they much more strictly adhered than to the Law itself though contrary

to each other. They acknowledged the immortality of the Soul and in consequence another life after this. The affected an outside virtue, regularity and austerity, which acquired them them great consideration with the people, but under that impositions appearance they concealed the greatest vices, sordid avarice, insupportable pride, an insatiable thirst of honours and distinctions, a violent desire for ruling above and envy that rose almost to fury against all merit but their own; an irreconciliable hatred for all who presumed to contradict them; a spirit of revenge capable of the most horrid excesses and what was still there a more distinguished characteristic and outdid all the rest, a black hypocracy which always wore the mark of religion.

Ancient History, By C. Rolin. pp. 299.

खालील मजकूर एका एथ्नॉग्राफीप्रवीण इतिहासज्ञाकडून आलेला आहे. यांतील मुद्दे चूक आहेत कीं बरोबर आहेत, हें इतिहासप्रविणांचें पहाण्याचें काम आहे.

## THE IMMIGRATIONS OF THE CHITAWUNS,

The are many proofs and corroborative facts to show that the *Chitpawuns* have come to India from Egypt through Persia, Baluchistan and the Makran coast.

(1) *Sanskrit Texts.*

(*a*) See Sahyadri Khund, Chapter 81, where they say that they are *Kaivartas* from the banks of the Indus, experts in *Vyadha Karma* (fishery).

(*b*) Late Vishnu Shastree Pandit, Editor of Indu Prakash (16th June 1873) exposed the mischief of fraudulent interpolation of 3 Shlokas composed by Messrs. Sathe and Ghate (Chitpawuns).

(*c*) The Hon. Rao Saheb (late) Vishwanath Narayan Mandlik published an essay in R. A. S. Journal Bombay Vol. VIII page 3, in which he maintains that the ancestors of Chitpawuns have probably come from opposit coast of Africa.

(*d*) That they (Chitpawuns) are *Berbers,* p. 67 *ibid.*

(2) *Berbers.*

(*a*) See Ratzel's History of Mankind, p. 12.

(*b*) J. H. Leewe's Ethnography, pp. 156-160.

(*c*) S. Laing's Origin of Man, p. 399.

(*d*) That Berbicon or Berberic was a tract in Sindh at the mouth of the Indus.

(3) *Possible stages of immigration* :—are visible in family names which Mr. Bal Gangadhar Tilak says in his " Arctic Home " page 292, are usually *place names.*

(*a*) Bam बाम a river and ancient town in Persia.

*(b)* Gokhale—Gokhalan is the name of a tribe in Persia. (Vide Lord Curzon's " Persia " Vol. I, page 270.)

*(c)* Lele—Lale is a place in Baluchistan,

*(d)* Gadre—Gadrocia was a province in Baluchistan, like Kirman, (Ibid, Vol. I. 228.) The Gadras of Baluchistan represent a mixed race born of the Baluchis from Egyptian women seized and sold as slaves.

(*e*) About female slaves imported to India, Mr. Edwardes says in his Census Report 1901, that " *Hand-some young women of Hellas (the Mediterranean Coast) destined to attend upon the King of the Country and cry* "charoh" *in his court. It is presumed that they were imported by these Kaivartas, who are or were themselves fair,* "

*(f)* Slaves were treated like poor relations. (Ratzel, Vol. I, p. 446).

(*g*) Slaves not inferior to poor relations, (Ibid p. 477).

(h) Supply of slaves from Persia, (Lord Curzon's Persia page 520).

(4) *Traces of Egyptian Origin.*

(a) Compare the Egyptian features of the figures in the Elephanta caves near Sopura or Bombay, where they possibly worked.

(b) Worship,

Bull (and the Gemini), The bull has been held to be the most sacred animal in Egypt, because between 2426 B. C. and 266 B. C. the equinox was retrograding through the constellation Taurus the bull. (Brennand's Hindu Astronomy, page 12).

(5) *Anthropometry.*

They are broad-headed, grey-eyed and often blond like the Egyptains.

(6) *NOTE* :–There is no mention of the Chitpawuns in the Vedas or in the earliest Sanskrit texts for the simple reason that they represent a *later* immigration. They themselves say that went to the Konkan coast from Sind, and Sind records show that the worship of Gemini (as Shiva and Parvati) and the bull (as Nundi) was imported from Egypt in the first Century B. C. The fact that there are no grey-eyed, blond, curly-haired and broad-headed Brahmans in the interior of the Great Indian Peninsula implies the immigration of these people by *sea.* There is the additional corroboration of the family place-names from Lower Persia and Lower Baluchistan, added to the surname *Tivarekar* which clearly shows connection with the sea-weed known as *Tivare* (Ougeinia Dalbergioides).

HISTORICUS

---

# प्रबोधनकार ठाकरे

# समग्र वाङ्‌मय

## खंड पाचवा

भिक्षुकशाहीचे बंड

Bull and the Gemini). The bull has been held to be the most sacred animal in Egypt, because between 2426 B. C. and 206 B. C. the equinox was retrograding through the constellation Taurus the bull. (Brennand's Hindu Astronomy, page 12).

(5) *Anthropometry.*

They are broad headed, grey-eyed and often blond like the Egyptians.

(6) *NOTE:* There is no mention of the [illegible] in the Vedas or in the earliest Sanskrit texts for the simple reason that they represent a *later* immigration [illegible] by sea that went to the Konkan coast from Sind, and Sind records show that the worship of Gemini (as Shiva and Parvati) and the bull (as Nandi) was imported from Egypt in the first Century B. C. The fact that there are no grey-eyed, blond, curly-haired and broad-headed Brahmans in the interior of the Great Indian Peninsula implies the immigration of these people by sea. There is the additional corroboration of the family place names from Lower Persia and Lower Baluchistan, added to the surnames [illegible] clearly shows connection with the sea, [illegible] known as [illegible] (Ogamus Delborgianderi).

HISTORICUS

---

।। सत्यात् नास्ति परोधर्मः ।।

# भिक्षुकशाहीचें बण्ड

## वज्रप्रहार ग्रंथमालेचा हा पहिला ग्रंथ


## केशव सीताराम ठाकरे

वक्तृत्वशास्त्र, कोदण्डाचा टणत्कार, कुमारीकांचे शाप
ग्रामण्यांचा साद्यंत इतिहास, लाईफ ॲन्ड
मिशन ऑफ रामदास, हिन्दु धर्माचें
दिव्य, इ. ग्रंथांचे कर्ते यांनीं
लिहून प्रसिद्ध केला.



---

**किंमत फक्त दोन रुपये**

---


पुस्तकें मागविण्याचा पत्ता : केशव सीताराम ठाकरे
वज्रप्रहार कार्यालय, २०, मिरांडाची चाळ
दादर–मुंबई.

प्रत्येक प्रतीवर ग्रंथकाराची इंग्रजी सही पाहून ग्राहकांनी ग्रंथ घ्यावा. सही नसलेली प्रत चोरीची समजून घेऊं नये.



हें पुस्तक मुंबई—भायखळा-परेलरोड, घर नंबर ३५४४ तत्त्वविवेचक छापखान्यांत
रा. विठ्ठल तानाजी मोडक यांनीं छापिलें, तें रा. केशव सीताराम ठाकरे,
यांनीं २० मिरांडाची चाळ, मुंबई नं. १४ येथें प्रसिद्ध केलें.

*All rights reserved.*

# प्रस्तावना

पुस्तक म्हटलें म्हणजे त्याला प्रस्तावना पाहिजे आणि शक्य असेल तर ती पुस्तककर्त्यापेक्षां कोणातरी निराळ्या लेखकानें लिहिलेली असली पाहिजे असा समज अलीकडे सर्वत्र अगदीं दृढमूल झालेला दिसतो; किंबहुना अशी अगदीं परंपराच पडल्या सारखी दिसते. रा. केशवराव ठाकरे चांगले वाचनमग्न असून महाराष्ट्रभाषेला हवीतशी वळविण्याचें सामर्थ्य त्यांच्या लेखणीच्या आंगीं आहे; असें असतां त्यांच्या सारख्याच्या पुस्तकालाहि निराळा प्रस्तावनालेखक लागावा याचें कारण तरी हा समजच असावा असें वाटतें आणि रा. ठाकरे जरी आपल्या ह्या पुस्तकांत परंपरेच्या भक्तांची निंदा करितात तरी आपल्या पुस्तकाला दुसरा प्रस्तावनालेखक शोधून, प्रत्यक्षपणें ह्या नव्या परंपरेची तळी उचलण्यालाच कारणीभूत होतात हें पाहून मानवी प्राण्याच्या परंपराप्रियतेबद्दल कौतुक वाटल्यावांचून रहात नाहीं. लेखक ह्या नात्यानें रा. ठाकऱ्यांचा आणि माझा परिचय होऊन एका तपापेक्षां अधिक काळ लोटला. त्यांचे विचारपरिप्लुत ग्रंथांचें वाचन जितकें दांडगें आहे तितकेंच तें लक्ष्यपूर्वक झालेलें आहे. त्यांच्या अंतःकरणाची तळमळ त्यांच्या लेखणीच्या ठिकाणी बाणाचें आणि वज्राचें सामर्थ्य उत्पन्न करीत असल्यामुळेंच त्यांचा कोदंडाचा टणत्कार आज अखिल महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्या दुमदुमून टाकण्यास समर्थ झाला आहे. आतां त्यांचा हा वज्रप्रहार आपल्या आघातानें, धर्माच्या नांवाखालीं स्वतःचे स्तोम माजविणाऱ्या भिक्षुकशाहीच्या काळजाचा थरकांप उडविणार आहे. वस्तुस्थिति ही अशी असल्यामुळें रा. ठाकऱ्यांच्या पुस्तकाला प्रस्तावनेची-निदान माझ्या तरी प्रस्तावनेची-मुळींच आवश्यकता नव्हती. पण अतिपरिचय असूनहि त्यांच्या शब्दांची अवज्ञा मला झाली नाहीं. मीहि ह्या परंपरेच्या भोंवऱ्यांत सांपडलो आणि रा. केशवरावांच्या शब्दाला मान देऊन निमूटपणें ही लहानशी प्रस्तावना लिहिली.

' भिक्षुकशाहीचे बंड ' हिंदु समाजांतच आहे असें नाहीं. परमेश्वर जसा अखिलचराचर व्यापक आहे, तो जेथें नाहीं असें ठिकाणच जसें कोठें नाहीं तसे ह्या भिक्षुकशाहीचें बंडहि सर्वत्र आहे. तें जसें हिंदूंमध्यें आहे तसेंच पारशांमध्यें आणि मुसलमानांमध्येंहि आहे. तें ख्रिस्त्यांत आहे, जैनांत आहे आणि फार तर काय पण नास्तिक म्हणून मानिल्या गेलेल्या बौद्धांतहि तें आहे. ' भिक्षुकशाहीचें बंड ' जसें हिंदुस्थानांत आहे तसेंच आज साऱ्या जगानें सुधारणेच्या शिखरावर नेऊन बसविलेल्या यूरोपांत आणि अमेरिकेंतहि तें आहे. जगाच्या पाठीवर असा एकहि समाज नाहीं, ह्या पृथ्वीवर असा एकहि धर्म नाहीं आणि ह्या भूपृष्ठावर असा एकहि देश नाहीं कीं जेथें ' भिक्षुकशाहीचें बंड ' नाहीं.

भिक्षुकशाहीच्या ह्या बंडाला जशी स्थलाची मर्यादा नाहीं–तें जसें मर्यादाबाधित आहे–तशीच त्याला कालाची मर्यादा नसल्यामुळें तें त्रिकालाबाधित आहे. ज्या परमेश्वराच्या मुखांतून वेद निर्माण झाले, त्याच परमेश्वराच्या किंवा त्याच्या वंशजांच्या हातानें ह्या बंडाचा पाया खोदला गेला असल्यामुळें वेदांइतकें जरी नसलें तरी तें अनादीच आहे असें मानण्याचा प्रघात पडलेला आहे. ब्राह्मणकाळीं यज्ञयागादि आणि पुराणकाळीं व्रत वैकल्यें आणि तीर्थयात्रादि दगड-धोंड्यांनीं,

ह्या बंडाचें जोतें तयार झालें असल्यामुळें प्राचीन काळांतील त्याचें अस्तित्व चांगलेंच भासमान होतें. इतिहास-काळांत तर त्याचा प्रभाव सोरटी सोमनाथापासून पर्वतीच्या रमण्यापर्यंत सर्वत्र निदर्शनास येतो. प्रस्तुत काळीं तर जगज्जेत्या म्हणविणाऱ्या इंग्रज बहादूरांना देखिल ' बाप दाखवा नाहीं तर श्राद्ध करा ' म्हणून छातीठोक सांगणाऱ्या लोकमान्य पुढाऱ्याच्या प्रायश्चित्तावरून त्याचें अस्तित्व जितकें प्रत्ययास येतें तितकें तें दुसऱ्या कशावरूनहि येत नाहीं ! सारांश भिक्षुकशाहीचें बंड वेदकाळापासून आज तागायत अव्याहतपणें चाललें आहे आणि यापुढें, भविष्यकाळीं देखील, जोंपर्यंत जनता लोकेषणा, वित्तेषणा, पुत्रेषणा इत्यादि ईर्षणांच्या अथवा वासनांच्या वाऱ्यानें झुलत राहील तों पर्यंत भिक्षुकशाहीच्या बंडाचें निशाण त्याच वाऱ्याच्या सोसाट्यानें जनतेच्या छातीवर सारखें फडफडत राहील.

जनतेच्या छातीवर फडकणारें हें बंडाचें निशाण, तिच्या छातींत अपमतलबी लोकांकडून निर्दयपणें भोंसकण्यांत आलेला हा विषारी जंबिया, काढून टाकण्याचें आजवर अनेकांनीं अनेक वेळां प्रयत्न केले. पण ह्या बंडखोरांनीं प्रथम श्रुतीच्या अमृततुल्योदकांत विष कालवून चर्तुवर्ण पद्धतीला वेदांचा आधार दिला आणि आपली उत्पत्ति विराटपुरुषाच्या मुखापासून झाली असें ठरवून आपलें श्रेष्ठत्व आणि इतरांचें कनिष्ठत्व प्रस्थापित केलें. अर्थात् श्रुतीलाच कवटाळून बंड मोडणारांचा हा हल्ला व्हावा तसा यशस्वी झाला नाहीं. पुढें त्या बंडाचें नेतृत्व जैमिनीच्या हातीं गेलें आणि त्यानें कर्ममार्गाचें थोतांड माजवून सुखाला लालचावलेल्या मनुष्यजातीला आपल्या काबूंत आणिलें व भिक्षुकशाहीला चरण्याकरितां एक अत्यंत विस्तृत असें कुरण निर्माण केलें ! कपिल महामुनीनें ह्या कुरणाची जाळपोळ उडवून सांख्यमताचा प्रसार केला. पण पुढे त्याला नास्तिकांत दडपून समाजावर चरण्याचा आपला हक्क हे बंडखोर यथास्थित गाजवूं लागले. बुद्धानें त्यांना चांगलाच हात दाखविला पण तोहि अखेर ह्या हिंदुस्थानच्या कर्मभूमींत नास्तिकच ठरला ! येथें ब्राह्मणाला दिलेलें दान जर परलोकीं मृत पितरांना पोंचतें, तर प्रवासांत कांहींएक बरोबर घेऊन न जाण्याविषयीं वडिलांना विनंति करून पुत्रानें रोजच्या रोज त्यांच्या नावें ब्राम्हणभोजन घालावें म्हणजे त्यांची खाणावळ शोधण्याची आणि जवळ अवश्य त्या वस्तु बाळगण्याची दगदग चुकेल असें म्हणून श्राद्धादिकांची टेर उडविणाऱ्या आणि ' भस्मी भूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः ' असा निःसंदिग्ध प्रश्न विचारणाऱ्या चार्वाकाचीहि ह्या भिक्षुकांनीं तीच वाट लावली. पुढें ह्या बंडखोरांचें नायकत्व मंडणमिश्राकडे आलें. सकाम कर्ममार्ग, हें ह्या बंडखोर भिक्षुकशाहीचें निशाण, तें मंडणमिश्रानें आपल्या हातांत घेतलें आणि त्याच्या घरच्या शुकसारिका देखील आपल्या मधुर स्वरानें ह्या निशाणाचीं स्तुतिस्तोत्रें गाऊं लागल्या ! हें सर्व यथास्थित झालें. पण लवकरच भिक्षुकशाहीच्या दुर्दैवानें आद्य शंकराचार्य उदयाला आले. त्यांनीं ब्रह्मचर्यानंतर एकदम संन्यास घेऊन आश्रमधर्माचा आणि संन्याशाला वर्णावर्णाचा विधिनिषेध नाहीं असे सांगून वर्णधर्माचा फोलपणा जनतेच्या निदर्शनास आणिला आणि मंडणमिश्राशीं भिक्षुकशाहीच्या बंडाच्या त्या पुढाऱ्याशीं वादविवाद करून त्याच्या त्या सकामकर्मरूपी निशाणाच्या चिंधड्या चिंधड्या उडविल्या व उपनिषत्प्रणित ज्ञानमार्गाचें पुनरुज्जीवन केलें; मंडणमिश्राला संन्यास देऊन सुरेश्वराचार्य बनविले आणि ह्या भिक्षुकशाहीच्या बंडाचें अखिल

मानवजातीस चौऱ्यांशींच्या फेऱ्यांत ढकलणारें हें निशाण, आर्यावर्तांत पुनश्च कोठेंहि फडकावलें जाऊं नये म्हणून त्याच्या चारहि बाजूस चार धर्मपीठें स्थापन करून त्यांपैकीं एका पीठावर आचार्य म्हणून त्याची योजना केली ! पण आद्य शंकराचार्यांनीं केलेली ही योजना त्यांच्या पश्चात् फार दिवस टिकली नाही. वेदांतसूत्रें, उपनिषदें आणि भगवद्‌गीता ह्या प्रमुख धर्मग्रंथांचे त्यांनीं लावलेले अद्वैतपर आणि त्यागपर अर्थ, त्यांतूनच विशिष्टाद्वैत आणि द्वैतपर अर्थ निर्माण करणारे नवे नवे आचार्य निर्माण होऊन शंकराचार्यांच्या पश्चात् थोडक्याच दिवसांत मागे पडले. ह्या आचार्यांनीं आपलीं स्वतंत्र पीठें निर्माण केलीं आणि त्यांचा अनुयायी वर्गहि एकसारखा वाढत चालला ! शंकराचार्यांच्या पीठांची उडालेली ही तारांबळ पाहून पुनः बंडखोर भिक्षुकांनीं आपलें डोकें वर उचलले आणि तत्कालिन सर्व पीठाधिस्थित आचार्यांच्या वेसणीं आपल्या हातांत घेऊन, ते त्यांना हवे तसे नाचवूं लागले. रा. ठाकरे आपल्या प्रस्तुत पुस्तकांत एके ठिकाणीं म्हणतात त्याप्रमाणें हे पीठस्थ आचार्य केवळ पिठाचे पुतळे बनले आणि भिक्षुकवर्ग आपल्या इच्छेप्रमाणें त्यांना घटकेंत गणपती तर घटकेंत मारुती (माकड) बनवूं लागला. असें नसतें तर त्यागी आद्य शंकराचार्यांचा अनुयायी म्हणविणारा सर्व हिंदु समाज, पूर्णपणें अनुरागी बनून सकाम कर्ममार्गाला आणि केवळ बाह्याचारांना धर्म धर्म म्हणून उराशीं कवटाळून बसणारा खास झाला नसता !

ह्या नंतर ह्या भिक्षुकशाहीच्या बंडाला शह देणारे धर्मवीर म्हटले म्हणजे रामानंद, चैतन्य, कबीर आणि ज्ञानेश्वरादि महाराष्ट्रीय संतच होत ! आजपर्यंत भिक्षुकशाहीनें सातकुलपांत दडपून ठेविलेले संस्कृत ग्रंथभाण्डार यांनीं खुलें करून आपआपल्या देशीभाषेच्या द्वारें तें आचांडाळ ब्राम्हण वर्गांस वाटून दिलें आणि हें भाण्डार देवाच्या घरचें आहे, एकट्या भिक्षुकशाहीची मालकी त्यावर नाहीं असें जगजाहीर करून, बंडखोरांनीं त्या ग्रंथभांडारावर आजपर्यंत गाजविलेल्या एकमुखी सत्तेचा जोमकस भाषेंत निषेध केला. भिक्षुकशाहीनें त्यांच्या बंडास शह देऊन, जन्माच्या पायावर उभारलेल्या जातिभेदाचा आणि मानवी समाजांत ह्या जातिभेदामुळें दृढमूल झालेल्या विषमभावाचा धिक्कार करणाऱ्या ह्या सत्पुरुषांचा कसाकसा छळ केला, तें आमच्या वाचकांस आम्हीं आज नव्यानें सांगितले पाहिजे असें नाहीं. एकनाथाच्या उपदेशानें तर ह्या बंडखोरांची फारच धांदल उडविली. **पैठण** म्हणजे त्यावेळच्या बंडखोरांचा पांजरपोळ. तेथलेच भिक्षुक जेव्हां **सकामकर्मे नाचरती कोणी । आमुची मिळकत बुडविली ।** असें म्हणून एकनाथांच्या नावानें खडे फोडूं लागले आणि त्याला आपला ' दावेदार ' म्हणू लागले, तेव्हा इतर ठिकाणच्या बंडखोरांची दशा काय विचारावी ! इतकें झालें तरी ह्या बहाद्दरांनीं ज्ञानेश्वरादि भावंडांप्रमाणें एकनाथाचाहि छळ करावयास कांहीं कमी केलें नाहीं. यूरोपांतल्या भिक्षुकशाहीप्रमाणें आमच्या देशांतल्या धर्मोद्धारकांना आमच्या देशांतील भिक्षुकशाहीने जाळून किंवा चिणून ठार केलें नाहीं इतकेंच;* बाकी कोणावर पूर्ण बहिष्कार घालून, तर कोणाच्या अंगावर थुंकून, कोणाला मार झोड करून, तर कोणाचे ग्रंथ बुडवून त्यांनीं त्यांचा दावा पुरा साधला यांत कांहीं शंका नाहीं.

* श्री. टिपणीसांच्या या शंकेच्या निरसनार्थ त्यांनीं व वाचकांनीं ' ग्रामण्यांचा साद्यंत इतिहास ', पृ. १८६-१८८ व प्रस्तुत पुस्तकांतील पृ. ४२ वरचा खुलासा अवश्य वाचावा.

ठाकरे.

रामदासांची गोष्ट या उपरिनिर्दिष्ट संतांपेक्षां बरीच निराळी होती. त्यांनीं कर्ममार्गाला बरेंच उचलून धरिलें आणि जन्मपात्र ब्राह्मणाला इतरांपेक्षां वरिष्ठ ठरविलें. वारकरी संप्रदायांत रामदासांना विशेष मान नसण्याचें आणि भिक्षुकवर्गांकडून त्यांस धन्यवाद मिळण्याचें कारण हेंच असावें असें आम्हाला वाटतें.

गेल्या शतकांत राजा राममोहनराय, ईश्वरचंद्र विद्यासागर, केशवचंद्रसेन, महर्षि देवेंद्रनाथ टागोर, पंडित दयानंदसरस्वती, ज्योतीराव फुले, लोकहितवादी-गोपाळराव देशमुख वगैरे थोर विभूतींनीं ह्या बंडाच्या नाड्या बऱ्याच ठेंचून टाकिल्या. या महात्म्यांचाहि आमच्या भिक्षुकशाहीनें कांहीं कमी छळ केला असें नाहीं. स्वामी दयानंद पुण्यास गेल्यावेळीं ह्या बंडखोरांनीं आणि त्यांच्या बहिष्कार शास्त्रास घाबरून त्यांच्या निशाणाचा आश्रय करणाऱ्या नामर्दांनीं त्यांचे कसेकसे धिंडवडे केले आणि आज त्यांचेच पुत्रपौत्र स्वामीजींच्या कट्टया शिष्याच्या कशा मिरवणुकी काढीत असतात, ह्या गोष्टी आज सर्वांस महशूर असल्यामुळें येथें त्यांचें विशेष विवेचन करीत नाहीं. ज्योतीराव फुले आणि लोकहितवादी देशमुख यांच्यावर हल्ले करून भिक्षुकशाहीची तळी उचलून धरण्याच्या कार्यांत प्रतिभाशाली जोमदार लेखक कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं आपली अर्धी अधिक हयात खर्ची घातली.

आतां काळ बदललेला आहे. पाश्चात्य शिक्षणाचा प्रसार मोठ्या नेटानें जरी नाहीं तरी सर्वत्र होऊं लागला आहे. दळणवळणाचीं साधनें वाढून लोक त्यांचा उपयोग जारीनें करीत असल्यामुळें, आमची कूपमंडूक वृत्ति आतां अस्तंगत होऊं लागली आहे. शास्त्रीय ज्ञानाच्या प्रगतीमुळें भोळसट कल्पनांना कायमच तिळांजळी मिळण्याचा समय नजीक येऊन ठेपला आहे. पुराणें, स्तोत्रें, महात्म्यें आणि व्रतकथा यांचा फोलकटपणा आतां जनतेच्या निदर्शनास येऊं लागला आहे. अशा वेळीं लोकमान्य टिळकांसारख्या विद्वानाने जरी ' ख्रिस्त्यांच्या हातचा चहा घेण्यांत आणि पुनर्विवाहाच्या प्रसंगी पानसुपारीला जाण्यांत पातक नाहीं ' असें ठरविण्याकरितां शंकराचार्यांच्या प्रतिनिधी समोर आरोपी म्हणून उभे राहून आणि आपल्या बचावाकरितां धर्मग्रंथांचें शेंकडों आधार त्यांच्यापुढें मांडून अथवा देशाला स्वराज्य मिळविण्याकरितां केलेल्या जलप्रवासाबद्दल प्रत्यक्ष प्रायश्चित घेऊन, पर्यायानें बंडखोर भिक्षुकशाहीचें महत्त्व कितीहि वाढविलें असलें, तरी यापुढें अज्ञानांधःकाराबरोबरच भिक्षुकशाहीच्या बंडाचाहि नायनाट झाल्यावांचून खास रहाणार नाहीं.

रा. ठाकरे यांनी आपल्या प्रस्तुत पुस्तकाच्या १०० व्या पृष्ठावर कै. टिळकांच्या प्रायश्चित्ताच्या बाबतींत निस्पृहपणानें टीका केल्याबद्दल महाराष्ट्र–साहित्यकाराच्या स्पष्टोक्तीची तारीफ केली आहे. प्रस्तावना लिहीण्याचें कबूल केल्यावर पुस्तक वाचीत असतां हा भाग आमच्या अवलोकनांत आला. पूर्वी येता तर आम्हीं रा. ठाकऱ्यांच्या आग्रहालाहि बाजूस सारून हें प्रस्तावना-लेखनाचें कार्य आंगावर खचित घेतलें नसतें. जलपर्यटनाबद्दल प्रायश्चित्त घेणारी व्यक्ति कोणीहि असो, प्रायश्चित्ताचा पोंचटपणा लोकांच्या निदर्शनास आणून देणें हें लोकशिक्षणाचें ब्रीद बाळगणाऱ्या पत्रकाराचें कर्तव्य आहे असें आम्हाला वाटतें. लोकमान्य टिळकांनीं विलायतेस

गेल्याबद्दल प्रायश्चित्त घेतलें आणि तो प्रसंग साधून आम्ही प्रायश्चित्तासंबंधाचे आमचे विचार निर्भिडपणें लोकांसमोर मांडिले. जर तो लेख अशा सार्वजनिक महत्त्वाचा नसता, व केवळ व्यक्तिश: टिळकांवरच जर ती टीका असती, तर त्यांच्या निधनापूर्वीच ती छापून तयार असतां, निरुपायानेंच कां होईना, त्यांच्या निधनानंतर आम्हीं ती खास प्रसिद्ध केली नसती. हा लेख अशा रीतीनें प्रसिद्ध झाल्यानंतर आतां कोणी वर्तमानपत्रांत आमच्यावर कुत्सित टीका करोत, खासगी पत्रें पाठवून आम्हांला शिव्या देवोत किंवा महाराष्ट्र-साहित्याला बहिष्कार घालोत अथवा रा. ठाकऱ्यांप्रमाणें आमचें अभिनंदन करोत, कर्तव्यानंदापुढें आम्हाला ह्या निंदास्तुतीबद्दल दु:ख अथवा सुख दोहोंचीहि विशेष पर्वा वाटत नाहीं. प्रायश्चित्त घेतल्याबद्दल लोकमान्यांवर आम्हींच टीका केली होती असें नाहीं. समाजकल्याणापुढें आणि स्वत:च्या कर्तव्यापुढें लोकमान्यांची मुरवत न बाळगणाऱ्या अनेक पत्रकर्त्यांनीं आमच्या पूर्वी आणि आमच्यापेक्षांहि जास्त निस्पृहतेनें त्यांचा समाचार घेतला होता. रा. ठाकरे यांच्या अवलोकनांत जर नगरच्या दीनमित्रानें केलेली टीका आली असती तर त्यांनीं महाराष्ट्र-साहित्यकाराच्या निस्पृहतेबद्दल त्यांस इतके धन्यवाद दिलेच नसते !

भिक्षुकशाहीच्या बंडाचा आतांपर्यंत आम्हीं वर जो इतिहास दिला आहे त्यावरून हे बंड केवळ ब्राह्मणेतरांविरुद्ध आहे असें म्हणतां येणार नाहीं. ब्राह्मणेतरां इतके जरी नसले, तरी त्याचे दुष्परिणाम बऱ्याच ब्राह्मण म्हणविणाऱ्या जातींना व गृहस्थ-ब्राह्मणांनाहि भोगावे लागले आहेत व लागत आहेत. तसेंच तें मोडण्याच्या कामीं ब्राह्मणेतरांस ह्या गृहस्थवर्गातील ब्राह्मणांनीं अनेकवेळां मोठी महत्त्वाची मदत केलेली आहे आणि आजहि ते तशा प्रकारची मदत त्यांस करीत आहेत. फार कशाला इतिहास  कालीं ह्या बंडखोरांवर पहिला हल्ला चढविणारा ज्ञानेश्वर, जन्मानें ब्राह्मणच होता; त्यानंतर तीनशें वर्षांनीं या बंडखोरांस त्राहि भगवान म्हणावयास लावणारा एकनाथहि जन्मत: पैठणचा अस्सल ब्राह्मणच होता एकंदरींत विचार करितां भिक्षुकशाहीच्या समाजविध्वंसक बंडाविरुद्ध बोलणें किंवा लिहिणें म्हणजे हल्ली जिला ब्राह्मणेतरांची चळवळ म्हणून म्हणतात त्या चळवळींत सामील झाल्याचें अघोर (?) पातक करणें असें जर कोणी म्हणत असेल तर तो त्याचा मतलबी वेडेपणा आहे, असें आम्हांला वाटतें.

हल्लींच्या जन्मसिद्ध जातींची उभारणी वर्णांच्या पायावर झाली असें म्हणतात; पण गुणकर्मविभागत: उत्पन्न झालेल्या चार वर्णांचा आणि सध्यांच्या आमच्या चार लाख जातींचा कांहीं एक संबंध नाहीं. असा संबंध असता तर सर्वच धर्मांतील समाजांत आमच्या हिंदु समाजाप्रमाणें जाति मानण्यांत आल्या असत्या. पुस्तकसंग्रहांत ज्याप्रमाणें ऐतिहासिक, शास्त्रीय, वाङ्मयविषयक इत्यादि विषयवारीनें पुस्तकांचें वर्गीकरण करितात त्याप्रमाणें हिंदुसमाजांत मनुष्याच्या आंगच्या गुणांवरून आणि त्यांनें दाखविलेल्या कर्तबगारीवरून जें वर्गीकरण केलेलें आहे त्यालाच वर्णपद्धति असें आमच्या प्राचीनतमपूर्वजांनीं म्हटलेलें आहे. अर्थात ही वर्णपद्धति नावानें जरी नसली तरी सर्व धर्माच्या आणि सर्व देशांतील समाजांत अस्तित्वांत आहेच आणि यापुढेंहि ती तशीच अस्तित्वांत रहाणार याबद्दल आम्हांला तरी बिलकुल शंका वाटत नाहीं. हिंदुस्थानांतल्या भिक्षुकशाहीच्या पुरस्कर्त्यांनीं मात्र आपलें श्रेष्ठत्व प्रस्थापित

करण्याकरितां तिला जातीचें स्वरूप दिलें आणि जाती जन्मावरून ठरविल्या ! जन्मावरून मनुष्यांचें उच्च नीचत्व ठरवावयाचें. आपल्याच धर्मबंधूंस, फारतर काय पण त्यांच्या सावलीस देखील, अस्पृश्य मानावयाचे; असले गाढवाचे गोंधळ अद्वैतवादी आद्य शंकराचार्यांच्या शिष्यत्वांत धन्यता मिरविणाऱ्या आमच्या समाजांत केवळ ह्या भिक्षुकशाहीच्या बंडामुळेंच उत्पन्न झाले आहेत. हे कृत्रिम भेद मोडून काढा, कोणालाहि अस्पृश्य मानूं नका, कामना सिद्धीची लालूच दाखवून तीर्थ यात्रा, व्रतवैकल्यें, श्राद्धपक्ष इत्यादिकांच्या फेऱ्यांत भोळ्या समाजाला पाडूं नका; वेद ईश्वरप्रणित असोत किंवा मनुष्यप्रणित असोत, इतर ग्रंथांप्रमाणें ईश्वराच्या सर्व लेकरांची अखिल मनुष्य जातीची, त्यांवर सारखीच सत्ता आहे; आपली जात तेवढी श्रेष्ठ आणि तिलाच वेदपठणाचा अधिकार असें म्हणणें म्हणजे शुद्ध दंडुकेशाही आहे; असेंच ब्राह्मणेतरांचें आणि सत्यशोधकांचें म्हणणें आहे. ज्या ब्राह्मणांना तें मान्य आहे ते भिक्षुकशाहीचे बंड मोडण्याच्या कामीं आज देखील त्यांना मदत करीत आहेत. सत्यशोधक समाज निघाला त्याचवेळीं निदान आपल्या महाराष्ट्रांत तरी हा ब्राह्मण ब्राह्मणेतरांचा वाद अलीकडच्या काळांत चालूं झाला. ह्या पूर्वी भिक्षुकशाहीनें ब्राह्मणेतरांना अनेक प्रकारें छळलें. पण तो ऐतिहासिक भाग बाजूला सारला तरी प्रस्तुत वाद चालूं होऊन आज पन्नास वर्षे झालीं, असें असतां सरकारी अधिकाऱ्यांच्या चिथावणीनेंच हे पक्ष झाले वगैरे कुत्सित कल्पना जनतेच्या मनांत भरवून आपल्या वाटेस कोणीहि न जाईल असें करणें हा भिक्षुकशाहीचा कावा आहे. सध्यांच्या काळीं ह्या वादाचें मूळ काय आहे, ब्राह्मणेतर जें म्हणतात त्यांत कोठें चूक आहे, बंडखोर भिक्षुकशाहीच्या म्हणण्यांत कितपत सत्य आहे, हें पहाण्याचा सर्वांनीं प्रयत्न केला पाहिजे. ब्राह्मणेतरांप्रमाणेंच ब्राह्मणांनींहि सत्यशोधक बनून आजच्या धार्मिक, सामाजिक, बौद्धिक वगैरे गुलामगिरींतून प्रथम आपल्या बांधवांची सुटका केली, तरच राजकीय गुलामगिरींतून सर्वांची सुटका होईल. रा. ठाकरे यांच्या पुस्तकांत ह्या गोष्टीचें यथोचित विवेचन असून त्यांनीं आपल्या विवेचनास आधार म्हणून टीपेंत दिलेले उतारे अत्यंत चिंतनीय आहेत.

रा. ठाकरे यांनी पुस्तकारंभी हातांत धरलेली लेखणी पुस्तक अपुरेंच पुरें करून खालीं ठेविली असावी असें दिसतें. ही लेखनशैली कितीहि प्रतिभा द्योतक असली तरी, वाचकांस कंटाळवाणी होते. ह्यापेक्षां त्यांनीं जर ह्या पुस्तकाचे भाग पाडले असते, तर विषयप्रतिपादन कंटाळवाणें न होतां, अधिक व्यवस्थित आणि पुनरुक्तीदोषरहीत असें झालें असतें. स्त्रियांचें अज्ञानच भिक्षुकशाहीच्या बंडाचें विशेष पोषक आहे असें सांगून त्याचें विवेचन स्वतंत्र पुस्तक रूपाने देण्याचें रा. ठाकरे यांनीं योजिल्यामुळें, त्यांचें हें प्रस्तुतचें पुस्तक अपूर्ण स्थितींत अर्थात मध्येंच पूर्ण झाल्यामुळें, वाचकांची निराशा झाल्यावांचून रहात नाहीं.

**' ब्राह्मणेतरांची चळवळ ' या लोकमान्य शब्द योजनेनें आतां सुप्रसिद्ध होत असलेल्या सुधारकांचा कटाक्ष ब्राह्मण म्हणविणाऱ्या समाजाविरुद्ध नसून या भिक्षुकी कारस्थानाविरुद्ध आहे.''** (पृ. ४७) असें जें रा. ठाकरे यांचें म्हणणें आहे तें अगदीं बरोबर आहे. आम्हीं वर एके ठिकाणीं आपला अभिप्राय याप्रमाणेंच नमुद केला आहे. रा. ठाकरे यांनीं जरी ह्या भिक्षुकीकारस्थानाविरुद्धच लिहिण्याचें योजिलें असलें आणि ' ब्राह्मण म्हणविणाऱ्या समाजाविरुद्ध '

लिहिण्याचा जरी त्यांचा हेतु नसला तरी त्या कारस्थानाच्या परिपोषाचा विचार चालू असतांना आणि विशेषतः ह्या कारस्थानी मंडळीकडून वारंवार पुढें ढकलण्यांत येणारें बीज क्षेत्राचें घोडें किती लंगडें आहे हें सांगताना सामान्यतः ब्राह्मण जातीवर तुटून पडल्यासारखे दिसतात. पण ब्राह्मणाच्या कुळांत जन्मल्यानें जसा कोणी गुणकर्मानें ब्राह्मण होऊं शकत नाहीं तसाच क्षत्रियांच्या कुळांत जन्मल्यानें कोणीहि खरा क्षत्रिय होऊं शकत नाहीं. ब्राह्मण जसे महारादि हीन मानलेल्या जातींना अस्पृश्य मानितात तसेच क्षत्रियादि इतर वर्णांचे लोकहि त्यांना अस्पृश्य मानितात. ह्या गोष्टी लक्ष्यांत घेतल्या तर भिक्षुकशाहीच्या बंडाला ब्राह्मणांइतकेंच इतर समाजांकडूनहि प्रोत्साहन मिळत आहे ही गोष्ट कोणालाहि अमान्य करिता येणार नाहीं.

रा. ठाकरे यांच्या प्रस्तुतच्या पुस्तकाच्या वाचनानें भिक्षुकशाहींचे कारस्थान कसें उभारलें गेलें आणि ह्या कारस्थानी लोकांनीं धर्मग्रंथांत स्वतःचें स्तोम माजविण्यासारख्या गोष्टी दडपून ब्राह्मणादि सर्वच वर्णांच्या गळ्यांत बौद्धिक गुलामगिरी कशी बांधली ह्या गोष्टी चांगल्याच समजतील.

रा. ठाकरे कोणत्याहि पक्षाचे नाहींत. ब्राह्मणांच्या पक्षाचे नाहींत कीं ब्राह्मणेतरांच्या पक्षाचे नाहींत. ते सत्यशोधक आहेत पण सत्यशोधक समाजाचे सभासद नाहींत किंवा त्या समाजाविरुद्ध दौरा काढणारेहि नाहींत. राजकीय बाबतींत त्यांचीं मतें कोणत्या पक्षाचीं आहेत हें जरी आम्हाला माहीत नाहीं, तरी सामाजिक आणि धार्मिक सुधारणेच्या बाबतींत ते जहालांतले जहाल असल्यामुळें राजकीय बाबतीत देखील फारसे मवाळ असतील असें वाटत नाहीं. अशा विचाराच्या आणि मताच्या विद्वानाकडून लिहिल्या गेलेल्या पुस्तकांत उपरिनिर्दिष्ट कांहीं दोष असले तरी ते सात्विक त्वेषाचे द्योतक आहेत, असें समजून वाचक वर्ग त्यांतील गुणांचेंच ग्रहण करतील अशी आशा आहे.

मुंबई, हनुमान जयंति शके १८४३ **गोविंद गोपाळ टिपणीस.**

# वज्रप्रहार ग्रंथमालेचा उद्देश.

॥ सत्यात् नास्ति परोधर्मः ॥

मानवजातीच्या संसारात उदारमनस्कता, व्यापकता व पूर्ण स्वातंत्र्य आणणें, म्हणजेच पृथ्वीवर परमेश्वराचें साम्राज्य स्थापन करून नराला नारायण स्वरूपाचा साक्षात्कार पटविण्याइतकें पुण्यकर्म आहे. हें पुण्यकर्म निर्विघ्न पार पाडण्यासाठीं जनतेंत ज्ञानाचा प्रसार अधिकाधिक करण्याबद्दल द्विधामत असणें शक्य नाहीं. **न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते** ही जगद्गुरु श्रीकृष्ण भगवंताची आज्ञा आहे. हल्लीं महाराष्ट्रांत ' मतांमतांचा गलबला ' सर्वत्र धुमश्चक्री घालीत असतां ' कोणी पुसेना कोणाला ' अशी अनवस्था पदोपदीं प्रत्येकाच्या प्रत्ययास येत आहे. अखिल भरतखण्डांत पुरुषांच्या निवळ साक्षरतेचें (विद्वत्तेचें किंवा विचारक्षमतेचें मुळींच नव्हे!) प्रमाण शेंकडा फक्त सहा असून, स्त्रियांच्या साक्षरतेचें प्रमाण हजारीं तरी एक पडेल कीं नाहीं, याची वानवाच आहे. अस्पृश्य व अवनत (डिप्रेस्ट) बांधव ७ कोटींच्याहि वर असून त्यांच्या निरक्षरतेचें प्रमाण शेंकडा ९९.५ आहे. उच्चत्वाची शेखी मिरवणाऱ्या समाजांकडून या मुक्या दुबळ्या समाजावर होणाऱ्या जुलमांपुढें व अन्यायांपुढें नादीरशहा तैमुरलंगाच्या तलवारीसुद्धां बोंथट पडतील, इतकें त्या जुलमांचें स्वरूप क्रूर, अमानुष व माणुसकीच्या तोंडाला काळें फांसणारें आहे. २०,७१,४७,०२६ हिन्दुजनांच्या समुदायांत दोन कोटी साठ लक्ष निरक्षर विधवा असून त्यांच्या आपत्तीचें स्वरूप अवनत बांधवांच्या दुर्दैवापेक्षां खचित कमी निंद्य व चिळस आणणारें नाहीं. येणेंप्रमाणें आमच्या बुद्धिमत्तेची व नीतिमत्तेची वाट लागली. शारिरीक सुस्थितीबद्दल तर लिहिण्याची सोयच नाहीं. वैवाहिक संस्कारांतल्या बालविवाहाच्या अमानुष जुलमांमुळें शेंकडा २५ अबला अकालीं मृत्युमुखीं पडत आहेत व विवाहविधी व्यापारी धोरणांवर किंवा ' पुरवठा व मागणी ' च्या तत्वांवर चालू असल्यामुळें शेंकडा २५ ते ३५ स्त्रिया प्राणघातक शारिरीक व्यंगामुळें जिवंत असून नसून सारख्याच होत आहेत. लहान मुलांच्या मृत्यूचें प्रमाण हजारीं २११ असून, शेंकडा पंचवीस मुलें एका वर्षाच्या आंतच आपल्या पणजोबाच्या भेटीची तांतड करतात. संपन्नतेच्या बाजूला पाहिलें तर या २० व्या शतकात अन्नपाण्यावांचून तडफडून प्राण सोडणाऱ्या हिन्दी बांधवांची संख्या सात कोटीच्या वर आहे. व्यापारधंद्याच्या नांवानें केवढा मोठा शंख दुर्दैवाच्या अडणीवर बसला आहे, तो बोट न दाखवितां कोणालाहि दिसणारा आहे. अशा अनेक राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक जखमांत आणखी जातिमत्सरांच्या प्राणघातक किड्यांचा भयंकर बुजबुजाट झाल्यामुळें हिन्दु विराटपुरुषाचें हिडीस चित्र रंगविण्याच्या कामीं विश्वकर्म्याच्याहि चित्रकौशल्याला हात टेंकण्याचा प्रसंग सांप्रत आला आहे. अशा या मरूं घातलेल्या विराटपुरुषाच्या सडलेल्या कोठ्यांत लोकशाहीचें रसायन कोणी कितीहि शहाणा धन्वंतरी असला तरी चुटकीसरसें मुळींच पचनीं पाडूं शकणार नाहीं, असें आम्ही कोणाच्याहि निंदास्तुतीची पर्वा न करतां स्पष्ट म्हणतों. लोकशाहीचीं पुराणें झोडायला व ऐकायला जरी कांहीं श्रम पडत नाहींत व त्यांच्या गोंडसपणानें जनता जरी घटकाभर आनंदानें बेहोष होऊन नाचूं लागेल, तथापि लोकशाही हे मृगजल आहे व तें हिंदूंची तहान सध्यां तरी मुळींच भागवूं शकणार नाहीं, असें आमचें प्रामाणिक मत आहे. गुलामगिरींत खितपत पडणाऱ्या लोकांना स्वातंत्र्याचीं पुराणें आकर्षक व मधुर वाटणें, यांत

अशक्य असें कांहींच नाहीं; तो निसर्गाचा नियमच आहे. परंतु गुलामगिरींतून निसटून स्वातंत्र्याच्या क्षेत्रांत येण्यापूर्वी आपल्याच दुष्कर्मांमुळें आपल्या हातापायांत पडलेल्या अनेक पोलादी श्रृंखळा दांतांनीं कुरतडून तोडण्याचे महायत्न करावे लागतात, हें विसरतां कामां नये. गुलामगिरीचें स्वातंत्र्यांत होणारें दिव्य पर्यवसान म्हणजे आधुनिक नाटकांतला ट्रान्स्फर सीन नव्हें. लोकशाहीची प्राणप्रतिष्ठा करण्यापूर्वी अनेक स्वदेशी शाह्यांच्या दौती लाथाडून जमीनदोस्त कराव्या लागतील व केल्या पाहिजेत. पाश्चिमात्य असुरी मायेचा (जिला महर्षि रविंद्रनाथ टागोर नॅशनॅलिझम असें सार्थ नांव देतात, तिचा) प्रतिकार करण्यापूर्वी, खुद्द आमच्याच देशांतल्या देशांत ज्या अनेक असुरी शाह्यांच्या जुलमी लीलांचे धांगडधिंगे आज अनेक शतकें चालू आहेत, त्यांना चेंचून जमीन दोस्त केल्याशिवाय हिंदुस्थानाला व विशेषतः हिंदुजनांना सुखाची व शान्तीची प्राप्ती खास होणार नाहीं, असें आम्ही कोणाचीहि भीडमुर्वत न धरतां स्पष्ट म्हणतों.

गेलीं वीस वर्षे स्वाध्याय, मनन व निरीक्षण करीत असतांना आमच्या मनावर जे जे संस्कार झाले, बुद्धीला जीं जीं तत्त्वें विचारांतीं पटलीं व प्रवासांत ठिकठिकाणच्या विद्वानांशीं चर्चा करून आमच्या हिंदु समाजांतल्या सामाजिक, धार्मिक व नैतिक अनेक अन्यायांची आम्हांला जी प्रत्यक्ष प्रचिति आली, त्या सर्वांचें निःपक्षपणानें, स्पष्टोक्तीनें यथाशक्ति उद्‌घाटन करण्याचा आम्हीं निश्चय करून, नवमतवादाचा पुरस्कार करणारी ही

## वज्रप्रहार ग्रंथमाला

गुंफण्याचे कार्य हातीं घेतलें आहे. ' सत्यात् नास्ति परोधर्म ; **सत्यापरता नाहीं धर्म । सत्य हेंचि परब्रह्म ॥** हें आमचें ब्रीदवाक्य आहे. आम्हांला राजमान्यतेची चाड नाहीं, लोकमान्यतेची पर्वा नाहीं, स्वकीय परकीयांच्या निंदास्तुतीची अगर वर्तमानपत्री चित्रगुप्तांच्या शिखंडी हल्लयांची दिक्कत नाहीं. उच्चनीचत्वाचा भेद आम्ही साफ झुगारून देऊन, सर्व देशबांधव एकाच दर्जाचे आहेत, या भावनेनें आम्ही कोणाच्याहि रागलोभाची पर्वा न करतां सत्य गोष्टी स्पष्ट बोलून दाखवूं. कोणी कितीहि प्रतिकार केला तरी यांत खंड पडणार नाहीं. आमची लेखणी व जिव्हा थांबविण्याची शक्ति एक मृत्यूमध्यें आहे. इतर कोणच्याहि मानवी शक्तीचें तें सामर्थ्य नव्हे ! मानापमानाचा पूर्ण संन्यास करून आमच्या देशबांधवांत सत्य तत्वांची जागृति उत्पन्न करण्यासाठीं आम्ही अन्यायांवर वज्रप्रहार करण्याचा भगवान् श्रीकृष्णाच्या प्रेरणेनें दृढ संकल्प केला आहे. जेथें जेथें अन्याय होत आहे किंवा असेल, खोडसाळ असुरी कल्पनांच्या मायेची जाळीं पसरलीं गेलीं आहेत, जात आहेत व पुढें जातील, त्या त्या ठिकाणीं आमचा वज्रप्रहार दत्त म्हणून उभा आहेच असें समजा. ज्यांना आमच्या मतांशीं सामना द्यावयाचा असेल, त्यांनीं प्रामाणिकपणानें व विशेषतः सभ्यपणानें टीकास्त्रांनीं खुशाल विरोध करावा; आम्हीं त्या सज्जनांच्या विधानांना अत्यंत प्रामाणिकपणानें सरळ सरळ प्रत्युत्तरें **आमच्याच पुस्तकांतून** देऊं; वर्तमानपत्रांचा कधींहि अवलंब करणार नाहीं. बीभत्स, विपर्यासी, पौरसवदा किंवा संदेशी धाटणीच्या टीकाकारांना आम्ही कदापिहि प्रत्युत्तर देणार नाहीं. शिखंडीवर शरसंधान रोखणें हें क्षत्रियांचें ब्रीद नव्हें !

ध्येय जरी एकच असलें तरी कार्य करण्याच्या पद्धति प्रत्येकाच्या भिन्नभिन्न असतात. रोगाच्या निदानाच्या बाबतींत वैद्य डॉक्टरांचें जरी एकमत झालें, तरी प्रत्येकजण आपापल्या मताप्रमाणेंच औषधयोजना करणार. डॉक्टर टिंक्चराकडे धांवणार, वैद्य काढ्या निकाढ्याच्या सप्तकाची योजना करणार, होमिओपाथ मोहरीएवढी एकच गोळी बालदीभर पाण्यांत विरघळवून एकेक मिनिटाला चमचाचमचा आचमनाची रोग्याला संथा देणार आणि सर्जन म्हणणार 'हें कांहीं नको; या रोगावर शस्त्रप्रयोगच केला पाहिजे.' असा मतमतांतराचा धांगडधिंगा नेहमींच चालत असतो. अर्थात् आमच्या पुस्तकांतली विवेचनसरणी जरा विशेष स्पष्ट व तिखट कां असते, याला आमचें उत्तर हेंच कीं आमच्या मताप्रमाणें हीच पद्धति आतां आवश्यक आहे. हिन्दुसमाजांतील ज्या अनेक दोषांवर आम्ही कडकडीत टीका केली आहे, त्यापेक्षां अधिक खरमरीत भाषेंत त्यांचे वाभाडे काढणारे आमच्यापेक्षां सवाई शिकंदर ग्रंथकार अनेक झाले, आहेत व होतील. अमूक एक दोष हा भयंकर आहे, इतकें खात्रीलायक पटल्यावर त्याला आमूलाग्र उखडून टांकण्यासाठीं शस्त्रप्रयोगाची मनाची निष्ठुरता न दाखवितां, त्यावर नुसत्या घोंटीव मलमाच्या मलमपट्ट्या बांधीत बसणें म्हणजे मनाचा दुबळेपणा व्यक्त करणें होय. भिक्षुकशाहीच्या बण्डाचें गळूं या असल्या तोंडपुज्या मलमपट्ट्यांनीं आतां अगदीं पूर्ण पिकलें आहे. पिकवणीचे काम झालें. आतां त्यावर तीक्ष्ण शस्त्राचा टोला मारून त्याला तोंड पाडलें पाहिजे, म्हणजे आपोआप त्याची सर्व घाण बाहेर पडूं लागेल. राष्ट्रांतील सर्व गोष्टींची पुनर्घटना होऊं घातली असतां, अमूक एक प्रश्न सध्यां बाजूला ठेवा असें म्हणणें केव्हांहि न्याय्य होणार नाहीं. पुनर्घटना करायचीच तर ती सर्वांगीण तरी करा. नुसत्या राजकीय पुनर्घटनेच्या प्रश्नानें हिन्दुस्थानांतले सर्व वादग्रस्त प्रश्न मिटतील, असें आम्हांला मुळींच वाटत नाहीं. राजकीय बाबतींत ब्राह्मणेतरांचा ब्राह्मणांवरील विश्वास अज्जीबात उडालेला आहे आणि सामाजिक व धार्मिक बाबतींतल्या ब्राह्मणांच्या वर्तनाचा गतेतिहास अत्यंत जुलमी, बेदरकार व उर्मट असल्याची साक्ष स्पष्ट व ठळक आहे. अशा स्थितींत धार्मिक व सामाजिक क्षेत्रांतलीं उच्चनीचत्वाचीं लहान मोठीं टेकाडीं जमीनदोस्त करून हिन्दुसमाजांतील सर्वच क्षेत्रांची भूमिका ताळेबंद समप्रमाणांत आणल्याशिवाय नुसत्या कोरड्या राष्ट्रीयत्वाच्या पुराणांना अतःपर कोणीहि भाळणार नाहीं. इंग्रजी नोकरशाहीच्या कृष्णकृत्यांची जितकी चीड ब्राह्मणांना येत आहे, तितकी ब्राह्मणेतरांना येत नाहीं, असें म्हणणें म्हणजे वस्तुस्थितीचा जाणूनबुजून शुद्ध विपर्यास करण्यासारखें आहे. गुलामगिरीच्या जोंखडाखालीं उत्साहानें मान देणारा अधम प्राणी या विसाव्या शतकांत हिन्दुस्थानांत औषधालासुद्धां मिळणार नाहीं. ब्राह्मणेतरांच्या चळवळींच्या मुळांशीं गुलामगिरीची चीडच मुख्यतः आहे, हें लक्षांत असावें. गुलामगिरी-मग ती उन्मत्त इंग्रजी नोकरशाहीची असो, नाहीतर मदोन्मत्त भिक्षुकशाहीची असो, ती एकदां कायमची झुगारून द्यायची व राजकीय, धार्मिक, सामाजिक सर्वच बाबतींत पूर्ण स्वातंत्र्य प्राप्त करून घ्यायचें,

हाच मुख्य उद्देश ब्राह्मणेतरांच्या चळवळींचा दिसतो. आजपर्यंतचा इतिहास पाहिला तर ब्राह्मणांनीं आपल्या हातीं असलेल्या सत्तेचा अत्यंत दुरुपयोग केलेला आहे, असें मोठ्या कष्टानें म्हणणें भाग पडतें. इतकेंच नव्हे तर उदार मनानें पूर्वीचे दोष उघड कबूल करून त्यांचे योग्य परिमार्जन करण्याऐवजीं त्या दोषांची तरफदारीच करण्याकडे कांहीं मूठभर व्यक्त्या बाद करून ब्राह्मणवर्गाची प्रवृत्ति अजून सुद्धां इतकी तीव्र आहे कीं ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर वादाचा समेट नुसत्या शाब्दिक वादविवादानें घडून येईल किंवा नाहीं, याची जबरदस्त शंका येते. खरें म्हटलें तर वादविवादाचें युग संपून या तंट्याचें पाऊल प्रत्यक्ष प्रतिकाराच्या क्षेत्रांत पडून सुद्धां चुकलें आहे. हल्लीं ठिकठिकाणीं ब्राह्मणेतरांच्या ज्या चळवळी सुरू झाल्या आहेत, त्यांचा मुख्य हेतू जर कोणता असेल तर तो तीनच शब्दांत सांगता येतो. Down with Priests (भिक्षुकशाहीला खाली ओढा. या चळवळीची साधनें (methods) किंवा त्यांचे वर्तन (conduct) अगदीं सोळा आणि सात्विक नसतील आणि एकदा युद्धालाच तोंड लागले की कवायतीच्या शिस्तीची समरभूमीवर फारशी कोणीं पर्वा राखीत नाहीं ! ––तरी पण त्यांच मूळ उद्देश जो भिक्षुकशाहीच्या गुलामगिरीचा नायनाट त्याबद्दल त्यांना कोणीहि समंजस मनुष्य जबाबदार धरणार नाहीं. आमच्या मतें ही चळवळ भिक्षुकशाहीच्या उन्मत्त वर्तनाची कांटेकोर प्रतिक्रिया आहे. आघाताचा प्रत्याघात आहे. कृतकर्माचे प्रायश्चित आहे. कसाहि आणि कितीहि विचार केला तरी या चळवळी बंद पाडण्याचें कार्य विरोधानें घडणें शक्य नाहीं. विरोधानें विरोधच वाढणार ! भिक्षुकशाहीच्या कृत्रिम वर्चस्वाविरुद्ध उघड उघड चढाई करणाऱ्या या व्यक्त चळवळीपेक्षां ठिकठिकाणीं असल्या अनेक अव्यक्त चळवळीं आहेतच. त्यांची वाट काय ? या कां अस्तित्वांत आल्या ? त्यांचें ध्येय काय ? त्यांचा परामर्ष सामोपचारांनीं घ्यायचा कीं वितंडवादांनीं कलहाग्नि भडकावून द्यायचा ? याचा विचार प्रथम व्हावयास पाहिजे. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या उदात्त कल्पनांच्या वातावरणांत उंच उंच भराऱ्या मारणाऱ्या गरुडांनीं पृथ्वीतलावरील आपल्याच घरची आपलीच भावंडे समर्थांच्या घरच्या श्वानांनीं किंवा श्वानांच्या घरच्या समर्थांनीं गुलामगिरीच्या वरवंट्याखाली ठेंचण्याचा संप्रदाय चालूं ठेवलेला पाहून सुद्धां किंचित् खालीं उतरूं नये, यावरून कोणाला काय बोध घेतां येण्यासारखा असेल तो घ्यावा ! नरसोबाच्या वाडीला तेथील भिक्षुकांनीं मुंबईकर दैवज्ञांवर केलेली प्राणघातक दंगल, नगरच्या नागझरी कुंडावरची मारामारी, बोरखळास झालेला तिरस्करणीय पोरखेळ, सज्जनगडावरचा हलकट दंगा, औंध संस्थानांत सध्यां सुरूं असलेली पंतांची डायरशाही व या सर्व प्रकरणांचें खापर एनकेन प्रकारेण ब्राह्मणेतरांच्या माथीं फोडण्याची राष्ट्रीय कंपूची चतुराई व कारवाई पाहून वारा कसा व कोणत्या दिशेला वहात आहे, हें सांगायला नको. हे असले प्रकार आजला ठिकठिकाणीं घडत आहेत. ते पाहून कोणाहि समतौल भावनेच्या मनुष्याचें मन खिन्न झाल्याशिवाय रहाणार नाहीं; मग भिक्षुकशाहीच्या नकली वर्चस्वाविरुद्ध आधींच खवळलेल्या

आडदांड सत्यशोधकांनीं कांहीं दंडेली केलीच, तर त्यांचा कान कसा पकडतां येईल ? अत्याचार केव्हांहि झाला, कोणीहि केला तरी तो निंद्यच; परंतु आपला दाम खोटा असून परक्यांशीं झगडा करणें मूर्खपणाचें आहे, एवढी जाणीव जर भिक्षुकशाहीला होईल, तर या वादाचा शेवट हां हां म्हणतां होईल, यांत मुळींच संशय नाहीं.

आमच्या आजपर्यंतच्या सर्व ग्रंथांना महाराष्ट्रीय बंधु भगिनीनीं फारच चांगला आश्रय दिलेला आहे; इतका कीं आमच्या प्रत्येक ग्रंथाची प्रथमावृत्ति बोलबोलता महिना पंधरा दिवसांतच खलास होत आली. या आश्रयाबद्दल आमचा विनम्र माथा त्यांच्या चरणीं कृतज्ञतापूर्वक सदैव ठेविला आहेच. प्रस्तुत वज्रप्रहार ग्रंथमालेला असाच आश्रय देऊन आमच्या सत्यप्रेमी बंधु भगिनी आमच्या स्वतंत्र प्रवृत्तीच्या नवमतवादी निस्पृह वाङमयसेवेचें योग्य चीज करतील अशी फार फार उमेद आहे.

सर्व पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा. याचें कारण आतांपासून आमच्या सर्व ग्रंथांचें प्रकाशन करण्याचें कार्य आम्हीं आपल्या स्वतःच्याच हातीं घेतलें आहे. प्रकाशकांच्या बाबतींत आम्हांला अत्यंत कटु अनुभव आला आहे. प्रकाशकपणाचा शेंदूर फांसलेले दगडधोंडे अखेर आपल्या जन्मप्रवृत्तीवर गेले; अर्थात् हातीं घेतलेल्या कार्याच्या महत्त्वापुढें या दगडोबांना लाथाडून आमचा मार्ग आम्हांला खुला करून घ्यावा लागला. एक खप्पी प्रकाशक तर आम्हांला असे भेटले आहेत कीं सतत दहा वर्षे हाडांचीं काडे करून लिहिलेला आमचा एक ग्रंथ ते जे दडवून बसले आहेत तो परत करण्याची बुद्धीच त्यांना होत नाहीं. कारण काय ? तर म्हणे 'तो कोठें ठेविला आहे तो सांपडत नाहीं' ! आतां या दीर्घ स्मरण्या गृहस्थांना लोकमान्य टिळकांची शपथ घालायचें मात्र राहिलें आहे; बाकी, ग्रंथावर पाणी सोडण्यापलीकडे दुसरें गत्यंतर उरलें नाहींच. असो. या उप्पर आमच्या सर्व जुन्या नव्या ग्रंथांबद्दल पत्रव्यवहार करणें तो फक्त आमच्याच नांवानें करीत जावा. पूर्वींच्या नामधारी प्रकाशकांचा व आमचा कांहीं एक संबंध उरलेला नाहीं किंवा त्यांच्या हातीं आमच्या ग्रंथांबद्दल कसलेहि अधिकार (पूर्वी दिलेच नव्हते !) उरलेले नाहींत.

प्रस्तुत पुस्तकाच्या संकल्पावस्थेपासून तो त्याचा आज जन्म होईपर्यंत आमच्या अनेक मित्रांनीं आम्हांला परोपरी सहाय केले. त्यांच्या सहायाच्या तुलनेनें आमचें नुसतें शाब्दिक आभार प्रदर्शन अगदीच कमतोल ठरणार हें उघड आहे. आभार प्रदर्शनाचें काम मोठें बिकट असतें. ज्यांच्या सक्रीय सहानुभूतिमुळेंच एखादें कार्य तडीला नेण्यास आपण शक्त होतो, त्या सहानुभूतीचा प्रत्युपकार फेडण्याचें सामर्थ्य नुसत्या शब्दांत तरी खास नाहीं, हें उपकार करणारा व प्रत्युपकाराचा प्रयत्न करणारा दोघेहि जाणत असतात. म्हणून आमच्या सर्व प्रेमळ सहायकांच्या चरणीं आम्हीं कृतज्ञ भावनानें मस्तक ठेवितो, या पलीकडे हृदयस्थान भावनेचें व्यक्तीकरण करण्यास अन्य मार्ग या क्षणी तरी आम्हांला आढळत नाहीं.

प्रेमळ मित्रांनीं उत्तेजन दिलें, परोपरी सहाय केलें व ग्रंथकारानें आपल्या बऱ्यावाईट पद्धतीनें ग्रंथ लिहून काढला; पण तो छापून निघाल्याशिवाय उपयोग काय? हल्ली मुंबईत छापखान्यांवर महागाईची व कामगारांच्या तुटवड्याची वक्रदृष्टी भयंकर असतांनाहि तत्त्वविवेचक छापखान्याचे तरुण उत्साही व सत्यप्रेमी मालक श्री. यशवंतराव काशिनाथ पडवळ व व्यवस्थापक श्री. तुकारामजी शेट यांनीं हा ग्रंथ फारच मेहनतीनें उत्कृष्टपणें छापून दिला, याबद्दल त्यांचे उपकार कोणत्या शब्दांनीं व्यक्त करावे? आम्ही त्यांचे फार आभारी आहोंत.

ता. ९ मे सन १९२१ सोमवार<br>
**श्रीशिवजयंति,** वैशाख शु. २<br>
शके १८४३, वज्रप्रहार ग्रंथमाला<br>
कचेरी २०, मिरांडाची चाळ,<br>
**दादर, मुंबई नं. १४.**

देशबंधुभगिनींचा दासानुदास,<br>
**केशव सीताराम ठाकरे.**

॥ ॐ भूर्भुवः स्वः। तत्सवितुर्वरेण्यम् भर्गो देवस्य धीमहि ॥ धियो
यो नः प्रचोदयात्।

# भिक्षुकशाहीचें बण्ड

*"आम्हां हिन्दु लोकांना अनेक शतकांपासून अनेक प्रकारच्या जुलमांखालीं रहावयाची संवय झाल्यामुळें आमच्या समाजांतील नीतिबल अगदीं नाहींसें झालें आहे. राजकीय जुलूम, आचार्यांचा जुलूम आणि सामाजिक किंवा जातीचा जुलूम आशा तीन प्रकारच्या जुलुमांखालीं आम्ही इतके दडपून गेलों आहों कीं, आम्हांस मान वरच करता येत नाहीं."*

डॉ. भांडारकर.

जुनें तेवढें सोनें, ही म्हण सोन्याइतकीच जरी मोहक आणि उत्कृष्ट असली, तरी सृष्टीक्रमाच्या निसर्गसिद्ध कायद्यांशीं विरोध करणारी आहे. अर्थात् या म्हणीच्या सांवलीखालीं फक्त जणिर्मतवाद्यांनीं-म्हणजे अप्रगमनशीलांनींच--काय तो आश्रय घ्यावा, मानवी सृष्टीत हरहमेश मोठमोठाल्या चळवळीं, प्राणघातक तंटे, मस्तकें भणाणून सोडणारे घातपात, हृदयाचें पाणी पाणी करून टांकणारीं बंडें सत्याला असत्याचा आणि असत्याला सत्याचा मुलामा चढवून जीवसृष्टीचा संहार करणारीं अमानुष युद्धें व कत्तली यांचा धुमाकूळ अखंड चालू असूनसुद्धां निसर्गदेवतेचा कारभार अगदीं कांटेतोल समतेनें अव्याहत चालूंच आहे. इतकेंच नव्हे, तर

## झपझप चालण्यास नेहमींच नाखुष

असलेल्या मानवी प्रवृत्तीलाही तो आपल्या बरोबर पुढें पुढें खेंचीत नेण्यास सोडीत नाहीं. निसर्ग प्रवृत्ति कधींही एका ठिकाणीं थांबून स्तब्ध उभी राहत नाहीं, किंवा कोणी तिची मान कांपली तरी पुढें टांकलेलें पाऊल ती मागें घेत नाहीं. तिची धांव नेहमीं पुढें पुढेंच असते. मानवी प्रवृत्ति नाठाळ बैलाप्रमाणें मध्येंच कोठें तरी उठवणीस आल्याचें ढोंग करून पुढें पाऊल टांकण्याचें साफ नाकारते ; यामुळें या दोन प्रवृत्तींच्या प्रगमनशीलतेंत नेहमींच शेंकडों मैलांचें अंतर पडलेलें दिसून येतें. निसर्गप्रवृत्तीचा ज्या ठिकाणीं किंवा ज्या प्रदेशांत **आज** संचार चालू असतो, तें ठिकाण किंवा तो प्रदेश **उद्यां** तिच्या सभोंवार दृष्टीस पडत नाहीं. मानवी प्रवृत्ति निसर्गाच्या

हिसकाहिसकीमुळें आणि कालोघाच्या सोंसाट्यामुळें विसाव्या शतकाच्या मैदानांत येऊन जरी दाखल झाली, तरी तिला १४ व्या किंवा १५ व्या शतकांतल्या कल्पनाच्या शिळ्यापाक्या झुणका भाकरीचा मोह सुटत नाहीं.

## निसर्गप्रवृत्ति आगगाडीसारखी आहे

क्रिस्ती शकाच्या पूर्वी ज्या ज्या परिस्थितीच्या स्टेशनांवरून ती भरधांव जात होती, तीं स्टेशनें आज कालपटलामागें अदृश्य झालीं असून, त्यांच्या अंधुकपणाबरोबरच तत्कालीन् परिस्थितीचे निरनिराळे रंगसुद्धां आजला दृष्टीगम्य नसल्यामुळें,तीक्ष्णतम दृष्टीसामर्थ्याची घमेंड मारणाऱ्या मानवी प्रेक्षकांच्या नेत्रांना त्याच्या इतिहाससिद्ध सगुणत्वाला निर्गुणत्वाच्या कोटीक्रमाचा बाप्तिस्मा देऊन, आपल्या निरीक्षण--कौशल्याची अब्रू कशीतरी बचवावी लागते. कमींत कमी गेल्या चार सहा हजार वर्षांच्या अवधींत या आगगाडीनें इतक्या दूरवर झपाट्यानें प्रवास केलेला आहे कीं मानवी सृष्टीची प्रगमनप्रियता तिच्या प्रगतीच्या तडफेपुढें कःपदार्थ बनली आहे. निसर्गाच्या मेलगाडीनें जें स्टेशन एकादा मागें टांकलें, त्याकडे ती पुनश्च कधींहि परत वळत नाहीं. उलटपक्षीं, मानवी प्रवृत्तीची मालगाडी परंपरेच्या कोत्या अभिमानाच्या ठोंकरीमुळें वारंवार कोठल्या तरी मधल्याच स्टेशनावर 'शंट' करून ठेवावी लागते. निसर्गाच्या मेलगाडीच्या इंजिनांत

## नवविचारांचा धगधगीत अग्नि

भडकलेला असतो. मानवी प्रवृत्तीच्या मालगाडीच्या इंजिनाला सदर्न मराठ्याप्रमाणें लांकडांच्या ढलप्यांवर व जीर्ण सालप्यापांचोळ्यावर आपली भूक भागविण्याची संवय लागलेली असल्यामुळें, हरदाशी कंठाळी घोड्याप्रमाणें तिची गति असते. निसर्ग प्रवृत्ति ही जात्याच एखाद्या सार्वभौम राजाच्या पट्टराणीसारखी नखरेल आणि तालेवार आहे. एकदा नेसलेली पैठणी ती पुन्हां कधींहि नेसत नाहीं. एकदां वापरलेल्या चंद्रहाराला ती पुनश्च केव्हांहि आपल्या वक्षस्थळाचा स्पर्श होऊं देत नाहीं. एकदां चाखलेलें पक्वान्न तिच्या अधरोष्टाच्या स्पर्शाला केव्हांहि पुन्हा पात्र होत नाहीं. फार काय, पण श्रृंगारलीला केलेल्या आजच्या रंगमहालांत घडीभरानें ती पाऊलसुद्धां टाकणार नाहीं. तिच्याइतकी नव्यानवाईची भोक्ती साऱ्या विश्वांत तिची तीच. तिला दररोज नव्यानव्या पैठण्या पाहिजेत; नव्यानव्या फॅशनचे नवीन नवीन रत्नांनी गुंफलेले रत्नहार पाहिजेत; नवीं नवीं रुचकर पक्वान्नें पाहिजेत आणि रोजच्या रोज नवनवे शृंगारलेले महाल पाहिजेत. जुन्यांकडे ती ढुंकूनसुद्धां पहात नाहीं किंवा त्यांची तिला आठवणसुद्धां होत नाहीं. रुचिवैचित्र्यांत निसर्गप्रवृत्ती जरी इतकी तालेवार आहे, तरी तिचा स्वभाव मात्र फार धिम्मा आणि तिचें वर्तन कांटेतोल पद्धतशीर आहे. मानवी कौशल्यानें बनविलेलीं घड्याळें आणि तालयंत्रें वेळी पुढें मागें होतील--नव्हे, होतातच,--पण निसर्गप्रवृत्तीची गति ठराविक ताळमेळानेंच अखंड चालू आहे. वेदपूर्व काळ, वैदिक काळ, तत्त्वज्ञानाची उच्च भरारी मारणारा उपनिषत्काळ, पौराणिकी कादंबऱ्यांचा काळ व ऐतिहासिक काळ, अशा अनेक निरनिराळ्या क्षेत्रांतून तिनें पद्धतशीर संचार केला आणि आजला ती विचारशक्तिसंपन्न

## नव्या मन्वंतराच्या विसाव्या शतकांत

नवजीवनाच्या रुचिवैचित्र्यांनीं खमंग बनलेली नवविचारांचीं पक्कान्नें सेवन करीत झपाट्यानें पुढें चाललीच आहे. वैदिक काळांत आल्यावर वेदपूर्व काळांतील आचारविचारांकडे तिनें ढुंकून पाहिलें नाहीं; उपनिषत्काळांतील क्षत्रियांच्या छातिठोक तत्वशोधनांची प्रदर्शनें पाहून, ऋग्वेद काळांतील साध्या भोळ्या पारमार्थिक कल्पनांची तिनें टर उडविली नाही; किंवा पौराणिकी काळांतील काल्पनिक कथोपकथांचा बेगडी बुट्ट्याचा शालू पांघरतांना, उपनिषत्कांळच्या शुभ्र तलम मलमली वस्त्रांची तिला आठवण झाली नाही. ऐतिहासिक काळांत गोवळकोंडी कोहीनुरांची कंकणें मोठ्या अभिमानानें आपल्या हातांत चढलेली पाहूनसुद्धा, मागील पौराणिक काळांतील तकलादी दागदागिन्यांची तिनें कधिं निंदा केली नाही; किंवा ऐतिहासिक काळांतील ठुशांचा घांट प्रचलीत नव मन्वंतरांत अझिबात कां बदलला ? म्हणून तिनें कधिं कोणास प्रश्नहि विचारला नाहीं. कारण तिला पक्कें माहीत आहे कीं Old order changeth giving place to new. "जुनी पद्धति बदलुनि जाते नवीस जागा द्याया."

आतां मानवी प्रवृत्ति पहा. ही स्वतःस फार शहाणी समजते. हिला आपल्या दूरदृष्टीची घमेंड फार. भूत वर्तमान व भविष्य या तीनहि काळांच्या नाकांत माझ्या एकमार्गी धोरणाची वेसण घालून मी त्यांना वाटेल तशी नाचवीन किंवा वाटेल तिकडे वळवीन, असा तिला मोठा आत्मविश्वास वाटतो. भूतकाळाचा आत्मा वर्तमान काळाच्या देहांत घालून त्याला भविष्यपुराणें सांगण्यास भाग पाडण्याची शक्ति माझ्यामध्यें आहे, असें तिला निश्चयपूर्वक वाटतें. मानवी प्रवृत्ति प्रगमनशीलतेचा मोठा आंव आणते खरी, परंतु जन्मदारभ्य तिच्या गळ्यांत अडकलेलें

## परंपरा-प्रियतेचें लोढणें

आज गेल्या पांच सहा हजार वर्षांत तिला काढून टांकतां आलें नाहीं, ही एकच गोष्ट तिच्या पंगूपणाची साक्ष देण्यास पुरेशी आहे. परंपरा ! होय परंपराच ! ! या परंपरेच्या केत्या अभिमानानें मानवी प्रवृत्तीची जगाच्या इतिहासांत जितकी बदनामी झाली आहे, तितकी तिच्या इतर कोणत्याही दुष्कृत्यांनी झालेली नाही. काळाच्या धांवत्या गतीबरोबर आणि निसर्गप्रवृत्तीच्या अप्रतिहत फोंफावत जाणाऱ्या सिद्धांतांबरोबर आपल्या आचारविचारांची गति ठेवण्याची दूरदृष्टी--नव्हे, लायकीच--मानवी प्रवृत्तींत नसल्यामुळें, तिचा इतिहास नेहमींच कालव्यतित्यानें चिघळत असतो. मानवी प्रवृत्तीची ही कालव्यतितता किंवा पुराणप्रियता मुख्यत्वें हिंदुस्थानांत व विशेषतः हिंदूत जशी ठळकपणें पहावयास मिळते, तशी जगांत इतरत्र कोठेंहि मिळणार नाहीं. या एका पुराणप्रियतेमुळें हिंदुस्थानाचें आणि हिंदूंचें जितकें नुकसान झालेलें आहें. तितकें परचक्रांनींहि केलेलें नाहीं. आजला हिंदू लोकांची जी कांहीं विशिष्ट नष्टाचर्य्यावस्था आहे, तिच्या मुळांशीं याच एका दोषाचें बीज पडलेलें आहे; आणि जोपर्यंत या बीजाचा बीमोड होणार नाहीं, तो पर्यत हिंदूंचा जगाच्या चढांओढींत टिकावही लागणार नाहीं. परंपरेचा अभिमान निराळा आणि पुराणप्रियतेचा ताठा निराळा. पहिल्यांत जेवढी सात्विक शुद्धता हातीं लागते,

त्याच्या दसपट तामसी घाण दुसऱ्यांत आढळते. पुराणप्रियतेंत परंपरेच्या अभिमानाचें मीठ पडलेलें असतें, ही गोष्ट खरी; परंतु पुराणप्रियतेच्या तामसी तत्वांत त्या मिठाचा सात्विकपणा तेव्हांच विरघळून नाहींसा होतो. परंपरेचा अभिमान ऐतिहासिक महत्वाच्या दृष्टीनें कितीहि क्षम्य आणि प्रशंसनीय असला, तथापि त्यांत पुराणप्रियतेच्या हट्टीपणाची खाजकुहिली पडतांच व्यावहारीक सृष्टींत तो अक्षम्य, निंद्य आणि हानीकारक ठरल्याशिवाय कधींहि रहात नाहीं. परंपरेचा ताठा आणि अनुवंशिक संस्काराची कल्पना, हीं दोन खुळें कोणत्याहि पराक्रमी राष्ट्राची शक्ती खच्ची करून टांकण्यास पुरेशीं आहेत. पुराणप्रियता ऊर्फ परंपरेचा फाजील ताठा म्हणजे काळाच्या ओघाबरोबर चालण्याची नाखुषी आणि अनुवंशिक संस्काराची कल्पना म्हणजे

## शुद्ध तर्काची कादंबरी

पुराणप्रियता म्हणजे नव्या घोड्यावर जुनाच खोगीर बळजबरीनें लादण्याचा अट्टहास आणि अनुवंशिकत्वाचे थेर म्हणजे जुन्या नव्या गोष्टीं अदूर दृष्टीनें एकाच ठरीव साच्यांत दडपिण्याचा मूर्खपणा. राष्ट्राच्या किंवा व्यक्तीच्या वयमानाचें प्रमाण लक्षांत न घेतां पुराणप्रियता त्याला बोंडल्याबोंडल्यानेंच दूध पाजण्याचा हट्ट धरते; तर अनुवंशिक संस्कार-कल्पनेची एकाक्ष राक्षसी सांचेवजा गुणधर्माच्या काल्पनिक स्थिरतेच्या मृगजळावरच तहान भागविण्याची मानवी समाजावर बळजबरी करते.

* * * *

[ २ ] हें कांहींहि असलें तरी एक गोष्ट निर्विवाद आहे कीं निसर्गप्रवृत्ति आणि मानवी प्रवृत्ति यांतल्या विरोधांतूनच जगाच्या इतिहासाची उत्पत्ति झाली आहे, होत आहे आणि पुढेंहि होतच राहील. या विरोधाच्या झटापटींनींच मानवी सृष्टीचा इतिहास रंगून निघालेला आहे, आणि या विरोधांतील विरोधी तत्व काढून टांकून त्यांत एकवाक्यता आणण्याचा प्रयत्न जरी ज्ञानी जन करीत असले, तरी इतिहासाची सारी रुचि या विरोधानेंच स्वादिष्ट बनविली आहे. हें मात्र कबूल करणें प्राप्त आहे. निसर्गाची कांटेतोल प्रगमनशीलता आणि मानवांची दुराग्रही अप्रगमनशीलता या दोन गोष्टी कितीही परस्परविरोधी असल्या, तरी

## जीवसृष्टीच्या इतिहासाचा आत्मा

या भेदाच्या विरोधानेंच चैतन्यपूर्ण केलेला असतो. जीवसृष्टी अत्यंत चलनप्रिय आहे आणि मनुष्यप्राणी हा जात्याच रुचिवैचित्र्याचा मोठा भोक्ता आहे. तथापि त्याचें रुचिवैचित्र्य, त्याची अमर्यादित महत्वाकांक्षा आणि साऱ्या ज्ञात सृष्टीवर हुकमत चालविण्याची त्याची कधींहि माघार न घेणारी निश्चयी वृत्ति, या सर्वावर ईश्वरदत्त एका देणगीचा दाब बसलेला असतो. हा दाब म्हणजे त्याच्या विवेकबुद्धीचा दाब होय. मानवी प्राण्याला विवेकबुद्धी ही परमेश्वराची खास देणगी आहे. याच देणगीनें त्याचें इहलोकाचें जीवित नियंत्रित झालेलें आहे. मानवी बुद्धिमता कितीहि अचाट आणि कितीहि पराक्रमी असली, तरी तिला विवेकाचा कस लागल्याशिवाय तिची खरी मान्यता प्रगट व्हायची नाहीं, तिची खरी किंमत कळावयाची नाहीं आणि मानवी संसाराला

तिचा कांहीं उपयोगहि व्हावयाचा नाहीं इतकी जाणीव मनुष्यांत असते म्हणूनच त्यांना मनुष्यें म्हणतात. विवेकबुद्धी ही माणसांमाणसांमधिल आत्मिक परिणततेच्या पायऱ्या दाखविणारी 'मीटर' शक्ती आहे. सृष्टी निर्माण करून, त्यांत

## मनुष्य प्राणी ही एक अजब चीज

उत्पन्न करण्यांत विधात्याचा हेतू काय असेल तो असो, पण मानवजातीचा आजदीनतागायत चळवळींचा इतिहास पाहिला तर त्यांत प्रत्यक्ष विश्वविधात्याच्या अगम्य शक्तीच्या तोडीस तोड देण्याची त्याची खटपट अव्याहत सुरुंच आहे, असें विधान करणें फारसें धाष्ट्यचिं होणार नाहीं. विश्वामित्रानें प्रतिसृष्टी निर्माण केल्याची गोष्ट जरी केव्हांहि ऐतिहासीक पुराव्यांनीं सिद्ध होणें शक्य नाही. [आणि ती प्राचीन ग्रंथांत मुद्दाम घुसडण्याचा हेतू फार निराळ्या मनोवृतींतून जन्मलेला आहे, ही गोष्ट याचा ग्रंथात पुढें दाखविण्यांत येईल.] तरीसुद्धां आपल्या मृत पितरांना प्रत्यक्ष देवांच्या पंक्तींत नेऊन बसवायला मानवांनी बिलकूल कमी केलेलें नाही. वाडवडीलांना खुद्द परमेश्वराच्या जागीं नेऊन स्थापन करण्याची आणि अशा रीतींनें आपला

## पारमेश्वरी अंशाच्या वारसाचा हक्क

अविच्छिन्न सिद्ध करून दाखविण्याची प्रवृत्ति सर्व राष्टांतील सर्व मानवांत विशेष दिसून येते. विशेषतः हिंदी आर्यांनीं तर या बाबतींत दंतकथांचा आणि पुराणादि कादंबऱ्यांचा न भूतो न भविष्यति असा उपयोग आणि प्रसार करून घेऊन 'आम्ही अमूक ऋषींचे खास वंशजच आहोंत' असा एका प्रकारच नाटकी कौटुंबिक इतिहासच अस्तित्वांत आणून ठेविला आहे. हिंदी आर्यांचें केवळ ऋषींच्या नुसत्या वंशजत्वावरहि समाधान झाल्याचें दिसत नाहीं. ऋग्वेद काळांतील पितरभक्तीच्या साध्याभोळ्या प्रेमपूर्ण कल्पनांवर त्यांनीं आणखी एका कादंबरीचें जाडजूड पूट चढविलें आणि सृष्टीविधाता ब्रह्मदेव अशी एक नवीन दैवी व्यक्ती आपल्या तरळ आणि चंचल कल्पनेंतून प्रसवून, त्याच्या निरनिराळ्या अवयवांतून आपणां स्वतःस त्यांनी प्रसवून, घेतलें. भेदभावाचा उद्गम आपणांस याच ठिकाणीं प्रथमतः आढळतो. ऋग्वेद-काळाच्या टळटळीत तीनसांजेच्या वेळीं जेव्हां ब्रह्मदेवाच्या बाळंतपणाची कादंबरी अस्तित्वांत आली, त्याच वेळीं

## ब्राह्मणीमताचें भेदभावाचें करटें

पालथें जन्माला आलें आणि त्याच वेळीं हिंदी आर्यांची सर्व संस्कृति आणि सर्व वैभवहि पालथेंच पडलें !! सामाजिक सोईकरितां—किंवा घटकाभर आपण असेंहि गृहीत धरून चालूं कीं स्वार्थाकरितां—मांणसांनी खुद्द आपापल्यामध्यें जरी अनेक भेद, पंथ व जाती निर्माण

केल्या आहेत, तरी विवेकाच्या शुद्ध दुर्बिणींतून आपण जर यच्चावत् मानवी सृष्टी पाहिली तर त्यांत आपल्याला **फक्त दोनच मुख्य भेद** दिसतात, माणसांचे दोनच ठळक पंथ आढळतात आणि दोनच मुख्य जाती आपल्याला दृष्टीगोचर होतात. कोणत्याहि काळांतलें कोणतेंहि राष्ट्र कितीहि सुधारलेलें असो, त्यांत नेहमीं हे दोन ठळक भेद—त्यांचीं नांवें कांहींहि असोत–असावयाचेच ; आणि मानवांच्या सुधारणेचा इतिहास आपण किंचित् शांत व निर्विकार चित्तानें मनन केला तर आपल्याला एकच गोष्ट सप्रमाण पटेल कीं अगदीं प्राचीनतम काळापासून मनुष्यांतल्या या

## दोनच भेदातल्या झटापटी

त्या त्या इतिहासाला मूळ कारणीभूत झालेल्या आहेत. मानवांतील हे दोन अनादिसिद्ध भेद म्हटले म्हणजे ज्ञानी व अज्ञानी हे होत. संस्कृत व असंस्कृत, सुधारक व रानटी, शिक्षित व अशिक्षित, यांपैकीं किंवा अशाच तऱ्हेचीं दुसरीं नांवें इतिहासांत अनेक आढळतील ; तथापि तीं ज्ञानी व अज्ञानी या दोन तत्त्वांचीच निदर्शक असतात. हीं दोन तत्त्वें मानवी समाजाच्या सुधारणेची अथवा रानटीपणाची द्योतक असतात. ज्ञानाला प्रकाशाची आणि अज्ञानाला अंधःकाराची उपमा देतात ; आणि या दोघांतील भेदहि तितकाच स्पष्ट आहे. प्रकाश व अंधार यांतील झगडा विश्वोत्पत्तीच्या काळापासूनचा आहे आणि तो विश्वसंहाराच्या (जर विश्वसंहार कधिंकाळीं खरोखरच व्हायचा असेल तर) शेवटच्या घटकेपर्यंत असाच चालायचा. हीच गोष्ट मानवांतील ज्ञान व अज्ञान यांची होय. साऱ्या जगाला––सर्व मानवजातीला सुविद्य व ज्ञानी करून सोडण्याची कोणी पैज मारली, तर त्या सज्जनाच्या सद्धेतूबद्दल जरी त्याची प्रशंसा करणें वाजवी होईल, तरी त्याच्या पैजेच्या अव्यवहार्यतेबद्दल त्याची कींव करणें तितकेंच भाग पडेल. कोणीतरी सुधारक आणि कोणीतरी रानटी, कोणीतरी ज्ञानी आणि कोणीतरी अज्ञानी, हा क्रम जगाच्या अंतापर्यंत असाच चालावचा. यांतच

## सृष्टीच्या संसाराची खरी मख्खी

आहे. यावरच जगाच्या इतिहासाचा प्राण अवलंबून आहे. प्रकाश अंधाराला चीत करण्याचा यत्न करतो, तर अंधार प्रकाशाला आमूलाग्र गिळूनच टाकण्याची पैज मारतो. ज्ञानी अज्ञान्याला दादा बाबा करून, किंवा वेळीं कान पकडून, त्याच्या तोंडांत बळेंच ज्ञानामृत कोंबण्याचा यत्न करतो, तर अज्ञानी तें अमृत थुंकून टाकून ज्ञान्यावर दुगाण्या झाडतो. ज्ञान डोळस असल्यामुळें ' पृथ्वीवर माझीच एकमुखी सत्ता चालूं पाहिजे ' असा न्याय्य हट्ट धरतें, तर अज्ञान म्हणतें की या प्रथ्वीवरचा मूळचा रहिवाशी आहें; मी या पाहुण्या आणि परक्या ज्ञानाची येथें मुळींच डाळ शिजूं देणार नाहीं; मीचं येथला आद्यसत्ताधारी आहें. ' ज्ञानाला जर देवाची उपमा दिली तर अज्ञानाला दैत्याची देणें सरळच होईल. ज्ञानाला **आर्य** म्हटलें तर अज्ञानाला **दस्यूच** म्हटलें

पाहिजे. जगाच्या प्राचीन उपलब्ध इतिहासाचें पहिलेंच पान उघडून पाहूं लागतांच हा देव दैत्यांचा किंवा

## आर्य दस्यूंचा झगडाच

आपल्या नजरेस प्रथम पडतो. हा झगडा सनातन असल्यामुळे तो अझूनपर्यंत आहे तसाचं चालू आहे, यांत कांहीं आश्चर्य नाहीं. मात्र त्यांचें स्वरूप सांप्रत अझीबात बदललें असून, कांहीं ठिकाणीं तर तें चिळस येईल इतकें विपर्यांसी बनलें आहे, आर्यांचा आणि दस्यूंचा झगडा किंवा संस्कृत समाजांचा असंस्कृत समाजांशीं झगडा कंठपर्यंत प्रशंसनीय ठरतो, याचीही कांहीं विशिष्ट विवेकमर्यादा ठरलेली आहे. कोणतीहि गोष्ट मर्यादेबाहेर गेली कीं तिच्याबद्दल कोणालाहि चिळसच उत्पन्न व्हायची; मग त्या गोष्टीचा कर्ता देव असो वा दैत्य असो, आर्य असो नाहींतर दस्यू असो ! अत्यंत प्राचीन काळीं हिंदु आर्यजन ज्ञानी होते. त्यांची सर्व प्रकारची संस्कृति फार उच्च दर्जाची होती. त्यांनीं तिच्या जोरावर अशीं सनातन धर्मतत्वें शोधून काढलीं कीं प्रचलीत मन्वंतरांतील कुशाग्र शास्त्रीय शोधांनाहि त्यांच्यापुढें मान वांकविणें भाग पडत आहे.* या सर्व गोष्टी कितीहि खऱ्या असल्या, इतिहासांत त्याला कितीहि भरमक्कम आधार असला, फार काय, पण आमच्या कट्ट्या हाडवैऱ्यांना [ जर खरोखर कोणी आमचे हाडवैरी असतील तर ! ] जरी त्या अगदी अक्षरशः मान्य असल्या, तरी त्याच प्राचीन परंपरेचा गर्वभार

* The Vedic Dharma, however, never feared scientific advancement, nor was it ever guilty of the terrors of the Inquisition. It never shed the blood of Galilio, a Copernicus or a Bruno.

*Hindu superiority. p. 394.*

(2) The Hindus regard God as present in the mosques, with those who kneel before the cross, and in the temple where Brahma is worshipped. And is not this Faith more in accordance with the *true doctrine* of Christ than that which lighted the *Auto da* fe for the infallibility of the Popes, for the divinity of Mary, and for the miracles of the saints ?

*Theogony of the Hindus. pp. 67—68.*

(3) India is the mother of religion. In her are combined secience and religion in perfect harmony, and that is the Hindu Religion, and it is India that shall be again the Spiritual Mother of the world.

*Mrs. Annie Besant,*

*Lecture at the Grand Theatre, Calcutta, delivered on 15th Jan. 1906.*

वहाणारे तेच हिंदुलोक सांप्रत कोणत्या स्थितींत आहेत? आमचा धर्म **सनातन वैदिक धर्म** † असे मोठ्या अभिमानानें सांगणारे हिंदू आज खरोखर कोणता धर्म आपल्या प्रत्यक्ष आचरणानें पाळीत आहेत? सांप्रतचा हिंदुधर्म म्हणजे विश्वव्यापकतत्त्वांची साऱ्या जगभर दुंदुभी घडकविणाराच वैदिक हिंदुधर्म आहे काय ? ज्यांनीं ऋग्वेद रचला त्याच आर्यांचे आम्ही खास वंशज आहोंत, अशी साऱ्या जगापुढें जबानी देणारे आजचे हिंदु.

## साऱ्या जगाचे गुलाम आणि मजूर

कां झाले आहेत ? प्राचीन आर्यांनीं घालून दिलेले धार्मिक, सामाजीक, राजकीय, आर्थिक इ. बाबतींतले उदात्त तत्त्वांचे घडेच आजचे हिंदु म्हणविणारे लोक घटवीत आहेत कीं त्यांत त्यांनी कांहीं सुधारणा केली आहे? सुधारणा म्हणत असाल तर तुम्ही आज इतक्या नरकवत् हीन स्थितींत कां ? ज्या हिंदु धर्माच्या प्रसाराचा विळखा ' पृथिव्यां सर्व मानवः ' वर पडलेला होता. तो सपशेल ढिला पडून अखेर त्याच्या प्रसाराचें क्षेत्र टिटवीच्या चोंचीइतकें संकुचित कां बनलें आहे ? या किंवा असल्यास प्रश्नांना समाधानकारक उत्तरें मिळत नाहींत. अलीकडे कांही हिन्दू आपणांस ' हिन्दु ' न म्हणवितां, व्याख्यानांत टाळ्या मिळविण्यासाठी ' आर्य ' म्हणतात; परंतु आर्यांच्या संस्कृतीचा शतांश तर राहूंद्याच, पण त्यांच्या रक्ताचा सहस्त्रांश तरी आजच्या या नामधारी आर्यांत उरला आहे काय ? आजला हिन्दु म्हणजे साऱ्या जगाची एक तिटकाऱ्याची वस्तु होऊन राहिली आहे. जगाच्या पाठीवर तिकडे पहाल तिकडे हिन्दूंना गचांड्या मारमारून हद्दपार करीत आहेत. हिन्दु आपल्या भूतकालीन् ऐश्वर्याबद्दल वाटेल तितक्या लंब्याचौड्या गप्पा मारोत, आज त्याना जगांत कोणीहि मोन देत नाहींत, ही गोष्ट नाकबूल करतां येणार नाहीं. कोणी त्यांना हिंडोस म्हणतो, कोणी जेन्टू म्हणतो. कोणी इंदोस म्हणतो. कोणी नेटीव म्हणण्यांतच धन्यता मानत ; पैगबरांची खैर, त्याना कोणी हैदोस किंवा ऑइस्टर (खेंकडें) अझून म्हणूं लागला नाहीं. हिंदूंची सांप्रतची समाजव्यावस्था, वर्णव्यवस्था, जातिभेद, धर्मव्यवस्था इत्यादि परिस्थिति इतक्या नीचतम दुरावस्थेला येऊन भिडली आहे कीं पुराणेंरूपीं काल्पनीक कादंबऱ्यांची बाडें प्रसविणाऱ्या नामधारी भोंदू व्यासांनी वर्णन केलेल्या नरकाच्या स्थितीचें हुबेहुब

† The present religion of the masses in India should not be literally taken to be the religion of their ancestors, and the nature of their religion should not be judged from the religious system of the modern Hindus. The once highly spiritual religion of the Hindus has, so far as the masses are concerned, now become thoroughly materialised to mark their degradation, and the things earthly are now installed in the place which was once occupied by the eternal principle of all things................ The Vedic Religion was not like the so-called Hindu religion of the present day, exclusive and confined to Indians. It was *Universal,* and non—Indians like the Greeks, Scythians, Huns and others, were included in its fold. Inscriptions recently discovered show that Greeks and others embraced Hinduism and were freely admitted in Hinduism.

*Hindu Superiority. pp, 388 & 392.*

चित्र आज प्रत्यक्ष हिंदुसमाजांत पहावयास मिळणें शक्य झालें आहे. फार काय, पण कांही अघटित घटनेनें ऋग्वेद कालचे आर्य आज जिवंत होऊन ही सर्व स्थिति आपल्या डोळ्यांनीं पहातील, तर

**' आम्ही ऋग्वेद काळच्या अर्यांचे खास वंशज आहोंत '**

असें आजचे हिंदु बोलतांच, खात्रीनें ते आपल्या पायांतला खेंटरच काढतील, यांत मुळींच संदेह नाही. पण ही अघटित घटनेची कल्पना अशक्य कोटींतील आहे, अठरा पुराणांच्या इतकाच असंभाव्यपणा हीत भरलेला आहे आणि सध्यांच्या ब्राह्मणांच्या ब्राह्मण्याइतकाच फोलकटपणा तींत आहे, म्हणून धर्माच्या नावांवर पशूवत् दुर्वर्तन आणि अत्याचार करणाऱ्या आमच्या नामधारी वेदोनारायणांनी भिती बाळगिण्याचें कांहीहि कारण नाही.

* * * *

[३] काळाची गति मोठी विलक्षण म्हणतात तेंच खरें ! कालचक्राच्या तडाक्यानें आजला हिंदूंच्या हिंदुपणाच्या चिंधड्या चिंधड्या उडविल्या आहेत. ज्या हिंदूंनीं साऱ्या जगाला धर्माचीं उच्चतम तत्त्वें शिकविली आपल्या ओजस्वी बुद्धिसामर्थ्यानें सृष्टीविधात्याचें एकमेवाद्वितीयत्व बिनतोड शोधून काढलें; आणि ज्यांनीं कित्येक शतकेंपर्यंत साऱ्या ज्ञात जगावर धार्मिक जगद्गुरूचा अधिकार गाजविला,* तेच हिंदु आज सर्वच बाबतींत परप्रत्ययनेय आणि धर्मलंड होऊन बसले आहेत. ज्या प्राचीन आर्य हिंदूंनीं समाजऐक्यांचे उच्च स्पृहणीय ध्येय प्रत्यक्ष प्राणांपलीकडेहि जतन करून सामाजिक व्यवस्थेंत कसलाहि भेद बाळगिला नाहीं, त्यांच हिंदूंची सांप्रतची समाजव्यवस्था हजारों जातीं पोटजातींनी केवळ सडून जाऊन तिला

**कुत्र्याच्या सडलेल्या प्रेताची घाण**

सुटली आहे. सामाजिक सुस्थितीसाठी गुणकर्मानुसार ठरविलेल्या वैयक्तिक कर्तबगारीच्या नैसर्गिक भेदाचा विपर्यास ठराविक नामधारी जातीतील जन्माच्या पुण्याईत झाला आहे ; आणि पूर्वीप्रमाणे त्रयवर्णिकांतील शरीरसंबंध सांप्रत बंद असूनसुद्धां ब्राह्मण म्हणविणारांच्या पोटीं शूद्रातिशूद्र वृतीचीं माणसें आणि शूद्र म्हणविणारांच्या उदरीं ब्रह्मविद्या जाणणारे क्षत्रिय किंवा कर्मठपणांत कोणासहि हार न जाणारे ब्राह्मण जन्माला येत आहेत. हें असें कां होत असावें,

---

* The Chaldeans, the Babylionians and the inhabitants of Colchis derived their religion and culture from India.

*Theogony of the Hindus, p. 38.,*

(2) That a system of Hinduism pervaded the whole Babylonian and Assyrian Empires, Scripture furnishes abundant proofs in the medium of the various types of Sungod, Bal Nath, whose pillar adorned every mount and every grove.

Tod's Rajasthan, Vol. I. p.605.

इकडें मात्र कोणाचेंहि लक्ष जात नसून, वर्णसंकराच्या बुजगावण्यानें* कृत्रिम जातिभेदाचे तट राजीखुषीनें व अक्कलहुषारीनें अधिकाधिक कणखर करण्यांत प्रत्येकजण अगदीं चूर होऊन गेला आहे. इतकेच नव्हें, तर असें करण्यांत महत्पुण्य आहे, धर्माचें यथासांग प्रतिपालन होत आहे आणि मोक्षाला बिनचूक जाण्याचा राजमार्ग हाच आहे, अशा प्रकारच्या चिथावण्या देण्यांत धर्मसंरेक्षणाची भाडोत्री काळजी वाहणाऱ्या भिक्षुकशाहीस तर मुळींच दिक्कत वाटेनाशीं झाली आहे. देशकालवर्तमानाप्रमाणें धार्मिक, सामाजिक किंवा राजकीय जीवनांत कमीअधिक चिवटपणा आणण्याची प्राचीन उदार मनोवृत्ति सांप्रत अज्जीबात नष्ट झाली असून, पूर्वीच्या चातुर्वर्ण्याचें पर्यवसान सध्या इतक्या असंख्य जातीं पोटजातींत झालेलें आहे कीं ब्रिटीश सरकारनें राजद्रोहाच्या अपराधाबद्दल एखाद्याला जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा न देतां, त्याला हिंदुस्थानांतील हिंदूंच्या जाती पोटजातींची मोजदाद करण्याची शिक्षा ठोंठावल्यास, ' मला या क्रूर शिक्षेपेक्षा दयाळू मायबाप सरकारनें ताबडतोब

## फांशीची शिक्षा देण्याची मेहेरबानी

करावी' असें अपील प्रिव्ही कौन्सीलांत दाखल केल्याशिवाय तो खास राहणार नाहीं. चार वर्णांच्या चाळीस हजार जाती ? त्याही पुन्हा एकमेकांपासून अलग–नव्हे, एकमेकांच्या प्रतिस्पर्धी ? मॅडमुल्ला गांधीच्या नॉन्कोऑपरेशनच्या कट्टया पुरस्कर्त्या !! ज्ञानीपणाचा किंवा अज्ञानीपणाचा, श्रेष्ठत्वाचा आणि नीचत्वाचा, प्रभुत्वाचा आणि गुलामगिरीचा मक्ता जन्मसिद्ध ठरलेला. मी ब्राह्मण कां तर माझी आई आणि बाप हीं ब्राह्मण म्हणवितात किंवा ब्राह्मणाच्या सदराखालीं मोडतात म्हणून मी ब्राह्मण, म्हणूनच मी जन्मसिद्ध ज्ञानी, जन्मसिद्ध श्रेष्ठ आणि जन्मसिद्ध पूज्य. मी कितीही महामूर्ख असलों, कितीही दुर्वर्तनी, दुराचारी, भ्रष्ट, पतित, आहो फार काय, पण खुद्द चांडाळालाहि लाज वाटेल अशी अनन्वित दुष्कृत्यें करण्यांत निर्ढावलेला असलों, तरीसुद्धां

## मी जन्मसिद्ध ब्राह्मण आहे

या एकाच अधारावर मी या लोकींचसा काय पण त्रैलोकींही वंद्यच आहे. ब्राह्मण ब्राह्मण म्हणजे काय

---

* The modern population of India almost everywhere is far two mixed to admit of the disentangling of distinct races each of a well-marked physical type. In the United Provinces or Agra and Oudh, where I served, the low caste Chamar or leather-dresser and even the sweeper (Bhangi & c.) often is handsome, and better-looking than many Brahmans............The mixture of races on indian soil was going on for countless ages before any history was recorded and it is hopeless now to unravel the different lines of descent.

*Vincent A. Smith, Oxford-India History p.6.*

(2) Like other peroples the modern Hindus are in varying degree of mixed stock.........One has only to look at a fair high caste Brahmana and a Dangar......India contains all type of cultute extending alomost from the neolithic to the present age.........The recial tangle is such that one hesitates to base conclusions on it.

THE SEED OF RACE, by Sir John Woodroff.
pp. 16—17.

समजतां ? मनुस्मृति * काय सांगते ? " **धर्मतो ब्राह्मणः प्रभु : १–९३] उत्पत्तिरेव विप्रस्य मूर्तिर्धर्मस्य शाश्वती । स हि धर्मार्थमुत्पन्नो ब्रह्मभूयाय कल्पते ॥** [१–१८] ब्राह्मण हा या सर्व सृष्टीचा प्रभु आहे. केवळ ब्राह्मणाच्या शरीराची उत्पत्ति हेंच धर्माचें अविनाशी शरीर होय. ब्राह्मण हा प्राणी धर्माकरितांच उत्पन्न झालेला आहे ; यास्तव, तो आत्मज्ञानाच्या द्वारां मोक्षास जातो." [अणि ब्राह्मणेतर ब्राह्मणांच्या मध्यस्थीशिवाय किंवा हातलावणीशिवाय मोक्षाला मुळींच जाणार नाहींत कीं काय ? [अझूनहि खात्री पटत नसेल तर घ्या आणखी एक मनुस्मृतीचा वळसा :—

**ब्राह्मणो जायमानो हि पृथिव्यामधिजायंते ।**
**ईश्वरः सर्वभूतानां धर्मकोशस्य गुप्तये ॥ ९९ ॥**
**सर्वं स्वं ब्राह्मणस्येदं यत्किंचिज्जगतीगतम् ॥**
**श्रेष्ठयेनाभिजनेनेदं सर्वं वै ब्राह्मणोऽर्हति ॥ १०० ॥**
**स्वमेव ब्राह्मणो भुङ्क्ते स्वं वस्ते स्वं ददातिच ॥**
**आनृश्यं स्याद्ब्राह्मणस्य भुजते हीतरे जनाः॥ १०१ ॥**

**——अध्याय १ ला.**

( कारण, उत्पन्न होणारा ब्राह्मण पृथ्वीमध्यें सर्वांत श्रेष्ठच उत्पन्न होतो. सर्व भूतांच्या धर्मसमूहाच्या रक्षणार्थ तो प्रभु आहे. या जगामध्यें जेवढें म्हणून धन आहे तें जणूं सर्व ब्राह्मणांचेंच आहे. कारण श्रष्ठता व कुलीनता या दोन गुणांमुळें त्या सर्वांस ब्राह्मण योग्य आहे. ब्राह्मण जें कांहीं दुसऱ्याचेंहि खातो तें तो वस्तुतः आपलेंच खातो. जें वस्त्र दुसऱ्याकडून घेऊन नेसतो तें तो आपलेंच नेसतो व जें एकाकडून घेऊन दुसऱ्यास देतो तेंहि आपलेंच देतो. आणि असा प्रकार असल्यामुळें केवळ ब्राह्मणांच्या करूणेमुळेंच इतर जन भोजनादि करितात. " आचार्यकर्ते बापटशास्त्रीकृत भाषांतर पृ. ११-१२) काय ? वाचलेत मनु काय म्हणतो तें ? अर्थात् मी ब्राह्मण आहे, तेव्हां अखिल मानव जातीचा मी गुरू आहे, अखिल विश्वाचा प्रभु आहे, मनुस्मृति ही माझी दंडनीति आहे आणि ती सृष्टी निर्माण होण्यापूर्वीच

## ब्रह्मदेवाच्या नाकांतून निर्माण झाली

म्हणून ब्राह्मणेतर साऱ्या दुनियेनें माझें पाय धुतलेलें पाणी तीर्थ म्हणून प्राशन करावें, एवढा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे. ही ब्राह्मण म्हणविणाऱ्या प्रण्यांची कल्पना ! निसर्गसिद्ध प्रजोत्पादनामुळें प्राप्त होणाऱ्या जन्माचा केवढा हा महिमा !! या महिम्याच्या सिद्धीप्रीत्यर्थ गेल्या तीन हजार वर्षें ब्राह्मण म्हणविणारांनीं न भूतो न भविष्यति उलाढाली आणि खटपटी केल्या आहेत. त्या खटपटींचा इतिहास ब्राह्मणेतर समाजांनीं नीटसा विचारांत न घेतल्यामुळें

---

* मनुस्मृति हा ग्रंथ अगदीं अर्वाचीन आहे. बौद्ध धर्माचा सणसणीत रट्टा पाठींत बसल्यावर ब्राह्मणी मताचीं पेकाटें पार पिचून गेलीं. परंतु पुढें बौद्ध धर्माचा ऱ्हास झाल्यानंतर ब्राह्मणांनीं पुनश्च [इ.स. पूर्वी एक दोन शतकांपासून पुढें] आत्मस्तोमाच्या दुगाण्या झाडण्यास सुरुवात केली आणि ब्राह्मणी वर्चस्वावर शास्त्रोक्त व्याख्यानें झोडण्यास जी ग्रंथांची भट्टी निर्माण केली त्याच भट्टींतून मनुस्मृति निर्माणं झालेली आहे. भिक्षुकी ग्रंथांचा सुळसुळाट पुढें याच ग्रंथांत वर्णन केलेला आहे.

## ब्राह्मणांच्या जन्मप्राप्त वर्चस्वाचें भूत

त्यांच्या बोकांडीं आज जवळ जवळ कायमचेंच बसलें आहें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु, अलेक्झांडरनें पुरुरवा (पोरस) राजाला कां जिंकलें म्हणून पृच्छा करणें जितकें वेडगळपणाचें ठरेल, तितकेंच क्षत्रिय वैश्यादि त्रैवर्णिकांना ब्राह्मणांनी निर्माल्यवत् कां केलें, असा प्रश्न विचारण्यांतहि ब्राह्मणेतरांवर अज्ञपणाचा आरोप येतो. आधीं तुम्ही जिंकलाच कां गेलात ? ब्राह्मणांची गुलामगिरी तुम्ही होऊन का मान्य केलीत ? हेच प्रश्न ब्राह्मणांच्या प्रतिस्पर्ध्यानीं वास्तवीक स्वतःसच विचारायला पाहिजेत. अमूक एक समाज शिरजोर झाला, त्याच्या खऱ्याखोट्या वर्चस्वाखालीं इतर समाजांना मान वांकवावी लागली आणि अखेर ते त्याचे बौद्धिक गुलाम बनले, तर या सर्व अपक्रांतीला जबाबदार ते गुलामच होत. आपण गुलामगिरीच्या क्षेत्रांत हळुहळूं नकळत फेंकलें जात आहोंत ;आपल्या शरिरीक सामर्थ्याची सर्वत्र वाहवा होत असतांनाच बौद्धिक सामर्थ्यांत आपल्याला कवडीमोल करून टाकण्यासाठीं एक विवक्षित समाज गुप्त कारस्थानें करीत आहे ; आणि तोंडानें स्वार्थत्यागाच्या संहितेचे पाठ जोरजोराने घडघड घडघड चालूं असतानाच, त्याच्या हृदयांत निर्भेळ स्वार्थसाधूपणाची धडपड रात्रंदिवस सुरूं आहे, या गोष्टी ओळखिण्याची ज्या ज्या व्यक्तींची अगर समाजांची दूरदृष्टी फुटली असेल, त्यांनीं आपल्या बौद्धिक गुलामगिरीबद्दल कितीहि हृदयद्रावक आक्रोश केला, अथवा निराशेच्या संतापानें केवढाहि निषेधपूर्ण त्रागा केला, तरी त्यांबद्दल जगानें काय म्हणून अनुकंपा दाखवावी ? क्षत्रियांची बदनामी करणारे खोटे दस्तऐवजी पुरावे स्मृतिपुराणादि ग्रंथांत स्वार्थी ब्राह्मणांनीं घुसडण्याच्या वेळींच जर

## ब्राह्मणांच्या नरड्यावर क्षत्रिय

बसले असते, तर आजला त्यांना शूद्र शूद्र असें ब्राह्मणांनीं धिःकारानें म्हणतांच, त्यांच्या खाडकन् मुस्कटांत भडकविण्याचा अतिप्रसंग टळला नसता काय ? मागासलेले आणि पुढारलेले असा जो एक आधुनीक भेद सांप्रत द्वैताच्या आंखाड्यांत अस्तन्या वर सारून उतरला आहे, त्यांतल्या मागासलेल्या पक्षाला आम्ही हाच प्रश्न स्पष्ट विचारूं कीं " भाऊ ! तूं इतक्या दिवस मागें कां पडून राहिलास ? " मनुष्य प्राणी हा जात्याच मोठा स्वार्थी आंहे ; आणि ब्राह्मणांनीं स्वार्थाची आराधना आजपर्यंत जितकी केली आहे, तितकी त्यानीं परमेश्वराचीसुद्धा केलेली नाही. असे नसतें तर ब्रह्मविद्येसारख्या गूढ विषयाचा गुरूपदेश प्राप्त करून घेण्यासाठीं " संस्कारस्य विशेषाश्च वर्णानां ब्राह्मणाः प्रभुः [ मनु. १०-३ ] उत्पत्तिरेव विप्रस्य मूर्तिर्धर्मस्य शाश्वती [ १-९८ ] " असे धमेंडीचे आत्मस्तोमनिर्दशक उद्‌गार काढणाऱ्या सांप्रतच्या ब्राह्मणांच्या वाडवडिलांना क्षत्रिय महर्षीच्या पायावर लोळण घेण्याचा प्रसंग कशाला आला असता ? क्षत्रिय जात्याच अत्यंत निःस्वार्थी ; या त्यांच्या लौकिकाची गेलीं सहा हजार वर्षांचा इतिहास ग्वाही देत आहे. ब्राह्मणांनीं स्वार्थलोलूप होऊन इतर त्रैवर्णिकांच्या निःस्वार्थतेचा आणि अनुकंपापूर्ण मृदुल मनोवृत्तिचा फायदा घेऊन, त्यांचा सर्व प्रकारचा दर्जा कवडीमोल ठरविण्याचे

जे जे फंद उपस्थित केले, त्यांची ठिकच्याठिकाणीं जर सर्वसमर्थ* क्षत्रियांनीं नांकठेंची केली असती, तर आजला ब्राह्मणांच्या नाटकी वर्चस्वाविरुद्ध कुरकुर करण्याचा प्रसंग त्यांच्यावर खास आला नसता. परंतु स्वार्थ आणि गुप्त कारस्थानें या दोन दुर्गुणांचें बाळकडू ब्राह्मणांप्रमाणें क्षत्रियांच्या आयांनीं त्यांना पाजलें नसल्यामुळें, भर समरांगणांत मर्दाप्रमाणें दोन हात करण्यास पुढें सरसावल्या प्रतिस्पर्ध्यांशीं साम दाम दंड भेद किंवा प्रसंगच पडल्यास

### शंठ प्रति शाठ्यंचा प्रयोग

जरी क्षत्रियांनीं केला, तरी घरातल्या घरांत, देशांतल्या देशांत, एकाच हाडारक्तांमांसांपसून निर्माण झालेल्या-परंतु गुणकर्माच्या सबबीखाली विशिष्ट सामाजिक कार्याकरिता विभक्त पडलेल्या-ब्राह्मण बांधवाशीं केवळ कांहीं धार्मिक बाबतींतल्या वरचढ हक्कांसाठी बायकी धुमफूस किंवा नामर्द कारस्थानें करण्याची भिक्षुकी पद्धति* क्षत्रियांना पसंत पडली नाहीं, येथेंच त्यांच्या क्षात्रवृत्तीच्या इतिहासाचें सारें गीतारहस्य सांपडतें. हे क्षात्रचारित्र्य आजदीनपर्यंत क्षत्रियांनीं अखंड आणि बिनतोड चालविलेलें आहे ; नाहींतर वेळी अवेळी त्यांची बदनामी करण्यास सवकलेल्या ब्राह्मणकांचीं हाडें ढिली करण्यास त्यांना केव्हांहि अवघड नव्हतें व नाहीं. क्षत्रिय

*While the priestly caste was still maltiplying rituals and supplying dogmatic explanations for each rite, the royal caste seems to have felt some impatience at this priestly pedantry. Thinking and earnest Kshatriyas asked themselves if these rites and dogmas were all that religion could teach. Learned Kshitriya, while still conforming to the rites laid down by priests, gave a start to healthier speculations and inquired about the destination of and the Soul and the nature of Supreme Being. So bold, so healthy and vigorous were these new earnest speculations, that the priestly classes, who were wise in their own esteem, at last *felt their inferiority and came to Kshatriya to learn something of the wisdom of the new school.* The Upanishads contain the healthy and earnest speculations which were started at the close of the Epic Period; and King Janaska of Videha is honoured and respected more than any other king of the time,—as an originator of the earnest speculations of the Upanishads.

*Dutt's Ancient India. p. 131-134.*

* The Brahmans have no conscience in respect to Truth. (p. 172) ...... The Brahmans are especially immoral. According to English reports, they do nothing but eat and sleep. In what is not forbidden them by the rules of their order they follow natural impulses entirely. When they take any part in public life they show themselves avaricions, deceiptful, voluptuous. With those whom they have reason to fear, they are humble enough; for which they avenge themselves on their dependents. " I do not know an honest man amoung them " says an English authority.

*PHILOSOPHY OF HISTORY*, by Hegel. p. 166.

पेशाचे लोक स्वभावानें करडे खरे,*पण त्यांच्या अंतःकरणाचा दिलदारपणा इतर सर्व वर्णांपेक्षां-विशेषतः ब्राह्मणांपेक्षां-अधिक उदात्त आणि व्यापक असल्यामुळें, त्यांनीं केव्हांहि झालें तरी ब्राह्मणांच्या दुष्कृत्यांकडे अत्यंत मेहेरबानीनेंच पाहिलें आहे. परंतु हीच त्यांची आत्यंतिक उदार आणि सरदारी मनोवृत्ति अखेर त्यांना भोंवली. कारण सद्गुण जात्या जरी कितीहि उत्कृष्ट असला, तरी त्याच्याहि आत्यंतिकावस्थेचें पर्यवसान अखेर निकृष्ट दुर्गुणांत होतें, याचीं ठळक उदाहरणें मराठ्यांच्या इतिहासांत अनेक सांपडतात. खुनशीपणा हा भिक्षुकी मनोवृत्तीचा 'ट्रेडमार्क' आहे आणि तो फार प्राचीन काळापासून इतिहासख्यात आहे. स्वार्थी भावना आणि निःस्वार्थी मनोवृत्ति या दोन गोष्टी नेहमीच व्यस्त गोत्राच्या असातात. ऋग्वेद काळापासून चालत आलेल्या ब्राह्मण आणि क्षत्रियांच्या तट्यांतलें मूळ बीज याच व्यस्त गोत्रांत सांपडतें. ब्राह्मणांच्या इतिहासांत Compromise तडजोड हें तत्व कोठेंच आढळून येत नाहीं. [Compromise under Compulsion म्ह. मानगुटी दाबल्यावर तडजोड केल्याचीं उदाहरणें मात्र सांपडतात.] याच्या उलट Conspiracy गुप्त कारस्थानें करण्यांत मात्र हे अत्यंत प्रवीण असल्याचे दाखले इतिहासांत पदोपदीं आढळतात आणि आजलाहि त्यांची प्रवृत्ति लोकविश्रुत आहे. धर्माच्या बाबतींत तर ब्राह्मणांनीं इतका पुंडावा केलेला आहे कीं गौतम बुद्धाचा अवतार होण्याच्या काळापर्यंत त्यांनीं हिंदुधर्माचा आणि हिंदु तत्वज्ञानाचा अगदीं विचका करून टाकला होता. या काळाच्या सुमारास ब्राह्मणांनीं यज्ञयागाच्या सोंगाढोंगाखाली हिंदुधर्माची प्राचीन व्यापक दृष्टी आपल्या स्वार्थी भावनेच्या तीक्ष्ण पहारीनें पार फोडून टाकली होती, आणि अशा रीतीनें

## आंधळा झालेला हिन्दुधर्म

लोण्याच्या गोळयाप्रमाणें वाटेल तसा वाटेल त्या आकाराचा करून बहुजन समाजाच्या डोळ्यांत धूळ फेंकण्याचा धंदा त्यांनी अप्रतिहत चालविला होता.† यज्ञयागाची ल्किष्ट ढोंगेंसोंगें निर्माण करून त्यांत बिकट बिकट मंत्रतंत्रांचीं जाळीं पसरविण्यांतच ब्राह्मणांनीं आपल्या ब्राह्मण्याचा

---

* They (Kshatriyas) are of hasty and irresolute temperament, but of *pure moral principles. They will not take anything wrongfully, and they yield more than fairness requires.* They fear the retribution for sins in other lives and make light of what conduct produces in this life. *They do not practices deceipt and keep their sworn obligations*

Hiouen Tsiang's Description of India & c.
Copied from " Epic India " C. V. Vaidya, p. 480.

† In this golden age of Brahmanism, priestcraft reigned supreme, ingenuously silly and bloodily sanctimonions, and though the priesthood in the course of time learned mercy and charity, they have indemnified themselves by preserving and glorifying the obscenities of the folk religions of which they made themselves guardians.

Barnett's Hinduism. p. 13.

(२) यज्ञयागांची थोताडें माजविणारीं ब्राह्मणें याच वेळीं निर्माण झाली.

The " Brahmana " period, the period of commentary and a certain amount of exegesis, (is marked) with the patent object of establishing the supremacy of the Brahman caste.

Vedic India. P. 129.

सवतासुभा प्रस्थापित करण्याची सिद्धी प्राप्त करून घेतली आहे, हे विसरतां कामां नये. या ऋग्वेदोत्तर काळीं यज्ञयागांच्या बंडांत मंत्रतंत्र्यांचा धुमाकूळ एवढा माजला कीं प्रत्यक्ष परमेश्वराच्या पूजेलाहि अर्धचंद्र मिळाला. नुसत्या मंत्रांच्या पोपटपंचीला आणि यज्ञविधीच्या धांगडधिंग्याला फाजील महत्व आल्यामुळें, हल्लीं जसा न्हावी लोकांत साधी दाढी करणारा एक आणेवाला न्हावी आणि ' हेअर कटिंग् ' करणारा आठ आणेवाला न्हावी असा भेद पडला आहे, त्याचप्रमाणे पोपटपंची करणाऱ्या निष्णांत पोपटांचा एक वर्ग हळुहळू निर्माण झाला. ऋग्वेद काळीं राजन्य उर्फ धनुर्धारी लोकांच्या हातांखाली निरनिराळ्या निसर्गसृष्टी दैवतांची स्तुति करण्याकरितां करनें रचून गाणारे कांहीं शागीर्द असत त्यांना ' विप्र ' म्हणत असत. याच विप्रांचे पुढें ब्राह्मण बनले. **विप्र** शब्दाचा अर्थ वेदोत्तर काळीं **ब्राह्मण** असा जरी समजण्यांत आला, तरी खुद्द ऋग्वेदांत विप्र म्हणजे ऋचा रचणारा एवढाच अर्थ सांपडतो. [ऋ. मंडळ ७–१०३, ८ इ.]

## ऋग्वेदकाळीं जाती मुळींच नव्हत्या.

त्या काळच्या राजन्यांचे (क्षत्रियांचे) विप्र शागीर्द पुढें भारत काळाच्या अखेरी अखेरीस धंदेवाईक ब्राह्मण बनले आणि महाभारतकाळी हिंदी आर्यांच्या धार्मिक विधींचा सर्व मामला आपल्याकडे घेऊन, पुराणकाळीं तर ते हिंदुधर्मांच्या ठेवीवरचे भुजंग* बनले. महाभारत काळच्या व पुराण काळच्या ब्राह्मणांच्या कृत्यांचा इतिहास म्हणजे एक ' स्वार्थवेद ' च होय. त्यांनी स्वतःच्या आत्मस्तोमालासुद्धां धार्मिक विधींच्या देव्हाऱ्यांत बेधडक नेऊन स्थापन केलें आणि धार्मिक प्रदेश कब्ज्यांत आल्यावर अखेर त्यांनीं

## सामाजिक प्रदेशांतसुद्धां दंगल

माजविण्यास कमी केलें नाहीं. यां दंगलीचें पर्यवसान अखेर भारतोत्तर काळीं बौद्ध आणि जैन धर्माच्या स्थापनेंत झालें. हिंदुधर्माच्या इतिहासांत बौद्ध व जैन–विशेषतः बौद्ध–धर्माच्या स्थापनेचें महत्व विशेष आहे. आज बौद्ध धर्म जरी हिंदुस्थानांतून हद्दपार झाला आहे, तरीहि त्याच्या लोकशाही कर्तबगारीचें ऋण हिंदुधर्मावर बरेंच झालेलें आहे, ही गोष्ट विसरून

---

* As the Aryans spread their empire over India, the ghostly influence of the Brahmans increased. In their hands the Vedic religion underwent a profound change. The divisions of the four great castes (Brahmans, Kshatriyas or warriors, Vaishyas or traders and Shudras or serfs) were mapped out in rigid damarcation.........The idea of sacrifice grew to an enormous degree to connoting as it did the spiritual supremacy of the Brahmans in every sphere, laid a crushing incubus upon the whole of Indian life. The entire wheel of the world was enjoined to depend upon he sacrificial ritual, the key of which was in the hands of the Brahmans. To this end were compiled about 800 B. C.(?) the *Brahmanas,* huge works exposing and commenting upon the ritual application of the Vedic Texts.

Barnett's Hinduism. pp.—11—12.

चालावयाचें नाहीं. या धर्मानें ब्राह्मणांच्या अत्याचारी प्रवृत्तीला असा कांही सणसणीत टोला लगावला कीं पुढें कित्येक शतकेंपर्यंत मद्यमांसांत लोळणाऱ्या ब्राह्मणांना नांकें मुठींत धरुन निःशद्ब अज्ञातवास कंठावा लागला. बौद्ध धर्म हें धार्मिक सामाजिक आणि बौद्धिक गुलामगिरीच्या विरूद्ध एक क्रांतिकारक बंडच म्हटलें तरी चालेल. निसर्गप्रवृत्ति आणि मानवी प्रवृत्ति यांचा तुलनात्मक अभ्यास सुरूं होतांच, त्यांतील घर्षणानें जी नवविचारांची ठिणगी उत्पन्न होते, तीच या बंडाचा अग्नि भडकवून देते आणि मानवी समाजाच्या कल्पनाक्षेत्रांत सांठलेल्या पुराणमतवादाच्या केरकचऱ्याचे पर्वतच्या पर्वत जाळून भस्मसात् करते. या नवविचाराच्या ठिणगीनेंच जगांत इतिहासाची पुनरावृत्ति घडून येत असते आणि याच पुनरावृत्तीच्या झंजावाताला तत्वज्ञानी जन

## परमेश्वराच्या अवतराची उपमा

देतात. हिंदूंनीं गौतम बुद्धाला आपल्या अवतारपरिषदेंत याच कारणामुळें बहुमानाची खुर्ची दिलेली आहे. गौतम बुद्धानें नवविचाराच्या खड्गानें भिक्षुकी जीर्ण मतांचा चक्काचूर केला. सॅवेज नामक एक तत्त्ववेता म्हणतो कीं The man of thought strikes deepest and strike safely. नवविचारी मर्दाचा वज्रप्रहार बिनचूक आणि काळजाला जाऊन भिडणारा असतो. गौतम बुद्धाच्या बौद्ध धर्मानें हिंदु धर्माच्या इतिहासांत हीच प्रशंसनीय कामगिरी बजावलेली आहे. या कामगिरीनें ज्ञत्रियांची उदात्त सरदारी मनोवृत्ति आणि ब्राह्मणांची संकुचित स्वार्थी मनोवृत्ती यांचा तौलनिक इतिहास जगापुढें हडसून खडसून मांडला. गौतम बुद्धाच्या नवविचाराचा अवतार जर हिंदुधर्माच्या क्षेत्रांत झाला नसता, तर यज्ञांतील मद्यमांसाच्या रेळचेळींला लालचटलेल्या ब्राह्मणांनीं वैदिक धर्माची किती भयंकर अनावस्था केली असती, त्याची कल्पनाच केली पाहिजे. गौतम बुद्धानें आपल्या

## नवविचाराच्या मोहरीचें प्लास्टर

भिक्षुकी मताच्या मस्तकावर मारून, त्यांच्या अत्याचारी प्रवृत्तीचा मेंदू जरीं ठिकाणावर आणला, तरीहि ज्यांनीं पुराणादि काल्पनीक कादंबऱ्यांच्या जोरावर हिंदुजनांच्या धार्मिक कल्पना भ्रष्ट आणि पतित करून टांकण्यास सोडलें नाहीं, त्यांना गौतम बुद्धानें जर त्या वेळीं यथास्थित ठेंचण्यास कांकू केलें असतें, तर आजला वांद्याचे कसाईखाने हिन्दुधर्माचीं मोक्षदाती मंदिरें बनल्याशिवाय खास राहिले नसते.

*　　　*　　　*　　　*

[४] हिंदू लोकांच्या अवनतीला जीं कांहीं अनेक कारणें झालीं, त्यांतच अनादिसिद्धत्वाची कल्पना ही एक राक्षसी आहे. याच राक्षसीच्या उदरांतून मायावाद जन्मलेला आहे. नवविद्वेषाचे (Conservatism) पिंड खाऊन खाऊन फुगलेल्या या मायावादानें हिंदु लोकांना खरेखुरे नामर्द बनवून त्यांची जीवनसंवेदना अगदीं ठार मारून टांकली आहे. या मायावादानें त्याना

कट्टे निराशावादी बनविल्यामुळें जगाच्या संसारांत किंवा जगाच्या चतुर्वर्गव्यवस्थेंत त्यांना आजला शूद्रत्वाचा दर्जा प्राप्त झाला आहे. जें हिंदु राष्ट्र पूर्वी साऱ्या जगाला पदाक्रांत करणाऱ्या

## विजयी वीरशिरोमणींचें माहेरघर

म्हणून ख्यात होतें, तेंच राष्ट्र आतां गुलाम आणि मजुरांचा साऱ्या जगाला पुरवठा करणारी टोलेजंग वखार बनली आहे. नित्य व्यवहारांतील प्रत्येक गोष्टींचें अथवा बदलणाऱ्या प्रत्येक परिस्थितींचें कर्तृत्व परमेश्वराला देणें ही गोष्ट तत्वज्ञानदृष्ट्या जरी मोठी प्रशंसनीय असली, तरी ' सर्व होणें जाणें तुझ्या हातीं ' अशा कल्पनेनें शुद्ध निराशावादांत आयुष्यभार कंठणारा मानवीसमाज साऱ्या जगाचा गुलामच झाला पाहिजे. परिस्थिति अनादिसिद्ध, जन्म अनादिसिद्ध, जाती अनादिसिद्ध, ब्राह्मणांचें ब्राह्मण्य अनादिसिद्ध, शूद्रांचें शूद्रत्व अनादिसिद्ध, विधवांचें वैधव्य अनादिसिद्ध, वेद उपनिषदें अनादिसिद्ध आणि पुराणें स्मृत्या यासुद्धां अनादिसिद्धच !

## इंग्रेजांचें ओंवळें म्लेंच्छ राज्य

हिंदुस्थानांत होण्यापूर्वीचे हिंदुलोकांचे सर्व प्राचीन अर्वाचीन ग्रंथ परमेश्वराच्या उच्छ्वासापासून निर्माण झालेले ! परिस्थिति कोण आणली ? देवाच्या इच्छेनें. जन्म कोणी दिला ? देवानें. जात जन्मसिद्ध कां ? देवाची मर्जी. ब्राह्मण जन्मसिद्ध पूज्य कां ? वेद तसें सांगतात म्हणून, आणि ' यस्य निश्वासितं वेदं '— वेद देवाचे सुस्करे ! शूद्रानें शूद्रवृत्तींतच खितपत राहिले पाहिजे काय ? अलबत्. शूद्रत्व देवानें दिलें आहे. विधवेनें वैधव्यांतच आयुष्य कां कंठावें आणि मसणवटींत सरण ज्याची वाट पहात आहे अशा

## वेशासंपन्न सोमयाजी वृद्ध कपी

नें कोवळ्या कुमारिकेचें पाणीग्रहण करण्याची मरतां मरतां तांतड कां करावी ? वेदांची आज्ञा आणि देवाची मर्जी म्हणून ! हिंदुस्थानांत दुष्काळामुळें कोट्यावधि जीव अन्न अन्न पाणी पाणी करून प्राण सोडीत असतांनाहि, त्यांची कींव न करतां, पुत्र मेला असतां सुनेला विकेशा करण्याकरितां, अगर बाप मेला असतां मातृदेवतेची न्हाव्याच्या हातून शुद्धी करण्याकरितां, जवळ पैसे नसेल तरी

## चक्रवाढ व्याजानें मारवाड्याचें कर्ज

काढून नाशिकच्या न्हाव्याभटांची धणि करण्याकरिता लोक धांवत जातात तें कां ? धर्माची आणि देवाची तशी आज्ञा आहे म्हणून ! अरेरे. हिंदुधर्माची काय ही अनावस्था आणि त्याच्या शुद्ध तत्वज्ञानाची काय ही विटंबना !! प्रत्येक आचार विचार किंवा परिस्थिति हीं देवानेंच केलीं आहेत किंवा देवानेंच नेमून दिलेलीं आहेत असें मानणें ही मानवी समाजाच्या अत्यंत निकृष्ट

मनोभावनेची स्थिति होय. समाजशास्त्रदृष्ट्या असल्या मनोवृत्तीचा समाज नीच दर्जाचा असें ठरतें. असल्या समाजाच्या नशिबीं साऱ्या संस्कृत जगाची गुलामगिरी करण्याची शूद्र वृत्तीची हमाली लागल्यास त्यांत आश्चर्य मानण्याचें कांहीं कारण नाहीं. प्रो. भाटे म्हणतात, " आमच्या धर्मशास्त्रकारांनीं समाजशास्त्रज्ञांच्या मूलभूत तत्वांवरच कुऱ्हाड घातली आहे. त्यांनी व्यक्तीला आत्मोन्नतीचे दरवाजे मुळींच खुले ठेविलेले नाहींत. असल्या नियमांनीं समाजाची सुधारणा होणें अशक्य आहे. धर्मशास्त्रकारांनीं घालून दिलेल्या आज्ञांप्रमाणें निमूटपणें वागणाऱ्या समाजांतील व्यक्तींचे विचार गुलामाला योग्य असेच बनतात. अशा व्यक्तींचा आणि कैद्यांचा आयुष्यक्रम सारखाच . . . . आमचे प्रत्येक आचार नियमबद्ध करून टाकणाऱ्या शास्त्रकारांनीं आम्हांस सर्वस्वीं परावलंबी करून टाकल्यामुळें आमची प्रगति बहुतेक खुंटल्यासारखी झाली आहे. आम्हीं बौद्धिक वादविवाद करूं आणि तो करीत असतां आमच्या चुका आमच्या नजरेस येऊन एखाद्या प्रश्नांसंबंधानें आमची खात्रीहि कदाचित होईल, पण खात्रीप्रमाणें वागणूक मात्र आमच्या हातून कधींहि होणार नाहीं. कारण, आमच्यांतील

## आत्मविश्वास पार नाहींसा झाला

आहे. आमच्या स्वतःमध्यें कांहीं कर्तबगारी आहे ; आम्हांला कांहीं बुद्धी आहे, विचारशक्ति आहे, असें आम्हांला मुळींच वाटत नाहीं. गॅलिलियोसारखीं विचार करून आपलें मत स्पष्टपणें लोकांपुढें मांडून सत्याकरितां कष्ट सोसणारीं माणसें, आमच्या देशांत फारशीं निर्माण झाली नाहींत, ती आमच्या ह्या परावलंबीपणामुळेंच. " [समाजशास्त्रावरील व्याख्यानें पृ. ८१-८२.] गेल्या दीड दोन हजार वर्षांचा इतिहास पाहिला म्हणजे हेंच दिसून येतें कीं बौद्धधर्माच्या ऱ्हासानंतर ब्राह्मणी मतांनीं जी एकदम चोहींकडून उचल केली, त्या उचलींत भिक्षुकी उचल्यांनीं संबंध हिंदुसमाजाचें विचारस्वातंत्र्य उचलून नेलें आणि आपल्या स्वार्थी शाबरी मंत्रांच्या प्रभावानें त्याच्या बौद्धिक सामर्थ्यालासुद्धां नपुंसक बनविलें. ब्राह्मणांनीं आपल्या शुद्ध आचरणाच्या आणि अनुवंशिक बुद्धिसामर्थ्याच्या जोरावर हिंदुसमाजांत अग्रस्थान पटकविलें, असें मोठ्या दिमाखानें सांगणाऱ्या शहाण्याचा कान पकडून आम्ही त्याला बजावून सांगतों कीं दादा, आत्मस्तोमाच्या कोरड्या कणग्यांतून बाहेर येऊन प्रथम इतिहास पहा. ब्राह्मणांच्या वर्चस्वाचें किंवा उत्तमपणाचें मूळ त्यांच्या अनुवंशिक बुद्धिसामर्थ्यांत नसून बहुजनसमाजाच्या डोळ्यांत खोट्यानाट्या धार्मिक कल्पनांची धूळ फेंकून त्यांच्या बौद्धिक स्वातंत्र्याला खच्ची करण्यांतच सांपडतें. हिंदु धर्माच्या मूलभूत प्राचीन कल्पना व तत्त्वें पहा आणि सध्यांचें हिंदुधर्माचें भ्रष्ट पतित आणि शिसारी आणणारें अनीतिपूर्ण स्वरूप पहा ; म्हणजे धर्मसंरक्षणाची जबाबदारी आपण होऊन आपल्या शिरांवर घेणाऱ्या ब्राह्मण वर्गाचा जुलमी खेळखंडोबा तेव्हांच प्रत्ययाला येईल.

## मार्टिन लूथरचें बंड

होण्यापूर्वी युरोपांत क्रिस्ती पोपांनीं आणि पाद्यांनी जसा जनतेच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन, त्यांच्या गळ्यांत आपल्या नाटकी पवित्र वर्चस्वाची धोंड अडकविली होती, तोच प्रकार सध्यां

हिंदुस्थानांत ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर यांच्यांत चालू आहे. क्रिस्ती पोप आणि पाद्री म्हणत असत की " बायबलांत कितीहि अविचारी आणि सारासार विचारविरुद्ध मजकूर असला, तरी तुम्ही त्यावर विश्वास ठेवलाच पाहिजे. त्यांत लिहिलेले दैवी चमत्कार कितीहि असंभाव्य आणि अशक्य वाटत असेल, तरी त्यांच्या विरुद्ध तुम्हीं ब्रसुद्धां काढतां कामां नये, त्यांच्यावर तुमची श्रद्धा व विश्वास तुम्ही ठेवलाच पाहिजे. बायबल स्मृतीचे व्यवहारीक नियम कितीहि असंबद्ध आणि निष्ठुर असले तरी ते तुम्हीं डोळे झांकून बिनतक्रार मान्य केलेच पाहिजेत. तुम्हाला बायबल वाचण्याची जरूर नाहीं; आम्ही तें तुमच्या करितां वाचूं. तें तुम्हाला मुळींच समजणार नाहीं, कारण तें ईश्वरदत्त आणि साक्षात्कारी आहे; आणि साक्षात्काराचे जन्मसिद्ध ज्ञानी आम्ही पोप आणि पाद्रीजन आहोंत. तुमच्यासाठीं तें आम्हीं वाचीत जाऊं आणि आम्ही जें सांगूं त्यावर तुम्हीं अगदीं डोंळे मिटून विश्वास ठेवणें प्राप्त आहे. हें असें कां आणि तें तसें कां ? हें विचारण्याचा तुम्हांला अधिकारच नाहीं. याद राखून ठेवा

## नरकखान्याच्या किल्ल्या आमच्या हातीं

आहेत. आम्हां पूज्य आणि पवित्र पाद्री पोपांना किंचित विरोध करतांक्षणींच तुम्हांला ईश्वराच्या नरकखान्यांत चिरकाल फेंकून देण्याचें सामर्थ्य आमच्या हातात आहे. " पोप पाद्यांच्या या बरळण्यांत आणि आमच्या आधुनीक नामधारी ब्राह्मणांच्या पुराणोक्त आत्मवर्चस्वांत काडीचाहि फरक नाहीं. पाद्रीपोपांच्या इतकाच या ब्राह्मणकांनीं हिंदी जनतेच्या सदसद्विवेक बुद्धीचा खून करून त्यांना लुळेपांगळे बनविण्याचें घोर महापातक केलेलें आहे. निरनिराळीं तऱ्हेतऱ्हेचीं पुराणें लिहून, त्यांत आपल्या जातीच्या अनुलंध्य वर्चस्वाचीं खोटींनाटीं वर्णनें घुसडून, त्यांनीं ब्राह्मणेतरांची सत्यान्वेषण दृष्टी फोडून टाकण्यांत पोपपाद्यांच्या क्रौर्यावरहि सरशी केलेली आहे. क्रिस्ती भटांप्रमाणें या हिंदू भटांचेंहि वर्म

## श्रद्धावान् लभ्यते ज्ञानम्

या महावाक्यांत आहे. लोकांत अंधश्रद्धा शक्य तितकी प्रसार करून करूनच ब्राह्मणांनीं ब्राह्मणेतरांना बौद्धिक गुलाम बनविलें आहे. याचा परिणाम साहजीकच असा झाला कीं सत्यशोधनप्रवृत्ती नष्ट होऊन तिच्या जागीं धर्मभोळेपणा आणि अंधःश्रद्धा यांचें भयंकर प्राबल्य माजून सारी जनता ईश्वराला धाब्यावर बसवून त्याच्या जागीं भटाभिक्षुकांची पूजा अर्चा करूं लागली. ' एको देवः ' चे तेहतीस कोटी देव बनून दररोज त्यांत आणखीहि नव्यानव्या देवांची भर पडत आहे. नाना प्रकारचीं व्रतें व नवीन नवीन देवतांचें बंड यांची गर्दी रोज होतच आहे. फार काय, पण कांहीं विशेष क्षेत्रांत कामगिरी करणाऱ्या लोकांची त्यांच्या हयातींतच देवळें बांधण्याची सुरुवात ब्राह्मणांनीं आतां केली आहे. भोळसटपणा आणि अंधविश्वास या दोन जालीम विषाचे डोसांवर डोस पाजून ब्राह्मणांनीं ब्राह्मणेतरांना नामर्द, आंधळे, मुके आणि पांगळे करून सोडले आहेत. शिमग्यातील बीभत्सपणाच्याहि तोंडांत मारणारीं बारा ज्योतिर्लिंगांच्या उत्पत्तीची पौराणिक वर्णन ऐकून किंवा वाचून त्यांतल्या गलिच्छ प्रकरणांबद्दल पुराणिक पोपटाला उलट सवाल करण्याची आजपर्यंत एकाचीहि छाती झाली नाहीं, याचें कारण काय ? भटजीनें पुराण वाचून मोठ्या आवेशानें प्रतिपादन करावें कीं विश्वामित्रानें सहस्त्रवर्षे लोहपिष्ट

भक्षण करून मोठ्या माराकुटीनें ब्राह्मणपणा प्राप्त करून घेतला आणि अखेर जेहत्ते निर्णय सांगितला कीं

धिग्बलं क्षात्रबलं ब्राह्मणबलं बलम्

आणि आम्ही ' वाहवा वाहवा ! काय या ब्राह्मण्याची थोरवी हो ! ' म्हणून नंदीबैलाप्रमाणें माना हालवाव्या ! पण या भिक्षुकी कादंबरींत उघडउघड दिसणाऱ्या असंभाव्यपणावर सुद्धां शंका घेऊं नये, हें नामर्द आणि कमजोर बनलेल्या बुद्धीचें लक्षण नव्हे काय ? विश्वामित्रानें त्रिशंकू राजाला एखाद्या चिरूटाप्रमाणें स्वर्गात झुगारून द्यावें, वशिष्टानें त्याला फुटबॉलप्रमाणें खालीं ढकलून द्यावें, विश्वामित्रानें आणखी एकदां त्याला टांच मारून वर फेंकावें, आणि त्रिशंकूनें मध्यंतरींच खालीं डोकें वर पाय करून लोंबळकत राहवें, ही गोष्ट घडली तरी कशी ? याचा विचारच कोणी करित नाहीं ; मग या गोष्टींतील अंतरंगाची छाननी कोणी करावी ? धर्मराजाच्या खापरपणज्या नहुषानें

## ब्राह्मणांना गाडी ओढायला लावले

म्हणून तो ब्राह्मणांच्या शापानें सर्प होऊन रानोमाळ भटकूं लागला ; ब्राह्मण परशुरामानें एक नाहीं दोन नाहीं एकवीस वेळा निःक्षत्रिय पृथ्वी केली ; ब्राह्मण वामनानें तीन पावलांत सारी प्रथ्वी आक्रमण करून चवथ्या पावलाच्या कचक्यानें क्षत्रिय बलीराजाला पाताळांत चिणलें ; इत्यादी गोष्टी वाचून किंवा एकून त्यांच्या खरेंखोटेपणाबद्दल शंका काढण्याचें धारिष्ट कोणाला होत नाहीं ; मग या गोष्टी कोणीं वा कां अस्तित्वांत आणल्या याची विचारपूस करण्याची जरूरच काय ?

## भट्ट सांगे आणि मट्ठ ऐके !

अशी जी परावलंबी व परप्रत्ययनेय स्थिति आज बहुजनसमाजाला प्राप्त झाली आहे, तिचें कारण काय ? जशी आज सर्वांची खात्री पटली आहे कीं क्रिश्चन धर्माचा पांढरा पाय जिकडे जिकडे फिरला तिकडे तिकडे त्याच्या मागोमागच गुलामगिरीचा खराटाहि फिरला, त्याचप्रमाणें जेव्हांपासून भिक्षुकी मताच्या वर्चस्वाचा श्रुतिस्मृतिपुरोणोक्त वरंवटा हिदू लोकांच्या टाळक्यांवर फिरूं लागला, तेव्हांपासूनच हिंदुंचें विचारस्वातंत्र्य मरण पावलें, त्यांचा राष्टीय दर्जा सुतकीं बसला आणि त्यांच्या सदसद्विवेक बुद्धीला वैधव्य आल्यामुळें तिचें केशवपन झालें. अशा परिस्थितीत नाना तऱ्हेच्या दैवी अकल्प्य चमत्कारांच्या सुळसुळाटांनीं बिछान्यांतील ढेंकणांप्रमाणें आमचे स्मृति पुराणादि ग्रंथ गजबजून गेले तर त्यांत काय नवल ? अहिल्येची म्हणे शिळा झाली आणि शिळेची पुन्हा अहिल्या झाली. ' मुसळ गेलें होतें वरुतें तैसेंच राहिलें तेथें. ' समुद्रावर म्हणें पाषाण तरले. या जुन्या पुराण्या गोष्टी राहूं द्या ; परंतु आमच्या संतलीलामृतांत तुम्हांला असा एकहि संत आढळून यायचा नाहीं कीं ज्यानें निदान एक डझनभर तरी चमत्कार केले नाहींत. अगदीं विद्यमान् नारायणबोवा केडगांवकरादि प्राणी घेतले तरी त्यांच्याहि दैवी जामानिम्याच्या आमटींत कांहीं ना कांहीं तरी चमत्कारांच्या मीठमोहरीचीच फोडणी पडलेली आढळते. जो खरा सत्यशोधक असतो, तो जुन्या गोष्टी जुन्या म्हणून निवळ अंधभक्तीनें मान्य करणार नाहीं ; किवा नव्या गोष्टी नवीने म्हणून त्यांचा त्याग करणार नाहीं. विवेकबुद्धीची खात्री

पटल्याशिवाय कोणतीहि गोष्ट निवळ अधश्रद्धेनें मान्य करणें, ही गुलामांची प्रकृति असते. डॉ. ए. थॉम्सन् म्हणतात " ही गुलामगिरीची प्रकृति म्हणजे सत्याला फुसलावून त्याचा खून करून त्याला मातींत गाडणारी असते. " एखाद्या होतकरू तरुणाला सोळा विद्या आणि चौसष्ट कलांत तरबेज करून, त्याच वेळीं त्याला मुष्टीमैथुनाची द्वाड खोडहि जर शिकवली, तर त्याचें कल्याण केलें असें कोणीहि म्हणणार नाही. त्याचप्रमाणें जनतेच्या चिकित्सक स्वतंत्र विचारवृत्तीचा खून करणारी अंधश्रद्धा त्यांच्यांत फैलावणें यालाहि कोणी शहाणा चांगलें म्हणणार नाहीं. आम्हीं बोलूं ती वेदवाणी, वाचूं तो धर्मग्रंथ, सांगूं ती स्मृति, अशा दमदाटीच्या प्रयत्नांबरोबरच जनतेंत अंधविश्वास उत्पन्न करणें, त्यांच्या सारासारबुद्धीच्या विकासाचें क्षेत्र शक्य तितकें संकुचित करणें, त्यांच्या धर्मकर्मांच्या मर्यादा आंखडत्या धरून आमका अधिकार तुम्हांला आहे आणि तमका नाहीं असल्या अनुज्ञांची त्यांच्यावर बळजबरी करणें, म्हणजे मानवी समाजाला पुच्छविहीन पशू बनविणें होय. ब्राह्मणांनीं ब्राह्मणेतरांचें काय नुकसान केलें तें दाखवा म्हणून पृच्छा करणाऱ्या

## पुण्याच्या केसरीकंपूला जबाब

हाच कीं त्यांनीं ब्राह्मणेतरांना खोट्यानाट्या अधार्मिक कल्पनांनीं गेल्या दोन हजार वर्षें आचार व विचारस्वातंत्र्यापासून भ्रष्ट केलें आहे. अर्थात् स्वातंत्र्यप्रिय हिंदू आर्यांच्या प्राचीन राष्टांत ही बौद्धीक गुलामगिरी नव्यानेंच सुरूं करण्याच्या अधोरी पातकांबद्दल ब्राह्मणांना पूर्ण प्रायश्चित दिल्याशिवाय ब्राह्मणेतर केव्हांहि स्वस्थ बसणार नाहींत.

* * * *

(५) सध्या हिंदी आर्यांच्या प्राचीन इतिहासाचें पुनरुज्जीवन होऊं पहात आहे. राजकीय स्वातंत्र्याचा उषःकाल झाला आहे. लोकसत्तेचा गार वारा पारतंत्र्यानें होरपळलेल्या अंतःकरणाच्या वेदना हळुंहळुं शमवीत आहे. तथापि एका इंग्रजी तत्ववेत्त्यानें म्हटलें आहे की :—

Political rights, however broadly framed,
Will not elevate a people individually depraved.

म्हणजे, राजकीय क्षेत्रांतील हक्क कितीहि उदात्त आणि व्यापक धोरणांवर आंखलेले असोत, ज्या समाजांतील व्यक्ती न् व्यक्ती गुणभ्रष्ट बनलेली असते, त्या समाजाच्या उन्नतीला त्या हक्कांचा काडीमात्र उपयोग होत नाहीं. ब्राह्मणांनी ब्राह्मणेतरांना गुणभ्रष्ट करण्यांत कसकसे अत्याचारी प्रयोग अंमलांत आणले, हे पाहूं इच्छिणारांनी

## मनुस्मृतीचा नीट अभ्यास करावा.

मनुस्मृति हें राष्टाचा जीव हळुंहळुं घेणारें एक जालीम भिक्षुकी जहर आहे. तें वरून शर्करावगुंठीत असल्यामुळें कोणीहि तें निमूटमणें गिळतो. भिक्षुकशाहीच्या अरेरावी वर्णाश्रम—

(अ) धर्माची कायदेबाजी दाखविणारा ग्रंथ हाच. या भिक्षुकी बायबलांत ब्राह्मणांची अवास्तव आणि आटोकाट स्तुति करून, ब्राह्मण्याची तळी आकाशापेक्षां उंच उचलून धरण्यांत आलेली असल्यामुळें, सोटा हें जसें काबुली पठाणाचें दैवत, त्याप्रमाणें मनुस्मृति हा ब्राह्मणांचा एक दैवतग्रंथ होऊन बसला आहे. शिवाय या ग्रंथाच्या नांवाला मनूच्या नांवाचें एंजीन जोडलें गेल्यामुळें तर त्याच्या महतीची टिमकी ब्राह्मणांनीं अतोनात पिटली. जनता अंधश्रद्धेनें बौद्धिक गुलामगिरींत जखडलेली, ब्राह्मणेतरांनीं व विशेषतः ब्राह्मणांशीं तोडीस तोड देणाऱ्या क्षत्रियांनीं विद्येचा व ज्ञानाचा हव्यास सोडलेला आणि न्यायनिष्ठुर ऐतिहासिक चिकित्सेचा पूर्ण अभाव, अशा परिस्थितीचा फायदा घेऊन ब्राह्मण ब्युरॉक्रसीनें एकदम मनुस्मृतीच्या महिम्याचा चोहींकडून जनतेवर भयंकर हल्ला चढविल्यामुळें, आजलाहि या ग्रंथाच्या फाजील स्तोमाबद्दल कांहीं भलभलते ग्रह लोकांच्या कल्पनेंत मूलभूत झालेले पहाण्यांत येतात. जे कोणी विद्वान आहेत, वाचन मनन निदिध्यास करणारे आहेत, चिकित्सक वाङमयाशीं परिचित आहेत, त्यांना ही मनुस्मृतीची पोंकळ हंडी चांगली परिचयाची झालेली आहे. परंतु असले सुशिक्षित लोक हिंदुस्थानासारख्या तीस तेहतीस कोटी लोकसंख्येंत केवळ हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच असल्यामुळें, बहुजनसमाजावरील मनुस्मृतीच्या वीरमंत्राचा अंमल अजुनसुद्धां आहे तसाच कायम आहे. कोणत्याहि आत्मविश्वासू, स्वावलंबनी आणि अतुल पराक्रमी राष्ट्राला गुपचूप हतबल करून त्याच्या पायांत गुलामगिरीच्या अभेद्य श्रृंखळा ठोंकावयाच्या असतील, तर त्याला नित्य मनुस्मृतीचे डोस ढोंसण्यास द्यावे ; हटकून तें राष्ट्र नामर्द, परावलंबी आणि पतित झाल्याशिवाय राहणार नाहीं. त्याची सत्यशोधनाची भूक ठार मरून, त्याला अधश्रद्धेचें अग्निमांद्य लागेल. स्वर्ग आणि नरक या दोन पात्यांच्या कात्रींत त्यांची मान अडकल्यामुळें, ज्यांच्या हातांत कात्री त्यांनीं आपल्या निर्विवाद वर्चस्वाची नितात खात्री ठेवावी. गुणभ्रष्टता ही गुलामगिरीची गुरुकिल्ली आहे. राष्ट्र गुणभ्रष्ट झाल्याशिवाय तें गुलाम बनत नाही. म्हणून जेते लोक जित लोकांना निःशस्त्र करून प्रथम त्यांना गुणभ्रष्ट करण्याची खटपट करतात. यानेंहि काम भागलें नाहीं तर याच्यापुढची निर्विद्यतेची युक्ति अंमलांत आणतात. राष्ट्र निर्विद्य की मग त्याला निर्वेध पिळून काढण्याचें काम अत्यंत सुकर होतें.

## ब्राह्मण ब्रह्मदेवाच्या तोंडांतून पडले

असल्यामुळे त्याना या युक्त्या जन्मसिद्धच अवगत होत्या. त्यांनीं सर्व ब्राह्मणेतरांना आस्ते आस्ते मनुस्मृति पुराणादि काढ्यांचीं सप्तकें पाजून पाजून त्यांना पूर्ण निर्विद्य अथवा बौद्धिक गुलाम बनविले आणि आपल्या वर्चस्वाचे टोलेजंग मनोरे सर्व हिंदुस्थानांत उभारले. तांर्तर मोंगलांच्या अगणित स्वाऱ्यांनीं, इस्लामियांच्या कडव्या तलवारींनीं, किंवा इंग्रेजांच्या हत्यारांच्या कायद्यानीं हिंदी राष्ट्राची मर्दुमकी जितका खच्ची झाली, त्यापेक्षां सहस्त्रपट नंपुसकपणा ब्राह्मणांनीं त्याला निर्विद्य ठेवून आणला, हें इतिहास छातीला हात लावून सांगत आहे. वैदिक किंवा उपनिषत्कालांतली हिंदु धर्माची व्यापक प्रवृत्ति पुढें पुढें संकुचित होत गेली आणि सामाजिक क्षेत्रांत एकट्या ब्राह्मणांशिवाय इतर सारे वर्ग निर्माल्यवत् कसे झाले, याचे धागेदोरे ब्राह्मणांनीं सर्वत्र पसरविलेल्या बौद्धिक गुलामगिरीच्या जाळ्यांतच सांपडतात. परंतु

## चिंती परा आणि येई घरा

या सुप्रसिद्ध लौकिकी म्हणीप्रमाणें ब्राह्मणहि याच स्वकृत बौद्धिक गुलामगिरीच्या जाळ्यांत सांपडून अखेर इतर वर्गाप्रमाणेंच नामधारी कसे बनले, हें अर्वाचीन काळच्या इतिहासावरून स्पष्ट दिसून येतें. चातुर्वर्ण्याच्या मर्यादा शक्य तितक्या कडक व सीलबंद करून ब्राह्मणेतरांना गुणभ्रष्ट बनविण्याच्या 'राष्ट्रीय' घाण्यांत अखेर ब्राह्मणांचाहि बळी पडल्यामुळें आजला ब्राह्मणवर्ग अझीबात नष्ट झाला आहे. इतरांना गुलाम करणारे अखेर आपण स्वतःच कसे नकळत गुलाम बनतात, हें ब्राह्मणांच्या निर्मूलनाच्या इतिहासावरून खासें शिकतां येण्यासारखे आहे. मागें कांहीं वर्षांपूर्वी 'आर्यधर्म' नामक मासिक पुस्तकांत एक मनोरंजक संवाद आला होता, त्याला येथें आम्ही नमूद करतों ; त्यावरून सध्यांच्या नामधारी ब्राह्मण्याचा डोलारा किती पोंकळ आहे तें वाचकांना समजून येईल :—

**सिद्धांत** :—जो विद्वान् नाहीं व ज्यांच्यांत ब्राह्मणत्व नाहीं, अशाला कोणीहि ब्राह्मण म्हणूं नये व त्याची सेवाहि कोंणी करूं नये.

**प्रश्न** :—मग हे जे सध्यां ब्राह्मण म्हणवितात ते कोण ?

**उत्तर** :—ते ब्राह्मण नव्हत. ते भिक्षुक-भिक्षेकरी आहेत. जसे युरोपांत पोप, तसे हे येथें अधर्म माजविणारे स्वार्थी लोक होत.............पूर्वीचे ब्राह्मण खरे होते व आतां हे नामधारी झाले आहेत.

**प्रश्न** :—सध्यांचे ब्राह्मण नामधारी कसे ? यांचा पिता व माताहि ब्राह्मणी. असें असतां त्यांच्या संतानाला नामधारी ब्राह्मण असें कसें तुम्ही म्हणतां ?

**उत्तर** :—तुम्ही म्हणतां तें खरें, पण विचार करा कीं आईबाप ब्राह्मण असले किंवा गुरु चांगला साधू असला, तथापि त्यांची मुले किंवा शिष्य उत्तम ब्राह्मण किंवा उत्तम साधू असतातच, असा कांहीं नियम नाहीं. ब्राह्मण किंवा साधू आपापल्या आंगच्या गुण कर्मस्वभावाप्रमाणें होत असतात. जर आंगी ब्राह्मणाचे गुण नाहींत, तर ब्राह्मण्य तरी आहे असें कसें म्हणतां येईल ? ब्राह्मण परोपकारी असले पाहिजेत ; पण सध्यांचे हे नामधारी ब्राह्मण स्वार्थी व म्हणूनच दान घेण्यांत पटाईत आहेत. युरोपांतल्या पोपाप्रमाणें यांची सध्याची स्थिति आहे............जे भोंदू आहेत ते जरी ब्राह्मणांच्या कुळांमध्ये उत्पन्न झालेले असले तरी ते ब्राह्मण नव्हत असें धर्माच्या साक्षींनें आम्ही साफ म्हणतों........राजे यजमान व इतर लोक हे सर्व अविद्वान् झाल्यानंतर कांहीं मंत्रांची घोकंपट्टी करणारेच ढङ्गाचार्य बनले त्यांनी " ब्राह्मणो न हन्तव्यः । साधुर्न हन्तव्यः " हीं वाक्यें पुढें करून नामधारी ब्राह्मण व वेषधारी भोंदू यानी कोणतिहि पातकें केलीं तरी ते अवध्य आहेत, असें भासविलें तर त्यांत नवल काय ? या स्वार्थसाधू लोकांनीं पाहिजे तसे ग्रंथ लिहून शेवटीं व्यासाचें नांव किंवा दुसऱ्या कोणत्यातरी ऋषिमुनींचे नांव घालून आपल्या मतलबाचा प्रचार केलेला आहे.

* * * *

[६] ब्राह्मणांच्या षट्कर्मोपैकीं सध्यां जर कोणतें कर्म अबाधित जिवंत राहिले असेल तर तें ' दान घेणें ' अथवा परिग्रह हें होय. पूर्वी ब्रह्म जाणणारा ज्ञानप्रसारक तो ब्रह्मण ही ब्राह्मण्याची व्याख्या होती ; आतां सामाजिक धार्मिक कांहीहि काम न करतां उनाड पोळाप्रमाणें भीक मागणारा तो ब्राह्मण, ही व्याख्या प्रचलीत आहे ; जणूं काय भीक मागणें हेंच अलिकडच्या ब्राह्मणाचें मुख्य लक्षण होऊन बसलें आहे. गेल्या दोन हजार वर्षांतले धार्मिक ग्रंथ पाहिले तर आत्मज्ञानाच्या विवरणापेक्षां दानकर्माच्या निरनिराळ्या पद्धतींचा उहापोह करण्याकडेच त्यांचा कल विषेश दिसून येतो. मनु याज्ञवल्क्य पराशर यांच्या नांवाखालीं विकल्या जाणाऱ्या स्मृत्यांचें कोणतेंहि पातडें घ्या, त्यांत या दानांचाच सुळसुळाट मनस्वी भरलेला आहे. शिवाय या दानपद्धतीच्या ट्रेडमार्काला गुणकर्मविशिष्ठत्वाची नक्षीदार बॉर्डर पाहिजेच असा खुद मनुस्मृतीचाहि आग्रह नसल्यामुळें दान घेणारा ऊर्फ भीक मागणारा साहजीकच ब्राह्मण्याचा अधिकारी ठरतो. भीक मागणाऱ्या भिक्षुक भटाला कोणकोणत्या प्रसंगीं कितीकिती दक्षिणा दिली पाहिजे, याचेंच विवेचन करण्याकडे गेल्या दोन हजार वर्षांतील ब्राह्मणी ग्रंथांनीं जितकीं पृष्ठें खर्ची घातलीं आहेत, त्याच्या निमपट पृष्ठें आणि पांवपट श्रम जर ब्राह्मणांनीं ब्रह्मज्ञानशोधनांत व अध्ययनांत खर्ची घातली असती तर आजला ब्राह्मण्याच्या नामाभिधानाखालीं शूद्रातिशूद्र प्राणी मिरवतांना खास दिसले नसते. बरें, बाह्मणांना दक्षिणां द्यायची ती देखील थोडीथोडकी देतां कामां नये. बौद्धिक गुलामगिरीचे आद्यपुरस्कर्ते मनुस्मृतिकार म्हणतात :—

**इन्द्रियाणि यशः स्वर्गमायुः कीर्तिं प्रजाः पशून् ।**
**हन्त्यल्प दक्षिणो यज्ञस्तस्मान्नाल्पधनो यजेत् ॥ ११.४०**

**अर्थ** :—ज्यामध्यें अल्प दक्षिणा दिली आहे असा यज्ञ यजमानांची चक्षुः श्रोत इत्यादि इंद्रियें, यश, स्वर्ग, आयुष्य, मेल्यावर मागें राहणारी कीर्ति, अपत्यें व पशू यांचा नाश करतो. यास्तव अल्प दक्षिणा देऊन यज्ञ करूं नये.

इतकेंच नव्हें तर, दक्षिणा तांब्या रुप्याची किंवा निकल चामड्याची चालणार नाहीं. ती सोन्याचीच पाहिजे. चांदीची किंवा इतर दक्षिणा निषिद्ध मानली आहे. कां ? त्याच्याहि आधाराची कादंबरी आगाऊच ब्राह्मणीग्रंथांत घुसडून ठेवलेली आहे. अग्नीजवळ देवांनीं आपली मालमत्ता ' डिपाझीट ' ठेवली होती. ती जेव्हां त्यांनीं परत मागितली, तेव्हां साहजीकच

**अग्नीच्या पोटांत भडभडून आलें.**

तो ओकसाबोकशीं रडूं लागला. तेव्हां त्याच्या डोळयांतून जीं टिपें टपटपां गळलीं ती चांदी झाली; म्हणून जो कोणी चांदीची दक्षिणा ब्राह्मणांना देईल त्याच्या घरांत नेहमीं रडारड होईल.* अशा प्रकारचे नाटकी निर्बंध करण्यांतला ब्राह्मणांचा मुख्य हेतू काय होता, हें आतांचें आठ वर्षांचें शेंबडें पोरसुद्धां सांगूं शकेल. या भीकमाग्या दानपद्धतीमुळें ब्राह्मणांच्या पोटापाण्याचा प्रश्न सनदशीर सुटला; अर्थात् त्याच्याबरोबरच त्यांच्या कर्तव्यकर्माच्या जबाबदारीचा

---

* हिंदुस्थानांत अलीकडे प्रत्येक घरांत या नाहीं त्या रोगानें माणसें मरून जी सर्वत्र रडारड सुरूं आहे, याचें कारण लोक ब्राह्मणांना सुवर्ण दक्षिणा देत नाहींत. हेंच असावें असें वाटतें. ही रडारड बंद व्हावी अशी इच्छा असणाऱ्या कर्मयोगी, दे. भ. महात्म्यांनीं स्वराज्य प्राप्तीची उठाठेव कांहीं काळ बंद ठेऊन ब्राह्मणांना कचकावून सुवर्णदक्षिणा देण्याची राष्ट्रीय चळवळ सुरूं करावी अशी शिफारस आहे.

बोजा अज्जीबात उठला. पण या दानपद्धतीनें राष्ट्राचीं दोन भयंकर नुकसानें झालीं. **एक :–** ब्राह्मणांवर कोणाचा दाब न राहिल्यामुळें त्यांनीं धर्माचा आणि तत्त्वज्ञानाचा चुथडा केला व जी काहीं विद्या गुरुशिष-परंपरेनें अस्तित्वांत राहिली असती तिचा समूळ नाश झाला ; **दुसरें :–** राष्ट्रांत आळशी, एदी, महामूर्ख भिक्षुक टोणप्यांचा अतोनात सुळसुळाट झाला. राष्ट्रांत जोंपर्यंत सुबत्ता होती, तोंपर्यंत मतिमंद बनलेल्या श्रद्धाळू जनतेनें या भिक्षुकांच्या झोळीचा कधींहि अनादर केला नाहीं ; पण दानपद्धतीच्या मंत्राचा अंमल किंचित् उतरत आहे असें त्यांच्या नजरेस येतांच, त्यांनीं तीर्थमहात्म्यें व नानाप्रकारचीं व्रतेंवैकल्यें याचा सुळसुळाट करून सोडला. याच सुमारास

## पुराणांचा अवतार झाला.

समुद्रांत प्रवास करणारा मनुष्य जसा संकट प्राप्त होतांच बोटीवरील लाईफ् बोय् प्राणसंरक्षक पट्ट्याकडे धांवत जातो, तसे हे नामधारी ब्राह्मण आपल्या फोलकट ब्राह्मण्यावर हल्ला होतांच पुराणांची कांस धरतात. डोंबाऱ्याच्या पोतडीप्रमाणें पुराणांत सर्व कांहीं बिनचूक सांपडतें. सृष्टी उत्पन्न कशी झाली, सूर्यवंशी सोमवंशी राजांच्या वंशावळी, ठिकठिकाणचीं तीर्थे व त्यांचीं महात्म्यें, अद्भुत चमत्कारांची रेळचेळ, पाताळ स्वर्गाचीं वर्णनें, पुढील भविष्यें, पवित्र अपवित्र दिवसांच्या याद्या, व्रतेंवैकल्यांच्या पापपुण्याच्या जंत्र्या, वर्णाश्रम धर्माच्या कथा, श्राद्ध पिंडांचीं वर्णनें, मोठमोठ्या यज्ञांचीं वर्णनें, नवखंड पृथ्वीचा भूगोल, काय वाटेल तें पुराणांत आहे. परंतु इतिहासाच्या भूगोलाच्या शास्त्राच्या किंवा सारासार विचाराच्या कसोटीस त्यांतली एक गोष्ट उतरेल तर हराम ! अथपासून इतिपर्यंत ब्राह्मणांचें स्तोम ! **कै. लोकहितवादी** म्हणतात, " पुराणांच्या स्वार्थी म्हणावयाचें कारण, त्यांत सर्वत्र फक्त ब्राह्मण जातीचें मात्र अघळपघळ वर्णन, त्यांचे शाप उःशाप,सामर्थ्य, तप वगैरे भरून दिलें आहे. हा प्रकार पाहिला म्हणजे तेव्हांच ही स्वार्थसाधुता व्यक्त होते. गुणकर्मविभागात्वें करून ब्राह्मण्याच्या स्थापनाची गोष्ट अगदीं लयास जाऊन ब्राह्मणवंश पिढ्यानुपिढ्या कायम राहूं लागले. त्यामुळें उच्च व कुलीन मानलेला जो ब्राह्मणवर्ग त्यास लवकरच कमीपणा घेऊन शेवटीं इतक्या थरावर गोष्ट येऊन ठेपली कीं,

## ब्राह्मण ह्मणजे पहिल्या प्रतीचे घातुक

दुष्ट बुद्धीचे, आणि कृतकर्मे आहेत, अशी सर्वांची समजूत व्हावयास लागली. दुराचरण नाहीं कोठें ? गांव आहे तेथें महारवाडा आहेच; परंतु असें असून सर्व प्रकारची उच्चता ब्राह्मणांकडे आलेली जेथें वर्णिली आहे. येणेंकरून परजातीयांस ब्राह्मणांचा हेवा उत्पन्न होऊन ते त्यांचें पैशून्य पाहतात हें साहजीक व योग्य आहे. गुणकर्मे करून चतुवर्ण वर्गीकरण करण्याचीच रीति सुरूं असती म्हणजे असें हेव्यादाव्याचें कारण राहिलें नसतीं असें वाटतें. पुराणांतील कथांतून ब्राह्मणांचे श्रेष्ठत्व किती वर्णिलें आहे ? याचीं उदाहरणें म्हणजे सर्व पुराणेंच आहेत. याचा शब्द देवहि कधिं खालीं पडूं देत नसत व क्षत्रिय राजे तर त्यांस चळचळ कांपत असत, इत्यादि वर्णनें जागोजाग आढळतात. विश्वामित्रानें हरिश्चंद्राचा छळ केला दुर्वासानें धर्मराजास

अरण्यवासांत असतां अन्नाकरितां आडविलें, परिक्षितीस शृंगीनामक ऋषिपुत्रानें शापिलें, भृगु ऋषीनें श्रीविष्णूच्या उरस्थलावर लत्ताप्रहार केला, इत्यादि कथा वर्णून त्या त्या सर्वांकडून त्या ब्राह्मणांचा मोठा सन्मान झाला असें लिहिलें आहे. ब्राह्मण म्हणजे शापादपिशरादपि, जें बोलतील तें होईल, करितां त्यांचे म्हणणें कोणीहि अमान्य करूं नये, असे ठिकठिकाणीं शेरे देऊन त्यांच्या हुबेहूब उदाहरणांचे दाखले नमूद करून ठेविले आहेत.:—

*(१) देवाऽधीनं जगत्सर्वं मंत्राऽधीनं च दैवतम् !
ते मंत्रा ब्राह्मणाऽधीना ब्राह्मणो मम दैवतम् !! भागवत.

(१) सर्व जग देवाच्या स्वाधीन, देव मंत्रांच्या आधीन, मंत्र ब्राह्मणांच्या स्वाधीन म्हणून ब्राह्मण जेहत्ते दैवतच होत.

(२) अविद्वांश्चैव विद्वांश्च ब्राह्मणो दैवतं महत् !
प्रणीतश्चाऽप्रणीतश्च यथाऽग्निर्दैवतं महत् !! मनु. ३१७-९.

(२) ज्याप्रमाणें अग्निहोत्राच्या कुंडांत सिद्ध करून ठेवलेला अग्नि असो कीं त्यावांचून दुसरा अग्नि असो ती मोठी देवता आहे, त्याप्रमाणें ब्राह्मण विद्वान असो कीं अविद्वान असो तें दैवत आहे.

(३) पृथिव्यां यानि तीर्थानि तानि सर्वाणि सागरे।
सागरे सर्व तीर्थानि पदे विप्रस्य दक्षिणे ॥

(३) पृथ्वीवरील सर्व तीर्थांचें श्रेय सागरांत असतें आणि ब्राह्मणाच्या उजव्या पायांत (डाव्या नव्हे हो !) सर्व सागराचें पुण्य सांठविलेलें असतें.

(४) दुःशीलोऽपि द्विजः पूज्यो न तु शूद्रो जितेंद्रियः।
कः परित्यज्य गां दुष्टां दुहेच्छीलवतीं खरीम् ॥ पराशरः ३३–८.

(४) ब्राह्मण कितीहि दुर्वर्तनी असला तरी तो पूजनीय व वंद्यच होय; परंतु शूद्र जितेन्द्रीय झाला तरी तो कदापिहि पूजनीय होऊं शकत नाहीं. अहो ! गाई कितीहि दुष्ट व खोडकर असली म्हणून शहाणा मनुष्य कधिं चांगल्या सुशील गधडीचें कां कधीं दूध काढण्यास प्रवृत्त होईल ? कदापि नाहीं !''

पुराणांतल्या राजांच्या वंशावळी आणि त्यांच्या भरंवसाट दिलेल्या आयुष्यमर्यादा म्हणजे पुराणकारांच्या अक्कलशून्य मेंदूचीं दिव्य प्रदर्शनेंच म्हटलीं पाहिजेत. पुराणांतला भूगोल घेऊन पृथ्वीपर्यटणास निघणाऱ्या प्राण्याचें डोकें ताळ्यावर असल्याचें खुद्द पुराणकाली तरी कोणी शहाण्यानें सर्टिफिकीट दिलं असेल, असें आम्हांस वाटत नाहीं. पुराणांतला भूगोल ज्योतिषशास्त्राच्या कसोटीस लावतांच, तो मिथ्या आणि खोडसाळ ठरवून खुद्द भास्कराचार्यादि

* अहाहा ! केवढी उज्ज्वल ही वेदवाणी ! कोणीतरी रिकामटेंकड्या ब्राह्मणपुत्रानें ही असलीं दिव्य वचनें एकत्र जमवून ' ब्राह्मणतेजमहात्म्य ' नावाचा एक राष्ट्रीय ग्रंथ सर्व भाषांत तयार करावा. म्हणजे आपत्प्रसंगीं, राजद्रोहाच्या खटल्यांत पुरावा म्हणून तो दाखल होतांच कोर्टातला न्यायाधीश व पार्लमेंटांतले जूरर्स, ह्या ग्रंथाच्या प्रभावानें आणि ब्राह्मणांच्या जन्मसिद्ध तेजानें ठिकच्या ठिकाणीं जळून खाक होतील.

विद्वान् ज्योतिषी त्यावर छी छी करून थुंकले. बरें, काव्य या दृष्टीनें जरी पुराणें पाहिलीं तरीहि ती कवडीमोल आहेत. कल्पनातरंगाच्या भरारीला तरी कांहीं सीमा ? कोणी समुद्र प्राशन केले, पृथ्वी गाईचें रूप घेऊन शरण गेली, सागर पर्वतांना वाचा फुटली, पर्वत उड्डाण करूं लागले, नद्यांना पुत्र झाले, चंद्रसूर्यांचे वंश पृथ्वीवर आले, पृथ्वीवरचीं माणसें स्वर्गांत जाऊन परत पृथ्वीवर आलीं

## ब्राह्मणांच्या वशिल्याचीं माणसें

स्वर्गांत सुखरूप जात आणि बाकीची मात्र पटापट नरकांत गळून पडत ! पुराणादि ब्राह्मणमहात्म्य ग्रंथांत ब्राह्मणांचे जें जें स्तोम* माजविलें आहे, त्याला ज्यांनीं बिनशर्त माना वांकविल्या त्यांना त्यांना स्वर्गातील सुखोपभोग चुटकीसरसे प्राप्त झाले आणि ज्यांनीं तसें केलें नाहीं ते रौरव नरकांत अनंत काळ कुझत पडले, अशीं काल्पनीक कादंबऱ्यांच्याहि थोबाडींत मारणारीं वर्णनें ज्या पुराणांत घुसडण्यास ब्राह्मणांनीं कमी केलें नाहीं, त्या पुराणांच्या पारायणांनीं जनता पापपुण्याच्या आणि स्वर्गनरकाच्या भीतीनें गांगरून जाऊन

## मोक्षासाठीं भटाभिक्षुकांचा कांसोटा

धरण्याइतकी नादान बनली तर त्यांत आश्चर्य काय ? **लोकहितवादी** म्हणतात. [स्वाध्याय पृ० ७७] '' जेथें तेथें पुराणांत ब्राह्मणांचें माहात्म्य घातलें आहे. ब्राह्मणांची प्रसन्नता सुख देणारी व त्यांचे शाप घात करणारे आहेत. मोठमोठे राजेहि ब्रह्मशापेंकरून जळून गेले आणि ब्राह्मणांची प्रसन्नता मिळविणें हीच ईश्वराची प्रसन्नता मिळविण्याचा मार्ग आहे व याजकरितां त्यांस दान द्यावें असें लिहिलें असून त्याप्रमाणें आजपर्यंत उपदेश होत आले. याजमुळें सर्व

## धर्माचे धोरण ब्राह्मणभोजनाकडे

गेलें. उपयोगी कामांचा उगम थिजून दिवसेंदिवस ब्राह्मणांस वतनदाराचा घुगरी फसकी सारखा फुकट धर्म अविच्छिन्न मिळूं लागला ; आणि त्यामुळें ब्राह्मणांनीं आपले कर्म सोडून बैरागी लोक

* मूळ पुराणांत क्षत्रियांचा पराक्रमच ग्रथीत केलेला असे. परंतु मूळच्या खरोष्टी प्राकृत भाषेंतल्या पुराणांना ब्राह्मणांनी जेव्हां संस्कृत रूप दिलें तेव्हां त्यांनी क्षत्रियचारित्र्याची पुराणांतून हकालपट्टी करून ब्राह्मणी मतांचा त्यांत बुजबुजाट करून ठेवला. एफ्. ई. पार्जिटर या सुप्रसिद्ध पुराणसंशोधकानें आपल्या Dynasties of Kali Age नामक पुस्तकांत येणेंप्रमाणें खुलासा केला आहे :—It was the brahmans probably who saved and improved the status of those old compositions by converting them into Sanskrit, and afterwards, perceiving what an excellent means they provided for reaching popular thought, made use of them to propagate their own views and doctrines by freely augmenting them with brahmanical fables, philoscphical discusions, and ceremonial expositions which were enforced with the authority of *Vyas*. I should say therefore speaking generally, that what may be called the *Kshatriya*, or better perhaps the popular, matter of the puranas constituted the really old and genuine *Purana*, and that the brahmanical and ritual matters now found in them were later additions and interpolations made from time to time. *Int. P. xvii. footnate.*

जसे अज्ञानावस्थेंत असतात, तसेच ब्राह्मण लोक अज्ञानी झाले. त्यांनी आपलें अध्यापनहि सोडलें. व जेणेंकरून निरुपयोगी धर्म मात्र दिवसेंदिवस वृद्धि पावला व भिक्षुक वर्ग वाढला. सारांशानें पाहिलें असतां पुराणांतील वर्णनक्रमावरून तीं केवळ निरपेक्ष बुद्धीनें व लोकांस सद्विचाराचें ज्ञानव्हावें एवढ्याकरितां कर्त्यानें केली नसून, त्यांत ब्राह्मणांचा स्वार्थ दिसतो.''

* * * *

(७) ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर, हा शब्दसमुच्चय आतां बऱ्याच लोकांच्या परिचयाचा होत आहे. या नवीन चळवळीची कुंडली मांडून तिच्या भविष्याचे ठोंकताळे निश्चित ठरविण्यासाठीं विचारी लोकांचे विचारयंत्र तिच्या घरांतील ग्रहांचे वैयक्तिक सत्व व तत्व अजमाऊन पहाण्यांत अगदीं गुंग झालें आहे. स्वतःस राजकारणाचे गड्डे समजणाऱ्या वावदुकांचे व कलम-कसायांचे अड्डे या चळवळीच्या तीव्र वेगाला आपल्या लेखण्या जिव्हांचे कोलदांडे घालून अडविण्याचा प्रयत्न करीत आहेत. हस्तिदंती धोरणांच्या छांछूनें लोकांच्या डोळयांत धूळ फेंकून त्यांच्याकडून आत्मस्तोमाचे देव्हारे थाटविणारीं वटवाघुळें म्हणतात कीं 'ऍः ! या चळवळींत कांही राम नाहीं. हा नुसता एकमेकांना शिव्या देण्याचा नवीन फोलकट उपक्रम आहे. हा जसा जन्मला आहे तसाच तो आपोआप मरून जाईल. त्याकडे लक्ष देण्याचे कांही कारण नाहीं.' या नवीन चळवळीचा आत्मा कोठें आहे आणि त्याच्या तेजाचें पर्यवसान अखेर कशांत होणार, याची पूर्ण जाणीव कांही समदर्शी सज्जनांना झालेली असून, स्पष्टोक्तीचें धाडस त्यांच्या आंगी नसल्यामुळेंच, 'बाबांनो, कशाला उगीच एकमेकांच्या उखाळ्या पाखाळ्या काढून भांडत बसतां ? काळाकडे पहा आणि समेट करा.' अशा प्रकारचा कोरडा उपदेश करण्यापलीकडे त्यांच्याकडून अधिक कांही होत नाहीं व होणें शक्यहि नाहीं. ब्राम्हण-ब्राम्हणेतर चळवळीचा मुख्य कटाक्ष कशावर आहे, हें बिनचुक उमगणारे व स्वतःच त्या कटाक्षाच्या क्षेत्रांत सांपडणारे लोक आपल्या भवितव्यतेबददल जरी पूर्ण साशंक होऊं लागले आहेत, तरी

## बुडत्याला गवताची काडी

जशी परब्रह्म वाटते, त्याप्रमाणें त्यांनीं या चळवळीच्या पुरस्कर्त्यांवर नानाप्रकारचे गलिच्छ गलिच्छ आरोप करुन, तिची भ्रुणहत्त्या करण्यासाठीं कंबरा कसल्या आहेत. एरवीं, वाटेल त्या बऱ्या वाईट गोष्टांचे बेळगांवी लोणी पुणेरी तत्वज्ञानाच्या कढईत उकळवून त्यांतून निश्चित प्रमेयांचे राष्ट्रीय तूप काढणाऱ्या बृहस्पतींना या ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळीच्या शक्तीचा अंदाज करतां येऊं नये, यांत शुद्ध ढोंगापेक्षां आणखी दुसरा क्रोणताहि मुदद्दा नाहीं. न्यायाच्या मंदिरांत बचावाच्या पुराव्याचें भांडे चाटूनपुसून झालें म्हणजे अट्टल आरोपी जसा डोकें बिघडल्याचें किंवा स्मृतिभ्रंश झाल्याचें ढोंग करतो, त्याच मासल्याचा हा ढोंगीपणा आहे. परंतु, ढोंगाचें सोंग आणलें म्हणून न्यायदेवता ज्याप्रमाणें खुनी इसमाला बेधडक फांसावर लटकविल्याखेरीज सोडीत नाहीं, त्याप्रमाणें ब्राम्हण ब्राम्हणोत्तर चळवळीबद्दल गाढ अज्ञान दाखविणाऱ्या शहाण्यासुर्त्या ढोंगी बृहस्पतींना अखेर त्या चळवळीच्या प्रलयाग्नींत भस्मसात् व्हावें लागेल ! ही धमकी नव्हे, हें

सत्य तत्त्व आहे. ही कादंबरीची गप्प नव्हे, ही इतिहासाची साक्ष आहे. ही पुणेरी हस्तिदंती नव्हे, आत्मविश्वासाच्या तडफेची ही सडेतोड निर्भीड जबानी आहे. अज्ञानी लोकांना पापपुण्याच्या जरबेखाली गुलामापेक्षां गुलाम बनविणाऱ्या भिक्षुकशाहीचा हा बहुरूपी आडपडदा नव्हे; दीन दुनियेला गुलामगिरींतून वर खेंचून काढण्यासाठीं; तळतळणाऱ्या हृदयाच्या कळकळीनें, अस्तन्या वर सारून,

## भिक्षुकशाहीला चारी मुंड्या चीत

करणाऱ्या क्षत्रियांचा हा इतिहासप्रसिद्ध कोदण्डाचा टणत्कार आहे. ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळ ही इतिहासाची पुनरावृत्ति आहे. या पुनरावृत्तींत क्षत्रियांच्या हाडीमासीं खिळलेली उदार व दिलदार मनोवृत्ति, मागील इतिहासाप्रमाणें प्रतिस्पर्ध्याला चीत करण्याच्या कामीं जर फाजील प्रमाणांत आड येणार नसेल, तर हिन्दुस्थान द्वीपकल्पांतून बौद्धिक गुलामगिरीच्या उन्मत्त विषवृक्षाला आमूलाग्र कायमचें उखडून टांकण्याचें अननुभूत श्रेय तिला मिळाल्याशिवाय खास रहाणार नाहीं. ब्राह्मण-ब्राह्मणेत्तरांची चळवळ ही फार प्राचीन आहे. तिची सांप्रतची पुनरावृत्ति ही नवीन काळाच्या उदरांतून बाहेर पडलेली

## खऱ्या लोकशाहीची तेजस्वी ज्योत

आहे. भिक्षुकशाहीनें आपल्या क्षुद्र स्वार्थासाठीं प्लेगाच्या किंवा इन्फ्ल्युएन्झाच्या प्राणघातक जंतूंप्रमाणें सर्वत्र फैलावलेल्या बौद्धिक गुलामगिरीचीं हाडें न् हाडें ठेंचून काढणारा हा वज्रप्रहार आहे. ज्या गोष्टी भिक्षुकशाहीच्या पुराण-प्रवचनांनीं अगर वेदोक्ताच्या कोरड्या अट्टहासांनीं साध्य झाल्या नाहींत–त्या साध्य व्हाव्या अशी भिक्षुकशाहीनें कधिं इच्छाच केली नाहीं !–त्या गोष्टी सांप्रतची ही इतिहासाची पुनरावृत्ति ऊर्फ ब्राह्मणेतरांची चळवळ सिद्ध करून दाखविणार आहे. भिक्षुकशाही डिमॉक्रसीच्या उर्फ लोकशाहीच्या कितीहि आणि केवढ्याहि लंब्या चौड्या गप्पा मारो, लोकशाहीचें वर्म आणि भिक्षुकशाहीचें मर्म यांचें गोत्र ३६ च्या आंकड्याप्रमाणें आहे, ही गोष्ट सर्वांनीं अवश्य विचारांत घेतली पाहिजे. पौराणिकी गप्पा झोडून बहुजनसमाजाच्या डोळ्यांत धूळ फेंकण्यांत भिक्षुकशाही फार प्राचीन काळापासून कुप्रसिद्ध आहे; ही गोष्ट त्यांचा वैरी तर नाकबूल करीत नाहींच, पण मित्रसुद्धां नाकबूल करीत नाहीं. पण ज्या ज्या वेळीं भिक्षुकशाहीचा वरपगडा होऊन तिच्या हातीं सत्तेचा चाप मिळाला, त्या त्या वेळीं जनतेच्या मानेला लागलेल्या गुलामगिरीच्या फांसाच्या दोऱ्या ढिल्या करण्यापेक्षां त्या त्या चापानें अधिकाधिक आंवळून तिची पूर्ण गळचेपी करण्यापेक्षां आणखी कोणतें मोठें शतकृत्य भिक्षुकशाहीनें केलें आहे, त्याचा सप्रमाण दाखला कोणी भिक्षुकशाहीचा शाहीर इतिहासांत दाखवील काय ? स्वातंत्र्य, वैयक्तिक स्वातंत्र्य, प्रामाणिक मतस्वातंत्र्य, खऱ्या लोकसत्तेचें स्वातंत्र्य प्रस्थापित करण्याचें भिक्षुकशाहीचें तोंडच नव्हे. भिक्षुकशाहीचा पिंडच मुळीं जनतेच्या अज्ञानावर, अंधश्रद्धेवर आणि बौधिक गुलामगिरीवर पोंसलेला. अज्ञान, अंधश्रद्धा आणि बौद्धिक गुलामगिरी या तीन नरकांतून वर येणाऱ्या उग्र दर्पाच्या वाफाऱ्यावरच

## भिक्षुकशाहीच्या इभ्रतेचीं अंडीं

आजपर्यंत उबत आलेलीं आहेत. या तीन नरककुंडांना अज्जीबात नष्ट करण्याची शेखी भिक्षुकशाहीनें मारणें म्हणजे स्वतःच्या प्राणावरच कुऱ्हाड घालणें नव्हे काय ? आणि इतका आत्मयज्ञ भिक्षुकशाही दीन दुनियेकरितां करील, ही गोष्ट तर कालत्रयींहि घडणें शक्य नाहीं; कारण तशी इतिहासाची साक्षच नाहीं. राष्ट्रांतील सर्व लोकांपेक्षां आम्ही सर्वच बाबतींत जन्मतः श्रेष्ठ व वंदनीय, म्हणूनच बहुजनसमाजापेक्षां अगदीं निराळ्या इभ्रतीच्या रिझर्व्ड कम्पार्टमेंटमध्यें रहाणारे, अशा बाष्कळ वल्गना व्याधिष्ठाच्या आंगांवरील चिडचिडलेल्या फोड्यांप्रमाणें सर्व पुराणेतिहास स्मृत्यादि ग्रंथांत पेरून ठेवण्यास न शरमणाऱ्या या भिक्षुकशाहीनें लोकशाहीवर पुराणें झोडणें म्हणजे स्वार्थासाठीं सैतानानें बायबलाचा पाठ करण्यासारखें नव्हे काय ? लोक जर अज्ञान्याचे ज्ञानी होतील, अंधश्रद्धाळूचे चिकित्सक बनतील आणि भिक्षुकशाहीनें जागोंजाग पेरून ठेवलेलीं बौद्धिक गुलामगिरीचीं जाळीं तडातड तोडून स्वतंत्र विचाराचे स्वयंविचारी होतील, तर ते स्वयंस्फूर्तीनेंच भिक्षुकशाहीला लाथाबुक्क्यांखालीं तुडवून तुडवून तिचा कायमचा चेंदामेंदा करतील, यांत मुळींच संशय नाहीं. ज्ञानप्रसाराचें हें अनिवार्य पर्यवसान न ओळखण्याइतकी भिक्षुकशाही दुधखुळी किंवा आंधळी नव्हे. आजला पाश्चात्य विद्येच्या संस्कारानें लोकांत थोडीबहुत चिकित्सकपणाची तीव्रता दिसूं लागल्यामुळें, सर्रास पाश्चात्य संस्कृतीला शिव्याश्राप देण्याचा वेदोक्त धंदा भिक्षुकशाही कशी इमानें इतबारें चालवीत असते, हें कोणाला सांगायला नकोच. ' आम्हांला सुधारणा पाहिजे, परंतु ती आमच्या प्राचीन संस्कृतीशीं जुळणारी अशीच पाहिजे,' असा जो एक उद्‌गार शिक्षुकशाहीच्या पुढाऱ्यांच्या वेदोक्त नरड्यांतून नेहमीं बाहेर पडत असतो, त्यांत सुद्धां आत्मवर्चस्व गमावण्याची नाखुषीच मुख्यत्वेंकरून असते. जुन्याला घट्ट चिकटून रहा म्हणून उपदेश करणारे राजकारणी मुरंबे रा. सितारामपंत दामले काय, शूद्रांचा जन्म सेवेकरितांच झाला आहे असें उपरणें फडकावून सांगणारे शाहूनगरवासी दादासाहेब करंदीकर काय, किंवा मनु याज्ञवल्क्याच्या स्मृतींचीं पातडीं यल्लमा भक्तांच्या झालीप्रमाणें डोक्यांवर घेऊन नाचणारे बापटाचार्य काय, लोकशाहीच्या प्रवचनांच्या दाखवायच्या दातांमागेंच त्यांचे भिक्षुकी ढोंगाचे खायचे स्वार्थी दांत लपलेले असतात, हें न ओळखिण्याइतकी अजाण जनता आतां इंग्रजी शिक्षणामुळें बरीच कमी कमी होत आहे, हें पाहून त्यांच्या पोटांत वायगोळा कां उठूं नये ?

* * * * *

[८] आधींच भिक्षुकशाहीची धर्मविषयक लटपट आणि डोळस ज्ञानाच्या चिकित्सेची मुसंडी यांचें मोठें हाडवैर ! युरपांत या चिकित्सेचा आणि सायन्टिफिक शोधन-प्रवृत्तीचा उदय होतांच, तेथील पाद्री भटांच्या

## पोंकळ वर्चस्वाचे कागदी मनोरे

धडाधड कोंसळून चक्काचूर झाले. जनतेच्या मनोवृक्षावर चढलेलीं अंधश्रद्धेचीं बांडगुळें ऐतिहासिक चिकित्सेच्या तीक्ष्ण शस्त्रांनी साफ तोडून, त्यांची शास्त्रीय शोधनाच्या भट्टींत राख

होतांच, पाद्रीभटांचा त्यांच्या बायबलाचा आणि मोक्षप्राप्त्यर्थ त्यांच्या मध्यस्थीचा बागुलबुवा अतःपर युरपांतील जनतेला मुळींच त्रास देऊं शकत नाहीं. तिकडील सुविद्य जनतेनें

## भट-बायबल-मोक्ष

या त्रयीशीं छातिठोंक लढाई देऊन, आपली माणुसकी व निसर्गदत्त आचार-विचार-स्वातंत्र्य आतां अगदीं कायमचें सिद्ध करून टांकलें आहे. परंतु, हें विचारस्वातंत्र्य व व्यक्तिस्वातंत्र्य प्राप्त करून घेण्यासाठीं जनतेला भिक्षुकशाहीशी युद्ध करतांना अत्यंत अमानुष हालअपेष्ठा सोसाव्या लागल्या, मोठमोठ्या नवमतवादी तत्ववेत्त्यांना भिक्षुकशाहीच्या रावणी क्रोधास बळी पडून, त्यांनी पेटविलेल्या प्रचंड होळ्यांत आपल्या बिनमोल देहांच्या आहुती द्याव्या लागल्या, 'इन्क्विझिशन्' च्या नांवानें इतिहासप्रसिद्ध असलेल्या राक्षसी भिक्षुकशाहीच्या अमानुष अत्याचारांत अगणिक पुरुष स्त्रिया व मुलें यांनी केवळ सत्यप्रेमासाठीं आपल्या जीवांचे धडाधड बळी दिले. हा इन्क्विझिशनचा इतिहास वाचला म्हणजे ज्याच्या अंतःकरणाची लाहीलाही उडणार नाहीं, असा भिक्षुकशाहीच्या पुळ्याशिवाय इतरत्र दुसरा कोणी माणूस आढळावयाचा नाही. हा इतिहास असें स्पष्ट सांगतो की वेळीं एखादें निःशस्त्र राष्ट्र आत्मस्वातंत्र्याच्या महत्वाकांक्षेच्या जोरावर सशस्त्र अशा प्रबल सत्तेशीं टक्कर देऊन आपल्या स्वयंनिर्णयाची किल्ली हस्तगत करूं शकेल ; परंतु सशस्त्र व सबळ राष्ट्रालासुद्धां भिक्षुकशाहीच्या मायावी, असुरी व अमंगल डांवपेंचाशीं तोंड देणें फार कठीण जाईल. एखाद्या राजाची राज्यसत्ता उलथून पाडणें जितकें सुलभ आहे, तितकेंच

## जनतेला भिडलेली भिक्षुकशाहीची रक्तपिती

घालविण्याचें काम दुर्घट आहे. युरपांतल्या पोप पाद्री भिक्षुकांच्या म्होरकेपणाखालीं भिक्षुकशाहीनें आपल्या मतांशी विरोध करणाऱ्या नवमतवाद्यांना वाटाण्यांतल्या खड्यांप्रमाणे निवडून काढून, कोणाच्या हातापायांत जडजड बेड्या ठोंकून त्यांना अंधार कोठड्यांत फेंकून दिलें ; कोणाला अन्नपाण्यावांचून ठार मारले, कोणाचे हातपाय 'रॅक्स' नामक ताटीवर ताणून बांधून त्यांचीं हाडें अक्षरशः ठेंचून त्यांचें पीठ केलें ; कोणाच्या जिभा कापल्या ; कोणाचे डोळे काढले ; कोणाचीं जिवंतपणीं आंगाचीं कातडीं सोलून काढलीं, तर कोणाला मोठमोठ्या शहरांच्या चौकांत होळ्या पेटवून त्यांना लाखों तमासगिरांच्या समक्ष जिवंत जाळले. हें सारें पुण्यकृत्य कशासाठीं ? तर भिक्षुकशाहीच्या पुराणमतांशी त्यांनीं विरोध केला म्हणून ! असल्या अमानुष अत्याचारांबद्दल क्रिस्ती भिक्षुकशाहीलाच कांहीं हंसायला नको. आमच्या महाराष्ट्रांतील शहाण्या पुण्याच्या शहाण्या चित्पावन नोकरशाहीनें आपल्या सद्दीच्या जोरावर असले अत्याचार रगड केलेले आहेत आणि ते करतांना स्वकृत्यसमर्थनार्थ त्यांनी भिक्षुकशाहीचा बायबलग्रंथ जो मनुस्मृति तिचीच नाटकी ढाल पुढें केली होती. परंतु महाराष्ट्राचें भाग्य म्हणून त्यांनीं इतरांवर जे जे अत्याचार केले त्या त्या अत्याचाराच्या एकेका प्रकारानेंच चित्पावन पेशव्यांच्या घराण्यांतली एकेक व्यक्ती अखेर बळी घेतली ! कर्मवादाचें गीतारहस्य म्हणतात तें हेंच !

इतिहास-संशोधन म्हणजे या जीर्णमतवादी गुंडांना शुद्ध थट्टा वाटते. असें म्हणण्यापेक्षां, संशोधन-चिकित्सेच्या वस्त्र्याची धार त्यांच्या अलीकडे चांगलीच प्रत्ययाला आल्यामुळें आणि त्या धारेची तीक्ष्णता सायन्सची सहाण दिवसेंदिवस अधिकाधिक तीक्ष्ण बनवीत असल्यामुळें, त्यांनीं आपल्या पूर्वपरंपरेच्या पद्धत्यनुरूप त्याकडे नुसतें धिःकारयुक्त पाहून तिची थट्टा व उपहास करण्याचें व्रत पत्करलें आहे. एखाद्या गोष्टीची भ्रूणहत्त्या करायची म्हणजे त्या गोष्टीची धिःकारपूर्वक अवहेलना करून तिच्याकडे जणूं काय आमचें लक्षच नाहीं, किंवा लक्ष देण्याचें कारणच नाहीं, अशी वृत्ति पत्करणें ; आणि ही वृत्ति म्हणजे

## भिक्षुकशाहीचा शिलकी परशुरामी बाण

होय. इतिहास-संशोधन आणि चिकित्सा या दोन न्यायनिष्ठूर वज्रांची जन्मभूमी युरपखंड-विशेषतः जर्मनी-होय. तेथून हीं अस्त्रें हिंदुस्थानांत आल्या दिवसापासून, त्यांच्या वज्रप्रहारांनी आमच्या ' बाबावाक्यं प्रमाणं ' धर्मशास्त्रादि ग्रंथांचा बरावाईटपणा चवाठ्यावर येऊन, त्यांतील कुभांडीपणाच्या हड्ड्या आजला चूर्ण होऊन गेल्या आहेत. जर्मन व इंग्रजी संशोधकांनीं इकडे येऊन आमच्या सर्व संस्कृत वाङ्मयाचें अत्यंत कळकळीनें, निष्ठेनें व चिकित्सेनें अध्ययन करून, त्यांवर आपापल्या भाषेंत विद्वत्तापूर्ण जितके ग्रंथ लिहिले आहेत, त्यांच्या पावपट तर राहूंद्याच पण एक अष्टमांशहि ग्रंथ अध्ययन अध्यापनाची शेखी मिरविणाऱ्या ब्राह्मणब्रुवांनी लिहिले नाहींत. उलट, या स्वार्थत्यागी पाश्चात्य पंडितांनी इकडे येऊन संस्कृत-भांडाराला शतकानुशतकें लागलेलीं ब्राह्मणी कुलपें तडातड तोडून त्यांत सांठविलेलें-परंतु कालवशात् गंजून गेलेलें-हिंदभूमीचें प्राचीन ज्ञान आपल्या चिकित्सापूर्ण अध्ययनाच्या शमॉय लेदरनें घांसून पुसून झक्क करून साऱ्या जगाला देतांच, धर्म बुडाला ! धर्म बुडाला !! म्हणून आमच्याकडील ब्राह्मणब्रुवांनीं केवढा मोठा शंखध्वनि केला, तो माणसें विसरलीं तरी इतिहास विसरणार नाहीं. फार दूर कशाला ? महाराष्ट्रांतले संस्कृताचे आद्यपंडीत व आद्य इतिहास-संशोधक

## डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर

यांनी या पाश्चात पंडीतांना प्राचीन संस्कृत भांडाराची इत्थंभूत माहिती दिली, एवढ्याच कारणावरून त्यांच्यावर अझूनहि जळफळणारे शहाणे काय कमी आहेत ? या वेळेपर्यंत संस्कृतांतले ज्ञानभांडार म्हणजे ब्राह्मणांच्या खऱ्याखोट्या श्रेष्ठत्वाचे नगारे होते ; ते या पाश्चात्य व पौर्वात्य चिकित्सकांनी आरपार फोडतांच ब्राह्मण्याचे बेंडच उघडें पडल्यामुळें ब्राह्मणबुवांच्या आंगाचा तिळपापड उडणें साहजीक आहे. तथापि अशाहि आणीबाणीच्या प्रसंगीं ब्राह्मणांनीं आपल्या कारस्थानी धोतऱ्याचें बी ठकबाजीच्या चिलमींतून या पाश्चात्य पंडीतांना यथास्थित द्यायला सोडलें नाहीं. शेंकडों उदाहरणांपैकीं एकच ठळक उदाहरण घ्या. कॅप्टन् विल्फर्ड नांवाचा एक विद्वान् शोधक इकडे आला होता. त्यानें अतोनात परिश्रम प्रवास व खर्च करून ठिकठिकाणचे जुने संस्कृत ग्रंथ व हस्तलिखितें गोळा केलीं आणि त्यांचें शोधन करून त्यांत ॲडॅम आणि ईव्, मनूचा जलप्रलय इ. गोष्टींबद्दल कांहीं संदर्भ सांपडतो कीं काय हें

पाहण्यासाठीं भरभक्कम पगार देऊन कांहीं वेदशास्त्रसंपन्न भटजींना त्या कामावर नेमले. या भटमंडळानें विल्फर्ड साहेबाला खूष करण्यासाठीं (पण वास्तवीक त्याला ठकविण्यासाठींच) ज्या प्रकारची माहितीं पाहिजे होती त्या प्रकारची बनावट बनवून त्याला पुरविण्याचा धूमधडाका सुरूं केला. ब्राह्मण कधिं खोटें कर्म करील ? मनुस्मृतीची शपथ ! प्रत्यक्ष ब्रह्मदेवाच्या तोंडांतून पडलेला, या साऱ्या विश्वाचा प्रभू असा ब्राह्मण कधिं खोटें काम करी ? बिचाऱ्या विल्फर्डनें या भटमंडळाकडून वेळोंवेळीं येणाऱ्या नोट्स्वरून एक उत्कृष्ट इंग्रजी ग्रंथ लिहून काढला व तो तपासण्याच्या वेळीं अस्सल संस्कृत पुराव्यांशीं मेळ घालून पहातांच या

## भटमंडळाचा खोडसाळपणा

त्याच्या नजरेस आला ! त्याची ग्रंथलेखनाची सारी मेहनत पाण्यांत गेल्यामुळें त्याला निराशेच्या केवढ्या भयंकर यातना सोसाव्या लागल्या असतील, याची कल्पना वाचकांनींच करावी ! या गोष्टीवर चर्चा करतांना सुप्रसिद्ध तत्त्ववेत्ते हेजेलसाहेब आपल्या "Philosophy of History नामक ग्रंथांत (पृ. १७२) म्हणतात कीं "The Brahmins have no conscience in respect to Truth" [ या ब्राह्मण लोकांना सत्याची तिळमात्र चाड न भासण्याइतके ते उलट्या काळजाचे असतात.] यांनीं आपल्या विद्वत्तेच्या पोंकळ सबबीवर आपल्या कित्येक प्राचीन ब्राह्मणी ग्रंथांची मनमुराद स्तुती करून त्यांचें प्राचीनत्व सिद्ध करणारे दाखले इंग्रजी ग्रंथांत नमूद करून ठेवण्याचा कित्येक युरोंपिअन शोधकांना मोह पडला; तर कित्येकांना आपल्या जातीबद्दल मोठ्या प्रसंशेची शिफारस-पत्रें जागोजाग पेरून ठेवण्याचा आग्रह केला. या ब्राह्मणी काव्यांत बरेचसे पाश्चात्य सशोधक सांपडले खरे; तथापि म्हातारीनें कोंबडें झांकून ठेवण्याचा आटाकोट यत्न जरी केला तरी उजाडायला कांहीं राहिलें नाहीं आणि पाश्चात्य संशोधकांची अशी एक पिढी पुढें आली कीं तिनें या अकटोविकटो वेदशास्त्रसंपन्नांना सफाई धाब्यावर बसवून वदोपनिषदें भारतरामायणादि ग्रंथांचें स्वतः पारायण करून त्यांवर स्वतंत्र विचारांचे अनेक ग्रंथ लिहिले. ऋग्वेदावर सायणाचार्यांची टीका* होती, तरीदेखील ती एका ब्राह्मणानेच लिहिलेली असल्यामुळे त्यांत त्यांनें

## ध चा मा अनेक ठिकाणीं केला

नसेंल कशावरून? या शंकेमुळें जर्मनींतला सुप्रसिद्ध प्राच्यविद्यासंशोधक **वुडॉल्फ रॉय** यानें तिकडे एक स्वतंत्र विचाराचा पंथ स्थापन करून, ऋग्वेदावर अगदीं निराळीच एक विस्तृत टीका जर्मन भाषेंत लिहून काढली. तिची इंग्रजी भाषांतराचीं पुस्तकें जगभर पसरतांच ऋग्वेदविषयक चर्चेच्या वावटळीनें आमच्या मॅक्समुल्लर साहेबांच्या वेदविषयक कित्येक विधानांचा नुसतां थरकांप उडाला.

गेलीं कित्येक शतके स्पष्टोक्ती म्हणजे देवाचा अपमान, धर्माची पायमल्ली, भिक्षुक शाहीचा उपमर्द आणि राजाचा द्रोह मानली जात आहे. प्रामाणिक विचार बोलून अगर लिहून व्यक्त

* ऋग्वेदाच्या जुन्यांतल्या जुन्या टीका दोन, एक सायणाचार्याची व दुसरी महीधराची. पाश्चात्य पंडीत सायणाचार्यांच्या टीकेला "a mere drag on the progress of Vedio Scholarship" म्हणतात (पहा S. B. East Vol. 32, Vedio Hymns p. 32) व महीधराच्या टीकेला तर सर्वस्वीं अग्राह्य ठरवितात. पूज्यपाद महर्षि दयानंदसरस्वती तर या दोघांना फुटक्या कवडीचीहि किंमत देत नाहींत.

करतांच तें एक अघोर कृत्य मानण्याचा संप्रदाय आहे.* विद्वान् चिकित्सक नवमतवाद्यांच्या तोंडाला या राक्षसी जीर्ण मतवादी भिक्षुकशाहीनें

## मोठमोठी मिलरचीं कुलुपें

ठोंकलेलीं आहेत. स्वतंत्रपणें विचार करून स्वतंत्र बाण्याचीं मतें प्रसृत करणाऱ्या नमवतवाद्यांचीं मस्तकें या मुर्दाड भिक्षुकशाहीनें वारंवार ठेंचण्याचा पुराणोक्त व बायबलोत्त्क प्रघात आज शतकानुशतकें बेगुमानपणाने चालू ठेविल्यामुळे मानवजातीच्या प्रगतींत बेसुमार पिछेहाट होत आहे; याचें कारण विवेकशक्तीचा अंमल बहुजनसमाजाच्या खालच्या थरापर्यंत कधी पोहचूंच शकत नाहीं. खिस्ती भिक्षुकशाहीनें आकाशांतल्या बापाला साक्ष ठेवून स्वतंत्र शोध करणाऱ्या नवमतवादी कोपर्निकस गॅलिलियो यांचा अमानुष छळ व सावोनरोला, ब्रूनो, इत्यादिकांचे दिवसाढवळ्या पाडलेले खून; आणि इकडील भिक्षुकशाहींने मनुस्मृति प्रसविणाऱ्या ' हातच्या आल्या' बापाला खूष ठेवणासाठीं सतीच्या ढोंगाखालीं केलेली राक्षसी स्त्रीहत्या, सोंवळ्या वेदोक्ताच्या सबबीखालीं अंगांवर जळतीं तेलें व कानातोंडांत शिशाचा रस ओतून पाडलेले ब्राह्मणेतरांचे खून व आत्मवर्चस्वासाठीं राष्ट्रीय स्वातंत्र्याला लावलेली भयंकर आग पाहून स्वतंत्र विचार करण्याची लोकांची प्रवृत्ति थरथर थरथर कापू लागली, तर त्यांत अश्चर्य तें काय? सात्यतत्वानें प्रज्वलीत केलेली, धीरोदात्त विचारवंतांनीं स्वतःच्या सुखसर्वस्वावर तुळशीपत्र ठेवून निश्चयाच्या तडफेनें जनतेसमोर उंच धरलेली सत्यशोनाची मशाल या भिक्षुकशाहीनें

## मानवी रक्ताचे हौदच्या हौद

ओतून अनेक वेळां विझवून टांकलेली आहे. कोणत्याही काळाचा कोणत्याहि देशाचा इतिहास घ्या, त्यांतलें भिक्षुकशाहीचें वर्तन अत्यंत उलट्या काळजाचें व बेगुमानपणाचेंच दिसून येतें. भिक्षुकशाहीनें आजपर्यंत धार्मिक अडत्येगिरीचा धंदा करुन, ईश्वराच्या स्वर्गीय खाणावळीच्या सायुज्यमुक्तीच्या दालनांत मोक्षामृताचें

## ओंटभर भुरके आणि पोटभर जेवण

कोणाला घातलें असेल तें असो, त्यांनीं सत्यसंशोधकांचा अमानुष छळ, बीभत्स विपर्यास व तीक्ष्ण उपहास केल्याचें मात्र इतिहासाच्या भरभक्कम पुराव्यानें सिद्ध होत आहे. या

† "Where a monarchy is master, enquiry is apt to be a disturbing element, and though it be exercised in the interest of the Commonwealth, it is none the less resented; where the priest is master, enquiry is sharply prohibited. The priest represents a spiritual monsrohy in which the tenets of belief are fixed, assumed to be infallible and to be prescribed by Deity. Thus the priest regarde enquiry as proceeding from an impertinent distrust, and is not reconciled on being assured that it is undertaken in the interest of truth. Thus the king denonuces enquiry as seditions, and the priest as sin. In the end, the enquirer finds himself an alien in Church and State and laws are made against his life, his liberty, property and veracity."

*George Jacob Holyoak,* quoted in *Vedic Magazine,* pp. 22-23. Vol. I-10.

भिक्षुकशाहीच्या वर्चस्वाचा डोलारा नेहमीं पौराणिक दंतकथा, अविश्वसनीय चमत्कार, खोटे दस्तऐवजी कादंबऱ्यांचे पुरावे, भुतांखेतांची आणि नरकांची जरब आणि त्यांनीं आपल्या अष्टपैलू मेंदूतून निर्माण केलेल्या देवांच्या अडत्येगिरीची जन्मसिद्ध सनद इत्यादी कडीकोयंड्यांवरच झुलत असतो. अर्थात् या कडीकोयंड्यांना सफाई विचकून उखडल्याशिवाय जनतेच्या बोकांडीं बसलेलें हें

## भिक्षुकशाहीचें जुनेंपुराणें भूत

कायमचें गाडलें जाणार नाहीं, इकडे आमच्या वाचकांचें पूर्ण लक्ष असावें. 'ब्राह्मणेतरांची चळवळ' या लोकमान्य शब्दयोजनेनें आतां सुप्रसिद्ध होत असलेल्या सुधारकांचा कटाक्ष ब्राह्मण म्हणविणाऱ्या समाजाविरूद्ध नसून या भिक्षुकी कारस्थानाविरूद्ध आहे. या चळवळीचें शरसंधान व्यक्तींवर नसून प्रवृत्तीवर आहे. शेक्सपियरनें 'सह्यवा हेन्‌री' नाटकाच्या ३ ऱ्या भागांत ग्लॉस्टरच्या तोंडीं जे विचार घातलेले आहेत, त्यांची आणि या भिक्षुकी प्रवृतीची किती बिनतोड एक वाक्यता होते, हें विचारी वाचकांस अधिक खुलाशानें सांगणें नको. ग्लास्टर म्हणतो :—

Why, I can smile, and murder whiles I smile;
And cry content to that which grieves my heart;
And wet my cheek with artificial tears,
And frame my face to all occasions.
I'll drown more sailors than the merimaid shall;
I'll slay more gazers than the basilisk;
I'll play the orator as well as Nestor;
Deceive more slily than Ulysses could;
And like a Sinon, take another Troy;
I can add colours to the cameleon;
Change shapes with proteus for advantages;
And set the murderous Machiavel to school.
Can I do this, and cannot get a crown ?
Tut, were it further off, I'll pluck it down;

बाबत राजकीय असो, सामाजिक असो, नाहींतर धार्मिक असो, जेथें जेथें अनुदारपणा, हट्टीपणा आणि विरोधाचा कर्कशपणा दिसून येईल, तेथें तेथें मुळाशीं ही ग्लॉस्टरी भिक्षुकी प्रवृत्ती असलीच पाहिजे असा एक अबाधित सिद्धांत गेली शंभरांवर वर्षे सुशिक्षित महाराष्ट्रीयांच्या पूर्ण प्रचितीस आलेला आहे. या भिक्षुकी प्रवृत्तीनें आपली सत्ता ब्राह्मणेतर समाजांवर अबाधित राखण्यासाठीं बाळंतिणीच्या खोलीपासून तो स्मशानांतील सरणापर्यंतच्या बऱ्यावाईट आचार विचारांचा मक्ता आपल्या हातीं ठेवल्यामुळें, लहान लहान मुलें व भोळ्या भाबड्या बाया यांच्यांत

## अंधश्रद्धेचें जालीम जहर

त्यांनीं सपाटून पेरण्याचा उपक्रम आजपर्यंत केलेला आहे. त्यांच्या कोमल तुरुतुल्य बुद्धीला आणि कल्पनेला आपल्या पौराणिकी गप्पांनीं भ्रष्ट व पतित करून करूनच भिक्षुकशाहीनें

हिंदुसमाजाचे हातपाय बौद्धिक गुलामगिरीच्या लोखंडी सांखळदंडांनीं करकचून आंवळून टांकले आहेत. सुखसंपन्नांना नरकाची भीति दाखवून आणि दुःखपीडितांना अध्यात्मिक मुलाम्याच्या खोट्यानाट्या गप्पांचीं अश्वासनें देऊन देऊनच हें भिक्षुकशाहीचें भूत आजवर आपल्या सत्तेची दमधाटी चालवित आलें आहे. वरपांगीं अध्ययन अध्यापनाची शेखी भिक्षुकशाही पुष्कळच मिरविते; परंतु शिक्षणाच्या प्रसाराला शक्य तितके अडथळे आणण्याची तिची खटपट नेहमींच जारी सुरूं असते. शिक्षणाच्या प्रसाराबद्दल लिहितांना किंवा बोलतांना, ' शाळाखात्यांत ब्राह्मण मास्तरांचाच भरणा इत्तर सर्व जातींपेक्षां जास्त आहे, अर्थात् बहुजनसमाजाचें शिक्षण हें अझून ब्राह्मणांच्याच हातीं आहे; ' असें एक विधान भिक्षुकशाही वारंवार करीत असते. परंतु प्रचलित शिक्षणाचें आणि तें देणाऱ्या मास्तरांच्या मास्तरकीचें पृथःकरण केलें तर धन्याला दूध देण्याकरितांच म्हैस फळते, या ग्राम्य परंतु समर्पक म्हणीचा दाखला कोणास पटणार नाहीं ? वास्तवीक स्थिति कशी आहे ती पहा. शिक्षणाचा प्रसार, बौद्धिक प्रगति व स्वतंत्र विचारांची चिकित्सा यांचें आणि या मुर्दाड भिक्षुकशाहीचें मोठें हाडवैर!

## आम्ही सांगूं, तुम्ही ऐका

ही या भिक्षुकशाहीची सनातन दण्डनीति. त्यांच्या पौराणिक चर्पटपंजरीवर कोणी शंका काढतां कमां नये. सर्व सद्‌गुणांतला मेरुमणी म्हणजे **अंधश्रद्धा** आणि तात्काळ नरकाला नेणारा दुर्गुण म्हणजे **शंका.** एवढ्या भांडवलावर भिक्षुकशाही आपल्या नाटकी वर्चस्वाचा संसार बिनधोक चालवित आहे. जेथें जेथें या भिक्षुकशाहीचें पाऊल पडलें किंवा बोट रुतलें, तेथें तेथें त्यांनीं मूढविश्वासाचें बीज पेरण्याची संधी मुळींच वांया जाऊं दिली नाहीं. त्यांनीं आजपर्यंत जर कांहीं मोठें शतकृत्य केलें असेल तर तें लोकांचीं मनें लंजूर करून त्यांच्या कल्पना भ्रष्ट व गढूळ करणें हेंच होय. या भिक्षुकशाहीच्या पुराणप्रवचनांनीं लाखों लोक-स्त्रिया व पुरुष-शुद्ध वेडेपीर बनल्याचे दाखले आहेत. दांभिकपणा हा भिक्षुकशाहीचा मोठा प्यारा सद्‌गुण आणि स्पष्टवक्तेपणा म्हणजे तात्काल नरकाचें साधन. जनतेनें भिक्षुकशाहीच्या दुष्ट कारस्थानांचा वेळींच धिःकार व प्रतिबंध न केल्यामुळें, मेणाच्या गोळीप्रमाणें त्यांनी लोकांचीं मनें गुलामवृत्तीच्या सांच्यांत जाम दडपून दडपून त्यांना आजला गुलामांपेक्षां गुलाम बनवून सोडलें आहे; आणि या गुलामांच्या परावलंबी व परप्रत्ययनेय स्थितीवरच भिक्षुकशाहीची गुंडगिरी आजपर्यंत बिनधोक चाललेली आहे.

* * * *

[९] एतद्देशीय व परदेशीय चिकित्सक संशोधकांनीं चर्तुदांपासून तों परवां निर्माण झालेल्या बोपदेवकृत ' व्यासोऽवाच ' भागवतापर्यंत सर्व ग्रंथांची छाननी करून त्यांच्या खरेखोटेपणाची पूर्ण चिकित्सा केल्यामुळें आमच्या पुराणमताभिमानी भिक्षुकशाहीच्या गुलामांच्या व्यापाराला जबरदस्त खो बसला आहे. तथापि त्यांच्या पायांच्या पुण्याईनें हिंदुसमाजाचा ७/८ भाग अझून बराच अशिक्षित असल्यामुळें, या ठिकाणीं नाहीं तर त्या ठिकाणीं, पुण्यास नाहीं तर साताऱ्यास, नाशिकास नाहीं तर पंढरपुरास, या समाजांत नाहीं तर त्या समाजांत, कोठेंतरी, जेथें विद्येचा, सारासार बुद्धीचा व चौकसपणाचा घातकी वारा वहात नसेल अशा निवांत प्रदेशांतल्या जडमूढ

लोकांत आपली भिक्षुकी गुलामगिरी पसरविण्याचा यांचा उद्योग जारीनें अव्याहत चालूंच आहे. पाश्चात्य विद्वानांनीं इकडे येऊन वेदोपनिषदादि संस्कृत ज्ञान-भांडाराच्या किल्ल्या भिक्षुकशाहीच्या हांतून हिसकावून घेऊन, त्यांतली ज्ञानसंपत्ति जर बंधमुक्त केली नसती, तर आजला तिचा पूर्ण विपर्यास-नव्हे, सत्यानाश होऊन,

## ब्राह्मण सांगतील ती पूर्वदिशा

असा भयंकर दुरावस्थेचा प्रसंग हिन्दु जनतेवर ओढवला असता. खरें म्हटलें तर बहुजनसमाजाची स्थिति वास्तविक सध्यांहि अशीच आहे आणि ती यावच्चंद्रदिवाकरो आहें तशीच रहावी, यासाठीं भिक्षुकशाहीचे शहाणेसुर्ते बृहस्पति रात्रंदिवस प्रयत्न करीत असतात. संस्कृत ज्ञानभंडाराचें गौप्य इंग्रज व जर्मन यवनांनीं प्रगट केल्यामुळें भिक्षुकशाहीच्या पोंकळ श्रेष्ठत्वाचा बोजवारा उडाला. तथापि अशाहि प्रसंगीं न डगमगतां त्यांनी पुराणांतल्या व्यासोवाच गप्पांच्या जोरावर आणि वेदोपनिषदादि ग्रंथावर स्वतःच्या भिक्षुकी मल्लीनाच्या लिहून युरपियन शोधकांच्या शोधांना खोडसाळ ठरविणारे अनेक विपर्यासपूर्ण ग्रंथ लिहून प्रसिद्ध करण्याचा एकसारखा सपाटा सुरूं ठेवलेला आहे. एकाला छू: करून दुसऱ्याला त्याच्या मागें लावण्यांत भिक्षुकशाही आधींच चांगली प्रख्या पावलेली; त्यांत अठराव्या शतकाच्या पूर्वार्धांत बर्बरदेशस्थ उर्फ परशुराम क्षेत्रस्थ चित्पावन समाज एनकेन प्रकारेण एकाकी त्यांच्यांत येऊन सामील होतांच, हिंदूंच्या राजकीय सामाजिक व धार्मिक क्षेत्रांत.

## भिक्षुकशाहीच्या ब्युरोक्रॅटीक लीला

न भूतो न भविष्यति धिंगाणा घालण्यास पूर्ण समर्थ झाल्या. या धिंगाण्यांचें पर्यवसान चित्पावनांनीं अत्यंत धूर्ततेनें व कुशलतेनें इतक्या थराला आणून भिडविलेलें आहे की त्यांच्यातील बऱ्याच मंडळींनीं भिक्षुकशाहीचा धाबळी पंचा झुगारून देऊन राष्ट्रीयत्वाची झकपक कल्हई जरी आपल्या सर्वांगावर सफाईत चढवून घेतली आहे, तरी त्यांच्या एकंदर राष्ट्रीय महात्म्याचा आत्मा शुद्ध भिक्षुकी ब्युरोक्रसीनेंच चैतन्यपूर्ण झालेला स्पष्ट दिसतो. या कंपूचीं जीं कांहीं ठाम मतें ठरलेलीं असतील, तींच सर्व लोकांनी निमूटपणें कांहींहि तक्रार न करितां मान्य केलींच पाहिजेत, अशी यांची

## पुणेरी हस्तिदंती दंडनीति

आहे. त्यांनी ज्यांना हरिभक्तिपरायण ठरविले ते ह. भ. प.; मग ते जरी शुक्रवार पेठेंत त्रिकाळ फेरफटका करणारे वारयोषितापारायण असले, तरी त्याबद्दल कोणी ब्रहि काढतां कामां नये. त्यांनी एखाद्याला देशभक्त ठरविल्याशिवाय तो दे. भ. असणें किंवा होणेंच शक्य नाहीं; मग जात्या तो कितीहि नीच दानतीचा आणि कवडीमोल अकलेचा असला तरी हरकत नाहीं. जसें क्रिस्ती होण्यासाठीं जारडन नदीच्या पाण्याचा ' कुरूस ' छातीवर व टाळक्यावर पाद्रीभटाच्या हातून काढवून घ्यावा लागतो, त्याप्रमाणें ज्याला देशभक्त व्हायचें असेल त्यानें पुण्याच्या राष्ट्रीय

शुक्रवार क्लबाच्या थालेपीठ भजांची दिक्षा घेऊन महिना पंधरा दिवस तेथील कचोपकचांची शागिर्दी केली कीं बस्स! तात्काळ तो दे. भ. बनतो. विद्वत्तेची, देशभक्तीची, सुधारणेची वगैरे सर्व गोष्टींचीं ताम्रपटें येथून मिळविल्याशिवाय जगांत-म्हणजे महाराष्ट्रांत-कोणीहि मानवाचा कारटा विद्वान्, देशभक्त, किंवा निष्काम कर्मयोगी निपजूंच शकायचा नाहीं, असा एक अलिखित कायदा ( unwritten law ) झाला आहे. या कायद्याला विरोध करून कोणीं आपलीं स्वतंत्र बाण्याचीं मतें प्रतिपादन करूं लागला तर त्याचे वाभाडे काढायला आमचे पुणेकर केसरी महाराजसुद्धां आपले सिंहाचें भाडोत्री कातडें व मुखवटा पार फेंकून देऊन, लूत लागून पिसाळलेल्या

## कुत्र्याप्रमाणें भुंकूं लागतात

मग त्यांच्या प्रभावळींतल्या पोसलेल्या गर्दभांच्या लाथादुगाण्यांचा खडखडाट आणि धडपडाट काय वर्णन करावा? स्वतःच्या हातांत दर्भाइतकीहि सत्ता नसतांना हें भिक्षुकशाहीचें पुणेरी भूत आपल्या राष्ट्रीय गुंडगिरीचा धिंगाणा घालतांना जर ढुंगणाचें सोडून डोक्याला गुंडाळायला कमी करीत नाहीं, तर उद्यां खऱ्यांखोट्या लोकशाहीच्या कौन्सिलांत यांच्या प्राबल्याची शीग जर उंचीवर चढली तर ते सर्वांच्या डोक्यांवर मिरें वांटून विसाव्या शतकात पुनश्च पेशवाई पाट्यावरवंट्याचा जीर्णोद्धार कशावरून करणार नाहींत, याची हमी कोणत्या विमा कंपनीनें घेतली आहे ? पुराणांच्या बंडाच्या धामधुमींतच निरनिराळ्या तीर्थांचा महिमा भिक्षुकशाहीनें पुकारून त्या त्या क्षेत्रांच्या ठिकाणीं आपल्या भिक्षुकी ऊर्फ बडवेगिरीच्या छावण्या थापल्या. तीर्थमहिम्यांचे आद्यकल्पक म्हटले म्हणजे काशीकर भिक्षुक होत. त्यांनीं गंगेच्या आणि काशीविश्वेश्वराच्या महात्म्याचें स्तोम **काशीखंड** नामक प्रचंड ग्रंथ प्रसवून माजविले ; या योजनेनें त्यांना बरीच किफायत मिळवून दिली. हें पहातांच गयामाहात्म्य, प्रयागमहात्म्य, नाशिक पंचवटी महात्म्य इत्यादि महात्म्य ग्रंथांच्या फलटणींचा पाठोपाठ सुळसुळाट उडाला आणि भीक मागण्यावर अवलंबून राहणाऱ्या भिक्षुकांच्या पायांशी घरबसल्या छिनाल लक्ष्मी लोटांगणें घालीत येऊं लागली. हा क्रम अझूनपर्यंत अप्रतिबंध चालला असून आणखींहि नवीन नवीन क्षेत्रें व त्यांचा महिमा रोज जन्माला येत आहेत. या सर्व धांगडधिंग्याचा जनतेच्या धर्मविषयक कल्पनांवर केवढा चमत्कारिक परिणाम झाला आहे तो पहा. गयेच्या गयावळानें

## तेरे पितर सरग भयो !

म्हटल्याशिवाय कोणत्याहि हिन्दूचा बाप स्वर्गाला सुखरूप पोहचत नाही. प्रयागास वेणीदान केल्याशिवाय पुढें येणाऱ्या अनंत जन्मांत नवरा बायकोच्या जोड्या कायमच्या ठरल्या जात नाहींत. नाशिकच्या कारट्यांच्या तोंडच्या मंत्राशिवाय आईबापाच्या नांवानें दिलेले पिंड खमंग बनत नाहींत व गोदावरींतल्या माशांनीं ते पिंड खाल्ल्याशिवाय आईबापांच्या पोटांत ते उतरत नाहींत. बाप मेला असतां गोदातटाकीच्या भिक्षुकी कसायीखान्यांत, नाशिकच्या न्हाव्याकडून

जन्मदात्या मातृदेवतेला भादरविण्याकरितां पाठविल्याशिवाय बाप मोक्षाला जात नाहीं ; किंवा पुत्र मेला असतां, त्याच्या तरण्याताठ्या पत्नीचा केशकलाप उतरवून, नाशिकच्या शूद्र न्हाव्यानें तिला एकांतात एकटी नेऊन बोडकी*केल्याशिवाय त्या हतभागिनीच्या सासऱ्याला आपल्या पुत्राच्या

## स्वर्गांतल्या रवानगीची पावती

मिळाल्यासारखें वाटत नाहीं. वर्णसंकर वर्णसंकर म्हणून बोंबाबोंब करणारे उच्च संस्कृतीचे हिन्दुलोक–विशेषतः स्वतःस धर्ममार्तण्ड समजणारे ब्राह्मणबुव–आठवड्यांतून एकवेळ आपल्या जातींतील विधवांना शूद्र व अपरिचित न्हाव्यांशीं एकांत करण्याची बिनतक्रार परवानगी देतात, भिक्षुकशाहींचें क्षेत्रमहात्म्यं ब्रह्मदेवाच्या बापाला सुद्धां खचित उलगडणार नाहीं. चातुर्मासात किंवा सिंहस्थांत अखिल हिंदुस्थानांतल्या कोणत्याहि जमिनीवर जरी विवाहसंस्कार करण्याची परवानगी अगर सवलत भिक्षुकशाहीनें हिन्दु लोकांना ठेवलेली नाहीं, तरी तें त्याच हंगामांत खुशाल क्षेत्राच्या ठिकाणीं करण्यास भिक्षुकी धर्मशास्त्रानें पूर्ण मुभा ठेविली आहे. शिवाय हीं क्षेत्रें म्हटली म्हणजें कसलींहि

## पातकें धुणाऱ्या धोब्यांच्या भट्ट्या

आहेत. नाशिकच्या पंचवटीचें महात्म्य शिवपुराणांत जेहत्ते काय सांगितले आहे.

आजन्ममरणाभ्यासात् वाराणस्यां तु यत्फलम् ।
तत्फलं निमिषार्धेन पंचवट्यां निवासिनः ।।

यंवरे यंव ! कशी केली काशीच्या भिक्षीकशाहीवर नाशिकच्या कारटेशाहीनें मात ! जन्मभर काशींत राहिल्यानें जें पुण्य मिळतें, तेंच पुण्य नाशिकच्या पंचवटींत एका निमिषार्धात १/१०० सेकंड वास्तव्य केल्यानें प्राप्त होतें. पहा, पापपुण्याच्या बाजारांत भिक्षुकशाहीची कशी चढाओढ चाललेली असते ती पाहून घ्या, साम्राज्यपदापासून तों गटारें झाडणाऱ्या झाडूपर्यंतचे वाटेल त्या दर्जाचें ऐश्वर्य घरबसल्या कामधेनू ताईत विकून प्राप्त करून देणारे अथणी संकेश्वराचे ब्रह्मदेवाचे बाप, आंजर्ले मुर्डीचे ' मी खरा कृष्णशास्त्री ' म्हणणारे भांडकुदळ धन्वंतरी, किंवा निपाणीच्या गटारांतून मलेरियाच्या जंतूप्रमाणें दरदिवशीं शेंकड्यांनीं निर्माण होणारे द्राक्षार्कमधुवाले, जसे एकमेकांना गाढव चोर लुच्चे म्हणून आपल्या मालाच्या जाहिराती देत असतात ; किंवा मागें हाजी कासम आणि किलिक निक्सनच्या कोंकणपट्टीला जाणाऱ्या

---

* हा शब्द काढून टांकण्याबद्दल आमच्या एका मित्रानें सूचना केली होती; परंतु ती अत्यंत नाखुषीनें आम्ही अमान्य केली. परपुरुषस्पर्शाबद्दल आमच्या हिंदु ललनांवर अत्यंत तीक्ष्ण कटाक्ष ठेवणारे सोज्वल व उच्च संस्कृतीचे म्हणविणारे हिंदु बांधव त्याच दुर्दैवी आया बहिणी सुना कन्यांचा पति सृष्टिक्रमानुसार मरण पावतांच, सारासार विचार आणि लाजलज्जेची फारकत करून, त्यांना आमरण दर आठवड्यास शूद्र न्हाव्याशीं एकांतांत किळसवाण्या स्थितींत बसविण्याचा अवैदिक धर्मसोहळा सुरूं करण्यास जर शरमत नाहींत, किंवा स्वतःची स्मश्रु उरकिल्यानंतर त्याच न्हाव्याला ' मागल्या दारीं जा ' म्हणून सांगण्यांत खंति बाळगीत नाहींत. तर आम्हीं नुसता ' बोडकी ' शब्द उपयोगांत आणल्यानें त्याच शहाण्या हिंदूंच्या मनाला एवढा जबरदस्त धक्का कां बरें बसावा ? बस्स ! पुरे करा हा शब्दांच्या मृदुलतेचा नाटकी फार्स !

बोटीबोटींत चुरशीचा सामना लागल्यावर प्रवाशांना फुकट तिकिटें देऊन आणखी वर चणेकुरमुरे शेंवगाठ्या भजीचिवडा देण्याची एकमेक सरशी करीत होते ; त्याच मासल्याची ही

## क्षेत्रस्थ भिक्षुकशाहीची चढाओढ

नव्हे काय ? साबरमतीचें महात्म्य तर याहून जास्त सवलतीचें आहे. '' काश्यां माघे च यत्पुण्यं सर्व तीर्थेषु यत्फलम् । तत्फलं समवाप्नोति सात्रमत्यांवगाहनात् ॥ '' गंगा महात्म्यांतील धोब्याची भट्टी तर याहून फारच थोड्या श्रमानें पातकांचा मळ धुवून टांकते.

गंगा गंगेति यैर्नाम योजनानां शतैरपि ।
स्थितैरुच्चरितं हन्ति पापं जन्मत्रयाऽर्जितम् ॥
गंगा गंगेति यो ब्रुयात् योजनानां शतैरपि ।
मुच्यते सर्व पापेभ्यो विष्णुलोकं स गच्छति ॥

**अर्थः**–गंगा गंगा असे शंभर योजनांवरून जरी नाम उच्चारलें तरी तीन जन्मांची पातकें नाश पावतात. गंगा गंगा असा चारशें कोसांवरून नामोच्चार केला तरी तो प्राणी सर्व पापांपासून मुक्त होऊन विष्णुलोकाप्रत जेहत्ते जातो. कां ? किती झटपट धोब्याचा कारखाना भिक्षुकशाहीनें काढला ! याच्यापुढें गीतेंतील कर्मवाद काय रडणार ? याशिवाय भस्ममहात्म्य, रुद्राक्षमहात्म्य, बिल्वमहात्म्य, गोपिचंदनमहात्म्य इ. खंडोगणती महात्म्यांच्या पातकें धुणाऱ्या भट्ट्या भट्टांनीं आपल्या सुपीक मेंदूंतून निर्माण केलेल्या आहेत. परंतु, कै. लोकहितवादी म्हणतात (स्वाध्याय पृ. १२१) '' अशा तीर्थयात्रांदिकेंकरून कसाहि पापी पुरुष शुद्ध होण्याच्या ज्या त्या त्या तीर्थांच्या व क्षेत्रांच्या महात्म्यांत प्रतिज्ञा गाइलेल्या आहेत, त्याप्रमाणें कोणीहि

## पश्चातापी बाटलेल्यास शुद्ध करून

आपल्या ज्ञातींत घेत नाहींत, किंवा अन्यजातीयांस हिन्दु करीत नाहींत* आणि तसेच, पुनर्विवाहास शास्त्राधार असतां हट्टवादीपणानें व धरसोडीनें अनाथ अबलांस वैधव्यात ठेवतात. '' खरें. अगदी अक्षरक्षः खरें. परंतु हीं जीं पापविमोचनांची सोंगेंढोंगें भिक्षुकशाहीनें काढलीं, तीं पापविमोचनांच्या उदात्त हेतूंनीं मुळीच नसून, तीं आपल्या क्षेत्रांची व ब्राह्मणजातीचीं महात्म्यें वाढविण्यासाठींच काढलेलीं आहेत, हें मुख्य लक्षांत ठेविलें पाहिजे. नुसते काशी नाशीकच्या गंगेंत बुचकळी मारल्यानें, भस्माचे पट्टे व गोपीचंदनाचे टिळे लावल्यानें, गंगा गंगा काशी काशी असा नुसता नामोच्चार केल्यानें किंवा

## न्हाव्याकडून विधवांच्या हजामती

करविल्यानें पातकें जर भस्म होतीं, तर आजला तीच क्षेत्रांचीं ठिकाणें कुंठणखाने बनून तेथले ब्राह्मण अनीतीचे दुर्वर्तनाचे व नानाविध व्यसनांचे पुतळे बनलेले कां दिसले असते ? चिळसालाही चिळस आणणारी ही दुस्थिति उघड्या डोळ्यांनी धडधडीत पहात असूनसुद्धां

* सन १८८० सालचे लोकहितवादींचे हे उद्‌गार आणि अलीकडची हिन्दु मिशनरी चळवळ यांतील कार्यकारणभावाकडे वाचकांचें लक्ष असावें.

आमच्यांतल्या शहाण्यासुर्त्या सुशिक्षितांना भिक्षुकशाहीबद्दल कांहींच खंत येऊं नये, हें कशाचें लक्षण ? भिक्षुकशाहीची पुण्याई कां सुशिक्षितांचे अज्ञान ? बिचाऱ्या अजाण जनसमूहाची गोष्ट एक असो. बौद्धिक गुलामगिरींत खितपत पडलेली गरीब बिचारी जनता शेंदूर माखलेल्या दगडधोंड्यांपुढें हीनदीन स्थितींत लोटांगणें घालायला जर सोडीत नाहीं, तर या धाबळी पांघरणाऱ्या, भस्मगंधाचे पट्टे ओढणाऱ्या अक्षरशून्य ब्रह्मसंमंधांच्या पायांवर कपाळें घासून

**माझ्या बापाला मुक्तीला पाठवा हो !**

म्हणून त्यांनी त्यांची काकुळतीनें याचना केल्यास, त्यांत मुळींच आश्चर्य नाहीं. ही दुःसह परिस्थिति पाहिली म्हणजें असें वाटूं लागतें कीं आचारविचारांत भयंकर क्रान्ति होऊन तिच्या धुमश्चक्रीच्या वादळांत आधणांतल्या बटाट्याप्रमाणें ही पृथ्वी जरी अखंड कोलमडत राहिली तरी पत्करली, परंतु विचारशून्य आंधळ्या श्रद्धेची ही स्मशानशांतता नको ! गेल्या चारपांचशे वर्षांचा खुद्द महाराष्ट्रांतील ब्राह्मणेत्तर हिंदु समाजांचा सामाजिक इतिहास किंचित् लक्षपूर्वक पाहिला तर सारासार विचार करून आपले नैतिक बळ वाढविण्याचा प्रामाणिक प्रयत्न करण्यांऐवजीं ज्याची त्याची उडी स्वतःचें नांक कांपून दुसऱ्यास अपशकून करणाऱ्या

**ब्राह्मणांच्या ब्राह्मण्याची नक्कल**

करण्याकडे फार! ब्राह्मण्यांनीं सोंवळ्या ओंवळ्याचें बंड माजविलें, लागले हे त्यांची नक्कल करायला. ब्राह्मण अर्थशून्य मंत्रजागरांचा कोलाहल करूं लागले, केली यांनी सुरुवात तसल्याच अर्थशून्य शंखध्वनीला. ब्राह्मणांनी विधवाविवाह बंद केले, यांनी बंद केले. विधवांना नवऱ्याच्या प्रेताबरोबर जिवंत जाळायच्या, होय जाळायच्या. केली सुरुवात. विधवांना सकेशा न ठेवतां विकेशा करण्याची पद्धत ब्राह्मणांनीं पाडली, लागले हे तोच राक्षसी प्रकार आपल्या समाजांत प्रसार करायला, आणि हें एवढें कशासाठी? तर ब्राह्मणांइतकेच उच्च संस्कृतीचे लोक आह्मी आहोंत हें जगांत दाखविण्यासाठी.* यांत वैदिक हिंदु धर्माचरणाचा उत्साह तिळमात्र नसून नुसत्या वरपांगी मिरविता येणाऱ्या संस्कृतीच्या कोरड्या झकाकीसाठी ही सारी चढाओढ आहे, हें कोणालाहि दिसून येईल. आपापल्या समाजाची विशिष्ट संस्कृतीची परंपरा एका बाजूस ठेवून दुसऱ्याच्या बाह्य वर्तनाची नुसती नक्कल करतांना हां गेलें हूं गेलें असें होऊन हातीं धुपाटणें आलें आहे. ह्मणजे प्राचीन परंपरा आचारहीनत्वामुळें नष्ट झाली आणि ब्राह्मण्यांचा बाह्य अनुकरणामुळें त्याच्या अंतरंगाचाही ठाव हातीं लागला नाहीं! त्यामुळें या नहिन्दुर्नयवनांचा सारा जोम आतां शाब्दिक फुशारक्यांपलीकडे कशांतही उरलेला नाहीं. ब्राह्मण्याची वरपांगी नक्कल करण्यांत बेसुमार भडकलेल्या एखाद्या महाराष्ट्रीय समाजाचें उदाहरण पहावयाचें असल्यास वाचकांनी चांद्रसेनीय कायस्थ प्रभू समाजाची जुनी पिढी अवश्य पहावी. नवीन पिढी बरीचशी शुद्धीवर आली आहे. अनुकरणप्रवृत्ति ही गुलामांची निशाणी आहे आणि विचार व

---

* नमूद करण्यास आनंद वाटतो कीं ही ब्राम्हण्याची कोरडी नक्कल करण्याची क्षुद्र प्रवृत्ति क्षत्रिय मराठ्यांनीं आजपर्यंत केव्हांहि उचलली नाहीं, हें मोठें अभिनंदनीय कृत्य होय. विशेषतः सप्तकुळी आणि शाण्णव कुळीच्या जातीवंत मराठ्यांच्या खासगी वर्तनांत प्राचीन रजपुती रीतीभातींचेंच प्राबल्य अझून विशेष दिसून येतें, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

आचार-स्वातंत्र्य हें समाजाच्या किंवा व्यक्तींच्या जिवंतपणाचें लक्षण आहे. चालू मन्वंतरांत ब्राह्मण सदरांत मोडणाऱ्या समाजांशीं स्पर्धा करणाऱ्या ब्राह्मणेतरांनीं प्रथम ही गुलामगिरीची अनुकरणप्रवृत्ति साफ धुवून टांकून 'आपण आपणांसी ओळखावें या नांव ज्ञान' तें प्राप्त करून घेण्याची खटपट केल्यास, शुष्क वादविवादांच्या दगडी तटांवर व्यर्थ टाळकीं हापटून घेण्याचा अतिप्रसंग अज्जीबात टळेल.

* * * *

(१०) ऋगवेद काळापासून हिन्दुस्थानचा इतिहास पाहिला तर जेव्हां जेव्हां ब्राह्मण आणि (सर्व ब्राम्हणेतरांच्या वतीनें) क्षत्रिय यांचे झगडे लागत, आणि क्षत्रियांच्या जगविख्यात पराक्रमानें भिक्षुकशाही नेस्तानाबूद होत असे, निदान क्षत्रियांच्या नजरेच्या जरबेनें योग्य मर्यादेंत रहात असे, तेव्हां तेव्हांच या देशाच्या भाग्यसागराला अपरंपार भरती आलेली आहे; आणि ज्या ज्या काळीं भिक्षुकशाहीचा वरपगडा झाला त्या त्या काळीं हिन्दुस्थानच्या सामाजिक धार्मिक व राष्ट्रीय वैभवाला पूर्ण ओहटी लागून तें रेताड वाळवंटाप्रमाणें भयाण व ओसाड बनल्याचे फोटोग्राफ इतिहासांत स्पष्ट उमटलेले आहेत. ' ईश्वरस्सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ' असली व्यापक व उदात्त भावना भिक्षुकशाहीनें एकदांहि व्यक्त केल्याचें आढळत नाहीं. क्षत्रियांनी लिहिलेले उपनिषत्‌ग्रंथ पहा आणि भिक्षुकशाहीनें लिहिलेलीं पुराणांची पातडीं पहा, म्हणजे याचा उलगाडा तेव्हांच होईल. भिक्षुकशाहीचा ट्रेडमार्क म्हटला कीं हृदयाचा संकुचितपणा, मनाचा कोतेपणा आणि प्रवृत्तीचा नीचपणा यांचेंच त्यांत प्राबल्य फार. यामुळें भिक्षुकशाहीच्या कोणत्याहि वंशात ईश्वरानें आजपर्यंत कधिंहि अवतार घेतलेला नाहीं. इतकेच नव्हे तर कलियुगाचा शेवटला अंक संपून त्याचा ' ड्रॉप ' पडल्यावर, पुनश्च सत्ययुगाचा नवीन प्रारंभ करण्याचा मान **मरु** आणि **देवापि** या दोन क्षत्रिय तपस्व्यांसच मिळणार आहे, आणि त्याकरितां ते कलाप नांवाच्या ग्रामांत तपश्चर्या करीत बसले आहेत, अशी पुराणांत हकीकत सांपडते. या नवीन युगाच्या ' ओपनिंग सेरेमनी ' चा मान ब्राह्मणी पुराणेंसुद्धां एकाद्या ब्राह्मणांस कां देऊं शकलीं नाहीत बरें ? आधीं मुळीं दशावताराची कल्पना अज्जीबात खोटी असून ; या उनाड कन्येला जन्म देण्याचें उनाड कृत्य ब्राह्मणी पुराणांनीच केलेलें आहे. ऋग्वेद उपनिषदें किंवा महाभारत यांत दशावतारांचा कांहीही उल्लेख नाहीं. ब्राह्मण्याचें अवास्तव स्तोम माजविणाऱ्या नाटकी पुराणांनीं त्यांत

## वामन आणि परशुराम

हे दोन काल्पनीक ब्राह्मणी अवतार मुद्दाम घुसडून दिलेले आहेत आणि आतां नुकतेंच भिक्षुकशाही पुङ्ग्यांतल्या एका कवीनें अकरावा अवतार सुद्धां आपल्या मेंदुंतून प्रसविण्याचें भिक्षुकी धाडस केलेलें आहे. परंतु, भिक्षुकशाहीनें फैलावलेल्या पौराणिक कादंबऱ्या क्षणभर टांचेखालीं दडपून धरून, इतिहासाच्या स्वच्छ दुर्बिणींतून गेल्या चार हजार वर्षांचा काळ पहा कीं आजपर्यंत

धर्मस्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार ।।

जर कोणत्या वर्गांत निर्माण झाले असतील तर क्षत्रियांतच अणि परमेश्वरानें क्षत्रियांशिवाय इतर कोणत्याहि समाजांत कधींही अवतार घेतलेला नाहीं, हेंच आपल्या दृष्टींस पडेल. वर्तमान भिक्षुकशाही मोठ्या अट्टाहासानें म्हणत असते कीं सध्यां हिन्दुस्थान निःक्षत्रिय झालें आहे; ही गोष्ट जरी खरी असेल, तर साधूंच्या परित्राणासाठीं, दुष्कृताच्या विनाशासाठीं आणि धर्माच्या संस्थापनेसाठीं हिंदुस्थानांत या उप्पर ईश्वराचा अवतार होणेंच शक्य नाहीं, हें त्यांनीं लक्षांत ठेवावें. आजपर्यंत साधूंचा परित्राण, दुष्कृताचा विनाश आणि ' पृथिव्यां सर्व मानवाः' ला विळखा घालून त्यांना विश्वात्मैक्य भावाच्या एकछत्री साम्राज्याखालीं आणणारी धर्मसंस्थापना क्षत्रीय वीरांनींच केलेली आहे. भिक्षुकशाहीनें जर कांहीं केलेंच असेल तर आपल्या इतिहासप्रसिद्ध संकुचित व क्षुद्र हृदयाच्या खाणींतून

## पंथभेदाचे दगडी कोळसे

मात्र मनमुराद उकरून काढलेले आहेत. धर्मस्थापना करावी ज्ञातिपुत्र महावीर जिनानें; धर्मस्थापना करावी शाक्य बुद्धानें; आदक्षिणोत्तरध्रुव धर्माचा प्रसार करावा क्षत्रिय सम्राट अशोकानें आणि आमच्या अर्वाचीन स्वामी विवेकानंदानें; धर्मरहस्याच्या नवनीताचे गोळेच्या गोळे चहूंकडे फेंकून मानवी संसार- चक्रांतील करकर बंद पाडून जनतेच्या तप्त हृदयाला गारीगार करण्याची पुण्य कामगिरी करावी श्रीमद्रामकृष्ण परमहंसांनीं. भिक्षुकशाहीच्या कर्णधार आद्यशंकराचार्यानीं काय केलें? तर भिक्षुकशाहीची तळी उचलून धरणारा एक पंथ निर्माण केला; त्या पंथाच्या संन्याशी धर्मानें हिंदुस्थानच्या राष्ट्रीय जीवनाची नौका अखेर निराशावादाच्या खडकावर नेऊन कशी हापटली, तें आजची परिस्थितीच सांगत आहे. धार्मिक काय सामाजिक काय किंवा राजकीय काय, कोणतीहि सत्ता भिक्षुकशाहीच्या हातीं गेली पुरें कीं तींत अनुदारपणाच्या किडयांचा बुजबुजाट झालाच म्हणून समजावा. काय म्हणे, ब्रह्म जाणे तो ब्राह्मण! ! पण आजपर्यंत कोणत्या ब्राह्मणानें आत्मज्ञानाच्या जोरावर ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेतलें, त्याचा विश्वसनीय दाखला तर कोठेंच मिळत नाहीं; उलट एवढे मोठे

## ब्रह्मदेवाच्या तोंडातून पडलेले ब्राह्मण

पण त्यांना अध्यात्म विद्येचा गुरुपदेश क्षत्रीयांच्या *पायाचें तीर्थ पिऊन पिऊनच प्राप्त करून घ्यावा लागला. एखाद्या इरसाल पतिव्रतेप्रमाणें ज्या आध्यात्म विद्येनें क्षत्रियांचें वामांक सोडून

---

*The Warrior class had evidently from a very early time produced a number of independent thinkers who were able to grapple with and to hold their own against the prieste, nay, who were superior to them in one subject, namely, in their knowledge of the Atman, the Self. (p. 14) ............ The Kshatriyas never surrendered their right to take part in the discussions of the great problems of life and death, and they occasionally asserted it with great force and dignity. (p. 10) " Indian Philosophy "—Max Muller.

भिक्षुकशाहीकडे प्रसन्नतेचा एकादा कृपाकटाक्ष कधिं चुकून सुद्धां टांकला नाहीं, त्या भिक्षुकशाहींनें मानव आणि देव यांच्यांमध्यें अडत्येगिरीचा सनदशीरपणा मिरवावा, हें चमत्कारीक नव्हे काय ?

* * * *

(११) आंगीमासीं खिळलेल्या कारस्थानी वृत्तीच्या जोरावर ज्या वेळीं भिक्षुकशाहीला उच्चीचे ग्रह आले आणि आपल्या ब्राह्मण्याचें फाजील स्तोम माजविण्यासाठी त्यांनीं (१) वैशंपायनाच्या भारतांत भिक्षुकी मताचा उकीरडा ठेंचून भरून त्याचें ' महाभारत 'बनविलें; (२) मनु याज्ञवल्क्य पराशरादिकांच्या नांवाच्या शेंदरांनीं निरनिराळ्या स्मृत्यांना देवकळा आणली; (३) व्यासाच्या गळ्यांत भागवताची धोंड बांधली; आणि (४) ब्राह्मणेतरांना-विशेषतः क्षत्रियांना-पाण्यापेक्षां पातळ करण्यासाठीं पुराणांची गिरणी सुरू केली, त्यावेळच्या या सर्व

## भिक्षुकी बायबलांचे पारायण

*करून त्यांतली प्रत्येक गोष्ट अगदी अक्षरशः खरी मानली तरीसुद्धां त्यांत काय तत्वांश निघतो हें या कलमात आपण त्रोटक रीतींने पाहूं. भिक्षुकशाहीची सर्व मदार पुराणांवर आणि मनू यज्ञवल्क्याच्या नांवाखालीं विकल्या जाणाऱ्या स्मृती नामक पातड्यांवर. ' पुराणे म्हणजे शिमगा ' असें कोणीं म्हटलें पुरे कीं आमचे राजकारणकर्तेसुद्धां त्याच्या नांवानें शिमगा करूं लागतात आणि लोकसंग्रहकार व्यासाला यरवड्याच्या मैदानांत फांसावर चढवून त्याच्याजागीं 'पिऱ्या म्हारा ' ची स्थापना करतात. पुराणें हीं ब्राह्मणांनीं लिहिलेली आहेत आणि या ब्राह्मणबुवांना आदर वाटणें अंगदीं स्वभावसिद्ध आहे; त्यावर कोणाचीच हरकत नाहीं. आतां त्या पूज्य ब्राह्मण-पुराणकारांबध्दल ब्राह्मणपूर्वजांच्या यादींत स्वतःची अक्कल पूज्यत्वास पोचलेल्या वंशजांनीं व्यासाच्या ऐवजीं पिऱ्या म्हाराची योजना केली, तर त्याबद्दल ब्राम्हणेतरांना सुहेर सुतकाचे सव्यापसव्य कांहींच नाहीं. मात्र, स्वतःच्या पूर्वजांना वार्षिक पिंड तीलोदक देतांना, मध्यंतरी

## पिऱ्या म्हाराची स्वारी

लोकसंग्रहाचा पुरावा घेऊन तर्पणोदकाच्या घुटक्यासाठीं आ पसरून आली, तर मात्र ब्राह्मणब्रुवांनाच गोमुत्राच्या गाडग्यामागें आश्रय घेण्याचा अनावस्था प्रसंग येईल, त्याचा

---

*The brahmans who compiled the Sanekrit account (of the puranas) could and did fabricate passages portraying the evils of the Kali Age. Dynasties of the Kali Age. p. ziz. Int.

(2) The Mahabharat, Ramayan and the Puranas...... must beused with caution.
*Ancient India, by Rapson. p. 70.*

(3) There can be no doubt that, originally at least the ancient epice belonged rather to the Kshatriyas than to the brahmans ...... Their religion is that of the kingly caste...... At a later date, when the supremacy of the Brahman caste was firmly established, no doubt a more definitely religious tone was given to the epics.
*Ditto. p. 78*

बंदोबस्त त्यांनीं केला पाहिजे. आजची स्थिति अशी आहे कीं पुराणें म्हणजे भिक्षुकशाहीचा देह व मनस्मृति तिचा आत्मा ! भिक्षुकशाही व पुराणें यांची ताटातूट करण्याची आमची इच्छा नाहीं; इतकेंच नव्हे तर, पुराणांबद्दलचें आमचें मत अगदीं दूर झुगारून देऊन, पुराणांच्याच दुर्बिणींतून भिक्षुकशाही कशी दिसते. हें पहाण्याचा पुढें यत्न करणार आहोंत, ज्या पुराणांचा मूळ उद्देशच ब्राह्मणांची व त्यांच्या ब्राह्मण्याची तळी शिकस्त तितकी उंच उचलून धरायची, त्या पुराणांच्या अस्सल आधारानेंच भिक्षुकशाहीच्या अगदीं मुळाला हात घातला,तर त्यांत भिक्षुकशाहीच्या प्रवर्तकांस राग येण्याचें कांहीं कारण नाहीं. तुमचेच पुरावे आणि तुमचीच परिक्षा. अर्थात् ऐतिहासीक संशोधनानें निश्चित केलेलें पुराणांचें खरे स्वरूप आपण अगदीं विसरून जाऊन, पुराणें आहेत तशींच खरीं धरून चालावयाचें आहे. पुराणें म्हणजे भिक्षुकशाहीच्या त्राह्मणी कादंबऱ्या, ही गोष्ट सध्यां मुळींच विचारांत घ्यायची नाहीं. पुराणांत जेहत्ते काय सांगितलें आहे कीं फार प्राचीन काळीं या पृथ्वीवर बली नावाचा एक अतुल पराक्रमी, सर्वगुणविद्यासंपन्न असा क्षत्रिय राजा होता. त्याच्या पराक्रमाचा शह प्रत्यक्ष इंद्राला लागला. त्यानें श्रीविष्णूची प्रार्थना करुन बलीच्या शताश्वमेधांत विघ्न आणण्याची विनंती केली; कारण मली स्वतःस त्रिभावनाचा सम्राट मानून, शताश्वमेधानें खुद्द इंद्रालाहि नेस्तनाबूद करून त्याचें सिंहासन घेणार होता. त्याचें ९९ मेध पूर्ण होऊन १०० व्याला सुरुवात झाली होती. तोंच श्रीविष्णू

## ब्राह्मण बटूचें सोंग घेऊन

बलीच्या यज्ञमंडपांत त्याच्या शताश्वमेधाचा संकल्प हाणून पाडण्यासाठीं येऊन दाखल झाला. [ श्रीविष्णूनें ' ब्राह्मणाचें रूप घेतले ' यावरून तो स्वतः **ब्राह्मण-गुणकर्मतः किंवा जन्मतः-नव्हता असें दिसतें ; त्याचप्रमाणें क्षत्रियांच्या धार्मिक किंवा राजकीय श्रेष्ठत्वाचा खून पाडण्यासाठीं भिक्षुकशाहीचा ब्राह्मणच काय तो वाकबगार,** ही गोष्ट देवांनासुद्धां फार प्राचीन काळापासून माहीत होती.] हा वामन बटु अगदीं बुटका व आंखूड पावलांचा मोहक चेहऱ्याचा व सुकुमार देहाचा होता. [कारस्थानी प्राण्यांचीं शरीरें अशींच मोहक व सूक्ष्म असतात.] अतिताभ्यागतास निरीच्छ करून सोडण्यांत क्षत्रियांचा बाणा पुराणप्रसिद्धच आहे, त्यांत बलीनें यज्ञदीक्षा घेतलेली मग तो या वामनबटूला निरीच्छ केल्याशिवाय थोडाच सोडणार ? ' हे ब्राह्मणा, तुझी काय इच्छा असेल ती सांग, मी ती सर्वस्वीं पूर्ण करीन;' असें बलींने विचारतांच वामनबटूनें एक अगदी क्षुल्लक दिसणारी देणगी.

## ' माझ्या तीन पावलांइतकी जमीन दे '

मागितली. [**अरेरे ! काय ही पोंचट मागणी ! लक्ष्मी प्रसन्न झाली आणि मागितलें काय ? तर मला सोन्याचा सल्ला दे. बलीसारख्या सम्राटापाशीं काय आंखुढ तीन पावलांइतकी जमीन मागायची ? पण ब्राह्मणाचें मागणें असेंच कांहींतरी क्षुल्लक आणि विचित्र असायचें. पण सल्ला मागण्यांतच दात्याच्या सर्वस्वावर हल्ला करून डल्ला मारण्याची भिक्षुकी लीला आतां जशी सर्वांच्या पूर्ण परिचयाची झालेली आहे, तशी ती श्रीविष्णूलाहि चांगलीच परिचित होती ; म्हणून त्यानें आपली ब्राह्मणी वेषाची भूमिका वठवितांना तीन पावलांइतकी जमीन**

मागितली, श्रीविष्णूला नटनायक म्हणण्याची सुरूवात याच प्रसंगामुळें तर झाली नसेल ना ? केसरीचे संपादक व मराठेशाहीचे शतसांवत्सरीक श्राद्ध घालणारे पुरोहित श्रीयुत नरसोपंत केळकर यानी ज्यांना ' चित्पावन राजे ' असें नुकतेंच आपल्या केसरींत झटलें, त्यांच्या पूर्वजानें छत्रपति शाहूमहाराजाजवळ ' केवळ छत्रपतीच्या जोड्याची सेवा 'च मागितली ; पण अखेर या चित्पावन राजांनी (?) छत्रपतीच्या वंशजांना जोडे मारमारून सातारच्या सिंहासनावरुन कसे अलगज उखडून टांकले, तें इतिहासप्रसिद्धच आहे. भटाला दिली ओसरी आणि भट हातपाय पसरी या सार्थ ह्मणीचें अन्वर्थक प्रत्यंतर ह्मणजेच केसरीच्या ' चित्पावन राजांचा इतिहास ' होय.]

वामनाची मागणी ऐकून बलीला हसूं आलें असेल ; कदाचित आश्चर्यहि वाटले असेल. त्यानें या वेषधारी ब्राह्मण बटूची मागणी मान्य करतांच वामनानें आपला देह आक्राळविक्राळ वाढविला आणि एका पावलानें पृथ्वी व दुसऱ्यानें स्वर्ग व्यापून

## तिसरें पाऊल कोठें ठेऊं बोल ?

म्हणून बलीला डुरकणी फोडून विचारिलें. बलीनें तात्काळ आपलें मस्तक पुढें करून म्हटलें ' येथें ठेव.' तात्काळ बलीच्या मस्तकावर वामनानें पाय ठेऊन त्याला पाताळांत चिणलें. झाली. कथा संपली. या गोष्टीचें तात्पर्य काय ? म्हणून भिक्षुकशाहीच्या पुराणिकबुवास विचारलें तर तो ब्राह्मणांच्या सामर्थ्यावर केवढी तरी मैलभर मल्लीनाथी झोडील. ही कथा आहे तशीच गृहीत धरली तरी त्यांत ब्राह्मण्याची प्रौढी कोणत्या मुद्याच्या कोपऱ्यांत लपून बसली आहे ती काहीं दिसत नाही. वामनानें बलीला पाताळांत दडपून काय मोठा पुरूषार्थ साधला हां त्यानें बलीच्या सिंहासनावर स्वतः बसून पृथ्वीचें राज्य चालविलें असतें, तर तें कांहींतरी स्तुत्य झालें असतें. पण असें कांही त्यानें न करितां, उलट पाताळलोकी वामनानें आपण होऊन

## बळीच्या दारांशीं द्वारपाळगिरी

करण्याचें काम पत्करलें, काय ? क्षत्रियांच्या दरवाज्यांतले जोडे आणि पायतणें संभाळण्याकरितांच श्रीविष्णूनें एवढा मोठा वामनावताराचा ब्राह्मणी खटाटोप केला ! नुसत्या द्वारपाळाची नोकरीच या ब्राह्मणबटूला पाहिजे होती, तर साध्या लंगोटीइतक्या चिटोऱ्यावरच्या अर्जानें किंवा तोंडीं विनंतीनें काय बळीनें ती त्याला दिली नसती ? वामनावताराचें रहस्य आहे कशांत हेंच मुळीं समजत नाही. यांत ब्राह्मण्याची थोरवी तर सिद्ध होत नाहींच नाही, पण उलट त्यांच्या बेअक्कलपणाचा दाखला मात्र पटतो. दोन पावलांत पृथ्वी आणि स्वर्ग व्यापून टाकल्यावर तिसऱ्या पावलासाठी जागा देण्याची बलीला अडचण पडेल, ही वामनाची भिक्षुकी अटकळ बलीनें

## ठेव माझ्या मस्तकावर पाय

म्हणतांच जागच्याजागीं चीत झाली. क्षत्रियांच्या जगप्रसिद्ध उदारमनस्कतेनें भिक्षुकशाहीच्या कारस्थानी संकुचित वृत्तीला ठेंचून काढलें आणि लाथेच्या टांचेनें बळीला पातळांत दडपितांच

ईश्वरावतार वामनला त्याच पातळांत स्वतःला कायमच्या गुलामगिरींत जखडून पडावें लागलें. बरें, ईश्वर अवतार घेतो केव्हां? आणि कशाला ? परित्रणाय साधूनाम् विनाशायच दुष्कृताम् । धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।। यांपैकी कोणत्या महत्कृत्यासाठी देवानें हा वामनाचा ब्राह्मणी अवतार घेतला ? बली हा जुलमी राजा (tryant) होता, त्यानें प्रजेचा छळ मांडला होता किंवा तो अधर्मी होता, असें एकहि पुराण सांगत नाहीं. उलट पक्षीं त्यांच्या सर्वगुणसंपन्नतेचीच वाखणणी सर्वत्र केलेली आढळते. फार काय पण ज्यावेळी श्रीविष्णूनें–वामनरूपानें प्रगट झाल्यावर–आपल्या चतुर्भजांतल्या आयुधांना ' जा बलीचा नाश करा ' असा हुकूम फर्मावला, तेव्हां त्यांनीसुद्धां ' हें कृत्य केव्हांहि आम्ही करणार नाहीं व तें शक्यहि नाहीं ' असा खडखडीत जवाब दिला. इतकेंच नव्हे, तर हजारों वर्षे झाली तरी आजदिनतागायत प्रत्येक वार्षिक दिवाळीच्या प्रतिपदेच्या दिवशीं '

## इडापिडा टळो आणि बळीचें राज्य येवो!

ही कळकळीची प्रार्थना यचावत् हिन्दु ललना करीत असतात. यावरून बळीच्या राज्याची श्रेष्ठता व अनुपमेय चांगुलपणा सिद्ध होत आहे. ज्याचें ' राज्य येवो, राज्य येवो ' असा स्त्रियांच्या याचनेचा टाहो क्षीरसागरांतल्या परमेश्वराच्या कानांवर आचांद्रार्क प्रत्यहीं आदळत आहे, त्या श्रीमान् बळीला पाताळांत दडपिण्याच देवाला काय प्रयोजन झालें ? आणि असें करून त्यांत अवताराचा कोणता पुरुषार्थ साधला ? यांत काय साधूंचें परिपालन झालें, दुष्कृताचा विनाश झाला, कीं धर्मसंस्थापना झाली; झालें तरी काय ? याचें उत्तर **कां–ही–ना–ही** हेंच द्यावे लागले. बळीच्या क्षत्रिय सिंहासनावर त्याचा मुलगाच बसला; एकदा वामनप्रासादिक ब्राह्मणबच्चा बसला नाहीं किंवा बाणासुराच्या प्रधानकीची जागाहि एवढ्या मोठ्या ब्राह्माणवतरानें एकादा लोकसंग्रही व राजकारणी भिक्षुकास दिली नाहीं बळीला ज्या खाड्यात गाडलें त्या खाड्यांत ईश्वरावतार वामनसुद्धां गाडला गेला. वाहवा रे अवतार ! अवतारच खरा !!

(१२) बळी आणि वामन यांचया पौराणिक झगड्यात ब्राह्मण व क्षत्रिय यांच्या परस्पर मनोवृत्तींचे चित्र स्पष्ट आणि उठावदार वठलेलें आहे. ही स्पष्टता आणि हा उठाव तुलनेनेंच व्यक्त होणे शक्य असल्यामुळें आपण या कलमांत

## जरासंधवधाचा इतिहास

त्रोटक रीतीनें पाहूं. वामनानें बलीचा नाश करण्यासाठी ब्राह्मणरूप धारण केलें होतें आणि हजारों क्षत्रियांना बंदित टांकून त्यांचा नरमेध करण्यासाचें धाडस करणाऱ्या धाडसी क्षत्रिय जरासंधाला टर टर टर टर उभा चिरून काढण्यासाठीं श्रीकृष्ण भीम अर्जुन यांनींही ब्राह्मणरूपें धारण करूनच जरासंधाचा राजवाड्यांत प्रवेश केला होता. परंतु वामनाच्या आणि श्रीकृष्णाच्या वर्णनांत आणि मागणींत केवढा जबरदस्त फरक पहा. श्रीकृष्ण भीमार्जुनासह सायंकाळ झाल्यावर भलत्याच मार्गानें जरासंधाचा राजवड्यांत शिरला. त्यांनी स्नातकाचा वेष घेतला

होता व सर्वांगावर सुगंधयुक्त गंध लावून पुष्पमाळा घातल्या होत्या. जरासंध एवढा क्रूर, जुलमी व सार्वभौमत्वासाठी हपापलेला क्षत्रिय राजा होता, तरी सत्पात्र ब्राह्मणांचा तो चाहता होता. त्यांने या तिघां वेषधारी स्नातकांस उत्तम आगतस्वागत दिलें ; पंरतु जात्याच तो मोठा चाणक्ष असल्यामुळें त्यानें या वेषधाऱ्यांचे ढोंग चटकन् ताडलें जरासंध धि:कारयुक्त वाणीनें म्हणाला '' ब्राह्मणहो, या लोकांमध्यें स्नातकव्रत आचारणारे पुरूष समावर्तनादि कारणावांचून गंधपुष्पें वैगैरे बाह्यालंकार धारण करीत नाहींत, हें मला पूर्ण विदीत आहे. म्हणून मी खात्रीनें म्हणतो कीं खरोखर तुम्ही ब्राह्मण नसून क्षत्रिय आहांत. गंधपुष्पे धारण करून बाह्यत : हें तुम्ही नुसतें ब्राह्मणपणाचें सोंग आणलें आहे. या पहा, धनुष्याची दोरी घासून घासून तुमच्या दंडावर पडलेल्याा घट्ट्याच्या खुणा ! तुम्ही खात्रीनें क्षत्रियच आहांत. हे विप्रांनो सत्य काय तें सांगा. या जगामध्ये

## क्षत्रियांना सत्यापासून शोभा

प्राप्त होते. अहो, तुम्ही चैतकप्राकाराचें शृंग फोडून भलत्याच मार्गानें निर्भयपणें राजरोस येथें, प्रवेश केला, तेव्हां हें असें कपट करण्याचें प्रयोजन कोणतें ? अहो, **ब्राह्मणांचा पराक्रम काय तो विशेषतः वांणीमध्यें ;** तोंडाचा पट्टा काय तो पाहून घ्यावा. असें असतांना ब्राह्मणशीलाच्या विरूद्ध वर्तन करून, तुम्ही आपल्या प्रत्यक्ष कृतीनें पराक्रम दाखविलात, याचा ताळमेळ कसा घालायचा ? '' श्रीकृष्णार्जुनभीमांनीं बाह्यत : जरी स्नातक वेष घेतला तरी ते जात्याच अस्सल क्षत्रिय असल्यामुळें त्यांच्या हातून नकळत झालेले पराक्रम जरासंधासारख्या जगजेत्या महापुरूषाच्या नजरेंतून कसे निसटतील ? त्यावर श्रीकृष्णानें दिलेलें सडेतोड उत्तर पहा. श्रीकृष्ण म्हणाला '' राजा जरासंधा, आम्ही खरोखरींच स्नाातकब्रह्मण (ब्रह्मचिंतनकरणारे पुरुष) अहोंत. ब्राह्मण क्षत्रिय व वैश्य या तिघांसहि स्नातकव्रतांचे परिपालन करण्याचा अधिकार आहे. पुष्पें धारण केल्यानें विजयलक्ष्मी माळ घालते म्हणून आमच्या शरीरावर या पुष्पमाला शोभत आहेत. क्षत्रियाच्या ठिकाणीं जसें बाहूबल असतें तसें वाग्बल नसतें. जरासंधा, क्षत्रियापासून मोठ्या प्रगल्भ व अघळपघळ भांषणाची इच्छा करण्यापेक्षां उग्र क्षत्रिय तेजाची इच्छा करावी. विधात्यानें क्षत्रियांच्या ठिकाणी बाहूंमध्येंच विशेषेंकरून बल ठेविलें आहे; तें बल पहावें अशी तुझी इच्छा असल्यास, ती तुझी इच्छा आज निश्चयानें परिपूर्ण होईल. राजा, धूर्त पुरूष शत्रूगृहीं आडमार्गानें व मित्रगृही योग्य मार्गाने प्रवेश करतात. म्हणून, ज्या मार्गानें आम्ही येथे प्रवेश केला, तो राजनीतीच्या तत्वाप्रमाणें योग्य मार्गच होय. जरासंधा, तूं स्वतः क्षत्रिय असून नरमेघ करण्यासाठी स्वज्ञातीय क्षत्रियांनाच कोंडून ठेवतोस ? क्षत्रियांने क्षत्रियांना यज्ञपशूंची संज्ञा द्यावी, असला हा मूर्खपणा करणारा तुझ्यासारखा तूंच. तूं ज्ञातीचा क्षय करण्यास उद्युक्त झाला आहेस असें पाहून, त्या दीन राजांचा मृत्यू चुकवावा व त्यायोगें क्षत्रिय ज्ञातीची वृद्धी करावी, या उद्देशानें जरासंधा, आम्ही येथे

## तुला ठार मारण्यासाठी आलों आहोत.

स्वजातियांचे संरक्षण करणें हें कर्तव्य मानणारा कोणताही मनोनिग्रही क्षत्रिय अशा समयीं युद्धास सिद्ध होऊन रणांगणांत देह ठेवण्यास कधीही माघार घेणार नाहीं हें नीट लक्षात ठेव. '' पुढें

भीमाच्या हातून जरासंधाचा वध करवून, विजयी श्रीकृष्ण सर्व बंदीवान क्षत्रिय राजांची मुक्तता करून परत आला,या गोष्टी विस्तृत सांगण्याची अवश्यकता नाहीं मूळ मुद्दा हा कीं वामनानें ब्राह्मणरूपानें येऊन क्षत्रिय बलीजवळ केलेल्या मागणीचा कारस्थानीपणा आणि क्षत्रिय श्रीकृष्णाच्या जरासंधापुढच्या तडफदार स्पष्टस्पष्ट आव्हानाच्या भाषेचा खडखडीतपणा पहा, ह्मणजे

## क्षत्रिय ब्राह्मणांच्या मनोवृत्तींचा भेद

तेव्हांच ध्यानीं येईल. भिक्षुकशाहीची ' आंतली गाठ ' आणि क्षत्रिय वीरांच्या मनाचा निःस्वार्थी मोकळेपणा, पापभिरूत्व आणि अन्यायाविषयीं भयंकर संताप या गोष्टी खुद्द ब्राह्मणी पुराणांवरूनसुद्धां सिद्ध करणारे आणखी असे कितीतरी दाखले देतां येतील; पण प्रस्तुत पुस्तकाचा उद्देश कांहीं तो नव्हे. अस्सल खराखुरा क्षत्रिय व बनावट किंवा अस्सल ब्राह्मण यांच्या अंतरंगाची कमावणी कस कसल्या मसाल्याची असते, ती किंचित् खुलासेवार पृथःकरणानें आपल्यास पहावयाची आहे.

* * * *

(१३) भिक्षुकशाहींत अनेक दुर्गुण असले तरी त्यांत खुनशीपणा हा प्रमुख दुर्गूण आहे. पुराणांतले सारे ब्राह्मणी पराक्रमाचे इतिहास पहा, त्यांत ब्राह्मणी सामर्थ्यांपुढे क्षत्रियांचा ठिकठिकाणीं पाडाव झाल्याचें नमूद करण्याच्या कामीं ब्राह्मण संपादकांनी जरी आपली जान जान पछाडली आहे, तरी भिक्षुकशाहीच्या

## रक्तांत रसरसणारा खुनशीपणा

त्यांना मुळींच छापवितां आला नाहीं, ही गोष्ट विशेषतः लक्षांत ठेवण्यासारखी आहे. क्रिस्ति शकाच्या पूर्वी ३२१ व्या वर्षी हिंदुस्थानावर राज्य करणाऱ्या सम्राट चंद्रगुप्त मौर्याचा मसलतगार विष्णुगुप्त चाणक्य यानें 'कौटिलीय अर्थशास्त्रम् ' नांवाचा इंडियन पिनल कोडवजा जो एक उत्कृष्ट ग्रंथ मौर्यसाम्राज्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीकरितां लिहिला, त्यांत राजानें आपल्या मुख्य पुरोहिताची व दिवाणांची परीक्षा कशी करावी, हें अत्यंत सूक्ष्म दृष्टीनें ठरवून लिहिलें आहे. त्यावरून भिक्षुकशाहीच्या उलट्या काळजाची व कृतघ्नपणाची ख्याति क्रि. शकपूर्व ३२१ च्या पूर्वी वरील लोकविश्रुत होती, इतके तरी मान्य करणें भागच पडतें. चाणक्य लिहितोः——

**पुरोहितमयाज्ययाजनाध्यापने नियुक्तममृप्यमाणं राजा अवक्षिपेत् ।
स सत्रिभिश्शापथ पूर्वमेकैकमात्यमुपजापयेत्——अधार्मिकोऽयं राजा
साधुधार्मिकमन्यमस्य तत्कुलीनमवरुद्धं कुल्यमेकप्रग्रहं सामन्तमाट-
विकमौपपादिकं वा प्रतिपादयामः सर्वेपामेतद्रचते कथं वा तवेति ।
प्रताख्याने शुचुरिति धर्मोपधा । १–१०. कौ० अ०**

**भावार्थः**—राजानें आपल्या पुरोहिताला एकाद्या बहिष्कृत मनुष्यास वेद शिकविण्याचा किंवा त्याच्या येथें याज्ञिकी करावयाचा हुकूम सोडावा; तो त्यानें अमान्य केला कीं त्याला राजानें नोकरीवरून दूर करावें. असें झालें ह्मणजे तो पुरोहित आपल्या कांहीं शास्त्री दूतांच्या मार्फत

राजाच्या एकेक अमात्य दिवाणांच्या कानाचा गुप्तपणें चावा घेऊन त्यांना राजाविरूद्ध चिथावण्याची शिकस्त करील. ते त्या दिवाणांना आणा शपथा घेऊन सांगतील कीं '' अहो, हा राजा अगदी अधार्मिक आहे. आपण सगळे मिळून एखादा चांगला धार्मिक राजा (या अधार्मिकाला उखडून टाकून त्याच्या जागी) स्थापन करूं या; किंवा याच राजघराण्यांत जन्मलेला एकादा धार्मिक पुरुष, किंवा एकादा बंदीवासांत पडलेला अथवा एकादा शेजारचा नातेवाईक कर्तबगार राजा, एकादा जंगली नायक, फार काय पण एकादा उपटशुंभ या राजाच्या सिंहासनावर आणून बसवूं या. या प्रयत्नाला आह्मां सर्व (पवित्र ?) शास्त्रीमंडळाची पूर्ण संमती आहे. आपलें काय मत आहे ?'' या भिक्षुकी कारस्थानाच्या जाळ्यांत जे जे दिवाण सांपडतील ते भ्रष्ट समजावे व न सांपडतील ते विश्वसनीय मानावे. या प्रयोगाला ' धार्मिक कसोटी ' असें ह्मणतात.

विष्णुगुप्त चाणक्याची ही पुरोहित ऊर्फ भिक्षुकशाहीच्या स्वभावधर्माची व्याख्या किती समर्पक, किती बिनचुक आणि किती दूरदृष्टीची आहे, याचें प्रत्यंतर पाहूं इच्छिणारांनी सांप्रत राजापूराच्या कोल्ह्यांची कोल्हापूरच्या राजाविरूद्ध जोरांत सुरूं असलेली

## वेदोक्ताची कोल्हेकुई

ऐकावी अशी शिफारस आहे. या कोल्हकुईत भिक्षुकी खुनशीपणा इतका भयंकर भडकलेला आहे कीं त्याच्या धगधगीत आंचेपुढें सत्याचें पोलादसुद्धां वितळवून त्याचें पाणीपाणी करण्यासाठीं अनेक राष्ट्रीय भिक्षुकांनीं कंबरा कसल्या आहेत. चाणक्यानें गुप्तपोलीसांचें खातें अत्यंत प्रबळ राखले होतें, हें इतिहासख्यातच आहे. गुप्तपोलीसांत काम करणारा पुरूष अगर स्त्री यांना जर कोणता विशेष 'क्वॉलीफिकेशन ' लगत असला तर तो काळजाची उलटी ठेवण आणि खुनशी पणा हाच होय. खुनशीपणा हा ब्राह्मणवर्गाचा हा जन्मसिद्ध हक्क असल्यामुळें, गुप्त पोलिसांच्या चमूमध्यें ब्राह्मण पुरूषांच्या जोडीनें ब्राह्मण स्त्रियांचीही योजना करायला चाणक्य विसरला नाहीं. अध्याय १२ येथें चाणक्य लिहितो, **परिव्राजिका वृत्तिकामा दारिद्रा विधवा प्रगल्भा ब्राह्मणी अन्तःपुरे कृतसत्कारा महामात्यकुलानि अधिगच्छेत्.** चाणक्याचें हें सुत्र वाचलें तेव्हां वासुदेव बळवंत फडके नारूच्या आजारानें दरीखोऱ्यांतल्या एका गुप्त ठिकाणीं आजारी पडला असतां, जेवणखाण व सुश्रुषा करण्यासाठीं त्याने भरपूर वेतन देऊन ठेवलेल्या एका ब्राह्मण विधवेंने, इंग्रजानीं जाहीर केलेलें बक्षिस उपटण्यासाठीं, वासुदेव बळवंताचा (अगदी स्वजातियाचा) स्वतःच्या डोक्यावर केंस नसतांनाहि केसानें गळा कसा कांपला, या गोष्टीची आठवण झाली. असो. या खुनशीपणाबद्दल भिक्षुकशाहीला बुराणकलापासून तों अगदीं आजपर्यंत खरपूस अद्दली घडत आल्या तरी त्याचा त्याग करण्याची बुद्धी त्यांना होत नाहीं या चिकाटीचा चिकटपणा काय वर्णन करावा ! याचें पुरातन पौराणिक उदाहरण ह्मणजे परशुरामाचे. या परशुरामाला भिक्षुकशाहीनें वामनाप्रमाणें

## दशावतारांतला एक ब्राह्मणी अवतार

बनविला आहे. या अवताराच्या असंबद्ध व सारासारा विचारासहित न पटणाऱ्या ज्या गोष्टी पुराणांत घुसडून दिलेल्या आहेत, त्याबद्दल आह्मी येथें कांहीच लिहीत नाहीं. त्या गृहीत धरूनच

या अवताराचा सारांश कशांत निघतो तें पाहूं. परशुरामानें २१ वेळां पृथ्वी निःक्षत्रिय केली. *[क्षत्रियांशीं २१ वेळा युद्धें करून त्यांचा पराभव केला, असें म्हटलें असतें तर काहीं शहाणपणाचें झालें असतें व विवेकबुद्धीला पटलें असतें पण 'निःक्षत्रिय' शद्वाच्या मख्खीवरच या अवताराची सारी इमारत उभारली आहे. ती खाडकन् ढांसळेल ना, त्याची वाट काय ? ]* कार्तवीर्याच्या मुलांनीं परशुरामाच्या बापाचा-जमदग्नीचा -खून पाडल्यामुळें संतप्त होऊन या ब्राह्मण वीरानें (?) सर्व क्षत्रियांचा निःपात करून समंतपंचक देशांत

## क्षत्रियांच्या रक्ताचे प्रचंड पांच डोह

निर्माण करून, त्या रक्तांच्या ओंझळी ओंझळींनीं परशुरामाने आपल्या बापाला तर्पणोदक पाजलें. क्षत्रियांचा निःपात करून मिळविलेली पृथ्वी परशुरामानें क्षत्रियांच्या हत्त्येचें पातक धुऊन जावें ह्मणून (परंतु वास्तविक स्वतःची राज्य चालविण्याची नालायकी दडविण्यासाठीं) कश्यपास दान दिली. (एरवी पृथ्वीनें तरी या विवेकभ्रष्टाला राजा ह्मणून थोडेंच मानलें असतें !) कश्यपानें परत ती क्षत्रियांच्या ताब्यांत राज्य चालविण्यासाठीं देऊन, परशुरामाला 'याउप्पर या पृथ्वीवर तूं राहूं नकोस, कोठेंतरी दुसरीकडे-पृथ्वीवर ज्याचा समावेश होत नाहीं अशा दुसऱ्या ठिकाणीं-चालता हो.' असा हुकूम फर्माविला. त्याप्रमाणें परशुराम एखाद्या बहिकृत रक्तपित्याप्रमाणें महेन्द्र पर्वतावर निघून गेला. आईबापाच्या श्राद्धप्रसंगी परशुरामासारख्या ईश्वरावतारी महापुरुषाच्या आमंत्रणाला मान देणारा एकही ब्राह्मण पृथ्वीतलावर आढळला नाहीं, ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. ह्मणून या चापधर ब्राह्मणानें क्रोधाने बाण मारून समुद्राला हटविलें आणि चितास्थानीं आढळलेल्या कैवर्तकांस (कोळयांस) चित्पावन ब्राह्मण बनवून* त्यांच्याकडून श्राद्धविधी उरकला व समुद्रांतली 'रिक्लेम्ड लॅन्ड' त्यांना आंदण दिली, अशी पुराणांत कथा आहे. या कथेवरून (१) राज्य चालविण्याची ब्राह्मणांची नालायकी, (२) परशुरामाचा खुद्द ब्राह्मणांस आलेला तिटकारा, (३) परशुरामाचा भिक्षुकी खुनशीपणा, आणि (४) परशुरामावताराच्या रहस्याचा ब्रह्मघोंटाळा, हीं उघड उघड दिसतात. एवढा मोठा परमेश्वराचा अवतार पण त्याला काय या पृथ्वीवर ब्राह्मणी राज्य स्थापन करतां येऊं ? बरें, क्षत्रियांपासून स्वपराक्रमानें जिंकून घेतलेली पृथ्वी कश्यपाला दान दिल्यावर त्या ब्राह्मणानें तरी सिंहासनारूढ होऊन स्वतःस सार्वभौमत्व घेण्याचा आयता आलेला योग साधून घ्यावा ? तेंहि नाहीं. त्यानें उरल्यासुरल्या क्षत्रियांना शोधून काढून त्यांच्या हवालीं पृथ्वीचें साम्राज्य केलें आणि पृथ्वीवर शांतता नांदावी ह्मणून निरर्थक रक्तपात करण्यास सोकावलेल्या खुनशी परशुरामाला

## देखत हुकूम हद्दपारीची शिक्षा

ठोंठावली. यावरून परशुरामाचें अस्तित्व पृथ्वीवर किती तापदायक व लांछनास्पद झालें होतें आणि ब्राह्मणांची राज्य चालविण्याची नालायकी किती लोकविश्रुत होती, याचा उलगडा पटतो.

---

* यावरून परशुराम जन्मप्राप्त ब्राह्मणाच्या तत्त्वाच्या विरुद्ध होता असे दिसते. नाहींतर त्यानें कोळ्याचे ब्राह्मण बनविण्याचा उपव्याप कशाला केला सता ? बरें, कोळ्यांचे ब्राह्मण झाले तरी कसे? आणि कोळ्यांचे जर ब्राह्मण होतात, तर या परशुरामी तत्त्वाविरूद्ध जन्मप्रापत ब्राह्मण्याची टिमकी वाजविणाऱ्या भोरप्यांच्या तांडवनृत्याचा कसाकाय मेळ घालायचा ?

अगदीं अलीकडच्या परशुरामप्रसादिक 'चित्पावन राजां' चा इतिहास कां घ्या ना. त्याचाहि मासला हाच. याबद्दल अनेक ऐतिहासिक पुरावे आहेत. त्यांतील एक खालीं देतों :–

The (Chitpawun) Brahmin is from diet, habit and education, keep active and intelligent, but generally avaricious and often treacherous. His life, if in public business, must from the system of his Government be passed in efforts to deceive, and detect others in deceiving. Such occupations raise cunning to the place of wisdom, and debase by giving a mean and interested bent to the mind, all those claims to respect and attachment upon which great and despotic power can alone have any permanent foundation. The history of the Mahratta nation abounds with instances of Brahmins rising from the lowest stations to be ministers, and sometimes rulers of a state ; but their character undergoes little change from advancement, and in general, all its meanest features remain ; though often leading armies the Mahratta Brahmins, have not with some remarkable exceptions, gained a high reputation for courage ; and if arrogant and cruel, they have often merited the charge of being unfeeling and oppressive. (Life of Nana Phadnis by A. Mac Donald. p. 6I) असो. परशुरामाच्या बाबतींत पुन्हा तोच प्रश्न उपस्थित होतो कीं ईश्वैरानें हा अवतार घेऊन केलें काय ? जगाच्या संसारांत बॅलन्स ऑफ पॉवर-सत्तेचा समतोलपणा राखण्याचीच कामगिरी करण्यासाठी परमेश्वर अवतार घेतो, अशी आह्मां हिंदुजनांची समजूत आहे. क्षात्रतेज, बुद्धिमत्ता, वाणिज्य आणि स्वयंसेवा या चार श्रमविभागाच्या तत्वांवरच जगाचा संसार समतोल चालूं शकतो. ब्राह्मणांच्या बुद्धिमत्तेला शिरजोरपणाचा वाव मिळाला आणि बाकींचीं तीन तत्वें जर हतबल बनलीं ; किंवा क्षात्रतेजाचा कडेलोट होऊन बुद्धिमत्ता वाणिज्यादि तत्वांचा ऱ्हास झाला, तर जगाचा संसार कधींहि सुरळीत चालणार नाहीं.

## बाहुबल बुद्धिमत्ता वाणिज्य व स्वयंसेवा

या प्रत्येक राष्ट्राच्या चार राष्ट्रीय जीवनाच्या प्राणज्योति आहेत. त्यांतील एकहि कमी अधिक होता कामां नये. परशुरामानें तर क्षात्रतेजाची प्राणज्योत अज्जिबात विझवून टाकली आणि जगांतलें उमदें पौरषत्वच खच्ची केलें, यांत त्यानें काय शहाणपणा केला ? या दुष्ट कृत्यामुळें परशुरामाची किंमत दिल्लीची कत्तल करणाऱ्या पाषाणहृदयी नादीरशहापेक्षां कवडीमात्र अधिक ठरत नाहीं, मग असल्या उनाडटप्पू खुनशी मातृघातक्याला ईश्वरावतार बनविणाऱ्या शहाण्यांची तारीफ फक्त तेच शहाणे करूं जाणें. मानवी समाजांत घातपात करण्यांत निर्ढावलेले कांही खुनशी रुधिरप्रिय राक्षस नेहमींच असतात, त्या अनिष्ट वर्गापैकींच परशुराम हा एक होता. कार्तवीर्याच्या मुलांनी त्याच्या बापाचा खून केला नसता, तर परशुरामाला क्षत्रियांचा संहार करून

## पृथ्वीला विधवा करण्याची संधि

प्राप्त झाली नसती आणि दशावताराच्या रत्नमालिकेंत हा नराधम शंख ओंवण्याचें क्षुद्र कृत्य भिक्षुकशाहीला करतांहि आलें नसतें. बापाच्या खुनाचा सूड ह्मणून साऱ्या क्षत्रिय समाजाचा संहार करणें, ही सबब ईश्वरी अवताराला काळीमा लावणारी आहे.* राष्ट्रांतली मिलिटरी पॉवर नष्ट करून नुसत्या भिक्षुकी अकलेच्या जोरावर पृथ्वीचें साम्राज्य चालविण्याचा मूर्खपणा करणारा कोणी मतिभ्रष्ट या पृथ्वीतलावर जन्मला असेल तर तो एक खुनशी परशुरामच होय आणि याला जर ईश्वरी अवताराच्या कोंदणांत बसवायचें असलें तर तात्या भिल्ल, वासुदेव बळवंत, चिंतामणराव पटवर्धन, चाफेकर बंधु, कान्हेरे या महात्म्यांनाहि अवतारी समजून दशावताराची यादी शतावतारापर्यंत खुशाल फुगविली तरी त्याबद्दल भिक्षुकशाहीचे कान उपटायला परमेश्वर केव्हांहि येणार नाहीं, एवढें आह्मी आश्वासन देतों. असो. देवानें हा परशुरामी अवतार घेतला कशाला ? कार्तवीर्य सहस्त्रार्जुनाला ठार मारायला ? त्यानें काय देवाचें घोडें मारलें होतें, कीं तो जरासंधाप्रमाणें क्षत्रियांना बंदीत टांकणारा होता किंवा रावणाप्रमाणें देवांना रस्ते झाडावयास लावणारा टायरन्ट होता ? मुळीच नाहीं. सहस्त्रर्जुनासारखा सर्वगुणसंपन्न व त्रिलोकमान्य राजा याचा तोच, असें पुराणांत ठिकठिकाणीं वर्णन सांपडतें. सहस्त्रार्जुनाची निंदा करणारें एक अक्षरसुद्धां खुद्द ब्राह्मणी पुराणांत आढळत नाहीं. साऱ्या जगाच्या इतिहासांत सहस्त्रार्जुनाला तोड द्यायचीच तर ती बळीराजाचीच होय. अशा या त्रिभुवनप्रिय नृपतीला ठार मारण्यासाठीं ईश्वरानें अवतार घ्यावा ही गोष्ट

## परमेश्वराच्या ब्रीदाला काळीमा

फांसणारी नव्हे काय ? परशुरामाचा आणि सहस्त्रर्जुनाचा खटका कां उडाला ? तर म्हणें जमदग्नीच्या आश्रमांतली कामधेनू त्यानें बळजबरीनें नेली. वशिष्ठ आणि गाधिजराजा (विश्वामित्र) यांच्यामध्यें कामधेनूहरणाचा झगडा उडाल्याची जी हकिकत पुराणांत दिलेली आहे, त्याच हकिकतीची हुबेहूब नक्कल–अक्षरक्षः– ' कॉपी टु कॉपी आणि माशी टु माशी '–परशुराम आणि सहस्त्रार्जुनाच्या झगड्याच्या प्रसंगी वर्णन केलेली पुराणांत आढळते. ही खरी कां ती खरी, हा वाद जरी सोडला, तरी त्यांत पुराणकारानें पुढच्या आख्यानांत थोडा भेद दाखविला आहे. तो एवढाच कीं वशिष्ठ विश्वामित्राच्या नाटकांत प्रत्यक्ष कामधेनूनें आपल्या–

> **आंगापासुनि केले प्रगट तिनें म्लेंच्छ यवन शबर शक ॥**
> **बळ उडविलें तिहीं खगपतिपक्ष्यांनीं जसें सहज मशक ॥**

आणि परशुरामाच्या नाटकांत पुराणकाराला ईश्वरी अवताराचें एक सोंग पौराणिक रंगभूमीवर नाचवायचे होतें, म्हणून त्यानें ' आंगापासुनि शबर शक प्रगट ' करण्याची कामधेनूची दैवी शक्ति

---

* क्षुल्लक कारणावरून चवताळून जाऊन मानवी संहार करणारा माथेफिरू परशुराम जर ईश्वरी अवतारांच्या लिष्टांत सहावा नंबर पटकावतो, तर पंजाबची कत्तल करणारा महात्मा डायर कोणत्या नंबराचा वारस ठरतो, हें परशुरामभक्त सांगतील काय ?

लंजूर पाडून, तिला पांजरपोळांतल्या एकाद्या खल्लड गाईप्रमाणें सहस्त्रार्जुनाच्या दाव्यांत गुपचूप मान अडकवून त्याच्या गोठ्यांत जाण्यास भाग पाडलें आहे. बाकी दोन्ही नाटकांतले प्लॉट एकच. सहस्त्रार्जुनाच्या वेळींच कामधेनुहरणाच्या क्षुल्लक सबबीवर ज्या ईश्वराला अवतार घेण्याची एवढी उतावळी झाली, तोच ईश्वर वशिष्ठाच्या कामधेनूवर विश्वामित्रानें हात टांकला तेव्हां काय गांजाची चिलीम ठांसून तर्र पडला होता, कीं एखाद्या वॉर हॉस्पिटलमध्यें वुंडेड सोल्जरांच्या लिष्टांत अडकला होता, कीं पेशवाई रमण्यांत पुढें लागणाऱ्या ब्राह्मण भोजनाच्या पत्रावळी आगाऊच शिवण्यांत गुंतला होता ? काय, करीत होता काय ? जें कारण एकदां परमेश्वरी अवतारास कारणीभूत होतें, तेंच कारण दुसऱ्या तसल्याच प्रसंगीं कां होऊं नयें ? परंतु अवताराची यादी हवी तितकी फुगविण्याचा कृतसंकल्प केलेल्या भिक्षुकशाहीला एवढा तारतम्यभाव कोठला उरणार ! बलीच्या बाबतींत ईश्वरी अवताराचें एखादें कारण कोनेकोंपरे धुंडाळून काढलेच तर शताश्वमेधाच्या सांगतेनें तो इंद्रपद पटकविण्याची महत्वाकांक्षा बाळगून होता, हें तरी सांपडेल ; पण सहस्त्रार्जुनाच्या बाबतींत तेंहि नाहीं. कामधेनूच्या हरणानंतर कांही बोलाचाल होऊन सहस्त्रार्जुनाच्या पुत्रांनीं जमदग्नीला ठार मारलें आणि रेणुकेवर २१ वार करून तिचाहि मुरदा पाडला. या गोष्टीची तक्रार या सोज्वळ परशुराम ब्राह्मणानें सहस्त्रर्जुनाकडे केली असती, तर न्याय अन्यायाची मीमांसा करून त्या सत्यप्रिय आणि न्यायप्रिय क्षत्रिय नृपतीनें आपल्या अपराधी पुत्रांस खात्रीनें फांसावर चढविलें असतें. सत्याकरितां व न्यायाकरितां क्षत्रिय राजांनीं केलेलीं असलीं हजारों आत्मयज्ञाचीं कृत्यें ब्राह्मणी पुराणांतच नमूद आहेत. पण खरें म्हटलें तर परशुरामाची स्थिति

## ना पुरुष ना नारी

या म्हणीप्रमाणें ना ब्राह्मण ना क्षत्रिय अशी अधलीमधलीच होती, आईबापाचा खून झाल्यावर, आपण परमेश्वराचेमोठे अवतार आहोंत, ' धर्मसंस्थापनार्थाय ' आपला जन्म आहे, वगैरे सर्व उदात्त गोष्टी पार विसरून जाऊन, कामाठपुऱ्यांतल्या एखाद्या माथेफिरूप्रमाणें या ब्राह्मणी अवतारानें सर्रास क्षत्रियांची कत्तल करण्याचा संकल्प करून, त्या संकल्पाची पहिली भवानी सहस्त्रार्जुनासारख्या लोकप्रिय चक्रवर्ति क्षत्रिय राजाच्या खुनानें केली. साऱ्या त्रिभुवनाला अत्यंत प्रिय असलेल्या राजदंडधारी पुरुषाचा खून करणें, हें केवढें चिळस आणणारें दुष्कृत्य आहे, याची या माथेफिरूला कल्पना होऊं नये, येथेंच परशुरामाच्या भिक्षुकी चारित्र्याची खरी मेंख आहे. शिवाय, ब्राह्मणांच्या हातीं क्षत्रियांची क्षात्रविद्या गेली असतां पृथ्वीवर केवढा हाहाकार उडतो, याचाहि दाखला या परशुराम चरित्रावरून चांगला पटतो, स्वतःच्या स्वार्थाला चिमटा बसतांच किंवा स्वतःचें कांही नुकसान होतांच, पाठीमागचा पुढचा कांहीहि विचार न करितां एखाद्या क्षुद्र माथेफिरूप्रमाणें

## राजदंडधारी राजांचे खून

करण्याची ही घातकी परंपरा हिन्दुस्थानांत सुरू करणाऱ्या परशुरामाला ईश्वरी अवतार मानणें, म्हणजे अवतार–कल्पनेची शुद्ध बीभत्स विटंबना होय. बरें, क्षत्रियांचा संहार करून परशुरामानें

अखेर मिळविलें काय ? पांडवांनी कौरवांचा संहार करून अखेर गतभर्तृकांचेंच राज्य मिळविलें. अहमदशहा अबदाल्लीनें पानपतास

## मराठेशाहीच्या तीन लाख बांगड्या

फोडून अखेर आपल्या स्वकीयांचीं श्राद्धतर्पणें घालीत घालीतच खैबर घांटाची गांठ त्याला घ्यावी लागली. हा काय विजय झाला ? याला विजयच म्हणायचें तर प्राणघातक विजय म्हणा; पण हा कांही विजय नव्हें. परशुरामानें क्षत्रिय संहार करून गतभर्तृका पृथ्वी हस्तगत केली; पण त्याला ' नको ही ब्याद ' म्हणून कश्यपाच्या पदरांत टाकावी लागली आणि अखेर कश्यपाच्या ' समरी आर्डर ' वरहुकूम त्याला मानवी समाजांतून एखाद्या रक्तपित्याप्रमाणें कायमचें उठून जावें लागलें. महेन्द्र पर्वतावरच्या ह्या एकलकोंड्या चिरंजीव समाज विध्वसकांचें ईश्वरी अवताराचें हें पर्यवसान पाहून प्रत्यक्ष ईश्वरसुद्धां ओक्साबोक्सी रडत बसला असेल ! ! !

* * * *

(१४) हिन्दुस्थानच्या इतिहासांत भिक्षुकशाही आणि खुनशीपणा या जोडप्याच्या अनेक विचित्र लीला फार प्राचीन काळापासून कुप्रसिद्ध आहेत. हें जोडपें एकमेकांत इतकें समरस होऊन गेलेलें आहे कीं भिक्षुकशाही म्हणजे खुनशीपणा आणि

## खुनशीपणा म्हणजेच भिक्षुकशाही

असा शब्दप्रयोग वाङ्मयांत कोणी केल्यास तो फारसा बेकायदेशीर किंवा ब्येव्याकरणशीर होईलसें वाटत वाटत नाही. ही खुनशीपणाची परंपरा कदाचित परशुरामाच्या महाकृपेचें फळ असावें असें वाटतें. निदान क्षत्रियांना सदैव पाण्यांत पहाण्याची भिक्षुकी प्रवृत्ति तरी येथपासूनच निर्माण झाली, असें गृहित धरण्यास कांही हरकत नाहीं. परशुरामाच्या अवतारावर मल्लीनाथ्या झोडणाऱ्या ग्रंथाचा प्रसार झाल्या दिवसापासून क्षत्रियांचा द्वेष हा

## ब्राह्मणांचा जन्मसिद्ध हक्क

किंवा ब्राह्मण्यांचें उत्कृष्ट चिन्ह होऊन बसलें आहे. इतकेंच नव्हें तर आम्ही एकदोन पावलें पुढें जाऊन ह्मणतों की ज्याच्यावर भिक्षुकशाहीचा परशुरामी डोळा वळेल, त्यानें बिनचुक आपल्या क्षत्रियत्वाची खूणगांठ मारावी, मग त्याच्या टाळक्यावर जन्मलिखित कोणत्याहि जातीची पाटी मारलेली असो.

## ब्राह्मण ज्याचे द्वेष्टे तो क्षत्रिय

हा एक आतां शाश्वत नियमच होऊन बसला आहे. अमक्यातमक्या ठिकाणीं हल्ली ' ब्रह्मद्वेष ' फार माजला आहे, अशीं वाक्यें अलीकडे बऱ्याच ठिकाणीं वाचनांत येतात. ब्रह्मद्वेष म्हणजेच ब्राह्मणद्वेष अशी या लिहिणारांची भावना असते. पण ब्रह्मद्वेष म्हणजे ब्राम्हणद्वेष हा अर्थ या कलमकसायांनीं कोणत्या शब्दकोशांतून काढला नकळे ! ब्रह्म म्हणजे ब्राम्हण ? आणि ब्राह्मण

म्हणजे ब्रम्ह? परब्रह्म ? वा: छान व्यात्पत्ति शोधून काढली. ब्र–ह्म–द्वे–ष म्हणजे ब्रम्हाचा द्वेष–द्रोह तो ब्रह्माद्रोह, आणि

## ब्रह्मद्वेष करणारे ते ब्राह्मण

असा अर्थ केला तर त्याला पुराणांचा व इतिहासाचा कांही भरपूर पुरावा तरी मिळेल; परंतु ब्रह्मद्वेष म्हणजे ब्राह्मणद्वेष असा नुसता शब्दप्रयोग करून ब्राह्मण कांही ब्रह्मत्वास पोंहचणार नाहींत ! आजपर्यंत ब्रह्माचा काय किंवा चक्रवर्ति राजाचा काय द्रोह करण्यांत ब्राह्मणांनींच आघाडी मारलेली आहे; याची उदाहरणे खुद्द ब्राह्मणी पुराणांतून व इतिहासांतून हवीं तितकीं काढून दाखवितां येतील. क्षत्रियांचा, क्षत्रिय सत्तेचा म्हणजेच राजदंडधारी राजांचा राजद्रोह आजपर्यंत ब्राम्हणांनी केला आहे, त्याच्या शतांशानें सुद्धां क्षत्रियांनीं ब्राह्मणांचा द्वेष केलेला नाहीं. उलट भिक्षुकशाहीच्या सर्व अवगुणांना डोळयांआड करून वेळोवेळीं सत्पात्र व सज्जन ब्राह्मणांच्या मध्यस्थीनें क्षत्रीय राजांनीं ब्राह्मणांस सन्मानपूर्वक जवळ केल्याचे दाखले इतिहासांत पदोपदीं आढळतात. याचें एकच उदाहरण आपण केल्याचे कान्यकुब्जाधिपती (इ.स. ६१०-६५०)

## श्रीशिलादित्य हर्षवर्धन राजा

यांचें घेऊं. हा क्षत्रिय राजा जरी बुद्धानुयायी होता, तरी इतर सर्व धर्मपंथांना त्याचा भरपूर आश्रय असे. वेदानुयायांचा त्याच्या दरबारांत बौद्ध भिक्षूंच्या तोडीनेंच सन्मान होत असे. यानें आपल्या साम्राज्यांत प्राणिहत्या कायद्यानें मना केली होती आणि कोणी लपून छपून ती केल्यास त्या अपराध्याला देहान्त शिक्षा फर्माविली जात असे. हर्षवर्धनानें ठिकठिकाणी हॉस्पिटलें, धर्मशाळा व मठ बांधले होते ; व बौद्ध भिक्षूंच्या स्वाध्यायांत अडचण येऊं नये म्हणून त्यांच्या पोटापाण्याची व्यवस्था चोख लावून दिली होती. दरसाल हा क्षत्रिय सम्राट आपल्या राजधानींत एक धर्मपरिषद भरवून, स्वराज्यांतल्या हजारों श्रमणांस व ब्राह्मणांस आपल्यासमोर धर्मतत्वांची चर्चा व वादविवाद करण्यास सन्मानपूर्वक बोलावीत असे. एकसाल त्यानें प्रसिद्ध चिनी प्रवाशी व बौद्धधर्ममार्तण्ड हूएनसंग यालाहि या परिषदेंत आमंत्रण दिलें.गंगानदीच्या दक्षिणतटाकीं भला मोठा ठोलेजंग परिषदमंडप उभारला. देशोदेशचे वीस राजे आपल्याबरोबर अनेक विद्वान् श्रमणांस व ब्राह्मणांस बरोबर घेऊन परिषदेला हजर होते. सर्व पंडितांना निरनिराळीं प्रशस्त आसनें मांडलेलीं होतीं व स्वतःकरितां हर्षराजानें एक उच्च सिंहासन मांडलें होतें.हर्षराजा बुद्धधर्मी असल्यामुळें वैदिक ब्राह्मणांपेक्षां बौद्ध श्रमणांकडे त्याचा ओढा विशेष असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. त्यानें दररोज उत्तमोत्तम अन्नांचे शिधे व दक्षिणा निमंत्रित श्रमणांस देण्याची सुरुवात केली. हें पाहून वैदिक ब्राह्मणांच्या वैषम्यांत पुराणप्रसिद्ध खुनशीपणाचा वडवानळ प्रदीप्त झाला. ताबडतोब हे सर्व वैदिक धर्ममार्तण्ड एकत्र होऊन त्यांनीं एक गुप्तकट केला आणि

## परिषदेच्या भव्य मंडपास आग

लावण्याचा प्रयत्न केला. दुर्दैवानें हा डाव फसला व कांहीं ब्राह्मण पकडले गेले, गुप्तकटाचा हा पहिला पेंच फसतांच या धर्ममार्तण्डांनीं एक खुनशी इसम भाड्यानें मिळवून, त्याच्याकडून हर्षवर्धनाचा खून करविण्याची योजना केली, राजाचें सुदैव म्हणून खुनी इसमाच्या शस्त्रप्रहाराचा तडाखा बसण्यापूर्वीच सावध होऊन तो मोठ्या शिताफीनें निसटला व खुनी इसम पकडला गेला. अर्थात् त्यानें

## धर्ममार्तण्डांच्या गुप्तकटाचा स्फोट

केला. हर्षवर्धनानें या भाडोत्री खुन्याचा भाडोत्रीपणा लक्षांत घेऊन त्याला क्षमा केली ; परंतु आपल्या साम्राज्यांतल्या सर्व वैदिक ब्राह्मणांना ताबडतोब हद्दपार केलें, वाचकहो, ही कादंबरी नव्हे, हा इतिहास आहे, या मासल्याचे अनेक निर्घृण खुनशीपणाचे ब्राह्मणी प्रकार इतिहासांत शेंकड्यांनीं मोजतां येतील इतके आहेत, त्यावरून भिक्षुकशाहीच्या कारस्थानी प्रवृत्तीची चटोर जिभली राजकीय रक्तासाठीं कितपत लालचटलेली असते, याची आपण कल्पनाच केलेली बरी ! असल्या या समाजघातकी राजद्रोही प्रवृत्तीचा आद्यप्रवर्तक जो परशुराम त्याला ईश्वरी अवतार व कुलदैवत ठरविणाऱ्यांची धन्य असो ! ! !

* * *

[१५] आमच्या मतें ' चातुर्वर्ण्य व्यवस्था ' ही शब्दयोजनाच चुकीची आहे, त्याऐवजीं ' चतुर्वर्ग व्यवस्था ' ही शब्दयोजना कांहींतरी सारासार बुद्धीस व इतिहासास पटणारी आहे. वर्णांवरून जाती ठरविल्या गेल्या असाव्यात, असें दिसत नाहीं. निदान हिंदुस्थानांत तरी **आर्य** आणि **अनार्य** अथवा **गोरे** आणि **काळे** हे दोनच भेद प्राचीन इतिहासांत दिसतात. रंगावरूनच जाती ठरल्या असें मानलें तर चारांच्या ऐवजीं दोनच जातींचें अस्तित्व सिद्ध मानणें प्राप्त आहे ; आणि जगाच्या आजच्या संसारातहि हाच

## काळ्या गोऱ्यांचा झगडा

चालूं मन्वंतरांतील इतिहास बनवीत आहे. क्षत्रिय ब्राह्मण वैश्य आणि शूद्र या चार वर्गांची उत्पत्ति किंवा उपपत्ती वर्णांत किंवा रंगांत सांपडणें शक्य नाहीं, मद्रासचे **श्रीयुत आर. शामाशास्त्री** यांनीं ' जातींची उत्क्रांति ' (The Evolution of caste) नामक पुस्तकांत (पृ. ४४) असें विधान केलें आहे कीं " निरनिराळ्या वर्गांच्या कपड्यांच्या निरनिराळ्या रंगावरून-वर्णावरून-वर्ण शब्दानें पूर्वी लोकांचे वर्ग समजले जात असावे. ब्राह्मणांचा पेहेराव पांढऱ्या रंगाचा, क्षत्रियांचा तांबडा, वैश्यांचा पिवळा आणि शूद्रांचा काळा. या रंगावरूनच पुढें बुद्धोत्तरकाळच्या वाङ्मयांत जातींचा नामनिर्देश होत आला." परंतु या चार वर्गांच्या लोकांना असले निरनिराळ्या रंगांचे युनिफॉर्म पेहराव करण्याचें कारण काय झालें असावें, याचें ऐतिहासिक अनुमान मात्र शास्त्रीबुवांनीं कोठेंच दिलेलें नाहीं. अर्थात् पेहरावाच्या रंगावरून जाती ठरविण्याचा हा तार्कीक उपक्रम मुळींच ग्राह्य धरतां येत नाहीं, मुसलमानांच्या अमदानीपासून ' पांढरपेशे ' असा एक शब्द हिंदूंतील उच्च संस्कृतीच्या वर्गाला उद्देशून योजण्यांत आलेला आहे. तथापि त्या योजनेंत जातिवैशिष्ट्याची कल्पना मुळीच नसून संस्कृतिवैशिष्ट्यच विशेषतः दृग्गोचर होतें. आजलाहि उत्तर हिंदुस्थानांतले बहुतेक सर्व लोक

## पांढऱ्या पेहरावाचे पांढरपेशेच

आहेत; म्हणून ते सर्वच कांहीं ' ब्राह्मण ' लेबलाचे हक्कदार नाहींत. शिवाय पांढरपेशे शब्दाप्रमाणें तांबडपेशे, पिंवळपेशे किंवा काळपेशे हे शब्द ज्याअर्थी कोणच्याहि वाङ्मयांत किंवा कोणच्याहि प्रांताच्या व्यावहारिक भाषासरणींत आलेले आढळत नाहींत, त्याअर्थी पेहरावाच्या वर्णावरून* वर्ग ओळखिले जात असत, या विधानाला शुद्ध तर्काशिवाय कसलाहि आधार दिसत नाहीं. तथापि पेहरावाच्या रंगापेक्षां जर कातडीच्या रंगाकडे आपण वळलों, तर कदाचित् चतुर्वर्ण शब्दाच्या व्युत्पत्तीच्या कांहींसे जवळ येण्याचा संभव आहे. एकंदर जगांतील मानवी समाजांत मुख्यत्वेंकरून चार रंगांच्या कातडीचे लोक आढळतात :– (१) **आर्य**–हे साधारणरीत्या गोऱ्या वर्णाचे व उंच असतात; (२) **मांगोलियन**–हे पिंवळसर रंगाचे असून मध्यम उंचीचे असतात; (३) **द्रविड**–काळसर वर्णाचे, फेफट्या फुगीर नाकाचे व साधारण मध्यम उंचीचे असतात; आणि (४) **नीग्रो**–पूर्ण काळ्या रंगाचे असतात. परंतु या चार मुख्य विभागांना आमच्या चातुर्वर्ण्य व्यवस्थेंत आमचे वेदोनारायण कांहीं सामील करीत नाहींत आणि वर्ण म्हणजे रंग हा अर्थहि ते अमान्य करून वर्ण म्हणजे जाती अशा मतलबी अर्थाच्या धाबळीखालींच घुंगट मारून बसतात. वरील चार मुख्य वर्णांतील नंबर २ व ४ हे हिंदुस्थानाबाहेरचे आहेत आणि

## हिंदुस्थान म्हणजेच सारें जग

या संकुचित कल्पनेच्या घोंट्याचा लोटा पचविणाऱ्या आमच्या स्मृतिकारांना एखादा बाबरओंठ्या काळा नीग्रो चातुर्वर्ण्य व्यवस्थेच्या क्षेत्रांत आलेला कसा खपेल बरें ? कृत त्रेता आणि द्वापार हीं युगें हिंदुस्थानांतच झालीं, हिंदुस्थानाबाहेर नव्हे ! मच्छ कच्छ वराहादि अवतार झाले, तेहि येथेंच; युरोप अमेरिकेंत नव्हे ! कारण–

चत्वारि भारते वर्षे युगानि कवयोऽब्रुवन् ।
कृतं त्रेता द्वापरश्च कलिश्चान्यत्र न क्वचित् ॥

हा पडला आमच्या धर्मशास्त्राचा (?) पुरावा ! येऊनजाऊन सर्वांची उडी आपलें आर्यवंशजत्व सिद्ध करून दाखविण्याकडे. परंतु आर्यांचे इतिहासप्रसिद्ध गुणधर्म तर राहू द्याच, परंतु त्यांच्या कातडीचा रंगसुद्धां आजला हिंदुस्थानांत कोठें दिसत नाहीं. समाजशास्त्राची रंगाची व अवयव-मापनाची कसोटी लावतांच आमच्या वेदोनारायण वर्गांतील शेंकडां ९५ लोक अनार्यांच्या किंवा भेसळीच्या कोटींत खडाखड खेंचले जातील, यांत मुळीच संशय नाहीं. जी गोष्ट वेदोनारायण वर्गाची तीच इतर वर्गांची, हें सांगणें नकोच. वर्णसंकराचा बागुलबुवा दाखवून वेळीं अवेळीं कोल्हेकुई करणाऱ्यांनीं आपल्या दांभिकतेच्या धाबळीचा बुरखा किंचित् बाजूला सारून, इतिहासाच्या सहाय्यानें आपल्या

---

* मनुस्मृतीच्या कर्त्याला ' वर्ण ' व ' जाति ' या शब्दांतील भेद जरी कळत होता आणि मनुष्यांत चारच वर्ण आहेत, हें जरी त्यानें ठिकठिकाणीं ठांसून प्रतिपादन केलें आहे तरीसुद्धां अखेर अध्याय १० श्लोक ३२ येथे ' वर्णान्पंचदशैव ' असा शब्दप्रयोग करून वर्ण शब्दाच्या अर्थाचा ब्रह्मघोटाळा करून ठेवला आहे, तो मात्र पाहण्यासारखा आहे.

## आंगांतील रक्ताचें पृथ:करण

करून पहावें, अशी शिफारस आहे. वास्तवीक वर्णसंकर अत्यंत प्राचीन काळींच होऊन बसला आहे, नित्य होतच आहे आणि कोणी कितीहि जरी सोंवळेंपणाची कांटेरी कुंपण नेसून मुकट्या धाबळ्यांच्या पायघड्यांवरून चालत असला, तरी वर्णसंकर असाच पुढें होत राहणार. वेद, उपनिषदें, स्मृत्या, पुराणें हीं जशीं अनादिसिद्ध मानण्याचा भिक्षुकी संप्रदाय आहे, त्याचप्रमाणें

## वर्णसंकर हा अनादिसिद्ध व स्वयंभू

आहे, हें समाजशास्त्राच्या व इतिहासाच्या आधारानें सिद्ध करतां येणें शक्य आहे. वेद उपनिषदें यांतहि संकर झाल्याशिवाय राहिला नाहीं; मग पुराणादि स्मृत्या सध्यां अकरमाशा भेसळीच्या आढळल्यास त्यांत आश्चर्य मानण्याचें काय कारण ? उत्तर हिंदुस्थानांतले वक्रतुंड महाकाय ब्राह्मण किंवा मिरज जंक्शनपासून पुढें करवीर इलाख्यांत व मद्रासकडे आढळणारे काळेकभिन्न कुरूप ब्राह्मण जर पाहिले, तर त्यांनीं होऊन 'मी ब्राह्मण' असें सांगितल्याशिवाय कोणाची खात्री पटत नाहीं. मिरज करवीरचे ब्राह्मण तर रंगारूपानें थेट कोंकणांतल्या कुणब्यांपेक्षांहि गलिच्छ आणि गचाळ दिसतात. आतां यांच्या बाबतींत वर्णाची कसोटी कशी व कोठें लावायची हें समजणें कठीण आहे. पांडवांच्या काळीं पांडवांमध्येंच वर्णसंकर झालेला होता. खुद्द पांडव हीच उघडाउघड नियोगाची प्रजा. भारतकर्ते व्यास, श्रीकृष्ण, अर्जुन, द्रौपदी हीं सर्व काळीं कुळकुळीत होतीं. वर्णसंकराबद्दल प्रत्यक्ष धर्मानेंच नहुषापुढें जबानी दिली आहे कीं " संकरात्सर्ववर्णानां दुष्परिक्ष्येति मे मतिः "– सर्व वर्णांचा संकर झाल्यामुळें निरनिराळ्या जातींची परीक्षा करितांच येत नाहीं. या मागील गोष्टीं सोडून दिल्या आणि अगदीं अलीकडचा एकच हजार वर्षांचा इतिहास घेतला तरी काय दिसतें ? या काळांत हिंदूंच्या जाती व पोट-जाती निरनिराळ्या अलग सवत्या सुभ्याप्रमाणें पोलादी सिमेंटाच्या तटबंदींत जाम जखडून ठेवल्या गेल्या तरीहि त्यांत रक्तांची भेसळ झाल्याशिवाय राहिली नाहीं. अनेक शतकें सुरूं असलेली असंवर्ग विवाहाची पद्धति हिंदूंनीं अमान्य ठरविली, तरीसुद्धां निरनिराळ्या वर्गांतल्या लोकांच्या कातडीचा रंग आणि चेहरेपट्टी यांत भयंकर संकर झाल्याचें व सध्यांहि होत असल्याचें स्पष्ट दिसत आहे. दक्षिणेकडे मद्रास इलाखा पहा. तिकडे

## आर्यब्राह्मण आणि अनार्यब्राह्मण

असे दोन भेद आढळून येतात. शुद्ध आर्य ठशाचे ब्राह्मण कोणते आणि उग्र चेहऱ्याचे, भसाड्या जबड्याचे व फेंफट्या फुगीर नांकपुडीचे अनार्य द्रविडी ब्राह्मण कोणते, हें कोणीहि तेव्हांच ओळखूं शकतो. या दोन भेदांवरून प्राचीन जगज्जेत्या आर्यांच्या नसांतील रक्त सांप्रत किती भ्रष्टावस्थेंत संकरपूर्ण झालेलें आहे, हें स्पष्ट कळून येतें. माणसांनीं आपल्या चलाख बुद्धीसामर्थ्याच्या जोरावर बिनतारी तारायंत्र, गगनकटाह फोडून पार अंतराळांत उड्डाण करून जाणारीं विमानें किंवा मंगळताऱ्यांवरील लोकांचा पृथ्वीवरील लोकांशीं दळणवळणाचा प्रघात शोधून काढला, तथापि विवक्षित ठशाचीं माणसें निर्माण करण्याची कला मात्र त्यांच्या हातांत

नाहीं. अर्थात् मद्रासकडच्या ब्राह्मण जातींच्या चेहऱ्यांवर ज्या अर्थी मिश्र अनुवंशिकत्वाचीं चिन्हें स्पष्ट दिसतात, त्याअर्थी त्यांच्यांत केवढा रक्तसंकर झाला असावा, याची कल्पनाच करणें बरें. हाच नियम थोड्याफार फरकानें हिंदुस्थानांतील सर्व ब्राह्मण वर्गाला लावला म्हणजे त्यांच्या नामधारी ब्राह्मण्याची, त्यांच्या सोंवळ्या पुराणप्रिय मनोवृत्तीची आणि त्यांच्या अनुवंशिक संस्कार-शुद्धतेची करावी तितकी कींव थोडीच ! ज्या अनुवंशिक संस्काराचा नगारा ते आज मोठ्या दमादमानें बडवीत असतात, तोच नगारा आज साऱ्या जगाला धडकाऊन जाहीर करीत आहे कीं अनुवंशिक संस्कृतीची परंपरा व रक्तशुद्धी जर अभ्रष्ट राहिली असती तर प्राचीन आर्यांचा वर्ण व चेहरेपट्टी आणि सांप्रतच्या आर्यत्वाभिमानी हिंदी ब्राह्मणांचा वर्ण, चेहरेपट्टी व शरीररचना यांत एवढा विपर्यासी भेद पडला नसता. तो भेद ज्याअर्थी पडला आहे त्याअर्थी त्यांच्या

## रक्तांत जबरदस्त भेसळ

झालेली आहे, हें निराळें सांगण्याची अवश्यकता नाहीं. प्राचीनकाळचे जगज्जेते आर्य गोरे होते आणि हिंदुस्थानांतील मूळचे रहिवाशी लोक काळे होते. जेते लोक जित लोकांना नेहमींच तिटकाऱ्यानें पाहतात व त्यांचा संसर्गहि आपणांस होऊं देत नाहींत, हें चालू काळच्या इतिहासावरूनसुध्द्वां प्रत्येकास समजून येणार आहे. काळा आणि गोरा हा वर्णभेद पुसला जाणें जवळजवळ अशक्य आहे. वर्णभेद किंवा ' कलर प्रिज्युडिस ' हा प्राचीन काळाप्रमाणेंच चालू मन्वंतरांतील इतिहासाचा लेखक बनला आहे. हिंदुस्थान घ्या, युरोप घ्या, अमेरिका घ्या किंवा सुप्रसिद्ध नाठाळ आफ्रिका घ्या, त्यांतसुद्धां जित आणि जेते, गुलाम आणि स्वतंत्र किंवा काळे आणि गोरे हा भेद प्राचीन आर्यांच्या व अनार्यांच्या भेदाइतकाच तीक्ष्ण असलेला आढळतो. अर्वाचीन पाश्चिमात्य गोऱ्या आर्यांना हिंदी काळ्या आदमींचा तर इतका तिटकारा वाटतो कीं आपल्या मुलांबाळांना

## हिंदुस्थानच्या काळ्या हवेची दृष्ट

लागून त्यांच्या गोऱ्या कातडीत तिची छटा उमटू नये म्हणून ते आपल्या गरोदर पत्न्यांची बाळंतपणासाठीं विलायतेस रवानगी करतात. इतकेंच नव्हे तर संस्कृतीची व पराक्रमाची शर्यत जिंकून, त्यांच्या मांडीशी मांडी लावून बसणाऱ्या एशियाटिक जपानच्या पिंवळसर वर्णाकडेहि ते नेहमीं साशंक नजरच फेंकीत असतात. याचें कारण उघड आहे. जगांत मुख्य वर्ण दोन. काळा आणि गोरा. तांबडा पिंवळा बदामी (गव्हासारखा) वगैरे रंग हे मिश्रणाचे परिणाम आहेत. अर्थात त्यांना मार्क कमीच मिळतात. गोरा वर्ण उच्च संस्कृतीचा द्योतक मानला जातो तर काळा रंग किंवा इतर मिश्र रंग रानटीपणाचे किंवा कमी दर्जाच्या संस्कृतीचे मानले जातात; आणि या दोन वर्णांचा संकर न होऊं देण्याबद्दल गोरे लोक डोळ्यांत तेल घालून जपत असतात. तेव्हां, वर्णांवरूनच जाती पडल्या असें मानलें तर फक्त दोनच जाती पडल्या पाहिजेत. **महाभारत, शांतिपर्व, अध्याय १८८.** (चातुर्वर्ण्यविभागकारण) येथें वर्णा (रंगां)- बद्दल जी माहिती आली आहे, ती येथें समग्र नमूद करतों. '' भृगु म्हणतातः–(ब्राह्मण हे सत्वगुणी असतात व

सत्वगुणाचा वर्ण शुभ्र आहे, म्हणून) **ब्राह्मणांचा वर्ण शुभ्र होय**; (क्षत्रिय रजोगुणी असतात व रजोगुणाचा वर्ण रक्त आहे, म्हणून) **क्षत्रियांचा वर्ण रक्त आहे**; (वैश्य हे रज आणि तम ह्या गुणांनीं व्याप्त असतात; अर्थात् रक्त आणि कृष्ण या दोन वर्णांच्या मिश्रणापासून उत्पन्न होणारा असा) पीत* वर्ण हा वैश्यांचा असतो; आणि (ज्याचा वर्ण कृष्ण आहे अशा तमोगुणानें व्याप्त असल्यामुळें) शूद्र कृष्णवर्ण असतात. **भरद्वाज** म्हणतातः– ह्या ब्राह्मणादि चार वर्णांत जो परस्पर भेद आहे, त्यास कारण जर श्वेतादि वर्ण असतील, तर मग सर्वच वर्ण संकीर्ण आहेत असें दिसून येतें. कारण, प्रत्येक वर्णांत निरनिराळ्या रंगाचे लोक आहेतच. सारांश, **रंगावरून वर्णभेद मानता येत नाहीं.** इतरहि कारणांमुळें वर्णभेद मानतां येत नाहीं. कारण आम्हां ब्राह्मणादि सर्वहि वर्णांवर काम, क्रोध, भय, लोभ, शोक, चिंता, क्षुधा आणि श्रम ह्या सर्वांचा सारखाच अंमल आहे. मग वर्णभेद असण्याचें कारण काय ? ब्राह्मणादि सर्वहि वर्णांच्या शरीरांतून घर्म, मूत्र, मल, कफ, पित्त आणि रक्त हीं सारख्याच रीतीनें बाहेर पडत असतात, मग वर्णभेद मानण्याचें कारण काय ? स्थावर आणि जंगम प्राण्यांच्या अनेक जाति असून त्यांचें रंगहि अनेक प्रकारचे आहेत; मग रंगावरून वर्ण ठरवावयाचा झाल्यास तो कसा ठरवितां येणार ? **भरद्वाज** म्हणतातः–

**न विशेषोऽस्ति वर्णांनां सर्वं ब्राह्ममिदं जगत् ।**
**ब्रह्मणा पूर्व सृष्टं हि कर्मभिर्वर्णतां गतम् ।।**

वर्णांमध्यें असा कांहीं भेद नाहीं. हें सर्व जग प्रथम ब्राह्मणच होतें. कारण तें ब्रह्मदेवानें निर्माण केलें आहे. पण कर्मांच्या अनुरोधानें त्याला वर्णाचें स्वरूप आलें. ह्या ब्राह्मणांपैकीं जे रजोगुणी होते, ते विषयोपभोगांची प्रीति, तीव्रता, कोपिष्टपणा, साहसकर्माची आवड आणि स्वधर्मत्याग† ह्यांमुळें **क्षत्रिय** बनले; रज व तम ह्या गुणांचें मिश्रण झालेले जे ब्राह्मण ते पशुपालन आणि कृषि ह्यांजवर चरितार्थ चालवूं लागले व त्यांनीं स्वधर्माचरण करण्याचें सोडून दिलें ह्यामुळें ते **वैश्य** बनले; आणि ब्राह्मणांपैकीं जे तमोगुणी असल्यामुळें ळिंसा व असत्य ह्यांजवर आसक्त झाले आणि लोभामुळें हव्या त्या कर्मावर उपजीविका करूं लागले, ते **शूद्र** झाले. सारांश, त्या कर्मांच्या योगानें मूळच्या जातीपासून भिन्न होऊन हे निरनिराळेच वर्ण बनले. तथापि त्यांना तत्तद्वर्णोचित धर्म आणि पंचमहायज्ञादि कर्में ह्यांचा केव्हांहि निषेध केलेला नाहीं.'' ऐतिहासिक दृष्टीची सडेतोड भाषा आणि पौराणिकी विवेचनाची ही भाविक भाषा यांत शब्दरचनेचा आणि विचाररचनेचा जरी कांहीं भेद दिसत असला, तरी मूलतः हें महाभारतीय विवेचन ऐतिहासिक दृष्टीपासून फारसें भिन्न नाहीं, हें वाचकांना कळेलच.

* * *

(१६) श्रीकृष्णानें भगवद्गीतेंत गुणकर्मविभागाशः चातुर्वर्ण किंवा चतुर्वर्ग निर्माण केल्याचें जें सांगितले आहे, त्यांतील मतितार्थ समाजशास्त्र व इतिहास या दोन दृष्टींनीं येथें थोडासा परीक्षण करूं. समाज अस्तित्वात आलां, त्यांतील घटकवयांना परस्पर संबंधाची थोडीबहुत जाणीव होऊं लागली, सामाजिक सौख्याची त्याची कल्पना विकास पावू लागली आणि समाजाच्या

* तांबड्या व काळ्या रंगाचें मिश्रण पिंवळें होत नाहीं. शास्त्रीय दृष्टीनें ही मिश्रणाची कल्पना खोटी ठरते.
† म्हणजे धर्मलंडपणा नव्हे. ब्राह्मण्याला परिपोषक अशा धर्मवृत्तीचा त्याग एवढाच अर्थ येथें गृहित धरलेला आहे.

चिरस्थाईत्वाची एक प्रकारची विवंचना उत्पन्न झाली कीं त्याला प्रथम धर्माची भूक लागते आणि नंतर शास्त्राची लागते.

## आधीं धर्म नंतर शास्त्र

हा एक अबाधित क्रम समाजशास्त्रवेत्त्यांनीं ठरविलेला आहे. धर्माची भूक ईश्वरविषयक ज्ञानाशिवाय भागत नसते. अर्थात या ईश्वर-विषयक ज्ञानाचा शोध लावून त्याचा समाजाला पुरवठा करणारा जो वर्ग समाजांतूनच उत्पन्न होतो, त्याला साहजीकच एक प्रकारचें महत्त्व येतें. ब्रह्म काय आहे किंवा असावें याचा मानवी विवेकाला पटण्याइतक्या तर्कशुद्ध पद्धतीनें शोध करून त्याचें ज्ञान समाजाला करून देणारा जो वर्ग तो ब्राह्मणवर्ग होय आणि तो प्रथमच समाजातून उत्पन्न झाल्यामुळे त्याला एकप्रकारचें श्रेष्ठत्व द्यायला समाजाचे इतर घटकावयव कधीहि कां कूं करीत नाहींत. तेव्हां ब्रह्मशोधन आणि ब्रह्मज्ञान-अध्यापन हे ब्राह्मणाचें गुणकर्म ठरले. परंतु नुसत्या ब्रह्मज्ञानाच्या कोरड्या भांडवलावर समाज कांही जिवंत राहू शकत नाही, किंवा नुसत्या ब्रह्मज्ञानमग्नांचाहि समाज अस्तित्वांत येऊ शकत नाही. यानंतरची दुसरी पायरी म्हणजे समाजातील घटकावयांवर योग्य प्रमाणांत दाब ठेवून त्यांचे परचक्रांपासून किंवा अंतस्थ कलहांपासून संरक्षण करण्यास खंबीर असा वर्ग समाजांतूनच निर्माण होतो. याला क्षत्रियवर्ग असें म्हणतात. क्षत्रियांचें गुणकर्म, पराक्रम आणि राजसत्ता यांत सांठविलेले असतें, म्हणूनच त्यांना 'राजन्य' अशी दुसरी संज्ञा आहे. कुंकुमतिलकाशिवाय (हिन्दुजनांत तरी) जसें कोणत्याहि स्त्रीला सौभ्याग्यवती म्हणणें रास्त होत नाही, त्याचप्रमाणें राजसत्तेचा राजदंड हातीं असल्याशिवाय क्षत्रियांच्या क्षात्रवृत्तीलाहि कोणी मान्यता देणार नाही.

## ज्याच्या हातीं राजदंड तोच क्षत्रिय.

समाजाच्या संरक्षणाकरितां लढणें, त्याच्या हिताकरितां दंडनीतीनें त्याचें शासन करणें आणि कोदण्डाच्या टणत्कारानें प्रतिस्पर्ध्यांना दाबांत ठेवून सर्वत्र शांतता राखणें या सर्वांचा क्षत्रियांच्या गुणकर्मांत मुख्यत्वें समावेश होतो. येथपर्यंत सर्व ठीक जुळलें. ब्रह्मज्ञानाचा शोध लावून ब्राह्मण आले. आम्ही सर्वांचें रक्षण करूं म्हणून मिशांवर पीळ देत दंड थोपटीत क्षत्रिय आले. पण समाज कांही या दोन वर्गांच्या गुणकर्मांनींच जिवंत राहणें शक्य नाहीं. हे सगळे विठोबा जमले पण समाजाच्या पोटोबाची व्यवस्था काय ? अर्थात् समाजाच्या आर्थिक गरजा भागविणाऱ्या, अर्थ निर्माण करणाऱ्या, सांपत्तिक स्थिति बलवत्तर करणाऱ्या अशा अणखी एका तिसऱ्या वर्गाची समाजाला गरज पडते. ही गरज शेतकी, उदीम, व्यापार, कलाकौशल्य यांत प्रविण असणारा वैश्यवर्ग समाजांतूनच निर्माण होऊन पुरी पाडतो. तेव्हां शेतकी व्यापार कलाकौशल्य यांचा वैश्यांच्या गुणकर्मांत अंतर्भाव होतो. यानंतर या तीनहि वर्गांच्या नियुक्त कर्तव्यकर्मांत अडथळा येऊं नये, त्यांचे विवक्षित गुणधर्म समाजाच्या सर्वांगीण हितासाठीं योग्य रीतीनें बजावले जावे, म्हणून त्यांची हरएक प्रकारची सेवा करण्यांत वाकबगार असा एक शूद्र वर्ग समाजातूनच निर्माण होतो व त्याच्या गुणकर्माची परीक्षा त्याच्या सेवावृत्तीच्या वाकबगारीवरून ठरते. वास्तवीक म्हटलें तर शूद्र वर्ग असा अगदींच स्वतंत्र वर्ग असत नाहीं. शूद्र हा व्यक्तीचा किंवा समूहाचा

सेवक असतो. अर्थात् सेव्य समूहाच्या गुणकर्मानुसार निरनिराळ्या तऱ्हेची सेवा करीत हा वर्ग वरील तीनहि वर्गांत पांगलेला असतो. ' चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः ' असें जें भगवंतानी म्हटलें आहे, त्याचा वास्तवीक आणि खरा आशय वरील मजकुरांतील विवरणाशी तंतोतंत जुळणारच असला पाहिजे. कारण हिंदुस्थानाशिवाय जातींचें बंड नसलेल्या इतर सर्व देशांतील समाज या गुणकर्मविभागशः वर्गवारीनेंच आपापले धार्मिक, सामाजिक, राजकीय, औद्योगिक संसार बिनतक्रार चालवित आहेत. कितीहि आणि कसाही विचार केला तरी

## गुणकर्मविभागशः वर्गवारी

हेंच तत्व सनातन दिसतें आणि म्हणूनच श्रीकृष्ण भगवंतांनीं त्याचा आपल्या भगवद्‌गीता ग्रंथात समावेश केला. हें जर खरें आहें, समाजहितासाठी कोणीतरी ब्राह्मण आणि कोणीतरी क्षत्रिय, कोणीतरी वैश्य व कोणीतरी शूद्र झालेच पाहिजे आीण शूद्रप्रवृत्तीच्या माणसाला जर ब्राह्मण्य साधणें शक्य नाहीं किंवा वैश्यप्रवृत्तीच्या माणसाला तागडीच्या ऐवजीं तरवार पेलणें निसर्गतःच कठीण जातें, तर मग हिन्दुस्थानातच हें जन्मसिद्ध जातीभेदाचें भूत उत्पन्न कसें व कां झाले ? ब्राह्मणानें शूद्र वृत्तीची हांव बाळगून तींतच रममाण व्हावें आणि शूद्रत्वाची पाटी कपाळावर मारलेल्या प्राण्यांनीं ब्राह्मणांना ब्रह्मविद्येत पराभूत करून क्षत्रियांनासुद्धा

## चल ये पुढें-होऊं दे दोन हात

म्हणून आवाहन करावें, हा काय चमत्कार आहें ? हिंदुस्थानाशिवाय इतरत्र अशा प्रकारची स्पर्धा कोठेंही दिसत नाहीं. गुणकर्मविभागशः वर्गवारी अशाच उदात्त व धूर्त दृष्टीनें प्राचीन आर्यांनीं शोधून काढली कीं तिच्यामुळें समाजांत समतोलपणा राहून असंतोष कोठेंच माजूं नये. मग हा सनातन सिद्धांत हिंदुस्थानांतच कां फोल होत आहे ? जन्मसिद्ध जातीभेद आणि जनतेची बौद्धिक गुलामगिरी यांवर ज्यांच्या नाटकी वर्चस्वाचे मनोरे अझूनपर्यंत जीव धरून उभे आहेत, असे जातिभेदाचे कांही भिक्षुकी मंडणमिश्र मोठ्या आवेशानें प्रतिपादन करतात कीं " अहो, जातिभेद नाहीं कोठें ? सगळीकडे आहे. इंग्लंडांत आहे, फ्रान्सात आहे, जर्मनींत आहे, अमेरिकेत आहे.

## मसणांत सुद्धां जातीभेद आहे.*

इंग्लंडांतले बडे लॉर्ड लोक कधीं मजूर वर्गाशीं अन्नव्यवहार तरी करतात काय, मग बेटीव्यवहाराची गोष्टच राहूं द्या ! त्यांच्यांतसुद्धां श्रीमान, मध्यम आणि सामान्य असे तीन भेद आहेतच कीं नाहीं ? आमच्याकडे एक जास्त. मग जातीभेद नाहीं असें कसें म्हणतां ? आमच्याकडे जातिभेदामुळें जर असंतोष आहे असें घटकाभर गृहीत धरलें तर विलायतेंतहि तोच प्रकार सध्यां चालूं आहे, [जातिभेदामुळें असंतोष माजला आहे हें या मंडणमिश्रांस मान्यच नाहीं. उलट जातिभेदच नाहीं असें ते प्रतिपादन करीत असतात.] हें मजुरपक्षाच्या धडपडीकडे पहा म्हणजे कळून येईल." इंग्लंडांतील किंवा यच्चावत् पाश्चात्य देशांतील असंतोषाचें कारण

*मुंबईच्या सोनापुरांत नसला तरी शहाण्या पुण्याच्या ओंकारेश्वरांत जातिभेद खरोखरच आहे, हें पुण्याच्या राष्ट्रीय बाण्यास मोठें भूषण आहे, हें कोणीहि झाला तरी प्रांजळपणें कबूलच करील.

आणि आमच्याकडील सामाजिक असंतोषाचें कारण या दोनहि गोष्टीं पूर्व-पश्चिमेइतक्याच भिन्न आहेत. तिकडे वर्गभेद आहे परंतु तो लवचिक आहे. तो दर्जावर मानला जातो. त्याच्या मर्यादा पराक्रमी पुरुषाला एकाच जन्मांत उल्लंघितां येतात. सामान्य वर्गांत चर्मकाराच्या घराण्यांत जन्माला आलेले लॉइड जॉर्ज स्वपराक्रमानें ताडकन् उडी मारून श्रीमान वर्गाच्या दर्जावर जाऊं शकतात. इकडे

## जाती जन्मावर ठरल्या

असल्यामुळें प्रत्येक व्यक्तीला आपल्या गुणकर्माचा विकास होऊं न देतां जन्मप्राप्त जातीच्या कफनाखालींच असंतोषाच्या क्षयरोगानें झुरून मरून मसणवटीची वाट धरावी लागते. त्यांचा परिस्थितिसिद्ध वर्गभेद लवचीक व उल्लंघनीय, आमचा जन्मसिद्ध जातीभेद कडकडीत व अनुल्लंघनीय. त्यांच्या सामान्याला गुणकर्माच्या पराक्रमानें मध्यम किंवा श्रीमान एकाच जन्मांत होतां येतें, आमच्या शुद्रांना गुणकर्माच्या जोरावर शाहण्यासुर्त्या ब्राह्मण लोकांच्या आवारांतसुद्धां येण्याची मनाई. एवढा हा ठळक भेद या मंडणमिश्रांच्या ध्यानी येऊ नये काय? गुणकर्मविभागशः ठरलेल्या वर्गवारीचें दुष्ट पर्यवसान जन्मप्राप्त जातींत भिक्षुकशाहीनें केलेलें आहे. हिंदुस्थानांतील सामाजिक असंतोष आणि पाश्चात्य देशांत हल्लीं बोकाळलेला असंतोष यांची किंचित बारकाईनें छाननी केली तर पाश्चात्य देशांतील निरनिराळ्या वर्गांतील चुरस म्हणजे

## समसमान हक्कांचें भांडण

आहे, असेंच दिसून येईल. स्त्रियांनींसुद्धां पुरुषांच्या बरोबरींच्या हक्कासाठीं भांडभांडून अखेर पार्लमेंटांत खुर्च्या पटकवल्या. मनुष्यप्राणी हीं सर्व एकाच ईश्वराचीं लेंकरें असल्यामुळें एकानें मरेमरे तों काम कां करावें आणि दुसऱ्यानें ऐदी खुशालचंदप्रमाणें त्यांच्या श्रमाच्या मोबदल्यावर गब्बर कां व्हावें ? हा एक प्रश्न* तिकडे उपस्थित झाला आहे. याच प्रश्नातून बोल्शेविझम् ऊर्फ समानसत्तावादी रामरगाड्या गुंडांचा धुडगुस जन्माला आला आहे. या धुडगुसानें पोट आणि अवयव या तात्विक गोष्टींतलें किंवा गुणकर्मविभागशः सूत्रांतलें उत्कृष्ट तत्व पायाखालीं लाथाळलें जात आहे; अर्थात् या

## गुंडांच्या गुंडगिरीचा परिणाम

तिकडील समाजरचनेचा अखेर विध्वंस केल्याशिवाय राहणार नाहीं, असें भाकीत करण्यास ज्योतिषशास्त्राचीं बाडेंच उलथींपालथीं करायला नकोत. पाश्चात्यांच्या या असंतोषाच्या मुळाशीं राजकीय सत्तेच्या वर्चस्वाची अहमहमिका आहे. आमच्या इकडील असंतोष सामाजिक जुलमाचा प्रतिकार करण्यांसाठीं उत्पन्न झाला आहे आणि तो आजच उत्पन्न झाला नसून, जन्मसिद्ध

*Equality in civil life is something absolutely impossible ; for individual distinetions of sex and age will always assert themselves ; and even if an equal share in the Government is accorded to all citizens, women & children are immediately passed by and remain excluded. The distinction between poverty and riches, th influence of skill and talent, can be as little ignored,—utterly refuting those abstract assertions.

Philosophy of History-Hegel, p. 152.

सामाजिक उच्च-निचतेच्या भावनेनें गीतेंतील गुणकर्मविभागाच्या व्यवस्थेची मुस्कटदाबी करण्याचें गुप्तकारस्थान जेव्हां जन्माला आलें तेव्हांपासूनच आहे. आमची प्राचीन समाजरचना व समाजव्यवस्था आतांप्रमाणें जन्मप्राप्तीच्या काकतालीय न्यायावर अथवा अनुवंशिक संस्काराच्या काल्पनीक म्हणूनच असिद्ध अशा सिद्धांतांवर ठरविलेली नव्हती.

## राष्ट्रसेवा हा हिंदूंचा समाजधर्म

होता. प्रत्येक व्यक्तीला आपल्या आंगच्या नैसर्गिक गुणकर्माचा पूर्ण विकास करण्याची मुभा होती. या गुणकर्मविकसनाच्या मार्गात कोणत्याहि प्रकारचे दैवी, मानवी, धार्मिक किंवा सामाजिक निर्बंधांचे अडथळे उत्पन्न झालेले नव्हते. म्हणूनच तत्कालीन् हिंदी आर्यांना समतोल समाजव्यवस्थेच्या जोरावर सारी दुनिया पादाक्रांत करणें सोपें गेलें. ज्या ज्या क्षेत्रांत ज्याला ज्याला जी जी कर्तबगारी गाजवितां येण्यासारखी असे, तिचा तो सार्वजनिक व राष्ट्रीय हितवर्धनार्थ उपयोग करण्यास पूर्ण स्वतंत्र असे. यामुळें प्रत्येकाच्या विवक्षित गुणकर्माचा उत्तम परिपोष होऊन तेंच उत्तरोत्तर अधिकाधिक जोमदार व कणखर बनविण्याची संधी त्यास प्राप्त होत असे. अशा प्रकारच्या दूरदर्शी आणि मुत्सदेगिरीच्या वर्गवारीमुळें राष्ट्रांत सांपत्तिक विभागणी यथायोग्य प्रमाणांत होऊन दुर्भिक्ष किंवा असंतोष यांचें वारें कोठेंहि नसें; मानसिक व नैतिक बल थरारत असे; राष्ट्राची सर्वांगीण कर्तबगारी सदासर्वदा कर्तव्योन्मुख असे आणि सर्वत्र समाधान असल्यामुळें प्रगमनशीलतेची मुस्कटदाबी किंवा नवमतवादाची गळचपी कधींच होत नसे. वैयक्तिक किंवा सामाजिक उच्चनीचतेचा मक्ता जन्मप्राप्तीच्या स्वाधीन नसल्यामुळे प्राचीन हिंदू आर्यांत अक्षरशून्य महामूर्ख ब्राह्मण, शेंदाड क्षत्रिय, कमकुवत वैश्य किंवा दास्यांतच कुझणारे शूद्र मुळींच अस्तित्वांत नव्हते. **रेव. एफ. डी. मॉरीस** आपल्या The religions of the world ( p. 43 ) नामक ग्रंथांत म्हणतात, " शूद्र म्हणजे गुलाम असें मुळीच समजूं नका, त्यांना गुलाम करता येणें शक्यच नव्हतें. (कारण गुलामगिरीची कल्पना प्राचीन हिंदू आर्यांत मुळींच नव्हती.) हिंदुस्थानांतील सर्व वर्गाचे लोक स्वतंत्र नागरीक असलेले पाहून ग्रीक लोकांना मोठा अचंबा वाटला." त्याचप्रमाणें ' हिंदुस्थानचा इतिहास ' कर्ते **मि. एलफिस्टन साहेब** म्हणतात " हिंदूंच्या प्राचीन नाट्यग्रंथांत राज्याच्या सभोंवतीं असणाऱ्या कोणत्याही व्यक्तींच्या भूमिका पहा, त्यांत गुलामगिरीचा लवलेषहि तुम्हांला आढळून येणार नाहीं ही एक विशेष लक्षांत ठेवण्यासारखीं गोष्ट आहे. " (पृ. २४३). त्या काळीं ब्राह्मणाच्या पोटी जन्मल्यामुळें कोणी ब्राह्मण मानला जात नसे किंवा शूद्राचा पुत्र म्हणून यावज्जन्म शूद्रवृत्तींतच कोणास खितपत पडावें लागत नसे. ब्राह्मण म्हणविणाऱ्याच्या, किंवा ब्राह्मणाच्या गुणकर्मांत प्रविण असणाराच्या पुत्राला क्षत्रिय वैश्य किंवा शूद्रहि होणें भाग पडत असे आणि शूद्रसुद्धां स्वतःच्या गुणकर्मांनीं वैश्य क्षत्रिय किंवा ब्राह्मण बनूं शकत असे. **कै. कर्नल् आल्कॉट** म्हणतात, " हिंदू लोक आतां जसे जातिभेदाच्या बिनमुर्वत तटबंदींत जाम जखडले गेले आहेत, तसे ते पूर्वी मुळींच नव्हते ; आपापल्या जन्मजात गुणकर्मांप्रमाणें समाजव्यवस्थेतील अत्युच्च मानाचा दर्जा पटकविण्यास किंवा अत्यंत निकृष्ट दर्जांत जाऊन पडण्यास प्रत्येकजण अगदी स्वतंत्र असे." आपस्तंब धर्मसूत्रकारांचा अभिप्राय जवळजवळ असाच आहे :—

अधर्मचर्यया पूर्वो वर्णो जघन्यं जघन्यं
वर्णमापद्यते जातिपरिवृत्तौ ॥१०॥

' अधर्मचरणानें उच्च वर्णाचा मनुष्य अवनत होतो.' शांकरदिग्जयकार म्हणतात " जन्मना जायते शूद्रः संस्कारात् द्विज उच्यते। वेदपाठी भवेत् विप्रः ब्रह्म जानाति ब्राह्मणः ॥" [अर्थः–जन्मतः प्रत्येकजण शूद्र असतो आणि पुढें संस्कारांमुळेंच द्विजत्व प्राप्त होतें. वेदाभ्यासप्रविणाला विप्र ही संज्ञा प्राप्त होते, तर ब्रह्मज्ञानवेत्ता ब्राह्मण होतो.] या तत्त्वांना सिद्ध करणाऱ्या अनेक माणसांच्या गोष्टीं प्राचीन ग्रंथांत ठिकठिकाणीं दिलेल्या आढळतात. ऐतरेय ब्राह्मण ग्रंथांत (२-३-१९) कवष ऐलुषाची हकीकत आलेली आहे. कवष ऐलुष हा हीन जातीच्या स्त्रीपासून जन्मलेला शूद्र होता. परंतु याच्या अगाध विद्वत्तेमुळें याला ऋषिवर्गांत उच्च स्थान देण्यांत आले; विशेष गोष्ट ही कीं हा हीनजात शूद्र अखेर ऋग्वेदांतील कांही ऋचांचा कर्ता बनला. (ऋ. मं. १०-३० ते ३४). छांदोग्योपनिषदांतील सत्यकाम जाबालीची कथा तर प्रसिद्धच आहे. याच्या बापाचा पत्ता तर नव्हताच नव्हता, परंतु मातोश्री सैरंध्री कर्म करीत असल्यामुळें अनेक यजमानांपैकी कोणाच्या अंशानें जाबालीची उत्पत्ति झाली हें सुद्धां तिला धड सांगतां येईना. परंतु सत्यप्रीति (सत्यवचनप्रियता) या एका गुणामुळेंच (आधुनीक भिक्षुकी भाषेंत बोलायचे तर) त्या

## अकरमाशाचा ब्राह्मणांत समावेश

बिनदिक्कत करण्यांत आला; आणि अखेर हाच जाबाली एका यजुर्वेद शाखेचा संस्थापक बनला. सुप्रसिद्ध पाणिनी आपल्या अष्टाध्यायीच्या ६ व्या अध्यायांत चक्रवर्मा नांवाच्या एका व्याकरणकाराचा उल्लेख करतो. ' वर्मा ' या उपपदावरून चक्रवर्मा क्षत्रिय होता, हें अधिक स्पष्ट करून सांगावयालाच पाहिजे असें नाहीं. केवळ गुणकर्मांवरूनच ब्राह्मण क्षत्रियादि वर्गांच्या आदलाबदली होत असल्याचा पुरावा देणारीं अशीं शेकडों उदाहरणें देतां येतील. अगदीं अलीकडच्या काळांत, ग्रीक लोकांच्या स्वारीच्या सुमारास, जरी पाहिलें तरी हिंदु आर्यांतला जातिभेद पाषाणी तटबंदीचा बनलेला नव्हता. ग्रीक ग्रंथाकार चारच* वर्गांचा उल्लेख करतात. मेगॅस्थेनीस म्हणतो, "A Hindu of any caste may become a Sophist i.e. Brahmana." (कोणत्याही जातीच्या हिंदूला ब्राह्मण होता येत असे.) **कर्नल टॉड्**चीही जबानी अशीच आहे. तो म्हणतो की :–"In the early ages of these Solar and Lunar dynasties, the priestly office was not herediatary in families; it was a profession, and the geneologies exhibit frequent instances of branches of these races terminating their martial career in the commencement of a religious sect or 'gotra' and of their descendants

*अरायन हा सात जातीं असल्यांचें म्हणतो. त्या येणेंप्रमाणें :—(१) Sophists ब्राह्मण, (२) Agriculturists शेतकरी, (३) Herdsmen गुराखी किंवा मेंढपाळ, (४) Handicrafts and artizens कलाकौशल्यवाले (जिनगर), (५) Warrious लढवय्ये, (६) Inspectors चौकशीदार, आणि (७) Councillors मंत्रि. (Strabo Lib XV) या उताऱ्यावरून गुणकर्मांवरून वर्गवारी होण्याची पद्धत त्याकाळीं प्रत्यक्ष अंमलांत होती हें निर्विवाद सिद्ध होत आहे.

reassuming their warlike occupations." [अर्थ :—फार प्राचीन काळीं, या सूर्य चंद्रवंशातल्या पुरोहिताच्या जागा वंशपरंपरेनें विवक्षित कुटुंबांकडेच सोंपविलेल्या नसत; पुरोहितपणा हा त्या काळीं एक धंदा मानला जात असे, (अर्थात् ज्याला तो साधत असे तो करीत असे; बापाने भिक्षुकी केली म्हणून लेकानेंही झोळीचा वारसा सिद्ध करण्याची प्रवृत्ति त्या काळीं मुळींच नव्हती.) शिवाय दोनहि वंशांतल्या अनेक घराण्यांत अशीं उदाहरणें आढळून येतात कीं कित्येकांनी क्षात्रवृत्तीला रामराम ठोंकून धार्मिक वृत्तीचा अंगिकार केला व आपले गोत्रहि निराळेंच बनविलें. पुढें याच धर्मप्रवर्तकांच्या वंशांत असेहि कांही वंशज उत्पन्न झाले कीं त्यांनीं धार्मिक वृत्तीला झुगारून देऊन पुनश्च आपल्या जुन्या क्षात्रवृत्तीचा स्वीकार केला.] या सर्व विवेचनावरून इतकें सिद्ध होतें कीं पूर्वी जात ही जन्मसिद्ध किंवा वंशपरंपरेनें ठरली जात नसे. प्रत्येक व्यक्तीं आपापल्या जन्मानुजन्मपरिणत गुणकर्मांच्या बलावर उच्च किंवा नीच सामाजिक दर्जा पटकावण्यास पूर्ण स्वतंत्र व मुखत्यार असे. यामुळें

## पोट आणि अवयव यांचे भांडण

न लागतां सामाजिक उन्नतीच्या जोरावर इतर सर्व उन्नतींचे गड कोट किल्ले भराभर जिंकण्यास फारसें अवघड जात नसे. अर्थात् या उदात्त, व्यापक आणि निसर्गाच्या नियमांना अनुसरून असणाऱ्या वर्गवारींचे पर्यवसान जन्मसिद्ध जातिभेदांत करण्याचा जेव्हां भिक्षुकशाहीनें नीच स्वार्थी उपक्रम केला, तेव्हांच हिंदूंच्या सामाजिक उन्नतीच्या महासागराला ओहटी लागली. ही ओहटी अजूनपर्यंत वाढत्याच प्रमाणावर आहे आणि गेल्या दीड हजार वर्षांत हिनें हिंदूंचा स्वाभिमान स्वराष्ट्राभिमान आणि स्वातंत्र्य हीं पार धुवून टांकून त्यांना सर्वच बाबतींत

## खंक ऊर्फ शंख

बनविलें आहें. आतां या शंखांच्या निव्वळ प्राणत्राणपरायण अशा चळवळींना कोणी शंखध्वनीची उपमा दिल्यास ती अक्षरशः सार्थ नाही, असें कोण म्हणेल ? हें कांहीहि असो, गुणकर्मांवरून वर्गवारी ठरविण्याच्या प्राचीन तत्वाला मान देणारे लोक व्यवहारांत मात्र गुणभ्रष्टतेचे चोचले माजवून जन्मप्राप्त जातिवर्चस्वाच्या टिमक्या पिटण्याच्या मोहाला बळी पडल्याशिवाय रहात नाहींत, असा अनुभव अझूनही येतो. हल्ली एकराष्ट्रीयत्वाचें वारें हिंन्दुस्थानांत वहात आहे. या वाऱ्याचा फायदा घेऊन आपल्या आत्मस्तोमाचीं शिडें फुगविणारें 'राष्ट्रीय' महात्मे, गुणकर्मविभागशः वर्गवारी आणि जन्मसिद्ध जातिमहात्म्याची वारसदारी यांचे भिक्षुकी प्रवचन करतांना, एकाच तोंडातून सर्द गरम हवेचे फवारे कसे उडवितात हें पहाणें अलीकडे बरेंच करमणुकीचें साधन होऊन बसलें आहे

विद्वनमान्य ॲनी बेझंटबाई आपल्या ' सामाजिक सुधारणांची आवश्यकता ' या मथळ्याच्या एका व्याख्यानांत गुणकर्मविभागशः वर्गवारी संबंधानें म्हणतात :—" जन्म आणि गुणकर्म ही जोडी एकसमयावच्छेदें जर एकत्र नसेल, तर जातीच्या महतीच्या वल्गना फोल होत. महाभारतांतील वनपर्वाच्या १८० व्या अध्यायांतील नहुष युधिष्ठिर संवाद पहा. ब्राह्मण कोण ? या नहुषाच्या प्रश्नाला युधिष्ठिरानें उत्तर दिलें कीं :—

सत्यं ज्ञानं क्षमाशीलमानृशंस्यं तपो घृणा ।
दृश्यते यत्र नागेंद्र स ब्राह्मण इति स्मृतः ॥

[ अर्थः—हे सर्पश्रेष्ठा ! ज्याच्या आंगीं सत्य, दान, क्षमा, सुस्वभाव, घातुकपणाचा अभाव, तप आणि दया हीं दिसून येतात त्यासच ब्राह्मण असें म्हणावयाचें ] त्यावर नहुषानें सवाल केला कीं :—

चातुर्वर्ण्यं प्रमाणं च सत्यं चेत्ब्रह्म चैवहि ।
शूद्रेष्वपि च सत्यंस्याद्दानमक्रोध एव च ॥

[ अर्थः—चातुर्वर्ण्याची व्यवस्था प्रमाण मानली पाहिजे आणि सत्य हेंच जर ब्रह्म अथवा ब्राह्मण्य असेल, तर शूद्राच्याहि ठिकाणीं सत्य, दान, शान्ति इ. दिसतात. त्याची वाट काय ? ] त्यावर धर्मानें स्पष्टच खुलासा केला कीं:—

शूद्रे तु यद्भवेल्लक्ष्म द्विजे तच्च न विद्यते ।
न वै शूद्रो भवेच्छूद्रो ब्राह्मणो न च ब्राह्मणः ॥

[**अर्थः**—जर शूद्रांत हें लक्षण असेल आणि ब्राह्मणांत हें लक्षण नसेल, तर तो शूद्रहि शृद नाहीं व ब्राह्मणहि ब्राह्मण नाहीं. ज्याठिकाणीं हें वर्तन दिसेल तो ब्राह्मण समजावा आणि ज्याठिकाणीं हें वर्तन नसेल तो शूद्र समजावा. ]*

गुणकर्म आणि जाति हीं जर एकच नसतील, तर जात म्हणजे शुद्ध ढोंगधत्तुरा होय. अशा जातीच्या अभिमानाला धर्मश्रद्धेच्या सदरांत कोणीहि गणणार नाहीं......आज गेलीं कितीतरी वर्षें ब्राह्मणांनीं आपल्या जातीचा सत्यानाश चालविला आहे. हिंदुस्थानांत कोणीकडेहि जा, जेथें तेथें तुम्हाला ब्राह्मणच पुढारी दिसतील; पण विद्येंत-ज्ञानांत-ते मात्र पुढारलेले असतातच असें मात्र मुळींच नाही. आज काल जिकडे पहावें तिकडे

## ब्राह्मण वकीलांचा सुळसुळाट !

कायद्यांचा अभ्यास आणि कोर्टांतली वकिली हा ब्राह्मणांचा धर्म कधिंपासून झाला ? कोणाच्या स्मृतींत हा धर्म सांगितला आहे ? पण प्रकार काय आहे तो पहा. न्यायाधिशाच्या खुर्च्या आणि वकिलांचीं दालनें ब्राह्मणांनीं चिक्कार भरलेलीं ! सार्वजनिक किंवा स्वार्थत्यागाच्या बाबतींत हेच वकील लोकांचे पुढारी असलेले मला ठिकठिकाणीं आढळतात. पण वकीली हा कांही ब्राह्मणांचा धर्म नव्हे.

*महाभारताच्या मराठी भाषांतरकाराची मा स्पष्टोन्तींने अगदीं तिरपीट उडून गेली आहे. धर्माचा हा सडेतोड सरळ जबाब ऐकूण खुद्द नहुषाची किंवा तत्कालीन् ब्राह्मणांची जरी घामरगुंडी उडाल्याचा दाखला नाहीं, तरी आमच्या कै. विद्यावाचरूपति राशिवडेकरांची मात्र मोठी धांदल उडाली. महाराष्ट्रांतले मूर्ख लोक या श्लोकाचा शब्दशः अर्थ घेऊन आधुनीक नामधारी ब्राह्मणांच्या ब्राह्मण्य-लेबलाला टरकाऊन त्या ठिकाणीं शूद्रत्त्वाची पाटी ठोंकतील कीं काय, या भीतीनें त्यांनीं या श्लोकावर तब्बल एक पानभर मल्लीनाथी केली आहे. [चिपळूणकर मभा पृ. ३६६] कारण काय ? तर म्हणें ब्राह्मणांसाबाधाचें हें विवेचनं फार **दुर्बोध** आहे. तें फारच सुबोध करतांना विद्यावाचस्तति भाषांतरकार खुलासा करतातः—ज्याठिकाणीं हीं सत्यादिक लक्षणें दिसून येतील तोच ब्राह्मण असून ज्याठिकाणीं तीं नसतील तो शूद्र होय, असें जें धर्मराजानें सांगितलें आहे, त्यावरुन ज्याच्याठिकाणीं सत्यादि आचार नसतील तो शूद आणि असतील तो ब्राह्मण, असें ठरत नसून, सत्यादिक आचारांनीं संपन्न असणें हें ब्राह्मणाच्या उत्कृष्ट ब्राह्मणत्वाचें द्योतक होय व ज्याच्या ठिकाणीं हे आचार नसतील तो ब्राह्मण शूद्रतुल्य होय असें ठरतें. तसेंच ब्राह्मणत्व हें मूळचेंच सिद्ध आहे असेंहि सिद्ध होतें. म्हणजे, कै. विद्यावाचस्पतीनीं उत्कृष्ट ब्राह्मण व निकृष्ट ब्राह्मण अशा आणखी दोन नवीन ब्राह्मणांच्या जाती पैदा केल्या म्हणायच्या? यांचें नांव भिक्षुकी मल्लीनाथीचा मासला-आधींच महाभारत ग्रंथ सौतीच्या घुसडाघुसडीनें मनस्वी संकरपूर्ण झालेला आहे. त्याच्यांत असल्या मल्लीनाथ्था वरचेवर घुसडूं लागल्या कीं आणखी शंभर वर्षांनीं या महाग्रंथाकडे पहाण्याची सोयच राहणार नाहीं.

## कायद्यांचें क्षेत्र क्षत्रियांचेंच आहे.

ब्राह्मांना त्यांत ढवळाढवळ करण्याचा अधिकार काय? कायदेपांडीत्यावर उपजीविका करणाऱ्या ब्राह्मणाला मनूनें निषिद्ध मानलें आहे; आणि आपल्या अशिलाचा दावा जिंकण्यासाठी ब्राह्मण वकील नेहमीं ज्या मनूच्या वचनांचा आधार घेत असतो, त्याच मनूच्या वचनांनीं तो आपल्या ब्राह्मण्याचा आधार समूळ ढांसळवीत असतो; कारण ब्राह्मणानें वकीली करणें हा मनुस्मृतीच्या दृष्टीनें शुद्ध अधर्म आहे. वकीलांप्रमाणें ब्राह्मण डाक्तरांनाही फार ऊत आला आहे. ब्राह्मणानें वैद्यकी करणें हें मनुस्मृतीच्या दृष्टीने अधर्म कर्म होय. माणसांचे रोग बरे करणें हा कांही ब्राह्मणांचा धर्म नाही. बरें, ब्राह्मणानें नेहमी निष्कांचन राहिलें पाहिजे. पण आज ब्राह्मणांत किती तरी ब्राह्मण

## सोनें कुटणारे सावकार

होऊन बसले आहेत. कलकत्त्याच्या एका ब्राह्मण वकीलाची मासिक प्राप्ती दहा हजारावर आहे. ब्राह्मण या दृष्टीनें (ब्राह्मण्याची चाड असेल तर) त्याला यांतल्या एक रुपडीलाही हात लावण्याचा अधिकार नाहीं ; तो अधर्म आहे. त्यानें नेहमीं निष्कांचनच राहिलें पाहिजे. आंगावर दोन वस्त्रें-एक धोतर आणि एक उपरणें-याशिवाय कांहींहि घेतां कामां नये. वैदिक ज्ञानांत त्यानें पारंगत असलें पाहिजे आणि त्यानें नेहमीं ज्ञानप्रसार करीत राहिलें पाहिजl. " [The birth of New India, pp 224–226] " षटकर्मांपैकीं अध्ययन आणि अध्यापन या दोनच गोष्टी जर ब्राह्मणी परंपरेंत अखंड राहिल्या असत्या, तरीदेखिल आजला ब्राह्मणवर्ग हिंदुस्थानांतून नष्ट झाला नसता. परंतु ब्राह्मणेतरांना बौद्धिक गुलाम बनविण्याची अवदसा जेव्हां ब्राह्मणांना आवडली, तेव्हां अध्यापनाबरोबरच त्यांच्या अध्ययन-कर्माचाहि समूळ लोप झाला.

**यथेमां वाचं कल्याणी मावदानि जनेभ्यः ।**

**ब्रह्मराजन्याभ्यां शूद्राय चार्यायच स्वाय चारणाय ॥***

**अर्थः**––परमेश्वर म्हणत आहे कीं ( यथा ) ज्याप्रमाणें मीं ( जनेभ्यः ) सर्व मानवांसाठीं, ( ब्रह्मराजन्याभ्याम् ) ब्राह्मण, क्षत्रिय, ( अर्याय ) वैश्य, ( शूद्राय ) शूद्र, ( स्वाय ) भृत्य, स्त्री इत्यादिक व ( अरणाय ) अतिशूद्रादिक यांच्यासाठी, ( इमाम् ) या ( कल्याणीम् ) संसार व मुक्ति यांतील सुखें प्राप्त करून देणारी ( वाचम् ) ऋग्वेदादि चारहि वेदरूप वाणी आहे, तिचा ( आवदानि ) सर्वांस उपदेश केला-सर्वांसाठीं वेदांचा प्रकाश केला, त्याचप्रमाणें तुम्हींहि करावा. ( वेदमंत्रार्थांचें श्रवण मननहि सर्वांनीं करावें व चांगल्याचें ग्रहण व वाईटाचा त्याग करून,

---

*यावर श्री. श्रीपाद दामोदर सातवळेकर 'लोकमित्र' जाने. १९२० च्या अंकांत येणेंप्रमाणें टीका करतात :-" अर्थात् देश जात कुळ गोत्र रंग रूप भाषा इत्यादि कारणामुळें कोणाहि माणसाला विद्येपासून दूर ठेवण्याचा अधिकार कोणालाहि नाहीं. जे कोणी अशा प्रकारें दुसऱ्यांना ज्ञानापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करतील ते मानवी उन्नतीच्या मार्गांत विघ्नें उत्पन्न करतील. यासाठीं सर्वांनीं ज्ञानप्रचाराला अवश्य मदत केली पाहिजे. विद्येचा प्रचार करणें हेंच मनुष्यत्वाचा विकास करण्याचें एक मुख्य साधन आहे."

*(२) Knowledge is the excellency of man, whereby he is usually differenced for a brute, —*Swinnock.*

दुःखापासून मुक्त होवून आनंदित व्हावें.) ही आमच्या प्राचीन आर्यपूर्वजांची विश्वव्यापक उदार मनोवृत्ति पहा आणि मनु याज्ञवल्क्य पराशरादिकांच्या स्मृत्यांच्या आधारावर क्षुद्र वृत्तीचा धांगडधिंगा घालणाऱ्या भिक्षुकशाहीच्या नीच मनाचा संकुचितपणा पहाः—

**(१) न शूद्राय मतिं दद्यान्नोच्छिष्टं न हविष्कृतम् ।**
**न चास्योपदिशेद्धर्मं न चास्य व्रतमादिशेत् । ८०-४**
**यो ह्यस्य धर्ममाचष्टे यश्चैवादिशति व्रतम् ।**
**सोऽसंवृतं नाम तमःसह तेनैव मज्जति ॥ ८१-४**

**अर्थः**——शूद्रास साक्षात् फल देणारी युक्ति सांगू नये. जो दास नाहीं अशा शूद्रास उच्छिष्ट अन्न देऊं नये. होम करून राहिलेला हविःशेष देऊ नये. त्यास कोणताही धर्मोपदेश करूं नये व कोणतेंहि प्रायश्चतादि व्रत सांगूं नये. तर ब्राह्मणास मध्यस्थ करून त्याच्याद्वारां त्यास धर्मादि सांगावें. कारण जो या शूद्रास धर्म सांगतो किंवा व्रतोपदेश करतो तो शूद्राबरोबरच असंवृत नामक गहन नरकांत पडतो.

**(२) ( वेदाङ्गानि संपठेत् ) न शूद्रजन संन्निधौ ॥ ९८, ९९-४**

**अर्थः**—शूद्रलोकांजवळ वेद म्हणूं नयेत.

**(३) नास्ति स्त्रीणां क्रिया मन्त्रेरितिधर्मे व्यवस्थितिः ।**
**रक्षिता यत्नतोऽपीहि भतृष्वेता विकुर्वते ॥ १५-९**

**अर्थः**——स्त्रियांच्या जातकर्मादि क्रिया मंत्रांच्या योगानें करूं नयेत, अशी शास्त्राची मर्यादा आहे. श्रुति व स्मृति हीं धर्माचीं प्रमाणें असून त्यांचा स्त्रियांस अधिकार नसल्यामुळें त्या धर्मज्ञ नसतात. पापांचा नाश करणारा जो मंत्रांचा जप तो त्यांस करतां येत नसल्यामुळे पाप झालें तरी तें घालविण्यास त्या असमर्थ व असत्याप्रमाणें अशुभ असतात अशी शास्त्रीय स्थिति आहे.

**(४) तान्सार्वान्घातयेद्राजा शूद्रांश्च द्विज लिंगिनः ॥ २२४–९**

**अर्थः**——यज्ञोपवितादि द्विजचिन्हें धारण करणाऱ्या शूद्रांस. राजानें देहान्त शिक्षा द्यावी.

**(५) वेदाक्षरोच्चारणात्तुक्षत्रियैर्धर्मपालकैः**
**जिव्हाच्छेदोस्यकर्तव्यः शूद्रस्येतिविनिश्चयः ॥**

**अर्थः**——धर्मपालन करणारे जे राजे असतील त्यांनीं शूद्र वेदाक्षरांचा उच्चार करील तर त्या जिव्हेचा छेद निश्चयें करून करावा. वगैरे.

कोठें तोंडांत शिशाचा रस ओतण्याचे, कोठें आंगांवर जळतें तेल ओतण्याचे, डोळे फोडण्याचे, लिंग छेदन करण्याचे वगैरे अनंत अमानुष शिक्षेचे प्रकार भिक्षुकी (अ) धर्मग्रंथांत ठिकठिकाणीं आढळतात; इतकेंच नव्हे तर भिक्षुकशाहीनें त्यांची अक्षरशः अंमलबजावणी केल्याचे दाखले इतिहासांतून आम्ही वाटेल तितके काढून दाखवूं. वरच्यासारखे असंख्य उतारे स्मृत्या व पुराणांसारख्या उनाड भिक्षुकी ग्रंथातून देतां येतील; परंतु स्थलसंकोचास्तव येथें एवढें म्हटलें

म्हणजें पुरें आहे कीं आजला असा एकहि धार्मिक (?) ग्रंथ उरला नाहीं की ज्यांत ब्राह्मणांनी आपल्या स्वार्थी मतांची भिक्षुकी खरुज पेरून ठेवलेली नाहीं. एकटा महाभारत ग्रंथच का घ्या ना; तो देखिल अर्वाचीन भिक्षुकी नायट्यानें इतका चिडचिडलेला आहें कीं मोठमोठ्या विद्वान् संशोधकांचीं उडदामाजीं काळें गोरें । काय निवडावें निवडणारें ।। अशी अनुकंपनीय स्थिति जाहली आहे. यावरून एवढाच निष्कर्ष निघतो कीं आपलें स्वतःचें वर्चस्व अबाधित राखण्यासाठीं व इतरांना गुराढोरांइतकेंच मतिमंद गुलाम बनविण्यासाठीं ब्राह्मणांनीं

## सनातन वैदिक धर्माचा खून

करण्यासहि मागेंपुढें पाहिलें नाहीं; आणि हा धर्माचा खून करणारे, जनतेला निर्विद्य करून गुलाम बनविणारे, अघोरी मतमतांतरें प्रचलित करून अंधश्रद्धेच्या जोरावर मूढ झालेल्या लोकांकडून आपले हातपाय रगडून घेणारे, नाना प्रकारचीं किळस आणणारीं अनितिमान् दुष्कृत्ये करण्यांत कोणाचीही-प्रत्यक्ष सद्सद्विवेक बुद्धीचीहि-दिक्कत न बाळगिणारे, राष्ट्रघातकी लोक ब्राह्मण्याचा तोरा मिरवायला अजूनहि शरमत नाहींत, तेव्हा त्यांच्या अंतःकरणाची व मेंदूची रचना किती विचित्र असेल याचा वाचकांनींच तर्क करावा ! हिंदु धर्माच्या विशुद्ध स्वरूपाचें अत्यंत गलिच्छ कुरूप भिक्षुकशाहीनें कसें बनविलें, त्याची भगवद्भक्त श्रीनामदेव यांच्या उद्गारावरुन चांगली कल्पना होते. नामदेव म्हणतात :—

**भजन चाललें उफराटें । कोण जाणें खरें खोटें ।।**
**सजीवासी हाणी लाथा । निर्जिव पायीं ठेवी माथा ।।**
**सजीव तुळशी तोडा । पूजा निर्जिव दगडा ।।**
**बेला करी तोडा तोडी । शिवा लाखोली रोकडी ।।**
**तोंड धरुनी मेंढा मारा । म्हणती सोमयाग करा ।।**
**जित्या पितरां नेदी अन्न । मेल्या करी पिंडदान ।।**
**सेंदूर माखुनिया धोंडा । पुजा करिती पोरें रांडा ।।**
**अग्निहोत्रांचा सुकाळ । कुशा पिंपळाचा काळ ।।**
**तिन्ही देव पिंपळांत । अग्नीहोत्री केला घात ।।**
**मृत्तिकेचा पूजा नाग । जित्या नागा देती डाग ।।**
**नामा म्हणे अवघें खोटें । एक हरिनाम गोमटें ।।**

या सर्व भिकार गोष्टींचा परिणाम व्हायचा तोच झाला. सुप्रसिद्ध स्पष्टवक्ते व निस्पृह लेखक कै. रावबहादुर लोकहितवादी आपल्या स्वाध्याय नामक ग्रंथांत (पृ. ११८) म्हणतात, "...विद्याहीन व उपयोगहीन, केवळ माळा तिलक व मुद्रा हीं बाह्य चिन्हें धारण करून, भांग गांजा अफू इ. खाऊन आळसांत निमग्न राहणारे भंगड ते साधू झाले; केवळ पाठ म्हणणारे ते ब्राह्मण झाले; आणि आळशांस पोसणें हाच धर्म असें लोक मानूं लागले. यामुळें उद्योग नाहींसा होऊन भिकारी व अनेक निमित्तांनी फिरणारे अशा संत साधू व ब्राह्मण ह्यांच्या टोळ्यांच्या टोळ्या सर्वत्र प्रतिष्ठितपणें भिक्षुक वृत्तीनें आणि देशास भारभूत अशा फिरूं लागल्या व फिरत आहेत,

हें या देशाचें दुर्भाग्यच होय. या देशास पुराणांसारख्या ग्रंथांनीं सत्यतेपासून सर्वथैव पराङ्मुखता आणिली. मुहूर्त मंत्र जादू किमया व तंत्रे हा व्यर्थ घोंटाळा ठिकठिकाणी नमूद करून, त्याप्रमाणें अनुभव व ठोकें आल्याचीं मनःकल्पित वर्णने, उत्साह व पराक्रम यांजवर आवरण घालण्यास उत्पन्न झालीं. अवश्य गोष्टींकडे दुर्लक्ष व निरर्थक कृत्यांची विलक्षण चिकित्सा हीं अत्यंत हास्यास्पद होत. तसाच, मेहनतीनें पुरुषार्थ करावयाचा सोडून मुहूर्त पाहून व मंत्र म्हणून जयप्राप्ती व लाभ इत्यादिकांचें चिंतन करण्याचीं वेडें पिकलीं व दर्भ समिधा व पिंड हीं उजवीकडे ठेवावीं कीं डावीकडे ठेवावीं ? पहिल्यानें पाणीं शिंपडावें कीं दर्भ अंथरावे ? इत्यादि गोष्टींत चित्त घालून तद्विषयक भवति न भवति करीत बसण्याची चाल पडली............कोणी उंटावर बसला अथवा कोणी वृद्धीत हजामत करविली इ. क्षुल्लक गोष्टींचे उहापोह मोठाल्या सभा भरून आमच्या भिक्षुकांत चालतात परंतु आपल्या देशाच्या तर्फे विलायतेच्या पार्लमेंट सभेंत अथवा कौन्सिलांत आणि कचेऱ्यांत हुद्याच्या व मोठाल्या जागा मिळाव्या अगर लष्करी पदव्या मिळाव्या म्हणून जमलेल्या मंडळींत अथवा भरलेल्या सभेंत जाणें व तद्विषयक वाटाघाट करणें हें त्यांस बरें वाटत नाहीं; अथवा तसे उद्योग किंवा प्रयत्न जें कायावाचामनेंकरून करीत असतील त्यांस ते बरें म्हणत नाहींत. इतकेंच नव्हें तर, तसें होऊन विलायतेस जाणाऱ्यांस वगैरे बहिष्कार घालणें व त्यांस प्रायश्चित्तें देणें ह्याच व्यर्थ गोष्टींना तें उलट भरती देत असतात.'' लोकहितवादींनी हे उद्‌गार सन १८८० सालांत काढलेले आहेत. त्याला आज पूर्ण चाळीस वर्षे झालीं, तरी हा प्रायश्चित्ताचा झोटींग आमच्या नामधारी ब्राह्मणांना अझूनही सोडीत नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. पूर्वी पेशवाई सत्तेला जेव्हां ऊर्ध्व लागला होता, त्याकाळीं राघोबादादा पेशव्याच्या वतीनें विलायतेला वकीली करण्याकरितां एक ब्राह्मण व एक पारशी वकील गेले होते, दीर्घशाहण्या मनुस्मृतिकाराच्या दृष्टीनें ' समुद्रयायी '-नौकेंत बसून समुद्रांतून द्वीपांतरास जाणारा-महापातकी भ्रष्ट आणि पतित ठरलेला.त्याप्रमाणें हे दोघे वकील विलायतेहून स्वदेशी परत येतांच, पारशी वकील आग्यारींतल्या विभूतीच्या चिमटीनें तेव्हांच पाक बनला; परंतु ब्राह्मण वकील ( आबा काळे ) नापाकाचा पाक होईना ! कारण भिक्षूकी वैदिक धर्मच पडला कडकडीत सोंवळा ! राघोबादादाच्या भोंवतीं वेदोनारायण कावळ्यांनीं काव काव सुरूं केली आणि अखेर सोन्याचे एक भलेमोठें स्त्रीलिंग करून त्यांतून त्यां नापाक पातकी ब्राह्मण वकीलाला बाहेर काढल्यावर तो शूद्ध व पाक झाला. स्त्रीलिंगाचें सोनें धर्ममार्तंडांच्या पदरांत पडतांच पतितालां पावनत्वाची सनद मिळाली! मनुस्मृतीचा जन्म होण्याच्यापूर्वी सीलोन, कराची वगैरे ठिकाणांहून सर्व पृथ्वीवर जलपर्यटन करून हिंदुस्थानचा व्यापार वाढविणाऱ्या दर्यावर्दी हिंदूंची या धर्ममार्तंडांनीं काय अवहेलना केली असती कोण जाणें ? असा Rise of the Maratha Power p 314 येथें कै. न्या. रानडे सूचक प्रश्न विचारतात. राघोबानें अनेक वेळां समुद्रप्रवास केला, आणि शिवाजी बेदनूरला जातांना समुद्रांतूनच गेला. त्यांनीं मनुस्मृतीसारख्या अदूरदर्शी व स्वार्थी भिक्षुकी ग्रंथाला डोक्यावर घेऊन त्याचे फाजील स्तोम माजविण्याचा धंदा केला असता, तर त्यांच्या हांतून झाला एवढाहि पराक्रम झाला नसता. हिंदु राष्ट्रानें जो इतिहासख्यात पराक्रम गाजविला तो सर्व मनुस्मृतीचा धूमकेतू उगविण्यापूर्वी. तो

उगवतांक्षणींच हिंदुस्थानाच्या सर्वांगीन वैभवाला आग लागली आणि त्यांचें राष्ट्रीय नपुंसकत्व दिवसेंदिवस वाढत जाऊन त्याला आज दिसत असलेली प्रेतकळा प्राप्त झाली. आतां या विसाव्या शतकांत मन्वाभिमानी नामधारी ब्राह्मणांचा मेंदु कांहींसा ताळ्यावर आला असेल, अशी कोणाची कल्पना असेल तर ती साफ चुकीची आहे. या कूपमंडुकांपासून अझूनहि बऱ्याच लोकांना मनस्वी त्रास सोसावा लागत आहे. मुंबईतल्या गुजराथी भाटे लोकांत विलायतेला जाऊन आलेल्या सुशिक्षितांची एक निराळीच जात बनलेली आहे. प्रथम ऋतुस्नात पत्नीला गुरुसेवेला पाठविण्याच्या वल्लभी सांप्रदायांतील लोकविश्रुत छिनाल पद्धतिविरुद्ध धिःकार दर्शविणाऱ्या नवमतवादी सुशिक्षित भाट्यांची आधींच एक नवीन जात बनलेली होती; तींतच जीर्णमतवाद्यांच्या हट्टवादीपणामुळें ही एक आणखी भर पडली आहे. परंतु उठल्यासुटल्या

## पुणें तेथें काय उणें

अशी शहाणपणाची मिजास मारणाऱ्या पुण्यांत ही प्रायश्चित्ताची महामारी अझून जिवंत असेल, असें मात्र कोणास वाटत नव्हतें! परंतु जीर्णमताचा भिक्षुकी जीर्ण झेंडा उंच पेलून धरणाऱ्या पुण्याच्या आचार्यानें ती कल्पना चुकीची ठरविली. हें आचार्य व्यापक मनोभावनेचा मोठा गर्वभार वहातात; परंतु मनुस्मृतीच्या भिक्षुकी आखाड्यांत तयार झालेली यांची मनोवृत्ति अखेर आपल्या कूपमंडुकी बाण्यावर घसरल्याशिवाय रहात नाही. शंकराचार्यांचा पुन्हा अवतार होऊन ते लवकरच सर्व नवमतवादी सुधाकरांचीं हाडें न् हाडें चांगलीं ठेचून काढणार आहेत, असें ते छातीला हात लावून सांगतात. या आचार्य भिक्षुकांनें फाल्गुन शु. ११ शके १८४१ च्या आपल्या पाक्षिक चिठोऱ्यांत परदेशगमनावर आपल्या मनुस्मृतिप्रासादिक भिक्षुकी ज्ञानाचे तारे तोडतां तोडतां अखेर कै. बाळ गंगाधर टिळकांच्या परदेशगमनाविरूद्ध प्रायश्चित्ताची चळवळ सुरू केली. कै. टिळकांच्या सार्वजनिक कार्यशैलींत दुटप्पीपणा होता, हा आक्षेप त्यांचे जीवलग स्नेही कै. आगरकरांपासून तो विद्यमान् श्रीयुत रँग्लर परांजप्यांपर्यंत त्यांचे सर्व सच्चे विरोधक प्रामाणिकपणें स्पष्टस्पष्ट बोलत आले; इतकेंच नव्हे तर टिळक हे लोकांचे पुढारी नसून शुद्ध लोकछंदानुवर्ति आहेत हें लक्षांत ठेवा, असा कै. आगरकरांनी आपल्या सुधारकांतून

## तुळशी बागेंतला शिमगा

झाला त्यावेळीं हडसून खडसून दिलेला जाहिर इशारा पुष्कळांच्या स्मरणांत असेलच. परंतु, गीतारहस्यासारखा अननुभूत तत्वज्ञानाचा दिव्य ग्रंथ निर्माण करणारा अलौकीक पुरूष, न्हाव्याभटाची धणी करणाऱ्या सिंहस्थ पर्वणीच्या सुमारासच भिक्षुकशाहीच्या बाष्कळ प्रायश्चित्तविधिपुढें एखाद्या प्राकृत संसाऱ्याप्रमाणें मान वांकवील ही कल्पना कोणालाहि सुचली नाहीं. पण अखेर त्या दूरदृष्टी आगरकर द्रष्ट्याचीच वाणी अक्षरशः खरी ठरली. स्वतःचा पुत्र सुद्धां जाहीर रीतीनें नको नको म्हणत असतां, ' तुम्ही प्रायश्चित घ्याल तर मी लग्नालाच उभा रहात नाहीं ' असा धडधडीत निषेध व्यक्त करीत असतां,

## बिचाऱ्या टिळकांनीं प्रायश्चित्त घेतलें

आचार्यकंपूची चळवळ फळली. मनुस्मृतीला दीडबोट मांस चढलें. याज्ञवल्क्याला गति मिळाली. पराशराचा उद्धार झाला. बापटी वैदिक धर्माचा बोज राखला गेला, आणि वेदोक्ताच्या टिमकीवर पुराणोक्ताचें कांतडे ताठ चढून, भिक्षुकशाहीच्या कलगी तुऱ्याचा डफ तारस्वरांत खणाणूं लागला. या शुभमंगल सावधान विदीच्या वाच्यता करण्याच्याकामीं, तृण न धरण्याची कागदी शेखी मिरविणारा केसरी अगदीं मूग गिळून कसा बसला होता व इतर राष्ट्रीय पत्रांच्या दांतखिळ्या कशा जाम जखडल्या होत्या, तें चाणाक्ष वाचकांना सांगायला नकोच. कै. टिळकांच्या या प्रायश्चित्तविधीबद्दल अत्यंत निस्पृहपणानें जर कोणी स्पष्टोक्तीचा अवलंब केला असेल तर साऱ्या महाराष्ट्रांत एकट्या **' महाराष्ट्र साहित्य '** कारानें. या स्पष्टोक्तीची झळ राष्ट्रीय भिक्षुकशाहीला लागली किंवा नाहीं हें कांही आम्हांला माहीत नाहीं; परंतु अर्धे हळकुंड खाऊन पिंवळा बनलेल्या ठाण्याच्या एका डोळेदार पत्राच्या शिखंडी

## संपादकाच्या पगडीनें मात्र पेट घेतला

ही गोष्ट नुकतीच ठाकुरद्वारावर धाडधाड धांवत आलेल्या फायर ब्रिगेडकडून लोकांस समजली. या बाबतीत अधिक वाच्यता न करितां, वाचकांनी महाराष्ट्र साहित्य मासिकाचा पहिल्या र्वाचा १२ वा अंक अवश्य मिळवून वाचावा, अशी शिफारस आहे.

* * * *

(१७) अनुवंशिक संस्कारांची कल्पना अगदींच अयथार्थ किंवा अविश्वसनीय आहे, असा कोणाचाच वाद नाहीं; परंतु त्याच्या अर्थाचा जो विपर्यास करण्यांत आला आहे, तो मात्र कोणालाहि मान्य होणार नाहीं. शिवाय याबद्दल शास्त्रवेत्त्यांचेंहि अझून एकमत झालेले नाहीं. अनुवंशिकत्वाच्या तत्वाचा शोध करण्याची प्रवृत्ति फार प्राचीन काळीं ग्रीक लोकांत उत्पन्न झाली होती; व त्याबाबतींत त्यांनी कांहीं ठोकळ सिद्धांत प्रस्थापित करण्याचा प्रयत्नहि केला होता. परंतु या बाबतींत विशेष निश्चित यत्नाचा पुरस्कार विसाव्या शतकांतच अस्तित्वांत आलेला आहे. मध्यतंरीच्या शतकश्रेणींत या तत्वाचा शास्त्रीय शोध लावण्याकडे फारसें कोणी लक्ष घातल्याचा दाखला नाहीं. हल्लींच्या संशोधन-प्रवृत्तींचे जनकत्व डार्वीन कडे असून, वीस्मन (Weismann) मेन्डेल (Mendel)प्रभृति शास्त्र्यांनीहि या तत्वाचीं काहीं निश्चित मतें सिद्ध करण्याचा यत्न केला. हा विषय दिसतो तितका सोपा नव्हें. अनुवंशिकत्वाचा पूर्ण छेडा कधिंकाळीं लागलाच, तर मानवजातीला सृष्टींतील अत्यंत गूढतम अशा एका श्रेष्ठ पारमेश्वरी तत्वाला हस्तगत केल्याचें श्रेय खात्रीनें मिळेल ! पण हें श्रेय फुकाचें मिळणारें नव्हें. त्यासाठीं संशोधन-तपश्चर्येचे पर्वतच्या पर्वत खर्ची घालावे लागतील, अशी खुद्द संशोधकांचीच जबानी आहे. असल्या जबरदस्त भानगडीच्या तत्वांचे निश्चित संशोधन करतांना आणखी अनेक सवर्गीय तत्वांचा कसोशीने स्वाध्याय करणें प्राप्त आहे व यासाठी न्यायबुद्धीचा समतोलपणा व सत्याच्या चाडीचा निर्दयपणा संशोधकांना अत्यंत तीव्र प्रमाणांत राखावा लागेल. ही गोष्ट बौद्धीक गुलामगिरीच्या भिक्षुकशाही धोरणांशी व्यस्त प्रमाणांत असल्यामुळें, अनुवंशिकत्वावरची भिक्षुकशाहींचीं पुराणें म्हणजे शुद्ध चहाटाळपणाचे बाजार म्हटल्याशिवाय सुटकाच नाहीं.

अनुवंशिकत्वाच्या या कल्पनेच्या जोडीनेंच बीज आणि क्षेत्र यांच्या शुद्धतेबद्दल मोठें पुराण सांगतात; परंतु ही बीज किंवा क्षेत्राची शुद्धी अजमावण्याचीं साधनें कोणतीं, हे मात्र या पुराणिकांना समजत नाहीं व नीटसें पटवूनहि देता येत नाहीं. नुसतें आमक्या स्मृतींत असें म्हटले आहे आणि तसें सांगितले आहे, हा कांही आधार नव्हें व स्मृतिग्रंथ हे शास्त्रीय ग्रंथहि नव्हत. अर्थात् अमूक बीज शुद्ध आहे आणि अमकें क्षेत्र अशुद्ध आहे, हें शास्त्रीय (Scientific) पद्धतीनें जोंपर्यंत सप्रमाण पटवितां येणें शक्य नाहीं, तोपर्यंत या

## बीज-क्षेत्र-शुद्धीच्या वल्गना

'फाल्गुने बालका इव'च होत. उदाहरणार्थ आपण **डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर** हे ब्राह्मण म्हणविणारे हिंदु गृहस्थ आणि **मिस् एडीथ कोहेन** (आतां सौ. शीलवतीबाई केतकर) या युरपियन विदुषी, हेंच जोडपें घेऊं. यांत बीज शुद्ध आहे हें कशावरून ठरवायचें आणि क्षेत्र अपवित्र- अशुद्धच आहे, हें कसें सिद्ध करायचें? पुण्याच्या खुन्या मुरलीधराच्या अध्यक्षतेखालीं मिस् कोहेनच्या व्रात्यस्तोमाबद्दल निषेध प्रदर्शित करायला जे रिकामटेंकडें ' चतुःशाखीय ' ब्रह्मवृंदमंडळ (?) ता० १२ एप्रिल १९२० रोजीं जमलें होतें, त्यांपैकीं एकादा तरी प्राणी या परस्पराकर्षी जोडप्याच्या बीजक्षेत्रशुद्धीचे शास्त्रीय तत्वाला पटेल असें कांहीं निश्चित अनुमान पटविल काय? पौराणिकी गप्पांपलीकडें त्यांना एकहिं आधार देतां येणार नाहीं. असली चर्चाच आधीं खोडसाळ आणि तिच्या समर्थनार्थ आणलेले पुरावे शतपट खोडसाळ. बीजक्षेत्रशुद्धीच्या गप्पा जातिभेदाच्या जन्मदिवशींच भिक्षुकी मेंदूतून गळलेल्या आहेत. बौद्धधर्माच्या ऱ्हासानंतर भिक्षुकशाहीनें जातिभेदाची जी बंडाळी उठवली त्या बंडाच्या धामधुमीपूर्वी या गप्पांचा सुगावा लागत नाहीं. हां, आंता मनुस्मृतींतल्या श्लोकांबरहुकूम दिवाणी फौजदारी कायद्यांची नसती ब्याद ऋग्वेद काळाच्या आर्यांच्या बोकांडीं मारणारा एखादा पावगी आपल्या अस्तन्या वर सारून, बीजक्षेत्रशुद्धाशुद्धतेचा इतिहास मानगुटीला धरून मागें खेचूं लागला व त्याचा उगम त्यांनी प्रत्यक्ष

## श्रीविष्णुच्या नाभिकमलांत दाखविला

तरी त्यांचा हात कोण धरणार ? ज्यांना वैदिक काळांतसुद्धां* लोकशाही स्वराज्य अपरंपार दिसतें, त्यांना श्रीविष्णूच्या नाभिकमलांतून ब्रह्मदेवाच्या तोंडापर्यंत निर्वेध संशोधनी लीला करतां येणार नाहीं, असें थोडेंच आहें? बीजक्षेत्रशुद्धीचें तत्व हें भिक्षुकीमताच्या वर्चस्वाचें ऐतिहासिक

---

*पुण्याचे रावसाहेब पावगी हे एक सुप्रसिद्ध विद्याव्यासंगी संशोधक आहेत. कै. टिळकांनी उत्तर ध्रुवाच्या बर्फात गाडलेलीं ऋग्वेदकालीन् आर्यांचीं थडगीं रावसाहेबांनीं नुकतींच तेथून खेंचून आणून पंजाबच्या सरहद्दीवर स्थापन केलीं व संशोधनकौशल्यानें टिळकांच्या 'योगःकर्मसु कौशलम्' वर ताण केली. इतके जाडे संशोधक जर अर्वाचीन मनुस्मृतीच्या दाखल्यांच्या अधारावर ऋग्वेदकालीन आर्यांच्या सामाजिक,धार्मिक, राजकीय जीवनाचा इतिहास रंगविण्यास कचरत नाहींत व ऋग्वेदी आर्यांना मनुयाज्ञवल्क्यांतल्या दिवाणी फौजदारी कायद्यांत अडकवायला सोडीत नाहींत, तर उद्या मॉन्टफर्ड रिफॉर्मसच्या खर्ड्यांचें जनकत्व कोणी बाळाजीपंत नातूच्या पदराला बांधल्यात आश्चर्य करण्याचें कारणच उरत नाहीं. भारतीय साम्राज्याचा इतिहास एवढ्याच व असल्याच संशोधन-पुण्याईवर पुरा करायचा असेल, तर कुत्र्यामांजरांच्या शेंपटांवर कादंबऱ्यांचे ढीगच्या ढीग प्रसविणारे श्रीयुत आजकाल रगड आहेत. रावसाहेबांनीं पेनशनचा काळ आता हरी हरी म्हणण्यांत घालवावा हें बरें.

स्मारक आहे, यापलीकडें सारासारविचारदृष्ट्या अगर शास्त्रियदृष्ट्या त्याला कवडीचेंहि महत्त्व नाहीं. हें वाचकांनीं ध्यानांत ठेवावें. शुद्ध बीज कसे ओळखावें आणि क्षेत्र अशुद्ध कसें ठरवावें, याचा अझून शोध लागलेला नाहीं, पुढेंमागें कधिं लागल असाहि भरवंसा नाहिं. आजपर्यंत हा शुद्धाशुद्धतेचा मामला ' आह्मी ब्राह्मणांनीं हें असें ठरविलें आहे ते तुम्हीं सनातन तत्त्व म्हणून मान्य करा ' अशा नुसत्या पोंकळ स्मृतिवचनांच्या मान्यतेवरच चाललेला आहे; या पेक्षां त्याच्या सत्यत्वाची प्रचीति पटण्याला दुसरा कांहीहि आधार नाहीं. बीजक्षेत्रमहात्म्याच्या या कांदबरीचा धागा ब्रह्मदेवाच्या गळ्यांतल्या जानव्याला अडकविणाऱ्या आधुनिक बृहस्पतींना आमचा एवढाच सवाल आहे कीं क्षेत्राच्या उच्चनीचतेवर जर तुमचें ' विशिष्ट प्रजोत्पत्ति ' तत्व ठरलेलें होतें, तर ज्या वैदिक व भारतीय काळाच्या अनेक ऋषींचें व अनेक इतिहासख्यात नरेश्वरांचे जन्म, तुम्ही मानलेल्या नीच क्षेत्रांत झाले, त्या संकरजात ऋषींना आणि अकरमाशा नरेश्वरांना तुम्हीं अझूनहि पूज्य व वंदनीय कां मानतां? अतिक्षूद्र क्षेत्रांत जन्मलेले सांख्य व पराशर, चांभारणीच्या उदरीं जन्मलेला टंकऋषी, विधवेचा पुत्र कौंडिण्य, रंभानामक गांवभवानीचा पुत्र वसिष्ट, कोळणीचा मुलगा व्यास, अविवाहित कुमारिकेला गुपचूप झालेला दीर्घतमा ही मंडळी एकतर काल्पनिक व्यक्त्या होत्या असें सांगून मोकळें व्हा, नाहींतर ब्रह्मदेवाच्या तोंडांतून गटकन् बाहेर पडलेल्या अतिशुद्ध ब्राह्मणांनीं या नीचयोनीजात अकरमाशांवर ग्रामण्य उभें करून त्यांना वाळींत का ठाकलें नाहीं तें तरी सांगा. कुत्र्यामांजरांच्या, सशाबेडकांच्या आणि पत्रावळीं द्रोणांच्या पोटीं जन्मलेल्या प्राण्यांची यादी आम्ही पुढें आणीत नाहीं. यावर जर तुमचा असा उलट सवाल असेल कीं क्षेत्र जरी नीच होतें तरी बीज उच्च होतें, तर तेथेंहि तुम्हाला खोटें बोलल्यांशिवाय गत्यंतर नाहीं. कारण वरच्यापैकीं एकाच्याहि खऱ्या

## बापाचा पत्ता लागत नाहीं.

शिवाय अमृतासारखा उच्च बीजाचा मद्यासारखा नीच क्षेत्रांत संकर झाल्यास विषोत्पत्तिपेक्षां अधिक चांगलें तें काय निर्माण होणार? एवंच येथें बीजक्षेत्रशुद्धीचा तर बोजावारा उडतोच उडतो, पण अनुवंशिक संस्काराची तरीं कोठें दाद लागते? म्हणे, ऋषींचें कूळ आणि नदीचें मूळ शोधूं नये. कां? त्यांत अवैदिक किंवा अशास्त्रीय असें काय आहे? खुद्द ऋषींनीं जर आपलें कूळ स्पष्ट सांगितलें आहें, तर त्यांत तुम्हांलाच कां वैषम्य वाटावें? अमूक करूं नये अेणि तमूक करूं नये हें सांगण्याचा तो मनुस्मति-मामला मागेंच मेला. आतांच्या या विसाव्या शतकांत प्रत्यक्ष देवालासुद्धां शास्त्रीय शोधांच्या चरकांत घालायला जे सोडणार नाहींत, ते काय ऋषींचें कूळ आणि नदीचे मूळ शोधायला कमी करणार ? अंधश्रद्धेचे दिवस गेले आणि पौराणिकी गप्पांच्या जोरावर बहुजनसमाजाला बौद्धिक गुलामगिरींत बद्ध करून ठेवण्याचा मनूहि ठार झाला. विवेकबुद्धीचा अंमल चालूं झाला आहे. आतां जुन्यापुराण्या पौराणिक भाकडकथांच्या आधारानें जनता झुलणार नाहीं किंवा संस्कृत भाषेंत रचलेल्या सूत्रांच्या नुसत्या पोपटपंचीला भुलणार नाहीं. प्रचलित काळ ऐतिहासिक सत्याचा आहे. हें सत्य केव्हांहि झालें तरी

## बाप दाखव नाहींतर श्राद्ध घाल

असेंच म्हणणार बीजशुद्धी आणि क्षेत्रशुद्धी कशी ठरवायची, कशी पारखायची तें आधीं विवेकबुद्धीला पटेल असें सिद्ध करून दाखवा आणि मग–

**जात्युत्कर्षे युगे ज्ञेयः पश्चमे सप्तमेऽपि वा।**
**व्यत्यये कर्मणां साम्यं पूर्ववच्चधरोत्तरम् ।।** याज्ञ० स्मृ० १-९६.

ही ब्राह्मणत्त्व-प्राप्तीची गिरणी कशी चालते तिची यंत्ररचना सांगा. नुसत्या जातिविशिष्ट सोयरिकीच्या चढत्या उतरत्या भांजणीनें किंवा ब्राह्मण कुटुबांत जन्मणारा प्रत्येक प्राणी त्या विशिष्ट कुटुंबाचेच गुणधर्म घेऊन जन्माला येतो असल्या त्रयराशिकी विधानानें जर या गोष्टींचा निर्णय ठरतो असें मानलें, तर उत्क्रांतिवाद त्या निर्णयाला सपशेल खोटा ठरवित आहे. सायन्टिफिक् (शास्त्रीय) शोधांच्या कसोटीला हे स्मृतिकारांचे काल्पनिक निर्बंध मुळींच उतरत नाहींत. इतकेंच नव्हें तर इतिहासाची साक्षसुद्धां शास्त्रीय शोधांच्या जबानीलाच पाठबळ देते एका विवक्षित कांळच्या सामाजिक संघटनेसाठी कांहीं चार विशेष शहाण्या डोक्यांनीं एकत्र बसून सामाजिक उच्च नीचतेचे दहापांच ठोकळ नियम ठरविले आणि ते ' स्मृति ' नामाभिधानाखाली समाजाचें नियमन करण्यासाठीं शिफारस केले, एवढ्यांच कारणामुळें ते नियम सनातन ठरूं शकत नाहींत, त्यांची योग्यता व श्रेष्ठता सर्व काळीं सर्वमान्य ठरणार नाही, किंवा प्रत्येक नव्या मन्वंतरांतील नवीन शास्त्रीय शोधांपुढें त्यांतलें तत्व अबाधित राहीलच असा भरंवसा मुळींच देतां येणार नाहीं. परंतु जीर्णमतवाद्यांना जुनें तितकें सोनें या कुकल्पनेची कांवीळ झाल्यामुळें. पूर्वीच्या स्मृतिकारांची सर्वच कृत्यें सनातन व अबाधित वाटावीं, यांत काही आश्चर्य नाहीं. हे पुराणमतवादी लोक उन्नत मनोवृत्तीची कितीहि फुशारकी मारोत, त्यांच्या मस्तकांत निराशावादाच्या किड्यांचा बुजबुजाट सनातन चाललेला असतो. गेले ते दिवस चांगले, येत आहेत ते वाईट. पूर्वीच काय ते बुद्धिसामर्थ्याचे बृहस्पति निर्माण होत असत, आतां सर्वत्र

## महामूर्ख शंखोबांचा सुळसुळाट

चालूं राहणार. याज्ञवल्क्य, जनक, वसिष्ट, वामदेवादी ऋषीं उत्पन्न होण्याचा काळ आतां गेला, पुन्हां तो कधींहीं येणार नाहीं. मानवीं बुद्धीचा ऱ्हास झपाटयांनें सुरूं आहे. अहल्या, द्रौपदी, सीता, तारा, मंदोदरी या पंचकन्या आतां कशाच्या पुन्हा आमच्या दृष्टीस पडतात! पूर्वी मैथून नियमबद्ध असल्यामुळें स्त्रीपुरूषांची नीति परीटघडीवजा पांढरीफेक असे; आतां मैथूनातिक्रम फार झाल्यामुळें सारी दुनिया सडत चालली आहें. अशा भयंकर दुरावस्थेंत आम्हीं शहाण्यांनी-शहाण्या पूर्वजांच्या शुद्ध शहाण्या वंशजांनी-विधवापुनर्विवाह किंवा असवर्णविवाहाला कशी बरें संमति द्यावी ? धर्म आणि शास्त्रें हीं पूर्वीच्याच लोंकांनी लिहावी ; आता काय ? आतां सगळाच सांवळा गोंधळ ! बुद्धि नाहीं, अक्कल नाहीं, तपश्चर्या नाहीं, नीतिमत्ता नाहीं, काहीं नाहीं ; आणि हे नकटे सुधारक म्हणतात कीं आम्हीं नवी स्मृति लिहूं, नवें धर्मशास्त्र निर्माण करूं आणि नामशेष झालेले विधवापुनर्विवाहासारखे प्रघात पुन्हां प्रस्थापित करूं ! मूर्ख कुठचें !! धर्माला ग्लानींवर ग्लानी येत आहेत, समाज अनीतिमान् झाला आहे, सोंवळ्या ओंवळ्याचा ताळ

सुटून सबगोलंकार सुरूं आहे, आम्हां पवित्र ब्राह्मणांची जो तो निंदा करीत आहे, आणि हे सुधारक म्हणे सुधारणा करणार ! अशी माणसाच्या हातून सुधारणा होती तर काय पाहिजे ! शंकराचार्य स्वतः अवतार घेतील, तेव्हां ही बिघडलेली घडी चापूनचोपून नीट इस्तरींत बसेल ! या आमच्या पुराणमतवाद्यांच्या कल्पना आणि त्या कल्पनांचा पुरस्कार करणार आमच्या ॲनी बिझांट बाई. त्यांनीं तर एक मैत्रेयावताराची आढीच उबत घातली आहे; आणि ही आढी त्या ज्या दिवशीं फोडतील, त्या दिवशीं त्यांतून बाहेर पडलेले मैत्रेय ऋषी हिंदुस्थानच्या बादशहाच्या शेजारीं दिल्लीच्या तक्तावर बसतील, असें त्यांचें भविष्य आहे. वर्तमानकाळ वाईट आणि भूतकाळ काय तो सोन्याचा, या कल्पनेचा म्हसोबा ज्यांच्या बोकांडीं बसला आहे, त्यांना सारा भविष्यकाळ अंधारग्रस्त दिसावा यांत कांहीं आश्चर्य नाहीं. मानव जाती दिवसेंदिवस उन्नत होत आहे कीं अवनत होत आहे, हा वाद पाश्चात्य पंडितांपुढें बरींच वर्षे होता आणि त्यांनीं सायन्स व इतिहास यांच्या आधारानें असा निश्चित निर्णय काढला आहे कीं " I have been led to the *firm conviction,* which I must now put forward as a *Scientific Truth* based upon the teachings of anthropology, folk-lore, and the history of civilization that *at the present day, in our time so widely decried as " nervous ", " degenerate ", and " overcivilized " not only are there no more sexually " perverse " persons than there were in former days......but further, that the greater part of the perversions of the present day are not to be regarded as " degenerations " at all."* [Iwan Bloch, M. D. in "The Sexual Life of our Time." P. 456] कलीयुगाचें काळेंकुट्ट भेसूर चित्र रेखाटण्यांत पुराणकारांच्या काव्यशक्तीला जरी एकप्रकारचें कंडुशमनाचे खाद्य मिळालें व कांहीं काळ त्यांच्या प्रवचनप्राविण्याची अहोरूप महोध्वनी अशा भिक्षुकशाही कंपूकडून मोठी वाहवा झाली, तरी त्या चित्राच्या नित्य दर्शनानें व मननानें हिन्दुजनांच्या कर्तबगारीचा सारा जोम जाळूनपोळून फस्त केला, ही गोष्ट हिन्दूंच्या राष्ट्रीय आपत्तींच्या यादींत अग्रभागी लिहून ठेवण्यासारखी झाली. या भिक्षुकी चित्रानें हिन्दुजनांवर निराशावादाचा एवढा जबरदस्त पगडा बसविला आहे की त्यांतून त्यांची धडपणें सुटका होणें फार दुष्कर कार्य होऊन बसलें आहे. निराशावादानें सडलेल्या मनोवृत्तीची राष्ट्रें दास्यत्वांत कुझून दास्यत्वांतच लयाला जातात, ही गोष्ट आम्हां हिन्दूंच्या गळीच उतरत नाहीं. पृथ्वीवरील इतर राष्ट्रें आशावादाच्या जोरावर आपापलें निश्चित राष्ट्रध्येय साधण्याकडे शक्तियुक्तीची पराकाष्ठा करीत आहेत, भविष्य काळ त्यांना पूर्ण प्रकाशमान् भासत असल्यामुळें त्यांच्या कार्यक्षमतेची तडफ प्रत्यक्ष कालचक्राच्या गतीलासुद्धां मागें पाडीत आहे आणि गतानुभवाची पेस्तर शिल्लक वर्तमान काळाच्या जमेले धरुन त्यांत नवीन नवीन अनुभवाची भर घालून हे आशावादी लोक आपल्या उज्वल महत्वाकांक्षा प्रत्यक्ष रंगरूपास आणण्याची पराकाष्ठा करीत आहेत. उलटपक्षी हिन्दुराष्ट्राचा कारभार पहा. जिकडे तिकडे कर्तबगारीचा शुकशुकाट ! इतर राष्ट्रांपेक्षा हिन्दुराष्ट्रांत जर कांहीं विशेष असेल तर गतगोष्टींच्या

## स्तुतिपाठाची वाचाळपंचविशी

मात्र लोकोत्तर आहे खरी. येत आहेत ते दिवस वाईट, चालूं परिस्थिति म्हणजे अनीतीचा शेणसडा व भविष्यकाळ म्हणजे अकल्पनीय अवनतीचा मूर्तिमंत नरक, याच ज्यांच्या ठाम कल्पना त्यांनी भूतकालाच्या सर्वांगसुंदरपणाचे खरे खोटे गोडवे न गावे तर करावें तरी काय ? हा निराशावादाचा म्हसोबा हिंदुंच्या बोकांडी बसवून त्यांना जिवंतपणीच प्रेतकळा आणण्याचें राष्ट्रघातकी दुष्कर्म भिक्षुकशाही पुराणांनीच केलेलें आहे. याबद्दल **एफ. जी. पार्जीटर** यांनी साधक बाधक विस्तृत विवेचनानंतर असा स्पष्ट सिद्धांत काढला आहे कीं " The brahmans who compiled the Sanskrit account (of the Puranas) could and did fabricate passages portraying the evils of the Kali age " *(Dynasties of Kali Age. Intro : p. 19)* भावार्थः-- ज्या ब्राह्मणांनी ( पूर्वी प्राकृत भाषेत असलेल्या पुराणांना) संस्कृत पोशाख चढविण्याचा उपक्रम केला, त्यांना त्यांत कलीयुगांतल्या महापातकांचीं (काल्पनिक) वर्णनें घुसडून देणें फारसें कठीण नव्हतें व ते त्यांनी केलेंच. " बौद्धधर्माचा पाडाव करण्यासाठीं भिक्षुकी धर्मानें ज्या उलाढाली केल्या त्यांतील मुख्य महत्त्वाची चळवळ म्हणजे पुराणांचा कारखाना ही होय ; आणि मि. पार्जिटर म्हणतात " It was largely through Puranic literature, that brahmanism re-established itself over the people and secured the revival of Hinduisim (?) and the downfall of Buddhism " भावार्थः--" या पुराणांच्याच द्वारें मुख्यतः भिक्षुकशाहीनें (हिन्दु) जनतेवर आपलें वर्चस्व पुनश्च प्रस्थापित केलें व बौद्धधर्माचा पाडाव करून हिन्दुधर्माचा* (अर्थात् भिक्षुकीधर्माचा) बचाव केला. " या कलीयुगाचा घातकी महिमा कसा काय आहे व पुढचें भविष्य किती भेसूर आहे, हें पाहू. इच्छिणारांनीं, इ. स. च्या ४ थ्या शतकांत जन्माला आलेल्या विष्णुपुराणांतला ६ व्या अंशाचा १ ला अध्याय, व त्याचा मराठी अर्थ देतांना कै. लेलेशास्त्र्यांनी केलेली भिक्षुकी मल्लीनाथी अवश्य वाचावी. पांचपांच सहासहा वर्षांच्या मुलींना पोरें होतील, आठआठ वर्षांची मुलें बाप बनतील, बाराव्या वर्षी पांढरे केस होतील व मनुष्याचें आयुष्य वीस वर्षांचे होईल. असल्या खोडसाळ कल्पनांचा पगडा मनावर बसलेल्या लोकांनीं

## हें असें होणारच हो !

या निश्चित कुकल्पनेच्या भ्रमानें जर हातपाय आढ्याला लावून होईल तें पहात स्वस्थ बसण्याचें ठरविलें, तर त्यांत त्या लोकांचा काय दोष ? कलीयुगांत ओढवणाऱ्या निरनिराळ्या अरिष्टांची आगाऊच भीती बाळगून त्यांच्या भयानें थरथर कांपणारी जनता निव्वळ निरक्षरांतच आढळते असें नव्हें ; मोठमोठे सुशिक्षित म्हणविणारे शहाणे लोकसुद्धां या काल्पनिक भयापुढें मान वांकवून, त्या भयाच्या निरसनार्थ भिक्षुकशाहीच्या अडत्येगिरीचा अवलंब करण्यास सोडीत नाहीं. आम्हांला आठवतें कीं सन १८९९ साली कलीयुगाची पांच हजार वर्षे पुरी झाल्यामुळें जगांत मोठा प्रलय होणार असल्याचे भिक्षुकशाहीचे जाहीरनामे गांवोगांव फडकले होते. काशिविश्वेश्वराच्या देवळांत

*हिंदुधर्म हा शब्द सामान्यतः भिक्षुकीधर्माच्या ऐवजींच पाश्चात्य संशोधक कावितात. परंतु सध्यांचा हिंदुधर्म हा शुद्ध वेदप्रणीत हिंदुधर्म नसून भिक्षुकशाहीप्रणीत भ्रष्ट असा हिंदुधर्म आहे, हें पृ. १० टीप * येथे स्पष्ट केलेंच आहे.

## आकाशांतून सुवर्णपत्रिका पडली

तींतसुद्धां या भिक्षुकी ज्योतिष्याचें पूर्ण समर्थन करणाराच मजकूर होता. यावेळीं म्हैसूर संस्थानांत मोठीच खळबळ उडाली. सर्व प्रजानन विपद्ग्रस्त स्थितींत दिवाणांच्या बंगल्यावर धांवत गेले व या महासंकटांतून कसें काय पार पडायचें त्याचा बंदोबस्त करावा म्हणून त्याच्या विनवण्या करूं लागलें. दिवाणसाहेब दिवाण असले तरी हिन्दूच होते, त्यांना या असल्या भिक्षुकी थोतांडानें ताबडतोब दिवाणे बनविलें व भिक्षुकशाहीच्यामार्फत या महाप्रलयाची शान्ति वगैरे करण्यासाठी काय खर्चवेंच येईल त्याचें '' बजेट '' हुजूर सरकारकडून लवकरच '' सांकशन '' करून घेतो, असें त्यानी प्रजाजनांना सांगून त्यांची बोळवण केली. नामर्द बुद्धिमत्तेचा हा मासला म्हणजे हिन्दुलोकांच्या बौद्धिक गुलामगिरीचा कळस होय! कलीयुगांतल्या अनेक लहानमोठ्या अरिष्टांच्या पौराणिकी प्रवचनांच्या जोडीनेंच हिन्दुलोकांच्या कर्तबगारीची गळचेपी या ज्योतिषशास्त्रानें केलेली आहे. याच ज्योतिषशास्त्रानें शकुनापशकून ग्रहापग्रहांचीं खेंकटी निर्माण केल्यामुळें माणसांसारखीं माणसें पण सांपळ्यांतल्या उंदरांप्रमाणें आकाशस्थ राहू केतू शनींच्या महादशेच्या फेऱ्यांपुढें लटलट कांपत असतात आणि या प्रसंगींसुद्धां या ग्रहांची शान्ति करण्याच्या कामीं भिक्षुकी अडत्यांची पायधरणी करतात. या शकुनापशकुनांनीं हिन्दुलोकांना इतके जाम जखडून टाकलें आहे कीं त्यांच्या गुलामगिरीच्या किळसवाण्या स्थितीपुढें अमेरिकन नीग्रोंची गुलामगिरी पुष्कळच सभ्य व इभ्रतदार ठरेल, ज्योतिषशास्त्राची निष्पत्ति म्हणजे भिक्षुकशाही गुलामगिरीचा दुट्टपी आडपेंच होय. पुराणोक्त वर्चस्वांतून कोणी निसटलाच तर पुढें ज्योतिषशांस्त्रप्रणीत महादशेचा फेरा, शनीचीं दानें, मारुतीचा शेंदूर व राहूकेतूच्या जपाच्या मंत्रसंख्येचीं भेंडोळीं दत्त म्हणून उभीच! कोठेंहि जा, तेथें भिक्षुकशाहीचें ह्या नाहींतर त्या कंत्राटाचें लचांड आहेच. भिक्षुकशाहीचीं आपमतलबी जाळीं हीं अशीं सर्वव्यापी आहेत. परंतु या जाळ्यांच्या सर्वप्रासीपणाची कोणालाहि दाद न लागतां त्यांची यथास्थित मांडणी करण्यांतलें भिक्षुकी कौशल्य जर विल्हेम कायझरला लाभतें तर गेल्या महायुद्धांत बिचाऱ्यांच्या मिशांची टोंकें खालीं होतींच ना! कलीयुगांत पातकांचीच परवड लागणार व प्रजा रसातळाला झाणार, तर मग पातकें कळत अगर नकळत आमच्या हातून घडलींच तर त्यांत वावगें तें काय? अशा समजुतीमुळें दुष्कृत्यें करण्याकडें मनुष्यांची प्रवृत्ति बिनधोक होत असते; व कोणी एखादें दुष्कृत्य केलेंच तर, ' हूं चाललंच आहे.

## हा सगळा कलीचा महिमा.

व्यासांनी आधींच हें लिहून ठेवलें आहे. तुका म्हणें उगें रहावें । जें जें होईल तें तें पहावें ॥ ' अशा शेऱ्यापुढें शाश्वत पुण्याईची वखार थापणारे धर्ममार्तण्डसुद्धां अधिक कांहीं करूं शकत नाहींत. फार काय, पण समाजसुधारक हिंदुसुद्धां जात्या हिंदूच असल्यामुळें त्यांच्या हातून समाज किंवा धर्मसुधारणेचें कार्य व्हावें तसें सकस व दणकट होत नाहीं, याचें कारण हे सुधारक लोकसुद्धां ' बिलकूल हिंदू ' असतात, हें होय. सामाजिक किंवा धार्मिक प्रगतीतून प्राप्त होणाऱ्या सुखाची जाणीव किंवा त्याचा स्वाद घेण्याची रुचीच कलीयुगमहात्याच्या या अवडंबरानें पार

नष्ट झाली आहे. कलीयुगांत सर्व गोष्टीं भिकार व घातकी अशाच निर्माण व्हायच्या आहेत ही हिंदुजनांची ठाम कल्पना झाल्यामुळें, त्यांना जगांत वर्तमानकाळीं किंवा पुढें येणाऱ्या भविष्यकाळीं चांगलें किंवा हितकारक असें काहींच दिसत नाहीं. जिकडे पहावें तिकड आंधार! अशा या अंधारांत निराशावादाच्या आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ खेळणारे हिंदुजन आतां राष्ट्रीय स्वातंत्र्य प्राप्त करण्यासाठीं सज्ज झालें आहेत! परंतु बौद्धिक गुलामगिरीचीं निरनिराळी जाळीं तोडल्याशिवाय राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या सुखास्वादास हिंदुराष्ट्र कदापिही पात्र होणार नाहीं, ही मुख्य मुद्याची गोष्ट आमचे विचारक्षम हिंदुबांधव विसरणार नाहींत, अशी आम्हांला फार फार उमेद आहे.

मागें युरोपांत **रोसो** नामक तत्त्ववेत्त्याने अमच्या इकडील पुराणमतवाद्यांच्या निराशातत्त्वाची तळी उचलून धरून सुधारणा-तत्त्वाची निंदा करण्याचा एक संप्रदाय स्थापन केला होता. यांत अनेक फाजील निष्ठ, सोंवळे शालशिष्ट, बरेचसे मतिभ्रष्ट आणि कांहीं भ्रमिष्ट अनुयायी सामील होऊन, त्यांनी अज्ञानी लोकांना भेवडावून गुपचूप पिळून काढण्याचा एक वेदोक्त व्यापारच सुरूं केला होता. स्वतः कांहिंहि न करतां नुसत्या सुधारकांना शिव्या देण्यात किंवा सर्रास सुधारणातत्वाची निंदा करण्यांत बहुसंख्यांक अज्ञानी लोकांच्या स्तुतिपाठाचा कापूर जर आत्मस्तोमाच्या आरतींत भरपूर पडतो, तर असल्या गव्हाणींतल्या कुत्र्यांची संख्या केव्हांहि व कोठेंहि सपाटून असायचीच. सरतेशेवटीं ' सुधारणा म्हणजे जगाचा सत्यानाश ' या तत्त्वाचा पुरस्कार करणाऱ्या **रोसोला** सणसणीत टक्कर देऊन चीत करायला लेसिंग आपल्या अस्तन्या वर सारून पुढें सरसावला. **लेसिंग** हा मोठा दूरदृष्टी, चिकित्सक, आखाडेबाज आणि तीक्ष्ण बुद्धिमत्तेचा तत्वज्ञानी होता. जगांतल्या सर्व सुधारणा मैथुनातिक्रमाला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष उत्तेजन देणाऱ्या असल्यामुळें त्या मानवजातीच्या संहारासच कारणीभूत होतात, असें प्रतिपादन करणाऱ्या **रोसो**प्रभृति निराशावाद्यांना **लेसिंग**नें असा सवाल केला कीं, " सुधारणेच्या उच्च शिखरावर पोहचलेलें व मैथुनातिक्रमांत भरकटलेलें दिसणारें अथेन्स अखेर खालीं कोसळलें, पण त्याच्या ऱ्हासाला मैथुनातिक्रमच कारणीभूत झाला याला आधार काय? आणि मैथुनातिक्रमा- ( Psychopathia sexualis ) मुळेंच जर राष्ट्रें नामशेष होतात असें गृहीत धरलें, तर जगप्रसिद्ध सद्‌गुणी स्पार्टाचा सत्यानाश कां व कशानें झाला? " अखेर रोसोला कबूल करावें लागलें कीं सुधारणा होणें हा निसर्गाचा अनिवार्य धर्म आहे. या धर्माचा नाश केला तर मानवजातीच्या प्रवृत्ति रानटी व राक्षसी बनून मैथुनातिक्रमाची मर्यादाहि कांही कमी होणार नाहीं. मैथुनातिक्रम निसर्गाच्या बरोबरीनेंच जन्मलेला आहे आणि तो आतांच फाजील झाला व पूर्वी तसा नव्हताच असें म्हणतां यावयाचें नाहीं, या गोष्टीचा **रोसो**च्या मनावर पूर्ण विचारांती चक्क प्रकाश पडला. सुप्रसिद्ध भाषाशास्त्री **मफ्‌नें** या प्रश्नाची आपल्या 'What is Civilization?' (सुधारणा म्हणजे काय ?) या पुस्तकांत चर्चा करतांना निर्णय काढला कीं " If civilization had not come, vice would still have been dominant, and that civilization, involving as it does *intellectual progress*, provides also the means for counter-acting vice " [pp. 30, 31, Halle, 1880.]

## मानवी उत्क्रांतीचा इतिहास

नीट लक्षपूर्वक, पूर्वग्रहविरहीत वृत्तीनें वाचून मनन केला कीं आपल्याला एक गोष्ट चटकन उमजून येईल की पुराणमतवाद्यांच्या निराशावादाला त्यांच्या हेकेखोर व एककल्लीपणाखेरीज कशाचाहि आधार नाहीं. अत्यंत रानटी अवस्थेंतून सुधारत सुधारत मनुष्य सांप्रतच्या उन्नत स्थितीला येऊन पोहचला आहे. कल्पनेच दुर्बिणींतून भविष्यकाळच्या प्रदेशाची पाहणी केली तर हीच उन्नतावस्था अधिकाधिक उज्वलच दिसेल आणि इतिहासाच्या सहाय्यानें भूतकाळाच्या खोल खाणींत उतरून उत्क्रांत्यवस्थेच्या पायऱ्यांची प्रत्यक्ष पाहणी केली, तर हेंच प्रत्ययाला येतें कीं जसेजसें खोल जावें तसतशा निकृष्ठावस्थेच्या ओबडधोबड पायऱ्या, खडपे व सुळे आढळतात आणि जसजसे वर यावें तों तों त्या पायऱ्यांना काहीं विशेष प्रकारच्या घडणीचा संस्कार होत होत आजला त्यांना कांहीतरी निश्चित स्वरूप आलेलें आढळतें. उत्क्रांतितत्त्वाचा एक मुख्य नियम असा आहे कीं मानवजातीच्या अनेक इंद्रियांची परिणति एकदम एकसमयावच्छेदें होत नसते. एकेक इंद्रिय क्रमशः परिणत होत जातें. ज्यावेळीं घ्राणेंद्रियाची परिणति होत असेल तेंव्हा त्याला पोषक व उत्तेजक असणाऱ्या विकारांचाच काय तो अंमल जोरांत असतो ; इतर इंद्रियें, विकार व विचार हीं संवेदना-शून्यच असतात. ज्यावेळी माणसांत वासनेंद्रिय परिणत होत होतें, त्यावेळीं त्याचें ज्ञानेंद्रिय बधिरावस्थेंत होतें. त्यावेळच्या मानवी मैथुनप्रवृत्तीत आणि पश्वादिकांच्या मैथुनातिक्रमांत कांहींहि फरक नव्हता; उलट सृष्टीनियमाविरूद्ध कर्म करण्यास प्राचीन काळचा मानवाचा कारटा मुळींच कचरत नसे. अर्थात् पशुपक्षादिकांच्या पोटीं जन्मलेंल्या पौराणिक व्यक्त्या एकतर काल्पनिक मानल्या पाहिजेत अगर या सृष्टीविरुद्ध मैथुनप्रवृत्तीच्या पर्यवसानांत त्या ढकलल्या पाहिजेंत, याशिवाय तिसरा मार्ग नाहीं. परंतु मनुष्यप्राण्याची उत्क्रांती म्हणजे त्याच्या

## ज्ञानेंद्रियाचा पूर्ण विकास

अथवा त्याच्या मेंदूची परिणति होय. मेंदु प्रगल्भ होऊं लागला कीं सहाजीकच त्यांची इतर इंद्रियें कमजोर होतात. ज्ञानेंद्रिय पूर्ण प्रगल्भ झालें कीं त्यालला पोषक व उत्तेजक अशाच विकारांची सेना हत्यारबंद होऊन त्याच्या पाठीशी उभी राहतें आणि पूर्वीचे इतर सर्व काम्य विकार लुलेपांगळे बनतात. पुराणमतवादी चालू मन्वंतराच्या मैथुनातिक्रमाबद्दल कितीहि आदळ आपट करीत, उत्क्रांतीचा इतिहास आज छातीला हात लावून सप्रमाण पटवून देत आहे कीं ज्याअर्थी हल्लीं मानवजातीचें ज्ञानेंद्रिय दिवसेंदिवस अधिकाधिक तीक्ष्ण व प्रगल्भ होत चाललें आहे, *त्याअर्थी मनुष्याच्या हातून पशुतुल्य मैथुनातिक्रम होणेंच शक्य नाहीं. उलटपक्षीं बुद्धि जसजशी तीव्र विकास पाऊं लागेल, तसतसा मैथुनप्रवृत्तीचा ओढाहि कमीकमी होत जाऊन, त्याला

*Havelock Ellis, in " Man and Woman " comes to the conclusion that the bodily development of our race is a progress in the direction of a youthful type. This is merely another way of expressing the fact that in the case of many organs and systems, and more especially in the case of the hairy covering of the skin, an arrest of development has occurred, and it is a recognition of the fact that the retrogressive metamorphosis of these organs is a compensation for the dominating and enormous development of the brain.

Sexual Life of our Times. P. 25.

निमित्तमात्र कर्तव्याचें शुद्ध स्वरूप प्राप्त झाल्याशिवाय खास राहणार नाही. एकूण सध्यां सुसंस्कृत मानवी समाजांत मैथुनातिक्रम पूर्वीइतका बलवत्तर नाहीं आणि आजला जो प्रेमातिरेक (Passionate Love) दृष्टीस पडतो, त्यांत निवळ काम्य हेतूपेक्षां काहींतरी विशेष भावना उद्दीपित झालेली असली पाहिजे हें निर्विवाद ठरतें. मानवी प्राण्यांच्या उत्क्रांत्यवस्थेच्या अगदीं सुरुवातीला

## प्रेम कशाशीं खातात

हें मुळींच माहीत नव्हतें, हा सिद्धांत प्रथम लबॉक नामक तत्ववेत्त्यानें शोधून काढला. प्रेमात निसर्गतःच असणारें उच्च अध्यात्मिक तत्व मानव प्राण्याची मानसिक दशा प्रगल्भ व परिणत झाल्याशिवाय त्याला अवगतच होणें कठीण. सुसंस्कृत समाजांतील मनुष्यांची काम्य प्रवृत्ति आणि अनाडी लोकांची पशुतुल्य व्यभिचारप्रवृत्ति यांत असणारा ढोबळ भेद नीट परीक्षण केला तर या मुद्यावर अधिक लिहिण्याची जरूरच उरत नाहीं. अलीकडच्या सुशिक्षित मंडळींच्या प्रेमप्रवृत्तीची हेंटाळणी करतांना किंवा विधवापुनर्विवाह असवर्गविवाहादि कृत्यांवर टीकांचा भडीमार करतांना सोंवळे पुराणमतवादी त्यांच्यावर

## बेधडक व्यभिचाराचा आरोप

करतात आणि वेशासंपन्न सोम्याजीनें तिरडीवर चढतां चढतां जरी एकामागून अनेक विवाह केले तरी ते अग्निहोत्राच्या सबबीखाली मात्र वेदोक्त आणि न्याय्य ठरवितात ; जणूं काय या अग्निहोत्र्यांची काम्यप्रवृत्ति अग्नींत जळून खाक झालेली असते आणि स्वतःचा पुनर्विवाह ते अग्निहोत्राच्या सांगतेकरितांच काय तो करतात. परंतु सुशिक्षितांचे प्रणयी लग्न आणि अग्निहोत्र्याचें स्मृत्योक्त लग्न यांतील एक मोठा ठळक भेद वाचकांनी अवश्य लक्षांत ठेवावा. सुशिक्षित प्रणयी सुधारकाचा मुख्य कटाक्ष त्याच्या पसंतीस उतरलेल्या विवक्षित तरुणीशींच विवाह करण्यांत असतो. त्या विवक्षित तरुणीऐवजीं दुसऱ्या कितीहि सद्गुणरूपसंपन्न तरुणी त्याला देण्याचें ठरवून त्याच्या प्रेमपात्र तरुणीचा नाद सोडण्याचा कितीहि आग्रह केला तर तो त्या आग्रहाला कदापिहि मान वांकवीत नाहीं.

## विवाह करीन तर तिच्याशींच करीन

या प्रतिज्ञेला चिकटून राहण्याची त्यांची चिकाटी असते. अर्थात् या चिकाटींत निवळ काम्य प्रवृत्तीपेक्षां आणखी कांही तरी विशिष्ट भावना उद्दीपित असते हें निर्विवाद होय--मग त्या भावनेची जाणीव त्याला व्यक्त करून दाखवितां येवो वा न येवो ! परंतु आमच्या अग्निहोत्र्यांना साठ्यांच्या गंगूऐवजीं पेठ्यांची रंगू जरी आयत्या वेळीं माळ घेऊन बोहल्यावर चढली तरी तिचें पाणीग्रहण करण्यास संकोच वाटत नाहीं. नगास नग मिळाला म्हणजे झालें ! या तुलनेवरून काम्यप्रवृत्तीचा अग्नि सुशिक्षित प्रणयी तरुणांपेक्षा या अग्निहोत्र्यांच्याच पुनर्विवाह-प्रवृत्तीत अधिक भडाडलेला असतो, हें अधिक विशद करून सांगितलेच पाहिजे काय ? सुप्रसिद्ध

निसर्गशास्त्रवेत्ता **कीलमेयर** (Kielmeyer) म्हणतो कीं, " Love is a tree, that it has its *roots* in the physical sphere, but that its *branches* extend high above the physical world, expanding more and more abundantly into the sphere of the spiritual." [Sex : Life p. 5] निराशावादाने मेंदु सडलेल्या जीर्णमताभिमानी धादांत्यांना आधीं मुळीं मानवजातीच्या प्रगतीची धडधडीत दिसणारी साक्षच मान्य नाहीं, मग प्रेमांत अंतर्भूत असलेली उच्च अध्यात्म (Spiritual) भावना दिसणार कशी ?

**कलीयुगामुळें । झालें धर्माचे वाटोळें ।।**

हा त्यांचा पौराणिकी सिद्धांत ते अक्षयीं आपल्या हृदयाशीं घट्ट धरून बसले आहेत. चालू युगाला सुद्धां कलीयुग हें नांव देऊन त्यांच्या काळेकुट्टपणाचा पुरावा देण्यासाठी ज्यांनी भविष्य पुराणांची जंत्री व्हिक्टोरिया राणीच्या कारकिर्दीपर्यंत* आणून भिडविली, त्यांच्या मनोवृत्तीवर चढलेल्या पातकी कल्पनांच्या डांबरीचीं पुटें कशी धुवून काढावीं ? तथापि विद्वान् शास्त्रवेत्त्यांनी याबद्दल जे निश्चित सिद्धांत काढले आहेत त्यांच्याशीं वाचकांचा अल्प परिचय करून दिल्याशिवाय पुढें जाणें बरें नाहीं. **इवॉन ब्लॉक्. एम्. डी.** हे आपल्या

**' चालूं मन्वंतरांतील मैथुनप्रवृत्ति '**

नामक ग्रंथांत (पृ. ५–६) खालील प्रमाणें विवेचन करतात :—

" For the human sprit in the course of its development has become not merely lord of the elementary forces of Nature : it has become also lord and master, interpreter and guide, of the sexual impulse; for this impulse owes to the human spirit its new and peculiar life, its life *capable of further development* as manifested in the history of human love. *The History of Love is the History of Mankind, of Civilization.* For love manifests a continual *progress,* which can be denied by those only who have failed to understand the deep significance of human love in the entire civilized life of all times, and who , observing the persistence of the primeval and ever-active sexual impulse, elemental in its nature, are led only to a hopeless doubt as to the possibility of all love, and thus justify the pessimism with which Schopenhauer has condemned the significance of human sexual love. Undoubtedly this elemental impulse persists for ever, and to follow it *alone* leads to death, to utter desolation, to nothingness,

---

*श्रीवेंकटेश्वर छापखान्यांत छापलेल्या भविष्यपुराणाच्या प्रतींत भविष्यांची जंत्री एकोणिसाव्या शतकापर्यंत आणून भिडविलेली आढळते.

as Tolstoi, Strindberg and Weininger, the bitter opponents of modern "love ", have so vehemently declared. But did these men know true love ? Had they become conscious of inevitable *necessity* with which civilization in the course of ages and generations had transformed the human sexual impulse into love as it now exists, transformed it in so idea of the development of love as it now exists, transformed it in so manifold and so wonderful a way ? Had they any idea of the *development* of love, and of its place and its significance in history ?

Let them believe this, these doubting and despairing souls— *nouthing* has been destroyed of all the spiritual relations, of all the wonderful possibilities of development which have manifested themselves in the course of the long and varied history of the evolution of love. To describe this evolution, it is necessary to draw attention to all those elements of civilization which *remain at present* influential in love, but it is further indispensable to forecast their future development. Once again we stand at an important turning point in the history of love, an important turning point in the history of love. *The old separates itself from the new, the better will once more be the enemy of the good.* But love regarded, as it must now be regarded, in its inner *nature,* as a sexual implulse most perfectly and completely infused with a spiritual content, will remain the inalienable gain of civilization; it will stand forth ever purer and more promotive of happiness, like a mirror of marvellous clearness, wherein is reflected a peculair and accurate picture of the successive epochs of civilization."

या विस्तृत विवेचनावरून आपणांस सप्रमाण पटतें कीं मानवजाती ही दिवसेंदिवस उन्नत होत असून एकंदर परिस्थिति निःपक्षपणानें पाहिली तर निराशावादाला कोठें कसलाहि आधार नाहीं. " The way of the spirit in love becomes predominant *pari passu* with the development of mankind in civilization........The transformation of the sexual impulse into passionate love represents the victory of the intelligence over the will." [do. p. 25] हा आधुनिक शास्त्रवेत्त्यांचा सिद्धांत पाहिला कीं बीज आणि क्षेत्र शुद्धीचे अशक्य नियम लिहून काढून स्मृतींचीं

बाडें भरून काढण्याचा रिकामटेंकडा उपद्व्याप आमच्या स्मृतिकारांनीं कां व कशाला केला कोण जाणें, असें वाटू लागतें. उलटपक्षीं, आपल्या तीक्ष्ण दूरदृष्टीचीं (?) चालतींबोलतीं स्मारकें म्हणून आपल्याला स्मृत्या लिहून ठेवण्याचा त्यांनीं जो महत्वाकांक्षी उपक्रम केला, तो काहीं काळपर्यंत बौद्धिक गुलामगिरींत सडत पडलेल्या हिंदूंनी जरी मान्य केला, तरी विसाव्या शतकांतील शास्त्रीय शोधांनी त्यांच्या स्मृतिवचनांतला पोंकळपणा चव्हाट्यावर नागवा उघडा केल्यामुळें या स्मृतिकारांची स्थिति सांप्रत अत्यंत शोचनीय झालेली आहे.

* * * *

[ १८ ] बीज आणि क्षेत्राच्या शुद्धीबद्दल एवढा मोठा कडेकोट बंदोबस्त करणाऱ्या स्मृत्यांचा आणि स्मृतिकारांचा जन्म होण्यापूर्वीच्या आर्यांची सामाजिक स्थिति, कोणत्याहि प्रकारचे समाजनिर्बंध नसतांनाहि. जर उत्कृष्ट असल्याची साक्ष इतिहास देत आहे, तर पुढें च या स्मृतिकारांनीं बीजक्षेत्र-शुद्धीचीं लचांडें निर्माण करून काय पुण्यांश साधला? यावर उत्तरपक्ष असा आहे कीं दस्यू लोकांच्या सानिध्यांत जेव्हां आर्यलोक आले, तेव्हां त्या नीच मानल्या गेलेल्या लोकांच्या रक्ताची आपल्या रक्तांत सळमिसळ होऊ नये,* म्हणून स्मृतिकारांना ही बीज-क्षेत्रशुद्धीची कुंपण मुद्दाम तयार करणें भाग पडलें. आर्य जेते होते आणि दस्यू जित होते, तेव्हां अशा प्रकारचा कांहीं निर्बंध जर खरोखरच ऋग्वेदकाळीं अंमलांत आणण्याचा प्रयत्न झाला असेल, ( त्यावेळीं तो झाला नाहीं हें सिद्धच आहे ) तर त्यांत अस्वाभाविक असें कांहींच नाहीं. परंतु यावर अशी शंका येते कीं खुद्द आर्यांची तरी उत्पत्ति बीजक्षेत्रशुद्धीच्या सोंवळ्या खाणींतून झालेलीं होती काय? या प्रश्नाला नास्तिपक्षींच उत्तर देणें भाग पडतें. बरें, इतिहास पाहिला तर शहाण्या स्मृतिकारांनी ठरविलेल्या नीचयोनिजात पुरूषांनीं व स्त्रियांनीं मोठमोठे पराक्रम गाजविल्याचें स्पष्ट दिसतें. असें जर आहे तर,

**ब्राह्मण्यां क्षत्रियात्सूतो वैशयोद्वैदेहिकस्तथा ।**
**शूद्राज्जातस्तु चाण्डालः सर्वधर्मबहिष्कृतः ।। १–९३ याज्ञ. स्मृ.**

हा निर्बंध स्मृतिकारांनीं कोणत्या आधारावर ठरविला ? आमची तर पक्की खात्री आहे कीं हल्लीं जसें महाराष्ट्रीय राजकारणाच्या क्षेत्रांत

---

* The pioneers of Indo Aryan civilisation, like their fellow Aryans *in Southern Europe, won their way even more effectually by their superior intellectual qualities than by their fighting strength.* Though for many centuries holding themselves proudly aloof from the non-Aryan races and jealously guarding their spirtual inheritance from profanation by the uninitiated, their laws, political institutions and religions ideas gradually became, for the vast majority of the people, the warp and weft of Indian life, even for the millions is whose *veins no trace of Aryan blood* can now be found..................even among those who called themselves Aryans, there were many of mixed blood. It was by spiritual rather than physical ties that Aryans and non-Aryans were gradually bound together into a political unity with an abiding sense of nationality.

Aryan Rule in India. P. 9.

## टिळकद्रोही तो देशद्रोही

हें एक ' राष्ट्रीय स्मृतिवचन ' सर्वत्र बोकाळलें आहे, तसल्याच हलकट मनोवृत्तींतून वरच्यासारखीं वचनें निर्माण झालेली आहेत. या पलीकडे त्यांना कवडीचीहि किंमत देता येणें शक्य नाहीं. अरसिक स्मृतिकारांनीं काहीं स्वार्थी चळवळ्यांच्या गुप्त कारस्थानास बळी पडून अनुलोम प्रतिलोम प्रजोत्पत्तीचे काल्पनिक व अशास्त्रीय ठोंकताळे स्मृतिग्रंथांतून मनमुराद पेरून ठेवण्याऐवजीं स्त्री-पुरुष–परस्पराकर्षण कां व कसे होतें याचा थोडे श्रम घेऊन नीट अभ्यास केला असता तर शूद्रमर्दापासून ब्राह्मणस्त्रीला झालेल्या पुत्राला चांडाळ ठरवून त्याच्या टाळक्यावर ' सर्वधर्मबहिष्कृत: ' ची पाटी मारण्याचें पोरकट कृत्य त्यांच्या हातून घडतेंच ना ! शिवाय असा एक साधारण नियम आहे कीं कायद्यांच्या पुस्तकांत ज्या ज्या अपराधांना शिक्षा सांगितलेल्या असतात, ते ते अपराध लोकांकडून घडत असतात. नुसते कायदे करून किंवा अपराध्यांना तुरुंगातले पोपट बनवून जनता कधीं सुधारत नसते, हें तत्त्व अझूनहि प्रिझन कमिशनच्या खुर्च्या खतविणाऱ्या बृहस्पतींना जर उमगत नाहीं, तर ज्यावेळीं

## हिंदुस्थान म्हणजेच सारें जग

असल्या कूपमंडकी कल्पनेंत बुद्धिसर्वस्वाची घमेंड मारणारे स्मृतिकार भिक्षुकी मतवर्चस्वाचे गुलाम बनून आपापल्या स्मृतींचीं बांडे खरडीत बसत त्यांना कोठून समजणार ? शिक्षा हा कांही सुधारणेचा उपाय नव्हे आणि निसर्गाच्या नियमानें आईबापांच्या पोटीं जन्माला येणें हा कांही गुन्हा नव्हे ! गुन्हाच मानायचा तर फार झालें तर तो आईबापांवर कदाचित् लादतां येईल. पण त्याचे प्रायश्चित्त त्यांच्या मुलांना काय म्हणून ? बालविधवांचे पुनर्विवाह करायचें नाहींत, साध्या माणुसकीचेहि हक्क त्यांना द्यायचे नाहींत, त्यांच्या सर्व महत्त्वाकांक्षांची दडपशाही निर्दयपणानें पोळपाट लाटण्याच्या गुलामगिरींत करायची आणि त्यांनीं अशा अमानुष कचाट्यांत निसर्गाच्या शुद्ध उमाळ्यानें काम्य मार्गाचा अवलंब करून पोटी जन्माला येणाऱ्या निरपराधी अर्भकाला जनापवादाच्या क्रौर्याला भिऊन पंढरपूरच्या चंद्रभागेंत किंवा नाठाळ नाशकाच्या गोदेंत

## न कांपितां नाळ स्वाधीन केला

आणि अशाहि स्थितींत त्या अनाथ अर्भकांचें संगोपन प्रार्थनासमाजीय एका बालसंगोपन-संस्थेनें केलें, तर यांत कोण, कसा व कां दोषी ठरतो याचा विचार ' बायकोशिवाय अग्निहोत्राच्या शेगडींतल्या गोवऱ्यांची राख थंड होत चालली हो ! ' म्हणून चौपदरी गळा काढून रडणाऱ्या नाशिक पुण्याच्या ब्रह्मसमंधांनीं केला पाहिजे. शूद्रबाप आणि ब्राह्मण आईच्या पोटीं जन्माला येणारा प्राणी चांडाळच असतो कीं ब्राह्मणांनाहि ब्रह्मज्ञानाच्या बाबतींत चीत करणारा पंडीत असतो, हें तत्व निदान आतां तरी अनाथबालसंगोपनालयांनीं स्पष्ट सिद्ध करून दाखविलें आहे ; आणि या दिशेनें प्रयत्न करण्यांत अग्रेसर म्हणून आमच्या देशांतील ब्राह्मणबुवांपेक्षाहि ख्रिस्ती मिशनऱ्यांनाच सर्व श्रेय देणें अधिक न्याय्य आहे. जोंपर्यंत असवर्ग संबंधाची प्रजा हिन्दु धर्माच्या क्षेत्रांत प्रामाणिक धर्माभिमानानें राहते तोपर्यंत ती चांडाळ किंवा शूद्र नांवाखालीं अस्पृश्य, अदर्शनीय व धर्मांचरणांतहि अनधिकारी ठरविली जाते आणि त्याच प्रजेनें

## क्रिस्ती धर्माचा बाप्तिस्मा घेतला

कीं तीच स्पृश्य, दर्शनीय आणि---त्यांतील कांही व्यक्ती अनुवंशिक संस्काराच्या जोरावर आंगीकृत गुणकर्मांचा पूर्ण विकास होऊन श्रेष्ठ दर्जाला पोहचतांच-पूजनीयहि ठरतात. या एकाच सिद्ध गोष्टीवरून आमच्या स्मृतिकारांचे स्मृतिनिर्बंध असनातन, असत्य, फोल आणि कुचकामाचे ठरत नाहींत काय ? अर्थात् जे निर्बंध सनातन नाहींत, सत्याच्या आणि प्रत्यक्ष प्रमाणांच्या कसोटीला उतरत नाहींत, त्यांचा सनातन धर्मांत समावेशहि होऊ शकत नाहीं. म्हणूनच ब्राह्मणांनी ब्राह्मणांकरिता स्वतःचें आत्मस्तोम माजविण्याकरितां लिहिलेल्या नानाविध

## स्मृत्यांचा समावेश धर्मांत होत नाहीं.

अगदीं अलीकडच्या इतिहासांतसुद्धां बाळाजीपंत नातू, चिंतामणराव सांगलीकर, निळकंठभट थत्ते, यमाजी शिवदेव वगैरे मूर्तिमंत चांडाळ व्यक्तींची चरित्रें पाहिलीं कीं ब्राह्मणत्व किंवा चांडाळत्व हें जन्मावर ठरविणाऱ्या स्मृतिकारांची ज्याला कींव येणार नाहीं तो मुक्तोऽथवापशूच असला पाहिजे खासः आणि या व्यक्त्या ब्राह्मणच होत्या असें कंठरवाने प्रतिपादन करणारे आधुनिक प्राणीसुद्धां चांडालत्वाच्या गुणधर्मांपेक्षा अधिक वरच्या पायरींत अझून उत्क्रांत झालेले नाहींत, असेहि म्हणणें प्राप्त होतें. अनुलोम प्रतिलोम प्रजाजनांच्या नियमांच्या फोलकटपणाप्रमाणेंच चांडाळांचीं मुलें चांडाळच निपजतात कीं काय या प्रश्नांनाहि या अनाथ बालसंगोपनाश्रमांनीं सक्रीय उत्तर दिलें आहे. अलेक्झांडर वॉन हम्बोल्ट् यानें आपल्या "Cosmos" नामक ग्रंथाच्या प्रस्तावनेंत असा एक शास्त्रीय सिद्धांत काढला आहे कीं "Sensual impressions and apparently chance occurrences are, in the case of youthful emotional individuals, often capable of determining the entire of a human life." लहानपणीं कोमल मनांवर होणारे बाह्य स्थितीचे परिणाम जरीं कालवशात् आपण विसरून जातों, तरी त्यांची आपल्या आत्मविषयक (psychical) प्रकृतीवर उमटली जाणारी मुद्रा कधींच पुसली जात नाहीं ; एवढेंच नव्हें, तर आपल्या भावी आयुष्यांतील सर्व प्रकारची बरी वाईट संस्कृति या मुद्रेनेंच घडवून आणलेली असते, ही गोष्ट आपण मुख्यतः लक्षांत घेतली पाहिजे. बालपणचे संस्कार हे मनुष्याच्या दैवाची घटना करणारे कारागीरच होत. गुन्हेगार जातींतलीं मुलें गुन्हेगारच कां निपजतात ? तीं गुन्हेगार आईबापांच्या पोटी जन्माला येतात म्हणून नव्हे, तर बाळपणीं तीं गुन्हेगारांच्या वसतींत, गुन्हें करण्याचीच प्रवृत्ति जेथे रात्रंदिवस विशेष प्रचलित आहे अशा परिस्थितींत वाढविलीं जातात आणि गुन्हें करण्याच्या प्रवृत्तीचा परिणाम त्यांच्या मनावर फार खोल आणि कायमचा होतो म्हणून, परंतु या मुलांना चांगले शिक्षण दिल्यास त्यांची गुन्हे करण्याची प्रवृत्ति एकाच जन्मांत नाहींशी होते आणि या गुन्हेगारांच्या समाजांतूनसुद्धां नामधारी

## ब्राह्मणांच्या तोंडात मारणारे ब्राह्मण्य

गाजविणारे ज्ञानी निर्माण होतात, ही गोष्ट अनाथ बालकाश्रमांनीं आतां अगदीं स्पष्टच सिद्ध करून दाखविली आहे. तेव्हा जन्मावरून जाती ठरविणाऱ्या स्मृतिकारांच्या बेअक्कलपणाची

साक्ष यापेक्षां अधिक ती कोणती ? व बीज आणि क्षेत्र शुद्धाशुद्धतेचा मामला डोक्यावर घेऊन नाचणाऱ्या शहाण्यांच्या पोकळ डोक्यांची तारीफ तरी किती करावी ? स्मृतिकारांचे हे स्मृतिनिर्बंध म्हणजे त्यांच्या माणुसकीच्या अभावाची चालतीं बोलतीं प्रदर्शनेंच म्हटलीं पाहिजेत. या निर्बंधांनीं हिन्दु धर्माचा खून केलेला आहे. या निर्बंधांनीं हिंदु समाजाचा लोकसंग्रहदृष्ट्या भयंकर ऱ्हास केल्याचें अघोर आणि अक्षम्य पातक केलें आहे. या स्मृतिकारांनीं हिंदु राष्ट्राचें राष्ट्रीयत्व खच्ची करून, त्याला आजला सर्वच बाबतीत पूर्ण नपूसंक बनवून सोडलें आहे. **श्रीमंत सयाजीराव गायकवाड** यांनी या प्रश्नाची फारच मार्मिक चिकित्सा केली आहे. ते म्हणतात—

**'' ज्या सामाजिक निर्बंधांमुळें आमच्या समाजांत, पारियापासून ब्राह्मणांपर्यंत, एकाहून एक हळू हळू उंच होत गेलेल्या, अशा असंख्य जाती निर्माण झाल्या आहेत, ते निर्बंधच मुळीं सर्वस्वी अन्यायाचे आहेत. ह्या निर्बंधामुळें, स्वभावतःच एका योग्यतेचा असणाऱ्या मनुष्यप्राण्यांत उच्चनीच भाव मानण्यांत आला आहे, व त्यांच्या जातीं करून टाकल्या आहेत ; आणि अशा या जातीची इमारत गुणकर्मांच्या पायावर न उभारतां, केवळ जन्माच्या तत्वावर रचलेली आहे. म्हणजे, एखादा मनुष्य यदृच्छेनें श्रेष्ठ मानलेल्या जातींत जन्माला आला, तर तेवढ्याच कारणामुळें कनिष्ठ मानलेल्या जातींत जन्म पावणाऱ्या मनुष्यांपेक्षा त्याची योग्यता अधिक आहे, असें गृहित धरलें जातें. समाजांत आपलें महत्व वाढावें, म्हणून जातीजातींत जे तंटे निरंतर चालू आहेत, ते परस्परांमधिल वैमनस्य कायम ठेवण्यास कारणीभूत होतात.''**

परंतु, याहिपेक्षां हिंदु राष्ट्राचें लोकसंग्रहदृष्ट्या जें नुकसान पूर्वी झालें, सध्यां होत आहे आणि–हे स्मृतिनिर्बंध हिंदूनीं जर लवकर फासांवर चढविले नाहींत तर–पुढेंहि होत राहणारें नुकसान या जगतितलावरून हिंदूंना सफाई नामशेष केल्याशिवाय खास राहणार नाहीं. मुसलमानी अंमदानीत इस्लामी धर्मछळामुळें परधर्मात गेलेल्या हिंदूंच्या संख्येपेक्षां हिंदूंच्याच धर्मछळामुळें मुसलमानी गोटांत गेलेल्या हिंदू बांधवांची संख्या अधिक भरते. आजलाहि क्रिस्ती गोटांत जाणाऱ्या हिंदूंना हिंदूंचा धर्मछळच विशेषतः कारण होत आहे. एकट्या मद्रास इलाख्याकडे पाहिलें तरीं हेच दिसून येतें कीं '' गेल्या चाळीस वर्षांत नुसत्या तेलंगणात सुमारें दोन लाख पन्नास हजार पंचमांनीं खिस्तीधर्म स्वीकारिला आहे. याशिवाय एकट्या त्रावणकोरांत एक लाख पंचम खिस्ती झाले आहेत ते निराळेच.'' (हिंदुस्थानांतील असंतोष, पृ. ३१३) मग आसेतुहिमाचल हिंदुस्थानांत हा

## धर्मांतराचा वणवा

केवढा भडकलेला असेल याची वाचकांनीं कल्पना करावी तें बरें. अर्थात् ही वणव्याची होळी अखंड अखंड धडाडत ठेवण्यास आमच्या अदूरदृष्टी स्मृतिकारांचे स्वार्थी निर्बंध आणि त्यांना डोक्यावर घेऊन नाचणाऱ्या अक्कलशून्य धर्ममार्तंडांचे पापी थेरच जबाबदार धरणें प्राप्त आहे.

मुसलमान किंवा क्रिस्ती मिशनऱ्यांना दोष देण्यापेक्षां, त्यांनीं--धर्मांतराच्या रूपानेंच कां होईनां !--आमच्यांतील बऱ्याचशा हिंदू भावंडांच्या गळ्याला लागलेला

## बौद्धिक गुलामगिरीचा फांस

तोडून त्यांचा ऐहिक उन्नतीचा मार्ग खुला करून दिला आणि भिक्षुकी जुलमांतून त्यांची कायमची सुटका केली, याबद्दल कोणी झाला तरी त्या मिशनऱ्यांचे आभारच मानील. मद्रासच्या पंचमांनीं क्रिस्ती धर्माचा स्वीकार करतांच त्यांची उन्नति कसकशी होत आहे, याबद्दल तेलगू मिशनच्या एका रिपोर्टांतील उतारा पहा :--

'' गेल्या चाळीस वर्षांत झालेल्या नैतिक व धार्मिक सुधारणेकडे जर आपण लक्ष पोहचविलें, तर मिशनरी लोकांच्या कामाचा परिणाम पाहून मनाला मोठा धीर वाटतो. पंचम लोक स्वभावतःच दरिद्री, घाणेरडे व अडाणी आहेत ; **आणि शेंकडों वर्षे जुलमाखालीं चिरडत आल्यामुळें, त्यांच्या आंगीं कांहीं विशेष प्रकारचे दुर्गुण जडलेले असून, त्यावरून त्यांच्या नीच स्थितीचा व दास्यत्वाचा बोध होतो,** हें अगदीं खरें आहे. परंतु त्यांच्या बाबतींतील अत्यंत आशाजनक गोष्ट अशीं आहे कीं, आपल्या नीच स्थितीची त्यांना पूर्ण जाणीव असून, त्यांतून सुटण्यांस ते फार उत्सुक आहेत आणि म्हणूनच त्यांच्या कल्याणाविषयीं कळकळ बाळगणाऱ्या व कर्तृत्ववान अशा शिक्षकांच्या देखरेखीखालीं त्यांच्याकरितां मंडळ्या स्थापन केल्या, तर त्यांच्या सांपत्तिक, बौद्धिक व नैतिक स्थितींत परिछिन्न सुधारणा दिसून येऊं लागते ; त्यांचें गाढ अज्ञान नाहींसें होतें ; ते आपली शरीरें व राहण्याची घरें वगैरे जास्त स्वच्छ व नीटनीटकीं ठेऊं लागतात ; गुरांना विष घालणें व शेतांतील धान्याची चोरी करणें, या दोन गुन्ह्यांकडे त्या लोकांची विशेष प्रवृत्ति असते, ती ते सोडून देऊं लागतात ; बालविवाह व वेश्यागमन ह्या ज्या वाईट चाली बहुतेक हिंदू लोकांत पडल्या आहेत, त्यांचा ते लोक त्याग करूं लागतात ; आपल्यापेक्षां उच्च जातींतील लोकांपुढें नाक घांसून आपण नेहमीं वागलें पाहिजे, अशी जी त्यांच्या मनाची समजूत असते, तिचा जोर बराच कमी पडतो ; आणि आपण मनुष्य प्राणी असल्यामुळें, आपले हक्क काय आहेत व त्याबद्दल आपणांस कसा अभिमान वाटला पाहिजे, ह्याची जाणीव त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न होते. भोवतालच्या परिस्थितींतून जर त्यांना आपली सुटका करून घेतां आली तर आपल्या देशबांधवांपैकीं जे उत्तम म्हणून गणले गेले आहेत, त्यांच्यापेक्षां बुद्धीनें आपण यत्किंचितहि कमी नाहीं, असे जगाच्या निदर्शनास ते लोक आणून देतात. विशेषतः मिशनरी लोकांनी स्थापन केलेल्या ज्या शाळांस बोर्डिंगें जोडलेली असतात, त्या ठिकाणीं वरील प्रकार फारच चांगल्या रीतीनें दृष्टीस पडतो. अशा वसतिगृहांतील पंचमांचीं मुलें ब्राह्मणलोकांच्या मुलांच्या बरोबरीनें विद्या संपादन करीत असतात ; आणि कांहीं मुलें तर खरोखरच ब्राह्मणांच्या मुलांना मागेहिं टाकतात.'' ' हिंदुस्थानांतील असंतोष ' पृ. ३१४-३१५ सामाजिक आणि धार्मिक जुलमांच्या बाबतींत मद्रास इलाखा साऱ्या हिंदुस्थानांत पहिल्या नंबरचा नाठाळ म्हणून ठरला आहे. तिकडील ब्राह्मण इतके मस्तवाल आहेत कीं त्यांना इतिहासात तोडच दाखवायची तर महारामांगांच्या गळ्यांत मडकीं अडकविणाऱ्यां पुण्याच्या चित्पावन पेशवे नोकरशाहीच्या अंमदानींतील भटांचीच होय. हल्लीं इंग्रजी रियासतींत जरी हे भटमंडळ

## अळवाच्या भाजीपेक्षां पातळ

झालेलें आहे, तरी रत्नागिरी जिल्ह्यांत अझून चालू असलेली त्यांचीं सोंवळी घाशीरामी त्रावणकोरांतल्या राजमान्य ब्राह्मणी जुलमाच्या थोबाडींत मारीत असते. "त्रावणकोर संस्थानांत नेहमी असें दृष्टीस पडतें कीं, कोर्टात खटला चालू असतां, एखाद्या पंचमांची साक्ष घेण्याचीं पाळी आली, तर ब्राह्मण न्यायाधीश व ब्राह्मण वकील यांस विटाळ होऊं नये म्हणून, अशा साक्षीदारास न्यायासनापासून सुमारें १०० कदमांवर उभा करितात ; आणि मग, न्यायाधीश व तो पारिया (पंचम) साक्षीदार ह्यांच्यामध्यें ठिकठिकाणीं शिपाई अथवा निरोपे उभे करून, त्यांच्यामार्फत साक्षीदारांचे सवाल-जबाब होत असतात." (**हिंदुस्थानांतील असंतोष. पृ. ३१२**). वाहवा रे त्रावणकोरी ब्राह्मण्य ! आणि धन्य ती त्रावणकोरी ब्राह्मणी राजसत्ता ! !

* * * *

[१९] आता आपण स्त्री-पुरूष-परस्पराकर्षण कसें व का होतें या तत्वाचा शास्त्रीय दृष्ट्या विचार करून, बीजक्षेत्रशुद्धीच्या पाखंडी पुराणावर कांही उजेड पडतो की काय तें पाहूं. स्त्रीपुरूषपरस्पराकर्षण तीन गोष्टींना घडून येतो :--

(१) Attraction आकर्षण किंवा चित्ताकर्षण, (२) Attention एकतानता आणि (३) Affection प्रेमोग्दम. यातली पहिली पायरी आकर्षणाची आहे आणि आकर्षण 'Like attracts like' समानतुल्य प्रवृत्ती-वाचून घडून येत नाही. वाटेल त्या प्रवृत्तीच्या मनुष्याचें चित्त हिरावून नेणाऱ्या आकर्षक स्त्रिया जरी पुष्कळ असल्या, तरी त्यांच्या दर्शनापासून फार झालें तर एकपक्षी आकर्षण होतें, पण परस्पराकर्षण होत नाही; म्हणजे वेळी एखाद्या पुरूषांला पाहून जर एखाद्या स्त्रीचें मन आकर्षित झालें, तर त्याच वेळीं त्या पुरुषाचीही स्थिति तशीच विद्ध होईल असे नाहीं. यांचे कारण त्यांच्या परस्पर मनोवृत्ति समसमान प्रवृत्तीच्या म्हणजे एकजिनसी नसतात. परंतु ज्या वेळीं स्त्रीपुरुषांचें परस्पराकर्षण वरील तीनहि स्थितींतून चढत चढत त्यांचे पूर्ण प्रेमविकासांत पर्यवसान होतें, तेव्हां तीं स्त्रीपुरूषे लौकीकी दृष्ट्या कसल्याही उच्च नीच दर्जाचीं असलीं, तरी ती समान मनोधर्मांचीं, समसमान स्वभावाचीं व एकजिनसी परिणता व्यवस्थेचींच असतात. उदाहरणार्थ, एखाद्या महारणीची व वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मणाची गट्टी जमली, तर ती महारीण महारीणहि नव्हे व तो ब्राह्मण ब्राह्मणही नव्हे; त्यांच्या परस्पर संस्कृतीचा पारा एकाच बिंदूवर आलेला असला पाहिजे, त्या शिवाय त्यांची परस्पर मनोवृत्ति वरील तीनहि स्थितींतून एकसमयावच्छेदें परिणत होत होत तीं दोघें एकमेकांशी प्रेमबद्ध होऊं शकणारच नाहींत. अलीकडे उच्चवर्गीय म्हणविणाऱ्या कांही समाजांतून नीचवर्गीय समाजासारखी दिसणारीं मुलें जन्माला येत आहेत आणि नीच समाजांत उच्चवर्णाप्रमाणें स्पष्टस्पष्ट दिसणारी स्त्री-पुरूषें आढळत आहेत, याचीं कारणें काय असावीं हें अधिक स्पष्ट करून सांगावला नको. अर्थात् जेथें स्त्री-पुरुष-परस्पराकर्षण निसर्गप्रवृत्तीच्याच जोरावर सदैव घडत असतें व सनातन असेंच घडत राहणार, तेथें

## बीजक्षेत्र शुद्धीचे मानवी कायदे

करून त्यांच्या जोरावर निसर्गाला आडविण्याचें कर्म दुष्कर जरी असलें तरी मूर्खपणांचें आहे खास.निसर्गाला विवेकाचा बंध पाहिजे खरा, परंतु त्याला कायद्याचा सफेदा चढवून त्याची बळजबरीनें अंमलबजावणी करूं लागले कीं मग मात्र डपशाहीच्या प्रत्येक कायद्याला अंमलबजावणीप्रमाणें निसर्गप्रवृत्ति खवळून जाऊन कायदेबाज

## विवेकाला चारी मुंड्या चीत

केल्याशिवाय कधींच राहणार नाहीं. उटल्या बसल्या स्मृतींचा आधार दाखविणाऱ्या ब्राह्मणांनी तरी हे स्मृतिनिर्बंध अक्षरशः आचरणांत आणल्याचे दिसत नाहीं; आणि ब्राह्मण्यांची जरतारी लाल शालजोडी पांघरून त्यांनी सत्तामदाच्या धुंदीत स्मृतिनिर्बंधांची ब्राह्मणेत्तर समाजांवर अत्यंत निर्दयपणाने बळजबरी केली, तरी तेहि स्वतः इतर मानवांच्या कारट्यांप्रमाणें मलमुत्रोत्पन्न माणसेंच असल्यामुळें, तोंडांनी जरी त्यांनी मनु याज्ञवल्क्याच्या भिक्षुंकी स्मृत्या घडघड तोंडपाट म्हणण्याचा पोपटी धंदा चालू ठेवला, तरी मैथुनातिक्रमांत तेहि इतरांप्रमाणें निसर्गप्रवृत्तीचेच दास बनलेले आहेत. हें त्यांच्या वर्तमान समाजस्थितीवरून चांगलेच सिद्ध होत आहे. बाह्य वर्तनाचा झगझगीत पडदा किंचित् दूर सारून पहातांच, हल्ली कोणत्याही समाजाला उच्च व नीच ठरविण्याचें धाडस करवत नाही; इतकी त्यांची अंतरावस्था व अंतर्व्यवस्था सारख्या प्रमाणावर येऊ न बेतली आहे. मानवांचे स्वार्थी स्मृतिनिर्बंध शूद्रपुरूष आणि ब्राह्मणस्त्री यांच्या संमीलनाला खुशाल विषमविवाह किंवा आणखी दुसरें कसलेंहि नांव देवोत, निसर्गांच्या नियमांप्रमाणे तोच समविवाह ठरत असतो. हें एवढ्या विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत येईल. शिवाय आणखीहि एक महत्त्वाचा मुद्दा आपण लक्षांत ठेवला पाहिजे. कोणताहि गुन्हा एकदोन व्यक्तींच्या हातून घडतांच, त्या गुन्ह्याला शिक्षा सांगणाऱ्या कलमांची कायद्यांच्या ग्रथांत ताबडतोब योजना करीत नाहींत; त्यावेळी गुन्हेगाराला त्याच्या गुन्ह्याच्या जवळजवळ साम्य असलेल्या दुसऱ्या गुन्ह्यांच्या कलमाप्रमाणें न्यायाधीश शासन करतो, परंतु विशिष्ट गुन्ह्याच्या आवृत्त्यांवर आवृत्त्या समाजांत घडूं लागल्या म्हणजे मगच त्या गुन्ह्यांच्या कलमांची योजना देशांचे शासन-मंडळ कायद्याच्या ग्रंथांत करतें. मुंबई इलाख्यांत धुम्रपानाचा अतिरेक होऊन घरोंघर आणि दारोंदार

## आबालवृद्ध चिमण्यांच्या तोंडांतून धूर

नव्हे, धुराचा डोंबाळा, रात्रंदिवस भडकूं लागला, तेव्हांच ' जुवेनाईल स्मोकींग बिल '—लहान मुलाच्या धूम्रपानाला प्रतिबंध करणारा कायदा–येथल्या कायदे कौन्सिलांत नामदार कंपूनीं आणला. याच नियमांप्रमाणें, अनुलोम प्रतिलोम विवाहाचा कडकडीत निषेध करणाऱ्या स्मृत्यांच्या अमदानींत या विवाहांचा धूमधडाखा चालूं असला पाहिजे खास; आणि मनुस्मृतीची उत्पति जगाच्या उत्पत्तीच्याही पूर्वी झाले असें घसा फोडफोडून सांगणाऱ्या शहाण्यांना हेंहि अर्थात् कबुलच करणें प्राप्त आहे कीं ही अनुलोम प्रतिलोम विवाहाचीं खेंकटी सृष्ट्युत्पत्तीच्याहि पूर्वीचीं आहेत, (सृष्ट्युत्पत्तीपूर्वी हे विवाह

कोणकोणांत लागत असत हें या शहाण्यांनींच सांगितलेलें बरें;) मग संकर आतांच होत आहे या रडगाण्यांत हांशिल काय ? परंतु

## संकराचे रडगाणें म्हणजेच धर्मप्रेम

अशी ज्यांची ठाम समजूत, त्यांची समजूत कशाने घालता येईल? भिक्षुकी स्मृत्यांची उत्पति हजारों वर्षाच्या संख्येवर टिंबें चढवीत चढवीत ब्रह्मदेवाच्या बेबींत नेऊन भिडविणाऱ्या बृहस्पतींना मानवी समाजाच्या उत्क्रान्तींचें भोंपळ्या एवढें ज्ञान असतें, असें मानणें प्राप्त आहे. मानवी समाजाला कायद्यांची आवश्यकता कां, केव्हां आणि कशी लागते; कायद्यांची घटना कसकशी होत जाते इत्यादि प्रश्न हे स्मृतिप्रिय प्राणी कधींच विचारांत घेत नाहींत. वास्तविक पाहिलें तर प्राश्चात्य देशांतील ' रोमन लॉ ' आणि आमच्याकडील ' स्मृतिनिर्बंध ' यांत एक जबरदस्त भेद आहे; तो हाच कीं पहिल्याच्या घटनेंत लोकसत्तेचा अंश अधिक पडल्यामुळें तो प्रत्यक्ष व्यवहारक्षम बनला आणि दुसऱ्यांत लोकमताची पर्वा न करणाऱ्या मूठभर

## वेदोनारायण शाईस्तेखान

भिक्षुकांच्या मतांचाच अंश पूर्णत्वानें पडल्यामुळें, स्मृतिनिर्बंधांचे स्वरूप अव्वलपासून अखेरपर्यंत शुद्ध · शिफारसवजाच राहिले. स्मृतींत कितीहि निर्बंध ग्रथित केलेले असोत त्यांवर राज्यमान्यतेचा अगर लोकमान्यतेचा शिक्का कधींच पडला नाहीं, ही एक लक्षांत ठेवण्यासारखी ऐतिहासिक महत्वाची गोष्ट आहे.

*    *    *    *    *

(२०) बीजक्षेत्रशुद्धिवाल्यांचा आणखी एक प्रामाणिक मुद्दा आहे कीं बीजक्षेत्रशुद्धिच्या निर्बंधांच्या अभावी समाजांत मैथुनातिक्रम वाढला तर तो राष्ट्राच्या ऱ्हासाला कारण झाल्याशिवाय रहाणार नाहीं. नीतिमत्ता बलवत्तर नसेल तर राष्ट्र कधींच थरारणार नाही आणि मैथुनातिक्रम हा नीतिमत्तेचा घात करणारा असल्यामुळें, तो फारच वाढल्यास राष्ट्रहि त्याच्यामुळें रसातळाला गेल्याशिवाय रहाणार नाहीं. या विधानांतील **नीतिमत्ता मैथुनातिक्रम** हे दोन शब्द फारच लवचिकपणानें वापरण्यात आलेले असतात. मैथुनातिक्रम कशाला म्हणतात व तो सांप्रत होत आहे कीं काय ? या प्रश्नांचा उहापोह मागें केलाच आहे; त्याची पुनरुक्ति येथे नको. नीतिमत्ता कशाला मानावी आणि नीतीचीं मूलभूत तत्त्वें काय असावीं, याची सार्वत्रिक (Universal) कल्पना अजुनही ठाम ठरलेली नाहीं. जी एकाला नीति वाटते, तीच दुसऱ्याला अनीति वाटते. प्राचीन काळचे कडकडीत

## कर्मठ ब्राह्मण गोमांसभक्षक होते,

आतांच्या काहीं ब्राह्मण ब्रुवांना डोळ्यावरच्या रांजणवाडीला सुक्या बोंबलाचा तुकडा शिववितांना सतरा वेळां नाक मुरडण्यांत ब्राह्मणपणा वाटतो, तर कित्येकांना पाण्यातली शुद्ध मासळी सपाटून खाणे हाच ब्राह्मणपणाचा ट्रेडमार्क वाटतो. आमच्या इकडे अक्षता बालिकेला वैधव्य आलें असतां, तिला दुसरा नवरा करून देणें म्हणजे आमच्या कर्मठांच्या टाळक्याची शीर ठणठणू

लागते; तर तिबेटांत एका बाईला एकाच वेळीं दहापासून तेरा नवरे करण्याची वेदोक्त परवानगी हीच नीति गणली जाते. दक्षिणी ब्राह्मणांना भेंकराच्या पावलाएवढी शेंडी ठेवण्यांत शुचिर्भूतता वाटते, तर मद्रासी ब्राह्मणांना दररोज

## शेंडीदाढीमिशीचें सक्षौर मुंडण

केल्याशिवाय ब्राह्मणी नीतिमत्तेच्या गुळगुळीतपणाची खात्री पटत नाहीं. आधुनीक सुविद्य लोकांनी वेश्यागमन हे पातक मानलेलें असतांहि, आमच्या इकडील नाशीक पंढरपुरच्या क्षेत्रस्थ भटांना साळू मैना चिमण्यांचा सहवास त्यांच्या ब्राह्मण्याच्या विरूद्ध आहे, एवढी साधी गोष्टही उमजत नाही. हिंदूंना

## एका जिवंत पत्नीच्या उरावर दहा सवती

करण्याची परवानगी धर्मशास्त्र खुशाल देतें, तर युरोपिअनांचें स्मृतिशास्त्र जिवंत पत्नीशी काडी मोडल्याशिवाय कोणत्याही जॉन्‌ला मिस् जेनचें प्राणीग्रहण करून देत नाहीं. युरोपिअनांत ' शेकहॅन्ड ' प्रमाणेंच चुंबन विधिचा फारसा विधिनिषेध मानला जात नाहीं, तर चिनी लोकांना चुंबनविधि नरमांसभक्षकांचा राक्षसी प्रकार वाटतो. महाराष्ट्रांतील सुविद्य समाजांत मामेबहिणीशीं लग्न करायला हरकत वाटत नाहीं, तर दक्षिणी लोकांतला हा ' अनाचार ' पाहून हिंदुस्थानांतल्या इतर प्रांतीय लोकांच्या आंगावर काटा उभा राहतो, उत्तर हिंदुस्थान, बंगाल, माळव्याकडे बायकांना पडद्यांत डांबून ठेवणें हा नीतिचा कळस वाटतो-मग दृष्टीआड एखादी निराळीच सृष्टी निर्माण झाली तरी त्याची त्यांना खंत नसते! तर द्रविडी लोकांत स्तनाच्छादनाची काडीमात्र व्यवस्था न ठेवतां बायकाना खुशाल पुरूषांमध्ये मिसळूं देतात; पण " महाराष्ट्रांतील बायकांची चोळी त्यांचा रमणीयपणा वाढवून, त्यांची लाज राखिते. नर्मदेच्या उत्तरेस बायकांना तिळमात्र स्वातंत्र्य नसतें. द्रविड देशांत व विशेषतः मलबारांत बायकांस फाजील मोकळीक असते, त्यामुळें त्या बऱ्याच निर्लज्ज होतात. प्रयागास द्रविडांच्या बायका आपल्या डोक्यावरचे सर्व केंस नदीस अर्पण करतात, व कांही दिवस

## सधवा असतांहि विधवा दिसतात.

महाराष्ट्रांतील बायका फक्त तीनच बोटें वेणी देतात. बंगाल्यांत कित्येक बाह्मण भाराभर बायका करतात. व कित्येक बायकांच्या घरी नवरा आला म्हणजे आईबाप हा तुझा नवरा म्हणून सांगतील तेव्हां बायकोची ओळख पटते! द्रविडांमध्ये तर कित्येक ठिकाणीं एकाच वेळीं अनेक नवरे करण्याची चाल आहे. " (कै. भागवत-उग्दार पृ. १४४) यावरून आपल्याला असें दिसतें कीं, " आचारः परमो धर्मः " आचार हाच जर परम धर्म मानला, तर धर्माचेंहि निश्चित स्वरूप ठरविणें फार कठिण आहे. जेथे आचाराचीं मूलतत्त्वेंच निरनिराळ्या ठिकाणी भिन्न भिन्न ठरलेली आहेत, तेथे नीतिमत्तेची निश्चित रूपरेषा आखण्याचा यज्ञ म्हणजे अनवस्था प्रसंगच नव्हे काय? मैथुनविवेक, मैथुनातिक्रम आणि व्यभिचार यांच्याहि व्याख्या देशपरत्वें--व आमच्या हिंदुस्थानांत प्रांतपरत्वें--निरनिराळ्या मानलेल्या आहेत. अर्थात् नीतिमत्तेच्या कल्पनेची एकवाक्यता

करण्याचें काम अत्यंत कठीण होऊन बसले आहे. हें निराळें सांगणें नको. तथापि देशपरत्वें किंवा प्रांतपरत्वें नीतीच्या निश्चित मर्यादेबाहेर जनतेच्या वर्तनाची उडी पडलीच आणि त्या देशाच्या किंवा प्रांताच्या दृष्टीनें जनता मैथुनातिक्रमांत बेसुमार भरकटली, तर त्यामुळें त्या देशाचा अगर राष्ट्राचा ऱ्हास होणें शक्य आहे काय ?

## मैथुनातिक्रम आणि राष्ट्राचा ऱ्हास

यांचा कांही अन्योन्य संबंध आहे काय ? या प्रश्नांचा प्राश्चिमात्य शास्त्रज्ञांनी कस्सून विचार केला आहे व त्यावर सोपपत्तिक विवेचनाचे अनेक ग्रंथहि लिहिले आहेत. त्यांपैकीं Car Bleibtren यांच्या Paradoxes of the Conventional Lies नामक ग्रंथांतील एक महत्त्वाचा उतारा खालील देऊन, या मुद्याची आपण सांगता करूं :—

" Ancient Rome produced its greatest men during a period of moral degeneration. The finest blossoms of Helenic civilization coincided with a period of fundamental immorality. We might easily urge that after Pericles, Phidias, Aristophanes, Euripides, Alcibiadis, and Socrates, the decay of the Greek race began, notwithstanding the fact that much later in Greek history the vital force of the nation was proved by the appearance of men of the first rank, such as Alexander, Aristotle and Demosthenes. But this rejoinder does not help us much, for in the earlier days of Greek history, in the legal Codes of Solon and Lycurgus, we find the most notable and clear indications that precisely in respect of sexual relationship, and more especially in regard to marriage and the procreation of children, the morals of this fresh and youthful race were disordered to the greatest possible extent.

" Just the same do we find it at the time of the Italian renascence and at the time of the Ho. henstaufen dynasty—a complete confusion of sexual relationships, The eighteenth century, also, notwithstanding all the justified jeremiads of Rousseau regarding the widespread unnaturalness of the time, and notwithstanding all the sorrows of the young Werther, was distinguished by the production of an incredible abundance of men of genius; and in contemporary France, the country which was most severely affected by this moral decay, there flourished the generation to which such men as Mirabeau and Nepoleon belonged—men whose unparalleled vitality influences us to this moment."

*The Sexual Life of our Time. P. 460.*

जी गोष्ट इतर राष्ट्रांची तीच हिंदुस्थानाची. हिंदुस्थानांत देवमाणसें राहतात आणि इतर राष्ट्रांत राक्षस राहतात, असें थोडेच आहे ? मनुष्यप्राणी आणि मनुष्यस्वभाव हा येथून तेथून सारखाच. फरक जर कांही असेल तो एवढाच कीं हिंदुस्थानांत स्वतः कांहींही हातपाय न हालवितां वडिलांचे गुण गाणाऱ्या पढतमूर्खांची इतर देशांपेक्षां अधिक लोकसंख्या आहे ! हिंदुस्थानांत ज्या ज्या वेळीं कांही विशेष राष्ट्रीय चळवळ घडून आलेली आहे, त्या त्या वेळचा इतिहास उघडून पहा म्हणजे जीर्णमतवाद्यांनीं व त्यांच्या बगलबच्यांनी अनीतीचा, मैथुनातिक्रमाचा आणि संकराचा शंख जोरजोरानें फुंकल्याचेंच आपल्याला आढळून येईल. चोराच्या उलट्या बोंबा कशा असतात हें जसें अलीकडे महाराष्ट्रातील बऱ्याच योगभ्रष्ट दे. भ. च्या वर्तनावरून शिकण्यासारखें आहे. तसेंच प्रत्येक नवविचाराच्या उषःकालीं जीर्णमताचा शंखध्वनी किती जोरजारानें सुरू असतो तें प्राचीन इतिहासावरूनहि समजून येण्यासारखें आहे. पांडवाच्या वेळी धर्माच्या राजसूय यज्ञप्रसंगी श्रीगोपालकृष्णाची निर्भत्सना करणारा शिशुपाल, अगदीं अलीकडे श्रीशिवाजीमहाराजांच्या राज्यभिषेकोत्सवाला विरोध करणारे मोरोपंत पिंगळ्याच्या उपरण्याखालचे ब्राह्मण व सांप्रत कुळकर्णी-वतनाच्या

## मेल्या मढ्याचा नाटकी आक्रोश.

करून, कोल्हापूरकर छत्रपतींच्या नांवानें कडकडा बोटें मोडणारे बेळगांवच्या बेळवीसारखे भिक्षुकी नामदार, हे सर्व प्राणी या जीर्णमतवादाचा शंखध्वनि करणारे आहेत, हें अधिक विशद करूनच सांगितलें पाहिजे असं नाहीं. तथापि हा सारा त्यांचा धडपडाट म्हणजे तेल संपलेल्या दिव्याच्या ज्योतीचा अखेरचा फडफडाट असल्यामुळें, ज्ञानी जन त्याकडे फारसें लक्ष देत नाहीत.

* * * * * *

(२१) वरील विवेचनावरून वाचकांच्या पूर्ण लक्षांत आलें असेलच कीं उन्नति व अवनति हा प्रश्न आत्मविषयक आहे आणि त्याच्या संबंध प्रत्येक व्यक्तींशीं असतो, कुटुंबांशीं नसतो. आजूबाजूची परिस्थिती ही प्रत्येक व्यक्तीच्या अवनतीला किंवा उन्नतीला पुष्कळ अंशी कारण होत असली, तरी तिचा बरा वाईट परिणाम होणें हें प्रत्येक व्यक्तीच्या आत्मिक परिणतीवरच (Psychic development) विशेष अवलंबून असतें, हें तत्व विसरतां कामां नये. गुलाब पुष्पांचें रोपडें चांगल्या ठिकाणीं लावलें, त्याची नीट मशागत ठेवली, वेळच्यावेळी पाणी दिलें, तर त्याला सुंदर व दळदार गुलाबाचीं फुलें येतात; तेंच तें दुर्दैवानें एकाद्या डोंगरकपारीं खडकाळ दरींत यहच्छेनें उगवले तर त्याला फुलें येणार नाहींत असें नाहीं, पण तीं खुरटलेलीं, फिकट व अल्पायुषी अशींच येतील. या फुलांना आपण ' गुलाबाचीं फुलें ' असे म्हणूं खरें, परंतु टवटवीतपणा, रंगाची खुमारी, पांकळ्याचा दणकटपणा आणि सुवासाची चित्तोन्मादक माधुरी इत्यादि उत्कृष्ट गुलाबाच्या फुलांचे गुणधर्म मात्र त्यांत आढळत नाहींत, म्हणून रसिकांचीहि दृष्टी आपल्याकडे वेधून घेण्याचें सामर्थ्य त्यांत उरत नाहीं. ते नुसतें नामधारी गुलाब पुष्प असतें. परिस्थितीचा एवढा परिणाम होत असतो. उत्तम परिस्थितींत धोत्र्याचें किंवा कांटेसराट्याचेंहि झाड बेसुमार थरारतें; पण त्याला गुलाबाच्या किंवा मोगऱ्याच्या कळ्यांचा भर कधिं येत नाहीं. याच नियमानुसार, ज्याची वैयक्तिक आत्मपरिणति चाण्डाळवृत्तीपर्यंतच आलेली आहे. असा एखादा प्राणी कर्मधर्मसंयोगानें गंधभस्मांचे आडवे उभे पट्टे ओढणाऱ्या ब्राह्मणब्रुवाच्या कुटुंबांत जन्माला आला, तर तेथल्या

## दशदिशा मोकाट परिस्थितीचा फायदा.

घेऊन तो आपल्या चाण्डाळ वृत्तीची रग गाजवून घेतल्याशिवाय कधींहि राहणार नाहीं. पुण्याच्या चित्पावन पेशवाईच्या अंमदानींत असलीं उदाहरणें शेंकड्यांनीं दाखवितां येतील. फार काय, पण '' अन्यधनहरणनिच्छायां कारणोपेक्षायां शूद्रेति संबोधनम् '' (जो परक्याचें धन हरण करतो तो शूद्र) या सूत्रानुसार छत्रपतीचें सर्वस्व गिळंकृत करणारे

## श्रीमंत पेशवे शूद्र ठरतात.

अनुवंशिक संस्काराचा अर्थ वास्तविक कौटुंबिक परंपरेनें चालत आलेले संस्कार असा नसून, प्रत्येक व्यक्तीच्या जन्मश्रेणीबरोबर उत्कांत होत आलेले त्याचे स्वतःचे संस्कार असाच आहे. नाहींतर पळीपंचपात्री खडबडविण्यांतच ज्याचा आणि ज्याच्या घराण्याचा सारा जन्म गेला, त्या विश्वनाथ भटजीचा मुलगा बाळाजी, अवचित शकुनीमामांचें पॉलिटिक्स गाजवून, पेशवाई सर करण्यास समर्थ कसा झाला, हें कोडें उलगडणें कठीण जातें. त्याच शुद्ध युक्तिबाज बाळाजीचा मुलगा बाजीराव तर

## मूर्तिमंत क्षात्रतेजाचा नमुना

निर्माण झाला, तेव्हां त्याच्या ब्राह्मण-संस्काराची वासलाद कशीकाय लावायची ? अटकेला झेंडे फडकवणारा आणि अहमदशहा अबद्दलीचें नरडें फोडून त्यांचें रक्त घटघटा पिणारा भीमकर्मा राघोबा ब्राह्मण होता, असें कोण म्हणेल ? परंतु त्याचाच वीयोत्पन्न मुलगा रावबाजी ब्राह्मणकर्मात अत्यंत तरबेज होता, म्हणून इंग्रज इतिहासकारांनीं त्याची मोठी स्तुति केली आहे. चांद्रसेनीय कायस्थ प्रभू समाजांतील सावित्रीबाई ठाणेदारीण आणि क-हाडे समाजांतील

## झांशीची राणी लक्ष्मीबाई

या शंबर नंबरी क्षत्रिय नव्हत्या असें म्हणणारा शहाणा शहाणाच म्हटला पाहिजे. अर्थात् अनुवंशिक संस्कार म्हणजे प्रत्येक कुटुंबाच्या परंपरेनें चालत आलेले संस्कार नसून, जन्माला येणाऱ्या प्रत्येक प्राण्याचे वैयक्तिक कृतकर्माप्रमाणें बनत आलेले त्याच्या आत्म्यावरील संस्कार, असा अर्थ ठरविल्याशिवाय बापाच्या आणि लेकाच्या स्वभावप्रवृत्तींतील विषमता किंवा स्मृतिकरांनीं ठरविलेल्या विशिष्ट समाजाच्या गुणकर्मांच्या व्याख्या आणि त्या समाजांत जन्माला आलेल्या प्राण्यांची विरोधी वर्तणूक याची विवेकबुद्धीला पटेल अशी एकवाक्यता करतां येणें शक्यच नाहीं. जोंपर्यंत गुणकर्मांवरूनच जात ठरविण्याचा प्रघात हिंदुसमाजांत रूढ होता, तोंपर्यंत ही विषमता व हा विरोध सामाजिक उन्नतीच्या आड केव्हांहि आला नाहीं आणि सांप्रत निरनिराळ्या समाजांत जो एक प्रकारचा असंतोष ऊर्फ परिस्थितीविषयीं गुप्त संताप प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणी दिसून येतो, त्याचाहि मागमूस नव्हता. अनुवंशिक संस्काराचा विचार करतांनाच अमका प्राणी अमक्याच ठिकाणीं जन्माला कां येतो, जन्म आणि जन्मांचे क्षेत्र यांत कांहीं गूढ परंतु निश्चित असें आकर्षक तत्व काय आहे कीं काय, हे प्रश्न पुढें येतात. अध्यात्मशास्त्रवेत्ते या आकर्षणाच्या अस्तित्वाची ग्वाही देतात. समान प्रवृत्तीशिवाय आकर्षण

होऊ शकत नाही आणि अध्यात्मशास्त्रवेत्ते म्हणतात कीं प्रत्येक प्राणी आपल्या गुणधर्मानुसार अनुकूल अशा जननक्षेत्राची यदृच्छेनें निवड करीत असतो. म्हणजे याचा सरळ अर्थ असाच घेणे प्राप्त आहे की मातेच्या व पुत्राच्या गुणकर्मप्रवृतींत बरेंचसें साम्य असलें पाहिजे. परंतु हा नुसत्या व्याखेचा प्रदेश सोडून प्रत्यक्ष जगांत आपण पाहू लागलो कीं याहि नियमाच्या ठोकळ्यांत जबरदस्त विसंगतपणा दिसूं लागतो; इतका कीं जितका अधिकाधिक विचार करावा तितका तो त्या आकर्षणतत्त्वाचें सर्व स्वारस्यच आकर्षण करूं लागतो. अत्यंत सुष्ट व ज्ञानी आईबापांच्यापोटीं अत्यंत दुष्ट व रानवट वृत्तींचीं कारटी जन्मांला आलेलीं कोणीं पाहिलीं नाहींत ? अथवा, चांडाळ वृत्तीच्या आईबापांच्या पोटीं सर्व जगाला वंद्य असे सत्पुरूष जन्मल्याचीं उदाहरणें काय कमी दाखवितां येतील ? या ठिकाणी या आकर्षण तत्वाची मांडणी कशी काय करावयाची हा मोठा बिकट प्रश्न येऊन पडतो; अखेर अध्यात्मवेत्ते अगम्यपणाच्या, गुढत्वाच्या किंवा अपरोक्षतेच्या कांहीं ठराविक साच्यांतील सूत्रांच्या आधारानें त्याची कशीबशी कांहीतरी वासलाद लावतात. परंतु त्यामुळें जिज्ञासूचें शांतवन होऊं शकत नाहीं. सुष्ट मातेच्या उदरीं जर दुष्ट पुत्र अथवा कन्या जन्माला येणें अशक्य नाहीं; किंवा दक्षिणोत्तर ध्रुवांइतक्या विषमतेची तीव्रता जर आईबाप व त्यांचीं मुलें यांत शेंकडां नव्वद प्रसंगी दृष्टीस पडते, तर

**ब्राह्मणाचा पुत्र ब्राह्मणच निपजतो**

या घाशीरामी स्मृतिवचनांत काय अर्थ राहिला? उलटपक्षीं शुद्ध वर्तनाच्या ब्राह्मणाच्या उदरीं एखादा नतद्रष्ट चांडाळ प्राणी पुत्ररूपानें अवतरला, तर त्या ब्राह्मण बापाच्या घरांतील परिस्थिती त्याच्या चांडाळ वृत्तीला पोषक नसल्यामुळें, तिचे तट फोडण्याचा यत्न तो करीत असतांना, आपल्या चाडांळपणाची धूळ आईबापांच्या डोक्यांत फेकून, तें ब्राह्मणांचे घर चांडाळाची दरी बनविल्याशिवाय रहात नाहीं. त्याच प्रमाणें शूद्रत्वाच्यापुढें ज्यांची उत्क्रांतीच झालेली नाहीं. अशा आईबापांच्या पोटीं जन्माला आलेल्या पूर्ण उत्क्रांत अशा ज्ञानी जीवालाहि आपल्या आजुबाजूच्या परिस्थितीशीं व प्रत्यक्ष जन्मदात्या आईबापांच्या विषम मनोवृत्तीशीं अत्यंत कठोरपणाचा झगडा करूनच आपल्या वैयक्तिक परिणतीला पोषक व उत्तेजक असें नवेंच परिस्थितीचें क्षेत्र निर्माण करावें लागतें. हिंदुस्थानांत जातीभेदाची जी अत्यंत तीक्ष्ण असह्य स्थिति सांप्रत राष्ट्रीय ऐक्याला कस्सून विरोध करीत आहे, तिच्या अनेक पाळ्यामुळ्यांपैकीं एक मुळी या जन्मप्राप्त विषमतेंत आहे,* हे-लक्षांत घेतलें पाहिजे. हल्लीं हिंदु समाजांतील अगणित जातीजातींतल्या दरोबस्त व्यक्तींत जो एक प्रकारचा असंतोष, परिस्थितीविषयीं जळफळाट आणि परस्पर संबंधातसुद्धां एकमेकांविषयी सहानुभूतीचा अभाव दृष्टीस पडत आहे, त्या सर्वांच्या मुळांशी ही

---

* The Indo–Aryan classification of society into for categories—*intellectuals, militarists, merchants, and labourers,*—was not merely a description of local conditions in Aryavarta but a general one indicative of the *four grades of culture* which are co-ordinated in the progress of civilization. It was the noblest characteristic of Indo–Aryan polity that it was always *based upon a just appreciation of the respective values of these four powers* governing the destiny of mankind............... It was only when Aryab Civilization was decadent that caste, as it is now understood, became a hindrance to intellectual progress. Aryan Rule in India, Havel, P.6.

## जन्मप्राप्त विषमतेची शूर्पणखा

आहे, हेंच विचारांतीं कबूल करावें लागतें. ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर, पुढारलेले आणि मागासलेले, इत्यादि भेदभावांच्या आंगांवर कसल्याहि इतर गोष्टींचीं वारुळें वेढलेली असोत, त्यांच्याहि पोटांत याच विषमतेचें जालीम विष रसरसत असतें,ही मुद्याची गोष्ट विसरुन चालणार नाहीं. दारूचे गुत्ते हमरस्त्यांवरुन आड रस्त्यांवर नेल्यानें किंवा अज्जीबात बंद केल्यानें दारूबाजीच्या व्यसनाचा नायनाट कधि होत नाहीं ; तर मनुष्य दारू कां पितो या गोष्टीच्या आद्यकारणाचा छेडा लावून त्या आद्यकरणाचेंच उच्चाटन केलें पाहिजे. त्याच प्रमाणें या जन्मप्राप्त विषमतेचें आद्यमूळ खच्ची केल्याशिवाय हिंदुस्थानांतला जातिभेद व जातिद्वेष रतिमात्र कमी होणार नाहीं.

## टिळकांच्या मॅनिफेस्टोंत जातीभेद

धुडकावून देण्यांत आला आहे, असलीं नाटकी विधानें करुन जातीभेदाचें खंडन करणें म्हणजे हमरस्त्यांवरील दारुचे पिठे आडरस्त्यांवर नेऊन मद्यपाननिषेधाची पुणेरी चळवळ करण्याइतकेंच खोडसाळ होय. असल्या गोष्टीं मानण्या न मानण्याच्या टायलीखोर हस्तिदंती वर्तनानें सुधारण्यासारख्या नसतात, हे आमच्या या मॅनिफेस्टोवाल्यांना अझूनहि उमगत नाहीं, येथेंच त्यांच्या भिक्षुकी हेतूचा तंतू दडी मारुन बसलेला आहे.

* * * *

(२२) आपण मागें पाहिलें कीं मनुष्याच्या आत्मविकासाला त्याच्या आजूबाजूची परिस्थिति बऱ्याच अंशी कारणीभूत होत असते. परंतु वरील दोन उदाहरणांवरुन आपल्याला असा निश्चित निष्कर्ष काढतां येतो कीं परिस्थितीचा बरा वाईट परिणाम होणें हें देखिल प्रत्येक व्यक्तीच्या ग्रहणक्षमतेच्या तीव्र सौम्य प्रमाणांवर विशेष अवलंबून असतें. मुलाची तामसवृत्ति जर आईबापांच्या सात्विक वृत्तीपेक्षां अधिक उन्मत्त असेल, तर सात्विकपणाला अखेर तामसीपणाच्या वर्चस्वापुढें हतबल व्हावें लागेल ; आणि सात्विकपणाचा जोर विशेष असला तर पिढ्यान्पिढ्या तमोवृत्तींत खितपत पडलेले समाजाच्या समाज केवळ एका व्यक्तीच्या सात्विक पराक्रमानें उन्नत होऊं शकतात.

## सोळा संस्काराची योजना

म्हणजे एका ठरावीक स्वरुपाच्या परिस्थितीचा मनुष्यावर आरोप करुन त्याच्या नैसर्गिक गुणकर्माला विशिष्ट वळण देण्याचा एक मानवी प्रयत्न. अर्थात् हा निवळ प्रयन्नच आहे ; त्याचा परिणाम प्रत्येक व्यक्तीवर त्याच्या विवक्षित गुणकर्माच्या सौम्य तीव्र ग्रहणक्षमतेप्रमाणेंच व्हायचा. ' जन्मना जायते शूद्रः । संस्कारात् द्विज उच्यते, ' संस्कारानें तो द्विज होतो किंवा झाला असें ' उच्यते ' म्हणतात, मानतात, इतकेंच. त्याला या मानवी खटाटोपीच्या संस्कारांनीं द्विजत्व येतेंच, असें थोडेंच आहे ? तूं या अमूक संस्कारामुळें द्विज झालास, तूं आतांपासून ब्राह्मण झालास किंवा तूं क्षत्रिय आहेस, असा नुसतां शाब्दिक आरोप त्यावर करुन त्याची त्याबद्दलची भावना दृढ करण्याचा तो यत्न आहे. हा यत्न सर्वच व्यक्तींत सारख्या प्रमाणांत फलद्रुप होतोच

असें नाही, कित्येकांत तर तो मुळींच होत नाहीं. म. भा. शांतिपर्व अ. १११ मध्यें व्याघ्र आणि गोमायु यांच्या संवादांत गोमायूनें व्याघ्राला जें उत्तर दिल्याचें कल्पित केलें आहे, तेंच या ठिकाणीं अनुभवास येतें. गोमायू म्हणतो ' माझें जन्म हें कांही कुल ठरविण्याविषयीं प्रमाणभूत नाहीं. कारण, कुल हें प्रत्येकाच्या आचरणावरुन ठरविलें जातें. ... स्वभावाच्याच योगानें धर्मरूपीं क्रिया उत्पन्न होत असते ; आश्रम हा कांहीं धर्मास कारणभूत नाहीं. ' म्हणून द्विज म्हणविणाऱ्या व्यक्तींवर प्रघाताप्रमाणें जरी उपनयनादि षोडश संस्कारांचा मामुली वहिवाटीचा आरोप करण्यांत येत असतो, तरी त्यांतल्या सगळ्याच व्यक्ति ब्राह्मण क्षत्रिय वैश्य कर्मप्रविण किंवा कर्मक्षम बनतातच असा कांहीं नियम नाहीं. जी गोष्ट सोळा संस्काराची तीच अवस्था चार आश्रमांची. हे सारे बाह्य उपचार आहेत. मनूष्याच्या बाह्यांगावर शिंपडले जाणारे हे रंग आहेत. या कृत्रिम रंगांच्या शिडकावानें बाह्यात्कारीं जरी एखादा मनुष्य ब्राह्मण किंवा क्षत्रिय दिसत असला, तरी अंतर्रगीं तो ब्राह्मण किंवा क्षत्रिय असेलच असा कांहीं निश्चित भरंवसा देतां येणार नाहीं. जसें नाटकी मंडळींतला

**गण्या वाढप्या हरिश्चंद्र राजा होतो**

तेव्हां त्याच्यावर नाट्यप्रयोगापुरती आरोप करण्यांत आलेली ती भूमिका यथातथ्य वठविण्याकरितां तो स्वप्नांतील वचनसुद्धां खरें करून विश्वामित्राच्या स्वाधीन सर्व राज्य अर्पण करतो आणि आपण स्वतः सकुटुंब गुलामगिरीचा पेशाहि स्विकारतो. परंतु भरतवाक्य होऊन ' टिकिटाचे पैशे संपले, आतां थिएटरची भाडोत्री जागा खाली करा ' हें जाहीर करणारी शेवटली घंटा ठणाणतांच धाडकन् खालीं कोसळून पडणाऱ्या ड्रॉप-पडद्याबरोबरच आमच्या गणोबांचा राजेपणाहि खोबरेलमिश्रित साबणाच्या फेंसांत सफाई धुतला जाऊन, ते पुनश्च आपल्या वाढपेपणाच्या कर्मप्राप्त झारापळीचे मालक बनतात. तात्पुरता राजेपणाचा आरोप आणि तात्पुरतीच राजेपणाची ऐट! संस्काराच्या आरोपाचा शेवटला पडदा पडतांच पुन्हा आपला

**गण्या वाढप्या तो गण्या वाढप्या.**

राजेपणाच्या तात्पुरत्या आरोपाच्या अगणित आवृत्त्यांच्या संस्कारामुळें सुद्धां त्याच्या गुणकर्मसिद्ध वाढपेपणांत राजवृत्तीचा भारदस्तपणा रतिमात्र दृग्गोचर होत नाहीं. जात्याच विलासी व छंगीफंगी असणारा नट मात्र कृष्णाची भूमिका वठवितांना रुक्मिणींच्या रंगमहालांत 'नच सुंदरी करुं कोपा ' च्या प्रवेशांत आपल्या विलासी मनोवृत्तीच्या निसर्गजात प्रत्यक्ष प्रदर्शनाच्या रंगानें साऱ्या प्रेक्षकांना कसा दंग करून सोडतो, हें थिएटर-वारकऱ्यांना अधिक खुलाशाने सांगणे नको. नाटकांतील भूमिका आणि सोळा संस्कारांचे आरोप हीं दोन्हीहि सारखींच मात्र सोळा संस्कारांची घटना ही जरी बरीच अर्वाचीन असली, तरी तींतहि तिच्या उत्पादकाचा हेतू मात्र अत्यंत शुद्ध, उदात्त आणि व्यापक होता, हें मात्र आपल्याला प्रांजळपणें कबूल केलें पाहिजे. अलीकडे हिप्नॉटिझम्, मेस्मेरिझम् इत्यादि सजेस्टिव् थिरॅप्युटिक्सचे (म्हणजे मनुष्याला कांहीं विशिष्ट प्रकारच्या मोहनीनें आपल्या इच्छाशक्तीच्या काबूत आणल्यावर त्याला कांही सूचना करून करून त्याच्या मनोधर्मांच्या सहायानें नाना प्रकारचे शारिरीक किंवा

मानसिक रोग बरे करण्याची शास्त्रसंमत विद्या) जे प्रकार आपण पहातों, तोच प्रयत्न या सोळा संस्कारांच्या विधींत आहे. स्वभावतःच ज्यांचे गुणधर्म ब्राह्मण, क्षत्रिय अथवा वैश्य प्रवृत्तीचे नसतील, त्यांच्याहि मनांवर या विधींचा परिणाम होऊन त्यांची वृत्ति, क्रमशः कां होईना, परंतु 'मी ब्राह्मण आहें, मी क्षत्रिय आहें, माझें अमुक अमुक कर्तव्य आहे, समाजांतील अमुक एका विशेष कामगिरीकरितां माझा जन्म आहे,' इत्यादि कल्पनांनीं पूर्ण भारून जाऊन ते ऊन्नत होण्याचा विशेष संभव आहे. हीच उदात्त कल्पना सोळा संस्कारांच्या उत्पादकाला विशेष मानवली, यांत संशय नाहीं. मंत्रतंत्र औषधोपचार इत्यादि प्रकार मानवी असले तरी त्यांचा मूळ उद्देश निसर्ग प्रवृत्तीला विरोध करण्याचा नसून (कारण निसर्गाला विरोध करण्याची कोणाची छातीच नाहीं.) तिच्या हालचालींना उद्दीपित करण्याचाच असतो. जठराग्नी मंद झालेल्या रोग्याला हिप्नॉटिस्ट डॉक्टर 'तुझा जठराग्नी मुळींच मंद नाहीं, तुला सपाटून भूक लागते, तुझी पचनशक्ति उत्तम आहे,' वगैरे सूचना करून करूनच निवळ आपल्या इच्छाशक्तीच्या जोरावर त्याला कालवशात् पूर्ण निरोगी करून सोडतो, हें आपण प्रत्यही पाहतों. त्याचप्रमाणें गुणकर्मांची मंद असलेली निसर्ग प्रवृत्ति तीव्र करून तिला प्रगमनशील बनविण्याची स्तुत्य कामगिरी हे सोळा संस्कार करीत असतात. परंतु याहि कामगिरीत कालवशात्

## द्वैत-पिशाच्चाचा प्रवेश

झाला. अधिकारी आणि अनधिकारी हा भेद माजविणाऱ्या क्षुद्र वृत्तीच्या भिक्षुकी स्मृतिकारांचा परशुरामी डोळा अखेर सोळा संस्कारांच्या क्षेत्रावरहि येऊन पडला. त्यांना सोळा संस्कारांतसुद्धां जातिभेद आणि संकर दिसूं लागला. कोंकणस्थ आणि देशस्थ भेदाप्रमाणेंच या संस्कारातसुद्धां त्यांनी अमंत्रक आणि समंत्रक असे दोन भेद पाडून, कोणाला किती संस्कार करूं द्यायचे याचीहि त्यांनी

## चार एके चार, चार दुणें आठ

अशी चाराच्या पाढ्यावर विभागणी ठरविली. सोळा संस्कार ते काय आणि त्याची विभागणी ती काय ! पण एकदां स्वार्थाचा पगडा पडल्यावर मनुष्य किती नीचपणाचें क्षुल्लक कृत्यसुद्धां करण्यास प्रवृत्त होतो, याचें हें एक ठळक उदाहरण आहे. स्मृतिकार झाले काय, शास्त्रकार भाष्यकार झाले काय किंवा मनु याज्ञवल्क्याच्या श्लोकांवर पुणेरी मल्लीनाथ्या झोडणारे आचार्यकार काय,

## सगळे एकाच माळेचे मणी !

ब्राह्मणांचे वर्चस्व एनकेनप्रकारेण वाढवायचेंच, एवढ्या संकल्पाचा गंडादोरा मनगटावर चढवितांच ज्या शहाण्यांनीं भागवतासारखी प्रचंड कादंबरी प्रसवून भगवान् श्रीकृष्णाला अट्टल छिनाल बनवायला सोडलें नाहीं, ज्यांनी महाभारत ग्रंथातील प्रत्येक नायक नायिकेला ब्राह्मणांच्या पायांतल्या वहाणांच्या किंमतीनें रेंखाटण्यास कमी केलें नाहीं आणि ज्यांनी मनुस्मृतींतील ब्राह्मण-स्मृतिपाठाचीं स्तोत्रें पितामह भीष्माला घरघराट लागला असतांहि त्याच्या घशांत कोंबायला पाठीमागें पुढें पाहिलें नाही. त्यांनीं सोळा संस्कारासारख्या क्षुल्लक विषयाची

छाटाछाट आणि तोडातोड केली, तर त्यांत आश्चर्य मानण्याचें काय कारण ? बरें, अधिकारी आणि अनधिकारी या भेदाला तरी कांहीं आधार ? आधार हाच कीं आमची भिक्षुकशाहीची इच्छा ! दुसरा काही नाहीं. सोळा संस्काराचे सोळा आणे अधिकारी ते ब्राह्मण, अनधिकारी ते ब्राह्मणेतर ! म्हणजे हा सारा पात्रापात्रतेचा सोहळा

## आई सवाशीण बाप गण

या पंढरपुरी सोहळ्याप्रमाणेंच समजायचा ! ! शिवाय येथें अशीहि शंका उत्पन्न होते कीं ब्राह्मण हा जात्याच 'धर्मार्थमुत्पन्नो' (धर्माकरितांच उत्पन्न झालेला आहे); आणि तो ब्रह्मभूयाय कल्पते' (मनु. १-९८) आत्मज्ञानाच्या द्वारां मोक्षास समर्थ होतो, तर त्याला हा भवसागर तरून जाण्यासाठीं सोळा संस्काराचा हा पोंकळ भोंपळा कमरेला बांधून घेण्याची अवश्यकताच कां भासावी ? परंतु हा प्रश्न उत्पन्न करण्यांत कांही अर्थ नाहीं. कारण ज्यांनी आडव्याउभ्या गंधाकरितां आणि जानव्याच्या ब्रह्मगांठीच्या जाडीरुंदीकरितां मोठमोठाली रणें माजविलीं, त्यांनी सोळा संस्काराचा भोंपळा स्वतःच्या गळ्यांत कायमचा अडकवून घेण्याचा पोरकट हट्ट घेतला, तर त्यांत विशेष तें काय ? या भोंपळ्याच्या जोडीनेंच

## वेदोक्त पुराणोक्त वादाचें मडकें

हा एक भिक्षुकशाहीच्या ब्राह्मण्यसिद्धीचा विषय गेली तीनशें वर्षे महाराष्ट्रांत धुमाकूळ घालीत असून, या रिकाम्या मडक्याच्या निर्भेळ स्वराज्यासाठीं ब्राह्मणब्रुवांनीं मराठी स्वराज्याच्या टोलेजंग इमारतीची राखरांगोळी करायलाहि कमी केलें नाहीं. वास्तविक विचार केला तर हा वाद दिसतो तितका भरीव नाहीं. भिक्षुकशाहीच्या पोंकळ अभिमानाइतकाच पोंकळपणा त्यांत आहे. या वादावरून आम्हांला एका कल्पित गोष्टीची आठवण होते. एका निपुत्रिक श्रीमंत म्हातारीच्या घरावर एक रात्रीं चोरांनीं दरोडा घातला. दरोड्याची चाहूल लागतांच त्या धूर्त म्हातारीनें आपल्या जवळचे सारे दागदागिने व जडजवाहीर घाणेरड्या गोणपाटांत भरून तीं शेजारच्या उकीरड्यावर फेंकून दिलीं ; आणि घरांतल्या बिजागरी पेट्यांत फाटके जोडे व वहाणा दडपून भरून ठेवून त्यांवर मोठी कुलपें ठोकलीं. दरोडखोर येतांच ती मोठ्या गयावया करून रडूं लागली व म्हणाली " बाबांनो, उगाच मारहाण करूं नका. हे माझे देव्हाऱ्यांतले चांदीसोन्याचे सारे देव तुम्ही खुशाल घेऊन जा. पण कृपा करून या माझ्या पेट्यांना मात्र हात लावूं नका. वाटेल तर तुम्ही माझा जीव घ्या, पण या माझ्या पेट्या मात्र नेऊं नका " चोरांनीं ताडलेंच कीं जें कांही वेदोक्त परब्रह्म आहे तें या पेटाऱ्यांतच आहे, त्यांनी म्हातारीला खांबांशी बांधून तिच्या धडपडीकडे काडीमात्र लक्ष न देतां त्या पेट्या भराभर लांबविल्या. दुसऱ्या दिवशीं लुटीची वांटणी करायला ते बसले तेव्हां पेटारे फोडून आंत पहातात तों काय ?

## सगळ्या फाटक्या वहाणा व जोडे !

म्हातारीच्या कांगावखोर आरड्याओरड्याचें रहस्य त्यांना पूर्ण उमगल्यामुळें त्यांच्या चर्येवरील विकारांचें हुबेहूब चलचित्र घ्यायला त्यावेळीं सिनेमाटोग्राफचा शोध लागलेला नव्हता. वेदोक्त

आणि पुराणोक्ताचा तंटा हा जवळजवळ याच मासल्याचा आहे. ब्राह्मणबुवांनी म्हटलें कीं ' हां ! तुम्हांला वेदोक्ताचा अधिकार नाही ; ' का क्षत्रिय मंडळीनीं खडाखड दंड थोपटून म्हणायचें कीं ' कसा नाहीं आम्हांला वेदोक्ताचा अधिकार रे भटा ? बस्स्, आम्ही वेदोक्तच करणार ! ' म्हातारीनें म्हटलें, पेटाऱ्यांना हात लाऊं नका ; आणि चोरांनीं तर्क केलाच कीं जर कांहीं विशेष असेल तर तें या पेटाऱ्यांतच आहे. यांतलाच नव्हे कां हा सारा प्रकार ? वेदोक्त करूं नका म्हणणाऱ्या ब्राह्मणांना काय, किंवा आम्ही वेदोक्तच करणार म्हणणाऱ्या ब्राह्मणेतरांना काय, वेद म्हणजे काय, त्यांत काय सांगितलें आहे, त्यांतील ऋचा किंवा मंत्रांत विशेष काय आहे, याची थोडीफार माहिती असेल तर हराम ! अहो, हेंच काय, पण

## वेद हे हिन्दूंचे पवित्र ग्रंथ

आहेत, असें मोठ्या आवेशानें प्रतिपादन करणाऱ्या प्लॅटफार्म-वारकऱ्यांनी आणि कलमकसायांनीं वेदाचा एकतरी ग्रंथ एकदांतरी नुसत्या डोळ्यांच्या उघडझांपीनें चाळलेला असतो काय ? वाडवडील बोलत आले, हे बोलतात, एवढेंच, वेदोक्त आणि पुराणोक्त तंट्यांत शुद्ध अधिकाराच्या प्रश्नाशिवाय दुसरा कोणताहि महत्वाचा मुद्दा नाहीं. तुम्ही म्हणतां नको, आम्ही करणार, या हमरीतुमरीपलीकडे या वादांत विशेष असें आणखी कांही नाहीं. वेदांत काय वाटेल तें असलें, तरी एक गोष्ट निर्विवाद आहे कीं वेद हे कांही ब्राह्मणांच्या बापांनी निर्माण केलेले नाहींत; ते आब्राह्मणचांडाळांच्याच बापांनी लिहून ठेवलेले आहेत. त्यावर सर्वांचा हक्क सारखाच, वाडवडिलाच्या इष्टेटीवरचा वहिवाटदार जर उद्यां यजमानालाच म्हणूं लागेल कीं या इष्टेटीवर तुमचा कांही अधिकार नाहीं, गेलीं अमूक हजार वर्षे माझें घराणें याची वहिवाट पहात आहे, तर कोणता यजमान त्या वहिवाटदाराची प्रथम बत्तिशी उतरून नंतर त्याला कोर्टात खेंचणार नाहीं ? परंतु पुणेंकरांच्या अत्यंत आवडीचा हा

## पुणेरी भांडकुदळ झोन

सोडून आपण किंचित् तात्विक दृष्ट्या या प्रश्नाची चर्चा करूं या. वेदप्रणित काय किंवा पुराण कुराणप्रणित काय, कोणच्याहि ग्रंथातल्या ऋचांनीं अगर मंत्र्यांनी आपल्याला ईश्वराची प्रार्थना करण्यापलिकडे तर अधिक कांही करावयाचें नसतें ना ? बरें, असां काही सिद्धांत कोणी सांगत नाही किंवा कोठें नमूद असल्याचें आम्हांला आढळलें नाहीं कीं वेदोक्त मंत्रांनीं प्रार्थना करणाऱ्या प्राण्याचें विमान पुराणोक्त प्रार्थना करणाऱ्याच्या खटाऱ्याच्या आधीं जाऊन सायुज्यमुक्तीच्या वखारींत आदळतें! प्रार्थना किंवा पूजा अर्चा करायची तर ती तीन किंवा चार हजार वर्षांपूर्वीचे आमचे वाडवडील ज्या शब्दांनीं, ज्या श्लोकांनी, ज्या स्वरांनीं किंवा ज्या पद्धतीनीं करीत असत, तेच शब्द तेच श्लोक तेच स्वर आणि त्याच पद्धतीनीं आम्ही आतांसुद्धां आमच्या प्रार्थना कराव्या, हा हट्ट म्हणजे

## बापाने सोडला म्हणून मुलानें सोडला

या म्हणीइतकाच ग्राम्य प्रकार नव्हे काय ? वेदोक्त मंत्र्यांनीं प्रार्थना केल्या किंवा कांही धार्मिक आचार चालविले तरच ते ईश्वराला पोहचतात आणि इंग्रजींत किंवा एस्परॅन्टो भाषेंत केल्यास

ते क्षीरसागरांत बुडून विरघळून जातात की काय ? किंवा वेदांच्या भाषेंतल्या प्रार्थनाच काय त्या परमेश्वराला समजतात, इतर भाषांतल्या समजत नाहींत ? असें असेल तर त्या अनाडी परमेश्वराची प्रार्थना करण्यात तरी काय अर्थ ? असल्या अनाडी देवाला, ॲनी बिझांटच्या मैत्रेय ऋषीप्रमाणें. प्रथम ऑक्सफर्ड किंवा केंब्रिजच्या पाठशाळेंत पाठविला पाहिजे! याहिपेक्षां हास्यास्पद व कींव येण्यासारख्या प्रकार म्हणजे एकादशनी, सत्यनारायण, गणेशचतुर्थी इत्यादि प्रसंगी त्या त्या दैवतांची पूजा वेदोक्त मंत्रांनींच करा असा यजमानाचा आग्रह आणि ' हो हो मी नेहमीं वेदोक्त मंत्रांनींच या व इतर पूजा करतों ' ही भटजीबुवांची हजरजबाबी पावती. पण या दोघांहि महामूर्खांना हें कळायला पाहिजे कीं वैदिक काळांत आणि त्याच्या पुढच्या अनेक शतकांत एकादशन्या, प्रायश्चितें, सत्यनारायण, द्वादशी प्रदोषांचे दोषी शिधे जन्माला आलेले नव्हते, इतकेंच नव्हे तर गणपतीचाचसा काय पण

## गणपतीच्या बापाचासुद्धां पत्ता

त्यावेळीं त्या वेदकर्त्यांना लागलेला नव्हता. मग या अर्वाचीन देवतांच्या पूजा प्रार्थनांचे मंत्र वेदांसारख्या प्राचीन ग्रंथांत कोठून येणार ? विशेष आश्चर्याची व खेदाची गोष्ट म्हटली म्हणजे ही वेदोक्त पुराणोक्ताची कोंबड्यांची झुंज लढविणारे कोण ? तर म्हणे आमचे जगद्‌गुरू (?) शंकराचार्य, या शंकराचार्यांचें एक मोठें पेंवच फुटलें आहे. आद्यशंकराचार्यांनीं हिन्दुस्थानांत चार दिशेला चार मठ स्थापन केले असें म्हणतात; पण आजकाल एकेका मठांतून दोनदोन तीनतीन आचार्य फटाफट् बाहेर पडताना दिसत आहेत. हा कशाचा परिणाम ? भिक्षुकशाहीच्या गुंडगिरीचा वाफारा या मठांत फाजील वाढल्यामुळें हीं नवीन जगद्‌गुरूंचीं अंडी फुटत आहेत, कीं सोळा संस्कारांचा मामला जसा चाराच्या पाढ्यावर येऊन बितला तद्वत चार मठांचे चारचोक सोळा मठ उत्पन्न करण्याची या शंखाचार्यांना भिक्षुकी अवदसा आठवली आहे ? मुण्डण केल्यावरसुद्धां शेंडीत राख घालून बाहेर निसटलेले करवीर पीठवरचे एक डुप्लिकेट आचार्य डॉ. कुर्तकोटी यांना अझून मठाकरितां जागाच सांपडत नाहीं. पुढेंमागें मिळालीच तर हे भिक्षुकछंदानुवर्ति महाभागवत धर्माच्या बाबतींत काय दिग्विजय लावणार तें त्यांच्या आजपर्यंतच्या पाघळलेल्या अकलेवरून दिसतच आहे. या महाशयांची करवीरपीठाच्या गादीवर जेव्हां श्रीमच्छत्रपति शाहूमहाराज सरकार करवीर यांनीं निवडणूक केली, तेव्हां या निवडणुकीची वाहवा करणाऱ्या तारापत्रांनीं वर्तमानपत्रें कितीतरी ठणाणत होतीं व लोकहि म्हणूं लागले होते कीं हे डॉक्टर साहेब आतां यापुढें हिंदूंच्या जगद्‌गुरूच्या गादीचा कांहीतरी मानमरातब वाढवून आपलें जगद्‌गुरू हें नांव सार्थ करतील! या भविष्याची आतांपर्यंत काय वाट लागली त्याचा इतिहास महाराष्ट्रीयांच्या पुढें आहेच. अलीकडे या स्वामींनीं राजकारणांत नांक खुपसण्याचा उपव्द्याप चालवून स्वतःच्या आत्मस्तोमाचे देव्हारे थाटविण्याची खटपट चालविली आहे. या स्वामींना नुसती लोकमान्यताच मिळवायची असेल व भिक्षुकशाहीच्या ग्लॉस्टरी छत्राखालीं विख्यातीचा मोक्ष मिळवायचा असेल, तर त्यांनीं आतां आपल्या काषायवस्त्रादि बाह्य थाटाचा ' वन्समोअर ' संन्यास करून एक नवीन संगीत नाटक मंडळी काढावी, अशी त्यांना आमची सूचना आहे. मठाची उठाठेव करण्यापेक्षां किंवा हिन्दुधर्मपरिषदेचे

वार्षिक लळीत नाचविण्याचा उपव्द्याप करण्यापेक्षां नाटक मण्डळीची योजना चुटकीसरशी* यशस्वि होऊन, डॉ. कुर्तकोटींचा बोलबाला हां हां म्हणतां सर्वत्र गाजूं लागेल. डॉ. कुर्तकोटी हे स्वतः चांगले सुविद्य तत्वज्ञानी आहेत, त्यांचे खासगत विचार बुद्धिप्रधान (Rational) असल्याचें आम्ही प्रत्यक्ष परिचयानें सांगतों; पण दुदैवानें ते भिक्षुकशाहीच्या कचाट्यात सांपडल्यामुळें व निश्चित मतांचा पुरस्कार निघड्या छातीनें करण्याइतका त्यांचा आत्मविश्वास त्यांच्या विद्वत्तेप्रमाणें कमाविलेला नसल्यामुळें, हा उमदा महाभागवत.

## लोकमान्यतेच्या बाजारांत लिलांवानें विकला

जात आहे, हें पाहून आम्हांला फार फार खेद होत आहे!! अचाट बुद्धिसामर्थ्याची व कर्तबगारीचीं असली नररत्नें भिक्षुकशाहीच्या मायावी डांवपेंचाच्या जाळ्यांत सापडून गारगोटीप्रमाणें कवडीमोल ठरावीं, यावरून हिन्दुधर्माचा व हिन्दुराष्ट्राचा भाग्योदव अझून बराच लांब आहे, असें म्हणणें प्राप्त पडतें. डॉ. कुर्तकोटीबद्दल हे किंचित् विषयांतर करण्याचें कारण विद्यमान डझन अर्धा डझन धर्मगुरूंच्या गादीवरील-मुलालगोट्यांपेक्षां हे स्वामी अधिक विचारी व सुसंस्कृत आहेत आणि त्यांनी अझूनहि आपल्या भोंवतालच्या परिस्थितीचा नीट विचार करून भिक्षुकशाहीचीं मोहक परंतु अंती घातक जाळीं तोडून स्वतंत्र आचारविचाराच्या वातावरणांत येण्याचें मनावर घेतलें, तर त्यांच्या हातून हिन्दुधर्माचें फारच मोठें अननुभूत कार्य होण्याचा फार मोठा संभव आहे. हा उपरतीचा प्रश्न आहे व स्वामींना उपरति होईल अशी आम्हांला उमेद आहे.

आजपर्यंत ही वेदोक्त पुराणोक्ताची झुंज झुंजविण्याचें कार्य भिक्षुकशाहीनें करावें व झुंज चिडीला आली म्हणजे या नामधारी जगद्गुरूंनी आज्ञापत्राचा एक नाटकी फार्स करून दोन्ही पक्षांना तात्पुरतें चूप करावें, असा प्रकार गेली २०० वर्षे या महाराष्ट्रांत चाललेला आहे. हीं आज्ञापत्रांची चिठोरी मिळविण्यासाठी ब्राह्मणेतर कित्येक समाजांनीं आपल्या

## अलोट संपत्तीचें व इभ्रतीचें शेण

केल्याचे दाखले काल परवांपर्यंत भरपूर आढळतील. या समाजांचा हीं असलीं कागदी चिठोरीं मिळविण्यांतला उद्देश पाहिला म्हणजे त्यांचें स्वधर्माविषयींचें गाढ अज्ञान व मनाचा दुबळेपणा व्यक्त होतो. अमुक समाजाला वेदोक्ताचा अधिकार नाहीं किंवा आहे, सोळा संस्कारापैकीं अमूक इतके संस्कार या समाजानें करावे, हें ठरविण्याचा अधिकार या शंकराचार्यांना कोणी दिला ? राजा किंवा धर्मगुरू हे जोपर्यंत आपल्या नियुक्त कर्तव्यकर्मांपासून च्युत होत नाहींत, तोंपर्यंतच जनतेनें त्यांच्या गादीचा मान राखून त्यांच्या आज्ञापत्रांना शिरसावंद्य मानावें, मग हे राजे व

* ' चुटकीसरशी ' म्हणण्याचें कारण सांप्रत कामधेनूप्रमाणें वाटेल तेव्हां झोळी भरणारें नवीन फण्डयुग उदयास आलें आहे व खेडाळू टारगट पोरांच्या पतंगवावड्या प्रमाणें निरनिराळ्या बँकेचे कोरेकरकरीत चेक इतस्मतः हवेंत वाटेल तितके भरान्या मारीत आहेत. दुनिया झुकती है, झुकानेवालेभी आस्तेकदम आ रहे है ! धर्मप्रसारांचे नियुक्त कार्य सोडून, नॉन्कोऑपरेशनच्या वाहत्या गंगेंत सवंग लोकप्रियता मिळविणान्या स्वामींना फण्डांचार्यांच्या गादीवर बसवून त्यांच्यावर कोन्या चेकांचीं छत्रचामरें उडवायला फण्डगुण्डांचा सध्या दुष्काळ नाहीं.

धर्मगुरू सनदशीर असोत वा नसोत. परंतु ज्या धर्मगुरूच्या गादीवर विद्याशून्य ऐदी गणोबा आज शतकानुशतकें बसत आले आहेत व ज्यांनी आपलें धर्मप्रसाराचें व धर्मोपदेशाचें कर्तव्यकर्मसुद्धां वर्ज केलें आहे अशा या नुसत्या निःसत्व दण्डधाऱ्यांची फाजील प्रतिष्ठा वाढविणें म्हणजे आपल्या दुबळ्या मनोवृत्तीचें प्रदर्शनच नव्हे काय ? शिवाय हे जगद्गुरू म्हणजे कारस्थानी भिक्षुकशाहीच्या हातची मेणाचीं बाहुलीं असतात. वारा वाहील तशीं शिडें पसरणारे व प्रसंग पाहून पगड्या फिरविणारे भिक्षुकशाहीचे शाहीर या मेणाच्या गोळ्यांना वाटेल तेव्हां

## गणपति नाहीं तर माकड

बनवायला जर सोडीत नाहींत, तर असल्या या नामधारी पीठावरील पिठांच्या पुतळ्यांच्या आज्ञापत्रांना काय किंमत द्यायची ती ज्याची त्यानेंच ठरविलेली बरी! शंकराचार्यांसारख्या निःसत्व दण्डधारी कर्महीनांच्या सत्तेला वास्तवीक यापूर्वीच मूठमाती द्यायला पाहिजे होती. परंतु तेहतीस कोटी देव निर्माण करून दर माणसाच्या बोकांडीं एकेक स्वतंत्र देव बसविणाऱ्या भिक्षुकशाहीची सत्ता जोंपर्यंत हिंदुजन झुगारून देणार नाहींत. तोंपर्यंत हीं पिठाचीं बाहुलीं आज्ञापत्रांचा सट्टयाचा बाजार चालू ठेवणारच. सध्यां स्वयंनिर्णयाचें युगांतर सुरूं झालें आहे. सामाजिक व विशेषतः राजकीय बाबतींत

## ज्याचा तो स्वातंत्र आहे

ही वर्तमान काळाची हांक ऐकून हिंदुजनांनीं भिक्षुकशाही व धर्मगुरु या नादान धार्मिक अडत्यांच्या अडत्येगिरीला कायमची मूठमाती देऊन आपलें पूर्ण धार्मिक स्वातंत्र्य जाहीर करावें. अशी संधि वारंवार येत नसते. फार प्राचीन काळापासून धर्मप्रेमाची वेसण हिंदूंच्या नाकांत अडकलेली असून, ती भिक्षुकशाहीनें आपल्या हातीं घट्ट धरून ठेवलेली आहे. उद्यां राजकीय स्वातंत्र्य मिळालें तरी जोंपर्यंत ही बौद्धिक गुलामगिरीची वेसण भिक्षुकशाहीच्या हातांत आहे, तोंपर्यंत सामाजिक स्वातंत्र्य तर राहूद्याच, पण राजकीय क्षेत्रांतसुद्धां भिक्षुकशाही ब्राह्मणेतरांच्या उरावर थै थै नाचल्याशिवाय राहणार नाहीं. ईश्वर करो व हें आमचें भाकीत सर्वस्वीं खोटें ठरो.

* * * * *

(२३) गेल्या शतकाच्या उत्तरार्धात झालेल्या ब्रह्मी युद्धाच्या हकिकती एकदां एक पेनशनर मेजर सुभेदार आम्हांला सांगत होते. ते म्हणाले कीं, '' इंग्रजी सैन्याचा एवढा मोठा कडेकोट बंदोबस्त आणि इतकी कडकडीत शिस्त व टापटीप, परंतु ब्रह्मी लोकांच्या गनिमीकाव्यापुढें त्यांचें कांही चालेना. ब्रह्मी लोकांचा हल्ला केव्हां येई व चटकन् कुठें चुटकीसारखा नाहींसा होई, याचा कांहीं मागमूसच लागत नसे. तिकडे कळकीचीं दाट जंगलें असल्यामुळें ब्रह्मी लोक त्यांतून भराभर दडून पसार होत, पण इंग्रजी सैनिक अगदींच नवखे असल्यामुळें, त्यांचा पाठलाग त्यांच्याच पाठीमागें लागून १०-१५ मिनीटांच्या आंतच ' अरे! आ तो हूं छूं! ' म्हणून छावणीला परत यावें लागत असे. लढाईला तोंड असें लागेच ना, यामुळें व्यर्थ कुचंबणा होऊं लागली. बरें, हल्लयांचा पाठलाग नेटानें केलाच तर हल्लेवाले कोठेंच न आढळतां, खेडवळ ब्रह्मी

लोकांचीं खेडीं आपापले व्यवहार शांतपणे करीत असलेलीं आढळायचीं. इंग्रज सेनापति एवढे मोठे मुत्सद्दी, पण हीं शांतपणे आपापल्या खेडवळी व्यवहारांत निमग्न असलेलीं ब्रह्मी खेडींच या गनिमी हल्लयांच्या मुळांशी आहेत, एवढेंसुद्धां त्यांना पटेना! आणि दिवसेंदिवस इंग्रजी सैन्यांची तर नाहक कुंचबणा होऊं लागली, अखेर एका रात्रीं मसलतखान्यांत मी सुचविलें कीं ' हीं ठिकठिकाणीं विखुरलेलीं ब्रह्मी खेडीं म्हणजे या हल्लेवाल्यांची नाकें आहेत. तुम्ही त्यांच्या तटस्थपणावर किंवा शांतपणावर जाऊं नका. हीं नांकें तुम्ही निर्दयपणानें ठेंचल्याशिवाय या ब्रह्मी युद्धांचें तोंड उघडणार नाहीं. निःशस्त्र व तटस्य नागरीकांवर शस्त्र उचलायचें नाहीं, हा वेदान्त गोंडस आहे खरा; परंतु जेथें नुसतें तटस्थपणाचें सोंग घेतलेले आहे. येथें हा वेदान्त काय उपयोगी? ' भवति न भवति होऊन अखेर ब्रह्मी लोकांचे गमिनी हल्ले बंद पाडण्यासाठी सुभेदार ×××× नीं वाटेल ते करावें, असा हुकूम मसलतखान्यांतून सुटला. माझी पक्की खात्री होती कीं ही बावळट व खेडवळ दिसणारी खेडींच या हल्लेखोरांचीं काळिजें आहेत; या काळजांनाच हात घातल्याशिवाय हे गनिमी हल्यांचे ब्रह्मी दंगे खास बंद पडणार नाहींत. दुसऱ्या दिवशीं अनेक सुभेदार व मी आपापल्या तुकड्या घेऊन निघालों आणि शिपायाना हुकूम फर्मावला कीं मागेंपुढें कांहीं न पाहतां जेथें जेथें ब्रह्मी खेडी आढळतील तेथें तेथें बेधडक तीं जाळून पोळून फस्त करीत चला. खेडवळांच्या रड्याओरड्याकडे लक्ष देण्याचें कांही कारण नाहीं. हुकूम होण्याचा अवकाश, बारा मैलांच्या घेरांत ठिकठिकाणच्या खेड्यांचा भडका उडाला. युद्धस्य कथा रम्या ! त्या हलकल्होळांचें हृदयद्रावक चित्र तुम्ही आपल्या कल्पनासृष्टींतच पहा ! ! संबंध दिवसभर ही जाळपोळ होतांच, संध्याकाळच्या सुमारास ब्रह्मी बंडेखोरांचे पुढारी आपण होऊन इंग्रजी छावणींत दाखल झाले व म्हणूं लागले कीं आम्हांला वाटेल तर फांसावर चढवा पण हीं जाळपोळ आतां बंद करा ! अशा रीतीनें बंडखोर ब्रह्मी पुढारीच हस्तगत झाल्यामुळें, ब्रह्मी युद्धाच्या भरतवाक्याचा प्रसंग पुढें लवकरच साध्य झाला, हें सांगणें नको ! ! ''

भिक्षुकशाहींचें बंडसुद्धां ब्रह्मी गनिमी काव्यानेंच आज इतकीं शतकें चालू आहे. ब्रह्मीयुद्ध आणि ब्राह्मणीयुद्ध जवळजवळ समरस आहेत. या युद्धाचा लवकर निकाल व्हावा अशी ज्यांची मनापासून इच्छा असेल, त्यांनीं साम दाम दंड भेदादि जुनेपुराणे उपाय या उप्पर घोंटीत न बसतां, धार्मिकपणाच्या मुखवट्याखालीं डांकेखोरपणाचे गनिमी हल्ले चढविणाऱ्या, निरनिराळ्या भिक्षुकी ग्रंथांची ब्रह्मी खेड्यांप्रमाणेंच वासलाद लावल्याशिवाय गत्यंतर नाहीं. निदान **लाला लजपतराय** म्हणतात त्याप्रमाणें त्यांच्यावर ' मेजॉर ऑपरेशन्स 'करून, त्यातली भिक्षुकी घाण बाहेर काढली पाहिजे. आजला हिन्दु राष्ट्राला जी शोचनीय प्रेतकळा आलेली आहे, त्याला कारण ही भिक्षुकी घाणच त्याच्या पिंडाब्रह्मांडाला झोंबलेली आहे. हिन्दुत्वाची सुधारणा करूं इच्छिणारांना या प्रश्नाकडे दुर्लक्ष करुन चालणार नाहीं. श्रुतिविरोधी जुने ग्रंथ आहेत तसेंच प्रमाण धरुन हिन्दुधर्माची व हिन्दुत्वाची सुधारणा करूं म्हणणारे लोक एक तर महामूर्ख असले पाहिजेत किंवा अट्टल लुच्चे तरी असले पाहिजेत. वास्तविक खरें म्हटलें तर बुद्धिप्रधान [Rationa] सत्यसंशोधनाच्या या नवयुगांत मनुष्यांनीं कोणत्याहि एका विशिष्ट ग्रंथांचे प्रामाण्य मानून त्या विवक्षित पंथाचे गुलाम बनूं नये, हा उत्तम पक्ष; व मतामतांच्या गलबल्याच्या वावटळींत

पायाखालची वाळू घसरूं नये, म्हणून श्रुतिसारख्या आद्यग्रंथांनाच चिकटून रहाणें, हा मध्यम पक्ष होय. श्रुतिप्रणित वैदिक धर्माचें स्वरुप **लाला लजपतराय** येणेंप्रमाणें वर्णन करतात :—

The Vedic Dharma, like all great religious movements that have left their mark in the world, is not only a creed, but a complete system of thought, a complete code of guidance of humanity in all relations to life and all departments of human activity, a policy as well as a science of living–in short, a way of looking at things, a point of view. (*Arya Samaj. P. 173*) हे उद्धार श्रुतिविषयक उत्कट भक्तीचे व प्रेमातिरेकाचे आहेत. परंतु बुद्धिप्रधान चिकित्सक नवमतवादी म्हणतात :— We know that all the riddles of the Universe had never been solved either in the Vedas, the Upanishads, the Puranas or in any Shastric or Unshastric literature of the Hindus however estimable they may be of whatever guidance they might have given to the people in the past. (*Indian Rationalistic Society's Bulletin Jan. 1921. P. 280.*) अर्थात् बदलणाऱ्या प्रत्येक नवयुगाच्या मानवी आकांक्षांना व ज्ञानलालसेला तृप्त करण्याइतकी, फार काय पण दिवसेंदिवस प्रौढतम बनत चाललेल्या शास्त्रीय शोधांशीं समगामी राहण्याइतकी श्रुतिप्रणित तत्वज्ञानाची–बीजरूपानेंच कां होईना–जर व्यवहारक्षमता (adaptability) आढळून येणार नाही, तर तेथें मात्र खुशाल स्वतंत्र विचार–योजना करण्याचा अधिकार वाटेल त्यास असला पाहिजे. नाहींतर स्मृतिपुराणोक्त भिक्षुकी गुलामगिरीच्या आगींतून निघून ग्रंथप्रामाण्याच्या शाब्दिक फुफाट्यांत पडण्याचा अनवस्था प्रसंग यायचा ! वस्तुस्थिति कशी आहे ती पहा. **ब्राह्मणांनीं वाटेल ते ग्रंथ वाटेल तसे खरडून त्यावर (धार्मिकपणाची) सोंवळ्या अधिकाराची धाबळी पांघरुन ठेवली खरी ; परंतु स्वामी दयानंदानीं हा खोडसाळपणा तेव्हांच उमगून, त्या धाबळीला दूर झुगारुन दिली. [आर्यसमाज पृ. ७३] हिंदु धर्मांत व्यक्तीला कांहींच महत्व नाहीं ; महत्वाचा सारा गड्डा काय तो ब्राह्मणाच्या स्वाधीन. प्रत्येक ब्राह्मण म्हणजे खुद्द परमेश्वराचा प्रतिनिधी. त्याचा शद्ब हाच कायदा. तो कोणी किंचित् मोडला पुरे कीं गेलाच तो नरकांत. ब्राह्मणाला कोणी निवडावें लागत नाहीं, पसंत करावें लागत नाहीं, नेमावें लागत नाहीं, काहीं नाहीं. तो जन्मसिद्धच या सर्व अधिकारांचा भोक्ता असतो ; इतकेंच नव्हे तर गुणकर्मांच्या किंवा शिक्षणाच्या बाबतींत तो जरी महाशंख असला तरी त्यामुळें त्याच्या या भिक्षुकी अधिकारास कांहींहि बाध येत नाहीं. धर्म कोणता आणि अधर्म कोणता हें याच बेट्याला माहित ! निवळ जन्मप्राप्तीच्या (काकतालीय) न्यायावरच त्याचा सारा पावनपणा अवलंबून असतो. हल्लीं हिंदु धर्म म्हणजे हजारों मतमतांतरें, पंथ, क्रियाकर्मे, चालीरीती आणि आचारविचारांचा असा एक अवाढव्य समुद्र बनला आहे कीं सेन्ससचे अधिकारी म्हणतात कीं**

**भटांची पूजा म्हणजे धर्माची कसोटी**

**हेंच हिंदुधर्माचें मुख्य लक्षण होऊन राहिलें आहे. युरपांतल्या मध्ययुगीन् पोपांना धार्मिक नादीरशहांची उपमा देतात ; पण आमच्या इकडील भिक्षुकशाहीच्या अरेरावीपणाशीं त्यांची**

तुलना केलीच, तर ते बिचारे निवळ कायदेबाज राजेच (Constitutional monarchs) ठरतात. [आर्यसमाज पृ. ६६-६७] हल्लींहि हिंदुस्थानांत अझून असे भले बहाद्दर आहेत कीं जे वेळीं वाटेल तेव्हां, हिंदुस्थानानें विरक्त वृत्तींत सोंवळेंपणानें एकलकोंडे रहावें, असें प्रतिपादन करितात. हे लोक प्राचीन काळच्या जुन्या म्हणून सोन्यासारख्या दिवसांचे मोठे चहाते असून, ते दिवस तसेच पुनश्च प्राप्त व्हावे म्हणून आपल्या जीवाची एकसारखी आटारेटी करीत असतात. असल्या मूर्खपणाच्या विधानांनीं भरलेलीं पुस्तकें लिहून ते त्यांचा सर्वत्र प्रसार करतात. लोकांच्या मृदुल मनोवृत्तींना चेतविणाऱ्या कविता व गाणीं लिहून त्यांचा फैलावा करितात. या असल्या लोकांना गद्धे म्हणावें कीं राष्ट्रघातकी म्हणावें, हें कांहीं मला समजत नाहीं. असल्या प्रकारच्या भिकार वाङ्मयापासून माझ्या देशबांधवांनीं पूर्णपणें अलीप्त रहावें, असा मी त्यांना अंतःकरणपूर्वक कळकळीचा इषारा देतों. [नॅशनल एज्यूकेशन पृ. ७९-८०] भूतकाळच्या परिस्थितीत रहाण्याचा हट्ट हा केवळ फोल होय,–नव्हे, अगदीं मूर्खपणाचा आहे. आपल्याला आज जर कशाची विशेष काळजी घेणें जरूर असेल, तर ती भविष्यकाळाचीच होय...........प्राचीन आर्यांबद्दलच्या आदराच्या बाबतींत मी स्वतः कोणासहि हार जाणार नाहीं, हें लक्षांत ठेवा. त्यांच्या संस्कृतीबद्दल दुसऱ्या कोणास जितका अभिमान वाटतो, तितकाच मलाहि वाटतो. अर्वाचीन मंडळींना प्रगति करतां येण्याजोग्या स्थितीपर्यंत प्राचीन आर्यांनीं मानवी ज्ञानाची शिकस्त केली. त्यांचा शहाणपणा, त्यांचें अध्यात्म, त्यांची नीति आणि त्यांची वाङ्मयपरिणति याबद्दल मला अभिमान वाटतो. पण आर्यांच्या काळापेक्षां ज्ञानाच्या बाबतींत जगानें, आतांपर्यंत जी उच्चतम भरारी मारलेली आहे, त्याकडे मी कशी डोळेझांक करूं ? आणि ज्ञानाचा (Knowledge) अर्थ जर चातुर्य (Wisdom) असाच असेल, तर तीन हजार वर्षांपूर्वीच्या जगापेक्षां आतांचें जग ज्ञानाच्या बाबतींत खात्रीनें पुष्कळच उन्नत झालें आहे, असें समजण्यास मुळीच हरकत नाहीं. [नॅश. एज्यु. ४३] फार दूर कशाला ? माझी पक्की खात्री आहे कीं आर्यांच्या पवित्र श्रुतींचे प्रवर्तक व संरक्षक, उपनिषदें दर्शनादि ग्रंथकर्त्यांचे प्रतिनिधि आणि मनु याज्ञवल्क्यादिकांचे अनुयायी हे सारे अज्ञानमग्न आणि मूढविश्वास मग्नच होते. ज्या वैदिक धर्मानें एके काळीं प्रत्येक मनुष्य प्राण्याला विचार व विवेक–स्वातंत्र्य पूर्णपणें दिलें ; ज्या धर्मांत मतभेद नुसता क्षम्यच नव्हे तर आदरानें मान्य केला जात असे ; वेदग्रंथांचें अध्ययन पारायण व मनन करण्याची प्रत्येक व्यक्तीला (मग तो कोणीहि असो) ज्या धर्मानें पूर्ण मुभा ठेवली होती ; प्रत्येक व्यक्ती आपल्या आत्म्याच्या बऱ्या वाईट गतीबद्दल स्वतः धनि, आपल्या आचारविचारांबद्दल परमेश्वराशीं प्रत्यक्ष जबाबदार आणि त्या स्वयंसिद्ध तेजोराशी भगवंतापासून प्रत्यक्ष (कोणत्याहि मानवी दलालाच्या मध्यस्थीशिवाय) प्रेरणा प्राप्त करुन घेण्याचा अधिकार सर्वांनाहि आहे, असें ज्या धर्मानें शिकविलें, तोच उज्वल आणि उदार हिंदुधर्म आजला अंधःश्रद्धेनें भिक्षुकशाहीचा अधिकार मानण्यास भाग पाडणाऱ्या बीन-काळजाच्या पद्धतीचा एक पुरस्कर्ता होऊन बसला आहे. ज्या हिंदूंना पूर्वी कोणत्याहि मध्यस्थाची जरूर नव्हती आणि धार्मिक व अध्यात्मिक बाबतींतल्या पूर्ण स्वातंत्र्यांत जे पूर्वी धन्यता मानीत असत,

त्यांनींच सध्या तीस कोटी देवांना आणि तितक्याच संख्येइतक्या ब्राह्मणांना आपले उद्धारक म्हणून बोकांडी बसवून घेतलें आहे. (*Arya Samaj. p. 22-32*) आतां, धर्मशास्त्रांसंबंधानें म्हणाल, तर मी स्पष्टच म्हणतों कीं आमचे सामाजिक व धार्मिक नियम पूर्वी काय होते याची निदान ओळख करुन घेणें हें कितीहि श्रेयस्कर असलें, तरी हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं आमच्या धर्मशास्त्रावरच्या प्रचलित उपलब्ध स्मृत्या अर्ध्याकच्या, खुळचट, असंबद्ध आणि परस्परविरुद्ध कल्पनांनीं व तत्वांनीं नुसत्या सडलेल्या आहेत. अशा परिस्थितींत मनु नारद आपस्तंबादिकांच्या स्मृत्या आमच्या तरुण विद्यार्थ्यांच्या हातीं देणें म्हणजे त्यांच्या मानसिक शक्तिची व्यर्थ ओढाताण करण्यासारखें आहे. [नॅश. एज्यु. पृ. ७८]

हे वरील उद्‌गार दुसऱ्या तिसऱ्या कोणाचे नसून त्रिलोकविश्रुत **लाला लजपतराय** यांचे आहेत ; तेव्हा त्यांच्या महत्वाबद्दल व सत्यतेबद्दल अधिक विवेचन करुन सूर्याला काडवातीनें उजेड दाखविण्याच्या फंदात आम्ही पडत नाहीं. लाला लजपतराय, महर्षि डॉ. रविंद्रनाथ टागोर आणि पूण्यपाद ऋषींद्र अरविंद घोस यांच्या ग्रंथांचें पारायण करणाऱ्यांना त्यांच्या उत्कट सत्यप्रतिपादनाविषयी व असूरी खोडसाळपणाचा चेंदामेंदा करतांना लालबुंद होणाऱ्या त्यांच्या सात्विक त्वेषाबद्दल ओळख करुन देण्याची अवश्यकता नाहीं. बोलपूर, पांदीचरी आणि लाहोर या तीन ज्ञानपीठांतून जें उज्वल वाङ्मय अलिकडे जगप्रसिद्ध होत असतें. त्यांत राष्ट्रीय गुंडगिरीचा दुष्टपीपणा, मानभावीपणा किंवा दुतोंडेपणा मुळींच नसतो, पण आमचे विद्वान् तरुण या वाङ्याचें परिशीलन, मनन व निदिध्यास करतील तर हराम ! एरवीं, कॉलेजें व शाळा सोडून गांवभर हुंदाटण्या घालायचा धंदा कोणी करावा ? 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त फल प्राप्त्यर्थम् ' ची शाब्दिक पोपटपंची करणारे भिक्षुक तर बोलूनचालून बाबावाक्यं प्रमाणंचे कट्टे शागीर्द. वर्णाश्रमधर्माच्या पोंकळ भोंपळ्याला पोटापाण्याच्या प्रश्नाचा दांडा लटकाऊन, स्वतःच्या अकलेच्या तारा जीर्णमताच्या खुंट्यांनी घट्ट आंवळून पुराणप्रवचनांचे जलसे करणाऱ्या 'हर्दास ' पुराणिकांच्या कवट्यांवर बोलपूर लाहोर वाङ्याचें भाग्य सटवीनें लिहिल्याचें दिसत नाहीं. इतकेंच नव्हे, तर श्रुतिस्मृतिपुराणोक्त फलप्राप्तीसाठी उनाड पोळवजा मतिमंद भिक्षुकांच्या झोळ्या भरणाऱ्या शहाण्या पुण्यवानांच्या चित्रगुप्ती हिशोबांत ही पुण्याई जमा पडल्याचेंहि दिसत नाहीं. असें नसते तर भिक्षुकशाहीच्या बण्डाला सांप्रत प्राप्त झालेली उर्मट कळा कधींच आली नसती, भिक्षुकांच्या तोंडचा 'शास्त्र' हा एकच शब्द वाटेल त्या शहाण्याच्या कमरेचे कांटे ढिले करूं शकतो. परंतु मद्रासचे अड्यार लायब्ररीचे डिरेक्टर **श्री. ए. महादेव शास्त्री बी. ए.** म्हणतात. " What we call Shastras are made up of texts of different values.........there are spurious additions and interpolations fathered upon the sages of lofty wisdom, but clearly indicative of the prejudices and idiosyncrasies of their real unscrupulous authors and quite unworthly of the holy names of the sages to whom they are attributed. (*Vedic Law of Marriage p. 96-97*) **बॅरिस्टर एस्. सी. मुकर्जी** याच मताचा पुरस्कार करून म्हणतात. " Shastras-the fabricated and forged interpolations whereof are well-known but nevertheless doggedly

adhered to as genuine. " (*Decline & fall of the Hindus. p. 24*) चिकित्सक विद्वानांचे असे असंख्य उतारे देऊन, प्रचलित धर्मग्रंथांचा फोलकटपणा वाटेल तसा सिद्ध करुन दाखवितां येईल; परंतु स्थलाभाव आड येत आहे. सध्यां याविषयीं थोडी रूपरेषा दाखविण्याचा यत्न करीत आहोंत. त्यावरुन भिक्षुकशाहीच्या ग्रंथप्रामाण्याच्या शास्त्रोक्त धिंगाण्याचें कांहींसें स्पष्ट करुन आमच्या वाचकांना पटेल अशी आशा आहे. स्मृतिग्रंथाबद्दल सामान्यत्वें आम्हीं आपला अभिप्राय वर नमूद केलाच आहे. स्मृतींत चांगल्या गोष्टी मुळींच नाहींत, असें आम्ही म्हणत नाही; आहेत, पुष्कळ आहेत. परंतु चांगल्यापेक्षां वाईटाची त्यांत बरीच भेसळ आहे याचें कारण हे ग्रंथ भिक्षुकांनी ब्राह्मणांचे अवास्तव महात्म्य व स्तोम वाढविण्यासाठी लिहिलेले असल्यामुळे, त्यांत सत्याचा खून पडला असल्यास त्यांत कांही नवल नाहीं* श्रुति (म्हणजे वेद) व स्मृति यांच्या परस्पर अंतरंगाची छाननी करतांना **श्री. ए. महादेव शास्त्री** म्हणतात, " ऋषींच्या निर्विकार व समतोल मनोवृत्तींत ज्या सनातन सत्यतत्वांचें प्रकटीकरण झालें, त्या तत्वांना वैदिक धर्म अथवा श्रुति असें म्हणतात; आणि एका विवक्षित काळाकरितां, सामान्य अनुभवावरच भिस्त ठेवून तत्कालीन् समयाचाराच्या कांही ठोंकळ ठरविलेल्या नियमांच्या संग्रहाला स्मृति असें म्हणतात. म्हणून स्मृतीचा अधिकार श्रुती (वेदा) इतका नाही. अशास्त्रसिद्ध गोष्टी व सामाजिक आचारं यांचाच प्रामुख्यानें स्मृतीत समावेश होतो व यावरील नियमच तींत असतात. म्हणून स्मृत्यांचा समावेश श्रुतिमर्यादेंत होत नाहीं. (त्या श्रूतिबाह्य आहेत.) अर्थात् त्या बदलूं शकतात व शास्त्रीय शोध जसजसे होत जातात व सामाजिक परिस्थिती बदलली जाते, त्याप्रमाणें स्मृत्यांत सुधारणाहि करतां येते.† स्मृतीची व जनरूढीची मान्यता असलेले

* Modern research however permits us to get to the historic origin and motive of those much vaunted "Texts" the genuineness whereof we are certainly in a position to impeach. It has now been clearly established that our Briddha Manu or the old Manu has been made to disappear and the present Manu, so redolent of Brahmanic superiority, has been redacted, recasted and re-edited several times to suit the Braman's interest at a late post-Buddhistic age, as and when Hindu revivals took place from time to time in the wake of the numerous Brahmanic and pro-Brahmanic kingdoms which came into existence. Not only Manu but all our Shastric literature has been put through the same process for the purpose of creating a new Earth in accordance with Brahmanic pretensions, after the Buddhistic deluge. In the necessity of doing so, the history of the past had to be garbled, abandoning all sense of proportion and falsifying or ignoring the sequence of time, circumstances and contemporaneous events.

*Decline & Fall of Hindus. p.p. 28-29.*

†अब्रह्मण्यम्! स्मृतींचे नियम बदलतात ? पूर्वी निस्पृह स्पष्टवक्ते संशोधक असलेले, पण अलीकडे राष्ट्रीय कंपूत घुसल्यामुळें लोकमान्यतेच्या आराधनीं लागलेले चिंतामनराव वैद्य एकाच तोंडानें सर्दगरम हवा सोडतांना म्हणतात कीं " मनु Law-giver नाहीं, Law Remembereror आहे ; हाच सिद्धांत आमचा आहे. ईश्वराच्या आज्ञा त्याला ज्या स्मरल्या त्या त्यानें लिहून (?) ठेविल्या ; त्याविरुद्ध आतां दुसऱ्या आम्हां हिंदूना तरी मान्य करणें शक्य नाहीं........मनुयाज्ञवल्क्यांचे कायदे सर्व काळाला योग्य असेच आहेत. " (सार्व. सभा पुणें ज्यु. अंक.) ब्रेव्हो उड बी लोकमान्य वैद्य ! महाभारत रामायणाची संशोधनपूर्वक सालटीं काढून मनुस्मृति ' अगदीं अलीकडची ' ठरविणारे रावबहादूर ते आपणच काय ? लोकमान्यतेची राष्ट्रीय मूस कोणाचे केव्हां कसें रूपांतर करील याचा कांहीं नेम नाहीं म्हणतात तें खरें दिसतें एकूण !

समयाचाराचे असे कितीतरी नियम स्मृतींत आहेत कीं ज्यांना श्रुतींत व शास्त्रांत (Science) आधार नाहीं; इतकेंच नव्हे तर कांही धडधडीत श्रुतिप्रामाण्याला व सायन्सला अगदीं विरोधी असतात. याचें कारण शोधूं गेलें तर, तें, (नजर किंवा घोड) चुका, विशिष्ठ कार्याचें औचित्य, दुर्वासना, गर्व किंवा मत्सर यांतच सांपडणार, '' असल्या स्मृत्यांच्या आधारावर प्रचलित हिंदू लॉ. रचणाऱ्या शहाण्यांची काय तारीफ करावी ? आणि स्मृतींतील वचनांना सनातनत्वाची सफेदी चढवूं पाहणाऱ्या पंडीतांची किती कींव करावी? मनुस्मृतींचें जनकत्व कांही हेकड जीर्णमतवादी वैवस्वत मनूच्या गळ्यांत बांधतात. याचें कारण अगदीं उघड आहे. भिक्षुकी ग्रंथांना असेंच मागेंमागें खेंचीत नेण्यावरच त्यांच्या भिक्षुकी इभ्रतीचा सारा पाया आहे. मानवधर्मसूत्र नामक एका प्राचीन ग्रंथाच्या पोटांतून मनुस्मृतींचा जन्म झाला, असें कांहींचें म्हणणें आहे; परंतु या ग्रंथाची विश्‍वसनीय अशी एकही प्रत अझून कोठेंहि उपलब्ध झालेले नाहीं. सध्यांची मनुस्मृति अत्यंत अर्वाचीन आहे. तींतील समाजव्यवस्थेच्या चित्रावरून (हें चित्रसुद्धां छपन्न मसाल्याच्या भेसळीचें आहे.) तिचा काळ इ.स. २०० च्या पूर्वी नेतांच येणें शक्यच नाहीं* हिचा कर्ता कोणी मगधदेशस्थ भृगूनामक भिक्षुक † असून त्यानें पौराणिकी धाटणीवर वैवस्वत मनूचा धागा आपल्या ग्रंथाला मोठेपणा, मान्यता व सोंवळेपणा येण्याकरितां जोडून दिलेला आहे. नन्दांचा संहार करून भरतखंडाच्या साम्राज्यपदावर बसलेला चंद्रगुप्ताचा हस्तक जो विष्णुगुप्त चाणक्य त्यानें अर्थशास्त्र नांवाचा जो एक ग्रंथ लिहिलेला आहे, त्याचा काळ इ.स. पूर्व ३२१ ते ३०० आहे. त्यांतील राजनीति, समाजनीति इ. चित्रें नीट निरखून पाहिलीं तर तीं मनुस्मृतींतील समाजचित्रांपेक्षां बरींच प्राचीन दिसतात. अर्थात् मनुस्मृति हा ग्रंथ अगदी अलीकडच्या ‡ काळांत ब्राह्मण्याचें अवास्तव स्तोम माजविणाऱ्या ब्राह्मणांनीं लिहिलेला आहे, हें स्पष्ट सिद्ध होतें.जी गोष्ट मनुबोवांची, तीच याज्ञवल्क्यपंताची आणि नारदभटजींची, प्रत्येक शतकाशतकाला-नव्हे, दशकादशकाला- मानव समाजाचे आचार व विचार उत्क्रांत होत असतात आणि त्याप्रमाणें त्याच्या सामाजिक व राष्ट्रीय जीवनांत कल्पनातील फेरफार होतात. हा सनातन सिद्धांत डोळ्यापुढें असूनहि हिंदू लॉ करण्याच्या वेळीं तत्कालीन् पंडितांनीं १४०० वर्षांपूर्वीच्या रद्दड स्मृत्याच्या आधारावर तोल सांवरून १९ व्या शतकांतील हिंदूंच्या सामाजिक

* I have come to believe that the author (of Manu Smriti) could not have lived before 200 A. D. and I am inclined to place him between 227 A. D. and 320 A. D.

† It was a strange irony of fate that the people who came forth as the expounders of Dharma were persons who had the least knowledge of the world. do. p. 69.

‡ What still more strikingly proves the priority of the " Artha Shastra " to the Smrities of Manu and Yajnyavalkya, as now extant, is the marked difference between the states of societies presented in them. The state of society portrayed in *Artha Shastra* is in the main pre-Buddhistic, though Kautilya wrote long after the time of Buddha, while the Smrities depict the ideal of the Hindu Society as reconstructed and reformed consequent on its struggle for existence against the all-victorious, but just then decadent Buddhism.

*Artha Shastra, Int: xviii. By R. Shamashastri.*

चारित्र्याची मुर्खपणानें गळचेपी करावी, असला ज्ञानमांद्याचा मासला साऱ्या जगाच्या इतिहासांत एकट्या हिंदुस्थांनातच सांपडेल. शिलार वंशातील जिमूतवाहनानें इ.स. १६ व्या शतकाच्या प्रारंभीं दायभागाचे जे क़ांही ठोंकळ नियम ठरविले. त्यांच्याच आधारावर २० व्या शतकांतल्या हिंदूंच्या संसारांतल्या दायभागाचें नियमन व्हावें, ही उलट्या पावलांनीं चालणारी प्रगमनशीलता ' आम्ही स्वराज्यास लायख आहोंत ' म्हणणाऱ्या हिंदूंना लांछनास्पद नव्हे काय ? हिंदू लॉ आमूलाग्र बदलून टांकण्याची एक चळवळ बंगाल्यांतल्या कांही कौन्सिलरांनी व वकीलांनी सुरूं केल्याचें वृत्तपत्रांतून वाचल्याचें पुष्कळांना स्मरत असेल; पुढें या चळवळीचें काय झालें तें कळत नाहीं. चळवळींत बोलघेवडा वकील पडला कीं तिचें तीनतेरा झालेंच म्हणून समजावें, हा अनुभव हिंदवासियाच्या चिरपरिचयाचाच आहे म्हणा ! दायभागाच्या या जुन्यापुराण्या घरटाच्या घरघराटीनें जीर्णमतवाद्यांना उषःकालच्या साखरझोंपेइतकी जरी चित्ताची प्रसन्नता प्राप्त होत असली, तरी सध्यांच्या या विश्वबंधुत्वाच्या व्यापक संसाराच्या नवयुगांत, त्या घरटामध्यें लाखों हिंदूंच्या संसाराचे पीठ होत असतें, हें न्यायमंदीरांतील निकालाच्या अहवालांचें परिशीलन केल्यास कोणासहि समजून येण्यासारखें आहे. हल्लीं मनोरंजन मासिक पुस्तकांत

## हिंदु स्त्रियांची कायदेशीर दुर्दशा !!

नामक जी एक उत्कृष्ट लेखमाला सुरूं झाली आहे, तींत या सर्व गोष्टींचा उहापोह पद्धतशीर रीतींने होत असतो, त्याकडे आमच्या प्रिय बंधुभगिनी वाचकवर्गाचें लक्ष वेधणें आमचें कर्तव्य आहे. बॅरिस्टर मूकरजी म्हणतात कीं " To the priestly Brahmans must be ascribed the downfall and decay of the Hindus as a nation" [भावार्थः---राष्ट्रीय दृष्ट्या हिंदूंच्या ऱ्हासाचें व अवनतीचें खापर बेशक भिक्षुकशाहीच्याच टाळक्यावर फोडलें पाहिजे.] आणि स्मृतिग्रंथांच्या जोरावर भिक्षुकशाहीनें हिंदुसमाजावर कायद्याच्या व नीतीच्या दृष्टीनें ज्या अनंत आपत्ती लादल्या आहेत त्यांचा विचार केला तर बॅ. मूकरजी प्रभृति स्पष्टवक्त्यांच्या विधानाची सत्यता पटवायला रामशास्त्री प्रभुणे स्वर्गांतून खाली उतरलेच पाहिजेत, असें मुळींच नाहीं. समाजधर्माच्या बाबतींत हिंदूंनी भिक्षुकशाहीच्या ओंजळीनें आजपर्यंत प्यालें तितकें पाणी पुरें झालें! या पाण्यानें त्यांच्या आंगचें खरें पौरूषत्वाचें पाणी मात्र नाहींसें झालें आहे, ' जो दुसऱ्यावरी विश्वासाला । त्याचा कार्यभाग बुडाला ' हें समर्थाचें वचन किंचित् बदलून

## जो भिक्षुकावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ॥

असें केलें, तर ते भिक्षुकी अंमलाखाली बौद्धिक गुलाम बनलेल्या हिन्दूंच्या सांप्रतच्या चारित्र्याला तंतोतंत लागूं पडेल, ग्रंथप्रामाण्याच्या सर्वव्यापी बागुलबोवाला अझूनहि भिणाऱ्या हिंदूबाधवांना एवढेंच सांगणे येथे शक्य आहे कीं पूर्वीचें ते एकलकोंड्या राष्ट्रीयत्वाचे दिवस विसरा. हिन्दूंनी हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांतच सद्दीच्या जोरावर जो कांही थोडाबहूत पराक्रम काकतालीय न्यायानें केला, त्याचे कोरडे गोडवे गाऊन या नवयुगांत तुमचा टिकाव लागणार नाहीं. प्राचीन संस्कृत भाषेंतल्या भाकड स्मृत्यापुराणांच्या शिफारसीवर या जगांत कोणी कुत्रासुद्धां तुमच्या

माणुसकीला मान देणार नाहीं. ' आमची भरतभूमी ही अध्यात्मभूमी आहे, तिला पाश्चात्यांचा अर्थवाद कधींहि परवडणार नाही ' असले दांभिकपणाचे उद्गार काढतांना, आजच्या हिन्दूंपाशीं अध्यात्म किंवा अर्थ यांपैकी कांहीहि उरलेलें नाहीं, इकडे डोळेझांक करून चालायचें नाहीं. हल्लीं जबरदस्ताच्या टिकावाचा काळ (Survival of the fittest) आला आहे. हिन्दूंना साऱ्या जगांशी तोंड देऊन जिवंत रहावयाचें असेल, तर त्यांच्या प्रयत्नाची पहिली पायरी म्हणजे

## भिक्षुकशाहीप्रणित गुलामगिरीचा नायनाट

ही होय. ह्या उलट्या काळजाच्या भिक्षुकशाहीने सबंध हिन्दु राष्ट्राच्या सर्वांगीण संसाराला एकप्रकारचें द्वाड आत्मघातकी वळण लावलें आहे. कलकत्त्याचे एक विद्वान गृहस्थ हल्ली युरोपांत फिरत असून त्यांनी तेथील परिस्थतीचा तुलनात्मक सूक्ष्म अभ्यास चालविला आहे व या आपल्या चिकित्सक स्वाध्यायाची विस्तृत विवेचनात्मक माहिती कलकत्त्याच्या Indian Rationalistic Society's Bulletin मध्ये The Diary of an Indian Tourist (एका हिंदी फिरस्त्याची रोजनिशी) या मथळ्याखाली देत असतात. त्यांत एके ठिकाणी त्यांनी असे उद्गार काढिले आहेत :—

*The East has its own maxim of life.* It resigns to poverty, displays a make-believe contentment in abjectness and squalor, and smiles a sickly smile over all this lowliness, and looks up to the sky for the removal of the misery it endures. I have often asked myself the question, " Why does the East bring itself to that condition of mind and why is it in perpretual despair." The answer to that, I believe, *is that the East has no notion of the rigour of the law of life which nature has imposed upon it.* That law demands obedience to the law of the struggle for existence with its concomitant by-laws *viz. the adaptation to environment*, the power of co-operation, sympathy, pride in one's race, mental and physical development and the knowledge that year is going forward and not moving backward. It does not realise that everything in art, science and manufacture, which the genius of man has produced, belongs *ipso facto* to all races of man and that everybody must strive to get the benefit of it...... The East is individualistic and sweats and labours for individual domination and supremacy over others, it pines for prophetic vision for ruling over other minds. Every other man in the East is striving to be a prophet. Such procedure stunts the intellect and kills knowledge, and with the disappearance of the prophet all knowledge becomes extinct.

*(I. R. Society"s Bulletin. p. 284.)*

लाला लजपतराय याच विचारांना पुष्टी देतांना अगदीं स्पष्टस्पष्टच म्हणतात :—" Our people require to be assiduously and persistently taught that there is no such thing as *Kismet*, and that *Karma* is always controllable and manageable by one's own efforts as well as by changes in one's social environments......... (p. 60)......... The Indian mind has for some centuries been more or less in a state of captivity. The strict regulated life of the *Shastras* and the *Shara*, the *rule of the priest*, the lack of opportunities for education, the constantly disturbed conditions of the country, the *philosophical pessimism* of the creeds and the cults, the belittling of life by centuries of monasticism and ascericism, all had for some time combined to make life in India static rather than dynamic...... The result is that the India of the last thousand years has been more decadent than progressive–often going backward, rather than forward."

*(Lala Lajpat Rai. National Education. p. 62-63.)*

धर्मशास्त्रें खरीं असोत नाहींतर खोटीं असोत ; स्मृति पुराणें व्यासाच्या उद्‌रांतून निघालेली असोत, नाहींतर बाळंभट नातूच्या मेंदूतून गळलेली असोत ; या उप्पर हिन्दूंनी ग्रंथप्रामाण्याच्या भिक्षुकी खोड्यांत अडकून राहणें केव्हांहि श्रेयस्कर नाही. आम्ही हिन्दूजन हिन्दूसाम्राज्यांतील स्वतंत्र नागरीक आहोंत, ब्राह्मण भिक्षुकांचे गुलाम नव्हत, अर्थात् आमच्या घरांत अमूक एखाद्या ग्रंथाची मान्यता असावी किंवा मुळींच नसावी, हें ठरविण्याचा अधिकार व विवेक आमच्याच हातीं असला पाहिजे. शिवाय अमुक ग्रंथ मान्य व अमान्य असल्याच्या सबबीवर कोणाहि व्यक्तीचें हिन्दुत्व हिरावून नेण्याचा अधिकार कोणालाहि नाहीं. बॅरिस्टर मुकरजी असें ठणकाऊन सांगतात कीं :—The Hindu-world, depleted as it is, must for the sake of its own future life *dethrone the Brahman priest from the Guruship of the Race* and break down the rigid walls of the Caste-System and refrene its " marriage code " and " Code social " in the re-adjustment and putting our own house in order, would show that we are still a living race and not mere mummies in the museum with scriptural " Texts " stamped on our foreheads.

*(Decline and Fall of the Hindus. p. 30)*

[भावार्थः—हिंदुजन सध्यां कवडीमोल झाले आहेत; त्यांना जर आपल्या भावी जीवनाची (जिवंत रहाण्याची) कांही चाड असेल, तर त्यांनी पहिल्याप्रथम या भिक्षुकशाहीच्या ब्राह्मणाला हिन्दूंच्या गुरुपदावरून खालीं खेचून पदच्युत केला पाहिजे; जातिभेदाच्या तटबंदी भिंती पडून

जमीनदोस्त केल्या पाहिजेत; आणि सध्यां जी सुधारणेची संस्कृति आपल्याला लाभलेली आहे, तिला सुसंगत अशी विवाहाचा कायदा व सामाजिक आचारविचारांचीं बंधनें यांची पुनर्घटना केली पाहिजे. ही सामाजिक पुनर्घटना जर आम्ही केली व आमचें स्वतःचेंच घर नीट ठाकठीक व्यवस्थेंत बसविलें, तरच आम्ही कोणी जिवंत माणसें आहोंत असें जगाला दिसेल; नाहींतर टाळक्यावर श्रुतिस्मृति ग्रंथांचा शिक्का मारलेलीं हीं कोणीतरी प्रदर्शनांतलीं सुकवून वाळवलेलीं मढीं आहेत, असें जग म्हणू लागेल.] म्हणे ना कां जग ! जगाची पर्वा मुर्दाड भिक्षुकशाहीला काय होय ?

**महाभारत आणि रामायण** :––हिन्दूंच्या वाङ्मयांत या दोन महाकाव्यग्रंथांचें फार महत्व आहे. त्यांतील काव्यानें साऱ्या जगाला मोहनी घातलेली आहे. त्यांतील कित्येक प्रसंग ऐतिहासिक दृष्ट्या बिनमोल आहेत, तर कित्येक विचारक्रान्ति करण्याच्या कामीं जगांतल्या कोणत्याहि स्फूर्तिदायक वाङ्मयास हार जाणार नाहींत, असे आहेत. परंतु या दोनहि ग्रंथांवर भिक्षुकशाहीचा हात फिरलेला असल्यामुळें त्यांचे स्वरूप सांप्रत अत्यंत विकृत व भ्रष्ट झालेलें आहे. रामायण आणि महाभारत, या दोन ग्रंथांचें यावज्जन्म परिशीलन करणारे विद्यमान चिंतामणराव वैद्य –ज्यांना महाराष्ट्रानें भारताचार्य ही सार्थ पदवी देण्यांत आपल्या रसिकतेचा व गुणग्राहकतेचा अत्यंत सदुपयोग केलेला आहे, –यांचे (१) Maharashtra-A Criticism, (२) Epic India, (३) Ramayan-A Raiddle आणि अलीकडे मराठींत प्रसिद्ध झालेला महाभारताचा उप संहार हे ग्रंथ वाचकांनी मुद्दाम वाचावे, अशी शिफारस आहे. त्यावरून या दोन महाग्रंथांतल्या घालघुसडीचा इतिहास चांगला कळून येईल. येथें या ग्रथांची छाननी करावयाची नसून त्यांत भिक्षुकशाही मतांचे कांटेसराटे कसेकसे घुसडले गेले आहेत, याची अगदी थोडक्यांत माहिती द्यावयाची आहे. महाभारताचें प्राचीन शुद्ध स्वरूप कसें असावें व त्यांत मागाहूनची घालघुसड किती असावी याचें संशोधन करण्याचें जगड्व्याळ कार्य श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी सं. औंध यांच्या प्रोत्साहनानें

## भांडारकर रिसर्च इन्स्टिट्यूट पुणे

या संस्थेनें हातीं घेतलें आहे, ही फार प्रशंसनीय गोष्ट होय. तिकडे पाश्चात्य देशांतहि कित्येक ऋषितुल्य विद्वान् संशोधक या ग्रंथांचें कस्सून संशोधन करीत आहेत. वर सांगितलेले हिन्दू फिरस्ते मि. चतरजी नुकतेच १० जुलई १९२० रोजी स्वीडन देशांतल्या मालमो (Malmo) गांवीं गेले असतां, त्यांची व प्रो. डैन्स ॲन्डरसन नामक एका महर्षीची गांठ पडली होती. त्या मुलाकतीची हकीकत इ. रॅ. सो. च्या फेब्रुवारी १९२१ च्या अंकांत आलेली आहे. महाभारताबद्दल संभाषण चाललें असतां प्रोफेसर ॲन्डर्सन म्हणाले कीं '' महाभारत ग्रंथ घुसडाघुसडीनें मनस्वीं सडलेला आहे. हिन्दुस्थानच्या हिन्दु लोकांचीं मनेंच चिकित्सक (Critical) नाहींत. ते चिकित्सकपणाचा डौल आणतात, परंतु धर्ममताचा पगडा बसतांच त्यांच्या मनांवर ढगारें येतात आणि ती तात्पुरती चिकित्सक वृत्ति तात्काळ कलंडते. व्यास ही एक नुसती काल्पनिक व्यक्ति आहे ; परंतु भोळसट हिन्दु मनोवृत्तीला तो कोणी खरोखरच होऊन गेला असेल असें वाटतें.''

महाभारत ग्रंथ अनेकांच्या हाती लागल्यामुळे तो मूळग्रंथापेक्षा मनस्वी वाढून फुगला आहे, याबद्दल पाश्चात्य व पौर्वात्य संशोधकांचें अगदीं एकमत आहे. या निरनिराळ्या आवृत्त्यांचा काळ निश्चित करण्याचें येथें प्रयोजन नाही. परंतु एवढी गोष्ट खरी कीं बौद्धधर्माचा पाडाव करण्यासाठीं भिक्षुकशाही ब्राम्हणांनी जेव्हां कंबरा बांधल्या, तेव्हांपासून महाभारताप्रमाणेंच रामायणादि इतर सर्व ग्रंथांतल्या क्षत्रिय महात्म्याला कायमचा चाट मिळून त्या ठिकाणी भिक्षुकी महात्म्याच्या खऱ्या खोट्या गोष्टी घुसटण्याचा धूमधडाका सुरूं झाला. महाभारत आणि रामायण पूर्वी क्षत्रियांच्याच महात्म्याचे इतिहास ग्रंथ होते. ते भिक्षूकशाहीजमा करून त्यांचा नायनाट करणें भिक्षुकशाहींला शक्य नव्हतें ; इतका त्यांचा प्रसार व मान्यता दांडगी होती. अर्थात् धार्मिक आणि भौद्धिक बाबतींत इतर सर्व लोकांपेक्षा भिक्षुकी वर्चस्वाचे देव्हारे माजविण्याचा कृतसंकल्प केलेल्या भिक्षुकशाहीनें लोकांचीं मनें भिक्षुकी सांच्यांत दडपून भिक्षुकी सत्तेला मान वांकविण्याइतकी कमजोर व बेअक्कल बनतील, अशा धोरणावरच्या काल्पनिक कथोपकथांच्या रद्दीनें ते ग्रंथ फुगविण्याचा सपाटा सुरूं केला व त्यांत त्यांना परशुरामाच्या कृपेनें पूर्ण यश आलें. प्राचीन क्षत्रिय ग्रंथांना भटाळण्याचा (brahmanize) प्रयत्न करण्यांत बुद्धधर्मांच्या उदार मतवादाच्या मुस्कटदाची हाहि एक मुख्य हेतू होता, हें लक्षांत असावें. **मॉनिअर विल्यम्स**च्या मताप्रमाणे महाभारत आणि रामायण हे दोन ग्रंथ भटाळून सोडण्याचा उपक्रम इ. श. पूर्व ४ च्या शतकांत सुरूं झाला. या कामीं जे कवि पुढें सरसावले ते सर्व भिक्षुकशाहीच्या अड्ड्यांतले इरसाल ब्राम्हण होते. ही भिक्षुकी ग्रंथरचना एकदम एकाच भिक्षुकाच्या हातून पार पडलेली नाही ; क्षत्रियेतिहासाला भटाळण्याची ही राष्ट्रीय चळवळ पुढें कित्येक शतकें एकसारखी चालूंच होती. ज्या ज्या श्लोकांत क्षत्रियांचा पराक्रम अत्यंत स्पष्ट व उघडाउघड व्यक्त होत होता. अशा श्लोकांत काव्यकल्पनात्मक कूटें ढकलून, त्यावर असंभवनीय चमत्कार कल्पित गोष्टी इत्यादिकांची चुरचुरीत फोडणी देऊन, त्या श्लोकांतली अर्थस्पष्टता विकृत व गढूळ करून सोडली. याचीं एकदोन ठळक उदाहरणें देतों. रामायणांत दशरथ राजानें ध्वनिशरसंधानानें धडधडीत एका ब्राम्हणपुत्राचा वध केला ; ब्राम्हणवधाबद्दल मग तो कळत असो वा नकळत असो—मनुस्मृतींत भयंकर शिक्षा ठोठावलेली आहे ; परंतु ' मी वानप्रस्थाचा पुत्र असलों तरी ब्राम्हण नव्हें ! ' अशी त्या मरत्या माणसांची लटकीच जबानी पुढें करून दशरथाची नुसत्या पुत्रशोकाच्या शापावर पुराणकारांनी मोकळीक केली आहे. रामायणांत श्रीरामचंद्रांने परशुरामाचा धनुर्युद्धांत पार धुव्वा उडवून त्याचा पराभव केला, ही हकीकत नीट काळजीपूर्वक वाचली म्हणजे निश्चित निर्णयाचा कसलाहि थांग लागूं नये म्हणून त्या गोष्टीवर नांना प्रकारच्या कविकल्पनांचीं कांटेरी जाळीं पुराणकारांनीं यथास्थित पसरून ठेवलेलीं आढळतील. महाभारतांतील वनपर्व व शांतिपर्वात भीष्मानेंहि परशुरामाचा जो पराभव केला आहे, तेथेंसुद्धां क्षात्रतेजाचा वरचढपणा सिद्ध होऊं नये म्हणून आयत्या वेळीं कांहीं ऋषीमुनींना समरभूमीवर मध्यस्थीकरितां आणले आहे आणि त्यांच्याकडून

**तूं छान लढलास व तूंहि छान लढलास**

अशा नुसत्या तोंडपुजेपणाच्या सारवासारवीवर या भीष्मपरशुराम युद्धाचा खरा रिपोर्ट पुराणकारांनीं दाबून टाकला आहे. परशुरामाच्या इतिहासावर अवतारीपणाचें जें पांघरुण घातलें

आहे, त्याच्याखांलीं क्षत्रियांच्या पराक्रमाचा बराचसा खरा इतिहास दडपला गेला असावा, अशी कै. रमेशचंद्र दत्तांनीं शंका व्यक्त केली आहे, ती काहीं अगदीच खोटी नव्हे. वामनावतारांचें बीज पुराणकारांनीं ऋग्वेदाच्या कोठारांतून आणून त्याचें पौराणिक कल्पनेशीं कलम करून त्यांतूनसुद्धां क्षत्रियांच्या तेजोभंगाची एक चुरचुरीत कादंबरी निर्माण करायला सोडली नाहीं. ऋग्वेद मण्डळ, अ. ४ सूक्त २२ येथें खालील ऋचा आढळतात :—

> अतो देवा अवन्तु नो यतो विष्णुर्विचक्रमे । पृथिव्याः सुप्त धामभिः १६
> इदं विष्णुर्विचक्रमे त्रेधा नि दधे पदम् । समूळहमस्य पांसुरे १७
> त्रीणि पदा वि चक्रमे विष्णुर्गोपा अदाभ्यः । अतो धर्माणि धारयन् १८

या एवढ्या बारीकशा कविकल्पनेच्या कणावर क्षत्रिय बलीच्या अधःपाताची आणि ब्राह्मण वामनाच्या श्रेष्ठतेची केवढी टोलेजंग इमारत भिक्षुकशाही पुराणकारांनी उठवून दिली पहा । वशिष्ठ विश्वामित्राच्या झगड्याची कादंबरी याच भिक्षुकी उद्देशांतून जन्म पावली आहे. *ब्राह्मणांच्या अनुलंध्य वर्चस्वाचे स्तोम माजविण्याच्या या भिक्षुकी प्रवृत्तीची अक्कल अखेर तर भृगुनामक ब्राह्मणाकडून

## विष्णू भगवंताच्या छाताडावर लाथ

मारण्यापर्यंत पाघळली ! या भिकारड्या कल्पित गोष्टींतले नवलांतलें नवल म्हणजे परमेश्वराच्या छाताडावर भिक्षुकशाहीच्या इरसाल ब्राह्मणानें लाथ मारली हे नव्हे, क्षीरसागरांत शेषासनावर लोळत पडणाऱ्या श्रीविष्णूनें ती लाथ एखाद्या अजागळ भंगडाप्रमाणें निमूटपणानें सहन केली हेंहि नव्हे, तर त्या लाथेचें चिन्ह जें वत्सलांच्छन तें विष्णूनें मोठ्या गौरवानें व्हिक्टोरिया क्रॉसप्रमाणें अगदी आतांपर्यंत उघड्या छातीवर धारण केलें आहे, हें होय. परमेश्वराच्या नशिबीं इतका उघडाउघड बेशरमपणा व नामर्दपणा बांधणाऱ्या कवीच्या भ्रष्ट मनः स्थितीची धन्य असो, यापलीकडे अधिक कोण काय म्हणूं शकेल ? महाभारत रामायण व पुराणें प्रसविणाऱ्या शहाण्यांनीं क्षत्रियांवर आणखी एक उपकार करून ठेवला आहे कीं मोठमोठ्या प्राचीन क्षत्रिय वंशांच्या मूळपुरुषत्वाचे धागे अचूक ब्राह्मणी ऋषीमुनींच्या पोटांतल्या आंतड्यांना नेऊन भिडविले आहेत. याचे कारण एवढेंच कीं एखाद्या वेळीं क्षात्रपराक्रमाचा इतिहास जपानी बाहुली प्रमाणें कलवंडून दडपितां आला नाहींच, आणि दुर्देवानें क्षात्रपराक्रमाची स्तुति करण्याचा कुप्रसंग भिक्षुकी लेखणीवर आलाच तर " मग त्यांत काय झालें ? अहो बोलून चालून आद्यबीज तर आम्हा ब्राह्मणांचेंच ना ?" असा क्षत्रियांना अपमानास्पद शेरा मारून मोकळे! बरें, विचारक्षमतेच्या दृष्टीने तरी क्षत्रियांना कांही मार्क शिल्लक ठेविले आहेत काय? मुळींच नाहींत. क्षत्रियराजे म्हणजे भिक्षुकशाहीच्या हातचीं मेणाची

---

* The episode which relates at full Vishvamitra's quarrel with the great saint Vashishtha, and the success of the former, though a kshatriya, in elevating himself to a Brahman's rank, introduces the wildest hyperbole, with the manifest object of investing the position of a Brahman with unapproachable grandeur, and deterring others from attempts in the same direction.

बाहुलीं. सारे भिक्षुकशाहीच्या विचार-पाणपोईवर ओंजळ लावून पाणी पिणारे. दशरथाचा दरबार घ्या, धर्मराजाचा घ्या, धृतराष्ट्राचा घ्या, जरासंघाचा घ्या, नाहींतर परिक्षितीचा घ्या, सर्वांच्या सभोंवार भिक्षुकी सल्लामसलतगारांचा टोलेजंग अड्डा कंबरखुंट बांधून बसलेला ठिकठिकाणीं वर्णन केलेला आढळतो. अकलेच्या साऱ्या बँकांचे डायरेक्टर काय ते भिक्षुकशाही ब्राह्मण. त्यांच्याशिवाय राजाच्या नित्यनैमित्तिक कर्माचें सुद्धां पान हालायचें नाहीं. सारांश, महाभारतादि भिक्षुकी ग्रंथांतले ब्राह्मण व क्षत्रिय यांचे परस्पर संबंध पाहिले, तर क्षत्रिय म्हणजे कोठच्या झाडाचा पाला आणि ब्राह्मण म्हणजे प्रत्यक्ष ईश्वराच्याहि छाताडावर लाथ मारणारे शापादपि शरादपि असे सृष्टिविधात्या ब्रह्मदेवाचे बाप. रामायण आणि महाभारत या दोन ग्रंथांतील पात्रें काल्पनीक किंवा खरीं हा वाद जरी सोडला, तरी ऐतिहासिक दृष्ट्या या दोन महाग्रंथांची भिक्षुकशाहीनें पार नासाडी केलेली आहे. अशाहि परिस्थितींत या ग्रंथांच्या रचनाकालच्या हिन्दुसमाजाच्या चित्राची थोडी फार कल्पना करता येणें अशक्याच आहे, असें मात्र नव्हे. नुसत्या सामाजिक चित्राचाच जरी विचार केला तरी त्यावरून.

## महाभारतानंतर रामायण

बऱ्याच काळानें रचिलें गेलें असावें असें तेव्हांच दिसून येतें. महाभारतांतली क्षत्रियांच्या क्षात्रतेजाची उरलीसुरली तडफसुद्धां रामायणांतल्या क्षत्रियांत दिसून येत नाहीं. जिकडे पहावें तिकडे पुळपुळीत आणि मुळमुळीत कारभार. राजापासून रंकापर्यंत प्रत्येक स्त्रीपुरुष भिक्षुकशाहीचा बंदा मिंधा गुलाम. जनकच पहा ना. औपनिषदिक युगांतली त्याची आत्मविश्वासाची तडफ, आत्मशक्तीच्या प्रचीतीची बिनमुर्वत प्रौढी आणि क्षात्रतेजाच्या वर्चस्वाची त्याची बेगुमान मर्दुमकी, ही सारीं रामायणांत पार मावळून जाऊन, तेथें तो भिक्षुकशाहीच्या गुब्बगुब्बूला मान हालविणारा एक शेळपट नंदीबैल बनलेला दिसतो. रामाचाहि प्रकार तोच. परशुरामाशीं युद्ध करतांना त्याचा तो अक्षात्र विनय काय, त्याच्या त्या अनार्यजुष्ट सबबी काय, साराच प्रकार नामर्दपणाचा! रामायण अथपासून इतिपर्यंत वाचून खाली ठेवलें की, हिन्दुस्थानांतल्या हिन्दूंचे शौर्ययुग संपून गुलामगिरी सुरू झाली व गंगानदीच्या प्रदेशांत शेकडों वर्षे वसाहत करून राहिल्यामुळें हिन्दु कार्याच्या प्राचीन आर्यतेजाचा ऱ्हास झाला, तो या रामायणरचना काळींच झाला, असें वाटल्याशिवाय रहात नाही. महाभारतांतलीं कांही कांही पात्रे हिरवट खरीं पण त्यांच्या दणकटपणांचा नुसता वाससुद्धां रामायणांत येत नाही. महाभारतांतल्या युद्धांतली चिकाटी, त्वेष, व कडवेपणा तर रामायणांतल्या रामरावणयुद्धप्रसंगींसुद्धा औषधाला मिळत नाहीं. कर्ण, दुर्योधन, भीमासारख्या पौरुष पात्राचा जागताजोग स्वाभिमान व निश्चयाची मुसंडी त्यांत तिळमात्र नाहीं. कोठें ती मोठमोठ्या मुत्सद्याच्या बुद्धिमत्तेला तोंडबेड्या ठोकणारी आणि कीचकासारख्या पाजी मनुष्याच्या धसळामुसळीला दाद न देतां, त्याचा कपाळमोक्ष करणारी द्रौपदी, आणि कोठें.

## रामाच्या चिंतनानें मी राम बनलें

अशा कवित्वावर समाधान मानून मुळमुळ रडणारी सीता! जमीन अस्मानाचा फरक !! रामायणांतलीं पुरुषपात्रें म्हणजे शुद्ध मेंग्या मेणाची. रामानें रडत रडत म्हणायचें " बाळा

लक्षुमणा, चार पैसे म्हणजे एक आणा'' आणि लक्ष्मणानें म्हणायचें ''होय दादा. '' रामायणांतल्या लढायांतले लढवय्यांचें वर्तन शुद्ध यांत्रिक आणि जुलमाच्या रामरामासारखें दिसतें त्यात महाभारतीय योध्यांची युद्धप्रियतेची लालसा, मारूं किंवा मरूंची तडफ अथवा निश्चयाचा दणदणाट मुळीच नाही. रामायणकाळीं हिन्दुसमाजावर भिक्षुकशाहीचा जबरदस्त पगडा बसलेला दिसतो. हकनाहक भिक्षुकशाहीचे गुलाम बनलेल्या व भिक्षुकी मध्यस्थीनें स्वतःसह पूर्वीच्या व पुढच्या बेचाळीस दुणें चौऱ्यांशी पिढ्यांचा उद्धार करूं पहाणाऱ्या शहाण्यांपेक्षा रामायणांतले स्त्रीपुरुष फारसे सुधारलेले दिसत नाहीत. येथून भिक्षुकशाहीच्या गुलामगिरीचा पाटावरवंटा थेट इसवी शकाच्या २० व्या शतकापर्यंत बिनबोभाट घडघडत येऊन, श्रुतिस्मृतिपुराणोक्त मंत्रांखाली आजला सारी हिन्दुजनता भिक्षुकांची दास बनली आहे. लोकशाही स्थापना करण्याचीं पुराणें सागणाऱ्यांना स्वतःच्या डोळ्यांत वाढलेलीं हीं भिक्षुकशाहीप्रणित बौद्धिक गुलामगिरीचीं मुसळे दिसतात किंवा नाही, हें कांहीं सांगवत नाहीं. परंतु भिक्षुकशाहीचीं पाळेमुळें खणून काढून, प्रत्येक हिन्दुमात्रानें आपलें आत्मिक स्वातंत्र्य जाहीर केल्याशिवाय लोकशाहीचें बीज या भरतभूमीत जीव धरणार नाहीं, एवढा आमचा नम्र परंतु स्पष्ट इषारा येथे नमूद करून ठेवलेला बरा. भविष्यकाळ आपला इतिहास लिहिण्यास समर्थ आहेच!

[२४] भिक्षुकशाहीच्या बण्डाचा इतिहास इतका सर्वव्यापी आणि त्याच्या मायावी बाजारांतल्या धामधुमीचे धागेदोरे इतक्या दूरदूरवर पसरलेले आहेत, कीं त्या सर्वांचें समर्पक उदघाटन करूं म्हटलें तरी प्रस्तुत ग्रंथाएवढे आणखी दहा ग्रंथ लिहितां येतील. परंतु एवढा उपद्व्याप करण्याची आवश्यकता नाहीं. कोर्टापुढे येणाऱ्या साक्षीदाराला एकाच मुद्यावर असत्यवादी ठरविल्यानंतर त्यांच्या साक्षींतल्या इतर सटरफटर चऱ्हाटाकडे लक्ष देण्याचें जसें कारणच उरत नाही, त्याप्रमाणे भिक्षुकशाहीच्या बण्डाचा गुप्त खोडसाळपणा इतक्या स्पष्ट रीतीनें आपल्या दृष्टीला पडतांच, त्यांच्या इतर कसल्याहि बचावाच्या पुराव्याकडे लक्ष देण्याची मुळींच अवश्यकता नाहीं वरवर विचार करणारांना असें वाटण्याचा संभव आहे की भिक्षुकशाहीनें फक्त धार्मिक बाबतीतच काय ती बंडाळी केलेली आहे; परंतु आतांपर्यंत सिद्ध केलेल्या अनेक मुद्यांच्या आधारानें या भिक्षुकी बण्डाचा छडा लावण्याचा कोणी यत्न केल्यास, या बण्डाच्या पाळ्यामुळ्या आम्हां हिन्दुजनांच्या चारित्र्याच्या सर्व भागांत इतक्या खोलवर जाऊन भिडलेल्या आहेत, कीं आमच्या सांप्रतच्या शोकजनक अवनतीबद्दल भिक्षुकशाहीचीं कृष्ण कृत्येंच सर्वस्वीं जबाबदार आहेत, असें सत्याच्या साक्षीनें त्यास स्पष्ट कबूलच करणें भाग पडेल. संप्रत हिन्दुस्थानावर नवयुगाची प्रभात उगवली आहे व तिच्या तेजानें आमच्या अनेक राष्ट्रीय गुणदोषाचें स्वरुप स्पष्ट दृश्यमान् होऊं लागले आहे. उत्क्रांतीच्या गार वाऱ्यानें आमची विचारशक्ति जागृत होऊन ती दाही दिशाकडे टौकारून पाहूं लागली आहे. विवेक दृष्टीवर बाजलेली भोळसट अंधःश्रद्धेचीं चिपडें बुद्धिप्रधान तात्विक प्रवृत्तीच्या शुद्ध जलानें धुवून काढून आत्मोन्नतीच्या द्वारे राष्ट्रोन्नति चटकन् कशी साधतां येईल, याचा मार्ग शोधण्याकडे राष्ट्रातील प्रत्येक व्यक्तिमात्राचें लक्ष लागलें आहे.

## मराठ्यांचा भगवा झेंडा

अटकेवर नेऊन, भीमथडीच्या घोड्यांना काबूल कंदाहारचें पाणी पाजण्याच्या आकुंचित बातबेताची क्षेत्रमर्यादा आजला अवाढव्य वाढून, हिंदुस्थानाच्या खऱ्याखुऱ्या एकराष्ट्रीयत्वाचे हिरवेतांबडे राष्ट्रीय निशाण लंडन पॅरीस अमेरिकेच्याहि मस्तकावर नाचवून सारा पृथ्वीचा गोल हिन्दु–आर्यांच्या संस्कृतीच्या मगरमिठीत प्रेमानें कवटाळण्याच्या उदात्त महात्वाकांक्षेनें आजला साऱ्या हिन्दुस्थानाचें सात्विक अंतःकरण स्फूर्तीनें फुरफुरूं लागलें आहे. हें कार्य अर्थात् लिहिण्याबोलण्याइतकें सोपें नव्हें ! जगाला बंधमुक्त करूं पहाणाऱ्यांनी प्रथम स्वतः बंधमुक्त होऊन, स्वकीयांच्या बंधविमोचनाचें कार्य पूर्ण यशस्वी करून दाखविले पाहिजे. स्वातंत्र्याची अपेक्षा करण्यापूर्वी स्वतःमुळे इतर कोणाच्याहि स्वातंत्र्यावर घाला पडत असेल, अगर त्याच्या गुलामगिरीच्या बेड्या अधिकाधिक दृढ होत असतील, तर त्यांचे बंधविमोचन प्रथम केल्याशिवाय नुसत्या अपेक्षेच्या हांकाआरोळ्यांना स्वातंत्र्यदेवता कधीहि भाळणार नाहीं. सामाजिक, धार्मिक व राजकीय अत्याचाराच्या जुलमी रक्तानें हिन्दुस्थानाचें तोंड सध्या इतकें माखलेले आहे की, अशा त्या गलिच्छ तोंडानें त्याला

## स्वयंनिर्णयाचा गायत्रीमंत्र

म्हणण्याचा अधिकारच पोहचत नाहीं. तोंडावर लिडबिडलेले सामाजिक जुलमाचें खुनशी रक्त पुसण्याचा प्रामाणिक यत्न न करितां, हिंदुजन तसेच धिटाईनें हा गायत्रीमंत्र जपूं लागतील, तर त्या मंत्राच्या उद्दिष्ट क्रियेपेक्षां त्याची प्रतिक्रियाच त्यांच्या समूळ उच्चाटनास कारणीभूत झाल्याशिवाय रहाणार नाहीं बौद्धिक गुलामगिरीनें माणसांसारख्या माणसांना पशूंपेक्षाहि पशू बनविण्याचा व्यापार बिनधोक चालविण्याऱ्या भिक्षुकशाहीच्या सामाजिक व धार्मिक अवडंबराचें जोंपर्यंत आमूलाग्र उच्चाटन होणार नाहीं, तोंपर्यंत या हिन्दु राष्ट्रांत स्वातंत्र्याचें बीज कधींच जीव धरणार नाहीं हिन्दु राष्ट्रातल्या अनेक आत्मघातकी पातकांत (१) अस्पृश्यांवरील सामाजिक व धार्मिक जुलूम आणि (२) स्त्रीवर्गाची गुलामगिरी ही दोन महापातकें प्रमुख होता. राष्ट्राच्या पूर्ण अधःपाताचें मर्म शोधकाला येथेंच सांपडतें. या मर्माचें उच्चाटन करण्यासाठी गेल्या ५० वर्षांत बराच विचारविनिमय व आचारक्रान्ति होत आली. परंतु प्रगतीचें पाऊल मात्र जेथल्या तेथेंच. विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं स्वयंनिर्णयाच्या जोरावर लोकशाही स्वराज्याला आम्ही सर्वथैव पात्र आहोंत असे जोरजोरानें ओरडून सांगणाऱ्या हिन्दु राष्ट्रांत लोकशाहीच्या व स्वयंनिर्णयाच्या मूळ तत्वालाच कुपथ्य करणारीं ही दोन राष्ट्रीय महापातकें पूर्वीप्रमाणे होती तशींच सीलबंद राहिलेली आहेत ; व तीं तशींच ठेवण्याचे गुप्त प्रयत्न भिक्षुकशाही करीत आहे. कदाचित लोकशाहीच्या डोलाऱ्याची खरीखोटी घटस्थापना यथासांग झाल्यावर फुरसुद सांपडली-लहर लागलीतर या महापातकांचा केरकचरा वरवर झाडून साफ करण्याचा "राष्ट्रीय" प्राण्यांचा विचार असल्यास नकळे! परंतु **जोंपर्यंत आमच्या हिन्दुसमाजांत अस्पृश्य व अवनत बांधवांची एवढी मोठी अगणित संख्या आहे व ती दिवसेंदिवस झपाट्यानें वाढत आहे, तोंपर्यंत हिन्दुस्थानला राष्ट्रीय भाग्याचें दिवस कधींहि येणार नाहींत** हा लाला लजपतराय यांचा स्पष्टोक्तीचा इषारा.

## चरकाच्या सुतानें स्वराज्य

मिळवू पहाणाऱ्यांनी वेळीच लक्षांत घेतलेला बरा. आजच्या चालू घटकेला भिक्षुकशाहीच्या स्मृतिपुराणोक्त चिथावणीमुळें हिन्दु म्हणविणारांकडून अस्पृश्य व अवनत हिन्दुबांधवांची जी मानसिक, बौद्धिक व आत्मिक मुस्कटदाबी करण्यांत येत असते, ती उघड्या डोळ्यांनीं पहाणाराला, हिन्दुस्थानच्या स्वराज्य प्राप्तीची मुदत सात महिन्यांवरून सात शतकांवर न्यावी लागेल. गुलामगिरी--मग ती शारिरीक असो वा मानसिक असो ती एक महारोगासारखी व्याधि आहे. या व्याधीत खितपत पडणाऱ्या राष्ट्रांना व समाजांना आपल्या दुष्कर्मांची घाणच येत नाहीं. इतर अवयवांप्रमाणेच त्यांची विवेकबुद्धिसुद्धां बधिर आणि आंधळी होते. त्यातल्या त्यांत बौद्धिक गुलामगिरी ही दृश्य नसल्यामुळे तींत बुजबुजणाऱ्या अनेक किड्यांचा सुळसुळाट गुलामी मनोवृत्तीच्या माणसांना भासतहि नाहीं. अस्पृश्यतेसारख्या महाभयंकर पातकाचें समूळ प्रायश्चित्त न घेतां, त्याला अलग आनीगोंदीखात्यांत जमा करून नुसत्या सुताच्या रहाटाच्या पुण्याईवर राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळवूं पहाणाऱ्यांच्या झटापटींत हें तत्व उत्कृष्ट रीतीनें व्यक्त झालेले पहाण्यांत येतें. गुलामगिरी-मग ती कसलीहि असो-केव्हांहि झाल तरी वाईटच. त्यांतल्या त्यांत मानसिक ऊर्फ बौद्धिक गुलामगिरी अत्यंत चीड आणणारी होय. एखाद्या पानपतावर राष्ट्राच्या तीन लाख बांगड्याऐवजी तीनचोक बारा लाख बांगड्या फुटल्या तर त्याची कोणी भीति बाळगीत नाही ; कारण

## हिंमते मर्दा मदते खुदा

या न्यायानें आज ना उद्यां ' बचेंगे तो और भि लढेंगे ' या दत्ताजी शिंद्याच्या मर्दानी वाणीची सत्यता पटविण्यासाठी तात्पुरतें हतबल झालेल्या राष्ट्राचा अवशिष्ट अंकुर त्या फुटक्या बांगड्याच्या कपरी कपरी गणित सव्याज उसनें फेडून घेतल्याशिवाय रहाणार नाही. परंतु मानवजातीच्या ३/४ भागाला अस्पृश्य नांवाखाली सर्वच बाबतीत गुलाम करून ठेवण्याचें कारस्थान केव्हांना केव्हांतरी प्रतिक्रियेच्या चक्रांत कारस्थानी ईश्वरद्रोह्यांचे पीठ केल्याशिवाय खास सोडणार नाहीं. अस्पृश्योद्धाराचा प्रश्न जितका महत्त्वाचा आहे, तितकाच तो भयंकरहि आहे ; आणि हा प्रश्न सुटल्याशिवाय हिन्दुस्थानाच्या राजकीय आकांक्षांना खऱ्या राष्ट्रीय स्वातंत्र्याची पालवीहि फुटणार नाहीं. अस्पृश्याचा प्रश्न काय किंवा भिक्षुकशाहीच्या बौद्धीक गुलामगिरींत कुझत पडलेल्या सर्व हिन्दुसमाजाचा प्रश्न काय, त्याची नीट वासलान लावली गेली नाही तर परकीय नोकरशाहीच्या घरटांत हिन्दुस्थानाचें पीठ होण्याच्या पूर्वीच स्वदेशी लोकशाहीच्या पहिल्याच घोंटाला राष्ट्राला प्राणघातक ठसका लागून त्यांचे प्राणोत्क्रमण होईल. या गोष्टीं क्षुल्लक आहेत, त्या आपण मागाहून सुधारूं ; सध्यां परकीय सत्तेचें जूं फेंकून देऊं या, मागावून आपली (?) स्वतःची लोकशाही स्थापन झाल्यावर या गोष्टी आपण नीट ठाकठीक बसवूं असले मानभावीपणाचे उद्‌गार काढणाऱ्यांना **डॉ. रविंद्रनाथ टागोर** यांचे खालील विचार आम्ही आहेर करून, हा मुद्दा समाप्त करू डॉक्टर म्हणतात. "आपण हे नीट लक्षांत ठेविलें पाहिजे कीं ज्या दोषी गोष्टी आपण क्षुल्लक समजून त्यांचा प्रसार व प्रचार समाजांत खुशाल चालूं देतों, त्याच गोष्टी राजकीय क्षेत्रांत भयंकर व्यत्यय आणण्यास कारणीभूत होतील.

सामाजिक क्षेत्रांतल्या जुन्या पुराण्या रीतीभातींच्या मढ्यांपुढें डोकें घासण्यास लावणारी आमची जी ऐदी वृत्ति राजकीय क्षेत्रांत आमच्या सभोंवार बळकट तटबंदीच्या मोठमोठ्या तुरुंगवजा भिंती उभारून आम्हांला गिरफदार करायला मुळींच सोडणार नाहीं. ज्या संकुचित अनुदार प्रवृत्तीनें मानवी समाजाचा बराचसा मोठा भाग नीचपणाच्या निर्दय जोंखडाखालीं दडपून टांकण्यास आम्ही शक्त झालों, तीच अनुदार प्रवृत्ती राजकीय क्षेत्रांत अन्यायी जुलमांचा धांगडधिंगा अधिक जोरानें घालण्यास खात्रीनें बेफाम बनल्याशिवाय राहणार नाही. (पृ. १२३) .... आमचे सामाजिक निर्बंध सध्यां सुद्धा जुलमी आहेत, इतके की त्यांच्यामुळे माणसें भ्याड आणि नामर्द बनत आहेत. साधारण अन्नव्यवहाराची गोष्ट ती काय ? पण त्या बाबतींतल्या मतविरोधामुळे आम्ही आमच्याच असंख्य बांधवांचा जीव अगदी नकोसा करून सोडला आहे. ज्या सामाजिक संवयीमुळे आम्हांला इतकाही मतविरोध सहन होत नाही, तीच संवय राजकीय घटनेच्या बाबतींत अधिक दृष्टी बनेल व दडपशाहीचे नवे नवे उपाय शोधून काढून मानवी समाजाच्या जिवंतपणाची साक्ष पटविणाऱ्या प्रत्येक नवमतवादाच्या चिंध्या उडविण्यास त्या उपायांची जुलमी इंजिनें सारखी चालूं ठेवील, यांत संशय नाही. आणि जुलूम सुरूं झाला की त्याच्या मागोमागच ढोंगीपणा व खोटें कर्म या दोन गोष्टींनी राजकीय जीवन सडलेंच जाईल. अरेरे ! नुसतें स्वातंत्र्य हें नांवच इतकें मौलवान आहे काय की त्याच्यासाठी आम्ही आपल्या नैतिक स्वातंत्र्यावरसुद्धां निखारे ठेवावे ? (पृ. १२४.).... या जहाल लोकांच्या ध्येयांत पाश्चात्य इतिहासाचा मसाला पडलेला आहे. हिंदुस्थानाच्या (Special problems) विशेष निकडीच्या गोष्टीबद्दल त्यांना मुळीच सहानुभूति नाहीं. आमच्या सामाजिक घटनेंत कांही असे विशिष्ट दोष आहेत कीं त्यामुळें आम्ही हिन्दुजन परक्यांशी तोंड देण्याच्या बाबतींत कमकुवत बनलेले आहोत, ही ढोबळ व सिद्ध गोष्टसुद्धां त्यांच्या गळी उतरत नाही.'' (डॉ. टागोरकृत नॅशनॅलिझम).

* * * *

[२५] आता एकच मुद्दा उरला, परंतु तो इतका महत्त्वाचा आहे की, त्याच्याकरितां एका स्वतंत्र ग्रंथाचीच योजना आम्ही केलेली आहे ; अर्थात् त्याबद्दल येथे मौनच धरणें बरे. भिक्षुकशाहीच्या बण्डाला स्त्रियांच्या अज्ञानभाण्डारांतून बरीच मदत होत असते आणि इतर कसल्याहि प्रयत्नानें या बण्डाला नामशेष सुद्धा उरूं न देण्याच्या चळवळी यशस्वी झाल्या, तरी स्त्रियांच्या परवशतेचा, राष्ट्रदेवतांच्या गुलामगिरीचा, आमच्याच माताभगिनींच्या बौद्धिक अधःपाताचा प्रश्न स्वच्छ सुटल्याशिवाय भिक्षुकशाहीचें बण्डसुद्धां पुनः पुनः उपटल्याशिवाय रहाणार नाही. हें लक्षांत असावें ' जावत्काल हिन्दु समाजांतील स्त्रीवर्ग आम्हां भिक्षुकांच्या भजनी लागलेला आहे व आमच्या जन्मसिद्ध पावित्र्याची महति त्यांच्या अंतःकरणांत भिनलेली आहे, तावत्काल आमच्या भिक्षुकशाहींचे वर्चस्व हाणून पाडण्याचे नकट्या सुधारकांचे यत्न जेहेत्ते फोलच होणार ! ' या भिक्षुकी उद्गारांची सोपपत्तिक फोड **राष्ट्रदेवतांची पायमल्ली** या दुसऱ्या स्वतंत्र ग्रंथांत करण्यासाठी या ग्रंथाची समाप्ति येथेंच करितों. अखेर, ज्या जगदीशाच्या कृपेने व प्रेरणेनें स्पष्टोक्तीचे कांही विचार जनतारूपीं जनार्दनाच्या सेवेला अर्पण करण्याची शक्ति व निर्भयता प्राप्त झाली, त्या परमेश्वराला अनन्य भावाने वंदन करून, वज्रप्रहार ग्रंथमालेच्या दुसऱ्या ग्रंथाकडे वळतों.

# प्रबोधनकार ठाकरे

# समग्र वाङ्‌मय

# खंड पाचवा

कोदण्डाचा टणत्कार

# कोदण्डाचा टणत्कार

अथवा

## भारत इतिहास संशोधक मंडळास

# उलट सलामी.


लेखक व प्रकाशक

केशव सीताराम ठाकरे



वज्रप्रहार ग्रंथमाला कचेरी,

२० मिरांडाची चाळ, दादर, मुंबई-१४.

---

किंमत दीड रुपया

हा ग्रंथ श्री. लक्ष्मणराव भाऊराव कोकाटे यांनीं हनुमान प्रेस, ३०० सदाशिव पेठ, पुणे शहर येथे छापिला आणि श्री. केशव सीताराम ठाकरे यांनीं २० मिरांडाची चाळ, दादर, मुंबई १४, येथे प्रसिद्ध केला.

# अर्पण-पत्रिका.

प्रतिस्पर्ध्यांच्या निंदेला, कारस्थानांना आणि नानाविध
छळांना न जुमानता, धार्मिक व सामाजिक
स्वयंनिर्णयाच्या सक्रीय संदेशानें बहुजन-
समाजाच्या आत्मिक प्रबोधनाचें
चिरंजीव राष्ट्रकार्य करणारे

## प. वा. राजर्षि श्रीशाहू छत्रपति करवीरकर

आणि

आंग्लाईच्या पहिल्या भर अमदानींत चांद्रश्रेणीय कायस्थ
प्रभू समाज आत्मज्ञानपराङ्मुख झाला असतां,
स्वार्थत्यागपूर्वक जुन्या ऐतिहासिक बखरींचा
जीर्णोद्धार करून त्यांच्यांत आत्मज्ञानाची
ज्योत प्रज्वलित करणारे इतिहासपंडित

## प. वा. रायबहादुर भाईसाहेब गुप्ते F. Z. S.

यांच्या दिव्यात्म्याला हा टणत्कार
साष्टांग प्रणिपातपूर्वक

## अर्पण असो !

केशव सीताराम ठाकरे.

# प्रास्ताविक खुलासा.

या पुस्तकाची पहिली आवृत्ति कार्तिक शु. १५ त्रिपुरी पौर्णिमा शके १८४० (ता. १७ नवंबर १९१८) रोजी प्रसिद्ध झाली व अवघ्या एकच महिन्यांत सर्व प्रति खलास झाल्या. तेव्हांपासून आतांपर्यंत मागणीचा जोर सारखा वाढतच आहे. पहिली आवृत्ति इन्फ्लुएंझाची साथ अगदी जोरांत असतांना घाईघाईत दोन छापखान्यांत कशी तरी छापून काढली होती. या द्वितीयावृत्तींत पुष्कळच नवीन मजकूर घालून कित्येक अस्पष्ट विधानें स्पष्ट केलीं आहेत. विशेषतः छत्रपति संभाजीच्या चरित्रावर अगदीं नवीन प्रकाश पाडणारा ऐतिहासिक मजकूर वाचकांना प्रथम याच पुस्तकांत पहावयास मिळत आहे. प्रस्तुतचें पुस्तक प्रथमतः भारत इतिहास संशोधक मंडळास प्रत्युत्तरादाखल म्हणून जरी लिहिलें होतें, तरी विधानें स्पष्ट करतांना घातलेल्या चर्चात्मक मजकुरामुळें, त्याचें एकांगी स्वरूप जाऊन, त्याला एका इतिहास विषयक चिकित्सक निबंधाचें स्वरूप आलें आहे. किंबहुना असेंही म्हणतां येईल कीं, हें पुस्तक म्हणजे ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाचें रहस्य अचुक पटविणारें हॅन्डबुकच होय.

भिक्षुकी कारस्थानामुळें क्रान्तीचक्रांत सर्वस्वाचा होम झाला असतां आणि हुंडाविध्वंसनाच्या चळवळीमुळें आमच्यावर बिथरलेल्या कायस्थ प्रभू निंदकांच्या विरोधाचा जोर भयंकर असतांहि, ही द्वितियावृत्ति लिहून काढण्याइतकी मनाची शांति ज्या भगवान् श्रीकृष्णानें अभंग राखिली, त्याला अनन्य भावें साष्टांग प्रणिपात करून, हा टणत्कार निस्पृह व विवेकी देशबांधवांना विचारक्रांतीकारक होवा, अशी अपेक्षा करून, " शंभर वर्षांपूर्वीचें महाराष्ट्र " अथवा " हिंदवी स्वराज्याचा खून " या ऐतिहासिक ग्रंथाच्या प्रकाशनाकडे वळतों.

सर्वांचा नम्र सेवक,
**केशव सीताराम ठाकरे.**

**वज्रप्रहार ग्रंथमाला.**
२० मिरांडाची चाळ
दादर, मुंबई १४.
श्री शिवजयंती २५ एप्रिल १९२५.

एन ४०२०–२३

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

# कोदण्डाचा टणत्कार

अर्थात्

## पुणें भारत-इतिहास-संशोधक मण्डळास

## उलट सलामी.

लेखकः—केशव सीताराम ठाकरे

प्रहर नमतु चापं प्राक्प्रहार प्रियोऽहम् ।

मयि तु कृतनिधाते किं विदध्या परेण ॥

—महावीरचरित.

### विषय-प्रवेश.

पुणें आणि पेशवाई ! महाराष्ट्राच्या बोकांडीं बसलेलें भूत म्हणजें चित्पावन पेशवाई आणि या भुताचा भूतखाना म्हणजे पुणें !! पेशवाई ओंकारेश्वरावर कधींच गेली असली तरी तिच्या कोळशाच्या वैभवाचीं स्मारकें पुणेंकर चित्पावन आपल्या बुद्धिवैभवांत अझूनहि वरचेवर घटवीत असतात. पुण्यास चाललेल्या नानाविध चळवळी केवळ वर्तमानपत्री डांगोऱ्यांतून ऐकणाऱ्यांना किंवा वरवर पहाणाऱ्या बावळटांना असें वाटतें कीं ही पुणेरी भटमंडळी देशासाठीं अगदीं जीव द्यायला उठलेली आहेत. केवढें त्यांचें गिरसप्पी वक्तृत्त्व, काय त्यांचे शिक्षणप्रयत्न, काय त्यांचीं तीं धडापासरीं साप्ताहिकें, दैनिकें आणि मासिकें, केवढाल्या त्यांच्या राष्ट्रीय संस्था, किती लांबरुंद त्यांचे रिपोर्ट, केवढे मोठमोठे त्यांचे राष्ट्रीय फंड, राष्ट्रीय पुरुष आणि राष्ट्रीय पुतळे ! सगळेंच पेशव्यांच्या पगडीसारखें अचाट आणि अफाट ! एखाद्या विधवा भटणीची घाणेरडी खाणावळ असली तरी तिचें नांव केवढें मोठें अगडबंब !' अखिल भारतीय मानव-जीवन-संरक्षक सार्वजनिक अन्नपूर्णा कल्पतरू सदन.' असल्या मालगाडी वजा नांवाचें

**भारत-इतिहास-संशोधक-मण्डळ**

नांवाचें एक उपद्व्यापी मण्डळ पुण्यास आहे. सगळ्या भारतखंडाचा इतिहास शोधून काढण्याच्या अहमहमिकेच्या काढण्या या मंडळांतल्या उपद्व्याप्यांच्या मानेला लागल्या आहेत. पुण्याच्या चित्पावनी राष्ट्रीय रिवाजानुसार या मण्डळालाहि सार्वजनिकपणाचा मुलामा देण्याची व जगांतल्या सर्व अकलेचा कोठावळेपणा आपल्याकडे घेण्याची उत्पादकांनीं व प्रवर्तकांनीं पुष्कळच खटपट केली असल्यास त्यांत फारसें नवल नाहीं. थोडक्यांत सांगायचें म्हणजे उप्पर तो और बनवाया है, अंदर की बात बम्मन जाने. बाहेरचा दिखाऊ भपका तर आकाशाइतक्या सार्वजनीक व्यापकपणाचा, आंतली घाण म्हणजे केवळ नाकझरी ! या मंडळाचे वार्षिक रिपोर्ट प्रसिद्ध होत असतात. त्यांत मामुली कार्याचा आढावा असल्याशिवाय कांहीं स्वयंप्रतिष्ठित इतिहास-संशोधकबुवांचीं टिपणें टांचणे मोठमोठे लेखहि असतात. या संशोधकसेनेचे गुरुवर्य उर्फ कॅपटन श्री. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे, बी.ए. हे सुप्रसिद्ध एककल्ली गृहस्थ होत. हें

मंडळ सार्वजनीक म्हणवीत असलें तरी त्यांतले कार्यकारी व संशोधन म्हणजे एकजात एकरकमी एका पराचे ब्राह्मण. पुण्याची तर हीच मोठी विशेष आहे. येथील वाटेल ती संस्था किंवा चळवळ घ्या, तिचा गवगवा मात्र मोठ्या सार्वजनिकपणाचा, पण कारभारी पाहिले तर सगळे पेशवे सांप्रदायी ब्राह्मण ! उगाच नांवाला एक दोन बावळट ब्राह्मणेतर असलीं कीं नाटक रंगलें ! एवढी मोठी केसरी-मराठा संस्था. पण भटांशिवाय तिथे कोणाचीच डाळ शिजत नाहीं, पूर्वी शिजली नाहीं, पुढे शिजणें शक्य नाहीं. वांईची प्राज्ञपाठशाळा फक्त निर्भेळ ब्राह्मणांसाठीं, इतर कोणाचाहि तेथें शिरकाव होत नाहीं. पण अखिल महाराष्ट्रीयांनीं या ' लोकोपयोगी ' (?) संस्थेला हमखास मदत करावी म्हणून ' सार्वजनिक ' केसरीकार दरवर्षी किती तरी स्फुटें खरडीत असतात. भा.इ.सं. मंडळांत वाटेल त्यानें यावें असा त्यांचा जाहीरनामाच आहे. पण जेथें मुळांतच भटांचा सुळसुळाट तेथें इतर जातो कोण मरायला ? आणि गेलाच तर या पेशवाई कारभाराच्या पातळ भाजींत त्या बावळटाची दाद तितकीच लागते. खाणावळीच्या आमटींत डाळीच्या पिचकणाची जेवढी आशा, तेवढीच पुणेरी भटांच्या सहकार्यापासून इतरांना आशा.

सदहू मण्डळ कोणत्या परसांतली भाजी हें पहिलीं तीन वर्षे फारसें कोणालाच माहीत नव्हतें. पण लोक जर आपल्याकडे पहात नसले तर आपल्याच घराला आग लावून त्यांचें लक्ष वेधण्याच्या अमानुष युक्तीचा अवलंब करावयाचें ठरवून, मण्डळानें आपल्या चवथ्या वर्षाच्या रिपोर्टांत

## कायस्थ प्रभूंची बदनामी

करणारा श्री. राजवाडे यांचा माथेफिरूपणालाहि लाजविणारा एक लेख प्रसिद्ध केला. हे रिपोर्ट फार महाग किंमतीनें विकले जात असल्यामुळें ते कोणी फारसे घेत नाहींत. अर्थात् हा रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यानंतर बरेच दिवस त्याकडे कोणाचेंच लक्ष गेलें नाहीं. वर्तमानपत्रांतील अभिप्रायांकडे पहावें, तों चालू मन्वंतरांतली ही शक्ति बिनशर्त ब्राह्मणांच्याच हातीं असल्यामुळें, त्या लेखांतल्या हलकट विधानांची वाच्यता कोण कशाला करतो ? इतकेंच नव्हे तर तो लेख मण्डळाच्या वार्षिक संमेलनांत श्री. राजवाडे यांनी मोठ्यानें वाचला, सर्व श्रोत्यांनीं सावधान चित्तानें ऐकला, निवडमंडळानें कोहीनुराप्रमाणें निवडला आणि अखेर तो छापून प्रसिद्धहि झाला. पण कोणी हूं का चूं केलें नाहीं. महाराष्ट्रांतील एका सुसंस्कृत समाजाची हकनाहक बदनामी करणारा लेख इतक्या सर्व पायऱ्या ओलांडून बेधडक बाहेर पडतो आणि मंडळांतल्या अध्यक्षा-पासून तों खालच्या झाडूपर्यंत त्याविषयीं कोणी चकार शब्दहि काढीत नाहीं, या गलधटपणाला काय नांव द्यावें हेंच समजत नाहीं. सध्यांचा काळ धार्मिक किंवा सामाजिक बाबतींत तंटे बखेडे करून, राष्ट्रीय आकांक्षांना विरोध करण्याचा नव्हे, याची आम्हांला पूर्ण जाणीव आहे. इतकेंच नव्हे तर प्राचीन हाडवैरांची गाडलीं गेलेलीं भुतें आपापल्या थडग्यांतून कधींकाळीं पुन्हा बाहेर पडल्यास महाराष्ट्राच्या भवितव्यतेवर त्यांच्या तांडवनृत्याचा केवढा प्राणघातक परिणाम होईल, याचें भेसूर चित्र आम्हांला दिसत नाहीं, अशांतलाहि प्रश्न नव्हे. परंतु राष्ट्रैक्याची सताड पुराणें झोडणारे आमचे पुणेकर चित्पावन देशबंधूच जेव्हां इतिहास संशोधनाच्या ढोंगाखाली चांद्रश्रेणीय कायस्थ प्रभूंवर हा नवीन ग्रामण्याचा हल्ला चढविण्यांत पुढाकार घेतात, तेव्हां हेंच खरें देशाचें दुर्दैव नव्हे काय ? ब्राह्मण समाजांच्या मानाने कायस्थ प्रभु हा अत्यंत अल्प संख्यांक परंतु अत्यंत प्रभावशाली समाज आहे. ब्राह्मणेतर समाजांतल्या शेंकडों जातींच्या लोकसंख्येपुढेंहि हा समाज अगदींच चिमुकला आहे. अल्पसंख्य आहे, चिमुकला आहे, मितभाषी आहे, चित्पावनांप्रमाणें उठल्या सुटल्या उगाच एखाद्या क्षुद्र बाबीची बोंबाबोंब करणारा नव्हे. तरी

देखील बुद्धिमत्तेच्या प्रभावांत तो कोणत्याही महाराष्ट्रीय समाजाला हात धरूं देणारा नव्हे. कायस्थांच्या कलमसमशेरीनेंच शिवछत्रपतींच्या हिंदवी स्वराज्याचा पाया घातला आणि आजहि तिच्या प्रभावाची दहशत सुबुद्धतेची शर्यत जिंकलेल्या चित्पावनांच्या हृदयांत घुसळा घालीत असते. म्हणूनच मंडळाच्या रिपोर्टासारख्या कुंपणाआडून चोरटा गोळीमार त्यांना करावा लागतो. कायस्थ प्रभूंचा बराच इतिहास अझून उजेडांत यावयाचा आहे; म्हणजे, त्यांच्या अस्तित्वाचा शेंडा बुडखासुद्धां उमगणार नाहीं, किंवा हे लोक कोणत्या झाडाचें पाले, कोठून आलें, पूर्वी कोण होते, राक्षस वनचर अनार्य शूद्र होते कीं आणखी कोण होते, हेंहि न समजण्याइतकें ऐतिहासिक साहित्य आज उपलब्ध नाहीं, असा प्रकार मुळींच नाहीं. पण उपलब्ध इतिहास मुळीच लक्षांत न घेतां, एका फाटक्या तुटक्या चिठोऱ्याचा जीर्णोद्धार करण्याच्या सबबीवर, त्यांच्या सर्व धार्मिक, सामाजिक आणि राजकीय संस्कृतीला कवडीमोल ठरविणारा डेमी ८ पेजी संचाचा तब्बल २२ पानी निबंध छापून काढण्याची मंडळाला जी कुप्रेरणा झाली, तिच्या मुळाशीं

## चित्पावन आणि कायस्थ प्रभु

या दोन समाजांतील ऐतिहासिक हाडवैराशिवाय दुसरा कोणताच हेतु संभवत नाहीं, हें पुढील विवेचनावरून स्पष्ट दिसून येईल. अर्थात् प्रस्तुतचा वाद कालमानाप्रमाणें कितीहि विघातक असला, तरी ज्या अर्थी भारत इतिहास-संशोधक मंडळानेंच तो उकरून काढून कायस्थ प्रभू समाजाला एका प्रकारें यादवी युद्धाचें आव्हान केलें आहे, त्या अर्थी

## होऊ द्याच तर दोन हात

असा कोदण्डाचा टणत्कार करून मंडळाच्या सलामीला उलट सलामी देणें आतां आम्हांस अपरिहार्यच आहे. या अनवश्यक वादाचें पिते श्रीयुत राजवाडे हें इतिहास-साहित्य संग्राहक ह्मणून चांगली प्रख्या पावलेलें आहेत. ' मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें ' शोधून तीं संकलींत करण्यांत राजवाडे यांनीं जे परिश्रम केलें व स्वार्थत्यागाची जी परासीमा गांठली, ती महाराष्ट्रांत अक्षरशः अद्वितीय व अत्यंत कौतुकास्पद आहे. आम्ही तर असेंहि म्हणतों कीं श्री. राजवाड्यांचे ' खंड ' जर बाहेर पडले नसते तर महाराष्ट्रेतिहासाच्या क्षेत्रांत खरोखरच ' सर्व अंधार ' पडला असता. राजवाड्यांची ही कामगिरी बहुमोल आहे, इतकेंच नव्हे तर, दुसरा राजवाडे प्रसवायला महाराष्ट्राला आणखी एक दोन शतकांचीहि तपश्चर्या अपुरी पडेल, असें आमचे प्रांजल मत आहे. परंतु राजवाड्यांच्या या बहुमोल कामगिरीचें त्यांच्या चित्पावनी हृदयानें पार मांतरें केलें आहे, असें कष्टानें म्हणावें लागतें. मेंढी दूध देते पण लेंड्यांनीं घाण करते, असलाच हा प्रकार आहे. ते कष्टाळू संग्राहक आहेत, पण प्रामाणिक संशोधक नव्हते. ते जेव्हां संशोधकी घमेंडीनें संग्रहीत कागद पत्रांतील मजकुराची ठरवाठरव करूं लागतात आणि चिकित्सेच्या दिमाखाने विधानांचीं अंडीं उबऊं लागतात, तेव्हां ' मोडतोड तांबापित्तल 'वाल्यानें केमिकल अनालायझरचें काम करण्याचा आंव घालण्यासारखा मूर्खपणा त्यांच्या हांतून घडत असतो. इतिहास-संशोधनाचे कामीं त्यांनीं आजपर्यंत जो खेळखंडोबा केला, कमअस्सल कागदपत्रंना अस्सलपणाचा बाप्तिस्मा देण्यांत जी हातचलाखी दाखविली आणि एखाद्या क्षुल्लक

## वेलांटीच्या आधारानें गोलांटी उडी

मारून, सुतानें स्वर्गाला जाण्याचा कसकसा आणि केव्हां केव्हां उपक्रम केला, त्याची वाच्यता करूं म्हटलें तर निराळाच ' मंडळ-धर्म-दीप ' लिहावा लागेल. अनेक इतर संशोधकांनीं व विविधज्ञानविस्तारादि मासिकांनीं त्यांना वेळच्या वेळीं सप्रमाण प्रत्युत्तरें देऊन त्यांचा चित्पावनी खोडसाळपणा महाराष्ट्राच्या नजरेस आणलाच आहे. खुद्द केसरीनें ९ जून १९१४ च्या अंकांत या राजवाडी माहात्म्याविषयीं काय उद्‌गार काढले आहेत ते पहा:—" मात्र कागदपत्र प्रसिद्ध करण्याच्या कामीं एकसूत्रीपणाच्या अभावाचा दोष त्यांच्या संशोधनाच्या कार्यांत उघड दिसून येतो. तसेंच थोड्या पुराव्याच्या पायावर अनुमानाची भली मोठी इमारत उठविण्याचें धाडस ते पुष्कळ वेळां करितात; आणि प्रतिपक्षावर टीका करण्याच्या भरांत येण्यास त्यांना फारसा वेळ लागत नसून, भरांत आल्यावर त्यासंबंधीं एकांतिक व अवमानकारक अशीं विधानें करण्याचा मोह त्यांना सुटत नाहीं." केसरीचें हें निस्पृह सर्टिफिकीट प्रस्तुतच्या वादाला किती समर्पक लागूं पडतें, याचा वाचकांना यथाक्रम यथाप्रमाण परिचय पुढें होईल. राजवाडे हे संग्राहकाचे संशोधकच बनून राहिले नाहीं, तर अलीकडे त्यांनीं ' समाजशास्त्री ' पद पटकविण्याची जारीनें खटपट चालूं केली आहे. इतिहाससंशोधनाच्या उपद्‌व्यापाला पाठबळ म्हणून समाजशास्त्राध्ययनाचा जो खटाटोप त्यांनीं आरंभिला आहे, त्याच्या सांगतेसाठीं चित्पावनेतर अखिल हिंदुसमाजाच्या

## बीज-क्षेत्र-शुद्धीचें पृथ:करण

त्यांनीं हातीं घेतलें आहे. या उत्कंठेची तळमळ त्यांना लागली असतांनाच, सातारकर महाराजांच्या हतभागी कागदपत्रांच्या गळाठ्यांत त्यांना **कायस्थधर्मदीप** नामक जीर्ण महाग्रंथाचें एक पुडकें हस्तगत झालें. विद्यमान सातारकर महाराज आणि त्यांच्या कारभाऱ्यादि शुंभनिशुंभांची प्रभावळ हाच मुळीं एक मोठा चमत्कारिक गळाठा आहे ! आमची अशी माहिती आहे कीं सातारा रेकार्डमधील कागदपत्रांवर अलीकडे कांही वर्षे चांगली पाळत ठेवण्यांत आलेली असून ते नुसते पहाणारांस किंवा चाळणारांस बऱ्याच वशिल्याच्या तट्टांची पायधरणी करावी लागते ; मग तेथून पुडकीं हस्तगत करण्याची गोष्ट तर निराळीच ! मग राजवाड्यांनाच हें पुडकें कसें मिळालें ? याहि बाबतींत आम्हांला दाट संशय आहे कीं या पुडक्यानें कोणा तरी कारस्थानी प्राण्याचा खिसा थोडा बहुत गरम झाल्याशिवाय तें गळाठ्यांतून बाहेर निसटलें नसावें. राजवाडे हे पूर्वीप्रमाणें नुसते संग्राहकच असते, तर त्यांनीं या पुडक्यांतील मजकूर जशाचा तसा छापून ते मोकळे झाले असते. पण ते आतां बनले आहेत समाजशास्त्री. ज्या कायस्थ ज्ञातीबद्दल शब्दाच्या व्युत्पत्त्या ठरविण्यात ' कायस्थ इति लघ्वी मात्रा ' इत्यादी नाट्यवचनांचा देखिल त्यांनीं पुरस्कार केला, त्याच ज्ञातीबद्दलचा (?) हा ग्रंथ ! मग काय विचारतां ? या विद्वान समाजशास्त्राचा आनंद गगनांत मावेना. त्यांना चां. का. प्रभूंच्या इतिहासाच्या

## मुळाशीं हात घालण्याची ईर्षा

उत्पन्न झाली, आणि आजपर्यंत अध्ययन करून कमविलेल्या समाजशास्त्रप्राविण्याची कुसोटी कायस्थ प्रभू समाजाच्या धार्मिक, सामाजिक, नैतिक व राजकीय इतिहासाच्या शिळेवर घांसून

पहाण्यास त्यांनीं कंबर कसली. मराठी स्वराज्याच्या स्थिति आणि लय कालांत चित्पावनांना सर्वच बाबतींत पुरून उरणारे असे कायस्थ प्रभूच. त्यांचा धुव्वा उडवितां उडवितांच चित्पावन पेशवे रसातळाला गेले खरे, पण तें कार्य अपुरेंच राहिलें. तें श्री. राजवाडे पूर्ण करणार ! पूर्ण करण्यापुरती विश्वसनीय सामग्री जरी लाभली नाहीं, तरी कायस्थ धर्मदीपाची सबब तरी हातीं पडली. बस झालें काम. एनकेन प्रकारेण या अल्पसंख्य परंतु चित्पावनांना तुल्यबली किंबहुना शिरजोर असणाऱ्या कायस्थ प्रभूंची अनुलोम प्रतिलोमाच्या भट्टींत दामटी वळवून त्यांचा सामाजिक व धार्मिक दर्जा जाहीर रीतीनें पाण्यापेक्षां पातळ केला कीं राजवाड्यांची तळमळ शांत. ' माझा नवरा मेल्याचें दुःख नाहीं, पण तुझ्या कपाळीं कुंकू मला पाहवत नाहीं ' एवढीच सामान्यतः–चित्पावनी हृदयाची तळमळ असते. पण येथेंहि राजवाड्यांनीं आपल्या विशिष्ठ पूर्वापार परंपरेला अनुसरून पिशाच्चाच्या उलट्या पावलांचा क्रम स्वीकारला, असें आमचें मत आहे. कायस्थ प्रभूंच्या घरांतील वांसे मोजण्यास किंवा त्यांच्या उत्पत्तीचे मूळ शोधण्यासाठीं त्यांच्या बीजक्षेत्राची ठरवाठरव करण्यास आपल्या मौल्यवान् समाजशास्त्रप्राविण्याचा व्यय न करतां, वास्तवीक त्यांनीं आपलेंच घर प्रथम नीट पारखून पहावयास हवें होतें. चित्पावनांस

## क्षितिपावन ठरविण्याचा अट्टहास

करणाऱ्या राजवाड्यांनीं आपल्या संशोधक बुद्धीचा दिवा पाजळून आपल्याच ज्ञातीच्या धार्मिक, सामाजिक व राजकीय इतिहासाचें घर नीट तपासून पाहिलें असतें, तर इतिहास–संशोधन आणि समाजशास्त्रप्राविण्य या दोन दिव्य रसायनांचें अंजन पडलेल्या त्यांच्या डोळ्यांना ' क्षितिपावनत्वाचा एखादा शिलालेख किंवा ताम्रपट हस्तगत होण्याचा पुष्कळच संभव होता. शिवाय, हा संभव खराच फलदायी ठरता तर त्यांच्या अध्ययन तपश्चर्येची ही पहिलीच ' भवानी ' कायस्थधर्मदीपाच्या पुण्याईपेक्षां कितीतरी पट अधिक श्रेयस्कर झाली असती. अझूनहि त्यांनीं आपल्या चित्पावन समाजाच्या संस्कृतीला समाजशास्त्राचा कस लाऊन पहावा, अशी आमची त्यांस आग्रहाची विनंती आहे. म्हणजे घारे डोळे, पिंगट केस व भुरी कातडी काय काय बिनमोल शोधांचें वाण राजवाड्यांच्या पदरांत टाकतील तें नीट समजेल, चित्पावनांना कसें बसें ' क्षितिपावन ' बनविणें, ही मयत पेशवाई नोकरशाहीची अपुरी राहिलेली इच्छा श्री. राजवाडे किंवा त्यांचे भगत पूर्ण करतील तरच

## शतसांवत्सरिक श्राद्धाचे पिंड

परलोकवासी पेशव्यांना रुचतील व पचतील, कायस्थ प्रभूंच्या मुळाशीं हात घालून काय फायदा ? दुसऱ्याची कुचेष्टा केल्याशिवाय आपली प्रतिष्ठा वाढत नाहीं, एवढ्याच उद्देशानें त्यांनीं आपल्या दिव्य समाजशास्त्राच्या भट्टींत कायस्थ प्रभूंचा उपलब्ध इतिहास जाळण्याचा उपक्रम केला असेल, तर त्यांनी खुशाल आपला हा क्रम आणखीही असाच पुढें चालूं ठेवावा. कायस्थ प्रभूंचा कोणताहि इतिहास त्यांच्या भट्टीच्या पचनीं पडण्याइतका कमकुवत किंवा निःसत्व झालेला नाहीं.

## पोथीचें पुराण

सातारी गळाठ्यांत राजवाड्यांना जी पोथी सांपडली तिची लांबी रुंदी पृष्ठसंख्या वगैरे माहिती मंडळाच्या रिवाजानुसार देतांना अशी विधानें केली आहेतः—'' (१) एकंदर पानें ५० पैकीं २८ पासून ५० पर्यंत कसरीनी पोंखरून टाकलेली आहेत. (२) छत्रपतींच्या ग्रंथालयांत न्यायाधीश व पंडितराव ह्या पोथीचा उपयोग करीत. [कशावरून ? राजवाडे म्हणतात म्हणून.] (३) कायस्थांचें धर्म, आचार संस्कार शिवाजीच्या कालीं बाळाजी आवजीच्या संमतीनें गागाभट्टानें ठरऊन दिले, ते ह्या पोथींत आहेत.[ राजवाड्यांच्या तर्काप्रमाणें स्वतःच्या जातीला नीच शूद्रत्वाची सनद गागाभट्टाकडून घेणारा बाळाजी तरी पागल असला पाहिजे किंवा हा विद्यमान तार्कीक गंजड असला पाहिजे, या शिवाय तिसरें अनुमानच निघत नाहीं.] तेव्हां आतां कायस्थांच्या आचारासंबंधानें संशयाला व वादाला बिलकूल अवकाश राहिलेला नाहीं. '' हा अखेर निर्णय राजवाड्यांनीं एखाद्या शालजोड्या धर्ममार्तंडाच्या अवसानांत झोकून दिला आहे. अर्ध्या अधिक कसरीनें खाऊन फस्त केलेलें हें राजवाडी पातडें म्हणजे काय ? तर **शिवराजप्रशस्ति व कायस्थ धर्मदीप**. केवढा अचाट हा शोध ! जणूं काय मोठा दुष्प्राप्य वेदच हुडकून काढला ! कायस्थधर्मदीप हा ग्रंथ सन १८७२ सालींच मुंबईच्या ' जगदीश्वर ' शिळाप्रेसांत छापून प्रसिद्ध झाला होता, त्याच्या हजारों प्रति भटांच्या घरोघरी अझूनहि सांपडतात. एवढ्यासाठीं सातारी गळांठ्याचा उकीरडाच फुंकण्याचें कांही प्रयोजन नव्हतें. किंवा पूर्वी हा ग्रंथ प्रसिद्ध झाला तेव्हां कायस्थ प्रभूंच्या सामाजीक व धार्मिक अधिकारांबद्दल कोणी शहाण्यानें एवढें चित्पावनी आकांड तांडवहि केलें नव्हतें. परंतु इतिहासाचे संशोधन करणारा बृहस्पति काय तो मीच आणि मी छापून प्रसिद्ध केल्याशिवाय जुन्या गळाठ्यांना जीर्णोद्धार किंवा धार्मिक वादविवादांचा अखेर निर्णय कधिं लागणेंच शक्य नाहीं हीच ज्यांची घमेंड, त्यांनीं इतर ठिकाणी कोणकोणते जुने पुराणे ग्रंथ छापून प्रसिद्ध होत आहेत किंवा झाले आहेत याची पर्वा कां करावी ? ' कायस्थ धर्मदीप ' हें नांवच पाहून राजवाडे समाधीसुखांत गाढ झाले. शिवकालापासून ब्राह्मणांना पुरून उरणाऱ्या आणि भटी पेशव्यांच्याहि चित्पावनी काव्याला वरचेवर फूटबॉली टांचा हाणणाऱ्या कायस्थप्रभूंचा एकदां झणझणीत पाणउतारा करण्याची त्यांच्या आंगांत विलक्षण शिरशिरी भरली. कायस्थांचें वाटोळें होण्याचा प्रत्येक प्रसंग म्हणजे पुणेरी चित्पावनांना अझूनहि पुत्रजन्मोत्सव वाटत असतो ! अर्थात् या विशिष्ट ग्रहाची कांवीळ फुललेल्या राजवाड्यांच्या डोळ्यांना—

**'' आदौ अस्मिन्ग्रंथे संकरज कायस्थानां धर्मकर्माण्युच्यन्ते । चित्रगुप्तचांद्रसेनीय कायस्थयोश्च धर्मकर्माणि कायस्थप्रदीप ग्रंथे वक्ष्यामि ॥ ''**

[ अर्थः—प्रथमतः या (कायस्थ धर्मदीप) ग्रंथांत संकरज कायस्थांच्या धर्मकर्मांचें कथन करितों. पुढें ' कायस्थ प्रदीप ' नामक ग्रंथांत चित्रगुप्त आणि चांद्रसेनीय कायस्थांचीं धर्मकर्मादि यांचें वर्णन देईन.]

हा स्पष्ट स्पष्ट असलेला उल्लेख दिसेल कशाला ? जो ग्रंथ वास्तवीक मूळ संकरज

कायस्थांकरितां लिहिलेला, तो दिला भिरकाऊन या शहाण्या समाजशास्त्रानें चांद्रसेनीय कायस्थ प्रभूंच्या मुस्कटावर ! इतिहास-संशोधनाच्या किंवा समाजशास्त्राच्या दृष्टीनें हें किती नीचपणाचें धाडस आहे, याचा निःपक्षपाती सज्जनांनींच विचार करावा. **कायस्थ धर्मादीपाची छापील प्रत** सन १८७२ सालीं आणि **कायस्थ धर्मादीपाची अस्सल प्रत** सन १८८८ सालींच उपलब्ध झालेली आहे. कायस्थ-प्रभूंचें म्हणणें कीं गागाभट्टानें आमच्याकरितां प्रदीप लिहिला. पण येथे सुद्धां

## गागाभट्टाचा हलकटपणा

सिद्ध होत आहे. ब्राह्मणेतरांच्या धर्माचरणांचा बरा वाईट निर्णय ब्राह्मणांनींच दिला पाहिजे, ही जी मानसिक गुलामगिरी अखिल ब्राह्मणेतर हिंदु समाजाच्या बोकांडीं बसलेली आहे, तिचा गागाभट्टानें रुपयाला वीस आणे पुरापूर फायदा घेतला. ब्राह्मणच काय ते कायस्थ प्रभूंच्या धर्माधिकाराचे निर्णायक हीच घमेंड राजवाड्यांच्या प्रस्तुत उपद्व्यापांच्या मुळांशीं सणसणत आहे. गागाभट्ट दक्षिणेंत आल्यावर त्यानें येथील ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाची मख्खी प्रथम नीट अजमावली. एवढा मोठा अतुल पराक्रमी स्वराज्य-संस्थापक शिवाजी व त्याचा बुद्धिवान् हस्तक बाळप्रभू चिटणीस, पण, केवळ वेदोक्त राज्याभिषेकासाठीं दोघेहि भिक्षुकशाहीचे नुसते दासानुदास उर्फ कुत्ते बनलेले. दक्षिणी ब्राह्मण तर काय, खुद्द ब्रह्मदेवाच्याही बापाचे बाप बनून बसलेले. गागाभट्ट झाला तरी जन्माचा भटुरडाच ! खरें बोलावें तर दक्षिणी ब्राह्मण म्हणजे सापाची अवलाद. एका दंशांत पुढच्या बेचाळीस पिढ्यांच्या आंगावर रक्तपिती उठविणारे. बरें, खोटें बोलावें, तर शिवाजीकडून मिळणारी गडगंज दक्षिणा उघड्या डोळ्यापुढें ठार बुडते. या अडचणींत तो सांपडला असतां त्यानें एक ' हिंदुस्थानी ' शक्कल लढवून, दोनहि प्रतिस्पर्ध्यांना गाढव बनविलें व आपली तुंबडी भरून काशीला फरारी झाला. त्या वेळीं ' कायस्थ प्रभू आणि ब्राह्मण ' हा तंटा विशेष जोरांत होता. ब्राह्मणांचें म्हणणें थेट राजवाडी. जबरदस्त शिवाजी एकवेळ क्षत्रिय म्हटला तरी चालेल, पण या शिरजोर कायस्थ प्रभूंना शूद्र ठरवा. गागानें ताबडतोब ' कायस्थ धर्मदीप ' फरकटून दिला भटांच्या पदरांत घ्या हा त्या संकरज कायस्थांच्या धर्माधिकाराचा-निर्णय-ग्रंथ. ही बातमी बाळाजी आवजीला कळतांच तोहि गागाला भेटला आणि म्हणाला ' काय गागाभटजी, हें तुम्ही काय केलें ? ' हजरजबाबी गागानें उत्तर दिलें, ' अरे, ब्राह्मणांना दिलेला दीप संकरज कायस्थांबद्दल आहे. तुझा त्यांत काय संबंध ? तुम्हां चांद्रसेनीय कायस्थ प्रभूंबद्दल हा पहा मी कायस्थ धर्मप्रदीप लिहिला आहे तो घे.' झाले. या युक्तीनें ब्राह्मण गप्प, बाळाजी गप्प आणि गागानें लाखों रुपयांची दक्षिणा केली गडप. सारांश, दीप आणि प्रदीप या विषयींचा वाद म्हणजे शुद्ध भिक्षुकी कारस्थान होय. यामुळें कायस्थ प्रभू, शिवाजी आणि ब्राह्मण हे सर्वच गागाच्या हलकटपणाच्या पचनीं पडले. याविषयीं विस्तृत माहिती घेऊं इच्छिणारांनी आमचा ' ग्रामण्यांचा साद्यंत इतिहास ' या ग्रंथांतील चवथें ग्रामण्य (पृ. ९ ते २०) मुद्दाम अभ्यासावें, म्हणजे अनेक शंकांची निखालस निवृत्ति होईल.

हिंदु धर्म आणि हिंदु समाज यांच्या विद्यमान अधःपाताला ब्राह्मणांची भिक्षुकशाहीच मुख्यतः कशी जबाबदार आहे, याचें सप्रमाण स्पष्टीकरण भिक्षुकशाहीचें बंड वगैरे अनेक ग्रंथांत आम्ही केलेलें आहेच. इतकेंच नव्हे तर हिंदवी स्वराज्याचा खून पाडण्यांत दक्षिणी भिक्षुकशाहीच विशेषतः कारस्थानी ठरलेली आहे. भिक्षुकशाही गुलामगिरीचा जबरदस्त पगडा मनावर बसलेल्या पूर्वजांनीं शंकराचार्यांचीं आज्ञापत्रें मिळविण्यासाठीं लाखों रुपयांचें शेण केलें आणि भटांच्या तोंडून स्वतःस क्षत्रियत्वाचें सर्टिफिकीट मिळविण्यासाठीं वाटेल त्या पौराणिक कादंबरीला ब्रह्मवाक्य मानलें, यांत आज आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. तो काळ तसाच अज्ञानाचा अर्थात् मूर्खपणाचा होता. वेदोक्तासाठीं पूर्वीच्या कायस्थांनीं किंवा शिवाजीच्या ज्ञातभाई दक्षिणी मराठ्यांनीं भिक्षुकी दास्याचे केवढेहि थेर माजविले असले तरी चालू जागृतीच्या युगांत कायस्थ प्रभू व मराठ्यादि इतर ब्राह्मणेतर, ब्राह्मणांना व त्यांच्या वेदोक्त श्रेष्ठत्वाला मुनसिपालटीच्या झाडूच्या खराट्याइतकीहि किंमत देत नाहींत; मग वेदोक्त पुराणोक्ताचा आज काय भाव आहे ? आज जेथे खुद्द ब्राह्मणांनाच आपलें ब्राह्मण्य सप्रमाण सिद्ध करण्याची पंचाईत पडली आहे, तेथें त्या गुंडांच्या तोंडचा क्षत्रियत्वाचा निर्णय मानणारा टोणगा कोण असेल तो असो ! आजचे कायस्थ प्रभू आणि मराठे त्यांच्या पूर्वजांनीं भटांकडून मिळविलेल्या निर्णयपत्रांचें, पौराणिक धेडगुजरी गाथांचे किंवा गागाभट्टादि लुच्या भटांनीं ठरविलेल्या सामाजीक व धार्मिक उत्पत्त्यांच्या कल्पनांचे गुलाम नव्हत. प्राचीन वंशावळीचे वृक्ष त्यांच्या शाखा उपशाखा ठरविण्यांत ब्राह्मणांच्या कारस्थानी बदसल्ल्यांना बळी पडून अनेक ब्राह्मणेतरांनीं आपल्या निर्भेळ परमेश्वरोत्पन्न उत्पत्तीसाठीं मांडलेलीं मूर्खपणाचीं प्रदर्शनें पाहून कौतुक वाटण्याऐवजीं तिटकारा उत्पन्न होतो. छत्रपतींचा वंशवृक्ष म्हणून एक मोठें रंगी बेरंगी नकाशाचें पुस्तक रा. ब. डोंगरे यांनीं छापिलें आहे. हा नकाशा सातारी गळाठ्यांतच त्यांना सांपडला आणि कै. शाहू छत्रपति करवीरकर यांनीं हजारों रुपये खर्चून तो रविवर्मा प्रेसांत छापविला. त्यांत छत्रपतींच्या पूर्वजांचा धागा थेट आदि नारायण ब्रम्ह्याच्या बेंबटात नेऊन घुसविला आहे. बरें झालें, ब्रम्ह्याच्या पुढचा मार्ग या वंशवृक्षनिर्णयकाला दिसला नाहीं. नाहीं तर त्याच्याहि पुढें त्याची मजल गेली असती. सूर्यवंशी आणि चंद्रवंशी क्षत्रियब्रुवांचा अभिमान काय विचारतां ? ब्राह्मण ब्रह्मदेवाच्या तोंडातून (वांतीसरसें कीं काय ?) पडले तर यांची उत्पत्ति थेट चंद्रसूर्याच्या रेतापासून ! चंद्रसूर्यांनीं तरी आपल्या जन्मजात क्षत्रियपणाचें आज्ञापत्र ब्रह्ममुखजन्य किंवा ब्रह्मवांत्युत्पन्न भिक्षुकशाहीकडून मिळविलें होतें कीं नाहीं, हें मात्र कळत नाहीं. शिवाय असाहि प्रश्न उद्भवतो कीं चंद्रसूर्याला जर पूर्वी पोरें झालीं, तर त्यांच्या बायका कोण ? कां ब्राह्मणांच्या उत्पत्तिसाठीं ब्रह्मदेवानेंच स्वतःकडे जसें बायकोपण घेतलें, तसाच येथेंहि प्रकार घडला ? बरें, पूर्वी पोरें झालीं तर मग आतांच कां होत नाहींत ? कां चंद्रसूर्याच्या रेताचा खजीनाच आटला ? का एकेका पोरापुरतेच त्यांनीं कंत्राट घेतलें होतें ? आणि एकेक पोरगाच ते प्रसविले म्हणावें तर पुढच्या वेलविस्तारासाठीं त्यांनीं कोणाच्या पोरीशीं लव्हाळीं जमविली ? चांद्रसेनीय कायस्थ प्रभूंच्या पूर्वजांनीं असाच एक धेडगुजरी पौराणीक फार्स आपल्या बोकांडीं बसवून घेतला आहे. ' चांद्रसेनीय ' शब्दाची व्युत्पत्ति ठाकठीक जमविण्यासाठीं भटांच्या (बद) सल्ल्यांनें त्यांनीं एक चंद्रसेन राजा कल्पनेच्या तणाव्यांत निर्माण केला.

' कायस्थ ' शब्दाची व्युत्पत्ति ' काये तिष्ठति यः सः कायस्थः ' अशी बसविण्यासाठीं, (काल्पनिक अवतार) परशुरामाच्या बाणाला बळी पडलेल्या चंद्रसेनाच्या तरुण गरोदर विधवेला दालभ्य ऋषीच्या आश्रमांत पळविली. तेथें ती बाळंत होऊन, तिच्या ' कायस्थ ' म्हणजे शरीरांत वसलेला पुत्र जगाचा प्रकाश पहाता झाला. त्याचा वेलविस्तार म्हणजे हे चांद्रसेनीय कायस्थ. किती मूर्खपणाची ही व्युत्पति ! चंद्रसेनाचा पोरगाच तेवढा आपल्या आईच्या उदरांत–देहांत–कायेंत–तिष्ठला, ' स्थ ' झाला आणि बाकीची मानव जाती काय करते ? प्रत्येक प्राणी, कीडमुंगीसुद्धां उत्पत्तिपूर्वी आपल्या आईच्या उदरांत ' कायस्थ ' नसतोच कीं काय ? मग या ' कायस्थ ' व्युत्पतीचें शहाणपण कशांत ठरविलें तें समजत नाहीं प्रत्येक भूतजात ' कायस्थ ' च असतो. पण धर्ममार्तंड गागा भटजी, चार वेद आणि सहा शास्त्रें पढलेले बृहस्पती कायस्थ धर्मदीप प्रकरण १ पान १७ ओळ १ वर मोठ्या व्युत्पत्तिकराचा डौल आणून जेहत्ते लिहितात आणि कित्येक विद्यमान भिक्षुकशाहीचे गुलाम कायस्थ प्रभू मोठ्या अभिमानानें वेदतुल्य वाक्य मान्य करतात कीं :—

**चंद्रसेन भार्योत्पन्नो यः स दाल्भ्यमुनिना**
**चित्रगुप्तवंशस्य कन्यया विवाहितस्तस्मै**
**चित्रगुप्तधर्मो लेखनवृत्यादिरपि दत्त–**
**स्तस्मात्तदुत्पन्ना ये चांद्रसेनीय कायस्थारते**
**चित्रगुप्तसमान धर्माणो भवन्ति ॥**

वाहवा ! काय इतिहास, केवढा धर्माधिकार, केवढी रॅशनल व्युत्पति ! सगळेंच कांहीं भिक्षुकी थाटाचें, हो ! पण एवढ्यावरच गाडें थांबत नाहीं. चांद्रसेनीय कायस्थ हे ' हैहय कुलोत्पन्न क्षत्रिय ' आहेत, हें सिद्ध करतांना बडोद्याच्या एका मूर्ख कायस्थ संशोधकरूवानें भगवान् श्री विष्णूवर भयंकर प्रसंग आणून भिडविला आहे. कोठच्याशा एका भिक्षुकी पुराणाच्या आधारानें श्रीविष्णूला त्यानें घोड्याचा अवतार देऊन लक्ष्मीलाहि घोडी बनविलें व या पारमेश्वरी दांपत्यापासून हैहय क्षत्रियांची उत्पत्ति करविली आहे. स्वतःच्या कुळामुळाचा श्रेष्ठपणा ठरविण्यासाठी देवालाहि घोडा बनविण्यास न कचरणाऱ्या गाढवांच्या माणुसकीचा पुरावा कोण कसा व कोठे देणार ?

## खरा इतिहास.

चांद्रसेनीय हा शब्द अपभ्रंश आहे. मूळ शब्द **चांद्रश्रेणीय** असा असून, त्यांत चंद्रसेन नाही, त्याची बायको नाही, तिच्या पोटांतलें पोर नाही, दालभ्य ऋषी नाही, परशुराम नाही, कोणी नाही, चांद्रश्रेणीय हा स्थलवाचक शब्द आहे. काश्मिरांतल्या चिनाब नदीच्या खोऱ्याला प्राचीन संस्कृत ग्रंथात चांद्रश्रेणी असें नांव आहे. या खोऱ्यांत किंवा चिनाब नदीच्या कांठच्या प्रदेशांत रहाणारे ते चांद्रश्रेणीय. नद्यांची नांवे मुलींना देण्याचा प्रघात अजूनहि हिंदुसमाजांत बराच आहे. कायस्थ प्रभूंत नद्यांच्या ऐवजी चंपा मालती गुलाब किंवा पिरोझ इत्यादि फुलांची नांवे मुलींना चिकटू लागली असली, तरी कोणत्याहि ब्राह्मण ब्राह्मणेत्तर समाजांत मुळीच प्रचलीत नसलेले ' चिनुबाई ' हे नांव कायस्थ जातींत अजूनहि तुरळक परंपरेनें चालत आलें आहे. चिनुबाई हे नांव चिनाब नदीवरून उचललेले आहे, हे उघडच आहे. चांद्रश्रेणी सोडून या लोकांची वस्ती

पुढें काय देशांत उर्फ अयोध्या प्रांतांत झाली, कोकणचे रहिवाशी जसे कोकणस्थ व देशावरचे देशस्थ तसेच काय देशाचे रहिवासी ते कायस्थ, हा सरळ अर्थ आहे. कोंकणस्थ ब्राह्मण पुण्यांत राहू लागल्यामुळें त्यांना 'पुणेंकर' हेही नांव लागू झालें आहे. (पूना ब्रॅमिन्स), म्हणजे ते कोंकणस्थ नव्हत की काय ? त्याचप्रमाणें प्रभू लोक चाद्रश्रेणी सोडून काय देशांत आल्यावर 'कायस्थ' बनले, तरी ते 'चांद्रश्रेणीय' कां राहू नयेत ? सारांश, चाद्रश्रेणीय कायस्थ हे दोन शब्द प्रभू लोकांच्या बसाहतीदर्शक स्थलवाचक शब्द आहेत. आतां राहला 'प्रभू' शब्द, प्रभू शब्दांत राजेपणा किंवा राज्यकर्तृत्व आहे आणि ते सिद्ध करणारे ऐतिहासीक पुरावे रगड आहेत. ते यथाक्रम पुढें येतीलच, कायस्थ प्रभू ही एक पोलीटिकल ट्राईब-राजकारणपटू जाती आहे. ती चातुर्वर्ण्याच्या किंवा चतुर्वर्गाच्या कोणत्या दालनांत शोभते हें ठरविण्याचा अधिकार कोणालाच नाहीं.* या जातीनें कलम-समशेरीचा प्रभाव अत्यंत स्पृहणीय सव्यसाचीत्वानें आजपर्यंत गाजवून हिंदु समाजांत योग्य तो दर्जा पटकविलाच आहे. तो दर्जा कवडीमोल ठरविण्याच्या कामीं राजवाड्यांचा वेदोक्त-पुराणोक्त, समंत्रक अमंत्रक किंवा अनुलोम-प्रतिलोम वाद फुकट आहे, कायस्थ प्रभू क्षत्रिय कीं शूद्र, शुद्ध रक्ताचे कीं अकरमासे हें ठरविण्याचा अधिकार ब्राह्मणांना व या चित्पावनांना दिला कोणी ? आजचे कायस्थ प्रभू स्वयंनिर्णयी आहेत, त्यांच्यापुढें राजवाडे किंवा भारत-इतिहास-संशोधक मंडळ कोणत्या झाडाचा पाला ? विद्वान असाल तर स्वतःच्या घरीं दहाच्या ऐवजीं पन्नास भाकरी खा. कायस्थांच्या किंवा कोणाहि इतर जातींच्या कुचाळ्या करण्याची तुह्मांला जरूरी नाहीं. ज्या ज्या क्षेत्रांत कायस्थांशीं दोन हात करण्याची तुम्हांला खुमखूम असेल, तेथें तेथें खुशाल दाना दुष्मन प्रमाणें येऊन उभे रहा; आम्ही कायस्थ प्रभू तुम्हांलाचसे काय, तुमच्या सर्व वंशजांनाहि पुरून उरू. यहुदी तर यहुदी आणि प्रत्येक खटल्यांत वादी।

## अव्यापारेषु व्यापार

करण्यांत राजवाडे आणि त्यांचें मंडळ यांनीं मिळविलेला लौकीक आतां तरी अखिल महाराष्ट्राच्या पूर्ण माहितीचा झालेला आहे. संशोधनाच्या सबबीवर एक जीर्ण पातडें छापतात काय, त्यावर मल्लीनाथी करतात काय, आणि प्रत्यक्ष मजकुराचें क्षेत्र सोडून, कायस्थ प्रभूंच्या सर्वच इतिहासावर एखाद्या माथेफिरूप्रमाणें भरंसाट आग पाखडतात काय ! विशेष आश्चर्याची गोष्ट हीच कीं राजवाड्यासारख्या एककल्ली माणसानें कांहींहि भरंसाट पिसाट खरडलें तरी मंडळासारखी जबाबदार संस्था तें बिनदिक्कत छापून प्रसिद्ध करते. या पुस्तकाची १ ली आवृत्ति निघून ६ वर्षे झालीं. इतक्या वर्षांनीं जरी कोणी राजवाड्यांचा मूळ निबंध वाचला, तरी त्यातल्या बेजबाबदार विचारसरणीची, कायस्थ ज्ञातीवर झुगारलेल्या अपमानास्पद क्षुद्र विधानांची व

*"......अशा स्थितींत कायस्थप्रभूंच्याच क्षत्रियत्वासंबंधाने हा आक्षेप पुढें आणणें, आणि त्याला चित्पावनांसारख्या-संशयित व वादग्रस्त उत्पत्ति असलेल्या, आणि त्यामुळेंच यांची राजकीय उन्नति होईपर्यंत इतर ब्राह्मण वर्गांनीं कमी दर्जाच्या मानलेल्या-पोटब्राह्मण जातीनें महत्व देणे, बरेच चमत्कारिक दिसतें." **टणत्कार परीक्षण.** वि. ज्ञा. विस्तार पृ. १५६ (एप्रील १९१९) श्री. माधवराव लेले, बी.ए.बी.एस.सी.

बिनबुडाच्या भयंकर आरोपांची नांगी त्याला पूर्वीपेक्षांहि अधिक तीव्रतेनें दंश केल्याशिवाय राहणार नाहीं. आजचे कायस्थ समंत्रक अमंत्रक पुण्याहवाचनावर किंवा वेदोक्त पुराणोक्तावर रुसले नाहींत. त्यांना त्यांची फुटक्या कवडीचीहि किंमत वाटत नाहीं. या बहुमोल मालाची वखार मंडळाला खुशाल आमरण बहाल असो. परंतु धर्माधिकारांची चर्चा करतां करतां राजवाड्यांनीं म्हणजेच मंडळानें इतिहासदृष्ट्या कायस्थ प्रभू समाजावर जे घाणेरडे आरोप करण्याचें धाडस केलें आहे, त्याला कायमचें सणसणीत प्रत्युत्तर देऊन, मंडळाचा पाजीपणा जनतेच्या व सरकारच्या नजरेला आणून देणे आमचें कर्तव्य आहे. पिसाळलेलें कुत्रें एकाला चावलें कीं, पुढें शेंकडों जणांना डसल्याशिवाय रहात नाहीं. त्याची कवटी फोडून त्याला मोक्षच द्यावा लागतो. धर्मदीपाची लावणी लावतां लावतां कायस्थांच्या सर्व इतिहासाला काळें फासण्याचें कारण राजवाडे देतात कीं " वाद (?) वरवर उपचार करून मिटण्यासारखा नाहीं. त्यांच्या

## मुळाशींच हात घातला पाहिजे."

गोष्ट खरी. आजपर्यंत भिक्षुकशाहीनें प्रत्येक ब्राह्मणेतर समाजाच्या मुळाशींच हात घालून त्याला निर्माल्यवत् बनविल्याची पुण्याई कमाविली आहे. मग कायस्थ प्रभूच अपवाद कसे ठरतील ? उलट, ब्राह्मणांच्या जुलमी घाशीरामीचा मार अखिल ब्राह्मणेतरांपेक्षां कायस्थ प्रभूंवरच विशेष पडलेला आहे. याला कारण कायस्थांची वरचढ बुद्धिमत्ता व ब्राह्मणांना पदोपदीं चेंचणारी राजकारण-कुशलता. चालू घटकेला सुद्धां पुणेरी चित्पावनांच्या डोळ्यांत खुपणारें प्रत्येक क्षेत्रांतलें जबरदस्त शल्य जर कोणतें असेल तर तें कायस्थ प्रभूच होय. हें शल्य कोणत्या उपायांनीं कायमचें उखडलें जाईल, हा एक मोठा बिकट प्रश्न चित्पावनांपुढें गेलीं दोनशें वर्षे पडला आहे. हीच विवंचना राजवाडे अशी मांडतात:—" कायस्थः समाजाला वेदोक्तसंस्काराचा अधिकार कसा द्यावा, हा प्रश्न गेलीं दोन अडीचशें वर्षे ब्राह्मण व क्षत्रिय समाजास पडला आहे. हा सामाजीक प्रश्न सुटत असतांना, (१) संभाजीचा वध झाला, (२) नारायणराव मारला गेला आणि (३) प्रतापसिंह पदभ्रष्टता पावला."–पृ. ४३. राजवाड्यांच्या समग्र निबंधदीपाचा अगदीं थोडक्यांत सारांश काढावयाचा तर " शिवकालापासून आजपर्यंत (?) हा जो

## कायस्थ ब्राह्मणांचा झगडा

चालला आहे, त्याचें अंतरंग काय आहे ? पृ. ३९ " हें मोठ्या चतुराईनें शोधून काढण्याच्या भरांत त्यांनीं उपलब्ध सर्व इतिहासांना फांसावर चढवून कायस्थ प्रभू समाजावर खालील ठळक आरोप केले आहेत. आम्ही फक्त ऐतिहासीक मुद्यांपुरतेंच आमच्या प्रत्युत्तराचें क्षेत्र मर्यादित केलें आहे. कायस्थांच्या उत्पत्तीविषयीं, रक्तशुद्धीविषयीं व शूद्रत्वाविषयीं राजवाड्यानीं काढलेल्या चित्पावनी प्रलापांविषयीं आह्मी कांहीं लिहूं इच्छित नाहीं. गांवभवानीच पातिव्रत्याचा दिमाख मिरवूं लागली तर तिच्या बाजारबसवेपणाबद्दल कोण घासाघीस करूं इच्छील ?

## कायस्थांवरील आरोप

(१) संभाजीचा खून व तत्कालीन् क्रांति कायस्थांमुळेंच घडून आली.

(२) नारायणराव पेशव्याच्या खुनांत कायस्थ प्रभूंचें आंग होतें.

(३) सातारच्या महाराजांच्या वतीनें दुसऱ्या बाजीरावाच्या विरूद्ध इंग्रजांशी खटपटी करणारें कायस्थ प्रभूच,

(४) सातारकर छत्रपति प्रतापसिंह याच्या पदभ्रष्टतेला मूळ कारण कायस्थ प्रभूच.

असे टळक चार आरोप करून, राजवाड्यांनीं, पर्यायानेंच नव्हे तर विशेष स्पष्टतेनें,

## कायस्थ स्वराज्यद्रोही आहेत

हे ठरविण्याचें पुण्यकार्य केलें आहे व या शतकृत्याचा वांटा आपणांस मिळावा म्हणून श्रीमंत सरदार **खंडेराव चिंतामण मेहेंदळे** व दत्तो वामन पोतदार या दोघा ग्रॅज्यूएटांच्या मार्फत भा. इ. सं. मंडळाने राजवाड्यांच्या हाताला हात लावला आहे. महाराष्ट्राच्या भवितव्यतेची रात्रंदिवस काळजी करून करून झुरणीस लागलेल्या राजवाड्यांना वेदोक्तांच्या खटपटी उकरून काढणाऱ्या कायस्थ प्रभूंच्या चळवळींची इतकी जबरदस्त दहशत पडली आहे कीं या खटपट्यांचा एकदा कायमचा निकाल लावून टाकण्यासाठीं, अगदीं उठवणीस आल्याप्रमाणें, ते सर्व आब्रांह्मण चाडांळ महाराष्ट्रीयांची काकुळतीनें विनंती करतात :—

**'' कायस्थांची जातिधर्मोन्नति करण्याच्या कामांत तडजोड न झाल्यामुळें स्वराज्यास आपण मुकलों. आतां एकवर्णाच्या वावटळींत समंजसपणे वाट न काढली, तर आपण हिंदु समाजासहि गमावून बसूं. '' पृ. ४९.**

इतक्या बेजबाबदार आरोपाचा प्रतिकार नुसत्या लेखनशक्तीने होने नाहीं. वास्तविक येथे पैजारांचें काम, असली बेअब्रूकारक व अपमानास्पद विधानें बेधडक ' इतिहासाची साधनें ' म्हणून प्रसिद्ध करणाऱ्या मंडळातले लोक एक तर अस्सल पागल असले पाहिजेत किंवा बिलंदाज कटवाले असले पाहिजेत. याच चित्पावनी धोरणाने महाराष्ट्राचा इतिहास घडणार असेल, तर तो कोणत्या वळणावर जाणार याचें भविष्य करायला ज्योतिषशास्त्र शिकले पाहिजे असें नाहीं. मंडळाच्या या बेजबाबदार आरोपाचा समारोपांत विस्तृत समाचार घेणेंच बरें. तत्पूर्वी राजवड्याच्या इतर आक्षेपांचा यथाक्रम विचार करूं. प्रथम ' कायस्थ ब्राह्मणांचा झगडा ' ही मोठी खुबीदार शब्दयोजना करतांना, त्यांतील ' ब्राह्मण ' शब्दाच्या व्याखेंत राजवाडे कोणाचा समावेश करूं पाहतात ? पेशवाई सत्तेच्या जोरावर कित्येक गबाळ देशस्थ व लोभी कऱ्हाड्यांशी जबरीचे मिश्रविवाह ठोकून, गेल्या १५० वर्षात उत्क्रांतीची शर्यत अत्यंत स्पृहणीच वेगानें जिंकणारा राजवाड्यांचा चित्पावन समाज आज स्वतःस जरी ' ब्राह्मण ' म्हणवीत असला, तरी त्याचा लौकीकी ब्राह्मणपणा अझुन अखिल हिंदु जनांस सारखाच मान्य झालेला नाहीं. इतकेंच नव्हे, तर अलोट विद्वता किंवा ' चित्तपावनता ' ( अथवा राजवाड्यांच्या विश्वामित्री व्युत्पत्तींत बोलायचें तर ' क्षितिपावनता ') आंगी असणारा एकहि चित्पावन शंकराचार्याच्या गादीवर बसण्यास कां पात्र मानला जात नाहीं, या प्रश्नाच्या उत्तरांतच चित्पावनांचा ब्राह्मणपणा

भाडोत्री ठरत आहे.* तें कांहींहि असलें तरी आम्ही स्पष्ट विचारतों कीं शिवाजीच्या वेळी हे ऊर्ध्वबुद्धी चित्पावन होते कोंठें? शिवकालापासून तो परवाच्या कै. न्या. रानड्यांच्या ' मराठी सत्तेचा उत्कर्ष ' पर्यंतचे सर्व जुने नवे लेख कागदपत्रें बखरी, पाश्चात्य फिरस्त्यांच्या रोजनिशा गाळून चाळल्या, किंवा मंडळाच्या अगर राजवाड्यांच्या घशांत कोळून कोळून पाजल्या, तरी एक गोष्ट स्पष्ट सिद्ध आहे कीं शिवाजीच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यांत एकाहि चित्पावनाच्या रक्ताचा थेंब खर्ची पडलेला नाहीं. स्वराज्यस्थापना हे चित्पावनांचें ब्रीदच नव्हें, मागें नव्हतें व पुढें असणारहि नाहीं. आजहि हिंदी स्वराज्यविषयक चळवळींचें सूक्ष्म निरीक्षण केल तरी त्यांतही चित्पावन खटपट्यांची तळमळ

## पेशवाई पाट्यावरवंट्याचा जीर्णोद्धार

करण्यासाठींच आहे. शिवाजीच्या हिंदवी स्वराज्याची प्राणप्रतिष्ठा कायस्थ प्रभूंच्या रक्तावर झालेली आहे आणि त्या स्वराज्याचा प्राण घेऊनच चित्पावनांनी आपली प्रतिष्ठा वाढविली आहे, हा ऐतिहासिक पुरावा खोडण्यासाठी राजवाड्यांना मंडळाला किंवा अखिल चित्पावनांना आपल्या बेचाळीस पिड्यांची पुण्याई खर्ची घातली तरी पुरणार नाहीं. ' सातारकर छत्रपति महाराजांची बखर ' नामक शिळा छापाच्या पुस्तकांत शिवाजी महाराजांच्या वेळच्या सर्व लहान मोठ्या राजकारणी पुरूषांची जी लांबलचक यादी खाते—प्रकरणशः छापलेली आहे, त्यांत एक चित्पावन औषधालासुद्धां सांपडत नाही. मग हे शिवकालापासून कायस्थांशी झगडणारे ब्राह्मण कोण ? आतां, ' ब्राह्मण म्हणजेच चित्पावन ' अशीच जर राजवाड्यांची

## घाशीरामी व्युत्पत्ती

असेल तर, मग कोणाचा तेथें काय इलाज ? शिवकालांत चित्पावनांचें राजकारणी अस्तित्व सिद्ध करण्यासाठी राजवाड्यांच्या व मंडळाच्या काय काय धडपडी सुरू आहेत, त्या आम्हांला पूर्ण माहित आहेत. याचें एक नमुनेदार उदाहरण देतों. राजवाड्यांनी नुकताच एक ' राधामाधवविलास चंपू काव्य ' नामक ग्रंथाचा जीर्णोद्धार केला. त्यांत शहाजी राजांच्या तंजावर येथील राजवैभवांचें कादंबरीच्या धाटणीवर कांहीं वर्णन असून त्यांच्या प्रभावळींतील कांही ठळक व्यक्तींची नांवें आहेत. या नावांची व्युत्पति लावून त्यांची नातींगोतीं शोधण्यात राजवाड्यांनी आपल्या संशोधकी अकलेला दिलेले तणावे हास्यास्पद असले तरी मनोरंजक वाटतात. त्यांत एक नांव अभेद गंगाधर असें आहे. यावर राजवाड्यांनीं ठरविलेली व्युत्पति पहा :— " अभेद अभयद–अभयंकर–अभ्यंकर. हा अभेद गंगाधर चित्पावन होता." झाले काम. शहाजींच्या

* या गोष्टीबद्दल पुण्याचें विद्वान् ' आचार्य ' कतें ता. २५ मे १९१५ च्या अंकात उद्गार काढतात :—

" २. आचार्याच्या पहिल्या वर्षाच्या सोळाव्या अंकात प्रो. भानु. करवीर-पीठाच्या जगद्गुरूंचे सर्वाधिकारी झाले, हें वर्तमान आम्ही अभिनंदनपूर्वक प्रसिद्ध केले होतें. पण त्या बहुमानाच्या व किफायतशीर पदावर त्यांना फार दिवस रूढ होतां आले नाहीं, हे कळविण्यास आम्हाला अतिशय खेद होतो. आम्ही तर अशीही आशा करीत होतो कीं ' चंचुप्रवेशे मुसलप्रवेशः ' किंवा ' भटाला दिली ओसरी ' या न्यायानें आता आमच्या कोंकणस्थांना ' जगद्गुरू ' होण्याचाही मान लवकरच मिळेल ! कारण हे प्रगतिप्रधान सर्वाधिकारी देशस्थानेंच संकेश्वरच्या पीठावर बसलें पाहिजे, कोकणस्थ स्वामींचा त्या पीठाला स्पर्शही होता कामां नये; असल्या अनुदार कल्पनांना फार दिवस टिकूं देणार नाहींत. फार काय पण प्रसंग पणल्यास ते स्वतः संन्यासदीक्षा घेऊन जगद्गुरूंचे पीठ सुशोभित करतील व विलायतेस जांऊन आचार्यांचें जगद्गुरूंत्व सार्थ करतील, अशी आम्ही बळकट आशा करीत होतों. पण चार-सहा महिन्यांच्या आंतच ती निष्फळ झाली. हें आम्हां कोंकणस्थांच्या दैवदुर्विलासाचेंच स्पष्ट चिन्ह आहे. "

दरबारांत चित्पावनाची प्राणप्रतिष्ठा करतांच, शिवकालीं चित्पावनांचे अस्तित्व सिद्ध केलेंच कीं नाही ? आमची राजवाड्यांना अशी सूचना आहे कीं असले बाष्फळ व्युत्पत्तिप्रदीप पाजळण्यापेक्षां त्यांनी एकदम

## ब्रह्मदेवालाच चित्पावनत्वाचा बाप्तिस्मा

द्यावा कीं सगळाच वाद मिटला. अभेद गंगाधराचा अभ्यंकर चित्पावन बनविण्यांत काय फायदा ? एकदम मुळाशींच हात घातलेला बरा. निर्विकार चित्तानें महाराष्ट्राच्या इतिहासाचें नुसते वरवर अवलोकन करणारालासुद्धां चटकन् समजून येईल कीं श्री शिव छत्रपतींच्या स्वराज्योपक्रमापासूनचा इतिहास घेतला तर सामाजिक व राजकीय प्रदेशांत चित्पावन लोकांचा प्रवेश नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीपूर्वी मुळींच झाला नव्हता. " कोकणस्थ ब्राह्मण हे प्रथमतः अगदी मूढ असत व कोंकणांतून फारसे घाटावर येत नसत, आणि देशस्थ लोकहि त्यांस अगदी हलके समजत. याजमुळेंच शिवाजीपर्यंत कारभारांत जे मुत्सद्दी लोक होते ते परभु किंवा देशस्थ असत. " ही कै. लोकहितवादी देशमुखांची पुराव्याची माहिती आजपर्यंत एकाहि प्रमाणिक संशोधकाला खोटी पाडता आलेली नाहीं. कै. न्या. रानडे म्हणतात, " कोंकणातील ब्राह्मणलोक मराठी साम्राज्यवृद्धीच्या पहिल्या साठ वर्षात अगदींच पुढें आले नाहींत. " (मराठी सत्तेचा उत्कर्ष पृ. १२१) येणार कोठून ! बाळाजी विश्वनाथानंतर (सन १७१४) " कांही दिवसांनी कोकणची मुलें घाटावर येऊ लागलीं. ती स्वयंपाक व शागिर्दी करण्यास रहात. " (लोकहितवादी) फार काय पण राजवाडे भावे प्रभृतीच्या पोटांत वायगोळ्याप्रमाणें धुमाकूळ घालणाऱ्या बाळप्रभु चिटणीसाचा मुलगा खंडोबल्लाळ, या कायस्थ प्रभूची मेहेरबानी* झाली नसती तर बाळाजी विश्वनाथ उदयास येणें बरेंच दुरापास्त गेले असतें, आणि सारा चित्पावन समाज अखेरपर्यंत ' हारकारू ' चेंच काम करीत राहिला असता. नानासाहेब पेशव्याची पेशवाई पदाची निवडणूकहि गोविंदराव चिटणीसाच्या हुंकारानेच घडून आली. याविषयी उपलब्ध इतिहास इतका स्पष्ट सडेतोड आहे की तो कसाहि उलट सुलट करून वाचला तरी त्यांतून एकच प्रधान तत्व निघत कीं **चित्पावन समाजाच्या उन्नतीच्या मुळाशी प्राध्यान्यें करून चांद्रश्रेणीय कायस्थ प्रभूच आहेत.** आजचे राजवाडे किंवा चित्पावन क्रियानष्ट असले, तरी पहिले दोन चित्पावन पेशवे हे तत्त्व कृतज्ञतेनें स्मरत होते. पण पुढील साऱ्या पेशवे नोकरशाहीचा इतिहास म्हणजे.

## खाल्ल्या घरचे वांसे

मोजण्याचा इतिहास झाल्यामुळें, चित्पावनांस नैतिक दृष्ट्या निमकहरामपणाचा जो कालिमा लागला तो आजदीनतागायत कायमच आहे, ही कृतघ्नपणाची डांबर पुसून टाकणारा आणि आपल्या जातभाईच्या सनातन वक्र मनोवृत्तीला सरळ रेषेत दाबणारा महात्मा जोपर्यंत चित्पावन

---

* बाळाजी विश्वनाथला पेशवाई मिळाली ती मुख्यत्वे खंडो बल्लाळच्या खटपटीनें मिळाली. ही गोष्ट सर्वांना माहितच आहे. याबद्दल ' प्रभाकर ' कवीचा पेशवाईवरचा पोवाडा ' यांतः—

सातारकर पंतनीस मुख्य चिटणीस लेखक नादर ।
छत्रपति विनवून देवविती श्रीमंतास चादर ॥

असें एक पालुपद आहे. परंतु या पालुपदालाहि अलीकडे आधुनिक संपादक-श्रेणीनीं ' कायमचा चाट ' देण्याचें पुण्य संपादिलें आहे.

समाजात उत्पन्न झाला नाहीं, तोंपर्यंत इतिहास-संशोधनाच्या पांघरूणाखालीं चित्पावनांना ' क्षितिपावन ' ठरविणाऱ्या कितीहि व्युत्पत्त्या कोणी लढविल्या आणि विश्वामित्री धाटणीवर बनावट लेखांचा, टाचणांचा किंवा आक्षेपाचा केवढाही जंगी साठा मंडळाच्या अहवालांत मुद्रित करून ठेवला तरी ऐतिहासिक सत्यें ढासळून पडणें कधींहि शक्य नाहीं. अर्थात् ज्याला राजवाडे ' कायस्थ ब्राह्मणांचा झगडा ' असें सामान्य नांव मोठ्या मुत्सद्देगिरीनें देतात, त्याचा खरा स्पष्टार्थ **स्वराज्यनिष्ठ व छत्रपतिनिष्ठ कायस्थ प्रभूंचा निमकहराम पेशवे नोकरशाहीशीं झगडा** असा आहे. यांत धर्माचा कांहींहि संबंध नव्हता, आतां नाहीं व पुढें कदाकाळीं असणेंहि शक्य नाहीं; आणि यदाकदाचित् असला, असें जरी वादार्थ गृहीत धरलें तरी त्याचा निर्णय करण्याचा अधिकार चित्पावनांना केव्हांहि नव्हता, आतां नाहीं व पुढेंहि असणें शक्य नाहीं. शिवकालीन ब्राह्मणांचा कायस्थद्वेष धर्माची भिक्षुकी धाबळी पांघरून जरी पुढें आला होता, तरी त्यांचें खरे वास्तविक स्वरूप बाळप्रभू चिटणिसानें तेव्हांच " कारभार संबंधी द्वेष त्यास कामानिमित्तें सरकार कल्याणाची चाकरी करून आम्हांस माजी करून हात दाखवावा. तें सोडून ब्राह्मण्यावर येऊन सांगून पाठवितां हें आश्चर्य आहे. हें रिकामें दात खाऊन अवलक्षण देणें चांगले दिसत नाहीं, " या खरमरीत स्पष्टोक्तीनें ब्राह्मणांच्या प्रत्त्ययास आणून दिलें होतें. अजूनहि कायस्थ-चित्पावन चुरशीचें मूळ याच तत्त्वांत आढळतें. पण बाळ प्रभूच्या वेळीं चित्पावनाचा कांहिही संबंध नव्हता. पुढें, सातारकर छत्रपतींना धाब्यावर बसवून, पुण्यास पेशव्यांनी जरी आपला स्वतंत्र सवता सुभा उभा केला आणि सत्तेच्या जोरावर चित्पावन समाज सर्वच बाबतींत, आजच्या गोऱ्या सिविल सर्वंटाप्रमाणें, भयंकर शिरजोर बनविला. तरी देखिल इतर महाराष्ट्रीय ब्राह्मण त्याला आपल्या पंक्तीला मुळींच घेत नव्हते.* शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मणांची तर या बाबतींत अझूनहि मोठी तक्रार आहे. चित्पावन पेशवे हे अगदीं राजाच्या पायरीला जाऊन भिडण्याइतके अरेराव झाले असतांहि इतर महाराष्ट्रीय ब्राह्मणांनी त्यांना पंक्तीवयवहाराचा प्रतिबंध करावा, ही गोष्ट विशेष चिंतनीय आहे. दुसरा बाजीराव नाशीकला गेला असतां तेथील ब्राह्मणांनीं त्याला गोदावरीच्या घाटावरील पायऱ्यांना स्पर्शहि करूं दिला नाहीं. (पहा, Hamilton's Description of India, Vol. II p. 197) असें शेंकडों उतारे देतां येतील. सारांश, ' ब्राह्मण ' व्याख्येंत चित्पावनांचा बळजबरीचा समावेश करण्याचा राजवाड्यांचा उपद्व्याप सर्वस्वीं लंगडा आहे. राष्ट्रीय भावनेचा नाटकी आंव आणणाऱ्या राजवाड्यांनीं आपल्या विवेचनांत ' खालचे ब्राह्मण, वरचे ब्राह्मण, गांवगन्ना ब्राह्मण ' वगैरे बऱ्याच नवीन ब्राह्मण जातींच्या जनकत्त्वाचा मान स्वतःकडे घेतला आहे. पण या पोकळ वादांत शिरण्याचें आपल्याला कांहीच प्रयोजन नाहीं.

ऐतिहासिक वादाची सुरुवात राजवाडे येणेंप्रमाणे करतातः-" शक १५५० च्या पूर्वीचा **महाराष्ट्रांतील चांद्रसेनीय** कायस्थांचा सामाजिक, धार्मिक, राजकीय असा कोणताच दस्तऐवजी इतिहास उपलब्ध नाहीं. हे लोक महाराष्ट्रांत केव्हां व कोणत्या राजाच्या आश्रयाने प्रथम उतरले, तें कळण्यास नक्की साधन नाही. शके १५७० च्या सुमारास बाळाजी आवजीस चिटणिशी मिळाल्यापासून त्यांचा इतिहास कळण्यास प्रारंभ होतो. तत्पूर्वी सर्व अंधार आहे."

* "The Peshwas were long excluded from eating at tables with any Brahmin of high caste," Ward's India & the Hindo 08. pp. 199-200.

अंधार आहे कीं पहाणारांचे डोळेच फुटले आहेत ? सदरहू विधान अत्यंत धाडसी, दांडगाईचें आणि जाणून बुजून लोकांच्या डोळ्यांत धूळ फेंकणारे आहे. ' महाराष्ट्रांतील ' हा शब्द ठळक ठशाने छापण्यांत राजवाडयांचा काय हेतु ? चित्पावनांप्रमाणे कायस्थ प्रभू अवचित बळजबरीनें हिंदूत घुसले, का अकल्पित आकाशांतून खाली पडले, का एकदम अस्पृश्यांचे स्पृश्य झाले, जनावरांची माणसें बनले, झाले तरी काय ? किंवा सन १७१४ पूर्वीचा चित्पावनांचा कसलाच इतिहास उपलब्ध नाही, हें शल्य त्यांच्या हृदयांत रात्रंदिवस सलत असल्याप्रमाणे, ' माझ्यासारखी कधीं होशील ' एवढ्याच उद्देशाने जाणून बुजून हा विपर्यास ते करीत आहेत ? ' महाराष्ट्रांतील ' या शब्दांवर ते विशेष जोर देतात, तर सन १६२८ पूर्वीचा कोणकोणत्या महाराष्ट्रीय हिंदू जातींचा दुव्वेबाज आणि स्पष्ट इतिहास आज त्यांच्यापाशी उपलब्ध आहे ? महाराष्ट्र हें सर्व हिंदूचें अलीकडचें वसतिस्थान आहे.

"It will thus be seen that neither Shivaji, whose family came from Rajputana, nor the Peshvas, who came from Egypt, nor the Prabhus who came from the valley of the Chinab in Kashmere and Panjab *via* Oudh and Dalbhum, are the original residents of the tract they now claim as their Native Land." (Grant Duff, Supplement.)

' प्रभू ' शब्दाची व्युत्पत्ति ठरवितांना कै. राजाराम रामकृष्ण भागवत या निस्पृह संशोधक गृहस्थानें (विविधज्ञान विस्तार पु. २५ अंक ९–१० पु. २०९ सन १८९३) ' चां. का. प्रभू ही सर्वात अत्यंत जुन्या वस्तीची जात आहे ' हें सिद्ध करताना " लेखणीचे अधिकारी कायस्थ प्रभू हा वटवृक्षाचा अस्सल व जुनाट दांडा असून, ब्राह्मणत्वाची शेखी मिरविणाऱ्या दरोबस्त जाती त्यासच फुटलेल्या पारंब्या होत. " हे उद्गार काढलेले काय राजवाडे प्रभृतीना माहीतच नाहीत ? बाळाजी आवजीचे वडील आवजी हरी, आजे हरी रामाजी व पणजे रामाजी श्रीरंग हे सर्व जंजीऱ्याच्या हबशाचे दिवाण होते व जंजीरा म्हणजे त्या वेळी कायस्थ प्रभूचा एक ' स्ट्राँगहोल्ड ' होता, हेहि जर या खंद्या संशोधकाला दिसत नाहीं, तर त्यांनी संशोधन दृष्टीची वृथा घमेंड तरी मारूं नये. इतिहास-संशोधनाच्या कामीं काळ्याचे पांढरे केस केलेल्या राजवाड्यांनी इतकें बाष्कळपणाचें विधान करावें आणि तें मंडळाच्या कार्यकारी सभासदांनी डोळे मिटून छापून काढावे, यांत मूर्खपणाचा अधिक वांटा पत्करण्याचा मान कोणाकडे जातो, हें ठरविणें कठीण आहे. काशी ते रामेश्वर ऐतिहासिक साधनें हुडकिण्यासाठी कंबर कसून नेटानें प्रयत्न करणाऱ्या या मंडळाला सन १६२८ पूर्वीचा कायस्थ प्रभूंचा उपलब्ध इतिहासच तेवढा नेमका दिसूं नये, हा आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ मंडळाची इतिहास-संशोधकी नालायकी सिद्ध करीत असला, तरी आम्हांला अत्यंत विषादकारक वाटतो. राजवाड्यांनी वरील विधान मंडळाच्या बृहस्पतिसेनेपुढें वाचतांच ' याला कांही आधार आहे कां ? या ज्ञातीचा उपलब्ध इतिहास तुम्ही विचारांत घेतला काय ? ' असा सवाल करण्याची अक्कल एकाहि सभासदास होऊं नये, हा त्यांच्या मतिमंदतेचा पुरावा मानावा कीं कायस्थ प्रभूंच्या जाहीर बदनामीचा पुरस्कार मानावा ? मराठी स्वराज्यस्थापनेच्या भर उषःकाळी ज्या कायस्थ प्रभु समाजाने न भूतो न भविष्यति अशी राष्ट्रसेवा करण्यात शेकडों उमलत्या जवानांची (Blooming flowers of the race) आहुती दिली, ती त्याच्या बलवत्तर प्रबुद्ध पूर्वसंस्कृतीच्या अभावी नुसत्या यदृच्छेनें

कधिं तरी देतां आली असती काय ? शिवउदयापूर्वी चां. का. प्रभू जर अंधारांत होते, त्यांच्या क्षेत्रबीजाचा किंवा कुळामुळाचा कोठेंच मागमूस नव्हता, तर ते शिवाजीच्या स्वराज्योपक्रमाच्या धाडसी कल्पनेला पाठबळ देण्यास समाजशः धाऊन आलेच कसे ? मागासलेल्या जांती उन्नतीची शर्यत अशी अवचित जिंकू शकत नसतात, हेंहि या समाजशास्त्रकोविदाला कळूं नये काय ? इतर जातींप्रमाणेंच चां. का. प्रभू ज्ञातीबद्दल अत्यंत कसोशीची चौकशी मिळविण्यासाठी इंग्रज सरकारनें मागे कमिशनें नेमली होती. त्यांनी अनेक ग्रंथांच्या, शिलालेखांच्या, ताम्रपटांच्या सहाय्याने अनेक साक्षीदारांच्या कसून तपासण्या घेतल्या, चालीरीतींचा, रूढी रिवाजांचा तपशील मिळविला, तो सरकारी संशोधकांकडून तपासून घेतला आणि 'एथ्नॉग्राफिकल सर्वे' नामक ग्रंथांत व इतर गॅझेटियरांत सरकारमार्फत प्रसिद्ध झालेलाच आहे. याशिवाय या ज्ञातीची विश्वसनीय माहिती देणारीं अनेक लहान मोठीं मराठी संस्कृत व इंग्रजी पुस्तकें व मासिकें प्रसिद्ध झालेली आहेत. चित्पावनांच्या वर्तमान बुद्धिवैभवाची झकाकी इंग्रेजी सरकारच्या हाडवैरावर तगलेली असल्यामुळेंच जर सरकारी ग्रंथांतील माहिती अविश्वसनीय मानण्याची मंडळाची प्रवृत्ति असेल, तर त्याच त्रयराशिकी नियमानें, या चित्पावनी मंडळातर्फे प्रसिद्ध होणारीं दिव्य बाडें चित्पावनेतर दुनियेनें खोटी कां मानूं नये ? राजवाडे किंवा मुंबई सरकारचा ५०० रुपयांचा मलिदा दरसाल हबकणारें भा. इ. सं. मंडळ यांनी चां. का. प्रभू ज्ञातीच्या इतिहासाच्या अज्ञानाचें जें ढोंग पांघरले आहे, त्या ढोंगाचे भूत इतिहास प्रसिद्ध हाडवैराच्या पिंडावर पोसलेले आहे, हें कोणाहि चाणाक्षाच्या लक्षांत तेव्हाच येईल. अर्थात् बळेंच आंधळ्यांचे सोंग घेतलेल्या या मंडळाला आम्ही काय काय म्हणून दाखविण्याचा यत्न करावा ? उपलब्ध असलेले पुरावेहि न पहाण्याइतके जे अरेराव तुसडे आणि उर्मट बनलेले आहेत. त्यांनींच सान्या भरतखंडाच्या अनुपलब्ध ऐतिहासिक सामुग्रीच्या संशोधनाची घमेंड मारावी, हे दृश्य अस्सल पेशवाई नव्हे असे कोण म्हणेल ?

## मंडळाला रातांधळें लागलें

असले तरी शक १५७० पूर्वीच्या अंधारांतहि कायस्थ प्रभूंच्या अस्तित्वाचा नव्हे, राजकारणी प्रभुत्वाचा कांही शोध लागल्यास पाहिले पाहिजे. चांद्रश्रेणीयांची वस्ती काश्मिरांत होती, हें वर सांगितलेंच आहे. तेथील इतिहासांत या लोकांबद्दल पुष्कळ माहिती मिळण्याचा संभव आहे. **राजतरंगिणी** हें सुप्रसिद्ध काव्य काश्मिर-नृपतीचा महाअमात्य **चंपकप्रभू** याचा मुलगा **कल्हणप्रभू** (शके १०९१–११६९) याने लिहिले आहे. सन १३१८ च्या सुमारास गुप्त (गुप्ते) राजांची सत्ता प्रस्थापित झाली. त्यावेळी चां. का. प्रभूंतील गुप्ते, राजे, प्रधान, चौबळ, रणदिवे, दळवी, ठाकरे हीं घराणी उदयास आली. शके १३४७ मध्ये नारायण चौबळ मुर्तुजाबादचे देशपांडे व गांवकुळकर्ण उपभोगीत होता. दौलताबादचा नवीन तख्ताधिपति अहमदशहा बहामनी याजकडे याच साली तो नजराणा घेऊन गेला होता. याचा मुलगा गोविंद चौबळ याच अल्लाउद्दीन बहामनी याने कोंकण व मावळ प्रांतांत 'चीफ इंजिनियर' नेमले होते, व शके १४७७ मध्ये खाजेखानाबरोबर त्याला कर्नाटकाच्या स्वारीलाहि पाठविले होतें. त्याचे पुढील पुत्रपौत्र नारायण, कृष्णाजी व गोविंद या सर्व पुरुषांनी हैदराबादेस हजार स्वारांची सरदारी केलेली आहे. (पहा चां. का. प्र. इतिहासांची साधने अंक १२.) चेऊल येथे सांपडलेल्या एका शिलालेखाचा फोटोग्राफ रॉयल एशियाटिक सोसायटीच्या जर्नलमध्ये (पु. १ पृ. १.३५) छापला आहे, तो सन १०८८ चा असून, त्यांत **वेलजीप्रभूचे** नांव

खोदलेले आहे. शिलहार राजा अपरादित्याच्या वेळचा सन ११८२ चा दुसरा एक * शिलालेख सांपडला आहे, त्यांत **अनंतजी प्रभू** सहासष्टी (साल्सेट-साष्टी) परगण्यावर गव्हर्नर होता, असा स्पष्ट उल्लेख आहे. हा शिलालेखसुद्धा **वालिग् पंडित** † नामक कायस्थ प्रभूनेंच लिहिल्याचा त्यांत उल्लेख आहे. ज्या सह्याद्रीखंडांत कायस्थ प्रभूंची माहिती आहे तो ग्रंथ इ. स. १० व्या शतकाच्या सुमारास लिहिला गेला असावा, असा विद्वानांचा निर्णय आहे. शिलहार वंशीय राजा हरपाळ याने एका ब्राह्मणाला दानपत्र दिले आहे, त्यांत त्या राजाचा प्रधान **लक्ष्मणप्रभु** असल्याचा उल्लेख आहे. रजपूत राजा राणा लक्ष्मणसिंह याने चितोड येथे जो एक जयस्तंभ उभारलेला आहे, त्यावर हल्लींच्या सातारकर चिटणीसांचा पूर्वज **श्रीपतप्रभू** याच्या नांवाचा उल्लेख आहे आणि या गोष्टीचा दुसरा पुरावा चिटणीसांच्या संग्रहीं असलेल्या वंशवृक्षादि दस्तऐवजांतहि सांपडतो. सन १२९५ त अल्लाउद्दीननें मांडवगडचे राज्य उध्वस्त केल्यामुळे तेथील शेकडों कायस्थांची घराणी चितोड व त्याचा आसमंत प्रदेश सोडून, कोकणांत व मावळांत आपल्या पूर्वी वसलेल्या जातभाईंना येऊन मिळाली. याशिवाय मुंबई सरकारने प्रसिद्ध केलेल्या ' मोनोग्राफ नं. ४ कायस्थ प्रभू ' या पुस्तकांत असें म्हटलें आहे :—(मराठी भाषांतर) '' चेऊल व इतर ठिकाणीं सांपडलेल्या दोन शिलालेखांवरुन असें दिसतें कीं कोंकणांत शिलहार राजे राज्य करीत होते त्याकाळीं कायस्थ प्रभू येथें वसतीला येऊं लागले. देशपांड्यांच्या वतनांवरून असें सिद्ध होतें कीं तीं वतनें त्यांनीं, दक्षिणेंत बहामनी राज्यसत्ता स्थापन होण्यापूर्वींच, मिळविलीं आहेत. यावरुन असा निष्कर्ष निघतो कीं या जातीच्या पूर्वजांची वसाहत कोंकणांत व मावळांत १०-११ व्या शतकांत झाली. तेव्हांपासून ते येथेंच स्थाईक झाले व पुढ मराठी स्वराज्यांत त्यांनी फार महत्त्वाचा भाग घेतला.'' (पृ० ७). मुसलमानी अमदानींतसुद्धां या ज्ञातींतील अनेक पुरुषांनीं त्या त्या सरकारच्या राज्यव्यवस्थेंत मोठमोठीं हुद्याचीं कामें केल्याचे दाखले ठसठशीत ठशांत प्रसिद्ध झालेले आहेत. मोनोग्राफांत आणखीं असें म्हटलें आहे कीं :—'' दक्षिणेंत मुसलमानी सत्तेचा प्रादुर्भाव होऊं लागल्यापासून चां. का. प्रभूंचा इतिहास सहजगत्या सुरळीत शोधतां येतो. दिवाणी आणि लष्करी खात्यांत या लोकांनीं अनुपमेय कर्तबगारीचीं कामें केलीं. देशमुख देशपांड्यांचीं पूर्वापार वतनें पुढें चालविल्यामुळेंच देशांत मुसलमानांना शांति राखतां आली. १३९६ च्या भयंकर दुष्काळानंतर वसाहती वाढवून देशांत सुव्यवस्था राखण्याच्या कामी देशमुख देशपांड्यांनीं बहुमोल कामगिरी केली. यावेळीं डोंगराळ प्रदेशांतील बंडखोरांची बंडे मोडण्यासाठीं त्यांना लष्करी नोकरीहि करावी लागली. बेदरच्या बादशहानें या देशमुख देशपांड्यांच्या मदतीला सन १४२९ त मुल्कउल्तिजार याला सैन्यासह पाठविलें होतें. या कामाबद्दल त्यांना मोठमोठ्या मानाच्या पदव्या मिळाल्या, त्या त्यांचे वंशज आजपर्यंत उपभोगीत आहेत. आतोण्याचे प्रभू देशमुख यांना **अभंगराव**, नात्याचे प्रभु देशमुख यांना **सरजेराव**,

---

* ज्यांना हल्लीं ' देशपांडे ' म्हणतात ते पूर्वी ' दैशपंडित ' किंवा ' पंडित ' या संज्ञेनें ओळखिले जात असत व त्यांचा व्यवसाय जमीन महसुलांचा हिशेब ठेवणें व लेखनवृत्ती हा असें

† हा शिलालेख वाचतांना डॉ. भांडारकर यांनीं बऱ्याच चुका केलेल्या आहेत. या शिलालेखाचा अस्सल फोटो आमच्या संग्रहीं आहे; त्याचप्रमाणे मि. वॅथेन साहेबांनीं त्याचेच अधिक काळजीपूर्वक केलेले वाचनहि आमच्याजवळ आहे. त्यावरून पाहतां डॉक्टरसाहेबांनी ' अनंतजिप्रभु ' हा शब्द वाचतांना त्यांतल्या जि अक्षराची पै बनवून अनंतप्रभूला सारस्वत बनविले. परंतु ही चूक आहे. जं कोणी याच शिलालेखांतील प्रारंभीच्या दुसऱ्या ओळींतील ' विराजित ' शब्दातली जि ' अनंतजिप्रभु ' शब्दांतल्या जिशीं ताडून पाहील त्याला ही डॉ. साहेबांची चूक समजून येईल. वास्तवीक डॉ. सा. नीं. हा शिलालेख अत्यंत अशुद्ध रीतीनें वाचलेला आहे. हें मि. वॅथेनच्या वाचनावरूहि स्पष्ट सिद्ध होत आहे.

मावळच्या प्रभु देशपांड्यांना **आदरराव**. अशा रीतीनें दक्षिणेंतील मुसलमानी राज्यकारभारांत या प्रभुलोकांनी मोठमोठीं कामें केलीं. चेऊलचे चौबळ, महाडचे नाडकर, नाते निजामपूरचे देशमुख, मावळांतले वैद्य आणि दिघे, आणि इतर पुष्कळ देशपांडे व कुलकर्णी यांच्या सनदा अनेक ऐतिहासिक सत्यांचा निवाडा करण्यास समर्थ आहेत. सन १४२६ त बेदरच्या बादशहानें वाजसनेय बाह्मणांना दिलेल्या एका सनदेंत **परशराम प्रभु कर्णिक** या दरबारी सरदाराचा उल्लेख आहे. ब्राह्मणांब्राह्मणांतले तंटे निवडण्याच्या कामावर त्याची नेमणूक होती. " (पृ. ७–८) असे आणखी किती तरी पुरावे राजवाड्यांना व मंडळाला दाखविता येतील. सारांश, शके १५७० (सन १६४८) पूर्वी राजवाडे म्हणतात त्याप्रमाणें ' सर्व अंधार ' नसून ' सर्व प्रकाश ' आहे. चित्पावनी डोळयांना दिसला नाहीं तर तो दोष डोळयांचा व हृदयाचा आहे.

ब्राह्मण म्हणजे हिंदुधर्माचे डबोल्यावरचे भुजंग. अखिल हिंदुजनांच्या सामाजिक धार्मिक आचारविचारांचे सोल एजंट. किंवा वेदोक्ताच्या पंढरीतले बडवे. ही राजवाड्यांची जन्मप्राप्त समजूत असल्यामुळें, त्यांनीं पुढें ग्रामण्यांचा विषय चर्चेला घेऊन, त्यावर चित्पावनी जजमेंटें ठोकलीं आहेत. पैकीं पहिलें :—

" मंत्रवदुपनयाचा आग्रह बाळाजी आवजीच्या पुढारपणाखालीं प्रथम (?) शिवाजीच्या कारकीर्दीच्या शेवटास झाला. बाळाजी आवजीची मंत्रवदुपनयना संबंधानें फिर्याद शिवाजीनें आपला पुत्र जो संभाजीराजा त्याजकडे सोंपविली, असा उल्लेख सांपडतो. (कोठें ?) संभाजीनें चांद्रसेनीय कायस्थ क्षत्रिय नाहींत, व मंत्रवदुपनार्ह नाहींत असा निकाल दिला. "

श्रोत्यांना रंजविण्याकरितां हरदासबुवा जशीं वडाची साल वांग्याला लावून कित्येक स्वकपोलकल्पित गोष्टी, शक्याशक्यतेची पर्वा न करतां; बेधडक सांगतात, त्या हरदासी गोष्टींच्याहि तोंडांत मारण्याइतकी हातचलाखी–नव्हे, बातचलाखी या उताऱ्यांत राजवाड्यांनीं दाखविली आहे, हें त्यांच्या वैऱ्यांनाहि मान्य करावें लागेल. असली विवेचनपद्धति आणि ऐतिहासिक गोष्टी हरदासी धाटणीनें दडपून ठोकण्याची राजवाड्यांची उलटी छाती पाहिली कीं ते कादंबरीकार होण्याऐवजीं इतिहाससंशोधनाच्या फंदांत चुकून कसे पडले, याचें कोणी प्रथम संशोधन करील तर बरें, असें आमच्याप्रमाणें इतरांनाहि वाटल्याशिवाय रहाणार नाहीं. शिवाजीच्या राज्याभिषेक प्रसंगीं दक्षिणी ब्राह्मणांनीं जी आपल्या

## अकलेची धूळवड शेणवड

खेळली आणि बाळप्रभू चिटणिसादी कायस्थ प्रभूंच्या धोरणी डांवपेचांची सज्जर जोडेपैजार खाल्ली, त्यांचें शल्य विद्यमान ब्राह्मणबुवांना रात्रंदिवस डांचत असतें. अलीकडे दरसाल होत असलेल्या शिवजयंत्युसव आणि राज्यभिषेकोत्सवांच्या प्रसंगीं तर हें भिक्षुकी पाप ठळक रीतीनें ' राष्ट्रीय ' चित्पावनांना आंतून खवखवत असतें. हें पाप एकदां कसेंबसें कायमचें गाडावें आणि शिवकालीन भटांचा हा महारोग कायस्थांच्या टाळक्यांवर लादावा, याविषयीं राजवाडेप्रभूती मंडळभगतांचे जारी प्रयत्न सुरू आहेत. प्रयत्नांबरोबरच

## कायस्थ मराठ्यांत फाटाफूट

पाडण्याचा कावा अगदीं उघड माथ्यानें चालू आहे. आणि कित्येक अकलमंद मराठे या काव्याला बळीहि पडत आहेत. ' ग्रामण्यांचा साद्यंत इतिहास ' अखिल महाराष्ट्रापुढें आम्ही सन १९१९ सालींच ठेविला असल्यामुळें प्रस्तुत ग्रंथाच्या या द्वितीयाऽवृत्तींत आम्ही तपशीलाचा संकोच केला तरी चालण्यासारखें आहे. ' शिवाजीचें व अखिल मराठ्यांचें क्षत्रियत्व शिवकालापूर्वीहि सर्व भिक्षुकांना मान्य होतें. पण या नाठाळ कायस्थ खटपटयांमुळें तो इतिहास विकृत झाला व सज्जन भिक्षुकशाही विनाकारण दोषी ठरली, वास्तविक खरे शूद्र हे लडभडे कायस्थ. यांना मंत्रवदुपनयाचा अधिकार नाहीं. मराठे खरे क्षत्रिय. त्यांच्याविषयी किंवा शिवाजीविषयी अथवा शिववंशजांविषयीं एकाही ब्राह्मणानें कधींहि आक्षेप घेतला नाहीं. ' ही विचारसरणी ऐतिहासिक सत्यांत जाम जखडून बसविण्यासाठीं राजवाड्यांनीं मंडळाच्या चतुर्थ संमेलनवृत्तांत दीपाचा उपद्व्याप केला, तर ठाण्याच्या विनायक लक्ष्मण भाव्यांनीं मराठी दप्तराच्या रुमालांत मालोजीच्या खोपटींत अग्निहोत्राचें पात्रच निर्माण केलें. शिवाजीच्या आजालाच अग्निहोत्री बनविला कीं शिवकालीन कायस्थांच्या शिवराज्याभिषेकाच्या वेदोक्ताच्या खटपटी आपोआपच स्वार्थी व पाचकळ ठरतील, हा सारा एवढ्या चित्पावनी काव्याचा रोख आहे. हा रोख मराठ्यांच्या पचनीं एकदां सरळ जाऊन पडला कीं कायस्थांचें व मराठ्यांचें कायमचे बिनसलें ! या पोरकट किंबहुना हलकट धोरणाचा मालमसालाच राजवाड्यांच्या प्रस्तुत विधानांत पडलेला आहे, हें सांगणें नकोच.

चां. का. प्रभूंच्या ग्रामण्यांचा इतिहास म्हणजे त्यांच्या राजकीय उत्कर्षाबद्दल ब्राह्मणांना पदोपदीं वाटणाऱ्या वैषम्याच्या आणि मत्सराच्या तडफडाटाचा इतिहास होय. ही एक व्याख्या नीट लक्षांत ठेविली की, ग्रामण्याविषयीं किंवा वेदोक्तपुराणोक्ताबद्दल वेळोवेळीं होणारा भिक्षुकी शिमगा म्हणजे काय असतो, हें तेंव्हाच उमगून येईल. बहुजनसमाजाच्या दातृत्वावरच जगणाऱ्या भिक्षुकशाहीनें प्रत्येक वेळी निर्वाणीचा दर्भ म्हणून ब्राह्मणेतरांच्या धर्माचरणाविषयीं आक्षेप घ्यावे, आणि मानसिक गुलामगिरीत पिचणाऱ्यांनीं या नकली भूदेवांची मनधरणी करावी, असा मूर्खपणाचा प्रघात आजवर चालूच आहे. यालाच राजवाडे ' मंत्रवदुपनयनाचा आग्रह ' असें भिक्षुकी नांव देतात, आणि म्हणतात कीं, हा आग्रह ' बाळाजी आवाजीच्या पुढारपणाखालीं प्रथम शिवाजीच्या कारकीर्दीच्या शेवटास झाला. ' विद्याशंकर भारतीच्या काळापासून तों पुण्यास चित्पावन नोकरशाहीचें तळपट उडेपर्यंत चां. का. प्रभूवर एकंदर दहा ग्रामण्यांचा हल्ला भटांकडून चढविण्यांत आला. मग शिवकालीन् ग्रामण्याला राजवाडे पहिला नंबर कसा देतात ? बरोबर. बाळाजी आवजीच्या चिटणिशीपूर्वी त्यांना ' सर्व अंधार ' दिसत आहे; अर्थात् त्यांनींच आपल्या खंडांत पूर्वीच्या ग्रामण्याची दिलेली माहिती त्यांना आतां कां दिसावी व दिसली तरी कां पहावी ? बाळ प्रभूवर झालेल्या ग्रामण्याचा विस्तृत इतिहास आम्ही प्रसिद्ध केला आहे तो वाचकांनीं मुद्दाम पुन्हां तपशीलवार वाचावा, अशी विनंति आहे. त्यांत (१) बाळप्रभूचा व शिवाजीचा अत्यंत स्नेह. (२) त्या आत्मभावाचा तत्कालीन कित्येक मराठे सरदार व देशस्थ ब्राह्मण अधिकाऱ्यांवर होणारा राजकरणी वर्चस्वाचा साहजिक परिणाम आणि (३) शिवाजीच्या उत्कर्षाबद्दल ठिकठिकाणी रुजूं लागलेल्या मत्सराची पाळेमुळे समूळ उपटून टाकण्यासाठी राज्याभिषेक करून घेण्याची बाळाजीने शिवाजीला सुचविलेली युक्ति, हीं मुख्य कारणे आहेत.

पूर्वीच्या दोन आणि या पुढच्या सात ग्रामण्यांप्रमाणेच प्रस्तुतच्या वादांत वेदोक्ताची किंवा धर्माची मामुली लंगडी सबब जरी पुढे होती, तरी राजकीय वर्चस्वाचें वैषम्य त्यांत विशिष्ट होतें, हा सिद्धांत सर्व निःपक्षपाती इतिहासकारांनी मान्य केलेला आहे. मोहिते महाडीक निंबाळकर सावंत जाधव घोरपडे वगैरे बडेबडे मराठे सरदार पहिल्यापासूनच शिवाजीच्या राज्यभिषेकाच्या कल्पनेला विरुद्ध, तर एकटा बाळाजी त्यांच्या विरोधाच्या विरुद्ध, अशी ही चुरशीचीं सुरुवात. * ' महाराजांचा राज्याभिषेक वेदोक्तच झाला पाहिजे, तो मी अवश्यमेव घडवून आणीन ' या बाळाजीच्या प्रतिज्ञेने चिडलेले भटमंडळ उपरोक्त मराठे सरदारांच्या बगलेंत घुसले आणि बाळाजीवरच ग्रामण्याचा हल्ला चढवून, अप्रत्यक्षपणे राज्यभिक्षेक–कल्पनेची गर्भहत्या करण्याचा बूट अस्तित्वात आला. ' टोपी–बदल ' हें सुताच्या जानव्याप्रमाणेंच भटाचे दुसरे वर्म आहे. असा वारा तशी शिडे फडफडविण्यांत भिक्षुकशाही अनामिका म्हणून प्रसिद्धच आहे. कार्य साधण्यासाठी दक्षिणी ब्राह्मण वाटेल त्यांच्या पाया पडतील आणि अस्पृश्योद्धाराचा नाटकी डोल आणून महार भंग्यांच्याहि गळयांत गळा घालतील. निःकायस्थ पृथिवी होत असेल तर मराठ्यांना क्षत्रियचसें काय पण ब्राह्मणहि म्हणावयास ते चुकणार नाहीत; किंबहुना ब्राह्मणांची उत्पत्ति मराठ्यांपासून झाली, असे जाहीरनामे फडकविण्यासहि मागेपुढे पहाणार नाहीत. मात्र काम झाल्यावर भटांचा रामराम घेतांना, त्यांच्या पचनी पडणारांची काय दाणादाण उडते, याचे अनुभव प्रत्यहीं ब्राह्मणेतरांच्या परिचयाचे आहेतच. असो. म्हातारीने कोंबडें झांकण्याचा आटोकाट प्रयत्न केला, पण अखेर उजडावयाचें तें उजाडलेच. शिवरायाला पट्टाभिषेक झाला, बाळप्रभूवरील ग्रामण्याचे धुकें पार वितळून गेले आणि शिरजोर झालेल्या सर्व मराठे सरदारांनी व मगरूर ब्राह्मणांनी छत्रपतीच्या सिंहासनापुढे बिनशर्त माना वांकविल्या.

चां. का. प्रभूंवरील भिक्षुकी आक्षेपांचा निवाडा रघुनाथ पंडीताच्या ' मिती शके १५९१ सौम्यनाम संवत्सरे मार्गशीर्ष शु० ११ ' च्या आज्ञापत्राने सर्वत्र जाहीर झाला. त्यात " चांद्रसेनी दालभ्यगोत्री प्रसिद्ध राहतील. ते क्षत्रियवर्ण कलगुयीं आहेत...द्वेषबुद्धीनी कर्म करण्या चालविण्यास बखेडा करितील ते देवाब्राह्मणाचे द्रोही व राजदंडास अधिकारी होतील. " (ग्रा० पृ. १९) असा स्पष्ट उल्लेख आहे. राजवाड्यांनीहि आपल्या ६ व्या खंडांत (पृ. ५२३, ५४६, ५४८) या प्रकरणाचे कांही कागद छापिले आहेत. पण ते आतां नवीनच कादंबरी बरळूं लागले आहेत. ते म्हणतात की बाळप्रभूच्या वेदोक्ताचा तंटा शिवाजीने आपल्या संभाजी पुत्राकडे जजमेंटासाठी पाठविल्याचा या महापंडिताला उल्लेख सांपडला आहे आणि संभाजीने कायस्थ क्षत्रिय नाहीत व मंत्रवदुपनयनार्ह नाहीत असा ' कडक ' भाषेत निकाल सांगितला. संभाजीच्या कमिशनरशिपचा उल्लेख राजवाड्यांना कोणत्या गळाठ्यांत सांपडला याची त्यांनी कोठेच वाच्यता केलेली नाही.

* For although the high-spirited Deccan nobles gladly followed Shivaji in the fild, they were unwilling in private life to concede to him any precedence. And at state dinners they resented that a Bhosla should sit on a seat raised above those assigned to Mohites and Nimbalkars, Savants and Ghorpades. He spoke of the matter to his secretary, Balaji Abaji Chitnis, and the latter urged him to take the royal crown from the hands, not of a Moghul Emperor, but of a Benaras priest. The king consulted his mother Jijabai, the saintly Ramdas and his favourite goddess Bhavani and found them all favourable to his secretary's suggestion.

Kincaid & Parasnis, Maratha History
Part I, page 2244.

मंडळाच्या चतुर्थ संमेलनवृत्ताचा ' दीप ' अखिल महाराष्ट्रभर पाजळून आज सहा वर्षें झाली व मंडळांतहि या मुद्यावर श्रीयुत वासुदेव सीताराम बेंद्रे यानीं दस्तऐवजी चर्चा केली; तरीहि या उल्लेखाबद्दल मंडळ किंवा राजवाडे यांनी अझून चकार शब्द काढलेला नाही. अर्थात् हा सर्व ' दडपून देतो ऐसाजे ' चाच धाडसी प्रकार ठरतो. संभाजीच्या कमिशनरशिपचे राजवाडी विधान पाहिलें म्हणजे झांशीच्या राणीला पृथ्वीराज चव्हाणाची मावस बहीण ठरविणाऱ्या आंग्लेतिहासकारांस हंसण्याची आतां सवडच नाहीं. संभाजीचा जन्म शक १५७९ (सन १६५७) साली झाला. (पहा मंडळाचे चतुर्थ संमेलनवृत्त; जेधे शकावली पृ. १८१) बाळप्रभूवरील ग्रामण्याचे निराकरण करणारे रघुनाथपंत हणमंते ' पंडितराव ' याचे आज्ञापत्र ' मिति शके १५९१ सौम्यनाम संवत्सरे मार्गशीर्ष शु. ११ ' चे आहे. (सन १६६९) या दोन काळांतले अंतर पहा :—

ग्रामण्य–निवृत्ती.........................................सन १६६९
संभाजीचा जन्म...........................................सन १६५७

**ग्रामण्याच्या वेळीं संभाजीचें वय १२ वर्षांचे होतें.** ग्रामण्यासारख्या बिकट धार्मिक भानगडीच्या प्रश्नाचा निकाल लावण्यासाठी १२ वर्षांच्या शेंबड्या पोराला कमिशनर नेमणारा शिवाजी मराठी स्वराज्यसंस्थापक खास नसावा. तो कोणीतरी राजवाड्यांचया विश्वमित्री सृष्टींतील दुसराच एकदा अक्कलशून्य टोणपा असावा, हे उघडच दिसते. आधुनिक पुणेकर संशोधक आपल्या ऊर्ध्वमुखी मेंदूतून काय काय नवीन सृष्ट्या निर्माण करतात, हें नुसते पहाणें देखिल मोठे करमणुकीचे साधनच आहे. राजवाड्यांच्या या काल्पनिक कादंबरीतून आणखी काय काय हास्यास्पद विधाने निघतात ती पहा.

[१] ग्रामण्याचा प्रश्न धार्मिक. वैदिक धर्म म्हणजे छप्पन्न गुंतागुंतीचे कैवर्तकी जाळे. देशकालपरिस्थितीप्रमाणे अखिल मराठ्यांना व खुद्द शिवाजीच्या घराण्याला वेदोक्त पुराणोक्ताची दाद सुद्धा नव्हती. मालोजी, शहाजी, शिवाजी अगर संभाजी यांपैकी एकाचाहि व्रतबंध, किंवा उपनयनविधि झालेला नव्हता. तो प्रघातच त्यांना माहीत नव्हता. तो प्रघातच त्यांना माहीत नव्हता. * बाळप्रभूनें राज्याभिषेकाचा आग्रह धरिला तेव्हांच वेदोक्त–पुराणोक्ताचा वाद उपस्थित झाला आणि अनेक भानगडींना तोंड देऊन एकट्या शिवाजीचा मुंज त्याच्या वयाच्या ४५ व्या वर्षी राज्याभिषेकप्रसंगी लागली. असल्या शिवाजीला कायस्थांच्या धर्माधिकारांचा निर्णय लावण्यात बारा वर्षाच्या संभाजीला कमिशनर नेमण्यास राजवाडे लावतात, तेव्हां त्यांच्या सारासार बुद्धीचें दिवाळे वाजले असे कोणी म्हटल्यास त्यांत वावगे ते काय ?

[२] अर्धी अधिक हयात खलास झालेल्या विसाव्या शतकांतील पदवीधर, समाजशास्त्री, व्युत्पत्तीप्रदीप व इतिहास-संशोधक राजवाड्यांना जर एवढेहि तारतम्य नाही, तर १७ व्या शतकांतला, अशिक्षित, केवळ १२ वर्षे वयाचा अल्लड कोवळा पोर, ज्याची मुंजहि झालेली नाही, वेद कशाशी खातात व पुराणे कशाशी पितात हेहि ज्याला माहीत नाही. असल्या संभाजीला राजवाडे कायस्थांच्या धर्माधिकार-निर्णयाचे कमिशनर नेमतात, तेव्हां हे इतिहास-संशोधन की भांग्यामारुतीच्या अड्ड्यावरच्या गप्पा ?

---

*आतां माहित झाला आहे तरीहि मराठ्यात सध्यांहि उपनयनविधी मुळींच रूढ नाहीं.

[३] ज्या शिवाजीच्या घराण्यांत वेदोक्ताबद्दल धुमाकूळ घालण्यात दक्षिणी भिक्षुकांना अझूनहि शरम वाटत नाही, कोल्हापूरच्या शाहू महाराजांना व अखिल मराठ्यांना तंजावर केसच्या जजाने शूद्र ठरविल्यामुळे महादेव राजाराम बोडसासारखे चित्पावन आनंदाने टिऱ्या फुटतात, त्याच भोसले घराण्यांतला अप्रबुद्ध संभाजी म्हणे ' कायस्थ प्रभू शूद्र आहेत ' असा कडक भाषेत निर्णय देतो, आणि संभाजीचा हा निर्णय तत्कालीन व वर्तमान भटाभिक्षुकांना शिरसावंद्य मान्य होतो; हे तर महदाश्चर्यच मानले पाहिजे.

[४] धार्मिक बाबीबद्दल छत्रपतींचे किंवा भोसल्यांचे किंवा मराठयांचे निर्णय जर त्या वेळीं सर्व भटांना मान्य होत होते तर ते आतांच कां होत नाहींत ? कोल्हापूरच्या विद्यमान क्षात्र वैदिक शाळेबद्दल नालिस्त्या करणाऱ्या भटांची गति कोणत्या नंबरच्या नरकात आहे, हे राजवाडे किंवा मंडळ सांगू शकेल काय? बरें ज्या संभाजीची ' वेदोक्त ' मुंजच झालेली नव्हती, व म्हणूनच ज्याला वेदाक्षर ऐकण्याचा किंवा उच्चारण्याचाही अधिकार नव्हता, त्याकडे वेदशास्त्रसंपन्न भटमंडळ धार्मिक निर्णय मागण्यास गेले, ते कोणत्या वेदाच्या आधारावर ?

[५] शिवाय, चां का प्रभू आणि खुद्द शिवाजी यांचा अनोन्य संबंध लक्षात घेतां, राजवड्यांनी संभाजीच्या कमिशनरशिपचे जे पिल्लू आपल्या चित्पावनी कल्पनेतून उबवून काढले आहे ते किती खोडसाळ आहे याचा तेव्हांच निकाल लागतो. ज्या शिवाजीनें सर्व महाराष्ट्रीयांच्या आधीं चां का. प्रभू सरदारांस आपलेसें करून, त्यांच्या हिमतीनें व एकनिष्ठेनें आपल्या सर्व महत्त्वकांक्षा रंगरूपास आणल्या; ज्या कायस्थ प्रभू सरदारांच्या रक्तावरच शिवाजींचे हिंदवी स्वराज्याचे टोलेजंग बुरूज उभे केले; जो शिवाजी बाळचिटणिसाविषयी

### बाळाजी माझा प्राण आहे

असे वारंवार नुसतें म्हणतच नसे, तर स्वदस्तुराच्या पत्रांत * सुद्धां स्पष्ट नमूद करतो कीं " तुम्ही स्वामीसेवा बहुत निष्ठेनीं करून श्रम साहस फार केलें, राज्यभिवृद्धीच्या कामीं आलां. " तोच शिवाजी बाळप्रभूच्या धर्माधिकार-निर्णयाचें किचकट काम संभाजीसारख्या बारा वर्षांच्या अल्लड मुलाकडे सोंपवितो ! ही कल्पना लढविणारा कादंबरीकारही मूर्ख ठरेल, मग इतिहास-संशोधक म्हणविणाराच्या तोंडात कोणी शेण घातल्यास त्यांत नवल नाहीं, धर्म-संरक्षणाच्या सबबीखालीं ब्राह्मणांनीं शिवाजीच्या विरुद्ध जीं कुटील कारस्थाने लढविलीं, त्यांवर मंडळाभिमानी राजवाडे भावे प्रभृतीनें पांघरून घालण्याचा केवढाहि आटोकाट यत्न केला, तरी

* स्वस्तिश्री राज्याभिषेक १ आनंदनाम संवत्सरे, ज्येष्ठ वद्य प्रतिपदा भानुवासरे, क्षत्रिय कुलावंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी यांणीं **राजकर्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री बाळाजी प्रभु चिटणीस** यासी आज्ञा केली ऐसीजे :-तुम्ही स्वामीसेवा बहुत निष्ठेनें करून, श्रमसाहस फार केले. राज्यवृद्धीचे कामीं आलां. यावरून तुम्हावर कृपाळू होऊन अष्ट प्रधानांतील पद द्यावे असे मनीं आणिं असतां, तुम्ही विनंति केली कीं आपणाकडे चिटणीसीचा दरख चालत आहे, हा अक्षयी वतनी वंशपरंपरेनें सन्निध व सर्व राज्यांतील चालवावा व कारखानीसी आणि जमेनिसी दोन धंदे राज्यांतील आपल निसबतीस दिल्हे, ते अक्षयी असावे. याजवरून कृपा करून चिटणिसी सन्निधानची व सर्व राज्यांतील तुम्हांकडे दिल्ही असं. **स्वामीचे वंशीचा कोणी अन्यथा करणार** नाहीं. तरी लिहिल्याप्रमाणे सदरहू प्रयोजनाचे व्यापाराची सेवा तुम्ही व पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें करून सुखरूप अनुभवणें.आणिजे. छ. बहूत काय लिहिणे. शके १५९६ ज्येष्ठ वद्य १.

शिवाजीनें भटांवर उगविलेल्या सुडाच्या आसुडाचे तडाखे आरोपींची पाठ आरपार फोडून इतिहासांत उमटले * आहेत. ' तारिख–इ–शिवाजी ' या बखरीतला उतारा पहा :—

'' गंगा (गागा) भट बनारसहून आला होता, त्याजकडून शिवाजीनें वेदमंत्र शिकून ब्राह्मणासारखे आचरण करण्यास सुरूवात केली. त्यावरून सर्व ब्राह्मणांनीं गागाभट्टावर बहिष्कार घातला. त्यावर शिवाजीने असा हुकुम काढिला कीं ' ब्राह्मण हे धर्मगुरू असून वंद्य आहेत; परंतु राज्यांत त्यांस नोकरीस ठेवणें हा धर्माचार नाहीं, सबब देवार्चनापलीकडे दुसऱ्या कोणत्याहि सरकारी कामांत त्यांस नेमण्यांत येऊं नये, ह्या हुकुमानुसार ब्राह्मणांस नोकरीवरून काढून त्यांच्या जागा प्रभूंस देण्यांत आल्या. तेव्हां ब्राह्मणाबद्दल मोरोपंतानें पुष्कळ रदबदली केली. तो म्हणाला, ' महाराज, आपण म्हणतां हाच खरा मार्ग, परंतु आपल्या खास नोकरींत एकटया प्रभूंवर विश्वास ठेवणे वाजवी नाहीं त्यामुळें राज्यास हानि, धोका अगर संकट येईल.' शिवाजी बोलला, ' प्रभूंची जात सर्वथैव विश्वासपात्र आहे. सीदीसारख्या परक्यांनीं सुद्धां राजपुरीच्या रक्षणास प्रभु ठेविले आहेत. ते ती नोकरी विश्वासानें बजावित असून प्रसंगीं आपले प्राण खर्ची घालण्यासहि ते कमी करीत नाहींत.' तेव्हां मोरोपंत निरूत्तर झाला.'' **सरदेसाईकृत मराठी रियासत पृ. ४९४)** यावरून स्पष्ट सिद्ध होईल कीं संभाजीच्या कमिशनरशिपबद्दलचें राजवाड्यांचें विधान निव्वळ काल्पनिक अतएव अत्यंत खोडसाळपणाचें व खोटें आहे.

संभाजीच्या कमिशनरशिपबद्दल राजवड्यांनी जी एक पुणेरी गप्प ठांसून भिरकावून दिली, तिच्या पुष्टीसाठीं पुढें ते आणखी काय म्हणतात ते पहा :—

'' ह्या सामाजिक वादाचे राजकीय परिणाम मोठे विलक्षण व भयंकर झाले. चांद्रसेनीयांच्या वेदादिधारकाला संभाजी राजानें विरोध केला व तो सौम्य भाषेला सोडून केला. त्याचा परिणाम असा झाला कीं **सर्व कायस्थ मंडळ संभाजीच्या विरूद्ध गेलें.** शिवाजीच्या मृत्यूची बातमी वेळेवर संभाजीला कळली नाहीं. संभाजीच्या मनात येऊ नये, त्या मुत्सद्यांविषयीं संशय येत चालले. त्या संशयाला कायस्थ, ब्राह्मण, मराठे, स्त्रिया व पुरूष बळी पडले. कलुशाखेरीज संभाजीला विश्वासपात्र असा माणूस मिळण्याची पंचाईत पडली. शेवटीं शत्रूच्या हस्तें संभाजी मृत्यु पावला. **ह्या सर्व क्रांतीला सामाजिक विषमतेचा जाच असह्य होऊन संतप्त झालेले कायस्थ कारण झालेले आहेत, अशी तत्कालीन राजकारणाचें अंतरंग बारकाईने पाहून, माझी समजूत झालेली आहे.''**

संभाजीनें चांद्रसेनियांच्या वेदाधिकाराला विरोध केल्याची जी गप्प राजवाड्यांनी झोकून दिली आहे. ती सौम्य भाषेंत होती का नव्हती, यांच्याशीं आम्हाला काही एक कर्तव्य नाहीं.

---

* कारखान्यांकडून ब्राह्मण कारकून दूर करून प्रभु कारखाने यांत ठेविले. त्यांजवर मोरोपत बोलिले कीं कारखानीयऋजे हुद्दे मातबऱ्या लोकांवर टाकले यानें नाश होईल. तेव्हां राजियानें उत्तर दिलें कीं, ज्या जागेचा ब्रह्मणांवर इतबार टाकिला ती जागा अम्हास हस्तगत जाहली. राजपुरीं प्रबूंवर हबशी यांचा इतबार ती जागा हस्तगत होत नाहीं. जे स्थळीं प्रबूंवर इतबार तें स्थळ एकाएकीं येत नाहीं. त्यांजवर इतबार असावा. मग निळोपंत व मोरोपंत मनांत खोंचल, उगेच राहिले.''

संभाजीच्या कमिशनरशिप बद्दलचें विधानच सपशेल ढांसळून पडल्यावर राजवाड्यांच्या याबद्दलच्या पुढील कादंबरीशीं माथेफोड करीत बसण्यात अर्थ नाहीं, हें उघडच आहे. त्यांतूनही राजवाड्यांनीं बालसंभाजीच्या जजमेंटाबद्दलचा उल्लेख किंवा दस्तऐवजी पुरावा पुढें आणून आजपर्यंतच्या या ग्रामण्य प्रकरणाच्या उपलब्ध कागदपत्रांवर डांबर ओतण्याचें श्रेय मिळविलेलें नाहीं. अर्थात् या मुसक्या कल्पनेशीं लढत बसणे केव्हांही वाजवी होणार नाही. बारा वर्षांच्या बालसंभाजीच्या कमिशनरशिपबद्दलचा राजवाड्यांचा अस्सल व विश्वसनीय दस्तऐवज पुढे येऊन त्यानें तत्कालीन श्रीशंकराचार्यांच्या आज्ञापत्रांना आणि बखरींना एकदां पाजी ठरविले कीं त्याचा विचार पुढें पहाता येईल परंतु येथेही मोठी अडचण आहे कारण राजवाड्यांची जगद्‌गुरूंच्या पीठाबद्दलची अनन्य भक्ति ते येणेप्रमाणें प्रसिद्ध करीत आहेत. ते पृ. ४८ वर म्हणतात, **शंकराचार्यांदींचीं धर्मपीठें आहेत; त्यांवर अजाण भटभिक्षुक क्षुद्रपणें विराजत आहेत. कायस्थांच्या मागण्यांचें स्वरूप काय त्यांचा इतिहास काय, त्यांना प्रतिरोध केला त्याची फळें काय, व त्या पुरवावयाच्या कशा, या बाबीसंबंधानें आचार्यांच्या ठायीं व आचार्यांच्या सल्लागारांच्या ठायीं पूर्ण अज्ञान आहे.** " या उद्‌गारांवरून जगद्‌गुरूंच्या पीठासनाचा

## चित्पावनांना मिळालेला " पक्का काट "

राजवाड्यांच्या अंतःकरणाची कशी लाही लाही उडवीत आहे, हें कळून येईल. ज्या सद्‌गृहस्थाला शंकराचार्यांच्या गादीवरील प्रत्येक प्राचीन अर्वाचीन धर्माधिकारी ' अजाण भट भिक्षुक क्षुद्रपणें ' विराजणारा दिसतो आणि ज्याचे सल्लागार सुद्धां ' अज्ञानी ' दिसतात, त्याच्या धर्मलंडपणाबद्दल हिंदुसमाजाने त्याची कीव करण्यापलीकडे अधिक काय करावें ?

राजवाड्यांनी संभाजीच्या कारकीर्दीतच कायस्थ प्रभूंना राजद्रोही ठरविण्याचा केलेला उपक्रम हास्यास्पद असला तरी कानाडोळा करण्याइतका क्षुद्र नव्हे. या उपक्रमाचा हेतु फार खोल व अत्यंत दुष्टाव्याचा आहे. बऱ्याच शहाण्या कायस्थ प्रभूंना त्याची चित्पावनी नांगी दिसणार नाहीं व भासणारहि नाहीं, इतक्या सफाईत हा दंश करण्यांत आलेला आहे. शिवाय, हा दंश मंडळाच्या अहवालांतच वज्रलेप मुद्रित करून ठेवल्यामुळें तर त्याचे घोर परिणाम कायस्थ प्रभूंच्या भावी वंशजांना एकलहरी सर्पदंशाप्रमाणें केव्हां ना केव्हां भोगणें प्राप्तच आहे. अखिल महाराष्ट्रीय हिंदु समाजांत इमानाची व स्वामीनिष्ठेची प्रौढी मिरवणारी एकच कां. कां. प्रभू जात आहे. * चित्पावनांच्या उत्पत्ति स्थितीचा इतिहास म्हणजे अथेति निमकहरामिचा, असा निदान सर्वत्र लौकीक आहे. पूर्वीची मराठेशाही सोडली तरी चालू आंग्लाईत सुद्धां

## चित्पावन मंडळ इंग्रेजांच्या विरूद्ध

गेल्याचे दाखले दररोज दिसत आहेत, राजवाड्यांच्या मनोवृत्तीच्या चित्पावनांची अशी पोरकट समजूत झालेली दिसते कीं आपल्या जातीची ही नामुष्की नाहींशी करायला, इतर जातींविषयीं तसल्याच नामुष्कीचे कांही तरी लेखी पुरावे दस्त करून ठेवले म्हणजे झालें, वेळ आली कीं बोट दाखवायला जागा तरी झाली! दुष्कृत्यांचें परिमार्जन करण्याची ही तऱ्हा मननीय नाहीं असें कोण म्हणेल ? यामुळें कायस्थांची बदनामी करण्याचें वीरकंकण हातीं बांधलेल्या राजवाडे

* या सद्‌गुणांचा सध्यां विकृत अर्थ घेऊन, इंग्रजी नोकरशाहीची कारकुंडेगिरी करणें हींच कायस्थांचीं लक्षणे होऊन बसली आहेत, हें दुर्दैवच म्हटलें पाहिजे.

भावे प्रभृतींच्या इतिहास-संशोधनाची गति वक्रनयनी झाली असल्याचे मासले अलीकडे पदोपदी आढळतात. भाव्यांचें ' मराठी दप्तर ' घ्या, मंडळाची ' संमेलन वृत्तें ' घ्या किंवा इतर टांचणे टिपणें घ्या, त्यात

## माझ्यासारखी कधीं होशील

ही वृत्ति उद्दाम झालेली आढळते. मग संभाजीच्या खुनाची व तत्कालीन राज्यक्रांतीची जबाबदारी राजवाड्यांनी कायस्थांवर न टाकावी तर काय करावें ? ब्राह्मण उघडाउघड ब्रह्ममुखोत्पन्न! सर्व जगत्रय म्हणजे त्याची जन्मप्राप्त जहागीर सर्व विश्वच त्यांचें. त्यांच्यावर खुनांचा व राज्यक्रांत्रीचा आरोप कोणी कसा सिद्ध करणार ? बारा वर्षांच्या बालसंभाजीच्या जजमेंटनें चिडून संतप्त झालेल्या हरामखोर व खुनशी कायस्थ मंडळाच्या कारस्थानामुळें संभाजीचा खून व राज्यक्रांति झाली, अशी तत्कालीन राजकारणाचें अंतरंग बारकाईनें पाहून ' समजूत झालेल्या ' राजवाड्यांना, कोणी झाला तरी हाच सरळ प्रश्न विचारील कीं ' कायस्थ विरूद्ध गेले ही गोष्ट खरी मानली, तरी संभाजीचा शब्द वेदवाक्य मानणारे भिक्षुकशाहीचे खंदे वीर महावीर व मुत्सद्दी ऐन राज्यक्रांतीच्या प्रसंगी कोठें मेले होतें ? त्यांनी खुनशी कायस्थांच्या चळवळींना पायबंद कां लावलां नाहीं ? अवघ्या महाराष्ट्रांत जर ' शिवकाली चांद्रसेनीयांची संख्या ५००० हून जास्त नव्हती ' (राज. पृ. ३९) आणि ब्रह्ममुखोत्पनांचा पसारा ढेंकूण चिलट डांसाइतका विश्यव्यापी होता, तर त्यांना या अल्पसंख्य हरामखोरांचा संभाजीच्या जिवासाठी कांहीच बंदोबस्त करतां येऊं नये ? असेंहि धरलें की सगळे ब्राह्मण अद्वैत चिंतनांत गांजाधुंद होते, तर संभाजीचा राज्यक्रांती टाळण्यासाठीं कोणकोणत्या ब्राह्मण वीरांनी आपल्या जिवाची मसणवटी केली, याचा पुरावा मंडळानें किंवा राजवाड्यांनी अवश्य द्यावयास पाहिजे होता. अझुनहि त्यांनी तो द्यावा, अशी आमची आग्रहाची विनंती आहे. मात्र, राजद्रोहाचें व स्वराज्यनाशाचें शाब्दिक खापर कायस्थांच्या टाळक्यांवर फोडून जर या संशोधक महात्म्यांचे पूर्वज गतीला जात असतील आणि यांना स्वतःला याच जन्मीं मोक्षपद सुलभ असेल, तर त्यांनीं खुशाल आणखीहि विश्वमित्री सृष्ट्या निर्माण कराव्या. कोणीहि कायस्थ किंवा ब्राह्मणेतर त्याना आड येणार नाहीं. वाटेल तर त्यांनीं स्वतःसाठीं महाराष्ट्राचा इतिहास उलट्या पावलांनीं लिहून काढावा; त्यालाहि आमची ना नाहीं.

मंडळांतल्या काहीं नवीन तरूण संशोधकांनीं राजवड्यांना ' गुरूवर्य गुरूवर्य ' किंवा ' इतिहाससंशोधनेश्वर ' म्हणून आकाशाइतके उंच धरले, आणि ' संभाजीकालीन राजकारणाचें अंतरंग मी अगीं बारकाईनें संशोधन केले ' असल्याची त्यांनी केवढीहि घमेंड मारली असली, तरी आम्ही प्रतिज्ञापूर्वक सांगू शकतों कीं राजवाड्यांना संभाजीकालीन् इतिहासाचा श्रीगणेशा सुद्धां अझून उमगलेला नाहीं. अलीकडे प्रो. जदुनाथ सरकार वगैरे संशोधकांनीं संकलित केलेल्या साहित्यावरून असें स्पष्ट दिसतें कीं उपलब्ध

## संभाजीचें चरित्र अत्यंत विपर्यस्त

आहे. तो जितका क्रूरकर्मा, व्यभिचारी, व्यसनी किंवा उतावळा म्हणून रंगविण्यात आलेला आहे, तसा वास्तविक प्रकार आतां दिसत नाहीं. संभाजी विरूद्ध कारस्थानें लढविणाऱ्या कंपूनें स्वत:वरील राज्यक्रान्तीचें पाप टाळण्यासाठीं संभाजीविषयीं भलभलत्या कंड्या उलटविल्या व त्या बखरींत उमटविल्या, असें सिद्ध होण्यास आतां फारसा अवकाश नाहीं. आमचा मुख्य मुद्याचा प्रश्न एवढाच आहे कीं सर्व कायस्थ मंडळ (निदान कांहीं थोड्या कायस्थ व्यक्ति तरी) संभाजीच्या

विरूद्ध गेल्या होत्या काय ? शिवछत्रपतीच्या स्वराज्य स्थापनेंत अकल्पनीय धडाडीनें व अतुल स्वार्थत्यागानें पुढाकार घेणारे कायस्थ प्रभु शिवाजीचा मृत्यु होतो न होतो तोच निमकहराम बनून राज्यक्रांती करण्यास कां उद्युक्त होतात ? राज्यक्रांती किंवा संभाजीचा वध साधण्यांत त्यांचा हेतु काय ? बरें, दुसऱ्याच छत्रपतीच्या अमदानींत कायस्थ लोक क्रांतीकारक बनतात किंवा ठरतात, तर पुढील संबंध मराठेशाहित व पेशवाईतहि सर्व राजकारणाच्या नाजूक व महत्वाच्या जागांवर कायस्थ मुख्यत्यारीनें राहिले ते त्यांच्या एकनिष्ठेवर, कर्तबगारीवर, स्वराज्याभिमनावर टिकले, कां सारे छत्रपति व पेशवे हेच मूर्ख व टोणपे होते ? अझूनहि बऱ्याच देशी संस्थापनांत कायस्थ दिवाण व कारभारी आहेत; ते कायस्थांच्या राज्यक्रांतिकारक चित्पावनी वृत्तीच्या पुण्याईवरच टिकले आहेत काय ? आजपर्यंतचा उपलब्ध इतिहास पाहिला तर असे स्पष्ट दिसून येते कीं

**छत्रपतीच्या तक्ताशीं चित्पावन मात्र बेइमान**
**झाले; कायस्थ प्रभू अखेरपर्यंत**
**राजनिष्ठच राहिले.**

शिवकालीन् स्वराज्यस्थापनेची आणभाक करणाऱ्या दादजी नरस प्रभू देशपांड्यापासून तों शेवटच्या प्रतापसिंहासाठी तब्बल १४ वर्षे विलायतेंत झगडणाऱ्या रंगो बापूजीपर्यंत कोण कोण कायस्थ छत्रपतीच्या तक्ताशी बेईमान झाले, त्यांची यादी मंडळानें अवश्य प्रसिद्ध करावी, असा आमचा आग्रह आहे. घमेंडखोर मंडळ या विनंतीकडे ढुंकुनहि बघणार नाहीं हे आम्ही जाणून आहों. एखाद्याच्या घराला आग लावून स्वस्थ मौज पहात बसणें हें ब्राह्मणांचे शील सर्वश्रुतच आहे. शिवाय इतरांना असभ्य ठरविण्यासाठीं ' मौनं सर्वार्थ-साधनम् ' मुलाम्यानें स्वतःला सभ्य मानण्याच्या कामीं मंडळाचे कार्यकतें मोठे इब्लिस आहेत.

मराठी स्वराज्याच्या कल्पनारंभापासून तों चित्पावन नोकरशाहीच्या अरेरावी वर्तनामुहें तें टार होईपर्यंत छत्रपतींच्या नावाचा तक्ताचा आणि स्वराज्याचा अभिमान धरून अनेक हाल अपेष्टांना आंणि मत्सरी ग्रामण्यांनाजर कोणी तोंड दिले असेल तर ते एकट्या चां. कां. प्रभु समाजानेंच मराठी राज्याचा पायांत मराठ्यांच्या जोडीनें **कायस्थ प्रभू वीराच्यांच** आहुती पडल्या. तीव्र विरोधांना किंवा ग्रामण्यासारख्या मत्सरी छळांना दाद न देतां छत्रपतींच्या राज्यभिषेकासारखा ऐतिहासिक सुप्रसंग कायस्थांनींच पार पाडला. शिवाजीमहाराजांपासून तों शेवटच्या छत्रपतीपर्यंतच्या प्रत्येक छत्रपतीच्या महत्त्वाच्या कामीं कायस्थ प्रभू वीरांचेंच रक्त खर्ची पडलेलें आहे. **मराठयांच्या सत्तेचा उत्कर्ष** पृ० ३६–३७ वर **न्या. रानडे** म्हणतात कीं '' ज्या जातींवर देशाची सारी भिस्त अशा प्रमुख प्रमुख जातींमधून शिवाजीनें आपलें प्रधानमंडळ निवडून काढलें होतें.'' चित्पावनांची जात त्या वेळी अंधारांतच असल्यामुळें, न्यायमूर्तींनी या मजकुरापुढें तत्कालीन मावळे, मराठे, देशस्थ ब्राह्मण आणि चां. का. प्रभू या शर्तीतील जी प्रमुख प्रमुख वीरांची नांवनिशी दिली आहे, त्या यादीत सहाजीकच चित्पावनांचा वाससुद्धां कोठे येत नाहीं. या यादीनंतर न्यायमुर्तींनीं शेरा दिला आहे कीं '' **यांपैकीं एकानेही शिवाजीशीं**

निमकहरामपणा केला नाहीं.'' निमकहरापणाचें बीज * कोंकणातून आलें आहे आणि ते पेशव्यांच्या अमदानींत चित्पावनांनी आपल्या भाग्योदयार्थ जेव्हां कोकणांतून घाटमाथ्यावर प्रयाण केले, त्या वेळीच ते त्यांनीं बरोबर आणलें, हे ऐतिहासिक सिद्ध तत्व कोणी कितीही मल्लीनाथ्या आणि व्युत्पत्त्या लढविल्या तरी खोडलें जाणें शक्य नाहीं.

शिवाजीच्या कारकीर्दीपासून-किंवा विधानार्थ त्याच्या शेवटच्या भागापासून म्हणा, तो संभाजीच्या अंतापर्यंत चां. कायस्थ प्रभूंपैकी मुख्य पुढारी बाळाजी व त्याचा मुलगा खंडो बल्लाळ हे दोघेच जरी गणतींत घेतले, तरी त्यांनी छत्रपतीच्या तक्ताशीं किंवा खुद्द छत्रपतीशीं काय विरोध किंवा कोणता निमकहरामपणा केला, हें पाहिलें पाहिजे.

शिवाजी हयात असतांनाच घरगुति कलहला व सापत्न मातेच्या मत्सराला कंटाळून संभाजी घराबाहेर पडला व मोंगलाईत दिलेलखानास मिळाला. यांत स्वराज्यद्रोह झाला, असे उथळ विचार करणारे वाटेल तर म्हणोत. खरी वस्तुस्थिति अशी कीं तारूण्यानें फुरफुरलेल्या या मर्द मराठ्याला, शिवसिंहाच्या या सवाई पराक्रमी छाव्याला राजवाड्यांतल्या निष्क्रीय आयुष्यापेक्षां, मोगलाईतच का होईना, कर्तबगारीला काहीतरी वाव पाहिजे होता. पुढें लवकरच तो परत येऊन पन्हाळ्यास शिवाजीस भेटला. सर्व गोष्टींचा खुलासा केला आणि '' आपणांस साहेबांचे पायाची जोड आहे. आपण दुधभात खाऊन साहेबांचे पायाचें चिंतन करून राहीन. '' (सभासद पृ. ९४) अशी प्रतिज्ञा करून तेथेंच राहिला. शिवाजीच्या शेवटच्या दुखण्यांतच सोयराबाईच्या ' राजाराम-राज्याभिषेका ' चे कारस्थान सुरू झालें व त्याला बहुतेक सर्व ब्राह्मण मंत्रीमंडळ सामील झालें. शिवाजीचा मृत्यु (३ एप्रिल १६८०) होतांच या कारस्थानाला जोर आला. संभाजीला पन्हाळ्यासच एकाकी कैद करून राजाराम राज्याभिषेक उरकण्याच्या या कारस्थानाला फक्त एकट्या बाळाजी आवजीचा कट्टा विरोध. शिवराई नाण्याप्रमाणें चिटणीशी लेखणीच्या मखलाशीचा दरख तमाम रियासतींत राजमान्य व लोकमान्य असल्यामुळें चिटणीसानेंच पन्हाळ्याच्या बंदोबस्ताचीं पत्रें लिहिल्याशिवाय मोरोपंत पिंगळे, अण्णाजी दत्तो सचिवादि मंत्र्यांच्या नुसत्या अकलेची मखलाशी फुकट होती. बाळाजीची मंत्र्यांनी पुष्कळच मनधरणी केली. त्यानें स्पष्ट जबाब दिला '' आम्ही दरखदार राजांचे, खावंद वडील संभाजी महाराज असतां अशीं पत्रें आम्ही लिहिणार नाहीं. तेव्हां तुम्हांस हा आग्रह करण्याचें कारण नाहीं. '' (चिटणीस, पृ. २) परंतु मंत्र्यांचा आग्रह अगदीं निकरावर आला. त्यांतच सोयराबाईच्या कडक आज्ञेची भर पडली :-''तुमचे हातचें पत्र नसल्यास लोकांस पत्राचा विश्वास पडणार नाहीं. यास्तव तुम्हाकडे दरख, त्या अर्थे बरी वाईट पत्रे तुम्ही लिहावी, हें तुम्हांस प्राप्त. लिहून

---

* '' हे लोक (चित्पावन, मनाचे सरळ नसतात; आणि अल्पस्वल्प स्वार्थासाठीं राज्याचीं राज्यें धुळीस मिळविण्याला मागे पुढें न पाहणारे लोक या जातीमध्ये आजपर्यंत पुष्कळ उत्पन्न झाले आणि त्यांनीं आपले पराक्रमहि त्या रीतीनें दाखविले. ××× स्वजातीच्या हितासाठीं अन्य जातींशीं द्वेष करून त्यांचे जे वास्तविकं हक्क किंवा अधिकार त्यांकडे दुर्लक्ष करणें, किंवा दाबून टाकणें हें मात्र वाईट. यद्यपि चित्पावन ब्रह्मणांमध्ये अशा प्रकारचे कित्येक लोक झाले. खरे, आणि अझूनहि असल्या कोत्या मनाचे कित्येक त्यांच्यामध्यें आहेत, हेहि खरें. ××× यांच्या आंगीं आर्जव शक्ति हें मोठे कसब आहे आणि तेणे करून ते कसलेहि मोठे काम सहज तडीस नेतात.''

कै. रा. भि. गुंजीकरकृत सरस्वतिमंडळ.

(२) '' ते (चित्पावन) स्वावलंबी, मेहनती, कोठेही पुढे घुसणारे, दीर्घ सूचना मनांत आणणारे, पण कांहीं अंशीं आपल्यापुरतें पाहणारे, बुद्धिमान् पण संकुचित दिलाचे लोक आहेत.''

रा. नरसोपंत केळकर, केसरी ३-१०-१९२०

द्यावीं.'' सत्तेपुढें शहाणपण व समर्थापुढे अहंता चालविणे बरे नव्हें, म्हणून नाइलाजानें '' मी लिहित नाहीं. मूल आवजी बावा आहे, त्यास स्वाधीन करितों. पाहिजे तसे करवा.'' असें सांहून बाळाजी वैतागानें स्वस्थ बसला. बाळाजीचा मुलगा आवजी याचें अक्षर थेट बापाच्या मखलाशीचें असे. त्याचा फायदा मंत्र्यांनीं घेऊन आवजीकडून वाटेल तशीं पत्रें लिहून घेतली. संभाजीनें हीं पत्रे पकडलीं. तेव्हां संभाजीपुढें जबाब देतांना :—

'' * * * बाळाजी आवजी यांनीं उत्तर दिल्हे कीं, राजाराम सहिष्णु
'' आणि माहाराजांचे मनापासोन यास अधिकारी करावें व सर्वांचीं
'' अंतःकरणें त्याचे ठायीं वागतात खरीं; परंतु ईश्वराची मर्जी असती
'' तरी राजाराम साहेबांस ज्येष्ठत्व कां दिलें नाहीं ?
'' तस्मात् संभाजी महाराजांचा पुण्योत्कर्ष, उग्रसेवेचें माहात्म्य ! त्यांत सोयराबाई साहे-
'' बांनीं विषप्रलय करून महाराजांस मारिलें तें सविस्तर राजश्रीस
''' कळलें. तेव्हा त्यांचा माथां आप्रमाद नाहीं.''

**चिटणीसकृत बखर**

असा स्पष्ट खुलासा होतांच '' चौक्या उठविल्या. बाळाजी आवजी प्रभु चिटणवीस यांनीं आपलें काम करावें असें सांगून (संभाजी महाराजानें) कृपा केली. '' (कित्ता पृ. ६) इतकेंच नव्हे तर सर्वत्र शांतता झाल्यावर रायगडावर जो पहिला दरबार भरला त्यावेळीं बाळप्रभूला उद्देशून संभाजीनें काढलेले उद्‌गार पहाः—

'' *** कचेरी करून सर्वांस बोलावून 'चुकली गोष्ट आहे ती तुम्हास
'' माफ केली. मनुष्यापासोनच विरुद्ध गोष्ट घडते ती घडली. तुम्ही
'' या गोष्टीची काळजी शपथपूर्वक करूं नका. तुम्ही सांगाल तशी मी
'' वर्तणूक करीन. महाराजांचे हाताखालीं वागला ; त्या अर्थी तुम्ही
'' आम्हांस त्यांचे ठिकाणीं आम्हां राज तुमचें, बुडवा वा तारा.' सर्वांस
'' जीव भरंसा वाटून आपापले कामावर सर्व हमवार जाले.''

**चिटणीसकृत बखर**

तत्कालीन् कायस्थांचा मुख्य पुढारी बाळप्रभू चिटणीस हा वरील पुराव्यावरून तरी, संभाजीच्या विरुद्ध गेला, असें मुळीच सिद्ध होत नाहीं. विरुद्ध गेलेल्या मंडळींची त्या खवळलेल्या नरव्याघ्रानें ठेवलेली बरदास्त बखरींत येणेंप्रमाणें आढळून येते—'' किल्ल्यावरील लोक कित्येक फितले होते. दिंडी लाविली नाहीं. महाराज दिंडीनेंच किल्लयावर गेले. कंक व सरनोबत भेटले आणि कान्होजी भांडवलकर हवलदार सदरेस होते त्यांस आधी कैद केले. आणि **मोरोपंत प्रधान व अंणाजी सचिव यांचे घरी चौक्या पाठऊन कैद केले.....मोरोपंत प्रधान व सचिव यांचीं घर लुटून बेड्या घातल्या.** '' मोरोपंत सचिवादि प्राणी कायस्थ प्रभु असल्याचा पुरावा आम्हाला माहीत नाहीं. मग, ही बक्षिसी राजनिष्ठेबद्दल मिळाली कीं काय ? राज्याभिषेकाच्या वेळीं मात्र '' त्रिबंक बाजी देशपांडे खासनीस यांणीं व आणखी ममतेंतील यांणीं महाराजांस विनंती करून बोलले कीं ' साहेब सिंहासनाधीश होणार आणि प्रधान यांचे घरी चौक्या हें विहित नाहीं.' याजवरून चौक्या उठविल्या.'' (चिट. ६) सारांश, संभाजीच्या कारकीर्दीच्या सुरुवातीलाच

त्याच्याविरुद्ध जें कारस्थान झालें, तें राजकीय होतें, धार्मिक नव्हतें. त्यांत मुख्य पुढाकार मोरोपंतादि ब्राह्मणांनी घेतला होता ; बाळप्रभूचा व कायस्थांचा त्यांत मुळीच संबंध नव्हता, हें सिद्ध करण्यासाठी आणखी पुरावे मंडळाला पाहिजे असतील तर त्यांनी संशोधनवृत्ती सोडून प्रथम इतिहासवाचन करावें, अशी सूचना आहे.

यापुढें असा प्रश्न साहजिक येतो कीं जर बाळप्रभूविषयीं आलेल्या संशयाची संभाजीची निवृत्ति झाली होती, तर त्यानें बाळप्रभूला पुढें हत्तीच्या पायीं कां दिलें ? या कटाची थोडी परिस्फुटता केली पाहिजे. त्यासाठीं कांहीं महत्वाच्या हकीकतींच्या तारखांची जंत्री खालीं देत आहें :—

## सन १६८०

१९ मे ते १६ जून :—आण्णाजी दत्तो, मोरोपंत पिंगळे, प्रल्हाद निराजी यांनी सेनापति हंबीरराव मोहिते कैद करून संभाजीपुढे पन्हाळ्यास आणतो. सर्व लष्कर संभाजीला छत्रपति मानतें.

१२ जून :—संभाजी पन्हाळ्याहून निघतो.

१८ जून :—संभाजी रायगडला येऊन राज्यकारभार हातीं घेतो. व राजारामाला कैद करतो.

२० जुलई :—संभाजीचा राज्यभिषेक.

१२ ऑक्टोबर :—मोरोपंत पिंगळ्याचा रायगडास मृत्यु.

२० नवंबर :—बाळप्रभूचा मुलगा आवजी बल्लाळ संभाजी छत्रपतीचा खलिता घेऊन वकील नात्यानें मुंबईला टोपकर कंपनीकडे जातो.

## सन १६८१

ऑगष्ट :—संभाजीला विषप्रयोग करण्याचें कारस्थान उघडकीस येतें.

४ ऑगष्ट :—आण्णाजी दत्तोवर नाराजी होऊन तो ठार मारला जातो.

२ सप्टेंबर :—बाळाजी आवजी चिटणीस, महादाजी अनंत, सोमाजी दत्तो व हिरोजी फरजंद यांना ठार मारण्यांत येतें.

या जंत्रीवरून वाचकांना स्वतंत्रपणे पुष्कळ अनुमाने काढतां येतील. संभाजी रायगडास आल्यानंतर तब्बल एक वर्ष दोन महिने बाळप्रभू आपल्या चिटणिशीवर मुखत्यारीनें होता. राज्यभिषेक झाल्यानंतर बरोबर चार महिन्यांनी आवजी पंडिताला (बाळाजीच्या मुलाला) 'ॲम्बासडर' दरबारी वकील नात्यानें बनिया कंपनीकडे मुंबईस पाठवितो. अर्थात चिटणिसाच्या घराण्याबद्दल किंवा सर्व कायस्थांबद्दल संभाजीचा विश्वास अभंग होता, हें सिद्ध होतें. सन १६८१ च्या ऑगष्टमध्यें अवचित विषप्रयोगाचे कारस्थान उघडकीस येतें आणि तडाक्यासरसा आण्णाजी दत्तो सचीव ४ ऑगष्टला ठार मारला जातो. नंतर एक महिन्यानें बाळाजी व इतर मंडळी ठार मारली जातात. बाळाजीला ठार मारविण्याची जी **ब्राह्मणी कारवाई** झाली ती याच महिन्यांत.

ब्राह्मणी कारवाईचा नेहमीं एक विशेष असतो. तो म्हणजे ' परभारें पावणे तेरा ' हा होय. सातारा राज्याचें व प्रतापसिंह छत्रपतीचे बारा वाजविण्यांत सुद्धां कुप्रसिद्ध चित्पावन ' आयागो ' बाळाजीपंत नातू यानें हेंच धोरण स्वीकारलें होतें. आजहि नेहमीच्या व्यवहारांत ब्राह्मणी कारस्थानाचें धोरण पाहुण्याच्या टाळक्यानें विंचू ठेंचण्याचेंच असतें. ब्राह्मण कधीं उघड माथ्यानें समोरासमोर येऊन भिडत नाहीं. तें त्याचें ब्रीद नव्हे, ती त्याची अक्कल नव्हे, तें त्याचें तोंड नव्हे, तो त्याच्या रक्ताचा गुणच नव्हे ! संभाजीचा कलुषा झाला तरी भिक्षूकच. दक्षिणी आण्णाजी दत्तो झाला काय किंवा उत्तरी कलुषा झाला काय, सर्व ब्राह्मण एकजात एकजात एकधोरणी. कलुषा हा कवि होता. त्याची रंगेल बायको * त्यानें स्वामीचरणीं अर्पण केली होती ; अर्थात् तो मोठा स्वार्थत्यागी ब्राह्मण म्हटला पाहिजें. हा महान् कपटी व धूर्त भिक्षुक अवरंगझेबाचा कारस्थानी ' सीएडी ' म्हणून दक्षिणेंत येऊन मराठी स्वराज्याच्या काळजाशीं चिकटून बसला होता. त्याच्या शाबरी मंत्राच्या प्रभावाखालीं संभाजी पूर्ण दडपला गेला असतांना त्याच्या गुप्त पत्रामुळें दिल्लीहून नूरमहंमदखान दक्षिणेवर गनिमी काव्याची चाल करून आला. त्यावेळीं बाळाजीनें संभाजीला खऱ्याखुऱ्या परिस्थितीची निर्भीडपणें ओळख देऊन, त्यास ताळ्यावर आणण्याचें धाडस केलें. संभाजीच्या नजरेस कलुषांचीं कारस्थानें आलीं व त्यानें बाळाजीनें लिहून आणलेल्या पत्रांवर स्वदस्तुरचें शिक्का मोर्बत केलें. ही पत्रें शंकराजी नारायण सचीव व श्रीनिवासराव प्रतिनिधी यास पोंहचतांच त्यांनीं नूरमहंमदच्या सैन्याचा पार धुव्वा उडविला. स्वराज्यनिष्ठेला स्मरून बाळाजी आवजीनें संभाजीला जर याच प्रसंगीं जागें केलें नसतें, तर कलुषाच्या या पहिल्या कारस्थानालाच संभाजी बळी पडला असता हें अधिक विषद करून सांगायला नकोच. अर्थात् राजवाड्यांच्या कल्पित कादंबरीप्रमाणें संभाजी कमिशनरच्या जजमेंटानें चिडून जाऊन सर्व कायस्थ मंडळ त्याच्याविरुद्ध गेलें असें जर मानलें, तर बाळप्रभूच्या या उत्कट कामगिरीची वासलाद ते कशी काय लावणार ? राजवाड्यांच्या मत्सरी संशोधक बुद्धीला या कामगिरीचें महत्व फारसें वाटणें शक्य नाहीं हे खरें, परंतु या कामगिरीच्या उलट्या पेंचामुळें कलुषाच्या कारस्थानाला जो जबरदस्त धक्का बसला, त्यामुळे तो तरी बाळप्रभूच्या चिटणीशीला यापुढें वचकूं लागला. इतकेंच नव्हे तर मराठी राज्य बुडविण्यापूर्वी त्या राज्याच्या **चिरस्थाइत्वाला सदैव चैतन्य देणारा आत्मा** जो बाळाजी आवजी त्याचा कांटा प्रथम दूर करण्याकरितां त्याला उपाय शोधावे लागले. हे उपाय शोधीत असतांनाच त्याला एक चित्पावनी वृत्तीचें कायस्थ पात्र हाताशींच सांपडले आणि ब्राह्मणांच्या लोकविश्रुत पॉलीसीप्रमाणें.

## कायस्थाच्या नरड्यावर कायस्थ

बसवून कलुषानें आपला डाव बोलबोलतां सिद्ध केला. स्वार्थासाठी आपल्या जातभाईचीं आंतडीं खाणारा कायस्थाधम म्हणजे **दादजी रघुनाथ देशपांडे महाडकर** हा होय. † याचा व बाळप्रभूचा

* कवि कलुषा कबजी म्हणोन कणौजी ब्राह्मण बहुत विद्वान्, मंत्रशास्त्र विद्या आंगम त्यास बहुत गम्य असे होते. त्यांची स्त्रीहि चतुर होती. त्यांनीं महाराज वश करावे म्हणून वशीकरण मंत्रप्रयोग करून महाराजांची बहुत जवळीक व कृपा संपादून आगोदर राज्याभिषेकापूर्वी होतेच. **चिट. पृ. ७.**

† या हरामखोरानें शिवाजीच्या वेळीं बेलवाडीच्या येसप्रभूचा गळा कापला व सावित्रीबाई ठाणेदारणीलाहि अधर्मयुद्धानें पकडली. बाळप्रभू चिटणिसालाहि अखेर हाच भोंवला. असला नराधम शंख प्रभूरत्नमालेंत गोवणाऱ्या कायस्थ मालाकाराची तारीफ करावी तेवढी थोडीच.

द्वेष होता. कबजी आल्यापासून ही स्वारी त्याच्या पुठ्ठ्यांत, कृपेंत, अगदीं थेट अंतरंगांत घुसलेली असे. पहिल्यापासुनच या केतूचा बाळप्रभूच्या चिटणिशी व कारखानिशी दरखावर डोळा होता. हा कबजीच्या पुठ्ठ्यांतला असल्यामुळें संभाजी छत्रपतीशीं याला केव्हांहि मज्जाव नसे. सन १६८१ च्या ऑगष्टांत विषप्रयोगाचें फिसाट उपटतांच या चित्पावनी कायस्थानें, कलुषाच्या चिथावणीवरून, संभाजीच्या कानाला, बाळप्रभूविरुद्ध दंश केला. आधींच संभाजी भरंसाट पिसाळलेला, त्यांतच दादजीनें आगींत तेल ओतलें. " चिटणिशी व कारखानिशी आपण करावी हे इच्छा (धरून) महाराजांस सुचविलें जे बाळाजी आवजी चिटणीस याणी पत्रें फितव्याची एकंदर राज्यांत व पन्हाळयास लिहिली असता, त्याजवर कृपा करूं नये. येखत्यारींत ठेवणें चांगले नाही. त्यांचें भाऊ शामजी आवजी कारखाननीस व सचिव यांनीं राजकारण हे बळाविलें." (चिट. पृ. ९) झालें. विषाचा एक थेंब पुरें.संभाजी महाराज म्हणजे काय ? स्वराज्यांतल्या फितुरांनी व कलुषाच्या भिक्षुकी डावपेचांनीं पुरे ' हॅमलेट ' बनलेले. त्यांनीहि " होय, फितव्यांत होते. पण बाळाजींनी आग्रह धरून पत्रें लिहिली नाहींत." असे म्हटलें. त्यावर " सरकार, ही शुद्ध लुच्चेगिरी आहे. आपण नामानिराळें राहून पुत्राला पुढें केला. दुसरें काय ? " अशी दादजीची मखलाशी होतांच ताबडतोब सर्वच जबाबदार चिटणिसांना हत्तीच्या पायाखालीं ठार मारण्याचा हुकूम. तोंडीं हुकूम मिळण्याचाच काय तो अवकाश, कलुषा तो अंमलांत आणून पार मोकळा ! अशा रीतीनें कलुषानें आपल्या वाटेंतला कांटा दूर केला. पण दादजी रघुनाथ देशपांड्यांना चिटणिशी व कारखाननिशी ? वाचकहो, जरा थांबा. बाळप्रभूची चिटणिशी म्हणजे पेशव्याची पेशवाई नव्हें ती असल्या उलट्या काळजाच्या कारस्थानानें मिळेल व मिळाली तरी पचेल ! बाळाजी, त्याचा पुत्र आवजी व बंधु शामजी या तिघांचा खून झाल्याचें वर्तमान येसूबाईला कळतांच तिनें संभाजीची झणझणीत कान उघडणी केली. ती म्हणाली " बाळाजी प्रभु मारिले हें उचित न केलें बहुता दिवसांचे आणि इतबारी व पोक्त. थोरले महाराज कृपाळू, सर्व अंतरंग त्याजपाशीं होत. चिटणीस राज्याचे व आपले प्राण ऐसे म्हणत आले. वंशपरंपरेनें चिटणिशी देऊन पत्र शपथपूर्वक त्यांस दिलें. तें माहित असोन, त्यांणीं अपराधहि कांही केला नाहीं. (असे असतां) लहानांचें (क्षुद्रांचें) सांगण्यावर हे गोष्ट कशी केली ? सर्व कारकून गेले, मारिले, बेदिल झाले, अन्यायीही झाले, एक एक होते तेहि ऐसे केलें पुढें राज्य कसें चालेल ? " यावर संभाजी महाराज म्हणतात, " आमचेही मनांत ही गोष्ट नव्हती. परंतु रागाचें समयीं बोललों तितक्यावर परवानगी सांगून झालें ते वाईट वहटून उठून आलो. वाईट गोष्ट झाली खरी. तुम्ही त्यांचे धाकटे पुत्र दोघे आहेत ते खासगीकडे (ठेवून) त्यांचा बंदोबस्त दरमहा देऊन चालवावा. त्यांचे कारकून लिहिणार त्यांचे हातेंच काम चालविण्याचें. मुलें लहान आहेत त्यांजवर कृपा करावयाची. " बाळप्रभूच्या सर्व चरित्राचा अंत हा असा झालेला आहे. यांत 'वेदोक्त' कोठें आलें, 'संतप्त कायस्थ' कोठें घुसले, 'विषमतेचा जाच असह्य झालेले' चांद्रसेनीय कोठें रुसले, तें फक्त मंडळाला व दीर्घबुद्धी राजवाड्यांनाच माहीत. बाळाजी आवजीचें समग्र चरित्र वाचणाऱ्या कोणत्याहि स्वकीय परकीयाला ज्याच्या अराजनिष्ठेचा कधीं पुसटसुद्धां संशय आला नाहीं, त्याच प्रभुवीराच्या माथीं राजवाडे एखाद्या बेफाम दरोडखोराप्रमाणें प्रभुद्रोहाचें खापर फोडतात व मंडळ या हलकट कृत्याला आपल्या चतुर्थ संमेलनवृत्तांत प्रसिद्धी देतें, या कृत्याला नाव तरी काय द्यावें ?

आतां संभाजीच्या सर्व कारकीर्दीत अनेकांपैकीं जो कायस्थ प्रभू प्रामुख्यानें आढळतो, तो वरील बाळाजी आवजीचा मुलगा खंडो बल्लाळ हा होय. याचेहि समग्र चरित्र आजला उपलब्ध नाहीं असें मुळीच नाहीं. पण तें पहाण्याची राजवाडे तसदी घेतात कशाला ? तथापि या प्रभूवीराच्या राजनिष्ठेबद्दल इतर बखरकारांच्या पुराव्यांचा उल्लेख करण्यापूर्वी न्यायमुर्ती रानड्यांचा अभिप्रायच प्रथम घेऊं. म. स. उत्कर्ष पृ. ११०-१११ वर ते म्हणतात :—

'' प्रभूजातीच्या सरदारांपैकी दोघांची नांवें सांगण्याजोगीं आहेत. पहिला खंडो बल्लाळ चिटणीस–शिवाजीचा मुख्य चिटणीस बाळाजी आवजी याचा मुलगा. त्याच्या बापास व चलुत्यास संभाजीनें जरी निर्दयपणानें ठार मारिलें होतें, तरीपण खंडोपंतानें एकनिष्ठपणानें चाकरी करून पोर्तुगीज (फिरंगी) लोकांबरोबर झालेल्या लढाईंत त्यानें तरवार गाजविली. सबब संभाजीची त्यावर मर्जी असे.''

राजवाडे हा उतारा नीट लक्षपूर्वक वाचतील, तर चिकित्सक न्यायमूर्तींनीं अनेक ऐतिहासिक कागदांचे तीक्ष्ण अशा न्याय बुद्धीनें परिशीलन करून काय निष्कर्ष काढला, हें त्यांना नीट पटेल. कायस्थांच्या वेदोक्त अधिकाराविरूद्ध संभाजी गेल्यामुळें कायस्थ त्याच्याविरूद्ध गेले, त्यामुळें सर्व तंत्र बिघडून संभाजी पकडला व मारला गेला, असें म्हणून त्यावेळच्या क्रांतीची जबाबदारी राजवाडे कायस्थांच्या माथीं मारतात. वरील साधार विवेचनावरून हें स्पष्टच होत आहे कीं शिवाजीच्या घराण्याची निरपेक्ष सेवा करण्याच्या कामांत अग्रगण्य आणि ज्यांच्या स्वामीभक्तीच्या बळावरच मराठेशाहीची स्थापना झाली त्या चांद्रसेनीयांवर कोणत्याही इतिहासकारानें आजपर्यंत राजद्रोहाचा असला घाणेरडा आरोप ठेवलेला नाहीं. संभाजीला दुर्व्यसनपराङ्‌मुख करण्याचा प्रयत्न चां. कां. प्रभूंनीच केला. अनेक प्रसंगीं संभाजीचा जीव चां. का. प्रभूंनीच वाचविला. अर्थात् संभाजींच्या वेळीं राज्यक्रांती होऊन संभाजींचा जो हृदयविदारक अंत झाला त्याला कारण कायस्थ प्रभूंचा राजद्रोह नसून भिक्षुक मंत्र्यांच्या कारस्थानांनीं उत्पन्न झालेली बेबंदशाही होय, असें सिद्ध करून दाखविण्यास फारसे प्रयास पडणार नाहींत. इतिहास पाहिला तर असे स्पष्ट दिसून येईल कीं राजद्रोहाचें कडू चित्पावनांना आरंभापासूनच पाजलेलें आहे ; हे त्यांचा प्रवेश राजकारणपटांगणात झाल्यापासूनच दिसून येतें ! बाळाजी विश्वनाथापासून शेवटच्या बाजीरावापर्यंतच्या कोणत्या पेशव्यानें स्वामीद्रोह केला नाहीं तें दाखवून द्यावें, असें आमचें चित्पावनांना आव्हान आहे. अलीकडे इंग्रजीशाहींत राजद्रोहाचा धडा इतरांस चित्पावनच घालून देत आहेत हें प्रस्तुतच्या राज्यकर्त्यांनीं सर्वांस वेळोवेळी सिद्ध करून दाखविलें आहेच. मराठेशाहींतील ब्राह्मणांनी राजद्रोह केल्याची प्रत्यंतरें पहावयाचीं असल्यास कै. भागवत यांचे **मराठ्याचे चार उद्‌गार** हें पुस्तक पहावें. मराठी इतिहासांतील अत्यंत बारीकसारीक मुद्यांची चिकित्सा करताना न्या. रानड्यांना ज्या प्रभुंच्या अराजनिष्ठतेचा किंचितसुद्धा कोठें भास झाला नाहीं. त्याचा राजवाड्यांना संभाजीच्या सर्व चरित्रांत येथून तेथून सारखा वास यावा, हें त्यांच्या **विघडलेल्या घ्राणेंद्रियाचें स्पष्ट चिन्ह** नव्हे काय ? सर्व कायस्थ मंडळ संभाजीच्या विरूद्ध कसे गेलें याचा उलगडा फक्त राजवाडेच करूं जाणोत. इतिहास या बाबतीत अगदी निधड्या छातीनें त्यांच्या विधानांच्या चिंधड्या चिंधड्या उडवीत आहे. खंडो

बल्लाळानें संभाजी महाराजांना अनेक संकटातून * वांचविले आहे. त्याने गोव्यानजीक कुंभार जुवें येथील लढाईत छत्रपतीच्या तक्तासाठीं तरवार गाजविली आहे. वसईच्या फिरंग्यावरली मोहीम याच प्रभू सरदाराने यशस्वी केलेली आहे. सन १६८५ त संभाजीची छावणी संगमेश्वरला असतांना, एका मुसलमान सरदाराने येसूबाईचा मेणा कब्ज करून नेला असतां, तिच्या सुटकेसाठीं आणि पातिव्रत्यसंरक्षणार्थ खंडो बल्लाळनें आपल्या मावस बहिणीचा **संतुबाईचा बळी दिला आहे** आणि संभाजी महाराजांना शेवटच्या कड्याबेड्या पडेपर्यंत वेळप्रसंग पाहून हरहमेष परिस्थितीची ओळख पटविण्यास न कचरणाऱ्या खंडो बल्लाळानें अखेर मोगलांनी धनि पकडतांच त्याचा कबिला स्वतः संरक्षण केला. हीं व आणखी अशींच अनेक आणीबाणीचीं स्वामिकार्ये खंडो बल्लाळानें-केवळ संभाजीच्याच कारकिर्दीत नव्हे तर-शाहू महाराजांच्या राज्यारोहणापर्यंत करून, इतिहासाच्या प्रत्येक पृष्ठाला आपल्या स्वामीनिष्ठेचे पोवाडे गायला भाग पाडलें आहे. हीं सर्व पृष्ठें खोटीं आणि राजवाड्यांची ' समजूत ' मात्र खरी ! तेव्हां **केसरीने** म्हटल्याप्रमाणें मनूच खास बदलला म्हणायचा ! नाहींतर, ज्या गोष्टींचा निर्णय एकदोन वेळ नव्हे तर शेकडों वेळां तावून सुलाखून ठरला गेला आहे, त्याच गोष्टीं उकरून काढून, राष्ट्रीय संघशक्तीच्या सध्यांच्या उत्क्रांत्यवस्थेंत राजवाड्यांनीं ' जातींजातींत वैमनस्य ' उत्पन्न करण्याचा देशद्रोही उपक्रम कशाला केला असता ? चां. का. प्रभू समाजाला निष्कारण डिंवचल्यामुळें आणि चित्पावनांच्या प्रस्तुत उन्नतीच्या आद्यजनकास ज्या ज्या समाजांनीं (चां. का. व देशस्थ) हाती धरून आश्रय दिला, त्यांच्याशीं बेइमान झाल्यामुळें महाराष्ट्राला केवढ्या राष्ट्रीय आपत्तीखालीं दडपून जाऊन स्वत्वपराङ्मुख व्हावे लागलें, याची तिळमात्र पर्वा न करतां, बेधडक वाटेल तो मजकूर बेगुमानपणानें छापण्याच्या धारिष्ट्याबद्दल भा. इ. सं. मं. ची करावी तितकी तारीफ थोडीच ! **" संभाजी महाराज व राजाराम साहेब यांचे कारकिर्दीत ग्रामण्य झालें नाहीं. यथास्थित चाललें.** " ही जुन्या बखरीची साक्ष आहे आणि कै. न्या. तैलंग यांनीहि ती सप्रमाण मान्य केली आहे, तर ' सामाजिक विषमतेचा जाच असह्य होऊन कायस्थ संतप्त झाले ' तो जाच कोणता ? शिवकालीन् काय किंवा इतर कालीन कायस्थ

---

* (१) पुढें स्वारी गोव्याचें राजकारण झालें ह्मणून तिकडे गेली. बरोबर **खंडोबा** गेले. बरोबर एक कलमदान व कागदचे भेंडोळे घेऊन नेहमीं स्वारीबरोबर धांवावें. एके दिवशीं संभाजीचा घोडा खाडींत पोहणीस लागला. जेरबंद होता यामुळे घोडा घाबरा झाला. तेव्हां **खंडोबानीं** पाण्यांत शिरून जेरबंद कापिला. इतक्यात एक शिपाई गलीमाचा पोहून सरकारवर चालून आला. त्याचे डोकींत कलमदान घातलें आणि घोडा कडेस आणिला. हें पाहून खंडोबास पोटाशीं धरून, तूं खरा इमानी आहेस असें बोलिलें. आणि अंगावरील पोषाख काढून दिला, आणि हींच वस्त्रें असें बोलिले. (सन १६८३).
**—कायस्थ प्रभूंच्या इतिहासाचीं साधनें पृ. ९-१०.**

(२) याच प्रसंगाबद्दल आणखी दुसरा दस्तऐवज म्हणतो कीं :—" खासा राजश्रीनींही शिपायगिरी फार केली. त्यांचे रुबरू आप्पांनींही (खंडोबल्लाळनीं) तशीच केली. चार पांच फिरंगी कासे (खासे ?) तरवारीनें ठार केले. हें राजेश्रीनीं रुबरू पाहून यशस्वी होऊन आलीयावरी राजश्रीनीं अप्पाशीं पोटाशीं धरून शाबासकी दिली. " **—टीप १ पृ. २२६ प्रभुरत्नमाला.**

(३) " अप्पास पोटाशीं धरून ' शाबास. तुझी चिटणीशी तुजला बहाल वतनी असे. जा तुझे वंशास धंदे चालविणार नाहीं तो भोंसल्याचा वीर्यज नाहीं ' असें बोलेन बहुमान केला. " **—कित्ता. टीप १ पृ. २२८.**

(४) गोव्याच्या स्वारीवर जातांना संभाजीच्या मागें कलमदान घेऊन धांवत असतांना—" अप्पास (खंडोबास) कळमळ येऊन रक्तवमन झालें. राजेश्रीनीं मागें फिरोन पाहिलें. दृष्टीस पडल्यावरी पालखी उभी करोन बोलावून आणोन मेहेरबान होवौन, स्वारीचा कोतवालापैकीं एक घोडा बसावयास दिल्हा. तसेंच अप्पास एक नामी तरवार पण राजश्रीनीं देऊन, दुष्टांचा समाचार चांगला घेण्यास तू डरू नको असे सांगितले. " **—कित्ता. टीप २ पृ. २२४.**

काय, किती झाले तरी ते आपल्या पुढाऱ्याच्या चळवळीच्या अनुषंगानेंच राहणार. त्यांचा तत्कालीन् पुढारी म्हटला म्हणजे खंडो बल्लाळ. त्याच्याच विषयीं न्यायमूर्ती पुढे म्हणतात :—

" संभाजीच्या मरणानंतर तो राजारामाबरोबर जिंजीस गेला. ही सर्व मंडळी वेष पालटून जात असतां बल्लारीजवळ मोंगल सुभेदाराने त्यांना ओळखून तो त्यांना पकडण्याच्या बेतांत होता. इतक्यांत खंडो बल्लाळानें जिवाची पर्वा न करतां आपण मागें राहून आपल्या सोबत्यांस पुढें पाठवून दिलें. त्या सुभेदारानें खंडो बल्लाळ यांस पकडून त्याचे हाल हाल * केले, तरीपण त्याची स्वामीनिष्ठा यत्किंचितहि ढळली नाही. पुढें थोड्या वेळानंतर त्याने जिंजीतून राजारामाची सुरक्षितपणें सुटका होण्याचा सुयोग जुळवून आणला. मोंगलांचे सैन्यांत कांही मराठे सरदार होते. खंडो बल्लाळानें आपले कोंकणांतील वतन त्या सरदारांचे सर्वस्वीं स्वाधीन करून त्यांशीं स्नेहभाव संपादिला व वरील सुयोग जुळवून आणला. शाहूराजे साताऱ्यास येऊन सिंहासनारूढ झाले तोंपर्यंत खंडो बल्लाळ जिवंत होते. या युद्धांत विजयश्री मिळविलेला दुसरा प्रभु सरदार प्रयागजी होय. औरंगजेब बादशहानें स्वतः सैन्य घेऊन साताऱ्यास पुष्कळ महिनेपर्यंत वेढा दिला होता. तेव्हां प्रयागजीनें मोठ्या शौर्यानें त्या शहराचें रक्षण केलें. "

संभाजीच्या वधानंतर रायगडावर इलायचीबेगाने जी धरपकड केली आणि येसुबाई व बालराजे शाहू यांना दिल्लीस नेलें, त्या वेळींहि (शिवाजीशी स्वराज्याची आणभाक करणाऱ्या दादजी नरस प्रभूचा मुलगा) कृष्णाजी देशपांडे, घरादाराचा आप्तकुटुंबाचा मोह सोडून, राजमातेबरोबर दिल्लीस निघून गेला. अशीं शेंकडों उदाहरणें देता येतील.

यावर राजवाडे यांचे म्हणणें काय आहे ? संभाजीच्या अ-सौम्य निर्णयावरून बिथरलेले प्रभुद्रोही कायस्थ मंडळ तें हेंच काय ? नसेल तर ते कोणतें ? परंतु राजवाड्यांना प्रश्न विचारण्यांत हांशील नाहीं. मुळांतच जी कल्पित कादंबरी, त्याला ऐतिहासिक पुरावा तरी ते कोठला आणणार ?

टणत्काराच्या पहिल्या आवृत्तीच्या परीक्षणसमयीं ज्या अनेक समतोल वृत्तीच्या निस्पृह ब्राह्मण विद्वानांनीं आपापले अभिप्राय प्रकट केले, त्यांपैकी लष्कर ग्वालेरचे **श्रीयुत माधवराव लेले**, बीए. एल्सीई, यांनी एप्रिल १९१९ च्या 'विविधज्ञान विस्तार' मासिकांत या मुद्याविषयीं प्रकट केलेले विचार येथेच उद्‌धृत केलेले बरें. श्रीयुत लेले म्हणतात :— " संभाजीचा खून व तत्कालीन क्रांति प्रभू कायस्थांमुळें घडून आली नाहीं. ती घडुन येण्याला मुख्यतः संभाजीचा शिवाजीच्या वेळेपासूनच दिसून आलेला मुर्ख, क्रूर, विलासी, अराजनिष्ठ व स्वेच्छाचारी

*याच प्रसंगी खंडा बल्लाळचा मुलगा बहिरोजी यानें आपण बापाच्या ठिकाणीं बसून त्याची मोंगलाच्या कैदेंतून सुटका कशी केली व पुढे बहिरोबानें मोंगलांच्या अनेक अमानुष अत्याचारांना आपला बळी कसा दिला. ही हकीकत रा. रा. (आतां रावबहादूर) दत्तात्रय बळवंत पारसनीस यांनीं 'बहिरोबा' नामक पुस्तकांत समग्र वर्णन केली आहे. तें पुस्तक वाचकांनीं एकवार अवश्य अवश्य वाचावें, अशी आमची शिफारस आहे. Forrest's Selections, Vol. I. p. 80 मधील खालील उतारा पहा :—" Khando Ballal Chitnis was arrested on his way to Jinji by the Moghals at Trivedi Arunachal. He induced the Hindu centry in charge of his cell to allow him to escape by substituting a man of similar features. His son Bhairoba offered to take his place and did so. Khando Ballal escaped and went to Jinji but the loyal; devoted son was murdered by Tarbiat Khan. Khando Ballal was the son of Balaji Avji alias Balprabhu who was also murdered for devoted loyal services. Bhairoba his grand son offered his life to ensure the success of his father's plans for the relief of Jinji."

स्वभावच कारण झाला ; व त्याच्यामध्यें त्यानें राज्यावर येताक्षणीं केलेल्या भयंकर अत्याचारांमुळें व पुढील पशुतुल्य वर्तनानें भर पडली. शिवाजीच्या वेळची कर्ती मंडळी अर्थातच संभाजीसारखा नालायक मनुष्य राज्यपदावर येणें इष्ट नाहीं हें जाणत होती. त्या कर्त्या मंडळीमध्यें खरा एकोपा व दूरदृष्टी असती, तर संभाजीची कायमची वाट लावून टाकणें सुद्धां कठीण होतें असे नाहीं. पण बाळाजी आवजीच्या सद्धेतूक पण अप्रासंगिक व अस्थानिक फाजील राजनिष्ठपणामुळें तो योग जुळून आला नाहीं. त्याच्या सारखा थोर व कर्ता पुरुष या कामांत पुढाकार घेता, तर संभाजीचे आक्रमण व कायमचें नियमन करणें कठीण पडलें नसतें. या प्रसंगीं कायस्थ प्रभू त्यांच्या नेहमींच्या अंगी खिळलेल्या निस्सीम राजनिष्ठेला चिकटून राहिले. त्यामुळें त्या वेळीं मऱ्हाठेशाहीवर तशा प्रकारचा कहर गुदरण्याला सवड झाली. कायस्थांनीं राजद्रोह केला नाहीं. उलट त्यांतील प्रमुख लोक संभाजीशीं मोठ्या निष्ठेनें वागत गेले, हें सिद्ध आहे." (पृ. १५२-१५३).

वरील अभिप्रायांत श्री. लेले यांनी पत्करलेली विचारसरणी कितीहि सरळ आणि स्पष्ट दिसत असली तरी तींत ' राजनिष्ठपणा ' आणि ' राजकारणी मुत्सद्देगिरी ' यां विषयींच्या शिवकालीन कायस्थांच्या कल्पनांचा बराच विपर्यास व्यक्त होत आहे. त्याचा थोडा खुलासा करणें प्राप्त आहे. हिंदू समाज हा जात्या व्यक्तिमाहात्म्याचा (Hero-Worship) भोक्ता असल्यामुळें कोणत्याहि निष्ठेकडे पाहण्याचा त्याचा चष्मा नेहमींच विकृत असतो. खुद्द आजच्या कायस्थांची राजनिष्ठेची व्याख्याहि अशीच भ्रष्ट व विपर्यस्त बनलेली आहे. शिवकालीन कायस्थाच्या व तानाजी प्रभृति मराठ्यांच्या राजनिष्ठेंत व्यक्तिपूजेचा थोडा अंश असला तरी मुख्य आणि बराच भाग **स्वराज्यनिष्ठेचा** होता, ही गोष्ट पुष्कळ चिकित्सक विसरून जातात. शिवकालीन जनतेला स्वराज्य-संस्थापक व्यक्तीचा आदर व प्रेमभाव वाटणें कितीहि निसर्गसिद्ध असलें, तरी प्रत्यक्ष स्वराज्यभिमानापुढें ती व्यक्तीला महत्व देत नसे. कायस्थ प्रभू हे **प्रथम** स्वराज्यनिष्ठ आणि नंतर छत्रपति ऊर्फ राजनिष्ठ असत, हें अनेक उदाहरणांनी सिद्ध करता येईल.सोयराबाईच्या कारस्थानाला बाळाजीनें विरोध केला व संभाजीचा पुरस्कार केला तो ' फाजील राजनिष्ठेनें ' म्हणजे व्यक्तिमहात्म्याच्या स्तोमानें नव्हे. व्यक्तिमहात्म्य सोयराबाईच्या पक्षात होतें. छत्रपतींची राजगादी म्हणजे भोसल्यांची वतनी जहागीर, त्यावर संभाजीला डावलून राजारामच बसवावा, असा या पक्षाचा कटाक्ष. बाळाजी या कटाक्षाच्या विरुद्ध. सोयराबाई पुढील त्याचें विधान (argument) असें मांडतां येईल. ही भाषा आधुनिक आहे, रंगभूमीला शोभण्यासारखी आहे. तथापि बाळप्रभूच्या विरोधाचा आशय त्यावरून वाचकांना विशेष स्पष्ट कळेल, म्हणूनच या भाषासरणीचा अवलंब येथें करणें प्राप्त आहे.

"मला संभाजी काय किंवा राजाराम काय, दोघेहि सारखेच. दोघांनाहि मी आवजी खंडूप्रमाणें कडी खांद्यावर खेळविले आहेत. पण मासाहेब, स्वराज्यसंपादनाप्रमाणेच स्वराज्यवृद्धीच्या कामांत व्यक्तिमाहात्म्याचें प्राबल्य वाढलें की, कार्याचा घात झालाच पाहिजे, ही गोष्ट दृष्टीआड करूं नका, एवढीच माझी प्रार्थना आहे. राज्यावर संभाजी बसला काय, किंवा राजाराम बसला काय, साध्या भोळया माणसांना आपल्या दृष्टीचें पारणें सारखेंच फिटल्यासारखें वाटतें. पण प्रस्तुतच्या राज्याचा वारसा म्हणजे भोसले घराण्याचा खासगी मालमत्तेचा वारसा नव्हे. छत्रपतींच्या भवानीच्या कृपेनें जन्माला आलेल्या या हिंदवी

स्वराज्याच्या पायांत हजारों इमानी मावळ्यांचे बळी पडले आहेत. शेंकडों कुटुंबातल्या तरण्याबांड जवानांनी आपलें आत्मसमर्पण केलें आहे ; आणि स्वराज्यासाठी झालेल्या आत्मयज्ञाच्या या मंगलकार्यासाठीं, मासाहेब, आपल्यासारख्या अनेक पुण्यवान् मातांनीं, मोठ्या धैर्यानें, आपल्या सुनांची मंगळसूत्रें कचाकच तोडून, त्यांच्या कपाळचीं कुंकवें स्वराज्याचीं गाणीं गात आपल्या हातांनी पुसलीं आहेत, हें विसरूं नका. छत्रपति हे छत्राचे पति असले तरी छत्रपति म्हणून अखिल महाराष्ट्राला जबाबदार होते. छत्रपतीचें स्वराज्य म्हणजे भोसल्यांची जहागीर नव्हे ; अवघ्या महाराष्ट्राची ती जहागीर आहे.स्वराज्याचा प्रश्न साऱ्या महाराष्ट्राच्या अब्रूचा प्रश्न आहे.रायगडावर विराजमान झालेली ही स्वराज्याची गादी, मासाहेब, महाराष्ट्रानें स्वयंस्फूर्तीनें बळी दिलेल्या सहस्त्रावधि वीरांच्या रक्तावर तरंगत आहे आणि याची साक्ष मराठशाहीच्या झेंड्यांत भगव्या रंगानें उमटलेली आज सारी दुनिया पहात आहे. ''

व्यक्तिमहात्म्याच्या विरुद्ध असणारा बाळाजी राजकारणी दूरदृष्टीनें संभाजीचा पुरस्कार कां करीत होता, हेंहि सिद्ध करणें फ़ारसें कठीण नाहीं. शिवाजीचा राज्यभिषेक होऊन महाराष्ट्रांत पायाशुद्ध स्वराज्य स्थापन झालें ही गोष्ट जितकी खरी, तितकीच तें बुडविण्याचे औरंगझेबाचे प्रयत्न विशेष जारी होते, ही गोष्टहि विसरतां कामा नये. शिवाजीच्या अखेरचा काळ वरवर पहाणाऱ्याला मोठ्या शांततेचा व सुबत्तेचा दिसतो खरा ; पण वस्तुस्थिति अगदीं उलट होती. स्वराज्यस्थापना सोपी गेली पण तें टिकविण्याचें काम मोठें बिकट व भयंकर, असा त्या वेळचा मामला होता. राजाराम सुबुद्ध असेल, लोकप्रिय असेल, मनाचा कोंवळा सज्जन असेल अथवा मोठा विवेकीही असेल ! नऊ वर्षांचें कोवळें पोरच तें ! त्याविषयीं कोणी काय अंदाज बांधावा ? अर्थात् हिंदवी स्वराज्य- विध्वंसनार्थ अवरंगझेबाचे जे दांडगे लष्करी डांवपेच सुरू होते, त्यांना तोंड देण्याची ताकद किंवा अक्कल, विशेषतः मिलिटरी कमांडशिप संभाजीच्या आंगीं जितकी होती, तितकी कोणत्याहि हयात उच्च वर्णीयब्रुव कर्त्या पुरुषांच्या किंवा अष्टप्रधानादि घोडशाळेच्या आंगी मुळीच नव्हती, हेंहि जर बाळाजीला कळत नव्हतें म्हणावें, तर तो चिटणीस तरी कसला, शिवाजीचा अंतरंगी दोस्त तरी कशाला झाला आणि सारी शिवशाही आमुलाग्र कशाला पारखली ? संभाजीचें लष्करी कौशल्य व सैनिकांचें त्याच्यावरील प्रेम खुद्द शिवाजीनें स्वतःच अनुभवलें होतें आणि पुढे १० वर्षांच्या कारकीर्दीत बऱ्हाणपुरापासून तों थेट गोव्यापर्यंत संभाजीनें घातलेल्या धुमाकुळानें तें पूर्ण सिद्ध झालें. अत्यंत प्रतिकूळ परिस्थितींतहि, अवरंगझेब, शिद्दी, पोर्च्युगीज व इंग्रज यांना दे माय धरणी ठाय करणाऱ्या संभाजीनें आपल्या स्वराज्याचा एक इंचभर तुकडा सुद्धां कधी चुकून गमावला नाहीं, ही कामगिरी कांहींच महत्वाची नव्हे काय ? स्वराज्य टिकविण्यासाठी लष्करी बुद्धिमत्तेचाच छत्रपति पाहिजे,या बाळाजीच्या आग्रहांतच त्याची राजकारणी दूरदृष्टी स्वच्छ दिसते. अष्टप्रधानांची नुसती बारभाई त्याला कमकुवत किंबहुना कारस्थानी अशीच वाटली. शिवाय, प्रधानमंडळाचा हा कमकुवतपणा संभाजी पन्हाळ्याहून निघतांच त्याला सर्व सैन्यानें आपला छत्रपति मानून एकमुखी पाठबळ देतांच सिद्ध झाला. तेव्हां बाळाजीचें धोरण ' फाजील राजनिष्ठेचें ' किंवा ' अप्रासंगिक ' कसें ? दुसरा प्रश्न असा उद्भवतो कीं अवघ्या नऊ वर्षाच्या कोवळ्या राजारामाला छत्रपति बनविण्यांत या भिक्षुकी प्रधानमंडळाचा हेतु काय ? यांना सैन्याचें पाठबळ नाहीं, स्वतःच्या मनगटांत लष्करी धमक नाहीं, फक्त भांडवल कारस्थानांचें व चहाड्याचुगल्यांचें ! ब्राह्मण मंत्री आणि बालराजा

ही जोडी जमली कीं तेथें आपोआप पेशवाई उमटते. नामधारी मत्ता बालराजाची, खरी सत्ता या भिक्षुकी चाणक्यांची, या एकाच उद्देशानें मोरोपंतादि ब्राह्मण मंत्री सोयराबाईच्या कारस्थानांत सामील झाले होते. यांत स्वराज्यनिष्ठा तर नव्हतीच नव्हती. पण राजनिष्ठासुद्धां बेगडीच होती. सवाई माधवरावाचें थेर माजविणारे बारभाईसुद्धां मत्ता पेशव्यांची सत्ता भटाभिक्षुकांची, याच क्षुद्र हेतुनें फुरफुरलेले होते. शिवाजीच्या मृत्यूनंतर प्रधानमंडळाचा हेतु कीं आता नऊ वर्षाच्या बालराजारामाला डोक्यावर चढवून, आपली भिक्षुकी सत्ता वाटेल तशी गाजवितां येईल, तोच नाना फडणिसादि बारभाईचा हेतू सवाई माधवरावासारख्या २१ दिवसांच्या पोराला पेशवाई झूल चढविण्यांत होता. स्वतंत्र राज्यें कमाविण्याची ब्राह्मणांना कधींच अक्कल नव्हती व आतांहि नाहीं. उलट, ब्राह्मणेतरांनी कमाविलेल्या राजसत्तेचे भिक्षुकी कारस्थानानें तीन तेरा करण्यांत ब्राह्मणवर्ग मोठा निष्णात आहे. चालू घडीच्या ब्राह्मणांच्या स्वराज्यपुराणांत हाच हेतु गुप्त असतो, हें ब्राह्मणेतरांच्या तीट गळीं उतरल्यास चालू स्वराज्यप्राप्तीच्या चळवळीचा तपशील फार निराळाच दिसू लागेल ! सारांश, मराठशाहींतील बाळाजी प्रभृति कायस्थांची राजनिष्ठा ही व्यक्तिनिष्ठा होती. जेथें संभाजीच्याच खऱ्या चारित्र्याचा विपर्यास होऊन बसला आहे, तेथें बाळाजी आवजीची स्वराज्यनिष्ठा ' फाजील राजनिष्ठा ' ऊर्फ व्यक्तिनिष्ठा वाटणें साहजिक आहे. संभाजीच्या वधानंतर खंडो बल्लाळ व धनाजी जाधव वगैरे मंडळींनी कर्नाटकाचा जो प्राणांतिक वनवास भोगला, तो काय राजाराम व्यक्तिसाठीं ? संभाजीनें शिरक्यांचें शिरकाण केलें म्हणून गणोजी व राणोजी शिर्के भोसल्यांचें तळपट उडविण्याच्या हेतूनें मोंगलास मिळाले व जंजीला राजारामास कोंडून धरला. शिर्क्यांप्रमाणेंच चिटणिसांचेंहि ' चिटणिसान ' ऊर्फ कत्तल झाली होती, तरी खंडो बल्लाळ राजारामासाठीं मरत होता तो काय खुळा म्हणून ? अर्थात् नव्हे. राजाराम कोण ? स्वराज्यांचें एक जिवंत प्रतीक. त्याचें नांव आणि स्वराज्यांचें गाव ! लोकसत्तानुवर्ती इंग्लंडांत जॉर्ज बादशाची जी आज किंमत आहे, तीच छत्रपति राजारामाची महाराष्ट्रांत होती. खंडो बल्लाळादि वीरांचे परिश्रम **स्वराज्यासाठीं** होते, व्यक्तिसाठीं नव्हते, किंवा स्वार्थासाठींहि नव्हते. जंजीचा वेढा फोडण्यासाठीं शिर्क्यांची मनधरणी खंडोबानें केली, तेव्हां शिर्के म्हणाले ' जसें आमचें शिरकाण केलें तसें भोसले यांचा निर्वंश झाल्यास चिंता नाहीं. हें फार चांगलें होतें. ' त्यावर खंडोबानें दिलेलें उत्तर ' या समयास तुम्ही बोलतां हें योग्य नव्हे. तुमचें शिरकाण केलें तसेच आमचे तीन पुरुष हत्तीचे पायाखालीं मेले, तेही गेले. परंतु **हिंदूंच्या दौलतीकरितां आम्ही झटतच आहों.** ज्यास जसा प्रसंग पडेल तसे झटतच आहेत. ' (चिट. ५५) या उद्गारां केवळ वैयक्तिक राजनिष्ठा आहे कीं व्यापक स्वराज्यनिष्ठा आहे, त्याचा वाचकांनीच निर्णय द्यावा.

संभाजीच्या चरित्रांत दुसरा एकविशेष आढळून येतो. तो हाच कीं राज्यसत्ता गाजवितांना त्यानें ब्राह्मण–ब्राह्मणेतर असला भेद मुळींच बाळगिलेला दिसत नाहीं. अपराध्यांना शिक्षा ठोठावताना त्यांनें ब्राह्मणांचा मनुस्मृति प्रासादिक ' ब्रह्ममुखोत्पन्न ' पणा, ' विश्वप्रभू ' किंवा ' चित्तपावन ' पणा मुळींच न मानतां, ब्राह्मणेतरांप्रमाणेंच ब्राह्मणांनाहि सारखेच हत्तीच्या पायाखालीं तुडविलें. आपल्या बापानें भटाभिक्षुकांचें केवढें फाजील स्तोम माजविलें होतें आणि वेदोक्त राज्यभिषेक तो काय, पण त्यासाठीं भटांची केवढी मनधरणी व चांदी सोन्याचा त्यानें हकनाहक होम केला, हें संभाजीनें प्रत्यक्ष पाहून अनुभविलें असल्यामुळें, समजूत आल्यापासूनच

त्याला ब्राह्मणांचा जन्मप्राप्त मानवी श्रेष्ठपणा, भूलोकचा देवपणा किंवा सर्वांगीण पावणपणा मुळींच मान्य नव्हता. शिवाजी ब्राह्मणांना पूज्य मानीत असे, तर संभाजी त्यांच्या मनुस्मृति प्रासादीक पूज्यत्वाला पूज्य किंमत देत असे. ब्राह्मण स्वतःला जरी प्रत्यक्ष ' भूदेव ' समजतच असत, तरी संभाजी त्यांना इतरांप्रमाणेंच ' मलमूत्रजन्य ' माणसें समजत असे. विशेषतः ब्राह्मणांचीं भिक्षुकी कारस्थानें शिवाजीच्या वेळीं त्यानें प्रत्यक्ष अभ्यासिलीं असल्यामुळें, त्याची ब्राह्मणांविषयींची पूज्य भावना बाप हयात असतांनाच समूळ नष्ट झालेली होती. तरुण संभाजीनें ' बलात्कारें ब्राह्मणी भोगिली ' म्हणून त्यावर व्याभिचाराचा केवढा हलकल्होळ ! तरुण राजे किंवा राजपुत्रांवर फिदा होणाऱ्या स्त्रिया काय कधीं नव्हत्या, का आतां नाहींत ? आज देशी संस्थानांत काय चाललें आहे ? काश्मिर इंदोरच्या भानगडी तर आतां जगप्रसिद्धच आहेत. अहो, क्षुद्र नाटक्यांच्याहि मागें लागणाऱ्या चटोर पोरींना आज दुष्काळ नाहीं ; तर राजवैभवी, तरुण, शरीरानें भीम, अर्जुनाप्रमाणें धनुर्धारी, असल्या संभाजीच्या गळ्यांत इतर शिवांगीप्रमाणें, मानवी विकारांची तरुण ' ब्राह्मणी ' पडली, तर त्यांत बिघडलें कोठें ? ब्राह्मण देव म्हणून ब्राह्मणी देवी हें त्रयराशिक संभाजीला कोठें मान्य होतें ? तरुणतरुणीच्या काम्य वृत्तींत (मग त्याला व्याभिचार म्हणा कीं काय वाटेल तें नांव द्या !) उच्चवर्ण नीचवर्ण येऊंच शकत नाहींत. संभाजीवर एखादी ब्राह्मण तरुणी फिदा झाली असेलच तर तो त्या उभयतांच्या प्रेमाचा प्रश्न. प्रेमांत लौकिकी भेदांचें कारण काय ? वाटेल तर असेंहि विधान मांडतां येईल कीं राज्यकारभाराप्रमाणेंच ' लव्हाळ्या 'त सुद्धां संभाजी ब्राह्मण–ब्राह्मणेतर भेद मानीत नसे. मग एकट्या संभाजीवरच व्यभिचाराचा भडिमार कां ? तरी बरें, कल्याणच्या मुलाण्याच्या सुनेला ' आई ' मानणाऱ्या शिवाजीला एकदोनच नव्हे तर चार पट्टराण्या होत्या आणि संभाजीची माय एकच येसूबाई पट्टराणी होती ! बाजीराव पेशव्यांची मुसलमान मस्तानी बिनतक्रार शनिवारवाड्यांत पचते आणि संभाजीची खरी खोटी ब्राह्मणी त्याच्यावर गहजबास कारण होते. हा ब्राह्मण–ब्राह्मणेतर भेद मनोरंजक आहे खरा. सारांश, संभाजीला ब्राह्मणांचे श्रेष्ठत्व मुळीच मान्य नसल्यामुळें आणि तो आपली डाळ मुळींच शिजूं देणार नाहीं, ही मोरोपंतादि ब्राह्मणांची खात्री असल्यामुळें, सोयराबाईच्या कारस्थानाकडे एकादिलानें वळण्यापलीकडे त्यांना गत्यंतरच नव्हतें. यांत कसली स्वराज्यनिष्ठा आणि राजनिष्ठा ?

यानंतर राजवाड्यांचा दुसरा मुद्दा असा आहे कीं :

" तद्नंतर दुसरी मोठी फिर्याद नारायणराव पेशव्यांच्या प्रधानकीच्या
" वेळीं झाली. त्यांत चांद्रसेनीयांनीं भाताचे पिंड वगैरे न करतां, शूद्र-
" वत् आचार करावे, असा निर्णय केला, तो. कागदपत्रीं प्रसिद्ध आहे.
" शूद्रांना फक्त पांच संस्कार आहेत, व चांद्रसेनीयांना बारा आहेत,
" असें गागाभट्ट म्हणतो. परंतु नारायणरावांच्या कारकीर्दीत चांद्रसे

* या वेळीं अर्थात् चित्पावनांनीं.

" नीयांची पिछेहाट शूद्रत्वापर्यंत गेली. * * * चांद्रसेनीयांच्या वेदा
" धिकाराला नारायणरावानें व तत्कालीन कांहीं * ब्राह्मणांनीं विरोध
" केला, त्याचा परिणाम असा झाला कीं रघुनाथराव दादाचा हस्तक
" जो सुमेरसिंग त्याच्या द्वारा नारायणराव जिवास मुकला व मराठे-
" शाहींत पंचवीस वर्षे यादवी माजली. कित्येक कायस्थ मित्रांच्या
" **सांगण्यांत** असे येतें कीं नारायणरावाच्या वधांत कायस्थांचा
" हात होता आणि हें सांगण्यांतील अर्थ अगदी संभवनीय दिसतो.
" रघुनाथरावाचा जीव कीं प्राण म्हणजे सखाराम हरी गुप्ते. नारायण-
" रावाच्या वधाच्या बाबतींत सखाराम हरीची सल्ला रघुनाथराव दादाला
" अवश्यमेव मिळाली असली पाहिजे. "

या उताऱ्यांत राजवाडे ऐतिहासिक सत्याच्या जवळजवळ-पण भीत भीत- आले आहेत, ही गोष्ट आम्ही केव्हांहि अमान्य करणार नाहीं. पहिल्या उताऱ्यांत काल्पनिक विधानांच्या पृष्ट्यर्थ त्यांनीं जो मुदार्डपणा स्वीकारला आहे तो या उताऱ्यांत बराच पातळ होऊन ते ऐतिहासिक मुद्यांच्या नजीक येऊन ठेपले आहेत. तथापि त्यानीं नारायणराव पेशव्याच्या वेळच्या चां. का. प्रभूंवरील ग्रामण्याच्या बखरी वाचण्याची जर थोडी तसदी घेतली असती ; निदान या प्रकाराबद्दल अलीकडील इतर विद्वानांनी ठरविलेल्या सिद्धांतांकडे ते जर क्षणभर लक्ष पुरविते, तर ऐतिहासिक मुद्याच्या इतके जवळ येऊनसुद्धां त्यांनीं जीं कित्येक अविश्वसनीय व निराधार विधानें प्रस्थापित करण्याचा यत्न केला आहे, तो करण्यास त्यांची मनोदेवता त्यांना सांगतीच ना. शिवकालीन ग्रामण्यापासून तों चित्पावन नोकरशाहीची तळी उचलेपर्यंत चां. का. प्रभू समाजावर जीं जीं ग्रामण्यें झालीं, त्यांत धार्मिक बाबतींपेक्षां त्यांच्या **राजकीय वर्चस्वाच्या मत्सराचाच भाग** अधिक होता. कायस्थांच्या संस्कारपद्धतीच्या विरोधापेक्षां त्यांच्या तत्कालीन् राजकारणांतील वर्चस्वाच्या हेव्याचा भाग त्या ग्रामण्यांत अधिक होता, हें एक तत्त्व पटल्यावर नारायणरावाच्या किंवा त्याच्या पुढच्या पेशव्यांच्या नोकरशाही अमधानींत कायस्थांवर धर्माच्या पांघरुणखालीं झालेल्या छळाचे धागे आपोआप उलगडूं लागतात.

मराठी राज्य स्थापन करतांना महाराष्ट्रांतल्या सर्व जातींत जी संघशक्ती उत्पन्न झाली आणि तें राज्य लयाला जाण्यास त्याच संघशक्तीचे जे तुकडे तुकडे झाले, या दोन महत्वाच्या स्थित्यंतराच्या मध्यावर जर रेषा मारली ; तर ती रेषा पूर्व आणि उत्तर भागाचीं मूळ कारणें स्पष्ट दिग्दर्शित करील. " **या दोन अर्धांस विभागणारी रेषा म्हटली म्हणजे शिवाजीच्या वंशजांचे हातून राज्य नाहींसें झालें व शाहूमहाराज कैलासवासी झाल्यानंतर मराठा राजधानीचें ठिकाण सातारा येथून हालवून पुणें मुक्कामीं नेण्यांत आलें व अर्थात्च सर्व सत्ता ब्राह्मण पेशव्यांच्या हातांत आली, हीच होय.** " असा शेरा न्या. रानडे देतात. या दोन अर्धांचें स्पष्टीकरण करून, उत्तरार्धाबद्दल रावबहादुरांनी उद्‌गार काढलें आहेत कीं, " **पुढील साठ वर्षांत राज्यकर्ते पेशवे व एकंदर महाराष्ट्रांतील प्रजा यांच्या अंगचीं व्यंगें एकामागून एक दृष्टोत्पत्तीस येऊन इ. स. १८१७ मध्यें सर्व देश इंग्लिशांच्या ताब्यांत जाण्याच्या आधींच राष्ट्र कसें अगदीं मोडकळीस आलें होतें हें चांगलें व्यक्त होतें. हें अंतर स्पष्ट कळलें म्हणजे,**

**शिवाजीनें घालून दिलेलीं व त्याच्यामागून राजाराम व शाहू यांनी बऱ्याच एकनिष्ठपणें सुरू ठेवलेलीं जीं तत्त्वें त्यांपासून पेशव्यांचें राजकीय धोरण कसें सुटत चाललें व खऱ्या राजनतीकडें दुर्लक्ष्य होऊन, आपणच काय ते श्रेष्ठ व आपण सर्वांहून निराळे, अशा पुरातन ब्राह्मणी कल्पनेचा प्रादुर्भाव झाल्यामुळें मराठा साम्राज्यवृक्षास कीड लागली व अखेरीस तो वृक्ष कसा समूळ उपटून पडला हें खासें ध्यानांत येईल.''** चित्पावनांच्या एकमुखी नोकरशाहीच्या ऱ्हासाची कारणें न्या. रानडे यांनीं अशा रीतीनें थोडक्यांत परंतु स्पष्ट सांगितली आहेत. याच मताचा पुरस्कार आजपर्यंत झालेल्या प्रत्येक इतिहास संशोधकांनें व विद्यार्थ्यानें एकमतानें केलेला आहे. राजवाड्यांच्या ' समजुती 'त मात्र हा मुद्दा नीटसा उतरत नाहीं, त्याला इलाज नाहीं. '' **जातीभेदाच्या प्रश्नावर मागें रणें पडलीं आहेत. पुढें मात्र ती पडतां उपयोगीं नाहींत. राजकीय परिस्थिति बदललली आहे. जातीनें श्रेष्ठ म्हणून राज्यकारभारांत वरिष्ठ नोकरी मिळण्याचा प्रश्नच उरला नाहीं. उलट सरकारी नोकरीतून अजीबात वगळले जाण्याचाच ब्राह्मणांवर प्रसंग आहे.''** याची पूर्ण जाणीव जाणून **कै. प्रो. हरि गोविंद लिमये, एम्. ए.** यांनी **' पेशवाईतला जातिभेद '** म्हणून एक उत्कृष्ठ निबंध सन १९१४ च्या **मनोरंजन-वसंत** अंकात लिहिला आहे. त्यांत त्यांनीं नारायणरावांच्या वेळच्या कायस्थांवरील ग्रामण्याचें शक्य त्या निस्पृहपणानें सिंहावलोकन केले आहे. तें वाचकांनीं पुन्हा वाचावें अशी आमची शिफारस आहे. त्यांतील त्यांच्या कांहीं विधानांना येथें जागा देणे न्याय्य होईल :—

(१) केवळ गुणांवरूनच ब्राह्मण व प्रभू यांच्या समाजांतील जागा ठरविण्याचा प्रयत्न करण्यांत आला, तर ब्राह्मण व प्रभू जवळजवळ एकाच ठिकाणीं बसवितां येतील, असा आमचा अंदाज आहे. कांहीं ब्राह्मणांचा नंबर पुष्कळ प्रभूंच्या वर लागला, काही प्रभूंचाहि पुष्कळ ब्राह्मणांच्या वर लागेल. गुणांनीं बहुतेक बरोबरी असल्यामुळें प्रभूंना जातिनिर्बंध विशेष जाचक भासूं लागले. **त्यांतूनहि जेव्हां प्रभूंना अपमानकारक वाटतील, असे नवीनच निर्बंध घालण्यांत आले, तेव्हां प्रभुंना चीड येणें स्वाभाविक होतें. पृ. ५४४.**

(२) अशा पेशव्यांच्या (नारायणराव) कारकिर्दीत ब्राह्मण्याला ऊत येऊन ब्राह्मणपक्षाच्या पुढाऱ्यांकडून अत्याचार व्हावा, हें स्वाभाविक होय. .–कित्ता.

(३) खरी राजसत्ता भोसलें छत्रपतीकडून ब्राह्मण पेशव्यांकडे आल्यानंतर थोड्याच वर्षांत जातिप्रकरणांत ब्राह्मण शिरजोर झाले.–कित्ता.

(४) छत्रपति शिवाजी महारांजांच्या राज्यव्यवस्थेंत महत्वाचीं कामें निरनिराळ्या जातींकडे वांटून दिलेलीं होतीं. म्हणूनच त्या राज्यव्यवस्थेची आपण स्तुति करतों. परंतु पेशवाईंत म्हणजे छत्रपति शाहू महारांच्या निधनानंतर आणि सर्व राज्यसत्ता ब्राह्मण पेशव्यांच्या हातीं आल्यानंतर अशा प्रकारची व्यवस्था ठेवण्यांत आली नाहीं. ब्राह्मणांच्या अंगीं बुद्धिमत्ता हाती, योग्यता होती, कर्तबगारी होती, त्यामुळें इतर जातींच्या अंगच्या गुणांचा विकास होण्याला–किंबहुना ते गुण दृष्टोत्पत्तीला येण्याला देखील ब्राह्मणशाहींत अवसरच मिळेनासा झाला. कारकून ब्राह्मण,

वकील ब्राह्मण, प्रधान ब्राह्मण, मुत्सद्दी ब्राह्मण शिपाई ब्राह्मण, सरदार ब्राह्मण, व खरा धनीहि ब्राह्मण–असें सर्वं ब्राह्मणमय झालें ! पृ. ५४७.

'जातिवर्चस्व ' सदराखालीं लिहितांना न्या. रानडे यांनी हेंच मत व्यक्त केलें आहे :—

" जातिमत्सराचा इतका बडेजाव माजला कीं, एक जूट होणें अशक्य झालें व राष्ट्रहिताच्या ऐवजीं आपलीच तुंबडी भरण्याकडे प्रत्येक प्रबळ सरदारांचें लक्ष गुंतलें. यावेळीं ब्राह्मणमंडळी म्हणजे अगदीं तर्र झालेली. खरे राज्यकर्ते आपण, आपणांस इतर जातींपेक्षां विशिष्ट हक्क व सवलती असावयास पाहिजेत असें ते समजत. शिवाजीच्या राज्यरचनेंत या मूढ कल्पनांचा नुसता वाससुद्धां नव्हता. आतां पेशव्यांकडे पहा. पेशवाईंत दप्तर कचेरींतील हिशेबखातें ठेवण्याचें सर्व काम कोंकणस्थब्राह्मण कारकुनाकडे असे. इतर कोणाचीही त्या खात्यांत नेमणूक होत नसे. त्या कारकुनांना पगारही मोठा असें असून यांनीं बाहेर ठिकाणाहून धान्य किंवा इतर माल आणविला तर त्या मालावर जकात किंवा बंदरपट्टी मुळींच घेत नसत. कल्याण प्रांत व मावळ येथील जे जमीनदार ब्राह्मण लोक होते, त्यांचेकडून जमिनीचा सारा इतर जातींतील जमीनदारांच्या निम्यानें, कमींच घेत असत. फौजदारी कोर्टांत तर ब्राह्मणाला कायद्याची अगदीं शेवटची म्हणजे देहांतशिक्षा देण्याचा कधींच परिपाठ नसे. उलट ब्राह्मण आरोपीला अशा शिक्षेविरुद्ध तक्रार करितां येत असे. किल्लयामध्यें जरी त्यांना कधींकाळीं तुरुगांत ठेविण्यांत आलें तरी, इतर जातींतील कैद्यांपेक्षां यांना जास्त उदारपणानें वागविण्यांत येई. इतक्या सवलती असून शिवाय ब्राह्मण जाति फार पवित्र म्हणून त्यांना धर्मादाय करण्याच्या कामीं सरकारचा (पेशवे) सढळ हात असे. " म. स. उ. पृ. १८७-१८८.

राजकीय कैद्यांच्या वागणुकीबद्दल इंग्रजी नोकरशाहीला दोष देणाऱ्यांनीं या स्वदेशी चित्पावन नोकरशाहीचा याबद्दलचा इतिहास मुद्दाम पहावा, म्हणजे ज्याच्या हातीं सावज तो शिकारी आणि बळी तो कानपिळी हा निसर्गाचाच नियम असल्यामुळें, दुसऱ्याच्या डोळ्यांतील कुसळावर टीका करण्यापूर्वी आपल्या डोळ्यांतील मुसळाच्या टीका वैद्याकडून काढवून घेणें किती आवश्यक आहे, हें कळून येईल. पेशव्यांचें ब्राह्मणकैद्यांबद्दलचें पक्षपाती वर्तन वर दिलेंच आहे. याच्या उलट कायस्थ प्रभू राजकीय कैद्यांबद्दलचें वर्तन पहा. " किल्ले मजकुरीं सखाराम हरी (गुप्ते) अटकेंत आहे त्यास पोटास शिधा मागत आहे तो मना करून जुन्या नागलीचें पीठ दररोज वजन पक्के १ एकशेरप्रमाणें देत जाणें. पीठाशिवाय आणीक कांहीं न देणें. उपास करूं लागल्यास करूं देणें मनास न आणणें. नवीन बेडी पाठविली आहे ती सखाराम हरी याचे पायांत घालून पक्के बंदोबस्तानें ठेवणें. " (भा. इ. सं. मं. ४ अहवाल पृ. १३८) न्या. रानडे पूढें म्हणतात. " सखाराम बापू (बोकील) एकेवेळीं पेशवाईच एके आधारस्तंभ होते, पण त्यांनीं राघोबादादांची बाजू उचलल्यामुळें त्यांना किल्ल्यामध्यें अटकेंत ठेविलें. दादासाहेबांचे इतर स्नेही-बहुतेक प्रभु ज्ञातींतील होते–रघुनाथ हरि, बाबुराव हरि इत्यादि लोकांचीहि तीच स्थिति झाली. " (म. स. उ. पृ. २०५).

चित्पावन नोकरशाही उर्फ पेशव्यांची पेशवाई हिच्या एकतंत्री राज्यव्यवस्थेचें न्या. रानड्यांनी काढलेलें हें स्पष्ट चित्र तत्कालीन चित्पावांच्या शिरजोरपणाला बेधडक चव्हाट्यावर आणीत आहे. मेल्या म्हशीला दूध फार या न्यायानें पेशवाईचे पोवाडे गाणाऱ्यांनीं पहिल्या प्रथम आपल्या पायांखालीं काय जळत होतें हें स्पष्ट उघड करून दाखविणाऱ्या या उताऱ्याचें नीट मनन करावें. अशा या बिनमुर्वत नोकरशाहीनें चित्पावनेतर अनेक जातींवर त्यावेळीं जे अनेक अमानुष जुलूम केलें, त्याचा इतिहास जर वाचला तर नारायणराव पेशव्याच्या नोकरशाहींत चां. का. प्रभु " शुद्रत्त्वापर्यंत पोंचलें, "इतर जातींप्रमाणें अगदींच हतवीर्य किंवा नामशेष झाले नाहींत, ही एकच गोष्ट त्यांच्या क्षात्र वीर्याची साक्ष देण्यास पुरेशी आहे.

मराठी इतिहासाचें विहंगमदृष्ट्या जरी समालोचन केलें तरी कोणालाहि एक गोष्ट प्रामुख्यानें आढळून येईल कीं छत्रपतीच्या तक्ताशी राजनिष्ठेच्या शपथा वाहणारे कायस्थ प्रभू पहिल्यापासूनच पुण्याच्या नोकरशाहीच्या विरुद्ध होते. पहिले दोन चित्पावन पेशवे छत्रपतीच्या तक्ताला विरोध * न करितां वागले, म्हणून छत्रपतीच्या खास विश्वासांतल्या कायस्थ प्रभू सरदारांना त्यांच्याशीं विरोध करण्याचें साहजिकच कांही कारण नव्हतें. परंतु बाजीराव बल्लाळाच्या मागें त्यांचे चिरंजीव † नानासाहेब जेव्हां साताऱ्याहून पेशवाईची वस्त्रें घेऊन आले, तेव्हांपासून छत्रपतींना निर्माल्यवत करणाऱ्या चित्पावन नोकरशाहीच्या एकतंत्री अरेरावपणास खरी सुरुवात झाली. कोकणांतल्या चित्पावनांचीं पार्सलें यांच्याच अंमदानींत बोरघांट चढली. चिटणीशी वळणावर जनोबाभट्टीचें तट्टू याच पेशव्यानें चढविलें. पानपतच्या मोहिमेंत मिळालेल्या अपयशाच्या खापरांत घरगुति कलहांचें पर्यवसान झालें, तें यांच्याच राजवटीत, **राघोबादादा आणि पेशवे** अशी खुद्दपुण्यांतल्या पुण्यांत दुफळी माजली आणि हजारों चां. का. प्रभू लढवय्यांचा आणि सरदारांचा पुण्यांत भरणा असूनसुद्धां पानपतच्या मोहिमेवर फारच थोडे चां. का. प्रभू गेले. चित्पावन नोकरशाही आणि छत्रपतिनिष्ठ कायस्थ प्रभू यांच्यांतील खऱ्या राजकीय

* वास्तविक सातारकर छत्रपतींना निर्माल्यवत् करून स्वतःची स्वतंत्र सत्ता प्रस्थापित करण्याची बुद्धि पहिल्या बाजीरावांतच बीजरूपानें उत्पन्न झाली होती. मुंबईच्या ब्रिटीश वकीलानें २० जुलै सन १७३७ रोजीं अशी नोंद करून ठेवली आहे कीं "That from the best intelligence procurable there appears no reason to doubt of Bajirao's disregard of any subjection to the Shahu Raja, whom he acknowledges for form's sake, whilt his views tend apparently to fortify himself in a state of independence on him, of which the Shahu Raja himselt does not seem ignorant." (Forrest's Selections p. 83.)

(2) "The sentiments of most of the principal men are that Bajirao has in view to throw off his allegiance to the Raja." (Ibid 10).

† रा. रा. पांगारकर आपल्या "मोरोपंत" चरित्रांत (पृ. ५९) तिसरे पेशवे नानासाहेब यांच्याबद्दल लिहितात :--" ××× याप्रमाणें कुटील नीतीनें वागून राष्ट्रांत केवळ स्वार्थासाठीं भयंकर फूट पाडणारा, इंग्रजांच्या सहायानें कान्होजी आंग्रयाचें आरमार बुडवून इंग्रजांस कोंकणपट्टी मोकळी करून देणारा व खुद्द आपल्या स्वामीशीं द्रोह करणारा नानासाहेब हा मराठेशाहीच्या भव्य प्रासादाला आग लावणाऱ्या पुरुषांचा अग्रणी नव्हे काय?" राजवाड्यासारख्या इतिहासशास्त्रयानीं इतिहास विकृति करणारा मलीन चष्मा एकीकडे ठेवून शांत चित्तानें व खऱ्या महाराष्ट्रीय दृष्टीनें याचा विचार करावा.

टीप :—(काव्येतिहास संग्रह ले. ४२८) "शाहू महाराज यांचा जीवात्मा आहे तों बाह्यात्कारीं त्यांचें सेवक!" हें खुद्द नानासाहेबाच्या तोंडचें वाक्य! मोरोपंतहि 'नामार्या' प्रकरणांत पर्याय सुचवून म्हणतात :—

"त्रिभुवनराज्य प्रभुचें प्रतिनिधिनें त्वां स्वहस्तगत केलें ॥
भोळ्या दिगंबराचें आक्रमिलें वतन् जळ जसे तेलें ॥ १०२ ॥"

विरोधाची सुरुवात याच तिसऱ्या * पेशव्याच्या कारकीर्दीत झाली, ती आजतागायक आमच्या माननीय राजवाड्यापर्यंत सरळ रेषेंत वंशपरंपरेनें उतरत आली आहे. चवथे पेशवे माधवराव यांच्या कडक अंमदानींत ग्रामण्याचे दिवटे घेऊन नाचणारीं आशाळभूत चित्पावन पिशाच्चें अंधारांत डोकीं खुपसूनच होतीं. परंतु माधवरावाचा क्षय उन्मत्त होऊन आणि व्यभिचारी नारायणरावाची स्वारी नोकरशाहीच्या अरेरावी दंडाचे मालक होतांच, हीं भुतें पुनश्च सैरावैरा बोकाळूं लागलीं. सातारकर छत्रपती या पेशव्याला पेशवाईचीं वस्त्रें देण्यास नाखूष होते. याचें कारण स्पष्टच आहे. साताऱ्याला निर्माल्यवत् करून टाकणाऱ्या पुण्याच्या या एकमुखी नोकरशाहीची सत्ता त्यावेळीं खुद्द छत्रपतींना सुद्धां फार जाचक झाली होती. अर्थात् पेशवाईचीं वस्त्रें भट घराण्यांतून अजीबात काढून तीं दुसऱ्या कोणा लायक मुत्सद्यास देण्याचा विचार छत्रपतीनीं करणें केव्हांही वाजवी आणि न्याय्यच होतें. परंतु नारायणरावानें उद्दामपणानें खुद्द छत्रपतीला '' जास्त मिजास कराल तर साताऱ्याचें तक्त खालसा करून तें पुण्याच्या तक्ताला नेऊन जोडीन.'' अशी धमकी देऊन बळजबरीनें पेशवाईचीं वस्त्रें साऱ्याहून आणलीं. तिची हकिकत जुन्या बखरी येणेंप्रमाणें देतात :—

'' नारायणराव बल्लाळ वस्त्रें घेण्याकरितां साताऱ्यास आले. वस्त्रांसमयीं मनोदयानुरूप कांहीं मतलब महाराजांचे करून द्यावे असें ठरावांत असतां, नारायणरावाचा जातीनें शरीरसामर्थ्य व तारुण्यमद प्रकृत ही उद्दाम असा गर्विष्ठ स्वभाव होता ; त्यायोगें वस्त्राचे समयी कांहीएक व्हावयाचें नाहीं म्हणोन उरुबुरू बोलले. यावरून महाराजांची मर्जी जाऊन शिव्या देऊन वस्त्रें देत नाहीं बोलले. वक्तास लावून घेऊं असें यांणी उत्तर केलें, यावरून महाराजांच्या मुखांतून शब्द निघाले जे, माजोऱ्या निसंतान होऊन मरशील. तुझे वाटोळें होईल. हा श्राप झाला. आणखीही फार श्रापें करून बोलले. नारायणराव यांनी वस्त्रें तशींच घेतलीं. शके १६९४ नंदननाम संवत्सरे सन सल्ला सबैन मार्गशीर्ष मास.''

अन्नदात्याशीं निमकहरामपणा केल्याबद्दल आणि मराठी राज्याच्या तक्ताधिपतीशीं उघड उघड द्रोह केल्याबद्दलचें प्रायश्चित नारायणरावाला कसें मिळालें, तें बखर पुढें सांगते :—

'' वस्त्रें घेऊन दरवाज्याबाहेर निघतांच मशालेची बत्ती झग्यास लागून झगा पेटला. आणखी अपशकून. पुढें हत्तीजवळ गेले, जरीपटका हत्तीवर होता. जरीपटक्याची काठी मोडून तो खालीं पडला. दोन अपशकून झाले. नंतर पुण्यास आले. ''

---

* (१) नानासाहेब पेशवे हे कायस्थप्रभूंवर ग्रामण्य करण्याच्या कारस्थानाच्या अगदीं विरुद्ध होते ; तथापि त्यांची प्रभूंशीं राजकीय बाबतींतीली स्पर्धा आणि द्वेष अत्यंत तीव्र असे.

" The Peshvas raised their own people to high offices and did all they could to undermine the influence of their rivals the Deshasthas and the the friends of that community the Prabhus, which resulted in the fall of the Maratha power. "

Grant Duff-Appendix. iv

(२) '' शिवाजीच्या कारकीर्दीत ज्या प्रभूजातीच्या लोकांनीं अलौकिक कृत्यें केलीं, त्यांचे वंशज बाळाजी बाजीरावच्या कारकीर्दीपासून अगदीं मागें पडत चालले. '' न्या. रानडे. म. स. उत्कर्ष पृ. ८.

(३) खुद्द राजवाडे आपल्या मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड ६ वा. पृ. ५४६-४८ वर काय उतारा नमूद करतात ते पहा :—पेशव्यास राजधानी प्राप्त झाल्यावर, संपूर्ण ब्राह्मणमंडळी वेदविद्या अधीत. क्षत्रिय चांद्रसेनीय लेखनविद्येत प्रवीण उदरनिर्वाह करुन होते ; सबब बराबरीनें वागले. चांद्रसेनीय थोडे, ब्राह्मण फार, म्हणून द्वेष वाढला ; परंतु कर्मलोप जाहला नाहीं. ''

नारायणरावाची उन्मत्त स्वारी पुण्यास आल्यावर त्यांचें वर्तन कसें होतें याबद्दल जुन्या बखरीची साक्ष खालीं दिल्याप्रमाणें आहे. राजवाडे प्रभृतींच्या ' समजुती ' ची साक्ष कशीही असो.

" फारच अविचारी वागणें उन्मादपणा राज्यमदेंही वागूं लागला. लोकांच्या स्त्रिया चांगल्या त्यांवर बलात्कार हळदकुंकवास नेऊन करावा. अगर बातमी लागल्यास पालखी पाठवून जबरी करावी. सातार संस्थानची निंदा करावी. असा फार अविचारपणा आरंभिला. व प्रभु ज्ञातीवर ग्रामण्याचा प्रारंभ केला. "

व्याभिचाराबद्दल केवळ रावबाजीनाच कांही दोष द्यायला नको ! दुर्वर्तनाचा पाया त्यांच्या पूर्वीच्याच पेशव्यानें घातलेला होता, सिद्ध हें व्हायला आणखी कांही शिंगें राहिलीं नाहींत कै. **प्रो. लिमये** म्हणतात :—

" नारायणरावांचा जो क्रूरपणें खून करण्यांत आला, त्यामुळें त्यांच्या दोषांकडे दुर्लक्ष्य करून त्यांना अनुकूल असे मत बनविण्याची स्वाभाविक प्रवृति असते. परंतु या पेशव्यांच्या साडेनऊ महिन्यांच्या कारकीर्दीत त्यांनीं ज्या गोष्टी केल्या, त्यांचें सूक्ष्म रीतीनें निरीक्षण केल्यास त्यांच्या ठिकाणीं मुत्सद्दीपणाचा पूर्ण अभाव होता, असें स्पष्ट दिसतें. त्यांचा स्वभाव फार उतावळा व हेकट होता. ते हलक्या कानाचे होते. जुन्या, अनुभवी व पोक्त कारभाऱ्यांचा उपमर्द करण्यास अगर परिणामाचा विचार न करितां आपला हेका चालविण्यास त्यांना बिलकुल दिक्कत वाटत नसे. थोरल्या माधवरावांच्या लक्ष्यांत आपल्या धाकट्या बंधूंचे हे दोष कधींच येऊन चुकले होते, व ' याचे कपाळी राज्य नाहीं ' असा शेराहि त्यांनीं मारून ठेविला होता. " **मनोरंजन-वसंत अंक १९१४.**

" Forrests Selection's Vol. Part II p. 25 : नामक पुस्तकांतील विल्यम् टेलर यांचेहि उद्‌गार असेच आहेत. पहा :—

Had Naraynrao possessed the least degree of prudence, he might have remained secure in the Peshwaship. For though by the instigation of his mother (Gopikabai) and the choice he had made of confidents he had created himself a deadly enemy in the Diwan Sakharam Bapu ; yet the influence and abilities of the Phadnis Nana and Morobe and their adherents were more than a counterpoisa to him. But without the least share of judgment and wholly devoted to low vices and pleasures, Naraynrao paid not the least regard to any one, on the contary he behaved in so senseless, imperious and disgraceful a manner even to the ministers in his own party that they became lukewarm in his iterest and in time suffered him to fall a sacrifice to the machinations of his enemies."

असल्या व्याभिचारी, बदफैली आणि दुर्व्यसनी पेशव्यानें कायस्थ प्रभूंवर ग्रामण्य काय किंवा इतर दुसरा छळ काय, केला नसता तरच आश्चर्य मानायला काहीं जागा होती. ज्या कृतघ्न

नराधमानें छत्रपतीच्या तक्ताची व प्रत्यक्ष छत्रपतीचीहि निर्भत्सना करण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं, त्यानेंच कायस्थ प्रभूंवर ग्रामण्यासारखे जुलूम करावें, यांत विशेष तें काय ? पण राजवाड्यांना पेशव्यांचें सर्वच कांही " विशेष " वाटतें. स्वाभिमान कोणाला नसावा असें आमचें मुळींच म्हणणें नाहीं आणि राजवाड्या सारख्यांच्या आंगी तो जागृतावस्थेंत सदैव चमकत असतो याबद्दल केव्हाहि झालें तरी ते स्तुत्यर्हच आहेत. परंतु त्याच स्वाभिमानाची मर्यादा फाजील क्षेत्र व्यापूं लागली आणि स्वतःचे काळेकुट्ट दोष दुसऱ्याच्या माथीं मारून त्याला कुत्सित बुद्धीनें निराधार पातकांचे धनि बनविण्याचा उपद्व्याप सुरू झाला कीं त्या वृत्तीला स्वाभिमान म्हणण्यापेक्षां पशुवृत्ति म्हटलें तरी चालेल. चित्पावन नोकरशाहीच्या हातून घडलेल्या राष्ट्रविध्वंसक अनन्वित पातकांवर पांघरूण घालण्याच्या भरांत आमची राजेवाडेप्रभूति मंडळी आली म्हणजे सारासारा विचारांचें गांठोडें खुंटीला अडकवून शेजाऱ्यांच्या घरांवर तीं कशीं धोंडे मारण्याचा उपक्रम करतात, हें राजवाड्यांच्या या आक्षेपित लेखांवरून समजण्यास अडचण पडणार नाहीं. स्वामिद्रोहाच्या बाबतींत चित्पावन नोकरशाहीनें आपल्या दुष्कीर्तीचा जो टोलेजंग पिरामिड उभारून ठेवला आहे, तो एकदाच **दृष्टीआड सृष्टीआड** कसा करतां येईल ही आमच्या आधुनिक चित्पावन बंधूंस फार काळजी लागली आहे. परंतु दुर्वर्तनाची काजळी सद्वर्तनाच्या सफेधीनें बुजवून टाकण्याचा राजमार्ग त्यांनीं न पत्करितां पूर्वापार वहिवाटीप्रमाणें त्याच काजळीचे शिंतोडे इतर समाजांवर उडविण्याचा त्यांचा उद्योग पाहिला कीं त्यांच्याबद्दल अत्यंत तिरस्कार येतो.* येन केन प्रकारेण चां. का. प्रभूंवर साम्राज्यद्रोहाचा आरोप शाबीत करण्याच्या कामीं राजवाड्यांचा अट्टाहास किती जाज्वल्य आहे तो आतां आणखी विशद करून सांगायला नकोच. त्यांनीं या अट्टहासाच्या **वेडाच्या लहरींत** प्रथम १२ वर्षांच्या संभाजीच्या गळ्यांत कमिशनरशिपचें लोंढणेंहि अडकविण्यास मागेपुढें पाहिलें नाहीं. आतां राजवाडे म्हणतात कीं **" कित्येक कायस्थ मित्रांच्या सांगण्यांत असें येतें कीं नारायणरावाच्या वधांत कायस्थांचा हात होता आणि हें सांगण्यांतील अर्थ अगदीं संभवनीय दिसतो. "** या उताऱ्यावरून एवढेंच सिद्ध होत आहे कीं, मोठमोठीं जीर्ण गळाठीं हुडकिणाऱ्या राजवाड्यांना काय, किंवा बुरख्या बुरख्यामधून त्यांच्याशीं कानगोष्टी करणाऱ्या त्यांच्या आत्मद्रोही कायस्थ मित्रांना काय, या प्रकरणाचा लागावा तितका सुगावा अझून लागलेला नाहीं खास. साऱ्या गोष्टी आणि पुरावे ' सांगोवांगी ' च्या संभवावरच अझून डळमळत आहेत.

---

* सन १८५१ साली मि. ए. मॅक्डोनल्ड नामक गृहस्थानें ' नाना फडणीसाचें चरित्र ' नामक जो एक उत्कृष्ट इंग्रजी ग्रंथ लिहिला आहे, त्यांत (पृ. ६१) त्यांनीं चित्पावनांना दिलेलें सर्टिफीकीट सध्यांच्या राष्ट्रीयवाल्यांनीं आपल्या चरित्रशीं ताडून पहावें "The Mahratta Bramin is, from diet, habit and education, keen, active and intelligent but generally avaricious, and often treacherous. His life, if in public business must from the system of his Government be passed in efforts to deceive, and to detect others in deceiving. Such occupations raise cunning to the place of wisdom, and debase by giving a mean and interested bent to the mind, all those claims to respect and attachment upon which great and despotic power can alone have any permanent foundation. The history of the Mahratta nation abounds with instances of Bramins rising from the lowest stations to be ministers, and sometimes rulers of a state ; but their character undergoes little change from advancement, and in general, all its meanest features remain ; though often leading armies, the Mahratta Bramins have not, with some remarkable exceptions, gained a high reputation for courage ; and if arrogant cruel, they have often merited the charge of being unfeeling and oppressive."

कायस्थ प्रभूंनीं राघोबादादाचा पक्ष स्वीकारल्यामुळें चित्पावन नोकरशाहीच्या दंड्धारकांची आणि त्यांच्या बगलबच्या मुत्सद्यांची कायस्थ प्रभूंवर करडी नजर असावी यांत विसगत असें कांहींच नाहीं. नारायणराव पेशव्याच्या वेळीं चित्पावन आणि कायस्थ यांचा तंटा विकोपास गेला होता ही गोष्ट इतिहासप्रसिद्धच आहे. परंतु शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीपासून स्वार्थत्याग करण्यांत अग्रेसरत्व पटकविणाऱ्या, हिंदवी स्वराज्यवृद्धीस अडथळा आणणाऱ्या गणोजी शिर्क्याला आपली स्वतःची वतनी जहागीर बहाल देऊन स्वतः कफल्लक बनणाऱ्या आणि वेळोवेळीं चित्पावन पेशव्यांच्याहि हिताकरितां अनेक संकट करणाऱ्या कायस्थ प्रभूंच्या वंशजांच्या हातून खुनासारखें नीच कृत्य होणें शक्य असेल काय, याबद्दल राजवाडे समाजशास्त्र्यांनीं जरा किंचित् पोक्त विचार करावयास पाहिजे होता. खुनासारखीं अमानुष कृत्यें करण्यास निरढावलेल्या समाजांची पूर्वसंस्कृति आणि पूर्वेतिहास तितकाच घातकी आणि राक्षसी असावा लागतो, हें साधें स्वानुभवाचें तत्व या समाजशास्त्रीबुवांच्या लक्षांत यावयास पाहिजे हातें. समाजशास्त्र गुंडाळून ठेवलें आणि नुसता इतिहासच घेतला तरी काय सिद्ध होत आहे ? '' व्रणार्थ पशुच्या शिरावरि सदा उभे काकसे '' अशा आमच्या चित्पावन बंधूंना असा कांहीं ऐतिहासिक पुराव्याचा एखादा तुकडा जरी सांपडता तरी ते आज आकाशाहूनही उंच झाले असते. परंतु अत्यंत आश्चर्याची गोष्ट ही कीं डोळयांत तेल घालून जुन्या दप्तरांचीं बांडें संशोधन करणाऱ्या एकाही इतिहास संशोधकाला असला ऐतिहासिक पुरावा अझून मिळालेला नाहीं ! चित्पावन बुद्धिमंद नाहींत. तेव्हां या भयंकर प्रकरणांत जर कायस्थांचा खरोखरच कांहीं हात असता तर तो त्यांनीं कधींच झांकला जाऊं दिला नसता. परंतु नुसत्या तर्कवादावरच इतिहासाची भली मोठी विश्वामित्री सृष्टी वेळोवेळीं निर्माण करण्याचें बाळकडूं मिळालेल्या राजवाड्यांना ' कित्येक कायस्थ मित्रांचें सांगणें ' हा एवढाच धागा.

## कायस्थ प्रभूंवर खुनाचा आरोप

करण्यास पुरेसा वाटावा, यांत आश्चर्य तें कसलें ? मंडळापुढे ज्यावेळीं राजवाड्यांनीं आपला हा दिव्य निबंध वाचला त्यावेळीं ' नागपुरकर भोंसल्यांची बखर ' प्रसिद्ध करणारा रा. ब. साने हे अध्यक्ष होते. या त्यांच्या बखरींत नारायणराव पेशव्यानें राघोबादादा आणि आनंदीबाई यांच्यावर केलेल्या अमानुष छळाचें वर्णन दिलेलें आहे. पांच दिवसपर्यंत राघोबादादाला अंधारकोठडींत उपाशीं कोंडून ट्टेविलें होतें आणि लुगड्यांत काहीं कागदपत्र लपवून ठेवूं नये म्हणून आनंदीबाईलाहि नेसावयास वस्त्र न देतां नग्न * स्थितींत तिचा बराच छळ करण्यांत येत होता, वगैरे माहिती रावबहादुरानी संशोधन करून छापलीच आहे. राजवाड्यांनीं का. प्रभूंवर नारायणरावाच्या खुनाचा आरोप करणारा आपला निबंधवेद वाचतांना त्या माहितीची त्यांना आठवण होऊं नये हें मोठें चमत्कारिक दिसतें. खून झाल्यानंतर सुमेरसिंगाला तोफेच्या तोंडीं देणारे चित्पावन **नोकरशाहीचे बिरबल** नाना फडणीस खुनाच्या आदल्या रात्रींच पुण्याहून

* '' मग दादासाहेबांचा बंदोबस्त करून ठेविला. देवपूजा करूं देऊं नये ; कीं या योगानें माझा भाऊ मारला असें म्हणोन खोलींत ठेविले. दादासाहेब अर्घ्य प्रदान सूर्यदर्शन घेतल्याविना अन्न भक्षूं नये हा नेम होता. खोलींत राहिल्यामुळें पांच उपोषणें जाहलीं व दादासाहेबांचे स्त्रियेस लुगड्यांत फंदाजे कागद लपविले या निमित्यानें लुगडें फेडून छळणा करावी. ''

रा. ब. साने संशोधित—
नागपूरकर भोसल्यांची बखर.

बाहेरगांवी चालते झाले होते आणि इकडे खून होत असतांना सासवडच्या पुरंदऱ्याकडे स्वारी मेजवान्या झोडीत बसली होती. उडत्या पांखरांचीं पिसें मोजणारे, पुण्यांतील स्वतःच्या घरांतील. भिंतीला कान देऊन हैद्राबादच्या निजामाच्या रंगमहालांतल्या गोष्टी ऐकणारे, हे खूप शर्तीनें राज्य राखणारे **यशवंत फडणीस** नाना खुनाच्या आदल्याच रात्रीं बिनचूक पुणें सोडतात, तर खुनाच्या कटांत खुद्द नाना फडणीसाचेंच आंग नव्हतें, हें तरी कशावरून ? सारांश, या प्रकणांत बाजारगप्पांच्या आधारानें कायस्थ प्रभूंवर खुनासायखा आरोप करणें, हें अत्यंत निंद्य व नीच कृत्य होय. यापेक्षां तीव्र अर्थाचें विशेषण मराठी भाषेंत आह्मांला सांपडत नाही. नाना फडणीसानें कटांतील सर्व अपराध्यांना शिक्षा ठोठावल्या ; त्यांत एकाही कायस्थाचें नांव नाहीं. सखारामबापू बोकीलालासुद्धां कैद केले होते. मग नाना फडणीसानें कायस्थांना मुद्दाम वगळलें होतें कीं काय ? तात्पर्य हें सर्व थोतांड असून कायस्थांचा तेजोभंग करण्याकरितां तें रचलेलें आहे ! कायस्थांचा या खुनाशीं कांहीं संबंध जोडण्यांत नाना फडणीसाच्या चातुर्यावर काजळ फांसलें जातें ही गोष्ट चित्पावन विसरून जातात. बाकी, चित्पावनांप्रमाणें कायस्थ प्रभू साम्राज्यद्रोही किंवा खुनी ठरत असल्यास नाना फडणीसाच्याचशा काय, साऱ्या पेशव्यांच्याहि तोंडाला काजळ फांसण्यास तयार होण्याइतके ते स्वार्थत्यागी आहेत हें आम्हीं जाणून आहोंत. ' नारायणरावाच्या वधाच्या बाबतींत सखाराम हरीची सल्ला रघुनाथराव दादाला **अवश्यमेव** मिळाली असली पाहिजे ' असलें छातीठोक **घाशीरामी विधान** करतांना नाना फडणीसाच्या इतिहासप्रसिद्ध अकलेपुढें आपल्या स्वतःच्या अकलेचें तट्टू धांवडण्याची राजवाड्यांना स्फूर्ति झाली असें दिसतें. राजवाड्यांच्या आंगीं नाना फडणीसावें फडणीशी चातुर्य मुळींच नाहीं असें नाहीं ; पण खुनासारख्या भयंकर वादग्रस्त प्रश्नाचा निकाल लावण्याच्या कामीं नानाच्या अकलेवर सरशी करण्यांचें त्यांचें धाडस पोरकट दिसतें. सखाराम हरी किंवा त्याच्या पुढारपणाखालीं असलेलें का. मंडळ यांचा जर खुनांत कांहीं प्रत्यक्ष संबंध असता ; तर राघोबा आणि आनंदीबाई यांना जात्यांत भरडून काढण्यांत ज्या नानानें मागें पुढें पाहिलें नाहीं ; त्यानें त्यावेळीं-कर्तुमकर्तुम् अन्यथा अकर्तुम् अशी सत्ता हातीं असतांना-कायस्थांचा किंवा सखाराम हरीचा मुलाजा राखला असता काय ? उलट खुनाच्या क्रांतीनंतर जें प्रधानमंडळ बनविण्याचें राजकारण नाना व महादजी यांनीं केलें त्यांत सखाराम बापू ; मोरोबा फडणीस व सखाराम हरी गुप्ते यांनींहि सामील व्हावें, म्हणून नानांनीं आपले जंग जंग पछाडले. परंतु सखाराम हरीनें नानाला या प्रकरणांत जें सडेतोड उत्तर दिल तें कायस्थ प्रभूंच्या इतिहासप्रसिद्ध स्वामीनिष्ठेला अधिकच उजाळा देण्यासारखें होतें. हें उत्तर ग्रँट डफ्च्या शब्दांनीच आम्ही येथें देतों :—It Was agreed that a new ministry should be formed........and Sakharam Hari nobly declared that nothing should ever induce him to abjure the cause of a generous master who had been his protector from youth to manhood, that Raghunathrao was a soldier, and Nana cunning cowardly courteer." Vol II

p. 250 'जो पक्ष एकवेळ स्वीकारला त्याचा त्याग करणे हें कुलीनास उचित नाहीं. हे उद्‌गार सत्ताधाऱ्याच्या तोंडावर निधड्या छातीनें काढणाऱ्या सखाराम हरीला आणि त्याच्या ज्ञातीला राजवाडे खुनासारख्या चिळस आणणाऱ्या आरोप्यांच्या मालिकेंत ओढतात, तेव्हां त्यांच्या उलट्या काळजाची तारीफ करावी तेवढी थोडीच. कायस्थ प्रभूंचा राजकीय इतिहास आणि चिटणीशी दिवाणगिरीच्या जागांवरील त्यांच्या इमानीं कर्तबगारीचा महिमा शिवकालापूर्वीपासून तों आजदीनतागायत सर माधवराव चौबळ, सर रघुनाथराव सबनीस आणि सर नामदार चिटणविसांपर्यंत अव्याहत वाखाणला गेलेला आहे. परंतु महाराष्ट्रीयांना ज्ञात अशा शिवकालीन बाळप्रभू चिटणिसापासून जरी इतिहास पाहिला तरी तेव्हांपासून तो आजच्या विद्यमान् दिवाणबहादुर समर्थांपर्यंत एखाद्या कायस्थानें स्वामिद्रोह, खून किंवा राज्यापहार केल्याचें उदाहरण घडल्याचें आमच्या ऐकिवांत नाहीं किंवा तसा कागदोपत्री पुरावाहि नाहीं. उलट का. प्रभूंच्या नेकीबद्दल आणि इमानाबद्दल श्रीशिवछत्रपतींचा जो अभिप्राय प्रसिद्ध आहे. तोच अभिप्राय सांप्रतच्या ब्रिटिश रियासतींतही कायमच असें असतांना भा. इ. सं. मंडळानें राजवाड्यांचे हस्तें या समाजाला

**निमकहराम, खूनी आणि स्वराज्यद्रोही**

बनविण्याचे दुष्कृत्य करावें हें किती लांछनास्पद आहे, याचा सुज्ञानींच विचार करावा. '**कायस्थांच्या वेदाधिकाराला विरोध केल्यामुळे नारायणराव पेशवा मारला गेला आणि पुढें मराठी राज्यांत २५ वर्षे यादवी माजली**' हाच जर राजवाड्यांच्या दीर्घ 'समजुती' चा सिद्धांत असेल, आणि '**स्वराज्य जाण्याला याच लोकांचे तंटे कारणीभूत झाले**' हा त्याचा निष्कर्ष असेल, तर मराठी राज्यांत आणि खुद्द पेशवाईत कायस्थांखेरीज इतर सारे भ्याड आणि नामर्द होते, हें तरी राजवाडे कबूल करायला तयार आहेत काय ? आणि कायस्थ प्रभू जर इतके शिरजोर झाले होते तर पुढचे तीन पेशवे कोणत्या सबळ पुण्याईच्या जोरावर तगले ?

टणत्काराचें परीक्षण करतांना **रा. ब. पुरूषोत्तम बाळकृष्ण जोशी** एफ. आर. जी. ए. जे. पी. या ज्ञानवृद्ध व वयोवृद्ध इतिहास-संशोधक गृहस्थांनी या मुद्यावर 'नवयुग' फेब्रुवारी १९१९च्या अंकात केलेलें विवेचन मुद्दाम येथें उदधृत केलें आहे.

" श्री. राजवाड्यांच्या वरील विधानांच्या सत्यासत्यतेचा इतिहासदृष्ट्या आपण विचार करू. ह्या विषयासंबंधानें प्रस्तूत लेखकास अधिकारयुक्त वाणीनें बोलतां येण्यासारखें आहे ; कारण सुमारें पस्तीस वर्षांमागें म्हणजे ज्यावेळीं श्री राजवाडे हे कॉलेजांत इतिहासांचे अध्ययन करीत असतील किंवा इतिहास-संशोधनाच्या कार्याचा ओनामा शिकत असतील अशा वेळीं प्रस्तुत लेखकाने सर जॉर्ज फारेस्ट ह्यांच्या सहकारितेनें मुंबई सरकारच्या दप्तरांतील मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांच्या प्रकाशनार्थ कित्येक वर्षे संशोधनाचें कार्य केले आहे. हें काम करीत

असतांना आम्हांला सरकारच्या 'सीक्रेट' आणि 'पोलिटिकल' खात्यांच्या जुन्या दप्तरांत मराठ्यांच्या इतिहासांवर नवीन प्रकाश पाडणारी बरीच माहिती उपलब्ध झाली. त्यापैकीं कांहीं महत्त्वाचा भाग Selections from State Papers, Mahratta Series नांवाच्या पुस्तकांत प्रसिद्ध झाला आहे. त्यांत मुंबई सरकारनने वॉरन हेस्टिंग्स ह्यांच्या माहितीकरीतां पुण्यांतील इंग्रज वकीलांकडून लिहविलेला मराठी राज्याच्या स्थापनेपासून तों सन १७७५ पर्यंतचा मराठी राज्यव्यवस्थेचा साद्यंत वृत्तांत प्रसिद्ध केला आहे. ह्या वृत्तांताच्या सूक्ष्म निरीक्षणानें असे सिद्ध होतें कीं, **नारायणरावाच्या वधास नारायणरावाची आई गोपिकाबाई व नारायणराव ह्यांचें दुर्वर्तन व कृष्णकारस्थानेंच बहुतांशीं कारणीभूत झालीं**. थोरल्या बाजीरावाप्रमाणेंच त्याचें नातू थोरले माधवराव राजनीतिविशारद व दूरदर्शी होते. राघोबादादाच्या शौर्याची व उपयुक्ततेची त्यास जाणीव होती आणि म्हणून दादांची राज्यकारभारात ते नेहमीं सल्ला घेत असत आणि मरणसमयीं गोपिकाबाईंच्या तंत्रानें न वागतां दादांचे ऐकत जावें असा उपदेश नारायणरावास त्यांनीं केला होता. **नारायणरावाची आई गोपिकाबाई ही मोठी कारस्थानी व दुराचरणी होती.** तिचे वर्तन पेशव्यांच्या कुळास काळिमा आणणारे आहे असे राघोबास वाटत असें. अशी वस्तुस्थिती असल्यामुळें गोपिकाबाईंचा राघोबा व त्यांचे मंत्री ह्यांजवर मोठाच कटाक्ष होता हें उघड आहे. म्हणून दादासाहेब व त्यांचे दिवाण ह्यांचा सूड कसा घ्यावा ह्या विचारांत ती निमग्न असे. इंग्रजांचा पुण्यांतील वकील विल्यम टेलर आपल्या रिपोर्टात म्हणतो, कीं **गोपिकाबाई व नारायणराव ह्यांनीं गुप्त खलबत करून दादा आणि सखाराम बापू ह्यांचा खून करण्याची योजना तयार केली होती**. पण सुदैवानें मुधोजी भोसल्यानें ह्या कारस्थानाची खबर सखाराम बापू व दादा ह्यांस वेळींच दिल्यामुळें गोपिकाबाईचा दुष्ट हेतु सिद्धीस गेला नाहीं. हें कारस्थान उघडकीस आल्यामुळे पुण्यास बरीच खळबळ उडाली ; दादा व नारायणराव तसेंच गोपिकाबाई आणि आनंदीबाई ह्यांच्यातील भांडण विकोपास गेलें आणि त्यांचें पर्यवसान नारायणरावाच्या वधांत झालें. ह्यासंबंधानें पुण्यांतील इंग्रज सरकारच्या वकीलाचें म्हणणें पुढें दिल्याप्रमाणे आहे :—

"It is said, by means of Mudaji Bhonsla the divan Sakharam received information of an intention to assasinate him and Raghoba, at the instigation of Gopikabai. Certain it is that this woman was well known to have been constantly advising her son to deprive him of the divanship which was the first step to the loss of riches and perhaps of life. From this instant Sakharam and his party set about concerting the means of deposing Narayanrao, relieving Raghoba, and placing him in the Peshwaship. Chiefly by means of the intervention of the Divan, Mahomed Essuf and

Sumersing, two subhedars, were won over to exceute the deed. On the 18th August 1773 at two in the afternoon they led their party of 500 men to the Darbar under pretence of being mustered, they forced the gates and put the guards to the sword-Narayenrao apprehensive of their design ran to his uncle Raghoba begging to take the Government but spare his life. Raghoba, it seems, wished to save him, as nothing more than his imprisonment was ever meant, but owing to the resentment of a slave of the family whom Narayenrao had caused to be publicly whipped, his death was determined upon. The assasins threatened instantly to destroy both, if he did not loose his nephew ; he then thrust him from him and the young man soon expired at his feet."

वरील उताऱ्यावरून असें दिसून येतें कीं, नारायणरावाचा वध करावा असा दादा व सखाराम बापू ह्यांचा विचार नसून नारायणरावास धरून पदच्यूत करावें असा त्यांचा उद्देश होता. नारायणरावानें आपल्या एका नोकरास भररस्त्यांत चाबकाने मारले होतें. ह्या अपमानाचा सूड उगवण्यासाठीं ' नारायणरावास जीवें मारीन ' अशी त्यानें प्रतिज्ञा केली होती आणि ती प्रतिज्ञा नारायणरावाचा खून करून त्यानें शेवटास नेली. ह्यावरून नारायणरावाचा खून कायस्थ प्रभूंच्या चिथावणीवरून झाला हा आरोप निराधार ठरतो.'' (नवयुग २३७–२३८.)

त्याचप्रमाणें **श्रीयुत माधवराव लेले** यांचे खालील विचारहि मननीय आहेत :—

'' नारायणराव पेशव्यांच्या खुनांत कायस्थ प्रभूंचे अंग होतें, हेंही विधान खरें मानतां येण्याजोगें नाहीं. या तरूणबांड शिराळशेटी पेशव्याच्या संबंधानें अलीकडे बरेच वर्षांपूर्वीपर्यंत त्याच्या भयंकर व आकस्मिक खुनामुळें साधारणपणे महाराष्ट्रीयांच्या मनांत एक तऱ्हेची सहानुभूति व अनुकंपा वसत होती ; व तसें असणें तोंवर उपलब्ध असलेल्या हकीकतीवरून व तत्संबंधीं करूणरसपूर्ण जुन्या व नव्या नाटकप्रयोग-प्रेक्षणावरून विशेष गैर होते असें नाहीं. पण त्याच्या कारकीर्दीच्या व वर्तनाच्या संबंधानें अलीकडे उपलब्ध व प्रसिद्ध झालेल्या ऐतिहासिक माहितीवरून पाहतां, नारायणराव पेशवे ही एक संभाजी महाराजांचीच पुनरावृत्ति होती असें दिसते त्याचा ज्या तऱ्हेनें वध झाला ती तऱ्हा ग्राह्य असली तरी राघोबादादा व आनंदीबाई यांना त्याचा खून करविण्यावांचून गत्यंतर नव्हतें, असेंच म्हणावे लागतें. त्याचें खाजगी वर्तन अनीतीचें व अन्यायाचें असून, सार्वजनिक व दरबारी वर्तनही गर्ह्य, उर्मट व उद्दामपणाचें होतें. त्याचमुळेच तो अप्रिय झालेला होता. त्याच्या खुनाच्या दिवशीं नाना फडणीस नव्हते हें खरें असलें, तर त्यावरून, एक तर त्यावेळीं त्यांचें दरबारात तितकें वजन नव्हतें आणि त्यांची कर्तृत्वशक्ति विशेष उदयास आलेली नव्हती असें, किंवा त्यांच्याकडून या प्रसंगीं चुकून

किंवा बुद्ध्या उपेक्षा करण्यात आली, असेंच म्हणावें लागतें. सखाराम हरी गुप्ते यांची या खुनाच्या कामीं राघोबादादाला सल्ला असावा, या म्हणण्याला कांहीं आधार नाहीं. ही गोष्ट घडण्यापूर्वी त्यांना ती माहीत होती, असें म्हणण्याला सुद्धां अडचणच आहे. निदान तसा संशय बारभाईंना त्यावेळी आल्याचे अपलब्ध साधनांवरून दिसत नाहीं. प्रभु मंडळींत तेच त्या समयास विशेष प्रसिद्ध होते. या खुनाच्या संबंधात कोणाही कायस्थ प्रभूंवर त्या वेळच्या कर्त्या मुत्सद्दी मंडळींनीं आरोप केल्याचें किंवा त्यास शिक्षा केल्याचें प्रसिद्ध नाहीं. अशा स्थितींत यासंबंधानें कायस्थ प्रभूंवर आरोप करणें अन्यायाचे आहे.

" नारायणरावाचा खून झाला त्याचें बीज, वास्तविकपणें नानासाहेब पेशव्यांच्या अकालिक मरणानंतर राघोबादादाला पेशवाई न मिळतां पोरवयाच्या माधवरावाला, तो नानासाहेबांचा उरलेला वडील पुत्र म्हणून, मिळण्याविषयीं खटपट झाली तेव्हांच पेरलें गेलें. पेशवाई ही वंशपरंपरेची खासगी मिळकत समजली जाऊन हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें व कुलपरंपरागत पद्धतीप्रमाणें ती वडील पुत्राला मिळालीच पाहिजे असें समजण्यांत आलें, ही मोठी चूक झाली. यावेळीं राघोबादादा चांगला तरवारबहाद्दर तसांच बऱ्याच योग्यतेचा लेखणीबहाद्दरही होता. त्याला पेशवाई मिळती तर बहुधा त्यानें पुनः आपला विशेष आवडता तरवारबहाद्दरपणा पतकरून राज्यव्यवस्थेचें काम इतर योग्य कामगारांकडे सोंपून दिलें असतें ; आणि दोन्ही कामें सुयंत्र चालतीं, माधवराव मोठे झाल्यावर त्यांचे योग्य नायब व हस्तक–बाजीरावाचे चिमाजी आप्पासारखे–बनते, आणि त्यांना क्षयानें मरण्याची पाळी न येंती. तसेंच राघोबादादालाही दुसरें लग्न करून आनंदीबाईसारख्या अप्सरेच्या पाशांत सांपडून बाजीरावसारखें नवरत्न पैदा करण्याचा प्रसंगच न येता, त्याच्या पश्चात् विशेष कर्तृत्ववान व अनुभविक झालेल्या माधवरावाला अधिकच योग्यरीतीनें पेशवाई करून नांव मिळवितां आले असतें. पण अमुक झालें असतें तर तमुक झाले असतें, असे म्हणणें व्यर्थ आहे. भगवद्गीतेंत म्हटल्याप्रमाणें " दैंव चै वात्र पंचमं " हेच आपल्याकडे वेळोवेळीं निदर्शनास येत गेलें व येत आहे. नारायणराव पेशव्यानें पेशवाईचीं वस्त्रें मिळविण्याच्या वेळीं केलेल्या निर्मर्याद व गर्ह्य वर्तनाचें उपलब्ध वर्णन खरे असलें तर ह्याच वेळीं एकाद्या अस्सल पूर्वपरंपरागत राजनिष्ठ प्रभूनें किंवा मराठ्याने नारायणरावाला छाटून टाकलें असतें तरी त्यांत कांहीं वावगें होतें ना. पण अशा वेळीं सुद्धां कायस्थ प्रभू निमकहराम बनल्याचें दिसून येत नाहीं."

**विविध ज्ञानविस्तार एप्रिल १९१९.**

राजवाड्यांचा कायस्थ प्रभूंवरचा तिसरा आक्षेप असा आहे :—

**" सातारच्या महाराजांच्या वतीनें दुसऱ्या बाजीरावाच्या विरुद्ध चांद्रसेनीयांनी इंग्रजांशी खटपटी केलेल्या महशूर आहेत." (पृ. ३८ कलम १३).** हें विधान पाहिलें म्हणजे या

कायस्थांना कोणत्या वैलात घालून कोणत्या वैलांत काढू असे राजवाड्यांना झालेंसें दिसतें. चित्पावन नोकरशाहीच्या शेवटच्या उलट्या अंबारीच्या या दिग्विजयी इंद्राविरूद्ध इतर कोणी खटपटी केल्याच नाहींत कीं काय ? मग चांद्रसेनीयांनाच तेवढें पुढें कां ढकलण्यात येत आहे ? रावबाजीचे असे कोणते सदगुण होते कीं त्यांचें तळपट उडालेलें पाहून, चांद्रसेनीयांच्या 'महशूर' खटपटी राजवाड्यांच्या डोळ्यांत खुपू लागाव्या ? छत्रपति प्रतापसिंहाची पेशव्यांच्या तुरुंगवासांतून मुक्तता करण्यासाठीं चांद्रसेनीयांनीं केलेल्या खटपटी मात्र राजवाड्यांना दिसल्या आणि त्या त्यांच्या लाडक्या रावबाजीच्या विरुद्ध, म्हणून तर अधिकच महशूर भासल्या ! "आश्रित लोकांनीं चार चार पांच पांच लग्नें करून घरीं एक बायको ठेवावी आणि सरकारवाड्यांत बाकीच्या बायका पाठवाव्या." असल्या दिव्य राजनीतीचे पुरस्कर्ते रावबाजी जेव्हां गर्भांत होते, तेव्हांपासून त्यांच्या विरुद्ध कारस्थानें करणारे आणि त्याला, त्याच्या बापाला किंवा त्याच्या औरस संततीला **चुकूनसुद्धां नमस्कार करावयाचा नाहीं,** म्हणून ओंकारेश्वरावर नारायणराव पेशव्याच्या चितेसमक्ष शपथा वाहणारे नाना फडणीस कांहीं चांद्रसेनीय नव्हते ना ? राघोबादादावर खवळून जाऊन रावबाजीचा स्पर्श पेशव्याच्या गादीला न होऊ देण्याची शिकस्त करणाऱ्या बारभाईच्या खेतींत कितीसे चांद्रसेनीय सामील होते ? ज्याच्या नांवानें जन्मदारभ्य हातबोटें चोळलीं त्याच रावबाजीला नानानें हात धरून पेशवाईच्या गादीवर बसविणें आणि आपण स्वतः त्याच 'राघोबाच्या* कारट्या' पुढें 'जी सरकार' म्हणून हात जोडून उभें राहणें, या राजकारणी पागोट्याच्या फडणीशी फिरवाफिरवीला स्वराज्यासाठीं स्वार्थत्याग समजणारे फक्त आंधळे नानाभक्त किंवा राजकारणाचीं चिंपाडें चोखून मुत्सद्दीपणाची घमेंड मारणारे वावदूक पुणेरी दे. भ. यांच्याशिवाय दुसरे कोणी सांपडतील कीं नाहीं याची शंकाच आहे. † आत्मवर्चस्वासाठीं घटकोघटकीं धोरणांचें पागोटें फिरविणारा नाना स्वराज्यभक्त दिसावा आणि चांद्रसेनीय एकटेच काय ते स्वराज्यद्रोही दिसावे, यांत आम्हांला मुळींच आश्चर्य वाटत नाहीं. कोणती ऐतिहासिक व्यक्ति श्रेष्ठ, राजमान्य किंवा लोकमान्य, हें ठरविण्याचा मक्ता आमच्या पुणेंकर चित्पावन देशबंधूंनीं

---

* "सवाई माधवराव यांनी शनिवारचे वाड्यांत उडी टाकल्यावर ते मरण पावले. नंतर नाना फडणविसांनीं असा विचार केला कीं, दादासाहेब यांचे मुलास पुण्याचे गादीवर आणलें तर सर्वांस (?) अनिष्ट आहे. कारण ते सर्व राज्याचे द्वेषी, याजकरितां दुसरा कोणी तरी यजमान बसवावा. ' हें मनांत आणून व राज्याचा नाश होऊं नये याकरितां बाजीरावाची पत्रिका करवून व राज्ययोग नाहीं वगैरे सबबी लाऊन ती प्रसिद्ध केली."

**लो. हि. वा. भाग १, पृ. ४८-४९.**

† "The Maratha chiefs in general are much disgusted with Nana Fadnavis, and jealous of his ambitious view which apparently tend to fixing himself at the held of that Government."

Forrest's Selections, Vol. I, Part II p. 301.

घेतलाच आहे; तेव्हां त्यांना सातारकर महाराजांच्या वतीनें रावबाजीच्याविरुद्ध खटपटी करणारे चांद्रसेनीयच कायते दिसावे आणि कुप्रसिद्ध चिंतामणराव पटवर्धन 'शतकृत्य करणाऱ्या नरपुंगवांचे मुकुटशिरोमणि' भासावे, यांत काय नवल? 'ज्याचें अन्न खावें त्याच्याकरितां मरावें' या जन्मसिद्ध प्रवृत्तीमुळें, सातारकर छत्रपतीच्या तक्ताचा अभिमान धरुन, तत्कालीन् राजकारणाच्या रागरंगाप्रमाणें चां. का. प्रभूंनीं रावबाजीच्या पाजी राजनीतीला शह देण्यासाठीं आणि छत्रपतीच्या तक्ताच्या चिरस्थाइत्वासाठीं जर कांही खटपटी केल्या असतील, तर त्याबद्दल राजवाडे प्रभृति मत्सरी संशोधकांव्यतिरिक्त कोणीहि त्यांना जबाबदार धरूं शकणार नाहीं. परंतु जेथें राजवाडे

## कायस्थ प्रभूंवर स्वराज्यनाशाचें खापर

फोडण्यास सिद्ध झाले आहेत, तेथें त्यांनीं रावबाजीविरुद्ध केलेल्या खटपटींच्या पापाचें खरेंखोटें माप त्यांच्या एकट्याच्याच पदरांत न घालावें तर काय करावें? पुण्याच्या सुप्रसिद्ध प्राचीन साडेतीन शहाण्यांच्या ज्या अर्वाचीन अभिमानी दीडशहाण्यांना 'अहिल्याबाईनें दानधर्म करून पेशवाई बुडविल्याचें' स्पष्टस्पष्ट दिसतें आणि सांमतचा मुसलमान समाज दंगेधोपे करणारा, सांसर्गजन्य रोगांनीं लिडबिडलेला, कर्तव्यशून्य आणि 'इतर सुधारलेल्या, शास्त्रसंपन्न व शुचिर्भूत देशांची गुलामगिरी करण्यापलीकडे येणाऱ्या हजार बाराशें वर्षे गत्यंतर नसलेला' (पहा भा. ई. सं. मं. चतुर्थ अहवाल पृ. १२) असा नीचतर पदवीस पोहोंचलेला दिसतो, त्याच संशोधकांनीं चां. का. प्रभूंवर घाणेरडे आरोप करण्यांत प्रत्यक्ष आपल्या सदसद्विवेक बुद्धीचाहि खून करण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं, तर आश्चर्य नव्हे! बरें, त्यांतूनहि रावबाजीच्या विरुद्ध चां. का. प्रभूंनीं खटपटी केल्या असें राजवाड्यांच्या महशूर समजुतीप्रमाणें गृहीत धरलें, तरी सांप्रतच्या कायस्थांना त्यांतसुद्धां अभिमान बाळगायला बरीच जागा आहे. शरीराचा नासकाकुसका अवयव कापून टाकणें हें ज्याप्रमाणें केव्हांही श्रेयस्कर असतें, त्याप्रमाणें ज्या उदात्त कल्पनेवर श्रीशिवछत्रपतींनीं मराठी राज्याची स्थापना केली व ज्याकरितां चां. का. प्रभूसमाजानें आपल्या अनेक नरनारींच्या प्राणांच्या आहुती दिल्या, त्याच कल्पनेला जेव्हा स्वार्थसाधु आणि कृतघ्न अशा चित्पावन नोकरशाहीचीं कीड लागली, तेव्हां तो नोकरशाहीचा सडका भाग छाटून टाकण्याच्या उद्देशाला हातभार लावणें तत्कालीन् कायस्थांना श्रेयस्कर वाटलें असल्यास कांहीं नवल नाहीं. आम्ही तर आज असेंहि म्हणतों कीं पेशव्यांनीं छत्रपतीला कैदेत धाकतांच, एखाद्या कायस्थानें रावबाजीला भर बुधवारांत छाटून टाकला असता, तर कदाचित् स्वराज्याची मान इतक्या लवकर फासांवर चढली नसती! तथापि इतिहास पाहिला तर स्वराज्यनाशाच्या बाबतीत खुद्द चित्पावन नोकरशाही आणि तिच्या नांवाचा गोंधळ घालणारे चित्पावन भुत्ये यांना जितका जाब देणें भाग पडेल, तितका चां. का. प्रभूंना मात्र खास नव्हे. खुद्द ब्रिटीश सरकारच्या संशोधक खात्याचा शेरा पहा :—"Even during the rule of the Peshavas, persons of this community (C. K. Prabhu) like the warlike brothers Sakharam Hari and Baburao Hari Gupte, of whose unswerving loyalty to their master, Nana Fadanavis was extermely jealous, and

Nilkanthrao Page Played a conspicuous part in the maintenance of Maratha Rule." (Monograph No. 4 p. 9) या शेऱ्यानंतर कित्येक इतिहासप्रसिद्ध कायस्थ वीरांची थोडक्यात माहिती देऊन समारोप केला आहे कीं :— "This caste has maintained its character for loyalty and trustworthiness to the present day. Members of it hold places of trust both in Native states and under the British Government, to whom they have always exhibited conspicuous loyalty." आश्रयदात्या तक्ताधिपति राजाशीं इमानी राहणें हें जर पुण्याच्या विश्वामित्री संशोधनी दृष्टीला आणि सरडेवजा राजकारणाला पातक वाटत असेल, तर त्या पातकाचे भागीदार व्हायला (चां. का. प्रभू केव्हाहि तयार आहेत. ज्याला एकदां इमान दिलें, त्याच्याशीं अखेरपर्यंत एकनिष्ठेनेंच वागणें, हें एकच तत्व कायस्थप्रभूंच्या ब्रीदाची साक्ष पटविण्यास पुरेंसें आहे;) आणि त्यांचा सारा इतिहास या एकाच तत्त्वानें जणूंकाय रंगून निघालेला आहे, असें म्हणण्यांत मुळींच अतिशयोक्ति होणार नाहीं. कायस्थ प्रभूंशी चित्पावन समाजानें पेशव्यांच्या भरभराटीच्या अमदानींत काय थोडें हाडवैर गाजवून घेतलें ? (त्या इतिहासप्रसिद्ध पशुवत् वर्तनाची पुनरावृत्ति ईश्वर करो आणि आमच्या कट्ट्या दुष्मनांवरहि न होवो !) परंतु इमान दिलेल्या चित्पावनांशींसुद्धा कायस्थ-प्रभूंनीं आपल्या निष्ठेंत अणुरेणू कमी केला नाहीं. सरदार सखाराम हरी गुप्ते यांनीं चित्पावन पेशवे राघोबादादाची नोकरी बजाविण्यांत वेळोवेळीं किती स्वार्थत्याग केला (आणि अखेरीस आत्मयज्ञहि केला !) आणि विरुद्धपक्ष प्रबळतम असतांहि–फार काय लांचलुचपतीचाहि जोर भयंकर असतांना त्यांनीं एकनिष्ठेची केवढी अपूर्व चिकाटी दाखविली याचा जर आमच्या आधुनिक चित्पावन देशबंधूंनीं किंचित् निःपक्षपात बुद्धीनें विचार केला तर वेळास येथें नाना* फडणीसाचा वार्षिकोत्सव करण्याची त्यांना खचित लाज वाटेल. राघोबादादानें इंग्रज कुंफणीची कांस धरतांच त्याचे सर्व इमानी आणि एकनिष्ठ सेवक सहाजीकच त्याच्याबरोबर तिकडे वळले, यांत विशेष कांहीं नाहीं. पण तेवढ्यावरून रावबाजीविरुद्ध खटपटींचे खापर कायस्थ प्रभुंच्या माथीं येऊन कसे फुटतें,हें मात्र आम्हांला कळत नाहीं. स्वतःच्या माथीं येऊन भिडलेलें स्वराज्यनाशाचें पाप येन केन प्रकारेण कायस्थांच्या माथीं मारण्याचा उपद्व्याप करणाऱ्या चित्पावन इतिहास संशोधकांनीं, रावबाजीच्या धामधुमींत तत्कालीन चित्पावन सरदारांनीं काय काय कारस्थानें लढविलीं आणि पेशवाई गेली तर जावो पण माझी सांगली चांगली राहो म्हणून स्वतःचा तळीराम गार करण्याकरितां काय काय उलाढाल्या केल्या, याचा इतिहास डोळे असल्यास अवश्य पहावा. सरदार सखाराम हरीचे पुत्र आनंदराव हे दुसऱ्या बाजीरावाच्या पदरीं होते. रावबाजीनें मराठी राज्यांचे उदक इंग्रज कुंफणी बहादुरांच्या हातावर सोडल्यानंतर, या आनंदरावाच्या एकनिष्ठेनें आपल्या तेजस्वी पित्याच्याहि एकनिष्ठेवर ताण केली. बाजीरावाचा आश्रय नष्ट झाला म्हणून साताऱ्याच्या महाराजांनीं आनंदरावाचा बंदोबस्त करून देण्याचें कबूल

* नानानें सखाराम हरीला पकडण्याकरिता जीं नीच कारस्थानें लढविलीं, त्यांच्याहि वर अमानुषपणाचा कळस करणारा त्याचा तुरुंगात झालेला छळ आणि पतीचें शेवटचें दर्शन घेण्याकरितां कावऱ्याबावऱ्या झालेल्या त्याच्या पत्नीपासून १५००० रुपये रोख व कित्येक हजारांच्या दागदागिन्यांचा लांच हबकून शेवटीं तिची जाणूनबुजून केलेली प्राणघातक निराशा, या नानाच्या पशुतुल्य वर्तनाचा इतिहास वाचला म्हणचे अंगावर कांटा न उठणारा मणुष्य खात्रीने मनुष्यच नसला पाहिजे.

करून, ' भेटून जावे ' म्हणून निकडीचे निरोप पाठविले असतां, आनंदरावानें उत्तर पाठविलें कीं, '' **पेशवाई गेल्यापासून मनांत असा संकल्प केला आहे कीं, आतां या उपरांत कामकाज करणें नाहीं.** '' हे एकनिष्ठेचें बाणेदार उत्तर आणि वर्तन पहा आणि चित्पावन कुलदीपक सदाशिवराव भाऊनें स्वतःच्या भावांवर रुसून जाऊन कोल्हापुरकरांची पेशवाई पत्करल्याचा प्रसंग पहा ! कायस्थ प्रभूंनीं आजपर्यंत आपल्या बऱ्यावाईट धन्याशीं जें एकनिष्ठेचें इमान दाखविलें तसलें एकतरी उदाहरण चित्पावनांच्या जातभाई* पैकीं कोणी घालून दिलें असल्यांस तें त्यांनीं सप्रमाण जाहीर करावें. पेशवाईच्या अखेरीस कोकणांतील सुवर्णदुर्ग गडावरील मराठेशाहीचे अन्न खाणाऱ्या गडकरी प्रधान† बंधुत्रयाचें आणखी एक उदाहरण घ्या. आसपासचे किल्ले इंग्रजांनीं काबीज केल्यावर त्यांचा हल्ला सुवर्णदुर्गावरहि आला. पेशवाईंत सारी बेबंदशाही माजली असतां आणि सातारकर धनी त्यामुळें निर्माल्यवत् झाले असतांहि केवळ मराठेशाहीचा अभिमान धरून प्रधानबंधूंनीं इंग्रजांशीं प्रतिकाराची टक्कर मारली. पुढें इंग्रजांनीं किल्ला सर करून प्रधानबंधूंना कैदेंत टाकलें ही गोष्ट निराळी. पेशवाई घशांत उतरल्यावर ती नीट पचनीं पडावीं म्हणून कुंफणीने पुढें जें सामोपचाराचें धोरण पत्करलें त्या वेळीं प्रधानबंधूंना बंधमुक्त करून त्यांच्या स्वामीनिष्ठेचा आणि शौर्याचा इंग्रजांनीं मोठा गौरव केला आणि इंग्रज रियासतींत मोठ्या नोकऱ्या देऊं केल्या. परंतु '' आम्ही पिढीजाद मराठेशाहीचें अन्न खाल्लें. टोपकरांचीं नोकरी कधीहि करणार नाहीं. '' असें सडेतोड उत्तर देऊन, त्यांनीं आपलें शेष आयुष्य अत्यंत विपदावस्थेंत कंठून परलोकचा रस्ता सुधारला. उलटपक्षीं पेशवाईतल्या चित्पावन सरदारांकडे पहा. रावबाजी आणि इंग्रज यांच्यांत जेव्हां चुरशीचे सामने होऊं लागले आणि पेशव्यांची गादी फार वेळ टिकत नाहीं असें जेव्हां या घाटांवरील ' जवानमर्द (?) ब्राह्मण भाई 'ना स्पष्ट दिसूं लागलें, तेव्हां **ज्याचें कर्म त्याच्याबरोबर** असें मानून, ते आपापल्या सरंजामी संस्थानांची व्यवस्था लावण्यांत कसे चूर झाले आणि स्वामिसेवेला कसे चोर झाले, ह्याचा इतिहास राजवाडे कंपूला काय माहीत नाही ? परंतु नूतनापित न्यायाचा नेहमीं अवलंब करणाऱ्या आणि ' त्यावेळी प्रसंगानुरोधानें चित्पावन सरदार तसे वागले म्हणून तरी महाराष्ट्रांत मराठ्यांची (?) (चित्पावनांचीं) कांहीं संस्थानें राहिलीं ' म्हणून मुक्त कंठानें स्तुतिरव गाणाऱ्या संशोधकांनीं श्री. केळकरांच्या **' मराठे आणि इंग्रज '** नामक शतसांवत्सरिक श्राद्धाच्या तर्पणाकडे दृष्टी वळवावी, अशी शिफारस आहे.

चां. का. प्रभू समाजावर पेशवाईच्या नाशाचा आणि पर्यायानें स्वराज्यनाशाचा आरोप करणाऱ्या पुणेरी संशोधक टोळीला आमचा अत्यंत नम्रतेचा सवाल आहे कीं, पुण्याच्या शनवार वाड्यावर इंग्रजांचे निशाण फडकवणारा बाळाजीपंत नातू तर कायस्थ प्रभू नव्हता ना ? ओव्हिन्स रेसिडंटाला छत्रपतीच्या नांवाचीं खोटीं शिक्का मोर्तबें तयार करून देणारा बाळकोबा तात्या केळकर हा तरी चां. का. प्रभू नसावा असें वाटतें. बाजीराव पेशव्याला इंग्रजांनीं पेनशनर

---

* ज्या धनाजी जाधवानें बाळाजी विश्वनाथाला आपत्कालीं आश्रय दिला, त्याच जाधवावर क्षुल्लक शिकारीच्या कारणावरून बाळाजी विश्वनाथ कसा उलटला याचा इतिहास पाहिला म्हणजे ' कायस्थं न हि विश्वसेत् ' म्हणणाऱ्यांना शरमच वाटली पाहिजे.

† सुप्रसिद्ध मराठी कवि कै. बजाबा रामचंद्र प्रधान यांचे आजे व चुलत आजे.

बनवून, महाराष्ट्रांत नातूंच्या हस्ते इंग्रजी राज्याची कोणाशिला बसविल्यावर पुणे शहरांत पेढे वांटण्यांत आले आणि उत्सवहि करण्यांत आले. सवाई माधवरावांच्या टोलेजंग विवाह समारंभात नाना फडणीसांनीं सरदार पोतनिसांच्या हातांत जशी अत्तरदाणी गुलाबदाणी दिली होती, तशी नोकरशाहीच्या तळपटाच्या या दिवशीं विंचुरकर, पटवर्धन, नातू अँन्ड को. नें कोणकोणत्या कायस्थांच्या हातांत पेढ्यांची तबकें दिलीं, त्यांची यादी राजवाडे अगर भा. इ. सं. मंडळ प्रसिद्ध करतील तर बरें होईल. रावबाजीच्या कारकिर्दीत जे जे * अत्याचार झाले, त्यांचा उपलब्ध आणि प्रसिद्ध झालेला इतिहास वाचला, म्हणजे पुण्यांतील सर्व जातींच्या रहिवाशांनीं-ब्राह्मणांनींसुद्धा-पेढे कां वाटले, याचा स्पष्ट उलगडा होतो. शनवार वाड्यावर युनियन जॅकचा बावटा फडकावून आपल्या मूठभर घोडेस्वारांना घेऊन आलेले अलपिष्टन साहेब जेव्हां दिल्ली दरवाजासमोर खुर्ची टाकून बसले, तेव्हां तो राज्यक्रांतीचा देखावा पाहण्याकरिता पुण्यपतनस्थ लाखों तमासगीर त्यांच्या सभोवतीं लांबलांबवर उभे राहिले होते. परंतु एकाहि मायच्या पुताला त्याला असा प्रश्न विचारण्याचा धीर झाला नाहीं कीं, " बाबा अलपिष्टणा ! तूं कोणाचा कोण ? आणि येथे आमच्या घरी कां ? " त्यावेळीं लोक काहीं निशस्त्र झाले नव्हते किंवा लढाईचा मगदूरहि आतांप्रमाणें कांहीं अस्तंगत झाला नव्हता. परंतु रावबाजीचा महिमाच असा काहीं होता कीं सद्दीच्या जोरावर त्यांच्या वाडवडिलांनीं स्थापन केलेल्या पुण्याच्या एकमुखी नोकरशाहीची तिरडी निघतांना त्यावेळीं एकाहि महाराष्ट्रीयाच्या डोळ्याला पाणी आलें नाहीं. चां. का. प्रभू तर बोलूनचालून सातारकर छत्रपतीचे कट्टे दोस्त व चित्पावन नोकरशाहीच्या विरुद्ध. परंतु पेशवाईच्या विरुद्ध खुद्द चित्पावन सरदारांनीं इंग्रजांशी केलेल्या खटपटी **जितक्या कागदोपत्री** प्रसिद्ध आहेत तितक्या कायस्थांनीं केलेल्या ' मशहूर ' नाहींत, हें राजवाड्यांनीं खूप ध्यानांत ठेवावे. सातारकर छत्रपतीबद्दलची स्वामिनिष्ठा कायस्थांनीं अगदी शेवटपर्यंत किती इमामानें बजावली याचें कायमचें स्मारक महाराष्ट्राच्या इतिहासांत केव्हांहि अजरामरच राहील, इतकें तें ठसठशीत आणि भरभक्कम आहे.

३ जून सन १९१८ या शतसांवत्सरिक श्राद्धाच्या तारखेचें महत्त्व जर कांहीं असेल तर तें हेंच कीं शंभर वर्षांपूर्वी याच दिवशीं मराठी राज्याच्या मालकाशीं विरोध करून, सतत शंभर वर्षे एकमुखी अरेरावी गाजविणाऱ्या चित्पावन नोकरशाहीचा अंत झाला. आमचे आधुनिक उन्नत आणि निःपक्षपाती चित्पावन देशबंधु महाराष्ट्रांतील या मयत नोकरशाहीच्या इतिहासाचा जर सूक्ष्म दृष्टीनें अभ्यास करतील, तर सध्यांच्या राष्ट्रीय चळवळींत कोणकोणत्या पातकापासून आपण दूर राहिले पाहिजे, हें त्यांचे त्यांना स्पष्ट समजून येईल. श्रीयुत लेले या मुद्यावर लिहितांना म्हणतात कीं :—

" साताराच्या महाराजांच्या वतीनें इंग्रजांशीं दुसऱ्या बाजीरावाविरुद्ध खटपटी करणारे कायस्थ प्रभूच-हेंही विधान खरें नाहीं. शाहूनंतरच्या सातारकर महाराजांशीं-विशेषतः रामराजानंतरच्या महाराजांशीं-पेशव्यांनीं जें वर्तन केल्याचें-मग तें स्वार्थ बुद्धीनें असो, निरुपायानें असो, किंवा मराठी साम्राज्य संवर्द्धन व संरक्षण या दृष्टीनें असो-लेखी पुराव्यावरून उपलब्ध आहे, त्या मानानें पाहतां त्यांच्या वतीनें कायस्थ प्रभूंनींच काय, पण कोणीही लहान थोर महाराष्ट्रीयनें, ज्या ज्या कांहीं खटपटी केल्या असतील, त्यासंबंधानें मुळींच आक्षेप घेतां

* " शिवाजीमहाराजांचें उदात्त राजधोरण जेव्हां पेशव्यांनी सोडिलें, व इंग्लिशासारख्या बलिष्ठ शत्रूबरोबर जीवनार्थ कलहाची वेळ आली, तेव्हांच पेशवाई ठार बुडणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. " **जस्टिस रानडे.**

(म. स. उ. पृ. २१७.)

येत नाहीं. शेवटच्या रावबाजीच्या कारकिर्दीत सर्वत्रच गडबड उडाली. त्याच्या वर्तनामुळें सर्व सरदार बेदिल झाले. रयत नागविली गेली. कोणी त्राता उरला नाहीं. ज्यानें त्यानें आपापल्या कायमीचा विचार होईल त्या रितीनें करण्याचें आरंभिलें. त्यांत इंग्रजांशीं गुप्तपणे स्वतःच्या बंदोबस्तासाठी तजवीज करून ठेवण्याचा उपक्रम प्रथम पटवर्धनांनीं केला. हा निमकहरामपणा नव्हें असें कांहीं म्हणतां येत नाहीं. तरी पण घरचा जाच दुस्सह होऊं लागला, " आई जेवू घालीना व बाप भीक मागू देईना, अशी स्थिती झाली, म्हणजे अर्थातच मुलाला स्वतःच्या रक्षणार्थ परक्याचा आश्रय करावा लागतो. हें कृत्य थोरपणाचें नसलें तरी स्वसंरक्षणार्थ निरुपायानें केलेलें असल्यामुळें तितकें दूषणीय म्हणतां येत नाहीं. बाकी हरामखोरपणाचा धडा चित्पावनानींच घालून दिला, हे म्हणणें तत्त्वतः खरें आहे असेच म्हटलें पाहिजें."

वि. ज्ञा. विस्तार, एप्रिल १९१९.

कायस्थ प्रभू समाजाची हकनाहक बदनामी करण्यासाठीं राजवाडे व भारत इतिहास संशोधक मंडळ यांनीं जो गुप्त कट केला आणि कायस्थांवर शेकडों घाणेरडे अपमानकारक आरोप केले, त्यापैकीं ऐतिहासिक बाजूच्या तीन ठळक आक्षेपांना येथपर्यंत प्रत्युत्तरें दिलीं, आता शेवटचा आरोप मात्र बराच भयंकर असून, कायस्थांमुळींच हिंदवी स्वराज्य ठार बुडालें, हें जनजाहीर चौघडा वाजवून दाखविण्याचा जो मंडळाचा व राजवाड्यांचा मूळ हेतु, त्यांतील काळाकुट्ट मत्सर आपणांस उघड करून दाखववावयाचा आहे. वरवर पाहतां कोणालाहि असें दिसतें कीं, राजवाडे केवळ ऐतिहासिक साधनांची चिकित्सा करीत आहेत. परंतु त्यांच्या सर्व लेखाची रचना व हेतु ऐतिहासिक सत्याशीं विसंगत असून, फक्त कायस्थ प्रभूविषयींचा त्यांच्या चित्पावनी हृदयांतला तीव्र द्वेष ओकून टाकण्याचाच हा एक परशुरामी प्रयत्न आहे, हें आतांपर्यंतच्या घेतलेल्या झाडझडतीवरून वाचकांना नीट पटलें असेल. राजवाड्यांची किंवा त्यांच्या छायेंतील संशोधक भिक्षुकांची एक खोडसाळ प्रवृत्ति लक्षांत ठेवण्यासारखी आहे. त्यांना शहाजीचे गुण गाण्याची इच्छा असली कीं, मालोजी व शिवाजी यांना ते क्षुद्र लेखतात व शिवाजीला वर चढवायचें असलें तर त्याच शहाजीला खुशाल खालीं ओढतात. कायस्थ प्रभूंची पाठ थोपटून कांहीं कावा लढवायचा असला कीं, मराठ्यांची पाठ यथास्थित धोपटतात; आणि मराठ्यांचीं मनें कायस्थांविरुद्ध भडकवून द्यायचीं असलीं कीं मराठ्यांना कुरवाळून कायस्थांना लाथाडण्यास त्यांना मुळींच वेळ लागत नाहीं. मराठ्यांच्या वेदोक्ताची किंवा क्षात्रोत्पत्तीची टर उडविण्यासाठीं कायस्थांच्या धर्माधिकारांना मान्यता द्यायची आणि कायस्थांची बदनामी करतांना थेट मालोजी भोसल्याला अग्निहोत्री ब्राह्मण म्हणून ठरवायचें, हा असला

## पाजीपणाचा डोंबारी खेळ

ही ब्राम्हण मंडळी आज गेलीं दोन अडीचशें वर्षे सारखी खेळत आहे. अस्सल पुराव्यांची मोठी मिजास मारणारीं हीं संशोधक डुकरें मग वाटेल त्या काल्पनिक विधानाच्या खातेऱ्यांत मनसोक्त डुंबतांना आजूबाजूची सुद्धां लाज बाळगीत नाहींत. कायस्थांच्या नांकाडावर सज्जर ठोकलेला राजवाड्यांच्या ४ थ्या मुद्याचा गुद्दा पहा :—

" प्रतापसिंहाच्या कारकीर्दींत कायस्थांनीं वेदोक्त प्रकरण इतकें वाढविलें कीं खुद्द प्रतापसिंहाला व मराठ्यांना वेदोक्त संस्काराचा अधिकार आहे कीं नाहीं यासंबंधानें वाद सुरू झाला. आतांपर्यंत फक्त चांद्रसेनीय तेवढे वेदोक्तसंस्काराकरितां झगडत होते. यापुढें या

झगड्यांत सातारचे मराठे अजाणपणें चांद्रसेनीयांच्या खटपटीनें गोविले गेले. वस्तुतः भोसले व इतर मराठे क्षत्रिय असल्यामुळें वेदोक्तसंस्काराधिकार त्यांना पूर्ण होता. परंतु गैरसमजुतीनें व पक्षाभिमानानें त्यांना तो अधिकार नाहीं असें नाना सबबी काढून, प्रतिपादिलें जाऊं लागलें."

म्हणजे राजवाडे म्हणतात कीं मराठ्यांच्या वेदोक्त संस्काराच्या अधिकाराबद्दल पूर्वी कधींच कोठें वाद नव्हता, ब्राह्मणांनीं त्याबद्दल कधीं ब्र सुद्धां तोंडांतून काढला नाहीं, किंवा त्यांना कधीं वेदोक्त धर्माचाराचा विरोधहि केला नाहीं. मालोजीपासून तों थेट प्रतापसिंहापर्यंत मराठ्यांचें क्षत्रियत्व सोळा आणे मान्य करून सर्व ब्रह्मवांत्युत्पन्न वेदोनारायण त्यांचे वेदोक्त कर्म बिनतक्रार कायावाचामनेंधनें करीत होते. कोठें फट् नाहीं, कोठे खट् नाहीं. रमण्यांतल्या ब्राह्मण भोजनांतील ढेंकराप्रमाणें सर्व काहीं सुरळीत चाललें होतें. पण या खटपट्या कायस्थांनीं मध्ये बिब्बा घातला. कायस्थ जर पृथ्वीतलावर नसते, किंवा असूनहि परमेश्वरावतार चित्पावन पेशवाईच्या वरवंट्याखालीं साफ बीं बियाण्यांसुद्धां नष्ट होते, तर प्रतापसिंहाचा किंवा मराठ्यांचा आणि वेदोनारायणांचा कोठें कधींहि झगडा येण्याचें कारणच नव्हतें.

यावर एवढीच कोणी झाला तरी शंका काढणार कीं, राजवाड्यांचा हा चित्पावनी सिद्धांत खरा मानला तर अलीकडचीं कोल्हापूरचीं वेदोक्त प्रकरणें इतकीं चिडीला जाऊन तेथल्या राजोपाध्यांच्या वतनी जहागिरी जप्त कां झाल्या ? मराठ्यांना व कोल्हापूरच्या छत्रपतीना शूद्र शूद्र म्हणून चिडविणारे व तंजावर केसचा निकाल ' सर्व मराठे शूद्र आहेत ' असा लागल्यावर टिऱ्या बडविणारे लोक ब्राह्मण कीं मुसलमान ? इतिहास पाहिला तर छत्रपतींच्या काय किंवा सरसकट मराठ्यांच्या गळ्यांत काय वेदोक्ताची घोरपड कायस्थ प्रभूंनीं अडकविली नसून, ती कृतघ्न ब्राह्मण समाजानेंच खुद्द शिवाजीपासून त्यांच्या गळ्यांत अडकवून ठेविली होती, आणि ती काढण्याकरितां मात्रकायस्थ प्रभूंनींच आपल्या रक्ताचें पाणी कें्ले. शिवाय छत्रपतीच्या विरुद्ध वेदोक्ताचें बंड कांहीं प्रतापसिंहाच्याच कारकीर्दीत उभारले गेलें नसून, (आद्य छत्रपतीला राज्याभिषेकच होऊं नये म्हणून ज्या द्वेष्ट्या व कृतघ्न ब्राह्मणांनीं आपल्या शक्तियुक्तींची अगदी शिकस्त केली.) त्यांनीच तें प्रथम उभारल्याचें इतिहासांत नमूद आहे. श्रीशिवछत्रपतीच्या स्वराज्योपक्रमाचे आजकाल पोंवाडे गाणारे आणि पत्रव्यवहारांतसुद्धां राज्याभिषेक शक* लिहिणारे टापटिपीचे अभिमानी पुणेकर संशोधक जरा डोळे उघडून इतिहास पाहतील, तर ज्या शिवाजीची टिमकी पिटण्याची आपण आजकाल मोठी कसरत करून दाखवीत आहोंत, त्याच शिवाजीला आपल्या वाडवडिलांनीं वेदोक्ताच्या ढोंगाखाली कसें पेंचांत आणलें होतें, हें समजायला फारसें कठीण जाणार नाहीं. अर्थात् मराठ्यांना वेदोक्त संस्काराचा अधिकार आहे कीं नाहीं, या वादाचा निकाल शिवाजीच्या अभिमानी बाळप्रभु कायस्थानें प्रथम लावून घेतल्यावरच मग राज्याभिषेकाचा समारंभ पार पडलेला आहे, हें ऐतिहासिक सत्य मंडळाचा एकूण एक संशोधक वीर खर्ची पडला तरीहि उलथून पडणें शक्य नाहीं. शिवाजीच्या किंवा

* " शिवाजीचा राज्याभिषेक शक १०४ वर्षे चालला. सन १७७७ त दुसरा शाहू गादीवर आला तेव्हां नाना फडणीस व सखाराम बापू यांनी हा शक कागदोपत्रीं वेद करण्याचा हुकूम काढला " (भारत इ. स.मं. अहवाल शके १८३५ पृ. ८७.) केवढी हो ही नामाची राजनिष्ठा ?

त्याच्या जातभाईच्या वेदोक्त संस्काराचें पुनरुज्जीवन करण्याचा अग्रमान कायस्थ प्रभूंचा आहे. उदेपुराहून वंशवृक्षाच्या प्रति आणविणें, (पैठणाहून गागाभट्टाला स्वतः जाऊन मोठ्या शिकस्तीनें रायगडास आणणें आणि त्याच्या हातून दरोबस्त मराठ्यांना शूद्रत्वाच्या खोट्या आख्याइकांपासून मुक्त करणें ही इतिहासप्रसिद्ध कामगिरी बाळप्रभूनेंच बजावली) आहे. कायस्थ प्रभू आणि मराठे यांचा यानंतरचा परस्पर स्नेहसंबंध पाहिला तर असें दिसून येईल कीं, (छत्रपतीवर किंवा मराठ्यांवर ज्या ज्या वेळीं भिक्षुकांकडून वेदोक्ताचा हल्ला चढविण्यांत आला, त्या त्या वेळीं कायस्थ प्रभूंनींच त्या हल्ल्यांना पुढें होऊन तोंड दिलें आहे.) ही गोष्ट आजदीनतागायतसुद्धां घडत असल्याचे दाखले पाह्यला पुण्यापासून फार दूर जायला नको. प्रतापसिंहाला वेदोक्ताच्या खटपटींत कायस्थांनीं गोंविलें कीं निमकहराम चित्पावन चळवळ्यांनीं मराठ्यांना वेदोक्ताच्या पेंचांत आणलें, हें सांगायला राजवाडे नकोत, या बाबतींत इतिहास आरशांसारखा स्वच्छ आहे. 'ग्रामण्यांचा साद्यंत इतिहास' आम्ही मंडळाला नजर केलाच आहे. छाती असेल तर त्यांनीं तो खोटा ठरवून द्यावा. छत्रपतीच्या वेदोक्ताकरितां, क्षत्रियत्वाच्या पुनरुज्जीवनाकरितां आणि तक्ताच्या चिरस्थाइत्वाकरितां चां. कां. प्रभूंनीं केलेल्या स्वार्थत्यागाबद्दल आणि ऐतिहासिक कामगिरीबद्दल कृतघ्न असलेला एकादा मराठा किंवा शिवाजीचा अस्सल वंशज सांपडणें आजलाहि बरेंच मुष्किलीचें आहे. म्हणें चांद्रसेनियांच्या खटपटीनें या झगड्यांत सातारचे मराठे **अजाणपणे** गोविले गेलें ! सातारचे मराठे अजागळ आणि बेवकूब होते किंवा आहेत, अशी का राजवाड्यांची समजूत आहे ? असेल तर, मराठे मूर्ख नसून, स्वतः राजवाडे मूर्खाग्रणी म्हटले पाहिजेत. कै. शाहू छत्रपतींनीं ब्राह्मणांच्या निमकहरामीला व चित्पावनांच्या कारस्थानांना कंटाळून, अखिल ब्राह्मणेतरांकरिता व विशेषतः मराठ्यांकरितां धार्मिक स्वयंनिर्णयाची चळवळ सुरू केल्यास फार दिवस लोटले नाहीत या चळवळीने मराठ्यांत धार्मिक स्वातंत्र्याचा झालेला अफाट फैलाव आणि कायस्थ प्रभूत अझूनहि भरपूर असलेली भिक्षकांची पायाचाही गुलामगिरी पाहिली की मराठ्यांवर केलेला अजाणतेपणाचा आणि चांद्रसेनियांच्या ओंझळीने पाणी पिण्याचा राजवाड्यांचा आरोप मराठे क्षुल्लक कानझाडीवरच विसरतील असे आम्हाला वाटत नाही अडचणींचा फायदा घेऊन कायस्थ प्रभूंनीं मराठ्यांवर किंवा कोणावर कुरघोडीचा कधींच प्रयोग केलेला नाही प्रतापसिंहकालीन मराठ्यांवरील ग्रामण्यांत काशी कर्नाटकांतल्या वेदोनारायणांना वादांत जिंकून मराठ्यांचे क्षत्रियत्व सिद्ध करण्यात विजय मिळविणारा शास्त्री आबा पारसनीस हा कायस्थ प्रभू होता. परंतु एवढ्यामुळेच कायस्थ प्रभू मराठ्यांचे राजोपाद्धे बनले नाहींत किंवा छत्रपतीचे मांडलिक जहागीरदार झाले नाहींत चित्पावनांनी निष्काम कर्माचा नुसता वाचाळपणाच करावा. कायस्थांचा सर्व इतिहास प्रत्यक्ष निष्काम कर्मी आहे. एवढाच, काय तो फरक !

भोसले छत्रपतींना वेदोक्ताचा पूर्ण अधिकार होता, परंतु चांद्रसेनीयांनी स्वतःच्या स्वार्थासाठी त्यांचा गैरसमज केला, हे राजवाड्यांचे विधान गृहीत धरले तरी प्रत्यक्ष पुरावा कसा पडतो तो पहा. शाहूनंतर १७४९ त रामराजा गादीवर बसून लगेच तुरुगांत पडला. छत्रपति कैदेत आणि पेशवे गणेशमहालाच्या सदरेत ! बिचाऱ्या छत्रपतीला कोरडी भाकर मिळण्याची मारामार, त्याला इतर संस्कारांचा काय लाभ मिळाला असेल, तो राजवाड्यांनींच सांगितलेला बरा ! पण

शेवटी देवाने रामराजाची कहाणी ऐकली व सन १७७७ त त्याला अखेर मृत्यूसंस्काराचा लाभ झाला. रामराजानंतर शहाजी गादीवर बसला. शहाजी क्षत्रिय. तेव्हां साहजीकच लग्नापूर्वी त्याची वेदोक्त मुंज व्हावयास पाहिजे होती. त्या वेळी नाना फडणिसांची अमदानी सुरू होती. त्याने छत्रपतीच्या कैदखान्यावरील जेलर बाबूराव कृष्ण यांस लिहिलेल्या पत्रांत :—

'' ....राजश्री स्वामी यांची मुंज वैशाख वद्य पंचमीस
आठ घटकांचे मुहूर्तावर समारंभेकरून जाहली....
**पुराणोक्त विधीनें मुंज्य जाहली** येणेकरून बाई-
साहेब आदीकरोन सर्वांस संतोष वाटला........
श्रीमंत महाराजाची मुंज्य वद्य पंचमीस पुराणोक्त
विधी करून बाईसाहेबास संतोष वाटून जाहाली.
ही तुम्ही फारच गोष्ट उत्तम केली.''

हा मजकूर आहे. त्याचप्रमाणे ' इतिहास आणि ऐतिहासिक ' मासिकांतून प्रसिद्ध झालेल्या '' पेशवाईची अखेर '' पृ. १४४ वर प्रतापसिंह छत्रपतीविषयीं '' सातारेयाचे राजे यांस राज्याभिषेक करावयाच्या पूर्वी मुंज करून मग राज्यभिषेक व्हावा अशी शिवाजी महाराजांची पासून चाल होती ती श्रीमंतानीं या वेळेस मना करून '' मुंज्य केल्याशिवाय राज्याभिषेक केला '' असा उल्लेख आहे. शहाजीच्या ' पुराणोक्त ' मुंजीत कोणकोण खटपट्ये कायस्थ होते ? आणि शहाजीची व प्रतापसिंहाची धर्मसंस्काराच्या बाबतीत श्रीमंतांनी व नानांनी जी वरची बडदास्त ठेवली, ती राजवाड्यांच्या कोटीक्रमाचें कितीसें समर्थन करते, तें वाचकांनीच अजमाऊन पहावें म्हणजे झालें. खरी स्थिति अशी आहे कीं राजवाड्यांचा कटाक्ष कसेंहि करून कायस्थ प्रभूंविषयी मराठ्यांची मने कलुषित करून बिथरविण्याचा असल्यामुळें, नाटकी वकीलाप्रमाणें शक्य ती ओढाताण करून खऱ्याला खोटे ठरविण्याचा उपद्व्याप करणें त्यांना प्राप्तच आहे. त्यांचा रोख चां. का. प्रभूंच्या वेदोक्तावर आहे; मराठ्यांच्या नाहीं. ज्यावेळी मराठ्यांच्या वेदोक्तावर राजवाड्यांचा **परशुरामी डोळा** फिरेल, तेव्हां हींच वाक्यें नुसत्या शब्दांच्या अदलाबदलीने मराठ्यांच्या तोंडावर फेंकण्यास ते थोडेच कचरणार आहेत ! ' हिस्टोरिकस् ' नामक एक लेखक म्हणतो. " The Vedokta therefore is a garb under which the pseudo-Brahmins of African origin have been trying to give undeserved importance to their own tribe by the ladder of exclusiveness." (Bombay Gazette, Supplement 9-11-06) सन १९०६ च्या ऑक्टोबरच्या विविधज्ञानविस्तार मासिकानेंहि या बाबतीत एक अत्यंत स्पष्टोक्तीचा विस्तृत लेख लिहून चित्पावनांच्या ब्राह्मणपणाचा आणि वेदोक्त कारस्थानाचा बोजवारा चव्हाट्यावर आणलेला आहेच.

राजवाड्यांच्या विधानांचा थोडक्यांत समारोप करावयाचा म्हणजे आजपर्यंत वेदोक्त प्रकरणें वाढवून स्वराज्य आणि स्वधर्म यांचे तळपट उडविलें ते फक्त चां. का. प्रभूंनी आणि चित्पावन म्हणजे तेथून येथून सारे गरीब गाईंचे अवतार ! मराठ्यांच्या वेदोक्त प्रकरणाचा किंवा चां. का. प्रभूंवरील ग्रामण्यांचा इतिहास आजलाहि समग्र उपलब्ध आहे ; इतकेच नव्हे तर छापूनहि प्रसिद्ध झालेला आहे. ' परभू जातीनिर्णय ' नामक महावेदाचे व्यास निळकंठशास्त्री थत्ते चित्पावन आयागो बाळाजीपंत नातू आणि राजवाड्यांचे अत्यंत आवडते ' शतकृत्य करणारे अग्रेसर नरपुंगव ' चिंतामणराव आपा पटवर्धन यांनीं प्रतापसिंह छत्रपतीच्या कारकीर्दीत

राजकारण, वेदोक्तप्रकरण आणि कायस्थप्रभू-ग्रामण्य यांची खिचडी बनविण्याकरिता जीं जीं अनन्वित कारस्थाने केलीं. त्यांचा इतिहास जर पाहिला, तर चां. का. प्रभूंवर वरील तीन आरोप राजवाड्यांनी करणे म्हणजे चोरांनी उलट्या बोंबा मारणे होय. राजवाड्यांचे धारिष्ट काय विचारावें ? चां कायस्थ प्रभूं ही एक संशयित उत्पत्तीची रंडगोळक चंडगोळकासारखी पोटजात आहे, ती विश्वासघातकी व स्वराज्यद्रोही आहे, असले भयंकर आरोप करण्यांतही जे राजवाडे कचरले नाहीत. त्यानीं वेदोक्ताचा आणि ग्रामण्याचा इतिहास उलटा वांचून त्यांतून चमत्कृतिजनक विपर्यासी विधाने काढल्यास आश्चर्य मानण्याचें काय कारण ? क्रांतिकारक चळवळींच्या आद्यजनकत्वाचा मान पुण्यपत्तनस्थ चित्पावनांवर लादण्याचा उपक्रम केल्याबद्दल रौलट कमिटीवर आग पाखडणारे विद्वान्, आपल्याचपैकीं कित्येक राजवाडे इतिहाससंशोधनाच्या नांवाखाली इतर जातींवर बेधडक कसकसले भयंकर आरोप निराधार लाटण्याचा नीच उपद्व्याप करीत असतात, याचा नीट विचार करतील. तर कायस्थ प्रभूंनी वेदोक्ताच्या चळवळी करून स्वराज्याचा खून केला, कां चित्पावनांनीं आपल्या स्वतःच्या ज्ञातीचे नसतें महत्त्व वाढविण्याकरिता त्यांच्याविरुद्ध आणि छत्रपतीच्या तक्ताविरुद्धजीं अनेक कारस्थाने लढविली त्यांना त्यांनी आत्मसंरक्षणार्थ तोंड दिले याचा अधिक खुलासा करण्याचे आमचे श्रम खात्रीने वाचतील. रौलट कमिटीच्या आरोपांना ' एकतर्फी पुरावा ' आहे या सबबीवर त्यांचा निषेध करण्याची चळवळ करणारे स्वतःला ' चळवळ्ये, खटपट्ये ' या सदरात घालूं देऊं इच्छीत नाहींत. राजवाड्यांचा सारा पुरावा तर त्यांच्या दिव्य ' समजुती ' चा त्यांना अमूक असे ' वाटले ' की मग त्यांना इतर पुरावे लक्षात घेण्याची जरूरीच भासत नाहीं. चांद्रसेनीयांवर जेव्हा चित्पावनांनी सत्तेच्या जोरांवर वेदोक्ताचा हल्ला चढविला तेव्हा याचा प्रतिकार करणे त्यांना केंव्हांही प्राप्तच होते. अर्थात् प्राप्त कर्तव्य करणे म्हणजे नसत्यां चळवळी उत्पन्न करणें ही व्याख्या चांद्रसेनीयांना लागू करायला चित्पावन–संशोधकांना आणि त्यांच्या जातभाईना सध्यां तरी तोंड नाहीं. रौलट कमिटीच्या रिपोर्टाचा धिःकार करतांना जीं चित्पावन तोंडें ' पुरावा दाखवा. पुरावा दाखवा ' म्हणून मोठा हलकल्होळ करीत, त्यापैकीं निदान तरी डझन अर्धा डझन तोंडें आपल्या कान डोळ्यांसह मंडळाच्या कंपूंत आहेत. चां. का. प्रभूंवर विश्वासघातकीपणाचा आणि स्वराज्य नाशाचा आरोप करताच **राजवाड्यांचा हात पकडून** सदरहू आरोपाचा पुरावा त्या तोंडांनीं ठिकच्याठिकाणी विचारायला नको होता काय ? परंतु ते कसें होणार ? चालले आहे; ठीक आहे; लेख **रेकॉर्ड** तर होऊ द्या. पुढचे पुढे ! यापलीकडे त्या विद्वानांची मति जाते कशाला !

राजवाड्यांच्या वरील उद्‌गारांत समाधान मानण्यासारखे-मानलें तर-एक विधान आहे. सातारचे मराठे व इतर मराठे हे ' क्षत्रिय असल्यामुळे वेदोक्त संस्कारधिकार त्यांना पूर्ण होता ' हे राजवाडे निदान येथे तरी कबूल करतात. परंतु ही त्याची कबुली म्हणजे केवळ हातचलाखी आहे. जे राजवाडे आणि त्यांचे पुण्यपत्तनस्थ कित्येक चित्पावन बंधु अगदी या घटकेपर्यंत कोल्हापूरच्या महाराजांची आणि त्यांच्या जातभाईची '' येदोक्त येदोक्त '' म्हणून थट्टा करीत आहेत, त्यांना कोणी सत्यप्रतिपादनाचे वाटेकरी बनविल, तर ते मात्र साफ चुकीचे होईल. त्यांनी चां. का. प्रभुसमाजाची बदनामी करण्याचा जो विडा उचलला आहे, त्या बदनामीला यथास्थित रंग यावा म्हणूनच हे विधान या संशोधकाच्या कलमांतून बाहेर पडले आहे, हे चाणक्ष वाचकांना सांगणे नकोच. नाहींतर अजूनहि छत्रपतिवंशज मराठे, त्यांच्या राजधानीतील जगद्‌गुरु श्रीशंकराचार्य आणि चां. का. प्रभू यांबद्दल पुण्याच्या चित्पावनांचा द्वेष किती जळजळीत आहे.

हे कोणाला नव्याने सांगायला पाहिजे असे नाहीं. आज कायस्थ प्रभूची बदनामी करायला मराठ्यांच्या वेदोक्तसंस्काराची कबुली द्यायची आणि उद्या कोल्हापूरच्या महाराजांची किंवा सर्रास मराठ्यांची बदनामी करायची वेळ आली की, कायस्थांच्या वेदोक्तसंस्काराचा पुरावा पुढे आणायचा, असली नाना फडणीसी करण्यात राजवाडे काय किंवा त्यांचे जातभाई काय चांगले प्रख्यात पावलेले आहेत. राजवाड्यांचा आणखी पुरवणीचा शेरा पहा :—

'' खुद्द छत्रपतींना या झगड्यांत गोविण्यांत चांद्रसेनियांचा असा मतलब होता कीं, मोठ्याच्या झगड्यांत आपल्या खऱ्या किंवा खोट्या अधिकारांचे संरक्षण, गाड्याबरोबर नळ्याच्या न्यायाने, सहजासहजी व्हावे. हा झगडा इतका विकोपास गेला कीं वाईच्या ब्राम्हणांनीं प्रतापसिंहाच्या पदच्युतीकरिता अनुष्ठाने आरंभिली, साताराच्या राज्यात तंट माजले; आणि या तटांच्या चुरशींत प्रतापसिंह राज्यभ्रष्ट झाला.''

राजवाड्यांनी डोके खाजवून जी इतकी मल्लीनाथी केली त्याचा सारांश त्यांनी इतकाच काढला आहे कीं—**गाड्याबरोबर नळ्याला यात्रा या न्यायाने चां. का. प्रभूंनी आपल्या खऱ्या किंवा खोट्या वेदोक्ताधिकाराच्या प्राप्त्यर्थ छत्रपतींना ग्रामण्याच्या भानगडींत ओढून, सरतेशेवटी प्रतापसिंहाचा गळा कापला. म्हणजे राजवाडे अप्रत्यक्षपणे असे ध्वनित करितात कीं मराठी राज्य चां. कायस्थ प्रभूंनीं बुडविले.**

प्रतापसिंहाची राज्यभ्रष्टता का. प्रभूंच्या ग्रामण्याने ओढवली का वाईच्या ब्राह्मणांच्या (?) अनुष्ठानाला संकरज * परशुराम फळला म्हणून झाली, हे फक्त राजवाड्यांनाच माहीत परंतु शका१७६१ श्रावण वद्य १३ गुरुवार (सन १८३९) सकाळी ६ वाजता ओव्हान्सनें प्रतापसिंह छत्रपतीस कैद करून नेल्या दिवसापासून तो शके १७६९ आश्विन शुद्ध ५ (सन १८४७ इ.) या दिवशी काशीस त्याचा काळ होईपर्यंत, चित्पावन नोकरशाहीचे शतसांवत्सरिक श्राद्ध घालणाऱ्या आणि मराठी स्वराज्याच्या अंताबद्दल नकाश्रु गाळणाऱ्या कोणकोणत्या चित्पावनाचे स्वराज्यवादी वाडवडील छत्रपति प्रतापसिंहाच्या सुटकेसाठी आणि फितुरीच्या आरोपाचे निरसन करण्यासाठी इंग्रेजाशी अखेरपर्यंत झगडले, त्यांच्या नावनिशीची यादी पुढे येत आहे काय? मराठी राज्य जानवीं गंध पिंडासाठी झगडून कायस्थांनी बुडविले, का चित्पावन नोकरशाहीने स्वार्थ साधण्याचा अहंकारात बुडविले, हे सिद्ध करायला अहीमहीच्या रक्तबिंदूप्रमाणे (कोट्यावधी राजवाडे जरी निर्माण झाले, तरी चित्पावनांच्या निमकहरामपणाशिवाय त्याच्या हाताला इतर दुसरा आणखी पुरावा लागणे शक्यच नाहीं.)

प्रतापसिंहाची धार्मिक स्वयंनिर्णयाची चळवळ, त्यामुळे ब्राह्मणवर्गात भडकलेला 'येदुक्ता ' चा असंतोष चिंतामणराव सांगलीकराने ब्राह्मणेतरांना 'शूद्राधमं शूद्राधम ' ठरविण्यासाठी केलेल्या दस्ताऐवजी उचापति, बाळाजीपंत नातूने राजकीय बाजूने महाराजांवर आणलेल्या खोट्या फितुरांच्या घारेपडी, प्रतापसिंहाची उचलबांगडी, काशीची कैद ' तेथे मृत्यु ' स्वराज्याच्या पुनरुज्जीवनासाठी महाराजांच्या वतीने रंगो बापूजीने १४ वर्षे विलायतेस घातलेला धुमाकूळ वगैरे इतिहास फारच मोठा आहे. त्याच्या तपशीलाची रूपरेषा आम्ही स्वतंत्र * प्रसिद्ध केल्याचे सर्वांना माहीतच आहे. पूर्ण तपशीलाचा ग्रंथ

---

* चित्पावनांचा कुलदेव जो परशुराम तो राजवाड्यांच्या मताप्रमाणे संकरज ठरतो. कारण त्याचा बाप जमदग्नी हा ब्राह्मण होता आणि आई रेणुका ही क्षत्रीय होती.

# शंभर वर्षांपूर्वीचे महाराष्ट्र
## अथवा
## हिंदवी स्वराज्याचा खून

हा ग्रंथ * लवकरच प्रसिद्ध करूं. निर्विकार चित्ताने या प्रकरणाबद्दल उपलब्ध इतिहास पाहिला तर असे आढळून येईल कीं मराठी राज्याचा काय किंवा दुसऱ्या कोणत्याहि राज्याचा काय ज्यावेळी ऱ्हास होतो त्यावेळी त्याची कारणे ही तात्कालिक नसतात. त्या कारणांचे बीज पूर्वीच पेरले गेलेलें असून, त्याची पाळेंमुळे एकदां चांगली खोलवर जाऊन रुतली म्हणजे मग तीं कालवशात् त्या राज्याचा पाया उलथून टाकण्यास समर्थ होतात. याच न्यायाने प्रतापसिंहाच्या सिंहासनाचा पाया आधींच अनेक द्वैताच्या धुंगुरट्यांनी पोखरुन पोखरुन अगदी पोकळ करून ठेविला होता. अर्थात् ईस्ट इंडिया कंपनीच्या महत्वाकांक्षी मुत्सद्यांना ' तू नाही तर तुझा बाप ' अशा प्रकारच्या फोलकट सबबीवर छत्रपतीच्या सिंहासनाच्या चारहि तंगड्या उपटून फेकून देणे फारसे कठीण गेले नाहीं. त्यावेळची प्रतापसिंहाच्या विरुद्ध सुप्रसिद्ध चित्पावन आयागो बाळाजीपंत नातूच्या सल्ल्याने चालणारी शहाजी उर्फ आप्पासाहेब महाराजांची कारस्थाने आणि पेशव्यांच्या छत्राखाली चित्पावन समाजाने सातारकर छत्रपतीचा उघड उघड चालविलेला द्रोह व छळ इ. अनेक आत्मघातकी गोष्टी जर नीट लक्षात घेतल्या तर ' मराठी राज्याच्या ऱ्हासास प्रभुंचीं ग्रामण्ये कारणीभूत झाली ' हा राजवाड्याचा सिद्धांत किती धाडसी आणि मत्सरी ठरतो, हे सांगणे नकोच.

छत्रपतीच्या तक्ताला आंतून पोखरणारी चित्पावन नोकरशाहीची वाळवी आपल्या घरांत येऊ देण्यात श्री शाहूछत्रपतींनीं व चिटणीसानीं जी घोडचूक केली. तिथेच पर्यवसान मराठी स्वराज्याच्या ऱ्हासास कारणीभूत कसें झालें. याबद्दल ग्रँट डफची कबुली पहा :—

"The chain by which the crafty Brahmins thereafter contracted the powers of Shahu Maharaja and made the successive Satarkars merely the nominal powerless kings, had its first link thus coined and made strong by Shahu himself."

न्या. रानडे हेंच सांगतात :—

'' पुढे सर्व कारभार साताऱ्याहून पुणे मुक्कामी नेल्यावर वरील सर्व अधिकार पिढीजाद झाले; पण ते अधिकार बाळगणाऱ्या लोकांचे राज्यकारस्थानमंडळींत वजन पडेनासें झाले शाहूराजानंतर जे दोन राजे झाले त्यांच्या अंगी या राजांच्या नांवावर पेशवे जो अधिकार गाजवीत, तो धारण करण्याची योग्यता नव्हती नावाने राजे मात्र, पण त्यांच्या वागणुकीवर अगदी सक्त देखरेख असे पेशव्यांचे हातांतील बाहुली म्हटले तरी चालेल. पेशव्यांला अधिकाऱ्याच्या दिलेला सनदा रद्द व्हाव्या म्हणून दमाजीने पुष्कळ खटपट केली. पण ती व्यर्थ गेली. नंतर सातारच्या राजास तेथील किल्ल्यांत अटकेत ठेविलें व नोकरचाकर, गाडीभाडे वगैरेच्या खर्चाकरिता तीस हजार रुपयांची त्याचेकडे नेमणूक झाली. याप्रमाणे सातारचे राजे बंदिवासाचे महद्दुःख भोगीत राहिले.'' **म. स. उ. पृ. १८३.**

---

* हा ग्रंथ आमच्या हातून लिहिलाच जाऊ नये. लिहून झाला तरी निदान प्रसिद्ध होऊ नये. म्हणून आमच्यावर नानाविध संकधाची भृगूचक्रे फेकण्यात येत आहेत. बिनसहीची खुनाच्या धमक्यांची पत्रे मधून मधून येतच असतात.

याच मुद्यावर श्रीयुत माधवराव लेले म्हणतात :—

'' सातारकर छत्रपति प्रतापसिंह याच्या पदभ्रष्टतेला मूळ कारण कायस्थ प्रभू हेंही विधान वरील तिन्ही विधानांप्रमाणेंच आभासात्मक दसतें. या प्रकरणासंबंधाचे तत्कालीन कागदपत्र पाहतां असें दिसून येतें कीं, या कामांत प्रतापसिंह महाराजांवर गैर समजुतीनें, व लबाड लफंगें लोकांच्या स्वार्थसाधू सांगण्यावर व त्यांनीं खरा म्हणून पुढें आणलेल्या लेखी पुराव्यावर भरंवसा ठेवून, त्यांना पदच्युत करण्यामध्यें, त्यांच्यावर भारी जुलूम झाला. असे प्रकार तेव्हांप्रमाणेंच अलीकडेही नाहींत असें नाहीं याचा दोष त्यावेळचे दिवाणजी बाळाजीपंत नातू, प्रतापसिंह महाराजांचे बंधु-त्यांच्या पदच्युतीनें स्वार्थ साधून गादी मिळालेले—अप्पासाहेब महारांज व इतर तत्पक्षीय मंडळी यांच्याकडेच विशेष येतो. त्यावेळी कायस्थांवरील ग्रामण्य उपस्थित झालेलें होतें, व त्याच्यांत प्रतापसिंह महाराजांनीं कायस्थांचा पक्ष घेतलेलाही असेल ; पण प्रतापसिंह महाराजांवरील दोषारोपासंबंधानें कायस्थ मंडळींला दोष लावण्याला पुरेसा पुरावा किंवा ऐतिहासिक साधन उपलब्ध नाहीं. सातारच्या गादीवरून प्रतापसिंह महाराज पदच्युत करण्यांत आले, त्याचप्रमाणें सिंध प्रांतांत थोड्या वर्षोनंतर—कांहींसा त्याच मासल्याचा प्रकार घडून आला. सिंधप्रांत इंग्रजांनीं काबूलच्या पहिल्या मोहिमेनंतर खालसा केला. त्यावेळीं खैरपूरचे मीरअली मुरादखान यांना त्यांनीं हातीं धरलें होतें. या वेळीं त्यांनीं इंग्रजांशीं चांगला सलोखा केला होता, व त्यांचें असें ठरलें होतें कीं, टढाईच्या पूर्वी अलीमुरादखान यांच्याकडे जो प्रांतभाग होता तो त्यांच्याकडे कायम राहावा, व त्यांना त्या सिंध प्रांतांत अग्रेसर मीर समजलें जावें. सिंधप्रांत खालसा हंऊन सर्वत्र स्थिरस्थावर झालें. काबुलची फौज परत आली. इंग्रजांचा चांगला जम बसला. नंतर जिंकून घेतलेल्या एका मीराच्या सांगण्यावरून, मीरअली मुराद यांनीं आपल्या वास्तविक हक्कापेक्षां जास्त प्रांत दाबला आहे अशाबद्दर काम चाललें. अखेर त्यांनीं पहिल्या मीराशीं वाटणीचा तह झालेला होता त्यांत लिहिलेल्या गांवाच्या ऐवजी मीर अली मुराद यांनीं ते ते तालुके दाबले आहेत, व ते आपले आहेत असें करण्यासाठीं तहाच्या कलमांत फेरफार केला आहे, असे ठरवून तेवढा भाग त्यांच्याकडून परत काढून घेतला गाला. व त्यांचा बराचसा अपमानही करण्यांत आला. तात्पर्य, अशा गंष्टी सुव्यवस्थित व दिवसेंदिवस बळावत व वाढत जाणाऱ्या राज्यांतही घडून येतात. पण त्यांच्यासाठीं एखाद्या विवक्षित वर्गाला किंवा जातीला दोषी धरणें योग्य नाहीं. '' **वि. ज्ञा. वि. एप्रिल १९१९**

कलम १८ पृ. ४१ येथें राजवाडे ठणकावून देतात कीं '' **याज्ञवल्क्य स्मृतींत ' कायस्थं न हि विश्वसेत '** असें वाक्य आहे. '' याज्ञवल्क्याच्या प्रचलित निरनिराळ्या प्रति आम्ही तपासून पाहिल्या, पण त्यांत वरील ' विधिवाक्य ' आम्हांला कुठेही सांपडलें नाहीं. कदाचित् आमची नजरचूकहि असेल. राजवाड्यांनीं तसदी घेऊन अध्याय व श्लोक दिला असता तर बरें होतें. पण त्यावरून एक तरी समाधान आहे की, ज्याअर्थी '' यज्ञवल्क्यस्मृती व तीवरील विज्ञानेश्वराची टीका महाराष्टांत पुरातन कालापासून प्रमाण धरतात '' असे राजवाडे म्हणतात, त्याअर्थी निमकहराम कायस्थांचा इतिहास याज्ञवल्क्याच्या पूर्वी बराच प्रसिद्ध असला पाहिजे ; त्याशिवाय पुरातन कालापासून प्रमाण असलेल्या या ग्रंथांत हें विधिवाक्य आलेच नसतें. शिवाय

सन १६२८ च्या पलीकडे राजवाड्यांना जो अंधार दिसत होता, त्या अंधारांतसुद्धां कायस्थांच्या इतिहासाबद्दल हें विधिवाक्य कुलाब्याच्या दांडीप्रमाणें त्यांना आढळलें म्हणावयाचें ! कायस्थांना विश्वासघातकी ठरविणारा हा राजवाड्यांचा याज्ञवल्क्य कोण असेल तो असो. पण याज्ञवल्क्यस्मृती अध्याय १, श्लोक ३३३ मात्र असें स्पष्ट सागत आहे की, " चोर दुष्ट आणि घातकी लोकांपासून त्रस्त झालेल्या प्रजेचें संरक्षण कायस्थांनींच केलें. " कायस्थ विश्वासार्ह आहेत कीं विश्वासघातकी आहेत, याची साक्ष द्यायला राजवाडे उगाच इतक्या पुरातन काळच्या अंधाऱ्या युगांत धावत गेले ! आजची ब्रिटिश यज्ञवल्क्यस्मृती पाहिली तर ' काचस्थं न हि विश्वसेत् ' च्या ऐवजीं

चित्पावनं न हि विश्वसेत्

असे विधिवाक्य मात्र हजारों दप्तरांतून आढळेल, प्राचीन इतिहासांतील गोष्टी काढून उगाच कोळसा कशाला उगळावा ? प्रचलित परिस्थित्यनुरूप सध्यांचा इतिहास काय आहे आणि निरनिराळ्या जातींची वृत्ति कशी पालटली आहे, याकडेच सर्वांनीं लक्ष द्यावें ! असें आमचे कित्येक चित्पावन मित्र आम्हांला नेहमीं उपदेश करीत असतात. म्हणूनच त्या उपदेशाला मान देऊन आम्ही म्हणतों कीं प्राचीन याज्ञवल्क्यांच्या किंवा पराशरांच्या स्मृति पाहण्यापेक्षां अर्वाचीन चालू याज्ञवल्क्यांच्या आणि पराशरांच्या स्मृति पाहिलेल्या बऱ्या. याज्ञवल्क्याच्या स्मृत्याधारें राजवाड्यांनीं पुढें असा मथितार्थ कढला आहे कीं, " महाडापासून जंजिऱ्यापर्यंतच्या टापूंत चांद्रचेनीय कायस्थ व मुंबईपासून दमणपर्यंतच्या टापूंत चांद्रसेनीय पाताणे *प्रभु एवढीं दोन कुळें तेवढीं शिलाहारांच्या अमदानींत कोकणांत आलेलीं आढळतात. **बाकी महाराष्ट्राच्या इतर सर्व प्रांतात कायस्थांना पक्का काट मिळालेला दिसतो.** " पेशवाईतल्या छळांना कंटाळून पुण्यांतील कायस्थ प्रभुमंडळ सातारा, नागपूर, बडोदें, ग्वालेर, देवाच, इंदूर, मुरूडजंजिरा वगैरे ठिकाणीं निघून गेल्याचें इतिहासकांस माहीत आहेच. या संस्थानांत कायस्थांची काय भरभराट झाली, त्यांचा किती भाग्योदय झाला आणि यांपैकीं कित्येक संस्थानांची फासावर लटकलेली मान केवळ कायस्थ दिवाणांच्याच अक्कलहुषारीनें वेळोवेळीं कशी सफाईत सोडविली गेली, याचा इतिहास शोधायला फार दूर जावयाला नको. आजहि य संस्थानांतून कायस्थं प्रभूंचा जितका भरणा आहे, तितका राजवाड्यांनीं आंखून ठेवलेल्या क्षेत्रांतहि नाहीं, हें आंधळ्यालासुद्धां दिसणारें आहे. या क्षेत्राव्यतिरिक्त महाराष्ट्राच्या इतर भागांत कायस्थांना पक्का काट मिळाला असेल तर तो मग कोठें ? आजहि महाराष्ट्रातल्या आणि महाराष्ट्राच्या बाहेरील सर्व स्वदेशी संस्थानांतून चा. का. प्रभूच दिवाणादि महत्वाच्या जाग्यावर अजून झळकत आहेत आणि इतर जातींतील अधिकाऱ्यांपेक्षां प्रत्येक दर्जाच्या खात्यांतून कायस्थ प्रभु कामगारांचीच संख्या अधिक आढळते. फार काय पण ब्रिटिश रियासतईत मुन्सफी मामलेदारीच्या जागांवर कायस्थ प्रभुंच्या नेमणुका अलीकडे (?) फार झाल्या आहेत म्हणून रा. रा. नरासिंह चिंतामण केळकर यांनी

*हे चांद्रसेनीय पाताणे प्रभू कोण ? आमच्या तर पहाण्यांत ही जात नवनच आली. मुंबईकर पाताणे प्रभु आपणास " चांद्रसेनीय पाताणे प्रभू " कधींच म्हणवीत नाहींत आणि त्यांच्या इतिहासांतहि हे नामाभिधान त्याना लावलेलें दिसत नाहीं. तेव्हा राजावाड्यांच्या विश्वामित्री सृष्टींतील हा एक नवीन जात्युत्पत्तीचा भाग दिसतो.

आपल्या ' मराठे आणि इंगज ' पुस्तकांत अप्रत्यक्ष खेदयुक्त उद्‌गार काढले आहेत. कायस्थ प्रभूंची जात जर याज्ञवल्क्याच्या पूर्वीपासून ' नहि विश्वसेत् ' इतकी निमकहरामी होती, तर अझूनपर्यंत स्वदेशी संस्थानातून आणि ब्रिटीश रियासतीत कायस्थांना अधिकाराच्या जागा देण्यांत संस्थानिकांचा आणि ब्रिटिश अधिकाऱ्यांचा जो विशेष ओढा आहे, तो काय त्या त्या संस्थानिकांचा मूर्खपणा म्हणून कीं काय ? आज पर्यंत स्वदेशी संस्थानिकांशीं द्रोह करणारे किंवा कुटिल नीतीनें त्यांच्या अधिकाराचा स्वापहार करणारे कितीकसे कायस्थ राजवाड्यांच्या डायरींत नमूद आहेत ? मल्हारराव गायकवाडाच्या बंडाच्या वेळी रामराव आपाजी फणशांनीच गायकवाडी वाचविली. काठेवाड दिवाणजीचा इतिहासहि तितकाच उज्वल आहे. इंदूर, धार, देवास, ग्वालेर इ. संस्थानांबद्दलहि कायस्थ प्रभू अधिकाऱ्यांची स्वामिनिष्ठेची कामगिरी ठळक ठशांत प्रसिद्ध झालेलीच आहे. मल्हारराव गायकवाडांचे साथीदार म्हणून ज्या ३२ दुष्ट आणि कारस्थानी लोकांची यादी रा. लोकहितवादींनीं (भाग १, पृ. १२५ वर) दिली आहे, त्यात एका तरी कायस्थाचें नांव राजवाडे दाखवून देतील काय ? (भाग १, पृ. १५१–५२ वर वर) लो. हि. नीं पेशवाईच्या काळांतील सुप्रसिद्ध दुष्ट लोकांची महिती दिली आहे, त्यांत (१) गुलाम कादर (२) सर्जेराव सखाराम घाटगे (३) सिदोजीराव आप्पा देसाई निपाणकर (४) हरिपंत भावे आणि (५) परशुरामपंत प्रतिनिधी, ही नांवें दिलेली आहेत ! यात कोण कायस्थ आहे तो राजवाड्यानींच दाखवावा. एकूण आपल्या मत्सरी कल्पनेला भाडोत्री याज्ञवल्क्याचा पेहराव घालून राजवाड्यानीं कायस्थ प्रभू समाजावर जो विश्वासघातकीपणाचा आरोप आणलेला आहे, त्याला ऐतिहासिक पुरावा मुळींच नाहीं. अर्थात् हा आरोप म्हणजे चां. का. प्रभू ज्ञातीची.

**शुद्ध बदनामी होय,**

असे म्हणायला कांहीं हरकत नाहीं. चां. का. प्रभ. ज्ञातीतील एकहि इसम आज मितीला आंदमान बेटांत पाण्याची शिक्षा भोगण्यास गेलेला नाही, एखाद्यावर राजकीय खुनाचा आरोप आल्याचे कोणाच्या ऐकिवांत नाही. अलीकडे राजकीय स्वरूपाच्या कितीतरी मोठमोठ्या चळवळी झाल्या, परंतु एकहि कायस्थ प्रभु राजद्रोहाच्या आरोपांत सांपडलेला नाहीं. कितिएकांच्या प्राचीन इनाम जमिनी किंवा इतर हक्क सध्यां नाहींसे झाले आहेत. राजकीय क्षेत्रांतील त्यांचें असावे तितके महत्त्व इतर सर्व जातींप्रमाणेंच–सध्या राहिलें नाहीं. तरीसुद्धा ब्रिटीश सत्ताधारी लोक आणि त्यांचीं सरकारी दप्तरें ही कायस्थ प्रभूंना " conspicuosly loyal " असाच शेरा देत आहेत. सुप्रसिद्ध आंग्ल इतिहासकार किंकेड साहेब तर त्यांना " The most attractive and lovable community " असाच शेरा देतात. कायस्थ प्रभू मुसलमानांशींहि निष्ठेनें वागले. या बद्दल खुद्द शिवाजीचेच उद्गार आहेत. मराठे छत्रपतीविषयींची त्यांची अनन्य भक्ति आणि स्वराज्यानिष्ठा इतिहासप्रसिद्धच आहे. याबद्दल सर जेम्स कँबेल, सर हर्बर्ट रिस्ले आणि ऑन. इम. एन्थॉवेन यांनींही प्रशंसापर उद्‌गार काढलेले आहेत. स्वदेशी संस्थानांत जर एखाद्या कायस्थ प्रभूनें नोकरी पत्करली, तर त्या संस्थानिकाच्या ऱ्हासाबरोबर तो स्वतःहि खालीं पडतो ; आणि त्याच्या भरभराटींतच स्वतःचा उत्कर्ष करून घेतो. परंतु राजाचा सत्यानाश झाल्यावर त्याच्या दुर्दैवाचा फायदा घेऊन स्वतःची तुंबडी भरणारा कायस्थ प्रभु मिळणेंच शक्य नाही. काठेवाड काबीज करून साऱ्या गायकवाडीला बगलेंत मारणारे आणि

' ज्या दगडाला शेंदुर फांशीन त्याला गायकवाड करीन ' अशी कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुम् सामर्थ्य एक वेळ ज्या काठेवाड दिवाणजीच्या हातांत होतें, त्याला गायकवाडी आपल्या घशांत उतरायला कांही अडचण नव्हती. पण नाहीं. असला परस्परापहार करणें

## कायस्थ प्रभूंचें ब्रीद नव्हे !

धन्याची मान कापून स्वतःचा तळीराम गार करण्याची जीं किळस आणणारीं कांहीं ठळक उदाहरणें मिरपूरखास, कोल्हापूर, लाहोर, पुणें, बडोदें, सातारा वगैरे ठिकाणीं घडून आलीं, तीं बहुतेक ब्राह्मणांच्या हातूनच घडलेलीं आहेत, हें इतिहासज्ञांस सांगणें नकोच. कायस्थ प्रभू मुसलमानांच्या विरूद्ध लढले, मराठ्यांच्याहि विरूद्ध लढले, फार काय छत्रपतीच्या वतींने इंग्रजाच्याहि विरूद्ध त्यानी लढण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं. हें सारें. कां ? तर एका स्वामीनिष्ठेकरितां. हा स्वामीनिष्ठेचा एकच गुण त्यांच्या नैसर्गिक रक्ताची साक्ष देण्यास पुरेसा आहे. म्हणूनच स्वदेशी संस्थानांतून काय अगर ब्रिटिश रियासतींत काय, कायस्थ प्रभू अधिकारी असला म्हणजे तेथील कारभाराबद्दल राजाला मुळींच फिकीर वाटत नाहीं.

प्रस्तुत पुस्तकांत आम्ही राजवाड्यांच्या लेखांतील ठळक ठळक आरोपांचाच विशेषतः विचार केला आहे. त्यांच्या लेखाचें स्वरूप आणि हेतूच इतका बेजबेबदार आहे की, ज्यांत कायस्थ प्रभूंची बदनामी नाहीं, अशी एक ओळहि सांपडणार नाहीं, असें सामान्य विधान केल्यास अतिशयोक्ति होईलसें वाटत नाहीं. कायस्थ प्रभूंवरील स्वराज्यद्रोहाच्या भयंकर आरोपाचा विचार करण्यापूर्वी राजवाड्यांच्या कांहीं त्रोटक आक्षेपांचा येथें विचार करणें बरें.

## नऊ कलमी कतब्याचें काय झालें ?

सन १९०७-०८ सालच्या स्वदेशी चळवळींत श्री. नरसोपंत केळकर, संपादक केसरी, हे खटला होऊन ठाण्याच्या जेलमध्यें असतांना, त्याच्याकडून सरकारनें एक कांहीं अटींचे माफीपत्र लिहून घेऊन त्यांची सुटका केल्याने पुष्कळांना स्मरत असेल. अशाच प्रकारचा एक नऊ कलमी भिक्षुकी अटींचा कतबा उत्सवमूर्ती नारायणा राव पेशव्यानें कायस्थ प्रभूंच्या प्रतिनिधींकडून मोराबादादाच्या* वाड्यांत बळजबरीनें सह्या करून घेतला होता. याची विस्तृत तपशीलवार हकीकत आमच्या ' ग्रामण्य ' ग्रंथांत पृ. ३८, ३९ वर दिलेली अवश्य पहावी.

हा नऊ कलमी कतबा येणें प्रमाणे :—

**(१) वैदिक मंत्रेंकरून कांहींच कर्म करणार नाहीं.**

**(२) वैदिक मंत्र येत असतील त्यांचा उच्चार कणार नाही.**

---

* पुण्यांतील मोराबादादा फडणिसांचा वाडा म्हणजे पेशव्यांचा भूतखाना म्हटला तरी चालेल. ग्रामण्यांच्या सबबीवर या वाड्यांत शेंकडों गरीब ब्राह्मणेतराना हाणामार झालेली आहे. बळजबरीचे वाटेल ते कतबे येथें लिहून घेतले जात. दैवज्ञ ब्राह्मणांच्या प्रतिनिधींचे तर या वाड्यांत खून पडलेले आहेत. अशा या चाण्डाळ कर्माच्या वाड्यांत आतां हिंदु संघटनेच्या सभा, अस्पृश्यांचे गणेशोत्सव, स्वराज्यवाद्यांचे वादविवाद वगैरे गोष्टी होत असतात. ज्या वाड्याची वास्तूच ब्राम्हणेतरांच्या हालअपेष्टांची, तेथें या गोष्टींच्या चळवळी यशस्वी होतील काय ?

(३) भाताचे पिंड करणार नाहीं.

(४) देवपूजादिक विहित कर्मे पुराणोक्त मंत्र करूनच करूं व ब्राह्मणभोजन आपले घरीं करणार नाहीं.

(५) शालीग्रामपूजा करणार नाहीं.

(६) ज्या देवास शूद्र जातात त्या देवास जाऊं.

(७) ब्राह्मणांना दंडवत मोठ्यानें म्हणत जाऊं व आपले जातींतहि दंडवत म्हणत जाऊं.

(८) वैदिक ब्राह्मण व आचारी व पाणके व शागिर्द ब्राम्हण व ब्राह्मण बायका चाकरीला ठेवणार नाहीं व आपले घरींहि ठेवणार नाहीं.

(९) आमच्या जातीमध्यें संतोषें पाट लावतील त्यांना आम्ही अडथळा करणार नाहीं.

चां. का. प्रभूंच्या ग्रामण्याबद्धलचा नऊ कलमांचा हा कतबा आधुनिक चित्पावन–संशोधकांच्या मोठ्या कौतुकाचा एक विषय होऊन बसला आहे. कारण बऱ्याच विद्वानांनीं हा बऱ्याच निरनिराळ्या ठिकाणी बऱ्याच वेळां प्रसिद्ध करण्याचें पुण्य संपादन केलें आहे. जणु काय हा नऊ कलमांचा कतबा म्हणजे त्यांना “Nine wonders of the world” वाटतो कीं काय कोण जाणें ! वासुदेवशास्त्री खरे यांनी आपल्या ऐतिहासिक लेखसंग्रहाच्या आठव्या खंडात त्याचा जीर्णोद्धार केला आहे. धुळ्याच्या हवेंत निर्माण होणाऱ्या ‘ इतिहास आणि ऐतिहासिक ’ मासिकानेंहि पहिल्या वर्षाच्या १२ व्या अंकांत त्याचें श्राद्ध घातलें आहे. आणखी कितीतरी ठिकाणीं तो छापला गेला आहे, त्यांची नांवनिशी कोठेवर द्यावी ? आमची या सर्व विद्वानांना एक विनंती आहे. त्यानीं हा—

## परशुरामी ताम्रपट

ब्रोंझ धातूच्या जाड पत्र्यावर ‘ रिलीफ् ठशांत ’ खोदवून भा. इ. स.. मंडळाच्या लोखंडी मंदिरांत कायमचा स्थापन करावा, म्हणजे ठिकठिकाणीं निरनिराळ्या प्रसंगी नकला छापून त्याच्या अमरत्वाची अशी कागदी काळजी वाहण्याची खटपट कायमची दूर होईल. नारायणराव पेशव्याच्या उरावर जाळलेल्या चां. का. प्रभूंच्या ग्रामण्याबद्दलचा हा दस्तेएवज चितापावन होऊन हजारों चित्पावनांच्या घरांत अस्सल म्हणून जरी अवतीर्ण झाला तरी त्यांत कांहीं मोठीशी आपत्ति चां. का. प्रभूवर येणार नाहीं. आमच्यासारखे आधुनीक कायस्थ तर आज या कतब्यापेक्षांहि दहा मैल पुढें जातात. वैदिकमंत्रच काय, पण कोणत्याच मंत्रानें कांहींहि करणार नाहीं. मंत्र लागलेच तर स्वतः मराठी व इंग्रजी रचून देवाला आळवूं. शाळीग्रामच काय पण कोणताहि दगड धोंडा पुजणार नाहीं. हातांत सांपडला तर बॅकबे बुजवायला मुंबईच्या डेवलमेंट डिपार्टमेंटला देऊं. भाताचे पिंड करणार नाहींच पण कशाचे मातीचे सुद्धा करण्याची इच्छा नाहीं. ब्राह्मणाचें देऊळहि आम्हांला नको आणि शूद्राचेंहि नको. देवळांत देव असतो, ही भिक्षुकी कल्पनाच आम्हाला मान्य नाहीं. ‘ संतोषे ’ पाट लावण्यापेक्षां शक्य तर ‘ जबरीनें ’ लावण्याची सुद्धां चळवळ सुरूं करूं. ब्राह्मण भोजणाची व ब्राह्मणी अडत्येगिरीची ब्याद सुटली तर महामारीच

गेली असे समजूं. ब्राह्मण आचारी पाणक्ये धोतरबडवे यांना कायमचा झाडू देण्यास मुळींच हरकत नाहीं ; पण ते बिचारे आमच्या आश्रयाच्या अभावीं उपाशी मरतील. त्याची वाट काय ? हल्ली पर्वतीवर रमणा नसतो ! दंडवताची मात्र मोठी पंचाईत आहे. हल्लीच्या गुडमॉर्निंग साहेबजी हल्लींच्या रामरगाड्यांत दंडवताचा व नमस्काराचाहि मुर्दा पडला आहे. मुर्दाला कोण लेक जगवितो ? आशा आहे कीं, या मुर्दाच्या निर्मेळ स्वराज्यासाठीं वेदनारायण फारसे सुतकी बसणार नाहींत. आमचे आजचे विचार हे असले तरी १८ व्या शतकातला कायस्थांना हा कतबा म्हणजे त्यांच्या अस्तित्वावरच झुगारलेला आकाशाचा वज्राघात असाच वाटला. कां वाटू नये ? मगरूर पेशव्यानीं तो कायस्थांवर झुगारण्यांतला हेतु एवढाच कीं, त्यांना लौकिकी दृष्टीनें कमी दर्जाचे ठरवावे. म्हणजे आज तुमचे आमचे विचार कितीही पुढें गेलेले असले, तरी १८ व्या शतकांतल्या पेशव्यांच्या व कायस्थांच्या उच्चनीचतेच्या व ब्राह्मण–शूद्रत्वाच्या कल्पना कशा होत्या, हें या परशुरामी आणि घाशीरामी फतव्यावरून खासें समजून येईल. तरी सुद्धां (बाजीरावानें मस्तानीला अर्धांगी केली व समशेर बहाद्दराच्या मुंजीचा प्रयत्न केला) एवढ्यावरून हिंदुमुसलमान- ऐक्याचें श्रेय बाजीरावाच्या पदराला बांधणारे, किंवा स्वतःच्या ब्राह्मणपणाची थप्पी कायम साधण्यासाठीं चित्पावनेतर ब्राह्मणांच्या मुलींशी जबरीचे विवाह ठोकणाऱ्या नानासाहेबाला हिंदुसंघटनाचे आद्योत्पादक बनविणारे ज्ञानकोशकार डॉक्टर केतकर नारायणराव पेशव्याच्या प्रेतावर प्रगमनशीलतेची शालजोडी पांघरण्यास कमी करणार नाहींत. हा प्रकार घरांत खडखडाट असणाऱ्या बुभुक्षितानें महाशिवरात्रींचा उपास केल्याची पुण्याई लाटण्यासारखाच आहे.

मंडळाच्या (चैत्र-भाद्रपद शके १८३४) च्याअहवालांत कै. पां. न. पटवर्धन यांनीं ' प्रभूप्रकरणीं दोन निवाडपत्रें ' देऊन, नारायणराव पेशव्याच्या ९ कलमी कतब्याचा उताराहि त्यांत दिला आहे. पटवर्धन म्हणतात कीं. ' सदरहू पत्राचें अस्सल वाई क्षेत्रांतील ब्राह्मणाजवळ आहे. ' (अस्सल कोणतें आणि नक्कल कोणतें), हें ठरविण्याचा अधिकार आजकाल चित्पावन संशोधकांनी आपणाकडे ' राखून ठेविला ' आहेच. तथापि बखरी पाहिल्या तर, नाना फडणीस यांस मुद्दाम तांतडीनें सदर्हू यादी दप्तरांतून काढून द्या, त्याशिवाय नारायणरायाचें प्रेत कायस्थ मंडळी उचलून देत नाहींत, असा दादासाहेबांचा निरोप पोचतांच. '' तेव्हां नानांनीं रुमाल आणून काढून दिली. ती याद सखाराम हरीस दिली. यांनीं विनंती केली, कीं आपले हातें फाडून द्यावी. तेव्हा दादासाहेबांनी श्रीकार फाडून दिली. ती व्यंकटराव काशीचे हातीं सखाराम हरीनें दिली. व्यंकटराव काशीनें ती याद फाडून पूरजे करून शवावर टाकीले. नंतर शव उचलून पुढी विधि झाला.'' ही बखरीची साक्ष आहे, तेव्हां वाईच्या ब्राह्मणाजवळ अस्सल आली कोठून ? बरें, अस्सल नष्ट झाली म्हणजे नकल राहतच नाहीं, असें थोडें आहे ! परंतु ' नकल हीच अस्सल ' असा हट्ट धरणाऱ्या आणि ज्या प्रकरणाबाबत ती नकल असते, त्या प्रकरणाचा कायमचा निकाल लागला असतांहि, ती पुन्हां जशीच्या तशी-झणुं काय, ती आतां अगदीं नवीनच उपलब्ध झाली अशा दिमाखानें प्रसिद्ध करणें, म्हणजे संशोधनाच्या शहाणपणाचा कळसच झाला म्हणावयाचा ! उद्यां सरकारी दरबारीं चालणाऱ्या खटल्यांतील पुराव्यांच्या कागदपत्रांबद्दल जर हीच पद्धति सुरू केली, तर या असल्या खटल्यांच्या निकालांच्या आवृत्यांवर आवृत्या देण्यासाठीं सरकारला

दरएक गांवाला दहा दहा कोटें निर्माण करावी लागतील.परंतु इतका पोंच आमच्या पटवर्धनांना राहील कसा ! त्यांनी यमाजी शिवदेवाच्या वेळच्या चां का. प्रभूवरील ग्रामण्याच्या आरोपाचें एक पत्र असेंच छापलें आहे. त्याचाहि रोग्य तो निकाल लागलेला आहेच. नानासाहेब पेशवे यांनीं शाहूमहाराजाकडून आज्ञापत्र आणवून ग्रामण्याचे मुख्य चळवळ्ये प्रतिनिधी आणि त्यांचे कारस्थानी मुतालीक यमाजी शिवदेव या दोघांनाहि अखेर तुरुंगांत रवाना केल्याचा मनोरंजक इतिहास म. स. उत्कर्ष पृ. १५५-१५६ वर ज. रानडे यांनी दिलाच आहे. अर्थात् असली ' आरोप पत्रें ' वारंवार ' नवीन पुरावा ' म्हणून प्रसिद्ध करणे, हें मत्सरी व कुत्सित चित्पावनांना फार चांगलें साधतें.

' शिवराज-प्रशस्ति ' व ' कायस्थ धर्मदीप ' या फाटक्या तुटक्या चोपड्यांचें संशोधन करण्याच्या सबबीवर राजवाड्यानीं कायस्थांविषयीं इतक्या अनेक अवांतर गोष्टींची नालिस्ती केली आहे कीं नालिस्ती करावयला गोष्टच उरली नाहीं म्हणून अखेरीस कायस्थांना त्यांच्या आईवरून एक सणसणीत शिवी हांसडण्याचेंच त्यांनी बाकी ठेवलें आहे. त्याशिवाय बाकी सर्व संस्कारांची त्यानीं वाटलेली मुबलक खैरात स्थितप्रज्ञाप्रमाणें निमूट सहन करणाऱ्या सर्व गलधट कायस्थाग्रणींनीं राजवाड्यांचे मनःपूर्वक आभार मानले पाहिजेत. कायस्थ धर्मदीपांतल्या तेलवातीची चिकित्सा करण्यासाठीं राजवाड्यानीं केवळ मुळाशीच हात घातला असें नव्हे, कायस्थांच्या टाळक्यांवरहि तो सफाई फिरविला आहे. त्यांना कायस्थ प्रभूंचें पागोटेंहि सहन होत नाहीं.

राजवाड्यांनी पृ. ४८ वर आपल्या ज्ञातिबांधवांची व्याजस्तुति करण्याच्या भरांत असें एक विधान ठोकून दिलें आहे कीं **' दंडवताच्या ऐवजीं नमस्कार घेण्याकरितां कायस्थांनीं रण माजविलें, आणि ब्राह्मणी पागोटें मस्तकावर चढविण्याकरितां कायस्थ दोनशें वर्षे हैराण झालें.** 'हा अद्वितीय शोध त्यांना कोणच्या गळाठ्यांत सांपडला असेल तो असो, परंतु प्रचारांत कायस्थांनी कधिं ' दंडवत ' शब्द नमनविधीला वापरल्याचें इतिहासांत सापडत नाहीं. राजवाड्यांना या विधिवाक्याचा ताम्रपट जर उपलब्ध झाला असेल तर तो त्यांनी अवश्य प्रसिद्ध करावा, म्हणजेसध्यां ' साहेबजी, हल्लो, आयसे मिस्टर, गुडमॉर्निंग ' करण्यांत फुशारकी मारणाऱ्या सुधारक कायस्थांच्या आधुनिक नमनप्रघातांत दंडवताची फोडणी घालण्याला कोणीहि आडवा येणार नाहीं. आता पागोट्याबद्दलहि असेंच आहे. ब्राह्मणें डोकींवर शिपतरें चढवूं लागलीं आणि कित्येक कायस्थ तर आतां बोडके फिरण्यांतच शेखी मिरवूं लागले आहेत. अर्वाचीन इतिहासाचीं प्रमेयें सोडविणें राजवाड्यांचा हातचा मळ जरी असला, तरी तसें करणे आम्हाला अप्रयोजक वाटतें. एखाद्या आधुनिक चित्पावनानें किंवा कायस्थानें मराठणीशीं विवाह केला, म्हणजे त्यांचे पूर्वजहि तसेच होते, हें विधान करणें जितकें बाष्कळपणाचें होईल, तितकींच सध्यांचीं कायस्थें फेटे किंवा टोप्या घालतात किंवा बोडके फिरतात म्हणून त्यांच्या वाडवडीलांच्या पागोट्यावर हल्ला करणें हेंहि चावटपणाचेंच ठरेल. ब्राह्मण मंडळी पागोटी कधीपासून घालूं लागलीं याचा इतिहास शोधायला अगदीच कांहीं अंधाऱ्या युगांत जावयाला

नको, श्रीवर्धनच्या कायस्थ प्रभु (केळशीकर प्रधान) कुळकर्ण्याच्या घरीं × कारकुनी करणारे बाळाजी विश्वनाथ जेव्हां कोकणांतून घांटावर आले,त्यावेळीं ते ब्राह्मणी पागोटें घालून आल्या वेळचा त्यांचा एकादा फोटो ठाणे येथील कोपिनेश्वराच्या पडक्या भिंताडांतून बाहेर पडलेला असल्यास नकळे ! चां. का. प्रभूच्या पागोट्याचें मूळ मात्र फार खोलवर गेले आहे. राजवाडे संशोधकांनीं किंचित् श्रम घेतल्यास तेंहि त्यांच्या सहज हातीं येईल. प्रख्यात ज्योतिर्विद-मुकुटमणि कै. जीवनराव चिटणीस म्हणतात. " प्राचीन काळचे चां. का. प्रभु हे नाग देशांतील रहाणारे होते. नागाचें वर्ष श्रावणांत सुरू होतें. ' वर्ष ' हा शब्द पर्जन्यदर्शक आहे. नागदेशांत पांच ऋतु होते. म्हणून पंचमी तिथी हा वर्षारंभ मानून नागाची पूजा पंचमीस करतात. नागपंचमी आणि नागपूजन यांचें महत्व चां. का. प्रभु ज्ञातींत अझूनहि बरेंच आहे. चां. का. प्रभु हे नागदेशांतील असल्यामुळें त्यांचें शिरस्त्राण अथवा पागोटें हें नागचिन्ह आहे. पागोट्याचा घेर नागाचें क्षेत्र किंवा वेटाळें होय. कोकी ही त्याची फडा. नागाची फडा रुंद झाली म्हणजे त्यावर दहाचा आंकडा झळकूं लागतो ; त्याप्रमाणें कोकीच्या मधोमध एक जरीचा पदर आलेला असतो. दुसरा जरीचा पदर हें शेंपूट. पागोट्याच्या पिळांचें आणि नागाच्या वेटाळ्यांचें साम्य आहे. चांद्रवंशीय कायस्थ

## पागोटें ब्राह्मण घालूं लागले

म्हणून पेशवाईच्या अंमदानींत त्याला ब्राह्मणी पागोटें ही संज्ञा मुद्दाम देण्यांत आली. " त्यापूर्वी ब्राह्मणांच्या डोक्यांवर असल्याचा इतिहास कोठें सांपडत नाहीं. भवभूति कालीदासापासून तों चालू रामराज्यवियोग नाटकांपर्यंत जरी पाहिलें तरी त्यांतहि रंगभूमीवर येणार ब्राह्मण पागोटें घालून येत नाहीं. वसई प्रांतांतील दूधवाले आणि भाजीवाले जी तांबड्या बनातीची कानटोपी घालतात तेंच ब्राह्मणांचें शिरस्त्राण आहे. नेहमीं व्यवहारांत पगडी घालणारे कै. वामनराव जोशी पुनर्विवाहादि मंगल कार्यांत पुरोहिताचें काम करण्याच्या वेळीं पगडी बाजूला ठेवून बनातीची तांबडी टोपी धारण करीत असत, हें आम्ही स्वतः पाहिलें आहे. अझूनपर्यंतहि ब्राह्मणवृत्ति चालविणारे ब्राह्मण पागोटें घालून वृत्ति चालविण्यास बसत नाहींत. आतांचे ब्राम्हण म्हणविणारे लोक पागोटीं घालोत, फेटे घालोत, टोप्या घालोत, नाहींतर शिपतरें घालोत, या प्रश्नाकडे लक्ष देण्याचें कारण नाहीं. वाटेल त्यानें वाटेल तो ड्रेस करावा. त्याबद्दल कोणीं कोणाची स्तुतीहि करीत नाहीं आणि निंदाहि करीत नाहीं. पण इतिहास पाहिला तर ब्राह्मणांना पागोट्याची मालकी सिद्ध करतांना नवीन विश्वामित्री ऐतिहासिक कागदपत्रें शेकोटीच्या धुरावर बनविल्याशिवाय मात्र गत्यंतर दिसत नाहीं.

---

× बाळाजी विश्वनाथ हे ' श्रीवर्धनचे कुळकर्णी ' असा सरसकट उल्लेख आजपर्यंतचे इतिहासकार करीत आले आहेत. पण त्यांना ही कुळकर्णगिरीची सनद कोणी दिली किंवा ते खरोखरच कुळकर्णी होते कां नव्हते, याबद्दल मात्र कोणी संशोधन केल्याचे दिसन नाही. सध्याचे तेथील केळशीकर प्रधान कायस्थप्रभू यांच्या जवळ श्रीवर्धनच्या कुलकर्डपणाच्या सनदा शिवाजीपूर्वीच्याहि आहेत. मग हे बाळाजीपंत कुळकर्णी कधीं झाले ? सदहू प्रधानांचे हे कारकून असल्याचा दाखला मात्र त्यांच्या दफ्तरी आहे. बाकी सध्फादेखील वकीलाचा कारकून स्वतःला वकीलच समजतो आणि लोकही तसेच मानतात त्यांतलाच हा कलकर्णीपणाचा मान बाळाजीने स्वतः घेतला असे दिसते.

कायस्थ प्रभू समाजाचा २० व्या शतकांत उद्धार करण्यासाठीं राजवाड्यानीं मंडळामार्फत जें परशुरामास्त्र सोडलें, त्याचा अखेरचा निर्णयी तडाखा ते असा देतात :—

'' आतांपर्यंतकायस्थांच्या मागण्यांना विरोध करण्यांत, ब्राह्मणांना अशी भीति वाटत असे कीं कायस्थांची एकेक मागणी पुरवितां पुरवितां, त्या मागणीची सीमा ब्राह्मणपणाचा हक्क मागण्यापर्यंत जाईल. ती सीमा गांठण्याचा काल कधींच येऊं नये, एतदर्थ कायस्थांच्या पहिल्या अल्पस्वरुप मागण्यांनाहि त्यांनीं प्रतिरोध केला. त्या प्रतिरोधांत ब्राह्मण क्षत्रियांच्या राज्याचा विध्वंस झाला आणि दंडधारी राज्यसत्तेच्या पाठिंब्यानें जें धर्मशासन शक्य व्हावयाचें तें धर्मशासनहि हातचें निघून गेलें. आतां अशी विचित्र स्थिति ओढवली आहे कीं, कायस्थांच्या ह्याहक्काच्या मागण्या पुरवावयाच्या त्या कोणत्या संस्थेनें ? '' पृ. ४७/४८. केवढा भयंकर प्रसंग हा ! स्वराज्याच्या वळवळी, हिंदुसंघटनाच्या चळवळी, अस्पृश्योद्धाराच्या चळवळी, वगैरे शेकडों चळवळी करणाऱ्यांचे या भयंकर प्रसंगाकडे आजपर्यंत कसें लक्ष गेलें नाही ? एवढे मोठे टिळक लोकमान्य झाले ! त्यांची बुद्धि म्हणे शतपैलू. वाटेल त्या विषयांत त्यांचा प्रभाव. नाना फडणीस उडत्या पांखराचीं पिसें मोजीत असे ! पण टिळकांची दृष्टीगोचरता इतकी सर्वगामी कीं ते म्हणे नसत्या पांखराची पिसेसुद्धां बिनचूक सांगत ! पण त्यांना सुद्धां कायस्थ प्रभूच्या अस्तित्वामुळे हिंदुस्थानावर, हिंदुसमाजावर, हिंदुधर्मावर, नव्हे हिंदुत्वावर ओढवलेल्या या भयंकर प्रसंगाचा वास सुद्धां येऊं नये ? कशाला असल्या माणसाचे पुतळे उभारता ? दर मंगळवारी इंग्रजांच्या कुटील नीतीची सालपटें सोलण्यांत ४५ वर्षे खर्ची घालणाऱ्या केसरीला अगदीं आपल्या पाठीजवळचे स्वराज्य व स्वधर्मविध्वंसक कायस्थ प्रभू दिसूं नयेत ? केसरी आंधळा व मुर्ख बनला तर बनला ; बोलून चालून तो हिन्दूच. पण केवळ गुप्तपोलीसांच्या जिवावर आपलें राज्यशकट बिनधोक हांकणाऱ्या आणि पंढरपूरच्या चंद्रभागेच्या पाण्याच्या वासावर नासिकच्या गोदेंतले गुप्त कट हुडकून काढणाऱ्या इंग्रेज राज्यकर्त्यांनाहि या विश्वातघातकी व साम्राज्यविध्वंसक कायस्थप्रभूंचा कायम बंदोबस्त करण्याची बुद्धि होऊं नये, हा काय आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ आहे ?

कायस्थांच्या बदनामीनें ब्राह्मणांच्या श्रेष्ठपणाला रंग चढविण्यांत राजवाडे आपल्या जातीला आकाशापेक्षांहि उंच उचलून धरीत आहेत. कायस्थ प्रभूंवर ब्राह्मण्यप्राप्तीचा आरोप करणाऱ्या या शहाण्या समाजशास्त्र्याचा कान पकडून आम्ही सांगतो कीं वेळीं कायस्थ प्रभू स्वर्गाऐवजी नरकाला पसंत करतील, पण ब्राह्मणांच्या ब्राह्मण्याच्या सावलीला शंभर योजने दूर ठेवतील. ब्राह्मणांच्या ब्राह्मण्यांत असें काय मोठें दिव्य तेज आहे की पूर्वीच्या किंवा आतांच्या कायस्थांनीं त्याच्या प्राप्तीसाठीं जीव टाकावा ? असाध्य व अनिवार्य रक्तपितीप्रमाणें ब्राह्मणांच्या नशिबीं आलेलें ब्राह्मण्य खुशाल त्यांना पुढील हजार जन्म लखलाभ असो ! हिंदुस्थानांतला एकहि ब्राह्मणेतर हिंदु या रक्तपितीवर आजपर्यंत प्यार झाला नाहीं, आज होत नाहीं, पुढें होणाय नाहीं. कै. रामशास्त्री भागवत आपल्या ' मराठ्यांचे चार उद्‌गार ' या प्रसिद्ध ग्रंथांत म्हणतात (पृ. ११०-१११).

" हल्लींच्या काळीं–म्हणजे जो उठला तो ब्राह्मण होऊं पाहतो, अशा काळींहि–परबु (प्रभु) लोकांचा मगज न फाटतां स्थिर राहिला आहे, हें विशेष अभिनंदनीय होय.......जर परबू (प्रभु) मध्यें कालज्ञता नसती, तर सगळें महाराष्ट्रमंडळ हिशोबाच्या संबंधाने ब्राह्मणमय होऊन जातें. पण परबु (प्रभु) लोक मूळचे लेखक असून कालज्ञ पडले, त्यामुळें ब्राह्मणांचा पगडा महाराष्ट्र देशांत सर्वच ठिकाणीं पडला नाहीं " आम्ही राजवाड्याना व त्यांच्या घमेंडखोर मताच्या ब्राह्मणांना प्रतिज्ञानापूर्वक सांगतो कीं कोणत्याही काळचा कायस्थ प्रभू वाटेल ती शिवी वेळीं सहन करून शिवराळाला क्षमा करील, पण त्याला कोणी ' ब्राह्मण 'उपाधी चिकटवूं म्हणेल तर तो त्याच्या नरडीचा घोट घेईल. ' कायस्थ प्रभूंच्या अल्पस्वल्प मागण्यांना ब्राह्मणांनीं विरोध केला म्हणून ब्राह्मण क्षत्रियांच्या राज्याचा विध्वंस झाला ' काय ? आणित्यामुळेंच हिंदूंच्या धर्मशासन संस्थांची होळी झाली अं ? मोठी आश्चर्याची गोष्ट आहे ! मूठभर कायस्थप्रभूंनी एवढा विध्वंस करावा, ब्राह्मणक्षत्रियांचीं राज्यें धुळीस मिळवावीं धर्मसत्तेला जिवंत गाडावी, आणि वीस कोटी हिन्दूंनीं, विशेषतः शापादपि शरादपि ब्राह्मणांनीं त्यांच्यापुढें नामोहरम व्हावें, हा प्रकार काय दर्शवितो ? एक राजवाड्यांचें हें विधान पुणेरी भांबट्याची गप्प तरी असले पाहिजे, किंवा कायस्थेतर ब्राह्मण क्षत्रिय हे सारे नामर्द षंढ तरी असले पाहिजेत, याशिवाय तिसरें विधानच निघत नाहीं. कायस्थांच्या बदनामींवर ब्राह्मण्यांचें फाजील स्तोम उभारतांना आपण सर्व ब्राह्मणांना बेवकूब हिजडे बनवीत आहोंत याची राजवाड्याना शुद्धच राहिली नाहीं. बहुसंख्य ब्राह्मणांना नामर्द व नेभळट बनविणाऱ्या ब्राह्मण्यासाठीं कोण बेअक्कल माथेफिरू जीव टाकीत असतील ते खुशाल टाकोत ! धर्मशासनाचा पाठिंबा गेल्यामुळें उद्यां सर्व ब्राह्मण व त्यांचें ब्राह्मण्य मोडक्या बाजारांत लिलावास निघालें तरी एकहि अस्सल बीजाचा कायस्थ त्याकडे ढुंकून पहाणार नाहीं.हिंदु समाजस्थैर्याबद्दल मोठा डुढाचार्याचा आंव आणून हिंदूजनांनीं व विशेषतः ब्राह्मणांनी या कायस्थांचा बीमोड करण्याची चळवळ प्रथम हातांत घ्यावी, हें ठांसून सुचविण्यासाठीं राजवाडे आपल्या दीपाची आरती करतांना म्हणतात :—

**" कायस्थांची जातिधर्मोन्नति करण्याच्या कामांत तडजोड न झाल्यामुळें स्वराज्यास आपण मुकलों. आतां एकवर्णाच्या वावटळींत समंजसपणें वाट न काढली, तर आपण हिंदुसमाजासहि गमावून बसूं."**

कोणत्याहि समाजाला किंवा व्यक्तीला नामोहरम करण्याचे मार्ग दोन. एक, त्याचा लौकिक दर्जा हीन ठरविणें, सर्वच बाबतींत बहुसंख्य ब्राह्मणांना चारीमुंड्या चीत करणाऱ्या अल्पसंख्य राजकारणी कायस्थ प्रभूंचा शारिरीक विध्वंस करणें ही गोष्ट ब्राह्मणांना कव्हांहि शक्य झाली नाहीं. उरला मार्ग लौहिकी बदनामीचा, तो चोळण्यांत मात्र त्यांनीं मुळींच कसर केली नाहीं. ग्रामण्यांचे हेतु हेच. क्षत्रिय मराठ्यांना शुद्र ठरविलें आणि कायस्थ प्रभूंना ' शूद्राधम ' बनविले, कीं पेशव्यांचें व चित्पावनांचें राजकीय व सामाजिक महत्व थरारलेंच ; या एकाच हेतुनीं छत्रपति व कायस्थ प्रभू यांचा पेशव्यांनीं छळ केला. राजवाड्यांच्या प्रस्तुत उपक्रमाचाहि मूळ उद्देश तोच. स्वराज्याचें व स्वधर्माचें तळपट कायस्थ प्रभूंमुळेंच उडालें, हे लोक मोठे विश्वासघातकी व साम्राज्यद्रोही आहेत, यांची बीजोत्पत्तिः क्षुद्र व संशयित आहे आणि या पुढें ब्राह्मणादि कायस्थेतर हिंदु समंजसपणें या कायस्थांना ' कायमचा चाट ' व ' पक्का काट ' न देतील

तर हां हां म्हणतां अखिल हिंदु समाजाचेंच तळपट उडण्याचा भयंकर प्रसंग अगदीं माथ्यावर येऊन भिडला आहे, ही राजवाडी मल्लीनाथी शेंकडों विवेकी चित्पावन बंधु व चित्पावनेतर अखिल हिंदुंना तर रान्य होणार नाहींच नाहीं ; मग असले भयंकर आरोप निपूटपणें सहन करणारे कायस्थ प्रभू आज खरोखरच अकरमाशे व हिजडे बनले आहेत, असें कोणी म्हटल्यास त्यांत वावगें तें काय ? वर्तमान हिंदु संघटनाच्या व स्वराज्यप्राप्तीच्या चळवळीच्या काळीं कायस्थ प्रभुसमाजावर विश्वासघाताचा व स्वराज्यद्रोहाचा जाहीर आरोप करण्यास भारत इतिहास संशोधक मंडळानें पुढाकार घ्यावा आणि या विषयीं कायस्थांत भयंकर खळबळ उडाली असतांहि केसरी सांप्रदाईक पत्रकारांनीं मूग गिळून बसावें, यावरून या सर्व स्वराज्य-पुराणिकांची या कायस्थ-बदनामीला पूर्ण संमति आहे, असाच निष्कर्ष निघतो. चित्पावनांच्या स्वराज्याच्या चळवळी म्हणजे

## ब्राह्मणभोजनांतल्या खरकट्या पत्रावळी

असे आम्ही जें नेहमीं म्हणतों त्याचा हा प्रत्यक्ष पुरावा ब्राह्मणेतरांनीं पाहून घ्यावा. कायस्थ प्रभु सार्वजनिक कार्यांत भागच घेत नाहीं म्हणून कधिंमधीं कुरबूर करणाऱ्या चित्पावन स्वराज्यवाद्यांनीं वास्तवीक असा विचार करावयास पाहिजे कीं एकजात कायस्थांना तुम्ही विश्वासघातकी व स्वराज्यबुडवे ठरविल्यानंतर तुमच्याशीं त्यांनी कोणत्या मुद्यावर सहकारिता करावी ? केवळ वैयक्तिक धडाडीनें राजकारणांत, समाजकारणांत किंवा जनसेवेच्या इतर रंगणांत यथामति कार्य कयणाऱ्या कायस्थ प्रभूबद्दल तरी या देवजी धसाड्यांनी आजपर्यंत काय पूरस्काय केला आहे व कितीशी सहानुभूति दाखविली आहे ? कायस्थ मरोत, इतर जनसेवक ब्राह्मणेतरांबद्दल तरी या चाणक्यांना कोठें प्रेम वाटतें ? ब्राह्मणेतर बहुजनसमाजा (masses) बद्दल परिश्रम करणारे कै. शाहू छत्रपति ज्यांना ' **स्वराज्यद्रोही छत्रपति** ' वाटावे त्यांनी कायस्थ प्रभूंवर वाटेल ते घाणेरडे आरोप केल्यास नवल नाहीं. प्रस्तुत वादासंबंधानें प्रोफेसर जदुनाथ सरकार यांनी ' मॉडर्न रिव्यू ' मासिकांत मंडळाची नुकतीच झाडाझडती घेतली. त्याला उत्तर देतांना श्री. दत्तो वामन  पोतदार यांनी टणत्काराच्या दणक्याला उद्देशून म्हटलें आहे कीं, ठाकरे यांनीं शिवराळ (abusive) वाङ्‌मयाची दांडगी चळवळ सुरू केली. " श्री. पोतदार हे बी. ए. असले तरी भाषाविषयांत किंवा इतिहास संशोधनांत मीच काय तो मोठा शहाणा  अशी त्यांनी वृथा घमेंड मारूं नये. ॲब्यूजिव (शिवराळ) भाषा कोणती व कोणती सभ्य, हें ठरविणारे विद्वान हिंदुस्थानांत पुष्कळ आहेत. ठाकऱ्यांचा टणत्कार या पंडिताला ' ॲब्यूजिव ' वाटावा, पण राजवाड्यांचा उपव्याप स्वतःच्या नांवांनें प्रसिद्ध करतांना ' डिफेमेटरी ' स्कॅन्डलस किंवा मिश्चीवस ' वाटूं नये, हें पोतदारांचें भाषाशास्त्रप्राविण्य, विधानकौशल्य, का कऱ्हाड्या मनांत पडलेली चित्पावनी फोडणी ? सभ्यतेच्या गाळीव अर्कांनो, इतिहाससंशोधनाच्या ढोंगानें कायस्थांच्या बीज क्षेत्रशुद्धीची नालस्ती करता, धडधडीत खोट्या व खोडसाळ पुराव्यावर त्यांना विश्वासघातकी म्हणता आणि मराठी स्वराज्य कायस्थ प्रभूंनीच बुडविलें म्हणून ठांसून जाहीर करता, हीं तुमची संशोधकी कारस्थानें ' ॲब्यूजिव ' शिवराळ कीं ठाकऱ्यांनीं प्रत्युत्तरादाखल हाणलेली जोडेपैजार शिवराळ ?

## असे तर कांरे

म्हणणें केव्हांहि सरळच असतें. परंतु ' अरे ' म्हणणारानेंच जर आपल्या जिभेला इतकी सैल सोडली नहीं. तर दुसऱ्यालाहि ' कांरे ' म्हणण्याची पाळी येत नाहीं. इतिहास-संशोधनाच्या नांवाखालीं जुनी जातीविशिष्ट मत्सरांची पुनरावृत्ति केल्यानें स्वज्ञातीचा इतिहास अधिक उज्वल होईल, किंवा इतर जातींतील ऐतिहासिक नरनारींच्या चरित्र्यांवर आणि चारियांवर काजळ फासल्यानें आपल्या विशिष्ट ज्ञातीच्या ऐतिहासिक पुरुषांची चरित्रें व चारित्र्यें अधिक उठावदार होतील, अशी अपेक्षा करणे, समंजसपणाचें तर होणार नाहींच, पण उलट त्या कृत्यानें संशोधकांच्या संशोधन-तपःश्चर्येवरच काजळ फासलं जाण्याचा संभव फार, हाच प्रसंग राजवाडे यांनी भा. इ. सं. मं. वर आणला आहे.

अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकांतील चित्पावन समाजाचा धार्मिक, सामाजिक आणि राजकीय वर्तनाचा जो इतहास प्रसिद्ध आहे. ज्यावरून चालू मन्वंतरांतसुद्धां जीं कित्येक बिनतोड प्रमेयें ठरविण्यांत आलेंली आहेत, आणि तद्विषयक सरकारी दप्तरांपासून तों कालच्या रौलटकमिटीच्या रिपोर्टापर्यंत एकजात एकच स्वरांत नमूद केलीं आहेत, तीं सर्व चित्पावन समाजांतील प्रत्येक व्यक्तीस एकसारखी लागू करणें, केव्हांहि न्याय्य होणार नाहीं. संस्कृतीच्या बाबतींत चित्पावन समाजानें गेल्या दीडशें वर्षांत जी भरारी मारली आहे, तीमुळें त्यांच्यात सुद्धां विद्वान्, विचाररक्षम, तत्वज्ञ आणि समभावना राखणारे महानुभाव बरेच दृष्टीस पडतात. परंतु एकंदर समाजाच्या व्याप्तीच्या मानानें असल्या महात्म्यांची संख्या अत्यंत अल्पतम (मायक्रॉस्कोपिक मायनॉरिटी) आहे. म्हणनूच ज्याप्रमाणें एका दुर्योधन व्यक्तीमुळें कौरवपांडवांच्या अठरा अक्षौहिणी सैन्याचा निष्कारण फडशा उडाला, त्याचप्रमाणे अल्पसंख्यांक परंतु बेजबाबधार चित्पावन व्यक्तींच्या कृष्णकृत्यामुळें संबंध समाजालाच काळोखी लागण्याचे प्रसंग वरचेवर यावेत. ही गोष्ट विशेष चिंतनीय आहे. देशबांधव या नात्यानें आम्हांला चित्पावन समाजाच्या संस्कृत्यांबद्दल आनंद वाटणें आणि दुस्त्कृत्यांबद्दल खेद होणें हें अगदी साहजिकच आहे; परंतु त्यांची प्रवृत्ति त्यांच्या ऐतिहासिक कारस्थानी परंपरेकडे जेव्हा आतांप्रमाणेंच कधी कधीं वळून मागें पहाते, तेव्हां त्या त्या बेजबाबदार व्यक्तिला ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न करणें, हें प्रत्येकाचे कर्तव्यकर्म आहे. तें आम्हीं प्रामाणिकपणानें बजावीत असतां कोणास एकदा जणादुणा शब्द निरूपणाच्या आवेशांत आमच्या लेखणींतून पडला असल्यास तो दोष आमचा नसून वाग्युद्धाचा आहे. हेंहि सांगितल असे नहीं. स्वतःच्या व स्वज्ञातियांच्या दृष्कृत्यांचा ब्राह्मणांना कधींच किळस येत नाहीं, त्यांची ब्रह्मवांत्युत्पन्नत्वाची धमेंड अझून पुरी जिरलेली नाहीं. स्वतःचे दोष दुसऱ्यांच्या माथीं थापण्याची त्यांची खुमखुम अझून बंद पडलेली नाहीं. महाराष्ट्रीय ब्राह्मणेतर ज्ञातींत कायस्थ प्रभू ही एकटीच ' आर्टिक्युलेट ' (चौकशी, बोलकी, असे म्हणतांच कांरे चा जबाब देणारी) ' कम्युनिटी ' आहे. कै. शाहू छत्रपतींच्या ' लोकशाही चळचळीत ' मुळें ब्राम्हणेतर नांवाखाली मराट्यांत मुसकीच्या हक्काची जाणीव होऊन त्याना अलीकडे वाचा फुटली आहे. तरी आजपर्यंत अखिल ब्राम्हणेतर ज्ञातींच्या ''आर्टिक्युलेट ' पणांचे प्रतिनिधित्व कायस्थ प्रभूनींच इमानानें बजावलेलें आहे. असल्या कायस्थाविषयी मराठ्यांचें व इतर ब्राह्मणेतरांचे मन बिथरून त्यांत वैमन्यस्य पाडल्याशिवाय, चित्पावनादि ' राष्ट्रीय ' ब्राह्मणांना त्यांच्यावर कुरघोडी चढवितांच येणें शक्य नाहीं, हाच ब्रह्म ह्यांम्हणांच्या सर्व चवळीचा गुप्त हेतु

आहे कै. शाहू छत्रपति एकदा प्रस्तुत लेखकाला म्हणाले " ऑ. गोखले मोठे पेट्रियट खरे. पण मला ते एकदां पुण्याच्या स्टेशनवर भेटले असतांना मी माझ्या चळवळीची दिशा त्यांना सांगितली. बहुजनसमाज---जागृतीचें तत्त्व अक्षरशः मान्य करून ते मला किंचित् ठासून म्हणाले की, हा प्रयत्न करतांना ब्राम्हणांसारख्या जागृत समाजाला डिंवचण्याचा यत्न करूं नका. Don't try to tease the articulate community like the Brahmins. सारांश, ठाकरे, टिळक झाले काय किंवा गोखले झाले काय, सर्वांच्या पेट्रिऑटिझममध्ये ब्राम्हणी वर्चस्वाचा एक रिझर्व कंपार्टमेंट आहे. त्याला कोणी हात लावूं नका म्हणतात. ब्राम्हणांनीं आपल्या वर्चस्वाचा टेंभा मिरविण्याचें सोडल्याशिवाय किंवा ब्राम्हणेतरांनींच ब्राम्हणांना दूर झुगारून दिल्याशिवाय ब्राम्हणेतरांना आत्मोद्वाराचा मार्ग कसा चोखळतां येईल, हें मला समजत नाहीं. कितीहि केलें तरी ब्राम्हण अखेर आपल्या जातीवरच जातो, याचें मी प्रत्यक्ष अनुभवाचे लाख दाखले देईन. मग ठाकरे साहेब, तुमचें मत कांहींहि असो." सदसद्विवेक बुद्धीला न ठकवितां प्रत्यक्ष अनुभवच सांगायचा तर गेल्या १५-२० वर्षांतील आमच्या जनसंपर्काचा परिणाम पाहिला तर कै. शाहू छत्रपतींचे उद्‌गार बहुतांशीं खरे आहेत, यात संशय नाहीं, सामान्य नियमाला अपवाद असतात, हें तत्व पूर्ण ध्यानांत ठेवून, असें म्हणावयास हरकत नाहीं कीं, ब्राम्हण—मग तो चित्पावन असो, यजुर्वेदी असो, किंवा कोणिहि असो-त्याच्या आपमतलबाला किंचितही धक्का लागण्याची वेळ आली की, तो सर्व देशबंधुपणाचें नातें विसरून ब्राह्मणातरांवर सापाप्रमाणें उलटण्यास कमी करणार नाहीं. सावकारींत मारवाडी पत्करला पण ब्राह्मण सावकार पत्करत नाहीं व्यापारांत गुजराथी, भाट्ये, मेमन, मुसलमान,पार्शी व्यापाऱ्यांशी सरळ केलेली चढाओढ त्यांच्या अभिनंदनास पात्र होते. पण ब्राह्मण व्यापारी भेटला तर तो वेळीं आपलें नाक कापून दुसऱ्या ब्राह्मणेतर व्यापाऱ्येले अपशकून करायला किंवा शक्य तर त्याा खाली पाडायला मुळींच कसर करणार नाहीं. वाङ्मय क्षेत्रांतहि ब्राह्मणी दुष्टी बुद्धीचे परिणाम प्रत्येहीं अनुभवास येत असतात. तात्पर्य, अकीकडे सार्वजनिकपणाच्या, देशबंधुत्याच्या किंवा स्वराज्याच्या ब्राह्मणी पुराणांना केवढाहि ऊत आलेला दिसला, तरी अखिल ब्राह्मणेतर जनतेवर आपली निरंतरची कुरघोडी कायम ठेवण्याचा ब्राह्मणांचा गुप्त हेतु त्यांच्या काळजापासून कधींच निराळा होत नाहीं, अर्थात स्वराज्याच्या मार्गात कायस्थ प्रभूंच्या जातिधर्मोन्नतीच्या विरोधाची किंवा त्यांच्या वेदोक्त पुराणोक्ताची धोंड आडवी पडलेली नसून, ब्राह्मणांच्या शिरजोरपणाचा व विलक्षण कारस्थानी मनोवृत्तीची धोंड प्रत्यहीं अडथळे उत्पन्न करीत आहे. आजचें राजकारण क्षूद्र भिक्षुकी आहे. आचारी पाणक्यांना देशभक्त आणि माथेफिरू पिसाटांना महर्षि किंवा सेनापति बनविणाऱ्या या राजकारणाच्या धांगडधिंग्यांत महात्मा गांधीसारखा लोकोत्तर संन्याशीहि वैतागून गेला, मग इतरांची काय क्षिति ? राजवाड्यांचा उपद्‌व्याप वरवर पहाणाराला वैयक्तिक दिसेल, एका कायस्थ ज्ञातीपुरता संकुचित वाटेल, किंवा त्यांचे महत्व दिवाणखानी गप्पांपुरतें अगर वर्तमानपत्री नियमित भासेल, परंतु हें एक अति व्यापक डावपेचांचे सामुदायिक पाठबळांचे भयंकर भिक्षुकी कारस्थान आहे. एवढे ब्रह्मणेतर जनतेला जर नीट पटेल तर ब्राह्मणांच्या नानाविध डोंग धतुऱ्यांना बळी पडणाऱ्यांची संख्या पुष्कळच कमी होईलच, अशी आशा आहे.

युद्ध–मग तें प्रत्यक्ष समरांगणांतील असो किंवा वाग्युद्ध असो–तें वाईटच. तें सुरूं असतांना प्रतिपक्षियांवर सोडलेले बाण प्रथम जरी युद्धाच्या आवशात बेगुमानपणानें आणि कठोर अंतःकरणानें सोडलेले असतात. तरी युद्धाची किंवा चकमकीची परिसमाप्ती होऊन सैन्य आणि सेनानी शिबिराकडे परतू लागले म्हणचे युद्धकालीं घडलेल्या अत्याचाराबद्दल प्रत्येक योद्ध्यास वाईट वाटल्याशिवाय रहातच नाहीं हा मनुष्य-धर्मच आहे. भा. इ. सं. मं. नें सध्यांच्या अत्यंत नाजुक परिस्थितींतच चां. का. प्रभू समाजावर अत्यंत घाणेरडे आरोप करण्यास पुढें व्हावें आणि त्या आरोपांचा प्रतिकार करण्यासाठी आम्हालाहि आमचें कोदंड सज्ज करणें भाग पाडावें ही गोष्ट अत्यंत शोधजनक भासत आहे. भगवान श्रीकृष्ण त्याना सुबुद्धि देवो।

ॐ शांतिः शांतिः शांतिः

## मराठ्यांचा इतहास फांसावर चढला

## [प्रबोधन १६/८/२२]

स्वराज्याच्या, राष्ट्रप्रेमाच्या व स्वातंत्र्यांच्या पुराणांना हल्ली कितीहि कढ आलेला असला आणि त्या कढांत बऱ्याचशा विवेकभ्रष्ट ब्राह्मणांच्या आदरयुक्त प्रेमाचा कढ जरी आटोकाट येत असला, तरी ब्राह्मणेतरांवर आपली कुरघोडी सनातन चिरंजीव करण्याच्या धडपडी ब्राह्मणांनीं, विशेषतः राष्ट्रीय चित्पावनांनीं चालू क्षणापर्यंत अव्याहत चालविलेल्या आहेत. या त्यांच्या खटपटी कुशाग्र विद्वत्तेच्या पांघरूणाखाली वाटेल तसल्या कारस्थानांची अंडीं उबवीत असतात. राष्ट्रीय चित्पावनांचे डांवपेच आता पुष्कळ चित्पावनेतरांच्या व अनेक विवेकी चित्पावनांच्या ध्यानांत आल्यामुळें , ते सहसा यांच्या तोंडून कोसळणाऱ्या अद्वैत गटारगंगेच्या लोंढ्यापासून बरेच दूर असतात. हें जरी खरें आहे. तरी त्या गंगेच्या पंचनीं पडून राष्ट्रीय चित्पावनांच्या पायांतल्या पायतणाचा मान मिळविण्यासाठीं धाधावलेले शेकडों शिखंडी आज ब्राह्मणेतरांत सांपडणें अशक्य नाहीं. एकट्या चित्पावनांबद्दल किंवा सर्रास ब्राह्मणांबद्दल जरा कोठें कोणी निषेधाचा ब्र काढला कीं ही अजागळ शिखंडीची जंबुकसेना लगेच कोल्हेकुई करावयास लागते कीं ' हा शुद्ध जातिद्वेष !' पण या विवेकशून्य महामूर्खांना अझून हें उमजत नाहीं कीं ब्राह्मण-ब्राह्मणेतरांतील कोणताहि तंटा घेतला तरी त्यांत पहिली आगळीक राष्ट्रीय चित्पावनांचीच असते. त्यांनीं ' अरे ' म्हणतांच ' कारे ' चा प्रतिध्वनि न काढण्याइतकें ब्राह्मणेतर आजच कांहीं षंढ झाले नाहींत. ऑफेन्सिवचें पातक राष्ट्रीय चित्पावनांनीं केल्याशिवाय ब्राह्मणेतरांनीं डिफेन्सिवचीं सणसणीत खेटरें त्याना कधींहीं हाणलेलीं नाहींत, हें आम्ही सप्रमाण पुराव्यानें वाटेल तसें सिद्ध करून द्यायला तयार आहोंत. चार पांच वर्षांपूर्वीचा **कायस्थ प्रभू विरूद्ध भारत इतिहास संशोधन मंडळ** हा वाद घ्या; किंवा सध्यां सुरू असलेला चित्पावन बोडस विरूद्ध भंडारी समाज वाद घ्या ; यांत पहिली आगळीक कोणाची ? हें चित्पावनांच्या पायांतले पायपोस बनलेल्या व घरांत चुलीपाशी बसून अभेदभावाच्या कहाण्या कुजबुजणाऱ्या नामर्द षंढांनीं कां विचारांत घेऊं नये ? भा. इ. से. मंडळानें राजवाड्यांच्या हस्तें कायस्थ प्रभूंना ' नीच बीजाचे, उलट्या काळजाचे, मराठी साम्राज्याला आग लावणारे ' वगैरे ठरविण्याचा पद्धतशीर दस्तऐवजी हलकटपणा केला नसता तर आम्हालाहि कडकडीत टीकेचा तडाखा मंडळाला भडकविण्याची काय जरूर होती ? परंतु आमच्या **कोदण्डाचा टणत्कार** होतांच, ' एकानें गाय मारली म्हणून दुसऱ्यानें वासरूं कशाला मारावें ? ' असा आम्हांला साळसूदपणाचा उपदेश करायला पुष्कळ ' नीच बीजाचे, उलट्या काळजाचे, साम्रज्यद्रोही ' कायस्थन शिखंडी पुढें आले होते. याच हरामखोराच्या पगडीशिलेदारपणामुळें मंडळाला अखेरचा पट्ट्याचा हात दाखविण्याचें कार्य ठार झाले आणि कायस्थांच्या ' साम्रज्यद्रोहा ' चा पुणेरी चित्पावन ताम्रपट आचंद्रार्क त्यांच्या उरावर थै थै नाचायला जिवंत राहिला. सध्यां चित्पावन बोडसानें पेटवून दिलेलें भंडाऱ्यांच्या अस्पृश्यत्वाचें कारस्थान पाहिलें तरी त्यांतहि आगळीक किंवा ऑफेन्सिवचा दोष चित्पावनांकडेच आहे, हें सर्वांनी नीट लक्षांत ठेवावे. हें प्रकरण एवढें भयंकर माजलें असतांहि राष्ट्रीय पत्रांत त्याचा नुसता नामर्निर्देशहि होत नाहीं, याचा ब्राह्मणेतरांतील चित्पावनी पायतणांवर कांहींच का उजेड पडू नये ?

(शा.म.मु.) एन ४०२०–२८ (११३५–४–२००५)

एका तत्त्ववेत्त्यानें कोठेंसें लिहिल्याचें स्मरतें की " You kill the history and yopu kill the man " इतिहास ठार करा कीं माणूस मेलाच ! इतिहास हें राष्ट्राचें जीवन आहे. समाजाचा प्राण आहे. हा प्राणच ठेंचला कीं काम झालें. यासाठींच जेते लोक प्रथम ज़ित लोकांच्या इतिहासाचा बालेकिल्ला जमीनदोस्त करतात. ब्राह्मणेतरांना कवडीमोल ठरविण्याची राष्ट्रीय कामगिरी प्रथम भारत इ. सं. मंडळानें आपल्या हातीं घेण्याचा उपक्रम केला. पण त्या कामीं त्याना हातपाय पोळून घेण्याचा अनवस्था प्रसाद लाभल्यामुळें, त्यांनीं सध्यां तरी या दिग्विजय संपादनाच्या मार्गाचा संन्यास केलेला दिसतो. संन्याशाला शेंडी फुटणार नाहीं असें नाहीं ! सामुदायिक प्रयत्नाला परशुराम यथास्थित न फळल्यामुळें, आता राष्ट्रीय चित्पावनांनीं व्यक्तिशः तुरळक हल्ले चढवून ब्राह्मणेतरांच्या इतिहासाचा मुर्दा पाडण्याच्या खटपटी चालू ठेविल्या आहेत. या कामीं पुण्याच्या पुण्याईचे मुंबईकर, धुळेकर, मिरजकर व ठाणेकर अभिमानी रात्रंदिवस राष्ट्रीय खस्ता खात आहेत. अस्पृश्योद्धाराच्या वल्गना चालल्या असतांना, भंडारी बांधवांना धेडा मांगांच्या पंक्तीला बसविण्याचा बोडसाचा प्रयत्न आणि आतां ठाण्याच्या तळेपाळीवर विद्वत्तेच्या खांबाला ' मराठी दप्तरा ' च्या दुसऱ्या रुमालाच्या सरगांठींत मराठ्यांच्या इतिहासाला फांसावर चढविण्याची श्री. विनायक लक्ष्मण भावे यांची कामगिरी, याच खंस्तांचें द्योतक आहे. मराठेशाहीचा इतिहास सामान्यतः कितीही उज्वल असला, कितीही अभिमानास्पद असला व कितीहि वर्णनीय असला, तरी त्यांत चित्पावन पेशव्यांच्या सैतानशाहीची काळीकुट्ट डांबर नखशिखांत भरलेली आहे, हें शल्य चित्पावनांना रात्रंदिवस सलत रहावें, यात निसर्ग विरूद्ध असें कांहीं तेव्हां, एनकेन प्रकारेण हा इतिहास उलटासुलटा कसा करता येईल, पेशव्यांच्या तोंडाची काजळी ब्राह्मणेतरांच्या बापजाद्यांच्या थोबाडावर बेमालून कशी डसवता येईल आणि सर्रास चित्पावनांच्या बोकांडी इतिहास पुराणदि ग्रंथांनीं लटकविलेली क्षुद्रोत्पत्तीची घारेपड चित्पावनेतरांच्या गळ्यांत कशी गपचूप घालतां येईल, यावर अनेक विचित्रवीर्य चित्पावन पंडितांच्या अकला अलीकडे भवतिनभवतीचे घाणे हांकीत असतात. याविषयीं सर्व महाराष्ट्रीयांना जाहीर स्पष्टोक्तीचा इषारा देतांना सन १९१९ सालांत प्रसिद्ध झालेल्या आमच्या **ग्रामण्यांचा साद्यंत इतहिास** या ग्रंथांत असे उद्‌गार काढले होते, कीं '' सध्या ऐतिहासिक व्यक्त्यांच्या बाप्तिरम्यांचा धुमाकूळ सुरू झाला आहे. सावित्रीबाई ठाणेदारणीला कोणी कायस्थ प्रभू ज्ञातींतून चित्पावन जातींत ढकलीत आहेत ; कोणी तिला कादंबरींतील नायिका म्हणत आहेत ; कोणी नाना फडणीसाच्या अंतःकरणाच्या खाणींतून कोहिनुरांचे ढीगच्या ढीग बाहेर काढीत आहेत ; कोणी त्याच्या मनोमय भूमिकेवर नक्षीदार गालीचे पसरण्याच्या गडबडीत आहेत ; कोणी गोपिनाथपंत बोकीलाला शिवाजीची क्षिटणीशी वतनी बहाल देण्याच्या धामधुमींत आहेत ; कोणी हेमाडपंतालाहि ब्राह्मणी पोषाख चढविण्याच्या तजविजींत आहेत ; तर कोणी मराठ्या आठवल्याला चित्पावनी बाप्तिस्मा देण्याच्या खटपटींत आहेत. असा मोठा ऐतिहासिक क्रांतीचा काळ आलेला आहे. तेव्हा या भानगडींत काय काय उलाढाल्या होतील तें पाहिलें पाहिजे. न जाणो, उद्यां अफझुलखान हा शिवाजीचा मामा ठरण्याचा बराच संभव आहे ; कारण कृष्णानें कंस मामाला ठार मारले म्हणून आणि मुरारबाजी हा चित्पावन असल्याचाहि दस्तऐवजी पुरावा सांपडणार नाहीं कशावरून ? '' हे आमचे उद्‌गार

वाचून त्या वेळीं दांत काढून हंसणाऱ्यांनीं आतां भाव्यांचा ' दुसरा रुमाल ' मुद्दाम डोळे फाडून पहावा, असें आम्ही आवाहन देतों. अफझुलखान शिवाजीचा मामाचसा काय, पण वामनाच्या त्रिपाद पराक्रमाप्रमाणे आमच्या या ठाणेदार लाखापतीचा ' मराठी दफ्तर ' प्रकाशनाच्या इजा बिजा आणि तिजा रुमालाचें पाऊल महाराष्ट्र इतिहास-सुंदरीच्या उरावर पडतांच, शिवाजी छत्रपतिमहाराज हे चित्पावन जातीचे ठरल्याशिवाय खास रहाणार नाहींत, अस भविष्य आह्मी आजच करून ठेवतों. ठाणकर वामनानें आपल्या दुसऱ्या पावलांत बाळाजी आवजीला तर बेछुट पहिल्या नंबरचा पागल ठरविला आहे ; छत्रपति सातारकरांना राष्ट्रद्रोही ठरवून, तत्कालीन शहाण्यांनीं प्रतापसिंहासारख्या ' हरामखोरा 'ला साताराच्या माळावर एखाद्या झाडाला जिवंत उलटा टांगून कोल्ह्या कुत्र्यांकडून कां फाडविला नाहीं, म्हणून त्यांच्या नांवानें कडकडा बोटे मोडलीं आहेत ; प्रतापसिंहाचे साथीदार क्षत्रिय मराठे व कायस्थ प्रभू यांनींच इंग्रेजांशीं घरभेद करून मराठी स्वराज्याचा प्राण घेतला, म्हणून या लाखापति भाव्यांनीं त्या सर्व मेल्या मुडद्यांच्या खाका वर खेंचून त्यांना ठाण्याच्या तळेपाळीवर ' वन्समोर ' फांशीं दिले आहे ; आणि विशेष राष्ट्रीयपणाची नवलाई म्हणजे-वाचकहो, नीट शुद्धीवर येऊन ऐका-जगांतलें कितवें आश्चर्य कोणास कळे ! नीट शांतपणाने भाव्यांची ही चालू चातुर्मासांतली कहाणी ऐका–शेवटले रावबाजी हे मोठे धाडसी पराक्रमी राजकारणी व मराठ्यांच्या स्वराज्याकरितां अखेरपर्यंत आपल्या जिवाचें रान करणारे मोठे शूर तलवारबहाद्दर मर्द होते, काय म्हणतां ? विश्वास बसत नाहीं ? वाचकहो, भावे तुह्मा आह्मा सर्वांना मूर्ख ठरवून असें सांगतात कीं रावबाजी स्वतःच रणशूर रणनवरे होते असें नाहीं, तर त्यांची नवरी उर्फ बायको-नव्हे, चुकलो रावबाजीची पट्टराणी-ही सुद्धां रणनवऱ्याची रणनवरी होती. त्या हरामखोर प्रतापसिंहानें मराठे व कायस्थ पागलांच्या नादीं लागून महात्मा रावबाजीचा गळा जर कापला नसता, तर-तर-तर काय आज बहार झाली असती ! पुण्याच्या माणकेश्वराचा तंबोरा आज ठाण्याच्या ठाणकेश्वर भाव्यांच्या हातांत आला असता. बोलून चालून इतिहास-संशोधनच तें. मग बाळाजी विश्वनाथाचा खापरपणजा शिवाजीमहाराजांच्या हाताखालीं दसहजारी सुभेदार म्हणून कां उपटूं नये ? आणि हबशानें जलसमाध दिलेला बाळाजीचा भाऊ जानबा भट खुद्द पुण्याचा सुभेदार असल्याचें सिद्ध कां होऊं नये ? अस्सल रक्ताच्या अस्सल चित्पावन इतिहाससंशोधकांच्या तावडींत सांपडणारे कोणते दस्तऐवज आजपर्यंत कमअस्सल ठरले आहेत ? एकहि नाहीं. भा. इ. सं. मंडळाच्या चतुर्थ संमेलनवृत्तांतला राजवाड्यांचा दिग्विजयी कायस्थ दीपसुद्धा कमअस्सल ठरवून जिवंत कायस्थांना विझवितां आला नाहीं. बाकी, कायस्थांत विद्वान् इतिहासज्ञांचा कांही दुष्काळ पडला नाही हो. राजवाडे प्रकरणाच्या वेळीं कायस्थांच्या घरोघरच्या मोलकरणीसुद्धां इतिहाससंशोधक बनल्या होत्या. पण अखेर काय ? त्यांच्या बांगड्यांच्या कणकण किणकिण नादांतच त्या प्रकरणाचें पर्यावसान होऊन, राजवाड्यांच्या निबंधाची नथणी एकजात कायस्थ मर्दांच्या नाकांत चिरकालची जाऊन बसली ती बसलीच! भाव्यांच्या दुसऱ्या रूमालाचें वारसें लावायला श्री. दत्तात्रय विष्णु आपट्यांच्या हाताला हात लावायलाहि एक कायस्थ पात्र श्री. भाव्यांना ठाण्याच्या तळेपाळीवर भटकतांना आढळलें. हें पात्र म्हणजे ' प्रभुरत्नमाला ' प्रसवून

कायस्थांच्या इतिहासाचीं पातळ भाजी करणारे व ' शिवदिग्विजय ' बखरीचा नैवेद्य बडोदेकर भिक्षुकदेवतेला दाखवून, तिचें मांतेरे करणारे राजमान्य राजेश्री सखाराम गणेश मुजुमदार हें होय. पहिल्या रूमालाच्या वेळीं ' असलबरहकूम ' चें सर्टिफिकेट मिळविण्यासाठीं श्री. भाव्यांनी असेच दोन तीन अजागळ कायस्थ निवडून काढले होते. या खेपेस त्यांना बडोदें संस्थानांतील गडावरच्या यां मुजुमदार गडकरी कायस्थ पात्राचा लाभ झाला! अलभ्य लाभच म्हणायचा?

श्री. भाव्यांचा ' पहिला रूमाल ' असाच अस्सल लेखणीच्या पोटी जन्माला आलेला आहे. त्या वेळीं राष्ट्रींय पत्रकारांनीं, अतांच्या लोकमान्य कर्त्याप्रमाणें, त्या रूमालाची तळी आकाशाला भिडे इतकी उंच उचलेली होती. त्यावेळीं आम्ही या रूमालाबद्दल असा स्पष्ट अभिप्राय दिला कीं, " तीन अनभ्यस्त लेखकांनीं पौराणिक धाटणीवर एक बखरवजा लिहिलेलें भारूड ठाणें येथील ' मराठी दप्तरांतील १ ला रुमाल ' म्हणून सन १९१७ सालीं प्रसिद्ध झालें आहे. संशोधकांनें व प्रकाशकांनें या भारूडाचे महत्त्व प्रस्थापित करण्यासाठी सर्टिफिकेटांचा वगैरे बराच फार्स केला आहे. परंतु हें भारूड म्हणजे निवळ ऐकीव ऐतिहासिक गप्पांचें एक अव्यवस्थित व अविश्वसनीय पोळें आहे. यांत ऐतिहासिक सत्यापेक्षां हरदासी गप्पांचा भरणाच रगड आहे. " (ग्रामण्य पृ. १३२ फूटनोट.) पुष्कळांना हा आमचा अभिप्राय एरंडेलाप्रमाणें रेचकदाता वाटला व ठाणें पुणें येथील चारपांच कायस्थ चष्मापगडीधरांनीं त्याबद्दल आपली ' कायस्थी नापसंती ' झिळमिळ्या फलकावून व्यक्तहि केली. इतक्यांत प्रो. जदुनाथ सरकारचा दंडुका या रूमालावर पडला. ' शिवाजी आणि शिवकाल ' या इंग्रजी पुस्तकाच्या ५०२ पृष्ठावर प्रोफेसरांनी स्पष्ट नमूद केलें कीं **" Utterly worthless expansion of Sabhasad with forged letters and imaginary details "** [ हें चोपडें बनावट पत्रें आणि काल्पनिक मजकुरानें भरलेलें सभासदी बखरीचें भरंसाट वाढविलेलें अत्यंत भिकारडें व कवडी किंमतीचें रूप आहे.]सोनारानेंच कान टोचल्यामुळें वरील पगडीधरांच्या एका कानावर कलथलेल्या पगड्या लगेच सरळ बसल्या कीं नाहीं, आम्हांस माहीत नाहीं.

श्री. भाव्यांचा हा ' चखोट ' ग्रंथ वाचून ' पेशवाई बुडाली ' असें म्हणणाऱ्या इसमाची ताबडतोब ठाण्याच्याच वेड्यांच्या आश्रमांत रवानगी करावी लागेल. हा महाग्रंथ ग्रंथकारानें भारत इ. सं. मंडळाच्या एका जबाबदार बैठकींत वाचल्याचें आम्हाला कळतें. ही गोष्ट खरी असेल तर मंडळाने आपला अभिप्राय त्वरित प्रसिद्ध करावा, असा आमचा आग्रह आहे. हिन्दवी स्वराज्याचा खून कोणी पाडला, याचा भरपूर पुरावा महाराष्ट्रापुढें मांडण्यासाठीं **शंभर वर्षापूर्वीचें महाराष्ट्र** हा ग्रंथ आम्ही लिहीत आहोंत. त्यांत भाव्यांच्या रुमालाच्यां चिंधड्या उडविण्याइतका दस्तऐवजी पुरावा व विवेचन येईलच. इतिहासाचें क्षेत्र, ब्राह्मणेतरांच्या गफलतीमुळें, जरी राष्ट्रीय चित्पावनांनीं सर केलें असलें, तरी त्यांच्या ऑफेन्सिवला डिफेन्सिवचीं उलट सलामी न देण्याइतका ब्राह्मणेतर समाज कांहीं निर्विर्य झाला नाहीं; किंवा ऐतिहासिक सत्याची निश्चिति चित्पावनांना हस्तगत झालेल्या चिठोऱ्यांवरच ठरण्याचा नाना फडणीशी मामला आज हयात नाहीं, हे त्यांनी पूर्ण लक्षांत ठेवावें.

------

### श्री. विनायक लक्ष्मण भावे यांचें

# विश्वामित्री इतिहास-संशोधन.

### [ प्रबोधन १-९-१९२२ व १०-१०-२२ ]

लोकाश्रयाच्या अभावीं गतप्राण झालेल्या ' मराठी दप्तर ' संस्थेला स्वतःच्या हिंमतीवर तशीच फरफटत ओढून तिच्या पोटीं ' दुसऱ्या रूमाला ' ची बळजबरीची प्रसूति करणाऱ्या श्री. भाव्यांच्या या नूतन अपत्याला आंगड्या कुंचड्याचां आहेर करण्यापूर्वी त्यांनी चित्रमयजगत्च्या जुलै १९२२ च्या अंकांत पृष्ठ २७८-७९ वर **शिवाजींच्या वंशकुळीचें** जें चिकित्सापुराण सांगितलें आहे, त्याचा आजच्या अंकीं विचार करण्याचें योजिलें आहे. प्रथमच आम्हीं मोकळ्या मनानें नमूद करून टाकतों कीं, श्री. भावे यांचा व आमचा ( राजवाड्यांप्रमाणेंच ) कोणत्याहि प्रकारचा वैरभाव नाहीं. त्यांच्या ग्रंथाशिवाय आमचा त्यांचा निकट परिचय केव्हांहि झालेला नाहीं; फार काय पण आम्ही निदान या घटकेपर्यंत कोणीही परस्परांस पाहिलेलें नाहीं. तेव्हां चिकित्सेच्या कांटेरी समरांगणावर वादविवादाच्या भरांत एकादा कलमी वार जेर झालाच, तर त्याच्याबद्दल कोणी कोणावर द्वेषबुद्धीचा आरोप करण्याला वास्तविक कांही जागा नाहीं श्री. भावे यांचा साहित्य व इतिहासविष्यक उद्योग प्रशंसनीय आहे. त्यांचा ' नेपोलियन ' अझून आमच्या हातीं गवसला नसला, तरी त्यांच्या ' **महाराष्ट्र सारस्वत** ' ग्रंथाचा रसास्वाद आम्ही अत्यंत आनंदाने एक दोन वेळां नव्हे, एकूण आठ वेळां लागोपाठ घेतलेला आहे. परंतु श्री. भावे झाले काय किंवा राजवाडे झाले काय, ते कितीहि प्रबूद्ध व स्वार्थत्यागी इतिहास-साहित्य संशोधक असले, तरी हातीं सांपडेल त्या भल्या बुऱ्या चिठोऱ्यावर जेव्हां ते आपल्या अकलेला तणावा देऊन विचित्र सिद्धातांची निष्पत्ति सिद्ध करूं पहातात, तेव्हां मात्र त्यांच्या विद्वत्तेवर पुण्याच्या डेक्कन बँकेचा प्रसंग ओढवतो. याला साधा व्यवहारीक दृष्टांतच द्यायचा तर आम्ही असें म्हणू कीं, ' मोड तोड तांबा पितळ ' करणारा मारवाडी उद्यां जर मेटल ॲनलायझरचें ( धातुसंशोधन ) काम करूं लागेल, तर तें जितकें हास्यास्पद क्वचित तिरस्कारापद होइल, तितकेंच दूषणार्ह कार्य ही भावे ॲन्ड कंपनी ऐतिहासिक गोष्टींची ठरवाठरव करूं लागली म्हणजे घडतें. यापेक्षां ही मंडळी राजवाड्यांच्या खंडाप्रमाणें जुने कागदपत्र जशाचे तसे नुसते छापून प्रसिद्ध करण्याचाच क्रम ठेवतील, तर त्यांचे उपकार महाराष्ट्र विसरणार नाहीं. मराठ्यांच्या इतिहासाचें साहित्यच जेथें अझून पुरें उमगलेलें नाहीं, तेथें लेकाच्यानों ठाम सिद्धांत कसले ठोकीत बसतां? भारत इ. सं. म. च्या चतुर्थ सं. वृत्तांतील ' कायस्थदीपाबद्दल ' आमचा वाद हाच होता. राजवाड्यांनीं तें जीर्ण गळाठें जसेंच्या तसें प्रसिद्ध केलें असतें तर आम्ही किंवा कोणीहि त्याची दखल केली नसती. सांपडला दस्तऐवज छापला. त्याचें महत्व ज्याचे ते घेतील पारखून. दीपाला दिपवायला प्रदीप कांही मेला नव्हता. तोहि आणखी छापला असता. पण साहित्य कलेक्टर राजवाडे जेव्हां आपला योग्य अधिकार विसरून त्या गळाठ्याच्या जोरावर इतिहास-डिक्टेटर बनले व कायस्थ प्रभू समाजाला तुम्ही असेच आणि तुम्ही तसेच वगैरे बेजबाबदार वेदान्ती जजमेंट देऊं लागले, तेव्हां त्यांच्या विद्वत्तेला पायबंद लावणें मंडळालासुद्धां जरूर पडलें. ऐतिहासिक गोष्टींचे सिद्धांत सिद्ध करण्याचें काम ऐतिहासिक कागदपत्रें हुडकून जमा करण्याइतकें खास सोपें नाहीं. तें काम

किती कठीण आहे, तें करण्याची पात्रता कोणाला असते, आणि ती पात्रता केव्हां प्राप्त होते, याविषयी ताळेबंद नियम खुद्द राजवाडे प्रभृतींनींच वेळोवेळी अनेक ठिकाणीं व्यक्त केलेले असूनसुद्धां, स्वतःच्या अकलेचा ' दीप ' पाजळतांना मात्र त्या नियमांची त्यांना मुळीच आठवण होत नाही हें कसें? खुद्द राजवाडेच काय म्हणतात ते पहा. " एकादी मोडकी तोडकी बखर किंवा फाटकी तुटकी पोथी सांपडली म्हणजे संशोधन झाले, असे समजण्याचा आतां काळ राहिलेला नाही. " (इ. ऐ. पृ. १९) " कारागीर कितीही कुशल असो, कितीही नकशी काम करणारा असो, अज्ञांच्या आग्रहानें व स्वतःच्या उतावीळपणानें तुटपुंज्या सामग्रीच्या लेच्यापेच्या जोरावर तो जर इमारत उठवून देण्याची हांव बांधील, तर त्याच्या या प्रयत्नाबद्दल तज्ञांच्या मनांत सकरुण तिरस्कार उत्पन्न होईल. तशांत आहे ती तुटपुंजी सामग्री मुबलक व भरपूर आहे अशी समजून स्वतः इतिहासलिलिखिषुच (?) करून घेउन चालूं लागला, तर त्याच्या अज्ञपणाची कमाल झाली समजावयाची. त्यांत ही मराठ्यांच्या इतिहासाची रूपरेघा सर्व कळली, नवीन शोधानें फार तर एखाद दुसरी काना कोपऱ्यातील नवीन बाब कळली तर कळेल अशी भावना एखाद्या लिलिखिषूनें उराशी धरली, तर त्याने आत्मवंचना करून घेतली, असेंच तज्ञांचे मत पडेल. ( इ. ऐ. पृ. २९ ) परंतु हाच नियम वारंवार ते दृष्टीआड कसा करतात याचें प्रत्यंतर म्हणजेच त्यांनी व त्यांच्या पुणेकर, धुळेकर, ठाणेकर, मिरजकर सांप्रदायिकांनी मराठ्यांच्या इतिहासातील अनेक गोष्टींचे सिद्धांत ठरविण्याचे केलेले ' राष्ट्रीय ' उपद्व्याप पाहिले म्हणजे दिसून येतें. कोणत्याहि काळाच्या इतिहासाच्या तपशिलाची ठरवाठरव करतांना, तत्कालीन परिस्थिति कशी होती आणि अमूक बाबतींत तत्कालीन लोकमताचा रंग कसा काय होता, इत्यादि अनेक गोष्टींच्या भूमिकेशी निर्णयकाचें तादात्म्य झाल्याशिवाय त्याला निश्चित निर्णय लावतां येणेंच शक्य नाहीं. बाळाजी आवजीच्या वेळच्या राजनिष्ठेच्या कल्पनांचे स्वरूप आधुनिक कायस्थांच्या कल्पनांच्या चष्म्यांतून पाहून ठरवूं म्हटलें, तर ' तें श्वान एक तुकड्यास्तव चार नाना ' या कव्युक्तीपलीकडे बाळाजीची किंमत अधिक ठरणार नाहीं. आधुनिक राजकीय चळवळींच्या चष्म्यातून शिवकालीन चळवळींच्या तपशिलाची ठरवाठरव म्हणजे शुद्ध गाढवपणाच नसेल तर निदान वेडेपणा तरी खास होईल. तद्वतच प्रचलित विचारक्रांतीच्या दृष्टीने शिवकालीन् ग्रामण्यांच्या तपशिलाचा उहापोह करून निर्णय-निश्चितीचा तोरा मिरविणें हा गाढीव मूर्खपणा होय. कोणतीही गोष्ट त्रयराशिकाच्या धाटणीवर ठरवूं म्हटलें तर मोठाच अनवस्था प्रसंग ! पण राजवाडे भावे प्रभृती मंडळी येथून तेथून एकजात त्रयराशिके. एका बाईला चार मुलें तर पांच बायांना वीस मुलें झालीच पाहिजेत, अशी त्यांच्या विधानांची नेहमी धाटणी असते. अपवाद परिस्थिति-भिन्नता इत्यादि गोष्टी विचारांत घेण्याची या शहाण्यांना मुळीच शुद्ध नसते. यांची आजपर्यंची राजवटच अशी कीं **आधीं सिद्धांत आणि मग संशोधन.** अर्थात् निश्चित सिद्धांतासाठीं सरळ मजकुरांतुन सुद्धां वांकड्या विधानांचे धागे ओढून काढणें या शिवाजीराव कलमदान्यांच्या ' शाई भरल्या हाताच्या हाताचा मळ ' होतो. कायस्थदीप पाजळतांना संभाजीनें कायस्थ प्रभूंच्या धार्मिक हक्कांसंबंधीं दिलेल्या प्रतिकूल जजमेंटाची लोणकडी थाप जेव्हां राजवाड्यांनीं बिनदिक्कत झोंकून दिली, तेव्हां एका १२ वर्षाच्या पोराच्या गळ्यांत आपण कसली घोरपड लटकवून, आपल्या पोरकटपणाचें प्रदर्शन करीत आहोंत, याचें

त्यांना भान राहिलें होतें काय ? राजवाड्यांनी हा पोरकटपणासुद्धां एका दस्तऐवजाच्या पुण्याईवरच केला होता. नाहीं असें नाहीं. पण तो चिठोरा कितपत विश्वसनीय आहे; तो कोणी कां कशाला लिहून ठेवला आहे; यांतल्या मजकुरांत सुसंगतपणाचें व विसंगतपणाचें प्रमाण किती आहें; बाळाजी आवजीविषयीं ' बाळा परभू नाशिक पंचवटीचा ' राहणारा, असलें दिव्य ऐतिहासिक ज्ञान प्रसविणारा लेखक पाजी कीं गाजी, याचा विचार करायला ' इतिहास-संशोधनेश्वर ' राजवाड्यांना फुरसत होती कुठें ? आधीं सिद्धांत मग संशोधन, या राष्ट्रीय सूत्राबरहुकूम कायस्थांची बदनामी करणारा सांपडेल तो पुरावा त्यांच्या तोंडावर झुगारून देण्यापलीकडे त्यांना विशेष कांहीं करावयाचेंच नव्हतें. मग या असल्या झटपट रंगारी निर्णयकर्मांत १२ वर्षाचा मराठा संभाजी वेशासंपन्न वाईकर चित्पावन लेल्याचा बाप जरी ठरला तरी राजवाड्यांनीं पर्वा ठेवीली नाहीं. (ज्या चिठोऱ्याच्या पुण्याईवर १२ वर्षाच्या संभाजीच्या गळ्यांत कायस्थांच्या धर्मनिर्णयाच्या कमिशनरशिपचें लोढणें राजवाड्यांनीं अडकविलें, तो-चिंतामणराव सांगलीकराच्या ' राष्ट्रीय ' (अ)धर्म ग्रंथप्रसूति फॅक्टरींत निपजलेला--' अस्सल ' दस्तऐवज आम्ही आमचे मित्र श्री. वासुदेव सिताराम बेंद्रे मु. पुणें यांच्या मार्फत भारत इं. सं. मंडळास १९२१ साली आहेरादाखल नजर पाठविला आहे. त्याच्या अस्सलपणाचा निर्णय द्यायला मंडळास अझून फुरसत झाल्याचें दिसत नाहीं) या स्वार्थी मानव सृष्टींत परस्पराविरूद्ध भावनांच्या झटापटींचे दाखले नेहमींच आढळणार. त्यांतून निश्चित सिद्धांत काढून वास्तवीक परिस्थितींचें रूप निस्पृहपणें जगापुढे मांडण्याचें कर्म फार बिकट आहे. हें न्यायधीशाचें कर्म बजावणारा असामी रामशास्त्र्याच्या मसाल्याचा असावा लागतो. इतिहास संशोधनाचा धंदा करणारे आधुनिक राजवाडे भावे देव प्रभृति लोक विद्वत्तेच्या किंवा कार्यकनिष्ठतेच्या बाबतींत खानदेशी श्रीखंडापेक्षां कितीहि घट्ट असले, तरी पेशव्यांच्या सैतानशाही परंपरेचें रक्त त्यांच्या धमन्यांत सणाणत असल्यामुळें ऐतिहासिक निर्णयकर्माच्या बाबतींत त्यांची नालायकी इतिहाससिद्ध आहे. त्यांनी रामशास्त्र्याच्या निस्पृहनिर्णयकौशल्याचा दिमाख चित्पावनेतर अफाट महाराष्ट्रीयांपुढें तरी मिरविण्याचें साहस करूं नये. मराठ्यांच्या इतिहासाविषयीं या लोकांच्या सिद्धांतांची मराठ्यांना ( अखिल चित्पावनेतर महाराष्ट्रीयांना ) मुळींच जरूर नाहीं. उलट सुलट दस्तऐवज नेहमींच सापडणार. परंतु त्यांच्या अस्सल कमअस्सलपणाचा निर्णय ठरवायला स्वराज्यद्रोही पेशव्यांच्या सांप्रदायिकांनीं विनाकारण आपलीं हिणकस देशप्रीति जाहिर लिलावांत विक्रीस काढू नये. जनतेचाच जेथे या लोकांवर सर्व बाबतींत पूर्ण अविश्वास व अनादर, तेथें यांच्या सिद्धांतकौमुदीचे चोज पुरवायला त्यांच्या बगलबच्चांशिवाय दुसरा कोण लाभणार ? ब्राह्मणेतर दुनियेला पायांतलीं खेटरें ठरविण्यासाठीं खाटे बनावट (अ)धर्मग्रंथ राशीगणति लिहून फैलावा करणारे चिंतामणराव सांगलीकर, निळकंठ शास्त्री थत्ते, मराठ्यांच्या स्वराज्याबरोबरच त्यांच्या इतिहासाचीं साधनें जाळून पोळून फस्त करणारा बाळाजीपंत नातू, बनावट कारस्थानांची उभारणी बेमालूम करण्यासाठीं खोटे शिक्के, सह्या, करारनामे वगैरेची पूणेरी टांकसाळ काढणारा बाळकोबा तात्या केळकर, असलीं इरसाल ' राष्ट्रीय ' रत्नें ज्या खाणींत पैदा झालीं, त्याच खाणींतल्या बृहस्पतीनीं ऐतिहासिक सिद्धांतनिरूपणाचे खरे राजवाडे हेच असा कितीहि कंठशोष करून दुनियेला चकविण्याचा भाव धरला, तरी त्यांच्या पुराणांवर कोण विश्वास

ठेवणार ? आजहि दुनियेला झुकविणारें व भविष्यकाळाच्या इतिहासज्ञांची सपशेल दिशाभूल करणारें वाङ्मय ' राष्ट्रीय ' सज्जन निर्माण करीत आहेतच कीं नाहीत ! मिसेस ॲनी बेझंटनें मैत्रेयावताराचा पुकारा करतांच, **अवतारकृत्याचा पोरखेळ** म्हणून कोलाहल करणारा केसरी आज कै. टिळकांच्या बाबतींत कसले खेळ खेळत आहे ? टिळकांच्या एका कल्याणानें तर त्यांना चतुर्भुज विष्णु बनवून पुणेरी पगडी जोड्यासह शेषाच्या उरावर नेऊन बसविलें आहे. आणखी शंभर वर्षांनीं ' टिळकांना दोन हात होते कीं चार हात होते ? टिळक देव की माणूस ? ' असल्या वादविवादावर टिळकांचा शेषाशायी फोटो प्रमाणभूत मानून ' ते चार हाताचे ईश्वर होते ' असा ऐतिहासिक सिद्धांत त्या वेळचे एखादे भावे किंवा राजवाडे खास ठरवतील. इतकेच नव्हे तर रामकृष्णादिकांप्रमाणे टिळक महात्म्याचा पावनपणा सिद्ध करणारा ओवीबद्ध **टिळकायन** ग्रंथ आजच कोणीतरी खरडीत बसला असेल. इतका भरपूर दस्तऐवजी व फोटोग्राफी पुरावा जरी पुढे आला, तरी भविष्यकाळीं टिळकांचा खराखुरा माणुसपणा सिद्ध करणारा विरोधक त्या वेळी खात्रीनें अस्तित्वांत असेलच. परंतु राष्ट्रीयांच्या राष्ट्रीय प्रयत्नांचा रोंख मात्र भावी इतिहासाला कसा घोंटाळ्यांत टाकणारा आहे, एवढेच येथें दिग्दर्शित केले आहे. भविष्य काळाला ठकविण्याची ज्यांची चतुराई इतकी दूरदृष्टीची, त्यांनींच भूतकालांतल्या गोष्टींना आपल्या कल्पनांचे बरे वाईट रंग फासटून, तर्कांच्या हातबोटावर त्या वाटेल तशा नाचविल्या तर आश्चर्याला जागाच कोठें उरतें ?

चित्रमयजगतमधील ' शिवाजीची वंशकुळी ' हा लेख श्री. भावे यांनी ' आधी सिद्धांत मग संशोधन ' याच धोरणाने खरडलेला आहे. शिवाजीला राज्याभिषेकसमयीं ब्राह्मणांकडून जो उपसर्ग पोंचला, त्या विषयीं आधुनिक ब्राह्मणबुवांना हरहमेश लज्जेनें खालीं मान घालण्याचे प्रसंग येतात. विशेषतः सार्वजनिकत्वाच्या ढोंगाखालीं स्वतःच्या तुंबड्या भरण्याचे कार्य साधण्यासाठीं राष्ट्रीय ब्राह्मणांनीं जेव्हा शिवाजी-उत्सवाला डोक्यावर घेऊन नाचण्याची सुरुवात केली, तेव्हांपासून तरी शिवकालीन ब्राह्मणांच्या कृतघ्नतेचे व शिरजोरपणाचे मोठेमोठे काटे राष्ट्रीय चळवळ्यांच्या पायांत विशेष ठळक रीतीनें रुतूं लागले. शिवाजीला विरोध करणाऱ्या ब्राह्मणांच्या उपसर्गाबद्दल स्पष्ट स्पष्ट पुरावे देणारे शेंकडो कागद आजपर्यंत इतके उपलब्ध झालेले आहेत, आणि खुद्द राजवाड्यांनींसुद्धां आपल्या बहुमोल खंडांत ते प्रसिद्ध केले आहेत, कीं ब्राह्मणांच्या हरामखोरीचा तो पुरावा उलथून पाडण्यासाठीं शिवभारताचा कर्ता परमानन्द भटचसा काय, पण श्री. भावे यांनी अखिल ब्राह्मण समाजाच्या बेचाळीस पूर्वजांना जरी मदतीला बोलाविलें तरी तो मृत्युलेखा इतकाच अनिवार्य व चिरंजीव राहणार आहे. तथापि शिवकालीन ब्राह्मणांच्या भिक्षुकशाही शिरजोरपणाच्या धडाडलेल्या होळीवर आपल्या विद्वत्तेच्या उपरण्याचें पांघरून घालून त्याची धग किंचित थंड पाडण्याचा त्यांनी प्रस्तुत जो अव्यापारेषु व्यापार केला आहे, तो पाहून त्यांच्या प्रयत्नाबद्दल जरी एखाद्या राष्ट्रीय प्राण्यानें त्यांचा सकौतुक गौरव केला, तरी साधारण बुद्धीमत्तेचा मनुष्यसुद्धां त्यांची कींव केल्याशिवाय राहणार नाही. शिवाजी महाराज आणि शिरजोर ब्राह्मणवर्ग, यांचा परस्पर संबंध किती ' प्रेमाचा ' होता, याविषयीचे पुरावे महाराष्ट्राला आज भाव्यांपासून घ्यावयाचे नाहीत. आज महाराष्ट्रात असें एकहि सुशिक्षित कुटुंब आढळणार नाही की ज्याला शिवराज्याभिषेकोत्सव प्रसंगी ब्राह्मणांनीं

धर्माच्या नांवावर खेळलेल्या धुळवड शेणवडीची माहिती नाहीं. परंतु सिद्धांताला संशोधनाचा बाप ठरविणाऱ्या श्री. भाव्यांना हा प्रचलित इतिहास उलथून पाडण्यासाठीं दोन सिद्धांत सिद्ध करावयाचे आहेत आणि म्हणूनच त्या धोरणानें त्यांनी कांही सटरफटर आधार जमा करून आपली विधानें रंगविण्याचा प्रयत्न केला आहे. ते सिद्धांत हेच (१) शिवाजीविरूद्ध ब्राह्मणांनीं कोणतेहि आक्षेप घेतले नाहीत किंवा कसलाहि धार्मिक बखेडा केला नाहीं, आणि (२) बाळाजी आवजींनें गागाभट्टाला दक्षिणेंत आणण्याची जी खटपट केली तिची कांही जरूर नव्हती, तो त्या रिकामटेकड्यानें स्वतःच्या स्वार्थासाठीं हकनाहक उपद्व्याप केला. सारांश आमचे लेखनकुशल विश्वमित्र ब्राह्मणांच्या थडग्यावर उमटलेली पागलपणाची सृष्टि अलगज उचलून बाळाजी आवजीच्या थडग्यावर निर्माण करण्याची खटपट करीत आहेत. श्री. भावे म्हणतात '' बाळाजी आवजींनीं उत्तरेस श्रीक्षेत्र काशी येथे जाऊन मोठ्या **मिनतवारीनें गागाभट्टाची** समजूत काढून केवळ राज्याभिषेक समारंभासाठी त्यास दक्षिणेंत आणिलें, हें म्हणणेंहि बरोबर नाहीं. ''याचें कारण '' गागा हा शिवाजी महाराजांच्या जुन्याच परिचयाचा होता...आणि त्याला आणण्यांत बाळाजी आवजीच्या दगदगीची व श्रमसाहसाची मुळींच आपेक्षा नव्हती. '' भले बहाद्दर ! कलमाच्या एका फटक्यानें आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या सर्व बखरी आणि जस्टिस रानडे तेलंगापासून तों राजवाडे सरदेसाई सान्यापर्यंत दरोबस्त इतिहास संशोधक श्री. भावे यांनी अव्वल नंबरचे पागल ठरविले ! याचें नांव इतिहास-संशोधन.याला आधार कशाचा? तर एका शिवभारत पोथीचा, पोथीशिवाय आमच्या चित्पावन संशोधकांच्या अकलेचा '' दीप '' कधीच पाजळला जायचा नाहीं. आश्चर्य वाटतें ते हे की, शिवभारतापेक्षांही शेंकडों कागदपत्रांचे दस्तऐवजी महाभारत ब्राह्मणांच्या उरावर तेव्हां आदळलें असतांहि, त्यांच्या धार्मिक गुंडगिरीची तीव्रता कमी झाली नाहीं, ती आता भाव्यांनी परमानंदाचें चोपडें उकरून काढलें म्हणून थोडीच होणार आहे? परमानंद भटाच्या शिवनिष्ठेवर अखिल ब्राह्मणांचीं शिवद्रोहानें काळीं ठिक्कर पडलेलीं तोंडे उजळ होणें शक्य नाहीं. हेंचसें काय, पण गागाभट रायगडास आल्यावरसुद्धां '' **राज्याभिषेकाच्या वेळेस लागणारे मंत्र गागाभट म्हणेना**; सबब राजकीय धोरण त्याजपुढें मांडावें लागलें ''( मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष पृ. १६३ ) हे कशाचें लक्षण ?'' राज्याभिषेकापूर्वी अनेक वर्षे महाराष्ट्रांतील वैदिक ब्राह्मणांस महाराजांचें क्षत्रियत्व पूर्णपणे मान्य होतें '' याचे काय ? या प्रकरणाचे इतके मुबलक दस्तएवजीं पुरावें आजपर्यंत प्रसिद्ध झालेले आहेत आणि त्यांत ब्राह्मणांनीं शिवाजीला दिलेल्या कृतघ्नतेच्या उपसर्गाबद्दल इतकी स्पष्टस्पष्ट एकवाक्यता आहे कीं ब्राह्मणांच्या नकली उदारमतवादित्वाचें भाव्यांचें हें चित्पावनीं पुराण एखादें शेंबडें पोरसुद्धां मान्य करणार नाहीं. भावे म्हणतात '' मालोजीराजे हे ब्राह्मणांकरवीं आपलें घरात आग्निहोत्र चालवीत, व ब्राह्मण तो विधि यथासांग संपादित असत. '' असें शिवभारताच्या १ ल्या अध्यायांत म्हटलें आहे. पोथी लिहिणारा शिवनिष्ठ असल्यामुळें, त्यानें आपल्या तत्कालीन जातभाईंच्या मताची पर्वा न करितां, शिवाजी महाराजांविषयी आदर व्यक्त करण्यासाठीं असलें विधान घुसडलें असल्यास नवल नाहीं. चिटणीशी बखरींतसुद्धां शिवाजीच्या प्रबुद्धतेची माहिती देतांना षोडशविद्या आणि चौसष्ट कलांची सुप्रसिद्ध यादी मोठ्या भाविकपणानें त्यानें उदधृत केली आहे. म्हणजे त्यावरून शिवाजीमहाराज हे चांगले गाणारे, नाचणारे, जुव्वा खेळणारे होते,

असें विधान करणें पोरकट ठरल्याशिवाय कसे राहिल ? शिवाय मालोजीची पिढी व शिवाजीची पिढी यांत कांही शतक दोन शतकांचें अंतर थोडेंच होतें ? मालोजी जर खराच आग्निहोत्री असता तर शिवाजीवर शूर्द्रत्वाचें काहूर उठलें तेव्हां चाणाक्ष बाळाजीकडून नुसता नेत्रसंकेत होतांच शिवाजीनें आपल्या घरांतून आज्याचें अग्निपात्र आणवून ' क्षत्रियत्वाचा हा घ्या पुरावा ' म्हणून शिरजोर ब्राह्मणांच्या थोबाडावर ते भिरकवण्यास केव्हांहि कमी केलें नसतें, किंवा आपल्या आज्याच्या घरांत ' यथासांग अग्निहोत्र ' चालविणाऱ्या भटांना तात्काल बोलावून त्यांच्याकडून विरोधी ब्राह्मणबुवांची आहुति त्याच अग्निकुंडांत द्यायला खास मागें पुढें पाहिलें नसतें. एवढे मोठे जाडजूड इतिहास-संशोधक आणि त्यांना एवढी साधीं गोष्ट समजूं नयें ? मालोजीच्या घरांत जर अग्निहोत्र होतें, तर त्याचा मुलगा शहाजी आमरण मुंजीशिवाय कां राहिला आणि राज्याभिषेकाच्या घटकेपर्यंत शिवाजीचीहि मुंज का झाली नाही, याला श्री. भाव्यांचें काय उत्तर आहे ? खुद्द मालोजीची तरी मुंज झाली होती काय ? परंतु शिवाजी महाराजांविरूद्ध ब्राह्मणांच्या बापजाद्यांनीं केलेल्या भिक्षुकशाही बंडाचा अधमपणा झांकण्यासाठीं आणि बाळाजी आवजीच्या कामगिरीला ' कवडीमोल उपद्व्याप ' ठरवून त्याला पागल बनविण्यासाठी हे विचित्रवीर्य संशोधक आपल्या अकलेचे तारे कसे तोडतात तें पहा. ' महाराष्ट्र विद्वान् भिक्षुकांना महाराजांचे क्षत्रियत्व पूर्णपणें मान्य होतें. तसेंच तें इतर महाराष्ट्र ब्राह्मणांनाही मान्य व मंजूर होतें. इतर ब्राह्मणांना त्याचा पुरावा रोजच्या रोज दिसत होता. शिवाजी महाराजांनीं आपल्या तरवारीनें तें उत्तम प्रकारें शाबित केलें होतें. व तशांतूनहि कोणास शंका असल्यास ते वाटेल तेव्हां तें सिद्ध करण्यास आपली तरवार घेऊन तयार असत. **हें शाबित करण्यास कोणाहि मध्यस्थाच्या लटपटीची गरज नव्हती.** शिवाजी राजांचे मौजीबंधन राज्याभिषेकापर्यंत केलें नव्हतें. वयाच्या ४५ व्या वर्षापर्यंत मौजीबंधन न होणें ही बाब जरा नवलाची असली तरी एकंदरीनें गौण आहे. असल्या सबबींचा दरकार महाराष्ट्रानें केव्हांच केला नाही. [ओहो!] व शिवाजीचे क्षत्रियत्वाबद्दल संशय दाखवून **राज्याभिषेकास अडचणही उभी केली नाही.** '' मराठे बांधवांनो, विप्रोत्तम भावे यांचें हें अनन्य शिवनिष्ठेचें पुराण ऐकून शिवकालीन ब्राह्मणांबद्दल तुमची आढी आतां सोडून द्या. आणि ती ' उपद्व्यापी मध्यस्थ ' बाळाजी आवजीविषयी अतःपर धरा. इतकेंच नव्हें, तर शिवकालीन ब्राह्मणांच्या या सात्विकतेचें उतरायीं होण्यासाठीं, पुण्याच्या नियोजित शिवस्मारकाच्या शेजारीच अखिल महाराष्ट्रीय ब्राह्मण समाजाच्या वतीनें साळसूदपणाची वकीली करण्यास पुढें सरसावलेल्या या उलट्या बाहुल्याच्या चित्पावन संशोधकासाठी एक जयस्तंभ उभारा. अतःपर चिटणीस-सांप्रदायिक ' लटपट्या मध्यस्थ ' कायस्थांच्या नादीं मुळींच न लागतां यमाजी शिवदेव, नाना फडणीस, नारायणराव पेशवे, छत्रपतींच्या राजघराण्याची बडदास्त ठेवणारे रावबाजी, बाळाजी पंत नातू, भरदिवसा पुण्याची होळी करणारे महात्मा हरीपंत भावे इत्यादि थोर थोर सात्विक अवतारी पुरूषांच्या ' राष्ट्रीय ' वंशजांची कांस धरा. म्हणजे मुळशी पेट्यांतल्या धरणासारख्या अनेक इहलोकच्या वैतरण्या पार पडून ' राष्ट्रीय ' पेशवाईच्या पुनरूज्जीवनांत तुम्हाला इतिहासाच्या पुनरावृत्तीचें स्वानंदसाम्राज्य खास लाभेल, असा श्री. भाव्यांचा तुम्हाला इतिहाससिद्ध ' राष्ट्रीय ' संदेश आहे. हे ' लटपटे मध्यस्थ ' कायस्थ तुमचा घात करतील. सात्विकतेचे अर्क जे ब्राह्मण त्यांनीं

शिवराज्याभिषेकास मुळींच कांहीं विरोध केला नाही. कशावरून म्हणतां ? कशावरून म्हणजे ? अहो, राज्याभिषेक कसा साजरा झाला त्याचा इतिहास पहा. तो पाह्याला फुरसत नसेल तर भाव्यांच्या सूत्रात्मक ' राष्ट्रीय ' वेदान्त पहा. भावे जेहेते म्हणतात " त्या उत्सवात समर्थ रामदास स्वामींनीं पूर्ण सहाय्य केलें. मोरोपंतांनीं अभिषेक केला. हणमंत्यांनी पवित्र जलसिंचन केलें. गागाभटजींनीं मंत्र म्हटले. व हजारों ब्राह्मणांनीं आशिर्वाद देऊन आपली पूर्ण संमति जाहीर केली. " घ्या. ब्राह्मणांच्या स्वराज्यप्रेमाचा आणि छत्रपतिनिष्ठेचा आणखी पुरावा काय पाहिजे ? रामदासापासून तों आशिर्वाद द्यायला ( भीक मागायला नव्हे ! ) रायगडावर धांवत पळत आलेल्या पाच हजार भिक्षुकांपर्यंत पाहून घ्या सारे एकजात ब्राह्मण. कायस्थ मराठे प्राणी सारे ठार मेले होते कीं काय नकळे ! पण त्याचाहि खुलासा श्री. भावें येणेंप्रमाणें करतात. " पण या प्रकरणांत ज्यास आपला हेतु साधला नाही ते मात्र तोंडानें नुसती वटवट करीत हात चोळीत बसले व राज्याभिषेकाच्या ज्येष्ठ महिन्याचा त्यांनी फाल्गुन मास केला. " चित्पावनी पेंचाची एकच टांग मारतांच शिवाजीचा इतिहास पहा आमच्या भाव्यांनी कसा उलटा पालटा केला तो ! ज्येष्ठांत फाल्गुन उरकणारे कोण ? भाव्यांचे पूर्वज ब्राह्मण तर खास नव्हते; कारण ते सारे राज्याभिषेकविधींत गुंतले होते. कोणी ' पूर्ण सहाय्य ' देत होते, कोणी ' जलसिंचन ' करीत होते आणि बाकीचे ' आशिर्वाद ' घोष करीत होते. अर्थात असा हा मंगलविधि चालू असतांना शिमग्याच्या शंखध्वनींत फक्त ब्राह्मणेतर, विशेषतः कायस्थ प्रभू, त्यांतूनहि विशेषतः बाळाजी आवजी चिटणीस हेच काय ते रममाण झाले होते, असा भाव्यांचा राष्ट्रीय सिद्धांत आहे.

इतकें नीच वृत्तींचें बेजबाबदार विधान, राजवाड्यांच्या ' कायस्थदीप ' प्रबंधानंतर आज पांच वर्षांनीं पुनश्च महाराष्ट्रीयांपुढें येत आहे. ज्येष्ठांतच शिमगा काय , पण बाराही महिने अष्टौप्रहर ब्राह्मणेतरांच्या नांवानें बोंबाबोंब करण्यास सवकलेल्या या अकलेच्या धसांना, या चित्पावन इतिहास-संशोधकांना आम्ही पुनश्च बजावून ठेंवतों कीं अशा प्रकारच्या मल्लीनाथी बुरख्याखालीं प्रत्यक्षाप्रत्यक्ष होणारी बदनामी निमूटपणें सहन करण्याइतका ब्राह्मणेतर समाज आज मेलेला मुडदा नव्हे. बाळाजी आवजीच्या राष्ट्रसेवेला कवडीमोल ठरवून लोणकड्या थापांनी मराठे बांधवांच्या सहानुभूतीला बगलेंत मारण्याचा तुमचा राष्ट्रीय कावा न ओळखण्याइतके तेहि आज भोळसट राहिलेले नाहींत. शिवकालीन ब्राह्मणांच्या हरामखोरपणाचा विस्तार केवळ मराठी दप्तरांतच मर्यादित झालेला नसून त्याच्या पाळ्यामुळ्या परकीय बखरकारांनीं महाराष्ट्रातून स्वतः उपटून नेऊन पुराव्यासाठीं नीट जपून ठेविल्या आहेत. बाळप्रभू चीटणीसाच्या, किंबहुना तत्कालीन अखिल कायस्थप्रभू समाजाच्या उज्वल पराक्रमानें हतप्रभ ठरलेल्या चित्पावन समाजांतल्या राष्ट्रीय पंडितांनो, बाळप्रभू चिटणीसाच्या घराण्यावर स्वार्थलोलुपतेचा व ' लटपट्या मध्यस्थीचा ' म्हणजेच जवळजवळ उपद्व्यापी कुंटणपणाचा आरोप करण्यापूर्वी दहा अंक मोजून तुमच्या बेजबाबदार कृतघ्न लेखणीचा टांक न तोडाल तर आम्हां मानवी सल्लागारांच्या शक्ति जरी उद्यां निसर्गधर्मानुरूप थंड पडल्या तरी शिवरायानें कायस्थांच्या आणि मावळ्यांच्या रक्तानें प्राणप्रतिष्ठा केलेली ती महाराष्ट्राची जिवनदेवता तुमच्या जीभलीचे साइराइ टांक तोडल्याशिवाय खास रहाणार नाहीं हें लक्षांत ठेवा.

ब्राह्मणेतरांचा तेजोभंग करून, विशेषतः क्षत्रिय वैश्यांना शूद्राच्या कोंडवाड्यांत दडपून, आपला वरचढ सवता सुभा प्रस्थापित करण्यासाठीं भिक्षुकशाहीनें पुराणकाळांत **नंदान्तं क्षत्रिय कुल**! म्हणजे नंदानंतर क्षत्रिय वर्ग बी बीयाण्यांसकट ठार झाला, असें एक भिक्षुकी सूत्र उत्पन्न केलें. या सूत्राची उत्पत्ति झाल्यानंतरहि अनेक वेळां क्षात्रतेजानें भरतखंडाला गदगदा हालवून सोडलें. तरीसुद्धां चालू घटकेला त्याच सूत्रांचें मंडण करून क्षत्रियांच्या अस्तित्वाविरूद्ध कंठशोष करणारे हाजारों वे. शा. संपन्न भिक्षूक, शेंकडों विद्वान् चित्पावन व बृहस्पति शंकराचार्य आहेतच. क्षत्रियत्वाचें अस्तित्व जसें क्षत्रियांनीं अनेक वेळां आपल्या क्षात्रतेजानें सिद्ध केलें , त्याचप्रमाणें तें अनेक विवेकी ब्राह्मणांनीहि आपल्या मुर्दाड जातभाईंच्या हुल्लडखोर मतांची पर्वा न करतां, स्पष्टपणें मान्य केल्याचे दाखले इतिहासांत आहेत व आजसुद्धां अनेक सज्जन ब्राह्मण बोलून किंवा लिहून व्यक्त करतात. म्हणजे यावरून असा सिद्धांत काढतां यावयाचा नाहीं कीं क्षत्रियांचें अस्तित्व आज सर्रास सर्व ब्राह्मणांना ' पूर्ण मान्य ' आहे. अवघे तीन महिन्यांचें तात्पुरतें लष्करी शिक्षण मिळालें असतांहि, जर्मन-गरूडाची फ्रान्सवर आलेली भिरीरीची झांप परतविण्यासाठीं गेल्या महायुद्धांत कोंकणांतल्या ' नांगऱ्या ' मराठ्या जवानांनीं व अस्पृश्य मानलेल्या महारांनीं अद्‌भूत पराक्रम दाखविला. तो या दर्भसमिधाबहाद्दर भिकमाग्या भिक्षुकांना जरी अवगत नसला, तरी तो महायुद्धाच्या इतिहासांत, फ्रान्स, इंग्लडच्या हृदयांत आणि युरोपियन लढवय्यांच्या डोळ्यांत आदरातिशयाच्या सिंहासनावर विराजमान झाला आहे. पंजाबांतल्या शीखांचा व नेपाळांतल्या गुरख्यांच्या लढवय्येपणाबद्दल केवढा बोलबाला ! पण पारीसच्या सरहद्दीवर जेव्हां जर्मनांच्या डुकरमुसंडीला तोंड देण्याचा प्रसंग येऊन बितला तेव्हां हे शीख आणि गुरखे कसे भेदरले, बिकानेरच्या महाराजांनीं ' छत्रपति शिवाजी महाराजांच्या नांवाला तुम्ही काळीमा फांसणार काय ? ' असा जाठ रजपूत मराठ्यांना सवाल टाकतांच मेजर डफळ्यांनीं सर्रकन् म्यानातून तलवार काढून उंच उभारतांच जाठ रजपूत मराठ्यांनीं **बोलो शिवाजी महाराजकी जय** अशी गगनभेदी गर्जना कशी केली आणि पाण्याचा एक घोंटही न पितां ताबडतोब जर्मनीच्या मोर्च्यावर लांडगेतोडीचा हल्ला चढवून अवघ्या ६ तासांत जर्मन गब्रूंना पारीस पासून ४७ मैलांवर रेटीत नेऊन कसे उद्वस्थ केले, या गोष्टी **केसरी**च्या महायुद्धवार्तेत किंवा खाडीलकरांच्या मासिक युद्धचर्चेच्या चित्रमयजगती श्राद्धविधींत जरी ठळकपणें नमूद नसल्या, तरी त्यांची प्रत्यक्ष परिचयाची साक्ष द्यायला बिकानेरचे रणगाजी महाराज आज हयात आहेत. पेशव्यांच्या सैतानशाहीनें बोंथट केलेल्या महाराष्ट्रीय महार मराठ्यादि क्षत्रियांच्या तलवारी कावेबाज इंग्रज कुंफणीनें आर्म्स आक्टाच्या कफणाखालीं दफणल्या दिवसापासून, त्या बिचाऱ्यांच्या सर्व महत्वकांक्षा नांगरांत अडकून राहिल्या. तरी पण वेळ येतांच रक्तांत जिवंत राहिलेल्या क्षात्र तेजानें युरोपखंडांत मराठ्यांच्या तलवारीचें पाणी दाखविलें, युरोपियन लढवय्यांच्या तोंडचें पळालेलें पाणी आनंदाच्या व विस्मयाच्या अतिरेकानें डोळ्यांतून बाहेर काढलें आणि ' ब्रेव्हो इंडियन टायगर ' [ जीते रहो हिन्दुस्थानका शेर ] असा प्रशंसेचा जयजयकार आबालवृद्ध युरपियन स्त्रीपुरूषांच्या तोंडी सर्वत्र रूढ केला. क्षात्रगुणकर्माची ही प्रत्यक्ष जिवंत प्रचीती आजच्या जिवंत ब्राह्मणबुवांच्या उघड्या डोळ्यासमोर असतांहि, त्याच लढवय्या मर्द महारांना **अस्पृश्य** म्हणायला सर्रास ब्राह्मणांच्या जिव्हा चुकत नाहींत.कोंकण घाटावरच्या शिवाजीच्या याच रणधुरंधर मराठे जवानांना संबंध रत्नागिरी जिल्ह्यांत श्री. भावे बोडसांचा एकही जातभाई ' शूद्र ' अशी शिवी हांसडण्यास अझूनही शरमत नाहीं, किंवा शिववंशीय करवीरकर छत्रपतीनीं क्षत्रियोचित वेदोक्त धर्माचरणाचा आग्रह धरतांच टिळकांपासून

तों बोंडसापर्यंत एकजात चित्पावनांच्या अंतःकरणाची होळी पेटल्याशिवाय रहात नाहीं. **मराठे क्षत्रिय कीं शूद्र हा वाद शिवाजीच्या वेळेपासून चालला आहे व नुकतेच तंजावरच्या कोर्टानें कोल्हापूरच्या महाराजांस शूद्र ठरविलें, तरी तेवढ्यानें लोकांचे समाधान होत नाहीं,** ( चित्रमयजगत् वर्ण-व्यवस्था जाने. १९१९ ) हे ममईच्या बोडसानें काढलेले उद्‌गार श्री. भाव्यांच्या प्रत्यक्ष डोळ्यांत नसलें तरी डोळ्यांखालून खास गेले असले पाहिजेत. या बोडशी उद्‌गारांचा भावार्थ काय ? चालूं घटकेला ' आखिल महाराष्ट्रीय विद्वान् ब्राह्मणांना मराठ्यांचे क्षत्रियत्व पूर्णपणें मान्य आहे ' असाच भावार्थ निघतो काय ? श्री. भाव्यांनी स्पष्ट उत्तर द्यावें. क्षत्रियांच्या क्षात्रवीर्याचा जागताज्योत पुरावा महायुद्धानें ब्राह्मणांच्या छाताडावर प्रत्यक्ष पाय देऊन उभा केला असतांहि चालूं घटकेला क्षत्रियांचे अस्तित्व, विशेषतः मराठ्यांचें क्षत्रियत्व ज्या विद्यमान भावे बोडशी ब्राह्मणांना लवमात्र मान्य होत नाहीं, त्याच शहाण्या जातींतल्या शहाण्या भाव्यांनीं शिवाजीच्या क्षत्रियत्वाच्या " प्रत्यक्ष पुरावा रोजच्या रोज दिसत होता. शिवाजी महाराजांनी आपल्या तलवारींनें तो उत्तम प्रकारें शाबीत केला होता. व तशांतूनहि कोणास शंका आल्यास तो वाटेल तेव्हां सिद्ध करण्यास आपली तरवार घेऊन ते तयार असत. हें शाबीत करण्यास कोणाहि मध्यस्थाच्या लटपटीची गरज नव्हती. " असली मल्लीनाथी करतांना जनाची नसली तरी निदान मनाची तरी लाज बाळगली पाहिजे होती. क्षत्रियांनी आपलें क्षात्रतेज आतांप्रमाणेंच शिवकाळींहि जगाला पटवून दिलें होतें. आतांप्रमाणेंच त्यावेळींहि परमानंद भटासारख्या कांहीं विवेकी ब्राह्मणांनीं क्षत्रियांच्या अस्तित्वाला मान्यता दिली होती. आतांप्रमाणेंच क्षत्रियांच्या क्षात्रवीर्याची तरफदारी करणारे बरेच संस्कृत ग्रंथ त्या वेळी जिवंत होते. शंकेखोरांचें शंकानिरसन करण्यासाठीं शिवाजी ' तरवार घेऊन तयार असे ' आजचे क्षत्रिय महायुद्धातील जखमा व बिल्ले घेऊन तयार आहेत. आणि आजचा मुर्दाड ब्राह्मण समाज मराठ्यांच्या किंवा अखिल क्षत्रियांच्या क्षत्रियत्वाबद्दल जितकी बोडशी ' पूर्ण मान्यता ' दाखवीत आहे, तितकाच उलट्या काळजाचा टिळकीपणा शिवाजीच्या वेळच्या भिक्षुकांत होता, म्हणूनच बाळाजी आवजीला, २० व्या शतकांतल्या ठाणेकर भाव्यांच्या विद्वत्तेची पर्वा न ठेवतां, १७ व्या शतकांतल्या भटांची मगरूरी जिरविण्यासाठीं गागाभटांकडून परस्पर पैजारा भडकविण्याची ' लटपटी मध्यस्थगिरी ' करावी लागली. शिवाजीच्या क्षत्रियत्वाची साक्ष देणारे दस्तऐवजी पुरावे व जिवंत माणसे रगड होतीं. त्यांत दरबारी विवेकी ब्राह्मणहि असतील. नाहीं असें नाहीं. परंतु तेवढ्यानें किंवा परमानंद भटाचें चोपडें आतां बाहेर पडल्यानें, राज्याभिषेक प्रकरणीं शिवाजीविरूद्ध धर्मद्रोही कृतघ्नतेची बंडाळी ब्राह्मणांनीं माजविलीच नाहीं, असल्या चित्पावनी विधानानें शिवकालीन ब्राह्मणांची काळीं तोंडे स्वच्छ करण्यासाठीं श्री. भाव्यांच्या प्रस्तुत लेखाशिवाय इतर सर्व उपलब्ध ऐतिहासिक साहित्य जाळून खाक करावे लागेल. शिवाजीच्या व अखिल मराठयांच्या क्षत्रियत्वाबद्दल परमानंदकृत शिवभारताशिवाय आणखी शेंकडो दस्तऐवजी पुरावे अझूनहि सांपडतील. परंतु तेवढ्यानें ब्राह्मणांचा हरामखोरपणा रतिमात्र कमी न होतां, उलट एवढ्या समकालीन जबरदस्त प्रत्यक्ष पुराव्याला विरोध करणारांचा भिक्षुकी गाढवपणा मात्र अधिकाधिक सिद्ध होणार आहे, हें भाव्यांनीं खूप ध्यानांत ठेवावें. ' एखाद्या परमानंदानें, जयराम पिंड्यानें अथवा गागाभट्टानें शिवाजींचें क्षत्रियत्व आपपल्या ग्रंथांत नमूद करून ठेवलें, हा कांहीं " महाराष्ट्रांतील विद्वान् वैदिक ब्राह्मणांस महाराजांचें क्षत्रियत्व पूर्णपणें मान्य होतें " याचा पुरावा नव्हे, किंवा राज्याभिषेक प्रसंगी मोरोपंत पिंगळे, रघुताथ पंडीत प्रभृति मुर्दाड भिक्षुकांच्या उपरण्याखालीं ब्राह्मणांनीं केलेल्या हलकटपणाला खोटा ठरविणारा सिद्धांत नव्हे. महाराष्ट्रांतल्या

अखिल दर्भसमीधापटूंना जर भोसल्यांचें क्षत्रियत्व ' पूर्णपणें मान्य ' होतें, तर राज्याभिषेकाचा वेदोक्त विधि करणारा एखादा शंकराचार्य किंवा ' विद्वान ब्राह्मण ' त्या वेळीं कां पुढें आला नाहीं ? रायगडावर दक्षिणेचें शेण खायला धांवत पळत गेलेल्या ब्राह्ममुखोत्पन्नांत काय एकहि विद्वान् पुरोहित नसावा ? महाराष्ट्र ब्राह्मणांच्या उरावर काशीचा गागा आणून बसविण्याची काय जरूरी होती ? का येथले सारे वे. शा. संपन्न आणि शंकराचार्य अचानक पटकी येऊन मेले होते ? झालें होतें तरी काय ? या प्रश्नांचीं रोखठोक उत्तरें इतिहासांत नमूद आहेत. इतिहास जरी उद्यां मेला किंवा मराठी स्वराज्याप्रमाणेंच नातुसांप्रदायिकांनी ठार मारला, तरी ब्राह्मणांनीं शिवाजी महाराजांना दिलेल्या कृतघ्न उपसर्गाच्या तिडका मराठ्यांच्या आणि कायस्थ प्रभूंच्या रक्तांत वंशपरंपरेनें चिरस्थायी होऊन बसल्या आहेत. सडकेवरील खड्याइतके भावे बोडस निर्माण होऊन त्यांनीं जरी चित्रमय जगताचीं सर्व पानें खरडण्याचा राष्ट्रीयपणा जोरजोरानें चालू ठेवला, तरी त्या तिडका नष्ट करण्यासाठीं ब्रह्मदेवाची पुण्याई सुद्धां पुरी पडणार नाहीं,

आपण वादार्थ असें गृहीत धरून चालूं कीं, श्री. भाव्यांनी लावलेला शोध अक्षरशः बरोबर आहे, शिवाजींचे क्षत्रियत्व महाराष्ट्रीय ब्राह्मणांना पूर्ण मान्य होतें, आणि त्यांनीं राज्याभिषेक प्रसंगी कसलाही राष्ट्रीयपणा केला नाहीं यावर असा प्रश्न सहाजीकच उद्‌भवतो कीं जर शिवाजीचें ( अर्थात् अखिल मराठ्यांचें ) क्षत्रियत्व महाराष्ट्रीय ब्राह्मणांना जर ' पूर्ण मान्य होतें ' तर त्याच शिवाजीच्या वंशजांचें क्षत्रियत्व त्यांना एकाकी कां अमान्य झालें ? छत्रपतींना व सर्रास मराठ्यांना शूद्र शिवी हांसडण्याची त्यांची मर्जी कां लागली ? वेदोक्तच्याऐवजी पुराणोक्त विधींची त्यांच्यावर बळजबरी कां होऊं लागली ? ' क्षत्रिय कुलावतंस ' हा छत्रपतींच्या नांवामागें लागणारा मायना बदलून त्याऐवजीं ' भोसले कुलावतंस ' हा चित्पावनी मायना कागदोपत्रीं रूढ करण्याची चिंतामणराव सांगलीकराला अवदसा कां आठवलीं ? '' श्रीमंत महाराजांची मुंज्य पुराणोक्त विधि करून जाहली ही गोष्ट तुम्ही फारच उत्तम केली. '' हें सर्टिफिकीट नाना फडणीसानें छत्रपतींच्या चित्पावन जेलरास--' राजश्री बाबुराव स्वामींचे शेवेशी ' पाठविलें त्याचा अर्थ काय ? नाना फडणीसानें वेदोक्ता ऐवजीं पुराणोक्त मंत्रांनीं छत्रपतींच्या मुंजी तरी होऊं दिल्या, पण रावबाजीनें तर त्याहि अजीबात बंद केल्या* ! महाराष्ट्रीय ब्राह्मणास शिवाजींचें क्षत्रियत्व ' पूर्ण मान्य ' असल्याचाच हा दाखला काय ? प्रतापसिंह छत्रपतीच्या वेळीं मराठ्यांवर ब्राह्मणांनीं जी भयंकर ग्रामण्याची चढाई केली आणि ' कलींत क्षत्रिय नाहींत ' या मुद्यावर सातार्‍यांत जें भिक्षुकी रणकंदन माजविलें, तें याच मान्यतेचें द्योतक काय ? शिवाजी जर क्षत्रिय होता तर त्याचे वंशजच तेवढें शूद्र कसे ठरले ? नन्दातं क्षत्रियकूलम् झाल्यावर, महाराष्ट्रीय विद्वान दर्भधारकांच्या ' पूर्ण सहाय्याने ' शिवाजीला ' क्षात्रधर्मस्य नवावतारः ' ठरविले; मग पुढें कोणान्तं क्षत्रियकुलं झालें, तें श्री. भावे सांगू शकतील काय ? कोल्हापूरचा वेदोक्ताचा धुमाकूळ म्हणजे जिवंत ब्राह्मणांच्या राष्ट्रीयपणाचें जिवंत स्मारक. कोल्हापूरच्या शिववंशज छत्रपतींना शूद्र ठरविण्यासाठीं मेहेरबान भाव्यांच्या जातभाईंनीं आपल्या जीवाचें नांव शिवा ठेवण्यांत मुळीच कसूर केलेली नाही. उलट तेजावर प्रकरणांत कोल्हापूरकर छत्रपतींना व **सर्व मराठ्यांना** मद्रासच्या शूद्र मुदलियर जज्जानें शूद्र ठरविल्याचें ऐकून लोकमान्य लोकश्री महादेव राजाराम बोडस चित्रमयजगतामध्यें आनंदानें टिर्‍या कुटूं लागले ! कोल्हापूर वेदोक्त

---

* सातार्‍याचे राजे यांना राज्यभिषेक करावयाच्या पूर्वी मुंज करून मग राज्यभिषेक व्हावा अशी शिवाजी महाराजांची चाल होती ती श्रीमंतांनीं या वेळेस मना करून मुंज्य केल्याशिवाय राज्यभिषेक केला.

पेशवाईची अखेर. पृ. १४४।

प्रकरणांत राजोपाध्यांना शाहू छत्रपतींनीं गचांडी देऊन घरीं बसविलें, त्याबद्दल ज्ञानकोशकार डॉ. केतकर यांनीं आपल्या ' हिस्टरी ऑफ इन्डियन कास्टस् ' नामक ग्रंथांत ( पृ. ६० फूटनोट ) असे गर्वोक्तीचे उद्‌गार काढले आहेत कीं " पैशाच्या किंवा इतर लोभानें ब्राह्मण लोक वाटेल ते विधि वाटेल त्याच्या घरीं करण्यास सिद्ध होतील, अशी कोणाची जर समजूत असेल तर ती साफ चूक आहे. ब्राह्मणांचा स्वत्वाचा अभिमान जेहत्ते काय कथन करावा ! काय त्यांचे शील, केवढी धर्मचरणाची कडवी शिस्त आणि तीव्र स्वतंत्र निस्पृह बाणा ! आजला सुद्धां अशा एका निस्पृह ब्राह्मणानें आपल्या वंशपरंपरागत चाळीस हजारांच्या जहागिरीवर लाथ मारली, पण **शिवाजीच्या वंशजाच्या घराण्यांत वेदोक्त कर्म करण्याचें साफ नाकारलें.** " श्री. भाव्यांना आमचा सरळ सवाल आहे कीं आधुनिक विद्वान ब्राह्मणांचीं हीं मुक्ताफळें तुम्हांला काय सिद्धांत पटवीत आहेत ? शिवाजी तेवढा क्षत्रिय आणि त्याचे वंशज सातारकर व कोल्हापूरकर क्षत्रपति मात्र शूद्र, हें त्रांगडें श्री. भाव्यांसारख्या त्रयराशिकी संशोधकांनीच उलगडून दाखविलेलें बरें. तथापि आम्ही थोडी मदत करतो. शिवाजीचें क्षत्रियत्व मान्य करणाऱ्या तत्कालीन विद्वान महाराष्ट्रीय ब्राह्मणांना जर तुम्हांला स्वराज्यनिष्ठ, शिवप्रेमी व शहाणे ठरविणें असेल, तर त्याच शिवाजीच्या वंशजांना व अखिल मराठ्यांना शूद्र ठरविणाऱ्या पेशव्यांना व आधुनिक विद्वान् महाराष्ट्रीय ब्राह्मणांना स्वराज्यद्रोही, छत्रपतिद्रोही व गाढव ठरविण्याचा मॅनिफेस्टो जाहिर करा, आणि पेशव्यांची अगर आधुनिक बोडसकेतकरादि ब्राह्मण विद्वानांची अब्रु चव्हाट्यावर आणण्याचा निस्पृहपणा जर तुमच्यांत नसेल, तर शिवकालीन ब्राह्मणांच्या इतिहाससिद्ध पाजीपणावर पांघरून घालण्याचा पाजीपणा करूं नका. बापजाद्यांचा मुर्खपणा बिनशर्त कबूल करा किंवा स्वतःचा मूर्खपणा निस्संकोच कबूल करा, याशिवाय या त्रांगड्याचा तिसरा निर्णय लागणें शक्य नाहीं.

कायस्थ प्रभू समाजाच्या शिवकालीन राष्ट्रकार्याला व वीरवीरांगनांना कवडीमोल ठरविण्यासाठीं, कायस्थांनीं लिहून ठेविलेल्या आद्य बखरींना ' खोडसाळ ' ठरवून, त्यांची महाराष्ट्रेतिहास–विषयक कामगिरी हाणून पाडण्यासाठीं आणि एकट्या ब्राह्मणांच्या टाळक्यावर स्वराज्यनाशाचें फुटलेलें खापर येनकेन प्रकारेण सर्व ब्राह्मणेतरांच्या, विशेषतः कायस्थ मराठ्यांच्या बोडक्यावर अलगज ठेवण्यासाठीं अलीकडे जे ब्राह्मणी राष्ट्रीय प्रयत्न सुरूं आहेत, त्याचा दृष्य परिणाम श्री. भावे बोडसादिकांच्या लेखांतून प्रगट होत असतो. अर्थात या प्रयत्नांच्या धामधुमींत बाळप्रभू चिटणीसेच्या निंदेवर शिवकालीन ब्राह्मणांची स्वराज्यनिष्ठा, रंगो बापुजीवर पाखडलेल्या आगींत रावबाजींची कर्तबगारी, गागाभट्ट प्रकरणांतल्या कायस्थांच्या खटपटीच्या गाढवपणावर मराठ्यांना कायस्थाविरूद्ध चिथविण्याची राष्ट्रीयपंथ–प्रासादिक नातुगिरी, असले प्रकार इतिहास संशोधनाच्या नांवाखाली बेफाम बोकाळल्यास आश्चर्य नाहीं. कृतघ्नता ही राष्ट्रीय चित्पावन ब्राह्मणांच्या जीविताची जीवनदेवता असल्येमुळें, चिटणीशी कलमाच्या फटकाऱ्याच्या पोटीं अखिल चित्पावन समाजाचें सामाजिक अस्तित्व व राजकीय भाग्य जन्माला आलें, ही इतिहाससिद्ध गोष्ट आधुनिकांच्या स्मरणांतून नष्ट होऊन, केवळ पेशवे संप्रदायाच्या स्तोमासाठीं त्यांनीं बाळ चिटणीसादि प्राचीन पुरस्कर्त्यांवर लाथा झाडल्या, तर त्यांत बिघडलें कोठें ? शिवाय, सध्यां सुरू असलेल्या स्वराज्याच्या राष्ट्रीय शिमग्यांत हीं पुणेरी ठाणेरी कुत्रीं जर सर्रास ब्राह्मणेतरांवर भुंकण्यास कांकूं करतील, तर त्यांच्या संप्रदायाचा स्वाराज्याभिमान हिणकस ठरल्याशिवाय कसा राहील ? ब्राम्हणेतरांना स्वराज्यद्रोही ठरविल्याशिवाय ब्राह्मणांची स्वराज्यनिष्ठा प्रस्थापित होणेंच शक्य नाहीं.

---

# थोडा खुलासा.

प्रबोधनांत वरील लेखमाला प्रसिद्ध झाल्यावर ठाकऱ्यांवर अब्रुनुकसानीची घोरपड चढवितां येईल किंवा नाहीं, या बाबद भा. इ. सं. मंडळाच्या वार्षिक संमेलन प्रसंगी खासगी बैठकींत बरीच चळवळ सुरू होती. कांही पटाईत ब्राह्मण वकीलांची सल्ला घेण्याचीहि जारी खटपट झाल्याचें वृत्त आम्हांला पुण्याहून समजलें होतें. पण त्या वेळीं आम्ही त्याची दख्खल केली नाहीं. कायदेबाजीच्या कैचींत ठाकऱ्यांच्या चिंधड्या उडविण्यांत मंडळाला किंवा श्री. भाव्यांना पैशाचा तुटवडा पडणार नाहीं. श्री. भावे तर काय लाखाधीश आंहेत म्हणतात. सातारच्या एका बेगडी श्रीमंत कायस्थ प्रभूनें आमच्यावर उभारलेल्या किटाळाच्या सिद्धीसाठी जर आपली लंगोटी खेचली होती तर आमची व प्रबोधनाची मुस्कटदाबी करायला मंडळाभिमानी ब्राह्मण वीरांना कंबरा कसणें फारसें कठीण मुळींच नव्हतें. तो त्यांच्या हातचा मळ आहे. प्रश्न इतकाच कीं ठाकरे व्यक्ति तुरुंगांत गेली, ठार मारली गेली किंवा कालमानाप्रमाणें उद्यां मरण पावलीं, तरी तेवढ्यानें मंडळाच्या किंवा राजवाडे भावे प्रभृतीच्या कारस्थानांचें आणि कायस्थादि ब्राह्मणेतरांच्या बदनामीचें मंडन तें कसें होणांर? इंग्रजांच्या 'सैतानी' राज्याविरूद्ध 'राष्ट्रीय' चित्पावन कितीहि आदळ आपट करीत असले आणि त्यांच्या राज्यशकटाला ढासळून इंग्रेजी कायद्याला न जुमानण्याच्या त्यांच्या वल्गना कितीहि असल्या, तरी कायद्याच्या खलबत्त्यांत एकाद्या ब्राह्मणेतराचा चेंदामेंदा होत असेल, तर आपल्या सर्व वल्गना बासनांत गुंडाळून १२४ (अ) व १५३ (अ) ची कायदेबाजी खेळायला त्यांना मुळींच शरम वाटणार नाहीं, हें आम्ही जाणून आहों. शिवाय, जेथें मंडळाचे प्रयत्न कायस्थ प्रभूंना लौकिकदृष्ट्या हीन व क्षुद्र लेखून त्यांचे कायमचें तळपट उडविण्याचे आहेत, तेथें कायस्थ प्रभू ठाकरे कायदेबाजीच्या फांसावर चढला तर हिंदूंच्या अस्तित्वावर उठलेल्या कायस्थ प्रभू समाजांतील एक 'खटपट्या' व 'चळवळ्या' नाहींसा केल्याची पुण्याई तरी मिळेल! सामुदायिक तळपटासाठीं वैयक्तिक छाटबाजी करावीच लागते. एका सबंध समाजाची बदनामी करणाऱ्या शहाण्यांनी स्वतःच्या अब्रूची फाजील किंमत ठरविणें फाजीलपणाचे आहे.

बस् खलास!

———

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई